UGC CARE LISTED
ISSN No. 2394-5990

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे मंडळ, धुळे
या संस्थेचे त्रैमासिक

।। संशोधक।।

पुरवणी अंक ३ – मार्च २०२३ (त्रैमासिक)

● **शके १९४४** ● **वर्ष : ९०** ● **पुरवणी अंक : ३**

संपादक मंडळ

● प्राचार्य डॉ. सर्जेराव भामरे ● प्रा. डॉ. मृदुला वर्मा ● प्रा. श्रीपाद नांदेडकर

अतिथी संपादक

● प्राचार्य डॉ.सुनिल हेळकर ● प्रा. डॉ. प्रेमचंद गायकवाड ● प्रा. डॉ. गोवर्धन दिकोंडा

✷ प्रकाशक ✷

श्री. संजय मुंदडा

कार्याध्यक्ष, इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे ४२४००१
दूरध्वनी (०२५६२) २३३८४८, ९४०४५७७०२०

कार्यालयीन वेळ

सकाळी ९.३० ते १.००, सायंकाळी ४.३० ते ८.०० (रविवारी सुट्टी)

मूल्य रु. १००/-
वार्षिक वर्गणी रु. ५००/-, आजीव वर्गणी रु. ५०००/- (१४ वर्षे)

विशेष सूचना : संशोधक त्रैमासिकाची वर्गणी चेक/ड्राफ्टने
'संशोधक त्रैमासिक राजवाडे मंडळ, धुळे' या नावाने पाठवावी.

अक्षरजुळणी : सौ. सीमा शिंत्रे, वारजे-माळवाडी, पुणे ५८.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकेच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले आहे. या नियतकालिकेतील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

अनुक्रमणिका

१. **राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचा समाजसुधारणेचा ऐतिहासिक वारसा**

- प्रा. डॉ. धनंजय ना. मोगले ----------११

२. **महाराष्ट्रातील सत्यशोधक चळवळ आणि राजर्षी छत्रपती शाहू महाराज**

- डॉ. दिनकर रावजी मुरकुटे ----------१४

३. **राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे राजकीय सुधारणावादी विचार**

- सहयोगी प्रा. डॉ. अतुल हणमंत कदम ----------१९

४. **राजर्षी शाहू महाराज यांचे आर्थिक विचार व कार्य विशेष संदर्भ :**
(शेती, जलव्यस्थापन, व्यापार व उद्योग, सहकार, औद्योगिक धोरण)

- प्रा. सुभाष बाजीराव शिंदे ---------- २४

५. **राजर्षी छ. शाहू महाराज सामाजिक लोकशाहीच्या चळवळीचे एक आधारस्तंभ**

- डॉ.सुनिल शिवमूर्ती रजपूत ----------२८

६. **राजर्षी शाहू महाराज : एक अष्टपैलू व्यक्तीमत्व (इ.स. १८७४–१९२२)**

- प्रा.डॉ.सौ.अरुणा रविंद्र वाघोले ---------- ३०

७. **राजर्षी शाहू महाराजांचे कार्य आणि कर्तृत्व : एक अभ्यास**

- डॉ. अनिल शिवाजी टिके ----------३५

८. **राजर्षी शाहू महाराज व लोकमान्य टिळक संघर्ष आणि दुसरी बाजू**

- डॉ विश्वनाथ महादेव आवड ---------- ३९

९. **सामाजिक न्यायाचे प्रणेते : राजर्षी छत्रपती शाहू महाराज**

- डॉ.सज्जन उद्धव पवार ----------४३

१०. **राजर्षी शाहू महाराजांचे अस्पृश्यविषयक धोरण : एक अभ्यास**

- डॉ. संजय तुकाराम वाघमारे ---------- ४७

११. **राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे शैक्षणिक विचार**

- डॉ. बाळासाहेब मुळीक ----------५१

ISSN No. 2394-5990

१२. **अस्पृश्योउद्धारक राजर्षी छत्रपती शाहू महाराज**
- प्रा.डॉ. जनार्दन दामू परकाळे ---------- ५४

१३. **राजर्षी शाहू छत्रपती :आर्थिक धोरण नियोजक आणि अंमलबजावणीकार (प्रशासक)**
- सहा. प्रा. वसुंधरा दत्ताराम साळुंखे ---------- ५७

१४. **राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या कृषीविषयक सुधारणा**
- प्रा. डॉ. भूषण गोविंद फडतरे ---------- ६१

१५. **छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांचे शिक्षण विषयक विचार आणि कार्य**
- प्रा. मारोती जनार्दन कंधारे ---------- ६६

१६. **शाहू महाराज यांचे आर्थिक आणि सामाजिक कार्य**
- प्रा.विरेंद्र विश्वास आहेर ---------- ७१

१७. **राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे आर्थिक विचार**
- डॉ. पी. एन. डापके ---------- ७४

१८. **राजर्षी शाहू महाराज व सत्यशोधक समाज**
- प्रा.डॉ. हनमंत महादेव लोंढे ---------- ७८

१९. **अस्पृश्य समाजांच्या उन्नतीत राजश्री छत्रपती शाहू महाराजांची भूमिका**
- प्रा.डॉ.चौधरी दत्तात्रय मल्हारी ---------- ८१

२०. **राजर्षी शाहू महाराज आणि वेदनिष्ठा: एक अभ्यास**
- डॉ. साळुंखे उमेश अशोक ---------- ८४

२१. **राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य**
- डॉ. युवराज गुंडू सुरवसे ---------- ८७

२२. **छत्रपती राजर्षीशाहू महाराज यांचा शेती विषयक विचार व सुधारणा**
- डॉ.माने दादासाो नामदेव ---------- ९०

२३. **छ. शाहू महाराज यांचे शैक्षणिक विचार**
- सहयोगी प्रा.मल्लिकार्जुन पांडुरंग कसबे ---------- ९४

२४. **राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य**

- प्रा.डॉ. जवाहर मोरे ---------- ९७

२५. **राजर्षी शाहू महाराजांच्या आर्थिक विचारांची प्रासंगिकता**

- डॉ. अंकुश तुकाराम करपे ---------- १००

२६. **शैक्षणिक व सामाजिक सुधारणांचे प्रणेते : छत्रपती राजर्षी शाहू महाराज**

- प्रा. संपतराव माणिकराव गर्जे ---------- १०५

२७. **छत्रपती राजर्षी शाहू महाराजांचा समाजसुधारणेच्या संदर्भातील तत्त्वज्ञानात्मक दृष्टीकोण**

- डॉ. उध्दव न. कांबळे ---------- ११०

२८. **राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक विचार आणि समाजसुधारणा**

- डॉ. उध्दव न. कांबळे ---------- ११४

२९. **राजर्षी शाहू महाराज यांचे शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय योगदान**

- डॉ. राजेंद्र नामदेव रासकर ---------- ११८

३०. **राजर्षी शाहू महाराजांच्या आर्थिक विचारांचा अभ्यास**

- डॉ. रेश्मा अणवेकर ---------- १२१

३१. **राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे सामाजिक विचार आणि कार्य**

- डॉ. गणेश एन. बहादे ---------- १२६

३२. **सर्वंकष सुधारणांचे पुरस्कर्ते राजर्षी शाहू महाराज**

- किशोर जनार्दन लांडेपाटील ---------- १३०

३३. **छत्रपती शाहू महाराज : सामाजिक क्रांतीचे आधारस्तंभ**

- डॉ. विकास विलासराव शिंदे ---------- १३५

३४. **राजर्षी शाहू महाराज यांची समतावादी दृष्टी व समकालीन प्रस्तुत**

- प्रा. पाटील प्रमोद जगन्नाथ ---------- १३९

३५. **मानवतावादी व्यक्तिमत्व – राजश्री शाहू महाराज**

- प्रा. डॉ. आनंदा एम. काळबांडे ---------- १४४

ISSN No. 2394-5990

३६. **राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या शैक्षणिक कार्याचे ऐतिहासिक विवेचन**

- डॉ. एस. आर. कट्टीमनी ---------- १४९

३७. **राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे स्त्री शिक्षण विषयक विचार व कार्य**

- कु. शुभांगी मनोहर आवारी ---------- १५५

३८. **राजर्षी शाहू महाराज यांचे शैक्षणिक व सामाजिक कार्य**

- प्रा. डॉ. विठ्ठल कल्लापा दळवी ---------- १५९

३९. **राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची आपत्ती व्यवस्थापनातील प्रासंगिकता**

- डॉ. गणेश पंढरीनाथ भामे ---------- १६३

४०. **छत्रपती राजश्री शाहू महाराज यांचे आरक्षण विषयक धोरण: एक ऐतिहासिक अध्ययन**

- डॉ. प्रज्ञा कामडी ---------- १७०

४१. **छ. शाहु महाराज यांचे शैक्षणिक कार्य : आजची प्रासंगिकता**

– सहयोगी प्राध्यापक इंगळे किशोरकुमार मनोहरराव ---------- १७५

४२. **मागासवर्गीयांच्या मुक्तीतील क्रांतिकारी महानायक राजर्षी छत्रपती शाहू महाराज : ऐतिहासिक विश्लेषण**

– डॉ.निशांत भिमराव शेंडे ---------- १७९

४३. **राजर्षी शाहू महाराज यांचे स्त्री शिक्षणविषयक विचार**

– आरती एम. देशमुख ---------- १८३

४४. **राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे सामाजिक कार्य आणि जागृति**

– डॉ. सचिन ज्ञानेश्वर मोरे ---------- १८७

४५. **शैक्षणिक क्रांतीचे अग्रदूत राजर्षी शाहू महाराज : ऐतिहासिक अध्ययन**

– श्री. संतोष गोहोकार ---------- १९१

४६. **राजर्षी शाहू महाराजांचे समाज परिवर्तनाच्या दृष्टीने अस्पृश्य उद्धाराचे कार्य**

– प्रा. केंगार आप्पासाहेब नामदेव ---------- १९४

४७. **राजर्षी शाहू महाराजांचे समाजसुधारणा विषयातील स्त्री उद्धाराचे कार्य**

– डॉ. गौतम नामदेव ढाले ---------- १९८

४८. **राजर्षी शाहू महाराज आणि सामाजिक न्याय**

– डॉ. विष्णू राणबा पाटील ---------- २०२

४९. **'राजर्षी शाहू महाराज यांनी परिवर्तनवादी दृष्टीने केलेल्या सामाजिक सुधारणांचा अभ्यास'**

– सौ. भारती श्याम पाटील ---------- २०५

५०. **छत्रपती शाहू महाराजांची कृषीनिती**

– डॉ.के. एल गिरमकर ---------- २०९

५१. **राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या सामाजिक सुधारणा**

– श्री जनार्धन विठ्ठल बुधवंत ---------- २१४

५२. **आधुनिक शिक्षणाचे अग्रदूत :राजश्री छत्रपती शाहू महाराज**

– डॉ देविदास ग्यानोजी गाडेकरे ---------- २१७

५३. **राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे राजकीय योगदान**

– प्रा. किर्ती विजय करंजावणे ---------- २२०

५४. **राजश्री शाहू महाराजांचे जलव्यवस्थापन**

– प्रा.डॉ कदम सतीश रावसाहेब ---------- २२३

५५. **राजर्षी शाहू महाराजांचे आर्थिक धोरण**

– डॉ. मोटे गितांजली सदाशिवराव ---------- २२७

५६. **राजर्षी शाहू महाराजांचे मागास जाती–जमातीच्या शिक्षणतील योगदान**

– प्रा.डॉ.राजेंद्र नागनाथ गायकवाड, डायरे अमोल राम ---------- २३०

५७. **महाराष्ट्राच्या सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळीचे अग्रदूत– छत्रपती शाहू महाराज**

– डॉ. प्रेमचंद गुंडू गायकवाड ---------- २३५

५८. **राजर्षीं छत्रपती शाहू महाराज यांचे आर्थिक विचार**

- डॉ. रुपाली गोवर्धन दिकोंडा ---------- २४०

५९. **राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे बेधडक व्यक्तिमत्त्व : एक अभ्यास**

- प्रा. डॉ. गोवर्धन कृष्णाहरी दिकोंडा ---------- २४३

ISSN No. 2394-5990

६०. **राजर्षी शाहू महाराजांचे महाराष्ट्राच्या सामाजिक व राजकीय विकासातील योगदान**

- प्रा.डॉ.दादासाहेब दामोधर हाके ---------- २४६

६१. **राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या विचारांची व कार्याची प्रासंगिकता**

– डॉ. सतीश खरात ----------२५२

६२. **राजर्षी शाहू महाराज–एक लोक कल्याणकारी राजा**

– डॉ. रुपेश एम.मेश्राम ----------२५६

६३. **राजर्षी छत्रपती शाहू महाराज आणि कुंभार समुदाय**

– डॉ. रामचंद्र वसंत कुंभार ---------- २६१

६४. **छत्रपती शाहू महाराजांच्या काळातील ख्रिश्चन मिशनरी (१८९४–१९२२)**

– डॉ. अंबादास क. मंजुळकर ---------- २६५

६५. **राजर्षी छत्रपती शाहू महाराज: मानवी हक्क संरक्षक दृष्टा राजा**

– प्रा.डॉ.प्रकाश निवृत्ति चौधरी ----------२६८

६६. **राजर्षी शाहू महाराजांचे शिक्षण विषयक विचार व कार्य**

– प्रा. डॉ. पंकज वा. मुन ----------२७४

६७. **छत्रपती शाहू महाराजांच्या सामाजिक सुधारणा**

– प्राध्यापक निलेश जमदाडे ---------- २७८

६८. **छत्रपती शाहू महाराजांचे शैक्षणिक आणि आर्थिक कार्य**

– प्रा.डॉ.प्रतापसिंह माने ---------- २८१

६९. **छत्रपती शाहू महाराजांचे सामाजिक कार्य**

– प्रा.संजय वामन साबळे ---------- २८५

७०. **छत्रपती शाहू महाराज यांचे शैक्षणिक क्षेत्रातील कार्याचे योगदान**

– प्रा. डॉ. उध्दव मनोहर घोडके, प्रा. अमोल जगन्नाथ वीर ----------२९०

७१. **छत्रपती राजश्री शाहू महाराज यांनी भौगोलिक परिस्थितीला अनुसरुन केलेला विकास**

– डॉ. समाधान धर्मा शिंदे, डॉ. उध्दव मनोहर घोडके ----------२९२

७२. **आधुनिक भारताचे अर्थनितीकार राजर्षी शाहू महाराज**

– डॉ. काशिनाथ रामचंद्र तनंगे ----------२९५

७३. **राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या सामाजिक सुधारणा संरक्षणाचे कायदे**

– डॉ.संभाजी सोपानराव दराडे ---------- ३००

७४. **वेदोक्तो प्रकरणात राजर्षी शाहू महाराज यांची भूमिका**

– प्रा.ज्ञानेश्वर बाळासाहेब पादर ---------- ३०४

७५. **छत्रपती शाहू महाराज यांचे शेतकऱ्यांच्या समस्या आणि शेती सुधारणेबाबत विचार**

– श्री.विष्णू मनोहर गावडे ---------- ३०७

७६. **राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य**

– प्रा.रविंद्र गोविंदराव पाटील ---------- ३१२

७७. **कोल्हापूर मल्लविद्येचे माहेरघर व छ. शाहू महाराज**

– प्रा. डॉ. थोरे किशोर धोंडीबा ---------- ३१७

७८. **राजर्षी शाहू महाराज: अब्राम्हणी राजा**

- अप्पासाहेब मल्लप्पा देशमुख ---------- ३२२

७९. **राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या जडणघडणीतील ब्रिटिशांचे विशेषत: गुरु फ्रेजर यांचे योगदान**

- डॉ. शिल्पा शेटे ---------- ३२७

८०. **राजर्षी शाहू महाराज यांचे शैक्षणिक कार्य**

- डॉ. बब्रुवान केरबाजी मोरे ---------- ३३२

८१. **राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे सामाजिक व शैक्षणिक कार्य**

– प्रा.डॉ.जयकुमार चंदनशिवे ---------- ३३६

८२. **राजर्षी शाहू महाराज यांचे शिक्षणातील योगदान**

– श्रीम. स्वामी आगतराव घावटे ---------- ३३९

८३. **राजर्षी शाहू महाराज यांचे अस्पृश्यद्धाराचे कार्य : विशेष संदर्भ – राजर्षी शाहू वसा आणि वारसा : एक आकलन**

– डॉ. शारदा कदम ---------- ३४२

ISSN No. 2394-5990

८४. **राजर्षी छत्रपती शाहूमहाराजांचे सामाजिक सुधारणेचे कार्य**

– डॉ. रवींद्र पुंजाजी मते ---------- ३४५

८५. **लोकनेता राजश्री शाहू महाराज**

– प्रा.डॉ.लखपती वासुदेव गायकवाड ---------- ३५०

८६. **राजर्षी शाहू महाराजांचे कृषीविषयक धोरण : एक अध्ययन**

– प्रा. डॉ. संतोष पां. बनसोड ---------- ३५३

८७. **राजर्षी शाहू महाराज : सामाजिक क्रांतीचे अग्रदूत**

– प्रा. डॉ. दीपक सो. वेडे ---------- ३५७

८८. **गोलमेज परिषदांमध्ये अस्पृश्यांच्या हक्कासाठी डॉ.आंबेडकरांचा संघर्ष व परिणाम**

- प्रा.डॉ.जयपाल चंद्रकांत सावंत ---------- ३६२

८९. **संगीत प्रेमी राजर्षी शाहू महाराज**

- डॉ. बुद्धरत्न लिहीतकर ---------- ३६९

९०. **राजर्षी शाहू महाराज म्हणजे सामाजिक लोकशाहीचे आधारस्तंभ**

- प्रा.संदिप पुंडलिक नन्नावरे ---------- ३७३

९१. **रिपब्लिकन पक्ष आंदोलनात नेतृत्वाचा प्रभाव**

– डॉ. योगेन्द्र काटकर ---------- ३७७

९२. **राजर्षी शाहू महाराज व आर्य समाज**

– प्रा.डॉ.संजीव सुखलाल बोडखे ---------- ३८२

९३. **कलासक्त राजर्षी शाहू महाराज**

– प्रा. डॉ. प्रफुल्ल तु. बन्सोड ---------- ३८५

९४. **अस्पृश्यउध्दारक – राजार्षी शाहू महाराज**

– प्रा. प्रफुल एम. राजुरवाडे ---------- ३८८

९५. **छत्रपति शाहू – लोकतंत्र के स्तंभकार**

– डॉ. श्वेता बा. चौधारे ---------- ३९१

९६. **राजश्री शाहू महाराज परिवर्तन का आरंभ**

– प्रा. शहेनाज अ.रफीक देशमुख ---------- ३९५

९७. **Pioneers of Human Rights and Social Justice: Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj**

– Dr. Nandkishor Nanasaheb Ugale ---------- ३९८

९८. **Contribution of Rajarshri Chatrapati Shahu Maharaj in the field of Performing Arts**

- Asst.Prof. Mharsale Sonali Bhaskar ---------- ४०३

९९. **Rajashri Shahu Maharaj Educational Reforms**

- Prof. Sunil Narnaware ---------- ४०८

१००. **Rajarshi Chhatrapati Shahu And Educational Revolution in Maharashtra**

- Dr. Sonawane Jagdish Chhaburao ---------- ४१३

१०१. **Chhatrapati Shahu Maharaj an Immortal king of modern India**

– Dr Devesh M. Kamble ---------- ४१८

१०२. **A Study of Economic Reforms by RajarshiChatrapatiShahu Maharaj**

– Dr. Pakdhane Smita N. ---------- ४२२

१०३. **Rararshi Chhatrapati Shahu Maharaj : The Royal Patroniser of 'Kushti' (Wrestling)**

– Mr. Rahul Vasant Ingle ---------- ४३०

▲▲▲

ISSN No. 2394-5990

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचा समाजसुधारणेचा ऐतिहासिक वारसा

प्रा. डॉ. धनंजय ना. मोगले
सहाय्यक प्राध्यापक इतिहास विभाग
वसुंधरा कला महाविद्यालय, जुळे सोलापूर

प्रस्तावना :

राजर्षी छत्रपती शाहू महाराज हे भारतातील कोल्हापूर संस्थानाचे राजे होते. हा तो काळ होता जेव्हा महाराष्ट्रात अस्पृश्यता मोठ्या प्रमाणावर रुजलेली होती. ज्यामध्ये केवळ ब्राह्मणांना विशेषाधिकार होते. प्रतिष्ठा आणि सत्ता ब्राम्हणाकडेच होती. इंग्रज सत्ताधारी होते पण त्यांनी फारसे स्त्रियांचे आणि ब्राम्हणेतर लोकांचे शोषण, जातिभेद, बालविवाह, विधवा विवाह बंदी,पडदा पद्धती यासारख्या वादग्रस्त बाबींमध्ये हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केला नाही. ब्रिटिश सरकारने भारतीय परंपरांवर अधारित असलेले मुद्दे टाळले, कारण ते केवळ जुलमी प्रशासक होते. भारतीय समाजाला पुढे नेणारे ब्रिटीश समाजसुधारक नव्हते. शाहू महाराजांनी आपले संपूर्ण आयुष्य परंपरा आणि संस्कृतीच्या नावाखाली निर्माण झालेल्या कुप्रथा रोखण्यासाठी वाहून घेतले होते. त्यांचा स्त्री-पुरुष समानतेवर विश्वास होता. ते काळाच्या एक पाऊल पुढे होते. शाहू महाराज व्यापक मानवतावादी दृष्टीकोन असलेला राजा होते. त्याच्याकडे वैश्विक वृत्ती होती. शाहू महाराज कोणत्याही जातीधर्माचा पक्षपात न करता राज्य कारभार सांभाळत असे.

शाहू महाराजांनी केवळ आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या वंचित वर्गाच्या उन्नतीसाठी आपले जीवन समर्पित केले नाही तर शिक्षणाद्वारे स्त्री मुक्तीचा मार्गही मोकळा केला. भारतातील राजे अनेक आपल्या भव्य जीवनशैलीसाठी प्रसिद्ध होते पण शाहू महाराज साधे सरळ जीवन जगणारे राजे होते. शाहू महाराजांनी आपले संपूर्ण आयुष्य समाजातून जातिभेद टाळण्यासाठी वाहून घेतले. जेव्हा राजघराण्यातील ब्राह्मण पुरोहितांनी वैदिक स्तोत्रानुसार ब्राह्मणेतरांचे संस्कार करण्यास नकार दिला, तेव्हा शाहूंनी आर्य समाज आणि सत्यशोधक समाजाला पाठिंबा दिला तसेच मराठा समाजाच्या हक्कांसाठी प्रचार केला. त्यांनी पुजाऱ्यांना हटवून क्षत्रजगद्गुरू (क्षत्रियांचे विश्व गुरू) ही पदवी देऊन एका तरुण मराठाची ब्राह्मणेतरांचे धर्मगुरू म्हणून नियुक्ती करण्याचे धाडसी पाऊल उचलले. वेदोक्त प्रकरण अशाच उच्च-नीच या तत्वावर झाले होते, यास वेदोक्त वाद म्हणूनही ओळखले जात असे. शाहू महाराजांनी ब्राह्मणाचे घरटे मोडीत अवस्थेला आणले होते, ब्राह्मणांच्या प्रचंड विरोधाला तोंड देऊन त्यांनी आपली पावले खंबीरपणेमागे टाकल्यामुळेच ते असामन्यझाले. ते लवकरच ब्राह्मणेतर चळवळीचा नेता झाले.

छत्रपती शाहूंनी १८९४ ते १९२२ अशी २८ वर्षे कोल्हापूरच्या गादीवर आपली पकड केली ; या काळात त्याने आपल्या साम्राज्यात अनेक सामाजिक सुधारणा सुरू केल्या. खालच्या जातींसाठी परिस्थिती सुधारण्यासाठी बरेच काही करण्याचे श्रेय त्यांना जाते. त्यांनी अशा प्रकारे शिक्षित विद्यार्थ्यांसाठी योग्य रोजगार सुनिश्चित केला, ज्यामुळे इतिहासातील सर्वात लवकर सकारात्मक कृती (कमकुवत घटकांना ५०% आरक्षण) कार्यक्रम तयार केला. यापैकी बरेच उपाय १९०२ मध्ये लागू झाले.

रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी त्यांनी १९०६ मध्ये शाहू छत्रपती विणकाम व सूतगिरणी सुरू केली. राजाराम महाविद्यालय शाहू महाराजांनी बांधले, आणि नंतर त्यांचे नाव देण्यात आले. त्यांचा भर शिक्षणावर होता, त्यांचा उद्देश लोकांपर्यंत शिक्षण उपलब्ध करून देणे हे होते. त्यांनी आपल्या विषयांमध्ये शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी अनेक शैक्षणिक कार्यक्रम सुरू केले. त्यांनी पांचाळ, देवदन्या, नाभिक, शिंपी, ढोर-चांभार समुदाय तसेच मुस्लिम, जैन आणि ख्रिश्चनांसह विविध जाती आणि धर्मांसाठी वसतिगृहे स्थापन केली. त्यांनी समाजातील सामाजिकरित्या अलग ठेवलेल्या घटकांसाठी मिस क्लार्क बोर्डिंग स्कूलची स्थापना केली. शाहूंनी मागास जातीतील गरीब गुणवंत विद्यार्थ्यांसाठी अनेक शिष्यवृत्ती सुरू केल्या. त्यांनी आपल्या राज्यात सर्वांसाठी सक्तीचे मोफत प्राथमिक शिक्षण सुरू केले. त्यांनी वैदिक शाळांची स्थापना केली ज्याने सर्व जाती आणि वर्गातील विद्यार्थ्यांना धर्मग्रंथ शिकण्यास सक्षम केले, अशा प्रकारे सर्वांमध्ये संस्कृत शिक्षणाचा प्रचार केला. गावातील प्रमुख किंवा 'पाटील' त्यांना चांगले प्रशासक बनवण्यासाठी त्यांनी खास शाळाही स्थापन केल्या.

शोधनिबंधाची उद्दिष्ट्ये :

१. छ.शाहू महाराजांचे सामाजिक व सांस्कृतिक कार्याचा ऐतेहासिक आढावा घेणे
२. छ. शाहू महाराजांनी केलेले सामाजिक चिंतन आणि सद्यकालीन स्थितीचा आढावा घेणे
३. छ. शाहू महाराज यांनी सुरु केलेल्या योजनाचा ऐतेहासिक आढावा घेणे

गृहीतके :

१. छ. शाहू महाराजांनी अनेक समाजसुधारणा केल्यामुळे समाजाला नवी दिशा मिळाली.
२. छ. शाहू महाराजांनी त्या काळात आरक्षण पद्धती सुरु केल्यामुळे आजची सामाजिक संरचना निर्माण झाली.
३. छ. शाहू महाराजांनी त्याकाळात सामाजिक सुधारणा करू नवीन आदर्श घातला आहे. देवदासी प्रथा बंदीचा कायदा, प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचा कायदा इ. नवीन समाज व्यवस्थेची नांदी ठरली.

छ. शाहू महाराजांच्या सामाजिक सुधारणाचा इतिहास :

शाहू समाजातील सर्व स्तरांमध्ये समानतेचे पुरस्कर्ते होते आणि त्यांनी ब्राह्मणांना विशेष दर्जा देण्यास नकार दिला. ब्राह्मणांनी ब्राह्मणेतरांसाठी धार्मिक संस्कार करण्यास नकार दिल्याने त्यांनी रॉयल धार्मिक सल्लागारांच्या पदावरून त्यांना काढून टाकले. त्यांनी एका तरुण मराठा विद्वान पदावर नियुक्त केले आणि त्यांना मक्षत्र जगद्गुरूफ (क्षत्रियांचे विश्व शिक्षक) ही पदवी बहाल केली. शाहूंनी ब्राह्मणेतरांना वेदांचे पठण आणि पठण करण्यास प्रोत्साहन दिल्याने या घटनेने महाराष्ट्रात वेदोक्त वाद निर्माण झाला. या वादामुळे समाजातील उच्चभ्रू वर्गातून निषेधाचे वादळ आणि त्यांच्या राजवटीला तीव्र विरोध झाला. त्यांनी१९१६ मध्ये निपाणी येथे डेक्कन रयत असोसिएशनची स्थापना केली.

जातीभेद निर्मुलानाची चळवळ :

या संघटनेने ब्राह्मणेतरांना राजकीय हक्क मिळवून देण्यासाठी आणि त्यांना राजकारणात समान सहभागासाठी आमंत्रित करण्याचा प्रयत्न केला. शाहूंवर ज्योतिबा फुले यांच्या कार्याचा प्रभाव होता आणि त्यांनी फुले यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाचे दीर्घकाळ संरक्षण केले. मध्ये, १९०३ मध्ये त्यांनी राजा एडवर्ड सातवा आणि राणी अलेक्झांड्रा यांच्या राज्याभिषेकाला हजेरी लावली आणि त्याच वर्षी मे महिन्यात त्यांना एल.एल.डी. ही मानद पदवी मिळाली होती.

जातिभेद आणि अस्पृश्यता ही संकल्पना नष्ट करण्यासाठी शाहूंनी खूप प्रयत्न केले. त्यांनी अस्पृश्य जातींसाठी सरकारी नोकऱ्यांमध्ये आरक्षण व्यवस्था सुरू केली. त्याच्या या पध्दतीमुळे आपल्या प्रजेला म्हणजेच समाजातील प्रत्येक सदस्याला समान वागणूक देण्याचे आदेश मिळाले आणि अस्पृश्यांना विहिरी आणि तलाव, तसेच शाळा आणि रुग्णालये यांसारख्या सार्वजनिक सुविधांमध्ये समान प्रवेश प्रदान केला. त्यांनी आंतरजातीय विवाहाला कायदेशीर मान्यता दिली आणि दलितांची परिस्थिती सुधारण्यासाठी खूप प्रयत्न केले.त्यांनी महसूल जमा करणार्यांच्या पदव्या आणि कार्यकाळ यांचे आनुवंशिक हस्तांतरण बंद केले.

देवदासी प्रथा :

गरीब कुटुंबातील मुलींना लहान वयात मंदिराच्या सेवेसाठी पाठवले जात असे. त्यांना लहान वयातच देवाच्या नावाने वेश्याव्यवसाय करण्यास प्रवृत्त केले गेले. त्या शहरातील श्रीमंत लोकांच्या माध्यमातून या मुलींचे शोषण होते. समाजावर तो डाग होता. शाहू महाराजांनी हा एक डाग मानला की, ज्या मुलींना पालकांनी देवदासी, मुरली किंवा भावीन बनण्यासाठी सोडून दिले होते, त्यांच्यासाठी पालकांचे दरवाजे नेहमीच बंद होते. तिच्या आई-वडिलांच्या मालमत्तेवर तिचा अधिकार नव्हता, शाहू महाराजांनी वाईट प्रथा मोडून काढण्याचा प्रयत्न केला आणि तिला कोणताही दर्जा नाकारला, जेणेकरून लोकांनी आपल्या मुलींना या वाईट प्रथेत पाठवणे थांबवले.

शाहू महाराजांनी आपल्या साम्राज्यात स्त्रियांची स्थिती सुधारण्यासाठीही काम केले. त्यांनी महिलांना शिक्षण देण्यासाठी शाळांची स्थापना केली आणि स्त्री शिक्षणाच्या विषयावरही त्यांनी जोरदार प्रहार केले. १९१७ मध्ये त्यांनी विधवा पुनर्विवाहाला कायदेशीर मान्यता दिली आणि बालविवाह रोखण्यासाठी प्रयत्न केले. १९२०मध्ये, शाहूंनी देवदासी प्रथा (देवाला मुली अर्पण करण्याची प्रथा) वर बंदी घालणारा कायदा आणला, ज्यामुळे मुलींचे होणारे लैंगिक शोषण थांबण्यास मदत झाली.

उद्योजकतेला वाव :

शाहू महाराजानी अनेक प्रकल्प सादर केले ज्यामुळे त्यांची प्रजा त्यांच्या निवडलेल्या व्यवसायात टिकून राहू शकली. शाहू छत्रपती सूत व विणकाम गिरणी, शेतकऱ्यांसाठी समर्पित बाजारपेठ आणि सहकारी संस्थांची स्थापना त्यांच्या प्रजेला व्यापारातील लबाड मध्यस्थांपासून मुक्त करण्यासाठी करण्यात आली. कृषी पद्धतींचे आधुनिकीकरण करण्यासाठी उपकरणे

ISSN No. 2394-5990

खरेदी करू पाहणाऱ्या शेतकऱ्यांना त्यांनी पत उपलब्ध करून दिले आणि शेतकऱ्यांना पीक उत्पादन आणि संबंधित तंत्रे वाढवण्याबाबत सूचना देण्यासाठी किंग एडवर्ड ॲग्रिकल्चरल इन्स्टिट्यूटची स्थापना केली. १८ फेब्रुवारी १९०७ रोजी त्यांनी राधानगरी धरणाची सुरुवात केली; हा प्रकल्प १९३५ मध्ये पूर्ण झाला आणि कोल्हापूरला पाण्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण केले. शेतकर्यांना सिंचन उपलब्ध करून देण्यासाठी त्यांनी प्रयत्न तर केलेच, पण तांत्रिक उपकरणे खरेदी करू पाहणार्या शेतकर्यांनाही कर्ज उपलब्ध करून दिले. शेतकर्यांना त्यांचे पीक उत्पादन आणि विविध शेती पद्धती वाढवण्यासाठी आधुनिक तंत्रे शिकवण्यासाठी त्यांनी किंग एडवर्ड कृषी संस्थेची स्थापना केली.

त्यांनी असंख्य प्रकल्प सादर केले जे त्यांच्या राज्यातील नागरिकांना स्वावलंबी व्यवसाय विकसित करण्यास सक्षम करतात जसे की शाहू छत्रपती स्पिनिंग अँड विव्हिंग मिल, शेतकऱ्यांसाठी समर्पित बाजारपेठ आणि व्यापारातील मध्यस्थांचा सहभाग दूर करण्यासाठी शेतकऱ्यांसाठी सहकारी संस्था. आपल्या विषयाच्या वाढीचे आणि विकासाचे वातावरण निर्माण करण्याचा त्यांनी नेहमीच प्रयत्न केला. राजर्षी शाहू महाराज हे सामाजिकदृष्ट्या वंचित घटकांच्या उन्नतीसाठी आणि उन्नतीचे ध्येय आणि ध्येय असलेले प्रबळ इच्छाशक्तीचे पुरुष होते.

सामाजिक समता हाच गाभा :

या अशा अनेक सामाजिक उद्देशासाठी त्यांनी आपले जीवन समर्पित केले आणि त्यासाठी अथक परिश्रम घेतले.जातिभेद आणि खालच्या जातींचे शोषण नष्ट करण्यासाठी त्यांनी पहिली आरक्षण पध्दती सुरू केली. सातत्याने शाहू महाराज म्हणायचे कि,मला समाजातील सर्व नेत्यांच्या निदर्शनास आणून द्यायचे आहे की, जातिभेद मोडून काढणेच हितावह आहे, अर्थातच जात पाळणे पाप आहे, हे राष्ट्रभक्तीच्या मार्गातील अडसर आहे, हि प्रथा मोडीत काढण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. ही जाणीव मनात ठेवून यावर चळवळ करा. अशा अर्थाने शाहू महाराज सर्वच बाबतीत महान ठरतात.

निष्कर्ष :

आज स्त्रिया देखील पुरुष प्रधान समाजाचे वेगवेगळे अडथळे तोडून पुढे जात आहेत पण तरीही त्यांचे अस्तित्व एकतर वर्चस्व आहे किंवा नाकारले जात आहे. वास्तुविशारद, अभियंता, डॉक्टर, प्राध्यापक, कमिशनर अशा प्रत्येक क्षेत्रात ती उच्च पदे मिळवत आहे, परंतु तिच्यावर वेगवेगळ्या विचारसरणीचा बोलबाला होत आहे. आज होळीच्या दिवशी स्त्रियांच्या नावाने वाईट शब्द दिले जातात, पण शाहू महाराजांनी होळीच्या दिवशी वाईट शब्द देण्याची घृणास्पद प्रथा नाकारली. प्रत्येक रंगपंचमीला महिलांना रंग ओतताना लाज वाटते, पण शाहू महाराजांनी कोल्हापुरात मनाई केली. जेव्हा आपण महिला सक्षमीकरणाविषयी बोलत असतो तेव्हा गेल्या शतकात शाहू महाराज किती महान होते याचा आत्मपरीक्षण करायला हवा.

शाहू महाराजांनी दिलेल्या संदेशामुळे सामाजिक समता प्रस्थापित होण्यास प्रेरक अशी सामाजिक अवस्था निर्माण होऊ लागली. जातीवाद समाजातून काढणे हा त्यांच्या कार्याचा विशेष गाभा होता. शाहू महाराजांनी केले कार्य अजोड आहे, समाजात समता आणि सामाजिक न्याय कसा टिकून राहील यासाठी ते शरीरात प्राण टिकेल तिथपर्यंत सामाजसुधारणेचे कार्य केले आहेत.भारतीय समाजाचे ते खऱ्या अर्थाने दृष्टे समाजसुधारक होते.

शाहू महाराजांनी सुरु केलेल्या कायदे व योजना या आधुनिक भारतीय समाजाची पायाभरणी होती.प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करण्यासाठी शाहू महाराजांनी कायदा केला होता तोच कायदा आता आरटीइचा कायदा सद्यकाळात दिसून येतो. अस्पृश्यासाठी शाहू महाराजांनी शाळा वसतिगृह काढले. अस्पृश्यांना हॉटेल काढून दिली त्यात ते स्वत चहा पित असत. महाराजांना अजिबात जातीभेद मान्य नव्हता म्हणूनच त्यांनी आरक्षण पद्धत सुरु केली. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे राजर्षी छत्रपती शाहू महाराज हे भारतीय समाजातील ते ध्रुवतारा होते.

संदर्भ :

१. सुर्यवंशी, के.जी. 'छत्रपती शाहू' राजा व माणुस (मराठी). जी.एल. ठोकळ प्रकाशन पुणे, फेब्रुवारी १९८४.
२. जाधव,बी.बी.. मराजर्षी शाहू महाराजांची भाषणेफराजर्षी प्रकाशन कोल्हापूर.
३. तोफखाने, व्ही.डी. मराजर्षी शाहू छत्रपती याचे अंतरंग (मराठी) महाराष्ट्र ग्रंथ भंडार, कोल्हापूर
४. छ.शाहू महाराज स्मारक ग्रंथ – जयसिंगराव पवार (२०१०)
५. कांबळे. चंद्रकांत,२०२१,'सत्यशोधक चळवळ:एक परिवर्तनाचाप्रवाह', सोलापूर:थिंक टंक पब्लिकेशन
६. कांबळे.नारायण.२०१५,नाव सामाजिक चळवळी, औरंगाबाद : चिन्मय प्रकाशन
७. एरंडे,कांबळे. २०२१,महाराष्ट्रातील परिवर्तनवादी विचार प्रवाह,सोलापूर:शब्द शिवार प्रकाशन

■■■

महाराष्ट्रातील सत्यशोधक चळवळ आणि राजर्षी छत्रपती शाहू महाराज

डॉ. दिनकर रावजी मुरकुटे
सहयोगी प्राध्यापक व प्रमुख, इतिहास विभाग,
एस.एम. जोशी कॉलेज हडपसर, पुणे-२८
९३२५२८९१३१, dinkar25773@gmail.com

सारांश (Abstract) :

आधुनिक महाराष्ट्राच्या सामाजिक समतेच्या व क्रांतीच्या इतिहासात सत्यशोधक समाजाचे अत्यंत महत्वपूर्ण योगदान राहिलेले आहे. महात्मा जोतीराव फुले यांनी भारतीय समाज व संस्कृती व्यवहारातील ब्राह्मणी धर्माचे प्रभुत्व उखडून काढण्याच्या उद्देशाने सत्यशोधक समाजाची स्थापना केली. जातीव्यवस्थेचा उच्छेद करणारा युक्तिवाद पुढे आणून त्यांनी ब्राह्मणी धर्माच्या शोषण व वर्चस्वाची व्यवस्था उघडकीस आणली. सत्यशोधक समाजाच्या स्थापनेपासून ते इ.स. १९१० पर्यंत व इ.स.१९११ ते इ.स.१९३० पर्यंत अशा दोन सत्यशोधक चळवळीच्या अवस्था मानल्या जातात. सत्यशोधक समाजाच्या पहिल्या अवस्थेमध्ये सत्यशोधक समाज ग्रामीण भागापर्यंत पोहोचला व सत्यशोधक समाजाचा विस्तार कोल्हापूर, बेळगाव, विदर्भापर्यंत झाला. शूद्रातिशूद्रांमध्ये शिक्षणाचा प्रसार करणे, धार्मिक विधींमध्ये ब्राह्मण-पुरोहिताला स्थान न देता सत्यशोधक रितीने जन्म, मृत्यू, विवाह, असे अनेक विधी करणे यावर सत्यशोधक समाजाचा भर होता. सामाजिक-सांस्कृतिक परिघात ब्राह्मणशाहीच्या शोषणाच्या विरोधात सत्यशोधक समाजाचा संघर्ष राहिला. सत्यशोधक समाजाच्या दुसऱ्या अवस्थेचे नेतृत्त्व राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी केले. इ.स. १९१० नंतर राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी प्रबोधनाच्या विविध माध्यमातून ब्राह्मणशाही, सावकारशाही विरुद्ध संघर्ष उभा केला. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी अनेक सत्यशोधकी निर्णय घेतले. त्यांनी ब्राह्मण पुरोहिताकडून होणाऱ्या राजवाड्यातील देवदेवतांच्या व पूर्वजांच्या समाधीच्या पूजा बंद करून त्या मराठा पुरोहिताकडून सुरू करण्याचा हुकूम दिला. त्यांनी मराठा पुरोहित तयार करण्यासाठी वैदिक शिक्षण देणारी संस्था स्थापन केली .

त्यांचा सर्वात महत्त्वाचा निर्णय म्हणजे पाटगावला मौनी महाराजांच्या पीठावर क्षात्रजगद्गुरुची स्थापना करण्याचा होता. या निर्णयामुळे महाराजांनी बहुजन समाजाला स्वतःचा धर्मगुरू मिळवून दिला.आज सत्यशोधक समाजाच्या स्थापनेला १५० वर्षे झाली आहेत. आजही या सत्यशोधकी विचारांची प्रासंगिकता निश्चितच आहे.

बीज शब्दावली (Key Words) : महात्मा जोतीराव फुले, सत्यशोधक चळवळ,राजर्षी छत्रपती शाहू महाराज, शोषणविरोधी संघर्ष,पर्यायी संस्कृती

प्रस्तावना :

आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात धार्मिक आणि सामाजिक गुलामगिरीमध्ये अनेक वर्षे दडपल्या गेलेल्या बहुजन व दलित समाजाच्या मुक्ततेसाठी महात्मा जोतीराव फुले यांनी २४ सप्टेंबर १८७३ रोजी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. मानवाच्या समतेवर विश्वास घोषित करणारी आधुनिक महाराष्ट्रातील ही पहिली चळवळ होय. उच्चवर्णियांच्या श्रेष्ठत्वाला व वर्चस्वाला धक्का देऊन सामाजिक समता प्रस्थापित करावयाची असेल तर चातुर्वर्ण्य पध्दती, जन्माधिष्ठित जातीव्यवस्था, धार्मिक रूढी, अनिष्ट चालीरीती नष्ट झाल्या पाहिजेत असा समग्र क्रांतीचा विचार महात्मा जोतीराव फुले यांनी व्यक्त केला.इ.स. १९१० नंतर या चळवळीने कात टाकून पुन्हा नवे रूप धारण केले. कोल्हापुरच्या छत्रपती शाहू महाराजांच्या उदार आश्रयामुळे शेतकरी वर्ग जागा झाला, कामगारांच्या संघटना उभ्या राहिल्या, सहकारी चळवळ सुरू झाली. शिक्षणाचा प्रसार गरीबांच्या झोपडीपर्यंत झाला. अनाथ व अपंगाच्या संस्था उभ्या राहिल्या. त्यामुळे आधुनिक महाराष्ट्राच्या जडण घडणीस मदत होऊन त्याचा चेहरा -मोहरा बदलण्यास मदत झाली.

उद्देश (Obectives) :

प्रस्तुत शोध निबंधाचे उद्देश पुढीलप्रमाणे आहेत:

१. सत्यशोधक चळवळीच्या सामाजिक प्रभावांचा अभ्यास करणे.
२. सत्यशोधक चळवळीने दिलेल्या पर्यायी विचारांची प्रासंगिकता विशद करणे.
३. सत्यशोधक चळवळीतील राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या कार्याचा अभ्यास करणे.

ISSN No. 2394-5990

विचार–विमर्श (Discussion) :

एकोणिसाव्या शतकाचा काळ महाराष्ट्राच्या इतिहासाला कलाटणी देणारा काळ होता. सर्व क्षेत्रांत या काळात आधुनिकतेचे बीज रुजले. परंपरेने बदलाचा ठाव घेतला आणि अनेक सामाजिक उलथा–पालथी घडून येऊ लागल्या. ब्रिटिशसत्तेच्या अंमलाखाली प्रशासकीय बदलांनी वेग घेतला. ब्रिटिशांनी नवी महसूल व्यवस्था, कायदेप्रशासन व्यवस्था, नवे सैन्य दल, पोलीस दल व नोकरशाही उभारुन प्रशासनाची पोलादी चौकट निर्माण केली. पोस्ट व टेलिग्राफ या सेवांचे जाळे विणून कार्यक्षम संदेशवहन यंत्रणा उभारली. रस्ते बांधून रेल्वेचा विस्तार करून कार्यक्षम व जलद दळणवळण यंत्रणा उभारली. नवी शिक्षणव्यवस्था प्रस्थापित केली. मुद्रणकलांचा सार्वत्रिक व सर्वदूर वापर करण्याचा प्रयत्न करून पाश्चात्य ज्ञान व संस्कृतीचा प्रसार केला.[१] याचा परिणाम म्हणून अनेक सामाजिक, धार्मिक संघटनांच्या माध्यमातून समाजसुधारकांनी जनजागृतीचे कार्य केले.

सत्यशोधक समाज ही एक समाज क्रांतीची चळवळ होती. कोणतीही चळवळ एका व्यक्तीच्या सामर्थ्यावर वाढू शकत नसते. म्हणूनच जोतीराव फुले यांच्या बरोबरच त्यांचे समकालीन स्वामी रामय्या अय्यावारू, कृष्णराव भालेकर, नारायण मेघाजी लोखंडे, डॉ. विश्राम रामजी घोले, धोंडीराम कुंभार, ज्ञानगिरी बुवा इत्यादी कार्यकर्त्यांचा सहभाग महत्वाचा होता. त्यांनी केलेल्या कार्याची व मांडलेल्या विचारांची आपल्याला अद्याप पुरेशी आणि सुसंगत माहिती उपलब्ध नाही. अलीकडे काही विद्वान अभ्यासकांचे लक्ष या उपेक्षित सत्यशोधकांच्या कार्याकडे गेले आहे. सत्यशोधक समाजातील पहिल्या पिढीतील कार्यकर्त्यांमध्ये कृष्णराव भालेकर(१८५०–१९१०) आणि गणपत सखाराम पाटील(१८६५–१८९२) यांचे कार्य प्रशंसनीय आहे. कृष्णराव भालेकर हे मुकुंदराव पाटील (१८८७–१९६७) यांचे जनक पिता होते. तर गणपतराव पाटील दत्तक पिता होते.

डॉ. विश्राम रामजी घोले हे इ.स. १८८५ ते इ.स. १८८७ पर्यंत सत्यशोधक समाजाचे अध्यक्ष होते. नारायण मेघाजी लोखंडे यांनी कृष्णराव भालेकरांचा 'दीनबंधू' चालवून मुंबई येथे कामगारांनी संघटना स्थापन करून त्यांच्या समस्या सोडविल्या. महाराष्ट्रातील पहिली कामगारांची चळवळ त्यांनी उभी केली आहे.

पहिल्या पिढीतील काही सत्यशोधकांचे कार्य अद्यापही अज्ञात आहे. महात्मा जोतीराव फुले यांचे निधन २८ नोव्हेंबर १८९० रोजी झाले, कृष्णराव भालेकर ७ मे १९१० रोजी दिवंगत झाले. डॉ. विश्राम घोले यांनी अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. नारायणराव लोखंडे यांचे निधन झाल्यामुळे ङ्गदीनबंधूफ पत्र बंद पडले. सत्यशोधकाची पहिली पिढी काळाच्या पडद्याआड गेली. त्यामुळे सत्यशोधक चळवळ हळूहळू निष्प्रभ होऊ लागली. समाज विस्कळीत झाला.

सत्यशोधक चळवळीच्या दुसऱ्या पिढीत राजर्षी छत्रपती शाहू महाराज,भास्करराव जाधव; 'दीनमित्र' कार मुकुंदराव पाटील; तरूण मराठा, 'कैवारी' आणि 'तेज' चे संपादक दिनकराव जवळकर, केशवराव जेधे, 'जागरुक'कार वालचंद कोठारी, 'डेक्कन रयत' आणि 'प्रगती व जीनविजय' आण्णासाहेब लठ्ठे, केशवराव बागडे, 'जागृती'कार भगवंतराव पालेकर, 'विजयी मराठा'कार श्रीपतराव शिंदे, 'प्रबोधन'कार के. सी. ठाकरे, 'नवयुग'कार सीताराम बोले, माधवराव बागल, 'विश्वबंधू'कार बळवंतराव पिसाळ, 'हंटर'कार खंडेराव बागल, 'गरीबांचा कैवारी'कार बाबूराव यादव, 'भगवा झेंडा'कार दत्ताजीराव कुटणे, इत्यादी कार्यकर्ते आणि वृत्तपत्रे यांच्या बहुमोल कामगिरीमुळे महाराष्ट्रात बहुजन समाजाचे प्रबोधन झाले.

बहुजन समाजाचे दुसरे महान नेते म्हणून महात्मा जोतीराव फुले यांच्यानंतर राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचा उल्लेख करावा लागतो. राजर्षी छत्रपती शाहू महाराज प्रजाहितदक्ष राजे होते. त्यांनी आपल्या सत्तेचा वापर लोककल्याण हा हेतू समोर ठेवून केला. 'सत्यशोधक समाजाशी राजर्षी शाहू महाराजांचा प्रथम संबंध केव्हा आला. याची निश्चित तारीख उपलब्ध नाही. परंतु त्या संबंधी काही अनुमान करता येते. राजर्षींचे एक प्रमुख सहकारी भास्करराव जाधव हे सत्यशोधक चळवळीतील एक प्रमुख नेते होते. भास्करराव जाधव यांना महात्मा फुल्यांचे सहकारी स्वामी रामय्या अय्यावारू आणि प्रसिद्ध इतिहासकार कृ.अ.केळुसकर यांचा सहवास लाभला होता. त्यामुळे भास्करराव‌ांनी या चळवळीची माहिती महाराजांना दिली असावी असे अनुमान करता येते. १९०१–०२ ला कोल्हापुरात वेदोक्त प्रकरणाला आरंभ झाला आणि त्यामुळे महात्मा फुले यांच्या सत्यशोधक चळवळीचे अस्तित्व पुन्हा जाणवू लागल्याची नोंद न.र.फाटक यांनी आपल्या भारतीय राष्ट्रवादाचा विकास या ग्रंथात केली आहे.'[२]

महात्मा फुले यांच्या नंतर गतप्राण झालेल्या सत्यशोधक चळवळीत प्राण फुंकण्याचे महत्वाचे कार्य शाहू महाराजांनी केले. सामाजिक चळवळीत महात्मा फुल्यांप्रमाणे त्यांनी आपला ठसा उमटवला. ते महात्मा फुले यांचे खरे सामाजिक चळवळीचे वारसदार होते. त्यांनी बहुजन समाजाला संघटित करुन त्याला आपल्या हक्कांची जाणीव करुन दिली.

कोल्हापूर मधील सत्यशोधक चळवळ :

महाराष्ट्रात सत्यशोधक समाजाच्या पुनरुज्जीवनाचे वारे सुरू झाले असता, कोल्हापूरसारखे बहुजन समाजाचे अस्वस्थ केंद्र त्यास अपवाद म्हणून राहणे शक्य नव्हते. सत्यशोधक समाजासारख्या चळवळीला खरी गती देण्याचे सामर्थ्य या केंद्रात होते. वेदोक्ताच्या संघर्षामुळे ब्राह्मणशाहीशी सामना करण्याचे मानसिक धैर्य येथील कार्यकर्त्यात उत्पन्न झाले होते. भास्करराव जाधव, आण्णासाहेब लठ्ठे या सारखे सत्यशोधकी बुद्धीवंत आणि बहुजनांचा कैवार घेणारे खुद्द छत्रपती शाहू महाराज यांच्या अस्तित्वाने कोल्हापूरची भूमी सत्यशोधक चळवळीच्या पुनरुज्जीवनास विलक्षण अनुकूल बनली होती. अशी परिस्थिती महाराष्ट्रात अन्यत्र कुठेच नव्हती.

दि. ११ जानेवारी १९११ रोजी कोल्हापूरात सत्यशोधक कार्यकर्त्यांची सभा होऊन 'श्री शाहू सत्यशोधक समाज' स्थापना करण्यात आला. सभेत भास्करराव जाधवांची अध्यक्ष म्हणून, अण्णासाहेब लठ्ठे यांची उपाध्यक्ष म्हणून, महादेवराव डोंगरे यांची मुख्याधिकारी म्हणून तर हरिभाऊ चव्हाण यांची कार्यवाहक म्हणून निवड करण्यात आली. जाधव, लठ्ठे आणि डोंगरे हे सर्व संस्थानातील महत्वाच्या हुद्यावरील लोक होते.[३] कोल्हापूरातील सत्यशोधक नेत्यांनी आपल्या सत्यशोधक समाजाचे नाव ङ्कश्री शाहू सत्यशोधक समाजफ असे ठेवले होते. राजर्षी शाहू महाराजांचे नाव जरी सत्यशोधक समाजाला जोडले असले तरी त्यांची चळवळ पुढे 'सत्यशोधक चळवळ' या नावानेच प्रसिद्धीत आली.

कोल्हापुरातील सत्यशोधक समाजाचे कार्य :

महाराष्ट्रातील समाज बदलाची प्रक्रिया सत्यशोधक समाजाच्या विचारात ओतप्रोत भरलेली होती. कोल्हापुरात सत्यशोधक समाजास साह्य करणारे हाडाचे कार्यकर्ते लाभले बाबुराव यादव, नानासाहेब मुळीक हे त्यापैकी होते. ब्राह्मण पुरोहिता शिवाय आपले धार्मिक विधी सत्यशोधकी पद्धतीने करायचे असे ठरवून त्यांनी पुढच्याच वर्षी मराठा पुरोहिता कडून कोल्हापुरातील पहिली श्रावणी घडवून आणली. (१९१२) ही वार्ता बाहेर पडतात ब्राह्मण वर्गात मोठी खळबळ माजली. त्याच दिवशी यादव व मुळीक यांच्या नेतृत्वाखाली मराठा समाजातील सुमारे १५० लोकांनी एकत्र येऊन एका जाहीर पूजेचा विधी घडवून आणला. या विधीच्या शेवटी ब्राह्मण पुरोहिताच्या मक्तेदारीतून बहुजन समाजाच्या ङ्कमनाची मुक्ती होवोफ अशी सार्वजनिक प्रार्थना करण्यात आली. सत्यशोधक कार्यकर्त्यांच्या या कृत्याचे अनुकरण कोल्हापुरात ठिकठिकाणी होऊ लागले. लोक धाडसाने आपले धार्मिक विधी ब्राह्मण भटजीच्या सहाय्यविना करू लागले.[४] सत्यशोधक समाजाने पर्यायी विचारची देणगी दिलेली होती. ब्राह्मणी विचाराचा सामना करण्यासाठी एकट्या कोल्हापुरात १९१२ साली २००, १९१३ साली २६६ तर १९१४ साली २९९ लग्नविधी सत्यशोधक पद्धतीने पार पडले. याशिवाय इतर धार्मिक विधींची संख्या वेगळीच होती. अशा प्रकारे ब्राह्मण पुरोहितास बाजूला काढून आपल्या ज्ञातीच्या पुरोहीताकडून आपले धार्मिक विधी करण्याची लाट कोल्हापुरात उत्पन्न होऊन ती संस्थानात खेड्यापाड्यात पसरू लागली. त्यातून मराठा पुरोहितांना प्रशिक्षण देण्याची कल्पना पुढे आली. भास्करराव जाधवांच्या मार्गदर्शनाखाली जुलै १९१३ मध्ये कोल्हापुरात सत्यशोधक शाळा स्थापन केली गेली. अर्थात या सर्व प्रकरणांमध्ये महाराजांचा आशीर्वाद होता. सत्यशोधक शाळेत शिक्षक म्हणून नेमलेले विठ्ठलराव ढोणे, हे राजवाड्यावरील एक सेवकच होते. दुसरे दोन सत्यशोधक कार्यकर्ते, हरिभाऊ चव्हाण व श्रीपतराव शिंदे, हेही त्या शाळेमध्ये शिकवत असत. त्यांचाही पगार महाराजांकडून दिला जात असे. शाळेला इमारत जागा इत्यादी सुविधाही महाराजांकडून प्राप्त झाल्या होत्या. थोडक्यात, महाराजांच्या आश्रयावरच शाळा चालू होती. शाळेचा अभ्यासक्रम भास्करावांच्या मार्गदर्शनाखाली तयार झाला होता. त्यासाठी धार्मिक विधींचे शिक्षण देणारे ङ्घरचा पुरोहितफ यासारखी ग्रंथही तयार केलेले होते.[५]

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे महत्त्वाचे तीन सत्यशोधकी निर्णय:

महाराजांनी आपल्या कारकिर्दीत संस्थानातील व संस्थांना बाहेरच्या अनेक सत्यशोधक कार्यकर्त्यांनी भरीव आर्थिक साह्य व नैतिक पाठिंबा दिल्याची अनेक उदाहरणे आहेत; पण त्याहून महत्त्वाचे म्हणजे त्यांनी सत्यशोधक समाजाच्या कार्याला पूरक असे तीन महत्त्वाचे निर्णय घेऊन ते अमलात आणले.

त्यापैकी पहिला निर्णय म्हणजे त्यांनी राजवाड्यातील देवदेवतांच्या व पूर्वजांच्या समाधीच्या पूजा आजवरच्या ब्राह्मण पुरोहिताकडून होत होत्या त्या बंद करून त्या मराठा पुरोहिताकडून सुरू करण्याचा हुकुम दिला.

दुसरा महत्त्वाचा निर्णय म्हणजे मराठा पुरोहित तयार करण्यासाठी खास प्रशिक्षण शाळा स्थापन करण्याचा ६ जुलै १९२० रोजी 'शिवाजी क्षत्रिय वैदिक पाठशाला' (वैदिक स्कूल) या नावाची वैदिक शिक्षण देणारी संस्था मामासाहेब खानविलकर यांच्या अध्यक्षतेखाली अस्तित्वात आली. आरंभी या शाळेत १४ विद्यार्थी होते. वर्षाच्या शेवटी त्यांची संख्या ६२ वर गेली.

ISSN No. 2394-5990

महाराजांचा तिसरा महत्त्वाचा निर्णय म्हणजे पाटगावला मौनी महाराजांच्या पीठावर क्षात्रजगद्गुरुची स्थापना करण्याचा. या निर्णयामुळे महाराजांनी हिंदूंची ब्राह्मणी धर्मगुरु शंकराचार्य यांच्या वर्णवर्चस्ववादी जोखडातून मराठा समाजाची मुक्तता करून त्याला स्वतःचा धर्मगुरू मिळवून दिला.[६]

राजर्षी छत्रपती शाहू महाराज आणि सत्यशोधक जलसे :

सत्यशोधक विचारधारेतून निर्माण झालेली महत्वाची चळवळ म्हणजे सत्यशोधकी जलसे. साधारणत: लोकनाट्याचा अकृतीबंध वापरून हे जलसे सादर केले जात असत. सत्यशोधक समाजाच्या तत्त्वांचा प्रसार करण्यासाठी सत्यशोधक जलसे सर्व महाराष्ट्रभर उदयास आले होते. त्यामागे राजर्षी छत्रपती शाहू महाराजांची प्रेरणा व साहाय्य होते. खेड्यापाड्यातील बहुजन समाजाचे तमाशा हे एक अत्यंत लोकप्रिय असे करमणुकीचे साधन होते. महाराजांनी बहुजन समाजाची ही नस अचूकपणे पकडून केवळ करमणूकीवर आधारित तमाशांचे रूपांतर सत्यशोधक समाजाच्या मतांचा प्रसार करणाऱ्या प्रबोधनात्मक सत्यशोधक जलशात केले. त्यानंतर अनेक सत्यशोधक कार्यकर्त्यांना त्यांनी सत्यशोधक जलशांची पथके तयार करण्यास प्रोत्साहित केले. त्यात भीमराव महामुनी, भाऊराव पाटोळे, तातोबा यादव गणपतराव मोरे इत्यादी प्रभृत्तींचे जलसे मुख्य होते.

सातारा जिल्ह्यातील सत्यशोधक कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या सत्यशोधक जलशाने तर मोठी धमाल उडवून दिली होती. अशा प्रकारे शाहू महाराजांच्या प्रेरणेने व साह्याने सत्यशोधक समाजाचे खरे पुनरुज्जीवन होऊन कोल्हापूर संस्थानातच नव्हे तर संस्थानाच्या बाहेर सातारा, पुणे. नगर, खानदेश–वर्हाड इत्यादी महाराष्ट्राच्या अनेक भागात सत्यशोधक चळवळ फोफावत गेली. परिणामी सत्यशोधक तसेच ब्राह्मणेतर चळवळीतील कार्यकर्ते महाराजांना प्रेरणास्थानी मानू लागले. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे निधन झाल्यानंतर कोल्हापुरात पंचगंगा नदीच्या तीरावर त्यांच्यावर अंत्यसंस्कार केले गेले. ते अंत्यसंस्कार महाराजांनी स्थापन केलेल्या वैदिक स्कूलमधील मराठा विद्यार्थ्यांकडून केले गेले. पूर्वी छत्रपतींचे अंत्यसंस्कार ब्राह्मण पुरोहिताकडून केले जात असत. राणी लक्ष्मीबाई व नूतन छत्रपती राजाराम महाराज यांनी ही प्रथा मोडून काढली.[७]

सत्यशोधक चळवळीतील राजर्षी शाहू महाराजांच्या योगदाना बाबत विविध विचारवंतांच्या प्रतिक्रिया :

शाहू महाराजांच्या निधनानंतर सत्यशोधक चळवळीचे मोठे नुकसान झाले त्यांना श्रद्धांजली वाहताना अनेक थोरामोठ्यांनी महाराजांनी केलेल्या सत्यशोधक समाजाच्या पुनरुज्जीवनाच्या कार्याचा गौरव केलेला आढळतो. थोर सत्यशोधक पुढारी जागृती कार भगवंतराव पाळेकर यांनी म्हटले होते की महाराजांच्या जाण्याने सत्यशोधक चळवळीचा उजवा हात गळून पडला आहे. त्या काळातील बहुजन समाजातील दुसरे सत्यशोधक पत्रकार खंडेराव बागल यांनी महाराजांच्या सत्यशोधकी कार्याचा गौरव करताना उद्गार काढले होते महाराजांनी एका हातात सत्य समाज आणि दुसऱ्या हातात समता हे निशाण घेऊन सर्व महाराष्ट्रभर महात्मा फुल्यांची तत्वे सर्वांसमोर मांडली.

या काळातील सर्वच विचारवंतांची व कार्यकर्त्यांची अशी भावना होती की छत्रपती शाहू महाराजांनी महात्मा जोतीराव फुले यांनी सत्यशोधक समाजाचे कार्य निश्चित पुढे नेले नाही, तर त्याचा सर्व महाराष्ट्रभर प्रसार देखील केला. तथापि शाहू महाराजांच्या सत्यशोधकी कार्याचा सर्वात मोठा गौरव केला गेला तो खुद्द महात्मा गांधी यांच्याकडून. म. गांधी यांनी एका मुलाखतीत अशी प्रतिक्रिया दिली की, 'सत्यशोधक समाजाच्या तत्त्वांप्रमाणे छत्रपती शाहू महाराजांनी अस्पृश्यता नष्ट केली. हा त्यांनी स्वराज्याचा खरा पायाच घातला आहे'[८]

मुकुंदराव पाटील यांनी त्यांच्या कार्याचा गौरव करत असताना 'महाराज जात्याच बुद्धिमान, धोरणी व चतुर असल्यामुळे त्यांनी सत्यशोधक समाजाचा उपयोग अगदी मनाजोगा करून घेतला, ते गादीवर आल्यापासून त्यांच्या नावाचा बोलबाला होण्यास जर काही विशेष कारण असेल तर ते सत्यशोधक समाजाची चळवळ हेच होय. हिंदुस्थानात लहान मोठे जे शेकडो राजे आहेत, त्यात शरीर सामर्थ्य व बुद्धिसामर्थ्य राजकारणातील डावपेच, धाडस, काटकपणा, धार्मिक औदार्य वगैरे गुणांत छत्रपतींचा हात धरणारा एकही संस्थानिक निघणार नाही.'[९] असे गौरवोद्गार मुकुंदराव पाटील यांनी त्यांच्या कार्यकर्तृत्वाबद्दल काढले आहेत. यापेक्षा राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या सत्यशोधकी कार्याचा गौरव कोणता असू शकेल.

निष्कर्ष (Findings) :

१. सामाजिक सुधारणेच्या क्षेत्रात सत्यशोधक चळवळीने महत्त्वाची भूमिका निभावली.
२. सत्यशोधक चळवळीचा विकास विविध अवस्थांमध्ये झाला.सत्यशोधक चळवळीला राज्याश्रय लाभला.
३. महात्मा जोतीराव फुले यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक चळवळीचे कार्य राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी पुढे नेले. त्यामुळे सत्यशोधक समाजाचे खरे पुनरुज्जीवन होऊन कोल्हापूर संस्थानातच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात सत्यशोधक चळवळ फोफावत गेली.

४. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी सत्यशोधकी जलसे,क्षात्रजगद्गुरुची स्थापना इत्यादींच्या माध्यमांतून सत्यशोधकी विचार जनमानसात रुजविला.

संदर्भग्रंथ :

१) बगाडे उमेश (२०१४), 'महात्मा जोतीराव फुले', श्रीगंधर्व वेद प्रकाशन, पुणे, पृ.क्र.१७.

२) मुकुंदराव पाटील स्मरणिका (१९९६), 'दीनमित्र'कार मुकुंदराव पाटील स्मारक समिती, तरवडी अहमदनगर.

३) पवार जयसिंगराव (संपा.), (२००१), राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, पृ. क्र. १४०.

४) पवार जयसिंगराव (२०१३), 'राजर्षी शाहू छत्रपती जीवन व कार्य', महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर. द्वितीय आवृत्ती , पृ. क्र. १११.

५) कित्ता , पृ. क्र. १११.

६) कित्ता , पृ. क्र. ११२.

७) कित्ता , पृ. क्र. ११३.

८) कित्ता , पृ. क्र. ११३.

९) 'दीनमित्र', वर्ष १२ वे., अंक २७ , दि. १७.०५.१९२२, 'कोल्हापूरचे छत्रपती शाहू महाराज स्वर्गवासी झाले!' पृ.क्र.४.

■■■

ISSN No. 2394-5990

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे राजकीय सुधारणावादी विचार

सहयोगी प्रा. डॉ. अतुल हणमंत कदम
(राज्यशास्त्र विभाग)
के.एन.भिसे आर्टस्, कॉमर्स ऍण्ड विनायकराव पाटील सायन्स कॉलेज,
विद्यानगर, भोसरे ता.माढा जि.सोलापूर महाराष्ट्र भारत ४१३२०८
मो. नं. ९४२००९३७९२ kadamah81@gmail.com

सारांश :

सामाजिक न्यायाचे पुरस्कर्ते, अष्टपैलू व्यक्तीमत्व, मैदाणी खेळांना प्रोत्साहन देणारे, नवसमाज निर्माता, समाजक्रांतीकारक म्हणून संपूर्ण जगात महाराष्ट्रातील छत्रपती शाहू महाराज यांना ओळखले जाते. त्यांनी आपल्या संपूर्ण आयुष्यात आपली राजसत्ता बहुजनांच्या कल्याणासाठी विविध कायदे करूण, निर्णय घेवून, जीवितास व राज्यसत्तेस धोका आहे हे माहित असताना राबवली. शेतकरी, कामगार, मागास, दलित, महिला, विद्यार्थी, जंगल, प्राणी या चराचराचा विचार करून त्यांच्या उन्नयनासाठी, सामाजिक गुलामगीरीतून मुक्त करण्यासाठी, हरिजन, गिरीजन यांना मानवी हक्क मिळण्यासाठी ते आयुष्यभर झटले. याकामी त्यांना स्वकीय व परकीय सत्तेशी दोन हात करावे लागले. शिक्षण, सहकार, रोजगार, कला, संस्कृती या सर्वच विषयांनी स्पर्श करून आपले वेगळे स्थान कोल्हापूर संस्थानामध्ये निर्माण केले. विविध समाज, संस्था निर्माण करून समतावादी नवभारताची निर्मिती त्यांच्या हातून झाली. आधुनिक भारताच्या वर्तमानात त्यांच्या कृतीने, कार्याने विकासाचा, न्यायाचा एक वेगळाच ठसा उमटवला असल्याने त्यांचे विचार नव राज्यकर्त्यांना राज्यकारभार करताना मार्गदर्शक ठरत आहेत याची नोंद घ्यावी लागते.

परवलीचे शब्द : वेदोक्त प्रकरण, सर्वधर्म समभाव, सामाजिक न्याय, लोकराजा

प्रस्तावना :

इंग्रजी राजवटीत हिंदुस्थानात ६५० हून जास्त संस्थाने होती. त्यांच्या करारभाराव इंग्रज प्रतिनिधींची नजर होती. मोगलांच्या राजवटीत या संस्थानांनी स्वराज्यासाठी लढा दिला असल्यामुळे ब्रिटिश ताब्यातील जनतेसह संस्थान मुलखातील प्रजेला या संस्थानांविषयी आपुलकी व आस्था होती. शिवछत्रतींच्या मराठेशाहीचे उरलेसुरले अवशेष म्हणून या संस्थानांचे अस्तित्व होते. इंदूर, ग्वाल्हेर, धार, बडोदा, कोल्हापूर, औंध, भोर, सांगली, मिरज, कुरुंदवाड, जमखिंडी, जत, सावंतवाडी, अक्कलकोट, फलटण ही काही संस्थाने सन १८१८ साली पेशवाईच्या अस्तानंतर शिल्लक राहिली होती. या सर्व छोट्यामोठ्या संस्थानांमध्ये कोल्हापूर संस्थानाचे अस्तित्व विशेष होते. राजर्षी शाहू महाराज यांचा जन्म २६ जून १८७४ रोजी कोल्हापूर जिल्ह्यातील कागल तालुक्यातील घाटगे घराण्यात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव जयसिंगराव ऊर्फ आप्पासाहेब होते. त्यांच्या आईचे नाव राधाबाई होते. कोल्हापूर संस्थानचे राजे चौथे शिवाजी महाराज यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या पत्नी आनंदीबाई यांनी १७ मार्च १८८४ रोजी यशवंतराव ऊर्फ बाबासाहेब घाडगे कागलकर म्हणजेच शाहू महाराज यांना भोसल्यांच्या घराणे दत्तक घेतले. दत्तक विधानानंतर यशवंतराव शाहू छत्रपती या नावाने ओळखले जावू लागले. लहान वयात विलायतेला आपल्या मुलाला शिक्षणासाठी नपाठवता शाहू छत्रपती यांचे शिक्षण राजकोटच्या राजकुमार विद्यालयात सुरू झाले. सन १८८९ ते १८९३ या कालावधीत शाहू महाराज यांचे शिक्षण धारवाड येथे झाले. याचवेळी १ एप्रिल १८९१ साली वयाच्या १७ व्या वर्षी बडोद्याचे गुणाजीराव खानविलकर यांच्या लक्ष्मीबाई या १२ वर्षापेक्षा कमी वय असणाऱ्या मुलीशी विवाह झाला. २ एप्रिल १८९४ रोजी त्यांचा राज्याभिषेक झाला. राज्याभिषेकानंतर सन १९२२ पर्यंत म्हणजे एकूण २८ वर्ष ते कोल्हापूर संस्थानचे राजे होते. आपल्या राजकीय विचारामध्ये शाहू महाराजांनी धर्मसुधारणा घडवून पुरोहितशाहीच्या वर्चस्वाला मोडित काढण्याचा प्रयत्न केला. शिक्षण प्रसार करून प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करण्यावर त्यांनी विशेष लक्ष दिले. मागास जातीच्या लोकांमध्ये आपल्या जाती अधिकाराबाबत जागृती केली. अल्पसंख्यांक, मागास, अस्पृश्य यांच्यासाठी स्वतंत्र मतदारसंघ, राखीव मतदारसंघ, राखीव जागा याबाबतचे धोरण आमलात आणले. ब्राम्हणेत्तरांचे पक्ष स्थापन करून समाजसुधारणा व त्यांची आथिक सुधारणा करण्यावर भर दिला. मुंबई येथे ६ मे १९२२ रोजी त्यांचे निधन झाले.

राज्याभिषेकानंतरचे कार्य :

२ एप्रिल १८९४ रोजी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानच्या गादीचे अधिकार हाती घेतल्यानंतर खऱ्या अर्थाने ते छत्रपती झाले. ३ एप्रिल १८९४ रोजी शाहू महाराजांनी आपल्या रयतेस लोककल्याणाची पूर्ण हमी देणारा जाहीरणामा प्रसिध्द करून लोकांना अश्वस्त केले. नाना फडणीस यांनी बंद केलेला राज्याभिषेक शक सुरू करून हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पवित्र स्मृतीस उजाळा दिला. गादीवर बसताच सन १८९६ च्या दुष्काळाशी शाहूना सामना करावा लागला. प्रजा अन्न, पाण्याविना तळमळत असल्याचे दैऱ्याच्या वेळी त्यांनी पाहिले. रयतेच्या अन्नपाण्याची सोय करून एकही भूकबळी होणार नाही याची त्यांनी विशेष काळजी घेतली. सन १८९६-९७ साली निराधाराश्रम स्थापन करून एकूण ४८,७८५ निराधारांची त्यात सोय केली. लहान मुलांच्या शिक्षणासाठी बालकालये उभी करून त्यांना सांभाळण्यासाठी आयांची सोय केली. या बालकांच्या खाण्या-पिण्याची, दूधदूभत्याची सोय केली. अशा तऱ्हेने प्रजेच्या लहान-सहान गरजांवर त्यांनी लक्ष ठेवून त्यावर उपाय योजल्या. सन १८९६ साली प्लेगने संपूर्ण मुंबई इलाक्यात हाहाकार माजवला असताना आपल्या संस्थानात त्यांनी खबरदारी घेवून विविध उपाय योजले. घरात हवा खेळती राहून सूर्य प्रकाश घरात जास्तीत जास्त कसा येईल याची खबरदारी त्यांनी घेतली. उंदरांची बिळे मुजवणे, उंदीर पकडण्यासाठी सापळे लावणे, प्रजेने मळ्यात रहायला जावे अशा उपाययोजना त्यांनी केल्या. मुंबई इलाक्यात प्लेगच्या साथीने हजारो भूकबळी गेले मात्र करवीर संस्थानात एकही भूकबळी गेला नाही.

सर्वधर्म समभावाचे धोरणे :

महाराज जेव्हा गादीवर आले तेव्हा राजकीय अस्थैर्यामुळे प्रशासनात मोठ्या प्रमाणात अनागोंधी माजली होती. याकाळात प्रशासनात इंग्रज, पारशी व ब्राम्हण लोकांचाच न्याय, महसूल, पोलिस खात्यात अधिक भरणा होता. त्यामुळे राजकीय अस्थिरतेचा फायदा घेवून आपणच राजे आहोत या अविर्भावात ते वागत होते. महाराजांच्या चाणाक्ष नजरेने हे ओळखले होते. आपल्या विचारांचे पाईक असणारे रघुनाथराव सबनीस, भास्करराव जाधव, दाजीराव अमृतराव विचारे अशा व्यक्तींची त्यांनी नेमणूक करून राज्यकारभार सुरू केला. जगद्गुरू पीठ धर्मसत्तेचा आधार घेवून शाहू महाराजांच्या राजकीय, सामाजिक आणि शासकीय सुधारणांमध्ये अडथळा बनत होते. धार्मिक क्षेत्रातील ब्राम्हणांचे वर्चस्व पूर्णत: नष्ट करण्यासाठी तसेच जन्मसिध्द पुरोहितशाही नष्ट करण्यासाठी त्यांनी क्षात्र जगद्गुरूची स्थापना केली. हा जगद्गुरू ईश्वराचा प्रतिनिधी नव्हता तर तो केवळ धार्मिक क्षेत्रातील प्रशासक होता. त्यांनी मराठ्यांसाठी नवे वेगळे धर्मपीठ स्थापन केले. पाटगाव येथील मौनीबाबांच्या मठाच्या गादीवर आरूढ होणाऱ्या मठपतीस क्षत्रिय मराठा जगद्गुरू हा हुद्दा त्यांनी दिला. सन १९२० साली मठाचे अधिपती स्वामी रामगिरी समाधिस्थ झाले असता त्यांच्या जागेवर सदाशिव लक्ष्मण पाटील यांची क्षत्रिय मराठा जगद्गुरू म्हणून नेमणूक केली. त्यांच्या सन्मानार्थ खास दरबार भरवून श्रध्देने मुजरा केला व त्यांचे बघून सगळ्या दरबाराने मुजरा करून क्षत्रिय मराठा जगद्गुरूला मान्यता दिली. सनातण्यांनी धर्माच्या आधारावर चालवलेले भोळ्याभाबड्या, अज्ञानी, दीन दुबळ्या प्रजेचे रक्षण करण्यासाठी हे एक महत्वाचे पाऊल शाहू महाराज यांनी टाकले होते. ब्राम्हणांशीवाय धर्मकृत्ये व्हावी म्हणून मराठा वैदिक शाळेची स्थापना केली. ब्राम्हण वर्गाकडून ब्राम्हणेत्तरांचा होणार छळ थांबवण्यासाठी त्यांनी आपले राज्य पणाला लावण्याचा चंग बांधून जातिनिर्मूलन करण्यात ते दंग राहिले. २६ जूलै १९०२ रोजी मागासलेल्या जातिजमातीसाठी संस्थानातील नोकऱ्यांमध्ये ५० टक्के जागा राखीव ठेवण्याचा निर्णय घेवून त्याची अम्मलबजावणी केली. अस्पृश्यांना माणसाप्रमाणे जगू दिले जात नव्हते म्हणून त्यांच्या उद्धारासाठी विशेष प्रयत्न केले. रयतेच्या खाजगी जीवनात अस्पृश्यांना स्थान नव्हते. अस्पृश्यांना खाजगी जीवनात स्थान मिळावे म्हणून शाहू महाराजांनी स्वत: आपल्या खाजगीत माहुत, कोचमन, टपालवाला, घोडेस्वार, मोटारीचे ड्रायव्हर, क्लीनर, पोलीस अशा विविध नोकऱ्यांवर अस्पृश्यांना नेमून उचित स्थान दिले. सरकारी कचेऱ्या, दवाखाने, शाळा, सरकारच्या मदतीवर चालणाऱ्या शाळा, पाणवठे इत्यादी ठिकाणी अस्पृश्यांना मुक्त प्रवेश दिला. अस्पृश्यांना आपण इतर माणसांच्या बरोबरीने आहोत असा आत्मविश्वास उत्पन्न व्हावा म्हणून जरी ते कमी शिक्षित असलेतरी त्यांना वकिलीच्या सनदा दिल्या. कुलकर्णी वतनाच्या माध्यमातून अज्ञानी, गरीब जनतेचे मोठ्या प्रमाणात शोषण होत होते म्हणून २ मार्च १९१८ रोजी कुलकर्णी वतन एक वटहुकूम काढून रद्द केले. कुलकर्णी वतनाच्या जागेवर तलाठी हे पद अस्तित्वात आणून त्या पदावर ब्राम्हणेत्तरांना संधी दिली. १८ सप्टेंबर १९१८ रोजी महार वतनाची पध्दत नष्ट केली. गुन्हेगार जातींना चावडीवर हजेरी लावण्याची पध्दत ३१ ऑगस्ट १९१८ रोजी कायदा करून नष्ट केली. अस्पृश्यांचा उल्लेख अस्पृश्य असा नकरता सूर्यवंशी म्हणून करावा असा १९१७ मध्ये राजपत्रत उल्लेख करून त्यांच्या मनातील न्यूनगंड दूर करण्याचा प्रयत्न केला. १९०८ मध्ये अस्पृश्यांच्या शिक्षणासाठी एक खास शिक्षण संस्था स्थापन केली. १९०१ ते

ISSN No. 2394-5990

१९२२ या कालावधीत वेगवेगळ्या जातीची २३ वसतीगृहे निर्माण करून त्या-त्या जातीच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय केली. माणगांव येथे भरलेल्या दलितांच्या परिषदेला हजर राहून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा गौरव केला. मूकनायक या आंबेडकरांच्या नियतकालिकाला २५०० रू. आर्थिक मदत करून ते नियतकालिक चालू ठेवण्याचा कार्यात मदत केली. आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन मिळावे म्हणून आंतरजातीय विवाह कायदा केला. आपल्या चुलत बहिणीच्या मुलिचा इंदूरच्या होळकर महाराजांच्या मुलाशी विवाह लावून दिला. त्यांनी मराठा आणि धनगर यांचे जवळपास २५ आंतरजातीय विवाह घडवून आणले.

आर्यसमाज, सत्यशोधक समाज, प्रार्थना समाज, दक्षिण महाराष्ट्र सत्यप्रसारक मंडळ आणि ब्राम्होसमाज :

स्वामी दयानंद, केशवचंद्र आणि महात्मा फुले यांच्या समाज सुधारणेच्या कार्याचा त्यांनी गैरव करून त्या मार्गावर ते आयुष्यभर चालत राहिले. महात्मा फुले यांच्या पश्चात आर्यसमाज मरणसन्न होण्याच्या वाटेवर होता. अशा वेळी भास्कररात जाधव यांच्या सारख्या कार्यकर्त्याला सत्यशोधक समाजाचे कार्य करण्यासाठी प्रोत्साहान दिले. शाहू महाराजांच्या पाठिंब्याने सत्यशोधक समाजाच्या प्रसारासाठी भास्कररात जाधव यांनी १९०४ साली मराठा दिनबंधू पत्र काढले होते. भास्कररात जाधव, आण्णा बाबाजी लठ्ठे, महादेव गणेश डोंगरे यांनी प्रचार दौरे काढून सत्यशोधक समाजाच्या कार्याची धुरा पुढे नेली. सन १९११ पासून आयुष्याच्या शेवट पर्यंत शाहू महाराज सत्यशोधक समाजाचे अनुयायी होते. आर्यसमाजाची वेदांबाबतची उदार भूमिका पसंद पडल्याने शाहू महाराज आर्यसमाजाचे सभासद झाले होते. समाजाच्या उन्नतीसाठी त्यांनी प्रार्थना समाज व ब्राम्होसमाज यांच्या कार्याला पाठबळ दिले. गंगाराम कांबळे व यल्लाप्पा यांना दलित समाजाच्या उध्दारासाठी एक संस्था काढण्याचे ठरविले होते. ही त्यांची ईच्छा त्यांनी शाहू महाराजांना बोलून दाखवली असता शाहू महाराजांनी त्यांच्या या संस्थेला दक्षिण महराष्ट्र सत्यप्रसारक मंडळ हे नामाभिधान दिले. एवढ्यवरच ते नथांबता या संस्थेला त्यांनी जुन्या पोस्टाच्या पिछाडीची जागा देवून संस्थेच्या जागेचा प्रश्न निकाली काढला. डॉ. बेझेट व जॉर्ज अरुंडेल या थिऑसफीकल नेत्यांशी धर्म सुधारणेबाबत शाहू चर्चा करत होते. या विविध संस्था समाजाला धार्मिक गुलामगीरतून मुक्त करतील असा विश्वास शाहू महाराजांना होता. धर्म सुधारणा नव्या सामाजिक नीतिमत्तेसाठी आवश्यक आहे असा आशावाद शाहू महाराजांनी मांडला होता.

कोल्हापूर नगरपालिका प्रशासन सुधारणा :

१२ ऑक्टोबर १८५४ साली कोल्हापूर नगरपालिका स्थापन झाली होती. त्यावेळी ब्राम्हण लोकांचा प्रभाव नगरपालिकेवर होता. दीनगरीबांना स्थानिक स्वराज्य संस्थेची फळे चाखता येत नव्हती. अशा वेळी शाहू महाराजांनी नगरपालिका प्रशासन बर्खास्त करून सत्यशोध समाजाचे अनुयायी भास्कररात जाधव यांच्या कडे नगरपालिकेचा कारभार सोपविला. त्यांनी नगरपालिकेतील अनागोंधी कारभार नष्ट करून प्रशासन लोकाभिमूख करण्याचा सपाटा लावला. हिशोबातील गोधळ, घरफाळा, तारदखानापट्टी व इतर कर वसूली या बाबत योग्य निर्णय घेतले. दैनंदिन कामाचे योग्य पध्दतीने रेकॉर्ड ठेवण्याचे नियोजन केले. कोल्हापूरच्या सर्वांगिण विकासासाठी जे निर्णय घेणे आवश्यक आहेत ते भास्कररात जाधवांकरवी शाहू महाराजांनी घेतले. आपल्या संस्थानातील मागास जातींना महाराजांनी तन, मन, धनाने मदत केली.

वेदोक्त प्रकरण :

वेदोक्त प्रकरणामुळे शाहू महाराजांच्या सामाजिक, धार्मिक विचारात क्रांतिकारक बदल झाला. नोव्हेबर १८९९ मध्ये हे प्रकरण घडले. शिवाचे भक्त असणारे शाहू महाराज कार्तिक स्नानासाठी पंचगंगेच्या तिरावर जात असत. स्नानावेळी धार्मिक विधी करण्यासाठी नारायणभट्ट यांना राजवाड्या कडून नेमण्यात आले होते. धार्मिक विधीच्या वेळी नाराणभट्टानी वेदोक्त मंत्राच्या ऐवजी पुराणोक्त मंत्राच्या सहाय्याने विधी चालू केला. हे महारांच्या सोबत असणारे राजारामशास्त्री यांच्या लक्षात आले असता ही बाब शाहू महाराजांच्या लक्षात आणून दिली. यावर महाराजांनी जाब विचारता असता शाहू महाराजांचे घराणे शुद्र असल्याचे सांगितले. शुद्रांना वेदोक्त मंत्राचा अधिकार नाही असे म्हणताच शाहू महाराजांचे रक्त सळसळू लागले. परंतु महाराजांचा संयम दांडगा असल्याने पुढील महिनाभर धार्मिक विधी नारायणभट्ट यांच्या हातूनच चालू दिले. मात्र सर्व जनतेचा अशा ब्राम्हणवृत्तीवर रोष प्रकट होत असण्याच्या पाश्वभूमीवर लोकमान्य टिळकांनी देखील २२ व २९ ऑक्टोबर १९०१ साली केसरीत लेख लिहून व विजापूरकरांनी ग्रंथमालेत लिखान करून त्यांच्या होकारात होकार मिसळायला सुरवात केली. शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक करणाऱ्या गागाभट्टांविरोधी देखील अनुद्गार काढले गेले. यावेळी मात्र शाहू महाराजांचा राग अनावर झाला. दुसरीकडे या जातीय भेदभावाच्या विरोधात जनक्षोभ मोठ्या प्रमाणत उसळू लागला होता. पंचगंगा नदीवर ब्राम्हणांच्या स्नानासाठी असणारी वेगळी व्यवस्था महाराजांच्या अपमानाचे उट्टे काढण्यासाठी असुसलेल्या रयतेने उलथवून

टाकली. लोकमान्य टिळकांच्या भूमिकेमुळे या प्रकरणाला वेगळेच वळण लागले. वेदोक्त प्रकरणाची चौकषी करण्यासाठी त्यांनी न्या. पंडितराव, न्या. विश्वनाथराव गोखले व आप्पासाहेब राजोपाध्ये या तिघांचे एक कमिशन नेमले. १६ एप्रिल १९०२ साली या कमिशनने आपला अहवाल सादर केला. द्विज वर्गातील म्हणजेच वेदोक्ताचा अधिकार असणारे शाहू छत्रपती आहेत असा अहवाल या कमिशनने दिला. मात्र या अहवालावर राजोपाध्ये यांनी सही केली नाही. सातारच्या प्रतापसिंह महाराजांना देखील या प्रसंगाला सामोरे जावे लागले. सातारच्या संस्कृत पाठशाळेत या वादाला सुरवात झाली. विठ्ठल सखाराम तथा आबा पारसनीस या विद्वान, निस्पृह ब्राम्हणाने वेदोक्त प्रकरणाची महराजांची बाजू उचलून धरली. ब्राम्हणांचा पराभव होवून छत्रपती घराणे, मोहिते, महाडिक, माने, गुजर, शिर्के, पालकर, अहिराव, खानविलकर, जाधव ही घराणी क्षत्रिय असून त्यांना वेदोक्ताचा अधिकार आहे असा निर्णय झाला. वेदोक्त प्रकरणानंतर शाहू महाराजांनी धर्मसुधारणेच्या चळवळीस गती दिली.

आदर्श राज्यकर्ता :

आपल्या संस्थानात सामाजिक भेदभाव न माननारे, शाहू महाराजांच्या विचाराशी एकरूप असणाऱ्या प्रशासकांचा एक वर्ग शाहू महाराजांनी तयार केला होता. याकामी त्यांनी आपले गुरूजी फ्रेजर, लीवॉर्नर, गंगारामभाऊ म्हस्के यांचा सल्ला त्यांनी समोर ठेवला होता. प्रस्थापित ब्राम्हण व युरोपियन लोकांना शाहू महाराजांनी प्रशासनातील महत्वाच्या पदावरून वगळले होते. सहाजिक शाहू महाराजांच्या या धोरणामुळे हे लोक त्यांच्यावर नाराज होवून संस्थानातील प्रशासनावर त्याचा वाईट परिणाम होण्याचा धोका निर्माण झाला. असे असले तरी महाराजांनी आपला योजना राबवत असताना इतर कोणताही विचार केला नाही. शाहू महाराजांना खात्री वाटत होती की, नवीन अधिकाऱ्यांच्या नेमणुकीमुळे शासन सुरळीत चालेल. अभियांत्याची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या दाजीराव विचारे यांना सार्वजनिक बांधकाम खात्यात नेमणूक दिली. आर. जे. शॅनॉन या बांधकाम खात्यातील प्रमुखाच्या अंदाजपत्रकावर संशय व्यक्त करून त्यांच्या कार्यात सुधारणा करावयास भाग पाडले. सौ. राधाबाई कृष्णराव केळवकर यांची स्त्रीशिक्षण खात्यात अधिक्षक म्हणून नेमणूक करून स्त्रीयांच्या सामाजिक क्षेत्रात येण्याचा मार्ग मोकळा केला. शिकारीसाठी जंगलात गेले असता तेथिल लोकांच्या समस्या जाणून घेवून त्या सोडवण्यासाठी वनविभागाचे अधिकारी व स्थानिक लोकांशी चर्चा करत असत. आपले हक्क व जबाबदाऱ्या लोकांना कळल्या पाहिजे म्हणून मराठी व कानडी भाषेतून ज्ञान देण्यासाठी त्यांनी शिक्षण संस्था स्थापन करण्याचे धोरण आखले. दुष्काळ, प्लेगची साथ अशा आपत्तीच्या काळी आपल्या प्रजाजनांना आधार देवून त्यांचे संगोपण शाहू महाराजांनी केले. त्यामुळेच छत्रपती शाहू महाराज हे एक प्रजाहितदक्ष व सुखसंपन्न असे राज्यकर्ते म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते.

समारोप :

छत्रपती शाहू महाराज यांनी आपल्या संस्थानात प्रजेच्या विकासासाठी विविध राजकीय निर्णय घेतले. आपली राजकीय सत्ता त्यांनी रयतेच्या उध्दारासाठी सर्वतोपरी वापरली. वेठविगारीची पध्दत बंद करण्याचा घेतलेला निर्णय हा त्यापैकीच एक होता. शिकारी करत असताना आपला प्रदेश शेतीप्रधान असून तिला पाण्याची कमतरता असल्याचे लक्षात आल्यानंतर २६०० फूट लांब व ११० फूट उंच राधानगरी धरणाची निर्मीत करणारा दूरदृष्टीचा जाणकार राजा म्हणून शाहू महाराजांचे स्थान स्थानिक लोकांच्या मनात नेहमीच उच्च राहिले आहे. आर्थिक विवंचणेमुळे शिक्षण अर्ध्यावर सोडावे लागणाऱ्या मुलांसाठी २५ सप्टेंबर १९०१ रोजी भारतातील पहिले व्हिक्टोरिया मराठा वसतीगृह या वसतीगृहाची त्यांनी निर्मिती केली. या कामी शाहू महाराजांनी न्या. रानडे, गोपाळ कृष्ण गोखले, बापूसाहेब महाराज, रघुनाथ व्यंकाजी सबनीस, भास्करराव जाधव व दाजीराव अमृतराव विचारे यांचा सल्ला घेतला. मराठा वसतिगृहाबरोबरच जैन वसतिगृह, मुस्लिम बोर्डिंग, लिंगायत वसतिगृह, अस्पृश्य वसतिगृह, दैवज्ञ बोर्डिंग, श्री नामदेव वसतिगृह, पांचाळ ब्राम्हण समाज वसतिगृह, सारस्वत ब्राम्हण वसतिगृह, कायस्थ प्रभू वसतिगृह, इंडियन ख्रिश्चन वसतिगृह, आर्य समाज वसतिगृह अर्थात गुरूकुल, वैश्य समाज वसतिगृह, इंदुमती राणीसाहेब वसतिगृह, वैदिक विद्यालय व वसतिगृह या माध्यमातून सगळ्याच जातीधर्माच्या मुलांच्या शिक्षणाची सोया शाहू महाराजांनी केली. सुरवातीला ही वसतिगृहे जातनिहाय असावीत नंतर मात्र त्यांचा उद्येश जातिसंस्था नष्ट करण्याचा असायला पाहिजे याकडे शाहू महाराजांचे लक्ष होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समाजसुधरक विचारांचा शाहू महाराजांच्या कृतीवर विलक्षण प्रभाव पडला होता. त्यामुळे डॉ. आंबेडकरांचे जाती निर्मूलन व समाजसुधारणा कार्य आपल्या संस्थानात आमलात आणले. लोकमान्य टिळकांशी दत्तकविधान, ताई महाराज प्रकरण, वेदोक्त प्रकरण या प्रसंगावेळी संपर्क आल्यानंतर त्यांच्या समाजसुधारणेच्या कृत्याला विशेष धार येत होती.

ISSN No. 2394-5990

संदर्भ ग्रंथ :

१. https://mr.wikipedia.org/wiki/शाहूमहाराज
२. शाहू छत्रपती आणि लोकमान्य, य.दि.फडके, श्रीविद्या प्रकाशन, शनिवार पेठ, पुणे, ४११ ०३० प्रथम आवृत्ती ६ मे १९८६.
३. शाहुंच्या आठवणी, प्रा. नानासाहेब साळुंखे, वृषाली प्रकाशन, कोल्हापूर, आवृत्ती २९ ऑक्टोबर २०१६
४. राजर्षी शाहू छत्रपती एक समाजक्रांतिकारक राजा, धनंजय कीर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती १९७९
५. राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, संपा. डॉ. जयसिंगराव पवार, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, द्वितीयावृत्ती २६ जून २००७

■■■

राजर्षी शाहू महाराज यांचे आर्थिक विचार व कार्य विशेष संदर्भ :
(शेती, जलव्यस्थापन, व्यापार व उद्योग, सहकार, औद्योगिक धोरण)

प्रा. सुभाष बाजीराव शिंदे
भारतीय जैन संघटनेचे कला
विज्ञान वाणिज्य महाविद्यालय, वाघोली
Email: shindesubhash394@gmail.com, Ph:7709362657

प्रस्तावना :

आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात समाज परिवर्तनाच्या वाटचालीमध्ये अस्पृश्यता निवारण, सामाजिक सुधारणा चळवळ, शैक्षणिक सुधारणा यामध्ये बदल घडून आले. या परिवर्तनाच्या वाटचालीमध्ये विशेष स्थान महाराष्ट्राच्या सामाजिक गतीशीलतेच्या परिवर्तनवादी धोरणामध्ये राजर्षी शाहू महाराज यांना दिले जाते. राजर्षी शाहू महाराज यांचे कार्य अतिशय मौलिक व महत्त्वाचे ठरते. समाज परिवर्तनाच्या वाटचालीमध्ये अस्पृश्यता निवारण, सामाजिक सुधारणा चळवळ, शैक्षणिक सुधारणा यामध्ये बदल घडवून समाज परिवर्तनामध्ये नवीन विचार प्रवाह निर्माण केला. राजर्षी शाहू महाराजांच्या विचारात व कृतीमध्ये अस्पृश्य उद्धाराची प्रचंड जाणीव दिसून येते. याशिवाय वसतीगृह चळवळीचा प्रयोग व तंत्र, शिक्षण प्रसाराचे कार्य, जातिभेद निर्मूलनाचे कार्य, स्त्रीजातीच्या संरक्षणासंदर्भातील भूमिका, सत्यशोधक समाजाची पूर्नस्थापना, आर्य समाजाविषयी भूमिका, औद्योगिक क्रांतीनंतर निर्माण झालेली कामगार चळवळ व त्या संदर्भात विवेचन, विविध कलेमधील योगदान विविध समाज हिताच्या दृष्टीने समाजाच्या कार्यासाठी प्रसिद्ध असणारे समाज क्रांतिकारक व महाराष्ट्राचे भाग्यविधाता असेही राजर्षी शाहू महाराजांना ओळखले जाते. अशा विविध क्षेत्रांमध्ये त्यांनी परिवर्तनवादी बदल घडून आणला. हा परिवर्तनवादी बदल समाज सुधारणेमध्ये बहुमोल ठरला. विशेष म्हणजे कोल्हापूर प्रांतात राजर्षी शाहू महाराज यांनी याची पहिल्यांदा सुरुवात केली आणि तेथूनच परिवर्तनवादी सुरुवातीला नवा आयाम मिळाला. त्यांचे आर्थिक विचारासंदर्भातही कार्य मौलिक स्वरूपाचे ठरते. राजर्षी शाहू महाराज यांनी शेती, उद्योग, सहकार, औद्योगिक धोरण यामध्ये बदल घडवून आणला. त्यामुळे आर्थिक विकासाला चालना मिळाली असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही.

प्रस्तुत विषयाच्या माध्यमातून राजर्षी शाहू महाराज यांचे शेती, उद्योग, सहकार, औद्योगिक धोरण या दृष्टिकोनातून आर्थिक धोरण या विषयाचा परामर्ष या शोधनिबंधातून घेतलेला आहे.

संशोधनाचे उद्देश :

१. राजर्षी शाहू महाराजांचे प्राथमिक जीवन याचा अभ्यास करणे.
२. राजर्षी शाहू महाराजांचे सहकार विषयक तत्त्व व भूमिका याचा अभ्यास करणे.
३. उद्योग व व्यवसाय वाढीसाठी राजर्षी शाहू महाराजांनी केलेले कार्य समजून घेणे.
४. राजर्षी शाहू महाराजांची औद्योगिक क्षेत्राविषयी भूमिका अभ्यासणे.
५. जल व्यवस्थापना संदर्भात शाहू महाराजांचे कार्य अभ्यासणे.
६. राजर्षी शाहू महाराज यांचे शेतीविषयक धोरण अभ्यासणे.

विषयविवेचन :

१.पूर्वचरित्र:

राजर्षी शाहू महाराजांचा जन्म २६ जुलै १८७४ मध्ये कागल घाटगे घराण्यामध्ये झाला. त्यांचे मूळ नाव यशवंत आबासाहेब घाटगे असे होते. करवीर संस्थानाला दत्तक गेल्यानंतर त्यांचे नामकरण शाहू असे करण्यात आले. सन १८८४ मध्ये शाहू महाराजांचा दत्तक विधानांचा समारंभ पार पडला. त्यानंतर पुढे १ एप्रिल १८९१ मध्ये त्यांनी बडोदा संस्थानातील सरदार खानविलकरांची कन्या लक्ष्मीबाई यांच्याशी विवाह केला. दत्तक विधानानंतर एक वर्ष शाहूंचे शिक्षण कोल्हापूर मध्ये झाले. त्यानंतर सन १८८५ मध्ये शिक्षणासाठी त्यांची रवानगी राजकोटच्या राजकुमारांच्या कॉलेजमध्ये करण्यात आली. सन १८८९ पर्यंत शाहू महाराज यांनी राजकोट या ठिकाणी शिक्षण घेतले. फ्रेझर यांच्या नेतृत्वाखाली त्यांनी शैक्षणिक विकास केला. २ एप्रिल १८९४ मध्ये राज्यकारभाराची सर्व सूत्रे वयाच्या विसाव्या वर्षी हाती घेतली. शाहू महाराजांचा शैक्षणिक प्रवास सुरू असतानाच संस्थानात लोकहिताच्या कार्याचा दृष्टीने त्यांनी लक्ष दिले. त्यानंतर त्यांनी अस्पृश्यता निवारण, शैक्षणिक सुधारणा, आर्थिक विकास, औद्योगिक विकास यामध्ये मूलभूत

ISSN No. 2394-5990

बदल घडवून आणला. परिवर्तनाच्या दृष्टीने समानतेसाठी त्यांनी प्रयत्नही केला. त्यांच्या या कार्यामुळेच नवे पर्व समाज परिवर्तनामध्ये दिसून आले. त्याचा परिणाम अनेक शतके महाराष्ट्रावर राहिला.

२. शेती व्यवस्थेतील बदलते उपक्रम :

कोल्हापूर संस्थानात शाहू महाराजांनी शेती व्यवस्थेत बदल घडवून आणून शेती व्यवस्थेतील आधुनिक उपक्रमाची जाणीव संपूर्ण महाराष्ट्राला करून दिली. मुळातच शेती शास्त्रीय पद्धतीने केल्यामुळे अन्नधान्याचे उत्पादन पूर्वीपेक्षा अधिक पटीने वाढते असा निष्कर्ष त्यांनी युरोपीय दौऱ्यामध्ये पाहिला. त्या दृष्टिकोनातून आपल्या देशात शास्त्रीय पद्धतीने शेती विकास केला तर आपण यामध्ये नक्कीच यशस्वी होऊ शकतो. या भूमिकेतून कोल्हापूर संस्थानात आधुनिक शेती पद्धतीचा प्रसार व मधून अधिकाधिक उत्पादन वाढवण्यासाठी १९१२ मध्ये कोल्हापुरात 'किंग एडवर्ड एग्रीकल्चर इन्स्टिट्यूट' नावाची संस्था स्थापन केली.[१] या संस्थेचा मुख्य उद्देश पारंपारिक शेती व्यवस्थेतील दोष दूर करणे व सुधारित शेती पद्धतीचा प्रसार करणे असा होता. हेच तत्त्व या संस्थेचे होते या दृष्टिकोनातून त्यांनी बी-बियाणे, रासायनिक खते, योग्य पद्धतीचे प्रशिक्षण व ज्ञान, आधुनिक पद्धतीची शेतकऱ्यांना सुधारित अवजारे याचा परिचय करून दिला त्याचबरोबर शेतकऱ्यांना योग्य प्रशिक्षण देण्यासाठी प्रशिक्षित अधिकाऱ्यांची सुद्धा नियुक्ती केली. शेती अवजाराचे प्रदर्शन आपल्या संस्थानात भरविले. विशेष म्हणजे कोल्हापुरात आधुनिक शेती अवजारांचे म्युझियम शाहू महाराजांनी सुरू केले. अशा वेगवेगळ्या बदलांमधून त्यांनी पारंपारिक पिकांमध्ये सुद्धा बदल घडवून आणण्याचा प्रयोग यशस्वी करून दाखवला. म्हणजेच कोल्हापूर संस्थानात चहा पिकवण्याचा प्रयत्न हा अतिशय यशस्वी ठरला. त्यांचा हा प्रयोग व्यापारी तत्त्वावर सुरू झाला.

३.जलव्यस्थापनासंदर्भात शाहू महाराजांचे कार्य :

कोल्हापूर संस्थानांमध्ये महाराष्ट्रात पहिल्यांदा हरितक्रांती घडून आली असे मानले जाते. कारण शाहू महाराजांनी शेती, उद्योग, सहकार या तिन्ही क्षेत्रात नाविन्यपूर्ण बदल घडवून आणला. यापैकी विशेष म्हणजे जल व्यवस्थापनाच्या संदर्भात शाहू महाराजांचे कार्य हे उल्लेखनीय ठरते. शाहू महाराजांचा राज्याभिषेक झाल्यानंतर त्यांच्या पहिल्याच पर्वामध्ये जलव्यवस्थापनासंदर्भात त्यांनी महत्त्वाची भूमिका घेतली. तत्कालीन कालखंडामध्ये मोठ्या प्रमाणात दुष्काळ याचा सामना करावा लागलेला होता. यावर उपाय शोधावा यासाठी त्यांनी प्रथमतः सन १९०२ मध्ये 'सार्वत्रिक पाटबंधारे धोरण' जाहीर केले आणि हे धोरण जाहीर करून या संदर्भातील उपाय योजनाही त्यांनी पूर्ण केल्या. विशेष म्हणजे जुन्या विहिरी, छोटे-मोठे तलाव, लहान मोठे बंधारे या सर्वांच्या दुरुस्तीची कामे जल व्यवस्थापनाच्या दृष्टीने त्यांनी हाती घेतली. तसेच निसर्गनिर्मित पावसाच्या पाण्याचा वापर व योग्य जल व्यवस्थापन जर झाले तर दुष्काळाचा सामना सहज करता येईल या दृष्टिकोनातून त्यांनी कोल्हापूर या संस्थांमध्ये राधानगरी सारखा महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतला.[२] सन १९०९ मध्ये राधानगरी धरणाचे बांधकाम सुरू करण्यात आले. सन १९१८ पर्यंत हे बांधकाम पूर्ण अवस्थेत दिसून आले. या धरणामध्ये दरवर्षी सहाशे दशलक्ष घनफूट पाणी शेतीसाठी उपलब्ध होऊ लागले. त्यामुळेच भोगावती व इतर भागातील लहान-मोठे जलविभाग व जल व्यवस्थापनाचे स्त्रोत यामुळे शेती व्यवसाय भरभराटीस आला. त्यामुळेच जल व्यवस्थापनाचे त्यांचे हे भरीव कार्य खऱ्या अर्थाने शेती व्यवसायाला संजीवनी देणारे घटक बनले.

४.व्यापार व उद्योग :

आर्थिक धोरण पूर्णतः व्यापार आणि उद्योग याच्या विकसनशीलतेवर अवलंबून आहे याची जाणीव शाहू महाराजांना होती. या दृष्टिकोनातून त्यांनी प्रेरक विचार मांडले त्यांच्या मते, 'केवळ शेती करून चालणार नाही तर व्यापार व व्यवसाय याच्यामध्ये विकसित धोरण आमच्या लोकांचे असावे.' युरोपीय लोकांचे धोरण व्यापार उद्योगात मोठ्या प्रमाणात अग्रेसर असल्यामुळे त्यांची झपाट्याने प्रगती झाली. असाही निष्कर्ष त्यांनी समाजासमोर ठेवला. पाश्चात्य देशांच्या प्रगतीचे खरे कारण औद्योगिक प्रगती बरोबरच व्यापारी धोरण आहे हे त्यांनी स्पष्ट केले. या व्यापारी धोरणाला चालना देण्यासाठी त्यांनी प्रथमतः आपल्याच संस्थानांमध्ये स्वतंत्र पद्धतीच्या बाजारपेठांची स्थापना केली. या दृष्टीने त्यांनी 'शाहूपुरी' नावाची नवी बाजारपेठ निर्माण केली.[३] सन १९०२ च्या सुमारास ही बाजारपेठ व्यापारामध्ये महाराष्ट्रात अग्रेसर राहिली. त्यांच्या या बाजारपेठेच्या निर्मितीमुळे कोल्हापूर संस्थानात व्यापारामध्ये भरभराट दिसून आली. उदाहरणार्थ गुळ उत्पादन व भुईमूग शेंगा यांची निर्यात महाराष्ट्रातील वेगवेगळ्या भागाबरोबर विविध देशांमध्ये मोठ्या प्रमाणात झाली.

उद्योगांना चालना देण्यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी नवे उद्योग सुरू व्हावे यासाठी औद्योगिक सर्वेक्षण प्रथमता केले. त्यानुसार संस्थानात पुढे कापड उद्योग व्यवसाय, औषधी तेल उद्योग व्यवसाय कोल्हापुरात भरभराटीस आले. महाराजांच्या मते, 'देशातील औद्योगिकीकरणाच्या इतिहासात उद्योग व्यवसाय यांना महत्त्वाचे स्थान आहे जर यांची विकसित अवस्था दिसून आली तर नक्कीच देश प्रगतीपथावर जाईल.' हे त्यांनी विचार

मांडले व त्या दृष्टीने कार्यवाही केली. म्हणजेच सन १९०४ मध्ये त्यांचा हा प्रयोग यशस्वी ठरला. याच वर्षी तेलउद्योगांमध्ये कोल्हापूर संस्थानाने मोठी प्रगती केली. आपल्या संस्थानातील नाविन्यपूर्ण वस्तूचे नमुने त्यांनी मुंबई, कलकत्ता तसेच अमेरिका व जपान या देशातील वेगवेगळ्या तज्ञांकडे पाठवणे. त्यातूनच पुढे यावर आधारित अभिनव उद्योगांचा प्रयोग त्यांनी यशस्वीरित्या राबवला. याचे उत्तम उदाहरण म्हणजे मधुमक्षिका पालन उद्योग, कष्टर्क रंग निर्मिती उद्योग यांचे मानले जाते. उद्योगधंद्यांविषयी प्रशिक्षण देण्यासाठी त्यांनी प्रशिक्षित अधिकाऱ्यांची नियुक्ती केली. प्रसंगी पाश्चात्य देशातील पुढारलेल्या तज्ञांची मदतही त्यांनी घेतली. याचा संदर्भ जर आपण पाहिलात तर मधुमक्षिकापालन उद्योगासंदर्भात त्यांनी मॅक्लीन यांना लिहिलेले पत्र यातून दिसून येते.

याच नवीन उद्योगाच्या पार्श्वभूमीवर शाहू महाराजांच्या प्रेरणेनेच पुढे सन १९०६ मध्ये 'शाहू छत्रपती स्पिनिंग अँड विहींग मिल्स' या कापड गिरणीची स्थापना कोल्हापूर संस्थानात झाली.[४] यामुळे कापड उद्योगात कोल्हापूर संस्थान अग्रेसर ठरले. त्यामुळे रोजगाराच्या अनेक संधी स्थानिक लोकांना सहजपणे उपलब्ध होत गेल्या. पुढे याच उद्योग व्यवसायाच्या पार्श्वभूमीवर ऑइल मिल, इलेक्ट्रिक कंपनी, मोटार ट्रान्सपोर्ट कंपनी असे अनेक उद्योग स्थापन होत गेले. या उद्योगांना संरक्षण देण्यासाठी आर्थिक तरतूद देखील त्यांनी घडवून आणली. म्हणजेच शाहू महाराजांच्या अभिनव प्रयोगातील उद्योग व्यवसायाला संरक्षण, त्यांना आर्थिक भांडवल व स्वयंपूर्ण पाठबळ देऊन ते टिकवण्याचा प्रयत्न त्यांनी केला. त्यामुळे आर्थिक विकासास हातभार लागला हे निश्चितच त्यांच्याच कार्याचे यश ठरते.

५.शाहू महाराजांचे सहकार तत्व :

शाहू महाराजांना सहकार तत्वाचे आद्य पुरस्कर्ते असेही म्हटले जाते. कारण प्रथमतः शासकीय यंत्रणेद्वारे उद्योग व व्यवसाय सुरू करण्याऐवजी सहकारी तत्त्व जर उद्योग व्यवसायामध्ये आणले तर यामध्ये भरभराट येईल असे मत शाहू महाराजांचे होते. त्यातूनच त्यांनी आधुनिक बदलाच्या पार्श्वभूमीवर कारागीर लोकांचे परंपरागत व्यवसाय यामध्ये आधुनिकता निर्माण करणे व ते टिकवणे या दृष्टीने नवे सहकाराचे तत्व स्वीकारावे असा उपदेश शाहू महाराजांनी तत्कालीन कालखंडामध्ये केला. सहकाराच्या माध्यमातून उद्योगांना लोकाश्रय कशा पद्धतीने मिळेल हे तत्त्व त्यांनी स्वीकारले.

सहकार त तत्त्वला पुढे कायद्याचे स्वरूप प्राप्त करून द्यावे यासाठी त्यांनी सन १९१२ मध्ये 'सहकारी संस्था विषयक कायदा' केला.[५] याची नोंदणी व्हावी यासाठी 'सहकार निबंधकाची' नियुक्ती त्यांनी संस्थानांमध्ये केली. त्यांच्या या धोरणामुळे सहकारी तत्त्वाला अनुसरून सहकारी संस्था निर्माण होत गेल्या. याचे उत्तम उदाहरण सन १९१३ मध्ये 'दि कोल्हापूर अर्बन को-ऑपरेटिव्ह सोसायटी' ही पहिली सहकारी संस्था भास्करराव जाधव यांचा नेतृत्वाखाली स्थापन झाली.[६] पार्श्वभूमीवर पुढे विविध कार्यकारी सरकारी संस्था. सहकारी उपसा जलसिंचन संस्था, सहकारी दूध संस्था, ग्रामीण पतपुरवठा संस्था या कोल्हापूर व महाराष्ट्रभर निर्माण होत गेल्या. उद्योगांना लोकाश्रय मिळाल्याने सहकार क्षेत्र भरभराटीस आले. सहकारक्षेत्राच्या या धोरणामुळेच शेती, उद्योग, व्यापार, व्यवसाय यामध्ये आधुनिकता प्राप्त होत गेली. याच तत्त्वाला अनुसरूनच सहकारी सुत गिरण्या यांची भरभराटी होऊन कापड उद्योग मोठ्या प्रमाणात नावारूपाला आला. म्हणजेच राजर्षी शाहू महाराजांचे सहकार विषयक तत्त्व यशस्वी झाले असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. आधुनिक महाराष्ट्राला गतिशीलतेकडे घेऊन जाणारा सहकार हा विषय शाहू महाराजांच्या कोल्हापूर संस्थानातूनच पुढे आला याचे सर्व श्रेय शाहू महाराजांना जाते.[७]

थोडक्यात शाहू महाराजांनी समाज परिवर्तनाच्या विधायक कार्याबरोबरच शेती व्यवसाय, जलव्यवस्थापन, व्यापार व उद्योग, सहकार तत्त्व यामध्ये आधुनिकता घडवून आणण्याचा प्रयत्न केला. युरोपीय देशातील नवीन तत्त्वप्रणाली जर अमलात आली तर शेती, उद्योग, व्यवसाय यामध्ये आधुनिकता निर्माण होईल. या पार्श्वभूमीवरच त्यांनी आर्थिक धोरण विकसित करताना नाविन्यपूर्ण बदल घडून आणले व या बदलांना प्रत्यक्ष कृतीची जोड देऊन त्यांना संरक्षण दिले. त्यामुळेच दीर्घकाळापर्यंत कोल्हापूर संस्थान व पर्यायाने महाराष्ट्रातील विविध भागांमध्ये शेती, उद्योग, व्यवसाय या आर्थिक धोरणाशी निगडित असणाऱ्या घटकांमध्ये बदल घडवून आला.

निष्कर्ष :

१. राजर्षी शाहू महाराजांचे आर्थिक विचारासंदर्भातही कार्य मौलिक स्वरूपाचे ठरते.
२. कोल्हापूर संस्थानात शाहू महाराजांनी शेती व्यवस्थेत बदल घडवून आणून शेती व्यवस्थेतील आधुनिक उपक्रमाची जाणीव संपूर्ण महाराष्ट्राला करून दिली.
३. राजर्षी शाहू महाराजांचे जलव्यवस्थापनाचे हे भरीव कार्य खऱ्या अर्थाने शेती व्यवसायाला संजीवनी देणारे घटक बनले.
४. राजर्षी शाहू महाराजांनी सहकाराच्या माध्यमातून उद्योगांना लोकाश्रय प्राप्त करून दिला.

ISSN No. 2394-5990

५. सहकारक्षेत्राच्या या धोरणामुळेच शेती, उद्योग, व्यापार, व्यवसाय यामध्ये आधुनिकता प्राप्त होत गेली.
६. आधुनिक महाराष्ट्राला गतिशीलतेकडे घेऊन जाणारा सहकार हा विषय राजर्षी शाहू महाराजांच्या कोल्हापूर संस्थानातूनच पुढे आला याचे सर्व श्रेय शाहू महाराजांना जाते.
७. उद्योगांना चालना देण्यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी नवे उद्योग सुरू व्हावे यासाठी औद्योगिक सर्वेक्षण प्रथमता केले. त्यानुसार संस्थानात पुढे कापड उद्योग व्यवसाय, औषधी तेल उद्योग व्यवसाय कोल्हापुरात भरभराटीस आले.

संदर्भ :

१. पाटील शामराव, (संपा.) भास्कर दटावकर, राजश्री छत्रपतींचे निवडक आदेश भाग १, मुंबई १९८८, पृष्ठ क्रमांक १४३.
२. कुलकर्णी मीना व कुलकर्णी ब.शी., श्री शाहू छत्रपतींचे अर्थकारण, प्रथम आवृत्ती १९७५ कोल्हापूर ,पृष्ठ क्रमांक ७२.
३. कीर धनंजय, राजर्षी शाहू छत्रपती एक समाज क्रांतिकारक, पहिली आवृत्ती मुंबई १९८९, पृष्ठ क्रमांक १६.
४. पवार जयसिंगराव (संपा.), राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, प्रकाशन संचालक महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, प्रथम आवृत्ती मे २००१, पृष्ठ क्रमांक २०१.
५. कित्ता, पृष्ठ क्रमांक २०२.
६. कित्ता, पृष्ठ क्रमांक २०३.
७. कित्ता, पृष्ठ क्रमांक २०५.

■■■

राजर्षी छ. शाहू महाराज सामाजिक लोकशाहीच्या चळवळीचे एक आधारस्तंभ

डॉ.सुनिल शिवमूर्ती रजपूत
प्रोफेसर, इतिहास विभाग प्रमुख,
जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य् महाविद्यालय,
अणदूर ता.तुळजापूर जि.उस्मानाबाद
Email- rajputsunil900@yahoo.com, मो.नं. ९९६०४०४९५६

गोषवारा :

महाराष्ट्रातील समाजव्यवस्थेचा अभ्यास करताना जाती, वतन, सामाजिक चालीरिती या घटकांचा प्रामुख्याने विचार करावा लागतो. छत्रपती शाहू महाराजांनी अस्पृश्योद्धारासाठी जी चळवळ उभी केलेली होती ती चळवळ जोमाने सुरु राहण्यासाठी त्यांना अस्पृश्य समाजातील कार्य करणारे कार्यकर्ते पाहिजे होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या रुपाने त्यांना असा कार्यकर्ता मिळाला असल्यामुळे राजर्षी शाहू महाराजांना आनंद झाला.

जाती व्यवस्थेतून निर्माण झालेला अस्पृश्यतेचा प्रश्न् सोडविण्यासाठी संपूर्ण समाज रचनेची पुर्नमांडणी करणे हा विचार सर्वप्रथम महात्मा फुले यांनी मांडला आणि हा विचार मनामध्ये घेऊन राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी सामाजिक लोकशाहीच्या चळवळीच्या रुपाने सुरुवात केली. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या अगोदर महाराजांनी अस्पृश्य मुक्तीची चळवळ सुरु केली होती. पुढे डॉ.आंबेडकर व शाहू महाराजांची भेट झाल्याची वार्ता सर्वत्र पसरल्यामुळे वर्णव्यवस्थेच्या पुरस्कर्त्यांनी विकृत बातम्या प्रसिद्ध केल्या. परंतु शाहू महाराज अशा विरोधकांना घाबरणारे राजे नव्हते.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक, आर्थिक, धार्मिक किंवा राजकीय बाबतीत जो संघर्ष करुन अस्पृश्य समाजाला उन्नतीच्या शिखरावर बसविले यामध्ये शाहू महाराजांचे बरेचसे योगदान आहे.

कि वर्डस : सामाजिक चळवळ, अस्पृश्योद्धार, मुकनायक, माणगांव परिषद

प्रस्तावना :

महाराष्ट्रातील समाजव्यवस्थेचा विचार करताना जाती, वतन, सामाजिक चालीरिती या घटकांचा प्रामुख्याने विचार करावा लागतो. जात ही श्रमविभागणीची व व्यवसायाधिष्ठित स्तरीकरणाची व्यवस्था होती. जातीच्या उतरंडीमध्ये प्रत्यक्ष जात आपल्याला श्रेष्ठ ठरवून आपल्यापेक्षा खालच्या जातीला दुय्यम मानत असे. यामध्ये अस्पृश्य म्हणून गणल्या गेलेल्या जातीजमातीची स्थिती दयनीय होती. अस्पृश्योद्धाराचे कार्य समाजातील सर्वच घटकांनी केलेले आहे. यामध्ये प्रामुख्याने महात्मा फुले, कोल्हापूर संस्थानचे राजे राजर्षी शाहू महाराज व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाचा उल्लेख करावा लागतो.

कोल्हापूर संस्थानचे राजे राजर्षी शाहू महाराज यांच्यावर महात्मा फुले यांच्या विचारांचा प्रभाव होता. २ एप्रिल १८९४ साली महाराजांनी आपल्या राज्याची सूत्रे जाती घेतल्यापासून 'माणूस' हाच त्यांच्या कार्याचा केंद्रबिंदू मानून ते सर्वच क्षेत्रात मुलगामी कृतीशीलतेने कार्य करीत होते. अस्पृश्यांना जागृत करण्यासाठी त्यांच्यामध्ये चळवळ घडून यावयास हवी व त्या चळवळीचे नेतृत्वही त्यांच्यापैकी कोणीतरी करावयास हवे, किंबहुना उदयास यावयास हवे अशी महाराजांची प्रामाणिक इच्छा होती. दरम्यानच्या काळामध्ये महाराजांची ही इच्छा पूर्ण करणारे नेतृत्व आले होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या रुपाने निडर तरुण, तडफदार पुढारी अस्पृश्यांना मिळाला आणि महाराजांची स्वप्नपूर्ती झाल्याचे देशाने पाहिले. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये राजर्षी छत्रपती शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ऋणानुबंधाचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

राजर्षी शाहू महाराज आणि डॉ.बाबासाहेब भेट :

जाती व्यवस्थेतून निर्माण झालेला अस्पृश्यतेचा प्रश्न सोडविण्यासाठी संपूर्ण समाज रचनेची पूर्नमांडणी करणे हा विचार सर्वप्रथम महात्मा फुले यांनी मांडला आणि हा विचार मनामध्ये घेवून राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी सामाजिक लोकशाहीच्या चळवळीच्या रुपाने सुरुवात केलेली होती. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या आधीच महाराजांनी अस्पृश्यांच्या मुक्तीची चळवळ सुरु केली होती.[१] कोल्हापूरात महाराजांनी सुरु केलेल्या

ISSN No. 2394-5990

अस्पृश्यांच्या चळवळीतील महाराजांचे निष्ठावंत व बाबासाहेबांचे निकटवर्ती दत्तोबा पोवार यांच्या मध्यस्थीने इ.स. १९१९ मध्ये शाहू-आंबेडकर या दोन्ही महापुरुषांचा परस्पर संबंध आला व पुढे या दोन्ही महापुरुषांची भेट मुंबईच्या परळ चाळीत घडून आली. दोघांमध्ये चर्चा झाली.[२] या पहिल्या भेटीतच महाराजांनी बाबासाहेबांना कोल्हापूरला येण्याविषयीचे निमंत्रण दिले व बाबासाहेबांनीही ते स्वीकारले.[३] दिलेल्या निमंत्रणाप्रमाणे डॉ.आंबेडकर कोल्हापूरला आले. त्यांचे स्वागत आणि पाहुणचार राजेशाही थाटात केला गेला. याच वेळी महाराजांनी बाबासाहेबांची कोल्हापूर शहरातून मिरवणूकही काढली होती. याच भेटीत महाराजांनी अनेक विषयांवर बाबासाहेबांशी प्रदीर्घ चर्चाही केली होती.[४]

मुकनायक पत्रासाठी महाराजांचे अर्थबळ :

बडोद्याचे सयाजीराव गायकवाड महाराज हे परिवर्तनवादी विचारांचे होते. त्यांच्या विचार व कृती मुळे अनेक अस्पृश्य लोक बडोदा, अहमदाबाद येथे उदरनिर्वाहासाठी गेले. डॉ. आंबेडकरांना अर्थसहाय्य् देताना महाराजांनी अटही घातली होती. याउलट छत्रपती शाहू महाराजांनी डॉ.आंबेडकरांना अर्थसहाय्य दिले, पण त्यांनी कधीही त्यांना कसलीही अट घातली नाही. याच महाराजांच्या कृतीमुळे डॉ.आंबेडकरांना एक खंबीर अढळ पाठींबा मिळाला. त्यामुळे बाबासाहेब नव्या उमेदीने उत्साहाने काम करण्यास सज्ज झाले.[५]

अस्पृश्यांची बाजू जनतेसमोर आणि भारत दौऱ्यावर आलेल्या साऊथबशे समितीसमोर मांडण्यासाठी बाबासाहेबांना वर्तमानपत्राची गरज भासू लागली. त्यांच्या प्रेरणेनेच अस्पृश्य समाजाबांधवांनी महाराजांची भेट घेऊन त्यांना ही योजना सांगण्यात आली. महाराजांनी ही योजना पसंत पडली. त्यांनी तात्काळ वर्तमानपत्र काढण्यासाठी अडीच हजारांचा चेक दिला.[६] महाराजांनी दिलेल्या या पैशातूनच मूकनायक या पाक्षिकाचा पहिला अंक ३१ जानेवारी १९२० साली प्रसिद्ध झाला.[७]

माणगांव परिषद :

राजर्षी छत्रपती शाहू महाराज आणि बाबासाहेब या दोघांच्या रुपाने अस्पृश्यांच्या चळवळीला दोन खंबीर वैचारिक आधारस्तंभ लाभले होते. ङ्कमाणगांव परिषदफ हे त्याचेच उदाहरण आहे. कोल्हापूर संस्थानातील कागल जहागिरीतल्या ङ्कमाणगांवफ या गावी २० व २१ मार्च १९२० रोजी माणगावचे तत्कालीन गावकामगार आप्पासाहेब दादगोंडा पाटील यांच्या मदतीने दक्षिण महाराष्ट्र दलित परिषदेचे पहिले अधिवेशन भरविण्यात आले होते.[८] या परिषदेत अध्यक्ष म्हणून डॉ.बाबासाहेबांची निवड करण्यात आली होती. या परिषदेस हजर राहण्यासाठी ते माणगांव या गावी आले असता तत्कालीन माणगावचे गावकामगार आप्पासाहेब दादगोंडा पाटील यांच्यासह शेकडो लोकांनी बाबासाहेबांचे जंगी स्वागत केले.[९] या परिषदेतील महाराजांचे भाषण बाबासाहेबांसह अस्पृश्य बांधवांचे मनोधैर्य उंचावणारे होतेच, शिवाय याच परिषदेमध्ये महाराजांनी अस्पृश्य चळवळीचे नेतृत्व बाबासाहेबांनी करावे अशी अपेक्षा व्यक्त केली. या परिषदेपासूनच बाबासाहेबांचे नेतृत्व उदयास आले आणि स्थिर होत गेले.

समारोप :

राजर्षी छत्रपती शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृश्यांच्या मुक्तीची चळवळ सुरु केली होती. नंतर या चळवळीची सुत्रे डॉ.बाबासाहेबांच्या हाती आली. चळवळीच्या कामामध्ये त्यांना महाराजांचा खऱ्या अर्थाने पाठिंबा आणि आधार मिळाला होता. त्यामुळे बाबासाहेब नव्या उमेदीने, उत्साहाने काम करण्यास सज्ज झाले.

संदर्भ :

१) डॉ.पवार जयसिंगराव, राजर्षी शाहू महाराज ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, जानेवारी २००१

२) कित्ता, पान नं. ५४७

३) साळुंखे बी.पी., राजर्षी शाहू गौरव ग्रंथ, दुसरी आवृत्ती, १९८८

४) डॉ.पवार जयसिंगराव, राजर्षी शाहू छत्रपती एक मागोवा (२००४ प.आ.), सुमेरु प्रकाशन, डोंबिवली, पृ. ३

५) कित्ता, पान नं. ५४८

६) डॉ.भीमराव रामजी आंबेडकर, खंड १

७) डॉ.पवार जयसिंगराव, राजर्षी शाहू महाराज

८) कित्ता, पान नं. ५४८

९) बहिष्कृत भारत आणि मुकनायक, मुंबई, एप्रिल १९२०

१०) राजर्षी शाहू छत्रपती, एक मागोवा (२००४ प.आ.), डॉ.जयसिंगराव पवार, सुमेरु प्रकाशन, डोंबिवली, पृ. २३

११) कित्ता, पृ. २३

■■■

राजर्षी शाहू महाराज : एक अष्टपैलू व्यक्तीमत्व (इ.स. १८७४-१९२२)

प्रा.डॉ.सौ.अरुणा रविंद्र वाघोले
सहयोगी प्राध्यापक,इतिहासविभाग प्रमुख.
मा.बाळासाहेब जाधव क, वा, वि. महाविदयालय
आळे,ता.जुन्नर.जि .पुणे. ४२२४११.
9860631908, aruna.123w@gmail.com

प्रास्ताविक:

शताब्दी महोत्सवानिमित्ताने अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचा राजा छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांचे जीवनातील सुवर्णकणांचा मागोवा कार्याच्या रूपाने पाहणार आहोत.

आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात कोल्हापूर येथील राजश्री शाहू महाराजांचे नाव विशेष उल्लेखनीय ठरते. त्यांनी आपल्या राज्यात सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक क्षेत्रात भरीव स्वरूपाच्या सुधारणा करून लोककल्याण करण्याचा प्रयत्न केला. महात्मा फुले यांनी सुरू केलेले समाजसुधारणांचे कार्य पुढे नेण्याचे कार्य शाहू महाराजांनी केले. ब्राह्मणेतर चळवळीची आवश्यकता- प्राचीन काळापासून चालत आलेल्या परंपरेला धक्का देणे सोपे काम नव्हते. धर्म, परंपरा नाकारून नव्या चळवळीची बीजे रोवण्याचे काम महाराष्ट्रातील समाजसुधारकांनी केले.[१] प्रजाहितदक्ष सत्ताधीश म्हणून शाहू महाराजांचा उल्लेख करावा लागतो. एक आदर्श राजा आणि बहुजन व दलित समाजाचे नेते म्हणून असलेली त्यांची लोकप्रियता शेवटपर्यंत कायम टिकली. त्यांनी केलेल्या कार्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्व कोल्हापूर संस्थानापुरते मर्यादित न राहता महाराष्ट्रातच नव्हे तर भारतातही लोकप्रिय झाले. उच्चवर्णीयांनी स्वतःचे स्थान अबाधित राखण्यासाठी समाजातील तथाकथित कनिष्ठ वर्गांना शिक्षणाच्या हक्कापासून दूर ठेवले. व्यवसायाधिष्ठित जातीव्यवस्थेत शिक्षण याचा अर्थ परंपरेने चालत आलेला व्यवसाय शिकणे एवढाच घेतला गेला. याने स्वयंपूर्ण व स्वयंनिर्वाही असल्याने त्यांना पारंपारिक व्यवस्थेत बदल करण्याची गरज वाटली नाही. जागतिक पातळीवरील सुधारणांचे वारे या गावांपर्यंत पोहोचवले नाही. त्यामुळे व्यवस्था भक्कम राहिली. इंग्रजांच्या आगमनानंतर हे वारे इतक्या जोरदारपणे येथे घुसले की डोईवरचे छप्परच उडून गेले. व्यवसाय बंद पडले. जीवन तृणवत झाले.[२] सर्वसामान्य लोकांचे कल्याण करणे, बहुजन समाजाची पारंपारिक बंधनातून मुक्तता करणे, त्यांना सुशिक्षित बनवणे, त्यांच्यात जागृती आणणे आणि त्यांना प्रगत बनवण्यासाठी प्रयत्न करणे हे त्यांनी आपले कर्तव्य मानले. ब्रिटिश अंमलाखाली आधुनिक भारतीय मध्यमवर्गाचा उदय झाला. १८३५ साली मेकॉलेने म्हटल्याप्रमाणे ब्रिटिश राज्यकर्ते व भारतीय जनता यांच्यातील मध्यस्थ्यांचा असा वर्ग निर्माण करणे ब्रिटिशांना अभिप्रेत होते की, तो वर्ग रक्ताने व रंगाने भारतीय असेल पण त्याच्या आवडी-निवडी, मते, नीतीनियम आणि बुद्धिमत्ता या गोष्टी इंग्रजी वळणाच्या असतील.[३] त्यानुसार त्यांनी आयुष्यभर कार्य केले. मध्यमवर्गीय समाज रचनेच्या संस्था व संकल्पनांनी आयात भारताला करण्यात आली. त्या आतून उमलून आलेल्या नव्हत्या. ङ्घोड्यापुढे गाडीफ असा हा प्रकार असल्याचे मत मिश्रा यांनी व्यक्त केले आहे.[४] त्यामुळेच अनुकरणशील भारतीय मध्यमवर्ग ब्रिटिशांना अभिप्रेत होता. नवी मूल्य व पद्धती निर्माण करणारा वर्ग अभिप्रेत नव्हता. या दृष्टीने शैक्षणिक व आर्थिक अशा दोन्ही क्षेत्रांना झिरपणी सिद्धांत (Theory of Filtration) लागू करण्याचा ब्रिटिशांचा प्रयत्न होता. भारतीय मध्यम वर्गात शासकीय कर्मचारी, वकील, शिक्षक, डॉक्टर्स इत्यादी बुद्धिजीवी व्यवसायिकांचे प्रमाण अधिक होते. पण पाश्चात्य पद्धतीच्या व्यापारी औद्योगिक व्यावसायिकांचे प्रमाण मात्र तुलनेने फारच कमी होते. भारतीय मध्यमवर्गामध्ये विविध प्रकारच्या सामाजिक गटांचा समावेश होता. बी. बी. मिश्रा यांनी अशा ११ गटांमध्ये त्याची विभागणी केली आहे. आणि या गटांसाठी मध्यमवर्ग या शब्दाचा बहुवचनी वापर (Middle Class) केलेला आहे.[५] तसेच तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री जोशी यांनी 'भारतीय प्रबोधन' संपादक बि. के. बेडेकर, भा. श. भगणे/भणगे यांच्या ग्रंथात ब्राह्मणेतर चळवळीसंबंधी लेखात सुरुवातीलाच युरोपातील मार्टिन ल्युथर व कॅलविन यांनी पुरोहित वर्गाच्या वर्चस्वाविरुद्ध केलेल्या चळवळी बरोबर ब्राह्मणेतर चळवळीशी तुलना केली आहे. त्यांच्या मते इंग्रजी राज्यामुळे भारतीय सामाजिक जीवनात अनेक नव्या

ISSN No. 2394-5990

चळवळी निर्माण होऊ लागल्या. महाराष्ट्रातील सत्यशोधक चळवळ त्यातीलच एक होती. गेल ऑमवेल, य. दि. फडके या संशोधकांच्या मते शेतकऱ्यांच्या पापावर आधारित अशी बहुजन समाजाची ही चळवळ होती.[६]

जन्म :

जयसिंगराव आबासाहेब घाटगे हे कागल परगण्याचे जहागीरदार होते. जयसिंगराव आबासाहेब घाटगे आणि त्यांची पत्नी राधाबाईसाहेब या दांपत्याच्या पोटी राजर्षी शाहू महाराजांचा जन्म २६ जून १८७४ रोजी झाला. त्यांचे मूळ नाव यशवंतराव होते. इ.स. १७०८ मध्ये कोल्हापूर या स्वतंत्र राज्याची स्थापना झाली. या राज्याचे राजे चौथे शिवाजी यांना वेडसर ठरवून इंग्रजांनी अहमदनगर किल्ल्यात ठेवले. त्या ठिकाणी इंग्रजांनी त्यांचा फार छळ केल्यामुळे २५ डिसेंबर १८८३ रोजी त्यांचा मृत्यू झाला. त्यांना अपत्य नसल्याने कोल्हापूर संस्थांचा राज्यकारभार पाहण्यासाठी दत्तक घेण्याची आवश्यकता निर्माण झाली. चौथे शिवाजी महाराज यांच्या पत्नी आनंदीबाईसाहेब यांनी घाटगे घराण्यातील जयसिंगराव आबासाहेब घाटगे यांचे पुत्र यशवंतराव यांना १७ मार्च रोजी १८८४ रोजी दत्तक घेतले. दत्तक घेतल्यानंतर यशवंतरावांचे नाव शाहू छत्रपती असे ठेवण्यात आले. हेच राजर्षी शाहू महाराज होत.

शिक्षण :

शाहू महाराज दत्तक म्हणून कोल्हापूर राज्यात येण्यापूर्वी त्यांच्या शिक्षणाला प्रारंभ झाला होता. कृष्णाजी भिकाजी गोखले व हरिपंत गोखले हे त्यांचे शिक्षक होते. तर मि. फिटझिराल्ड हे त्यांचे मुख्य शिक्षक होते. इ.स. १८८५ मध्ये महाराजांना राजकोट येथे राजकुमार कॉलेजात पाठविण्यात आले. त्यांचे लहान बंधू श्रीमंत बापूसाहेब, श्रीमंत काकासाहेब व दत्ताजीराव इंगळे हे आरंभापासून महाराजांच्या सहाध्यायी होते. हे सहाध्यायी कॉलेजातही महाराजांबरोबर होते. कुस्ती, शिकार, घोडयावर बसणे याबाबतीत महाराजांची बरोबरी करणारा एकही राजकुमार तेथे नव्हता. त्याच ठिकाणी महाराजांचा निगर्वी व मनमिळावू स्वभाव सर्व राजकुमारांच्या नजरेत भरला. महाराज राजकोट येथे असतानाच त्यांचे वडील इ.स. १८८५ ते इ.स. १८८९ पर्यंत महाराजांनी राजकोट येथील महाविद्यालयात शिक्षण पूर्ण केले. या काळात मॅकनॉटन हे महाविद्यालयाचे प्राचार्य होते. इ.स. १८९० ते इ.स. १८९४ या काळात महाराजांचे धारवाड येथे शिक्षण पूर्ण झाले. सर स्टुअर्ट फ्रेझर आणि सर रघुनाथराव व्यंकाजी सबनीस हे त्यांचे येथील गुरु होते. येथे महाराजांनी इंग्रजी भाषा, राज्यकारभार आणि जगाचा इतिहास इत्यादी विषयांचे सखोल अध्ययन केले. १८८९ मध्ये इंग्रज सरकारने महाराजांचे टयुटर व गार्डियन म्हणून फ्रेझर यांना नियुक्त केले होते. पुढे इ.स.१८९४ मध्ये ते या पदावरून निघून गेले.

विवाह :

महाराजांचा विवाह हे ते धारवड येथे शिक्षण घेत असताना १ एप्रिल १८९१ रोजी झाला. त्यांची पत्नी श्रीमंत लक्ष्मीबाईसाहेब या बडोद्याचे गुणाजीराव खानविलकर यांच्या कन्या होत. विवाहप्रसंगी लक्ष्मीबाईचे वय ११ वर्षांचे होते. महाराजांचे शिक्षण चालू असतानाच लक्ष्मीबाईंच्या शिक्षणाची सोय करण्यात आली. त्यांना शिक्षण देण्याचे काम मिसेस फॉक्स यांनी केले. महाराजांना पुढील अपत्ये जन्माला आली.

१) **राधाबाई उर्फ आक्कासाहेब महाराज :** महाराजांचे हे पहिले अपत्य १० मार्च १८९४ रोजी जन्माला आले.

२) **भाऊसाहेब उर्फ आक्कासाहेब :** २३ मे १८९५ रोजी भाऊसाहेबांचा जन्म झाला. परंतु त्यांचा लवकरच मृत्यू झाला.

३) **राजाराम महाराज :** यांचा जन्म ३१ जुलै १८९७ रोजी झाला. महाराजांच्या मृत्यूनंतर हे कोल्हापूर राज्याचे छत्रपती झाले.

४) **राजकुमार शिवाजी महाराज :** यांचा जन्म १५ एप्रिल १८९९ रोजी झाला. त्यांचा मृत्यू कुंभोजच्या डोंगरात रानडुकराचा पाठलाग करताना झाला.

अधिकार ग्रहण :

छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी २ एप्रिल १८९४ रोजी कोल्हापूर राज्याची सूत्रे हाती घेतली. त्यावेळी त्यांनी सर्व प्रजाजनांना जाहीर केले की, आमचे प्रजाजन सदासुखी व संपुष्ट असावेत. त्यांच्या हिताची एकसारखी अभिवृत्ती होत जावी व आमच्या संस्थानचा सर्व बाजूंनी अभिर व्हावा अशी आमची उत्कट इच्छा आहे. त्यासाठी सर्वांच्या उज्वल राजनिष्ठेची व सहकार्याची आम्हास आवश्यकता आहे. राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर राज्याची सूत्रे हाती घेतल्यानंतर समाज जीवनाचे बारकाईने निरीक्षण केले. त्यानुसार त्यांना आलेल्या अनुभवाच्या आधारे त्यांनी आपल्या राज्यातील जनतेचे विविध योजना आखून कल्याण कार्य सुरू केले. अष्टपैलू व्यक्तिमत्व– राजश्री शाहू छत्रपती यांनी विविधांगी काम केलेले दिसते. शेती, शिक्षण, समाज, पाणीपुरवठा, धरणे बांधून व सहकारी पतपेढ्यांच्या माध्यमातून त्यांनी शेतकऱ्यांना मदत केली. यामुळेच महाराजांना हिंदुस्थानातील 'हरितक्रांतीचे अग्रदूत' म्हणतात. धनंजय कीर यांच्या शब्दात राजाने जर कर्तव्यवृद्धीने व न्यायबुद्धीने मुकुट धारण केला तर त्याची राजवट जनतेला नैतिक व भौतिक यशाची ग्वाही देते. शाहूंनी तसे वागून यश मिळवले. 'बोले तैसा चाले' या उक्तीचे एक उत्तम उदाहरण होय.[७]

शैक्षणिक कार्य :

अखिल महाराष्ट्रावर जो शिक्षणाचा प्रकाश पडून आहे. त्या प्रकाशाचा अमर दिवा महाराष्ट्रात त्यांनीच लावला आहे. या दिव्यावर नंतर अनेक शिक्षण महर्षींनी आपली दिवे लावून महाराष्ट्रात ज्ञानयुग सुरू करून गरिबांच्या झोपडीपर्यंत ज्ञानगंगा नेण्याचा भगीरथ प्रयत्न केला. गरिबांना व दलितांना ज्ञान देऊन त्यांचे जीवित सुखी करणे ही महान लोकसेवा होय. त्यासाठीच शाहूंनी आपले जीवित वेचले. युद्धातील विजयापेक्षा शांततेच्या काळातील विजय सत्कीर्ती पावतात. अशा तत्त्वावर त्यांची नितांत श्रद्धा होती. असा हा राज्यकर्ता होता. ते एक महान सामाजिक पुरुष होते. एक समाजक्रांतिकारक राजा, लोकशाहीनिष्ठ पत्रकारांचा पाठीराखा, हिंदी शास्त्रीय संगीताचा एक पुरस्कर्ता, मराठी संस्कृतीचा एक शिल्पकार, मल्लयुद्धाचा एक आश्रयदाता, आधुनिक महाराष्ट्राचा एक भाग्यविधाता, भारतातील हरितक्रांतीचा अग्रदूत आणि भारतातील सामाजिक आणि आर्थिक लोकशाहीचा एक संस्थापक ठरला.[८] प्रजेच्या सुखातच राजाचे सुख आहे या धोरणाची त्यांनी अंमलबजावणी केली. त्यांनी जनतेसाठी संगीतवाद्य, शिकार कुस्ती, अश्वारोहण आणि मल्लखांब याला प्रोत्साहन दिले. त्यामुळे कोल्हापूर हे खऱ्या अर्थाने कलापूर झालेले दिसते. शाहू महाराजांनी राज्यातील अनेक गुणी कारागिरांना उत्तेजन दिले. त्यामुळे सामान्य जनतेत राजाविषयी जीव हा निर्माण झाला. त्यांनी बहुजन समाजाच्या उद्धारासाठी समाजाचे नेतृत्व समर्थपणे केले. महात्मा फुलेंनी सुरू केलेले कार्यपुढे घेऊन जाण्याचे काम महाराष्ट्रात शाहू महाराजांनीच केले. त्यांच्या कार्यामुळे ब्राह्मणेतर चळवळीला नवचैतन्य निर्माण झाले. त्यांनी ब्राह्मणेतर चळवळीचे नेतृत्व खंबीरपणे केले. त्यांनी सुरू केलेल्या ब्राह्मणेतर चळवळीचा उद्देश समाजातील विषमता नष्ट होऊन सामाजिक न्याय प्रस्थापित व्हावा हाच होता.

धार्मिक कार्य :

संस्थानातील देवस्थानांना सरकारी वर्षासन, बक्षीस जमिनी, करमुक्त जमिनी असत. ही देवस्थाने त्यांच्या ताब्यात असत. ते 'तळे राखील, तो पाणी चाखेल' या न्यायाने ही मालमत्ता विश्वस्त म्हणून सांभाळण्याऐवजी खासगी मालमत्ता म्हणून वापरत. महाराजांनी या पद्धतीला आळा घालण्यासाठी ग्रामाधिकारी व मंदिराचे वहिवाटदार यांना सरकारी नोकरीचा दर्जा देऊन त्यांची देवस्थानावरील खासगी मालकी संपुष्टात आणली. देवस्थानच्या जमिनी सरकारने आपल्या ताब्यात घेऊन देवस्थान व्यवस्था व खर्चावर नियंत्रण जारी केले. सरकारच्या मूलभूत हक्कात समाविष्ट केला. देवस्थानकडे जमा होणाऱ्या रकमेतून आवश्यक खर्च वजा जाता अन्य रक्कम शिक्षणासाठी वापरण्याचे ठरविले.[९] धनंजय कीर यांनी 'राजर्षी शाहू छत्रपती' पुस्तकात महाराजांचे यथार्थ वर्णन केले आहे. ते लिहितात, त्यांनी (छत्रपती शाहू महाराज) आपल्या राज्यकारभाराच्या निरनिराळ्या शाखांत व कर्तव्यात न्यायकृती, बुद्धिमत्ता आणि धूर्तपणा दाखविला. प्रशासक म्हणून ते कर्तबगार व कार्यक्षम होते. आपण व दरबारने दिलेल्या आज्ञा, केलेले निर्णय यांची नीट अंमलबजावणी होती की नाही, आखलेल्या योजना कार्यवाहीत येतात की नाही, व गरिबांच्या अर्जाचा निर्णय होतो की नाही हे पाहण्यासाठी त्यांनी एक 'इन्स्पेक्टर ऑफ ऑर्डर्स' नावाचा अधिकारीही नेमला होता. आधुनिक शेती आणि आधुनिक औद्योगिक विकास याच्यावर त्यांची श्रद्धा होती.[१०]

वेदोक्त प्रकरण :

शाहू महाराज धार्मिक प्रवृत्तीचे होते. ते नेहमीच पूजाअर्चा करीत असत. तसेच पवित्र तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी देवदर्शनास जात असत. महाराज दरसाल कार्तिक स्नान करण्यासाठी पंचगंगा नदीवर जात असत. पूर्वापार प्रथेप्रमाणे महाराज ऑक्टोबर १८९९ मध्ये कार्तिक महिन्यात पंचगंगा नदीवर स्नानास गेले. सोबत बंधू बापूसाहेब महाराज मेहुणे मामासाहेब खानविलकर आणि राजाराम शास्त्री भागवत इत्यादी मंडळी होते. महाराजांचे स्नान चालू असताना नारायण भट हा स्वतः स्नान न करताच वेदोक्त मंत्राऐवजी पुराणोक्त मंत्र उच्चारच होता. शाहू महाराज हे वेदोक्त मंत्राचे अधिकार असताना हा भटनी पूर्णक्त मंत्र म्हणून म्हणत असल्याचे राजारामशास्त्री यांनी महाराजांच्या नजरेस आणून दिल्यावर महाराजांनी त्यावर त्यास जाब विचारला, तेव्हा त्याने उत्तर दिले. क्षुद्राला पुराणोक्त मंत्र सांगावे लागतात. वैदिक मंत्र म्हणते वेळी स्नानाची आवश्यकता असते. परंतु या क्षुद्राना पुराणोक्त पद्धतीचा अनुग्रह करावयाचा असल्याने मला स्नानाची आवश्यकता नाही. त्या भटजीची अभद्र वाणी ऐकून महाराजांच्या अंगावर आकाशातून वीज कोसळल्याप्रमाणे झाले. क्षत्रिय कुलावंतस, हिंदू पदपातशहा अशी बिरुदावली असणाऱ्या छत्रपतीस भटनीने क्षुद्र म्हणून हिणवावे, ही कल्पना सहन करण्यापलीकडे होती. पण ती महाराजांसमोर उभी राहिलेली वस्तुस्थिती होती. हे वेदोक्त प्रकरण होय. या घटनेमुळे महाराज विचारप्रवण चिंतनशील बनले. तसेच ते सामाजिक बंडखोरीस उद्युक्त झाले.

शाहू महाराजांनी मी क्षत्रिय आहे. आपण वैदिक मंत्रानेच सर्व विधी केले पाहिजेत, असे नारायण भटजीला सुनावले. तेव्हा भटजी म्हणाले तुम्ही क्षत्रिय आहात असे सर्व शक्तिमान ब्रम्हवंद जोपर्यंत जाहीर करीत नाही, तोपर्यंत मी तुमची किंमत

ISSN No. 2394-5990

क्षुद्रापेक्षा अधिक समजणार नाही. हा उद्धट पुरोहित रोज वेश्येच्या घरी असतो हे महाराजांना समजले होते. अपवित्र व बाहेरख्याली पुरोहिताने आपणास क्षुद्र लेखल्यामुळे महाराजांना या धार्मिक अन्यायाची चीड आली. छत्रपती घराण्याचे धार्मिक विधी करण्यासाठी आप्पासाहेब राजोपाध्ये यांना ३०००० रुपये वार्षिक इनाम मिळाले होते. राजोपाध्ये हेही महाराजांच्या पंचगंगेवरील कार्तिक स्नानाच्या वेळी हजर होते. नोव्हेंबर १९०१ मध्ये राजघरातील सर्व धार्मिक विधी वेदोक्त पद्धतीने करण्याचे फर्मान महाराजांनी सोडले. परंतु राजोपाध्ये यांनी त्यास नकार दिला. त्यांचा नारायण भटजीच्या मतास पाठिंबा होता. त्यामुळे १ मे १९०२ रोजी त्यांना इनाम जप्त का करू नये ? अशी विचारणा केली. पण राजोपाध्ये यांना लोकमान्य टिळक व कोल्हापुरातील सनातनी ब्राह्मणांचा पाठिंबा असल्याने त्यांनी महाराजांची टिंगल सुरू केली. त्यामुळे ६ मे १९०२ रोजी महाराजांनी राजोपाध्ये यांना नोकरीवरून काढले व त्यांचे वतन रद्द केले. महाराजांनी या निर्णयाचा फेर विचार करण्याची मागणी राजोपाध्ये यांनी केली. पण महाराजांनी त्यांची मागणी फेटाळली. यानंतर राजोपाध्ये यांनी इंग्रज प्रतिनिधी कर्नल फेरीस व त्यानंतर मुंबई सरकार व व्हाईसरॉय लॉर्ड कर्झन यांच्याकडे तक्रार केली पण त्यांनीही त्यांचा अर्ज फेटाळले. हे वेदोक्त प्रकरण महाराष्ट्रात पसरले होते. आणि या प्रकरणावर ब्राह्मण व ब्राम्हणेतर असे दोन गट निर्माण झाले. आप्पासाहेब राजोपाध्ये यांना लोकमान्य टिळक, न. चिं. केळकर, महादेव बोडस, बाळासाहेब नातू, बाळासाहेब करंदीकर, चिपळूणकर व महाराष्ट्रातील सनातनी ब्राम्हनांनी पाठिंबा दिला. लोकमान्य टिळकांनी तर केसरीतून लेख लिहून शाहू महाराजांच्या विरोधात आकाश-पातळ एक केले.

क्षात्र जगद्गुरु पीठाची स्थापना (१९२०) :

शाहू महाराजांनी इ.स.१९१७ मध्ये महाभागवत डॉ. कुर्तकोटी यांना करवीर पीठावर शंकराचार्य म्हणून आरुढ केले. यापूर्वी ब्रम्हनाळकर हे शंकराचार्य होते. त्यांचे इ.स. १९१७ मध्ये निधन झाले. डॉ. कुर्तकोटी हे उदारमतवादी, राजनिष्ठ व नेमस्त राजकीय मताचे आहेत अशी प्रारंभी महाराजांची समजूत होती, पण कुर्तकोटी हे सनातनी होते. १५ सप्टेंबर १९१८ रोजी महाराजांनी कुलकर्णी वतने नष्ट केली. यावेळी कृतकोटी यांनी कुलकर्णी यांची बाजू घेतली. त्यामुळे त्यांचे आणि महाराजांचे पटले नाही. त्यामुळे त्यांनी ऑक्टोबर १९१८ मध्ये पदत्याग केला. त्यानंतर आत्मशास्त्री चित्रे हे करवीरचे शंकराचार्य झाले. पण या पीठावरील जगद्गुरुकडून बहुजन समाजाला न्याय मिळेल ही महाराजांनी आशा कायमची लोप पावली. आपल्या ज्ञातीच्या लोकांची धर्म कृत्ये आपल्याच ज्ञातीच्या पुरोहिताकडून करून घेऊन ब्राह्मण पुरोहिताचे जोखड कायमचे फेकून देण्याचा महाराजांनी निर्णय घेतला. त्यानुसार त्यांनी कोल्हापूर येथे जुलै १९२० मध्ये मराठा पुरोहित तयार करण्यासाठी श्री शिवाजी वैदिक विद्यालय सुरू केले. त्यांनी आपल्या ज्ञातीसाठी स्वतंत्र जगद्गुरु निर्माण करण्याचेही ठरवले. पारगाव येथे मौनी महाराजांचे पीठ होते. मौनीबुवा हे क्षत्रिय संत व छत्रपती शिवाजी महाराजांचे गुरु होते. हे संत सर्व मराठ्यांना पूजनीय होते. ते मराठ्यांचे जगद्गुरु होते व ते धार्मिक पूजा ही वेदोक्त रीतीने चालवीत असत. या गादींचे पुनरुज्जीवन करून त्यावर योग्य अशा मराठ्याची नेमणूक करण्याचा निर्णय महाराजांनी घेतला. १२ ऑक्टोबर १९२० रोजी महाराजांनी क्षात्रजगद्गुरु संबंधित जाहीरनामा प्रसिद्ध केला. त्यामध्ये त्यांनी क्षात्रजगद्गुरु पदाची निर्मिती आपण का करीत आहोत, त्यामागचे आपली तात्विक भूमिका काय आहे याची सविस्तर स्पष्टीकरण केले होते. पुढे ११ नोव्हेंबर १९२० रोजी पाटगाव येथे मौनी महाराजांच्या मठात सदाशिवराव पाटील यांना सशास्त्र पट्टाभिषेक होऊन वैदिक मंत्राच्या घोषात क्षात्रजगद्गुरु पिठाची निर्मिती करण्यात येऊन जगद्गुरु म्हणून एका मराठा व्यक्तीची नेमणूक करण्यात आली. शाहू महाराजांची ही कृती मात्र सत्यशोधक समाजाच्या कार्यकर्त्यांना आवडली नाही. कारण महात्मा फुले यांनी देव आणि माणूस यांच्यात मध्यस्थ नाकारला होता. परंतु क्षात्रजगद्गुरूला दरबारात वाकून मुजराही करण्यास नकार दिला जात होता. त्यांना हे पीठ होऊ देऊ नये असे वाटत होते. पगडी गेली व पटका आला एवढाच फरक असे ते म्हणत.

कार्याचे मूल्यमापन :

राजा म्हणून शाहू महाराजांनी २ एप्रिल १८९४ रोजी अधिकार सूत्रे हाती घेतली. तेव्हापासून महाराजांचे अस्पृश्योद्धाराचे कार्य सुरू झाले. त्यांच्या विचारात व कृतीत महात्मा फुले यांच्या इतकाच अस्पृश्योद्धाराचा कळवळा होता. अस्पृश्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी त्यांनी शाळा काढल्या, वसतिगृहे सुरू केली आणि त्यांच्यासाठी शिष्यवृत्तीही दिल्या. अस्पृश्यांच्या मुलांसाठी त्यांनी २७ शाळा सुरू केल्या होत्या आणि ७ वसतिगृहे चालविण्यात आली होती. अस्पृश्य मुला-मुलींना मोफत शिक्षण मिळावे अशीही त्यांनी सोय केली. नंतर अस्पृश्यांच्या स्वतंत्र शाळा बंद करून त्या विद्यार्थ्यांची स्पृश्य शाळेत सोय करण्यात आली. अस्पृश्यांना समान संधी प्राप्त करून देण्यासाठी शाहू महाराजांनी अस्पृश्यांना अनेक सवलती दिल्या. सुशिक्षित आणि पात्र अस्पृश्यांना दरबारात त्यांनी नोकऱ्या दिल्या. १९१७ नंतरच्या काळात पोलीस, तलाठी व कारकून वगैरेंच्या जागा मिळाव्यात म्हणून खास प्रयत्न केलेच शिवाय अस्पृश्य तरुणांना वकील अगर डॉक्टर होता यावे यासाठी आवश्यक ती व्यवस्था केली.

दरबारात राजवाड्यात त्यांनी अस्पृश्य नोकर ठेवले. गंगाराम कांबळे या अस्पृश्यास महाराजांनी कोल्हापूरच्या मध्यवस्तीत हॉटेल काढून दिले. महाराज स्वतः तेथे चहा घेत असत. शाळा, महाविद्यालय, न्यायालय, सरकारी कार्यालय, धर्मशाळा, अन्नछत्रे, पानवठे व विहिरी इत्यादी ठिकाणी अस्पृश्यांना समान वागणूक दिली जाईल अशी महाराजांनी दक्षता घेतली. व तसा त्यांनी वटहुकूम काढला. अस्पृश्यांबरोबर ते उघड-उघड सहभोजन करीत. त्यामुळे दलित बांधवांना शाहू महाराजांबद्दल आदर व आपुलकी वाटत असे. तसेच महाराजांनी सुशिक्षित अस्पृश्य तरुणांना वकिलीच्या सनदा दिल्या. आंतरजातीय विवाहास उत्तेजन दिले. अस्पृश्यांच्या बाबतीत असलेली वेठबिगारी पद्धत कायद्याने बंद केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना परदेशातील शिक्षणासाठी मदत केली. जिथे अस्पृश्यांच्या परिषदा होत असत, तेथे महाराज स्वतः हजर राहत.[११] राजर्षी शाहू महाराज यांचे सन १९२२ मध्ये निधन झाले. त्यांच्या निधनामुळे ब्राह्मणेतर चळवळीला फार मोठा धक्का बसला. परंतु या धक्क्यातून ब्राह्मणेतर नेते हळूहळू सावरले गेले. शाहू महाराजांनी घालून दिलेल्या तत्त्वानुसार ही चळवळ पुढे नेण्याचा त्यांनी प्रयत्न केला.[१२] ब्राह्मणेतर चळवळ का उदयास आली हे स्पष्ट करताना समाज जीवनावरील ब्राह्मणांचे वर्चस्व, वर्ण श्रेष्ठत्वाचा अहंकार, जातींची उपेक्षा व झालेली जागृती, वेदोक्त प्रकरण, सुधारणांना सनातनी ब्राह्मण वर्गाचा विरोध, छत्रपती शाहू महाराजांचे नेतृत्व, प्रबोधन, दिनमित्र, गरिबांचा कैवारी, भगवा झेंडा, तरुण मराठा, छत्रपती, प्रगती, जिनविजय, जागरुक विजयी मराठा ब्राह्मणेतर वृत्तपत्रांनी अज्ञान नष्ट करून जागृत करण्यासाठी लेखणीद्वारे कार्य केले. विचार प्रचार व प्रसारातून प्रबोधन कार्य प्रबोधनाचा मार्ग स्वीकारला.[१३]

निष्कर्ष :

आज २१ व्या शतकात विविध क्षेत्रात बहुजन समाजातील कार्यरत असणारे अभ्यासक, विचारवंत, पदाधिकारी राजांच्या कार्यामुळे आहेत. आपणही उत्तम काम करावे व पुढील पिढीला आदर्श निर्माण करावा हा बोध घेता येईल.

तळटीपा व संदर्भग्रंथ :

१) महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास (इ.स.१८१८ ते १९६०) : प्रा. गणेश राऊत, प्रा. ज्योती राऊत, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे मार्च २०११. पृ. १४६

२) महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास : कित्ता पृ. १४६

३) १९ व्या शतकातील महाराष्ट्र मध्यम वर्गाचा उदय : डॉ. राजा दीक्षित, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे. १६ डिसें. २०१९. पृ. २२

४) १९ व्या शतकातील महाराष्ट्र मध्यम वर्गाचा उदय : कित्ता पृ. २२

५) १९ व्या शतकातील महाराष्ट्र मध्यम वर्गाचा उदय : कित्ता पृ. २२

६) आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास : प्रा. वसंत जाधव, विद्या प्रकाशन, नागपूर. प्रथमावृत्ती १२ ऑक्टो. २००५. पृ. १७८

७) महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास (इ.स.१८१८ ते १९६०) : कित्ता पृ. १५४

८) महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास (इ.स.१८१८ ते १९६०) : कित्ता पृ. १५४, १५५

९) महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास (इ.स.१८१८ ते १९६०) : कित्ता पृ. १५५

१०) महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास (इ.स.१८१८ ते १९६०) : कित्ता पृ. १५४

११) आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास : कित्ता पृ. १९०

१२) आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास : कित्ता पृ. १८५

१३) आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास : कित्ता पृ. १८३

■■■

ISSN No. 2394-5990

राजर्षी शाहू महाराजांचे कार्य आणि कर्तृत्व : एक अभ्यास

डॉ. अनिल शिवाजी टिके
इतिहास विभाग प्रमुख
मुधोजी महाविद्यालय,फलटण
Email: tikeanil1648@gmail.com
Ph.9421119652

प्रस्तावना :

महाराष्ट्राची जडणघडण करण्यासाठी अनेक प्रज्ञावंत, प्रतिभावंत आणि क्रांतिकारकांनी आपली सर्व बुद्धिमत्ता समर्पकपणे पणास लावली. या समाजसुधारकांच्या मालिकेमध्ये लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख, महात्मा फुले, गोपाळ गणेश आगरकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजर्षी शाहू महाराज यांना अध्यक्रम दिला जातो. आधुनिक महाराष्ट्राची पायाभरणी करणारे, समतावादी धोरणाचा पुरस्कार करून समाज परिवर्तन घडवून आणणारे, अस्पृशोउद्धार, जातीयता दूर करणारे, सर्व धर्म समभाव हे तत्व बाळगून राज्यकारभार करणारे राजर्षी शाहू महाराज यांचाच उल्लेख केला जातो. पिढ्यानपिढ्या शिक्षणाला वंचित असणाऱ्या मागासवर्गीय जाती जमातींना शिक्षणाच्या संधी सोयी प्राप्त करून देणारे 'समतावादी लोकराजा' अशी आदर्श प्रतिमा असणारे राजर्षी शाहू महाराज यांचाच उल्लेख केला जातो.

मनुष्य हाच राजर्षी शाहू महाराज यांच्या सामाजिक आणि शैक्षणिक कार्याचा केंद्रबिंदू मानला जातो. म्हणूनच लोकांनी 'लोकांचा राजा' ही प्रतिमा राजर्षी शाहू महाराजांची जनलोकांत रुजवली. असणारे राजर्षी शाहू महाराज यांनी आपल्या कार्य आणि कर्तुत्वाने आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात समाज परिवर्तनाच्या वाटचालीमध्ये अस्पृश्यता निवारण, सामाजिक सुधारणा चळवळ, शैक्षणिक सुधारणा ,शेती, उद्योग, सहकार, औद्योगिक धोरण, यामध्ये बदल घडवून आणले. आपल्या कार्य आणि कर्तुत्वाने समाज परिवर्तनवादी कार्यासाठी प्रसिद्ध असणारे समाज क्रांतिकारक व महाराष्ट्राचे भाग्यविधाता म्हणून राजर्षी शाहू महाराजांना ओळखले जाते. प्रस्तुत विषयाच्या माध्यमातून राजर्षी शाहू महाराजांचे कार्य आणि कर्तृत्व या विषयाच्या माध्यमातून स्पष्ट केले आहे.

१. संशोधनाचे उद्देश :

१. शाहू महाराजांचे प्राथमिक जीवन व कार्य याचा अभ्यास करणे.
२. राजर्षी शाहू महाराजांचे अस्पृशोउद्धार विषयक तत्व व भूमिका याचा अभ्यास करणे.
३. राजर्षी शाहू महाराजांचे शिक्षण विषयक केलेले कार्य समजून घेणे.
४. राजर्षी शाहू महाराजांची शेती, सहकार, उद्धोग, औद्योगिक क्षेत्राविषयी भूमिका अभ्यासणे.
५. राजर्षी शाहू महाराजांच्या सामाजिक सुधारणा चळवळी अभ्यास करणे.

अशा विविध उद्देशाने प्रस्तुत शोधनिबंधाची रचना केलेली आहे.

विषयविवेचन :

१. पूर्वचरित्र:

राजर्षी शाहू महाराजांचा जन्म २६ जून १८७४ रोजी कागल येथील घाटगे घराण्यात झाला. त्यांचे मूळ नाव यशवंतराव असे होते. त्यांच्या वडिलांचे नाव जयसिंगराव उर्फ आबासाहेब घाटगे तर आईचे नाव राधाबाईसाहेब असे होते. जयसिंगराव घाटगे हे कागल जहागिरीचा थोरल्या पातीचे प्रमुख होते. कोल्हापूर संस्थानाचे राजे चौथे शिवाजी यांच्या पत्नी आनंदीबाईसाहेब यांनी १७ मार्च १८८४ रोजी कागलच्या घाटगे घराण्यातील जयसिंगराव उर्फ आबासाहेब घाटगे यांचे पुत्र यशवंतराव यांना दत्तक घेतले. ३१ डिसेंबर १८८५ रोजी राजर्षी शाहू महाराजांना राजकोट येथील राजकुमारांसाठी असलेल्या कॉलेजमध्ये शिक्षणासाठी पाठवण्यात आले. पुढे त्यांचे शिक्षण चार वर्ष याच ठिकाणी झाले.

२ एप्रिल १८९४ रोजी राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानाची अधिकार सूत्रे हाती घेतली. या काळात आपल्या संस्थानात जनकल्याणासाठी योजना आखण्याचा मनोमन निश्चय त्यांनी केला. लोकोपयोगी कामाच्या माध्यमातून शिक्षण प्रसार, अस्पृश्य व दुर्बल घटकांना न्याय, राज्याची आर्थिक घडी बसविणे, अस्पृश्योउद्धार , बहुजन समाजाला न्याय हक्क मिळवून देणे यावरच आपले कार्यक्षेत्र बनवले. विशेष म्हणजे मागासलेल्या

बहुजन समाजातील लोकांना उद्योगधंदे, शासकीय नोकऱ्यांमध्ये आद्यक्रम, या समाजाला ज्ञानाची शिकवण देणे, व्यापार, उद्योग, व्यवसाय, राज्यकारभार इत्यादी क्षेत्रांमध्ये त्यांना समाविष्ट करून घेणे हे महत्त्वाचे सूत्र त्यांनी राज्यकारभाराच्या कार्यप्रणालीत अमलात आणले. याच पार्श्वभूमीवर राजर्षी शाहू महाराज यांनी शिक्षण सामाजिक सुधारणा अस्पृश्य उद्धार कृषी विषयक धोरण उद्योग व्यवसाय यावर आपले विचार समाज परिवर्तनाच्या भूमिकेतून मांडले केवळ विचार मांडून त्यावर कार्यवाहीचे धोरण सुद्धा त्यांनी राबवले राजर्षी शाहू महाराजांचा मृत्यू ६ मे १९२२ रोजी झाला.[१]

२. शैक्षणिक कार्य :

राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य व विचार समाज परिवर्तनाकडे घेऊन जाणारे होते. शिक्षणामुळे समाजाचा दर्जा उंचावतो यावर त्यांचा प्रचंड विश्वास होता. परिवर्तनाच्या चळवळीमध्ये तसेच व्यक्तीच्या विकासास पर्यायाने राष्ट्र विकासामध्ये शिक्षणाची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. त्यामुळेच त्यांनी शैक्षणिक सुधारणा आपल्या संस्थांमध्ये घडून आणल्या. अस्पृश्य समाजातील तसेच विविध जाती धर्मातील मुलांना शैक्षणिक सुविधा सहजपणे उपलब्ध व्हाव्यात याकरिता जातीनिहाय वसतीगृहे त्यांनी स्थापन केली.[२] उदाहरणार्थ सन १९०९ मध्ये महाराणी व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग इन्स्टिट्यूशन, दिगंबर जैन वस्तीगृह, सन १९०६ मध्ये मुस्लिम समाजातील विद्यार्थ्यांकरिता वस्तीगृह, सन १९०८ मध्ये अस्पृशांकारिता मिस क्लार्क वसतिगृह, सन १९११ मध्ये शिंपी समाज, सन १९१२ मध्ये पांचाळ समाजासाठी, सन १९१५ मध्ये सारस्वत ब्राह्मणांसाठी वस्तीगृहाची स्थापना केली. तत्कालीन कालखंडामध्ये शिक्षणाची गुणवत्ता व दर्जा यामध्ये सुधारणा व्हावी याकरिता प्रथमच शिक्षकांसाठी प्रशिक्षण शाळा स्थापन करण्याचा यशस्वी प्रयोग त्यांनी केला. पाटीलकीचे शिक्षण देणारे ग्राम प्रशासनातील नाविन्यपूर्ण पाटील शाळेची संकल्पना अभिनव पद्धतीने त्यांनी सन १९१२ मध्ये सुरू केली. जवळजवळ सात वर्ष हे काम सातत्याने सुरू होते. सन १९१३ मध्ये पुरोहितांची शाळा स्थापन केली. त्या शाळेला ङ्गसत्यशोधकफ असे नाव त्यांनी दिले. आपल्या संस्थांमध्ये मोफत व सक्तीचे शिक्षण मिळावे याकरिता प्राथमिक शिक्षण सक्तीचे करणारा कायदा त्यांनी सन १९११ मध्ये संस्थांमध्ये केला. सन १९१७ पासून याच आदेशानुसार सक्तीच्या शिक्षणाला सुरुवात झाली.[३] हे खऱ्या अर्थाने शाहू महाराजांच्या कार्याचे यश मानावे लागेल.

महात्मा फुले यांच्या कार्य आणि कृती प्रमाणेच राजर्षी शाहू महाराजांनी स्त्री शिक्षणाकरिता स्त्री शिक्षण अधीक्षक हे पद निर्माण करून मिस. लिटल यांची नियुक्ती या पदावर केली. शिक्षणाचा प्रसार मोठ्या प्रमाणात त्यामुळे वाढला. स्वतंत्र मुलींना शिक्षण देणाऱ्या शाळांची निर्मिती कोल्हापूर संस्थानांमध्ये त्यांनी घडवून आणली. या व्यतिरिक्त समाज उपयोगी शाळांची स्थापना त्यामध्ये क्षत्रिय वैदिक शाळा, कुलकर्णी पाटील शाळा, सैनिक शाळा, संस्कृत शाळा यावर विशेष लक्ष देऊन या सर्व शाळांनी प्राथमिक, तांत्रिक, धार्मिक, नैतिक, शिक्षण देण्याची जबाबदारी त्यांनी स्वीकारावी असेही धोरण त्यांनी जाहीर केले. म्हणजेच शैक्षणिक क्षेत्रामध्ये खऱ्या अर्थाने कोल्हापूर संस्थानांमध्ये परिवर्तन घडवून आणण्याचे काम राजर्षी शाहू महाराज यांच्यामुळेच झाले.

३. अस्पृश्य उद्धाराचे कार्य :

अस्पृश्य उद्धाराचे कार्य प्रथमतः महाराष्ट्रामध्ये महात्मा ज्योतिराव फुले यांनी मोठ्या प्रमाणात हाती घेतले. गाव गाड्यांमध्ये या वर्गाची स्थिती अत्यंत अशा परिस्थितीमध्ये राजर्षी शाहू महाराजांनी समाजातील अस्पृश्यता नष्ट करणे, तसेच बहुजन समाजातील लोकांना शिक्षण, प्रशासकीय, उद्योग, व्यापार, व्यवसाय या क्षेत्रामध्ये समाविष्ट करून घेण्यासाठी शैक्षणिक उपक्रम व प्रशासकीय उपक्रम हाती घेऊन तशा पद्धतीच्या सुधारणा संस्थानांमध्ये घडून आणल्या. या समाजातील मुलांना शिक्षणाची सुविधा उपलब्ध व्हावी याकरिता सन १८९६ पासून अस्पृश्य शाळा प्रथमता: सुरू केल्या. याच विचारधारेवर आधारित २४ सप्टेंबर १९०० मध्ये मुलांना फी माप करणे व शिष्यवृत्ती देणे हे धोरण जाहीर केले.

सामाजिक चळवळीमधील जातीभेदाची कल्पना दूर करून सर्व जातींची व धर्मांची मुले एकत्र शैक्षणिक सुविधा घेतील अशीही आज्ञा सन १९१९ पासून राजर्षी शाहू महाराजांनी सुरू केली.[४] प्रत्यक्ष राजर्षी शाहू महाराजांनी हत्तीवरील गडकऱ्यांमध्ये महार समाजातील व्यक्तींची नियुक्ती, राजपकुलातील मंडळींसाठी ड्रायव्हर पदावर यल्लाप्पा बाळा नाईक याची केलेली नियुक्ती, दरबार रथावर सारथी म्हणून केलेली नियुक्ती हे विचार परिवर्तनवादी धोरणातून दिसून येतात.

लोकसंपर्काच्या माध्यमातून अशिक्षित असणाऱ्या अस्पृश्य समाजातील लोकांना त्यांनी नोकरीमध्ये समाविष्ट करून घेतले. कारकून, शिक्षक, तलाठी अशा वेगवेगळ्या पदावर त्यांची नियुक्ती केली. आडनावरून जातीवाचकता दिसून आल्यानंतर राजर्षी शाहू महाराजांनी जाट, सरदार, पंडित अशी नावे देऊन अस्पृश्यतेची भावना समाजातील कमी करण्याचा प्रयत्न केला. गुन्हेगारीची हजेरी लावणे हा कायदा होता. राजर्षी शाहू महाराजांनी १०ऑगस्ट १९१८ पासून गुन्हेगारी जातींची हजेरी

ISSN No. 2394-5990

बंद करण्याचा हुकूम काढला. प्रत्यक्षामध्ये १ जानेवारी १९१९ रोजी शाहू महाराजांनी सार्वजनिक ठिकाणी विटाळ न मानण्याबद्दल आज्ञापत्र काढले त्यात म्हटले होते की, सार्वजनिक इमारती, धर्मशाळा, रेस्ट हाऊस, सरकारी अन्नछत्रे इत्यादी ठिकाणी व नदीचे पानवटे व सार्वजनिक विहिरी येथे कोणत्याही मनुष्य प्राण्याचा विटाळ मानायचा नाही.[५]

१९२० मध्ये राजर्षी शाहू महाराजांनी प्रत्यक्षात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या 'मूकनायक' या साप्ताहिकाला मदत केली. २० मार्च १९२० मध्ये माणगाव येथील भरलेल्या अस्पृश्यांच्या पहिल्या परिषदेत महत्त्वाची भूमिका बजावून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना 'पददलितांचा कैवारी' अशी पदवी त्यांनी दिली. १६ व १७ मे १९२० रोजी नागपूर येथे भरलेल्या परिषदेत राजर्षी शाहू महाराज म्हणतात, 'अस्पृश्य हा शब्द कोणत्याही माणसाला लावणे हे निंद आहे. तुम्हास अस्पृश्य मानणाऱ्या पुष्कळ लोकांपेक्षा जास्त बुद्धिमान, जास्त पराक्रमी, जास्त सुविचारी, जास्त स्वार्थत्यागी असे तुम्ही हिंदी राष्ट्राचे घटक अवयव आहात. मी तुम्हाला अस्पृश्य समजत नाही. आपण निदान बरोबरीची भावंडे आहोत. आपले हक्क समान तरी खासच आहेत, ही भावना धरून पुढील कामास लागले पाहिजे.'[६] असे मत त्यांनी व्यक्त केले.

समाजातील दलितांना न्याय देण्यासाठी राजर्षी शाहू राजांनी काळाच्याही पुढे जाऊन धडाडीने प्रभावी उपाय अंमलात आणण्यास सुरुवात केली. शिकलेल्या दलितांपैकी काहींना वकिलीच्या सनदा दिल्या. गणाचार्य (मांग), रामू कारंडे (चांभार) मंडपाळकर (महार) व डी. एस. पोवार (चांभार) यांना वकिलीच्या सनदा दिल्यामुळे प्रचंड खळबळ माजली. टीकाटिप्पणी सुरू झाली. महाराजांनी उत्तर दिले, जे धंदे अस्पृश्य वर्गास रूढीने, कायद्याने अगर दडपशाहीने बंद झाले आहेत ते त्यास मोकळे करून द्यावेत आणि त्यांची स्थिती सुधारून त्यांच्यात आपण इतर माणसांसारखे त्यांच्या बरोबरीचे आहोत असा आत्मविश्वास निर्माण करावा एवढाच माझा हेतू आहे.[७]

थोडक्यात अस्पृश्यउदाराचे कार्य हा राजर्षी शाहू महाराजांच्या सामाजिक सुधारण्याचा खऱ्या अर्थाने प्रयत्न होता. अस्पृश्यांची गुलामगिरी नष्ट केली. कुलकर्णी वतने, महार वतने रद्द करून 'सत्यशोधक' समाजाची पुनर्स्थापना सन १९११ मध्ये राजर्षी शाहू महाराजांनी केली. त्यामुळेच 'अस्पृश्यउद्धारक' म्हणूनही शाहू महाराज हे समाज व्यवस्थेत परिचित आहेत. त्यांचे हे विचार तत्कालीन कालखंडात क्रांतिकारी व परिवर्तनवादी स्वरूपाचे ठरले. त्यामुळेच पुढे अस्पृश्य समाजाच्या सामाजिक सुधारणेच्या गतिशीलतेमध्ये नवा आयाम दिसून आला. याचे श्रेय राजर्षी शाहू महाराज यांनाच जाते. या व्यतिरिक्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अस्पृश्यनिवारण कार्याला गती देण्याचे काम राजर्षी शाहू महाराजांनीच केले.

४.राजर्षी शाहू महाराज यांचे आर्थिक विचार व कार्य :

राजर्षी शाहू महाराजांनी आर्थिक व्यवस्थेमध्ये पुनर्रचना घडवून आणण्यासाठी शेती, उद्योग, व्यापार यामध्ये परिवर्तनवादी बदल घडवून आणले. या बदलांमध्ये शेतीला सर्वात जास्त महत्त्वाचा दर्जा दिला. शेतीशास्त्रीय पद्धतीने केल्यामुळे अन्नधान्याचे उत्पादन वाढू शकते याच भूमिकेतून त्यांनी कोल्हापूरमध्ये सन १९१२ मध्ये कोल्हापूर मध्ये किंग एडवर्ड एग्रीकल्चर इन्स्टिट्यूट नावाची संस्था स्थापन केली. जल व्यवस्थापनाच्या संदर्भात विशेष लक्ष देऊन त्यांनी पहिल्यांदा सन १९०२ मध्ये ङ्गसार्वत्रिक पाटबंधारे धोरणफ जाहीर केले.[८] सन १९०९ मध्ये राधानगरी धरणाचे बांधकाम सुरू करण्यात आले. व्यापारी धोरणाला चालना देण्यासाठी आपल्याच संस्थानांमध्ये स्वतंत्र पद्धतीच्या बाजारपेठांची स्थापना केली. या दृष्टीने त्यांनी 'शाहूपुरी' नावाची नवी बाजारपेठ निर्माण केली. नवे उद्योग सुरू व्हावे यासाठी औद्योगिक सर्वेक्षण केले. राजर्षी शाहू महाराजांच्या प्रेरणेनेच पुढे सन १९०६ मध्ये 'शाहू छत्रपती स्पिनिंग अँड विहींग मिल्स' या कापड गिरणीची स्थापना झाली. उद्योगांना संरक्षण देण्यासाठी आर्थिक तरतूद देखील केली. सहकाराच्या माध्यमातून उद्योगांना लोकाश्रय कशा पद्धतीने याची खबरदारी घेतली. राजर्षी शाहू महाराजांनी सन १९१२ मध्ये 'सहकारी संस्था विषयक कायदा' केला.[९] राजर्षी शाहू महाराजांच्या या सहकारक्षेत्राच्या या धोरणामुळेच शेती, उद्योग, व्यापार, व्यवसाय यामध्ये गतिशीलता व आधुनिकता प्राप्त होत गेली. याचे सर्व श्रेय राजर्षी शाहू महाराजांनाच जाते. थोडक्यात आर्थिक बदलांना प्रत्यक्ष कृतीची जोड देऊन त्यांना संरक्षण दिले.

थोडक्यात या प्रभावी कार्याबरोबरच राजर्षी शाहू महाराजांनी पुढे कला, क्रीडा यांनाही आश्रय दिला. कृषी औद्योगिक क्षेत्रात युरोपीय विचारधारेवर नवा प्रगतीचा पाया त्यांनी रचला. त्याचबरोबर स्त्री शिक्षण, आर्य समाज, सत्यशोधक समाज या सर्व घटकांच्या माध्यमातून समाजपरिवर्तनाची नवी दिशा राजर्षी शाहू महाराज यांच्यामुळेच महाराष्ट्राला प्राप्त झाली. त्यामुळे पिढ्यानपिढ्या शिक्षणापासून वंचित असलेल्या मागासवर्गीय जाती-जमातींना शिक्षणाच्या संधी सोयी प्राप्त करून देणारा खऱ्या अर्थाने लोकराजा ही पदवी त्यांना सार्थ वाटते. थोडक्यात समाजात परिवर्तन घडवून समता प्रस्थापित करणारे राजर्षी शाहू महाराज यांचे व्यक्तिमत्व होते. कानपूरच्या पूर्वी क्षत्रियांनी परिषद भरून राजर्षी शाहू महाराजांना राजर्षी ही पदवी देऊन त्यांचा सन्मान केला.

निष्कर्ष :

१. राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य व विचार समाज परिवर्तनाकडे घेऊन जाणारे होते.

२. राजर्षी शाहू महाराज यांच्यामुळेच शैक्षणिक क्षेत्रामध्ये खऱ्या अर्थाने कोल्हापूर संस्थानांमध्ये परिवर्तन घडवून आणण्याचे काम झाले.

३. समाजात परिवर्तन घडवून समता प्रस्थापित करणारे राजर्षी शाहू महाराज यांचे व्यक्तिमत्व होते.

४. राजर्षी शाहू महाराजांनी आर्थिक व्यवस्थेमध्ये पुनर्रचना घडवून आणण्यासाठी शेती, उद्योग, व्यापार यामध्ये परिवर्तनवादी बदल घडवून आणले.

५. राजर्षी शाहू महाराजांनी उद्योगांना संरक्षण देण्यासाठी आर्थिक तरतूद देखील केली. सहकाराच्या माध्यमातून उद्योगांना लोकाश्रय कशा पद्धतीने याची खबरदारी घेतली.

६. राजर्षी शाहू महाराजांनी कला, क्रीडा यांनाही आश्रय दिला.

७. राजर्षी शाहू महाराजांनी कृषी, औद्योगिक क्षेत्रात युरोपीय विचारधारेवर नवा प्रगतीचा पाया त्यांनी रचला.

८. समाजातील दलितांना न्याय देण्यासाठी राजर्षी शाहू राजांनी काळाच्याही पुढे जाऊन धडाडीने प्रभावी उपाय अंमलात आणण्यास सुरुवात केली.

९. राजर्षी शाहू महाराजांनी जाट, सरदार, पंडित अशी नावे देऊन अस्पृश्य समाजातील लोकांना देऊन अस्पृश्यतेची भावना समाजातील कमी करण्याचा प्रयत्न केला.

१०. अस्पृश्यउदाराचे कार्य हा राजर्षी शाहू महाराजांच्या सामाजिक सुधारण्याचा खऱ्या अर्थाने प्रयत्न होता.

११. राजर्षी शाहू महाराजांनीच बहुजन समाजातील लोकांना शिक्षण, प्रशासकीय, उद्योग, व्यापार, व्यवसाय या क्षेत्रामध्ये समाविष्ट करून घेण्यासाठी शैक्षणिक उपक्रम व प्रशासकीय उपक्रम हाती घेऊन तशा पद्धतीच्या सुधारणा संस्थानांमध्ये घडून आणल्या.

संदर्भ:

१. कीर धनंजय, राजर्षी शाहू छत्रपती एक समाज क्रांतिकारक, पॅप्युलर प्रकाशन, पहिली आवृत्ती मुंबई १९८९, पृष्ठ क्रमांक,२५.

२. जाधव भ.बा. राजश्री शाहू महाराजांची भाषणे, पहिली आवृत्ती कोल्हापूर १९७१, पृष्ठ क्रमांक ३०.

३. तोफखाने वा.द., राजर्षी शाहू छत्रपती यांचे अंतरंग, महाराष्ट्र प्रकाशन कोल्हापूर, प्रथम आवृत्ती १९६१, , पृष्ठ क्रमांक ४५.

४. भोसले एस. एस. क्रांतीसुक्ते राजर्षी छत्रपती शाहू, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई प्रथम आवृत्ती १९९१, पृष्ठ क्रमांक ३५. .

५. पाटील शामराव, (संपा.) भास्कर दटावकर, राजश्री छत्रपतींचे निवडक आदेश भाग १, मुंबई १९८८, पृष्ठ क्रमांक १५०.

६. पवार जयसिंगराव, राजर्षी शाहू छत्रपती एक मागवा,सुमेरू प्रकाशन, मुंबई प्रथम आवृत्ती २००४, , पृष्ठ क्रमांक ५५.

७. पवार जयसिंगराव (संपा.), राजश्री शाहू स्मारक ग्रंथ, प्रकाशन संचालक महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, प्रथम आवृत्ती मे २००१, पृष्ठ क्रमांक ३९४.

८. कित्ता, राजश्री शाहू स्मारक ग्रंथ, पृष्ठ क्रमांक २०२.

९. कित्ता, राजश्री शाहू स्मारक ग्रंथ, पृष्ठ क्रमांक ३९३.

१०. कित्ता, राजश्री शाहू स्मारक ग्रंथ, पृष्ठ क्रमांक ६२३.

■■■

ISSN No. 2394-5990

राजर्षी शाहू महाराज व लोकमान्य टिळक संघर्ष आणि दुसरी बाजू

डॉ विश्वनाथ महादेव आवड
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
शंकरराव मोहिते महाविद्यालयं, अकलूज
संपर्क : ९४२२०२८८३८

प्रस्तावना :

राजर्षी शाहू महाराज आणि लोकमान्य टिळक हे दोन्ही महान पुरुष. एकाने सामाजिक जबाबदारी पत्करून संपूर्ण जीवन सामाजिक कार्याला वाहून दिले तर दुसर्याने राजकीय सुधारणासाठी आपले सर्वस्व पणाला लावले. या दोन्ही विभूतीच्या महत्कार्यामुळेच आजच्या महाराष्ट्राची जडणघडण झालेली दिसते. एकाने माणसाच्या मुक्तीसाठी आपली भूमिका मांडली तर दुसर्याने राजकीय स्वातंत्र्यास ध्येयास चालना दिली. दोन्ही प्रकारच्या स्वातंत्र्य संकल्पना एकमेकास पूरक आहेत. हे दोन्ही महापूरुषाना आवगत होते पण या दोन्ही महापुरुषांच्या बाबतीत हे घडले नाही यामुळे महाराष्ट्राच्या सामाजिक आणि राजकीय चळवळीचे मोठे नुकसान झाले. असे असले तरी या लोकमान्य टिळक शाहू महाराज यांच्या संबंधातील दुसरी बाजू होती हे ही मान्य करावे लागते. या हेतूने त्याच्या जीवन कारकीर्दीतील दुसरी बाजू अभ्यासणेसाठी वरील विषय शोधनिबंधाच्या मांडणीसाठी निवडलेला आहे.

संशोधन निबंधाचा उद्देश हाच आहे की राजर्षि शाहू व लोकमान्य टिळक यांच्या भूमिका जाणून घेवून त्यांच्या विचारातील दुसरी बाजू उजेडात आणणे. वरील विषय मांडणी करीत असताना दुय्यम साधनाचा अभ्यास केलेला आहे.

राजर्षी शाहू महाराज आणि लोकमान्य टिळक संघर्षाची कारणे :

शाहू महाराज सामाजिक क्षेत्रातले आपुलकीचे नाव तर लोकमान्य टिळक देशपातळीवर नेता म्हणून नावारूपाला आलेले मोठे नाव. दोघांचा फायदा एकमेकाला करून घेता येईल असेच सुरूवातीला संबंध होते. पण पुढील काळात दोंघांचे संबंध बिघडले त्याची महत्वाची कारणे आपणास सांगता येतात.

१. वेदोक्त प्रकरण :

राजर्षी शाहू छत्रपती आणि लोकमान्य टिळकांच्या जीवनातच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्राच्या सामाजिक आणि धार्मिक जीवनात आमूलाग्र बदल घडवून आणणारे ज्याचे आजही परिणाम दिसतात. वादळी प्रकरण म्हणून वेदोक्त प्रकरणाकडे पाहावे लागते. 'जरी ब्राह्मण झाला भ्रष्टा तरी तो तिन्ही लोकी श्रेष्ठा' या सनातनी हिंदू धर्मातील वर्णवर्चस्वाच्या अहंकारी प्रवृत्तीविरुद्ध राजर्षी शाहू छत्रपतींनी आपल्या आयुष्याच्या अखेरपर्यंत बहुजनांच्या सर्वांगीण कल्याणासाठी केलेल्या संघर्षांची ही सुरवात होती.

१८९९ च्या कार्तिक महिन्यात शाहू छत्रपतींचे क्षत्रियत्व अमान्य करून त्यांचे सेवक असणाऱ्या भिक्षुकाने त्यांचा वेदोक्ताचा अधिकार नाकारला होता. पंचगंगेच्या काठावर स्नानाच्या वेळी घडलेल्या या दुर्दैवी प्रसंगाने महाराष्ट्राच्या सामाजिक – धार्मिक जीवनाचा चेहरामोहराच पूर्ण बदलून टाकला. या प्रकरणात शाहू छत्रपतींच्या विरोधात सनातनी उच्चवर्णीय वर्गाचे नेतृत्व इतिहासाचार्य वि. का. राजवाडे, ङ्गसमर्थफ पत्रकाचे संपादक विष्णू गोविंद विजापूरकर आणि वाईचे धर्मपंडित भाऊसाहेब लेले यांनी केले. यासोबतच लोकमान्य टिळकांनी २२ आणि २९ ऑक्टोबर १९०१ च्या 'केसरी'मधे 'वेदोक्ताचे खूळ' असे दोन अग्रलेख लिहून शाहू छत्रपतींवर जहरी टीका केली. शेवटी हे प्रकरण मुंबईच्या न्यायालयात गेले. १९०५ मधे या प्रकरणात न्यायालयाने शाहू छत्रपतींचा वेदोक्ताचा अधिकार मान्य केला. इतकेच नव्हे तर हिंदू धर्मपीठानेही राजर्षी शाहू छत्रपतींचा वेदोक्ताचा अधिकार जाहीररीत्या सन्मानपूर्वक मान्य केला.

वेदोक्त प्रकरणातील लोकमान्य टिळकांची सनातनी भूमिका वादाला कारणीभूत ठरली श्री. म. माटे यांच्यासारख्या हिंदुत्ववादी लेखकालाही आवडलेली नव्हती. म्हणून त्यांनी आपल्या आत्मचरित्रात लिहिले आहे की, या वादाच्या प्रसंगी बारीक-सारीक तपशिलात न शिरता टिळकांनी गर्जना करून जर सांगितले असते की, छत्रपती क्षत्रियच आहेत आणि छत्रपतींना वेदोक्तचा अधिकार आहे... तर महाराष्ट्रातील तत्कालीन आणि आजच्या जातीय विचारांना निराळे वळण लागले असते.

२. ताई महाराज प्रकरण :

कोल्हापूर संस्थानात दुसर्या शिवाजी महाराज यांचे काळात सिद्धेश्वर महाराज नावाचे छत्रपतीचे गुरु होते. छत्रपतींनी त्यांना

महाराज ही पदवी आणि इनामे दिलेली होती, पुढे या घराण्याची एक शाखा पुणे येथे स्थायिक झाली. त्यातील वासुदेव हरी ऊर्फ बाबामहाराज पंडित लोकमान्य टिळकांचे एक स्नेही होते. ते पुण्यात राहात होते. मुंबई सरकारने पहिल्या वर्गाचे सरदार म्हणून मान्यता दिलेली होती. त्यांच्या पहिल्या पत्नीच्या निधनानंतर बाबामहाराजांनी सिन्नरकर यांची मुलगी सकवारबाई ऊर्फ ताईमहाराज यांचशी विवाह केला.

७ ऑगस्ट १८९७ रोजी बाबामहाराजांचे कॉल-याने निधन झाले. तेव्हा ताईमहाराज गरोदर होत्या व त्यांना मुलगा होईल व आपल्या संपत्तीस वारस मिळेल, अशी मृत्युशय्येवर पडलेल्या बाबामहाराजांना आशा होती. बाबामहाराज कॉल-याने आजारी पडल्याचे समजल्यावर लोकमान्य त्यांना भेटावयास गेले. त्यांनी बाबामहाराजांना मृत्युपत्र करण्याचा सल्ला दिला. आपल्या मालमत्तेची व्यवस्था पाहण्यासाठी विश्वस्त नेमणे आवश्यक आहे, असे बाबामहाराजांना वाटले. त्यांनी टिळकांनाच त्यासाठी गळ घातली. बाबामहाराजांच्या इच्छेनुसार टिळकां प्रमाणेच बाबामहाराजांचे व्याही दादासाहेब ऊर्फ गणेश श्रीकृष्ण खापर्डे, श्रीपाद सखाराम कुंभोजकर व बळवंत मार्तंड नागपूरकर हे विश्वस्त बनले. ७ ऑगस्ट १८९७ रोजी सकाळी बाबामहाराजांनी मृत्युपत्र तयार केले. त्याचा मजकूर असे म्हटले होते, आमचे कुटुंब सौ. सकवारबाई हल्ली गरोदर आहे. तीस पुत्र न झाल्यास किंवा होऊन तो अल्पायुषी झाल्यास आमचे घराण्याचे नाव चालविण्याकरिता यथाशास्त्र जरूर लागेल तितक्या वेळेस आमचे कुटुंबाचे मांडीवर दत्तक वर लिहिलेल्या गृहस्थांच्या विचारे देऊन त्या मुलाचे वतीने तो वयात येईपर्यंत सदर पंचांनी (ट्रस्टी) स्थावर-जंगम इस्टेटीची व्यवस्था करावी.

१८ जानेवारी १८९८ रोजी त्याई महाराज यांना मुलगा झाला. पण तो अल्पायुषी ठरला. त्यामुळे ताईमहाराजांनी शक्यतो आपल्या नात्यातल्या एखाद्या मुलास दत्तक घ्यावे असा विचार पुढे आला. पण नातेवाईकांना दूर सारून टिळक व अन्य विश्वस्तांनी, औरंगाबादच्या पंडित घराण्याच्या एका शाखेतील लहान मुलास दत्तक म्हणून निवडले. ताईमहाराजांनीही सुरूवातीला त्यास अनुकूलता दर्शविली. ठरल्यानुसार दत्तकविधान समारंभ पार पडला. पण पुढे ताई महाराज यांनी आपला निर्णय बदलला आणि कोल्हापूर शाखेतील बाळामहाराजांना दत्तक घेण्याची तयारी सुरू केली. त्यास कोल्हापूर दरबारचा पाठिंबाही मिळविला. पण टिळकांनी हे दत्तकविधान बेकायदेशीर असल्याने ते थोपविण्याचा अटोकाट प्रयत्न केला. त्यासाठी कोर्टात धाव घेतली पण अखेर हा दत्तकसमारंभ पुण्यावजी कोल्हापूरात झाला. त्यास शाहू छत्रपती उपस्थिती आणि मान्यता होती. दत्तक वारसा १९ वर्षे हे प्रकरण चालले.

लोकमान्य आणि राहर्षि यांच्यामधील वाद निर्माण होण्यासाठी ही दोन प्रकरणे महत्वाची असली तरी पुढील काळातल्या घटना आणि कागदपत्रे पाहता असे दिसते की, दोघामधील वाद खूपच विकोपाला गेलेला दिसतो. चिरोल प्रकरण, कुलकर्णी वतन प्रकरण, यांचाही ऊल्लेख करावा लागेल. या वादामुळे महाराष्ट्रातील ब्राह्मण आणि ब्राम्हनेतर वाद टोकाला गेला काही वेळा याचा एव्हढा उद्रेक दिसतो की टिळकासारखा माणूस जर्मनीत असता तर त्यास गोळ्या घातल्या असत्या असे उद्गार शाहू महाराज यांनी काढले आणि जर इंग्रजांची साथ सोडली नाही तर त्यांचा जॅक्सन किवा रँड केला जाईल अशी धमकी टिळकांनी दिल्याचे सांगितले जाते.

दुसरी बाजू :

शोध निबंधाच्या वरील मांडणीत दोन्ही महनिय व्यक्ती मधील टोकाचा वाद आणि संघर्ष आपणाला दिसत असला तरी आणि तत्कालीन कागदपत्रे आणि मान्यवर अभ्यासक आणि विचारवंत यांनी मांडलेली मते विचारात घेतली असता या संघर्षाला एक वेगळी किनारही आहे हे आपणास मांडता येते.

१. चिरोल खटल्यात महाराजांनी टिळकांच्या विरोधात भूमिका घेतली होती. पण त्या प्रकरणात राजर्षी यांनी काही कागदपत्रे लोकमान्यांचे वकील दादासाहेब करंदीकर यांच्याकडे गुप्तपणे सोपवली होती. यासंबंधीचा सविस्तर वृत्तांत प्रबोधनकार ठाकरे यांच्या 'माझी जीवनगाथा' या आत्मचरित्रात मिळतो. प्रबोधनकार ठाकरे यांनी त्याच्या आठवणी सांगताना सांगीतले आहे. प्रत्यक्षात आम्ही पत्रे दाबून ठेवून टिळकांना गोत्यात आणायचे काय असे ऊत्तर देवून महाराज म्हणाले होते की टिळक देशासाठी मरताहेत तेव्हा आम्ही काय वेदोक्ताचे वैर राजकारणात धरायचे काय? वाद जितक्यास तितका असावा. थोडक्यात मुंबई सरकारचा आदेश डावलून महाराजांनी धोका पत्करून टिळकांना चिरोल खटल्यात सहकार्य केलेले दिसते.

२. शाहू महाराज यांनी लोकमान्य टिळक आजारी पडल्यानंतर त्यांचा मुलगा श्रीधरपंत यांचेकडे आपल्या माणसाकरवी पत्र पाठवून त्याच्या प्रकृतीची ख्याली खुशाली रोज तारेने कळवीत जावे असे लिहले. या सोबत त्यांना चांगल्या डॉक्टराची मदत घेण्यासाठी मिरज येथील त्यांच्या बंगल्यात राहू शकता असेही संगितले होते.

३. भाई माधवराव बागल आपल्या आठवणीत सांगतात की, लोकमान्य टिळकांचे ज्यावेळी निधन झाले त्याची

ISSN No. 2394-5990

बातमी महाराजांना समजली तेव्हा त्यांनी डोळे मिटून घेतले त्यांच्या डोळ्यातून आसवे आली. माझा थोर शत्रू नाहीसा झाला आता मी कोणाशी लढू माझे त्यांचे भांडण असले तरी त्यांची देशसेवा मोठी होती असे महाराज म्हणाले.

४. टिळकांच्या निधना दिवशी महाराज वाघ बरोबर घेवून शिकारीवर जाणार होते तो बेत रद्द केला आणि. त्यादिवशी त्यांनी मांसाहार केला नाही. एवढेच नाही तर वाघालाही मांसाहार न देता दूध पाजण्यात आले

५. १८८३ मधे राजर्षी शाहू छत्रपतींचे दत्तक वडील चौथे शिवाजी यांना तत्कालीन कोल्हापूर संस्थानचे दिवाण माधवराव बर्वे यांना ब्रिटिशांनी हाताशी धरून वेडे ठरविले होते. आणि महाराजांना अहमदनगरच्या तुरुंगात डांबण्यात आलेले होते. तुरंगात ब्रिटिश अधिकारी ग्रीनने महाराजांच्या पोटात बुटाची लाथ घातली. परिणामी महाराजांचा पोटातील प्लीहा फुटून त्यांचा दुःखद मृत्यू झाला. यावेळी लोकमान्य टिळक आणि आगरकर यांनी कोल्हापूर संस्थांनातील चवथे शिवाजी महाराज यांच्यावर होत असलेल्या आन्यायाची भूमिका केसरी मध्ये मांडत चौथे शिवाजी महाराजांची बाजू घेऊन ब्रिटिश आणि दिवाण बर्वे यांच्यावर कडाडून टीका केली. त्यामुळे माधवराव बर्वे यांनी अब्रुनुकसानीचा दावा लावला. त्या दाव्यात टिळक आणि आगरकरांना १०१ दिवसांची डोंगरीच्या तुरुंगात सक्तमजुरीची शिक्षा भोगावी लागली होती.

६. १८८४ च्या सप्टेंबरमधे डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना झाली. त्यावेळी कोल्हापूर संस्थानचे प्रतिनिधी जयसिंगराव ऊर्फ आबासाहेब घाटगे यांनी टिळक-आगरकरांच्या न्यू इंग्लिश स्कूलला पाचशे रुपयांची देणगी देवून डेक्कन सोसायटीला अर्थ सहाय केलेले होते. आणि या सोसायटीचे अध्यक्षपद कोल्हापूरच्या छत्रपती यांना देण्यात आलेले होते.

७. २ एप्रिल १८९४ रोजी शाहू राजांचा राज्याभिषेक समारंभ अतिशय थाटात पार पडला आणि कागलच्या घाटगे घराण्यातून यशवंतराव जयसिंगराव घाटगे हे कोल्हापूरचे शाहू छत्रपती झाले. त्या प्रसंगी लोकमान्य टिळकांनी मोठ्या आनंदाने आणि उत्साहाने एप्रिल १८९४ च्या 'केसरी'मधे 'करवीर क्षेत्री राजकीय कपिलाषष्ठीचा योग' असा अग्रलेख लिहून शाहू छत्रपतींचे मनःपूर्वक स्वागत केले होते.

८. लोकमान्य टिळकांच्या नेतृत्वाखाली रायगडावरील समाधी जिर्णोधार करण्यासाठी नेमण्यात आलेल्या शिष्टमंडळाच्या माध्यमातून कोल्हापूरला आलेल्या मंडळीचा यथायोग्य सन्मान आणि स्वागत छत्रपतीच्या वतीने करण्यात आलेला होता.

९. ज्या वेदोक्त प्रकरणामुळे दोघांचा वाद सुरू झाला त्याबद्दल पुढील काळात लोकमान्य टिळकांनी छत्रपतींना वेदोक्ताचा अधिकार आहे असे सांगून वेदोक्त प्रकरणातील कटुता कमी करण्याचा प्रयत्न केला होता. छत्रपतींना वेदोक्ताचा अधिकार आहे हे त्यांचे मत शाहू छत्रपतींनी १२ नोव्हेंबर १९०७ रोजी कर्नल फेरीस यांना लिहिलेल्या पत्रात वाचावयास मिळते.

१०. लोकमान्य टिळकांच्या प्रेरणेने कोल्हापुरात स्थापन झालेल्या शिवाजी क्लबला सतत आर्थिक मदत शाहू छत्रपतींना केलेली होती.

११. लोकमान्य टिळकांच्या प्रयत्नातून नेपाळ येथे उभ्या केल्या जात असणाऱ्या बंदुकीच्या कारखान्याला शाहू छत्रपतींनी ५००० रुपयांची मदत दिली होती, अशी लोकमान्य टिळकांचे नातू जयवंतराव टिळक यांची साक्ष आहे.

१२. सुमारे १९०३ पासून ते १९०८ पर्यंत भावी सशस्त्र स्वातंत्र्ययुद्धाकरिता टिळकांनी एक गुप्त संघटना चालवली होती. त्या संघटनेला प्रतिवर्षी शाहू छत्रपती ५०० रुपये पाठवीत असल्याची गणपत जांबोटकर यांची साक्ष आहे. त्यांची १ ऑगस्ट १९७१ च्या ङ्गकेसरीफ्मधे त्यांची मुलाखत प्रसिद्ध झाली होती.

१३. मिरजला ङ्गगुप्तमंजुषाफनाटक पाहण्यासाठी दोघेही आले होते. शाहू छत्रपती पहिल्या रांगेत बसले होते. लोकमान्य टिळकांना ते आपल्या शेजारी बसण्याचा आग्रह करीत होते. परंतु लोकमान्य टिळक तेथे न बसता छत्रपतींना मुजरा करून पाठीमागे जाऊन बसले होते.

निष्कर्ष :

दोघांच्या आयुष्यातील काही प्रसंग आणि घटना मुळे राजर्षी शाहू महाराज आणि लोकमान्य टिळक यांचा संघर्ष निश्चितच दिसतो तो आगदी टोकाला गेलेला दिसतो. तरीही या दोन महापुरुषांमधे जिव्हाळ्याचे संबंध होते हे नाकारून चालत नाही. राजर्षी शाहू महाराज आणि कोल्हापूर संस्थांन याविषयी लोकमान्य टिळकांची भूमिका तपासात असताना तात्कालिन काही संदर्भाच्या आधारे आपणास असे दिसते की लोकमान्य टिळकांच्या मनामध्ये कोल्हापूर संस्थांनाविषयी आदराची भावना होती. आज शाहू छत्रपती आणि लोकमान्य टिळक यांच्यामधे

स्वातंत्र्ययुद्धात कसा सहयोग होता, यासंबंधीचेही भरपूर पुरावे उपलब्ध आहेत.

संदर्भ साधने

१. राजर्षी शाहू जीवन आणि कार्य : डॉ जयसिंगराव पवार
२. शाहू छत्रपती आणि लोकमान्य टिळक – य. दि. फडके, १९८६,
३. छत्रपती शाहू महाराज चरित्र : हिंदुराव साळुंखे १९९८
४. राजर्षी श्रीशाहू छत्रपती : वाद आणि वास्तव रमेश जाधव १९९२
५. लोकमान्य टिळक चरित्र : न ची केळकर १९२८
६. राजर्षी श्रीशाहू छत्रपती यांचे अंतरंग : वा द तोफखाने १९६३

■■■

ISSN No. 2394-5990

सामाजिक न्यायाचे प्रणेते : राजर्षी छत्रपती शाहू महाराज

डॉ.सज्जन उद्धव पवार
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग
शंकरराव मोहिते महाविद्यालय,अकलूज
मो. नं. ९९२२१८८२७०

'महाराष्ट्र ही सामाजिक सुधारण्यासाठी झटणाऱ्या समाजसुधारकांची व मानवतेची मूल्य जोपासना करणाऱ्या मानवतावादी विचारवंतांची भूमी आहे. याच भूमीमध्ये अनेक समाज सुधारकांनी आपल्या विचार कार्याच्या माध्यमातून सामाजिक न्यायाची बाजू भक्कमपणे मांडण्यासाठी पुरोगामी विचाराची मुहूर्तमेढ रोवली. चातुर्वर्ण्य व्यवस्थेमुळे अधोगतीस गेलेल्या समाजव्यवस्थेला पुरोगामी विचार देऊन अनेक विचारवंतांनी आपल्या विचारधारेच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तन केले. त्यातून सामाजिक क्रांती होऊन समाजामध्ये राजकीय, सामाजिक व शैक्षणिक सुधारणा घडवून आल्या. परंतु सामाजिक क्रांती होऊही समाजामध्ये सामाजिक न्यायाचा मात्र अभाव होता. अशा स्थितीत करवीर नगरीचे राजे राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या कारकिर्दीमध्ये विविध संघटनांच्या विचारपीठावरून समाज परिवर्तनाचे विचार मांडून सामाजिक क्रांती घडवून समाजसुधारणा केल्या.समाज परिवर्तनाच्या चळवळीमध्ये राजर्षी शाहू महाराज यांचे योगदान अनन्यसाधारण असल्याचे दिसून येते.शाहू महाराजांनी केलेल्या सर्व सामाजिक, शैक्षणिक, राजकीय सुधारणा सामाजिक न्यायाशी नाते सांगतात.शाहू महाराजांनी आपल्या सुधारणावादी कार्यातून समाजक्रांती नंतर समाजामध्ये सामाजिक न्याय प्रस्थापित केला. राजर्षी शाहू महाराजांनी सामाजिक सुधारणाच्या माध्यमातून अवघड वाटणारे सामाजिक न्यायाचे तत्व साकारले होते.त्यादृष्टीनेफ्रासामाजिक न्यायाचे प्रणेते :राजर्षी छत्रपती शाहू महाराजफ्रा शोधनिबंधातून राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या सामाजिक न्यायवादी भूमिकेचा आढावा घेतला आहे.

राजर्षी शाहू महाराज यांचा जन्म २६ जून १८७४ रोजी कागल येथे घाटगे घराण्यात झाला. त्यांचे मूळ नाव मयशवंतफ होते.करवीर संस्थानचे राजे चौथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या निधनानंतर, त्यांच्या पत्नी आनंदीबाई यांनी दिनांक १७ मार्च १८८४ रोजी यशवंतरावास दत्तक घेतले. त्यानंतर २ एप्रिल १८९४ रोजी त्यांचा कोल्हापूर संस्थानाचे छत्रपती म्हणून राज्यरोहण समारंभ झाला.[१] छत्रपती शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानाच्या राज्यकारभार हाती घेतला. त्यावेळी त्यांचे वय २० वर्षाचे होते. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी २ एप्रिल १८८४ ते ६ में १९२२ या कालावधीमध्ये कोल्हापूर संस्थानात लोककल्याणकारी राज्यकारभार करून सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक क्षेत्रात अमुलाग्र सुधारणा करून राज्यात सामाजिक न्याय प्रस्थापित केला.सामाजिक न्याय म्हणजे सामाजिक क्रांती नंतरची क्रांती होय.सामाजिक न्यायाची संकल्पना मानवी स्वातंत्र्य, समता व बंधुता तत्त्वावर आधारित असते. सामाजिक क्रांती नंतरचे सामाजिक न्यायाची लढाई मोठी अवघड असते. या लढाईत स्वकीयांशी, परकीयांशी आणि विशेषत: स्वतःशी लढावे लागते. समाजामध्ये आर्थिक व राजकीय न्याय प्रस्थापित करणे सोपे असते परंतु सामाजिक न्याय प्रस्थापित करणे अवघड असते. कारण सामाजिक न्याय प्रस्थापित करताना संघर्षाला तोंड द्यावे लागते.[२] संघर्षाला तोंड देणे ही मोठी जोखीम असते. शाहू महाराजांनी ही जोखीम पत्करून सामाजिक विकासात सामाजिक न्यायाचे तत्व आणण्यासाठी आपल्या संस्थानामध्ये राज्यकारभार सुरू केला. असमानता नष्ट करून सामाजिक समता प्रस्थापित करणे म्हणजे न्याय आणि तो न्याय विकसित करणे म्हणजे सामाजिक न्याय. समाजामध्ये दुर्बल घटकांना विकासाची संधी दिल्यामुळे सामाजिक न्याय प्रस्थापित होत नाही तर त्या दुर्बल घटकांना समाजात आत्मसन्मान व प्रतिष्ठा मिळवून देऊन सामाजिक न्याय प्रस्थापित करता येईल. त्यादृष्टीने शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी केलेले कार्य महत्त्वाचे वाटते.

राजर्षी शाहू महाराजांनी अस्पृश्य वर्गासाठी सामाजिक न्याय मिळवून देण्याची भूमिका सातत्याने घेतल्याचे त्यांच्या अस्पृश्यता निवारण कार्यातून दिसते. अस्पृश्य समाजातील माणसांना मेलेली गुरे ओढणे किंवा कचराकुंडीचे उकिरडे साफ करणे अशी कामे करावी लागत होती. अशा सर्व कामातून अस्पृश्यांना मुक्त करण्याचे कार्य राजर्षी शाहू महाराजांनी केले. त्याचबरोबर त्यांनी बारा बलुतेदारी किंवा वतनव्यवस्था बंद करून अस्पृश्य वर्गांना सामाजिक प्रतिष्ठाच मिळवून देण्याची महत्त्वाचे कार्य राजर्षी शाहू महाराजांनी केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणत अस्पृश्यता हा आमच्या आत्म्यावरील कलंक आहे, पण तो

कलंक पुसण्यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी कायदे व जाहीरनामे काढून करवीर नगरीमध्ये सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याचे कार्य केले. समाज मंदिरात अस्पृश्याबरोबर भोजन करणे किंवा अस्पृश्यांना मंदिरात प्रवेश देणे इत्यादी कार्यातून त्यांनी चातुर्वर्ण्य व्यवस्थेतून निर्माण झालेल्या चुकीच्या प्रथा मोडीत काढून अस्पृश्यांना समाजात प्रतिष्ठा मिळवून दिली. महाराजांनी गुन्हेगारी जातीची हजेरी बंद केली. पारधी, बेरड, वडार आदी अनेक जातींना ब्रिटिशांनी गुन्हेगार जमात ठरविले होते. या सर्वांना पोलीस पाटलासमोर जाऊन हजेरी द्यावी लागत असे. ही हजेरीची प्रथा राजर्षी शाहू महाराजांनी १९१८ मध्ये जाहीरनामा काढून बंद केली आणि या सर्व अस्पृश्य जातींचे पुनर्वसन केले. त्यासाठी त्यांनी सर्वप्रथम गुन्हेगारास गुन्हेगारीतून मुक्त केले. त्या सर्व जमातीसह शिक्षण व रोजगार देऊन त्यांच्या उदरनिर्वाहाची सोय करून सामाजिक प्रतिष्ठा मिळवून दिली.राजर्षी शाहू महाराज यांनी गंगाराम कांबळे नावाच्या अस्पृश्य व्यक्तीला चहाचे दुकान टाकून दिले आणि त्याच चहाच्या दुकानावर रोज स्वतः महाराज आपल्या लवाजमासह चहा पिण्यासाठी जात असत.[३] अशा प्रकारे शाहू महाराजांनी अस्पृश्यता निवारण करण्याबरोबरच गंगाराम कांबळे यांना सामाजिक न्याय मिळवून देण्याचे कार्य केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्यकर्ते दादासाहेब गायकवाड या आंबे गावातील एका अस्पृश्य सदन शेतकऱ्याने मोठ्या कष्टाने गुऱ्हाळ चालू केले. परंतु ते अस्पृश्य असल्याने त्यांच्या गुऱ्हाळातील गूळ व्यापारी खरेदी करत नसत. त्यावेळी शाहू महाराजांनी स्वतः गुळ व्यापाराकडे नेऊन विक्री करून दादासाहेब गायकवाड यांच्या व्यवसायास मदत केली. त्यांनी त्यासाठी राज्यात अस्पृश्यता निवारण करण्यासाठी विविध कायदे केले व कायद्याने अस्पृश्यताचे पालन करणार्याला शिक्षा केली. अस्पृश्यता निर्मूलनाचे कायदे करताना एखाद्या समाजाला शिक्षा करून एखाद्याला तात्काळ न्याय द्यायचा नव्हता. तर दोघांमध्येही सामाजिक न्याय रुजवण्याचे उद्दिष्ट होते. सामाजिक क्रांती म्हणजेच जातीव्यवस्थितेची विषमता नष्ट करणे होय. सामाजिक विषमता नष्ट करण्यासाठी शाहू महाराजांनी कायदे करून त्याचे प्रभावी अंमलबजावणी केली.या कायद्यातून सवर्ण व अस्पृश्य दोघांचेही प्रबोधन होऊन सामाजिक अभिसरण होईल व त्यातून समाजामध्ये सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याचे महाराजांचे धोरण होते.

राजर्षी शाहू महाराजांनी समाजामध्ये अस्पृश्यता निवारण करून सामाजिक न्याय निर्माण करताना समतेबरोबर बंधुत्वाचेही तत्त्व जोपासलेले दिसून येते.तत्कालीन समाजातील अतिशूद्र लोकांना माणूस तर नाही, पण पशु पेक्षाही हीन दर्जाची वागणूक दिली जात होती. त्यांचा स्पर्श अपवित्र मानला जात होता.राजर्षी शाहू महाराजांनी ही अस्पृश्यता संपवण्यासाठी सार्वजनिक व सरकारी खात्यामध्ये अस्पृश्यता पाळणे गुन्हा आहे अशा पद्धतीचा जाहीरनामा जाहीर केला. प्रत्येकाने जातीभेद न पाळता एकमेकांशी प्रेमाने, समतेने वागले पाहिजे,असा अधिकाऱ्याला आदेश दिला. महाराज येथेच थांबले नाहीत तर त्यांनी स्वतःचे अंगरक्षक, वॉचमन,ड्रायव्हर म्हणून महार जातीतील व्यक्तीची नेमणूक केली.त्यांनी राज्यात कुलकर्णी पद रद्द करून तलाठी पदाची निर्मिती केली आणि तलाठी पदावर अस्पृश्य समाजातील लोकांची नेमणूक केली. त्यातून अस्पृश्यता निवारण करून अस्पृश्यांना प्रतिष्ठा मिळवून देण्याचे कार्य केले.[४] अशा पध्दतीने राजर्षी शाहू महाराजांनी सर्वांना समान संधी या समतावादी विचारातून दुर्बल घटकातील लोकांना न्यायिक भूमिकेतून समान संधी देण्यासाठी आपले जीवन समर्पित केलेले दिसून येते.

समाजामध्ये सामाजिक न्याय प्राप्त करण्याचे महत्त्वाचे साधन म्हणजे शिक्षण. शिक्षणाने व्यक्ती ज्ञानी व विचारी बनतो. त्यामुळे शाहू महाराजांनी संस्थानातील सर्व जातीच्या लोकांना शिक्षण देण्यासाठी शिक्षणाचा कायदा केला. शिक्षणाचे सोय करून ही मुलांना शाळेमध्ये पाठवले जात नव्हते.त्यामुळे त्यांनी संस्थानात सक्तीच्या व मोफत शिक्षणाचा कायदा केला.तसेच विद्यार्थ्यांची शिक्षणाबरोबर राहण्याची व जेवणाची सोय करण्यासाठी वसतीगृह उभी केली.[५] या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य मोफत दिले. शिक्षण पूर्ण केलेल्या मुलांना पात्रतेनुसार संस्थानामध्ये नोकरीची संधी उपलब्ध करून दिली.तसेच नोकरदार मुलांमध्ये सामाजिक कार्याचे बीजारोपण करून सामाजिक परिवर्तनाचे कार्य केले. शिक्षणाची व्यवस्था करताना मागास समाजातील मुलांनाही शिक्षणाची सोय करून सामाजिक समता प्रस्थापित केली. त्यामुळे जातीव्यवस्थेने सडलेल्या समाजात स्वातंत्र्य, समता व सन्मानाचे बिजारोपण झाले. अशा पद्धतीने राजर्षी शाहू महाराजांनी संस्थानांमध्ये शिक्षणाद्वारे व्यक्तीला साक्षर करण्याबरोबर व्यक्तीच्या सर्वांगीण विकास साधला व त्यातून सामाजिक न्याय प्रस्थापित केला.

समाजामध्ये शेतकरी व शेतमजुराचा मोठा कष्टकरी वर्ग होता. शेतीही पावसाच्या पाण्यावर अवलंबून असल्याने शेतकऱ्यांना अनेक अडचणीचा सामना करावा लागत असे.याच शेतीतून राज्याला मोठे उत्पन्न कर रूपाने मिळत होते. त्यामुळे शाहू महाराजांनी शेतकऱ्यांना शेती पिकवण्याच्या आदेश न देता शेतकऱ्यांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून देऊन, त्यांना स्वावलंबी बनविले. महाराजांनी शेतीला पाणीपुरवठ्याची सोय व्हावी म्हणून राधानगरी धरण कोणताही बळी न देता बांधले.[६]

ISSN No. 2394-5990

शेतकऱ्यांना नवीन तंत्रज्ञान उपलब्ध करून दिले. दुष्काळ व टंचाईच्या काळात शेतकऱ्यांच्या जनावरांना मोफत चारा देऊन जनावराचे संगोपन केले. शेती उत्पादन वाढण्याबरोबर प्रक्रिया उद्योगांना चालना देऊन शेतकऱ्यांना जास्तीचा फायदा करून दिला. कोल्हापूर मधील महालक्ष्मी (येशील) हे गोडेतेल तयार करून या तेलाची देशभरात विक्री केली जात होती. आजही शाहू महाराजांनी कोल्हापुरात सुरू केलेला गूळ व चप्पल उद्योगांनी मोठा नावलौकिक मिळवला आहे.[७] त्यांनी विविध शेतीविषयक सुधारणा व शेतीपूरक उद्योगधंद्याचे निर्मिती करून शेतकऱ्यांना स्वाभिमानी व स्वावलंबी केले. अशा प्रकारे शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांची सोडवणूक करून शेतकऱ्याच्या जीवनामध्ये स्वावलंबन व स्वाभिमान निर्माण केला. त्यातून कष्टकरी शेतकऱ्यांच्या जीवनात प्रगती घडून आली.

अस्पृश्य, शेतकरी समाजाबरोबरच भारतातील स्त्रियांचाही अनेक ठिकाणी छळ आणि पिळवणूक केल्याची दिसून येते. महाराजांनी राज्यात स्त्री सुधारणाची चळवळ सुरू करून स्त्रियांच्या शिक्षणाची सोय केली. त्यांनी आपल्या अकाली वैधव्य आलेल्या सुनेला घरामध्ये न ठेवता शिक्षण देऊन सुशिक्षित केले आणि त्यांच्यावर राज्याच्या शिक्षणाची जबाबदारी देऊन स्वतःच्या पायावर उभे केले.[८] त्यामुळे राज्यातील इतर महिला ही शिक्षण घेण्यास पुढे येऊ लागल्या. एकेकाळी या देशात नवऱ्याच्या चितेवर त्याच्या विधवा पत्नीला बांधून जिवंत जाळण्याची सतीची अघोरी प्रथा होती. समाजातील अघोरी सतीची चाल राजर्षी शाहू महाराजांनी राज्यात बंद केली. राजर्षी शाहू महाराजांनी स्त्रियांचा कैवार घेऊन त्यांच्या हक्कासाठी व संरक्षणासाठी सामाजिक न्यायाच्या भूमिकेतून अनेक कायदे केलेले दिसून येतात. त्यामध्ये विधवा पुनर्विवाह कायदा, आंतरजातीय विवाह कायदा, देवदासी प्रतिबंध कायदा, स्त्रीला मानसिक छळास प्रतिबंध करणारा कायदा, घटस्फोट व स्त्री वारसा हक्क कायदा असे कायदे करून स्त्री वर्गाला समाजात स्वातंत्र्य व सन्मान मिळवून दिला.[९] शाहू महाराजांनी आंतरजातीय विवाहास प्राधान्य देताना, आपल्या राज्यात मराठा व धनगर समाजामध्ये विवाह लावून दिले व विवाहित जोडप्यांना आपल्या राज्यातील जमीन देऊन त्यांच्या उदरनिर्वाची सोय केली. तसेच त्यांनी स्वतःच्या बहिणीचे आंतरजातीय लग्न लावून आंतरजातीय विवाह कायद्याची अंमलबजावणी कृतीतून करून दाखवली.शाहू महाराजांनी स्त्रियांना सन्मान मिळवून देण्यासाठी सामाजिक न्यायाच्या भूमिकेतून केलेले कायदे क्रांतिकारी असल्याचे दिसून येते. राजर्षी शाहू महाराजांनी स्त्रियांच्या हक्कासाठी आणि संरक्षणासाठी कठोरातले कठोर कायदे करून उपेक्षित रंजल्या गांजलेल्या स्त्री वर्गासाठी सामाजिक न्याय देण्याच्या भूमिकेतून कार्य केल्याचे दिसून येते.

अमर्त्य सेन यांनी सामाजिक न्याय म्हणजे कार्यक्षमतांचा विकास अशी सामाजिक न्यायाची व्याख्या केलेली आहे. राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या राज्यात सामान्य माणसांच्या कार्यक्षमतांच्या विकासाला अग्रक्रम दिलेला दिसतो. त्यांनी दलित, भटके-विमुक्त, शेतकरी व स्त्री समाजाला त्यांच्या कार्यक्षमता विकसित करण्याची संधी दिली.त्यांनी सांस्कृतिक क्षेत्रातील विविध ठिकाणी ब्राह्मणेतर लोकांवर जबाबदाऱ्या सोपवून, त्यांनी समाजातील सामान्य व्यक्तीचाही विकास करून सामान्यांना प्रतिष्ठा मिळवून दिली. त्यामुळे राजर्षी शाहू महाराज यांची सामाजिक न्यायाची संकल्पना ही वंचित समूहामधून पुढे येऊन, ती व्यक्तीच्या कार्यक्षमतांच्या विकासाला देखील प्राधान्य देते. राजर्षी शाहू महाराजांनी संपूर्ण जीवनात सामाजिक न्यायाचे कार्य केले. समाज कायदे व शिस्तीने उभा करता येतो. पण तो सामाजिक न्यायावर उभा करता येणे अवघड असते. त्यासाठी सामाजिक जीवनाच्या विविध क्षेत्रात सामाजिक क्रांती करावी लागते, पण या सामाजिक क्रांतीतून सामाजिक न्याय जन्माला येईलच असे नाही. आज भारताला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे झाली. तरी सामाजिक न्याय अभावानेच जाणवतो. या सर्व परिस्थितीत राजर्षी शाहू महाराजांनी सामाजिक न्यायासाठी यशस्वीपणे केलेल्या लढाया, कायदे व सुधारणा यातून समाजामध्ये सामाजिक न्याय प्रस्थापित केलेला दिसून येतो. म्हणूनच राजर्षी शाहू महाराज यांचा २६ जून हा जन्मदिवस मसामाजिक न्याय दिनफ म्हणून साजरा केला जातो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी म्हटल्याप्रमाणे, सामाजिक लोकशाही नसेल तर राजकीय लोकशाहीला किंमत नसते. त्यावेळी सामाजिक न्यायाची बाब कोलमडल्याशिवाय राहत नाही.या विचारधारेला अनुसरून राजर्षी शाहू महाराजांनी सामाजिक, शैक्षणिक सुधारणा घडवून आणण्यासाठी सामाजिक न्यायाशी नाते जोडल्याचे दिसून येते.

संदर्भ साधने :

१. कांबळे नारायण व इतर (संपा.), राजर्षी शाहू नव्या दिशा, नवे चिंतन,चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, २०१८, पृ.५५.

२. डॉ. पवार जयसिंग व डॉ. पवार मंजुश्री (संपा.), राजर्षी शाहू पंचखंडात्मक स्मारक ग्रंथ, खंड: चार आणि पाच, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, मार्च -२०१९, पृ.१३७४.

३. डॉ.कोंडेकर आर. एस. 'रयतेचा राजा : राजर्षी शाहू महाराज' अरुणा प्रकाशन, लातूर, २०११, पृ.१५२-१५३.
४. पवार वसुधा,राजर्षी शाहू छत्रपती एक अभ्यास, मेहता पब्लिकेशन हाऊस,पुणे,तृतीयावृत्ती,२०११ पृ.७०-७१.
५. पवार जयसिंगराव (संपा.),राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी,कोल्हापूर, प्रथमावृत्ती, २००१,पृ. ५९५.
६. डॉ.सावंत उत्तम, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, निर्मल प्रकाशन, नांदेड,प्रथमावृत्ती, २००६,पृ.८७.
७. उपरोक्त,राजर्षी शाहू पंचखंडात्मक स्मारक ग्रंथ, खंड: चार आणि पाच,पृ.१३८०
८. भगत रा.तु. राजर्षी शाहू छत्रपती: जीवन व कार्य, सिद्धराज प्रकाशन, कोल्हापूर,१९९९, पृ. ७८.
९. उपरोक्त,राजर्षी शाहू जीवन व कार्य, पृ. ७८.

■■■

ISSN No. 2394-5990

राजर्षी शाहू महाराजांचे अस्पृश्यविषयक धोरण : एक अभ्यास

डॉ. संजय तुकाराम वाघमारे
इतिहास विभाग प्रमुख
शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज
मु. पो. शिवाजीनगर, माळेवाडी-अकलूज
मो. नं. ९३५९५९४८८०
Email.drsanjaywaghmare7099@gmail.com

प्रस्तावना :

भारतातील सामाजिक व आर्थिक लोकशाही जसजशी यशस्वी व सामर्थ्यशाली होत जाईल, तस तशी शाहूंची ऐतिहासिक मुर्ती अधिकाधिक तेजस्वी दिसत जाईल. जनता आपल्या अपार प्रेमाने अखंड कृतज्ञेने त्यांचे स्मरण करीत राहील, यात संदेह नाही. अर्थात छत्रपतींचे नाव इतिहासात सुवर्णाक्षरात लिहले जाईल कर्तुत्ववान मनुष्य आपल्या जीवनात अनेक भूमिका वटवित असतो. आपल्या दुर्दम्य, त्यागी व विरक्त आत्मशक्तीने राजर्षी शाहू महाराज हे महाराजा शिवछत्रपतींच्या नंतरचे महान राज्यकर्ते ठरले आहेत. खरोखर ते एक महान सामाजिक पुरूष होते. एक सामाजिक क्रांतिकारक राजा, लोकशाहीनिष्ठ पत्रकारांचा पाठीराखा, हिंदी शास्त्रीय संगिताचा एक पुरस्कर्ता, मराठी रंगभूमिचा एक शिल्पकार, मल्लयुध्दाचा एक आश्रयदाता, आधुनिक महाराष्ट्राचा एक भाग्यविधाता, भारतातील हरीतक्रांतीचा अग्रदूत आणि भारतातील सामाजिक आणि आर्थिक लोकशाहीचा ते एक संस्थापक ठरतात.

अज्ञानाने काळवंडून गेलेले आणि दारिद्याने गांजून गेलेले सर्वसामान्य लोकांचे जीवन ज्ञानाने उजळून निघावे आणि समृध्दीने भरून यावे यासाठी शाहू महाराजांनी आयुष्यभर जो संघर्ष केला म्हणूनच मी राजर्षी शाहू महाराजांचे अस्पृश्यविषयक धोरण : एक अभ्यास या विषयावर शोध निबंध सादर करीत आहे.

प्रारंभिक जीवन :

शाहू महाराजांचा जन्म २६ जून १८७४ रोजी कागल येथील घाटगे घराण्यात झाला. त्यांचे मुळ नाव यशवंत, त्यांच्या वडिलांचे नाव जयसिंगराव (आप्पासाहेब) तर आईचे नाव राधाबाई होते. कोल्हापूर संस्थानाचे राजे चौथे शिवाजी महाराज यांच्या मृत्यूनंतर त्यांची पत्नी आनंदीबाई यांनी १७ मार्च १८८४ यशवंतरावांना दत्तक घेतले व शाहू हे नाव ठेवले. सन १८८९ ते १८९३ या चार वर्षाच्या कालखंडात धारवाड येथे शाहू महाराजांचा शैक्षणिक आणि शारीरिक विकास झाला. शिक्षण चालू असतानाच एक एप्रिल १८९१ रोजी बडोद्याच्या गुणाजी खानविलकर यांच्या लक्ष्मीबाई या मुलीशी शाहू विवाहबध्द झाले. यावेळी त्यांचे वय १७ वर्षाचे होते आणि लक्ष्मीबाईचे वय १२ वर्षाहून कमी होते. २ एप्रिल १८९४ रोजी त्यांचा राज्यारोहण समारंभ झाला. इ. स. १९२२ सालापर्यंत म्हणजेच २८ वर्षे ते कोल्हापूर संस्थानांचे राजे होते. मुंबई येथे ६ मे १९२२ रोजी त्यांचे निधन झाले.

सत्यसुधारक हॉटेल अस्पृश्यता निर्मुलनाची प्रयोगशाळा :

गंगाराम कांबळे अस्पृश्य समाजातील व्यक्तीला मराठा समाजाच्या लोकांनी पाण्याच्या हौदाला स्पर्श केला म्हणून बेदम मारहाण केली. तेंव्हा शाहू महाराजांनी गंगारामाच्या हातात चाबूक दिला आणि ज्यांनी गंगाराम कांबळे ला मारले त्यांना परत मारावयास लावले. अशा गंगाराम कांबळेला कोल्हापूरच्या हम रस्त्यावर हॉटेल काढून दिले. त्या हॉटेलमध्ये महाराजा आपल्या दरबारी मंडळीसह स्वत: जात आणि गंगारामच्या हातचा चहा पित असत. महाराज स्वत:च चहा पीत असल्यामुळे सवर्ण दरबारी मंडळीदेखील महाराजांच्या बरोबर आपोआपच नाईलाजाने गंगाराम कांबळेच्या हॉटेल मध्ये चहा पीत ते हॉटेल म्हणजेच शाहू महारांची अस्पृश्यता निर्मुलनाचे प्रयोगशाळाच होती.

कुस्तीच्या आखाड्यातून समानतेचा प्रयत्न :

शाहू महाराजांनी विविध जातीधर्माच्या पैलवानांना आश्रय दिला. जातीभेद निर्मुलनासाठी महारमल्लांना, जाठ पैलवान व वाल्मिकी समाजातील पैलवानांना पंडित पैलवान अशी नावे दिली. कुणाची जात कळू नये. तसेच जातीभेदामुळे कुणीही एकमेकांबरोबर कुस्ती खेळण्यास नकार देऊ नये यासाठी सदरची युक्ती शाहू महाराजांनी शोधली होती.

शिष्यवृत्ती आणि वस्तीगृहे सुरू :

शाहू महाराजांनी १८९१-९२ मध्ये राजाराम महाविद्यालयामध्ये एक वस्तीगृह सुरू केले तसेच १९०१ साली मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी व्हिक्टोरीया मराठा बोर्डींग हाऊस हे वस्तीगृह सुरू केले. उच्च शिक्षणासाठी त्यांना शिष्यवृत्ती देणे सुरू केले. अस्पृश्य विद्यार्थ्यांसाठी त्यांनी शिक्षण शुल्क माफ केले. १९०८ मध्ये अस्पृश्य जातीच्या उन्नतीचे पुरस्कर्ते असलेल्या व्हाईलेट क्लार्क यांच्या नावाने अस्पृश्य विद्यार्थ्यांसाठी वस्तीगृह सुरू केले. शाहू महाराजांनी कोल्हापूर, नाशिक, पुणे, आणि अहमदनगर इ. ठिकाणी सुमारे २६ वस्तीगृहे सुरू केली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शाहू महाराजांनी केलेली मदत :

अस्पृश्य समाजातील भिमराव आंबेडकर हा तरूण विदेशातून उच्च शिक्षण घेऊन आल्यानंतर स्वत: शाहू महाराज आंबेडकरांना भेटण्यासाठी मुंबईच्या परळ चाळीत जिथे बाबासाहेब राहत होते तिथे ते गेले व त्यांनी बाबासाहेबांचे अभिनंदन केले. शाहू महाराजांनी बाबासाहेब आंबेडकरांच्या मुकनायक या वर्तमानपत्रासाठी आर्थिक मदत केली. लंडन येथील अपुऱ्या राहिलेल्या उच्च शिक्षणासाठी शाहू महाराजांनी बाबासाहेबांना आर्थिक मदत केली.

माणगांव परिषद :

२१ व २२ मार्च १९२० रोजी कोल्हापूर संस्थानांतील माणगाव या गावी बहिष्कृत (अस्पृश्य) समाजाची पहिली परिषद डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली भरली २२ मार्च १९२० रोजी शाहू महाराज परिषदेला हजर राहून सर्व बहिस्कृत वर्गास ऋणी करून सोडले. बहिस्कृत लोक हे हिंदी साम्राज्याचे घटक आहेत व इतर हिंदी लोकांप्रमाणे त्यांना मानवी हक्क आहेत. या परिषदेमध्ये पुढील प्रमाणे ठराव करण्यात आले.

अ) सार्वजनिक रस्ते विहीरी, तलाव, शाळा, धर्मशाळा, तसेच लायसेन्स खाली असलेल्या करमणुकीच्या जागा, भोजनगृहे, वाहने इत्यादी सार्वजनिक सोईंचा उपयोग घेण्याचा अस्पृश्य समाजास हक्क आहे.

ब) गुणसिध्द योग्यतेने त्यांना व्यापार करण्याचा व नोकरी मिळविण्याचा हक्क आहे. वरील हक्क उपभोगताना जेंव्हा अडचण पडेल. त्यावेळी ती दूर करण्यास सरकारने कायद्याने मदत करावी.

क) बहिष्कृत वर्गात शिक्षणाचा प्रसार करण्यास दरेक जिल्ह्याला बहिष्कृत वर्गापैकी निदान एक डेप्युटी किंवा असिसस्टंट डेप्युटी एज्युकेशनल इनेस्पेक्टर असावा व त्या दर्जाला ट्रेनिंग कॉलेजची थर्ड इयर परीक्षा पास झालेला असावा. किंवा मॅट्रीक पर्यंत शिकलेला इसम लायक समजला जावा.

ड) छत्रपती शाहूंनी आपल्या राज्यात बहिष्कृतांना समानतेचे हक्क देवून त्याचा उध्दार करण्याचे सत्कृत्य आरंभल्याबद्दल त्यांचा वाढदिवस प्रत्येक बहिष्कृत व्यक्तीने सणाप्रमाणे साजरा करा असा ठराव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडला होता.

अस्पृश्यांना वकिलीची सनद :

वकिली क्षेत्रातील उच्चवर्णियांची मक्तेदारी मोडून काढण्यासाठी शाहू महाराजांनी ११ मार्च १९२० रोजी वटहुकूम काढला की, करवीर इलाख्यातील सर्व कोर्टात वकिली करण्यासाठी रामचंद्र शिवराम कांबळे, रामचंद्र सखाराम कांबळे, दत्तात्रय संतराम पोवार, तुकाराम आप्पाजी गणेशाचार्य, कृष्णराव भाऊसाहेब शिंदे, विश्वनाथ नारायण कुंभार, धोंडदेव रामचंद्र व्हटकर आणि कलेश यशवंत ढाले इत्यादींना वकिली सनद शाहू महाराजांनी देऊ केल्या.

जातीवार मतदार संघाची मागणी :

शाहू महाराजांनी ब्राह्मणेत्तर व अस्पृश्य समाजाच्या विकासाकरीता जातीवार मतदार संघाची मागणी पुढे केली होती. मजातीवार प्रतिनिधीत्वफ या संकल्पनेचा विचार शाहू महाराजांनी व्यापक अर्थाने पुढे मांडला आहे. सर्व जातीचे लोक पुढे येऊन सामाजिक, औद्योगिक, शिक्षण विषयक, सरकारी नोकरी वगैरे सर्व बाबतीत आपापली जबाबदारी पुरी पाडण्याचे सामर्थ्य त्यास येणे, याला मी मजातवार प्रतिनिधीत्वफ असे म्हणतो.

मागासवर्गीयांना राखीव जागा :

राजर्षी शाहूंनी ब्राह्मणेत्तर चळवळ सुरू करून जातीयतेची जुनाट गढी ढासळून जमीनदोस्त केली. अस्पृश्य समाजाची उन्नती कशा प्रकारे होईल याचा ध्यास घेतला. सर्वत्र ब्राह्मणांचे राजप्रतिनिधी आढळत होते. एका बाजूला बलवान चपळ असे घोडे तर दुसऱ्या बाजूला कमजोर अशक्त घोडे; यांच्या शर्यतीत जीवनाच्या शेवटपर्यंत कमजोर घोडे हे हारणारच होते, त्यासाठी आपल्या राज्यात २६ जुलै १९०२ पासून आपल्या कमजोर अस्पृश्य वर्गास ५० टक्के राखीव जागा दिल्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पुढे घटनेमध्ये याचे रूपांतर करून राखीव जागांबाबत कायदेशीर अंमलबजावणी करण्यास सुरूवात केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना राखीव जागांसाठी प्रस्तापितांसाठी खूप झगडावे लागले. राजर्षी शाहू महाराजांनी केवळ एका सिंह गर्जनेने काम करून टाकले. आज महाराष्ट्राची स्थिती पाहता.

ISSN No. 2394-5990

प्रत्येक क्षेत्रात अस्पृश्यांची राखीव जागांबाबत कायदेशीर रित्या तरतुद केली आहे. राजर्षी शाहू महाराजांच्या पूर्वी अस्पृश्यांना अशा राखीव जागा नव्हत्या परंतू शाहू महाराजांनी हे कार्य केले. आज अस्पृश्य विद्यार्थी जिद्दीने शिक्षण घेताना दिसून येत आहेत. त्यांच्या शिक्षणासाठी मागासवर्गीय शिष्यवृत्ती योजना राबविली जात आहे. राखीव जागा व शिष्यवृत्तीच्या साहाय्याने आज बहुजन समाजाचा विकास होताना दिसत आहे. आज हा वर्ग तटपुंजा मदतीवर सुध्दा आपले भविष्य घडवित आहे. राजर्षी शाहूंनी आपल्या संस्थानात राखीव जागा ठेवल्या नसत्या तर आधुनिक महाराष्ट्रातील अस्पृश्य जनता शंभर दिडशे वर्ष मागेच राहिली असती. शाहू महाराजांच्या या राखीव जागेच्या धोरणामुळे महाराष्ट्रात अस्पृश्य समाज झपाट्याने प्रगती करीत आहे.

अस्पृश्यांच्या मुक्तीचे जाहिरनामे :

मानवातवादी दृष्टीकोनातूनच शाहू महाराजांनी खालीलप्रमाणे अस्पृश्यांच्या मुक्तीकरीता कायदे केले.

अ) हजेरी पधद्तीवर बंदी – अस्पृश्यता मुक्तीचा पहिला आदेश २७ जुलै १९१८ ला मंजुर होवून कोल्हापूर गॅझेट मध्ये ३ ऑगस्ट १९१८ रोजी प्रसिध्द झाला. त्यामध्ये अस्पृश्यांवर लादलेली 'हजेरी' पध्दतीचे निर्मुलन करण्यात आले २९ सप्टेंबर १९१८ रोजी महाराजांचा हजेरी संदर्भात आणखी एक हुकूम गॅझेट झाला त्यात गुन्हेगार म्हणून कपाळावर कायमचा शिक्का बसलेले मगट्रेचोरफ जातीची हजेरी महाराजांनी माफ केल्याचे जाहीर करून शिक्षा झालेल्या कोणाही मनुष्याचे वर्तन शिक्षा संपल्यापासून ५ वर्ष चांगले राहिले असेल तर त्यास हजेरीतून मुक्त करावे असे म्हटले आहे.

ब) वेट बिगारी पध्दतीवर बंदी – शाहू महाराजांनी २६ जून १९१८ रोजी महार लोकांचे उत्पन्न बलुते खुतांतून कमी करून गाव हक्कदार खुतांत दाखल करण्याविषयी एक वटहुकूम काढल्याची नोंद मिळते. याचा अर्थ महारांच्या वतनी जमिनी या हुकूमाने रायतावार होणार होत्या. म्हणजे इतर रयत लोकांच्या प्रमाणे त्यांना जमिनीवर शेतसारा भरावा लागणार होता. पण त्याचबरोबर जमिनीचे वतनी स्वरूप नष्ट होणार असल्याने मवेठ वरलाफ ही नष्ट होणार होता.

क) महार वतनाचे उच्चाटन – मे १९२१ महाराजांनी प्रत्येक गावच्या समस्त वतदनदार महारलोकांकडून एक अर्ज भरून घेतला व त्यावर तातडीने कारवाही करून त्या त्या गावचे महार वतन खालसा करून टाकले.

जोगतिणी प्रतिबंध कायदा :

जोगतिणी, मुरळी, देवदासी, भावीण इ. अत्यंत कनिष्ठ दर्जाचे व उपेक्षित जीवन जगणाऱ्या या स्त्रियांकरीता महाराजांनी १७ जानेवारी १९२० ला कायदा करून या स्त्रियांना देवाला सोडल्यामुळे जे विशिष्ट हक्क (मग ते नीच दर्जाचे का असेनात) प्राप्त होतात तेच कायद्याने रद्द केले. त्यामुळे ज्या कनिष्ठ जातीमध्ये देवाला मुली वाहण्याची जी अत्यंत घृणास्पद व क्रुर चाल रूढ झाली होती तिला आपोआपच आळा बसला.

अस्पृश्यता निवारण उपाययोजना :

शाहू महाराजांनी अखिल मानव जातीस कलंक असणाऱ्या अस्पृश्यतेच्या रूढीचे निर्मुलन करण्यासाठी अनेक उपाययोजना केल्या महाराजांनी १९१९ च्या जानेवारीच्या पहिल्या तारखेस दोन जाहिरनामे मंजूर केले त्यातील पहिला महसूल, न्याय इ. खात्यासंबंधी होता. तर दुसरा संस्थानांच्या आरोग्य विभागासाठी होता. या जाहिरनाम्यानुसार महसूल, न्याय आरोग्य विभागामध्ये कोणीही अस्पृश्यता पाळणार नाही अशी ताकिद देण्यात आली.

२३ ऑगस्ट १९१९ च्या जाहिरनाम्यानुसार सरकारी मदत मिळणाऱ्या कोणत्याही शाळेत एखादा अस्पृश्य वर्गाचा विद्यार्थी आला तर संभावित गृहस्थाप्रमाणे आदरपूर्वक वागवून त्याला शाळेत घेण्यात यावे. शाहू महाराजांनी सर्व सार्वजनिक इमारती, धर्म शाळा, रेस्टहाऊसीस, सरकारी अन्नक्षेत्रे वगैरे ठिकाणी व नदीचे पाणवटे, सार्वजनिक विहीरी येथे कोणताही मनुष्य प्राण्याचा विटाळ मानायचा नाही म्हणून एक तमाम जनतेसाठी अस्पृश्यता निवारण्याचा जाहिरनामा ६ सप्टेंबर १९१९ ला काढला.

अस्पृश्योध्दाराचे कार्य :

शाहू महाराजांनी इ. स. १९१७ सालू आपल्या 'लष्करी फडात' चार अस्पृश्यांची नेमणूक केली. त्यापैकी दोघे महार होते. तर दोघे मांग होते. अन्य सरकारी सेवेतही अस्पृश्यांच्या नेमणुका केल्या जाव्यात यासाठी महाराजांनी ५ ऑगस्ट १९१८ रोजी खास हुकूम काढला. अस्पृश्यांना आग्रक्रमाने तलाठी म्हणून नेमले जावे यासाठी महाराजांनी ८ ऑगस्ट १९१८ व २६ ऑगस्ट १९१९ रोजी खास हुकूम जारी केले. शाहू महाराजीनी इ. स. १९२० साली शहरातील पोलिस गेटावर सोळा महारांची नेमणूक करताना म्हटले की, या लोकांचा समाजात दर्जा वाढावा म्हणून आपण हे करीत आहोत. कोल्हापूर म्युन्सीपाल्टीच्या चेअरमन पदी प्रथमच एका अस्पृश्याची दत्तोबा पोवार यांची महाराजांच्या प्रेरणेने नेमणुक झाली. महाराजांनी हिरा मदार भंगी यास लोकनियुक्त कमिटीवर म्युनिसिपल मेंबर म्हणून नेमल्याची नोंद मिळते. ज्ञानदेव ध्रुवनाथ घोलप या मुलाला उच्च शिक्षण देऊन उच्च विद्याविभूषित बनविले. इ. स. १९२४ साली मुंबई इलाख्याच्या कायदेमंडळात अस्पृश्यांचा पहिला प्रतिनिधी म्हणून निवडून जाण्याचे भाग्य त्यास मिळाले. पुढील काळात ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सहकारी बनले.

कृष्णाजी लक्ष्मण मोरे या मांग जातीच्या मुलाचे आर्य समाजाच्या आश्रम शाळेत शिक्षण पूर्ण करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली. हा मुलगा पुढे भारतीय लोकसभेचा दोन वेळा सदस्य होण्याचा बहुमान त्यास मिळाला.

छत्रपती शाहू महाराजांच्या निधनानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अस्पृश्यमुक्तीच्या लढ्यात कोल्हापूर संस्थानातील आघाडीवर असलेले गंगाराम कांबळे बाबासाहेबांचे सच्चे सहकारी म्हणून कार्यरत राहिले. गंगाराम कांबळे यांनी शाहू महाराजांच्या मृत्यू नंतर त्यांचे स्मारक उभारण्यासाठी त्यांनी आपल्या महार समाजाचे एक मंडळ स्थापून त्यामार्फत इ. स. १९२५ साली कोल्हापूरात शाहू महाराजांचे स्मारक उभारले. अखिल हिंदूस्थानातील महाराजांचे हे पहिले स्मारक होय.

छत्रपती शाहू महाराजांच्या अस्पृश्य उध्दाराच्या कार्याविषयी मोठ्या कृतज्ञतेने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उद्गार काढले की, शाहू महाराजांसारखा सखा अस्पृश्यांना पूर्वी लाभला नव्हता व पुढे लाभेल की, नाही याबद्दल आम्हाला शंका आहे.

उपसंहार :

'बोले तैसा चाले' अशी त्यांची दलित व अस्पृश्य यांचे प्रश्न सोडविण्याचे बाबतीत मुलगामी विचारसरणी होती. दलित समाजाला, अस्पृश्य माणसाला माणूस म्हणून माणसाप्रमाणे वागविण्याचे शाहू महाराजांचे कार्य चिरंतर व ऐतिहासिक स्वरूपाचे आहे असे दिसून येते.

शाहू महाराजांनी आजपासून १२० वर्षापूर्वी २६ जुलै १९०२ रोजी आपल्या संस्थानास दलित आणि मागासवर्गीयांकरीता ५० टक्के जागा राखीव ठेवून सामाजिक आंदोलनाची सुरूवात केली. राजर्षी शाहू महाराजांची प्रेरणा संपूर्ण समाजाला सामाजिक न्यायाच्या या चळवळीला गतिमान करण्याची ताकद देत राहील. शाहू महाराजांच्या सामाजिक कार्यामुळे जातीभेद व द्वेषाचे निर्मुलन होवू लागले. अंधश्रध्देला तडा जावू लागला. जाती जातीतील दरी व दुरी कमी झाली. समाज परिवर्तनाची चक्रे जलद गतीने फिरू लागली असे दिसून येते. शाहू महाराजांनी राज्यात न्याय, समता, स्वातंत्र्य व बंधुत्वाची पेरणी केली. 'घडला न भुतो न घडे भविष्य ते राजा ऐसे.'

संदर्भ साधने :

१) डॉ. जयसिंगराव पवार (संपा.), राजर्षी शाहू छत्रपतींचे जाहीरनामे व हुकूमनामे, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, दितीयावृत्ती, मार्च २०१८

२) डॉ. जयसिंगराव पवार, राजर्षी शाहू छत्रपती : पत्रव्यवहार आणि कायदे मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, दितीयावृत्ती, मार्च २०१८

३) धनंजय कीर, राजर्षी शाहू छत्रपती – एक सामाजिक क्रांतिकारक राजा, पहिली आवृत्ती, मुंबई १९७९.

४) डॉ. रमेश जाधव, लोकराजा शाहू छत्रपती पहिली आवृत्ती, पुणे १९९७.

५) शामराव पाटील, (संपा.), भास्कर धाटावकर, राजर्षी शाहू छत्रपतींचे आदेश, भाग–१, मुंबई १९८८.

६) करवीर सरकारचे गॅझेट, कोल्हापूर पुराभिलेखागार, कोल्हापूर.

७) करवीर रियासत, स. मा. गर्गे, तिसरी आवृत्ती, कोल्हापूर २००३.

८) इंद्रजित वसंतराव सावंत, डॉ. देविकारणी शिवाजीराव पाटील. राजर्षी शाहू छत्रपती : रयतेच्या राजाचे चित्रमय चरित्र, पाचवी आवृत्ती सप्टेंबर २०१८ कोल्हापूर

९) प्रा. कपिल राजहंस (संपा), राजर्षी शाहूंना समजून घेताना.... संवाद प्रकाशन कोल्हापूर, प्रथमावृत्ती २६ जानेवारी २०२०.

१०) सिध्दार्थ कांबळे, माणगांव परिषदेची शंभरी आणि आजचं सामाजिक वास्तव, संवाद प्रकाशन कोल्हापूर, प्रथमावृत्ती २६ जून २०२०.

११) Chatrapati Shahu - The Pillar of Social Democracy (Ed) P. B. Salunkhe, Kolhapur 1994

१२) Rajashri Shahu Chatrapati Paper Vol. III (Ed) Dr. Vilas Sangave and Dr. B. D. Khane, Shivaji University, Kolhapur.

■■■

ISSN No. 2394-5990

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे शैक्षणिक विचार

डॉ. बाळासाहेब मुळीक
सहाय्यक प्राध्यापक, तत्त्वज्ञान विभाग,
शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज
मो.नं. ९८२२४४२१८५
Email: balasaheb.mulik1969@gmail.com

प्रस्तावना :

भारतामध्ये इंग्रज व्यापाऱ्यांच्या वेषात आले तेव्हा ते केवळ व्यापारासाठीच आले असे वाटले. परंतु ईस्ट इंडिया कंपनीने साम्राज्यवादी संघर्ष करून आपले प्रभूत्व निर्माण केले. त्यावेळी इंग्रज आणि मराठा यांच्यात तीन युद्धे झाली. परंतु इंग्रजांविरूद्ध आघाडी निर्माण करण्यास आपणास अपयश आले. अर्थातच मराठेशाहीची विनाशाकडे वाटचाल सुरू झाली. तद्वतच दूर असणाऱ्या भागांवर मध्यवर्ती सत्ता नियंत्रण ठेवू शकत नसल्याने संस्थाने उदयास आली. सर्व संस्थानांना अंतर्गत कारभारात स्वातंत्र्य देताना आपल्या सरकारच्या हितसंबंधांना बाधा येणार नाही याची खबरदारी ब्रिटीश सरकारने घेतली. सातारा, हैद्राबाद आदी संस्थानात राजकीय, प्रशासकीय सुधारणा घडून आल्या. या संदर्भात समाजानेही मोठे कार्य आणि सहकार्य केले. महाराष्ट्रातील आद्य सुधारक चळवळी, महिला चळवळ, शैक्षणिक चळवळ आदी चळवळींनी प्रबोधनाच्या कार्याला मोठा हातभार लावला आहे. सांस्कृतिक पुनर्रउत्थानात संगीत, नाटक, चित्रकला, काव्य, साहित्य आणि संशोधन विकास या क्षेत्राचा भारताच्या प्रगतीमध्ये मोठा वाटा आहे. त्याच अनुषंगाने शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टीने व्यापक असे कार्य केलेले आहे.

राजघराण्याचा वारसा असणाऱ्या जयसिंगराव ऊर्फ आबासाहेब व राधाबाई या दांपत्यास २६ जून १८७४ रोजी कोल्हापूर मुक्कामी पुत्रप्राप्ती झाली. या पुत्राचे नाव 'यशवंतराव' असे ठेवले गेले. छत्रपत्रींच्या गादीवर सर्वात जवळचे वारसदार म्हणून ब्रिटीशांच्या संमतीने आबासाहेबांचे ज्येष्ठ पुत्र यशवंतराव यांची निवड केली. चौथ्या शिवाजी महाराजांच्या राणी आनंदीबाई यांनी १७ मार्च १८८४ रोजी यशवंतरावांना विधिवत दत्तक घेतले. त्याच वेळी कागलच्या घाटगे घराण्यातील यशवंतराव कोल्हापूरच्या गादीवर शाहू छत्रपती म्हणून आरूढ झाले.

राजर्षी शाहू महाराज एक क्रियाशील पंडीत होते. ते 'प्रगतीप्रिय राजे' असल्यामुळे त्यांना शिक्षणाच्या माध्यमातून सर्व जातीधर्मियांची प्रगती पाहायची होती. त्या अनुषंगाने लोकविकासासाठी गावोगावी शिक्षण पोहोचले पाहिजे. लोकांना शिक्षण आणि उद्योग देणे एवढेच नव्हे तर त्यांची सर्व क्षेत्रात उन्नती व्हावी आणि त्यासाठी राजाने प्रगतीशील रहावे नव्हे तर ते त्याचे कर्तव्यच असते असे शाहू महाराजांना वाटे म्हणून राजर्षी शाहू महाराजांनी अंत्यजापासून ते वंजाऱ्यापर्यंत सर्वांच्या शिक्षणाची सोय केली. त्याचप्रमाणे शिक्षणातून लोकांच्या हक्कांची जाणीव करून दिली. यामध्ये महात्मा जोतीराव फुले यांनी जी ज्ञानज्योत लावली त्या ज्योतीने ज्योत लावण्याचे पवित्र काम राजर्षी शाहू महाराजांनी केले.

शैक्षणिक कार्य करणारा दूरदृष्टीचा महापुरूष म्हणून राजर्षी शाहू छत्रपती महाराजांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते. ज्या समाजात शिक्षणाला फारसा वारसा नव्हता आणि भारतामध्ये परंपरांनी ज्या लोकांना शिक्षणाचा हक्क नाकारला होता अशा लोकांच्या शिक्षणासाठी शाहू छत्रपती महाराज काम करीत राहिले. खऱ्या अर्थाने कोल्हापूर हे त्याकाळी विद्येचे माहेरघरच होते. ब्राह्मणेतरांच्या शिक्षित झालेल्या अनेक नेत्यांनी कोल्हापूरात शिक्षण घेतल्याने महाराष्ट्राच्या सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक जडणघडणीमध्ये कोल्हापूरचे मोठे योगदान आहे. भारत देश स्वतंत्र झाल्यानंतर प्रजासत्ताकाची घटना १९५० साली अंमलात आली. घटनेच्या ४५ व्या कलमान्वये असा आदेश दिला आहे की, सर्व मुला-मुलींना चौदा वर्षे वयापर्यंत मोफत शिक्षण द्यावे परंतु शाहू महाराजांनी त्यांच्या राज्यात १९१७ साली सक्तीच्या शिक्षणाचा तर १९०२ साली राखीव जागासंबंधी कायदा केला होता. हा एक क्रांतीकारी निर्णय मानला जातो की, ज्या निर्णयामुळे आजची समाजव्यवस्था त्याच विचारावर आपले अस्तित्व निर्माण करू पाहत आहे.

परंपरेने विशिष्ट जाती व धर्मातील लोक ज्ञान फक्त आम्हीच घ्यावे, त्या ज्ञानाच्या सर्व चाव्या आमच्याकडे कशा राहतील याची व्यवस्था केलेली होती. पण राजर्षी शाहू महाराजांनी या व्यवस्थेला छेद देत प्रत्येक जाती धर्माच्या हाती ज्ञानाच्या चाव्या सोपविल्या. त्यामुळे झोपडीपर्यंत आणि गरिबांपर्यंत

शिक्षणाची गंगा पोहचून त्यांच्यात असामान्य सामर्थ्य जागृत झाले. त्याच ज्ञानाची सूर्यकिरणे चंद्रमौळी घरापर्यंत येऊन पोहोचली. त्यामुळे समानता, एकता आणि मानवता या तत्त्वत्रयींच्या आधाराने समाज मंदीर उभे केले. स्वामी विवेकानंदांनी म्हटल्याप्रमाणेङ्घबहूजन समाजाला शिक्षण दिल्याशिवाय व त्या समाजाची काळजी घेतल्याशिवाय राजकारण फलद्रूप होणार नाहीफ्याच हेतूने राजर्षी शाहू महाराजांनी स्वामी विवेकानंदांचे तत्त्व तंतोतंत आचरणात आणून दाखविले.

राजर्षी शाहू महाराजांचे शिक्षण कार्य :

१) बहूजन समाजामध्ये ज्ञानप्राप्तीची जाणीव निर्माण करणे,
२) सामाजिक उच्चनीचतेची भावना बोथट करणे,
३) समाजोद्धारासाठी शाळा आणि वसतीगृहे काढणे या पायावर आधारलेले आहे.

राजर्षी शाहू महाराजांनी अ) – १) प्राथमिक शिक्षण, २) दुय्यम आणि उच्च शिक्षण, ३) पुरोहित शाळा, ४) युवराज शाळा, ५) पाटील शाळा, ६) उद्योग शाळा, ७) संस्कृत शाळा, ८) सत्यशोधक शाळा, ९) सैनिक शाळा, १०) बालवीर शाळा, ११) डोंबारी मुलांची शाळा, १२) कला शाळा

ब) वसतीगृहांची स्थापना – १) कोल्हापूर – विद्यार्थी वसतिगृहांची माता, २) शिक्षणासाठी जातवार वसतिगृहे

वसतिगृहे – १) व्हिक्टोरिया मराठा बोर्डींग हाऊस, २) दिगंबर जैन बोर्डींग, ३) वीरशैव लिंगायत विद्यार्थी वसतिगृह, ४) मुस्लीम बोर्डींग, ५) मिस क्लार्क होस्टेल, ६) दैवेज्ञ शिक्षण समाज बोर्डींग, ७) श्री नामदेव बोर्डींग, ८) पांचाळ ब्राह्मण वसतिगृह, ९) श्रीमती सरस्वतीबाई गौड सारस्वत ब्राह्मण विद्यार्थी वसतिगृह, १०) इंडियन ख्रिश्चन होस्टेल, ११) रावबहादूर रघुनाथ व्यंकाजी सबनीस चंद्रसेनीय कायस्थ प्रभू विद्यार्थी वसतिगृह, १२) आर्य समाज गुरुकूल, १३) वैश्य बोर्डींग, १४) ढोर–चांभार बोर्डींग, १५) शिवाजी वैदिक विद्यालय वसतिगृह, १६) श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डींग हाऊस, १७) इंडियन ख्रिश्चन होस्टेल, १८) नाभिक विद्यार्थी वसतिगृह, १९)सोमवंशीय आर्यक्षत्रिय बोर्डींग, २०) श्री देवांग बोर्डींग, २१) उदाजी मराठा वसतिगृह, २२) श्री छत्रपती करवीर चौथे शिवाजी मराठा बोर्डींग, २३) वंजारी समाज वसतिगृह, २४) श्री शाहू छत्रपती बोर्डींग, २५) चोखामेळा वसतिगृह, २६) छत्रपती ताराबाई मराठा बोर्डींग ची स्थापना करून राजर्षी शाहू महाराजांनी माणसाला माणुसकीचे आणि स्वातंत्र्याचे समान हक्क देण्यासाठी आर्थिक आणि त्याचबरोबर मानसिक स्तरावर जीवनभर कार्य केले.

राजर्षी शाहू महाराजांची दृष्टी काळाच्या पुढे पाहणारी होती. त्यामुळे समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षणाशिवाय दुसरा अन्य पर्याय नाही हे त्यांनी अचूकपणे जाणले. त्यामधूनच शिक्षण हे सर्वसामान्यांपर्यंत पोहचण्याचे धोरण आखण्यात आले. यामध्ये शाहू महाराजांना सर्वप्रथम मानसिक गुलामी दूर करावयाची होती. लोकांना ज्ञानी बनण्यासाठी तसेच त्यांच्या अंधश्रद्धा नाहीशा होण्यासाठी शिक्षण महत्त्वाचे आहे हे त्यांनी जाणले. माणसाचे जीवन सुरू झाले की शिक्षणही सुरू होते. शिक्षण ही प्रक्रिया नदीच्या वाहत्या पाण्यासारखी असते. माणसाच्या जीवनाचा शिक्षणाशी अतूट असा संबंध असतो. शिक्षणातून स्वातंत्र्य, समता, न्याय, प्रतिष्ठा आणि बंधूभाव ही सामाजिक मूल्ये समजू शकतो व नंतरच्या पिढीकडे आपण सोपवू आणि रुजवू शकतो. आर्थिक, सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी सर्व समाजाला शिक्षणच द्यावे लागते हे राजर्षी शाहू महाराज यांनी ओळखले होते. म्हणूनच प्राथमिक शाळेपासून वसतिगृहाच्या उभारणीसाठी त्यांनी प्रयत्न केले.

राजर्षी शाहू महाराजांच्या आधी महाराष्ट्रामध्ये शिक्षण प्रसाराचे काम जगन्नाथ शंकरशेठ, आचार्य बाळकृष्ण जांभेकर, दादोबा पांडुरंग तर्खडकर, गोपाळ हरि देशमुख ऊर्फ लोकहितवादी, डॉ. भाऊ दाजी लाड व महात्मा जोतीराव फुले या समाजसुधारकांनी काही प्रमाणात केले. पैकी महात्मा फुले यांचे शिक्षणविषयक विचार त्यामध्ये मौलिक आहेत. त्याच आधारे राजर्षी शाहू महाराज यांनी शिक्षणविषयक चळवळ खऱ्या अर्थाने अंमलात आणली व लोकांना शिक्षण देण्याचे महनीय काम केले. महात्मा जोतीराव फुले म्हणत ङ्गपोटात भुकेचा डोंब उसळला की भाकरीची किंमत कळते, तसे गरिबीचे चटके बसले की शिक्षणाची किंमत कळते.फ्यांना ज्यांना इच्छा असेल त्यांना त्यांना शिक्षण मिळाले पाहिजे. कारण शिक्षणातून समाजजागृती होते. तसेच समाजशिक्षणातून समाजपरिवर्तनही हे चोहो बाजूंनी होते. या जगामध्ये विद्येचा अधिकार माणसांना आहे तो त्यांना मिळाला पाहिजे यावर शाहू महाराजांचा प्रचंड विश्वास होता.

नवा समाज निर्माण व्हायचा असेल तर प्रत्येकास शिक्षण मिळाले पाहिजे ही समतावादी भूमिका शाहू महाराजांनी स्वीकारली होती. ते सतत असे म्हणत की, शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही. अमेरिकेतील टस्केनी संस्थेचे संचालक बुकर टी. वॉशिंग्टन यांनी शिक्षणाच्या माध्यमातून आर्थिक उन्नती साधण्याचे जे एक ऐतिहासिक कार्य केले तसेच कार्य शाहू महाराजांनी आपल्या राज्यात केले. खऱ्या अर्थाने राजर्षी शाहू आपल्या महाराष्ट्राचे ङ्गबुकर टी. वॉशिंग्टनफ्होते. राजर्षी शाहू

ISSN No. 2394-5990

महाराज शिक्षण हे मानवी गुंतवणूक आहे असे मानत असत. शिक्षणामुळे लिहिता-वाचता येणे, लिहिलेले समजणे, समजलेले आचरणात आणणे आणि आचरणात आणताना ते का आचरणात आणावे अशा ठाम विचार प्रक्रियेला खरे शिक्षण म्हणता येईल यावर त्यांचा दृढ विश्वास होता. त्यामुळेच ते असे म्हणत की, शिक्षणामुळे माणसांची मने बदलत असतात. भारतीय समाजरचना बदलायची असेल तर त्यासाठी शिक्षण हे एकमेव साधन आहे. शिक्षण या साधनाने माणसाच्या मनामध्ये आत्मविश्वास जागा होतो तसेच त्याची पात्रता वाढते. मानवी ध्येयप्राप्तीसाठी प्रथम पात्रता असावी मगच त्या गोष्टीची इच्छा व्यक्त करावी असे ते म्हणत असत. शिक्षणाने समतेवर आधारलेली नवीन समाजरचना निर्माण करता येईल. त्यातूनच राज्याच्या हिताच्या दृष्टीकोनातून ध्येय-धोरणे ठरविता येतील आणि जातिबांधवांच्या हाती राज्याची सूत्रे सुरक्षित राहतील असे शाहू महाराजांना वाटे.

राजर्षी शाहू महाराजांनी प्राथमिक आणि सक्तीच्या मोफत शिक्षणावर भर देऊन सर्व जातीधर्मासाठी शिक्षण सुरू केले. त्यामुळे शाहू महाराजांच्या काळातच विद्येच्या मक्तेदारीला मूठमाती मिळाली. समाज उन्नतीप्रित्यर्थ शिक्षण मिळू लागले. शेकडो वर्षांपासून गोरगरिबांची अविद्येमुळे चाललेली गळचेपी थांबली. आपल्या राज्याचाङ्घशूद्रफ्हा आधारस्तंभ ठरला. या शुद्रांसाठी राजर्षी शाहूंनीङ्घगाव तेथे शाळाफ्काढून लोकांची अस्मिता जागृत केली. स्वदेश, स्वधर्म आणि स्वभाषा याविषयी लोकांच्या मनात प्रेम निर्माण केले.

राजर्षी शाहू महाराजांनी स्त्रियांच्या मानसिक विकासासाठीही शिक्षण आवश्यक आहे असे म्हटले. राजर्षी शाहूंनी अस्पृश्यांच्या शिक्षणापासून स्त्रीशिक्षणापर्यंत शिक्षणाविषयी निश्चित धोरण आखले. शाहू महाराजांविषयी त्यांचे गुरू एस. एम. फ्रेझर म्हणतात, शाहू महाराजांचा जीवित कार्याचा गाभा म्हणजे त्यांच्या हृदयात असलेली मानवतावादी विशाल दृष्टी तसेच कोणाचीही भीड मुर्वत न ठेवणारी, दडपणाने दबली न जाणारी विलक्षण साहसी वृत्ती या दोन्हीचा संगम आहे. त्याकाळी स्त्रियांनी शिक्षण घेणे पाप समजले जाई परंतु धाडसाने स्त्री शिक्षणाचे कार्य करणारे शाहू महाराज स्त्री शिक्षणासाठी उत्तेजन देत राहिले.

राजर्षी शाहू महाराजांच्या विचारांमध्ये १) शिक्षणसंस्थांची निर्मिती करणे, २) विविध जातिधर्माच्या विद्यार्थ्यांसाठी वसति गृहाची सोय करणे, ३) सामान्य माणसामध्ये ज्ञानाची लालसा निर्माण करणे, ४) शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या, पारितोषिके व नादाऱ्या देणे, प्राथमिक शिक्षणाच्या आधाराने शिक्षणप्रसार होईल व शिक्षणासाठी गरीब, दलित, सर्व ब्राम्हणेतर वर्ग शिक्षण घेण्यास तयार होईल. या चार शिक्षणविषयक घटकांमुळे शिक्षण सर्वांपर्यंत पोहोचेल असे त्यांना वाटे. म्हणून त्यांच्या शिक्षणविषयक आंदोलनाचे हे चार आधार होते.

आधुनिक भारताच्या जडणघडणीमध्ये समाजसुधारकांचे योगदान महत्त्वाचे आहे. समाजसुधारकांच्या मांदियाळीमध्ये सर्वांनी शिक्षणावर अधिक भर दिला. ज्ञानी माणसेच देशाचे भविष्य उज्ज्वल करतील म्हणून प्रथम ज्ञानाचा अंधकार नाहीसा करावा लागेल हे सर्वांनाच उमगले. महाराष्ट्रामध्ये म. फुले, राजर्षी शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची समाजोद्धारासाठी असलेली तळमळ ही आजही आपणास ऊर्जा आणि प्रेरणा देत असते. त्या प्रेरणेतून महाराष्ट्र व संपूर्ण भारतात शिक्षणविषयक चळवळ उभी राहिली आहे. आपल्या महाराष्ट्रात कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. पंजाबराव देशमुख, कर्मवीर मामासाहेब जगदाळे, डॉ. बापूजी साळुंखे, श्री. भाऊसाहेब हिरे, बॅ. बाळासाहेब खर्डेकर, कर्मवीर डॉ. घोगरे, सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील, बाळासाहेब विखे-पाटील, तात्यासाहेब कोरे, बाबूराव जगताप यासारख्या शिक्षणप्रेमी माणसांनी शिक्षणप्रसाराच्या कामात निस्वार्थीपणे रस घेतला म्हणूनच आज शिक्षण सर्वांपर्यंत पोहोचल्याचे दिसत आहे. या शिक्षण प्रसारकांनी संपूर्ण महाराष्ट्रात बहूजन समाजाला समर्थ बनविणारी शिक्षण चळवळ चालविली. त्यातून समाजाची एक प्रागतिक सामाजिक मानसिकता तयार झाली. या सर्व प्रगतीची मुळे म. फुले व राजर्षी शाहू महाराज यांच्या विचारात व कृतीत आहेच हे विसरून चालणार नाही. आजच्या महाराष्ट्राच्या प्रगतीचे प्रत्येक पाऊल म. फुले, राजर्षी शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने पडत आहे म्हणूनच देशपातळीवर महाराष्ट्राची ओळख या समाजसुधारकामुळे वेगळी आहे. त्यांच्या विचारांना प्रमाण मानून महाराष्ट्र प्रगती करीत आहे.

संदर्भ ग्रंथ :

१) डॉ. जयसिंगराव पवार, राजर्षी शाहू छत्रपती, जीवन व कार्य, तारांराणी बुक सर्व्हीस, कोल्हापूर-४१६०११.

२) प्राचार्य रा. तु. भगत, राजर्षी शाहू छत्रपती, जीवन व शिक्षणकार्य, रिया पब्लिकेशन्स, कोल्हापूर-४१६००१.

३) कॉ. गोविंद पानसरे, राजर्षी शाहू वसा आणि वारसा, कॉ. प्रशांत आंबी, भारती मुद्रणालय, कोल्हापूर.

■■■

अस्पृश्योउद्धारक राजर्षी छत्रपती शाहू महाराज

प्रा.डॉ. जनार्दन दामू परकाळे
मराठी विभाग
शंकराव मोहिते महाविद्यालय अकलूज
मो. नं. ९८९०२२००१२

महाराष्ट्राच्या समाज सुधारणेच्या चळवळीमध्ये अनेक महापुरुषांची नावे घेतल्याशिवाय समाज सुधारणेचा इतिहास पूर्ण होत नाही. अगदी प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंत अनेक महापुरुषांची नावे सांगता येतील. गौतम बुद्ध, चार्वाक, मध्ययुगीन काळातील संत परंपरेमध्ये संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ, संत तुकाराम तर आधुनिक कालखंडामध्ये संत गाडगे महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तसेच राजर्षी शाहू महाराज या महापुरुषांचे नावे आवर्जून घ्यावे लागतात. हे समाज सुधारक म्हणजे महाराष्ट्राच्या अस्मितेचे प्रतीक आहे. इथल्या मातीच्या कणाकणात महापुरुषांच्या कार्याचा सुगंध दरवळत आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्य असेल व शाहू फुले आंबेडकरांचा स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि सामाजिक न्याय या भावनेने सामाजिक परिवर्तन या महाराष्ट्रात केल्याचे दिसून येते. छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांनी महात्मा फुले यांच्या कार्याचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून आपल्या करवीर नगरीमध्ये सामाजिक सुधारणेला व शैक्षणिक सुधारणेला खऱ्या अर्थाने सुरुवात करणारा पहिला करवीर नगरीतील राजा होय. आज संपूर्ण देशातील बहुजन दलित जनता ही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्यकर्तृत्वाला दैवत मानून या सामाजिक अभिसरणाच्या चळवळीमध्ये महात्मा फुले व शाहू महाराज यांना गुरुस्थानी मानले आहे. अशा गुरुस्थानी असणाऱ्या छत्रपती शाहू महाराज यांच्या कार्यातून अस्पृश्योद्धार कशा पद्धतीने झाला आहे हे या शोधनिबंधाच्या माध्यमातून मांडणार आहे

राजर्षी शाहू महाराज यांचा जन्मदिवस हा २६ जुलै असून महाराष्ट्र शासनाने सन २००६ पासून मसामाजिक न्याय दिनफ म्हणून साजरा करण्याचे ठरविले. आज राजर्षी शाहू महाराज यांचा जन्मदिवस सामाजिक न्याय म्हणून साजरा करीत असताना निश्चितच त्यांनी केलेल्या समाज सुधारणेच्या कार्यकर्तृत्वाची निश्चितच आठवण झाल्याशिवाय राहत नाही. त्यांनी आपल्या जाहीरनाम्यात स्पष्टपणाने उल्लेख केला आहे.ते म्हणतात, मआपणाला मिळालेले राज्य हा अधिकार हा राजवैभव व राजविलास उपभोगण्यासाठी नसून तो रंजल्या गांजल्या प्रजेसाठी विशेषता गोरगरीब, अज्ञानी जनतेच्या उद्धारासाठी असल्याचे स्पष्ट मत नोंदविले आहे. याच विचारधारेतून करवीर नगरीमध्ये समाज उद्धाराचे महत्त्वाचे कार्य राजर्षी शाहू महाराज यांनी केल्याचे दिसून येते

राजर्षी शाहू राजांच्या वेदोक्त प्रकरणांची निश्चितच आठवण झाल्याशिवाय राहत नाही. कोल्हापूर नगरीतील ब्राह्मण वर्ग शाहू महाराजांना शूद्र लेखले होते. त्यांचे क्षत्रियत्व नाकारून त्यांना शूद्रपणाची वागणूक कशी दिली जात होती याची नोंद कोल्हापुरात १८९९ सालातील वेदोक्त प्रकरणाची घटना होय. या वेदोक्त प्रकरणातून छत्रपती शाहू महाराजांनी बोध घेतला इथला ब्राह्मण वर्ग राजाशी जर असे वागत असतील तर अस्पृश्य समाजातील गोरगरीब जनतेशी किती हीनतेने वागत असतील याचा विचार केला. राजाने हा वैयक्तिक अपमान समजून हा समाजाचा अपमान आहे असे समजून त्यांनी या प्रकरणात ब्राह्मण पुरोहित वर्गाला दोषी ठरवले. समाज उद्धाराचे कार्य करीत असताना त्यांनी पहिला निर्णय घेतला कुलकर्णी व महार हे वतन रद्द करून तलाठी हे महसूल खात्यातील महत्त्वाचे पद तयार केले. यातून खऱ्या अर्थाने छत्रपती शाहू महाराज हे महात्मा फुले यांच्या सत्यशोधक समाजाच्या विचाराचे असल्याचे दिसून येते. यातून त्यांनी अस्पृश्य उद्धाराचे कार्य करण्यात सुरुवात केली.

छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांनी आपल्या करवीर नगरीतील बहुजन समाजातील महार, मांग, चांभार, ढोर व अन्य मागासवर्गीय समाजासाठी यातून ब्राह्मण, प्रभू, शेणवी, पारशी या जाती वगळून सर्व बहुजन समाजातील जातींना व जमातींना संस्थानातील नोकऱ्यांमध्ये ५० टक्के आरक्षणाचा लाभ १९०२ मध्ये देऊन अस्पृश्योद्धाराचे कार्य केले. त्याचबरोबर कोल्हापूर आणि परिसरातील अस्पृश्य समाजासाठी पाच रात्र शाळा सुरू केल्या. महात्मा फुलेंच्या शैक्षणिक कार्याची विचारधारा शाहू महाराजांनी पुढे चालू ठेवण्याचे या कार्यातून दिसून येते.

ISSN No. 2394-5990

मागासवर्गीय विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणात संधी मिळावी यासाठी त्यांनी १९०८ व १९११ मध्ये 'सत्यशोधक समाजाच्या स्थापना' करून त्यांच्यासाठी मिस क्लार्क वस्तीग्रह सुरू केले. त्या सर्वांना मोफत शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून दिली. एक कृतीशील राजा म्हणून त्यांच्या कार्याचा गुणगौरव सांगितला जातो. ते अस्पृश्योद्धारासाठी कायम आग्रही भूमिका मांडत असतात. ते नेहमी रोटी आणि बेटी व्यवहाराला प्राधान्य देत असत. त्यांनी स्वतःच्या घरापासून या कार्याला सुरुवात केली. आपली चुलत बहीण इंदूरच्या यशवंतराव होळकर या धनगर समाजातील मुलाशी देऊन विवाह लावून दिला. त्याचबरोबर कोल्हापुरातील महार समाजातील गंगाराम कांबळे या अस्पृश्य व्यक्तीला चहाचे दुकान उघडून दिले. त्या चहाच्या हॉटेलमध्ये दररोज आपल्या लवा जम्यासह ते चहा पिण्यासाठी जात असत. त्यांचे सोबत ब्राह्मणवादी विचाराचे लोकही चहा पीत असत. त्यामुळे अप्रत्यक्ष अस्पृश्य व्यक्तीच्या दुकानात ब्राह्मण चहा पिल्यानंतर एक समाजासमोर अस्पृश्य उद्धाराचे कार्य शाहू महाराजांनी ठेवले होते. त्याचबरोबर भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. भीमराव आंबेडकर यांना परदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्तीच्या रूपाने मदत करणारा पहिला राजा म्हणून त्यांची ओळख अस्पृश्योद्धारच्या यादीत घ्यावै लागेल.

अस्पृश्य वातावरणामुळे समाजाची प्रगती होत नाही हे छत्रपती शाहू महाराजांनी वेळेत ओळखले होते. त्यांनी वर्णव्यवस्थेच्या विरुद्ध लढा द्यायचा असेल तर शिक्षण हेच महत्त्वाचे आहे. असे हे शिक्षण मागासवर्गीय समाजातील मुलांना देणे गरजेचे आहे. त्यातून अस्पृश्य लोकांचा उद्धार झाल्याशिवाय राहणार नाही. हा विचार शाहू महाराजांनी वेळीच ओळखला होता. त्यामुळे त्यांनी अस्पृश्य उद्धारासाठी शिक्षणाच्या अनेक संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. शिक्षणाच्या माध्यमातून समाजाची उन्नती होते, दिनदुबळ्या लोकांचे सशक्तिकरण होऊ शकते ही पक्की धारणा राजर्षी शाहू महाराजांचे होती. खामगाव येथील शिक्षण परिषदेत बोलताना ते म्हणाले की, मशिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती नाही असे इतिहास सांगतो.फ छत्रपती शाहू महाराज हे केवळ बोलके सुधारक नव्हते तर ते कर्ते सुधारक होते. म्हणून त्यांनी आपल्या संस्थानांमध्ये तो १९१७ पासून मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा कायदा केला . संस्थानांमध्ये १९० शाळा स्थापन केल्या,व १९२२मध्ये ५९० शाळा स्थापन केल्या. असा हा शिक्षण उद्धाराबरोबरच अस्पृश्य उद्धाराचे कार्य निष्ठेने करणारा हा राजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज होय. राजर्षी शाहू महाराज यांनी २४ नोव्हेंबर १९११ रोजी आपल्या संस्थानांमध्ये आदेश काढला तो म्हणजे सर्व अस्पृश्य वर्गास सर्व प्रकारचे शिक्षण मोफत करण्यात यावे आणि अस्पृश्य वर्गातील हुशार विद्यार्थ्यांना दरबारा कडून वेळोवेळी खास शिष्यवृत्ती देण्यात याव्यात. या आदेशान्वये अस्पृश्य लोकांची दैना अवस्था संपवण्यासाठी महाराजांचे फार मोठे योगदान असल्याचे दिसून येते. शिवाय राजर्षी शाहू महाराजांनी अस्पृश्यद्धाराच्या कार्यालयात तलाठी सारख्या महत्त्वाच्या महसुलीपदावर अस्पृश्य समाजातील मुलांना नेमणुका देण्याचे महत्त्वाचे कार्य केले. या समाज परिवर्तनासाठी वर्ण व्यवस्थेची चिकित्सा केली. समानतेचा तत्वांचा विचार मांडला ,विधवा पुनर्विवाहाला मान्यता दिली. पडदा पद्धती बंद केली, त्याचबरोबर शेतकरी हिताचे निर्णय मोठ्या प्रमाणात घेतल्याचे दिसून येते असे राजर्षी श१हू महाराज यांचे कार्य आज महाराष्ट्रासाठी आदर्शवत म्हणून उभे आहेत.

राजर्षी शाहू महाराज यांनी अस्पृश्यमुक्तीचा पहिला आदेश २७ जुलै १९१८ ला मंजूर करून कोल्हापूर गॅझेट मध्ये ३ ऑगस्ट १९१८ रोजी प्रसिद्ध केला. अस्पृश्यावर लादलेली अमानुष अशी हजेरीची प्रथा बंद करण्यात आले. अस्पृश्यतेचा कायदेशीर उच्चाटन करणे हेच एक अस्पृश्यद्धाराचे कार्य छत्रपती शाहू महाराजांचे होते. त्यांनी वेळोवेळी अनेक वटहुकूम जाहीर करून जाहीरनामे प्रसिद्ध केले. हे कृतिशील समाज सुधारक असल्याकारणाने त्यांनी अस्पृश्यांना खाजगी सेवेत व सरकारी सेवेत अस्पृश्यांना नोकरीवर सामावून घेतले. त्यामुळे अस्पृश्य उद्धाराचे महत्त्वाची भूमिका राजर्षी शाहू महाराजांनी पूर्ण केली.सन १९१७ मध्ये तर त्यांनी लष्करी फडात चार अस्पृश्य व्यक्तींची नेमणूक करून सरकारी सेवेत सामावून घेतले.. शाहू महाराजांच्या कारकिर्दीमध्ये भंगी समाजातील व्यक्तींना नगरपालिकेमध्ये प्रवेश मिळाला व त्यांना महत्त्वाचे पद देऊन गौरविण्यात आले .ते अस्पृश्य समाजातील जातिवाचक आडनावे बदलण्यासाठी कसोशीने प्रयत्न करत असतात. जेणेकरून त्या जातीवाचक आडनावावरून जातीचा कोणताही लवलेश राहता कामा नये. यासाठी ते प्रयत्न करत असतात ते मल्लांच्या कुस्ती फडामध्ये मल्लांची नावे जातिवाचक आडनावे बदलून सरदार, पंडित ,जाट अशा आडनावांचा नामोल्लेख करत असत.. भंगी, महार, चांभार, मांग या अस्पृश्य समाजातील व्यक्तींना जातीचे लेबले घट्ट चिकटली असल्याकारणाने शाहू महाराज त्यांची आडनावेच बदलण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करत असत यातून शाहू महाराजांच्या अस्पृश्यद्धाराच्या कार्याची महती कळते.

राजर्षी शाहू महाराजांच्या अस्पृश्योद्धारच्या कार्याविषयी अस्पृश्यांच्या मनात आदराचा पूज्य भाव आहे. याचे वर्णन करताना धनंजय कीर म्हणतात, मशाहूंच्या या अलौकिक प्रेमामुळे व निष्ठेमुळे त्यांना मागासवर्गीय व अस्पृश्य मानलेले वर्ग देवासमान मानत होते, गौतम बुद्ध, महात्मा फुले व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना ते जसे पूजनीय मानतात तसे शाहू महाराजांनाही ते उद्धार कर्ते व पूजनीय मानतात. राजर्षी शाहू महाराज यांनी अस्पृश्य उद्धारासाठी अनेक उपाययोजना केल्या. ते त्यांच्या अनेक कार्यातून दिसून येते. महात्मा फुले शाहू महाराज यांच्या अस्पृश्यद्धाराची धुरा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेच्या रूपाने पुढे नेल्याचे आज समाजामध्ये दिसून येते अशा या अस्पृश्योद्धारक कार्य करणाऱ्या शाहू महाराजांचा गुण गौरव निश्चितच महत्त्वाचा आहे

संदर्भ ग्रंथ

१. राजर्षी शाहू गौरव ग्रंथ:संपादक डॉ. जयसिंगराव पवार व डॉ. मंजुश्री पवार–२००१
२. राजर्षी शाहू गौरव ग्रंथ :संपादक पी . बी साळुंखे.
३. राजर्षी शाहू महाराज –धनंजय कीर–
४. छत्रपती शाहू महाराज यांची चरित्र –अण्णासाहेब लठ्ठे – २००८

■■■

ISSN No. 2394-5990

राजर्षी शाहू छत्रपती :आर्थिक धोरण नियोजक आणि अंमलबजावणीकार (प्रशासक)

सहा. प्रा. वसुंधरा दत्ताराम साळुंखे
(अर्थशास्त्र विभाग), शिक्षण महर्षी दादासाहेब लिमये महाविद्यालय,
कळंबोली, सेक्टर ३ ए सिडको कॉलनी कळंबोली,
नवी मुंबई ४१०२१८
ीरश्रींपज्ञश३६सारळश्र.लेा, चेलळश्रश छे. ९९६९८००९००

प्रस्तावना :

ज्यांच्या बद्दल मनात आदराचे स्थान आहे असे कर्तबगार व क्रांतिकारी राजर्षी शाहू महाराज यांनी त्यांच्या कार्याचा ठसा आर्थिक सामाजिक सांस्कृतिक व राजकीय या सर्व क्षेत्रांमध्ये त्यांच्या कारकिर्दीत उमटवला आहे. महाराष्ट्राला घडविणाऱ्या महापुरुषांमध्ये राजर्षी शाहू महाराजांचा गौरव होताना त्यांनी केलेल्या वटवृक्षासारख्या कामाला नजरेआड करता येत नाही, त्यांनी पुढील काळाची ओळख स्वतःच्याच काळात ओळखून त्यांनी जनतेला पुढील काळात सुखाने कसे जगता येईल यासाठी विविध आर्थिक सामाजिक सांस्कृतिक व राजकीय कार्य केली की त्यामुळे महाराष्ट्रातील माणूस सुखसंपन्नतेचे मळे पिकवत आहे. काल प्रवाहास जबरदस्त धक्का देऊन नवमहाराष्ट्र जडणघडणीत या महापुरुषाचे कार्य गौरवास्पद असून ; सिंहाचा वाटा आहे स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आपण भारताचा आर्थिक विकास व्हावा म्हणून जी आर्थिक धोरणे राबवत आहे, त्या धोरणाचे मूळ किंवा धोरणे राजर्षी शाहू महाराजांनी त्यांच्या संस्थानाच्या राज्यकारभारात राबवलेली होती. देशाला स्वातंत्र्य मिळवून ७५ वर्षे आर्थिक विकासासाठी नियोजन आयोग स्थापना (१९५०) पंचवार्षिक योजना हाती घेऊन आर्थिक विकास प्राप्तीसाठी आपण जे आज प्रयत्न करत आहोत त्या सर्व प्रयत्नामध्ये किंवा धोरणांमध्ये आपण जर पाहिले तर त्यांच्या आर्थिक धोरणाची पुनरावृत्ती झाल्याचे आपणास दिसून येते. आपण मानव विकास, शाश्वत विकास या अलीकडच्या काळात जागतिक पातळीपासून ते स्थानिक पातळीपर्यंत प्राप्त करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्टा करत आहोत, मात्र राजर्षी शाहू महाराजांनी हे त्यांच्या राज्यकारभारात तेव्हाच अमलात आणले होते, त्यांनी त्यांचा राजकारभार हा खरा कर्मयोगी आणि राष्ट्र उद्धारक राजा म्हणून केलाच पण त्याचबरोबर ते लोकशाहीचे आद्य प्रवर्तक, समाज क्रांतिकारक राजा, इतिहास घडविणारा लोकराज्य, भटक्या विमुक्त समाजाचा उद्धारक राजा, लोकाभिमुख प्रशासक, शिक्षण क्रांतीचे प्रेषित, व आर्थिक नियोजन कार म्हणून त्यांच्याकडे आदराने पाहिले जाते. प्रस्तुत शोधनिबंधात त्यांनी आर्थिक विकास व्हावा म्हणून जे जे नियोजन केले व धोरणे हाती घेऊन ती राबविली याची चर्चा केली आहे.

अभ्यास उद्दिष्टे :

१. राजर्षी शाहू महाराज यांनी हाती घेतलेल्या आर्थिक विकास धोरणांची चर्चा करणे.
२. राजर्षी शाहू महाराजांच्या आर्थिक धोरणामुळे झालेल्या बदलांची चर्चा करणे.

अभ्यास व्याप्ती :

छत्रपती शाहू महाराजांनी राज्यकारभार करताना हाती घेतलेल्या आर्थिक विकास धोरणाचा अभ्यास करणे

तथ्य संकलन पद्धती :

प्रस्तुत शोधनिबंधात द्वितीय तथ्य संकलन पद्धतीचा वापर केला आहे.

अभ्यास मर्यादा :

छत्रपती शाहू महाराजांच्या केवळ अशा धोरणांचा अभ्यास आहे की त्यांनी आर्थिक विकासाला महत्त्व दिले आहे इतर धोरणाचा / कार्याचा आर्थिक विकासाशी निगडित असलेल्या धोरणाचा विचार केलेला नाही.

स्पष्टीकरण :

राजर्षी शाहू महाराजांचा जन्म २६ जून १८७४ रोजी झाला ते दहा वर्षाचे होण्याअगोदर म्हणजेच १७ मार्च १८८४ रोजी ते दत्तक म्हणून कोल्हापूरच्या गादीवर विराजमान झाले २ एप्रिल १८९४ रोजी त्यांनी स्वतः राज्यकारभाराची सूत्रे हाती घेतली आणि ६ मे १९२२ रोजी त्यांचे मुंबई येथे दुःखद निधन झाले त्यांनी एकूण २८ वर्षे राज्यकारभार केला पण या त्यांच्या

राज्यकारभाराच्या अल्प कालावधीत त्यांनी महाराष्ट्रात काय देशाला सुद्धा आर्थिक विकास करण्यासाठी मूलभूत पाया उभारणी कशी असते हे एक आर्थिक नियोजनकार म्हणून त्यांनी त्यांच्या कर्तुत्वाने दाखवून दिले आहे. गरीब शेतकरी धंदेवाले उद्योजक व कारागिर यांना स्वस्त भांडवल मोफत किंवा माफक भावात जमिनी, पाणी, परिवहन सुविधा, व्यापारपेठा, व्यावसायिक शिक्षण, संयुक्त क्षेत्र व सहकारी संस्थांना प्रोत्साहन, मागासवर्गीयांना रोजगार पुरविणे, आर्थिक आणि सामाजिक मागासलेपणा कमी करणे, मोफत सामाजिक सेवा इत्यादीतून दिसून आले.

१. पायाभूत सुविधा :

राजर्षी शाहू महाराजांनी आर्थिक विकासाची प्रक्रिया गतिमान करणाऱ्या पायाभूत सोयी सुविधांच्या निर्मितीला प्रोत्साहन दिले रस्ते बांधणी आणि पाणीपुरवठा यांना अग्रक्रम दिलाच त्याचबरोबर शेती व्यापार, ग्रामीण विकास आणि औद्योगिक प्रगती या सर्वांसाठी आवश्यक परिवहनांच्या सोयी निर्माण करून दिल्या मोठी खेडी आणि शहरे कोल्हापुरास जोडली जातील अशा अनेक रस्त्यांचे पक्क्या रस्त्यात रूपांतर केले, त्यांनी ग्रामीण रस्त्यांच्या जाळ्यात विस्तार केला त्यामुळे ग्रामीण जनतेच्या प्रशासन हालचाली, शिक्षण, आरोग्य , पशुचिकित्सा, शेतकऱ्यांचा शेतमाल, शेती साठी लागणारे साहित्य , औद्योगिक उत्पादनाची ने आण यामुळे शक्य झाली. यातही त्यांनी लोहमार्ग विकासावर अधिक भर दिला, त्यांनी ८ मे १८८८ रोजी कोल्हापूर मिरज लोहमार्गाची पायाभरणी केली आणि तो १८९१ साली पूर्ण झाला, या लोहमार्गाची मालकी कोल्हापूर संस्थानाकडे होती त्यांच्या कारकिर्दीत १८५ मैल लांबीचे नवे रस्ते तयार करण्यात आले

२. शेती विकास :

देशाची ८०% आणि राजर्षी शाहू महाराजांच्या संस्थानातील १००% जनता शेतीवरच उपजीविका करत असल्यामुळे त्यांनी शेती विकासाला अग्रक्रम दिला. शेती विकास झाला तर औद्योगिक व व्यापार विकास होणार आहे हे त्यांना माहीत होते म्हणूनच त्यांनी १९०२ मध्ये इटली सारख्या शेतीप्रधान देशाला भेट दिली स्कॉटलंडच्या शेतीचे बारकाईने निरीक्षण केले. त्यांना भारतीय शेतकऱ्यांच्या कामगिरीवर व कष्टावर विश्वास होता पण भारतीय शेतकऱ्यांच्या पुढे प्रश्न होते ते म्हणजे

१. अज्ञान
२. निरक्षरता
३. स्वस्त भांडवलाची साधने हाताशी नसने
४. अल्पभूधारकता
५. शेतमाल विक्री समस्या

अशा शेतकऱ्यांसमोरील समस्या दूर करण्यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी बहुमुखी व्युव्हनीती अमलात आणली

१. शेतीसाठी व पिण्यासाठी पाण्याचा पुरवठा व्हावा यासाठी लहान व मोठ्या योजना हाती घेणे.
२. शेतकीय शिक्षणासारख्या विस्तार कार्यक्रमांना चालना देणे
३. विहीर खोदण्यासाठी तसेच शेतीला लागणाऱ्या इतर आधुनिक सेवा सुविधा खरेदी करण्यासाठी शेतकऱ्यांना बिनव्याजी किंवा अल्पव्याजी कर्ज देणे.
४. सहकारी पतसंस्था व विपणन संस्था यांना प्रोत्साहन देणे
५. वनोपज गोळा करून तिला बाजारपेठ मिळवून देणे त्यांनी शेतीचे विभाजन व तुकडीकरण होऊ नये शेती उत्पादनात घट होऊ नये म्हणून त्यांनी सन १९१३ साली शाहू महाराजांनी कायदा करून संस्थानातील सर्व इनामे अविभाज्य केली, त्यांची वाटणी करता येणार नाही असे ठरविले.

३. पाणीपुरवठा किंवा सिंचन सविधा :

महाराष्ट्रात दुष्काळ नेहमीच पडत असत १८९६-९७ आणि १८९९-१९०० या काळात कोल्हापुर संस्थानात मोठे दुष्काळ पडले तर १९१८ ते १९ या वर्षी पडलेल्या दुष्काळाची तीव्रता आधीच्या दुष्काळापेक्षा कमी होती अशा पडणाऱ्या दुष्काळावर मात म्हणजे शेतीला पाणीपुरवठा होय याचे भान ठेवून त्यांनी काही योजना अमलात आणल्या नदीपासून जवळच्या उंच टेकाडा पर्यंत पाणी पोहोचविणाऱ्या मो मोठा च्या विहिरींची भुडक्या विहिरींची साखळी त्यांनी तयार करून घेतली, साध्या विहिरी, बंधारे, नद्या, तलाव यांच्याद्वारे शेतीला पाणीपुरवठा व दुबार पीक घेणे अशी व्यवस्था निर्माण केली. सन १९१५-१६ च्या अहवालावरून असे दिसते की, नद्यापासून ३९७८३ एकर विहिरी पासून ३९८४५ एकर आणि तलावापासून २३२ एकर असे एकूण ७९,८६० एकराला पाणीपुरवठा होत होता.

भोगावती नदीवरील राधानगरी धरण बांधण्याचे काम हाती घेतले हे धरण राजाराम महाराजांच्या काळात पूर्ण झाले दूधगंगा नदीवरचा काळम्मादेवी धरणाचा विचार त्यांना पैशाअभावी सोडून द्यावा लागला परंतु आज ना उद्या हे करावेच लागेल असे त्यांचे मत होते. कोल्हापुरात आज शेती उत्पादन जास्त किंवा हरितक्रांती दिसते त्याचे प्रणेते राजर्षी शाहू महाराजच आहेत. राजर्षी शाहू महाराजांनी संस्थानात दुष्काळ निवारण्याच्या

ISSN No. 2394-5990

विविध योजना हाती घेतल्या होत्या दुष्काळात मजुरीची कामे काढणे, कर्जे देणे, गुरे पोसने, वाजवी किमतीत अन्नधान्य पुरविणे, अन्नधान्य आयातीस प्रोत्साहन देणे, एरवी धान्य साठवण्यात प्रोत्साहन देणे, जनावरांसाठी चाऱ्याचा साठा करणे व चारा पुरविणे, सरकारी जमिनी जनावरांना चरण्यासाठी देणे अशा विविध उपायोजना महाराजांनी केल्या की ज्या आज आपण दुष्काळ निवारण्यासाठी हाती शासनाकडून घेतल्या जातात.

४. शेती संस्था प्रदर्शने व प्रात्यक्षिके :

सन १९१२ साली स्वतंत्र शेती संस्था कोल्हापुरात स्थापन करण्यात आली, या संस्थेत सुधारित अवजारांचे एक म्युझियम होते आणि यातील अवजारे शेतकऱ्यांना प्रयोगासाठी देण्यात येत होती याचप्रमाणे शेती प्रयोग करणाऱ्या प्रत्यक्षिकांची नेमणूक करण्यात आली होती. महाराजांनी कृषी प्रदर्शने आणि जनावरांचे प्रदर्शने भरवली याचे उदाहरण म्हणजे ४ फेब्रुवारी १८९६ ला चिंचली गावामध्ये कृषी प्रदर्शन भरविले या कृषी प्रदर्शनातून गुळ काढण्याच्या नव्या पद्धती जनावरांच्या पैदाशी सुधारण्याचे उपाय आधुनिक खते शेती तंत्रे पिकावर पडणारे रोग त्यांचा प्रतिबंध किंवा उपाय, रोगनाशक आणि कीटकनाशक औषधे यांची प्रात्यक्षिके तिथे लोकांना पाहायला मिळत होती. त्यांनी आपल्या संस्थानात नवी पिके व पद्धती आणल्या पन्हाळा व भुदरगड येथे चहा कॉफीची लागवड करून पाहिली या भागात वेलदोडे, कोको,रबर,ताग,अंबाडी,बटाटे, लाख ट्रॅपिओका कंबोडियन कापूस ही पिके नव्याने लागवडीखाली आणली. हिरडा, जांभूळ, ताग, काजू, साग, आंबा व फणस इत्यादीच्या बागा लावायला प्रोत्साहन दिले. दूध दुभत्या जनावरांच्या चांगल्या जातींची पैदास करण्यावर भर देऊन शेतकऱ्यांच्या आर्थिक उत्पन्न वाढीचा या ठिकाणी त्यांनी विचार केला होता.

५. औद्योगिक विकास किंवा संस्थानातील उद्योग :

राजर्षी शाहू महाराजांनी औद्योगिक धोरणे राबवून व प्रोत्साहक उपाय योजून त्यांनी कोल्हापूर संस्थानात अनेक औद्योगिक प्रतिष्ठाने आणि व्यापारी केंद्रांची उभारणी केली. त्यांनी कोल्हापूर संस्थानाच्या औद्योगिक विकासाचा कच्चा आराखडा तयार केला, त्यांनी लघु व विकेंद्रीत उद्योगाचे धोरण अमलात आणले. शाहू महाराजांनी उद्योगधंद्यात आपल्या दरबाराची बरीच रक्कम भाग- भांडवलाच्या स्वरूपात गुंतवली व उद्योगधंद्याची स्थापन करण्यास पोषक वातावरण निर्मिती करून दिली. त्यांच्या कारकिर्दीत राज्यसत्तेचा उद्योग क्षेत्रात कमीत कमी हस्तक्षेप, उद्योजकांना मोफत किंवा कमी दरात पायाभूत सुविधाची उपलब्धता, वित्तीय प्रलोभने तांत्रिक प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांचा संपूर्ण खर्च दरबारा कडून दिला जात होता. कर सवलती आर्थिक मदत उद्योग उभारणीसाठी जागा इत्यादी सवलती उद्योगधंद्यांना दिल्या गेल्या . १९०५ साली संस्थानातील काही व्यापाऱ्यांनी एक जॉईन स्टॉक कंपनी स्थापन करून त्यामार्फत सूतगिरणी चालू केली. या मिलला जमीन व पाणीपुरवठा मोफत केला या मिलचे नाव ङ्गशाहू मिलफ असे होते.१९२८ पर्यंत या मिलमध्ये सूत उत्पादन त्यानंतर मात्र कापड उत्पादन होऊ लागले . १९०८-०९ ते १९१२-१३ या काळात जिनिंग फॅक्टऱ्यांची संख्या ६ इतकी झाली.

इचलकरंजी - १,कोल्हापूर - २, शिरोळ - १,
चिंचली - १, गडहिंग्लज - १.

१९१२-१३ मध्ये महाराजांनी रायबाग येथे सहकार तत्वावर 'शाहू विणकर' संघाची स्थापना केली शाहू वीव्हर्स असोसिएशन धंद्यातील अपयशी विणकर कामगार यांना एकत्र आणून त्यांना राहण्याची जागा बिनव्याजी कर्ज थोडीशी रयतावा म्हणजेच जमीन दिली व दरबारातर्फे यांच्याकडे साड्या, धोतरे, खण व चादरी यांची मागणी करत राहिले. कोल्हापुरातील शाहूपुरीत व इतर तालुक्यात रंगांचे कारखाने, राळ तयार करण्याचा व्यवसाय, कात कारखाना, तेल गिरण्या, कागद निर्मिती, साखर कारखाने, सायकल आणि मोटार कंपनी, पीठ गिरण्या व मुद्रा साहित्यांचे कारखाने सुरू झाले, त्यांची औद्योगिक प्रदर्शने भरविली इतकेच काय पहिल्या महायुद्धाच्या काळात किर्लोस्करांच्या लोखंडी कारखान्याला मदत व शेतकऱ्यांना लोखंडी नांगर मशागतीसाठी कमी पडू नयेत म्हणून त्यांनी आपल्या तोफा वितळवून नांगर करण्यासाठी मदत केली. उद्योग निघावेत रोजगार वाढावा उत्पादन वाढावे सुबता वाढावी आणि त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी राजर्षी शाहू महाराजांच्या संस्थानाने महत्त्वाची व मोलाची भूमिका बजावली होती.

६. व्यापार :

शेती आणि उद्योग हे परस्परावलंबी असून त्यांचे भविष्य व्यापार सुविधांशी निगडित असते, याची जाण महाराजांना होती म्हणून तर त्यांनी बेळगाव व निपाणी येथील व्यापाऱ्यांना कोल्हापुरात व्यापारी पेढ्या सुरू कराव्यात म्हणून त्यांनी त्यांना अनेक सवलती दिल्या. १८९५ मध्ये 'शाहूपुरी व्यापार पेठ' स्थापन केली या पेठेत व्यापार पेढ्या काढणाऱ्या व्यापाऱ्यांना मोठमोठ्या आकाराचे प्लॉट्स मोफत देण्यात आले. कर सवलती व इतर सवलती दिल्यामुळे शाहूपुरी गुळ तेलबिया, ढेपा, कापड, लोखंड, पोलाद, तांबे आणि खनिजे यांच्या निर्यातीचे मोठे केंद्र बनले. कोल्हापुरच्या गुळाला आणि इतर शेती

उत्पादनाला देशभरातून मागणी निर्माण झाली. जयसिंगपूर येथे तंबाखू आणि गडिंहग्लज येथे गुळ, मिरची, भुईमूग यांची बाजारपेठ तयार झाली. कोल्हापुरी गुळ आजही प्रसिद्ध आहे.

१८९४-९५ साली महाराजांच्या संस्थानातून निर्यात सहा लाख रुपये झाली होती. ती १९२१ साली ३० लाख रुपये झाली. आपण इतर संस्थानिकांचा विचार करता व्यापार वृद्धीसाठी असे प्रयत्न करणारे त्यांच्यासारखे दुसरे कुणीच संस्थानिक नव्हते.

७. कामगार संघटना :

राजर्षी शाहू महाराजांनी कामगार संघटनांचे केवळ स्वागतच केले नाहीत तर त्यांना प्रोत्साहन दिले म्हणून त्यांना भारतातील कामगार चळवळीचे आद्य समर्थक - प्रवर्तक म्हणतात. आपल्या देशात मुख्य मागासलेला वर्ग शेतकऱ्यांचा असून कामगार वर्ग हा शेतकरी वर्गातूनच शहरात स्थलांतरित झालेला कष्टकरी वर्ग आहे, आणि म्हणून या दोन्हीही वर्गांच्या हिताचा विचार एकत्रच करणे गरजेचे आहे. त्यांनी काही मुल्ये लोकांमध्ये रुजवण्याचा प्रयत्न केला . मजूरदार म्हणून घेण्यात कसलाही कमीपणा नाही, उलट स्वाभिमानच आहे असे ते आवर्जून सांगत असत मी कोल्हापूरच्या राजपदावर असलो तरी मला शिपाई, शेतकरी किंवा मजूर म्हणून घेण्यात अभिमान वाटतो राजवाड्यापेक्षा गरिबांच्या झोपडीत इमानीपणा, बंधुप्रेम देशप्रीती, राजनिष्ठा व मत्सराचा अभाव असे सद्गुण आढळतात

निष्कर्ष :

शाहू महाराजांच्या आर्थिक धोरणाचा कोल्हापूर संस्थानाच्या नव्हे तर समकालीन पश्चिम महाराष्ट्राच्या सामाजिक - आर्थिक जीवनावर फार खोलवर व दीर्घकाळ परिणाम झाल्याचे जाणवते, आजही आपणास ते परिणाम पाहावयास मिळतात. राजर्षी शाहू महाराज एक आर्थिक धोरण नियोजनकार तर होतेच त्याचप्रमाणे ते धोरणाची अंमलबजावणी करणारे प्रशासक होते. त्यांच्या अशा कामगिरीमुळे आर्थिक विकासासाठी मूलभूत सोयी सुविधांची उपलब्धता लागते त्या पायाची निर्मिती करून देण्याचे काम त्यांनी केले. त्यांच्या या आर्थिक धोरण निर्मिती व अंमलबजावणी मध्ये आर्थिक विकासातील उत्पन्न पातळीतील वाढ, लोकांच्या राहणीमानातील वाढ, आयुर्मानातील वाढ त्याचप्रमाणे त्यांच्या कार्यामुळे शाश्वत विकासाची जी ध्येय व धोरणे अलीकडच्या काळात आपण संपूर्ण जागतिक अर्थव्यवस्था पातळीवर आणि स्थानिक पातळीवरहाती घेतली आहेत, ती सर्व ध्येय व धोरणे शाहू महाराजांनी त्यांचा राज्यकारभार करत असताना हाती घेतल्याचे दिसून येते. म्हणूनच त्यांना एक आर्थिक नियोजनकार व आर्थिक धोरणांची अंमलबजावणी करणारे प्रशासक म्हणून ओळखले जाते.

संदर्भ सूची :

१. कीर धनंजय - राजर्षी शाहू छत्रपती, मुंबई पॉप्युलर प्रकाशन २००८
२. पवार जयसिंगराव (संपादक) - राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, कोल्हापूर, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, २००१
३. ठोंबरे प्र. गो. छत्रपती शाहू - आर्थिक क्षेत्रातील थोरवी राशाकाविका, १९७५
४. सूर्यवंशी मा. ह. राजर्षी शाहू- भारतीय कल्याणकारी अर्थशास्त्राचे आद्य प्रवर्तक राशाकाविका१९७५.
५. भा. ल. भोळे, छत्रपती शाहू महाराज, गंधर्व- वेद प्रकाशन २०१०.
६. Ghuge V.B Chatrapati's Shahu's Economic Policies 1894-1922 Kolhapur - zilla parishad 1975
७. Mhopare R.S Patil J.E Economic policies and programmes of Rajashri Chhatrapati Shahu Maharaj Kolhapur Shivaji University 2007
८. Sangve , Vilas and Khane B.D (eds) Rajashri Shahu Chhatrapati Papers, Vol II 1894 -1900 -D (Early -dministrative Reforms) Kolhapur Shahu Research center , Shivaji University 1983

■■■

ISSN No. 2394-5990

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या कृषीविषयक सुधारणा

प्रा. डॉ. भूषण गोविंद फडतरे
इतिहास विभाग प्रमुख,
भारतीय जैन संघटनेचे
कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, वाघोली, पुणे.
फोन नं. ९४२३२३७७३०.

प्रस्तावना :

कोल्हापूर संस्थानाला स्वतंत्र अस्तित्त्व प्राप्त झाल्यानंतर होऊन गेलेल्या अनेक छत्रपतींपैकी राजर्षी शाहू महाराज हे प्रजेचे सर्वाधिक मान्यता मिळविणारे एक आदर्श ङ्कछत्रपतीफ ठरलेले आहेत. शाहू महाराजांची सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक व कृषीविषयक क्षेत्रात धैर्यपूर्ण सक्रिय आणि स्फूर्ती प्रत अशी कामगिरी ठरली आहे. राजर्षी शाहू महाराजांनी प्रथम कृष्णाजी भिकाजी गोखले या शिक्षकाकडून शिक्षण घेतले. राजकोटनंतर धारवाड येथे राज्यकारभाराचे शिक्षण घेतले. कोल्हापूरचे शाहू महाराज, कागलचे जहागीरदार बापूसाहेब, भावनगरचे कुवर साहेब (भाऊ सिंहजी) या राजपुत्रांना राज्यकारभाराचे शिक्षण देण्यासाठी ब्रिटिश सरकारने सर स्टुअर्ट मीट फोर्ड फ्रेझर (आयसीएस अधिकारी) यांची नेमणूक केली होती. त्यांना दरमहा एक हजार रुपये मानधन दिले जात होते.[१] सर फ्रेझर यांनी शाहू महाराजांना दिलेले शिक्षण हे पुढे कोल्हापूर संस्थानाच्या प्रगतिशील आलेखावरून दिसून येते. अशीही गुरु शिष्याची जोडी ३३ वर्ष टिकवून होती. अशा स्वरूपात शाहू महाराजांच्या प्रारंभीच्या जडणघडणीत सर फ्रेझर यांचे उल्लेखनीय योगदान आहे.

शाहू महाराजांचे शिक्षण धारवाड येथे सुरू असताना जेव्हा ब्रिटिश राजपुत्र अल्बर्ट व्हिक्टर हे पुण्याला आले असताना त्यांच्या स्वागतासाठी शाहू महाराज गेलेले होते. याप्रसंगी विशेष दरबार भरवून शाहू महाराजांचा 'छत्रपती' म्हणून गौरव करण्यात आलेला होता.[२] तसेच पुढे अखिल भारतीय कुरमी क्षत्रियांची तेरावी सामाजिक परिषद उत्तर प्रदेशमधील कानपूर (१९ एप्रिल १९१९) येथे भरली. या परिषदेचे अध्यक्ष शाहू महाराज होते. याच परिषदेत कुरमी क्षत्रियांनी शाहू महाराजांना 'राजर्षी' ही पदवी देऊन सन्मान केलेला होता.[३] पुढे ते देशभर 'राजर्षी' शाहू महाराज या नावाने परिचित झाले. राजकोट, धारवाड येथील शिक्षण पूर्ण झाल्यानंतर २ एप्रिल १८९४ रोजी शाहू महाराजांनी ङ्कछत्रपतीफ म्हणून कोल्हापूर संस्थानाची सूत्रे हाती घेतली.

शाहू महाराज एक आदर्श राज्यकर्ता :

शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानाच्या राज्यकारभाराची सूत्रे हाती घेतल्यानंतर तेथे समाज परिवर्तनाच्या दृष्टीने केलेल्या सुधारणा कायदे, जाहीरनामे हे महत्त्वाचे ठरले आहेत. त्यांनी लोको उपयोगी अनेक योजना आखून त्या प्रत्यक्ष कृतीतून आणण्यावर भर दिला. शिक्षणावर भर देताना मराठा, जैन, लिंगायत, सारस्वत, पांचाल, नामदेव शिंपी अशा जातीच्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह काढली. ही वसतिगृहे कोल्हापूर संस्थानाबरोबरच पुणे, नगर, नाशिक, नागपूर इत्यादी जिल्ह्यांमध्ये देखील काढण्यावर भर दिला. तसेच कोल्हापूर संस्थानांमध्ये प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत देण्यासाठी कायदा करून त्याची अंमलबजावणी केली. अस्पृश्यता निर्मूलनासाठी परिषदांचे आयोजन केले. अस्पृश्य लोकांना दुकाने हॉटेल सुरू करण्यास सांगून तेथे स्वतः शाहू महाराज जात होते. अस्पृश्यांना सरकारी नोकरीमध्ये पन्नास टक्के आरक्षण ठेवले होते.

स्री सुधारणे संदर्भात पुनर्विवाह विधवा कायदा (१९१७), आंतरजातीय विवाह मान्यता देणारा कायदा (१९१९), घटस्फोट व वारसा कायदा (१९२०), देवदासी प्रथा प्रतिबंद कायदा असे अनेक कायदे केले. कृषी व उद्योग क्षेत्रातही मोठ्या सुधारणा करण्यावर भर दिला. शिकार, मल्लविद्या, संगीत, नाट्य, चित्रपट व चित्रकला अशा विविध कलांना आश्रय दिला. ङ्कमानवी जीवनाविषयी अत्यंत सहानुभूतीफ हे शाहू महाराजांचे ब्रीदवाक्य होते.[४] यावरून शाहू महाराजांच्या सर्व सुधारणा सामान्य जनतेच्या उन्नतीसाठी होत्या. त्यामुळेच एक आदर्श राज्यकर्ता म्हणून छत्रपती शाहू महाराजांचे नाव संपूर्ण देशात अग्रस्थानी घेतले जाते.

कोल्हापूर संस्थानातील कृषिव्यवस्था :

कोल्हापूर संस्थानामध्ये पेटा करवीर, पेटा राधानगरी, पेटा पन्हाळा, पेटा हातकणंगले, पेटा गडहिंग्लज, पेटा आजरा, पेटा भुदरगड, पेटा कागल या पेट्यांचे उल्लेख मिळतात. कृषिव्यवस्थेच्या दृष्टिकोनातून लोकांचा मुख्य व्यवसाय शेती

होता. येथील लोकांचे जीवनमान कृषी जीवनावर आधारित होते. पर्जन्यमानातील चढ उतार व त्याचा शेतीवर होत असलेला परिणाम, पारंपरिक स्वरूपात शेती करण्याची पद्धत, शेतीला पूरक असणाऱ्या व्यवसायांचा अभाव, शेतकऱ्यांना भांडवलाची कमतरता, शेतीमालासाठी योग्य बाजारपेठेचा अभाव, शेतकऱ्यांना शेतीसाठी प्रशिक्षणाचा अभाव अशा अनेक कारणांमुळे शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती दुर्बल होताना शाहू महाराजांना दिसत होते. त्यामुळेच त्यांनी आपल्या संस्थानातील शेतकऱ्यांचा विकास करण्यासाठी कृषीविषयक क्षेत्रात अनेक सुधारणा घडवून आणण्यावर भर दिलेला होता. शेतीसाठी, जलव्यवस्थापनाविषयी घेतलेले निर्णय हे अत्यंत महत्त्वाचे आहेत. त्यातूनच शेतीचा विकास झाल्याचे दिसून येते. कोल्हापूर संस्थानांमधून पंचगंगा, वारणा, हिरण्यकेशी व वेदगंगा या नद्यांबरोबरच भोगावती, कुंभी, कासारी, तुळशी व धामणी या नद्या देखील वाहतात. या नद्यांवर रंकाळे, पदमाळे, पेटाळे अशी लहान स्वरूपात तलाव बांधून काही प्रमाणात पाणीपुरवठ्याची व्यवस्था केलेली होती.

कृषीविषयक जलव्यवस्थापन :

कोल्हापूर संस्थानातील पाणीटंचाईपासून शेतकऱ्यांची मुक्तता होण्यासाठी तसेच अनियमित पडणाऱ्या पावसाच्या आधारावर असणाऱ्या पारंपरिक शेतीला पाणीपुरवठ्याची असणारी गरज ही शाहू महाराजांनी ओळखली होती. म्हणूनच सार्वजनिक बांधकाम खात्यांतर्गत पाटबंधाऱ्याची कामे होत होती. परंतु दुष्काळावर कायमची मात करण्यासाठी शाहू महाराजांनी १९०२ मध्ये सार्वजनिक बांधकाम खात्यामधून ड्रपाटबंधारेफ हा स्वतंत्र विभाग केला. स्वतंत्र पाटबंधारे विभाग निर्माण करण्या संदर्भात ३ फेब्रुवारी १९०२ रोजी करवीर सरकारच्यावतीने जाहीरनामा काढला.[५] जाहीरनाम्यातील काही महत्त्वाचे मुद्दे –

- ❒ दुष्काळावर मात करण्यासाठी पाणीपुरवठा निर्मितीचे काम सुरू करण्याबाबत मि. शंकर सिताराम गुप्ते यांची इरिगेशन ऑफिसर म्हणून नेमणूक केली.
- ❒ सध्या जलसिंचनासाठी तलाव कोठे असून तेथे पाण्याचा स्रोत कुठून आहे, पाणी किती महिने येत असून, त्याचा उपयोग किती होतो याबद्दलची माहिती घेऊन खुलासा करणे.
- ❒ तलावांच्या निर्मितीमुळे शेतीसाठी जलसिंचन किती एकरास होणार असून त्यावर खर्च किती येणाऱ्या सिंचनापासून सरकारास थोडा फायदा होऊन रयतेस अधिक फायदा होण्यासारखी स्थिती असेल अशा तलावांच्या संदर्भातील स्वतंत्र अहवाल तयार करणे.
- ❒ संस्थानात असलेले सरकारी तलाव व खाजगी विहिरीद्वारे भिजत असलेल्या जमिनीचा गावानुसार तक्ता तयार करणे.
- ❒ इरिगेशन ऑफिसला प्रत्येक तालुक्यातील रेव्हेन्यू ऑफिसरने मदत करणे.

या जाहीरनाम्यातील तपशीलवार संस्थानांमध्ये तलावांची निर्मिती करून शेतीसाठी करण्यात येणाऱ्या जलसिंचनाचा आराखडा तयार करण्यावर भर दिलेला होता.

कोल्हापूर शहरातील कळंबे तलावातील पाणी पिण्यासाठी, शेतीसाठी व उद्योगधंद्यासाठी वापरले जात होते. त्यामुळे शाहू महाराजांनी येथील तलावाची विशेषत: काळजी घेतली. गायमुख तलावातील पाणी हे सोनतळी व कुशीरे गावापर्यंत नेण्यासाठी ९०० रुपये सरकारातून खर्च केला. ज्योतिबाच्या डोंगरावरील तलावाच्या पाण्याचा उपयोग डोंगर परिसरात बंधारे बांधून शेतकऱ्यांना होत होता. भोपळेवाडी हातकणंगले व वडगाव येथे नवीन तलाव बांधण्यासाठी व तेथून पाणीपुरवठा करण्यासाठी आर्थिक तरतूद मंजूर केली होती. याशिवाय अनेक गावांमध्ये नव्याने विहिरी खोदलेल्या होत्या. कोल्हापूर संस्थानात असणाऱ्या तलावांची दुरुस्ती केली तर शेतीसाठी जलसिंचन क्षमता अधिक वृद्धिंगत होऊन आधुनिक शेती व नवनवीन पीक लागवड करता येऊ शकते या धोरणाने शाहू महाराजांनी अनेक तलावांची निर्मिती करून घेतली.

कोल्हापूर संस्थानातील शेतकऱ्यांसाठीचा पाणीप्रश्न कायमचा सोडविण्यासाठी राधानगरी येथे धरण बांधण्याची योजना तयार केली. कोल्हापूर संस्थानचे इंजिनियर श्री. दाजीराव अमृतराव विचारे यांच्यावर धरण बांधण्याची जबाबदारी दिली. सन १९०९ मध्ये राधानगरी धरणाच्या बांधकामास प्रारंभ झाला. धरणाचे बांधकाम महाराणी लक्ष्मीबाई यांच्या शुभहस्ते झाले.[६] पुढे दहा वर्षापर्यंत ४० फुटापर्यंत धरणाचे बांधकाम होऊन जवळजवळ १४ लाख रुपये निधी खर्च झालेला होता. या धरणावरून राधानगरी, कोल्हापूर परिसरातील शेतीला बाराही महिने पाणीपुरवठा होऊ लागला. एवढेच नव्हे तर भोगावती व पंचगंगा नद्यांमधून पाणी सोडले. या नद्यांवर कच्चे बंधाऱ्याऐवजी पक्के बंधारे बांधण्यास प्रारंभ केला. कोल्हापूर जवळ बावडा येथे पहिला कोल्हापुरी पद्धतीचा बंधारा बांधला.[७] पुढे काही वर्षातच दोन्ही नद्यांवर तेरा बंधारे बांधले त्यामुळे हजारो एकर शेती जलसिंचनाखाली आली. ऊसाच्या शेतीला प्राधान्य देण्यात येऊ लागले अशा स्वरूपात शाहू महाराजांचे हरितक्रांतीचे स्वप्न यशस्वी झाल्याचे दिसून येते.

ISSN No. 2394-5990

कृषीविषयक कर प्रणाली :

शाहू महाराजांनी शेतातील पिकांच्या प्रकारानुसार पाणीपट्टीचा दर निश्चित केलेला होता. प्रत्येक पेट्यावर असणाऱ्या मामलेदारांनी आपल्या पेट्यातील कृषी व्यवस्थित सुधारणा करताना तेथील शेतसारा वसुलीवर काळजीपूर्वक लक्ष दिले पाहिजे. मामलेदारांनी शेतसारा वसूल करताना शेतकऱ्यांची विशेष काळजी घेतली पाहिजे. हुशारीने काळजीपूर्वक कार्य केले नाही तर त्या मामलेदाराची कायमची त्या पेट्यावर नेमणूक होणार नाही असे शाहू महाराजांनी जाहीरनामाद्वारे निर्देशित केलेले होते. काही नैसर्गिक संकटाच्या प्रसंगी शेतकऱ्यांना मदत दिली जात होती. सन १८९६ च्या उत्तरार्धात कोल्हापूर संस्थानांमध्ये दुष्काळ पडल्याने लोकांचे दैनंदिन जीवन अत्यंत दुर्बल झाले होते. अशा प्रसंगी पन्हाळा, भुदरगड आणि कटकोळ या दुष्काळी भागातील लोकांना शाहू महाराजांनी मोठी मदत केली. दुष्काळामुळे शेतीतून पीक निघाले नाही म्हणून त्या वर्षीचा सर्व शेतसारा वसुली करण्यास तहकूबी दिलेली होती.[८]

शेतकऱ्यांना कृषीविषयक शिक्षणावर भर :

कोल्हापूर संस्थानाच्या प्रगतीचा मूलाधार हा तेथील आर्थिक द्रव्य निधीवर अवलंबून असतो आणि अशा आर्थिक द्रव्य निधीचा मूळ घटक शेतकरी असतो. त्यामुळेच शेतकरी सुज्ञ होण्यासाठी ज्ञानाची गरज आहे हे ओळखूनच शाहू महाराजांनी शेतकऱ्यांना कृषीविषयक शिक्षण देण्यावर भर दिला. सन १९०२ मध्ये शाहू महाराजांनी युरोपमधील देशांना भेटी दिल्या. त्यावेळी त्यांना तेथील कृषीप्रधान व्यवस्थेत आधुनिक शेती कार्यपद्धती व योग्य तंत्रज्ञानाचा वापर केल्याचे दिसून आले. अशाच पद्धतीचे शिक्षण व तंत्रज्ञान कोल्हापूर संस्थानातील शेतकऱ्यांना देण्यासाठी प्रारंभ केला. शेत जमिनीचा कस सुधारून त्यामधून जास्त उत्पादन कसे घेता येईल यावर भर देणे आवश्यक होते. कागलमध्ये शेतीचा कस वाढविण्यासाठी चांगला प्रयोग झाला होता. त्याच धर्तीवर शाहू महाराजांनी करवीर पेट्यात प्रयोग राबवीला. तो म्हणजे सन १९१६ मध्ये 'शेती सुधारणा' हे स्वतंत्र खाते निर्माण करून त्याला भरीव आर्थिक निधी मंजूर केला. या प्रयोगावर करवीर पेट्याचे मामलेदार श्री. मराठे व शेरी कामगार श्री. गोपाळ विष्णू पारगावकर यांची स्वतंत्रपणे नेमणूक केली. या दोघांनीही कागलमधील शेती सुधारणांची माहिती घेऊन तशा सुधारणा करवीर पेट्यात करण्याचे सूचित केले. या प्रयोगानुसार करवीर पेट्यातील पडीक जमीन व जंगल सोडून काही भाग २० ते ३० वर्ष कालावधीसाठी लावणी बद्दलचा लिलाव करून त्या जमिनीतील कस सुधारण्यासाठी शेतकऱ्यांना विशेष लक्ष देण्यास सांगितले होते. आधुनिक तंत्रज्ञानाच्या आधारावर शेती करण्यासाठी भांडवलाची समस्या होती. ती दूर करण्यासाठी शाहू महाराजांनी 'तगाई' स्वरूपात शेतकऱ्यांसाठी प्रत्येक वर्षीच्या अर्थसंकल्पात आर्थिक निधी मंजूर केलेला होता. सन १८९७ मध्ये शेतकऱ्यांना ३६ हजार २०१ एवढी रक्कम तगाई स्वरूपात दिलेली होती. याशिवाय शेतकऱ्यांना सशक्त कर्जाची देखील सुविधा उपलब्ध करून दिली. तगाई व सशर्त कर्ज स्वरूपात दिलेले कर्ज वाटप परत सरकारमध्ये भरण्याची व्यवस्था होती. त्यामुळे संस्थानाच्या तिजोरीवर कोणताही आर्थिक ताण येत नव्हता. शेतकऱ्यांना शेतीमध्ये गुंतवणूक करण्यास चालना मिळून शेतीचा विकास होण्यास मदत झाली. नैसर्गिक संकटापासून किंवा सरकारी अधिकाऱ्यांकडून शेतीचे काही नुकसान झाले तर तात्काळ शेतकऱ्याला नुकसान भरपाईची रक्कम मिळत होती. करवीर पेट्यातील केले गावात रस्ता दुरुस्तीचे काम सुरू असताना तलाव फुटल्याने अनेक शेतकऱ्यांच्या शेतीचे नुकसान झाले. त्यावेळी नुकसान भरपाई म्हणून ३२५ रुपये सदर शेतकऱ्यांना मिळालेले होते.[९]

शेतीच्या आधुनिकीकरणासाठी १९१२ मध्ये कोल्हापूर येथे 'किंग एडवर्ड ग्रीकल्चर' संस्थेची स्थापना झाली. तिचे अध्यक्ष शाहू महाराज होते. या संस्थेच्या नावाने ३२२४१ एवढी रक्कम सरकारात ठेव म्हणून ठेवली होती. वार्षिक येणाऱ्या व्याजावर ही संस्था चालत असून शेतकऱ्यांना खते बी – बियाणे, आधुनिक तंत्रज्ञानाचे शिक्षण दिले जात होते. आधुनिक पद्धतीची अवजारे भाड्याने दिली जात होती. थोडक्यात ही संस्था शेतकी प्रयोगशाळेचेच कार्य करत होती. पुढील काळात कृषीव्यवस्थेच्या विकासासाठी या संस्थेचे मोठे योगदान ठरलेले आहे. शेतकऱ्यांना आधुनिक पद्धतीचे शिक्षण मिळण्यासाठी शेतकी अधिकाऱ्यांच्या नेमणुका केल्या. शेतकी अधिकारी गावागावात जाऊन शेतकऱ्यांना भेटून शेती संदर्भातील हवामान अंदाज, पीक पद्धती हंगामानुसार लागवड, जमिनीच्या प्रकारानुसार पीक लागवड व आधुनिक अवजारे घेण्यासाठी सरकारकडून मिळणारे अर्थसाह्य इत्यादी बद्दलची माहिती देऊ लागले. त्यामुळे देखील कृषीविकासाला बळकटी येऊ लागली. शेती विषयक प्रदर्शन भरविण्यावर देखील शाहू महाराजांनी भर दिला होता. गावागावांमध्ये यात्रा भरत अशा प्रसंगी शेतकी प्रदर्शन, विज्ञान प्रदर्शन भरविले जात होते. या प्रदर्शनामधून शेतीविषयक आधुनिक अवजारे, अन्नधान्याच्या नवीन जाती आणि उच्च प्रतीची जनावरे यांची माहिती दिली जात होती.[१०] त्याचबरोबर देवाणघेवाणही होत होती. सन १९०५ मध्ये रायबागमध्ये

जनावरांचे प्रदर्शन भरविले असताना त्यांच्या चारापाण्याच्या व्यवस्थेसाठी शाहू महाराजांनी सरकारमधून दोनशे रुपये दिले होते. परिणामी शेतकऱ्यांना तर फायदा होत होता त्यामधून मोठी आर्थिक उलाढाल देखील होत होती.

शाहू महाराजांनी सरकारच्यावतीने पारंपरिक पिकांबरोबरच चहा, कॉफी, रबर, वेलदोडे, जायफळ, बाळंत लिंबू, तुती अशा नवीन पिकांच्या लागवडीचेही प्रयोग सुरू केले होते. या प्रयोगांचा शेतकऱ्यांना फायदा होईल असे त्यांचा उद्देश होता. वेळप्रसंगी देशविदेशातून बी – बियाणे मागविली होती. पन्हाळा (केळी, बुंद, वेलदोडे, चहा, तुती, जायफळ), भुदरगड (चहा, कॉफी, तुती), जेऊर (चहा), बागलवाडी (चहा, कॉफी), भोगाव (चहा), नांदगाव (चहा), राधानगरी (चहा), अंबवडे (वेलदोडा व केळी), वळवडे (रबर), पेंडखेल (कॉफी), फराळे (तुती) अशा पद्धतीने विविध ठिकाणी नवीन पिकांची लागवड करताना तेथील वातावरणाचा प्रथम विचार केलेला होता. काही ठिकाणी या नवीन प्रयोगासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी घेतल्या असल्या तरी त्यांना योग्य तो आर्थिक मोबदला दिलेला होता.

कृषिक्षेत्राशी निगडित व्यवसाय :

कोल्हापूर संस्थानातील शेतकऱ्यांनी प्रारंभी शेतीला पूरक असणारा दुग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन, पशुपालन असे पारंपरिक व्यवसाय करण्यावर भर दिलेला होता. शाहू महाराजांनी वेगवेगळ्या पिकांबाबत नवनवीन प्रयोग राबवीत असतानाच त्यावर आधारित नवनवीन उद्योगधंदे सुरू करण्यावर देखील भर दिलेला होता. शेती –व्यापार – उद्योग हे तिन्ही घटक एकमेकांशी पूरक आहेत हे ओळखून शाहू महाराजांनी आधुनिक पद्धतीच्या तंत्रज्ञानावर आधारित उद्योगधंदे सुरू करण्यावर भर दिला. कोल्हापूर येथे ङ्कशाहू छत्रपती मिलफ ही पहिली सूतगिरणी सुरू केली. २७ सप्टेंबर १९०६ रोजी दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर शाहू छत्रपती मिलचे उद् घाटन शाहू महाराजांच्या हस्ते झाले.[११] शाहू मिलच्या उभारण्याची जबाबदारी रघुपती पंडित महाराज यांच्यावर दिलेली होती. शाहू मिल कापूस खरेदीसाठी मोठा आर्थिक निधीही दिलेला होता. हा निधी कापसाला योग्य भाव मिळत असल्याने तो शेतकऱ्यांना मिळणारा होता. गडहिंग्लज. शिरोळ. इचलकरंजी. चिंचली इत्यादी ठिकाणी देखील सूतगिरणी सुरू झालेल्या होत्या. तुतीची लागवड झाल्याने रेशीम किडे पालन व्यवसाय नव्याने सुरू झाला. पुढे याच व्यवसायाला जोडून ज्योतिबा डोंगरावरील वाडी रत्नागिरी येथे रेशीम तयार करणारा कारखाना सुरू झाला. तसेच वनौषधींपासून तेल बनविणे. लाकडांपासून लोणारी कोळसा तयार होऊ लागला. अशा स्वरूपात अनेक लहान मोठ्या व्यवसायांपासून शेतकऱ्यांचा फायदा होऊ लागला. यावरून शाहू महाराजांचे कृषीविषयक राबविण्यात येणारे धोरण हे कल्याणकारी व कृतिशील होते. अशा विविध उद्योगधंद्यामुळे व्यापारास देखील चालना मिळत गेली. त्यातून नवनवीन बाजारपेठांची निर्मिती झाली. त्यामध्ये शाहूपुरी व राधानगरी येथील बाजारपेठ प्रसिद्ध होती.

सारांश :

राजश्री शाहू महाराजांचे सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील कार्य तर महत्त्वाचे आहेच पण त्याचबरोबर त्यांचे कृषी क्षेत्रात विज्ञानाच्या क्षेत्रात केलेले कार्य दैदीप्यमान ठरले आहे त्यांनी कोल्हापूर संस्थानाच्या विकासासाठी काढलेले जाहीरनामे व हुकूमनामे सामाजिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे होते. १९०२ मध्ये शाहू महाराजांनी आपल्या राज्याच्या कृषी विकासासाठी व अनेक गावांच्या पाणीपुरवठ्यासाठी जलसिंचन संदर्भात काढलेला जाहीरनामा शेतकऱ्यांच्या सुधारणांसाठी अत्यंत महत्त्वाचा ठरला आहे. कोल्हापूर संस्थानासाठी सार्वजनिक पाटबंधारे धोरण जाहीर करून स्वतंत्रपणे 'पाटबंधारे खाते' निर्माण केले. राधानगरी धरणाची निर्मिती करत शेतीच्या क्षेत्रात नवनवीन उपक्रम राबविण्यावर भर दिला. शेतकी प्रदर्शने, विज्ञान प्रदर्शने आयोजित केली. पारंपरिक पिके घेण्याबरोबरच चहा, कॉफी, रबर यासारखी व्यापारी पिके घेण्यावर देखील भर दिला. शेती बरोबरच व्यापारालाही चालना दिली. कोल्हापूर, कागल, निपाणी येथे बाजारपेठेची निर्मिती केली. कोल्हापूरमध्ये 'शाहूपुरी' नावाची बाजारपेठ प्रसिद्ध होती. याशिवाय कोल्हापूर, शिरोळ, इचलकरंजी, गडहिंग्लज इत्यादी ठिकाणी सूतगिरणी सुरू झाल्या. 'शाहू छत्रपती मिल'ची स्थापना झाली. सहकारी तत्त्वावर आधारित शेतकऱ्यांसाठी पूरक उद्योग सुरू केले. अशा विविध सुधारणांमधून राजश्री शाहू महाराजांच्या विविध पैलूंचा अभ्यास करता येतो.

संदर्भ व टिपा :

१. डॉ. जयसिंगराव पवार (संपा.), राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, २००७, पृ. ५१९.
२. प्राचार्य रा.तु. भगत, राजर्षी शाहू छत्रपती जीवन व शिक्षण कार्य, सिद्धराज प्रकाशन, पुणे, २००३, पृ. ३५.
३. कित्ता, पृ. ५८.
४. धनंजय कीर, राजर्षी शाहू छत्रपती, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, २०२२, पृ. ५९०.

ISSN No. 2394-5990

५. डॉ. जयसिंगराव पवार (संपा.), राजर्षी शाहू छत्रपतींचे जाहीरनामे व हुकूमनामे, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, २०१८, पृ. ३०.
६. प्रा. नानासाहेब साळुंखे, शाहूंच्या आठवणी, वृषाली प्रकाशन, कोल्हापूर, २००६, पृ. २०८.
७. डॉ. जयसिंगराव पवार (संपा.), राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, पूर्वोक्त, पृ. ६९८.
८. डॉ. सुवर्णा नाईक निंबाळकर, राजर्षी शाहू महाराज, संस्कृती प्रकाशन, पुणे, २०१४, पृ. ७२.
९. भास्कर धटावकर (संपा.), राजर्षी शाहू छत्रपतींचे निवडक आदेश, भाग एक, पुराभिलेख विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८८, पृ. ३५.
१०. डॉ. जयसिंगराव पवार, (संपा.), राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, पूर्वोक्त, २०३.
११. कित्ता, पृष्ठ २०७.

■■■

छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांचे शिक्षण विषयक विचार आणि कार्य

प्रा. मारोती जनार्दन कंधारे
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
लासलगाव ता. निफाड जि नाशिक
मो. ९८९०९३८१९१.

प्रस्तावना :

काल प्रवाहास जबरदस्त धक्का देऊन त्यावर स्वप्रयत्नाने मात करणारे जे सामर्थ्यशाली राजे असतात, त्यामध्ये राजर्षी शाहू महाराज यांचे नाव अग्रगण्य आहे. लिखाणाद्वारे साहित्यामध्ये बदल घडविणारे कवी आणि लेखक अनेक असतात. परंतु शेकडो वर्षापासून अनेक जुन्या चालिरीती, परंपरामुळे ज्यांना शिक्षणाचे दारे बंद होती, गुलामी मध्ये सापडून शिक्षणापासून कोसोअंतर लांब होती अशा दिन- दलितांच्या जीवन चक्राला विद्येच्या साधनाने गतिशील बनविणारा पहिला राजा म्हणून राजर्षी शाहू महाराज यांचा उल्लेख इतिहासात अजरामर राहील. या आधुनिक दूरदृष्टी राजांने शिक्षणाचे महत्त्व ओळखून समताधीष्टीत समाज निर्माण करण्यासाठी, समाजाला ज्ञानी बनविण्यासाठी बंड केला. कोल्हापूर संस्थानात नव्हे तर महाराष्ट्रभर शिक्षणासाठी चळवळ उभी करून समाज सुधारणा घडवून आणली.

शाहू महाराज हे समतेचे पाईक होते. समतामूलक समाज निर्माण करण्यासाठी कोल्हापूर संस्थानात अमुलाग्र बदल घडवून आणला. आणि हा बदल घडविण्यासाठी शिक्षणासारखे सामर्थ्यशाली साधन नाही हे ओळखून शिक्षण हे लोकचळवळ म्हणून उभी केली. गरिबांच्या झोपडीत व पारध्यांच्या पालात ज्ञानदीप कसा लागेल याचा ध्यास घेतला होता. पिढ्यानपिढ्या ज्यांच्या घरी अज्ञानाचा अंधकार दाटला होता, त्यांच्या अंगणी ज्ञानगंगा पोहोचविण्याचे कार्य शाहू महाराज यांनी केले. लोकशिक्षण हा लोकशाहीचा आत्मा आहे हे महाराजांनी ओळखले होते. अडाणी माणसाला चांगले दिवस यावयाचे असतील तर, त्यांची प्रथम ज्ञानाशी गाठभेट घालून दिली पाहिजे, गरिबाला समृद्धीकडे घेऊन जाणारा मार्ग म्हणजे शिक्षण होय. तळागाळात अडकून पडलेल्या सर्वच अज्ञानी समाजाला शिक्षणाला हात देऊन जोपर्यंत त्यास वर उचलून घेतले जात नाही, तोपर्यंत त्या समाजाच्या दाही दिशा उजळल्या जाणार नाही. या विचारातून ज्ञानाचा अभिषेक अज्ञानी समाजाला घालायचा महाराजांनी ठरवले होते. विशेष बाब म्हणजे तो काळ राजकीय दृष्ट्या पारतंत्र्याचा होता. १९०९ ते १९१९ च्या सुधारणा कायद्यान्वये लोकशाहीचे नगारे वाजू लागले होते. पण त्यावेळी जर स्वराज्य मिळाले तर ते कोणाच्या हाती जाणार याची महाराजांना चांगली जाण होती. म्हणून आपल्या राज्यात सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा पास केला आणि शिक्षणाचे महत्त्व पटवून शिक्षण चळवळ सुरू केली.[१]

केवळ शिक्षण देण्याने सर्व गोष्टी साध्य होत नाहीत, तर त्यातून शिकलेला व्यक्ती स्वावलंबी, स्वाभिमानी, स्वत्वयुक्त व राष्ट्रीय बाण्याचे असावे यावर महाराजांचा भर होता.[२] हे शिक्षणामुळे अज्ञानाचा घनदाट अंधार दूर होईल याच हेतूने महाराजांनी पुढील काळात शिक्षणाची रचना खालीलप्रमाणे आखली होती.

करवीर राज्याचा कारभार सन १८४४ ला ब्रिटिशांनी आपल्या हाती घेतला. त्यावेळी अज्ञानात सर्व राज्य बुडालेले होते. मात्र १८४८ ला करवीर राज्याचा कारभार मुंबई सरकारने आपल्याकडे घेतल्यामुळे मुंबई सरकारचे शिक्षणविषयक धोरण करवीर राज्यालाही लागू करण्यात आले. शिक्षणाच्या नव्या धोरणानुसार सन १८४८ ला करवीर दरबारने कोल्हापूर, पन्हाळा ,आळते व शिरोळ या चार ठिकाणी शाळा उघडले.[३]

सन १८५४ ला करवीर राज्यातील सर्व पेठांच्या आणि तालुक्यांच्या ठिकाणी शाळा चालू झाल्या. करवीर राज्यातील पहिली इंग्रजी शाळा कोल्हापुर येथे सन १८५१ला स्थापन करण्यात आली. तिचे नाव कोल्हापूर अंग्लो मराठी स्कूल ठेवण्यात आले. ही इंग्रजी शाळा म्हणजे राज्यातील आधुनिक शिक्षणाचा हा प्रारंभच म्हणता येईल. इंग्रजी शाळा सोबत अनेक प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, महाविद्यालय स्थापन करण्यात आले. त्यासोबतच महत्त्वाचे म्हणजे प्राथमिक शाळेतील शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी देखील शिक्षकांना अध्यापक विद्यालयाची स्थापना सन १८६३ ला करण्यात आली. हाच कालखंड चालू असताना छत्रपती शाहू महाराजांनी १८९४ ला कोल्हापूर संस्थानाचा राज्यकारभार हाती घेतला. तेव्हा राज्याचे शैक्षणिक स्थिती अत्यंत दयनीय होती. यामध्ये शाहू महाराजांनी

ISSN No. 2394-5990

बदल घडवून आणला आणि शिक्षणाशिवाय अज्ञान दूर होणार नाही म्हणून सक्तीचे प्राथमिक शिक्षण, फी माफी, वसतिगृह, परदेशी शिक्षणासाठी खर्च, अध्यापक प्रशिक्षण अशा नवनवीन योजना आखून कोल्हापुर हे महाराष्ट्रातील एक महत्त्वाचे व प्रेरणादायी शैक्षणिक केंद्र बनविले.

फी माफी :

शिक्षणाचा प्रसार झाला पाहिजे हा हेतू होताच. परंतु त्यामध्ये सर्वात मोठा अडथळा हा आर्थिक बाबीचा होता. जनता दारिद्र्याने पीडित होती. या जनतेला आर्थिक हालाखीतील लोकांच्या मुलांना फी माफ केल्याशिवाय शिक्षण प्रसार होऊ शकणार नाही हे शाहू महाराजांनी ओळखून आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्याना फी– माफी करण्याचे पाऊल त्यांनी दिनांक २० मे १९११ रोजी घेतले. प्रत्येक शाळेतील शेकडा १५ मुलांना फी माफीचा निर्णय घेतला. ज्या विद्यार्थ्यांना फी माफीची गरज आहे, त्यांनी आपल्या घरच्या आर्थिक स्थितीबद्दल कमीत कमी तीन शाळा पंचांचे दाखले हजर केले पाहिजेत अशी अटही घातली.[४]

शाळा पंच पद्धती :

शिक्षण प्रसाराच्या व शाळेच्या योग्य कारभाराच्या दृष्टीने शाहू महाराजांनी शाळा पंचांना अधिकार दिले आणि गावाच्या शिक्षणाची व्यवस्था त्यांच्याकडे सुपूर्द केली. प्रत्येक शाळेसाठी एक पंचसमिती, त्या समितीत तीन ते नऊ सभासद होते. शाळा पंचांची नेमणूक ही शिक्षणाधिकारी करायचे. तालुका व महालाच्या ठिकाणी शाळा समितीचे अध्यक्ष,मामलेदार व महालकरी हे होते. गावकामगार पाटील हे पंचसमितीचे पदसिद्ध सभासद होते. शाळा पंचसमितीने शाळेवर संपूर्ण देखरेख ठेवणे, शाळेत गैरप्रकार रोखून शाळेतील विद्यार्थ्यांचा टक्का वाढविणे, फी माफीच्या अर्जावर आर्थिक हलाखीचा दाखला देऊन शिफारस करावयाची. इत्यादी कार्य पंचसमितीने पार पाडावयाची होती. अशा प्रकारे गावातील लोकांना अधिकार देऊन पाटलांच्या कर्तव्याची जाण करून दिली व ग्रामीण भागातील शिक्षणासाठी स्थानिक जनतेला उपयोग करून शिक्षण प्रसार – प्रचार मोहिम हाती घेतली.

शिक्षकांचे प्रशिक्षण :

शिक्षण प्रसार झाला पाहिजे यासाठी नवनवीन योजना कोल्हापूर संस्थानाकडून आखल्या जात होत्या. परंतु हे शिक्षण विद्यार्थ्यांना दर्जेदार द्यायचे असेल तर शिक्षकांचे प्रशिक्षण झाल्याशिवाय पर्याय नाही हे लक्षात येत होते . मुळात ज्यांचे शिक्षण झाले आहे ते शिक्षकीपेशा कडे जास्त वळत नव्हते . तर अन्य नोकरी करत होते. त्या काळात शिक्षक बनण्यासाठी कोणतीही पात्रता नव्हती. लिहिता वाचता येऊ लागले, पाढे पाठ झाले, अंकज्ञान झाले, आकडेमोड करता आले की समजायचे हा शहाणा झाला. इंग्रजी राजवटीने मात्र सात वर्षाचा सात इयत्तांचा शिक्षणक्रम आखला होता. शेवटी प्राथमिक शालान्त परीक्षा (त्यावेळीचे व्ह.फा म्हणजे व्हर्णाक्युलर फायनल परीक्षा) घेतली जात होती. ही परीक्षा त्याकाळी पात्रता परीक्षा होती. सरकारी कार्यालयात यावरून नोकरी मिळत होती. म्हणून ही पात्रता पूर्ण करून शिक्षक कोणी होत नव्हते. म्हणून पात्र शिक्षकांचा तीव्र तुटवडा निर्माण झाला. शिक्षणप्रसार करण्यासाठी शाळा आणि मिळेल तो शिक्षक ही परिस्थिती निर्माण झाली. ही परिस्थिती दूर सारण्यासाठी शाहू महाराजांनी अल्पमुक्तीचे प्रशिक्षण वर्गांचे आयोजन करण्याचे ठरविले. या प्रशिक्षण वर्गांचा कालावधी हा सहा महिन्यांचा होता. हा प्रशिक्षण वर्ग सन १९१२ पासून सुरू झाला. या प्रशिक्षण वर्गामध्ये अंकगणित, मराठी भाषा, बाळबोध व मोडी लिपीत लेखन, अध्यापनाची तत्वे यांनी रीती, शालेय व्यवस्थापन आणि पाठ शिकविण्याचा कालावधी या बाबीचा अभ्यास आणि प्रशिक्षण पूर्ण करून घेतले जात होते.[५]

अशिक्षित, कुशल शिक्षकापेक्षा कुशल, प्रशिक्षित शिक्षक शिक्षणाच्या उपयोगी येतील म्हणून व्ह. फा पास झालेले शिक्षकच प्रशिक्षणासाठी निवडले जात होते. परंतु व्ह.फा पास झालेले नाहीत अशा चाळीशी पूर्ण न झालेल्या शिक्षकांना दोन वर्षात व्ह.फा पास होण्याची संधी प्राप्त करून दिली. व त्यासाठी तीन महिन्याची अभ्यास रजा देखील मंजूर केली होती. यातून शाहू महाराजांची शिक्षणाची गुणवत्ता व दर्जा वाढविण्यासाठी केलेला प्रयत्न दिसून येतो. प्रशिक्षण, निरीक्षण आणि विविध प्रकारच्या मुद्दाम आयोजन केलेल्या चाचण्यातून प्रशिक्षित शिक्षकांनी शाहू महाराजांनी दर्जेदार शिक्षण चळवळ यशस्वी करण्यात मोलाचा वाटा आहे असे दिसून येते.

आगळ्यावेगळ्या खास शाळा :

साधारणपणे शाळा म्हटले की फक्त वाचन, लिखाण, आकडेमोड, माहिती नव्हे तर शाळांमध्ये जे शिक्षण मिळते ते जगण्याचे प्रशिक्षण व्हावे हा मानस शाहू महाराजांचा शिक्षण चळवळी मागे होता. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही असा महाराजांचा विचार आणि विश्वास होता. म्हणूनच गावातील पाटलांना प्रशिक्षण देण्याची सोय केली आणि तसा शाळा उभारणी केल्या. एवढेच नाही तर धार्मिक विधी कशा पद्धतीने करावी यांचे शिक्षण भटजीपुरतेच मर्यादित न ठेवता ते सर्वांना देण्यासाठी एका शाळेचे नियोजन देखील शाहू महाराजांनी आपल्या राज्यात केलेल्या होत्या.

प्राथमिक शिक्षण :

शिक्षणासाठी प्रयत्न करताना ग्रामीण भागातून जेवढा प्रतिसाद मिळायला हवा तो मिळत नव्हता. सर्वत्र निरक्षरतेचे वातावरण होते. बहुजनांच्या मुलांना शाळेत जाणे म्हणजे जिकरीचे वाटायचे. त्यावर उपाय केल्याशिवाय शाळेत मुलांचे संख्या वाढणार नाही. आणि ही शिक्षण चळवळ यशस्वी करण्यासाठी निरक्षरता नष्ट करण्याचा एकमेव तोडगा म्हणजे सक्तीचे शिक्षण हे लक्षात आल्यानंतर ती योजना सन १९१७ ला मोफत सक्तीचे शिक्षण योजना तयार झाली. मोफत सक्तीचे शिक्षण योजना लागू होऊन देखील फारशी वाढ शाळेत झाली नाही. याला पालकांचे अज्ञान व रूढी परंपरा कारणीभूत होत्या. याची दखल घेऊन अनेक प्रकारचे उपाययोजना केल्या .लोकांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्यासाठी जलशाचा नामी व प्रभावी उपक्रम केला. सत्यशोधक जलशाचे, लोकशिक्षणाचे अभूतपूर्व कार्य करून सामाजिक परिवर्तनाचे चक्र फिरवण्यास मदत केली. गावाच्या शिक्षणात गावातील लोक सहभागी झाले. सक्तीच्या शिक्षणाला चालना देणारा उपक्रम म्हणजे प्राथमिक शिक्षकांच्या पगारामध्ये वाढ केली. प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीची योजनेची पहिली कार्यवाही सन ०४ मार्च १९१८ ला झाली. त्याप्रमाणे मुक्काम चिखली, बेटा, करवीर येथे पहिली प्राथमिक शाळा काढण्यात आली. या योजनेसाठी त्या काळात शाहू महाराजांनी सुमारे पाऊण लाख रुपये खर्च केले. यावेळी सुमारे ४६३० मुले शाळेत शिकत होती. त्यानंतर सन १९२२ ला याच योजनेखाली सुमारे तीन लाख रुपये खर्च करण्यात आले. त्या काळात शाहू महाराजांनी प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारासाठी खर्च केलेली ही रक्कम पाहता समाज मनात शिक्षणाविषयीची तीव्र लालसा रुजविण्यासाठी शाहू महाराजांच्या मनामध्ये किती तळमळ होती हे स्पष्ट होते. मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा शुभारंभ झाल्यानंतर प्राथमिक शाळांची संख्या चंद्रकलेप्रमाणे वाढत गेली या योजनेची वाढ पुढील प्रमाणे झाली.

वर्ष	शाळा	विद्यार्थी
१९१७-१८	२७	१२९६
१९१८-१९	९५	४६२१
१९१९-२०	१७०	६३६२
१९२०-२१	३७६	१७२१८
१९२१-२२	४२०	२२००७

जाती-जातीनुसार वेगळ्या प्राथमिक शाळा न काढता सर्व मुलांना एकत्र आणण्यासाठी प्रयत्न केला. त्यांचाच जाती निर्मूलनासाठी मोठा परिणाम होऊन शिक्षण क्षेत्रात मोठा बदल होण्यास मदत झाली.एकीकडे शाहू महाराजांनी सन १९१७ ला सक्तीच्या शिक्षणाचा कायदा केला आणि स्वतंत्र भारतामध्ये बालकांचा मोफत आणि शिक्षणाचा अधिकार हा भारताच्या संसदेचा कायदा ४ ऑगस्ट २००९ रोजी लागू केलेला आहे. कलम २१ अ अंतर्गत भारतात ६ ते १४ वर्षे वयोगटातील मुलांसाठी मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाची तरतूद आहे.[६] यातूनच शाहू महाराज शिक्षणाच्या बाबतीत शंभर वर्षे पुढचा विचार करून शिक्षणासाठी क्रांती राबवणारे राजा होते ही जनता करावी विसरणार.

स्त्री शिक्षण :

ज्या काळात शिक्षणाबद्दल प्रचंड अनास्था होती. शिक्षणाबद्दल आवड नव्हती, शिक्षणासाठी कोणत्या प्रकारची माहिती नव्हती. त्या काळात स्त्री शिक्षण हा विचार करणे देखील सोपे नव्हते. परंतु स्त्री शिक्षणासाठी शाहू महाराजांनी सर्वतोपरी प्रयत्न करून स्त्रियांना त्या काळात शिक्षणाची दार उघडे करून दिली. स्त्री शिक्षणासाठी एक विशेष अधिकार पद निर्माण करण्यात आले होते. त्या अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली सर्व स्त्री शिक्षणाची देखभाल होत होती. सन १९९५ ला सौ.रखमाबाई केळवळकर या बुद्धिमान व कर्तृत्वशाली प्रौढ महिलेची नेमणूक झाली. स्त्री शिक्षणात त्यांनी भरीव मोलाचे कार्य केले. शाहू महाराजांनी स्त्री शिक्षणासाठी विशेष शिष्यवृत्ती सुरुवात केली होती. आणि सर्व मुलींना मोफत शिक्षण देऊन त्यांना पुढील उच्च शिक्षणासाठी लागणारा खर्च शिष्यवृत्ती देऊन केली. कृष्णाबाई केळवलकर वैद्यक शास्त्रात उच्च शिक्षण झालेल्या होत्या. त्यांना पुढील शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देऊन परदेशात पाठवले. याच कृष्णाबाई उच्च शिक्षण घेऊन सन १९०३ ला भारतात परत आल्या आणि कोल्हापुरातील अल्बर्ट दवाखान्यात त्यांनी १९२४ पर्यंत सेवाभावाने काम केले. स्त्री शिक्षणासाठी रुजवलेले रोपटे पुढे अनेक पद्धतीने वटवृक्ष होऊन सेवाभाव जपण्याचे कार्य केले. शाहू महाराजांना शेवटच्या तळागाळापर्यंत शिक्षणाचा फैलाव झाला पाहिजे असे वाटत होते. हे त्यांनी दिलेल्या आदेशावरून लक्षात येईल. तमाम लोकांना जाहीर करण्यात येते की, ज्यांच्यातील पडदा पाळण्याची रीत नाही आणि ज्यांच्यातील मुलींना व स्त्रीयांना शिक्षण घेण्याची इच्छा आहे, अशा मागासलेल्या वर्गातील लोकांनी आप्पासाहेब तथा मामासाहेब सुर्वे यांच्याकडे तसे अर्ज द्यावेत. म्हणजे त्या विद्यार्थिनीची राहण्याची, जेवण्याची व शालेय फी पुस्तकांची वगैरे सारी सोय सरकारी खर्चाने करण्यात येईल.[७] यावरून राहणे, भोजन आणि शिक्षणासाठी लागणाऱ्या सर्व बाबींची तरतूद शाहू महाराजांनी त्या काळात स्त्री शिक्षणासाठी केली होती हे लक्षात येईल.

ISSN No. 2394-5990

शिक्षण म्हणजे केवळ वाचायला, लिहायला, शिकवणे एवढेच मर्यादित अर्थ शाहू महाराजांना अपेक्षित नव्हता. तर चांगल्या प्रकारचे शिक्षण मिळावे म्हणून शाहू महाराज मुलींना इतरत्र शिक्षणासाठी पाठवित होते. राधाबाई सूर्यवंशी, ताराबाई खानोलकर इत्यादी पाच मुलींची निवड करून त्यांना सेंट कोलंबो गर्ल्स हायस्कूल, मुंबई या संस्थेत पाठविण्यात आले.[८] शाहू महाराजांनी मुलीच्या शिक्षणाबाबत एक विशेष मोहिम राबवली होती. शिक्षकांनी मुलींच्या शिक्षणाबाबत आत्मीयतेने प्रसार करावा म्हणून मुलांच्या शाळेत मुलींना शिक्षण घेण्यासाठी दखल करणाऱ्या शिक्षकांना प्रोत्साहनपर बक्षीस देण्याचे घोषित केले होते. शाहू महाराजांच्या कारकिर्दीतील करवीर राज्यांच्या शैक्षणिक प्रगतीचा आढावा लक्षात घेतला तर १८९३ ला १९८ खेड्यामध्ये शाळा होत्या तर १९२२ ला ५५९ खेड्यामध्ये शाळा स्थापन झालेल्या होत्या. ही आकडेवारी पाहता स्वतंत्रपूर्व भारतातील तेव्हाची असलेली बिकट परिस्थितीत आनंददायीच म्हणता येईल.

छत्रपती शाहू महाराजांनी शिक्षण चळवळीत सर्वात मोठे कार्य केले म्हणजे त्यांनी निर्माण केलेले वसतिगृह. त्यावेळीची हालाखीची परिस्थिती, शिक्षणाबद्दलचे अज्ञान, प्रचंड दारिद्र्य, भोजन निवासाच्या सोयीचा अभाव त्यामुळे शिक्षणाच्या प्रवाहात कोणी सामील होणार नाही. कारण या प्राथमिक गरजा सर्वात मोठा अडसर होता. हा अडथळा ओळखून त्यांनी प्रत्येक जात धर्मासाठी स्वतंत्र वसतिगृह निर्माण केले. शाहू महाराज उदारमतवादी शिक्षणाचे प्रणेते होते. शिक्षणाच्या माध्यमातून समाज जीवनात क्रांतीची बीजे पेरत होते. शाहू महाराजांना सर्व समाजाला साक्षर करावयाचे होते. असा समाज सह्याद्रीच्या दर्या खोऱ्यात पसरलेला होता या समाजापर्यंत त्यांनी प्राथमिक शाळा नेऊन पोहोचविली. परंतु दुय्यम व उच्च शिक्षणासाठी सर्व सोयी ग्रामीण भागापर्यंत पोहोचविणे त्या काळामध्ये अवघड होते. म्हणून ग्रामीण भागामध्ये जी हुशार, होतकरू व गरीब मुले असतील त्यांच्या दुय्यम व उच्च शिक्षणासाठी आभाळ होऊ नये म्हणून वसतीगृहात्मक शिक्षणाची सोय उपलब्ध करून दिली. या चळवळीचा हेतू समाजाच्या सर्व थरातील लोकांना विद्या मिळावी हाच होता. शाहू महाराज हे महाराष्ट्रातील वस्तीगृहात्मक शिक्षण प्रसाराचे पहिले शिल्पकार होते. शाहू महाराजांनी वसतिगृह निर्माण करताना जातीनुसार वसतिगृह निर्माण केले. त्या पाठीमागे त्याच्या जातीं जमातीच्या पुढार्यांना एकत्र करून शिक्षणातून स्वजातीचा आता तरी उद्धार करा असे सांगावयाचे होते. छत्रपती शाहू महाराज यांच्या मनात शिक्षण प्रेमाविषयीचा जिवंत झरा होता. एखाद्या तत्ववेत्याप्रमाणे शिक्षणाबद्दल उद्दिष्टे निर्माण करून वसतिगृहाची स्थापना केली होती. शाहू महाराजांचे शिक्षण/ वसतिगृह विषयक कार्यापाठीमागे खालील उद्देश होते.

१) समाजाच्या सर्व थरात वस्तीगृहात्मक शिक्षणाविषयी जागृती निर्माण करणे.
२) शिक्षण क्षेत्रातील मक्तेदारी कमी करणे.
३) दुय्यम व उच्च शिक्षणास वाव करून देणे.
४) शिक्षणाची द्वारे सर्वांना मोकळी करणे.
५) समाजाच्या उन्नतीसाठी वसतिगृह काढतील असे कार्यकर्ते तयार करणे.
६) शिक्षणासाठी वसतिगृहात राहण्याची आवड व सवय निर्माण करणे.
७) विद्यार्थ्यांना स्वावलंबन, सहिष्णुता, शिस्त, देशप्रेम, सहकार्य व नियमितपणा इत्यादी गुण वाढीस लावणे.
८) जातीभेदाची भावना क्षीण करणे.
९) स्वयंप्रयत्न करून स्व उद्धार करण्यास उत्तेजन देणे.

या व्यापक जाणीवेतून शाहू महाराजांनी महाराष्ट्रामध्ये वसतिगृहाच्या स्थापनेची चळवळ उभी केली. शाहू महाराजांच्या अंगी असलेल्या या माणुसकीने समाजाच्या सर्व थरातील माणसांना शिक्षित करण्याचा चंग बांधलेला होता. सर्व माणसांना आपली सामाजिक व नैतिक पातळी वाढविण्याचे एक समर्थ साधन म्हणून त्यांनी शिक्षणाचा नवा मार्ग दाखविला. अशा तऱ्हेने युगायुगापासून चालत आलेल्या सामाजिक गुलामगिरीचा अंत करण्यासाठी शाहू महाराजांनी वसतिगृह स्थापनेची मोहीम हाती घेतली होती.

शाहू महाराजांनी एकूण स्थापन केलेली वसतिगृह खालीलप्रमाणे

१) व्हीक्टोरिया मराठा बोर्डिंग हाऊस – १८ एप्रिल १९०१
२) दिगंबर जैन बोर्डिंग – एप्रिल १९०१
३) वीरशैव लिंगायत विद्यार्थी वसतिगृह – १९०६
४) मुस्लिम बोर्डिंग – १९०६
५) मिस क्लार्क होस्टेल – १४ फेब्रुवारी १९०८
६) दैवज्ञ शिक्षण समाज बोर्डिंग – २४ डिसेंबर १९०८
७) श्री नामदेव बोर्डिंग – २ एप्रिल १९१८
८) पांचाळ ब्राह्मण वसतिगृह – १९१२
९) श्रीमती सरस्वतीबाई गोड सारस्वत ब्राह्मण विद्यार्थी वसतिगृह – २० मे १९१५
१०) इंडियन ख्रिश्चन हॉस्टेल – ७ जून १९१५
११) राव बहादुर सबनीस प्रभू बोर्डिंग – १९१५
१२) आर्य समाज गुरुकुल – १८ मार्च १९१८
१३) ढोर चांभार बोर्डींग – १ जानेवारी १९१९
१४) श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊस –१ जुलै १९२०

१५) नाभिक विद्यार्थी वसतिगृह – २४ जुलै १९२१

असे अनेक प्रकारचे वसतिगृह त्या काळात छत्रपती शाहू महाराज यांनी स्थापन करून त्यांना देणगी दिली.९ शिक्षण प्रसार व्हावा म्हणून सुरू केलेली वसतिगृह शाहू महाराजांचे बहुजन समाजावरील प्रेमाचे प्रतीके आहेत. अज्ञानी समाजाला सज्ञानी करण्यासाठी घेतलेल्या कठोर परिश्रमाची जीवन स्मारके आहेत. शाहू महाराजांनी राज्यामध्ये शिक्षण चळवळ राबवीत असताना सर्व जातीभेद दूर सारून शिक्षण चळवळ राबविली. शाहू महाराजांचा हेतू उदात्त आणि दूरदृष्टीचा होता. स्वराज्य प्राप्तीसाठी शिक्षण हा महाराजांचा व्यापक दृष्टिकोन होता. शाहू महाराज म्हणतात आम्हा स्वराज्य प्राप्ती पाहिजे असे म्हणताना आम्ही स्वराज्यात पात्र आहोत किंवा नाही याचा विचार प्रत्येकाने केला पाहिजे असा प्रश्न देखील शाहू महाराजांनी केलेला होता.

महात्मा फुले ज्या पद्धतीने म्हणतात की

विद्या विना मती गेली, मतीविना गती गेली.

गतीविना नीती गेली, नितीविना वित्त गेले .

वित्तविना शूद्र खचले, एवढे सारे अनर्थ एका अविद्येने केले.

हा विचार शाहू महाराजांनी अंगीकारला होता. म्हणूनच समाजाच्या सर्व थरांना शिक्षणाच्या मूलमंत्राने जाग आणण्याचा त्यांनी आग्रह धरला होता. त्यामुळे त्यांनी सर्व थरातील लोकांना सर्वतोपरी प्रयत्न करून शिक्षणाची लोकचळवळ त्या काळात उभी केली होती. असे दिसून येते. त्यांचे शिक्षण विषयक विचार आणि कार्य अखिल महाराष्ट्राला भारावून टाकणारे आहे. सर्वांना सज्ञानी करण्याचे व्रत शाहू महाराजांचे अजरामर आहे. माणसाला माणूस म्हणून जगण्यासाठी समर्थ बनविणारे शाहू महाराजांचे शिक्षणशास्त्र डोळस होते. शाहू महाराज म्हणजे लोकांसाठी वाहिलेले विद्यापीठ होते असंच म्हणता येईल.

संदर्भ :

१) प्राचार्य रा. तू. भगत, राजर्षी शाहू शिक्षण विषयक विचार आणि कार्य, चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर.

२) प्राचार्य रा. तू. भगत, राजर्षी शाहू शिक्षण विषयक विचार आणि कार्य, चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर.

३) बॉम्बे गॅझेटिअर १८८६, तजङ– ददखत घजडक-झणठ रिसिश पींलशी– २८१–२८२

४) करवीर गॅजेट , २ मे १९९१, पृष्ठ –१३५

५) करवीर गॅझेट , १४ ऑक्टोबर १९९१, पृष्ठ २७२

६) शिक्षण हक्क कायदा २०१०

७) हुजूरज्ञा, तारीख ६ ऑक्टोबर १९१९

८) कृ. गो. सूर्यवंशी,राजश्री शाहू राजा व माणूस, पेज क्र १८८, ठोकळ प्रकाशन, पुणे.

९) प्राचार्य.रा. तू भगत,शाहू शिक्षण विषयक विचार आणि कार्य,चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर,पेज ९१ ते ९३.

■■■

ISSN No. 2394-5990

शाहू महाराज यांचे आर्थिक आणि सामाजिक कार्य

प्रा.विरेंद्र विश्वास आहेर
कला,वाणिज्य व विज्ञान महाविध्यालय
लासलगाव,ता.निफाड जि.नाशिक.
मो.९४०५६१५२३०

प्रस्तावना :

शाहू महाराजांची छत्रपती म्हणून केवळ अठरा वर्ष वर्षाची कारकीर्द. त्यांचा जन्म २६ जुलै १८७४ आणि ०६ मे १९२२ चा मृत्यू म्हणजे केवळ ४८ वर्षांच्या आयुष्य महाराजांना लाभले. या एवढ्या कमी आयुष्यात आणि कारकिर्दीत कोल्हापूर संस्थानाचा कारभार हा कोल्हापूर पुरताच मर्यादित न राहता तो संबंध महाराष्ट्रा भर पसरला आणि संपूर्ण बहुजन समाजाला परिचित असे राजे झाले. खऱ्या अर्थाने लोकराजा ज्याला म्हणतात तसेच जीवन जगले आणि सामान्य लोकांनी त्यांना राजर्षी ही पदवी बहाल केली. याउलट स्वातंत्रद्रोही आणि ब्राह्मण विरोधी ही विशेषणे त्यांना सहन करावी लागली. एकंदरीत छत्रपती शिवाजी महाराजानंतर हिंदुस्तानात हे दुसरे वादळी व लोक कल्याण व्यक्तिमत्व म्हणता येईल.

रयतेची कल्याण हा शासन संस्थेचा हेतू आणि छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श ही नीती मनात बाळगून शाहू महाराजांनी आपले कार्य केलेले दिसते. महाराजांची कार्य दृष्टी ही शैक्षणिक राजकीय धार्मिक,आर्थिक, नैतिक-मूल्य, नगररचना, कायदेशीर ज्ञान यासारख्या अनेक बहुगुणसंपन्न कार्यातून दिसते. महाराजांचे दत्तक विधान होऊन ते कोल्हापूरास छत्रपती घराण्यात दिनांक १७ मार्च १८९४ रोजी आले. महाराजांचे प्राथमिक व राज शिष्टाचारचे शिक्षण सुरू असतानाच ते विलायती लोकांमध्ये फार रमायचे नाही, तर या उलट आपण महाराज आहोत ह्या प्रकृती धर्माला न मानता तसेच तथाकथित प्रतिष्ठावान लोकांमध्ये ते फारसे मिसळ नसत. सर्वसामान्य लोकांमध्ये मात्र ते चांगलेच रमून जाई व मोठेपणीही ते याच पद्धतीने वागले असे त्यांना पाहिलेले लोक सांगतात. कुत्तेवाण, मोतदार, हुजरे आदी कनिष्ठ लोकांनाही ते आपल्या पंक्तीला घेऊन जेवण करत व आपल्या शेजारी बसून त्यांना फिरावयास नेत. शिकारीला गेल्यावर ते हटकून शेतकरी बांधवात मिसळत आणि गावच्या तरुण पोरांना तालमीत जमवून त्यांच्याशी दोन हातही करत.[१]

२ एप्रिल १८९४ मध्ये शाहू महाराजांनी अधिकृत पणे सूत्रे आपल्या हाती घेतली व मोठ्या जोमाने कामाला सुरुवात केली. परीणामी शाहू महाराजांनी जेव्हा छत्रपती म्हणून स्वतःचे अस्तित्व सिद्ध करण्याचा प्रयत्न केला. तेव्हा अनेक पारशी व युरोपियन अधिकाऱ्यांना आपल्या स्वतःच्या दोषामुळे कोल्हापुरातून पळ काढावा लागला. तसेच राज्यकारभारात इतर जातीतील लोकांना नोकऱ्या दिल्या म्हणून ब्राह्मण समाजातील लोकांनी त्यांना विरोध केला. मात्र महाराजांचे धोरणच बहुजन लोकांचे कल्याण हे होते.

१८९४ मध्ये महाराजांनी गारगोटी येथे पाण्याची व्यवस्था केली व तेथील मुलींसाठी शाळा सुरू केली. तसेच १८९४ साली महार,मांग या जमातींना पेशवाई पासून वेटबिगारीचा जो त्रास सहन करावा लागत होता ती पद्धती कायद्याने बंद करून महाराजांनी त्यास योग्य अशी आर्थिक स्वरूपात वेतन सुरु केली. सदर्न-मराठा रेल्वेचा मुख्य फाटा सांगली-मिरज वरून पुढे बेळगावी गेलेला असल्याने त्याचा परिणाम कोल्हापूरच्या व्यापारावर झालेले दिसून येतो. महाराजांनी शाहूपुरी नवीन वसाहत १८९५ मध्ये स्थापन करून व्यापाराला चांगली चालना दिली व व्यापारी वर्गाला विशेष सवलती देऊन संस्थानाच्या व्यापारात वाढच केली.[२]

१८९७ चा भयंकर दुष्काळ हा महाराजांची परीक्षा पाहणारा होता पण या परिस्थितीतही महाराजांनी आपल्या जनतेला वाऱ्यावर सोडले नाही ना नफा- ना तोटा या तत्त्वावर त्यांनी सरकारी व सहकारी तत्त्वावर चालणारी अनेक धान्य दुकाने सुरू करून रयतेच्या अन्नाचा प्रश्न सोडविला. परंतु मुक्या जनावरांचा प्रश्न अजूनही अनुत्तरीत होता. तोही महाराजांनी एका फर्मानाद्वारे सर्व शासकीय कुरणे जनावरांना चरण्यासाठी उघडली व शेतकऱ्यांची शेती योग्य जनावरे सरकारच्या खर्चाने सांभाळण्याची व्यवस्था केली. याच काळात शेतकऱ्यांना दीर्घ मुदतीची कर्जही दिली.[३]

महाराज समाजकार्यासोबतच शिक्षणाचे शिक्षणाची जाणकारही होते. शिक्षणाने मनुष्याच्या पिढ्यानपिढ्या सुधारतात

यावर महाराजांचा विश्वास होता म्हणूनच महाराजांनी शिक्षणावर मोठा आर्थिक खर्च केलेला दिसतो. याचा प्रत्यय शाहू महाराजांनी जे पालक आपल्या पाल्याला शाळेत पाठवणार नाहीत त्यास दोन पैसे शिक्षा केली यावरून महाराज शिक्षणासाठी किती आग्रही होते हे दिसते.

शिक्षण ही सर्व सुधारणांची गुरुकिल्ली आहे यावर महाराजांचा विश्वास होता. शिक्षणाबरोबरच महाराजांनी संस्थानाचा विकास व्हावा या हेतूने उद्योगधंद्यांची वाढ व्हावी म्हणून १९०६ मध्ये कोल्हापुरात श्री शाहू मिल या गिरणीची स्थापना केली आणि १९१२ साली सहकारी कायद्याचा खऱ्या अर्थाने अंमल सुरू झाला. त्यामुळे शेतकऱ्यांची पत वाढली व तो स्वावलंबी जीवनाकडे वळाला.[४]

कोल्हापूर संस्थानाने पुण्यातील फर्गुसन कॉलेजला विशेष आर्थिक मदत केली. या मदतीबद्दल कॉलेजमध्ये फीबाबत वस्तीगृहातील प्रवेश याबद्दल कोल्हापुरातील सर्व जातीतील मुलांना सवलत द्यावी अशी नोंद आढळते. महाराज शिक्षणाबरोबरच आरोग्य विषयक बाबतीत अत्यंत संवेदनशील होते. १९९६ मध्ये बडोद्याच्या अहिल्याबाई राणीसाहेब मरण पावल्या तेव्हा त्यांच्या स्मृतीत कोल्हापुरास दवाखाना ही उभा केला.

हिंदू समाजात त्याकाळी विधवा विवाह हा मोठा प्रश्न होता शिवाय समाजही त्यास मान्यता देत नव्हता. यावर उपाय म्हणून महाराजांनी कोल्हापुरात १९१७ मध्ये पुनर्विवाह कायदा केला तसेच सामाजिक अभिसरण व समता यांच्या वृद्धीसाठी आंतरजातीय विवाह कायदा ही सन १९१८ मध्ये अमलात आणला अशा पद्धतीने समाजातील दैनंदिन जीवनातील दुर्लक्षित प्रश्नाकडे बारकाईने विचार करून त्यात बदल घडवून आणलेला दिसतो.

शिक्षणाशिवाय तरणोपाय उपाय नाही असा समजुतीचा तो काळ होता. अशातच देश-विदेशातील लोक देशात प्रतिष्ठाच्या आणि अधिकाराच्या नोकऱ्या मिळवून रयतेची पिळवणूक करत ब्राह्मण लोकांनी अशिक्षित अब्राह्मण लोकांना शिकवण्याची जबाबदारी घेण्याऐवजी त्यांच्या शिक्षणाचा अधिकार त्यांना करत गोरगरिबांच्या दारापर्यंत विद्येचे लोन पोचवावे यासाठी त्यांनी प्रथम आपल्या राज्यातील आळते या गावी १८८७ मध्ये महार स्कूल ची स्थापना करून आपल्या कार्याची सुरुवात केली. मुलांच्या प्राथमिक व उच्च शिक्षणाची सोय व्हावी म्हणून महाराजांनी मुलांसाठी संपूर्ण महाराष्ट्रभर वस्तीगृहे काढली. इतकेच नाही तर जेवणाची व्यवस्था केलीच पण सरकारी गाडी घोड्यावरून त्यांना शाळा कॉलेजात पोहोचवण्याची काळजी ही घेतली सर्वच जातीच्या विद्यार्थ्यांना शिक्षण संस्थांकडून शिष्यवृत्ती देऊ केल्या पुणे येथे 'मराठा स्टुडंट्स इन्स्टिट्यूट' या नावाने शंभर ते १२५ विद्यार्थ्यांची सोय होईल असे वस्तीगृह १९०१ मध्ये बांधले. त्यासाठी कायमस्वरूपी मोठी देणगी व जमीन देऊ केली पुढे याच वस्तीगृहाचे नाव बदलून श्री शाहू वस्तीगृह असे करण्यात आले.[५]

एप्रिल १९०१ मध्ये जैन विद्यार्थ्यांसाठी एक वस्तीगृह सुरु करण्यात आले यासाठी मराठा वस्तीगृहासमोरील भव्य व सुंदर जागा संस्थासाठी महाराजांनी बक्षीस म्हणून दिली यात साधारण शंभर विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय झाली. १९०७ मध्ये कोल्हापूरचा रंकाळा तलावाजवळ लिंगायत विद्यार्थ्यांसाठी वस्तीगृह उघडले. तेथे ५० विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय करण्यात आली. १९०२ मध्ये महाराज विलायतीवरून आल्यावर मुस्लिम बांधवांनी त्यांचा सत्कार केला त्याच वेळी मुसलमान विद्यार्थ्यांसाठी बोर्डिंग काढण्याचे आश्वासन दिले. परंतु त्याची जबाबदारी पेलण्यासाठी त्या समाजातून कोणीच पुढे येईना. तेव्हा सुमारे दहा ते पंधरा विद्यार्थ्यांची सोय मराठा वस्तीगृहात करण्यात आली इतक्या जुन्या काळी मराठा वस्तीगृहात मुसलमान विद्यार्थ्यांची सोय करण्याचे धाडस फक्त शिवछत्रपतीच शाहूमहाराजच करू शकतात. यावरून महाराज खरे धर्म सहिष्णू होते हे समजते. महाराजांनी या इमारत फंडासाठी ५५०० रुपयांची देणगी आणि २५० रुपये मदत म्हणून दिले. सारस्वत जातीच्या विद्यार्थ्यांसाठी पाच हजार रुपये देणगी व इमारत फंडासाठी १६०० रुपये रक्कम देऊन ही इमारत मराठा वस्तीगृहासमोरच महाराजांनी उभी केली तेथे त्याकाळी ३० विद्यार्थ्यांची सोय करण्यात आली आणि प्रभू जातीच्या विद्यार्थ्यांसाठी पंधरा हजार रुपयांची महाराजांनी देणगी दिली.[६]

१९१४ साली अस्पृश्य जाती बद्दल असलेल्या कळकळीमुळे प्रशस्त इमारत विद्यार्थ्यांसाठी बांधून दिली. चर्मकार विद्यार्थ्यांसाठी इंदुमती वस्तीगृह स्थापन करून तेथील मुलांच्या राहण्याची अडचण दूर केली. १९२० मध्ये जिनगर समाजातील विद्यार्थ्यांसाठी ३००० रुपये देणगी व वार्षिक मदत दिली. त्याशिवाय या जातीसाठी एक स्वतंत्र वसाहत स्थापन करून एक औद्योगिक विद्यालय उघडले. महाराष्ट्रातील ज्या गरीब अब्राह्मण विद्यार्थ्याला शिक्षण घेता येत नसेल; तो सरळ त्याकाळी कोल्हापूरला जात असे व कोल्हापुरातील शाळा, प्रशाळा आणि धंदे शिक्षण संस्थेत शिकून तो तयार होत असे. 'राजाराम कॉलेजही' उच्च शिक्षण देणारे त्याकाळी दक्षिण भारतातील एकमेव संस्था होती. तेथे सर्व जाती धर्माच्या विद्यार्थ्यांना विद्यासाने दिले जात असे. आजचा आधुनिक

ISSN No. 2394-5990

विचारांचा आणि उच्च शिक्षणाचा नवीन महाराष्ट्र घडविण्यात शाहू महाराजांची कामगिरी मोलाची ठरते.[७]

शाहूंच्या काळात आधी राजकारण की सामाजिक सुधारणा हा वाद गाजलेला होता. सामाजिक सुधारणा नंतर करता येतील परंतु स्वतंत्र प्रथम मिळाले पाहिजे असा विचार सामान्यता लोकमान्य टिळक व इतर महत्त्वाच्या राजकीय लोकांनी व पक्षांनी जोपासलेला होता. परंतु शाहूमहाराज यांच्या दृष्टीने हा वाद चुकीचा होता. तसेच या दोन्ही सुधारणा एकमेकांपासून वेगळा नसून पूरकच आहेत यावर ते विश्वास ठेवत.

तसेच माणसाला माणूस म्हणून मान्यता दिल्या खेरीज राजकारण करता येणार नाही व देशाला स्वातंत्र्य मिळवून द्यायचे असेल तर संपूर्ण समाज एकत्र असला पाहिजे यासाठी शाहू महाराजांनी आयुष्यभर जाणीवपूर्वक प्रयत्न केले. हिंदू धर्म व्यवस्थेने शापित ठरवलेलं समाज म्हणजे अस्पृश्यवर्ग या वर्गाला एकत्र आणून त्यांच्यात सामाजिक सुधारणा घडाव्यात म्हणून संपूर्ण भारतातील अस्पृश्यांना आपले बांधव मानून त्यांच्या निरनिराळ्या परिषदा घडवून आणल्या व त्यांच्यात सुधारण्याची बिजारोपण केले. १९२० साली आपल्या राज्यातील माणगाव येथे त्यांनी अस्पृश्यांची पहिली परिषद भरून डॉक्टर भीमराव रामजी आंबेडकर यांना अस्पृश्यांच्या मुक्तिसंग्रामाचे नेतृत्व करण्यासाठी प्रोत्साहन दिले. यानंतर भारतभर अशा अनेक परिषदा पार पडल्या परंतु यामागची प्रेरणा हि खरी शाहूमहाराज यांचीच होती.

हिंदू धर्मात अनेक जाती व पोट जाती आहेत. त्यामुळे सामाजिक व राष्ट्रीय एक्य साधने कठीण होते. आणि जोपर्यंत राष्ट्रीय एक्य वृद्धिंगत होण्याचे प्रयत्न होत नाहीत. तोपर्यंत भारताचे ऐक्य धोक्यात आहे किंवा भारत स्वतंत्र्य होण्याचे स्वप्न धूसर आहे असे म्हणता येईल. म्हणून निदान सर्व हिंदूंना तरी एक करावे हा त्यांचा हेतू होता. म्हणूनच त्यांनी स्वतःच्या राज्यात अंतर-जातीय विवाह कायदा करून स्वतःच्या राजघराण्याचे धनगर राज घराण्याशी बेटी व्यवहार सुरू करून एक नवा आदर्श त्यांनी निर्माण केला होता. माणसाच्या जात म्हणजे माणूसच कृत्रिम जाती बंधने समाजातील लोकांनी तोडून टाकावी म्हणून त्यांनी शिक्षण प्रसार व्याख्याने व प्रत्यक्ष कृतीतून आयुष्यभर काम केले. एका महार माणसाला त्याकाळी हॉटेल घालून दिले व तेथे सर्वांच्या समोर ते स्वतः अस्पृश्याने तयार केलेल्या चहा पीत.[८] यावरून:-

बोले तैसा चाले । त्याची वंदीन पाउले ।।
अंगे झाडीन अंगण । त्याचे दासत्व करीन ।।
त्याचा होईन किंकर । उभा ठाकेन जोडोनि कर ।।
तुका म्हणे देव । त्याचे चरणी माझा भाव ।।

वरील संत तुकारामांच्या पंक्ती छत्रपती शाहू महाराजांचा बाबतीत अगदी योग्य लागू पडतात. इंग्लंड मजूर पक्षाचे व रशियातील साम्यवादी क्रांती यांचे महत्त्व ओळखून त्यांनी मुंबईच्या कामगारांना १९२१ साली आपल्या संघटना बांधण्यास उत्तेजन दिले होते. असे हे शाहू छत्रपती महाराज सर्वांना समाज सुधारण्यासाठी प्रोत्साहन देत होते. तसेच आपल्या व्याख्यानातून व कृतीतून त्यांनी आजही समाजाला एक नवा आदर्श घालून दिला. राजा असूनही ऋषी सारखे अमर सत्याचे व मानवी स्वातंत्र्याचे विचार सामान्य लोकांना पटवून देत होते. म्हणून महाराजांना राजर्षी ही पदवी कानपूरच्या कुर्मी समाजाने दिली.

संदर्भ :

१. कोल्हापूरचे शाहू छत्रपती (चरित्र व कार्य), द्वितीय आवृत्ती. लेखक :ए.के.घोरपडे.

२. कोल्हापूरचे शाहू छत्रपती (चरित्र व कार्य), द्वितीय आवृत्ती. लेखक : ए.के.घोरपडे. पान.न.२६

३. महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणेचा इतिहास (१८८५-१९५०), मेहता पब्लिशिंग हाउस,पुणे.पान नं.२४

४. Keer, Dhananjay, Shahu Chhatrapati, - Royal Revloutionary, Bombay, 1976.

५. कोल्हापूरचे शाहू छत्रपती (चरित्र व कार्य), द्वितीय आवृत्ती. लेखक : ए.के.घोरपडे. पान नं.३२

६. पवार, जयसिंगराव संपा., राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, कोल्हापूर, २००१.पान नं.१२७

७. https://mr.vikaspedia.in/education/childrenscorner/92d93e93092494092f-90792493f93993e938/93693e939942-92e93993e93093e91c

८. सूर्यवंशी, कृ. गो. राजर्षी शाहू : राजा व माणूस, पुणे, १९८४.

■■■

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे आर्थिक विचार

डॉ. पी. एन. डापके
सहयोगी प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
संत ज्ञानेश्वर महाविद्यालय, सोयगाव

प्रस्तावना :

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचा जन्म लक्ष्मी– विलास राजवाडा, कसबा, बावडा, कोल्हापूर येथे २६ जुलै १८७४ रोजी झाला तर मृत्यू ६ मे १९२२ रोजी झाला. ते छत्रपती शाहू महाराज, राजर्षी शाहू महाराज, कोल्हापूरचे शाहू व चौथे शाहू असे वेगवेगळ्या नावाने प्रसिद्ध आहेत. त्यांनी बहुजन समाजाच्या उद्धारासाठी आणि मागासवर्गीय समाजाच्या विकासासाठी मोलाचे कार्य केले. कानपूरच्या कुर्मी समाजाने महाराजांना राजर्षी ही पदवी बहाल केली. २ एप्रिल १८९४ रोजी शाहू महाराजांनी गादीचे अधिकार हाती घेतले आणि ते कोल्हापूरचे छत्रपती झाले. छत्रपती शाहू महाराजांनी १८९४ ते १९३२ या त्यांच्या कारकीर्दीत अनेक सुधारणा घडवून आणल्या. त्यांच्या या २८ वर्षाच्या राज्यकारभारात त्यांनी शिक्षणाला अत्यंत महत्त्व देऊन विद्यार्थ्यांसाठी शिक्षण हे मोफत व सक्तीचे केले तसेच शिष्यवृत्ती आणि वस्तीगृहाची सुविधा उपलब्ध करून दिली.छत्रपती शाहू महाराजांनी या सोबतच शेती, उद्योगधंदे व्यापार आणि सहकार क्षेत्रात सुद्धा अलौकिक असे कार्य केले आहे. त्यांच्या या कार्याचा आढावा प्रस्तुत शोधनिबंधात घेण्यात आला आहे.

शिक्षण विषयक विचार :

छत्रपती शाहू महाराजांनी १९ व्या शतकात मानवाच्या कल्याणासाठी शिक्षणाला अधिक महत्त्व दिले. शिक्षणाचा अभाव हेच बहुजन जनतेच्या मूळ प्रश्नांचे कारण असल्यामुळे बहुजनांसाठी सरकारने प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करण्याची मागणी त्यांनी सरकारकडे केली होती. याच अनुषंगाने १९१३ मध्ये त्यांनी कोल्हापूर संस्थानांमध्ये शिक्षण विषयक कायदा पारित करून शिक्षणासाठी होणाऱ्या खर्चाची तरतूद केली. शिक्षणाचा प्रसार झपाट्याने व्हावा म्हणून त्यांनी राजाराम कॉलेजची स्थापना केली तसेच या कॉलेजमध्ये शिकणाऱ्या बहुजन समाजाच्या विद्यार्थ्यांना प्रवेश शुल्क माफ करून शिष्यवृत्ती दिल्या. त्यांच्या मते शिक्षण हे मानवी भांडवलातील गुंतवणूक असून त्यामुळे मानवाचा विकास होऊन त्यांच्या क्षमतेत वाढ होते. यावरून छत्रपती शाहू महाराजांचा शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन खूपच व्यापक असल्याचे समजते.

संशोधनाची उद्दिष्टे :

१) राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या शेतीविषयक विचारांचा अभ्यास करणे.
२) राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे उद्योगासंबंधीचे विचार जाणून घेणे.
३) राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या व्यापार विषयक विचारांचा अभ्यास करणे.

संशोधन पद्धती :

सदरील शोधणेबंधाच्या संशोधनासाठी दुय्यम साधनसामग्रीचा उपयोग करण्यात आला आहे त्यामध्ये विविध संदर्भग्रंथ, गौरवग्रंथ, विषयाची संबंधित विविध प्रकाशने व इंटरनेटवरील उपलब्ध माहितीचा उपयोग करण्यात आला आहे.

शेती विषयक विचार :

भारतातील बहुसंख्य लोकांचा मुख्य व्यवसाय हा शेती होता. त्यामुळे छत्रपती शाहू महाराजांनी शेतीच्या विकासाला अधिक महत्त्व दिले. त्यांचा असा विश्वास होता की देशाचे कल्याण हे शेती सुधारणेवरच अवलंबून असल्यामुळे शेतीकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. शेतीमध्ये झपाट्याने सुधारणा होण्यासाठी शेतीला शाश्वत स्वरूपाचा पाणीपुरवठा व्हावा या हेतूने त्यांनी लहान व मोठ्या पाटबंधाऱ्याच्या योजना, कृषी शिक्षणासाठी कृषी विस्तार योजना, शेतकऱ्यांना शेतीसाठी आवश्यक ती साधने खरेदीसाठी कमी दराने कर्ज पुरवठा आणि सहकारी पतपेढ्यांसारख्या योजनांची अंमलबजावणी केली. शेतीच्या विकासासाठी महाराजांनी शेती पुरक कर्ज पुरवठा केला तसेच व्हिक्टोरिया मेमोरियल फंड आणि किंग एडवर्ड मेमोरियल फंड यांचाही उपयोग केला. शेतीच्या तुकडीकरणाला सुद्धा महाराजांचा कडाडून विरोध होता. त्यांचे असे म्हणणे होते की, शेतीचे लहान लहान तुकड्यांमध्ये विभाजन झाल्यास शेती किफायातशीर राहत नाही

ISSN No. 2394-5990

आणि त्यामुळे शेतकऱ्यांची प्रगती होत नाही. शेतीचे तुकडीकरण होऊ नये म्हणून त्यांनी १९१३ मध्ये अविभाज्य इनामाचा कायदा करून शेतीची वाटणी करता येणार नाही असे ठरविले. शेतीच्या आधुनिकीकरणाची आज आपण चर्चा करीत असलो तरी याची सुरुवात छत्रपती शाहू महाराजांनी त्यांच्या कारकीर्दीतच सुरू केली होती. सुधारित शेती पद्धतीचा प्रसार करण्यासाठी व शेतीच्या आधुनिकीकरणासाठी १९१२ मध्ये कोल्हापूर संस्थानात त्यांनी किंग एडवर्ड एग्रीकल्चर इन्स्टिट्यूट ची स्थापना केली. त्यानंतर आधुनिक शेती अवजारांचे एक म्युझियम सुरू करून या म्युझियमच्या माध्यमातून त्यांनी शेतकऱ्यांसाठी सुधारित अवजारे, बी–बियाणे, रासायनिक खते आणि आधुनिक पद्धतीने शेती करण्यासाठी प्रशिक्षणाची व्यवस्था केली. प्रसंगी शेती व जनावरांचे प्रदर्शने भरून शेती सुधारण्यासाठी जे जे करणे शक्य आहे ते सर्व प्रयत्न त्यांनी केले. शेती सोबतच पन्हाळा व भुदरगड येथे महाराजांनी चहाची व कॉफीची लागवड केली तसेच वेलदोडे, कोको, रबर, ताग, अंबाडी, बटाटे, लाख इत्यादी सारख्या नगदी पिकांचे लागवडीचे प्रयोग सुद्धा शाहू महाराजांनी केले होते. त्याचप्रमाणे जांभूळ, आंबा, फणस आणि काजू यासारख्या बागांना प्रोत्साहन देवून अर्थसहाय्य केले होते.

छत्रपती शाहू महाराजांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या ध्येयधोरणांचे अंमलबजावणी त्यांच्या १३ दिवसांच्या राज्यरोहनानंतर सुरू केली. ही ध्येय धोरणे खेड्यापाड्यातील रयतेशी संबंधित होते. त्याकाळी रयत प्रामुख्याने दुष्काळ आणि प्लेग सारख्या नैसर्गिक संकटांचा सामना करीत होती. यातून जनतेला वाचविण्यासाठी त्यांनी अन्नधान्याचा तर गुराढोरांना वाचविण्यासाठी गवत चाऱ्याचा पुरवठा केला. दुष्काळावर कायमची मात करण्यासाठी त्यांनी १९०२ मध्ये सार्वत्रिक पाटबंधारे धोरण जाहीर केले होते. तसेच त्यांच्या असे लक्षात आले होते की, संस्थानी नोकर जेव्हा कामानिमित्त त्या गावी मुक्कामी असत तेव्हा त्यांना उपयोगी पडतील अशा वस्तू, बकरी, कोंबडी, अंडी इत्यादी मोफत वसूल करीत होते. तेव्हा रयतेवर होणारा जुलूम थांबविण्यासाठी महाराजांनी तसा आदेश तातडीने जारी केला होता आणि त्यात असे नमूद केले होते की, अशा लागणाऱ्या गरजेच्या सर्व वस्तू या रोख पैसे देऊन खरेदी कराव्यात. छत्रपती शाहू महाराजांना गोरगरीब जनतेविषयी व शेतकऱ्यांविषयी खूपच जिव्हाळा होता. कोल्हापूर हे पहिल्यापासूनच ऊस आणि गुऱ्हाळासाठी प्रसिद्ध होते त्यामुळे तेथे ऊसाचे व गुळाचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होत होते. मात्र हे करत असताना अनेकदा शेतकऱ्यांचे हात ऊस गाळताना घाण्यात सापडत होते त्यांचे हे दुःख असह्य होते म्हणून महाराजांनी नवीन पद्धतीने ऊस गाळपाचे घाणे शोधून काढले व शेतकऱ्यांना या दुःखातून मुक्त केले. शेतीला पूरक जोड व्यवसाय म्हणून मधुमक्षिका पालन उद्योग महाराजांनी सुरू केला. मात्र या उद्योगांचे संपूर्ण भारतात कुठेही प्रशिक्षणाची सोय नव्हती तरीसुद्धा हा उद्योग त्यांनी मोठ्या जिद्दीने व चिकाटीने सुरू करून कोल्हापूरला या उद्योगाचे जनकत्व प्राप्त करून दिले. थोडक्यात छत्रपती शाहू महाराजांनी शेतीपूरक व्यवसायाला महत्त्व देऊन त्यामध्ये शेतीसाठी लागणाऱ्या जनावरांची पैदास, कोंबडी आणि दुग्ध व्यवसाय अशा शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवून देणाऱ्या आर्थिक बाबींचा विचार केला आहे. आज कोल्हापूर जिल्हा शेती, उद्योगधंदे आणि सहकार क्षेत्रात अग्रेसर दिसत असला तरी याची संपूर्ण पायाभरणी छत्रपती शाहू महाराजांनी केली होती. एवढेच नव्हे तर महाराष्ट्रातील हरितक्रांतीचे पहिले ठिकाण म्हणून कोल्हापूर संस्थानाकडेच पाहिले जाते.

राधानगरी धरण प्रकल्पाची निर्मिती :

छत्रपती शाहू महाराज सन १९०२ मध्ये युरोप दौऱ्यावर गेले होते. युरोपातील लोकांनी निसर्गातील साधन संपत्तीचा कसा पुरेपूर वापर करून घेतला आहे याचे त्यांनी बारकाईने निरीक्षण केले. पुढे याच निरीक्षणातून त्यांनी शेतीच्या व पिण्याच्या पाण्याचे व्यवस्था म्हणून राधानगरी धरणाचा प्रकल्प हाती घेतला. सन १९०७ मध्ये छत्रपती शाहू महाराजांनी राधानगरी धरणाची आखणी केली. परंतु आर्थिक आणि तंत्रज्ञानाच्या अडचणींमुळे धरणाच्या कामात अनेक अडचणी निर्माण झाल्या. तरीसुद्धा त्यांनी चिकाटीने धरणाचे काम सुरू ठेवले. मात्र त्यांच्या हयातीत हे धरण पूर्ण होऊ शकले नाही पुढे राजाराम राजांनी हे धरण पूर्ण केले. त्यानंतर या धरणाच्या पायथ्याशी विद्युत निर्मिती केंद्राची स्थापना करण्यात आली.

शेतीच्या विकासासाठी पाण्याची आवश्यकता असते हे शाहू महाराजांनी हेरले होते. सततच्या दुष्काळामुळे पिण्याच्या पाण्याची समस्या सुद्धा गंभीर होत चालली होती. शेतीसाठी लागणाऱ्या पाण्याची आणि पिण्याच्या पाण्याची समस्या कायमस्वरूपी सुटावी याच हेतूने छत्रपती शाहू महाराजांनी तळी, विहिरी आणि बंधारे बांधण्यास प्रोत्साहन देऊन अर्थसाह्य केले होते. यामुळे सन १९१५–१६ मध्ये विहिरींपासून ३९८४५ एकर जमीन नद्यांपासून ३९७८३ एकर जमीन आणि तलावांपासून २३२ एकर जमिनींना पाणीपुरवठा करण्यात आला होता. आज कोल्हापुरात दिसत असलेल्या हरितक्रांतीचा खरा प्रणेता म्हणून छत्रपती शाहू महाराजांकडेच बघितले जाते.

उद्योग, व्यापार व सहकार विषयक विचार :

छत्रपती शाहू महाराजांनी उद्योगधंद्यासंबंधीचे आर्थिक धोरण स्पष्ट केले होते. त्याअगोदर असा समज होता की, उद्योग, व्यवसाय आणि व्यापार असे आर्थिक व्यवहार वाढविण्याचे काम हे राजकीय किंवा शासनाचे नाही आणि हेच धोरण ब्रिटिशांनी अवलंबिले होते. मात्र शाहू महाराजांनी अशा विचारांना जुगारून आर्थिक संपन्नता ही औद्योगीकरणावर अवलंबून असून जोपर्यंत उद्योगधंदे भरभराटीस येणार नाही तोपर्यंत आर्थिक संपन्नता होणार नाही अशी त्यांची पक्की खात्री होती. म्हणून ते म्हणतात लोकांनी एकत्र येऊन सहकारी कारखाने, सहकारी संस्था व सहकारी बाजारपेठांची स्थापना केली पाहिजे. विशेष म्हणजे अशी स्थापना करताना ती एका ठिकाणी केंद्रित न करता विविध ठिकाणी ती स्थापन केली पाहिजे जेणेकरून तेथील स्थानिक लोकांना रोजगार उपलब्ध होईल. याच उद्देशाने त्यांनी इचलकरंजी येथे सर्वप्रथम एक जिनिंग फॅक्टरी सुरू केली. त्यानंतर कोल्हापूरमध्ये दोन, शिरोळला, चिंचलीला आणि गडहिंग्लज येथे प्रत्येकी एक जिनिंग फॅक्टरी सुरू केली. तसेच उद्योगधंदे व व्यापार वाढीच्या दृष्टिकोनातून वाहतुकीची साधने महत्त्वाचे असतात म्हणून त्यांनी रस्ते व रेल्वेच्या विकासावर सुद्धा लक्ष केंद्रित केले होते. छत्रपती शाहू महाराजांनी १९ व्या शतकात उद्योग व व्यापाराच्या विकासासाठी खासगी, सार्वजनिक, सहकारी व संयुक्त अशा क्षेत्रात उद्योगांची उभारणी केली. त्यांचे असे मत होते की, जोपर्यंत देशात उद्योगधंदे व व्यापार वाढणार नाही तोपर्यंत देशाचा विकास होणे शक्य नाही. याच उद्देशाने छत्रपती शाहू महाराजांनी खासगी उद्योगांना प्रोत्साहन देऊन सार्वजनिक क्षेत्रामध्ये शाहू छत्रपती मिल ची स्थापना केली. त्याचबरोबर विणकारांच्या संस्था सुरू करून खासगी मुद्रण संस्थांना प्रोत्साहन दिले. कागद कारखाना, तेल गिरण्या आणि द कोल्हापूर मोटार सर्व्हिसेस अशा विविध उद्योगांची स्थापना केली.

छत्रपती शाहू महाराजांनी १९१२ मध्ये सहकार विषयक कायदा करून अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक आणि बलभीम को-ऑपरेटिव्ह बँक ची स्थापना केली. विशेष बाब म्हणजे आज सुद्धा कोल्हापूर जिल्हा सहकार क्षेत्रात आघाडीवर असल्याचे दिसून येते. त्यांचे असे मत होते की अनेक लोकांनी एकत्र येऊन एकमेकांना सहकार्य केले पाहिजे कारण एकमेकांच्या सहकार्यातून लवकरात लवकर विकास साधता येतो. देशाच्या विकासात व्यापार उद्योगांना अत्यंत महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. परंतु आपण व्यापार उद्योगातच मागे असल्याचे स्पष्ट मत छत्रपती शाहू महाराजांनी व्यक्त केले होते. हे त्यांच्या १९१७ मध्ये अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या केलेल्या अध्यक्षीय भाषणातून स्पष्ट होते. ते म्हणतात आपण फक्त शेतकरी किंवा सैनिक एवढ्या पुरतेच मर्यादित न राहता मराठी माणसांनी व्यापार उद्योगात शिरावे आणि स्वतःची प्रगती करून देशाचे प्रगती करावी.

छत्रपती शाहू महाराजांनी विकासासाठी बाजारपेठेचे महत्त्व ओळखले होते. परंतु बाजारपेठांचे भौगोलिक दृष्टिकोनातून केंद्रीकरण न होता विकेंद्रीकरणाला त्यांनी महत्त्व दिले. त्यांच्या सुरुवातीच्या काळात कोल्हापूर संस्थानात व्यापाराची स्थिती फारशी चांगली नसल्यामुळे प्रमुख अशा बाजारपेठा नव्हत्या. त्यामुळे कोल्हापूर संस्थानात उत्पादित होणारा उत्कृष्ट प्रतीचा गुळ कोकणात राजापूरच्या बाजारपेठेत उतरवून तेथून तो गुळ मुंबई सारख्या ठिकाणी पाठविला जाई. गुळ चांगल्या प्रतीचा असल्यामुळे हा गुळ राजापुरी गुळ म्हणून सर्वत्र प्रसिद्ध झाला होता. गुळ कोल्हापूरचा पण केवळ राजापूरच्या बाजारपेठेमुळे त्याला राजापुरी गुळ म्हणून प्रसिद्धी मिळाली हे शाहू महाराजांच्या लक्षात आले होते. ही परिस्थिती बदलण्यासाठी शाहू महाराजांनी शाहूपुरी ही नवीन बाजारपेठ वसविण्याचे काम सुरू करून स्पिनिंग अँड विव्हींग मिल, गुळाची बाजारपेठ आणि शेतकरी सहकारी संस्थांची स्थापना केली. तसेच कोल्हापूर, कागल आणि निपाणी येथील व्यापाऱ्यास खास सवलती देऊन व्यापारास प्रोत्साहन दिले. त्यामुळे संस्थानातील शेतीमालास हक्काची बाजारपेठ मिळून आर्थिक व्यवहारात वाढ झाली.

सारांश :

छत्रपती शाहू महाराज हे थोर समाजसुधारक होते. त्यांनी समाजाच्या विकासासाठी अनेक महत्त्वपूर्ण कार्य केले. त्यांच्यावर युरोप खंडातील राजकीय सामाजिक आणि आर्थिक बदलांचा प्रभाव होता. परंतु भारतातील सामाजिक चित्र हे एकदम उलटे होते येथील समाज हा अशिक्षित, अज्ञानी आणि रूढी परंपरावादी होता. या परंपरेतून समाजाला बाहेर काढले पाहिजे या विचाराने शाहू महाराजांनी मागासलेल्या समाजाचे उत्थान करून बहुजनांचा सांस्कृतिक सामाजिक आणि आर्थिक विकास करण्याचा संकल्प केला होता. छत्रपती शाहू महाराजांनी शिक्षणाचा प्रसार अस्पृश्यता निवारण भटक्या जातीच्या विकासाचे कार्य वस्तीगृहाची स्थापना आरक्षणाचे धोरण या सामाजिक कार्यासोबतच शेतीमध्ये नवनवीन सुधारणा करून आधुनिक पद्धतीने शेती करण्यावर भर दिला. सोबतच उद्योगधंदे व्यापार आणि सहकार यांचे विकासातील महत्त्व ओळखून त्यासाठी सुद्धा आवश्यक ते बदल त्यांनी घडवून आणले होते.

ISSN No. 2394-5990

संदर्भग्रंथ :

१. जयसिंगराव पवार, राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधनी, कोल्हापूर, २००१.

२. नाईक तु. बा., छत्रपती शाहू महाराज, मेहता पब्लिकेशन हाऊस, पुणे, २००५.

३. पाटील शामराव, भास्कर धारावकर, राजर्षी शाहू छत्रपतींचे निवडक आदेश, मुंबई, १९८९.

४. साळुंके नानासाहेब, शाहूंच्या आठवणी, वृषाली प्रकाशन, कोल्हापूर, २००९.

५. भगत रा. तू., राजर्षी शाहू महाराज जीवन व शिक्षण कार्य, रिया पब्लिकेशन, कोल्हापूर,२०१६.

६. कीर धनंजय, राजर्षी शाहू छत्रपती, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, २०१२.

■■■

राजर्षी शाहू महाराज व सत्यशोधक समाज

प्रा.डॉ. हनमंत महादेव लोंढे
प्रोफेसर व इतिहास विभाग प्रमुख
कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय पंढरपूर
जि. सोलापूर
मो.नं.९६०४४०४२०५

प्रस्तावना :

१९ वे शतक भारताच्या दृष्टिकोनातून अतिशय महत्त्वाचे आहे. ब्रिटिशांनी संपूर्ण भारतावर आपला अंमल सुरू केला होता. समाजामध्ये अनेक धार्मिक व जातीमध्ये अनेक पद्धती सुरू झाल्या होत्या. जातीव्यवस्था कडक झाली होती. ब्राह्मण्यवादाचे स्त्रोम मोठ्या प्रमाणात वाढले होते. समाजसुधारण्याची गरज भासत होती. अशावेळी एक तेजस्वी पुरुष महाराष्ट्राच्या सामाजिक क्रांतीच्या क्षितिजावर तळपू लागला. तो पुरुष म्हणजे कोल्हापूरचा राजा राजर्षी शाहू महाराज होय. त्यांच्या कार्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्व केवळ कोल्हापूर संस्थानापुरते मर्यादित न राहता संपूर्ण महाराष्ट्रातच नव्हे तर भारतातही लोकप्रिय झाले .राजा असून राजपदाचा डामडौल न करीता आपले राजपद सर्वसामान्यांकरता समर्पित केले.

भारतीय समाजात सर्वांगीण समता, स्वातंत्र्य आणि बंधुत्व ही त्रिसूत्री प्रत्यक्षात कार्यवाहीत व्हावी ज्या महापुरुषांनी आपले आयुष्य सर्वस्वी पणाला लावले. त्यामध्ये महात्मा जोतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे महत्त्वाचे आहेत. सुप्रसिद्ध चरित्रकार धनंजय कीर यांनी राजर्षी शाहू छत्रपतींना प्रेषित असे संबोधले आहे. त्यांनी दिलेली उपाधी अगदी योग्य अशी आहे.'प्रेषित' म्हणजे ईश्वराचा दूत. त्यानी ईश्वराचा दूत होऊन सर्वसामान्य जनता, दलित, पीडित यांच्यासाठी 'परमेश्वर' बनून कार्य केले. त्यांनी केलेले कार्य महान आहे. राजर्षी शाहू छत्रपती हे महात्मा ज्योतिबा फुले यांना आपले गुरुस्थानी मानत असत. महात्मा फुले यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाला सर्वसामान्यांपर्यंत पोहोचण्यासाठी कोल्हापूर संस्थानांमध्ये चळवळ उभारली. या चळवळीला राजाश्रय दिला. या चळवळीने पुरोगामी विचाराचा मोठ्या प्रमाणात प्रसार व प्रचार केला.

सत्यशोधक समाजाची स्थापना :

महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाज का व कसा स्थापन केला याचा सविस्तर वृत्तान त्यांचे एक सहकारी तुकाराम हनुमंत पिंजण यांनी दिला आहे. तर सत्यशोधक चळवळीचा पहिला अहवाल सांगतो की,ब्राह्मण, भट, जोशी, उपाध्ये इत्यादी लोकांच्या दास्यत्वापासून शूद्र लोकास मुक्त करण्याकरिता व आपल्या मतलबी ग्रंथाच्या आधारे आज हजारो वर्षे ते शूद्र लोकास नीच मानून गफलतीने लुटीत आले आहेत. यास्तव व सदुपदेश व विद्याद्वारे यास त्यांचे वास्तविक अधिकार समजून देण्यासाठी म्हणजे धर्म व व्यवहारासंबंधी ब्राह्मणांचे बनावट व कार्य साधक ग्रंथापासून त्यास मुक्त करण्याकरता काही सुज्ञ शूद्र मंडळींनी हा समाज तारीख २४ सप्टेंबर १८७३ इसवी सन रोजी स्थापन केला. या समाजात राजकीय विषयावर बोलणे वर्ज आहे.

कोल्हापूरमध्ये सत्यशोधक समाजाची स्थापना :

महात्मा फुले यांनी पुणे येथे सत्यशोधक समाजाची स्थापना केली. ते होते तोपर्यंत समाजाचे काम जोराने सुरू होते तथापि १८९० मध्ये त्यांचा मृत्यू झाला. त्यानंतर समाजाच्या कार्याची गती मंदावत गेली. महात्मा फुले यांचे सहकारी व कामगारांचे पुढारी नारायण मेघाजी लोखंडे यांनी सत्यशोध समाजाला पुन्हा गती देण्याचा प्रयत्न केला. परंतु १८९७ मध्ये त्यांचीही मृत्यू झाला. त्यामुळे पुन्हा सत्यशोधक समाजाच्या कार्याला ओहोटी लागली. याच काळात वेदोक्त प्रकरण महाराष्ट्रात गाजले ब्राह्मण्यवादाविरोधात असंतोष निर्माण झाला. कोल्हापूरची भूमी सत्यशोधक चळवळीच्या पुनरुज्जीवनास अनुकूल बनली. कोल्हापूरमध्ये परशुराम घोसरवाडकर यांच्या अध्यक्षतेखाती ११ जानेवारी १९११ रोजी सभा घेऊन सत्यशोधक कार्यकर्त्यांनी श्रीशाहू सत्यशोधक समाज स्थापन करण्यात आला. या सभेत अध्यक्ष म्हणून भास्कररराव जाधव उपाध्यक्ष म्हणून आप्पासाहेब लठ्ठे मुख्याधिकारी म्हणून महादेव डोंगरे व कार्यवाहक म्हणून हरिभाऊ चव्हाण यांची नियुक्ती करण्यात आली. राजश्री शाहू महाराजांचे नाव सत्यशोधक समाजास जोडले असले तरी ही चळवळ सत्यशोधक चळवळ म्हणून नावारूपास आली.

ISSN No. 2394-5990

राजर्षी शाहू महाराजांचे कार्य :

वरील प्रमाणे कोल्हापूरमध्ये सत्यशोधक होळीचा पाया घातला गेला. या चळवळीला राजर्षी शाहू महाराजांनी उघडपणे पाठिंबा दिला. महाराजांच्या पाठिंबामुळे या चळवळीला गती मिळाली. पुरोहिता शिवाय अनेक धार्मिक कार्यक्रम होऊ लागले. त्यामुळे पुरोहित वर्गामध्ये अस्वस्थता निर्माण झाली. भास्करराव जाधवांच्या मार्गदर्शनाखाली जुलै १९१३ मध्ये कोल्हापुरात सत्यशोधक शाळा स्थापन करण्यात आली. सत्यशोधक शाळेत शिक्षक म्हणून नेमलेले विठ्ठलराव डोणे हे राजवाड्यातील एक सेवक होते. त्यांचा पगार दरबारातून दिला जात होता. त्याचप्रमाणे शाळेसाठी जागा व इमारत ही संस्थानाकडून देण्यात आली होती. शाळेचा अभ्यासक्रम भास्करराव जाधवांच्या मार्गदर्शनाखाली तयार करण्यात आला होता. धार्मिक विधीचे शिक्षण देणारे घरचा पुरोहित यासारखे ग्रंथ ही तयार करण्यात आले होते. इसवी सन १९१६ मध्ये महाराजांनी सत्यशोधक मतानुसार चालणारे एक मिश्र भोजनगृह कोल्हापूरमध्ये सुरू करण्याचे ठरविले. दरबारी सेवक केशवराव पाटील यांच्यावर ही जबाबदारी सोपविण्यात आली. भोजनाच्या खर्चासाठी ५०० ते ६०० रुपये मासिक खर्चाची तरतूद महाराजांनी केली. जागा, इमारत उपलब्ध करून दिली. बाबुराव यादव हे सत्यशोधक चळवळीचे खंदे समर्थक होते. त्यांना सत्यशोधक समाजाची मुलुख मैदान तोफ म्हणून ओळखले जात होते. ते शाहू महाराजांचे अत्यंत जवळचे विश्वासू होते. त्यांनी सत्यशोधक समाजाच्या विचाराचा प्रसार करण्यामध्ये मोलाची कामगिरी केलेली दिसून येते.

सत्यशोधक समाजाच्या कार्याला शाहू महाराजांच्या कडून मोठ्या प्रमाणात अर्थसाह्य ही केले जात होते. १५ ऑगस्ट १९२० रोजी च्या हुकूमन्वये महाराजांनी समाजासाठी १५०० रुपये मंजूर करून ते भास्करराव जाधवाकडे दिल्याची दप्तरी नोंद आहे.

शिवाजी क्षेत्रीय वैदिक पाठशाळा :

१९२० मध्ये शाहू महाराजांनी सत्यशोधक समाजाच्या कार्याला पूरक होणारे अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. जून मध्ये त्यांनी राजवाड्यातील देवदेवतांच्या व पूर्वजांच्या समाधीच्या पूजा ज्या ब्राह्मण पुरोहिताकडून होत होत्या त्या बंद करून मराठा पुरोहिताकडून सुरू करण्याचा हुकूम दिला. त्याप्रमाणे मराठा पुरोहित तयार करण्यासाठी खास प्रशिक्षित शाळा सुरू करण्यात आल्या. महादेवराव डोंगरे व मामासाहेब खानविलकर यांच्यावर ही जबाबदारी सोपवण्यात आली. ६ जुलै १९२० रोजी शिवाजी क्षत्रिय वैदिक पाठशाळाया नावाची वैदिक शिक्षण देणारी संस्था मामासाहेब खानविलकरांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आली. या शाळेत अनेक मराठा पुरोहित निर्माण केले.

सत्यशोधक जलशे :

राजश्री शाहू महाराजांनी सत्यशोधक चळवळीचा प्रसार व प्रचार करण्यासाठी अनेक मार्ग निवडले. त्यामध्ये महत्त्वाचे म्हणजेसत्यशोधक जलशेहोय. त्या काळातजलसाकिंवा तमाशाहे ग्रामीण करमणुकीचे महत्त्वाचे साधन होते. महाराजांनी हे ओळखून करमणूक प्रधान तमाशाचे रूपांतरसत्यशोधक जलशा मध्ये केले. अनेक जलसापथके तयार करण्यात आली. भीमराव महामुनी, भाऊराव पाटोळे, तातोबा यादव, गणपतराव मोरे, यांचे प्रमुख जलसे होते. हे सर्व शाहीर होते. सोनतळी कॅम्प या ठिकाणी या जलस्यांचे पहिले प्रयोग शाहू महाराजांच्या समोर सादर केले जात असत. महाराज त्यांना मार्गदर्शन करीत असत. त्यानंतर जलशाच्या प्रचार दौऱ्याची आखणी केली जात असत.

जलशाच्या कार्यक्रमामधून करमणुकीबरोबरच अज्ञानी जनतेचे मोठे समाज प्रबोधन होत असत. देव व मानव यांच्यामध्ये ब्राह्मण पुरोहिताची गरज नाही. हे सांगितले जात होते. सर्व साक्षी जगत्पती, त्याला नकोच मध्यस्थी, हे सत्यशोधक चळवळीचे ब्रीदवाक्य होते. ते जलश्यामधून सांगितले जात असत. प्रबोधनकार ठाकरे यांनीही जलशाच्या कार्याबद्दल गौरव उद्गार काढले आहेत. त्या काळात पूर्वीचा सातारा जिल्हा हा सत्यशोधक चळवळीचा बालेकिल्ला बनला होता. १९२० मध्ये कराड या ठिकाणी मुकुंदराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली सत्यशोधक समाजाची परिषद भरविण्यात आली. या परिषदेला कराडमधील ब्राहमण्यवाद्यांनी परिषद होऊ नये म्हणून विरोध केला, परंतु या परिषदेला शाहू महाराजांचा आशीर्वाद होता. शाहू महाराजांनी तंबू, खुर्च्या, जाजमे सामानाची केलेली मदतच कारणीभूत ठरल्याची नोंद दीनमित्रया वृत्तपत्राने केली आहे. याच काळात सातारा जिल्ह्यात सत्यशोधक कार्यकर्ते केशवराव विचारे व भावराव पाटील यांचे कार्य विशेष गाजत होते. विशेषता कर्मवीर भाऊराव पाटलांच्या सत्यशोधक जलशाने ग्रामीण भागात लोकप्रियता मिळवली होती.

सारांश :

सत्यशोधक समाज हा भूमाता नैसर्गिक अंकुर होता. या समाजाचा मूळ संस्थापक हा मुळात शूद्र समजल्या जाणाऱ्या जातीत जन्मलेला होता. शूद्र, अस्पृश्य समाजावरील अन्यायाला वाचा फोडणे व त्यांना स्वाभिमानाने जगण्याचा अधिकार देणे हेच त्यांचे ध्येय होते. ब्राह्मण्यवादातून त्यांना सोडवणे , मुक्त

करणे हे त्यांचे ध्येय होते. त्यासाठी महात्मा फुले यांनी शिक्षणाचा मार्ग स्वीकारला. अस्पृश्यांसाठी अनेक शाळा सुरु करून अस्पृश्य समाजाला ब्राह्मण्यवादापासून मुक्ती मिळवण्याचा त्यांनी प्रयत्न केला. त्यांचे अपुरे कार्य लोकराजा राजर्षी शाहू महाराज यांनी पूर्ण केले. शाहू महाराजांनी सत्यशोधक समाजाचा पुरस्कार करून पुरोगामी विचारधारा समाजात रुजविण्याचा प्रयत्न केला.

सारांश शाहू महाराजांच्या प्रेरणेने व मदतीने सत्यशोधक समाजाचे खरे पुनर्जीवन होऊन कोल्हापूर संस्थानामध्येच नाही तर महाराष्ट्रात सत्यशोधक चळवळ वाढत गेली. परिणामी सत्यशोधक तसेच ब्राह्मणेतर चळवळीतील कार्यकर्ते महाराजांना प्रेरणास्थानी मानू लागले. ६ मे १९२२ रोजी राजर्षी शाहू महाराजांचे मुंबई येथे निधन झाले. ७ मे रोजी कोल्हापुरातील पंचगंगा नदीच्या काठावर महाराजांच्या वर अंत्यसंस्कार करण्यात आले. आत्तापर्यंतच्या छत्रपतींचे अंत्यसंस्कार ब्राह्मण पुरोहिताकडून होत असत ही प्रथा महाराणी लक्ष्मीबाई साहेब व नूतन छत्रपती राजाराम महाराज यांनी मोडून काढली. त्यांनीशिवाजी वैदिक विद्यालयच्या मराठा विद्यार्थ्याकडून महाराजांचे अंत्यसंस्कार वेदमंत्राच्या घोषात केले. महाराजांच्या जीवन निष्ठेला शोभेल असेच हे कार्य होते.

शाहू महाराजांच्या मृत्युने महाराष्ट्रातील सत्यशोधक चळवळीला जबरदस्त धक्का बसला. थोर सत्यशोधक व मजागृतीफकार भगवंतराव पाळेकरांनी महाराजांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करताना म्हटले आहे की,सत्यशोधक चळवळीचा उजवा हात गळून पडला आणि अस्पृश्य मानलेल्या वर्गातील लोकांच्या मस्तकावरील प्रेमाचे व औदार्याचे छत्र मोडून पडले आहे.सत्यशोधक समाजाने १९२७ मध्ये महात्मा गांधींना दिलेल्या मानपात्रात शाहू महाराजांचे स्मरण करताना नमूद केले आहे की,बहुसंख्य शेतकरी लोकांनी मानसिक गुलामगिरीतून मुक्तता करण्यासाठी शाहू महाराजांनी सत्यशोधक चळवळीस प्रोत्साहन दिले.भास्करराव जाधव महाराजांच्या कार्याचा गौरव करताना म्हणतात की,सत्यशोधक समाजाला यश मिळाले आहे त्याचे सर्व श्रेय शाहू महाराजांच्या प्रयत्नाला आहे. असा एक महान राजर्षी राजा होऊन गेला.

संदर्भ ग्रंथ सूची :

१) द. रा. बगाडे – छ. शाहू महाराज आणि कायदेभान , १९८२
२) पी. बी. साळुंखे (संपादक) – राजर्षी शाहू गौरव ग्रंथ, १९७६
३) रमेश जाधव – राजर्षी शाहू छत्रपती : वाद आणि वास्तव, १९९२
४) जयसिंगराव पवार – राजर्षी शाहू: एक दृष्टिक्षेप, १९८९
५) जयसिंगराव पवार – (संपादक) राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ २००१
६) मीना कुलकर्णी – श्री शाहू छत्रपतीचे अर्थकारण, १९७५
७) माधवराव बागल–सत्यशोधक हिरक महोत्सव ग्रंथ, १९३३
८) धनंजय कीर – राजर्षी शाहू छत्रपती
९) य. दि. फडके – शाहू छत्रपती आणि लोकमान्य
१०) तू .बा .नाईक – छत्रपती राजर्षी शाहू महाराज.

■■■

ISSN No. 2394-5990

अस्पृश्य समाजांच्या उन्नतीत राजश्री छत्रपती शाहू महाराजांची भूमिका

प्रा.डॉ.चौधरी दत्तात्रय मल्हारी
इतिहास विभाग, कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय,
पंढरपूर, स्वायत
Email:- chaudhridattatray@gmail.com
Mobile No:- 9766624995

प्रास्ताविक :

भारतातील महान समाजसुधारक म्हणून राजश्री छत्रपती शाहू महाराजांना ओळखतात. कोल्हापूर संस्थानाचे छत्रपती म्हणून इ.स.१८८४ ते १९२२ याकाळात त्यांनी काम पहिले. इग्लंडच्या राणीने खऱ्या अर्थाने जनतेचे राजे म्हणून त्यांचा बद्दल गौरवपूर्ण उदगार काढलेले आहे. ब्रिटीश राजसत्तेच्या काळात सामान्य जनतेला न्याय मिळून देण्यासाठी प्रयत्न केले. बहुजन समाजाच्या सामाजिक उन्नतीसाठी प्रयत्न केले व त्यांनी सामाजिक प्रगतीला गती प्राप्त करून दिली. सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक कार्याव्दारे बहुजन समाजाला जागृत केले व त्यांची सर्वांगीण प्रगती घडून आणली. प्रजाहितदक्ष सत्ताधीश म्हणजे राजश्री छत्रपती शाहू महाराज होय. एक आदर्श राजा, बहुजन समाजाचा नेता, प्रतिगामी महाराष्ट्राला परोगामी बनविण्याचे महान कार्य केले. आधुनिक महाराष्ट्राच्या निर्मितीत शाहूमहाराजांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते.

जन्म व बालपण :

राजश्री छत्रपती शाहू महाराजांचा २६ जून १८७४ रोजी कागलच्या घाटगे घराण्यात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव जयसिंगराव तर आईचे नाव राधाबाई होते. कोल्हापूर संस्थानाचे राजे चौथे शिवाजी महाराज यांच्या मृत्यू त्यांची पत्नी आनंदीबाईने १७ मार्च १८८४ रोजी यशवंतरावांना दत्तक घेतले व त्यांचे नामकरण विधी करून त्यांचे नाव शाहू महाराज असे ठेवले. त्यांचे शिक्षण ब्रिटीश अधिकारी फ्रेजर यांच्या मार्गदर्शनाखाली झाले व पुढील शिक्षण राजकोटच्या राजकुमार कॉलेज मध्ये झाले व धारवाड येथे झाले. सहलीद्वारे मिळालेले व्यवहार ज्ञान या मुले शाहू महाराजांचे व्यक्तिमत्व विकसित होत गेले व पुढे बडोद्याचे गुणाजीराव खानविलकर यांची कन्या लक्ष्मीबाई यांच्याशी त्यांचा विवाह झाला. विवाहाच्या वेळी शाहूमहाराजांचे वय १७ वर्ष तर लक्ष्मीबाईचे वय १२ वर्षाहून कमी होते. २ एप्रिल १८९४ रोजी त्यांचा राज्यारोहण समारंभ झाला. त्यांनी २८ वर्ष कोल्हापूर संस्थांनाचा कारभार संभाळला. मुंबई येथे ६ मे १९२२ रोजी त्यांचे निधन झाले. त्यांनी आयुष्यभर मानव समाजाची सेवा केली.

अस्पृश्य समाजाची उन्नती:

सामाजिक शिक्षण :

राजश्री छत्रपती शाहू महाराजांनी बहुजन समाजाच्या शिक्षण प्रसाराच्या कार्याला सुरवात केली. त्यांनी शैक्षणिक कार्याद्वारे सामाजिक लोकशाही निर्माण करण्याचा प्रयत्न केला. कनिष्ठा समाजातील मुलांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली. त्यांनी कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले. तर अस्पृश्यांच्या मुलांना स्वतंत्र वसतिगृहाची स्थापना करून दिली. समाजातील सर्व वर्गाना शिक्षण मिळले पाहिजे अशी त्यांची भूमिका होती.[१]

अस्पृश्य समाजासाठी केलेले कार्य :

अस्पृश्यता हा मानव जातीला लागलेला कलंक आहे असे शाहू महाराजांना वाटत होते. जर अस्पृश्यांची स्थितीत सुधारणा घडवून असेल तर त्यांच्या शिक्षणावर भर दिला पाहिजे असे त्यांचे मत होते. त्यांनी अस्पृश्यांच्या मुलासाठी कोल्हापुरात वसतिगृह निर्माण केले. त्यावेळी मुंबई इलाख्याचे दिवंगत गव्हर्नर यांची कन्या मिस क्लार्क यांचे नाव देण्यात आले. तसेच त्यांनी महार स्कूलची स्थापना केली.तसेच त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनापरदेशात शिक्षणासाठी आर्थिक मदत केली.[२]

जातीभेद निर्मुलन :

अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी राजश्री छत्रपती शाहू महाराजांनी जातीभेद निर्मूलनाला महत्वाचे स्थान दिले.जातीभेद निर्मूलनाचा आदर्श महात्मा फुले यांच्या कडून त्यांनी घेतलेला होता.जातीभेदाचे विषारी फळ म्हणजे अस्पृश्यता होय. त्यांनी अस्पृश्य बांधवांना शिक्षणासाठी शिष्यवृत्त्या ठेवल्या त्यांच्यासाठी स्वतंत्र शाळा काढल्या तसेच वसतिगृहे काढली. त्यांना आर्थिक मदत केली. शिकलेल्या महार, मांग, चांभार, ढोर, इत्यादींना वकिलाच्या सनदा दिल्या.आपल्या संस्थानातील अस्पृश्य

बांधवासाठी सार्वजनिक तळी व विहिरी खुल्या केल्या. यातून जातीभेद निर्मुलनाला चालना दिली.[३]

आंतरजातीय विवाहास चालना :

जातीभेद निर्मूलनला चालना देण्यासाठी रोटी बेटी व्यवहार घडवून यावेत म्हणून पुढाकार घेतला. त्यांनी आंतरजातीय विवाहाला चालना दिली. त्यांनी आपली कन्या धनगर घराण्यातील राजपुत्रास देवून आंतरजातीय विवाहाला प्रोत्साहन दिले. विठ्ठलदास पटेल यांनी मध्यवर्ती कायदेमंडळांत इ.स. १९१८ मध्ये आंतरजातीय विधेयक मांडले होते तेंव्हा शाहूमहाराजांनी या विधेयकाला पाठिंबा दिला होता.[४]

आरक्षण धोरण :

अस्पृश्यता निर्मुलनासाठी शाहू महाराजांनी अनेक प्रयत्न केले. शाहू महाराजांनी अनेक प्रयत्न केले. शाहू महाराजांनी २६ जुलै १९०२ रोजी करवीर गॅझेट मध्ये एक जाहीरनामा प्रसिद्ध केला.सरकारी खात्यात नोकऱ्या देताना ५० टक्के जागा मागासवर्गीयासाठी जागा राखीव ठेवल्या या पदावर मागासवर्गीय सुशिक्षित तरुणाची भारती करावी असे स्पष्ट केले. शाहूमहाराजांचा जाहीरनामा म्हणजे स्वतंत्र भारताच्या आरक्षण धोरणाचा पाया ठरला.[५]

अस्पृश्यांना सार्वजनिक जीवनात प्रवेश :

अस्पृश्यांना आपल्या संस्थानातील प्रशासनात नोकऱ्या दिल्या. शिक्षण घेतलेल्या अस्पृश्यांना तलाठी, शिक्षक या जागेवर नोकऱ्या दिल्या. सार्वजनिक धर्मशाळा,विहिरी, तळी, म्युनिसिपालटी कार्यालय इत्यादी ठिकाणी अस्पृश्यांना मुक्त प्रवेश दिला.[६]

अस्पृश्यता विरोधी कायदे :

सन १९१९ मध्ये वटहुकुम काढून शाळा, दवाखाने , सरकारी नोकरीत अस्पृश्यता पाळणे गुन्हा ठरवला. तसेच बलुतेदारी पद्धत बंद केली. या कायद्याचा भंग केल्यास १०० रुपये दंड व चार दिवस कारावासाची शिक्षा देणारा कायदा केला. सन १९१८ मध्ये एक वटहूकूम काढून पारधी जमातीतील लोकांना रोज पोलीस चौकीवर हजरी देण्याची पद्धत बंद केली.[७]

अस्पृश्यांना रोजगाराच्या संधी:

अस्पृश्यांची आर्थिक स्थितीत सुधारणा करण्यासाठी त्यांना स्वावलंबी बनविण्यासाठी त्यांना स्वतंत्र व्यवसाय करण्यास प्रोत्साहन दिले. दुकान, हॉटेल्स काढावीत म्हणून आर्थिक मदत केली. गंगाराम कांबळे नावाच्या व्यक्तीला कोल्हापूरच्या भर चौकात चहाचे दुकान काढून दिले. महार, मांग,चांभार, भंगी यांना पंडित अशा पदव्या दिल्या. शिक्षित अस्पृश्यांना तलाठी म्हणून नेमले.[८]

अस्पृश्यांच्या परिषदेत सहभाग :

अस्पृश्योध्दारसाठी निरनिराळ्या परिषदा भरवण्यात आल्या.त्यात शाहूमहाराजांनी सहभाग नोंदविला व सामाजिक सुधारणेविषयी आपले विचार वारोंवार मांडले. सन १९२० मध्ये कोल्हापूर संस्थानातील माणगाव या ठिकाणी अस्पृश्यांची परिषद भरविण्यात आली होती.या परिषदेत शाहूमहाराजांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अस्पृश्य मुक्ती चळवळीचे नेतृत्व करण्यास प्रोत्साहन दिले. तसेच दिल्ली येथे भरलेल्या अस्पृश्य परिषदेचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले.

सामाजिक लोकशाहीचा पाया :

सामाजिक लोकशाहीची संकल्पना हि भारतीय विचारांच्या परंपरेत शाहू महाराजांच्या विचार परंपरेत रूढ झाली. अन्यायग्रस्त व विषमतेवर आधारलेली समाजव्यवस्थेत क्रांतिकारक परिवर्तन घडवून आणण्यासाठी शाहू महाराजांनी सामाजिक लोकशाहीचा प्रयोग साकार केला. त्यांचे कार्य कोल्हापूर संस्थाना पुरते मर्यादित असले तरी त्यांची दखल तत्कालीन बुद्धीजीवी वर्गाला घेणे भाग पडले. त्यांनी आपल्या राज्यात सामाजिक शिक्षण, समता, न्याय, विकास, व चळवळीद्वारे सामाजिक लोकशाहीचा पाया घातला.त्यांना सामाजिक लोकशाहीचे आधारस्तंभ म्हंटले जाते.[९]

मूल्यमापन: भारतातील महान समाजसुधारक म्हणून राजश्री छत्रपती शाहू महाराजांना ओळखले जाते. राजश्री छत्रपती शाहू महाराजांनी बहुजन समाजाच्या शिक्षण प्रसाराच्या कार्याला सुरवात करून त्यांनी शैक्षणिक कार्याद्वारे सामाजिक लोकशाही निर्माण करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. राजश्री छत्रपती शाहू महाराजांनी बहुजन समाजाच्या शिक्षण प्रसाराच्या कार्याला सुरवात करून त्यांनी शैक्षणिक कार्याद्वारे सामाजिक लोकशाही निर्माण करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. जातीभेद निर्मूलनला चालना देण्यासाठी रोटी बेटी व्यवहार घडवून यावेत म्हणून पुढाकार घेतला व त्यांनी आंतरजातीय विवाहाला चालना दिलेली दिसून येते.अस्पृश्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा करण्यासाठी व त्यांना स्वावलंबी बनविण्यासाठी स्वतंत्र व्यवसाय करण्यास प्रोत्साहन दिलेले दिसून येथे. अस्पृश्योध्दारसाठी निरनिराळ्या परिषदा भरवण्यात आल्या व त्यात शाहू महाराजांनी सहभाग नोंदविलेला दिसून येतो.

ISSN No. 2394-5990

संदर्भ ग्रंथसूची :

१. भगत रा.तू. राजश्री शाहू छत्रपती : जीवन व शिक्षणकार्य, रिया पब्लिकेशन, कोल्हापूर २०१६, पृ १४२
२. स्नेहल एन सोनवणे व इतर, आधुनिक महाराष्ट्र, सक्सेस प्रकाशन, पुणे २०१९,पृ ५.१५
३. जाधव नरेंद्र, महाराष्ट्रातील मानचिन्हे, मॅजेस्टिक प्रकाशन, पुणे १९९० ,पृ११५
४. नांदेडकर व.गो.,राजकीय विचार व विचारवंत, डायमंड प्रकाशन,पुणे २०११,पृ ६७
५. भगत रा.तु. राजश्री शाहू छत्रपती: जीवन व शिक्षणकार्य, रिया पब्लिकेशन, कोल्हापूर २०१६, पृ ६९
६. स्नेहल एन सोनवणे व इतर, आधुनिक महाराष्ट्र, सक्सेस प्रकाशन, पुणे २०१९,पृ ५.१७
७. जाधव नरेंद्र, महाराष्ट्रातील मानचिन्हे, मॅजेस्टिक प्रकाशन, पुणे १९९० ,पृ११८
८. नांदेडकर व.गो.,राजकीय विचार व विचारवंत, डायमंड प्रकाशन,पुणे २०११,पृ ७०

■■■

राजर्षी शाहू महाराज आणि वेदनिष्ठा: एक अभ्यास

डॉ. साळुंखे उमेश अशोक
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग
कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर
मो. नं. ९७९७१०८४५९
E-mail: usalunke10@gmail.com

सारांश:

राजर्षी शाहू महाराजांवर अर्यधर्माचा प्रभाव होता; याच आर्य धर्माच्या प्रभावामुळे शाहू महाराजांच्या जीवनात वेदनिष्ठा निर्माण झाल्याचे दिसून येते. असे असले तरी शाहू महाराज यांनी कोणत्याही धर्माचा किंवा समाजाचा स्वीकार केलेला नव्हता अथवा कोणत्याही समाजाचे ते अनुयायी नव्हते ते एक राजे होते आणि स्वयंभू राजे होते त्यांच्या विचारातून व कृतीतून त्यांची वेदांवरील निष्ठा दिसून येते. स्वामी दयानंद सरस्वती यांच्या आर्य समाजाचा त्यांच्यावर प्रभाव असल्यामुळे त्यांनी आपल्या कार्यात व विचारात अनेक बदल केले होते. आर्य समाजाला मूर्तीपूजा अमान्य होती तर शाहू महाराजांना ती मान्य होती. वेदनिष्ठ आर्यांनी ङ्गवसुदैव कुटुंबकमफ ची जी संकल्पना मांडली होती ती महाराजांना तत्वतः मान्य होती हे त्यांच्या भाषणावरून दिसून येते. कारण मानवी समतेवर अधिष्ठित असा आर्यधर्म हा केवळ हिंदुस्थानचा राष्ट्रधर्म व्हावा एवढ्यावरच शाहू महाराजांचे विचार थांबत नव्हते तर आर्य धर्माच्या मानवतावादी तत्वांचा जगभर प्रसार व्हावा व तो विश्वव्यापी धर्म बनवा अशीही ते इच्छा बाळगून होते अथवा तसे स्वप्न महाराजांचे होते हे दिसून येते.

प्रस्तावना:

राजर्षी शाहू महाराज आणि वेद हा परस्पर संबंध हा अतिशय चर्चेचा विषय राहिलेला आहे. छ. राजर्षी शाहू महाराज यांच्या जीवनातील वेदोक्त प्रकरणावरून किंवा त्या घटनेपासून महाराज आणि वेद या मुद्द्यावर विचार करणे आवश्यक वाटते. मुळात महाराजांनी वेदांवर आधारित पूजा अर्चा करून घेण्याचा आग्रह म्हणजे त्यांची वेदांवरील निष्ठा सिद्ध होते. वेदांचा महाराजांनी अभ्यास केल्याचे दिसून येते. अर्थात यासाठी त्यांना आर्य समाजाच्या प्रभावातून जावे लागले आणि महाराजांना वर्णाश्रम, ब्राह्मणत्व, आर्य म्हणजे कोण? क्षत्रिय म्हणजे कोण? वेद विद्येचा अधिकार कोणाला याविषयी त्यांचे विचार पाहिल्यानंतर दिसून येते की, महाराजांना वेदांमधील विचार भावले होते व त्या विचारांचा परिणाम त्यांच्या अनेक क्षेत्रातील कामगिरीवर दिसून येतो. परंतु त्यांना वेदांवरील असलेली एका विशिष्ट वर्गाची मक्तेदारी मान्य नव्हती. स्वामी दयानंद सरस्वती, शाहू महाराज, रानडे, लोकहितवादी आदीपासून पांडुरंगशास्त्री आठवले यांच्यापर्यंत अनेकांनी सनातन्यांच्या विरुद्ध जाऊन वेदांचा अभ्यास किंवा वेद जाणून घेण्याचा अधिकार सर्वसामान्यांना व स्त्रियांना उपलब्ध करून दिला.

शाहू महाराज आणि आर्य धर्म :

शाहू महाराजांचा आर्य समाजाशी फार पूर्वीच म्हणजेच विद्यार्थी दशेतच संबंध आला होता. १८८२ च्या हिंदुस्तानच्या शैक्षणिक सफरीत मथुरा या ठिकाणच्या आर्य समाजाने त्यांचा मानपत्र देऊन गौरव केलेला होता. परंतु आर्य समाजाच्या तत्वज्ञानाचा व कार्य पद्धतीचा त्यांना खरा परिचय १९०२ साली झाला.[१] सर्व मनुष्यमात्रास वेदाधिकार ही अर्यसमाजाची घोषणा त्यांच्या ङ्गमनुष्याची समानताफ या उदात्त तत्त्वावर अधिष्ठित होती आणि हेच तत्व महाराजांचे आर्य समाजाविषयीचे आकर्षण वाढविण्यास कारणीभूत झाले होते.

आर्य कोण? आर्य म्हणजे श्रेष्ठ, आर्य म्हणजे सुसंस्कृत, आर्य म्हणजे प्रौढ, आणि आर्य म्हणजे पुजेस पात्र.

कर्तव्यमाचरन्कार्यमकर्तव्यमनाचरन् ।
तिष्ठति प्रकृताचारे स वै आर्य इति स्मृतः।।

करण्यास योग्य असे कार्य जो करतो आणि न करण्यास योग्य असे कार्य जो करत नाही आणि त्यानुसार स्वतःच्या अचारांवर जो स्थिर आहे अशा मानवाला आर्य म्हणतात.[२] ज्या आर्यांनी वेद सांभाळले व वेदांचा प्रसार केला आणि 'कृण्वन्तो विश्वम अर्यम' ची घोषणा केली.

आर्य धर्माचा प्रसार व्हावा हा महाराजांचा विचार आक्रमक नव्हता. इतर धर्माचा उच्छेद करून आर्यधर्माचा प्रभाव पडावा, ही मनिषा बाळगून तो व्यक्त झालेला नाही. आर्य धर्म हा अखिल मनुष्य मात्रास व्यक्तिमत्वाच्या विकासाचे स्वातंत्र्य देणारा व समतेच्या पायावर वागविणारा मानवधर्म असल्याने तो विश्वधर्म झाल्याचे स्वप्न महाराज पाहत होते.

ISSN No. 2394-5990

शाहू महाराजांचे वेदांविषयी विचार :

१९ एप्रिल १९१९ रोजी कानपूर येथील अखिल भारतीय क्षत्रियांची १३ वी सामाजिक परिषद भरली होती याच परिषदेत त्यांना राजर्षी पदवी मिळाली होती. तेथे महाराजांनी आपले वेदांबद्दलचे व वर्णाश्रम पद्धतीबद्दल आपले विचार मांडले आहेत.

वैदिक काळात अशा पद्धतीची स्वतंत्रता होती की, तो कोणी एखाद्या वर्णाचे कर्तव्य करी त्याला त्या वर्णात सामील करून घेतले जाई. वेद आदिकरून शास्त्रांचा अभ्यास करण्यास प्रत्येक स्त्री-पुरुषास अधिकार होता.[३] वैदिक काळात सर्व वर्गांचे ऋषी झालेले आहेत. जो पर्यंत स्त्रिया मंत्र जाणणाऱ्या होत्या तोपर्यंत आर्यावर्त स्वर्गाप्रमाणे होता. 'स्त्रियांनी व शुद्रांनी वेद वाचू नयेत' अशा कल्पित श्रुतींचा आवाज आकाशातूनसुद्धा काढू देत नसत. त्यावेळी शुद्रांनी वेद एकले तर त्यांच्या कानात शिसे ओतले जात नसे. ज्यावेळी वर्णव्यवस्था वंशपरंपरागत रजिस्टर झाली तेव्हा एका वर्णाच्या मनुष्याला दुसऱ्या वर्णाचे काम करणे कठीण होऊ लागले. आणि लोक आपल्या वर्णातील कर्मापासून हळूहळू मुकू लागले. समाजाची घडी बिघडू लागली. शेवटी जी वर्णव्यवस्था गुणकर्मावर आधारित होती ती जन्मावर येऊन बसली.[४] माणूस हीच जात आणि तोच धर्म मानणाऱ्या महाराजांना वर्णश्रेष्ठत्वाचा अहंकार मान्य नव्हता म्हणूनच त्यांनी ब्राह्मणी वर्चस्वाला आव्हान दिले.[५]

वरील विचार मांडताना महाराजांनी निरुक्त, आपस्तंभ, उपनिषद, श्रीमद्भगवद्गीता या ग्रंथाच्या आधारे आपले विचार मांडले आहेत.

शाहू महाराजांची वेदनिष्ठा :

शाहू महाराज आर्य समाजाने प्रभावित असले तरी त्यांना मूर्तीपूजा मान्य होती परंतु आर्य समाजाला मूर्तीपूजा अमान्य होती. महाराज शेवटपर्यंत आपल्या राजवाड्यात देव-देवतांच्या पार्थिव मूर्तींची पूजा करीत राहिले. आर्य समाजाचे होमहवनाचे कर्मकांड देखील त्यांना मान्य नव्हते. शास्त्रीय मूर्तीपूजा त्यांनी अनुसरली होती. अर्थात मुर्तीपुजेतील सगुणोपासना महाराजांना अपेक्षित असावी असे वाटते.

बहुजन समाजाने वेदांचा अभ्यास केला पाहिजे व वेदांचे शिक्षण घेतले पाहिजे असा महाराजांचा आग्रह होता. शाहू महाराजांनी स्थापन केलेल्या वैदिक स्कूल मध्ये एकदा महाराजांनी आपल्या वडिलांचे श्राद्ध घालण्यासाठी विद्यार्थ्यांकडून तशी पूजा करण्याचा आग्रह धरला त्यामुळे सर्व चकित झाले. त्यांना हवा तसा पुरोहित मिळाला असता, तरीही महाराजांनी सांगितले 'हे बघा, ही माझी मुले आहेत, बहुजन समाजाची आहेत. त्यांनी बाराखड्या म्हणू देत; तरी मला ते चालेल, पण मला भटजी पुरोहित नको आहे.'[६]

वेदांच्या अधिकारासाठी महाराजांचा आग्रह होता. तो काही जुनाट वैदिक परंपरांचे पुनरुज्जीवन करण्यासाठी नव्हता. ब्राह्मण वर्गाने मक्तेदारीने वेदांचा अधिकार आपल्याकडे ठेवला होता ती मक्तेदारी महाराजांना मोडून काढायची होती. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी देखील याच दृष्टिकोनातून नाशिकच्या काळाराम मंदिरात प्रवेश केला तो हिंदू म्हणून त्यांना मंदिरात प्रवेश करण्याचा अधिकार होता त्याच्या आग्रहासाठी होता.

शाहू महाराज व स्वामी दयानंद सरस्वती हे समकालीन होते. आर्य समाजाच्या व दयानंद यांच्या विचारांचा त्यांच्यावर प्रभाव असला तरी ते पूर्णतः आर्य समाजाचे अनुयायी नव्हते महाराजांची स्वतंत्र प्रज्ञा होती. ते स्वयंभू राजे होते. स्वामी दयानंद यांनी मूर्तिपूजेचे खंडन केले ही गोष्ट खटकण्यासारखी आहे. वेद शिकले पाहिजेत व शिकविले पाहिजेत हे ज्यांनी जाहीर केले ही गोष्ट शाहू महाराजांना अभिप्रेत होती. परंतु मुर्तीपुजेत घुसलेला कचरा किंवा कर्मकांड दयानंद सरस्वती यांनी दूर करण्यासाठी प्रयत्न केले नाही.[७]

वैदिक विचारांचा शाहू महाराजांच्या शैक्षणिक कार्यावर झालेला परिणाम :

धर्म हा सर्वांसाठी समान असतो. व्यक्तीच्या जन्मानुसार त्याची जात न ठरता कर्मावरून ठरते हा आर्य धर्माचा विचार राजर्षी शाहूंनी स्वीकारला. जातीभेद, स्त्रीशिक्षण, पुनर्विवाह या सुधारणावादी कृतींचा विचार राजर्षी शाहूंनी प्रत्यक्ष कृतीतून दाखवून दिला. महाराजांनी अनेक शैक्षणीक आदेश काढले. गुरुकुलांसाठी आर्थिक मदत, शिवाजी क्षत्रिय वैदिक कॉलेज सुरु केले.[८] या सारख्या कृतीतून महाराजांनी वैदिक विचारांवरील आपले प्रेम व्यक्त केले आहे. वेद विचार हे संस्कृतमध्ये असल्याने सर्वसामान्यांसाठी संस्कृत कॉलेज सुरु करावे अशी महाराजांची इच्छा होती. वैदिक वाङ्मय संस्कृतमध्ये असल्यामुळे १९१७ साली शाहू महाराजांनी करवीर संस्थानात शंकराचार्यांच्या मार्गदर्शनाखाली संस्कृत कॉलेज काढण्याचा प्रयत्न केला पण बहुजन समाजाच्या मुलांना संस्कृत भाषा शिकवण्याची सुविधा उपलब्ध करून देण्याचा महाराजांचा हा प्रयोग यशस्वी होऊ शकला नाही; हे न होण्यामागे शंकराचार्य कुर्तकोटीच कारणीभूत असल्याचे दिसून येते.

वरील सर्व बाबी विचारात घेता राजर्षी शाहूंनी वैदिक धर्माची तत्वे स्वीकारून आर्य समाजाच्या मदतीने सर्वाना सत्य वैदिक धर्म कळावा व त्यासाठी शिक्षण हे एक माध्यम ठरू शकते

असा विचार करून महाराजांनी शैक्षणिक कार्यामागे ही बदलाची दृष्टी ठेवल्याचे दिसून येते.

संदर्भ :

१. डॉ. जयसिंगराव पवार, राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, २००१, पृष्ठ क्र. १३५
२. विजीगिषु जीवनवाद, संपादक सद्विचारदर्शन, डॉ. भाजेकर लेन, मुंबई, १४ वी आवृत्ती २०२०, पृष्ठ क्र. २७
३. महर्षी दयानंद सरस्वती, सत्यार्थ प्रकाश, आर्ष साहित्य प्रचार ट्रस्ट, ४२७ नया बांस, दिल्ली, ७९ वी आवृत्ती, २०१३, पृष्ठ क्र. ५४
४. उपरोक्त, राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, पृष्ठ क्र. ८३५
५. यशवंत पाटणे, चैतन्याचे चांदणे, संस्कृती प्रकाशन, शिवाजीनगर, पुणे, २००७, पृष्ठ क्र. ९७
६. उपरोक्त, राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, पृष्ठ क्र.१५४
७. उपरोक्त, विजीगिषु जीवनवाद, पृष्ठ क्र. ११९
८. धनंजय कीर, राजर्षी शाहू छत्रपती, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

■■■

ISSN No. 2394-5990

राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य

डॉ. युवराज गुंडू सुरवसे
सहाय्यक प्राध्यापक इतिहास विभाग
छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज ऑफ आर्ट्स
अँड कॉमर्स, सोलापूर.

प्रस्तावना :

ब्रिटिश राजवटीत महाराष्ट्राची जडणघडण करण्यात या थोर महापुरुषांनी मोठा वाटा उचलला त्यापैकी राजर्षी शाहू महाराज एक होते. राजर्षी शाहू महाराज हे प्रगतशील व कृतिशील विचारवंत होते. पुरुषप्रधान भारतीय संस्कृतीत अंधश्रद्धा यांचा पगडा असल्यामुळे स्त्रियांवर अन्याय होत होते. या पार्श्वभूमीवर शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात स्त्री शिक्षणाला मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहन दिले. राजर्षी शाहू महाराजांच्या कार्याचा आढावा घेता समाजातील उपेक्षित घटकाला प्राधान्याने न्याय देण्याबरोबरच त्यांच्यात सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि शैक्षणिक विकास घडवून आणण्याचे कार्य त्यांनी केल्याची दिसून येते.

सामाजिक समतेचे पुरस्कर्ते आणि कृतिशील राजा म्हणून शाहू महाराजा कडे पाहिले जाते. त्यांची कारकीर्द म्हणजे न्याय आणि तत्व निष्ठुरतेच्या समतावादी कार्यांचा आलेखच होय. विचाराला प्रत्यक्ष कृतीची जोड देणारा असा कार्यक्रम समाजही त्यासाठीच कार्यरत होता. शाहू महाराजांनी आपल्या सत्तेचा उपयोग सर्वच क्षेत्रातील वंचित राहिलेल्या अशा समाजाला शिक्षण देऊन त्यांच्यात जाणीव जागृती निर्माण केली. एकोणिसाव्या शतकातील बहुजन समाज अज्ञान, अंधकार व दारिद्र्यात खितपत पडलेला होता. आणि हे सर्व शिक्षणाच्या अभावामुळे घडले होते आणि म्हणूनच महात्मा ज्योतिबा फुले शिक्षणासंबंधी म्हणतात विद्ये विना मती गेली, मती विना गती गेली, गती विना वित्त गेले, वित्तविना शूद्र खचले, आणि हे सर्व एका अविद्येने केले. हे ओळखूनच शाहू महाराजांनी बहुजन समाजातील मुलांसाठी खेड्यापाड्यात प्राथमिक शाळा नव्हत्या त्या ठिकाणी प्राथमिक शाळा काढल्या. त्या काळात शिक्षण शिकायची तरी फक्त उच्च वर्गातील धनिक,जमीनदार यांनाच हक्क होता. गरीब, दलित व स्त्रिया यांना शिकणे हा गुन्हा त्यावेळी समजला जात असे. शिक्षण हे काम ब्राह्मण, श्रीमंत व सावकार यांचे कार्य होते अशा सामान्य माणसाची समजूत झाली होती. शाहू महाराज प्राथमिक शिक्षणाबाबत म्हणतात की, शिक्षण शिवाय आम्हाला तरुणोपाय नाही. शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती झाली नाही असे इतिहास सांगतो. अज्ञानात बुडून गेलेल्या देशात उन्मत व लढवय वीर कधीच निपजणार नाहीत. म्हणून सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाची भारताला अत्यंत आवश्यकता आहे असे त्यांचे मत होते म्हणूनच शिक्षणासंबंधी कार्य त्यांनी आपल्या कोल्हापूर संस्थानात केल्याचे दिसून येते.

उद्देश:

१. राजर्षी शाहू महाराजांचे जीवन कार्य अभ्यासणे.
२. राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य जाणून घेणे.
३. शिक्षणासाठी महाराजांनी केलेल्या कार्याचा आढावा घेणे.

संशोधन पद्धती :

प्रस्तुत संशोधनासाठी प्रामुख्याने दुय्यम स्तोत्रांचा वापर करण्यात आलेला असून त्यामध्ये प्रकाशित, अप्रकाशित साहित्य, संदर्भ ग्रंथ, नियतकालिके, साप्ताहिके, वर्तमानपत्रे, संख्येत स्थळे व वेबसाईट इत्यादी स्तोत्रांचा वापर करण्यात आलेला आहे.

राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य :

१. प्राथमिक शिक्षण विषयक कार्य :

सर्वांच्या विकासासाठी शिक्षण यावर शाहू महाराजांनी भर दिलेला दिसून येतो. कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करण्याविषयी चा विचार इसवी सन १९१२-१३ च्या सुमारास सुरू केला होता. जोपर्यंत बहुजन समाज साक्षर होणार नाही तोपर्यंत लोकशाहीला डोळसपणा येणार नाही अशी त्यांची मत होते. म्हणूनच निरक्षर लोक आपल्यापर्यंत नाही तर आपण त्यांच्यापर्यंत गेले पाहिजे असे त्यांचे मत होते. त्यांनी खेडेगाव घटक म्हणून प्राथमिक शिक्षण प्रसारास सुरुवात केली. २४ जुलै १९१७ साली एक वटहुकूम काढून प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केले.

२. माध्यमिक शिक्षण :

१८६७ साली कोल्हापूर संस्थानामध्ये पहिली इंग्रजी पूर्व प्राथमिक शाळा स्थापन करण्यात आली होती. ती कोल्हापूर हायस्कूल या नावाने ओळखली जात असे. पुढे ती राजाराम हायस्कूल या नावाने ओळखली जाऊ लागले या शाळेत मॅट्रिक पर्यंतचे शिक्षण दिले जात असे. परंतु पैशांच्या अडचणीमुळे तेथे विद्यार्थी संख्या सोडवली हे जाणून शाहू महाराजांनी शिक्षण मोफत केले होते.

३. उच्च शिक्षण विषय कार्य :

उच्च शिक्षणाचा प्रारंभ राजाराम महाविद्यालयाच्या स्थापनेपासून झाला. तसेच संस्कृत विषय शिकविण्यासाठी संस्कृत महाविद्यालय सुरू करण्यात आले होते. महाराजांनी बहुजन मुलांना उच्च शिक्षणाची संधी मिळवून दिली. शेतीला प्राधान्य म्हणून शेतीविषयक अभ्यासक्रमाची सुरुवात केली होती त्यांच्या प्रयत्नावादी धोरणामुळेच उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्या मोठी वाढ झाल्याचे पुढे दिसते.

४. तंत्र शिक्षण विषयक कार्य :

राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानांमध्ये औद्योगिक व्यावसायिक प्रगती व्हायची असेल तर व सर्वांगीण विकास व्हायचा असेल तर तंत्रज्ञान विषयक शिक्षण देणे किती महत्त्वाचे आहे हे जाणले होते यासाठी समाजाचे सर्वांगीण प्रगती साठी औद्योगिक तांत्रिक व्यावसायिक शिक्षणावर ही त्यांनी भर दिला होता त्यासाठी १९१२ साली जयसिंगराव घाडगे टेक्निकल इन्स्टिट्यूट ची स्थापना केली तसेच अनेक व्यावसायिक शाळा ही सुरू केल्या होत्या.

५. व्यवसायाभिमुख शिक्षण :

छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी पारंपारिक शिक्षण देणाऱ्या शाळा बरोबरच व्यवसाय प्रमुख शिक्षण देणाऱ्या शाळा ही स्थापन केल्या होत्या. त्यामध्ये टेक्निकल स्कूल, राधाकृष्ण मंदिरात छत्रपती राजाराम औद्योगिक मंदिर, कलागृह, औद्योगिक स्कूलची स्थापना, दिल्ली दरबार पाटील शाळा सत्यशोधक शाळा तलाठी स्कूल ची स्थापना आशा वेगवेगळ्या व्यवसायाभिमुख शाळांची स्थापना महाराजांनी केलेली होती.

६. कलाशिक्षण :

राजर्षी शाहू महाराजांनी कला व कलावंतांना आपल्या संस्थानांमध्ये त्यांच्या कला जोपासण्यासाठी प्रोत्साहन दिल्याचे दिसून येते. संगीत कलेच्या शिक्षणासाठी त्यांनी १९१३ मध्ये देबल क्लब चा आरंभ केला होता. त्यांनी शाहीर, मल्ल,कलावंत यांना आश्रय दिला होता. महाराजांनी कोल्हापूर संस्थानात शाहिरीला उत्तेजन दिले. अनेक शाहिरांना सहाय्य केले यावरून महाराजांच्या रसिक मनाची साक्ष पटते. शाहीर तगासगीर, सत्यशोधक जलसेवाले, शिवाय अनेक कवींना आर्थिक साह्यही केले. त्यामुळेच त्यांच्या कलांचा विकास झाला आणि शैक्षणिक दृष्ट्या बहुजन समाज प्रकृती पथावर आला.

७. वस्तीगृह योजना:

शाहू महाराजांनी १८९६ मध्ये कोल्हापूर मध्ये सर्व जाती-जमातींच्या विद्यार्थ्यांसाठी वस्तीग्रह सुरू केले होते वस्तीग्रह चालविण्यासाठी एका ब्राह्मण अधिकाऱ्याची नियुक्ती केली परंतु या वस्तीगृहात दहा वर्षात केवळ ब्राह्मणच शिकले हा अनुभव लक्षात घेऊन शाहू महाराजांनी प्रत्येक जातीच्या विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र वस्तीगृह स्थापन केले म्हणून राजर्षी शाहू महाराजांना भारतातील विद्यार्थी वस्तीगृहाचे आद्य जनक म्हणून ही ओळखले जातात.

८. स्त्री शिक्षण विषयक कार्य :

कोल्हापूर संस्थानाचा स्त्री विषयीच्या दृष्टिकोन मुळातच पुरोगामी होता. संस्थानात मुला मुलींच्या शाळा होत्याच त्याशिवाय खास मुलींच्या साठी स्वतंत्र अशा शाळा स्थापन केल्या गेल्या होत्या. विशेषतः भुदरगड सारख्या सह्याद्री लगतच्या मागासलेल्या भागात मुलींच्या शाळा स्थापन झाल्या होत्या. मुलींना शाळेत यावे मुलांच्या बरोबरीने शिक्षण घ्यावे यासाठी खास उत्तेजन दिले जात होते. प्रौढ स्त्रियांच्या शिक्षणाच्या बाबतीत ही शाहू महाराजांनी विशेष लक्ष घातल्याचे दिसून येते. खास करून मागासलेल्या जातींच्या शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या स्त्रियांसाठी त्यांनी १९१९ मध्ये खास हुकूम गॅजेट केला होता त्या अन्वये अशा स्त्रियांच्या राहण्याच्या जेवणाची सर्व सोय दरबारा कडून मोफत केली जाणार होते. हुशार मुलींना पुढील शिक्षणात प्रोत्साहन मिळावे म्हणून दरबाराने खास शिष्यवृत्ती ठेवल्या होत्या. मुलींच्या उच्च शिक्षणाच्या बाबतीत ही शाहू महाराजांनी अत्यंत उदार दृष्टी ठेवली होती. राजाराम कॉलेजमध्ये शिकणाऱ्या सर्व मुलींना त्यांनी शिक्षण मोफत केले होते. स्त्री शिक्षणाचा प्रसार स्त्री शिक्षिका असतील तर अधिक वेगाने होऊ शकतो म्हणून राजर्षी शाहू महाराजांनी ८९८ मध्ये स्त्रियांसाठी अध्यापक विद्यालयाची स्थापना केली आणि स्त्रियांच्या विकासासाठी शिक्षणाच्या समान संधीची आवश्यकता असल्याचे आपले मत व्यक्त केल्याचे दिसून येते एकूणच शाहू महाराजांच्या प्रयत्नामुळे कोल्हापूर संस्थानातील स्त्रियांच्या साक्षरतेचे ०.१०% वरून ते दर ०.३५% इतक्या पर्यंत पोहोचलेले दिसून येते.

ISSN No. 2394-5990

९. शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना :

सर्वसामान्य जनतेला शिक्षण मिळावे. याचबरोबर दलित बहुजन अशा सर्वसामान्य लोकांमधील वंचित घटकात शिक्षणाचा प्रसार व्हावा त्याचबरोबर तलाठी,शेतकरी, तांत्रिक शिक्षण संस्था यामध्ये मागास जातीच्या मुलांना शिष्यवृत्ती योजना सुरू केली. महाराजांनी त्या काळामध्ये शिष्यवृत्ती विषयक शिक्षणाची गरज ओळखली होती व त्या दिशेने कार्य देखील केल्याचे दिसून येते. शिक्षणाच्या प्रसारासाठी त्यांनी अनेक शिष्यवृत्ती योजना देखील विद्यार्थ्यांना लागू करण्यात आल्या होत्या.

निष्कर्ष :

राजश्री शाहू महाराजांनी आपल्या सत्तेचा उपयोग समाजातील उपेक्षित वंचित अशा समाजाला शिक्षण देऊन त्यांच्या जाणीव, जागृती निर्माण केली. शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती झाली नाही, असे इतिहास सांगतो, अज्ञानात बुडून गेलेल्या देशात उन्मत लढवे वीर कधीच निपजणार नाहीत. म्हणून सक्तीचे मोफत प्राथमिक शिक्षणाची भारताला अत्यंत आवश्यकता आहे. असे त्यांचे मत होते. खास मुलींच्या साठी स्वतंत्र शाळा स्थापन केल्या गेल्या होत्या. विशेषतः मुलींना शाळेत यावे मुलांच्या बरोबरीने शिक्षण घ्यावे. यासाठी महाराजांनी उत्तेजन ही देत असत. राजर्षी शाहू महाराजांनी प्रौढ स्त्रियांच्या शिक्षणाच्या बाबतीतही विशेष लक्ष घातल्याचे दिसून येते. शिवाय मागासलेल्या जातीच्या शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या स्त्रियांसाठी त्यांनी १९११ मध्ये खास असा हुकुमही काढलेला होता. शाहू महाराजांच्या प्रयत्नामुळे कोल्हापूर संस्थानातील स्त्रियांच्या साक्षरतेचा दर मोठ्या प्रमाणावर वाढल्याचेही दिसून आले. शाहू महाराजांनी राजाराम व संस्कृत महाविद्यालय सुरू करून शिक्षणाची सुरुवात केलेली दिसून येते. शाहू महाराजांनी प्रत्येक जातीच्या विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र वस्तीगृह स्थापन करून त्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन दिलेले आहे. तसेच वेगवेगळ्या शाळांची स्थापना केलेली दिसते तसेच दलित बहुजन अशा सर्वसामान्य लोकांमधील वंचित घटकात शिक्षणाचा प्रसार व्हावा त्याचबरोबर तलाठी शेतकरी तांत्रिक शिक्षण संस्था यामध्ये मागास जातीच्या मुलांना शिर्षावरती योजना सुरू केली होती. तसेच व्यवसाय व शिक्षण देणाऱ्या शाळा स्थापन केल्या होत्या तसेच महाराजांनी संगीतकारच्या शिक्षणासाठी शाळेचा आरंभ केला. शाहीर, मल्ल, कलावंत यांना राजर्षी दिला. महाराजांनी आपल्या कोल्हापूर संस्थानात शाहिराला उत्तेजन देऊन शाहिरांच्या मदतीने गावोगावी इतिहास परत जागविता यावा यासाठी त्यांना प्रोत्साहन दिले शाहू महाराजांनी गावोगाव गावी तालीम आखाडे स्थापन करण्यास मदत केली. यात जोर, बैठका, मलखांब, कुस्ती, दांडपट्टा, बरचीचे शिक्षण विद्यार्थ्यांना तालमीत दिले जात होते. एकूणच शाहू महाराजांचं शैक्षणिक कार्याच्या बाबतीमध्ये काम करत असताना कोल्हापूर संस्था सर्व क्षेत्रांमध्ये कसे पुढे जाईल यासाठी देखील शाहू महाराजांनी प्रयत्न केल्याचे दिसून येते.

संदर्भ सूची :

१. घोरमोडे के. यु. घोरमोडे कला (२००६)शैक्षणिक विचारवंत भारतीय व पाश्चात्य, विद्या प्रकाशन, नागपूर.
२. डोईफोडे ज्योती (२००५) मूलभूत सामाजिक विचार, विद्या बुक्स पब्लिशर्स औरंगाबाद.
३. पवार जयसिंगराव (संपा) (२००७)राजश्री शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर.
४. एस. एस. गाठाळ(२००५) आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद.
५. डॉ जयसिंगराव पवार (२००२) राजश्री शाहू महाराज, सुमेर प्रकाशन, मुंबई.

■■■

छत्रपती राजर्षीशाहू महाराज यांचा शेती विषयक विचार व सुधारणा

डॉ.माने दादासाो नामदेव
विभाग – अर्थशास्त्र
कृष्णा महाविद्यालय, रेठरे बु ।। शिवनगर
ता.कराड जि.सातारा : ४१५१०८
मोबाईल नं.९८५०२८७६६०/७७७४०९५४९१ WH

गोषावारा :

राजर्षी शाहु महाराज – कष्टकरी शेतक–यांच्या जीवनात समृधी व परिवर्तन आणण्यासाठी राजर्षीशाहू महाराजांनी अनेक सुधारणा केल्या सन १८९४ ते १९२२ अशी २८ वर्ष त्यांनी कोल्हापूर संस्थानाचा राज्य कारभार पाहिला, त्यांनी संस्थानाच्या शेती, सहकार, उद्योग, मुलभूत सोयी सुविधा सेवा क्षेत्र, राजस्व इ.क्षेत्रामध्ये लक्षणीय विकास घडवून आणला, यापैकी शेती क्षेत्रातील त्यांनी केलेल्या सुधारणा महत्त्वाच्या होत्या. तसे पहिलेतर प्रत्येक क्षेत्र परस्परावलंबी आहे. एक क्षेत्रावर दुसरे क्षेत्र अवलंबून असते. जलनिती सुधारणावर शेती विकास अवलंबून आहे. तसेच आर्थिक सुधारणावर शेती विकास अवलंबून आहे. राजर्षी शाहू महारांजाना जरी आर्थिक, समाजिक शैक्षणिक अशा सर्वच क्षेत्रामध्ये सर्वांगीण विकासाची व्युहरचना आखली असली तरी सुध्दा या सर्व विकासाच्या मुळाशी शेती क्षेत्राच्या विकासाचे त्यांनी केलेले नियोजन अतिशय महत्त्वाचे होते. या शेती विकासासाठी जलनिती धोरण महत्त्वाचे होते. शेती व्यवसायाला जोड व्यवसाय दुय्यम धंदे यांचा विकास हा ही महत्तवप्रुण आसल्याचे दिसते. शेतीचा हा सर्वागीण विकास होण्यासाठी शेतक–यांना आधुनिक माहिती मिळावी म्हणून, शेती प्रदर्शन, जनावरांविषयक प्रदर्शन, संशोधनावर भर देण्यात आला. वेगवेगळ्या भागात जलसिंचनाच्या पुरेशा सुविधा उपलब्ध करुन दिल्या. मेंढयापालन, कुक्कटपालन, रेशीम उद्योग रोजगार निर्मिती तसेच आदर्श शेतीचा प्रयोग तसेच गरजेनुसार रोपांची निर्मिती वेलदोडे, देवंकापूस, घायपात, बटाटा, काजू, ताग या सारख्या अनेक पिकांच्या लागवडीचे प्रयोग केले. रोपवाटीकांची निर्मिती देखील करण्यात आली. यावरुन राजर्षी शाहू महाराजांचा शेतीच्या आधुनिकीकरणा बद्दलचा दृष्टीकोन व प्रयोगशिल वृतीचे दर्शन घडते.

जीवन परिचय :

राजर्षी छत्रपती शाहू महारांचा जन्म २६ जून १८७४ रोजी कोल्हापूरातील कसबा बावडा येथे लक्ष्मी निवास पॅलेसमध्ये झाला. राजर्षी शाहूंचे दत्तक विधानाप्रूवीचे पूर्ण नाव. श्री.यशवंतराव जयसिंगराव घाटगे असे होते. पुढे वयाच्या ९ व्या वर्षी कोल्हापूरच्या गादीला वारस म्हणून चौथ्या शिवाजी महाराजांच्या पत्नी श्रीमती आनंदीबाई राणीसाहेबानी यशवंतरावास (शाहू महाराज) दि.१७ मार्च १८८४ रोजी दत्तक घेतले व त्यांचे शाहू असे नामकरण करण्यात आले. पुढे हेच शाहू असे नामकरण करण्यात आले. पुढे हेच शाहू कोल्हापूर संस्थानचे राजर्षी छत्रपती शाहू महाराज म्हणून संपूर्ण देशातच नव्हे तर जगभर आपल्या कार्यकर्तृत्वाने सुपरिचित झाले. राजधींनी त्यांचे बालपणीचे शिक्षण राजकोट व धारवाड येथे पुर्ण केले. त्यांच्या गुरुंचे नांव एस.एस.फ्रेजर होते. सन १८९४ ते १९२२ अशी फक्त २८ वर्षे त्यांनी कोल्हापूर संस्थानाच राज्यकारभार पहिला. शाहू महाराज अर्थशास्त्राचे प्रत्यक्ष विद्यार्थी नसले तरी त्यांनी त्यांच्या कारकिर्दीत अर्थशास्त्राच्या सर्वच क्षेत्रांमध्ये (उदा.शेती, सहकार, उद्योग, मूलभूत सोई–सुविधा, सेवा क्षेत्र, राजस्व इत्यादी) कृतीव्दारे लक्षणीय विकास घडवून आणला होता. ज्यामुळे त्यांना अर्थशास्त्रज्ञ म्हणून मान्यता देण्तास किंचितही संकोच वाटणार नाही. शाहू महाराजांनी संस्थानात राबविलेले विविध कार्यक्रम व धोरणे लक्षात घेतली असता अर्थशास्त्रातील सनातनवादी, नवसनातनवादी व आधुनिक अर्थशास्त्रज्ञांच्या विचाराचे व सिध्दांताचे फलित त्यांच्या कार्यात अगदी स्पष्ट दिसते.

संशोधनाची उदिद्ष्टये :

१) छत्रपती राजर्षीशाहू महाराजाच्या आर्थिक विचारांचा मागोवा घेणे.
२) भारतातील आर्थिक सुधारणांचे बद्दल अभ्यासणे.
३) भारतातील जागतिक आर्थिक सुघारणांच्या काळात मागस जाती–जमातीवरील परिणाम अभ्यासणे.
४) विकासात्मक शिफारशी सुचविणे.

गृहितके :

१) अर्थिक सुधारणा ही समाजाची गरज आहे.
२) आर्थिक सुधारणेच्या सुरुवातीच्या काळातील बद्दल शेतक–यांच्या दृष्टीने पुरेसे नियोजन करणे.

ISSN No. 2394-5990

३) पुर्व नियोजीत विकास दृष्टीत धोरणे आवलंब करणे.
४) शेतीविकास करण्याची गरज.

संशोधन पध्दती :

संबधीत संशोधन पर लेख लिहण्यासाठी विविध संदर्भ ग्रंथ गुगल वेबसाईट, मसिके, अहवाल इत्यादीचा आधार घेतला आहे.

संशोधनाचे महत्त्व :

१) छत्रपती राजर्षीशाहू महाराज यांच्या विचाराबाबात जागृती निर्माण करणे.
२) समाजातील सर्व शेतकरी व शेती विकास हा प्रवाह समजून घेणे.
३) आर्थिक सुधारणेच्या काळातील लाभ आवश्यक त्या घटका पर्यंत पोहचावे या दृष्टीने खरे चित्र समोर आणणे.

शेती हा अर्थव्यवसथ्येचा कणा आहे :

विकसीत समाजव्यवस्था निर्माण होण्यासाठी राजर्षीचे विचार कारणीभूत ठरले. राजर्षी शाहू महाराज हे कृषी, उदयोग प्रणेते होते. ते अष्टावधानी होते. ते खरे कर्मवीर होते. म्हणूनच त्यांची विचार क्रांती यशस्वी झाली. रयतेचा राजा राजर्षी शाहू महाराज यांनी आपल्या रयतेच्या उन्नतीसाठी सहकार सामाजीक, कृषी, उद्योग आदी विविध क्षेत्रात भरीव कार्य केले. शेतीच्या विकासवरच देशाचा विकास अवलंबून असतो यांची पूरेपर जाणिव असल्याने शाहू महाराजांनी त्यांच्या संस्थानात शेतीकडे जाणिव पूर्वक लक्ष दिले. दुष्काळ, गुरांचे आजार, अल्प उत्पादन यांच्याकडे लक्ष देऊन अनेक आर्थिक विकासाच्या योजना धोरण, राबविले. राज्यकारभार स्वीकारल्यानंतर छ.शाहू महाराजांनी सर्वप्रथम शेतकर-यांच्या प्रत्यक्ष भेटी घेऊन त्यांचे प्रश्न समजून घेतले. शेतीचे उत्पादन वाढविण्यासाठी आधुनिकतंत्र आत्मसात केले पाहिजे. १८९५ मध्ये शेतक-यांना कर्जपुरवठा संस्थाना मार्फत करण्यात आला. १ जून १८९९ रोजी वटहुकूम प्रस्तुत करुन सावकारावर निर्बंध आणले. शेतक-यांच्या शेतातील उभी पिके जप्त करण्यावर बंदी लागू झाली. शेतक-यांनी नगदी पिकाकडे लक्ष वळले पाहिजे असे शाहू महाराजांना वाटत असल्यामुळे पन्हाळा येथे चहा, कॉफी, रबर यांचे मळे तयार केले. सोबतच बटाटे, कापूस, माग, रेशीम या सारखी पीके घेण्यासाठी शेतकऱ्यांना प्रवृत्त केले.

राजर्षी शाहू महाराजांच्या कारकीर्दीत शेती हा प्राधान व्यवसाय शेतीचे तुकडीकरण झाले होते. या लहान लहान तुकडयाचे एकत्रिकरण करुन मोठया विस्तारीत शेती मध्ये त्यांचे रुपांतरण व्हावे असे त्यांचे विचार होते. विस्तारीत शेती ही प्रगतशील होणार यातून शेतीचा विकास साध्य होणार या शेतीमध्ये आधुनिक शेतीचे प्रयोग केले असता शेती यशस्वीपणे कसली जाऊ शकते असे राजर्षीचे मत होते.

शेतीचे विभाजन व तुकडीकरण कमी करुन शेतीचा १० एकराचा एक गट केल्यास ती कीफायतशीर शेती होईल आणि शेतीची प्रगती ही होईल.

माणगावच्या परिषदे मध्ये भाषण करताना ते म्हणाले सर्व शेतक-यांना म्हणाले की, तुम्ही साधारण माणसी दहा एकर जमिन वाटयाला येईल असे तुमच्या म्हारकीचे तुकडे करा आणि हे उत्पन्न तुमच्यातील वडील असणा-या व्यक्तीकडे चालवायला द्या म्हणजे सर्वांना अर्धपोटी रहावे लागते ते वाचेल. त्यासाठी त्यांनी १९१३ ला अविभाज्य ज्ञानाचा कायदा केला.

राजर्षीचा शेतीविषयक दृष्टीकोण :

राजर्षीं छत्रपती शाहू महारांजाची शेतीतील आवड लक्षात घेऊन १९०२ च्या युरोप दौ-यात रॉयल ॲग्रिकल्चरल सोसायटी ऑफ इंग्लंड या ख्यातनाम शेती संशोधन संस्थेने राजर्षींना आपले सभासदत्व बहाल केले होते. शेतीचे महत्त्व विशव करताना राजर्षी शाहू महाराज एका भाषणात म्हणाले होते की, देशातील ८० टक्के पेक्षा अधिक लोकसंख्या शेती क्षेत्रावर अवलंबून आहे. माझ्या संस्थानच्या दृष्टीने विचार केला असता कृतीरुपाने माझे सर्व राज्यच शेतीच्या प्रगतीवर अवलंबून आहे. त्यामुळे माझ्या संस्थानातील प्रत्येक व्यक्तीला शेती विकासाच्या दृष्टीकोणातून मदत करण्यासाठी मी स्वत: कष्ट घेत आहे.

राजर्षींच्या काळात क्षत्रिय लोक शेती व्यवसायाला खालच्या दर्जचा व्यवसाय मानत असत. राजर्षींच्या लक्षात ही बाब येताच त्यांनी कुर्मी क्षत्रिय परिषदेला उद्देशून आपल्या भाषणाची सुरुवात पुढीलप्रमाणे केली होती. प्रिय क्षत्रिय बंधू हो! मी तुमच्य पैकीच आहे. मला मजूर समजा किंवा शेतकरी समजा. माझे वाडवडील हाच धंदा करीत होते. जे काम माझे पुर्वज करीत होते तेच काम करणा-या लोकांचा अध्यक्ष होण्याकरीता मला आज बोलाविले आहे. याबद्दल मला अत्यंत आनंद होत आहे. पुढे याच भाषणात त्यांनी असे सागितले की, कृषिकर्म इतके पवित्र आहे की, वैदिक काळात वर्षातून एकदा चक्रवर्ती राजा व त्याचा मंत्रीही (कृषीकर्मची उन्नती करण्याकरीता) नांगर हाकीत असत ज्याच्या योगाने भूमीमध्ये एक दाणा टाकून हजारो दाणे मिळतात व ज्या कृषीकर्मावर सारी मनुष्यजात उपजीविका करते ते कृषिकर्म हलके अथवा वाईट मी मुळीच मानत नाही. मी माझ्या युवराजाला कृषी विद्या शिकण्याकरीता

विलायतेला व अलाहाबादला कृषी स्कूलमध्ये पाठविले होते. आपल्याला माहित आहेच की, कृषिकर्मापासून दुहेरी उन्नती होते. स्वतला सुख मिळून सर्व मनुष्यजातीलाही सुख मिळते. कृषिकर्माबरोबर पशुपालनसबंधीही पुष्कळ काम करावयाचे आहे. दूध, तूप वगैरेची समृध्दी देशामध्ये झाली पाहिजे. कृषिकर्म करताना क्षात्र तेजाला बाधा येते असे नाही. ज्यावर मनुष्याची सुव्यवस्था व उन्नती अवलंबून आहे ते कर्म करणारे नीच आहेत हे म्हणणे मुळीच पटत नाही.

एकंदरीत वरील बाबीवरून असे लक्षात येते की, राजर्षीनी फक्त इतरांना सांगितले असेच नाही तर स्वतच्या मुलाला शेती शिक्षण देऊन 'अधी केले मग सांगितले' या उक्तीचा परिचय आणून दिला. एवढेच नव्हे तर इटली व स्कॉटरलंडसारख्या विविध देशांना भेटी देऊन त्या ठिकाणचे शेतीतील प्रगत तंत्रज्ञान भारतात आणण्यासाठीसुध्दा राजर्षींनी अथक परिश्रम घेतले होते. यातून राजर्षीचा शेतीविषयक विधायक दृष्टीकोण आपणासमोर येतो.

राजर्षी शाहूमहाराज यांच्या शेती विषयक सुधारणांची वैशिष्टये:

१) शेतीचे आधुनिकीकरण व संशोधन करण्यता आले.
२) १९०२ साली 'सार्वत्रिक पाटबंधारे धोरण' जाहिर केले.
३) सन १८९६-१९९९ संस्थानात पडलेल्या दुष्काळात अन्नधान्य व गवतचा-याचा वेळीच पुरवठा केला.
४) स्वतंत्र 'पाटबंधारे खाते निर्माण करुन' इरिगेशन ऑफीसरची नेमणूक करण्यात आली.
५) जुन्या विहीरी छोटेमोठे तलाव, बंधारे यांच्या नोंदी करुन पावसाच्या पाण्याचा स्त्रोत अडवून शेतीसाठी उपयोगी केला.
६) कोल्हापूरच्या पश्चिमेस, सह्याद्रीच्या घाटात, भोगावती नदीचा जलप्रवाह अड़विला. राधानगरी धरण उभारणी करुन शेती सुजलम सुफलाम करण्यात आले.
७) राधानगरी धरणात साडणा-या पाण्याच्या साठयातून दरवर्षी ६०० दशलक्ष घनफूट पाणी शेतीसाठी उपलब्ध होऊ लागले.
८) युरोपातील शास्त्रीय शेती पध्दतीचा उपयोग करुन अन्नधान्य उत्पादन अनेक पटीने वाढविण्यात यशस्वी प्रयोग झाले.
९) शेतक-यात आधुनिक शेतीचा व ज्ञानाच प्रसार करुन शेती अवजारांचे एक म्युझियम सुरु केले.
१०) १९१२ साली 'किंग एडवर्ड ऑग्रिक्लचरल इन्स्टीट्युट' ही संस्था स्थापन करुन नविन अवजारांची माहिती शेतकर-यांना देण्यात आली.
११) शेतक-यांना सुधारीत अवजारे बी-बीयाणे, रासायनिक खते औद्योगीक मशागत पध्दती यांचे ज्ञान व प्रशिक्षण देण्यासाठी शेती आधिका-यांच्या नेमणूका करण्यात आल्या.
१२) शेतीचे प्रदर्शन भरविली त्यामध्ये शेतीची आधुनिक साधने उत्कृष्ट उत्पादनाच्या धान्याचे नमुने, माहितीपत्रके इ.मांडणी करुन शेतक-यांना माहिती पूरविली गेली.
१३) विज्ञान प्रदर्शने आयोजीत करुन जनावरांची प्रदर्शने भरवली गेली आसून शेतक-यांना प्रेरणा दिली.

अशा विविध प्रकारे राजार्षिनी शेती विकासासाठी वेगवेगळे प्रयोग केले. भात, ऊस, भूईमूग, चहा, रबर वेलदोडे, कोको इथे कधीच न घेतलेली उत्पादने घेता आली. त्यामुळे शेतीचा काया पालट झाला. चहाच्या मळ्याचा प्रयोग यशस्वी केला.

शेतीला कर्जपुरवठा :

छत्रपती राजर्षीशाहू महाराज यांनी कर्जपुरवठा बाबत विविध योजना हाती घेतल्या सहकारी संस्थाची स्थापना केली त्यामुळे शेतक-याच्या होणा-या पिळवणूकीला लगाम घालण्याचा प्रयत्न केला. अल्प व्याज दरात शेतक-यांना कर्जपुरवठा करण्यासाठी १९०४ मध्ये शेतक-याच्या हिक्टोरीया मेमोरियल फंड या नावांने संस्था स्थापन केली. तर १९२०-१९२१ मध्ये द किंग एडवर्ड फंडाची स्थापना केली. आश्या विविध फंडातून शेतक-याना शेती विकासाठी एकूण २५, ५३, २८० रुपये एवढा कर्ज पुरवठा केला.

शेतीला जोड पाणी व्यवस्थापन :

छत्रपती राजर्षीशाहू महाराज यांच्या कारकिर्दीत सर्वात मोठी उल्लखनिय बाब म्हणजे राधनगरी प्रकल्प आहे. दुष्कांळाचा वाईट अनुभव लक्षात घेता त्यावर मात करण्यासाठी राधा नगरी धरण योजना १९६० मध्ये सुरु केले. हा प्रकल्प राजर्षीशाहू महाराजांनी भोगावती नदीवर बांधण्याचे निश्चित केले. आर्थिक कुवत नसताना सुध्दा हा प्रयोग त्यांनी यशस्वी केला.

आश्या प्रकारे अविकसित मागास शेतीला विकासाचे रुप प्रधान करण्यासाठी राजर्षीशाहू महाराजयांची कामगीरी उल्लेखनिय व न भूतो न भविष्यती असे कार्य आहे.

निष्कर्ष :

१) राष्ट्रीय विकासाच्या प्रवाहात शेती विकास महत्वाचा असल्याचे दिसते हे वाचकाच्या समोर ठेवणे.
२) शेती विकासासाठी छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी केलेले कार्याचे चित्रण, आठवण वाचकांच्या समोर ठेवणे.

ISSN No. 2394-5990

३) छत्रपती राजर्षी शाहू महाराज कोल्हापूर संस्थानाला विकासाची दिलेली दिशामुळे आजही प्रगती पथावर असल्याची दिसते.

४) छत्रपती राजर्षी शाहू महाराजांच्या ठायी असणा-या गुणवत्तेचा कार्याप्रवणतेचा बुध्दीचा, कौशल्याचा विकासत्मक दृष्टीने वापर करुन आर्थिक विकासाचे प्रयोग यशस्वी झाले.

संदर्भ ग्रंथ सूची

- ❒ राजर्षी शाहू छत्रपती जीवन व कार्य, डॉ.जयसिंगराव पवार – अरुंधती प्रकाशन, शिवतेज,१०५, साने गुरुजी वसाहत, राधानगरीरोड, कोल्हापूर ४१६०११.
- ❒ राजर्षी शाहू राजा व माणूस, कृ.गो.सुर्यवंशी पूणे १९८४ प्रथमावृत्ती-२०१४,
- ❒ लोकराजा शाहू छत्रपती – रमेश जाधव पूणे/१९९७,
- ❒ सत्यवादी – राजर्षी शाहू छत्रपती (खास अंक), बाळासाहेब पाटील- कोल्हापूर १९७४.
- ❒ आर्थिक विचारांचा इतिहास – डॉ.अनिल कुमार बाबरे, प्रा.संजय घोंड, प्रा.अनिल सत्रे
- ❒ आर्थिक विचारांचा इतिहास – प्रा.डॉ.जे.एफ.पाटील.
- ❒ www.lokmat.com Kolhapur.
- ❒ www.loksatta.com sampadkiyafutures.
- ❒ भारत सरकार (१९९०) अनुसचित जाति-जमातीच्या विकासाबाबत सातव्या पंचवार्षिक योजनेत नेमलेल्या अभ्यास मंडळाच्या अहवाल, सामाजिक कल्याण मंत्रालय, नवी दिल्ली.
- ❒ भारत सरकार (१९९५) अनुसूचित जाती-जमातीसाठी समितीचा अहवाल, सामाजिक न्याय व साक्षिमीकरण मंत्रालय, नवी दिल्ली.
- ❒ आर्थिक सर्वेक्षण (१९९७) वित मंत्रालय, आर्थिक विभाग, नवी दिल्ली.
- ❒ डॉ.भालचंद्र पुणेकर (२००५) भारतातील आर्थिक सुधारणा आणि दलित : एक आबेंडकरी दृष्टीकोन, सुगावा प्रकाशन, पुणे.

■■■

छ. शाहू महाराज यांचे शैक्षणिक विचार

सहयोगी प्रा.मल्लिकार्जुन पांडुरंग कसबे
इतिहास विभाग प्रमुख
एस.बी.पी. कला,वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय,
मंद्रुप,दक्षिण सोलापूर
मोब- ९०७५८२७९८६ ईमेल-mkasabe137976@gmail.com

प्रस्तावना :

समतेवर आधारीत समाजव्यवस्था निर्मितीसाठी शिक्षण प्रसार हे राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक विचार होते आणि त्याच्या प्राप्तीसाठी आपल्या राज्यात शैक्षणिक धोरणे आखली. शिक्षणानेच आमचा तरणोपाय आहे असे त्यांचे मत होते. ''शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती झाली नाही असे इसिहास सांगतो.''[१] असे महाराजांना वाटत होते. राजर्षी शाहू महाराजांची शैक्षणिक विचारांना आधार ज्या चार पायांवर उभा होता ती चतु:सूत्री अशी होती.

१) समाजात प्राथमिक शिक्षण सर्वांना उपलब्ध करून देणे. नंतर माध्यमिक शिक्षण व शेवटी उच्च शिक्षणाची सोय करणे.
२) समाजातील प्रतिकूल परिस्थितीतील घटकांना शिक्षणाच्या सोयीसवलती विशेष बाब म्हणून उपलब्ध करून देणे.
३) ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शहरात येऊन अल्पखर्चात शिक्षण घेता यावे म्हणून शहरात सर्व जाती जमातीसाठी वसतीगृहे सुरू करणे.
४) प्रथमच शिकून तयार झालेल्यांचा शिक्षणावरील विश्वास दृढ व्हावा म्हणून त्यांच्यासाठी रोजगाराची सोय करणे. त्यांच्यासाठी नोकऱ्यात राखीव जागा ठेवणे.

संशोधनाची उद्दिष्ट्ये :

१) छ. शाहू महाराज यांनी सुरु केलेल्या विद्यार्थी वसतीगृहाचा आढावा घेणे.
२) छ. शाहू महाराज यांनी सुरू केलेल्या प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत या योजनेचा आढावा घेणे.
३) छ. शाहू महाराज यांनी सुरू केलेल्या स्त्रि शिक्षणाचे महत्त्व विशद करणे.
४) छ. शाहू महाराज यांनी सुरू केलेल्या अस्पृश्यांच्या शिक्षण व्यवस्थेचे महत्व सांगणे.

संशोधन पद्धती:

प्रस्तुत शोधनिबंधासाठी प्राथमिक आणि दुय्यम स्त्रोत यांचा अवलंब करण्यात आला आहे. या विषयाशी संबंधित ग्रंथ, नियतकालिक, मासिके, इ. चा वापर करण्यात आला आहे.

वसतिगृहांची संकल्पना:

शाहू महाराजांनी प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारावर भर दिलेला होता आणि त्यास अनुसरून प्राथमिक शिक्षण पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना माध्यमिक आणि उच्च शिक्षण मिळाले पाहिजे ही त्यांची भूमिका होती. ग्रामीण भागातील होतकरू विद्यार्थ्यांची उच्च शिक्षणाची सोय चांगल्याप्रकारे व्हावयाची असेल तर त्यांना शहरात आल्यानंतर शैक्षणिक सुविधा मिळाल्या पाहिजेत यादृष्टीने शैक्षणिक धोरणाची आखणी करणे आवश्यक होते आणि यामधूनच ''वसतिगृहात्मक'' शिक्षणा ची संकल्पना पुढे आली. या संकल्पनेचा उगम कसा झाला हे राजर्षिच्या शब्दातच पुढीलप्रमाणे पाहता येईल.

राजर्षि शाहू म्हणतात की, ''माझ्या प्रजेतील दुर्बलांची अधिकाधिक बलाढ्यांपेक्षा काळजी घेणे हे माझे तत्व आहे. त्यांच्या स्थितीने मला वैयक्तिकरित्या आवाहन केले आहे, आणि माझ्या प्रशासनाचे हे एक उद्दिष्ट आहे की वाईट परिस्थती दूर करण्यासाठी माझ्या स्तरावर सर्वोत्कृष्ट प्रयत्न करणे. हे लक्षात घेऊन मी कठोर परिश्रम करत आहे..... मी त्यांना शिकण्यासाठी विशेष सुविधा देत आहे. जेव्हा मी माझी सत्ता स्वीकारली तेव्हा मला आढळले की त्यांना कोणीही नेता नाही. भारताची वाईट परिस्थती म्हणजे प्रत्येक जात स्वत:च्या लोकांची काळजी घेते आणि ती इतरांबद्दल उदासीन असते. म्हणूनच मी मराठा, लिंगायत, जैन, शिंपी, सुवर्णकार, मुस्लीम आणि वंचित वर्ग किंवा 'अस्पृश्य' अशा विविध जातींना प्रोत्साहन दिले. ज्यांची स्वत:ची वसतिगृहे असण्याला''[२]

म्हणून वेगवेगळ्या जातीची स्वतंत्र वसतिगृहे तयार करण्यास त्यांनी सुरुवात केली. यात त्यांचे शैक्षणिक दृष्टेपण पहावयास मिळते. याचाच परिणाम म्हणजे कोल्हापूरमध्ये सुरू झालेली

ISSN No. 2394-5990

वसतिगृहांची चळवळ होय. या कार्यामुळे कोल्हापूर 'वसतिगृहांची माता' म्हणून ओळखली जाते.

प्राथमिक शिक्षण:

राजर्षी शाहू महाराज लोकशाहीवादी विचाराचे असल्याने त्यांना रयतेच्या राज्यकारभारात सहभाग वाढविण्याची मनस्वी इच्छा होती. त्यासाठी जनतेस प्रथमत: तयार केले पाहिजे. त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण केली पाहिजे. त्यासाठी प्रथमत: ''लोकांच्या बुध्दीवर व ज्ञानावर जड व जुलमी जूं लादले गेले आहे ते झुगारून देण्याची शक्ती बहुजन समाजाचे अंगी येण्यास सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाची फार जरूरी आहे.''[३] अशाप्रकारे प्रजा शिकून तयार होत नाही तोपर्यंत मात्र राजर्षि लोकांच्या हाती राज्यकारभार देण्यास तयार नव्हते. आमची सर्व प्रजा शिक्षित असणे यावर त्यांचा भर होता. प्रजेच्या हाती कारभार सोविण्यासाठीच आपला प्रयत्न आहे हे स्पष्ट करताना शाहू महाराजांनी जी पूर्वअट घातली आहे ती महत्त्वाची आहे. ''माझ्या रयतेमध्ये प्राथमिक व उच्य शिक्षणाचा प्रसार करण्याची माझी इतकी जोराने खटपट चालली आहे यावरून शक्य तितक्या लवकर रयतेस स्वराज्य देण्याचे माझे धोरण आहे. माझी सर्व प्रजा मराठी तिसरी इयत्ता तरी शिकून तयार झाली असती तर त्यांना राज्यकारभाराचे हक्क आनंदाने''[५] शाहू महाराजांनी दिले असते.

प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्याचा शाहू महाराजांचा प्रयत्न पाहिला तर या दृष्ट्या राजाने शिक्षणाचे महत्त्व पूर्णपणे जाणले होते हे लक्षात येते. त्या दिशेने त्यांनी केलेल्या कायदेशीर तरतुदी मुद्दाम लक्षात घ्याव्या लागतील.

प्राथमिक शिक्षण सक्तीचे :

इ.स.१९१२ मध्ये राजर्षि शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले. जास्तीत जास्त मुले प्राथमिक शाळेत भरती व्हावीत यासाठीची जबाबदारी शिक्षक, पालक, गावकामगार, मामलेदार यांच्यावर सोपविलेली होती. शाहू महाराजांनी या संबंधात फर्मान काढले होते.[६]

प्राथमिक शिक्षणाचा प्रसार होण्यासाठी शिक्षण फक्त सक्तीचे करून चालणार नाही तर इतरही अडचणींकडे लक्ष दिले पाहिजे. गोरगरिबांचे शिक्षण आर्थिक प्रतिकूल परिस्थितीमुळे होऊ शकणार नाही याची जाणीव महाराजांना होती आणि त्यामुळे २५/०७/१९१७च्या आदेशान्वये प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करून प्राथमिक शाळांमधील फी आकारण्याची पध्दती बंद करण्यात आली.[७]

स्त्री शिक्षणासंबधी विचार :

शाहू महाराजांनी स्त्री शिक्षणाच्या प्रसारासाठीही काम केले होते. त्यापाठीमागे त्यांची शैक्षणिक दृष्टी अशी होती की स्त्री ही शिकून स्वावलंबी झाली पाहिजे कारण शिक्षण हे मानवाच्या विकासाचे प्रमुख साधन आहे. त्याचा हा दृष्टिकोन आपली स्नुषा इंदुमती राणीसाहेब यांना उद्देशून लिहिलेल्या पुढील उताऱ्यावरून स्पष्ट होते. शाहू महाराज त्यांना लिहितात की,

''शिक्षणामुळे तुमची मानसिक दृष्टी जसजशी वाढेल, तसतसे तुमचे विचार अधिकाधिक उदात्त होतील. त्यामुळे तुमच्या अभ्यासाकडे दुर्लक्ष करू नका. तुम्हाला उच्च शिक्षित आणि विद्वान महिला बनवण्याची माझी खूप इच्छा आहे. ही इच्छा पूर्ण करणे हेच तुमचे पवित्र कर्तव्य आहे.''८

अस्पृश्यांसाठीचे शैक्षणिक कार्य :

आपला शैक्षणिक दृष्टिकोन स्पष्ट करीत असताना शाहू महाराजांनी स्वतः असे म्हणतात की, ''माझ्या प्रजेमध्ये बलवानांपेक्षा दुर्बलांची काळजी घेणे हे माझे तत्व आहे.'' या धोरणानुसार समाजाने ज्यास अस्पृश्य समजलेले होते त्या समाजाच्या विकासाची काळजी घेणे राजर्षि शाहू महाराजांना महत्त्वाचे वाटत होते. अस्पृश्य समाज हा चातुर्वर्ण्य व्यवस्थेमुळे नेहमीच शिक्षणापासून दूर ठेवण्यात आला होता आणि शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही ही शाहू महाराजांची भूमिका होती. यासाठी त्यांना अस्पृश्यांच्या शिक्षणाकडे खास लक्ष पुरवावे लागले असे दिसून येते. याचाच एक भाग म्हणून अस्पृश्य मुलांच्या शिक्षणाची सोय व्हावी म्हणून त्यांनी त्यांच्याकरिता शाळा सुरू केल्या. शिक्षण प्रसारामधून सामाजिक विषमता नष्ट व्हावी ही महाराजांची दृष्टी होती, तथापि अस्पृश्यांसाठी असलेल्या स्वतंत्र शाळांमुळे हे होणे शक्य नव्हते हे त्यांच्या लक्षात आल्यावर त्या शाळा बंद करून अस्पृश्य मुलांना इतर मुलांच्याप्रमाणे सरकारी शाळात दाखल करून घेण्याचा आदेश त्यांनी दिला होता. सरकारी शाळांतून शिवाशिव पाळण्यास बंदी असल्याने सर्व धर्मांची आणि जातींची मुले एकत्र राहू शकतील आणि सामाजिक विषमता कमी होण्यास मदत होईल. तथापि असे करूनही अस्पृश्य मुलांना तुच्छतेनेच वागवले जात होते असे आढळून आल्याने महाराजांनी खालीलप्रमाणे हुकूम जारी केला.

''हुजूरांच्या असे पाहण्यात आले की, अस्पृश्यांना व स्पृश्यांना शाळा खात्यात निरनिराळ्या तऱ्हेने वागविले जाते व अस्पृश्यांना शाळाखात्याच्या इमारतीच्या कंपाऊंडच्या आत येऊ दिले जात नाही. सरकारी इमारती खाजगी उपयोगासाठी दिलेल्या नसल्यामुळे अस्पृश्यांना तुच्छतेने वागविण्याचा कोणालाही हक्क नसून

अस्पृश्यांची प्रत्येक तऱ्हेची काळजी घेतली पाहिजे. शिक्षण संस्था गरीब लोकांकरिता असून गरिबातील गरीब जे अस्पृश्य, त्यांना समतेच्या पायावर वागविणे योग्य आहे. ते कर देतात तर मग त्यांना वाईट रीतीने का वागवावे? हुजूरांची अंत:करणपूर्वक इच्छा आहे की, शाळा खात्यातील ज्या खाजगी किंवा सरकारी संस्थांना अनुदान किंवा इमारती किंवा खेळाच्या मैदानाच्या वगैरे रूपाने मदत मिळते त्यांनी स्पृश्यवर्गापेक्षा अस्पृश्यांना जास्त ममतेने व आदराने वागवावे. कारण स्पृश्य लोक कोणत्याही प्रकारे शिक्षणात आपला मार्ग काढू शकतात. परंतु अस्पृश्यांना समतेने वागविले नाही तर मग तो मुख्याध्यापक किवा शिक्षक असो, त्याला जाब द्यावा लागेल, आणि खाजगी संस्थांना जी मदत मिळते ती काढून घेण्यात येईल.'' एवढ्यावरच शाहू महाराज थांबले नाहीत तर शैक्षणिक संस्थांमध्ये अस्पृश्यांना चांगली वागणूक मिळाली नाही तर संबंधितांवर कारवाई करावी लागेल असे सूचित होते. त्यादृष्टीने सदरच्या हुकूमात पुढे म्हटले आहे की, करण्यात आलेफ

''सरकारी मदत मिळणाऱ्या कोणत्याही शाळेत एखादा अस्पृश्य वर्गाचा विद्यार्थी आला तर संभावित गृहस्थाप्रमाणे आदरपूर्वक वागवून त्याला शाळेत घेण्यात यावे. शाळा खात्यातील कोणत्याही व्यक्तीची असे करण्यास हरकत असेल तर त्याने हा हुकूम झाल्यापासून सहा आठवड्याचे आत आपला राजीनामा पाठवावा, अर्थात त्याला पेन्शन मिळणार नाही. मदत मिळणाऱ्या शिक्षणसंस्थांची हरकत असेल तर त्यांचे हे अनुदान किंवा इतर मदत दरबार बंद करील. शाळेचे मैदान, इमारती अथवा दुसरी स्थावर जंगम मिळकत जी संस्थानाकडून त्यांना देण्यात आली आहे, तिच्यावर मोठा कर बसेल, तर एखादी खाजगी संस्था देणगी देणाऱ्याच्या इच्छेविरुद्ध जाईल तर देणगीतील स्थावर अगर जंगम मिळकतीवर शेकडा ७रु कर बसेल किंवा देणगी देणयाच्या किंवा त्याच्या वारसाच्या इच्छेप्रमाणे एक शिष्यवृत्ती ठेवली जाईल. कोणत्याही शिक्षकाने मग तो काम करून कितीही थकलेला असेल, अस्पृश्य विद्यार्थी शाळेत येताच त्याला अवश्य मदत करावी.''[९]

मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे आणि त्यांची गुणवत्ता वाढावी यासाठी मांग, महार, मुलांना शिष्यवृत्ती देण्याचे धोरण महाराजांनी सुरू केले होते.[१०]

मूल्यमापण :

राजर्षि शाहू महाराज कृतिशील विचारवंत होते. त्यामुळे त्यांनी जो शैक्षणिक विचार मांडला तो प्रत्यक्षात आणण्याचा कसोशीने प्रयत्न केला, हे त्यांच्या शैक्षणिक कार्यातून स्पष्ट होते.

खेड्यापाड्यातील मुलांचा शहरामध्ये आल्यानंतर राहण्याचा प्रश्न मिटावा आणि त्यांना शिक्षण घेता यावे यासाठी राजर्षि शाहू छत्रपती शाहू महाराजांनी वेगवेगळ्या जातीतील मुलांसाठी वसतिगृहे बांधली होती. त्यामध्ये व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग हाऊस, जैन बोर्डिंग, मिस क्लर्क वसतिगृह, दयानंद वसतिगृह, सारस्वत बोर्डिंग, कायस्थ प्रभू बोर्डिंग, जिनगर वसतिगृह, पांचाल ब्राह्मण वसतिगृह, ख्रिश्चन वसतिगृह, वैश्य बोर्डिंग, चांभार/ढोर वसतिगृह, देवांग बोर्डिंग, सुतार बोर्डिंग, बोहरी समाज बोर्डिंग, वैदिक स्कूल वसतिगृह, आर्य समाज गुरुकूल, प्रिन्स शिवाजी बोर्डिंग, इ. अस्पृश्यासाठी करण्यात येणाऱ्या कार्याबद्दल शाहू महाराज खूपच जागरूक होते त्यांच्या मते जर घोड्याच्या पागेत वेगवेगळ्या जातीचे, वयाचे, धष्टपुष्ट, दुर्बल असे घोडे होते. त्यांना ज्यावेळी खायला दिले जात असे त्यावेळी दुर्बल, वयाने लहान घोड्यांचे हाल होत असत. तत्कालीन समाजजीवनातही समाजातील दुर्बल घटकांचे हाल असेच होऊन ते पाठीमागे रहात होते यासाठी त्यांच्याकरिता वेगळे धोरण स्वीकारणे आवश्यक होते.

राजर्षि छत्रपती शाहू महाराज यांनी जे शैक्षणिक विचार मांडले आणि त्या अनुषंगाने कृती केली यामधून त्यांना समाजामध्ये असे शैक्षणिक बातावरण निर्माण करावयाचे होते की त्यामधून समताधिष्ठित समाजनिर्मितीस चालना मिळेल हा दृष्टिकोन स्पष्ट होतो.

तळटीपा :

१) संगवे विलास आणि खाणे बी.डी.,राजर्षी शाहू कागदपत्रे खंड–४ पृ.२२.
२) जाधव भा.बा. (सं) राजर्षी शाहू महाराजांची कागदपत्रे पृ.१६३.
३) कित्ता पृ.३.
४) कित्ता पृ.७४.
५) कित्ता पृ.७४.
६) करवीर गॅझेट जून १९१२ भाग १ पृ.८.
७) शाळा खाते ठराव क्र. २०२,२७/७/१७चा आदेश, करवीर गॅझेट भाग १,
८) लठ्ठे ए.बी. कोल्हापूरचे श्री छ. शाहू महाराजांच्या आठवणी बॉम्बे टाईम्स प्रेस, १९२४ पृ. ४३२
९) पूर्वोक्त जाधव भा.बा. पृ.३.
१०) धटावकर भास्कर (सं) राजर्षी छ. शाहूंचे निवडक आदेश पृ.१७९.

■■■

ISSN No. 2394-5990

राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य

प्रा.डॉ. जवाहर मोरे
संतोष भीमराव पाटील कला, वाणिज्य
व विज्ञान महाविद्यालय, मंद्रुप

प्रस्तावना :

भारत देशाच्या सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक परिवर्तनाच्या चळवळीत थोर विचारवंत व समाजसुधारक यांचे फार मोठे योगदान आहे. त्यामध्ये म. ज्योतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजर्षी शाहू महाराज, लोकहितवादी, राजा राममोहन रॉय, धोंडो केशव कर्वे यासारख्या अनेक थोर विभूतींची नावे सांगता येतील. या महामानवांच्या कार्याचा गुणगौरव करणारे धनंजय कीर यांचे विधान मला संयुक्तिक वाटते ते म्हणतात– ''जे पुरुष प्रगतिशील सामाजिक स्थित्यंतरे घडवून आणण्यासाठी आपल्या कालखंडात निष्ठेने व धैर्याने धडपड करुन समाजातील प्रस्थापितांवर दाब आणित असतात. त्यांच्या जीवनाची परिणती महान व्यक्तिमत्वात होते. असे महापुरुष प्रगतीपर सामाजिक स्थित्यंतरासाठी आवश्यक ते विचार मांडून, ते कृतीत आणण्यासाठी परिणामकारक अशी ऐतिहासिक भूमिका वठवतात. त्यामुळे त्या कालखंडाच्या सामाजिक स्थित्यंतराचे एक वस्तुनिष्ठ चित्र बनते.''[१] या विधानातील विचार हे राजर्षी शाहू महाराज यांच्या सामाजिक व शैक्षणिक कार्याशी तंतोतंत जुळतात. म्हणून प्रस्तुत लेखात राजर्षी शाहू महाराजांनी केलेल्या शैक्षणिक कार्याचा आढावा घेणार आहोत.

शिक्षणाच्या पायावरच समाजोन्नती :

समाजातील सर्व घटकांपर्यंत शिक्षण पोहचणे हे अतिशय गरजेचे आहे. हे महाराजांनी जाणले होते. कारण दौरे करत असताना नेहमी म्हणत, ''शिक्षणाच्या बाबतीत आमचा गतकाल म्हणजे इतिहासातील एक अंधारी रात्र आहे. फक्त एकाच जातीने विद्येचा मक्ता घेतला होता. मनु आणि त्याच्या मागून झालेल्या शास्त्रकारांनी त्या त्या वेळच्या ध्येयाला अनुसरुन निरनिराळ्या जातींच्या व्यवहारास बंधनकारक असे निर्बंध रचले. खालच्या कमी जातीच्या लोकांना विद्यामंदिरचे दरवाजे बंद करण्यात आले. म्हणून शिक्षणाच्या पायावरच सर्व समाजाची उन्नती करता येईल.''[२] म्हणूनच महाराजांनी शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही हे जाणून गोरगरिब, दीन आणि हीन लोकांना शिक्षणातून संजीवनी देऊनच बलशाली करावे हा ध्यास महाराजांनी घेतला होता. समाजाची अवनती जवळून पाहिल्याने अजून समाजाला अज्ञानाच्या अंध:कारात ढकलायचे नाही, असे झाले तर सारा समाज पुन्हा भरकटला जाईल. यावरुन राजर्षी शाहूंचे शिक्षणविषयक विचारच सर्वसामान्यांच्या प्रगतीचे होते हे लक्षात येते. म्हणूनच त्यांनी सार्वत्रिक आणि सक्तीचे शिक्षण हा विचार मांडला. ज्यायोगे सर्वांनाच याचा लाभ होईल. परिस्थितीने कोणीही शिक्षणापासून वंचित राहणार नाही. म.फुले यांच्यानंतर सर्वसामान्य लोकांच्या कल्याणासाठी महाराजांनी कार्य केले. त्यांच्या मते, ''जोपर्यंत भारतातील प्रत्येक स्त्री–पुरुषांस शिक्षण मिळत नाही, तोपर्यंत भारत स्वतंत्र, समृध्द, एकजीवन आणि बलवान होऊ शकत नाही.''[३] या विश्वासाच्या जोरावरच शिक्षण घेणाऱ्यांना नवी दिशा, दृष्टी, नवनवे ध्येय, उद्योग शोध लागतील आणि स्वावलंबी माणूस बनेल असे त्याना वाटत होते. शिक्षण हेच समापरिवर्तनाचे मुख्य साधन असून समाजाचा चौफेर विकास, समाजसुधारणा, साक्षरता, समाधान, समता, ज्ञानवृध्दी, बंधुभाव, एकसंघ समाजनिर्मिती हे शिक्षण घरोघरी पोचल्याशिवाय होणार नाही. हे सर्वश्रुत आहे. मनुष्यामध्ये वैचारिक क्षमता वाढली पाहिजे. विचारांना कृतीची जोड देऊन सामाजिक कार्यामध्ये डोळसता आणता येईल. म्हणूनच समाजाची उन्नती साधायची असेल तर शिक्षणाचा पाया भक्कम करण्याची गरज आहे. या राजर्षी शाहू महाराजांच्या विचारांची अजूनही गरज आहे. असे मला वाटते.

मोफत आणि सक्तीचे प्राथमिक शिक्षण :

मोफत आणि सक्तीचे प्राथमिक शिक्षण हे अतिशय गरजेचे असून शिक्षणामुळेच कनिष्ठ वर्गाची ऐहिक आणि बौध्दिक गुलामगिरीतून सुटका होईल हा विचार म. फुले यांनी इ.स.१८८० पासून मांडला होता. तत्कालीन परिस्थिती मात्र उच्च शिक्षण, विधवा विवाह, जरठ विवाह या विषयाभोवतीच फिरत होती. म. फुले, ना.गोखले यांच्याशिवाय कनिष्ठ वर्गातील लोकांविषयी तळमळ कोणाला नव्हती. म्हणूनच म. फुले यांनी सक्तीच्या मोफत प्राथमिक शिक्षणाचा आग्रह धरला होता. हाच वारसा

पुढे राजर्षी शाहू महाराजांनी चालविला. प्राथमिक शिक्षणाची गरज कशी आहे हे सांगताना नाशिकच्या एका सभेत महाराज म्हणाले होते की, ''खालच्या वर्गाच्या लोकांच्या बुध्दीवर व ज्ञानावर हे जे जड व जुलमी जू लादले गेले आहे ते झुगारुन देण्याची शक्ती बहुजन समाजाच्या अंगी येण्यास मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची फार जरुरी आहे.''[४] यावरुनच प्राथमिक शिक्षण देऊन सुधारणा करण्याचा ध्यास महाराजांनी घेतला होता. अगदी बारीक तपशिलासह शिक्षणाचे महत्व ते पटवून देत असत. शिक्षण घेतले तरच समाज समृध्द होईल आणि अशा समाजातूनच उत्तम शेतकरी, शिक्षक, व्यापारी, उद्योगपती, सैनिक निर्माण होतील. त्यासाठी शिक्षणाची गंगा ही खेड्यापाड्यापर्यंत पोहोचली पाहिजे असा आग्रह त्यांनी धरला होता. नुसता आग्रह धरून महाराज थांबले नाहीत तर सार्वत्रिक शिक्षणाचा विचार अंमलात आणण्यासाठी प्रत्येक खेड्यात एक शाळा स्थापन करुन त्या शाळेत पगारी शिक्षक न नेमता वतनी शिक्षक नेमायचा अशी योजना आखली होती. पुढे १९१७ च्या जाहिरनाम्यात ''येत्या गणेशचतुर्थीपासून करवीर इलाख्यात प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करायचे आहे. सध्या असलेल्या सर्व प्राथमिक शाळातील फी सदर दिवसापासून माफ करण्यात येत आहे.''[५] असेही म्हटले होते. मग लगेचच शिक्षण तज्ञांची समिती नेमून या योजनेवर १ लाख रुपये खर्च करुन उरलेली रक्कम शाळा इमारत व शालोपयोगी साहित्यासाठी वापरावेत असे फर्मानही सोडले होते. जे पालक मुलांना शाळेत पाठवणार नाहीत, अशांना दंडाचीही तरतूद केली होती. अशा दूरदृष्टी आणि व्यापक, विचारांचे राजर्षी शाहू महाराज प्राथमिक शिक्षण, मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण, स्त्री शिक्षण, शिष्यवृत्ती, देणगी यासाठी अविरत झटत होते. या शैक्षणिक धोरणाचा परिणाम पुढे राज्यभर झाला. महाराजांच्या कार्याची प्रेरणा घेऊन कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यापासून डॉ. पंजाबराव देशमुखापर्यंत अनेक विचारवंतांनी शैक्षणिक चळवळ यशस्वीरित्या राबवली होती. यामुळेच समाजाची प्रागतिक मानसिकता निर्माण झाली होती. ती खऱ्या अर्थाने म. फुले आणि राजर्षी शाहू महाराजांच्या मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणामुळेच असे म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही.

स्त्री शिक्षणास प्रोत्साहन :

शिक्षण ही विशिष्ट वर्गाची मक्तेदारी नाही. शिक्षणाचा लाभ हा सर्वांनाच झाला पाहिजे. मग तो पुरुष असो किंवा स्त्री असो, सवर्ण असो की दलित, आर्थिकदृष्ट्या सबल असो की दुर्बल, सर्वांनाच सुख-समाधानाने कसे जगता येईल. यासाठी शिक्षणाने मार्ग दाखवता येतो, अधिकाधिक प्रगती साधण्यासाठी स्त्रीयांनीही शिक्षण घेतले पाहिजे हा विचार पुढे आला होता. म.फुले यांनी तर समाजक्रांतीचे पहिले शस्त्र म्हणून स्त्री शिक्षण हाती घेतले होते. परंतु त्याकाळी स्त्री शिकली तर अघटित होईल अशी समजूत होती. या विचारांना म. फुलेंनी तिलांजली देण्याचे कार्य केले. सावित्रीबाईंच्या मदतीने स्त्री शिक्षणाची दारे खुली केली. या पुरोगामी विचाराचा वारसा राजर्षी शाहु महाराजांनीही पुढे चालवला. कारण ते मुळातच दूरदृष्टीचे शिक्षणतपस्वी होते. त्यांची स्त्री शिक्षणाबद्दलची साहसीवृत्ती आणि मानवतावादी विशालदृष्टी कौतुकास्पद होती. ज्या काळात स्त्री शिक्षणास मज्जाव होता. त्या काळी राजर्षींनी आपल्या विचारांना अंमलात आणून प्रत्यक्ष स्त्रीशिक्षणाचे कार्य करुन दाखवले. स्त्रियांच्या मानसिक विकासासाठीही शिक्षणाची गरज आहे, हे ओळखून त्यांनी आपल्या विधवा सुनेलाही शिक्षणाच्या प्रवाहात आणून स्वसंरक्षणाचे ज्ञान प्राप्त होण्यासाठी शिक्षण हाच रामबाण उपाय आहे. असे त्यांचे ठाम मत होते. एवढेच नव्हे तर राणी इंदुमती देवींना शिक्षण घेण्यासाठी प्रवृत्त केले. त्यांच्यासोबत काही मुलीही शिकू लागल्या. शिक्षण घेणे हाच स्त्रीचा धर्म आहे. हा उदात्त विचार करुन महाराजांनी खरा करुन दाखवला. स्त्रीयांना कौटुंबिक संकटाच्या काळात, स्वावलंबी व सुसंस्कारी बनण्यात शिक्षणच उपयोगी पडते. हे दाखवून दिले आणि समर्थ व सामर्थ्यवान स्त्री निर्माण होण्यासाठी प्रत्यक प्रकारचे ज्ञान तिला द्यावे अशा सुचनाही मांडल्या. स्त्री शिक्षणाला खऱ्या अर्थाने प्रेरणा देऊन पुरुषांनी हातावर तलवार घेउन लढावे आणि स्त्रीने चूल मूल सांभाळलेल्या या विचाराला महाराजांनी आपल्या कृतीतून मुठमाती दिली होती. महाराजांना शिक्षणातून साहसी, शूर सुसंस्कृत, सद्गुणी, सालस, प्रामाणिक, आदर्श, स्वावलंबी व नम्र स्त्री निर्माण करावयाची होती. खऱ्या अर्थाने स्त्रीला शिक्षणरुपाने महाराजांनी माणुसकीचे हक्क प्राप्त करुन दिले होते. पुरुष शिकणे म्हणजे एका व्यक्तीने शिकणे आहे तर स्त्रीने शिकणे म्हणजे साऱ्या घराने शिकणे आहे. म्हणूनच स्त्रीशिक्षणाचे कार्य जोमाने सुरु केले होते. राजर्षी शाहूंच्या मते, ''स्त्रियांच्या कर्तृत्वाचे क्षेत्र मोकळे केले पाहिजे. त्यांची अस्मिता जागी केली पाहिजे. त्यांची जाणीव जागृत केली पाहिजे आणि स्वावलंबानाने समर्थपणे जगण्याची आस वाढविली पाहिजे.''[६] एवढ्यावरच महाराजांचे शैक्षणिक कार्य थांबले नाही तर समाजातील सर्व घटकांपर्यंत शिक्षण पोचले पाहिजे. हा विचार मांडून कार्य पुढे नेण्यास सुरुवात केली होती. त्यांनी बहुजन समाजाच्या उन्नती प्रित्यर्थ शिक्षण सुरु केले. शिवाय शिक्षण हे जातीभेद निर्मूलनासाठी कसे उपयुक्त आहे हे ही सांगितले. जातीय व्यवस्था ही गोष्ट फार वाईट असून तिला कायमचे गाडण्यासाठी शिक्षणाची गरज आहे. असे महाराज सांगतात.

ISSN No. 2394-5990

माणूस इथून तिथून सारखाच असून अस्पृश्य समाजातील प्रत्येकाने शिक्षण घ्यावे असा आग्रह धरला होता. दलितोध्दाराचे कार्य करीत असताना स्पृश्य आणि अस्पृश्य मुलांनी एकत्र बसून शिकावे असा वटहुकुमही काढला होता. शिक्षणातून एकसंध समाजनिर्मिती साधून उच्च-नीच या भेदभावाचे निर्मूलन करावे आणि अस्पृश्यांची गुलामगिरीतून सुटका करुन द्यावी असा त्यांचा विशाल दृष्टिकोन होता.

यापुढेही जाऊन राजर्षी शाहू महाराजांनी शेतकरी, मजूर, कामगार, कलाकार अशासारख्यांच्या शिक्षणासाठी आपले कार्य सुरुच ठेवले होते. शिक्षणशिवाय माणसाचे जीवन म्हणजे हे पशूसारखेच असते हे दाखवून द्यायचे होते. पुढे त्यांनी कायदेशिक्षण, भाषा शिक्षण, कलेचे शिक्षण, ग्रंथालय चळवळ, गाव तिथे शाळा, शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून प्रत्येक जातीची, धर्माची वसतीगृह स्थापना इ. सार्वजनिक, समताधिष्ठीत विचार राजर्षी शाहू महाराजांनी नुसते पेरले नाहीत तर अंमलात आणले.

समारोप :

अशा प्रकारे राजर्षी शाहू महाराजांनी पुरोगामी विचार, समाजउध्दार, ध्येय बाळगून दूरदृष्टीने शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार केला. त्यामुळे महाराष्ट्राचा कायापालट तर झालाच शिवाय सामाजिक परिवर्तनाची लाट निर्माण झाली. बहुजन आणि तळागाळातला माणूस ताठ मानेने वावरु लागला. या कार्यामुळेच शैक्षणिक कार्याचा प्रसार वाढत गेला. अनेक शाळा, महाविद्यालये, विद्यापीठ निर्माण झाली. हे राजर्षी शाहू महाराजांच्या कार्याचेच फलित म्हणावे लागेल.

संदर्भ :

१. धनंजय कीर - राजर्षी शाहू छत्रपती, पॉप्युलर प्रकाशन मुंबई, प्रथमावृत्ती, १९७९ पृष्ठ क्र. ७ व ८
२. रा.तु.भगत - शिक्षणमहर्षी राजर्षी महाराज, सिध्दराज प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९९९, पृष्ठ क्र. ४६
३. Dr. Kavalekar - Non-Brahmin movement in Southern India : Shivaji University Publication, 1979, P.53
४. संपादक जयसिंगराव पवार - राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर प्रथम आवृत्ती, २००१, पृष्ठ क्र. ११९
५. तत्रैव पृष्ठ क्र. १२०
६. रा.तु. भगत - शिक्षणमहर्षी राजर्षी महाराज, सिध्दराज प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९९९ पृष्ठ क्र. ७८

■■■

राजर्षी शाहू महाराजांच्या आर्थिक विचारांची प्रासंगिकता

डॉ. अंकुश तुकाराम करपे
अर्थशास्त्र विभाग,
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय करमाळा,जि.सोलापूर.
मो.९४०५३५७०९६

गोषवारा :

छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांना विसाव्या शतकातील आर्थिक विकासाचे प्रणेते म्हणून संबोधले जाते. कारण महाराजांकडे राज्याच्या आर्थिक विकासाबरोबरच सर्वांगीण विकासाची दूरदृष्टी होती. कृषी विकास हा राज्याच्या आर्थिक विकासाचा पाया आहे. हे राजर्षींनी ओळखले होते. म्हणूनच त्यांनी पारंपारिक पीकांऐवजी नगदी व व्यापारी पिके घेण्यास शेतकऱ्यांना प्रोत्साहन दिले. चहा, कॉफी, रबर यांचे उत्पादन त्याकाळी मोठ्या प्रमाणात घेतले जात असे. शेतीतील उत्पादित मालाला चांगला भाव मिळावा यासाठी आपल्या संस्थानात अनेक बाजारपेठा विकसित केल्या. तेथे व्यापाऱ्यांना गुंतवणूक करण्यास प्रोत्साहन दिले. तसेच कृषी प्रदर्शने, पशु प्रदर्शने, विज्ञान प्रदर्शन यांचे आयोजन यात्रा काळात केले जात असे. शेतकऱ्यांची सावकारी पाशातून मुक्तता होण्यासाठी सुलभ दराने कर्ज पुरवठा सुविधा उपलब्ध करून दिल्या. सिंचनाचे महत्त्व ओळखून राजर्षी शाहूंनी राधानगरी सारखा मोठा सिंचन प्रकल्प निर्माण केला. याशिवाय विहिरी खोदणे,तलाव बांधणे,नदीवर बंधारे बांधणे, तलावातील गाळ काढणे अशी कार्ये करून जलसिंचन क्षेत्र वाढविले. राजर्षी शाहू महाराजांनी शेती विकासाबरोबरच व्यापार व उद्योग यांच्या उभारणीकडे तितकेच लक्ष दिले. सुगंधी औषधी तेलाचे उत्पादन, काष्ठार्क तेल उद्योग, मधुमक्षिकापालन यासारखे नाविन्यपूर्ण उद्योग निर्माण केले. तसेच कापड गिरण्या उभारून कापड उद्योग मोठ्या प्रमाणात विकसित केला. याशिवाय ऑइल मिल, सॉ मिल, इलेक्ट्रिक कंपनी, मोटर ट्रान्सपोर्ट कंपनी असे अनेक उद्योग नव्याने सुरू केले. सन.१९१२ मध्ये सहकारी संस्था विषयक कायदा करून त्या अंतर्गत विविध क्षेत्रात सहकारी संस्था निर्माण केल्या. त्यामुळे राज्याच्या आर्थिक विकासामध्ये आणखी भर पडली. राजर्षी शाहूंनी कृषी, उद्योग व व्यापार या क्षेत्रांच्या विकासातून समतोल आर्थिक विकासाचा पाया घालून दिला. राजर्षी शाहूंनी केलेल्या या कार्यातूनच त्यांचे आर्थिक विचार स्पष्ट होतात. हे विचार आजही सरकार व प्रशासन यांना मार्गदर्शक ठरणारे आहेत. यावरून राजर्षी शाहू महाराजांच्या आर्थिक विचारांची प्रासंगिकता लक्षात येते. अशा प्रकारे राजर्षी शाहू महाराज यांनी मबहुजन हिताय,बहुजन सुखाय म ठरणाऱ्या अनेक योजना राबवून सामान्यांच्या उत्कर्षासाठी आपले राजपद पणाला लावले.

प्रस्तावना :

लोककल्याणकारी व प्रजाहितदक्ष राजा, स्वराज्योपासक, रयतेचा राजा, दुर्दम्य इच्छाशक्ती व कणखर मन असणारा राजा, कामगार चळवळीचे प्रणेते, सहकारी तत्त्वाचे आद्य पुरस्कर्ते, शैक्षणिक चळवळीचे प्रसारक, जातीभेदाचे निर्मूलक, न्यायिक, स्त्रियांचे संरक्षक, भटक्या विमुक्त जमातींचा उद्धारकर्ता, आरक्षणाचे जनक, साहित्यिक व कलाकारांचा आधारड, अस्पृश्योध्दारक, दिनदलितांचा पाठिराखा, पुरोगामी विचारांचे पुरस्कर्ते अशा अनेक भूषणांनी छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांना गौरविण्यात येते. राजर्षी शाहू महाराजांचा जन्म २६ जून १८७४ मध्ये झाला. त्यांनी वयाच्या अवघ्या २० व्या वर्षी २ एप्रिल,१८९४ रोजी कोल्हापूर संस्थानाची सुत्रे हाती घेतली. यानंतर त्यांनी आपल्या आर्थिक व सामाजिक बदलाच्या संकल्पना प्रत्यक्षात उतरविण्यास सुरुवात केली. शेती, शिक्षण, आरोग्य, उद्योग, व्यापार, पयाभूत सुविधांची निर्मिती, सहकाराचा अवलंब यातून समाजाची प्रगती केली. राजर्षी शाहू महाराजांनी शेती संबंधी केलेले कार्य, जलसिंचन सुविधा, बाजारपेठांची निर्मिती,सहकारी संस्थाची निर्मिती, उद्योगधंद्याची उभारणी या सर्व कार्यातून त्यांचे आर्थिक विचार स्पष्ट होतात. जे आजच्या २१ व्या शतकातील भारताला पुढे नेण्यास उपयुक्त ठरतात.

बिजसंज्ञा : कृषी, व्यापार, उद्योगधंदे, सहकार, पायाभूत सुविधा, आर्थिक विकास, जलसिंचन इत्यादी.

शोधनिबंधाची उद्दिष्टे :

१) आर्थिक विकासासंबंधी केलेल्या कार्याचा आढावा घेणे.
२) आर्थिक विचारांची प्रासंगिकता अभ्यासणे.

ISSN No. 2394-5990

संशोधन पद्धती :

प्रस्तूत शोधनिबंधामध्ये दुय्यम सामग्रीचा आधार घेतला असून त्यामध्ये विषयाशी संबंधित विविध शोध निबंध, संदर्भ ग्रंथ, साप्ताहिके, मासिके, पाक्षिके, वर्तमानपत्रे, व संकेतस्थळे यांचा वापर केला आहे.

अभ्यास विषयाची निवड :

राजर्षी शाहू महाराजांनी केलेल्या शैक्षणिक, सामाजिक, स्त्रियांचे प्रश्न या कार्यावर मोठ्या प्रमाणात लेखन व संशोधन झाले आहे. परंतु आर्थिक विकासासंबंधी राजर्षी शाहू महाराजांनी केलेले कार्य व आर्थिक विचार यावर म्हणावे तेवढे संशोधन व लेखन झालेले नाही. म्हणून त्यांनी केलेल्या आर्थिक विकास कार्याचा अभ्यास करणे व त्यांच्या आर्थिक विचारांची आजची गरज अभ्यासणे. यासाठी संशोधन विषयाची निवड करण्यात आली आहे.

आज महाराष्ट्रात कोल्हापूर जिल्हा अग्रेसर असल्याचे दिसून येते याचे मुख्य कारण म्हणजे राजर्षी शाहू महाराज यांनी घातलेला आर्थिक विकासाचा पाया हे आहे. त्यांनी कृषि, उद्योग, व्यापार, सहकार, सिंचन इत्यादी विविध क्षेत्रात भरीव अशी कामगिरी केली. त्यांनी केलेल्या कार्यातूनच त्यांचे आर्थिक विचार दिसून येतात. त्याचा आढावा पुढीलप्रमाणे

१) कृषिविषयक कार्ये :

'शेतकरी सुखी तर, जग सुखी' हे महात्मा फुले यांचे सुत्र राजर्षी शाहू महाराजांनी आयुष्यभर जोपासले. शेतीचे महत्त्व सांगताना राजर्षी शाहू महाराज म्हणतात की, ज्या कृषि कर्मावर सर्व मनुष्य जात अवलंबून आहे ते कृषिकर्म हलके नाही तर ते पवित्र असे कार्य आहे. म्हणून तर वैदिक काळात सुद्धा एखादा चक्रवर्ती राजा वर्षातून एकदा नांगर हाकीत असे.

शेती हा आपल्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. तेव्हा शेतीचा विकास म्हणजे शेतकऱ्यांचा उद्धार, पर्यायाने देशाचाही उद्धार, हे सूत्र लक्षात घेऊन राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात शेती विकासाच्या अनेक नाविन्यपूर्ण योजना राबविल्या. शेती आणि शेतकरी यांच्या संबंधी संशोधनाची कास धरल्याशिवाय त्यांचे दारिद्र्य नष्ट होवू शकणार नाही. असा राजर्षी शाहूंचा ठाम विश्वास होता. युरोपच्या प्रवासावरून परत आल्यानंतर राजर्षी शाहू महाराजांनी कृषि विकासाचे अनेक उपक्रम हाती घेतले. त्यापैकी एक म्हणजे सन. १९१२ मध्ये कोल्हापूरात स्थापन केलेली 'किंग एडवर्ड ॲग्रिकल्चरल इन्स्टिट्यूट' ही संस्था होय. तसेच तिला जोडून आधुनिक शेती अवजारांचे एक म्युझियमही सुरू केले. शेतकऱ्यांना सुधारित अवजारे, बी-बियाणे, रासायनिक खते आणि आधुनिक मशागतीच्या पद्धती यांचे ज्ञान व प्रशिक्षण देण्यासाठी खास शेती अधिकाऱ्यांच्या नेमणूका केल्या. शेतकरी वर्गास आधुनिक शेतीची गोडी लागावी म्हणून संस्थानात महालक्ष्मी रथोत्सव, जोतिबा यात्रा अशा प्रसंगी 'शेतकी प्रदर्शने' भरवली जात असत. उत्तम पैदाशींच्या जनावरांचे प्रदर्शन भरवले जाई. काही प्रसंगी 'विज्ञान प्रदर्शन' ही आयोजित केले जाई. कृषी क्षेत्रात राजर्षी शाहू महाराज सतत नवनवीन प्रयोग करत असत. भात, ज्वारी, मका,बाजरी या पारंपारिक पिकांपेक्षा चहा, कॉफी, रबर, वेलदोडे, कोको, राळ, ताग,कापूस , बुंदा,बेळगावी बटाटे या सारखी पिके घेण्यास प्रोत्साहन दिले. संस्थानांमध्ये चहा, कॉफी, रबर यांचे मळे मोठ्या प्रमाणात विकसित केले. 'पन्हाळा टी नं.-४' हा चहा त्याकाळी संस्थानाबाहेरही खूप मोठ्या प्रमाणावर प्रसिद्ध झाला होता.

अशा प्रकारे राजर्षी शाहू महाराजांनी संस्थानांमध्ये नवनवीन बियाणे,खतांचा वापर,पाणीपुरवठ्याच्या सोयी,शेतकऱ्यांना स्वस्त दराने कर्ज पुरवठा करणे, सेठ-सावकारांच्या मगर मिठीतून शेतकऱ्यांची मुक्तता,शेतमजूर व गरीब शेतकऱ्यांना त्यांच्या श्रमाचा योग्य मोबदला मिळवून देणे,शेतीला पूरक असणारे उद्योगधंदे सुरू करणे,शेतमालाची किफायतशीर खरेदी - विक्री करणे,उत्तम जनावरांची पैदास,कृषी प्रदर्शने इत्यादी कृषी विकासाची कार्ये केली यातूनच शेतकऱ्यांची आर्थिक उन्नती झाली.

२) सिंचनविषयक कार्ये :

आपल्या संस्थानातील शेतीला कायमचा पाणीपुरवठा व्हावा यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या प्रशासनात स्वतंत्र पाटबंधारे खाते निर्माण केले होते. त्या अंतर्गत सिंचनक्षेत्र वाढविण्यासाठी विहिरी खोदणे,जुन्या विहिरी दुरुस्त करणे,विहिरीतील गाळ काढणे,लहान-मोठे तलाव बांधणे,नदीवर लहान-लहान बंधारे बांधणे इत्यादी कामे केली. राजर्षी शाहू महाराजांची एक महत्त्वाची उपलब्धी म्हणजे मराधानगरी धरणफ होय सन.१९०९ मध्ये या धरणाचे बांधकाम सुरू केले.व सन. १९१८ पर्यंत यावर १४ लाख रुपये खर्च करून ४० फुटापर्यंत बांधकाम करण्यात आले.मात्र हा प्रकल्प निर्माण करत असताना महाराजांना अनेक कठीण प्रसंगांना सामोरे जावे लागले. कारण त्या काळातील तो देशातील सर्वात मोठा सिंचन प्रकल्प होता.या धरणा संदर्भात राजर्षी शाहू महाराज म्हणतात हा धरण प्रकल्प जेव्हा पूर्ण होईल तेव्हा खऱ्या अर्थाने माझे जीवन कार्य पूर्ण होईल. हे धरण म्हणजे कोल्हापूर जिल्ह्यातील हरितक्रांतीची जननी आहे असे म्हटले जाते. यामुळे सिंचन क्षेत्रात वाढ होऊन त्या भागातील शेतकऱ्यांचा आर्थिक विकास घडवून आला.

३) व्यापार विषयक कार्ये :

राष्ट्राचा विकास व्यापारावर अवलंबून असतो, असे राजश्री शाहू महाराजांचे ठाम मत होते.म्हणूनच त्यांनी तरुणांना व्यापार व उद्योगाकडे वळण्याचे अवाहन केले. व्यापार ही एक चळवळ म्हणून पुढे यावी असे त्यांना वाटत असे. म्हणून त्यांनी आपल्या दोन्ही मुलांना व्यापार-उद्योगात घातले होते.

i) शाहूपुरी बाजारपेठेची निर्मिती : कोल्हापूर संस्थानात गुळाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होत असे,परंतु या गुळाची बाजारपेठ कोल्हापुरात नव्हती. गुळ कोल्हापूरचा आणि नाव राजापूरचे अशी परिस्थिती होती. ती बदलण्यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी सन. १८९५ मध्ये रेल्वे स्टेशनजवळ 'शाहूपुरी' ही नवीन बाजारपेठ वसवली. तेथे व्यापाऱ्यांना सवलती देऊन वखारी घालण्यास प्रोत्साहन दिले. व अवघ्या ५ ते ७ वर्षात ही बाजारपेठ भरभराटीस आणली. येथून मोठ्या प्रमाणात गुळाची निर्यात केली जात असे. म्हणूनच आजही कोल्हापूर ही गुळाची सर्वात मोठी बाजारपेठ मानली जाते.

ii) जयसिंगपूर बाजारपेठेची निर्मिती : राजर्षी शाहू महाराजांनी संस्थानाच्या पूर्व भागात शिरोळ या गावी आणखी एक नवीन बाजारपेठ निर्माण केली.व तिला 'जयसिंगपूर' हे नाव दिले. ही बाजारपेठ पुढे व्यापारीदृष्ट्या भरभराटीस आली. याचप्रमाणे संस्थानाच्या पश्चिमेस राधानगरी धरणाच्या पायथ्याशी 'राधानगरी' नावाची नवी वसाहत निर्माण करून तिला बाजारपेठेचे स्वरूप दिले. त्या ठिकाणी व्यापाऱ्यांनी जावे म्हणून त्यांना प्रोत्साहन दिले. रकमा भांडवल म्हणून दिल्या. अशा प्रकारे शाहू महाराजांनी आपल्या संस्थांनामध्ये विकेंद्रित बाजारपेठांची निर्मिती करून तेथील अर्थकारणाला गती दिली.

४) उद्योगधंद्यांचा विकास :

प्रत्येक क्षेत्रातील प्रगती ही नियोजनबद्ध असायला हवी, असे महाराजांना वाटत असे. म्हणूनच त्यांनी आपल्या संस्थानाचे औद्योगिक सर्वेक्षण करून उपलब्ध नैसर्गिक साधन संपत्तीच्या सहाय्याने कोणकोणते नवीन उद्योगधंदे विकसित करता येतील याचे नियोजन केले. त्यानुसार स्वतःच्या कल्पकतेने अनेक उद्योग सुरू करण्यास लोकांना प्रोत्साहन दिले. ज्यामध्ये सुगंधित औषधी तेल उद्योग, मधुमक्षिकापालन उद्योग, काष्ठार्क तेल उद्योग आणि सुती कापड उद्योग अशा नविन्यपूर्ण उद्योगांचा समावेश होता. त्यासाठी देशाच्या विविध भागात शाहू महाराजांनी आपली माणसे त्या त्या उद्योगाच्या प्रशिक्षणासाठी पाठविली. आज आपणास वरील उद्योग सर्वत्र दिसून येतात. मात्र त्याकाळी संपूर्ण देशात अशा प्रकारचे उद्योग अभावानेच होते. या पार्श्वभूमीवर राजर्षी शाहू महाराजांनी हे उद्योग सुरू करण्यास दाखवलेली प्रयोगशीलता त्याकाळी ही अनेकांना अचंबित करणारी ठरली होती.

i) सुगंधित औषधी तेलाचे उत्पादन : राजर्षी शाहू महाराजांनी डी.एस.शाळिग्राम नावाच्या रसायन तज्ञांच्या मार्गदर्शनाखाली जंगल संपत्तीवर आधारित काही उद्योग सुरू केले. त्यामध्ये सुगंधित औषधे तेल उद्योग हा होता. त्याकाळी मुंबईत भरलेल्या मऔद्योगिक प्रदर्शनातफकोल्हापूर संस्थानातील सुगंधित औषधी तेलास चांदीचे पदक बहाल केले होते. तसेच हा एक नाविन्यपूर्ण प्रयोग असल्याचे प्रशस्तीपत्र ही देण्यात आले होते.

ii) काष्ठार्क तेल उद्योग : काष्ठार्क तेल उद्योगातही कोल्हापूरने बाजी मारली होती. सह्याद्रीच्या जंगलात मिळणाऱ्या वनस्पतींच्या लाकडाच्या भट्टया लावून,त्यापासून लोणारी कोळसा, व्हिनिगर आणि डांबर हे पदार्थ उत्पादित केले जात असत. ते पदार्थ म्हैसूर अमेरिका व जपान या देशात पाठविले जात असत. यांच्या उत्पादनाबद्दल ही कोल्हापूर संस्थानाला चांदीचे पदक देऊन गौरविण्यात आले होते.

iii) मधुमक्षिकापालन : कोल्हापूर संस्थानातील 'मधुमक्षिकापालन' हा सर्वात कौतुकास्पद व नाविन्यपूर्ण उद्योग होता. त्यामध्ये राजर्षी शाहू महाराजांची कल्पकता, प्रयोगशीलता, दूरदृष्टी, चिकाटी इत्यादी अनेक गुणांचे दर्शन होते. त्याकाळी अखंड हिंदुस्थानमध्ये कुठेही हा उद्योग अस्तित्वात नव्हता म्हणून महाराजांनी या विषयातील ग्रंथ मागवून आपल्या दरबारातील अधिकाऱ्यांना दिले व अभ्यास करून त्यांनी प्रशिक्षण देण्याची व्यवस्था केली. ज्यामुळे शेतकऱ्याला आणखी एक जोडधंदा निर्माण झाला. या उद्योगाने कोल्हापुरास फार मोठा लौकिक मिळवून दिला.

iv) शाहू छत्रपती मिलची स्थापना : राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूरमध्ये २७ सप्टेंबर १९०६ रोजी दसऱ्याच्या शुभ मुहूर्तावर 'शाहू छत्रपती मिल' या कापड गिरणीची स्थापना केली. याबरोबरच संस्थानात शिरोळ, इचलकरंजी, गडहिंग्लज या ठिकाणी अनेक कापड गिरण्या उभा केल्या. व अल्पावधितच कोल्हापूर संस्थानाचे नाव हिंदुस्थानातील कापड उद्योगाच्या नकाशावर कोरले गेले. या उद्योगामुळे शेकडो लोकांना रोजगार मिळाला. याबरोबरच संस्थानांमध्ये पहिली ऑइल मिल, पहिली सॉ मिल, पहिली फाउंड्री फॅक्टरी, पहिली इलेक्ट्रिक कंपनी, पहिली मोटार ट्रान्सपोर्ट कंपनी असे अनेक उद्योग नव्याने सुरू केले. या उद्योगांना लागणारा प्रशिक्षित कामगार मिळावा यासाठी 'राजाराम इंडस्ट्रियल स्कूल' या संस्थेची स्थापना केली. तसेच व्यापाऱ्यांना व उद्योजकांना अल्पमुदतीच्या कर्जाद्वारे भांडवल पुरवठा करण्याची व्यवस्था केली. यातून महाराजांची आर्थिक विकासासाठी कृषी बरोबर औद्योगिक विकासाची गरज असणारी

ISSN No. 2394-5990

दृष्टी दिसून येते. जी राजकारणी व प्रशासकीय अधिकाऱ्यांना आजही मार्गदर्शक ठरते.

५) सहकार विषयक कार्ये :

सहकारी तत्त्वाचे आद्य पुरस्कर्ते, राजर्षी शाहू महाराज यांनी आपल्या संस्थानांमध्ये सन. १९१२ मध्ये 'सहकारी संस्था विषयक कायदा' करून सहकाराची मुहूर्तमेढ रोवली. त्या अंतर्गत सहकारी संस्थांची नोंदणी करण्यासाठी 'सहकार निबंधकाची' नेमणूक करण्यात आली. सन. १९१३ मध्ये भास्करराव जाधव यांच्या नेतृत्वाखाली 'कोल्हापूर अर्बन को-ऑपरेटिव्ह सोसायटी लि.' ही पहिली सहकारी संस्था स्थापन केली. व त्यानंतर उत्तरोत्तर सहकारी चळवळीची संख्यात्मक व गुणात्मक वाढ वेगाने होत गेली. ग्रामीण भागापर्यंत विविध क्षेत्रात सहकारी चळवळ मोठ्या प्रमाणात फोफावली ज्यामध्ये विविध कार्यकारी सहकारी संस्था, सहकारी उपसा जलसिंचन संस्था, सहकारी दूध संस्था, ग्रामीण पतपुरवठा संस्था, सहकारी साखर उद्योग, सहकारी सूत गिरण्या अशा अनेक प्रकारच्या सहकारी संस्थांचे दाट जाळे राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या संस्थानांमध्ये विणले होते.

अशा प्रकारे राजर्षी शाहू महाराजांनी शेती विकासविषयक केलेली कार्ये,जलसिंचन व्यवस्था, व्यापारविषयक कार्ये, उद्योगासंबंधीचे कार्ये, सहकारी संस्थांची उभारणी या सर्व केलेल्या कार्यातून त्यांचे आर्थिक विचार स्पष्ट होतात. शेती, उद्योग, व्यापार, सहकार व जलसिंचन इत्यादी क्षेत्राचा त्यांनी केलेल्या विकास पाहून त्यांना संतुलित विकासाचे आद्य प्रवर्तक असेच म्हणावे लागेल. त्याकाळी शेती क्षेत्रात राबविलेले नाविन्यपूर्ण असे उपक्रम आजही अनुकरणशील आहेत. जलसिंचनासंबंधी केलेले महान कार्य आजच्या राजकीय नेतृत्वाला मार्गदर्शक आहे. व्यापार व उद्योगासंबंधी राबविलेले नाविन्यपूर्ण उपक्रम हे आजच्या सरकारला व प्रशासकांना निश्चितच मार्गदर्शक आहेत. कोणता उद्योग कुठे उभारावा, व्यापारपेठांची निर्मिती कशाप्रकारे करावी, सहकारी संस्थांची उभारणी कशा प्रकारे करावी, त्यांचे कामकाज करताना लोकांचे हित कसे जोपासावे, या सर्व आर्थिक विचारांची २१ व्या शतकातील भारताला प्रगतीपथावर जाण्यासाठी निश्चितच गरज आहे.

निष्कर्ष :

१) शेती आणि शेतकरी यांचा विकास करण्यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी व्यापारी पिकांचे उत्पादन घेणे,कृषी प्रदर्शने भरवणे, पशु प्रदर्शन,विज्ञान प्रदर्शन भरविणे इत्यादी अनेक मार्गाचा अवलंब केला. तसेच शेतकऱ्यांची सावकारी पाशातून मुक्तता करण्यावर ही भर दिला. आज याचे अनुकरण झाले तर शेतकरी आत्महत्येच्या वाटेला जाणार नाही. व त्याची दारिद्र्यातून मुक्तता होईल.

२) जलसिंचनाचे महत्त्व जाणून राजर्षी शाहू महाराजांनी बांधलेले राधानगरी धरण हे त्या काळातील देशातील सर्वात मोठे धरण होते. आजही असे सिंचन प्रकल्प मोठ्या प्रमाणावर उभारले तर कष्टकरी बळीराजाचे जीवन फुलेल व ग्रामीण विकासाला चालना मिळेल.

३) कृषि विकासाबरोबरच राजर्षी शाहू महाराजांनी व्यापार क्षेत्राच्या विकासाकडेही जाणीवपूर्वक लक्ष दिले. शाहूपुरी, जयसिंगपूर, राधानगरी अशा बाजारपेठा निर्माण करून त्यांचा विकास केला. काळाची गरज ओळखून बाजारपेठांची निर्मिती करणे हे राजर्षी शाहू महाराजांचे धोरण आजच्या परिस्थितीतही लागू करण्यासारखे आहे.

४) व्यापाराबरोबरच सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असणारी दुसरी बाब म्हणजे उद्योगाचा विकास होय. हे राजश्री शाहू महाराजांनी जाणले होते. म्हणूनच त्यांनी आपल्या संस्थानांमध्ये सुगंधित औषधी तेलाचे उत्पादन, काष्ठार्क तेल उद्योग, मधुमक्षिकापालन, शाहू छत्रपती कापड गिरणीची स्थापना याबरोबरच ऑइल मिल, सॉ मिल, इलेक्ट्रिक कंपनी, मोटर ट्रान्सपोर्ट कंपनी असे अनेक उद्योग विकसित केले. उद्योगांच्या बाबतीतली राजर्षी शाहू महाराजांची ही कल्पकता, नाविन्यपूर्णता आजही शासन संस्थांना मार्गदर्शक आहे.

५) राजर्षी शाहू महाराजांनी सहकाराचे महत्त्व जाणले होते. म्हणूनच त्यांनी सन. १९१२ मध्ये ङ्गसहकारी संस्था विषयक कायदाफ केला. त्या अंतर्गत विविध क्षेत्रात सहकारी संस्थाचे जाळे आपल्या संस्थानामध्ये विणले. आजही २१ व्या शतकामध्ये सहकार खात्याद्वारे आर्थिक विकास साध्य करण्याचा राष्ट्रीय पातळीवर प्रयत्न केला जात आहे. यासाठी राजर्षी शाहू महाराजांची सहकारी चळवळ निश्चितच मार्गदर्शक ठरेल.

संदर्भसूची :

१. पवार जयसिंगराव (संपा) , (२००१), राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ , कोल्हापूर : महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी.

२. नाईक तु. बा. (२००५) , छत्रपती राजर्षी शाहू महाराज, पुणे : मेहता पब्लिशिंग हाऊस.

३. पवार शिरिष, (२०१२) , राजर्षी छत्रपती शाहू महाराज : विचार आणि कार्य, पुणे : सह्याद्री प्रकाशन.

४. पवार जयसिंगराव भा., (२०१२),राजर्षी शाहू छत्रपती जीवन व कार्य, कोल्हापूर : महाराष्ट्र इतिहास प्रबाधिनी.
५. कुलकर्णी मीना,(१९७५) , श्री शाहू छत्रपतींचे अर्थकारण, कोल्हापूर : गौरीनंदन पब्लिकेशन.
६. जाधव रमेश,(१९९७), लोकराजा शाहू छत्रपती, पुणे : शैलेंद्र प्रकाशन.
७. कीर धनंजय,(२००८) , राजर्षी शाहू छत्रपती, मुंबई : पॉप्युलर प्रकाशन.
८. कीर धनंजय,(१९७९), राजर्षी शाहू छत्रपती – एक समाज क्रांतिकारक राजा, मुंबई : पॉप्युलर प्रकाशन.

■■■

ISSN No. 2394-5990

शैक्षणिक व सामाजिक सुधारणांचे प्रणेते : छत्रपती राजर्षी शाहू महाराज

प्रा. संपतराव माणिकराव गर्जे
प्राध्यापक
भारतीय जैन संघटनेचे उच्च माध्यमिक विद्यालय,
संत तुकारामनगर, पिंपरी, ता. हवेली,
जि. पुणे, पिन - ४११०१८
sampat.garje66@gmail.com, मो. : ९४०३३५८२२२.

सारांश :

महाराष्ट्रीय जनतेच्या किंवा समाजाच्या मनामध्ये समाज सुधारणेच्या माध्यमातून सत्याचा सूर्य प्रकट करणाऱ्या राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे कार्य अनमोल, अलौकिक व अभूतपूर्व आहे. महाराष्ट्रीयन संस्कृतीत अवघ्या समाजाला मार्गदर्शन व प्रेरणा देणारी, मरगळलेल्या शैथल्यरुपी जीवनात जागृती आणणारी एक सर्वश्रेष्ठ विभूती म्हणजेच राजर्षी छत्रपती शाहू महाराज होय. महाराष्ट्रातील समाज सुधारणेचे शिल्पकार राजर्षी छत्रपती शाहू महाराज आहेत. राजर्षी शाहू महाराज हे ब्रिटिशांच्या राजवटीतील संस्थानिक होते तरी त्यांच्या समाजसुधारणेच्या कार्यामुळे त्यांचे नाव इतिहासात अजरामर झाले. शिक्षणानेच आमचा तरणोपाय आहे, शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती झाली नाही असे राजर्षी शाहू महाराजांचे मत होते. म्हणूनच शैक्षणिक समाज सुधारणा क्रांती करण्याचे अनमोल कार्य राजर्षी शाहू महाराजांनी केले. त्याचबरोबर दीन, दलित, दुबळे व दुःखी यांचे कल्याण हेच जणू राजर्षी शाहू महाराजांच्या जीवनाचे ध्येय होते. उपेक्षितांच्या उद्धाराचा संकल्प करून त्यांचा सामाजिक विकास करणे हे व्रत त्यांनी आयुष्यभर पाळले. मजीवभावे जीवसेवाफ हा त्यांचा महामंत्र होता. विविध कलाप्रेमी राजा, दलितोध्दारक, मानवतावादी राष्ट्रपुरुष, वंचितांचे वाली, लोकमंगल, लोककल्याणकारी राजा छत्रपती शाहू महाराजांचे सर्वच क्षेत्रातील कार्य महन्मय आहे. शैक्षणिक व सामाजिक सुधारणा क्रांतीचे ते थोर प्रणेते होते.

प्रस्तावना :

चैतन्यमयी ओठात माझ्या
धार वज्राची मिळू दे
प्रेरणादायी आत्म्यात माझ्या
सूर्य सत्याचा उजळू दे

महाराष्ट्रीय जनतेच्या वा समाजाच्या मनामध्ये समाज सुधारणेच्या माध्यमातून सत्याचा सूर्य प्रकट करणाऱ्या राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे कार्य अनमोल, अलौकिक व अभूतपूर्व आहे. महाराष्ट्रामध्ये जे सामाजिक परिवर्तन झाले त्या परिवर्तनाच्या इतिहासात राजर्षी शाहू महाराजांचे स्थान अव्वल दर्जाचे आहे. इंग्रजी काळामध्ये अथवा ब्रिटिशांच्या काळामध्ये आपला बहुसंख्य समाज हा दीर्घकाळ शिक्षण, राजकीय सत्ता, सामाजिक स्थान व प्रतिष्ठा यापासून वंचित राहिला. परंतु महाराष्ट्रामध्ये हे झाले नाही. महाराष्ट्रीयन संस्कृतीत अवघ्या समाजाला मार्गदर्शन व प्रेरणा देणारे, मरगळलेल्या शैथल्यरुपी जीवनात जागृती आणणारी एक सर्वश्रेष्ठ विभूती म्हणजेच राजर्षी छत्रपती शाहू महाराज. म्हणूनच या महान विभूती विषयी असे प्रतिपादन करावेसे वाटते की,

तटधर्म कल्पनांचे
उलथून पाडिले तुम्ही
दलितांस धीर दिधला
पुसिलेस आसवांशी

या उक्तीप्रमाणे खरोखरच महाराष्ट्रातील समाज सुधारण्याचे शिल्पकार राजर्षी छत्रपती शाहू महाराज आहेत. म्हणूनच महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री व प्रख्यात साहित्यिक यशवंतरावजी चव्हाण यांनी राजर्षी शाहू महाराजांना मोठ्या दिलाचा राजा असे म्हटलेले आहे.

शाहू महाराजांचा जन्म २६ जून १८७४ रोजी कागल येथील घाटगे घराण्यात झाला. त्यांचे मूळ नाव यशवंत. कोल्हापूर संस्थानाचे राजे चौथे शिवाजी महाराज यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या पत्नी आनंदीबाई यांनी १७ मार्च १८८४ रोजी यशवंतरावांना दत्तक घेतले व शाहू छत्रपती हे नाव ठेवले. १७ व्या वर्षी लक्ष्मीबाईंशी विवाह झाल्यानंतर २ एप्रिल १८९४ रोजी त्यांचा राज्यारोहन समारंभ झाला व ते कोल्हापूर संस्थानाचे राजे झाले.

राजर्षी शाहू महाराज हे ब्रिटिशांच्या राजवटीतील संस्थानिक होते. भारतातील पारतंत्र्याचे वातावरण पाहून –

स्वच्छ सारे मार्ग व्हावे
आणि मनेही साफ व्हावी
मोकळ्या श्वासात येथे
जीवसृष्टी जन्म घ्यावी

असे त्यांना वाटत होते. देश, काल, परिस्थितीच्या मर्यादा पडत होत्या. पण त्यांनी या सगळ्या परिस्थितीला सामोरे जाऊन समाज सुधारणेचा मार्ग अवलंबिला. त्यांच्या समाज सुधारणेच्या कार्यामुळे त्यांचे नाव इतिहासात अजरामर झाले. शाहू महाराजांच्या राजसत्तेला सर्वसामान्य जनतेच्या कळवळ्याचे लेणे चढले होते. कोल्हापूर संस्थानामध्ये शाहू महाराजांनी कला, व्यापार, विद्या, उद्योग इत्यादी क्षेत्रामध्ये नवचैतन्य निर्माण केले. या अनेकविध क्षेत्रातील गुणीजनांना त्यांनी प्रोत्साहन दिले. आपल्या राज्यामध्ये क्रीडा, व्यापार, कला, विद्या इत्यादी क्षेत्रांची भरभराट व्हावी व त्या क्षेत्रातून आपल्या प्रजाजनांचे भले व्हावे, चांगले व्हावे ही महाराजांची प्रेरणा होती. छत्रपती शाहू महाराजांनी समाज परिवर्तनाच्या दृष्टिकोनातून वेगवेगळ्या शैक्षणिक व सामाजिक सुधारणा केल्या त्या पुढीलप्रमाणे :

शैक्षणिक सुधारणा :

१९ व्या शतकामध्ये त्यावेळेसच्या बहुजन समाजाला दोन मोठे रोग लागले होते ते म्हणजे एक अज्ञान व दुसरे दारिद्र्य. याचे मूळ कारण म्हणजे त्यावेळेस असणारा शिक्षणाचा अभाव म्हणजेच अविद्या. या अविद्येमुळे शूद्रातिशूद्र समाजामध्ये त्या काळात प्रचंड अनर्थ झालेले होते. याची जाणीव आपल्या बांधवांना प्रथमतः थोर महापुरुष महात्मा ज्योतिराव फुले यांनी करून दिलेली होती. अत्यंत सामाजिक कठीणप्रद परिस्थितीमध्ये या विचारांचा वारसा पुढे छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या राज्यात चालू ठेवलेला होता. शिक्षणाविषयीची माहिती सांगत असताना महाराज असे म्हणत असत की, शिक्षणानेच आमचा तरणोपाय आहे असे माझे ठाम मत आहे. शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती झाली नाही, असे इतिहास सांगतो. अज्ञानात बुडून गेलेल्या देशात उत्तम, मुत्सद्दी व लढवय्ये वीर कधीही निपजणार नाहीत म्हणूनच सक्तीच्या व मोफत शिक्षणाची हिंदुस्तानला अत्यंत आवश्यकता आहे. शिक्षण हीच खरी समाजाची संजीवनी आहे ते प्रदान केल्याशिवाय शुद्रातिशुद्रांची ऐहिक व बौद्धिक गुलामगिरीतून मुक्तता होणार नाही हे शाहू महाराजांनी जाणले होते. म्हणूनच शाहू छत्रपतींनी सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा आग्रह धरला. मागासलेल्या वर्गांची मानसिक गुलामगिरी नाहीशी करण्यासाठी त्यांना किमान प्राथमिक शिक्षण तरी दिले गेले पाहिजे असे त्यांचे ठाम मत होते. खालच्या वर्गाच्या लोकांच्या बुद्धीवर व ज्ञानावर जे जड मानसिक गुलामगिरीचे जुलमी जू लादले गेले आहे ते झुगारून देण्याची शक्ती बहुजन समाजाच्या अंगी येणे महत्त्वाचे आहे, म्हणून त्यांना सक्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षण देणे गरजेचे आहे हे शाहू महाराजांनी ओळखले व त्यानुसार ते विचार कृतीतून अंमलात आणले. बहुजन समाज समृद्ध व बलवान झाला पाहिजे. उत्तम उद्योगपती, उत्तम सैनिक, उत्तम शिक्षक, उत्तम शेतकरी, उत्तम व्यापारी निर्माण झाले पाहिजेत व त्यासाठी शिक्षणगंगेचे पाठ खेड्यापाड्यांतील गोरगरीब जनतेच्या दारापर्यंत नेले पाहिजे असे महाराजांना वाटत होते.

३० सप्टेंबर १९१७ साली शाहू महाराजांनी प्राथमिक शिक्षणाच्या संदर्भात निश्चित पाऊल उचलले. सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची नियमावली तयार करण्यासाठी करमरकर, मराठे व प्रो. पंडितराव अशा तीन शिक्षण तज्ञांची समिती नेमली गेली. एज्युकेशन इन्स्पेक्टर डोंगरे यांच्याकडे अभ्यासक्रम तयार करण्याची जबाबदारी सोपविली गेली. त्याचप्रमाणे या सक्तीच्या शिक्षण योजनेवर एक लाख रुपये खर्च करण्याचे जाहीर केले. साधारणपणे ५०० ते १००० लोकसंख्या असलेल्या प्रत्येक गावामध्ये प्राथमिक शाळा सुरू केली गेली. प्रारंभीच्या काळामध्ये धर्मशाळा, देवळे, चावडी अशा इमारतींमध्ये शाळा सुरू केल्या. ज्या गावांमध्ये इमारती नाहीत त्या गावांमध्ये तुळजाभवानीचे मंदिर बांधून एका सोप्यात शाळा व दुसऱ्या सोप्यात गाव चावडी ठेवावी असे आदेश दिले गेले. वर्षभरामध्ये संस्थानातील खेड्यापाड्यांत अशा ९६ नव्या शाळा सुरू झाल्या. ज्या काळी शिक्षकांचा पगार बारा रुपये होता त्या काळामध्ये प्राथमिक शिक्षणावर शाहू महाराजांनी तीन लाखापर्यंत रक्कम खर्च करून प्राथमिक शिक्षण खुद्द आपल्या नजरेखाली ठेवले. छत्रपती शाहू महाराजांनी त्या काळामध्ये स्त्री शिक्षणास प्रोत्साहन दिले. संस्थानामध्ये मुलामुलींच्या शाळा निर्माण केल्या पण त्याचबरोबर खास मुलींसाठीही स्वतंत्र शाळा स्थापन केल्या गेल्या. छत्रपती शाहू महाराजांचा शिक्षणाविषयीचा ध्यास प्रचंड मोठा होता.

देखणी ती पाऊले
जी ध्यासपंथे चालती
वाळवंटातुनी सुद्धा
स्वस्तिपद्मे रेखिती

याप्रमाणे त्यांच्या शिक्षणविषयक कार्याची थोरवी होती. विशेषतः महाराजांच्या कारकिर्दीच्या पहिल्या चार-पाच वर्षांमध्ये सह्याद्री लगतच्या भुदरगड सारख्या मागासलेल्या भागामध्ये मुलींच्या शाळा स्थापन झालेल्या होत्या. ज्या ठिकाणी मुलींच्या स्वतंत्र शाळा नाहीत त्या ठिकाणी मुले-मुली एकत्र शिक्षण घेत

ISSN No. 2394-5990

होती. विशेषतः मुलींच्या शिक्षणामध्ये शिक्षकांनी अधिक रस घ्यावा म्हणून मुलांच्या शाळेत पास होणाऱ्या मुलींच्या संख्येवर त्या शिक्षकांना खास इनाम म्हणून बक्षीसी दिली जात असे. प्रौढ स्त्रियांच्या शिक्षणाच्या बाबतीतही शाहू महाराजांनी विशेष लक्ष दिले होते. शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या मागासलेल्या जातींच्या स्त्रियांसाठी त्यांनी १९१९ मध्ये एक खास हुकूम गॅझेट केला होता. त्यानुसार अशा स्त्रियांना राहण्या जेवण्याची सर्व व्यवस्था दरबाराकडून मोफत केली गेलेली होती. मुलींच्या उच्च शिक्षणाच्या बाबतीतही अत्यंत उदार दृष्टी त्यांनी ठेवलेली होती. राजाराम कॉलेजमध्ये शिकणाऱ्या सर्व मुलींना त्यांनी शिक्षण मोफत केलेले होते. बहुजन समाजातील अनेक होतकरू तरुणांना उच्च शिक्षणासाठी आर्थिक साहाय्य शाहू महाराजांनी दिले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर व रा. ब. पी. सी. पाटील यांची उदाहरणे तर इतिहास प्रसिद्धच आहेत. नामवंत शिक्षण तज्ञ म्हणून प्रसिद्ध पावलेले प्रि. सी. आर. तावडे यांना अमेरिकेत उच्च शिक्षणास जाण्यासाठी तसेच नामवंत कलावंत भाई माधवराव बागल यांना जे. जे. स्कूल आर्ट मध्ये शिकण्यासाठी साहाय्य केले होते. कायदा, तंत्रज्ञान, वैद्यक, कला या विषयात उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी काही शिष्यवृत्त्या ठेवल्या गेल्या होत्या.

शहरांमध्ये बोर्डिंगे नसली तर अनेक होतकरू विद्यार्थ्यांची शिकण्याची इच्छा असूनही त्यांना शिक्षण घेता येत नाही ही गोष्ट महाराजांना दिसून आली होती. म्हणून १८९६ साली कोल्हापूर येथे सर्व जाती-जमातीसाठी एक बोर्डिंग त्यांनी स्थापन केली. या बोर्डिंगमध्ये विद्यार्थ्यांची राहण्याची व्यवस्था मोफत केलेली होती. शाहू महाराजांनी व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग, दिगंबर जैन बोर्डिंग, वीरशैव लिंगायत वसतिगृह, मुस्लिम बोर्डिंग, मिस क्लार्क होस्टेल, दैवज्ञ शिक्षण समाज बोर्डिंग, श्री नामदेव बोर्डिंग, पांचाळ ब्राह्मण वसतिगृह, श्रीमती सरस्वतीबाई गौड सारस्वत ब्राह्मण विद्यार्थी वसतिगृह, इंडियन ख्रिश्चन होस्टेल, रावबहादूर सबनीस प्रभू बोर्डिंग, आर्य समाज गुरुकुल, वैश्य बोर्डिंग, ढोर चांभार बोर्डिंग, शिवाजी वैदिक विद्यालय वसतिगृह, श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊस, सुतार बोर्डिंग, नाभिक विद्यार्थी वसतिगृह, सोमवंशीय आर्यक्षत्रिय बोर्डिंग, श्रीदेवांग बोर्डिंग इत्यादी बोर्डिंग विद्यार्थ्यांसाठी स्थापन केलेल्या होत्या. जातवार बोर्डिंगे काढण्यामागे शाहू महाराजांचा त्या त्या जातीतील पुढार्यांचे व कार्यकर्त्यांचे अशा बोर्डींगांना कायिक व आर्थिक साहाय्य मिळवण्याचाही हेतू होता. आपल्या जातीसाठी माणूस थोड्याफार प्रमाणात झीज सोसण्यास तयार असतो म्हणून शाहू महाराजांनी हा विचार ओळखला व प्रत्येक जातीतील पुढारी व कार्यकर्ते बोलावून त्यांना बोर्डिंगे स्थापण्यास व ती चालविण्यास प्रवृत्त केले. या पाठीमागे शाहू महाराजांची २५ वर्षांची तपश्चर्या होती. जातीवाचक बोर्डिंग काढली तरी त्यांच्यात अलगपणाची भावना राहू नये म्हणून ही बोर्डिंगे शक्यतो शेजारी-शेजारी ठेवण्याची शाहू महाराजांनी योजना केली होती. त्यांनी गंगावेशीतून रंकाळा वेशीकडे जाणाऱ्या रस्त्यावर सहा वसतिगृहांना व दसरा चौकाच्या परिसरात सात वसतिगृहांना जागा व काहींना इमारतीसह जागा दिल्या होत्या. ही जातीवाचक बोर्डिंगे काढण्यामागे शाहू महाराजांची दृष्टी पूर्णपणे राष्ट्रीय होती. कोल्हापूर येथील आर्य क्षत्रिय परिषदेच्या १५ ऑगस्ट १९२० रोजी भरलेल्या अधिवेशनात महाराजांनी आपले विचार सुस्पष्टपणे मांडलेले आहेत. ते म्हणतात :

जातीभेद हा हिंदुस्थानास लागलेला मोठा रोग आहे असे मी यापूर्वी अनेक प्रसंगी स्पष्ट बोलून दाखविले आहे व ते मोडण्याचे माझे प्रयत्न सतत चालू आहेत. ज्या समाजात आपण वाढलो त्या समाजाची उन्नती करण्याची काळजी वाहाणे हे योग्य आहे. पण त्या समाजाच्या बाहेर एक मोठा, फारच मोठा समाज आहे व त्याचीही सेवा आपणांस केली पाहिजे, याची जाणीव प्रत्येकाने ठेवली पाहिजे. म्हणूनच जातीचा अभिमान अगदी मर्यादित असावा. आपण हिंदी आहोत. देशाची उन्नती करण्याची जबाबदारी आपणांवर आहे, याची विस्मृती होऊ देता कामा नये. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे जात्यभिमान हा राष्ट्रकार्यास पोषक असावा, राष्ट्रसेवा नजरेआड करणारा नसावा.

जातिभेद मोडणे इष्ट आहे, जरूर आहे. जातिभेद पाळणे हे पाप आहे. देशोन्नतीच्या मार्गात हा अडथळा आहे. हा अडथळा दूर करण्याचे प्रयत्न जोराने केले पाहिजेत, ती जाणीव पक्की ध्यानात ठेवून मग या दिशेचा प्रयत्न जातिपरिषदांनी केला पाहिजे असे ते पुढाऱ्यांना सांगत असत. सर्व जातीत समभाव प्रस्थापित व्हावा व त्यातून राष्ट्रीयता निर्माण व्हावी अशी शाहू महाराजांची इच्छा होती. या दृष्टीने एका जातीच्या बोर्डिंगात दुसऱ्या जातिधर्माची काही मुले ठेवण्याचे त्यांचे प्रथमपासून धोरण होते. याचे उदाहरण म्हणजे व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंगात सुरुवातीपासूनच काही मुस्लिम व अस्पृश्य विद्यार्थी राहत होते. शाहू महाराजांनी स्थापन केलेल्या बहुतेक बोर्डिंगात सर्व जाती धर्माची मुले राहत होती. विद्यार्थ्यांना घरापेक्षा वसतिगृहात अधिक एकाग्रचित्ताने अभ्यास करता येतो. मुलांचा एकलकोंडा स्वभाव जाऊन सर्वांशी मिळून मिसळून वागण्याची त्यांना सवय होते. इतर विद्यार्थ्यांच्या अडीअडचणी समजतात. त्यांचे स्वभाव कळतात. तसेच

विद्यार्थ्यांमध्ये स्वावलंबन, सहकार्य, सहिष्णुता, समभाव, शिस्त प्राप्त होऊन वसतिगृहातील विद्यार्थी हा देशाचा चारित्र्यसंपन्न व सुसंस्कृत नागरिक बनण्याचा प्रयत्न करतो असा महाराजांचा विचार होता. अशा वसतिगृहातून महाराष्ट्राचे सहकार मंत्री नामदार यशवंतराव मोहिते, केंद्र सरकारचे माजी मंत्री कै. ना. डी. आर. चव्हाण, सहकार क्षेत्रातील अग्रगण्य कार्यकर्ते खासदार गुलाबराव पाटील, संस्कृत पंडित प्राचार्य एम. आर. देसाई, माजी मंत्री दादासाहेब जगताप, सुप्रसिद्ध लेखक ग. ल. ठोकळ, पंजाबचे राज्यपाल रँग्लर डी. सी. पावटे, नागरी पुरवठा मंत्री नामदार रत्नाप्पा कुंभार, महाराष्ट्राचे माजी गृहमंत्री बाळासाहेब देसाई, कॉम्रेड नागनाथ नायकवडी, महाराष्ट्राचे सेवानिवृत्त शिक्षण उपसंचालक श्री. कृ. गो. सूर्यवंशी तसेच मंत्री, प्राचार्य, राज्यपाल, न्यायाधीश, डॉक्टर्स, तंत्रज्ञ, अभियंते, आचार्य, आमदार, वरिष्ठ अधिकारी, समाजसेवक असे कितीतरी झालेले आहेत. शाहू महाराजांनी स्थापन केलेल्या बोर्डिंगमध्ये मध्यप्रदेश, गुजरात, कर्नाटकापासून सर्व जाती धर्माचे विद्यार्थी आले आणि शिक्षण घेऊन सर्व भारतभर शाहू महाराजांचा कीर्तीध्वज घेऊन विखुरले गेले. अशा विद्यार्थ्यांना घडविण्याचे श्रेय शाहू महाराजांच्या दिव्यदृष्टीला, तळमळीला आणि त्यांच्या अखंड तपश्चर्येला आहे.

शाहू महाराजांनी शिक्षणाच्या क्षेत्रात जे मूलगामी धडाडीचे धोरण अमलात आणले होते, त्याची मधुर फळे त्यांच्याच कारकिर्दीत प्रजाजनांना चाखावयास मिळाली. शाहू महाराजांच्या शैक्षणिक धोरणाचे परिणाम केवळ कोल्हापूर संस्थान व त्यांची कारकीर्द या पुरतेच मर्यादित राहिले नाहीत. त्यांच्या कार्यापासून प्रेरणा घेऊन पुढे कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यापासून ते डॉ. पंजाबराव देशमुखांपर्यंत, अनेक शिक्षण प्रसारकांनी सर्व महाराष्ट्रात बहुजन समाजाला समर्थ बनविणारी शिक्षण चळवळ अर्धशतकभर चालविली. शेकडो प्राथमिक शाळा, हायस्कूले व अनेक कॉलेज स्थापून ज्ञानगंगेचे असंख्य पाठ त्यांनी रयतेच्या झोपडीपर्यंत पोहोचविले. परिणामी महाराष्ट्रात बहुजन समाजाचा अपूर्व सामाजिक अभ्युदय घडून आला. त्याचप्रमाणे समाजाची एक प्रागतिक सामाजिक मानसिकता तयार झाली. या सर्व प्रगतीची मुळे राजर्षी शाहू महाराजांच्या विचारांत आणि कृतीत आहेत हे विसरून चालणार नाही.

सामाजिक सुधारणा :

जयांना कोणी ना जगती
सदा ते अंतरी रडती
तया जाऊन सुखवावे
जगाला प्रेम अर्पावे

अशी छत्रपती शाहू महाराजांची समाजाविषयीची आंतरिक तळमळ होती. ज्ञान, करुणा, परदुःखकारकता, समभाव, मैत्री, देशप्रेम, आत्मविश्वास, तेज, धैर्य इत्यादी शारीरिक व मानसिक गुण प्रकर्षाने छत्रपती शाहू महाराजांच्या व्यक्तिमत्त्वात दृष्टोत्पत्तीस येतात. दीन, दरिद्री लोकांचे कष्ट पाहून ते अत्यंत व्यथित होत असत. दीन, दलित, दुबळे व दुःखी यांचे कल्याण हेच जणू राजर्षी शाहू महाराजांच्या जीवनाचे ध्येय होते. उपेक्षितांच्या उद्धाराचा संकल्प करून त्यांचा सामाजिक विकास करणे हे व्रत त्यांनी आयुष्यभर पाळले. ङ्गजीवभावे जीवसेवाफ हा त्यांचा महामंत्र होता. समतेची, मैत्रीची, बंधुत्वाची त्यांची वाणी होती. त्यांच्या हृदयामध्ये स्वदेश प्रेम व विश्वबंधुत्व या भावनांचा अभूतपूर्व विकास झालेला होता.

समस्ता धीर तो द्यावा
सुखाचा शब्द बोलावा
अनाथा साह्य ते द्यावे
जगाला प्रेम अर्पावे

अशी ममतेची, मातृत्वाची, वात्सल्याची दृष्टी शाहू महाराजांची होती. शाहू महाराजांनी भटक्या व विमुक्त जमातींचा उद्धार केला. टकारी भामटा, राजपूत भामटा, कंजारभाट, रामोशी, फासेपारधी, छप्परबंद, कटबू अशा जमाती चोऱ्या, लुटालुट अशा कृत्यात ब्रिटिशांच्या काळात सापडू लागल्या. ब्रिटिशांनी त्यांना गुन्हेगार जमात म्हणून त्यावेळेस घोषित करण्यास सुरुवात केली. अशा जमातींना शाहू महाराजांनी पोटाशी धरले आणि माणसात आणले. या जमातीच्या लोकांचा संचार कोल्हापूर संस्थानात होऊ लागला. या प्रत्येक जमातीच्या अंगी विशिष्ट कला असून त्या कलेत ते निष्णात होते. शरीराने काटक असून त्या जमातीतील लोक मनाने निर्मळ होते. अशा लोकांना घरादारासाठी जागा देऊन त्यांनी स्थिर केले. त्यांच्या वस्त्या बनवल्या. कलाकुसरीच्या वस्तू बनविण्यास त्यांना प्रोत्साहन दिले. पहिलवानकी करण्यासाठी खुराक देऊन प्रख्यात कुस्तीगीर बनवले. त्यांचे बेकारी आणि दारिद्र्य दूर झाल्याशिवाय त्यांचा मानसिक विकास होणार नाही हे ओळखून फासेपारधी या जमातीतील प्रमुख पुढार्यांनाच त्यांनी आपल्या निवासस्थानाच्या संरक्षणाची जबाबदारी सोपवली. स्वतःच्या सोनतळी कॅम्पच्या खास पहाऱ्यावर त्यांना नेमले. सोनतळी कॅम्पवर महाराजांनी फासेपारध्यांसाठी बरीच बांधकामे काढली होती. या बांधकामावर स्त्री-पुरुष काम करीत असताना त्यांच्या मुलांच्या शिक्षणाची सोयही केली. एवढेच नाही तर भोजनाची व्यवस्था केली. १९१७ साली महाराजांनी खास आदेश काढून फासेपारधी तांड्यांना शेकडो एकर जमीन जात इनाम म्हणून दिली. त्यांना

ISSN No. 2394-5990

घरादाराचे व जमिनीचे मालक बनवून समाज क्रांतीची ही किमया घडवून आणली.

शाहू महाराजांनी जातीद्वेष हेच जातीभेदाचे कार्य आहे हे ओळखून जातीभेद निवारण चळवळ अंमलात आणली. त्या काळामध्ये आंतरजातीय विवाहाचा पुरस्कार करून जवळजवळ २५ आंतरजातीय विवाह साजरे केले गेले. २२ फेब्रुवारी १९१८ रोजी कोल्हापूर सरकारच्या गॅझेटमध्ये जाहीरनामा प्रसिद्ध होऊन संस्थानातील बलुतेदार पद्धती खालसा करण्यात आली. सर्व बलुतेदारांना वाटेल त्या ठिकाणी राहण्याची व वाटेल तो धंदा वा वाटेल त्या प्रकारचे काम करण्याची परवानगी देण्यात आली. अशाप्रकारे ग्रामीण भागामध्ये असणाऱ्या बलुतेदारांना, मागासलेल्या जातींना महाराजांनी व्यवसाय स्वातंत्र्य दिले व एक प्रकारच्या सामाजिक गुलामगिरीतून त्यांची मुक्तता केली. मागासवर्गीय लोकांना सरकारी नोकरीमध्ये नेमून किंवा सार्वजनिक जीवनातील अधिकाराच्या जागा देऊन महाराजांनी त्यांचे कर्तृत्व खुलवणारी नवीन दालनेच उघडी केली. त्याचप्रमाणे स्त्री वर्गाच्या संरक्षणाचे कायदे विशेषतः विधवा - पुनर्विवाह कायदा, आंतरजातीय विवाह कायदा, क्रूरपणाच्या वर्तनास प्रतिबंध करणारा कायदा, घटस्फोटाचा व वारसाचा कायदा, देवदासी प्रथा प्रतिबंध कायदा अशा अनेक प्रकारच्या कायद्याच्या तरतुदी अंमलात आणल्या.

राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या राज्यामध्ये असणाऱ्या सरकारी नोकऱ्यांत मागासवर्गांसाठी पन्नास टक्के जागा राखून ठेवण्याचा क्रांतिकारी निर्णय घेतला होता. त्याचप्रमाणे सरकारी तत्त्वावर एका कापड गिरणीची त्यांनी उभारणी केली. कोल्हापूरच्या पश्चिमेला सुमारे ५५ किलोमीटर अंतरावर दाजीपूर जवळ भोगावती नदीला बंधारा घातला व जमिनीला पाणीपुरवठ्याची योजना आखून त्या बंधाऱ्याला महाराणी लक्ष्मीबाई तलाव असे नाव देण्यात आले. कोल्हापूर ते मिरज या रेल्वे मार्गाची पायाभरणी शाहू महाराजांच्या हस्ते करण्यात आली. महारोग्यांसाठी व्हिक्टोरिया लेप्रसी या हॉस्पिटलची स्थापना करण्यात आली. महाराजांनी शेती आणि त्यावर अवलंबून असलेला शेतकरी यांच्यासाठीही अनेक उपाययोजना केल्या. संस्थानातील सार्वजनिक पाणवठे आणि मंदिरे सर्वांसाठी खुली केली.

समारोप :

अस्पृश्यता निवारण, ग्रामोद्योगाचे पुनरुज्जीवन, दारिद्र्यता निर्मूलन, स्त्रियांसाठी सुधारणा, आर्थिक समानता कार्यक्रम असे अनेक उपक्रम त्यांनी अंगीकारले होते. जगद्गुरु संत तुकोबारायांच्या अभंगोक्तीप्रमाणे-

जें का रंजले गांजले
त्यासी म्हणे जो आपुलें
तोचि साधु ओळखावा
देव तेथेंचि जाणावा

हे त्यांच्या जीवनाचे सूत्र होते. विविध कलाप्रेमी राजा, दलितोध्दारक, मानवतावादी राष्ट्रपुरुष, वंचितांचे वाली, लोकमंगल, लोककल्याणकारी राजा छत्रपती शाहू महाराजांचे सर्वच क्षेत्रातील कार्य अनमोल, अलौकिक व अभूतपूर्व आहे. शैक्षणिक व सामाजिक सुधारणा क्रांतीचे ते थोर प्रणेते होते. समारोप प्रसंगी एवढेच नमूद करावेसे वाटते -

निजदेहाचे झिजवूनी चंदन
तुम्ही वेचियेले येथे तनमन
स्मृतीस तुमच्या शतशः वंदन.

संदर्भ :

१. छत्रपती शाहू स्मृतिदर्शन - हिंदुराव साळुंखे, प्रथमावृत्ती, कोल्हापूर, १९९८.
२. राजर्षी शाहू : एक दृष्टिक्षेप - जयसिंगराव पवार, कोल्हापूर,१९८९.
३. राजर्षी शाहू : राजा व माणूस - कृ. गो. सूर्यवंशी, पहिली आवृत्ती, पुणे, १९८४.
४. लोकराजा शाहू छत्रपती - रमेश जाधव, प्रथम आवृत्ती, पुणे, १९९७.
५. छत्रपती राजर्षी शाहू महाराज - तु. बा. नाईक, पाचवी आवृत्ती, २००७.
६. राजर्षी - एक व्यक्ती दर्शन - श्याम येडेकर, कोल्हापूर.
७. राजर्षी श्री शाहू छत्रपती यांचे अंतरंग - वा. द. तोफखाने, प्रथमावृत्ती, कोल्हापूर, १९६३.
८. राजर्षी शाहू गौरव ग्रंथ - (सं.) पी. बी. साळुंखे, मुंबई, १९७६.

■■■

छत्रपती राजर्षी शाहू महाराजांचा समाजसुधारणेच्या संदर्भातील तत्त्वज्ञानात्मक दृष्टीकोण

डॉ. उध्दव न. कांबळे
सहायक प्राध्यापक, तत्त्वज्ञान विभाग
वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर.
ई-मेल : unkamble27@gmail.com
मोबाईल - ८३५६०८६३८८

सारांश :

चार्वाक, बुध्द, फुले, मध्ययुगातील संत महात्मा बसवेश्वर, संत तुकाराम आदि सर्व सुधारकांनी महाराष्ट्रातीलच नव्हे तर सबंध देशातील समाज सुधारणेच्या संदर्भात विचारांच्या माध्यमातून विद्रोह केलेला होता. त्यांच्या कार्यामूळे समाजातला वंचित समूह पुरोहित शाहीच्या कचाट्यातून पूर्णपणे सुटला, मुक्त झाला असे मी म्हणणार नाही, पण त्यांचे जीवन काही प्रमाणात सुसह्य झाले. एकोणविसाव्या शतकात शाहू महाराजांच्या प्रयत्नांनी समाज सुधारणेला वेग आला. शाहू महाराजांनी समाज सुधारणेकरीता समाजातील सर्व अनिष्ट गोष्टीला विरोध करून, प्राथमिक, व्यावसायिक, उच्च आणि मोफत शिक्षणाची अंमलबजावणी केली. यामुळे समाजसुधारणेत आमुलाग्र बदल घडून आले.

सूचक शब्द : शाहू महाराज, समाजसुधारणा, मोफत शिक्षण, स्वराज्य, अस्पृश्य.

प्रस्तावना :

विसाव्या शतकाच्या पहिल्या पंचवीस वर्षात महाराष्ट्राचे सामाजिक जीवन ढवळून काढणारी, सामाजिक समतेची प्रतिष्ठापना करण्यासाठी अविश्रांत परिश्रम करणारी, बहुजन समाजाच्या उध्दारासाठी तळमळणारी व मार्गदर्शन करणारी लोकोत्तर व्यक्ती राजर्षी शाहू महाराज होत. ते एका संस्थानाचे अधिपती असले तरी त्यांचे मन लोकशाहीवाद्यांचे होते, वागणूक समतेच्या पुरस्कर्त्यांची होती. बहुजन समाजाची व विशेषत: अस्पृश्य वर्गाची अस्मिता जागृत करण्याचे, त्यांच्या सर्वांगीण उद्धारचे कार्य त्यांनी सुरू केले व त्याद्वारा महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात समता प्रस्थापित करण्याचा मौलिक प्रयत्न केला.

शाहूमहाराजांच्या काळात, स्पृश्य माणसांचे पिंड व विचार सनातनी होते. सामाजिक समतेचे कार्य म्हणजे कार्यकर्त्याला ती सुळावरची पोळीच. त्या काळात, राजकीय सुधारणा अगोदर की सामाजिक सुधारणा अगोदर असे वातावरण होते. राजकीय सुधारणावादी मतवाद्यांचा मोठा जोर होता. अशा काळात सामाजिक समता प्रस्थापित करण्याचे तत्त्वज्ञान समाजापुढे धाडसाने मांडून, दलितोद्धारासाठी मूलगामी व क्रांतीकारक अशी ठाम व निश्चित भूमिका शाहूमहाराजांनी घेतली. यामध्येच त्यांचे मोठेपण आहे. दलित माणसाला, अस्पृश्य माणसाला माणूस मानून माणसाप्रमाणे वागविण्याचे शाहू महाराज यांचे कार्य चिरंतन व ऐतिहासिक स्वरूपाचे आहे.

जातिव्यवस्था विषयक विचार :

भारतातील उच्चनीच स्वरूपाच्या जातिव्यवस्थेतून जन्माला आलेला एक महाभयंकर प्रकार म्हणजे अस्पृश्यता आहे. त्याकरिता ही उच्चनीच जातीजातींची उतरंड मोडली पाहिजे व जातीभेदाचा हा विषवृक्ष मुळासकट उपटून काढला पाहिजे, अशी शाहू महाराजांची सुरुवातीपासून भूमिका होती. अस्पृश्यता हे याच जातिव्यवस्थेच्या समाजवृक्षाला आलेले महाभयंकर विषारी फळ आहे. त्या वृक्षाचे निर्मुलन करावयाचे असेल तर त्याकरीता आपल्या समाजातले जातीभेद गाडले पाहिजेत, मोडले पाहिजेत, त्याशिवाय समाजात खरी समता निर्माण होणार नाही. जातीभेद समाजघातकी आहे. त्याचप्रमाणे तो राष्ट्रालाही विघातक आहे.

शाहू महाराज आपल्या एका भाषणात असे म्हणाले होते की, 'भारताशिवाय इतर कोणत्याही देशात मनुष्यात जात नाही परंतु दुर्दैवाने हिंदुस्थानात मात्र जातिभेद इतका तीव्र आहे की मांजर, कुत्रे यापेक्षादेखील कमी अशाप्रमाणे आम्ही आपल्या देशबांधवास व भगिनीस वागवितो. तोंडाने बडबडणारे पुढारी आम्हास नको आहेत. कृतीने जातीभेद मोडून आम्हांस मनुष्याप्रमाणे वागवतील असे पुढारी पाहिजेत.'

सर्व जातींच्या पुढाऱ्यांना माझे सांगणे आहे की, आपली दृष्टी दूरवर ठेवा, पायापुरते पाहू नका. जातीभेद मोडणे इष्ट आहे, जरूरीचे आहे. जातीभेद पाळणे हे पाप आहे. देशाच्या उन्नतीच्या मार्गात हा अडथळा आहे. हा दूर करण्याचे

ISSN No. 2394-5990

जोरदार प्रयत्न केले पाहिजेत. तद्वत स्वराज्यावर सर्वांचा हक्क राहील. त्याकरीता महाराज दहा वर्षापर्यंत आम्हाला जातवार प्रतिनिधी निवडून देण्याचा हक्क असला पाहिजे असे म्हणतात.

महार वतनाचे उच्छाटण विषयक विचार :

महाराष्ट्रात महार वतनाची परंपरा आज शेकडो वर्षापासून चालत आलेली आहे. ही वतनाची जुलमी श्रृंखला महार समाजाच्या पायात अडकविल्यामुळे त्यांच्या सामाजिक प्रगतीचा मार्ग खुंटला होता. या वतनदारीमुळे त्यांना गावकीची सर्व कामे विनामोबदला करावी लागत. वीतभर इनामी जमिनीच्या तुकड्यांसाठी गावातील सर्व महार जमात अहोरात्र राबत असे. सरकारी वेठबिगारीची कामे सोडून गावकऱ्यांच्या कामासाठी महारांना अहोरात्र राबविण्याची वहिवाट होती. या परिस्थितीमुळे महार समाजाचे जीवन अत्यंत कष्टमय बनले होते. रात्री अपरात्री येणाऱ्या वेठबिगारी उचलण्यात महार समाजाचा जीव मेटाकुटीला आला होता. अज्ञानाच्या अंधकारात खितपत पडल्यामुळे आणि वेठबिगारीच्या राक्षसी जीवनाखाली सगळी जमात भरडली गेली होती. सामाजिक व धार्मिक रुढींमुळे आणि जातीभेदाच्या दडपणाखाली सर्व बाजूंनी पिडलेल्या समाजाला कसे मुक्त करता येईल, ही एक गंभीर समस्या महाराजांना सारखी जाचत होती. याकरीता महाराजांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा सल्ला घेतला, या समाजाला गुलामगिरीच्या दास्यविमोचनातून जर कायमचे मुक्त करायचे असेल तर, त्यांचे महारकी वतन नष्ट करा. असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महाराजांना सांगितले. बलुत्यासाठी रात्रंदिवस काबाडकष्ट करून लाचारी पत्करणारे जीवन महार समाजाच्या माणुसकीला काळीमा फासणारे आहे, तसेच महारकी व तराळकी यांमुळे स्वाभिमान नष्ट झाला आहे. अशा परिस्थितीत त्यांना जर सुधारावयाचे असेल, तर वतनाचे उच्चाटन करणे हा एकच प्रभावी मार्ग आहे, याची खात्री महाराजांना पटली. म्हणूनच सर्वांगीण परिस्थितीचा विचार करून महाराजांनी महारकी वतन नष्ट केल्याचे फर्मान काढले आणि अशा रीतीने लोकांच्या सार्वजनिक व धार्मिक धोरणाला जोरदार धक्का दिला.

पुनर्विवाह विषयक विचार :

हिंदू समाजामध्ये विधवा स्त्रियांना अपमानित, अमानुष वागणूक दिली जाते. लग्न म्हणजे काय ? नवरा म्हणजे कोण? या गोष्टीचे ज्ञान होण्यापूर्वीच अनेक मुलींची लग्ने हात असत. एखाद्या आजाराने त्या मुलीचा नवरा निवर्तला, तर या मुलीच्या पांढऱ्या पायांमुळेच तो मरण पावला, असा चुकीचा ग्रह करून घेऊन तिच्या सासरच्या मंडळीनी तिला जीव नकोसा करून सोडावा, हा नित्याचाच प्रकार होता. अशा मुलींनी उभे आयुष्य वैधव्यात काढायचे म्हणजे साक्षात नरकयातना भोगण्याचा प्रकार होय. तिने दुसरे लग्न करायचे नाही. याउपर पुरूषाने मात्र आपली बायको मरण पावल्यास खुशाल दुसरी बायको करावी. ती मेल्यास तिसरी करावी. त्याला मात्र कशाचेच बंधन नाही. विधवा स्त्रियांना पुनर्विवाहाचा हक्क मिळावा म्हणून महात्मा फुलेंनी फार परिश्रम घेतले होते. राजश्री शाहू महाराजांनीही १९१७ साली पुनर्विवाहाचा कायदा करून दुर्दैवी स्त्रियांना माणुसकीचे हक्क प्राप्त करून देण्याचा यशस्वी प्रयत्न केला.

स्वराज्य विषयक विचार :

स्वराज्य हे समाजातील सर्व घटकांच्या विकासाच्या दृष्टीकोनातून महत्तवपूर्ण आहे. या संदर्भात राजश्री शाहू महाराज म्हणतात दलितांच्या उद्धारासाठी प्रयत्न करणे म्हणजे त्यांच्यावर कसलीही मेहेरबानी करण्याचा प्रकार नसून त्याद्वारे आपण आपलाच उद्धार करून घेत असतो. अशी महाराजांची भूमिका होती. सामाजिक सुधारणेच्या चळवळीत उच्चवर्णीयांनी भाग घेणे हे त्यांचे परमकर्तव्य आहे, अशी त्यांची धारणा होती. सध्याची जाती व्यवस्था जशीच्या तशी कायम राहिली आणि स्वराज्य आले, तर स्वराज्य आम जनतेच्या हातात न जाता फक्त मूठभर लोकांच्या हातात जाईल अशी रास्त भिती महाराजांना होती. त्यांना स्वराज्य जरूर पाहिजे होते, परंतु या स्वराज्याची सत्ता मूठभर उच्चवर्णीयांच्या आणि वरिष्ठवर्णीयांच्या हातात केंद्रित होता कामा नये, याबाबत ते जागरुक होते. ते म्हणतात, जपान देशातील सामुराई जातीने, म्हणजे त्या राष्ट्रातील क्षत्रीय वर्गाने त्यांच्यातील जातीभेद मोडून टाकण्याच्या बाबतीत पुढाकार घेतला. त्याचप्रमाणे येथील प्रस्थापितांनी कार्य करावे.

महाराजांच्या या प्रयत्नामुळे महार समाजाला मिळालेला इनामी जमिनीचे रूपांतर रयतावा जमिनीत झाले. महार समाज खराखुरा नागरिक बनला. इतर गावकऱ्यांप्रमाणे त्यांनाही आता सर्व प्रकारचे हक्क प्राप्त झाले.

महाराजांच्या सामाजिक सुधारणेच्या वरील घटकांसोबत शैक्षणिक घटक पण तेवढाच महत्त्वाचा आहे. शैक्षणिक घटकांच्या संदर्भात महाराजांचे विचार सविस्तर पुढीलप्रमाणे आहेत.

शिक्षण विषयक विचार :

महात्मा फुले यांच्याप्रमाणेच सामाजिक सुधारणेच्या कार्यात त्यांनी शिक्षणाला प्रमुख स्थान दिले. शाहू महाराजांना जेव्हा

संस्थानाचे अधिकार प्राप्त झाले त्या काळात बहुजन समाज अज्ञानाचे व अंधश्रद्धेचे जीवन जगत होता. शिक्षण घेणे हे केवळ श्रीमंताचे काम आहे, आपले काम नाही अशी समजूत या समाजाची होती. ज्ञानाच्या श्रेत्रात ब्राह्मण जातीची मक्तेदारी ब्रिटिशपूर्व काळापासून निर्माण झालेली होती. इंग्रजांनी विद्येची प्रवेशद्वारे सर्व जातीसाठी खुली केली, तरीपण पुर्वीपासून ज्यांना विद्याभ्यासाची परंपरा नव्हती त्यांना या नव्या संधीचा लाभ घेता आला नाही. छत्रपती शाहू महाराजांनी या अज्ञानी बहुजन समाजात ज्ञानाची ज्योत प्रज्वलित करण्याचा निश्चय केला. बहुजन समाजाला, स्त्रियांना सुशिक्षित करण्यासाठी प्राथमिक शिक्षणापासून उच्चशिक्षणापर्यंत सोय उपलब्ध करण्याचे धोरण त्यांनी आखले.

शिक्षण हाच आमचा तरणोपाय आहे असे माझे ठाम मत आहे. शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती झाली नाही असे इतिहास सांगतो. अज्ञानात बुडून गेलेल्या देशात उत्तम मुत्सद्दी व लढवय्ये कधीही निपजणार नाहीत, म्हणून सक्तीच्या व मोफत शिक्षणाची भारत देशाला अत्यंत आवश्यकता आहे. अशी महाराजांची विचारसरणी होती.

१. प्राथमिक शिक्षणाला प्राधान्य :

बहुजन समाजाचा शैक्षणिक विकास घडवून आणण्यासाठी महाराजांनी योजनाबद्ध आखणी केली. प्रत्येक गावात एक तरी शाळा असावी व ती शाळा गावात बहुसंख्येने राहणाऱ्या जातीच्या व्यक्तीने चालवावी असे त्यांचे मत होते. शिक्षकाचा गावकामगारांत समावेश करून वतनाने भाडेमुक्त जमीन देण्याचे त्यांनी ठरविले. शिक्षणाविषयी शिक्षकाच्या मनात आस्था निर्माण व्हावी व त्यांनी शिक्षणविषयक चळवळीला गती यावी असे महाराजांना वाटत होते. तथापि वतनदारी पद्धत उपयुक्त न ठरल्याने त्यांनी शिक्षकांची पगारावर नेमणूक सुरू केली. सन १९१३ च्या आधीच्यानुसार वेगवेगळ्या खेड्यांमध्ये मंदीरे, चावडी, धर्मशाळा या इमारतीमधून प्राथमिक शाळा सुरू झाल्या. बहुजन समाजाच्या सर्वांगीण हितासाठी प्राथमिक शिक्षणाद्वारे शाहू महाराजांनी व्यापक बैठक तयार केली. त्या दृष्टीकोनातून त्यांनी निरनिराळ्या शिक्षणसंस्था व व्यक्तींना आर्थिक सहकार्य केले. त्यामुळेच कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षणाचा मोठ्या प्रमाणावर विकास झाला.

२. सक्तीचे शिक्षण :

बहुजन समाजाचा शेती हा प्रमुख व्यवसाय होता. सर्वजण शेतीतच गुंतुन राहत असत. शिवाय अज्ञानामुळे बहुजन समाजाला शिक्षणाचे महत्व समजलेच नव्हते, म्हणून महाराजांनी सक्तीचे शिक्षणाचे धोरण आखले. प्रथमच महाराजांनी प्रत्येक गावातून शाळा सुरू करण्यासाठी माहिती घेतली. गावागावातून शाळा सुरू करण्याचे आदेश दिले. देवस्थानच्या खर्चातून नित्य नैमित्यिक खर्च वजा करून उरलेले उत्पन्न शाळेला द्यावे असे ठरविले. २५ जुलै १९१७ च्या आदेशाने महाराजांनी प्राथमिक शाळेची फी माफीची घोषणा केली. २१ नोव्हेंबर १९१७ रोजी काढलेल्या जाहीरनाम्यानुसार कोल्हापूर संस्थानात शिक्षण सक्तीचे करण्यात आले. परिणामत: सर्वजण या प्रवाहात सामील झाले. त्याचबरोबर महाराजांनी उच्च व व्यवसाय शिक्षणाला त्यांनी महत्त्व दिलेले दिसते.

३. उच्च व व्यवसाय शिक्षण :

प्राथमिक शाळांप्रमाणे महाराजांनी माध्यमिक व उच्च शिक्षणालाही महत्व दिले. सन १८५१ मध्ये कोल्हापूर येथे सुरु झालेल्या एका इंग्रजी शाळेचे सन १८८१ साली राजाराम महाविद्यालयात रूपांतर झाले. जहागीरदार व सरकारांकडून मिळणाऱ्या वर्षासनातून या महाविद्यलयाचा खर्च चाले. पुढील काळात आर्य समाजाचे धोरण सामाजिक सुधारणेला अनुकूल असल्यामुळे ते या महाविद्यालयाची व्यवस्थीत प्रगती करील या विश्वासाने धंगपतीनी हे महाविद्यालय आर्य समाजाकडे सोपविले. त्यांच्या नियंत्रणाखाली या महाविद्यालयाची प्रगती झाली.

उच्च शिक्षणासोबत महाराजांनी व्यावसायिक शिक्षणालाही महत्त्व दिले. गावचा कारभार चांगला चालविला जावा या उद्देशानी महाराजांनी ङ्कपाटील स्कूल व तलाठी स्कूलफ सुरू केले. या शाळांमधून पाटील व तलाठ्यांना जमाखर्च, कायदे, शांतता व सुव्यवस्था महसूल विषयक दक्षता इ. विषयांचे शिक्षण दिले जात असे.

शैक्षणिक प्रगतीत शिक्षक महत्त्वाचा घटक असल्याने शिक्षकांसाठी ङ्कप्रशिक्षण केंद्रफ सुरू केले. तांत्रिक शिक्षणाची समाजात आवड निर्माण व्हावी म्हणून ङ्कजयसिंगराव घाटगे टेक्निकल इन्स्टिट्यूटचीफस्थापना केली. या संस्थेत विद्यार्थ्यांना लोहारकाम, गवंडीकाम, सुतारकाम यांसारख्या विषयाचे शिक्षण दिले जाई. या विविध शिक्षण संस्थांच्याद्वारे बहुजन समाजाला विविधांगी शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध करून देण्याचे श्रेय शाहू महाराजांनाच द्यावे लागेल.

वरील सविस्तर विवेचनानंतर शेवटी असे म्हणावे लागेल की, प्रतिकूल परिस्थिती असताना शाहू महाराजांनी बहुजन समाजातील सर्व घटकांचा सर्वांगीण विकास व्हावा, त्यांचे जीवन सुखकारक, आनंदमय व्हावे यासाठी आटोकाट प्रयत्न केले. म्हणूनच बहुजन समाजाचे जीवन सुधारू शकले यात शंकाच वाटत नाही.

ISSN No. 2394-5990

संदर्भ सूची :

- जाधव रमेश (सं), ङ्कराजर्षी शाहू गौरव ग्रंथफ, महाराष्ट शासन राजर्षी शाहू चरित्र साधने प्रकाशन समिती मंत्रालय, मुंबई, २०१६, पृ. १४०.
- जाधव भ. बा. (सं), 'राजर्षी शाहू महाराजांची भाषणे', राजर्षी प्रकाशन, १९७१, पृ. ६२.
- कित्ता, ६७.
- जाधव रमेश (सं), उनि, पृ. २९८.
- जाधव रमेश (सं), उनि, पृ. ४६४
- जी.एल.भिडे, 'महाराष्टातील समाजसुधारणेचा इतिहास,' फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००९, पृ. १०६.
- कित्ता, पृ. १०७.
- कित्ता, पृ. १०७.
- कित्ता, पृ. १०८.
- कित्ता, पृ. १०९.

■■■

राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक विचार आणि समाजसुधारणा

डॉ. उध्दव न. कांबळे
सहायक प्राध्यापक, तत्त्वज्ञान विभाग
वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर.
ई-मेल : unkamble27@gmail.com
मोबाईल - ८३५६०८६३८८

सारांश :

हात्मा फुले यांनी प्रथम महाराष्ट्रामध्ये समाजसुधारणेचे महत्त्वपूर्ण कार्य केलेले आहे. समाजातला बहुजन म्हणून गणला जाणारा वर्ग सर्व हक्क, अधिकारापासून वंचित असताना शिक्षणाची गंगा सर्व घटकांपर्यंत पोहचवून, समाजसुधारणेचे कार्य केले. फुलेंच्या नंतर शाहू महाराजांनी त्यांचे कार्य पुढे चालू ठेवले. महाराज असे म्हणत असत की, समाजाच्या आणि देशाच्या हिताच्या दृष्टीकोनातून शिक्षण हे महत्त्वपूर्ण आहे. त्याचा लाभ सर्वांना सर्वांच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. त्यासाठी शाहू महाराजांनी कोल्हापूर आणि कोल्हापूरच्या बाहेर शिक्षणाची गंगा दारोदारी पोहचवली. परिणामत: समाज सुधारीत झाला.

सूचक शब्द : शिक्षण, समाजसुधारणा, शाहू महाराज, उच्चशिक्षण, जातीभेद.

प्रस्तावना :

'क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे' या उक्तीप्रमाणे राजश्री शाहू महाराज एक क्रियाशील सुधारक तत्त्वज्ञ होते. ते एक प्रगतीप्रिय राजे असल्यामुळे त्यांना शिक्षणाच्या माध्यमातून समाजातील सर्व जाती धर्माची प्रगती साधावयाची होती. शिक्षण ही विकासाची गुरूकिल्ली आहे, हे शाहू महाराज चांगले ओळखून होते. त्यांना लोकांच्या उत्कर्षासाठी, बुद्धीच्या प्रगतीसाठी, मनावरील संस्कारासाठी गावोगावी शिक्षणाचे लोण त्यांना पोहोचवयाचे होते. आदर्श राज्यकर्त्यांचे खरे कर्तव्य शिक्षण आणि उद्योग यांची वाढ करून जनहित साधने असते. समाजातील प्रत्येक घटकाच्या उन्नतीसाठी प्रयत्नशील राहणे हे खऱ्या राज्याचे कर्तव्य असते. शाहू महाराजांनी सर्वांच्या शिक्षणाची सोय करून त्यांना स्वत:च्या हक्काची जाणीव करून देण्याची युगान्तर कार्य केले. महाराजांच्या समाजातील सर्व जाती-धर्माच्या शिक्षणाची ही काळजीवाहू कृती म्हणजे युगप्रवर्तक धैर्याची आणि कृती शूरपणाची प्रकाशमान पताकाच होय. महात्मा फुलेंनी जी ज्ञानज्योत लावली त्या 'ज्योतीने ज्योत लावण्याचे काम राजर्षींनी केले. हे काय करत असताना आपल्या समता आणि मानवता या दोन नेत्रासमोर,

'धर्म राज्ये भेद नसावे । सत्याने वागावे । ईशासाठी ।।
ख्रिस्त, महंमद ब्राह्मणांसी । धरावे पोटाशी । बंधूपरी ।।
निर्मिकाचा धर्म सत्य आहे एक । भांडणे अनेक कशासाठी ?'

ही महात्मा फुलेंची तत्त्वनिष्ठा डोळ्यासमोर ठेवून आणि स्वामी दयानंदांचा सर्व मानवजातीच्या उन्नतीचा मूलमंत्र मनात बाळगून राजश्रींनी लोकशिक्षणाचा यज्ञ केला.

शिक्षण :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर शिक्षणाच्या संदर्भात एके ठिकाणी असे म्हणतात, 'विद्येशिवाय माणसाला शांतता नाही आणि माणूसकीही नाही. ती महासागरासारखी आहे. माणसाला जगण्यासाठी अन्नाची आवश्यकता तशीच विद्येची.' त्यांच्या मते शिक्षणामुळे जगणे सुसह्य होते. जगण्यासाठी शक्ती मिळते. वैचारिक दृष्टी प्राप्त होते. जीवनातील आव्हानांकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टीकोन निर्माण होतो. स्वावलंबी, स्वाभिमानी बनता येते. व्यक्तीमध्ये नैतिक-अनैतिक, योग्य-अयोग्य व चांगले-वाईट यांमध्ये फरक करण्याची विवेकशक्ती विकसित होते. 'शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे जो कोणी प्राशन करील तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही.' असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात. शिक्षणामध्ये व्यक्तीला विषमता, शोषण, अज्ञान, दारिद्र्य व गुलामगिरी यांतून मुक्त करण्याचे सामर्थ्य आहे. शिक्षण हा समाज व राष्ट्र यांच्या विकासाचा पाया आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेला शिक्षणविषयक विचार महाराजांच्या विचारांशी सुसंगत असा विचार आहे. समाजसुधारणेच्या संदर्भात शिक्षणविषयक हाच विचार महाराज स्वीकारतात आणि त्या संदर्भातील निर्णय कोल्हापूर प्रांतात आणि प्रांताच्या बाहेर लागू करतात. महाराजांचा शिक्षण विचार पाहण्यापूर्वी त्यांच्या कार्यकाळात असणारी शैक्षणिक परिस्थिती पाहणे गरजेचे आहे.

ISSN No. 2394-5990

शाहू महाराज पूर्व काळातील शैक्षणिक परिस्थिती :

त्या काळातील तथाकथित वर्णवर्चस्ववादी अत्यंत अहंकारी होते. अहंकाराच्या धुंदीमुळे त्यांच्या सद्सद् विवेकबुद्धीचे बंध तुटले होते. अविवेकाच्या आंधळेपणामुळे समरस विचारांचे बांध फुटले होते. 'शिक्षणाच्या किल्ल्या आमच्या कमरेला आहेत. या अविचाराने ते ग्रासलेले होते. यामुळे शुद्राचे जीवन दु:खीकष्टी झाले होते. सावकारी पाशानी त्यांचे गळे आवळलेले होते. अंधश्रद्धेमुळे त्यांची विचारशक्ती नष्ट झाली होती. अज्ञानामुळे त्यांची अस्मिता लोप पावली होती. धर्ममार्तंडांनी त्यांना दैववादी बनवले होते. खरे तर ही वेळ समस्त शूद्रांच्या मस्तकावर ज्ञानाचा अभिषेक करण्याची गरज होती. याच वेळी शिक्षणाच्या किल्या सर्वसामान्य अज्ञानी बांधवाच्या हातात देण्याची आवश्यकता होती. अंधश्रद्धेमुळे आलेले दैन्य-दारिद्र्य झुगारून ज्ञानाच्या फुलवातीने त्यांचे सारे जीवन उजळून टाकण्याची सुसंधी आलेली होती. याच सुसंधीचा उपयोग महाराजांनी केलेला होता. समाजातल्या प्रत्येक घटकाचा सर्वांगिण विकास घडवून यावा ही त्यांची प्रांजळ आणि व्यापक भूमिका होती. त्याकरिता त्यांनी शिक्षणास जीवनाचे अंतिम ध्येय मानले होते.'

शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य :

१. प्राथमिक शिक्षण :

विसाव्या शतकाच्या प्रथम दशकात महात्मा फुले नंतर प्राथमिक शिक्षण विचारांचे सूत्र महाराजांनी पकडले. कोल्हापूर हे सत्यशोधक समाजाचे एक शक्तिशाली केंद्र करून महाराष्ट्रभर ही शिक्षणलाट उसळून देण्याचे काम महाराजांनी केले. त्यांनी पायाभूत शिक्षण म्हणून प्राथमिक शिक्षणाच्या कार्यास प्रारंभ केला. रयतेतील प्रत्येक माणसाला प्राथमिक शिक्षण मिळाले पाहिजे असा महाराजांचा दंडक होता. कारण सर्व लोक शिक्षण संपन्न झाले तरच शिक्षणप्राप्त लोकांची मक्तेदारी नष्ट होईल. प्रथम महाराजांनी खेडेगाव घटक मानून शिक्षण प्रसारास प्रारंभ केला. प्राथमिक शिक्षणाचा प्रसार प्रभावीपणे व्हावा यासाठी २४ जुलै १९१७ रोजी हुकूम काढून प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केले.

प्राथमिक शिक्षणासाठी शाळांची निर्मिती, धर्मशाळेचे बांधकाम, त्यावरील देखरेख, उत्पन्न खर्च, शिक्षकांच्या नेमणुका, शिक्षकाची पात्रता, शिक्षकाचे प्रशिक्षण, शिक्षकाचे वेतन, शाळाची तपासणी, ग्रंथालय, एकूण शिक्षण पद्धती इ. सर्व घटकांना महत्त्व देणे आवश्यक आहे, असे महाराज म्हणतात. प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे या योजनेची पहिली कार्यवाही ४ मार्च १९१८ साली झाली. त्याप्रमाणे मुक्काम चिखली, पेटा, करवीर, येथे पहिली प्राथमिक शाळा काढण्यात आली. या योजनेसाठी त्याकाळात महाराजांनी सुमारे पाऊणलाख रुपये खर्च केले. त्यामुळे सुमारे ४६३० मुले शाळेत शिकत होती. नंतर सन १९२२ साली या योजनेसाठी सुमारे तीन लाख खर्च करण्यात आले. त्या काळात महाराजांनी प्राथमिक शिक्षणावर केलेला खर्च पाहता त्यांच्याकडे शिक्षणाविषयीची लालसा कळवळा किती होता हे उघड होते. मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा शुभारंभ झाल्यानंतर प्राथमिक शाळाची संख्या चंद्रकलेप्रमाणे वाढत गेली. या योजनेची वाढ पुढीलप्रमाणे झाली.

वर्ष	शाळा	विद्यार्थी
१९१७-१८	२७	१,२९६
१९१८-१९	९५	४,६२१
१९१९-२९	१७०	६,३६२
१९२०-२१	३७६	१७,२१८
१९२१-२२	४२०	२२,००७

बारा बलुतेदाराच्या, मांगा-महारांच्या मुलांसाठी वेगळ्या प्राथमिक शाळा न काढता सर्व मुलांना एकत्रच बसवावे आणि शिक्षण द्यावे असा महाराजांनी जाहीरनामा काढला होता. म्हणून प्राथमिक शिक्षण म्हणजे स्वातंत्र्यपूर्व काळातील जातिनिर्मुलनाची केंद्रेच बनली. शिक्षणप्रसार आणि जाति-निर्मुलन या दोन्ही गोष्टी महाराजांनी एका दमात करून टाकल्या.

२. उच्च शिक्षण :

सक्तीच्या व मोफत शिक्षणाच्या बाबतीत शाहू महारांचे नाव अग्रक्रमाने घ्यावेच लागते. शिक्षणाच्या इमारतीचा पाया मजबूत व्हावा म्हणून महाराजांनी प्राथमिक शिक्षणावर लक्ष केंद्रित केले. पण त्यांनी उच्च शिक्षणाकडे दुर्लक्ष केले असे म्हटले जाऊ शकत नाही. महाराजांनी समाजातील बहुसंख्य अज्ञानी समाजास ज्ञानाच्या उजेडात आणण्याच्या हेतूने प्राथमिक शिक्षणापासून सुरुवात केली. ह्यामुळे समाज साक्षर होईल, पण ज्ञानी होईल, पण ज्ञानीपणा म्हणजे ङ्कशहाणपणाफ नव्हे. ज्ञानीपणामध्ये जीवनाच्या मूलभूत ऊर्जा, उर्मीचा वेध घेण्याची शक्ती असते. पण शहाणपणा हा ज्ञानीपणाच्या हाताला धरून चालत असतो. त्यांना ज्ञानाच्या सहाय्याने सारा समाज सतेज आणि डोळस करून सोडायचा होता. त्यासाठी त्यांनी उच्च शिक्षणाचे रणशिंग फुंकले.

शाहू महाराज महाराष्ट्रभर शिक्षणप्रसाराचे काम सातत्याने करत होते. अनेक गोर-गरीब, होतकरु, गरीब विद्यार्थ्यांना

परदेशी उच्च शिक्षण घेण्यासाठी खाजगीतून मदत केली. पुण्यातील डेक्कन एज्युकेशन सोसायटी, श्री शिवाजी मराठा सोसायटी स्थापनेमागील सक्रियता, प्रेरणा महाराजांचीच होती. कोल्हापूरच्या बाहेरही महाराजांनी पुण्यासारख्या ठिकाणी उच्च शिक्षणास उत्तेजन, सहानुभूती आणि पाठबळ दिले. अनुसुचित जातीजमातीसाठी शिक्षण संस्थामधून आणि नोकऱ्यांमधून विशिष्ट प्रमाणे राखून ठेवून मागासलेल्या वर्गास पुढे आणण्याचेही कार्य केले. ते एक सामाजिक कर्तव्य आहे. ती मेहेरबानी नही, अशी महाराजांची भूमिका होती.

'लोकशिक्षण हा लोकशाहीचा पाया आहे.' हे तत्त्व राजर्षींनी प्राथमिक शिक्षणापासून ते उच्च शिक्षणापर्यंत पाळले होते. म्हणजे प्रत्येक जातीने आपल्यातील स्त्री-पुरुषांना चांगले शिक्षण दिले पाहिजे. त्यावर महाराजांचा कटाक्ष होता. कारण शिक्षणामुळेच जातीभेद नष्ट होऊन समाज एका ठिकाणी आनंदाने नांदेल, असा महाराजांना विश्वास होता.

महाराजाच्या शैक्षणिक तालमीत तयार झालेल्यामध्ये कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. पंजाबराव देशमुख, भाऊसाहेब हिरे, बाळासाहेब खर्डेकर, कर्मवीर घोगटे, बाबूराव जगताप आदिचा उल्लेख करता येईल. विशेषत: कर्मवीर भाऊरावांनी निर्माण केलेली 'रयत शिक्षण संस्था' म्हणजे जोतीरावांच्या शिक्षण परंपरेचा दिप्तीसंपन्न थोर वारसा घेऊन आणि शाहू महाराजांच्या हृदयातील शिक्षण प्रसाराचे स्वप्न मनी बाळगून सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यात पसरलेल्या रयतेच्या जीवनाचा सर्व बाजूंनी विचार करून उत्तम नागरिक करणारी एक 'ज्ञानगंगा'च होय. याच पद्धतीने महाराजांनी सुरू केलेली प्राथमिक, उच्च शिक्षणाची सरिता पुढे जाऊन 'शिक्षण सागर' बनली.

३. स्त्री शिक्षण :

बहुजन जमाजाप्रमाणे स्त्री जीवनाच्या मागासलेपणाची महाराजांना जाणीव होती. स्त्री शिकली पाहिजे, तिचा सर्वांगीण विकास झाला पाहिजे. स्त्री शिकली तर सर्व कुटुंबाचा विकास होतो अशी व्यापक भावना महाराजांची होती. कोल्हापूर स्थित राजाराम महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या स्त्रियांना फी माफीची सवलत महाराजांनी जाहीर केलेली होती. आपल्या सुनबाई इंदुमती राणीसाहेब यांना वैधव्य प्राप्त झाल्यावर त्यांना शिक्षण देऊन कोल्हापूर संस्थानचे शिक्षण खाते त्याच्याकडे सोपविण्याचा महाराजांचा विचार होता. तथापि राणीसाहेबाच्या मृत्यूमुळे तो पूर्ण झाला नाही. संस्थानच्या शिक्षणाधिकारी म्हणून मिस लिटन नंतर त्यांनी श्रीमंती रखमाबाई केळकर यांची नेमणूक केली. यावरून महाराजांचा स्त्री शिक्षणविषयक दृष्टीकोण स्पष्ट होतो.

४. पुरोहितशाळा :

शाहू महाराजांच्या कालखंडात पुरोहितगिरी सामाजिक प्रगतीला विरोध करून बहुजन समाजाच्या अज्ञानावर ती आरूढ झालेली आहे हे राजर्षींना पक्के माहित होते. म्हणून जन्माधिष्ठित पुरोहित गिरीला सुरूंग लावून वैदिक धर्माचे दरवाजे सर्वांना खुले करण्याचा विचार महाराजांच्या मनी आला. याप्रमाणे आपल्या देशातील कोणत्याही धर्माचा आणि जातीचा मनुष्य पुरोहित होऊ शकतो आणि त्यामुळे प्रतिष्ठेच्या अहंकाराची कोंडी फुटून धार्मिक स्वातंत्र्य प्राप्त होईल आणि म्हणून समाजातील ज्या व्यक्तींना पुरोहिताचे काम करावयाचे असेल त्यास पुरोहिताचे काम चांगले समजले पाहिजे. यासाठीच पुरोहित शाळा सुरू करण्याचा निर्णय घेतला. ब्राह्मणेत्तर वर्गातील पुरोहित तयार करून देव आणि मानव यांच्यातील बदली करायची नष्ट करण्याचा प्रयत्न केला.

शाहू महाराजांचे शिक्षण विषयक विचार :

१. शिक्षण : समाजोन्नतीचे प्रभावी साधन :

महाराज शिक्षणास मानवी गुंतवणूक मानत होते. या दृष्टीने शिक्षण म्हणजे अक्रोडाचे झाड ठरते. ते पुढील पिढ्यांसाठी फळा-फुलांनी बहरून येते. त्यासाठी मागील पिढीतील लोकांना ते लावावयाचे असते. त्यास खतपाणी घालू वाढावयाचे असते. आपणास शेकडो वर्षांची तयारी करावयाची असेल तर माणसे पेरावी लागतात. म्हणूनच शिक्षण प्रसाराच्या बाबतीत असे म्हणावेसे वाटते की, 'ज्योतीरावे रचिला पाया, शाहू झालासे कळस' या कळसावर पुढे कर्मवीर भाऊराव पाटलांनी पताका फडकवली, महाराजांना लोकांना शिकवायचे नव्हते, तर कारण राधाकृष्णन म्हणतात, त्याप्रमाणे 'साक्षर : इति राक्षस:' असण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणून शिक्षणामुळे लिहिता-वाचता येणे, लिहिलेले समजणे, समजलेले आचरणात आणणे आणि जे आचरणात आणावयाचे ते का ठोस विचार ठरविणे इतक्या प्रक्रिया शिक्षणात येतात. यासाठी प्रत्येक मनुष्याच्या अवती-भवती पसरलेली दुनिया आहे तिच्या सर्वंकष, सांस्कृतिक, सामाजिक, धार्मिक आणि नैतिक झगड्यातील शिक्षण हे प्रभावी साधन आहे, योच सर्वांना आकलन व्हावे म्हणून महाराज आपल्या हाती ज्ञान-ज्योत घेऊन आईच्या प्रेमाने जागे करत होते.

२. विद्येच्या मक्तेदारीला मूठमाती :

शिक्षण ही कोणचीही मक्तेदारी नाही आहे. केवळ समाजातील विशिष्ट वर्गाने त्याचा लाभा घ्यावा असेही नाही आहे. शिक्षण हा सर्वांचा प्रमुख अधिकार आहे, आणि तो सर्वांना मिळालाच

ISSN No. 2394-5990

पाहिजे ही महाराजांची भूमिका होती. म्हणूनच त्यांनी पुरोहिताकडील शिक्षणाची मक्तेदारी मोडीत काढून समाजातल्या सर्व लोकांना शिक्षण मिळावे यासाठी यशस्वी प्रयत्न केले. शिक्षणाशिवाय समाजाचा सर्वांगीण विकास होणे शक्य नाही असे महाराज म्हणत असत. म्हणूनच त्यांनी बहुजन समाजाला शिक्षणाचा लाभ मिळावा, त्यांचा विकास व्हावा, समाज सुधारावा याकरिता प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत केले, त्याचबरोबर उच्च शिक्षणाचा ही लाभ सर्वांना मिळावा याकरिता प्रयत्नशील राहिले.

३. शिक्षणाच्या माध्यमातून स्वावलंबन :

शिक्षणाच्या माध्यमातून स्वावलंबन साधले पाहिजे, असे शाहू महाराजांचे मत होते. म्हणून सामान्य माणसाच्या उन्नतीच्या आड येणारे सर्व अडथळे महाराजांनी दूर केले. सामान्य माणसांच्या उन्नतीमध्ये समाजाची उन्नती सामावलेली आहे असे महाराज म्हणतात. यासाठीच महाराज सर्वांना उन्नतीचा मूलमंत्र देत होते.

४. जातीभेदाच्या निर्मूलनासाठी शिक्षण :

अनेक जाती, धर्म, वंश आणि भाषा यांनी नटलेला भारत देश म्हणजे अनेक रंगाच्या फुलांच्या माळेसारखा सुंदर दिसतो. या सर्व भिन्नत्वामध्ये भारतीयत्वाचे एकत्व दिसते. परंतु कधी जातीच्या, धर्माच्या तर कधी भाषेच्या नावावर श्रेष्ठ-कनिष्ठता समाजात पसरते तेव्हा समाजाच्या सर्व घटकांवर दुष्परिणाम होतो. १९व्या शतकात व्यक्तिस्वातंत्र्यवादी भूमिकेचा प्रचार चालू असून देखील परंपरेचे, रुढींचे डोंगर तसूभर देखील हलले नाहीत. त्यामुळे जातीव्यवस्थेचा पगडा तसाच राहिला इंग्रजाच्या आगमनाने शिक्षण प्रसार सुरू झाला. त्यामुळे जातीच्या बुरुजांवर प्रहार सुरू झाले. फुले, आंबेडकर यांनी हे कार्य मनापासून केले. परंतु ज्यांच्या अंतरंगात मनस्पर्शी असे सामाजिक परिवर्तनाचे वारे वाहत होते, त्या समाज सुधारकांतील एक राजबिंडा पुरुष शाहू महाराजांचे प्रथम नाव घ्यावे लागेल. फुले, आंबेडकरांनी जातीभेद निर्मुलनासाठी शिक्षणाचे जे महत्त्व सांगितले, त्याच शिक्षणाचा उपयोग शाहू महाराजांनी जातीभेद निर्मुलनासाठी केलेला दिसून येतो.

शेवटी केवळ मला असे म्हणावे वाटते, की पृथ्वीच्या पाठीवर अनेक राजे, सम्राट झाले असतील पण समाजातील मानवेतर माणूस म्हणून मायेची पाखर घालणारे राजे फार थोडे झाले असतील. राजश्री शाहू महाराज त्यांपैकी एक होत. सामाजिक क्रांतीचे त्यांचे स्वप्न एखाद्या दीपस्तंभाप्रमाणे आजच्या वादळी जीवनात आपल्याला वाट दाखवायला पूर्णपणे समर्थ आहे.

संदर्भ सूची :

- भगत रा. तु., 'राजर्षी शाहू छत्रपती,' ठिया प्रकाशन, कोल्हापूर, २०११,पृ.२१८
- कुंभार नागोराव, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक तत्त्वज्ञान,' प्रबोधन प्रकाशन, लातूर, २०२२, पृ. क्र. ३५.
- कित्ता, पृ.क्र. ३५.
- भगत रा. तु. उ.नि, पृ. २२०.
- भगत रा. तु. उ.नि, पृ. २२२.
- भगत रा.तु. उ.नि, पृ. २२६.
- भगत रा.तु. पृ. २२७.
- भिडे जी. एल., एन.डी.पाटील, ङ्गमहाराष्टातील समाजसुधारणेचा इतिहासफ, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००९, पृ. १०८.
- भगत रा. तु. उ नि, पृ. २२८.
- भगत रा. तु. उ. नि, पृ. २२९.

■■■

राजर्षी शाहू महाराज यांचे शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय योगदान

डॉ. राजेंद्र नामदेव रासकर
इतिहास विभागप्रमुख
डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय
औंध, पुणे
मो. नं - ९९६०६५९६८४

प्रस्तावना :

रयतेच्या कल्याणाचा, हिताचा सदोदित विचार करणारा आणि त्यासाठी विविध योजना आखून त्या प्रत्यक्षात आणण्यासाठी झटणारा अत्यंत सहृदयी व लोककल्याणकारी राजा म्हणून त्यांच्याकडे पाहावे लागते. ब्रिटीश कालखंडात संस्थानिकांवर अनेक बंधने, मांडलिकत्व लादून त्यांच्या कार्यावर, हालचालींवर अनेक प्रकारच्या मर्यादा घालण्यात आलेल्या होत्या. अशा परिस्थितीत देशभरातील अन्य संस्थानिक केवळ आपला कचकडी डामडौल व तामझाम सांभाळण्यात व्यस्त राहिले असताना राजर्षी शाहू महाराज मात्र आपल्या हाती असलेल्या तुटपुंज्या अधिकारांचा प्रजेच्या कल्याणासाठी कसा वापर करता येईल, याचा विचार करीत असत. त्यामुळेच त्यांच्या हातून कोल्हापूर संस्थानामध्ये लोककल्याणाचा, विकासाची, सामाजिक न्याय प्रस्थापनेची अनेक महत्त्वाची कामे पार पडली.

सन १८९४ ते १९२२ अशा अवघ्या २८ वर्षांच्या कारकीर्दीत शाहू महाराजांनी त्यांच्या दूरदृष्टीने जी विविधांगी कामे उभी केली, पूर्ण केली, त्याला आजही तोड नाही. किंबहुना, काळाच्या पुढे जाऊन त्यांनी शंभर वर्षांपूर्वी जे कार्य केले, त्याचे महत्त्व आज शंभर वर्षांनंतरही तसूभरही कमी झालेले नाही, उलट त्यांच्या कार्याची प्रस्तुतता ही आजही अनेक कामांच्या उभारणीसाठी प्रेरणादायी व स्फूर्तीदायक स्वरुपाची आहे. सुमारे शंभर वर्षांपूर्वी आपल्या संस्थानात मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा कायदा करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करून बहुजन, दलितांच्या शिक्षणाची पर्यायाने उत्थानाची पायाभरणी शाहू महाराजांनी केली. त्यासाठी त्यांनी कायद्यात केलेल्या तरतुदी या कठोर असल्या तरी व्यापक समाजहिताच्या होत्या. त्यामुळे शिक्षणाची गंगोत्री या विभागात मोठ्या जोमाने प्रवाहित झाली. त्यासाठी वसतिगृहांसारख्या सुविधांची निर्मिती करून बहुजनांच्या शिक्षणात खंड पडणार नाही, याची दक्षता घेणारा शाहू महाराज हा एक आगळा प्रजाहितदक्ष लोकराजा होता.

शाहू महाराजांचे शैक्षणिक विचार :

राजर्षी शाहू महाराजांनी बहुजन समाजामध्ये शिक्षणाच्या अभावी माजलेली दुरवस्था पाहिली. त्यामुळे या समाजाला सक्तीचे व मोफत शिक्षण देण्याच्या अनुषंगाने त्यांचा विचार सुरू होता. शिक्षणाचे महत्त्व महाराजांनी जाणले होते. ते अधोरेखित करताना महाराज खामगाव (विदर्भ) येथे २७ डिसेंबर १९१७ रोजी केलेल्या भाषणात म्हणतात, शिक्षणानेच आमचा तरणोपाय आहे, असे माझे ठाम मत आहे. शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती झाली नाही, असे इतिहास सांगतो. अज्ञानात बुडून गेलेल्या देशात उत्तम मुत्सद्दी व लढवय्ये वीर कधीही निपजणार नाहीत. म्हणूनच सक्तीच्या व मोफत शिक्षणाची हिंदुस्थानला अत्यंत आवश्यकता आहे.

या बाबतीत आमचा गतकाल म्हटला म्हणजे इतिहासातील एक अंधारी रात्र आहे. फक्त एकाच जातीने विद्येचा मक्ता घेतला होता. मनू आणि त्याच्या मागून झालेल्या शास्त्रकारांनी, त्या त्या वेळच्या ध्येयाला अनुसरून निरनिराळ्या जातींच्या व्यवहारास बंधनकारक असे निर्बंध रचिले आणि कमी जातींच्या लोकांना विद्यामंदिरचे दरवाजे बंद करण्यात आले. त्यांचे स्वतःचे धर्मग्रंथ आणि वेद वाचण्याचीही त्यांना मनाई होती.

नाशिक येथील भाषणातही शाहू महाराजांनी आपली शिक्षणविषयक भूमिका स्पष्ट केली होती. ते म्हणतात, रयतेतील थोडासा भाग पूर्ण सुशिक्षित होण्यापेक्षा सर्व रयतेला प्राथमिक शिक्षणाचा थोडा तरी अंश मिळाला पाहिजे, असे माझे मत आहे. रयतेमधील मोठा भाग अडाणी राहिला, थोडे लोक विद्यासंपन्न झाले व प्रजेस अधिकार दिले तर ते या थोड्या लोकांच्या हाती पडणार व सुशिक्षित ब्युरोक्रसी तयार होणार. म्हणूनच खालच्या वर्गाच्या लोकांच्या बुद्धीवर व ज्ञानावर हे जे जड, जुलमी जू लादले गेले आहे, ते झुगारून देण्याची शक्ती बहुजन समाजाच्या अंगी येण्यास सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाची फार जरुरी आहे.

याच भाषणात शाहू महाराज पुढे म्हणतात की, बहुजन समाजाचा शिक्षणाच्या बाबतीतील दर्जा वाढून वरिष्ठ वर्गाच्या

ISSN No. 2394-5990

बरोबरीने अंशतः तरी ते आल्याशिवाय सुधारणेच्या दृष्टीने माझ्या संस्थानच्या कारभारात लोकांस हक्क देण्याविषयीचा बदल करण्याला हात घालण्यास मी धजणार नाही. अन्य एका भाषणात ते म्हणतात की, माझे सर्व नागरिक निदान तिसरी इयत्ता पास आहेत, असे झाले म्हणजे मी आनंदाने निवृत्त होईन.

शाहू महाराजांच्या उपरोक्त विधानांवरुन त्यांची शिक्षणाच्या विषयीची तळमळ आणि कळकळ दिसून येते. समाजाच्या सर्व स्तरांत किमान प्राथमिक शिक्षणाची प्रस्थापना झाल्याखेरीज निवृत्त न होण्याची प्रतिज्ञा करणे किंवा त्याखेरीज संस्थानच्या कारभारात लोकांना हक्क न देण्याचे सूतोवाच करणे यातून राजर्षींच्या शिक्षणविषयक धोरणाबाबत कमालीची आस्था आणि आत्मविश्वासही दिसून येतो.

शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य :

उपरोक्त पार्श्वभूमीवर, शाहू महाराज सन १९१२-१३पासूनच आपल्या राज्यात प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करावे, या बाबत गांभिर्याने विचार करीत होते. शिक्षणाच्या सार्वत्रिक प्रसारासाठी त्यांनी वतनी शिक्षक नेमण्याचा प्रयोगही केला. मात्र, त्यात त्यांना फारसे यश आले नाही. २४ जुलै १९१७ रोजी मात्र त्यांनी घोषित केले की, ङ्गयेत्या गणेश चतुर्थीपासून (३० सप्टेंबर) करवीर इलाख्यात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करण्यात येत आहे. सध्या असलेल्या सर्व प्राथमिक शाळांतील फी सदर दिवसापासून माफ करण्यात येत आहे. या सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची नियमावली तयार करण्यासाठी करमरकर, मराठे व प्रो. पंडितराव अशा तीन ब्राह्मण शिक्षणतज्ज्ञांची समिती नेमली गेली.

एज्युकेशन इन्स्पेक्टर डोंगरे यांच्याकडे अभ्यासक्रम तयार करण्याची जबाबदारी सोपविली गेली. या योजनेवर एक लक्ष रुपये खर्च करण्याचे जाहीर केले गेले. त्यापैकी ८० हजार रुपये दरबार खजिन्यातून तर २० हजार रुपये देवस्थान फंडातून खर्च होणार होते. खर्च झाल्यानंतर शिल्लक उरणारी रक्कम ट्रेनिंग कॉलेज, शाळा इमारती व शिक्षणोपयोगी साहित्य यांवर खर्च करण्याचे ठरले होते.

२१ सप्टेंबर १९१७ रोजी कोल्हापूर संस्थानात 'सक्तीच्या शिक्षणाचा कायदा' खास जाहीरनामा काढून प्रसिद्ध करण्यात आला. त्याच्या उद्देशात 'करवीर इलाख्यातील आमच्या सर्व प्रजाजनांना लिहीता-वाचता येऊन आपली स्थिती ओळखून सुधारण्यास समर्थ व्हावे,' म्हणून कायदा केल्याचे म्हटले होते. या कायद्यान्वये, शिक्षणास योग्य वयाची मुले शाळेत पाठविण्याची आईबापांवर सक्ती करण्यात आली. त्यांनी तशी पाठविली नाहीत, तर त्यांना प्रत्येकी एक रुपया दर महिना दंड करण्याची तरतूद करण्यात आली.

ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांना सन २०१७मध्ये कोल्हापूरच्या राजर्षी शाहू मेमोरियल ट्रस्टचा शाहू पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यावेळी त्यांनी आपल्या भाषणात वित्त आयोगाचे माजी अध्यक्ष व अर्थतज्ज्ञ विजय केळकर यांच्या हवाल्याने सांगितले की, सन १९१७चा एक रुपया म्हणजे सन २०१७ मधील तब्बल १६ हजार ३९२ रुपये. शाहू महाराजांनी त्या काळात इतका मोठा दंड ठेवला, आणि तो दंड न भरल्यास संपत्ती जप्त करण्याचे आदेश दिले कारण शिक्षणाविना कोणीही व्यक्ती वंचित राहू नये, ही कळकळच त्यामागे होती.

वर्षभरात संस्थानातील खेड्यापाड्यांत ९६ नव्या शाळा सुरू झाल्या. यातील पहिल्या नव्या सक्तीच्या शाळेचा उद्घाटन सोहळा चिखली येथे ४ मार्च १९१८ रोजी खुद्द शाहू महाराजांच्या हस्ते झाला. या योजनेमुळे सुमारे पाऊण लाख खेडुतांच्या टप्प्यात प्राथमिक शिक्षण प्रथमतः आले आणि त्यांच्यापैकी साडेचार हजारांवर मुले शिक्षण घेऊ लागली, असे शाहू चरित्रकार लठ्ठे यांनी म्हटले आहे.

त्या काळात कोल्हापूरसारख्या छोट्या संस्थानात शाहू महाराज शिक्षणावर एक लाख रुपये खर्च करीत होते. महत्त्वाचे म्हणजे त्या काळात महाराष्ट्र, गुजरात आणि सिंध इतक्या अफाट प्रदेशावर पसरलेल्या अख्ख्या मुंबई इलाख्याचीही शिक्षणावरील तरतूद एक लाख रुपये इतकी नव्हती. आणि हा पैसा महाराजांनी संस्थानातील प्रत्येक घरावर एक रुपया अशा नामात्र शिक्षण कराच्या रुपाने त्यांनी उभा केला आणि बड्या मंडळींवर शेकडा १० ते २० टक्के शिक्षणपट्टी बसविली. आपापल्या गावातील रयतेच्या शिक्षणासाठी एवढा आर्थिक बोजा ही मंडळी आनंदाने सहन करतील, अशी आमची खात्री आहे, असे महाराजांनी त्या संदर्भात काढलेल्या आदेशात म्हटले. (१६ ऑगस्ट १९१८) प्रजेच्या उद्धाराची खरी तळमळ असेल तर पैशाची कमी पडत नाही, त्याला इच्छाशक्तीची जोड मात्र असावी लागते, हे महाराजांच्या या आदेशावरुन दिसून येते.

शाहू महाराजांनी शिक्षणाचा कायदा केला, त्यावेळी समकालीन परिस्थितीत सन १९२३मध्ये मुंबई प्रांताच्या कायदेमंडळातील शिक्षणविषयक अवस्था पाहिली, तरी शाहू महाराजांच्या या कायद्याचे महत्त्व अधोरेखित होते. मुंबई प्रांतिक कायदेमंडळाचे तत्कालीन शिक्षण मंत्री प्राचार्य र.पु. परांजपे यांनी सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाची कल्पना 'व्यावहारिकदृष्ट्या अशक्य' असल्याचे म्हटले होते. वरिष्ठ वर्गातील विचारवंतांनी महाराजांच्या या प्राथमिक शिक्षण योजनेचे

फारसे स्वागत केले नव्हते. 'सर्व्हंट्स ऑफ इंडिया'सारख्या वृत्तपत्राने … the scheme of compulsory education, as outlined by the Darbar, is very defective in conception and execution may take several long years, if at all it materialises. असा निराशेचा सूर लावलेला होता. 'केसरी'कारांनी तर सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणावर खर्च करण्यापेक्षा अस्तित्वात असलेली शाळागृहे 'विस्तृत व हवेशीर' करण्याचा सल्ला सरकारला दिलेला होता.

समारोप :

या पार्श्वभूमीवर, शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणासाठी स्वतंत्र खाते काढले. त्याला स्वतंत्र डायरेक्टर, एज्युकेशन डायरेक्टर यांची नियुक्ती केली. आणि हे खाते ङ्कखुद्द आमच्या नजरेखाली राहीलफ, असे जाहीर केले. संस्थानातील मामलेदार-महालकरी वर्गापासून ते गावच्या पाटलांपर्यंत सर्वांना या चळवळीत सामील करून घेण्यासाठी प्रत्येकाची जबाबदारी निश्चित करण्यात आली. त्यामागे ही योजना कागदोपत्री न राहता तिची अंमलबजावणी पूर्ण कार्यक्षमतेने व्हावी, हाच त्यांचा उद्देश होता. शेतकऱ्यांच्या मुलांना त्यांची शेतीची कामे करता करता शिकता यावे, यासाठी त्यांना सकाळी किंवा संध्याकाळी दोन तास शाळेत येण्याची सवलत महाराजांनी दिली. (जुलै १९१९) यावरुन निर्णयाची कठोर अंमलबजावणी करीत असतानाही रयतेचे प्रश्न समजून घेऊन प्रसंगी लवचिक धोरण घेऊन त्यात सर्वसमावेशकता आणण्याचा महाराजांचा प्रयत्न अत्यंत वास्तवदर्शी स्वरुपाचा आहे, हे दिसून येते.

परिणामी, सन १९१७-१८मध्ये जेव्हा प्राथमिक शिक्षणाचा कायदा अंमलात आला, त्यावेळी या योजनेखाली २७ शाळा व १२९६ मुले होती. तथापि, त्यानंतरच्या पाच वर्षांच्या कालावधीत सन १९२१-२२ पर्यंत त्यात वाढ होऊन शाळांची संख्या ४२० आणि मुलांची संख्या २२,००७ इतकी झाली. तर, योजनेवर होणारा खर्च तीन लाखांपर्यंत गेला.

अशाप्रकारे राजश्री शाहू महाराज यांचे शैक्षणिक क्षेत्रातील कार्य येणाऱ्या प्रत्येक पिढीसाठी मार्गदर्शक आणि प्रेरणादायी आहे. तळागाळातील लोकांपर्यंत शिक्षण पोहोचले पाहिजे यासाठी शिक्षण क्षेत्रात केलेले परिवर्तन अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. राजकीय,सामाजिक, स्त्रीविषय क्षेत्रातील कार्यही समाजाच्या विकासात जनजाकृती आणि मार्गदर्शक आहे.

संदर्भसूची :

१. जाधव, रमेश: राजर्षी शाहू गौरव ग्रंथ, राजर्षी शाहू चरित्र साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई (२०१६), पृ. ८३८
२. पवार, जयसिंगराव (संपा.): राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर (द्वितियावृत्ती, २००७), पृ. ६०३
३. उपरोक्त: जाधव, रमेश, पृ. ८३९
४. उपरोक्त: पवार, जयसिंगराव, पृ. ९७
५. देशपांडे, सागर: मासिक जडण-घडण, सप्टेंबर २०१७, पृ. ९
६. उपरोक्त: पवार, जयसिंगराव, पृ. ९८
७. कठारे अनिल, भारतातील सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळीचा इतिहास, प्रशांत प्रकाशन जळगाव, २०१५

■■■

ISSN No. 2394-5990

''राजर्षी शाहू महाराजांच्या आर्थिक विचारांचा अभ्यास''

डॉ. रेश्मा अणवेकर
अर्थशास्त्र विभाग, विकास कॉलेज ऑफ आर्टस्,
सायन्स ॲन्ड कॉमर्स, विक्रोली, मुंबई
मो. ९३२६५९४०५९ ईमेल : reshmaanvekar9@gmail.com

घोषवारा :

करवीर संस्थानमध्ये जी सामाजिक व आर्थिक प्रगती झाली आहे त्याच्या पाठीमागे महाराजांचे समाजवादी उद्दिष्टांचे आर्थिक धोरण कारणीभूत आहे. महाराजांच्या आर्थिक धोरणापाठीमागे उत्पन्न व संपत्तीच्या बाबतीतील विषमता नष्ट करणे, किमान वेतन वा रोजगाराची हमी देणे, खाजगी क्षेत्रातील सर्वोत्तम बाबींचा उपयोग समाजास व्हावा यादृष्टीने प्रयत्न करणे, इ. दृष्टीचा समावेश होता. त्याच्यापाठीमागे सामान्य जनतेच्या हिताची दृष्टी होती. हे आर्थिक धोरण अंमलात आणण्यासाठी त्यांनी सार्वजनिक प्रशासनाचा विस्तार व पुनर्रचना केली. मागासलेल्या व अस्पृश्य वर्गाचा दुबळेपणा नष्ट करुन त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारली. शेतकरी, व्यापार, कारखानदार व कारागिर यांचे उत्पन्न व उत्पादनशक्ती वाढवण्यासाठी त्यांना स्वस्त दराने कर्जाचा पुरवठा केला. त्यांच्या मालाला वाढती मागणी यावी म्हणून संघटित बाजारपेठा वसविल्या, सहकारी क्षेत्राचा जोरदार पुरस्कार केला. त्यासाठी सहकारी पतपेढया, सहकारी ग्राहक भांडारे व सहकारी उद्योगधंदे काढले. उद्योग व व्यापारास चालना देण्यासाठी त्यांनी सार्वजनिक कर्जउभारणी केली. आर्थिक धोरणांचे सनातनपंथी विचार व नितीआर्थिक क्षेत्रात शासनामार्फत काही परिणामकारक धोरणांची कार्यवाही करता येते ही कल्पना १९ व्या शतकात २० व्या शतकाच्या पहिल्या तीन दशकात अस्तित्वात नव्हती.

संशोधनाचे शिर्षक :

''राजर्षी शाहू महाराजांचे आर्थिक विचारांचा अभ्यास''

संशोधनाचा उद्देश :

१. राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात केलेल्या आर्थिक सुधारणा आणि योजनांचा अभ्यास करणे.
२. शाहू महाराजांच्या संस्थानातील प्रशासनविषयक कार्याचा अभ्यास करणे.

गृहीतकृत्य :

१. संस्थानचा राजा असूनसुद्धा राजर्षी शाहू महाराजांनी लोकशाही पद्धतीने संस्थानचा कारभार चालवला

तत्थसंकलन पद्धती :

प्रस्तुत शोधनिबंध हा दुय्यम सामग्रीवर अवलंबून असून अभ्यासासाठी संदर्भग्रंथ, पुस्तके, वर्तमानपत्रांद्वारे माहिती गोळा करुन विश्लेषण करण्यात आले आहे.

प्रस्तावना :

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या कार्याचा परीघ मोठा आहे. प्रत्येक क्षेत्रात त्यांनी आपल्या दूरदृष्टीचा प्रत्यय देत लोककल्याणकारी योजना राबविल्या. मानवतावादी भूमिकेचा जागर त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून मांडला. शाहू महाराजांनी इंग्रजी राजवटीच्या जोखंडात असतानाही आपल्या कर्तृत्वतेचा ठसा उमटवीला. देशाच्या आताच्या अवस्थेच्या स्थितीचे अवलोकन केल्यास छत्रपती शाहूंच्या विचारांची गरज आजही लक्षात येते. धर्मांधता, जातीयता, टोकाचे राजकारण, महागाई व सरकारी योजनांतील भ्रष्टाचाराला प्रतिबंध घालण्याची ताकद छत्रपती शाहूंच्या विचारात आहे. त्यामुळे केवळ राष्ट्रीयच नव्हे, तर आंतरराष्ट्रीय स्तरावर शाहूंचे कार्य पुन्हा एकदा समजावून घेण्याची वेळ आली आहे.

शाहू महाराजांनी अस्पृश्य मानल्या गेलेल्या लोकांच्या प्रगतीसाठी मोठे कार्य केले. अस्पृश्यतेचे निर्मूलन झाले पाहिजे आणि अस्पृश्य मानल्या गेलेल्या लोकांना सर्व व्यवहारात योग्य असा वाटा मिळाला पाहिजे अशी त्यांची भुमिका होती. छत्रपती महाराजांनी आपल्या संस्थानातील जनतेला प्रगती करता यावी म्हणून त्यांनी अनेक नवे सामाजिक कायदे केले. त्यामध्ये सक्तीचा आणि मोफत शिक्षणाचा कायदा, अस्पृशता निर्मूलनाचा कायदा, आंतरजातीय विवाह कायदेशीर करण्याचा कायदा, स्त्रीवर होणार्या घरगुती हिंसाचाराविरुद्धचा कायदा आणि देवीला मुली जोगतीणी म्हणून वाहण्याविरुद्धचा कायदा इत्यादी अनेक सामाजिक हिताचे कायदे राजर्षी शाहू महाराजांनी केले. ते

नव्या प्रगतीशील समाजाच्या स्थापनेसाठी प्रयत्न करणारे समाजसुधारक होते. भारतात सामाजिक लोकशाही स्थापन करण्याचे त्यांचे स्वप्न होते. त्यांनी मांडलेल्या अनेक विचारांचा नंतर भारतीय राज्यघटनेमध्ये समावेश करण्यात आला. सुमारे १०० वर्षापुर्वी महाराजांनी हे प्रगतीशील विचार लोकांच्या समोर पोटतिडकीने मांडले. त्यातील काही विचारांची अंमलबजावणी अजूनही झाली नाही. अंधश्रद्धा निर्मूलन, अस्पृश्यता निर्मूलन, जातीव्यवस्था निर्मूलन आणि विषमता निर्मूलन ही त्यांची उद्दीष्टये अद्याप पुर्ण झालेली नाहीत. हि उद्दीष्टये पुर्ण झाल्याशिवाय आपलया देशात सामाजिक लोकशाही स्थापन होणार नाही. भारतीय समाज जातीग्रस्त असून ही जातीव्यवस्था उच्च कनिष्ठत्वावर जन्मजात विषमतेवर आधारित आहे. या जातीव्यवस्थेने समाजाचे अनेक भागात विभाजन केले असून मागास समजल्या जाणार्या जातींवर मोठया प्रमाणात अन्याय केला जातो. जातीचा वापर राजकिय सत्तेची मक्तेदारी स्थापन करण्यासाठी केला जातो. त्यांच्या मते, काही लोक असे म्हणतात की, जाती राहिल्यातरी हरकत नाही पण जातीद्वेश नको. ते पुढे म्हणतात की याला अर्थ नाही कारण एकमेकांचा द्वेश करणे हेच जातीसंस्थेचे कार्य आहे. म्हणून जाती संस्था मोडली पाहिजे. त्यासाठी त्यांना अंतरजातीय विवाहाला प्रोत्साहन दिले आणि कायदा करुन आंतरजातीय विवाहाला कायदेशीर मान्यता प्रदान केली. जातीय अस्पृश्यतेला त्यांनी विरोध केला. सर्वजातीय भोजन समारंभ आयोजित केले.

तिसरी गोष्ट म्हणजे जातीय विषमता व बहूसंख्य समाजाचा मागासपणा दुर करण्यासाठी त्यांनी राखीव जागांचा पुरस्कार केला. १९०२ साली आपल्या राज्यातील नोकर्यामध्ये त्यांनी शेकडा ५० टक्के जागा राखीव ठेवल्या. राखीव जागा ठेवून तुम्ही जाती-जातींमध्ये भेदभाव करत आहात, जात बघून नोकर्या देत आहात व गुणवत्तेकडे दुर्लक्ष करीत आहात अशी टिका त्यांच्यावर करण्यात आली. त्याला उत्तर देताना छत्रपती शाहू महाराज असे म्हणाले की, विषम समाजामध्ये सर्वांना समान संधी देण्याचे तत्त्व आपणास आंधळेपणाने लागू करता येणार नाही, कारण स्पर्धा विषम असते. गव्हाणीत ठेवलेला चारा खाण्यासाठी जर सशक्त आणि कमजोर घोडे एकाचवेळी सोडले तर सशक्त घोडे सर्व चारा खावून टाकतात आणि अशक्त घोडे उपाशी राहतात. राखीव जागेच्या विशेष तरतुदीद्वारा मागास जातींना विकासाचा संधी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. येथे जात बघून नोकरी देण्याचा प्रश्न नसून मागास जातींना सत्तेमध्ये सहभागी करुन घेण्याचा प्रश्न आहे. त्यांना वरच्या पदावर काम करण्याची संधी मिळाल्यानंतरच ते आपली गुणवत्ता सिद्ध करु शकतात. राखीव जागांद्वारे समाजात सामाजिक ऐक्य आणि समता निर्माण होईल कारण त्याद्वारे मागास समाज सुशिक्षीत वर्गाच्या बरोबर येऊ शकेल. आज राखीव जागांच्या संदर्भात ज्यावेळी काही प्रश्न उपस्थित केले जातात त्यावेळी शाहू महाराजांचे आर्थिक विचार लक्षात येते.

राजर्षी शाहू महाराजांनी अवघ्या २८ वर्षाच्या कालखंडात, सत्ता ही जनहितार्थ राबवून कोल्हापूर संस्थानाचा आर्थिक कायापालट घडवून आणला. महाराजांचे आर्थिक धोरण हे शेती व उद्योग या दोन प्रमुख व्यवसायांचा कायापालट करणारे होते. हे दोन धंदे एकमेकांस पुरक व एकामेकांवर अवलंबून असून संपूर्ण देशाचा आर्थिक कणा यावरच आहे. म्हणून महाराजांनी या व्यवसायावरच प्रामुख्याने लक्ष दिले. त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक कार्याच्या पाठीमागे आर्थिक कार्यक्रमाचे सामाजिक न्याय प्रस्थापित करणारे निश्चित धोरण होते. महाराज हे प्रजाहिततत्पर, धाडशी समाजसुधारक व बहूजन समाजाच्या उद्धारासाठी झटणारे राजे होते. ज्या सुधारणा महाराष्ट्रात पुढे दोन किंवा तीन पिढयांनंतर झाल्या, त्यात त्यांनी किती तरी आगोदर आपल्या राजवटीत प्रत्यक्ष कृतीत आणून दाखविल्या.

शाहू महाराजांच्या काळी देशाची आर्थिक परिस्थिती ही अविकसीत होती. लोकसंख्या वाढीमुळे दारिद्र्यसुद्धा मोठया प्रमाणात वाढत होते. त्याकाळी स्त्रिया व गरीब हे शिक्षणापासून वंचित होते. बहुसंख्य जनता ही अज्ञानात, दारिद्र्यात अडकलेली असल्यामुळे शेतीवर अवलंबून राहणार्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत होती. ब्रिटीशांची सत्ता असल्यामुळे विदेशी वस्तुंशी भारतीय वस्तु स्पर्धा करु शकत नव्हत्या. म्हणून भारतीय व्यवसाय हे मागे पडले होते त्यामुळे बरेचजण शेतीकडे वळत होते. समकालिन संस्थानिकात शाहू महाराजांचे एक वेगळेच स्थान होते. त्यांचे प्रशासन हे पुरोगामी तत्त्वावर आधारलेले होते. ते सामाजिक न्यायावर व दुर्बल घटकांचा विकास घडवून आणणारे होते. त्याला अर्थव्यवस्थेची जोड होती. शाहू महाराजांच्या आर्थिक धोरणामागचे ध्येय हे सर्वांगिण आर्थिक प्रगती व समाजातल्या मागासलेल्या वर्गाचे कल्याण हे होते. दरडोई उत्पन्न व लोकांच्या जीवनाचे राहणीमान वाढले पाहीजे अशा तर्हेचे आर्थिक धोरण महाराजांनी स्विकारले होते. या धोरणा पाठीमागे त्यांची समाजवादी विचारसरणी होती.

राजर्षी शाहू महाराजांच्या आर्थिक धोरणांची उदिद्ष्टये :

- ❒ पुरोगामी योजना योग्यरितीने कार्यवाहीत येण्यासाठी सार्वजनिक प्रशासनाचा विस्तार व पुनर्रचना करुन त्यास जबाबदार व समाजाभिमुख बनवणे.

ISSN No. 2394-5990

- ❒ समाजाला हानिकारक ठरणार्या पुरोहितशाहीचे वर्चस्व नष्ट करु शकेल व जातीनिरपेक्ष समाज निर्मितीस उपकृत ठरेल अशी नवीन शक्ती पद्धतशीरपणे समाजात निर्माण करणे.
- ❒ गरीब शेतकरी, व्यापारी, कारखानदार व कारागीर यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी त्यांची उत्पादनशक्ती वाढविणे.
- ❒ खाजगी मक्तेदारी व शासनाधीनता यामुळे निर्माण होणार्या उणिवा टाळण्यासाठी उद्योग, व्यापार व अर्थव्यवहारात सहकारी व संयुक्त क्षेत्राला चालना देणे.
- ❒ अर्थनिधीच्या उभारणीसाठी कोल्हापूरात व इतरत्र प्रचलित प्रतिगामी कर पद्धतीवरचा भार कमी करुन प्रगतशिल कर बसवून सार्वजर्निक कर्ज उभारणी करुन आणि उद्योग व व्यापारास चालना देवून साधन संपत्ती उभी केली.
- ❒ अर्थव्यवहारात व करपद्धतीत महसुल उत्पन्नाचे उद्दिष्ट तर ठेवलेच पण त्याची सामाजिक न्यायाच्या तत्वावर नवी उभारणी केली.

राजर्षी शाहू महाराजांचे हस्तक्षेपी धोरण :

राजर्षी शाहू महाराजांनी परंपरेला सोडून प्रगत अशा जनहितार्थ सहकारी हस्तक्षेपाच्या तत्त्वज्ञानाची भुमिका स्विकारली आणि त्यावर आधारलेले आर्थिक धोरण आखले. त्यांनी योजलेल्या क्रांतिकारी उपाययोजना या धोरणाचे निदर्शक आहेत.

सार्वजनिक वित्त विषयक आधुनिक सिद्धांत :

सामाजिक, आर्थिक उद्दिष्टये साध्य करण्यासाठी खर्चाचा मोठा भार राजर्षी शाहू महाराजांना सहन करावा लागला. आधूनिक अर्थशास्त्रात चालू शतकाच्या चौथ्या दशकात पुढे आलेल्या सार्वजनिक गरजांसाठी खर्च या सिद्धांताचा अवलंब त्यांनी त्याकाळामध्ये केला होता. असे खात्यांर्गत व वेगवेगळया खात्यांवरील खर्च करण्याचा राजर्षीच्या पद्धतीवरुन दिसते. प्रशासकीय सुधारणा अंमलात आणताना आपल्या प्रगत धोरणांची अंमलबजावणी करु शकणारी समर्थ व प्रतिसादपुर्ण प्रशासकीय यंत्रणा निर्माण व्हावी आणि तिच्या मार्फत राज्याची सुरक्षा, समाजकल्याण व आर्थिक विकास ही कार्ये क्षमतेने पार पाडली जावीत अशी त्यांची भुमिका होती.

शेती व सहकार :

कोल्हापूर संस्थानचे जवळजवळ सर्व लोक शेतीवर आपली उपजिवीका करत होते. त्यांनी शेतकर्यांना बियाणाच्या, खताच्या, पैशाच्या स्वरुपात मदत केली. शेतीमध्ये संशोधनाला चालना दिली. लोकांना प्रोत्साहन देण्यासाठी आपण स्वत: दरबारातर्फे वेगवेगळया लागवडीचे सतत प्रयत्न केले. निधी उभे करुन व्यावहारिक व तांत्रिक संशोधनाला गती दिली. शेतीविषयक प्रदर्शने भरविली. लोकांना उत्तेजनार्थ बक्षिसे दिली. हरितक्रांती घडवून आणण्यासाठी पाटबंधार्यांच्या योजना आखल्या. शेती विषयक शिक्षणाचा प्रसार केला. शेती संशोधनाला व लागवडीला जोड म्हणून आदर्श शेतीचेही प्रयोग महाराजांनी करविले होते. शेतीचे आधुनिकीकरण करणे आवश्यक आहे असे मत महाराजांचे होते. शेतीबरोबरच शेतीच्या जोडव्यवसायाकडे महाराजांचे लक्ष होते. शेती हा हंगामी व्यवसाय असल्याने बारा महिने उत्पन्न मिळविण्यासाठी काही पुरक व्यवसाय शेतीबरोबरच करणे आवश्यक आहे असे शाहू महाराजांचे मत होते.

शेतकर्यांचा शेतीमाल तयार होत असे पण त्यासाठी विक्री संघटना नव्हती. ती अडचण दूर करण्यासाठी महाराजांनी सहकारी पतपेढया काढण्याचा मंत्र दिला. अर्थात महाराजांचा हा उपदेश केवळ शेती क्षेत्रापुरताच मर्यादित नव्हता तर व्यापार, उद्योगव्यवसाय, औद्योगिक कामगार इत्यादी क्षेत्रांनी व्यापून राहिला होता. आज महाराष्ट्रात कोल्हापूर जिल्हा सहकाराच्या बाबतीत अग्रेसर ठरला आहे.

महाराजांचे पाटबंधारे धोरण :

१८९५-९६ साली कोल्हापूर संस्थानात मोठया प्रमाणावर दुष्काळ पडलेला होता. त्याला अनेक प्रकारे तोंड देण्यासाठी महाराज झगडत होते. धान्याचा तुटवडा होता, वस्तुच्या किंमती वाढत होत्या, जनावरांना द्यायच्या गवताचे दुर्भिक्ष भासत होते, पाणी टंचाई भासत होती. म्हणून महाराजांनी पाटबंधारे धोरण आखले आणि त्याची अंमलबजावणीही केली. कोल्हापूर जिल्हयात जी शेतीविषयक प्रगती, आर्थिक भरभराट झालेली दिसून येते त्यातील बरेचसे श्रेय शाहूमहाराजांना द्यायला हवे. कोल्हापूरातील आजच्या हरितक्रांतीचे जनक म्हणून त्यांचा उल्लेख केला तर ते चूकीचे ठरणार नाही.

औद्योगिक विकास :

औद्योगिक विकासाच्या दृष्टीकोनातून महाराजांच्या कारकिर्दीकडे दृष्टीक्षेप टाकल्यास आपल्याला असे दिसून येईल की, औद्योगिक विकास होण्यासाठी महाराजांनी हर प्रकारचे प्रयत्न केलेले आहेत. केवळ शहरी किंवा ग्रामीण किंवा शेतीवर आधारित नसलेली उद्योगधंदे इत्यादी असा फरक त्यांनी केला नाही. किंवा केवळ एकाच उद्योगधंद्याच्या विकासावर त्यांनी भर दिलेली नाही. संस्थानाची औद्योगिक वाढ सर्वांगिण व्हावी व त्यामध्ये मानवी घटकांना मान व स्थान देवून ती केली जावी याकडे त्यांनी जातीने लक्ष पुरविले. विविध प्रकारच्या व्यवसायांना त्यांच्या हस्ते, परहस्ते

नानाप्रकारची मदत केली. उद्योगधंद्यांना स्वत:च्या पायावर भक्कमपणे उभे राहता यावे यासाठी त्यांनी योग्य प्रकारे पोषक परिस्थिती निर्माण केली. हयासाठी त्यांनी जे जे प्रयत्न केले त्यात त्यांची दुरदृष्टी, धाडस, संयोजकत्व आढळून येते.

शाहू मिल :

कोल्हापूर संस्थानच्या औद्योगिक विकासातील त्या काळातला महत्वाचा टप्पा म्हणजे शाहू मिल. सुरुवातीला ही गिरणी सामाजिक भांडवलाच्या तत्त्वावर आधारित होती. पण अनेक बदल होऊन ती शेवटी राजाश्रयाखाली आली. हया गिरणीसाठी महाराजांनी जागा व तलाव मोफत देवून शिवाय भांडवलाची मदतही केली. लोकांनी आपणहून सहकारी तत्त्वावर अशा प्रकारच्या गिरण्या काढाव्यात आणि मग त्याला लागेल ती मदत द्यायला मी तयार आहे असे आश्वासन महाराजांनी दिले.

शाहू महाराजांचे व्यापार धोरण :

ज्यावेळेला महाराजांनी उद्योगधंद्यांना प्रोत्साहन द्यायला सुरुवात केली त्याचवेळेला त्यांनी व्यापाराकडेही लक्ष दिले. व्यापार व उद्योग हे परस्पर अवलंबून आहेत. उद्योगधंद्याच्या विस्ताराच्या योजना आखल्यास त्यातून तयार होणारा माल खपविण्यासाठी बाजारपेठ पाहीजेत. व्यापार वाढवायचा असल्यास औद्योगिक उत्पादन हवे. आधूनिक अर्थव्यवस्थेचे जे दोन आधारस्तंभ उद्योगव्यवसाय व व्यापार या बाबतीत महाराजांनी त्यांच्या काळीच प्रगती करण्याचा उपक्रम केला होता.

राधानगरी योजना :

जी सर्व कामे महाराजांनी हाती घेतली होती ती काही कमी महत्वाची नव्हती किंवा किरकोळ स्वरुपाची नव्हती. महाराजांनी राधानगरी योजनेचा पाया घातला म्हणून कोल्हापूरवासीयांना दोन वर्षापूर्वीच्या दुष्काळात पिण्याच्या पाण्याच्या टंचाईवर तडाखा बसला नाही. ऊसाची लागवड विस्तृत प्रमाणावर करता येते, शेतीला पाण्याचा पुरवठा होऊ शकतो, विजपुरवठा उपलब्ध होऊ शकतो. हे सर्व फायदे आपल्या मिळत आहेत ते शाहू महाराजांनी राधानगरी तलावाची योजना व्यवहारात आणलयामुळे त्यांना 'हरितक्रांतीचे जनक' हि पदवी योग्य ठरते. पाऊस असेल तेव्हा आणि नसेल तेव्हाही संस्थानला पाण्याचा भरपूर पुरवठा झाला पाहिजे. पाणी असेल तरच भरभराट शक्य आहे हा महाराजांचा दृष्टीकोन होता.

शाहू महाराजांचे इतर उद्योग :

१. पुण्यातील कापसाची व रेशीमगिरणी त्याचप्रमाणे पुण्यातील जी स्वदेशी कागदाची गिरणी होती त्यांचे महाराज आश्रयदाते होते.
२. ज्यावेळी शाहू मिलची स्थापना व वाढ सुरु होती त्याचवेळेला शिरोळ रोड येथील जिनिंग फॅक्टरीलाही बर्याच मोठया प्रमाणावर महाराजांनी मदत दिली होती.
३. विव्हिंग फॅक्टरीत जशी वाढ झाली तशाच प्रमाणात विव्हिंग फॅक्टरीचीही हालचाल होत होती. रायबाग येथे एका तज्ञाने हातमागाचा कारखाना सुरु केला होता त्यालाही महाराजांनी सढळ हाताने मदत दिली होती.
४. महाराजांनी राळ तयार करण्याच्या बाबतीतही प्रयत्न करुन बघीतले. संस्थानच्या जंगलामध्ये राळ तयार करण्याठी गंजन गवत भरपूर प्रमाणात होत असल्याने हा प्रयोग केला गेला यासाठी खास खानदेशातून तज्ञ माणूस बोलविण्यात आला होता.
५. महाराजांनी जिननगर समाजाला उद्योग क्षेत्रात आणले. महाराजांचे औद्योगिक विकासाबद्दलचे दृष्टीकोन त्यांनी जिननगर समाजाबद्दल घेतलेल्या प्रवृत्तीवरुनही दिसून येते. त्यांच्या करीता स्वतंत्र बोर्डींग हाऊस स्थापले गेले. त्याचप्रमाणे त्यावेळेस प्रिन्स राजाराम औद्योगिक शाळाही स्थापन केले होते.
६. श्रम कामगार संघटना रोजगारविषयी शाहू महाराजांचे विचार होते ते म्हणजे श्रम उत्पादनाचाच एक घटक आहे. संघटनेने मजूरांचे फायदे होतात व त्यांची उन्नतीही होते ते सर्व लाभ मजूरांनी उठविले पाहीजेत तर आधुनिक अर्थप्रवाहात मजूरांचा टिकाव लागणार आहे. हे महत्वाचे तत्त्व त्यांनी समजावून सांगितले.

निष्कर्ष :

१. राजर्षी शाहू महाराज हे केवळ समाजसुधारक नसुन ते अर्थशास्त्रज्ञ, शिक्षणशास्त्रज्ञ व प्रशासकीय तज्ञ होते.
२. राजर्षी शाहू महाराज यांचे आर्थिक विचार त्यांनी शेती क्षेत्र, शेतकरी शेतमजूर, कामगार, कर, सामाजिक विचार, शैक्षणिक विचार त्यांनी पुढे नेलेली सामाजिक चळवळ व परिषदा अशा विविध अंगाने त्यांचे कार्य होते.
३. देशाची आर्थिक प्रगती शेतीवर आधारित असल्याने शेतीव्यवसायाच्या सर्वांगिण विकासासाठी प्रयत्न झाले पाहिजेत, शासनाने वेळोवेळी कृषी विकासासाठी जाहिर केलेल्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी प्रशासनातर्फे झाली पाहीजे.
४. आर्थिक विकासासाठी शेतीवर आधारित उद्योगांच्या निर्मितीला व विकासाला चालना देणे आवश्यक आहे.
५. शाहू महाराज शिक्षणाकडे सामाजिक हित आणि मानवी भांडवल गुंतवणूक अशा दुहेरी दृष्टीने पाहत असत.

ISSN No. 2394-5990

संदर्भ :

१. संगवे विलास १९९४ राजर्षी शाहू छत्रपती पेपर्स, कुलसचीव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, खंड ६, पृष्ठ क्रमांक २२

२. रमेश जाधव २०१६ राजषी शाहू महाराज गौरव ग्रंथ, महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग सचिवालय, मुंबई सुधारित तिसरी आवृत्ती, पृष्ठ क्र. ३३

३. पवार जयसिंग २००१ राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, १०८ साने गुरुजी वसाहत राधानगरी रोड, कोल्हापूर , प्रथम आवृत्ती.

४. दिगंबर मारुती गायकवाड २०२० 'राजर्षी शाहू महाराजांच्या आर्थिक विचारांचा अभ्यास ग्रंथ', सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

५. सुरेश कोडीतकर, लोककल्याणकारी राजर्षी शाहू महाराज, यशोदिप पब्लिकेशन

६. डॉ. एस. एस. भोसले, राजर्षी शाहू महाराज, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

■■■

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे सामाजिक विचार आणि कार्य

डॉ. गणेश एन. बहादे
समाजशास्त्र विभाग प्रमुख
श्री. साईबाबा लोक प्रबोधन कला महाविद्यालय,
वडनेर, ता. हिंगणघाट, जि. वर्धा
Email ID: ganeshbahade94@gmail.com
मो. ९०४९६७३१६४

गोषवारा :

भारताच्या सामाजिक इतिहासात सामाजिक विचार मांडून ते अंमलात व प्रत्यक्ष स्वरुपात उतरवण्याच्या दृष्टीने जे कार्य २० व्या शतकात ज्या महापुरुषांनी केले, त्यात राजर्षी छत्रपती शाहू महाराज हे अग्रगण्य होते. तत्कालीन समाज व्यवस्थेतील जातीवाद, अस्पृश्यता, शिक्षण इत्यादीमुळे भारतीय समाज जीवन या समस्यांनी त्रस्त बनले होते. त्याचे निवारण करण्यासाठी समाज व्यवस्थेच्या वस्तुनिष्ठ आकलनाची व ऐतिहासिक दृष्टिकोनाची आवश्यकता लक्षात घेऊन, राजर्षी छत्रपती शाहू महाराजांची त्या संदर्भातील विचाराची मांडणी त्यांनी केलेल्या त्यांच्या भाषणातून व्यक्त झालेली दिसून येते. एकूणच राजर्षी छत्रपती शाहूंच्या या विचारात समाजशास्त्रीय दृष्टिकोन असलेला दिसून येतो. आधुनिक समाजाच्या रचनेच्या अभ्यासात सामाजिक विचाराचा आधार घ्यावा लागतो. कारण सामाजिक सत्याचे आकलन त्याशिवाय शक्य नाही. समाजशास्त्रीय विचारातून निर्माण झालेल्या सिद्धांताचा उपयोग भविष्यातील समाजाच्या स्वरुपाच्या आकलनासाठी आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर राजर्षी छत्रपती शाहूंचे सामाजिक विचार व कार्यांचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

बीजशब्द : प्रशासन, शिक्षण, कला, क्रीडा, शेती, उद्योगधंदे, आरोग्य.

प्रस्तावना :

राजर्षी छत्रपती शाहूंची कारकीर्द केवळ कोल्हापूर संस्थानच नव्हे, तर साऱ्या महाराष्ट्राच्या इतिहासाला कलाटणी देणारी ठरली. त्यांच्या ध्येयवादी दृष्टिकोनातून नियोजनपूर्वक केलेल्या बहुविध व सर्वकष सुधारणांमुळे कोल्हापूर संस्थानातील जनतेच्या जीवनावर दूरगामी स्वरुपाचे परिणाम झाले. त्याचबरोबर महाराष्ट्रातील जनतेमध्ये देखील सामाजिक क्रांती घडून येण्यास सुरुवात झाली. राजर्षी शाहूंनी सामान्य जनतेची सर्वांगिण प्रगती विविध मार्गांनी पण ते शक्य तो लवकर साधावी हे ध्येय नजरेसमोर ठेवून राजर्षी शाहूंनी निष्ठापूर्वक राज्यकारभार केला. त्यांनी प्रशासन, शिक्षण, कला, क्रीडा, शेती, उद्योगधंदे, आरोग्य इत्यादी क्षेत्रात आमूलाग्र सुधारणा घडवून आणल्या आहेत. राजर्षी शाहूंच्या प्रेरणेने, प्रोत्साहनाने व अविरत परिश्रमाने महाराष्ट्रात अभूतपूर्व स्वरुपाची सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया सुरु झाली आणि महाराष्ट्राचा कायाकल्प घडून आला.

संशोधनाचे उद्दिष्ट्ये :

१) राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे सामाजिक कार्याचा आढावा घेणे.
२) राजर्षी शाहू महाराज यांच्या सर्वधर्म समभाव तत्वाचा अभ्यास करणे.

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे सामाजिक विचार व कार्य :

प्राथमिक शिक्षण :

राजर्षी शाहू उदामतवादी शिक्षणापासून ते तांत्रिक शिक्षणापर्यंत आणि अस्पृश्यांच्या शिक्षणापासून ते स्त्री शिक्षणापर्यंत दूरच्या नजरेने पाहणारे एक जाणते शिक्षण पुरस्कर्ते व प्रसारक होते. छत्रपती शाहू महाराजांनी केलेल्या सुधारणा वरवरच्या नव्हत्या तर अगदी मुलगामी स्वरुपाच्या होत्या. महाराजांनी इ. स. १९१६ साली कोल्हापूर संस्थानामध्ये प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत केले. गावातील कोणतेही मुल शिक्षणापासून वंचित राहू नये याची गावातील शाळेच्या मुख्यध्यापकावर जबाबदारी सोपवली. शिक्षणास योग्य वयाच्या मुलाची यादी प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसाच्या आत मुलांच्या आई वडीलांनी आपली मुले शाळेत पाठवावित. ती मुले जर शाळेत आली नाहीत तर अशा मुलांची नावे व त्यांच्या पालकाची नावे त्या शाळेच्या हेडमास्तराने मामलेदारास कळवावित, मामलेदारांने त्यांचे म्हणणे ऐकून घ्यावे व संयुक्तिक उत्तर न दिसल्यास प्रत्येक मुलाबद्दल एक रुपया दंड करावा. अशा प्रकारचे महाराजांनी २१ सप्टेंबर १९१७ ला फर्मान काढले होते. अत्यंत महत्वाची बाब म्हणजे त्या कायद्याची त्यांनी कडक अंमलबजावणी केली. २५ जुलै १९१७ रोजी महाराजांनी मोफत

ISSN No. 2394-5990

आणि सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा आदेश काढला. कारण शिक्षणाशिवाय पर्याय नाही असे शाहू महाराजांचे मत होते.

वसतिगृहे व शिक्षण प्रसार :

छत्रपती शाहू महाराज तत्कालीन संस्थानिकाप्रमाणे ऐश आरामात जीवन जगणारे नव्हते. त्यांनी आपल्या स्वतंत्र प्रज्ञेने शिक्षणाच्या क्षेत्रामध्ये अनेक योजना आखल्या, स्वतंत्रपणे धोरणे ठरविली. समाजसुधारणेचा पाया घालण्यासाठी त्यांनी सर्व समाजास शिक्षणाची संधी उपलब्ध करुन दिली.

छत्रपती शाहू महाराजांनी दिगंबर जैन बोर्डिंग, मुस्लिम बोर्डिंग, वीरशैव लिंगायत बोर्डिंग, मिस क्लार्क होस्टेल, नामदेव बोर्डिंग, कायस्थ प्रभू बोर्डिंग, वैश्य बोर्डिंग, ढोर चांभार बोर्डिंग, सुतार बोर्डिंग, नाभिक बोर्डिंग अशी एकूण २० वसतिगृहे स्थापन केली. वसतिगृहाप्रमाणेच शिक्षण प्रसारासाठी तपोवन आश्रम, विद्यापीठ, छत्रपती संस्कृत विद्यालय, शिवाजी मराठा हायस्कूल, छत्रपती राजाराम औद्योगिक मंदिर अशा अनेक शैक्षणिक संस्था स्थापन करुन बहुजन समाजातील शिक्षण प्रसाराचे कार्य महाराजांनी गतीमान केले.

स्त्री शिक्षण :

शिक्षणाचा अधिकार शूद्रांसोबत स्त्रीला सुद्धा नाकारला जात होता व तिला गुलाम ठरवले होते. स्त्रियांची या गुलामगिरीतून मुक्तता झाल्याशिवाय जातीअंताचे व समताधिष्ठित समाज निर्मितीचे प्रयत्न यशस्वी होणार नाहीत. म्हणून स्त्री वर्गाची या गुलामगिरीतून मुक्तता करण्यासाठी त्यांनी शिक्षण हे महत्वाचे मानून त्यासंदर्भात काही प्रयत्न केले. कोल्हापूर संस्थानात स्त्री शिक्षणास उत्तेजन देण्यासाठी एक विशेष अधिकाराची जागा निर्माण केली. स्त्रियाच्या मानसिक विकासासाठी शिक्षणाची गरज आहे, असे राजर्षी शाहू महाराजांना वाटत असे. शाहू महाराज यांच्या मते, स्त्रीला माणसासारखे जगता आले पाहिजे आणि त्याचबरोबर तिला स्वतःचे संरक्षण करण्याचे ज्ञान प्राप्त झाले पाहिजे. हे साध्य होण्यासाठी ङ्गशिक्षणफ हाच एकमेव रामबाण उपाय होय.

स्त्रीने शिक्षण घेतल्यामुळे तीला अकाली वैधव्य येईल, ती कुमार्गास लागेल, पापचरणांची प्रवृत्ती बळावेल अशी त्यावेळी स्त्रियांबद्दलचा समज होता. म्हणून शूद्र आणि अतिशूद्र जातीतील स्त्रियांना शिक्षण देणे हा त्या काळच्या सनातनी लोकांना मोठा भ्रष्टाचार वाटत असे त्यांना शिक्षण देणे म्हणजे देव, धर्म आणि समाज यांच्याविरुद्ध वर्तन करणे होय. शिवाय स्त्री शिक्षण म्हणजे हिंदुधर्मावर भयंकर अत्याचार अशा तऱ्हेच्या सनातन्यांच्या समजुतीमुळे स्त्रियांना शिक्षणाचे दरवाजे बंद होते. सनातनी लोकांच्या या मतावर तीव्र आघात करुन महाराष्ट्रात प्रथम स्त्रीस शिक्षणाचे दरवाजे उघडून दिले ते महात्मा फुले यांनीच, कारण त्यांना माहित होते की, स्त्री शिक्षण म्हणजे पर्यायाने तिच्या मुलांचे शिक्षण होय. सामाजिक क्रांतीच एक महत्वाचे शस्त्र म्हणून महात्मा फुलेंनी स्त्री शिक्षणाला सुरुवात केली. त्याला पुढे घेऊन जाण्याचे कार्य राजर्षी शाहू महाराजांनी केले. ज्या काळात समाज स्त्रियांना शिक्षण नाकारत होता, त्या काळात राजर्षी शाहूंनी स्त्री शिक्षणाबद्दलचे आपले विचार प्रकट करुन व प्रत्यक्ष स्त्री शिक्षणाचे कार्य करुन दाखविले.

अस्पृश्य वर्गाचा उद्धार :

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी राजर्षी शाहू महाराजांच्या व्यक्तिमत्वाचा मागोवा घेताना त्याचे मन ङ्गउत्क्रमशीलफ होते तसच ते उत्कर्षशील होते असे म्हटले तसेच त्याच लेखात त्यांनी लिहिले आहे की, भारतीय निराश्रित साह्यकारी मंडळीची स्थापना झाल्यावर तिच्या अव्वल अमदानीत माझ्या व त्यांच्या ज्या भेटी झाल्या त्यावेळी अस्पृश्यांविषयी त्यांची सहानुभूती अद्यापि बनली नव्हती. असे माझ्या स्पष्ट नजरेस आले. मात्र अस्पृश्याविषयी द्वेष त्यांच्या कोमल मनात असणेच शक्य नव्हते. द्वेष नसणे आणि प्रेमाचा पाझर फुटणे ह्यात जमीन आसमानाचे अंतर आहे. पण तेही अंतर त्यांनी हळूहळू ओलांडले.

इ. स. १९०६ नंतर ब्राम्हण दहशतवाद्यांनी उत्तरोत्तर उग्र स्वरुप धारण केले. महाराजाच्या चारित्र्यहननापासून त्यांना या जगातून नाहिसे करण्यापर्यंतचे सर्व अवैद्य व अनैतिक मार्ग चोखाळले गेले. या संघर्षातून ङ्गवाईटातून चांगलेफ या न्यायाने वर्णवर्चस्ववाद्यांच्या विरुद्ध लढण्याची महाराजांची मनोभूमिका अधिक खंबीर व तत्वनिष्ठ बनली. त्याचबरोबर छत्रपतीनाही शूद्र म्हणणाऱ्या वर्णवर्चस्ववाद्यांनी ज्या शूद्रातिशूद्रांना पशुतुल्य जीवन जगण्यास भाग पाडले होते. त्यांच्या वेदना महाराज समजू शकले. ब्राम्हणशाही विरुद्धच्या झगड्यात या शूद्रातिशूद्रांना प्रथम मानसिक व सामाजिक गुलामगिरीतून मुक्त करावयास हवे, याची त्यांना प्रकर्षाने जाणीव झाली.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज व अस्पृश्य वर्ग :

अस्पृश्यता म्हणजे मानवजातीला लागलेला कलंक असून सामाजिक समतेच्या दृष्टीने तो हानिकारक आहे याची जाणीव महाराजांना झाली. मानवतेच्या व सामाजिक समतेच्या दृष्टीने कलंक असलेली ही अस्पृश्यता नष्ट केली पाहिजे असे महाराजांचे स्पष्ट मत होते. बहुजन समाजातही जे विशेष मागासलेले पिडीत, भटके व शोषित आहेत त्या अस्पृश्यांच्या उन्नतीकडे त्यांचे विशेष लक्ष होते.

इ. स. १९१८ सालापासून सत्यशोधक चळवळ, ब्राम्हणेत्तर पक्षाची चळवळ, अस्पृश्योद्धार जातीभेद निर्मूलन, शिक्षण प्रसार अशा अनेक क्षेत्रांत शाहू महाराजांचे कार्य अधिक गतिमान झाल्याचे दिसून येते. विशेषतः अस्पश्योद्धार चळवळीत तर त्यांनी एकामागून एक क्रांतिकारी पावले उचलून अस्पृश्य समाजास युगानुयुगाच्या सामाजिक गुलामगिरीतून मुक्त करण्याचा अविरत प्रयत्न चालू ठेवला. या प्रयत्नाच्या मागे महाराजांच्या हदयातील अस्पृश्यांविषयीची कारुण्याची भावना जशी होती, तशी त्याच्या तळाशी या सुमारास त्यांच्या वैयक्तिक जीवनातील नियतीच्या एका कठोर हल्ल्याने त्यांच्या ठिकाणी निर्माण झालेली विशेष अशी एक मानसिकताही कार्यरत होती.

हजेरी देण्याची पद्धत बंद :

दीनदलिताची सेवा हीच खरी मानवतेची सेवा या थोर मानवतावादी भूमिकेवर महाराज आलेले दिसतात. याच भूमिकेतून त्यांनी येथून पुढील अस्पृश्य मुक्तीचा संग्राम चालविला. अस्पृश्य मुक्तीचा पहिला आदेश २७ जुलै १९१८ ला मंजूर होऊन कोल्हापूर गॅझेटमध्ये ३ ऑगस्ट १९१८ रोजी प्रसिद्ध झाला. त्याच म्हटले होते, 'इलाखे मजकुरी गुन्हेगार जातीच्या लोकांनी हजेरी दररोज पोलीस पाटलाकडे होते. त्यातील काही जातीची हजेरी माफ केला असून काही ठिकाणी त्यांची हजेरी अद्याप घेण्यात येते. या हजेरीपासून त्या त्या जातींच्या लोकांची फार गैरसोय होते व इमानाचे धंदे करुन पोट भरण्यास अडचण पडते. ही सर्व अडचण दूर झाली पाहिजे, यासाठी हुकूम देण्यात येतो की, महार, मांग, रामोशी व बेरड या चार जातींच्या लोकांची हजेरी बंद करण्यात यावी, यातील जे कोणी गुन्ह्यात सापडून शिक्षा झालेले असतील त्यांना मात्र या हुकुमाने हजेरीची माफी नाही. या हुमुमाचा अंमल ताबडतोब करण्यात यावा.'

२९ सप्टेंबर १९१८ रोजी महाराजांच्या हजेरी संदर्भात आणखी एक हुकुम गॅझेट झाला, 'त्यात गुन्हेगार म्हणून कपाळावर कायमचा शिक्का बसलेल्या जातीची हजेरी महारांजांनी माफ केल्याचे जाहीर करुन शिक्षा झालेल्या कोणीही मनुश्याचे वर्तन शिक्षा संपल्यापासून पाच वर्ष चांगले राहिले असेल तर त्यास हजेरीतून मुक्त करावे असे म्हटले आहे.'

आंतरजातीय विवाहाचा पुरस्कार :

जातीभेद नष्ट करण्याचा खरा उपाय म्हणजे भिन्नभिन्न जातींमध्ये घडवून आणलेले आंतरजातीय विवाह होय. या बंडखोर मताचा महाराजांनी त्या काळी जाहीर पुरस्कार केला. आपल्या एका भाषणात ते म्हणतात, या देशाची उन्नती लवकर किंवा उशिरा होणे हे केवळ जातिभेद ज्या प्रमाणात नाहीसा होईल, त्यावर अवलंबून आहे. हा जातिभेद नाहीसा होण्यास भिन्न भिन्न जातीचे शरीरसंबंध विस्तृत प्रमाणावर होणे फार गरजेचे आहे. रोटी व्यवहार आता जास्त प्रमाणात होणार, त्याविरुद्ध कोणी कितीही धडपड केली तरी तिचा उपयोग होणार नाही पण बेटी व्यवहाराची तशी गोष्ट नाही असे विवाह होण्याकडे प्रवृत्ती होण्यास कायदेशीर अडचणी दूर झाल्या पाहिजेत.

वेठबिगारी पद्धत बंद :

हजेरी प्रमाणेच अस्पृश्य, मागास वर्गीय, भटके व विशेषतः महार समाजाच्या माथ्यावर वेठबिगारी ही अमानुश पद्धत लादली गेली होती. वेठबिगारी पद्धतीखाली पाटील-कुलकर्णी हे गावकामगार अथवा सरकारी अधिकारी महारांस अनेक प्रकारची कामे सांगून विना मोबदला राबवून घेत असत. वास्तविक पाहता महार हा गावगाडयातील एक महत्वाचा वतनदार होता. पण त्याचे वतन म्हणजे पाटील-कुलकर्णी अथवा देशमुख-देशपांडे यांच्या वतनांप्रमाणे प्रतिष्ठेचे वतन नव्हते. त्यास वतनाची इनामे व हक्क असत. महारांनाही त्यांच्या चाकरीची इनामे व हक्क असत. पण त्यांचे स्वरुप शूद्र असे. महारांच्या चाकरीत गावगाडयाच्या इतर अनेक कामाबरोबर वेठबिगारीचे ओझे वाहावे लागत असे. महारकीच्या वतनाबरोबर ही वेठबिगारीची बेडी त्यांच्या पायात पिढयानपिढया ठोकलेली होती. महार हे वतन सोडून गावाबाहेर पडू शकत नव्हते. परिणामी ही वेठबिगारीची बेडी तुटून पडू शकत नव्हती. एका परीने हे महारकीचे वतन म्हणजे सामाजिक गुलामगिरीच होती. हे वतन खालसा करुन महारांना या गुलामगिरीतून मुक्त करावे, असा विचार शाहू महाराज करीत होते. या विचारातून त्यांनी २६ जून १९१८ रोजी ङ्गमहार लोकांचे उत्पन्न बलुते खुतांतून कमी करुन गाव हक्कदार खुतांत दाखल करण्याविषयीफएक वटहुकूम काढल्याची नोंद मिळते.

माणगांव परिषदेनंतर अवघ्या महिनाभरानेच शाहू महाराजांनी संस्थानातील अन्यायी वेठबिगारी पद्धत कायद्याने बंद करुन टाकली. त्या संदर्भात काढलेल्या हुकुमात महाराज म्हणतात, 'महार, मांग, भटके वैगेरे कोणीही अस्पृश्य लोकांकडून राजघराण्यातील लोकांशिवाय व स्टेट दप्तराच्या कामाशिवाय वेठबिगारी घेण्याची नाही. तहत रावब, दिवाणसो पर्यंत कोणीही स्टेट रिजंड अगर ॲडमिनिस्टेटर नोकराने वरील कामाशिवाय सदर लोकांस वेठीस धरण्याचे नाही. पाटलाने जर वेठीस महार घेतला तर त्यास वतनातून कमी केले जाईल. तसेच मांगाकडून दोर-नाडा वगैरे हर एक काम फुकट वेठबिगारीच्या स्वरुपात कोणी करुन घेईल त्यासही जबर शासन करण्यात येईल.'

ISSN No. 2394-5990

सारांश :

राजर्षी शाहू महाराष्ट्रातील स्वातंत्र्य, समता व विकासाच्या चळवळीतील दीपस्तंभ होते. त्यांनी दलित, आदिवासी, बहुजन, शेतकरी, कामगार व स्त्रियांच्या सामाजिक उत्थानाच्या नव्या युगाला गतिमान केले. दबलेल्या वर्गजातीच्या व स्त्रियांच्या अधिकारांचा संघर्ष पुढे नेण्यासाठी त्यांनी सामाजिक न्यायावर आधारलेल्या विकासनीतीचा पाया रचला. त्यांच्या विकासाच्या विचाराने व व्यूहनीतीमुळे समाजाचा सम्यक विकास साधला गेला. राजर्षी शाहूंच्या विकास विचाराने आधुनिक महाराष्ट्र राज्याच्या विकासनीतीला मार्गदर्शन केले आहे.

संदर्भग्रंथ सूची :

१. भगत, रा. तु. १९९९, शिक्षण महर्षी राजर्षी शाहू महाराज जीवन व कार्य, सिद्धराज प्रकाशन, पुणे, पृष्ठ क्र. १३८.
२. सरदार, गं. बा. १९९२, 'राजर्षी शाहू महाराजांच्या विचारांची दिशा', कुंभार, नागोराव (संपा.) राजर्षी शाहू महाराज, विचार शलाका (विशेषांक) लातूर, प्रबोधन प्रकाशन, पृष्ठ क्र. ४७.
३. पवार, जयसिंगराव, (संपा.) २००१, राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, कोल्हापूर, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, पृष्ठ क्र. ११९.
४. सूर्यवंशी, कृ. गो., १९८४, राजर्षी शाहू: राजा व माणूस, ठोकळ प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, पृष्ठ क्र. १८८.
५. जाधव, भगवानराव बापूसाहेब (संपा.) २००१, राजर्षी श्री शाहू महाराजाची भाषणे, मुंबई, लोकवाड.मयगृह, पृष्ठ क्र. ८७.
६. भोसले, एस. एस. (संपा.) १९९१, क्रांतिसूक्ते: राजर्षी छत्रपती शाहू, मुंबई, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, पृष्ठ क्र. १२५, १२६.
७. लट्ठे, आ. बा., १९२५, श्री म. छत्रपती शाहू महाराज यांचे चरित्र, दत्ताजीराव सावंत, श्रीरामत्व प्रकाश छापखाना, बेळगांव, पृष्ठ क्र. ३८०, ३८१.
८. भगत, रा. तु. २००३, राजर्षी शाहू छत्रपती जीवन व शिक्षण कार्य, सिद्धराज प्रकाशन, पुणे, पृष्ठ क्र. १८१.
९. सूर्यवंशी, कृ. गो., १९७६, इंदुमती राणीसाहेब, ठोकळ प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, पृष्ठ क्र. १९.

■■■

सर्वंकष सुधारणांचे पुरस्कर्ते राजर्षी शाहू महाराज

किशोर जनार्दन लांडेपाटील
हुतात्मा राजगुरू महाविद्यालय,
राजगुरुनगर, ता.खेड, पुणे
9420174503, kishorlandepatil@gmail.com

गोषवारा :

भारतात स्वातंत्र्यपूर्व काळात अनेक राज्यकर्ते (संस्थाने) होऊन गेले. परंतु पारतंत्र्य काळातही आपल्या सत्तेचा उपयोग आपली प्रजा व भारतीय समाजाला नवी दिशा देण्यासाठी करणारे काही राज्यकर्ते होते. त्यापैकी एक महत्त्वपूर्ण राज्यकर्ते करवीरचे छत्रपती राजर्षी शाहू महाराज होत. त्यांचे केवळ कार्यच नव्हे तर विचारही अनुकरणीय व दिशादर्शक ठरले. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे त्यांचा उल्लेख 'नवयुगातील सर्वांगपूर्ण राष्ट्रपुरुष' असा करतात. अलीकडच्या काळात करोना प्रदुर्भावाच्या पार्श्वभूमीवर समाज व राज्यकर्त्यांनी समस्यांना कसे सामोरे जावे याविषयी विविध पातळीवर चर्चा सुरु झाली. राजर्षी शाहू महाराज आचार विचारात सुसूत्रता असणारे, भविष्याचा वेध घेणारे व लोकमानसाची जाण असणारे राज्यकर्ते होते. त्यामुळे त्यांनी विविध विषयांच्या अनुषंगाने केलेले विचार व कार्य आजच्या काळातही अनुकरणीय व मार्गदर्शक आहेत.त्यामुळे प्रस्तुत लेखात राजर्षी शाहू महाराज यांच्या कार्याचा थोडक्यात आढावा व महत्त्व मांडण्यात आले आहे.

प्रास्ताविक :

राजाराम महाराजांचा फ्लोरेंस येथे अचानक मृत्यू झाला आणि चौथे शिवाजी महाराज कोल्हापूर गादीवर आले. इंग्रजांनी त्यांना अहमदनगरच्या किल्ल्यात ठेवले तेथेच त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या पत्नी आनंदीबाई साहेबांनी कागलच्या घाटगे घराण्यातील यशवंतराव यांना दत्तक घेऊन शाहू हे नाव ठेवले. शाहू (यशवंत) यांचा जन्म २६ जून १८७४ रोजी झाला होता. शाहूंच्या शिक्षणाची उत्तम व्यवस्था करण्यात आली होती. १८९१ मध्ये बडोदा येथील लक्ष्मीबाई (खानविलकर) यांच्याशी त्यांचा विवाह झाला. तर १८९४ मध्ये शाहू महाराजांचा राज्याभिषेक झाला. शाहू महाराजांच्या मृत्यूनंतर राजाराम महाराज गादीवर आले. शाहू महाराज यांनी छत्रपती पदाची धुरा सांभाळल्या नंतर मृत्युपर्यंत (१९२२, २८ वर्ष) छत्रपती म्हणून लोककल्याणकारी कामे केली. हे करत असतानाच सुरु असलेल्या स्वातंत्र्य लढ्याशी साह्यकारी भूमिका घेतली.

महाराजांनी आपल्यास मिळालेले पद लोककल्याणार्थ उपयोगात आणले. पदाचे अधिकार व जबाबदारी आपल्याला मिळालेल्या वारश्यानुसार अत्यंत प्रभावी व लोकाभिमुख पद्धतीने वापरली. आपल्या लोककल्याणकारी व पुरोगामी विचारधारेमुळे शाहू महाराजांनी आपला एक वेगळा ठसा भारतीय इतिहासावर उमटविला आहे. त्यांनी केलेले कार्य केवळ त्यांच्या संस्थानी प्रदेशापुरते मर्यादित न राहता भारतभर त्यांचा प्रभाव पसरला.

राजर्षी शाहू महाराज यांचे कार्य :

शिक्षणविषयक कार्य :

समाजाचा उत्कर्ष घडवून आणण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे साधन म्हणजे शिक्षण होय. समाज उन्नती साठी शिक्षणाचे महत्त्व ओळखून कार्य करणाऱ्या भारतीय सुधारकांमध्ये राजर्षी शाहू महाराज यांचे अमुल्य योगदान आहे. शाहू महाराजांची शिक्षणविषयक दृष्टी मूलगामी होती व कायम स्वरूपाच्या सामाजिक परिवर्तनासाठी शिक्षण हाच एकमेव मार्ग असल्याची त्यांची भूमिका होती.[१] क्षमता विकास करण्याची शिक्षणाची ताकद जाणून महाराजांनी आपल्या कार्यास अनुसरून अनेक संस्था व व्यवस्था (सुविधा) निर्माण केल्या. महाराजांचे कार्य विविधांगी असल्याने विविध प्रकारच्या संस्था त्यांनी उभारल्या व तशा संस्था उभारणीस अनुकुलता व मदत निर्माण केली. शिक्षण सुधार समिती स्थापन केली त्यामाध्यमातून शिक्षण गरजा व समस्यांवर विचार केला. शिक्षणासाठी विविध मार्गांनी पैसा उभा केला. मंदिर उत्पन्नाचाही त्यासाठी उपयोग केला.[२]

शिक्षणाचे महत्त्व व गरज ओळखून अनेक शाळा सुरु केल्या. पुरोहित शाळा, पाटील शाळा, उद्योग शाळा, संस्कृत शाळा, सत्यशोधक शाळा व कला शाळा त्यापैकीच आहेत. प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केले. मुलांना शाळेत न पाठविणाऱ्या पालकांना दंड (महिन्याला एक रुपया) केला. त्यामुळे संस्थानात शाळा व विद्यार्थ्यांची संख्या लक्षणीयरित्या वाढली. स्त्री शिक्षणास पाठबळ दिले. विवाहाचा खर्च शिष्यवृत्तीकडे म्हणजेच शिक्षणाकडे वळविला. शिक्षण प्रसारासाठी मुख्य समस्या दूर

ISSN No. 2394-5990

करण्यास अनेक वसतिगृहे स्थापन (सुरु) केली. (उदा. व्हिक्टोरिया मराठा वसतिगृह, दिगंबर जैन वसतिगृह, वीरशैव लिंगायत वसतिगृह, मुस्लीम वसतिगृह, मिस क्लार्क वसतिगृह, दैवज्ञ शिक्षण समाज वसतिगृह, श्री. नामदेव वसतिगृह, पांचाळ ब्राम्हण वसतिगृह, इंडियन ख्रिश्चन वसतिगृह, ढोर-चांभार वसतिगृह, सुतार वसतिगृह, नाभिक विद्यार्थी वसतिगृह, उदाजी मराठा वसतिगृह, वंजारी समाज वसतिगृह)

उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांना (राजाराम कॉलेज, डेक्कन एज्युकेशन सोसायटी, बनारस विद्यापीठ) मोठी मदत दिली. तांत्रिक व लष्करी शिक्षण देणाऱ्या व्यावसायिक शिक्षणासही प्रयत्न केले. आपल्या संस्थानाबाहेरील संस्थांनाही मदत दिली त्याप्रमाणेच विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली. स्त्री शिक्षणाचा पुरस्कार केला. त्यासाठी विविध मार्गांचा (फी माफी, अधिकार पदी नियुक्ती) अवलंब केला.

अस्पृश्यता व अनिष्ट प्रथा निवारण कार्य :

महाराज समतावादी होते. विषमता व त्याअनुकुल व्यवस्थांना त्यांनी विरोध केला. जातीआधारित शाळा पद्धती बंद (१९१९) केली. आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन दिले. स्वत:च्या कुटुंबातही असा विवाह घडवून आणला. संस्थानात आरक्षण (६ जुलै १९०२) लागू करत विकासाच्या संधी निर्माण करून दिल्या. इंग्रजांनी गुन्हेगार शिक्का मारत काही जमातींसाठी सुरु केलेली हजेरी पद्धत बंद केली. सहभोजने केली व स्वत: त्याविषयक आदर्श (गंगाराम कांबळे) घालून दिले. अस्पृश्य परिषदांमध्ये (माण) भाग घेतला. १९२२ मधील दिल्लीच्या परिषदेत राजांचे भाषण त्यांच्या विचाराची व्यापकता व सखोलता दाखविते. या भाषणात त्यांनी स्वावलंबी होण्याची आवश्यकता प्रकर्षाने मांडली आहे. सामाजिक विषमतेच्या मुळाशी असलेले अर्थकारण महाराजांना चांगलेच ज्ञात होते त्यामुळे आर्थिकदृष्ट्या लोक स्वावलंबी (उदा. शिवणयंत्रे) होतील यासाठी विशेष प्रयत्न केले. धर्म महत्त्वाचा असला तरी राष्ट्रीय एकात्मतेच्या आड तो येता कामा नये. म्हणूनच अस्पृश्य या शब्दासही महाराजांचा तीव्र विरोध होता. अस्पृश्यता निवारणाच्या अनुशंगाने त्यांनी जाती व्यवस्था नष्ट करण्याची भूमिका मांडली आहे. नवे बदल करणे व स्वीकारणेबाबत अनुकूल भूमिका घेतली.

सुधारणावादी समाज :

आर्य समाज, प्रार्थना समाज, थिओसोफिकल सोसायटी यांचे विचार व कार्य महाराजांना प्रभावित करून गेले. महाराजांनीही या समाजांना त्यांच्या कार्यासाठी मदतीची भूमिका घेतली. महाराज पुरोगामी विचाराचे पुरस्कर्ते होते. अर्थात सर्व समाजाचे सर्वच विचार त्यांनी स्वीकारले असे नाही. त्यांना जे जे भावले ते ते स्वीकारले व पुरस्कारीले[३] आहे. महाराजांच्या काळात सर्वाधिक चर्चिले गेलेले व गाजलेले प्रकरण म्हणजे वेदोक्त प्रकरण (१८९९) होय. या प्रकरणामुळे विविध पातळीवर विचार मंथन व जाणीव विकसित झाल्या. सत्यशोधक चळवळीस प्रेरणा मिळाली. कोल्हापुरातही सत्यशोधक समाजाची स्थापना (१९११) झाली होती. संस्थानात व सर्वत्र सत्यशोधक विचारांचा प्रसार अधिक जोमाने झाला. यात महाराजांचे योगदान महत्त्वाचे ठरले. म.फुले यांच्यानंतर सत्यशोधक समाजास पुनर्जीवीत करण्यात महाराजांचे योगदान मोठे आहे. कुठल्याही एका विशिष्ट वर्गाच्या जोखडात समाज अडकता कामा नये यासाठी सत्यशोधकी आग्रही होते. महाराजांचीही भूमिका तशीच होती. विशिष्ट प्रवृत्ती व त्यातून निर्माण शोषक व्यवस्थेविरोधात त्यांचा लढा होता. विशिष्ट वर्गाची मक्तेदारी मोडून काढण्यासाठी त्यांनी विविधांगी प्रयत्न (क्षात्र जगद्गुरू) केले. १२ ऑक्टोबर १९२० रोजी शाहू महाराजांनी क्षात्रजगद्गुरू संबंधीचा जाहीरनामा प्रसिद्ध केला.[४] या सगळ्याच्या मुळाशी असलेल्या वेदोक्त प्रकरणाबाबत गोवर्धन पारीख म्हणतात, वेदोक्त महाराष्ट्र प्रकरणाने एका महान सामाजिक बंडखोरीला जन्म दिला आणि ती पर्यायाने महाराष्ट्राच्या सर्व सामाजिक जीवनाला वेगळे वळण देण्याला, इतिहासाला कलाटणी देण्याला समर्थ ठरली.[५]

स्त्री सुधारणा :

समाजातील विविध वंचित घटकांच्या जीवनात सुधारणा घडविण्यासाठी राजांनी कार्य केले. स्त्रीचे समाजातील महत्त्व व स्थान लक्षात घेऊन अनेक बदल राजांनी केले. विधवा विवाहास प्रोत्साहन देत पुनर्विवाहाचा कायदा (१९१७) केला. याशिवाय आंतरजातीय आंतरधर्मीय कायदा (१९१९), घटस्फोटविषयक कायदा (१९२०), देवदासी प्रथेविरोधात व जोगत्या-मुरळी प्रतिबंधक कायदा (१९२०) व मुलीच्या विवाह वयविषयक कायदा असे अनेक कायदे स्त्री सुधारणा-मुक्तीसाठी उपयुक्त ठरले.

स्त्रीच्या सक्षमीकरणासाठी शिक्षणाची आवश्यकता लक्षात घेऊन त्यासाठी अनुकुलता निर्माण केली. स्त्रियांचा शिक्षण कल वाढविण्यास प्रयत्न केले. शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या स्त्रियांना मोफत राहण्या- शिकण्याची सोय उपलब्ध करून दिली. स्वत:च्या सुनेसही (इंदुमती साहेब) शिक्षणासाठी प्रोत्साहित केले. इंदुमतीदेवींचे आयुष्य म्हणजे शाहू छत्रपतींच्या स्त्रीशिक्षणविषयक कल्पना राबविण्याची उत्तम प्रयोगशाळाच होती.[६] गुणवत्ता, पात्रता व कार्यक्षमतेनुसार स्त्रियांना अधिकार पदे दिली जात. स्त्री आहे म्हणून संधी नाकारली गेली नाही.

कोल्हापुरातल्या कृष्णाबाई केळवकर यांना महाराजांनी वैद्यकीय अधिकारी नेमले त्या भारतातल्या पहिल्या स्त्री वैद्यकीय अधिकारी होत.

शेती व उद्योग विषयक कार्य :

भारतीय समाजाचा आधार शेती आहे. शेतीवर केवळ उपजीविकाच चालते असे नव्हे तर लोकांच्या जीवन विचारालाही त्यातून दिशा मिळते. त्यामुळे शेतीचा विकास झाला, शेतकरी सुखी झाला तर राज्य सुखी, सधन, संपन्न होईल. असा त्यांचा विश्वास होता. शेतकऱ्यास विविध समस्या असतात त्या सोडविण्याची जबाबदारी घेणे व त्यासाठी आपले अधिकार वापरण्याची इच्छाशक्ती राज्यकर्त्याकडे असावी लागते. ती महाराजांकडे होती. शेतकऱ्यास त्याच्या समस्या सोडविण्यासाठी तात्कालिक मदत तर द्यायचीच परंतु समस्या पुन्हा निर्माणच होणार नाही यासाठीही प्रयत्न करण्याची दूरदर्शी भूमिका राजर्षींची होती. महाराजांनी सत्तेवर आल्यावर संस्थांनी प्रजेचा मुख्य आधार असलेल्या शेतीकडे विशेष लक्ष दिले.

महाराजांनी लागवड क्षेत्र वाढविण्यास प्रयत्न केले. पिक पद्धतीतही बदलास (कॉफी, चहा लागवड) चालना[७] दिली. शेती विकासासाठी त्यांनी सिंचन समस्यांवर मात करण्यासाठी धरणाची (राधानगरी) निर्मिती केली. त्यांनी उभारलेल्या धरण प्रकल्पात अनेक सुप्त संभाव्यता[८] दडलेल्या होत्या. विद्युत सुविधा निर्माण केल्या. त्याबरोबरीने शेती तंत्रात आधुनिकीकरणासही प्रोत्साहन दिले. यंत्र शोध-निर्मितीस प्रोत्साहन दिले, त्यासाठी बक्षीस जाहीर केले. नव्या शोधांच्या (यंत्र) वापरास प्रोत्साहन दिले. किंग एडवर्ड ग्रिकल्चरल इन्स्टिट्यूट स्थापन केली. राजाराम कॉलेजमध्ये शेतीपूरक अभ्यासक्रम सुरु केला. कृषी प्रदर्शने आयोजित केली.शेतीसपूरक उद्योग व सहकार वाढीस हातभार लावला. शेती सुधारासाठी दुष्काळ निवारणाच्या अनुशंगाने विविध उपाय योजताना अनिष्ट परंपरा व व्यवस्था (वतनदारी व सावकारी) दूर करण्यासाठी प्रयत्न केले. शेतकी उत्पादनांना योग्य भाव मिळावा यासाठी प्रक्रिया उद्योगांना चालना दिली.

महाराज कृषी औद्योगिक समाजाची पायाभरणी[९] करत होते. औद्योगिक विकासाची आवश्यकता महाराजांना वाटत होती. अर्थात उद्योगांना चालना देताना त्यातील दोष, धोक्यांची जाणीवही त्यांना होती म्हणून संस्थानात समतोल औद्योगिक विकास होईल व उद्योग मालकी विशिष्ट गटाकडे केंद्रित होणार नाही याकडेही लक्ष दिले. सहकार वाढवा यासाठी प्रयत्न केले व त्याला अनुकुल धोरण स्वीकारले. संस्थानामध्ये 'सहकारी संस्थाविषयक कायदा' (१९१२) केला. सहकार निबंधकांची नियुक्ती केली.

महाराजांनी आपण व्यापार-उद्योगाकडे वळण्याची आवश्यकता[१०] वेळोवेळी मांडली. आपल्या विचारांना अनुसरून संस्थांनी उद्योगांसाठी संरक्षक धोरण स्वीकारले. गुळ व्यापारासाठी पेठा (शाहूपुरी, राजारामपुरी) वसविल्या. कापड गिरणीची (१९०६) स्थापना केली. व्यापारी संस्थांचा खर्च वाढणार नाही यांची काळजी (नोंदणी शुल्क माफ) घेतली. संस्थांनी प्रदेशातील उत्पादन (शाई, कागद) वापरास प्राधान्य दिले. संस्थान मालकीचे लोहमार्ग उभारले. त्यामुळे शेतीसह उद्योग व्यापारास गती मिळून शेती व प्रजेचे हीत साध्य झाले. शेती व उद्योगांच्या विकासातून परस्परपूरक स्थिती निर्माण करण्यावर त्यांचा भर होता.

आपत्तीतील आधार महाराज :

महाराजांना राज्यकर्ता म्हणून आपल्या कार्यकाळात अनेकदा नैसर्गिक आपत्तीचाही सामना करावा लागला. महाराज गादीवर आले त्यानंतर अल्पावधीत दुष्काळ (१८९६) व प्लेगची साथ या संकटाचा सामना करावा लागला. दुष्काळी भागाची पाहणी अधिकाऱ्यांमार्फत तर केलीच पण स्वत:ही दुष्काळी भागाचा दौरा केला.[११] स्वतंत्र दुष्काळ विभाग सुरु केला. दुष्काळात सारा वसुलीत सवलती दिल्या. अनेक दुष्काळी कामे सुरु केली ती करताना रोजगार निर्मिती व लोकोपयोगी कामे यांचा मेळ घातला. लोकांसाठी अनेक सुविधा (स्वस्त धान्यदुकाने, निराधार आश्रम) निर्माण केल्या. उपासमारीने माणूस व प्राणी जाऊ नये यासाठी सरकारने खर्च करत व्यवस्था (स्वस्त धान्य दुकान, सामुदायिक गोठे) केली. जवळपास ७५ हजार रुपयांचे कर्ज अल्पव्याजदरात उपलब्ध करून दिले.दुष्काळाबरोबर प्लेगची साथही पसरत होती. महाराजांनी प्लेग आयुक्ताची नियुक्ती केली. प्लेगबाबत लोकांना माहिती (शास्त्रीय) देण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. त्यासाठी पत्रके, व्याख्याने असे अनेक मार्ग वापरले. नियमावली जाहीर केली. स्वच्छता व काळजी याबाबत जागृती केली. धारीष्ट्याने यात्रांवर निर्बंध घातले. विलगीकरण कक्ष उभारले. प्लेगवर होमिओपॅथी उपचारपद्धती प्रभावी असल्याने कोल्हापुरात पहिला सार्वजनिक होमिओपॅथीचा दवाखाना (१८९८) सुरु केला. पुन्हा अशा समस्या निर्माण झाल्यास त्यास तोंड देण्याची व्यवस्था तयार ठेवली. प्रतिकूल काळात महागाई वाढणार नाही याची काळजी घेतली. डॉ.शिखरे म्हणतात, दुष्काळ व प्लेगच्या आजारावर मात करण्यासाठी शास्त्रशुध्द नियोजन, कार्यक्षम प्रशासन निर्माण केले. भीती आणि अनिश्चिततेच सावट घेऊन आलेल्या दुष्काळ व प्लेगच्या महामारीत महाराजांनी रयतेला दिलासा देण्याचे महत्कार्य केले.[१२]

ISSN No. 2394-5990

राजकीय व प्रशासकीय जागृती :

आपल्या राजसत्तेचा उपयोग महाराजांनी लोकांच्या कल्याणासाठी केला. सत्ता व व्यवस्था यांची लोकांना जाण असावी व त्यात काम करणाऱ्यास तत्संबंधी ज्ञान असावे याबाबत महाराज आग्रही असल्याने त्यांनी गावकीचा कारभार चालविणाऱ्या पाटलाच्या शिक्षणासाठी पाटील शाळा सुरु केल्या. तलाठी शाळा सुरु केल्या. समाज राजकीय व्यवस्थेशी जोडला जाण्यासाठी डेक्कन रयत असोसिएशन (१९१६) सुरु केली. स्त्री सुधारणा करताना त्यांचा राजकीय सहभाग वाढविण्यावर त्यांनी भर दिला. राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनास त्यांनी कृष्णाबाई व द्वारकाबाई केळवकर यांना पाठविले होते.

कलावंतांचे आश्रयदाते महाराज :

महाराज कलाप्रेमी होते.[१३] राजर्षी शाहू महाराज यांनी चित्रपट, लोककला, कुस्ती अशा विविध क्षेत्रातील लोकांना आश्रय देत प्रोत्साहन दिले. साहित्य, संगीताची त्यांना विशेष जाण व आवड होती. विविध कलावंतांप्रमाणे शाहिरांनाही त्यांनी उदार आश्रय दिला व प्रसंगानुसार त्यांचा गौरव केला. लहरी हैदरसाहेब (कलगीवाले), जंगली मुजावर, शाहीर विठ्ठल बिराजी डोणे, रामचंद्र नरहर (कलगी शिरपेचवाले, आबा माळी (तुरेवाले), शाहीर भाऊ पाटोळे (भिलवडीकर), शाहीर रामचंद्र दळवी, शाहीर पठ्ठे बापूराव (रेठरेकर), शाहीर मारुती सकटे अशा अनेक शाहिरांना महाराजांचा उदार आश्रय लाभला होता. अशा अनेक शाहिरांना त्यांनी गौरविले आहे. संगीतविषयक सहाशे[१४] पेक्षा जास्त कलावंत महाराजंच्या आश्रयास होते. देशातील पहिली संगीतविषयक संस्था (कोल्हापूर गायन समाज, १८८३)[१५] महाराजांच्याच पाठबळाने स्थापन झाली. त्यामुळे विविध कलांचा विकास झाला. सांस्कृतिक विकास साधत असतानाच काळाची व प्रजेची गरज ओळखून विविध क्षेत्रात नवे नवे प्रयोग करत विकास घडवून आणला. त्यांनी त्यांच्या संस्थान प्रदेशात राबविलेल्या अनेक योजना सर्वत्र अनुकरणीय ठरल्या.

समारोप :

राजर्षी शाहू महाराज यांच्या कार्याचा भारतीयांच्या विचार व आचारावर मोठा प्रभाव पडला. त्यांच्या या प्रभावी कार्यामुळेच आजही जनमानसात त्यांचा पगडा असलेला दिसतो. त्यांच्या कार्याच्या गौरवार्थ त्यांचा जन्मदिवस सामाजिक न्याय दिवस म्हणून साजरा केला जातो. कुर्मी समाजाने (कानपूर) महाराजांना राजर्षी म्हणून गौरविले आहे.

राजर्षी शाहू महाराज राज्यकर्ते होते. आपली सत्ता लोककल्याणासाठी उपयोगात आणण्याची त्यांची भूमिका होती. तत्कालीन लोकमानसाची त्यांना उत्तम जाण होती. म्हणूनच त्यांनी आपली दंडशक्ती फार प्रभावीपणे वापरली. प्रसंगी गरजेचे महत्त्व समजून घेत धाडसी निर्णय घेतले. समस्या सोडविताना भविष्यात त्या पुन्हा निर्माण होणार नाहीत व झाल्याच तर त्याचे दुष्परिणाम भोगावे लागणार नाही यासाठी व्यवस्था त्यांनी विकसित केल्या. निर्णय करताना, व्यवस्था उभारताना सामान्य माणूस त्यांच्या डोळ्यासमोर होता. तत्कालीन व भविष्यातील जगाच्या बरोबरीने आपली प्रजा कशी जाईल यासाठी ते प्रयत्नशील होते. त्यांच्या आचार विचारात कमालीचे एकत्व होते. जे विचार त्यांनी मांडले ते त्यांनी आचरणातही आणले. सर्व अनिष्ट व्यवस्थांच्या, मर्यादांच्या पलीकडे जाऊन भविष्यकालीन गरजा ओळखून कार्य करणारे राज्यकर्ते राजर्षी शाहू महाराज होते. आजही अनेक प्रसंगात महाराजांची विचार व निर्णय पद्धती आदर्श व उपयुक्त तसेच काळशी सुसंगत दिसते.

संदर्भ :

१. भा.ल.भोळे, छत्रपती शाहू महाराज, गंधर्व-वेद प्रकाशन, पुणे,२०१०, पृ.७३.
२. अधिक माहिती व संदर्भासाठी पहा - राजर्षी शाहू छत्रपती पेपर्स
३. '...प्रत्येक प्रवाह त्यांनी आपल्या पद्धतीने स्वीकारला.' राजा दीक्षित, राजर्षी शाहू महाराजांचा धर्मविचार समाविष्ट समाज प्रबोधन पत्रिका, अंक २३९, जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर २०२२, पुणे, पृ.५.
४. भा.ल.भोळे, पूर्वोक्त, पृ.२९.
५. पारीख गोवर्धन, सामाजिक प्रबोधन आणि शाहू महाराज, राजर्षी शाहू गौरव ग्रंथ, १९७६, पृ. ४०१.
६. ढेरे अरुणा, राजर्षी शाहू छत्रपती आणि स्त्रीशिक्षण, राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, २००१, पृ.६१९.
७. उदाहरणासाठी पहा- भा.ल.भोळे, पूर्वोक्त, पृ.३८.
८. विश्वेश्वरय्या यांचा धरणासंबंधी अभिप्राय घेतला असता त्यांनी असे सांगितले होते की, असंख्य सुप्त संभाव्यता प्रस्तुत धरणप्रकल्पात दडलेल्या आहेत. याद्वारे लोकांच्या उत्पादनक्षमतेत भर घालणे, शेतकी मालाचे उत्पादन वाढवणे, तसेच औद्योगिकता व उत्पादकता यांचा विकास साध्य करणे शक्य होणार असल्यामुळे, या प्रकल्पाचे मोल दिवसेंदिवस वृद्धिंगतच होत जाणार आहे. - Mhopare R.S., J.F.Patil, Economic Policies and Programmes of Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj, Shivaji University,

Kolhapure, 2007, Pg.87.वरून भा.ल.भोळे, पूर्वोक्त, पृ.९१ वर उद्धृत.
९. भा.ल.भोळे, पूर्वोक्त, पृ.९७.
१०. उदा.- १७ डिसेंबर १९१७ रोजीचे खामगाव येथील अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेतील भाषण.
११. कुलकर्णी मीना, श्री शाहू छत्रपतींचे अर्थकारण, गौरीनंदन पब्लिकेशन, कोल्हापूर, १९७५, पृ.१४६.
१२. सुरेश वसंत शिखरे, छत्रपती शाहू महाराजांचे आपत्ती व्यवस्थापन धोरण आणि कार्य, समाविष्ट समाज प्रबोधन पत्रिका, अंक २३९, जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर २०२२, पुणे, पृ.१२७.
१३. अधिक माहितीसाठी पहा- प्रा.डॉ.शिरीष पवार, राजर्षी छत्रपती शाहू महाराज विचार आणि कार्य, सह्याद्री प्रकाशन, पुणे, २०१२, पृ.२०३ ते २१४.
१४. भा.ल.भोळे, पूर्वोक्त, पृ.१३३.
१५. कित्ता, पृ.१३३.

ISSN No. 2394-5990

छत्रपती शाहू महाराज : सामाजिक क्रांतीचे आधारस्तंभ

डॉ. विकास विलासराव शिंदे
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग
माऊली महाविद्यालय, वडाळा.
मो : ९८८१२५६११५
E-mail : shindevikas450@gmail.com

प्रस्तावना :

२० शतकाच्या पहिल्या दोन दशकात महाराष्ट्राचे सामाजिक जीवन ढवळून काढणारी,सामाजिक समतेची प्रतिष्ठापना करण्यासाठी अविश्रांत परिश्रम करणारी, बहुजन समाज व विशेषतः अस्पृश्य, स्त्री,भटके या सामाजिक सत्तेच्या परिघाबाहेरील सर्व शोषित, वंचित, उपेक्षित वर्गाची अस्मिता जागृत करून त्यांच्या सर्वांगीण उद्धाराचे कार्य करणारी लोकोत्तर व्यक्ती म्हणजे राजर्षी छत्रपती शाहू महाराज होय. नायक हा जीवनाच्या सर्वच क्षेत्रात नायक असतो असे प्रसिद्ध तत्वविते थॉमस कार्लाईल यांनी म्हटले आहे.

२ एप्रिल १८९४ या ऐतिहासिक दिवशी राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानाचा कारभार हाती घेतला. शाहू महाराजांनी राज्यकारभार हाती घेतला आणि इथल्या सामाजिक,सांस्कृतिक, आर्थिक व प्रशासकीय क्षेत्रातील ब्राह्मणी वर्चस्व मोडून काढले. सर्व क्षेत्रातील सत्तेच्या चाव्या कोल्हापूर संस्थानातील बहुजनांच्या हाती दिल्या. १३ जानेवारी १९४० रोजी कोल्हापूर येथे संपन्न झालेल्या कोल्हापूर दलित प्रजा परिषदेच्या अध्यक्ष भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते, ङ्गछत्रपती शाहूंनी समाजातील विषमता नष्ट करण्याचा आटोकाठ प्रयत्न केला व ब्राह्मण्याचा किल्ला ढासळवून टाकलाफ शाहू महाराजांना एक समाज सुधारक म्हणून नाही तर शासन व्यवस्था म्हणून समजून घेणे गरजेचे आहे. या व्यवस्थेने काय काम करावे, कसे करावे, कसा विचार करावा, सामाजिक आणि आर्थिक जीवनात कशा पद्धतीची लोकशाही निर्माण करावी याचं आदर्श उदाहरण म्हणजे राजर्षी शाहू महाराज होय. शाहू महाराज कोल्हापूर संस्थानचे राजे होते परंतु त्यांच्या कर्तुत्वाने कोल्हापूर संस्थानाच्या मर्यादा केव्हाच ओलांडल्या होत्या.

सामाजिक लोकशाही म्हणजे काय?

संविधान सभेमध्ये संविधान सुपूर्द करताना २५ नोव्हेंबर १९४९ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भाषणात सामाजिक लोकशाहीची व्याख्या केली होती. डॉ.आंबेडकर म्हणतात प्रत्यक्षात जर लोकशाही अस्तित्वात यावी अशी जर आपली इच्छा असेल तर तीन गोष्टी कराव्या लागतील.

१) आपल्या सामाजिक आणि आर्थिक उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी संविधानिक मार्गाची कास धरली पाहिजे
२) लोकांनी आपले स्वातंत्र्य कितीही मोठा माणूस असला तरी त्याच्या चरणी अर्पण करता कामा नये तसेच त्याच्यावर इतका विश्वास ठेवू नये की जेणेकरून त्याला प्राप्त अधिकारांचा तो लोकांच्या संस्था उध्वस्त करण्यासाठी प्रयत्न करेल
३) तिसरी गोष्ट आपण केली पाहिजे ती म्हणजे केवळ राजकीय लोकशाहीवर आपण समाधान मानता कामा नये राजकीय लोकशाहीचे आपण सामाजिक लोकशाहीमध्ये परिवर्तन करायला हवं हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी निक्षून सांगितलेले दिसते

अस्पृश्यता निवारणाचे कार्य :

१९०१ च्या कोल्हापूर जनगणनेच्या अहवालात अस्पृश्यांचे वर्णन दिले आहे. त्यांच्या परिस्थितीवर प्रकाश टाकला आहे. अस्पृश्यांची संख्या १९०१ साली कोल्हापूर आणि एसएमसी मध्ये १,०३,८८९ होती असे अहवालावरून दिसते. यात महार मांग ढोर चांभार या अस्पृश्यांचा समावेश केला गेला. अस्पृश्य समाज हा जातीव्यवस्थेमध्ये सर्वात खालच्या थराला होता. राजर्षी शाहूंना या समाजातला आत्मसमान आणि प्रतिष्ठा प्राप्त करून द्यावयाची होतीच. त्याचबरोबर त्यांची आर्थिक प्रगती होणे हे देखील गरजेचं आहे असे वाटत होते.

देशाच्या स्वातंत्र्यासाठी ज्यांनी ब्रिटिशाविरुद्ध आंदोलने करून स्वातंत्र्य पैदा केले त्यांनाच राष्ट्रपुरुष म्हणणे किंवा त्यांनीच राष्ट्राचे जडणघडण केली असे म्हणणे म्हणजे इतिहासाचे मोठे अज्ञान आहे. देशाच्या स्वातंत्र्यासाठी जे लढले ते राष्ट्रपुरुष खरेच. पण जे देशातील ९५% मागासलेल्या समाजाच्या उद्धारासाठी खपले त्यांच्या सामाजिक समतेच्या व न्यायाच्या हक्कासाठी लढले ते राष्ट्रपुरुष नव्हते काय? राष्ट्र केवळ राजकीय स्वातंत्र्याने घडत नाही त्या राष्ट्रांना समाज सामाजिक समतेच्या

पायावर उभा करावा लागतो. त्यासाठी सामाजिक ऐक्य व बंधुभाव यांची गरज असते. महाराजांनी संस्थानातील जातीव्यवस्था व अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी अनेक कायदे केले. त्यांचे पडसाद शिक्षण क्षेत्रातही उमटले. २८ सप्टेंबर १९१९ रोजी महाराजांनी संस्थानातील अस्पृश्यांच्या शाळा बंद केल्या व अस्पृश्य मुलास सरकारी शाळातून इतर लोकांच्या मुलाप्रमाणे दाखल करून घेतले जावे सरकारी शाळातून शिवाशिव नसल्याने सर्व जातींच्या व धर्माच्या मुलास एकत्रित बसवण्यात यावे. २७ जुलै १९१८ ला आदेश काढून अस्पृश्यावर लाभलेली अमानुष अशा हजेरीचे पद्धतीचे निर्मूलन करण्यात आले. भारतीय संसदेने साली अस्पृशता निवारणाचा कायदा केला.जी गोष्ट घडण्यास देशाला स्वातंत्र्यानंतर काही काळ वाट पाहावी लागली ते कार्य शाहू महाराजांनी ३० ते ३५ वर्षे अगोदरच केले होते. अस्पृश्यता या शब्दाची त्यांना चीड होती. अस्पृश्यता शब्द कोणत्याही मानवास लावणे ते नींद्य आहे असे त्यांचे सांगणे होते. अस्पृश्यता नष्ट करण्याच्या दृष्टीने त्यांनी चाबुकस्वार, मोटारचा ड्रायव्हर, माहुत, खाजगी नोकर महार असतील अशी व्यवस्था त्यांनी केली होती. दलितांची नावे भंगी,महार,चांभार या नावात अस्पृश्यता चिकटली आहे. ती काढून टाकण्यासाठी या जातीतील पैलवानांना नवीन नावे दिली. महार पैलवानांना हाक मारतेवेळी मजाटफ पैलवान, चांभारांना मसरदारफव भंग्यांना मपंडितफअशी नावे ठेवली. यामुळे दुसऱ्या जातीतील पैलवान पैलवानांना आपण महारबंगी चांभार जातीतील पैलवानाशी खेळत आहोत ही कल्पनाही येत नव्हती. महाराजांचे अस्पृश्य वर्गावर खूप प्रेम होते. महाराज शिरोळा शिकारीला गेले असता चहासाठी म्हणून शिरोळच्या महारांना त्यांच्या तक्यात सर्वांची सोय करायला सांगितले.महाराज एकटेच तक्यात गेले नाहीत तर बायकांना भाग घेता यावा म्हणून हळदी कुंकवाचा कार्यक्रम ठेवला व त्या ठिकाणी राणीसाहेब, अक्कासाहेब व इंदुमतीदेवी यांना मुद्दामून बोलावून घेतले. इंदुमतीदेवींना तर चार शब्द बोलायला देखील लावलं. महाराज जातीव्यवस्था नष्ट करण्याचे सांगत असताना जपानमधील एक उदाहरण देतात, ते म्हणतात जपानमधील सामुराई लोकांनी आपला जन्माने प्राप्त झालेला उच्च दर्जा सोडून दिला म्हणून जपानमध्ये ऐक्य होऊन त्या देशाची उन्नती झाली आणि त्याच प्रमाणे ब्राह्मणांनी जातीमत्सर सोडल्याशिवाय आमची प्रगती होणार नाही. ते म्हणतात, मी प्रथम अगदी कंजर्वेटिव्ह म्हणजे जुन्या मताचा कट्टा अभिमानी होतो. जातिभेद कायम राहिला पाहिजे व पाळला पाहिजे असे माझे मत होते. अशा दुराभिमानाने इतरांची उन्नती होण्याच्या मार्गात मी अडथळा करतो याची मला जाणीव नसे. स्वतःची चूक कबूल करणं ही एक निधड्या छातीचा व्यक्तीच करू शकतो असे यावरून आपणास दिसून येते.

भटक्या विमुक्तांचा उद्धार :

१८७१ साली इंग्रजांनी भटक्या आणि विमुक्त जातींची मोजदाद करून त्यांना मजन्मजात गुन्हेगारफम्हणून जाहीर केले. हिंदुस्थानात शांतता व सुव्यवस्था निर्माण करण्याची जबाबदारी आपल्यावर आहे, अशी शेखी मिरवणाऱ्या इंग्रजांनी प्रतिष्ठित समाजाचे अशा गुन्हेगार जातींकडून संरक्षण व्हावे म्हणून अनेक उपाय योजले. 'सेटलमेंट' ही एक अशीच उपाययोजना होती. अशा गुन्हेगार जातीमध्ये फासेपारधी, कोरवी, कुंचीकोरवी, वडर, डोंबारी, गोसावी, रजपूत भामटा ह्यांचा प्रामुख्याने समावेश होत होता. अशा प्रकारे या सर्वच जाती-जमातींकडे गुन्हेगार म्हणून तुच्छतेने पाहिले जात असता आणि खुद्द या जाती एक प्रकारचे पशूतुल्य जिणे जगत असता या देशातील एका राजाने त्यांच्याकडे 'माणूस' म्हणून पाहिले व आपल्या पोटाशी धरून समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे मोठे प्रयत्न केले. या समूहातील लोकांना शाहू राजांनी अत्यंत प्रेमाने जवळ घेतले त्याच्यामधील गुणवान लोकांना संधी दिली.नोकऱ्या दिल्या. निवास स्थानावर पहारेकरी म्हणून नेमणुका केल्या. ज्या वेळी समाज या समूहाकडे संशयित गुन्हेगार म्हणूनच पाहत होता या पार्श्वभूमीवर शाहू महाराजांनी भटक्या-विमुक्त जातीत 'माणूस' पाहिला या माणसातील स्वावलंबन व स्वाभिमान जागृत करून त्यास समाजातील मुख्य प्रवाहात आणून सोडण्यासाठी भरीव प्रयत्न केले.

आंतरजातीय विवाह :

छत्रपती शाहू महाराज हे कृतिशील विचारवंत होते. कर्ते समाज सुधारक होते. जातीभेदाच्या निर्मूलनासाठी त्यांनी अनेक आंतरजातीय विवाह घडवून आणले. महाराजांच्या चुलत भगिनी 'चंद्रप्रभाबाई' यांचा विवाह इंदूरच्या तुकोजीराव होळकरांचे पुत्र यांच्याशी निश्चित केला. मराठ्यातील उच्च कुलिन घराण्याची धनगर समाजाशी वैवाहिक संबंध जोडण्याची मानसिकता तयार व्हावी म्हणून करवीरच्या शंकराचार्याकडून मराठ-धनगर एक आहेत असा अभिप्राय त्यांनी मिळवला. कोल्हापूर व इंदूर या दोन संस्थांच्या दरम्यान १०० मराठा धनगर आंतरजातीय विवाहची योजना त्यांनी आखली. या विवाह ६० हजार रुपये खर्च करायचे व या विवाहातील जोडप्यांना उभय राजांनी आपापल्या राज्यातील जमीन जुमला देऊन सहकार्य करायचे असे ठरले. या योजनेप्रमाणे २५ विवाह साजरे झाले. जातीभेदाच्या निवारणाचा महत्त्वाचा मार्ग म्हणून रोटीबीटी व्यवहाराचा आजही उल्लेख केला जातो त्या काळात आंतरजातीय विवाह करणे म्हणजे संकट ओढवून घेण्यासारखेच होते.समाज प्रचंड साना त्यांनी होता परंतु संकटांना समोर जाण्याचा मार्ग

ISSN No. 2394-5990

शाहू महाराजांच्या व्यक्तिमत्त्वात होता. त्यांनी केवळ भाषणे आणि कायदा करून विषय सोडून दिला नाही तर त्याची सुरुवात स्वतःच्या घरापासून केली.

मोफत आणि सक्तीचे शिक्षण :

विद्येविना माती गेलेल्या शिक्षणाशिवाय तरणोपाय नसल्याचे लक्षात आल्यावर शाहू महाराजांनी सर्वप्रथम शिक्षणासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले. सर्व जाति-जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहांची स्थापना केली. शाहूंनी २८ वर्षात अनेक वसतिगृहांची स्थापना करून कोल्हापूरला ममदर ऑफ बोर्डिंग हाऊसेसफ अशी ओळख मिळवून दिली. संस्थानात प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करण्यासाठी राजर्षी शाहूंनी १९१३ मध्ये बंधू पिराजीराव घाटगे यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली. भास्करराव जाधव, म. ग. डोंगरे, अण्णासाहेब लठ्ठे. वाय. के. दिलवर, डॉ. एच. एन. घाटगे या सदस्यांची नियुक्ती करून शिफारशी मागवून घेतल्या. २४ जुलै १९१७ रोजी त्यांनी प्राथमिक शिक्षण मोफत व व सक्तीचे करण्याच्या योजनेचा हुकूम काढला. त्यात म्हटले आहे की, येत्या गणेश चतुर्थीपासून परिसरातील सर्व शाळांत मोफत व शिक्षण अमलात आणण्याचा उपक्रम होण्याचा आहे. सर्व प्राथमिक शाळांतून फी माफी करण्यात आली आहे. असा आदेशही २५ जुलै १९१७ रोजी काढला. प्रत्येक गावात एक शाळा, यानुसार काम सुरू केले. गावातील चावडी, धर्मशाळा, मंदिरात शाळा सुरू करण्याचा आदेश काढला. ज्या गावात चावडी नाही. तेथे तुळजाभवानीचे मंदिर बांधून तेथेच शाळा व चावडी बांधण्याचा आदेश काढला. त्या काळात अस्पृश्यांसाठी करवीर सक्तीचे वेगळ्या शाळा होत्या. शाहू महाराजांनी अस्पृश्यांसाठीच्या शाळा बंद केल्या. अस्पृश्य मुलांना इतर मुलांबरोबरच शाळेत बसण्याचा आदेश दिला. या बहुतेक शाळा देवळांमधून भरत होत्या. त्या काळात मंदिरांमध्येही अस्पृश्यांना प्रवेश नव्हता. शाहू महाराजांनी या निर्णयाद्वारे एकाच दगडात दोन पक्षी मारले. शालेय पातळीवरील स्पृश्यास्पृश्यतेचा भेद मिटवून टाकला.

शाहू महाराज आणि आरक्षणाचे धोरण :

राखीव जागांचे धोरण अमलात आणणारे शाहू महाराज हे देशातील पहिले राज्यकर्ते आहेत. २६ जुलै १९०२ रोजी त्यांनी हा निर्णय घेतला. त्याद्वारे तळागाळातल्या घटकांसाठी ५० टक्के जागा राखीव ठेवल्या. आरक्षणाच्या निर्णयावर अभ्यंकर नावाच्या एका वकिलाने आक्षेप घेतला.ज्याच्यात क्षमता आहे. तो पुढे जाईल, असा युक्तिवाद त्या वकिलाने केला. शाहू महाराजांनी त्याचे म्हणणे शांतपणे ऐकून घेतले. घोड्याच्या पागेत बसलेल्या शाहू महाराजांनी वकिलाला तिथेच एक प्रयोग करून दाखवला. शाहू महाराजांनी मोतद्दारांना एके ठिकाणी घोड्यांची चंदी टाकायला सांगितली. नंतर घोड्यांचा सांभाळ करणाऱ्या मोतद्दारांना सगळे घोडे सोडून द्यायला सांगितले. पागेतले सर्व घोडे सोडून दिले. घोडे चंदी खाण्यासाठी तुटून पडले. पण सगळी चंदी धष्टपुष्ट घोड्यांनीच खाऊन टाकली. अशक्त, कमजोर, लुळीपांगळी घोडी तशीच मागे राहिली. मग महाराजांनी त्या वकिलाला सांगितले. माझे आरक्षणाचे धोरण हे अशा लोकांसाठी आहे. कमजोर, कमकुवत लोकांसाठी आहे. शाहू धष्टपुष्ट, ताकदवान घोडी कमजोर, कमकुवत घोड्यांना काहीच खाऊ देत नाहीत. अशाच कमकुवत लोकांना आरक्षण धोरणातून संधी दिली जाते. शाहूराजांनी घेतलेला आरक्षणाचा निर्णय अनेक अर्थानी क्रांतिकारक ठरतो.

स्त्री उद्धाराचे प्रणेते :

राजर्षी शाहूंनी स्त्रियांना पुरुषांच्या गुलामगिरीतून मुक्त करावे आणि त्यांना स्वतंत्र जगता यावे यासाठी अत्यंत महत्त्वाचे कायदे केले. जुलै १९१७ मध्ये त्यांनी आपल्या संस्थानात विधवांच्या पुनर्विवाह कायदेशीर मान्यता देणारा कायदा केला तसेच या कायद्यानुसार विवाहाची कायदेशीर नोंदणी करण्याची पद्धत सुरू केली. १९१९ मध्ये कोल्हापूर संस्थानातील विवाह संबंधी कायदा पास केला हिंदू व जैन या मुख्य धर्माच्या लोकांना जातीनिर्बंध न पाहता आपल्या कोणत्याही धर्माच्या मनुष्याशी विवाह करण्याची मुभा दिली.या कायद्यानुसार पुरुषाचे विवाहाचे वय १८ वर्षे तर स्त्रीचे वय १४ वर्षे ठरविण्यात आले. १८ वर्षे पूर्ण झालेल्या स्त्रीस विवाह साठी पिता किंवा पालकाच्या संमतीची आवश्यकता राहणार नाही अशी तरतूद केली. नव्या कायद्यानुसार झालेल्या आंतरजातीय लग्नास कायदेशीर मान्यता देण्यासाठी शाहूंनी एक खास विवाह नोंदणी अधिकारी (द रजिस्टर ऑफ मॅरेज) नियुक्त केला होता. स्त्रियांवर होणारे कौटुंबिक अत्याचार रोखण्यासाठी १९१९ मध्ये क्रूर वर्तनास प्रतिबंध करणारा कायदा केला या कायद्याची प्रस्तावना शाहू महाराजांनी लिहिली व त्यात ते म्हणतात,काही स्त्रियांना इतका त्रास होतो सासूकडून नवऱ्याकडून नणंदेकडून काय काय वेळेला धरणी मला पोटामध्ये घेईल तर बरे होईल असे वाटते.अशा सुद्धा स्त्रियांची दखल शाहू महाराजांनी घेतली. या कायद्याचे महत्त्व असे की हा कायदा संपूर्ण भारतामध्ये तर नव्हताच पण अशा प्रकारचा कायदा युरोपमध्ये देखील नव्हता. आपल्या भारतीय संसदेने The Protection of Women from Domestic Violence Act 2005.21 त्याचप्रमाणे १९१९ मध्ये घटस्फोटाचा कायदा करून स्त्रियांना घटस्फोट घेण्याचे स्वातंत्र्य दिले या कायद्यानुसार घटस्फोटीत स्त्रीच्या अन्न वस्त्राच्या

खर्चाची पोटगीची व शिक्षणाबद्दलची व्यवस्था केली होती. समाजामध्ये देवदासींचा दुर्दैवी वर्ग होता यामध्ये जोगतीन, मुरळी, भावी इत्यादी प्रकार असत. अस्पृश्यतेप्रमाणे हा समाजावरील कलंक होता. १९२० मध्ये देवदासी प्रथा प्रतिबंध कायदा करून देवदासी स्त्रियांना आई-वडिलांच्या संपत्तीत वाटा मिळवून दिला. त्यांनी हे कायदे स्त्रियांच्या आत्मसन्मानाचे व स्वातंत्र्याचे कायदे केले. त्यांचे विचार काळाच्या किती पुढे होते हे यावरून दिसून येते.

समारोप :

एका अमेरिकी इतिहासकाराला राजर्षी शाहू महाराजांच्या भूमिकेचे फार आश्चर्य वाटते तो म्हणतो इतका मुलगा मी सामाजिक दृष्टिकोन फुल्यांसारख्या एका शेतकरी कुटुंबात आढळणे हे समजण्यासारखे आहे पण शाहू महाराजांसारख्या एका राज्यांमध्ये दिसून येणे ही फार थक्क करणारी गोष्ट आहे.

राजर्षी शाहू महाराजांनी समाज व्यवस्थेने नाकारलेल्या या समूहाला धार्मिक रूढी परंपरेच्या काळ्याकुट्ट अंधारातून बाहेर काढले. आईच्या ममतेने त्यांना आधार दिला. बापाप्रमाणे त्यांच्या पोटापाण्याची व्यवस्था केली. त्यांच्यामध्ये स्वाभिमान विश्वास जागृत केला. त्यांना सक्षम बनवून माणूस बनवलं. अशा प्रकारची पराकोटीची मानवीय संवेदनशीलता स्वातंत्र्य, समता आणि बंधू या विचारातूनच जन्माला येत असते. शरीराने अत्यंत बलवान बलदंड असणाऱ्या शाहू महाराजांच्या मनात हा समतेचा नितळजरा वंचित शोषितांप्रती जिवंत होता. खरी समता सामाजिक आणि आर्थिक मालकीतून प्रस्थापित होत असते. म्हणून या वंचित समूहाला सन्मानाने माणूस म्हणून जगण्याची प्रतिष्ठेची साधने दिली. स्वतःच्या बहिणीच्या शाही लग्नात महारांना सन्मानाची भरजरी वस्त्रे देऊन त्यांच्या हातात शस्त्रे देऊन शाही पाहुण्यांच्या स्वागताला उभे करणारे३७ राजर्षी शाहू महाराज महाराष्ट्राचा मानबिंदू आहेत. आरक्षणाचा आरंभबिंदू आहेत. मानवतेचे,उदारतेचे आणि पुरोगामीत्वाचे प्रतीक आहेत. विद्यमान भारतातील सामाजिक व आर्थिक लोकशाही जशी जशी यशस्वी होत जाईल तशी तशी शाहू महाराजांच्या कर्तृत्वाची दखल इतिहासात घेतली जाईल.

संदर्भ :

१) डॉ.जाधव रमेश, शाहू महाराज आणि आपत्ती व्यवस्थापनाचा मानदंड, सकाळ, २६ जून २०२०

२) डॉ.पवार जयसिंगराव, राजर्षी शाहू छत्रपती जीवन व कार्य, ताराराणी बुक सर्विसेस कोल्हापूर प्रथमावृत्ती, २०१४

३) डॉ.कळसे अनंत, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी भारताच्या घटना समितीसमोर केलेली भाषणे, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, नागपूर, डिसेंबर, २०१५ पृ.११० ,१११

४) Khane B.D. Chhatrapati Shahu's Crusade Against untouchability, Round Table India, 26 June 2021.

५) लोकराज्य, माहिती व जनसंपर्क महासंचलनालय, मे, २०२२ पृ.४८

६) डॉ.पवार जयसिंगराव, राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रभोधिनी, कोल्हापूर प्रथमावृत्ती,जानेवारी २००१

७) कित्ता, पृ.७६

८) डॉ.पवार जयसिंगराव,लोकोत्तर राजा, लोकसत्ता,१ मे २०२२

९) लोकराज्य,राजर्षी श्री शाहू महाराज राज्यारोहण शताब्दी विशेषांक, १ ऑगस्ट १९९४,

१०) डॉ.भोसले एस.एल., क्रांतीसुक्ते: राजर्षी छत्रपती शाहू, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती महामंडळ, मुंबई, तृतीय आवृत्ती, जुलै २००६

११) लोकराज्य, माहिती व जनसंपर्क महासंचलनालय, जून, २०२२

१२) सूर्यवंशी कृ.गो.राजर्षी शाहू राजा व राजा माणूस, ठोकळ प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती,१९८४

१३) फडके य.दि. छत्रपती शाहू आणि लोकमान्य, श्रीविद्या प्रकाशन ,पुणे, प्रथमावृत्ती ,६ मे १९८६ पृ.२९८

१४) प्रा.साळुंखे नानासाहेब,शाहूंच्या आठवणी, वृषाली प्रकाशन, कोल्हापूर, दुसरी आवृत्ती, ४ जानेवारी २००७,पृ.५८

■■■

ISSN No. 2394-5990

राजर्षी शाहू महाराज यांची समतावादी दृष्टी व समकालीन प्रस्तुत

प्रा. पाटील प्रमोद जगन्नाथ
राज्यशास्त्र विभाग
माऊली महाविद्यालय, वडाळा
ता.उत्तर सोलापूर जिल्हा- सोलापूर
भ्रमणध्वनी ९५५२५२९३३७, pramod24patil@gmail.com

प्रास्ताविक :

एकोणिसाव्या शतकामध्ये सामाजिक सुधारणेच्या दृष्टीने महाराष्ट्रामध्ये जी वैचारिक घुसळण चालू होती त्या वैचारिक घुसळणीमध्ये ज्या महान तत्त्ववेत्यांनी योगदान दिले त्यामध्ये राजर्षी शाहू महाराज यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. सामाजिक क्रांती घडवून आणण्यामध्ये शाहू महाराजांनी महत्त्वाच्या असे योगदान आपल्या २८ वर्षाच्या कारकिर्दीत दिले. शाहू महाराजांच्या काळात वसाहतवादी राजवट आणि वसाहती अंतर्गत राजेशाही हा प्रकार होता परंतु शाहू महाराज सामाजिक न्याय आणि लोकशाहीचे पुरस्कर्ते होते. शाहू महाराजांनी लोक ही संकल्पना त्यांच्या काळात व्यापक केली होती. त्यांची लोक ही संकल्पना राजकीय समाजशास्त्राच्या दृष्टिकोनातून सर्व समावेशक स्वरूपाचे आणि व्यापक प्रकारची होती. कारण लोक या संकल्पनेत अनुसूचित जाती, भटक्या व गुन्हेगारी जमाती, महिला, मुस्लिम, आणि उच्च जाती यांचाही समावेश त्यांनी केला. त्याचबरोबर त्यांनी कृषी क्षेत्रातील लोक, व्यापारी क्षेत्रातील लोक, मध्यमवर्गीय लोक यांचे हितसंबंध त्यांच्या राज्यसंस्थेमध्ये जपले या लोकसमूहांना त्यांनी कृतीशील केले होते. रयत म्हणजे अर्थातच बहुसंख्या प्रजासमूहांचा विचार होता. त्यांच्या राज्यकारभाराच्या व्यवहारात रयत केंद्रस्थानी होती.(संदर्भ –पानसरे गोविंद,२०१०:२७) या पार्श्वभूमी वरती त्यांचे वर्णन विठ्ठल रामजी शिंदे यांनी नवयुगातील 'सर्वांगपूर्ण राष्ट्रपुरुष' असे त्यांचे वर्णन केले आहे तर प्रबोधनकार ठाकरे त्यांना 'नानानारंगी महापुरुष' संबोधतात. जरी त्यांचे असे वर्णन केले जात असले तरी मुख्यतः राजर्षी शाहू महाराज यांचे सामाजिक, समतेविषयीची दृष्टी, विचार या मर्यादेत सदर संशोधन पेपर अभ्यासला जाणार आहे.

गृहीतके :

१) राजर्षी शाहू महाराज यांनी अस्पृश्य समाजाच्या न्याय हक्कासाठी विविध उपाय योजना राज्यसंस्थेद्वारा केल्या.
२) राजर्षी शाहू महाराज यांच्या शैक्षणिक धोरणाचा परिणाम महाराष्ट्राच्या शैक्षणिक धोरणावरती झाला.
३) राजर्षी शाहू महाराज यांच्या समतावादी विचार व कृतींमुळे महाराष्ट्राचे समाजशास्त्रीय आकलन बदलले.
४) राजर्षी शाहू महाराज यांच्या नोकऱ्यांमधील आरक्षण धोरणाचा भारतीय राज्यघटने वरती प्रभाव पडला.
५) राजर्षी शाहू महाराज यांच्या समतावादी दृष्टिकोनामुळे लोकशाहीचा आयाम विस्तारला.

उद्दिष्टे :

१) राजर्षी शाहू महाराज यांच्या समतावादी दृष्टिकोनामुळे लोकशाहीचा आयाम विस्तारला का ते पाहणे.
२) राजर्षी शाहू महाराज यांच्या आरक्षणाचा भारतीय राज्यघटनेवरती प्रभाव पडला का ते पाहणे.
३) राजर्षी शाहू महाराज यांच्या शैक्षणिक कार्याचा महाराष्ट्राच्या शिक्षण क्षेत्रावर परिणाम झाला का ते अभ्यासणे.
४) राजर्षी शाहू महाराज यांच्या समतावादी कार्यामुळे धर्म सत्तेचा प्रभाव कमी झाला का ते पाहणे.

संशोधन पद्धती :

प्रस्तुत संशोधन पेपर मध्ये ऐतिहासिक व ग्रंथालयीन संशोधन पद्धतीचा वापर संशोधकाकडून केला जाणार आहे. ग्रंथालयातील संदर्भ ग्रंथांचा तसेच प्रकाशित, अप्रकाशित प्राथमिक व दुय्यम तथ्य संकलनांच्या आधार सदर संशोधन पेपरसाठी घेतला जाणार आहे.

विषय विश्लेषण :

शाहू महाराजांच्या जीवनातील सामाजिक समतेच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचा मुद्दा म्हणजे १८९९ साली जे वेदोक्त प्रकरण झाले. या प्रकरणाने शाहू महाराजांची सामाजिक दृष्टी, समतेविषयीची भूमिका अधिक विस्तारली असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही.

ब्राह्मो समाज, आर्य समाज या उदारमतवादी चळवळींचा प्रभाव :

छत्रपती शाहू महाराज यांच्या आरंभीच्या जीवनामध्ये ब्राह्मो समाज, आर्य समाज या उदारमतवादी चळवळींचा प्रभाव पडलेला आपणास दिसतो. केशव चंद्रसेन यांच्या विचारांनी शाहू महाराज विशेषतः प्रभावित झाले होते. केशवचंद्र सेन यांच्या अस्पृश्यता किंवा समतावादी विचारांचा, स्त्री दास्य यांच्या विरुद्ध जे पुरोगामी विचार मांडले होते त्याचे महाराजांना निश्चित आकर्षण होते. याशिवाय प्रार्थना समाजाच्या चळवळी विषयी महाराजांना विशेष आदरभाव होता. २० जुलै १९२० साली हुबळी येथे भरलेल्या सभेमध्ये उदारमतवादी चळवळीबद्दल आदर व्यक्त करतात. शाहू महाराजांवरती आर्य समाज व सत्यशोधक समाज या दोन्ही समाजाचा प्रभाव जाणवतो. सत्यशोधक समाजाचा त्यांच्यावरील प्रभाव हा भास्करराव जाधव यांच्यामुळे इसवी सन १८९५ सत्यशोधक समाजाची ओळख झाल्याचे स्पष्ट होते. वेदोक्त प्रकरणानंतर हा प्रभाव अधिक वाढत गेल्याचे स्पष्ट होते. १९११ मध्ये कोल्हापूर मध्ये सत्यशोधक समाजाची स्थापना झाली. सुधारणावादी विचार लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी मसत्यशोधक जलसेफ हे माध्यम विकसित करण्यामागे शाहू महाराजांची मोठी प्रेरणा होती. तसेच शाहू महाराजांवरती महात्मा फुलेंच्या कार्याचा त्यांच्या विचारांचा देखील प्रभाव आपणास जाणवतो. यामध्ये प्रामुख्याने ब्राह्मणी वर्चस्वाला विरोध, पुरोहितशहीला विरोध, अस्पृश्यता, स्त्री दास्य यांसारख्या चालीरीतीस विरोध या बाबतीत महात्मा फुले आणि छत्रपती शाहू महाराज यांचे विचार हे आपणास मिळते जुळते असल्याचे स्पष्ट होते. शाहू महाराजांच्या सामाजिक सुधारण्याच्या विचारांवरती अमेरिकन प्रेस्बिटेरियन मिशनचा देखील प्रभाव जाणवतो. १९०३ पासून डॉ. डब्ल्यू.जे. वानलेस व डॉ. सी. ई. व्हेल या दोन मिशनरी डॉक्टरांशी शाहू महाराजांचा संपर्क झाला होता या मिशनऱ्यांच्या मानवतावाद आणि अस्पृश्यता निवारण विषयक विचारांचा प्रभाव महाराजांवरती होता.

थिऑसॉफिकल विचारांचा प्रभाव- छत्रपती शाहू महाराज यांच्या सामाजिक विचारांवरती थिऑसॉफी या पंथाचा देखील प्रभाव जाणवतो. सर्वधर्मसमभाव या दृष्टिकोनाचा त्यांच्या विचारांवरती प्रभाव पडला होता. महाराजांच्या शेवटच्या कालखंडामध्ये थिऑसॉफिकल विचारांबद्दल आकर्षण निर्माण झाले होते. १९१५ मध्ये कोल्हापूर येथे डॉ.अनी बेझंट यांच्या अध्यक्षतेखाली थिऑसॉफिकल सोसायटीचे अधिवेशन भरवण्यात आले होते. १९२० साली अड्यार येथील थिऑसॉफीच्या केंद्राला शाहू महाराजांनी भेट दिली होती.

महाराजांच्या शिक्षण विषयक विचारांवरती आर्य समाजाचा प्रभाव पडल्याचे आपणास स्पष्ट दिसते. महाराजांना आर्य समाजाने शिक्षण विषय केलेल्या कार्याचे आकर्षण होते. त्यामुळेच १९०२ मध्ये महाराजांनी शिक्षणविषयक चळवळ रुजवली. त्याचबरोबर पाटील तलाठी या परीक्षांसाठी शाहू महाराजांनी स्वामी दयानंद सरस्वती यांचा मसत्यार्थ प्रकाशफ हा ग्रंथ लागू केला होता. महाराज स्वतःला महृदयाने आर्य समाजवादीफअसे मानत असत.

अस्पृश्यता निवारण, ब्राह्मणेतर चळवळ, स्त्री-मुक्ती या सामाजिक सुधारण्याच्या बाबतीमध्ये शाहू महाराजांची स्पष्ट अशी भूमिका होती. २७ जुलै १९२० रोजी हुबळी या ठिकाणी मकर्नाटक ब्राह्मणेतर सामाजिक परिषदेचेफ अध्यक्ष या नात्याने त्यांनी केलेले भाषण हे त्यांचे सामाजिक सुधारणेविषयीची दृष्टी आपणास स्पष्ट करते. त्या भाषणात ते प्रतिपादित करतात सामाजिक नीतिमत्ता वाढणे हे सामाजिक सुधारण्याचे महत्त्वाचे अंग आहे. वाईट रीतीभाती व धर्म भोळेपणा यांच्या योगाने आमच्या मध्ये मद्यपान, बालविवाह, जुलमाचे वैधव्य, देवास मुली वाहने, असे घातक प्रकार रूढ होऊन त्यापासून शारीरिक, मानसिक व बौद्धिक अवनती झाली आहे. ही अवनती दूर करण्यास आपण उपाययोजना करावी. याबाबतीत शील बनविणे, हेच मुख्य कर्तव्य आहे. शिलवान नागरिकाशिवाय राष्ट्र बनणे अगर उदयास येणे, या गोष्टी शक्यच नाहीत. शारीरिक उन्नतीकडे आपण लक्ष दिले पाहिजे. परंतु केवळ शारीरिक शौर्य, वीर्य कितीही अंगात असले तरी नीतिमत्तेची अवनती झाल्याबरोबर रोम सारखे बलाढ्य राष्ट्र ही रसातळाला गेली हे आपण विसरता कामा नये. या भाषणातून शाहू महाराज सामाजिक नीतिमत्ता आपण उंचावली तरच आपले राष्ट्र उभा राहू शकते हा संदेश देतात. थोडक्यात सामाजिक सुधारणेचा आग्रह धरतात.

शाहू महाराज यांचे शिक्षणविषयक विचार :

१९ एप्रिल १९१९ रोजी तेराव्या अखिल भारतीय कुर्मी क्षत्रिय सामाजिक परिषदेमध्ये अध्यक्ष भाषण करताना शाहू महाराज आपल्या महा विद्येचा समय आहेफ या भाषणांमध्ये असे स्पष्ट करतात की, परमेश्वरा आमच्या देशातील लोकांना सुबुद्धी देऊन त्यांच्या अंतकरणात ज्ञानाचा प्रकाश पाड, आम्ही सर्व माणसे सद्गुनी चिरायू पुत्र होऊन बंधू प्रेमाने राहू. दुसऱ्याचे दुःख ते आपले दुःख व दुसऱ्याचे सुख ते आपले सुख असा आमचा समज होऊ दे. सर्वजण मिळून शारीरिक, आत्मिक व सामाजिक उन्नती करून, संसाराला स्वर्गधाम बनवूया.

या भाषणावरून आपणास असे लक्षात येते की, शाहू महाराजांना शिक्षणाद्वारे सर्वसामान्यांना माणसांच्या जीवनात स्वर्ग साकार करावयाचा होता. या भूमीवर साक्षात स्वर्ग म्हणजे एक

ISSN No. 2394-5990

प्रकारचे आदर्श राज्य, आदर्श समाजव्यवस्था निर्माण करायची होती. न्याय स्वातंत्र्य,समता बंधुतेच्या आधारावर आधारलेला नव समाज निर्माण करण्याचे त्यांचे स्वप्न होते. सामाजिक समतेच्या विचारातून शाहू महाराज आदर्श आपल्यासमोर ठेवतात.

शाहू महाराजांनी पुनर्विवाहस मान्यता, आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाहास मान्यता, पुरोहितशाहीचा धार्मिक विधी बाबतचा एकाधिकार नष्ट करणे. क्षत्रियांना पुरोहित्य करण्यास मान्यता देणे. ब्राह्मण वर्चस्वास धार्मिक मान्यता होती ती नष्ट करण्याचा व त्यासाठी अस्पृश्यते विरुद्धचा लढा जोमाने सुरू केला. सर्वांना शिक्षण मिळावे म्हणून शिक्षण सक्तीचे व मोफत केले. संस्थानातील नोकऱ्यांमधील मक्तेदारीमुळे जातीयता बळकट होते व इतरांना त्यामुळे समान संधी मिळत नाही म्हणून सरकारी नोकरीत शेकडा ५० टक्के जागा मागास जातींसाठी राखीव ठेवल्या. जातीय वारसानुसार प्राप्त होणारी वतने त्यांनी रद्द केली. (संदर्भ- लठ्ठे अ.बा.(२००२),३९४) या त्यांच्या कृतीचा भारतीय राज्यघटनेवरती देखील प्रभाव आपणास जाणवतो भारतीय राज्यघटनेतील कलम १४ ते १८ मध्ये समतेविषयक जे मूलभूत अधिकार स्वीकारण्यात आले आहेत. त्यावरती शाहू महाराजांच्या विचारांचा आपणास प्रभाव जाणवतो.

शिक्षणप्रसार :

सामाजिक समता खऱ्या अर्थाने प्रस्थापित करण्यासाठी शिक्षण प्रसार होणे महत्त्वाचे असते हेच ओळखून शाहू महाराजांनी १९१७ पासून प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले. या योजनेवर त्यांनी त्या कालखंडामध्ये एक लाख रुपये खर्च जाहीर केलेला होता. २१ सप्टेंबर १९१७ रोजी कोल्हापूर संस्थानात सक्तीच्या शिक्षणाचा कायदा खास जाहीरनामा काढून त्यांनी प्रसिद्ध केला. या कायद्यान्वये शिक्षणास योग्य वयाची मुले शाळेत पाठविण्याची आई-वडिलांवर सक्ती करण्यात आली. शाळेत न पाठवणाऱ्या पालकांना एक रुपया दंड महिना भरण्याची तरतूद देखील करण्यात आली. वर्षभरात संस्थानातील खेड्यापाड्या ९६ नव्या शाळा सुरू झाल्या. या योजनेमुळे सुमारे पाऊण लाख खेडूतांच्या टप्प्यात प्राथमिक शिक्षण प्रथमता आले. त्यांच्यापैकी साडेचार हजारांवर मुले शिक्षण घेऊ लागली. परिणामी सण १९१७-१८ मध्ये जेव्हा प्राथमिक शिक्षणाचा कायदा अमलात आला त्यावेळी या योजनेखाली २७ शाळा व १२९६ मुले होती. तथापि त्यानंतरच्या पाच वर्षाच्या कालावधीत सन २०२१-२२ पर्यंत त्यात वाढ होऊन शाळांची संख्या ४२० आणि मुलांचे संख्या २२,००७ इतकी झाली तर, या योजनेवर ती होणारा खर्च हा तीन लाखांपर्यंत गेला. या कार्याची प्रेरणा पुढे जाऊन कर्मवीर भाऊराव पाटील यांनी घेतले व संपूर्ण महाराष्ट्रात शैक्षणिक क्रांती घडवण्याची त्यांनी कार्य केले समतावादी समाज स्थापनेमधील शाहूंची प्रेरणा अद्वितीय मानावी लागेल.

अस्पृश्यांच्या शिक्षणाचे कार्य :

अस्पृश्यांच्या उद्धारासाठी शिक्षणाशिवाय पर्याय नाही हे ओळखून राजर्षी शाहू महाराजांनी शिक्षण विषयक जागृती निर्माण करण्यासाठी शाळांची व विद्यार्थ्यांची संख्या वाढवली. महाराजांनी त्यांच्या कालखंडामध्ये अस्पृश्यांचे शिक्षणासाठी काही खास आदेश काढले २४ नोव्हेंबर १९११ रोजी महाराजांनी अत्यंत महत्त्वाचा आदेश काढला तो म्हणजे संस्थानातील सर्व अस्पृश्य वर्गास सर्व प्रकारचे शिक्षण मोफत करण्यात आले. याशिवाय हुशार अस्पृश्य विद्यार्थ्यांना दरबारा कडून वेळोवेळी विशेष शिष्यवृत्ती देण्याचे धोरण स्वीकारण्यात आले. ७ एप्रिल १९१९ आदेशानव्या अस्पृश्यातील दैन्यावस्था लक्षात घेऊन त्यांच्या शिक्षणास उत्तेजन देण्यासाठी त्यांना पाट्या, पेन्सिल, पुस्तके मोफत देण्यासाठी अडीच हजार रुपये मंजूर केले. (संदर्भ- पवार ज. (२००७) राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ कोल्हापूर महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी)

स्त्री शिक्षणासाठी तरतुदी :

राजर्षी शाहू महाराज यांनी कोल्हापूर संस्थानांमध्ये स्त्रियांच्या शिक्षणासाठी स्वतंत्र व्यवस्था निर्माण केली. त्या व्यवस्थेची जबाबदारी रखमाबाई केळवकर यांच्याकडे देण्यात आली. १९१९ मध्ये प्रौढ व मागासवर्गातील स्त्रियांसाठी गॅझेट मध्ये आदेश काढण्यात आला या आदेशानुसार शिक्षण घेण्यासाठी ज्या स्त्रिया इच्छुक आहेत त्यांच्या राहण्याची जेवणाची व्यवस्था संस्थानाकडून करण्यात आली. हुशार मुलींना उच्च शिक्षणाची तरतूद शाहू महाराजांनी केली. राजाराम कॉलेजमध्ये शिकणाऱ्या सर्व मुलींना त्यांनी मोफत शिक्षण दिले. रखमाबाई यांच्या मुलीला मुंबईला वैद्यकीय शिक्षणासाठी शाहू महाराजांनी पाठवले व पुढे उच्च वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी इंग्लंडला पाठवले. उच्च विद्याविभूषित होऊन पुन्हा संस्थानाच्या सेवेत कृष्णाबाई रुजू झाल्या. स्त्री शिक्षणाच्या संदर्भात शाहू महाराजांचा हा वेगळा दृष्टिकोन सद्यकालीन परिस्थितीमध्ये देखील उपयुक्त ठरतो.

वस्तीगृहाद्वारे शिक्षणाच्या सुविधांची उपलब्धता :

राजर्षी शाहू महाराज यांनी खेड्यापाड्यातील मुलांच्या शिक्षणाची सोय केली त्याचबरोबर त्यांच्या राहण्याची सोय वस्तीगृहाच्या माध्यमातून केली. १८ एप्रिल १९०१ रोजी व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग ची स्थापना केली. त्यानंतर जैन

बोर्डिंग ची स्थापना करण्यात आली. १९०८ पर्यंत लिंगायत, मुस्लिम, अस्पृश्य, सोनार, शिंपी, पांचाळ, गौंड, सारस्वत, इंडियन ख्रिश्चन, कायस्थप्रभू, नाभिक, वैश्य, ढोर, चांभार, सुतार, सोमवंशीय क्षत्रिय, कोष्टी अशा विविध जाती धर्मांसाठी २३ वस्तीगृहाची निर्मिती करण्यात आली.

अर्थात शाहू महाराजांचा विविध जाती धर्मासाठी वेगवेगळी वस्तीगृह स्थापन करून जातिव्यवस्थेला उत्तेजन देणे हा हेतू नव्हता. तत्कालीन कालखंडामध्ये जातीव्यवस्थेचे भयान वास्तव लक्षात घेता सर्व जाती धर्मातील लोकांना शिक्षणाची संधी मिळाली पाहिजे. कोणामुळे तर कोणाची संधी न हिरावता घेता प्रत्येकाला संधीची समानता प्राप्त झाली पाहिजे. हा त्यांचा विविध जाती, धर्मची वस्तीगृह निर्माण करण्या पाठीमागचा हेतू होता.

जातिभेद निर्मूलनाचे कार्य :

शाहू महाराज यांनी सामाजिक समता प्रस्थापित करण्याच्या दृष्टिकोनातून संस्थानात शाळा धर्मशाळा सरकारी कार्यालय दवाखाने इत्यादी सार्वजनिक ठिकाणी जातीभेद अस्पृश्यता यांना प्रतिबंध करणारा जाहीरनामा प्रसिद्ध केला त्याचबरोबर आंतरजातीय रोटी व्यवहार व भेटी व्यवहाराला प्रोत्साहन दिले संस्थानात १२ जुलै १९१९ रोजी आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाहस मान्यता देणारा कायदा त्यांनी लागू केला हा कायदा त्यांनी केवळ कागदावर तीच अमलात मानता २५ आंतरजातीय विवाह घडवून देखील आणले. शाहू महाराजांच्या भगिनी चंद्रप्रभाबाई यांचा इंदूरचे राजे यशवंतराव होळकर यांच्याशी झालेला आंतरजातीय विवाह हा त्यापैकीच एक होता जाती आधारित व्यवसाय बंदीच्या निबंधातून ग्रामीण भागातील बलुतेदारांना मुक्त करण्यासाठी २२ फेब्रुवारी १९१८ रोजी आदेश काढून महाराजांनी बलुतेदारी देखील बंद केली.

सामाजिक दर्जा :

अस्पृश्य समजले गेलेल्या समाजाला त्यांचा सामाजिक दर्जा उंचावण्याच्या दृष्टिकोनातून शाहू महाराजांनी महार पैलवानांना मजाठफ म्हणून तर चांभार पैलवानांना मसरदारफ म्हणून आखाड्यात बोलवण्याची पद्धत सुरू केली. याशिवाय तत्कालीन गुन्हेगारी समजल्या जाणाऱ्या जमातींना हजेरी लावण्याची पद्धत जी होती ती देखील शाहू महाराजांनी २ ऑगस्ट १९१८ रोजी एका आदेशाद्वारे बंद केली. अस्पृश्यांना प्राधान्याने आपल्या संस्थानांमध्ये नोकऱ्यांमध्ये त्यांना महसूल, न्याय, पोलीस, इ. महत्त्वाच्या खात्यांमध्ये तर नोकरी दिल्याच त्याच्याबरोबर त्यांना व्यवसायासाठी प्रोत्साहन देखील दिले. व्यवसायात सामाजिक प्रतिष्ठेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी शाहू महाराज गंगाराम कांबळे यांच्या सत्यशोधक हॉटेलमध्ये स्वतः दरबारातील लोकांसह चहा पिण्यासाठी जात असत. हा सामाजिक समतेचा कृतीशील संदेश शाहू महाराजांनी स्वतःच्या वर्तनामधून दिलेला आपणास दिसून येतो.

निष्कर्षात्मक नोंदी :

१) राजश्री शाहू महाराज यांनी सामाजिक सुधारणेविषयी घेतलेली भूमिका व प्रत्यक्षात केलेली कृती यामुळे महाराष्ट्राचे समाजशास्त्रीय स्वरूप बदलण्यास मदत झाली. स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये ब्राह्मणेतर चळवळ चे पडसाद प्रामुख्याने महाराष्ट्राच्या राजकारणावरती आजपर्यंत पडताना आपणास दिसतात. यामधूनच प्रेरणा घेऊन कामगार, शेतकरी, अस्पृश्य स्त्रियांचे प्रश्न हे समाजशास्त्रीय अभ्यासापुरते न राहता राजकारणामध्ये देखील हे घटक प्रभावी ठरवू लागले आहेत. एका अर्थाने सामाजिक लोकशाहीचा पाया विस्तारण्याचे श्रेय राजश्री शाहू महाराज यांच्याकडे जाते.

२) शाहू महाराजांनी आपल्या कार्याद्वारे तत्कालीन कालखंडामधील असलेले धर्म सत्तेचा प्रभाव कमी करण्याचा प्रयत्न केला. तसेच बहुजन समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी सामाजिक चळवळी उभ्या केल्या. ब्राह्मणेतर चळवळ महात्मा फुलेंच्या मृत्यूनंतर जी मोडकळीस आली होती तिचे कार्य जिवंत व व्यापक करण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली. आपल्या अधिकारांबाबत लोकांच्या मध्ये जागृती निर्माण केली. नवे पुरोगामी अशा स्वरूपाचे सामाजिक कायदे करून स्त्रिया व मागासजातींना न्याय दिला.

३) सामाजिक चळवळीचे पाठीराखे– ४ सप्टेंबर २०२१ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शाहू महाराजांना पाठविलेल्या पत्रामध्ये शाहू महाराजांचा उल्लेख मसामाजिक लोकशाहीच्या महान चळवळीचे एक आधारस्तंभफ असा उल्लेख करतात.(संदर्भ – किर धनंजय, (१९६९) राजश्री शाहू छत्रपती एक समाज क्रांतिकारक राजा, मुंबई. पृष्ठ क्र. ५०६)

४) राजर्षी शाहू महाराज यांनी समतेच्या प्रस्थापनेसाठी केलेल्या शैक्षणिक कार्याचा परिणाम म्हणजे त्यातून अनेक महापुरुषांनी प्रेरणा घेतली. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शाहू महाराजांना आपले आदर्श मानून महाराष्ट्राचे शैक्षणिक क्षेत्रामध्ये क्रांती घडवून आणली परिणामतः महाराष्ट्र आज भारतातील पुढारलेले राज्य म्हणून आपणास पुढे आलेले दिसते.

ISSN No. 2394-5990

५) शाहू महाराजांच्या नोकऱ्यांमध्ये आरक्षण ठेवण्याच्या निर्णयाचा, तसेच समतेच्या दृष्टिकोनाचा परिणाम भारतीय राज्यघटनेतील कलम १४ ते १८ मध्ये स्पष्टपणे आपणास जाणवतो.

संदर्भ ग्रंथ :

१) Chousalkar Ashok (2006) Conflict between temporal Power and Spiritual authority in Maharashtra state. pp 77-86, journal of Shivaji University Dr. Appasaheb Pawar commemoration Vallum val.41, No.1 2006.

२) लठ्ठे अ.बा. (२००२) श्री. मच्छत्रपती शाहू महाराज यांचे चरित्र, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर.

३) राजवाडे वि.का. २०१२, निवडक लेख, समन्वयक प्रकाशन, कोल्हापूर.

४) संगवे विलास (संपादक), (२०१२) राजर्षी शाहू छत्रपती पेपर्स, खंड खखख, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

५) कीर धनंजय,१९७९, राजर्षी शाहू छत्रपती- एक सामाजिक क्रांतिकारक राजा, मुंबई

६) पवार जयसिंगराव, (संपादित) (२००१) राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, कोल्हापूर. महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी.

■■■

मानवतावादी व्यक्तिमत्व - राजश्री शाहू महाराज

प्रा. डॉ. आनंदा एम. काळबांडे
सहयोगी प्राध्यापक,
इतिहास विभाग प्रमुख,
सार्वजनिक कला व वाणिज्य महाविद्यालय
विसरवाडी ता. नवापूर जि. नंदूरबार

गोषवारा :

आधुनिक भारतात मानवतावादी विचारांची बिजारोपण करणाऱ्या थोर समाजसुधारकांच्या मालिकेत राजर्षी शाहू महाराजांची गणना होते. राजा कसा असावा याचा अर्थ शाहू महाराजांनी घालून दिला. सनातन अनिष्ट रूढी परंपरा विरूध्द लढणारा, शेतकऱ्यांचा हितकर्ता, सामान्यजनांचा राजा मानवतावादी दृष्टिकोणातून प्रजेची सुख-दु:ख समजावून घेवून राज्यकारभार करतांना समता प्रस्थापित करण्यासाठी जीवनभर अविश्रांती, परिश्रम करणारा असा राजा छत्रपती शाहू दिपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक ठरतात, शाहू महाराजांचे समाजनिरीक्षण जबरदस्त होते, समाजातील दुबळया वर्गाला न्यायाने व समतेने वागविले पाहिजे ही त्यांची भूमिका होती. या भूमिकेतूनच समाजघटकाला क्रूरतेने वागविणाऱ्या प्रथेला कायद्याची बंधने घातलीत. बहुजन व मागासवर्गीय समाज शिकून शहाणा झाल्याशिवाय त्यांचे दु:ख, दारिद्रय, अज्ञान, अंधश्रध्दा नष्ट होणार नाही. याची जाणीव शाहूंना होती. मागासलेल्या जातीकडून शिक्षणाची फारशी आस्था किंवा जनजागृती नसल्यामुळे राज्यात मोफत व सक्तीचे शिक्षण शाहू महाराजांनी सुरू केले. तत्कालीन भारतीय समाजात / प्रशासनात उच्च पदस्थावर फक्त उच्च वर्णीयच होते. त्यांचीच ती मक्तेदारी बनली होती. राज्यातील मागासलेल्या प्रजाजनाच्या अभ्युदयासाठी एक अभूतपूर्व जाहिरनामा प्रसिध्द करून मागासवर्गीयांसाठी शासकीय नोकरीत राखीव जागेची तरतूद (कायदा) केली. त्यातून पारपंरिक मक्तेदारी नष्ट केली. गुन्हेगार म्हणून शिक्का मारलेल्या जातीला सन्मानाने जगण्याच्या मार्गाची कायद्याने सुविधा दिली. वर्णवर्चस्ववादी धोरणाची पायमल्ली केली. न्यायसंस्था व कायद्यातील तरतूदीनुसार सामाजिक न्याय प्रस्थापितांचे कार्य केले. त्यामुळे वर्षानुवर्ष अन्यायाखाली पिचलेल्या घटकांना सामाजिक, शैक्षणिक, राजकीय जीवनदान देवून माणूस म्हणून जगण्याचा अधिकार प्राप्त करून दिला. शाहूंचे चरित्रकार धनंजय किर म्हणूनच त्यांना 'नवीन युगाच्या आगमनाची घोषणा करणारा अग्रदुत' असे म्हणतात. शांतता आणि युध्दकाळ यामध्ये शासनाचा हेतू राज्य करणे त्यांचे किंवा प्रजातीचे वैभव नसून सामान्य माणसाचे सुख असते हे त्यांनी दाखवून दिले. विविध कला, व्यापार, उद्योगाची मुहूर्तमेढ रोवून प्रगतीपथावर नव्याने कार्य केले. त्यांनी सामाजिक अभिसरणासाठी तसेच परिवर्तनासाठी क्षाप्रजगतगुरू पद निर्माण केले. त्यांनी सर्व समाजासाठी पुरोहित शाळा, वेदोक्तांचे अधिकार तसेच क्षाप्रजगतगुरू पदाची स्थापना केली. त्यांचे मन उत्क्रमणशील होते. शाहु महाराज नुसते मराठा किंवा ब्राह्मणेत्तरही नव्हते तर नवयुगातला स्वयंपूर्ण राष्ट्रपुरूष होते. त्यांच्या विचारांची चौकट मानवता आणि सामाजिक लोकशाही स्पष्ट करते. शाहु महाराज नवयुगातील स्वयंपूर्ण राष्ट्रपुरूष होते.

शोधनिबंधाचे उद्दिष्टे :

१) छ. शाहुंच्या मानवतावादी विचार व तथ्यांचा अभ्यास करणे.
२) सामाजिक न्याय व समतेसाठी राजर्षी शाहूंच्या आरक्षण भूमिकेचा वेध घेणे.
३) स्त्री-शेतकरी घटकांच्या उत्थानाच्या कार्याचा आढावा घेणे.
४) प्रस्थापित व्यवस्थेच्या परिवर्तन कार्याचा आदर्श घेणे.
५) शैक्षणिक कार्यातून आदर्श घेणे.
६) कला, उद्योग, व्यापार, व्यवसाय कार्याचा आढावा घेणे.

संशोधन पध्दती :

सदर शोधनिबंध हा वर्णनात्मक पध्दतीने पूर्ण केलेला आहे. सदर शोधनिबंधात द्वितीय सामुग्रीचा वापर करण्यात आला असून वस्तूनिष्ठ पध्दतीने मांडणी केली आहे.

जीवन परिचय :

शाहू महाराज म्हणजे यशवंतराव जयसिंगराव घाटगे. मुळचे कोल्हापूरातील कागल ठिकाणचे होते. त्यांचा जन्म २६ जुलै १८७४ ला घाटगे घराण्यात झाला. वडिल जयसिंगराव

ISSN No. 2394-5990

आबासाहेब घाटगे तर आईचे नाव राधाबाई असे होते. कोल्हापूरचे राजे चौथे शिवाजी निपूत्रीक मरण पावल्यानंतर त्यांची पत्नी महाराणी आनंदीबाईने १७ मार्च १८८४ रोजी यशवंतराव यांना दत्तक घेतले. तेव्हापासून शाहू छत्रपती नावाने ते ओळखले जावू लागले.[१] राजकोट येथील राजाराम कॉलेजमधून शिक्षण घेतले. प्राचार्य मॅकनॉटन, एस. एम. फ्रेअरच्या नेतृत्वाखाली त्यांचे शिक्षण पूर्ण झाले. या काळात त्यांनी इंग्रजी भाषा, राज्यकारभार, जगाचा इतिहास सारख्या विषयाचे सखोल अध्ययन केले. १ एप्रिल १८९१ रोजी शाहूंचा विवाह बडोद्याचे गुणाजी खानविलकरांची कन्या लक्ष्मीबाईसोबत झाला. वयाच्या विसाव्या वर्षी म्हणजेच २ एप्रिल १८९४ ला कोल्हापूर संस्थानाचे अधिकार सूत्रे त्यांनी स्विकृत केली. भविष्यात अनेक योजनांच्या माध्यमातून राज्याचा विकास साधला. एकूण २८ वर्षाचा राज्यकारभार करत वयाच्या ४८ व्या वर्षी ६ मे १९२२ रोजी मुंबई येथे शाहू महाराजांचे निधन झाले.

स्त्री सुधार कार्य :

स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीने शिक्षण घेण्याची संधी दिली जावी, असे मत शाहू महाराजांचे होते. कोल्हापूर संस्थानात स्त्री शिक्षणासाठी एक खास अधिकारीपद निर्माण करण्यात आले होते. त्या पदावर कोल्हापूर फेमिल ट्रेनिंग स्कूल मध्ये काम करणाऱ्या सौ. रखामाबाई केळबकार या अतिशय बुध्दिमान व कर्तव्यदक्ष स्त्रीची शाहूने १ सप्टेंबर १८९५ पासून नियुक्ती केली होती.[२] गारगोटीतील लोकांना मुलींची शाळा उघडण्यास मंजूरी तसेच भुदरगड हिंग्लज या डोंगरी भागात मुलींची शाळा सुरू करण्याचा आदेश अधिकाऱ्यांना दिला होता. स्त्री शिक्षणाचा प्रसार स्त्री शिक्षिका असतील तर अधिक वेगाने होईल. यासाठी १८९८ मध्ये स्त्रियांसाठी अध्यापक विद्यालयाची स्थापना केली. तसेच अनेक ठिकाणी मुलींसाठी शाळा, संस्था उभारल्यात. त्यामध्ये अहिल्याबाई गर्ल्स हायस्कुल आणि लक्ष्मीबाई कन्या विद्यालय स्थापन केलेत. मुलीच्या शैक्षणिक प्रोत्साहनासाठी अनेक प्रकारच्या शिष्यवृत्या व बक्षिसे देणे सुरू केले. महिला संदर्भात अनेक सामाजिक सुधारणा तसेच सुरक्षिततेच्या दृष्टीने कायदे तयार केलेत. शाहू महाराजांनी बालविवाहाच्या विरोधात महत्वपूर्ण भूमिका घेतली. त्यांनी स्वत:ची मुलगी राधाबाई उर्फ अक्कासाहेब यांच्या विवाहाच्यावेळी कायदा करून घेतला. त्यामध्ये वधूचे वय १४ तर वराचे वय १८ असावे असे कायद्याने बंधन घातले. ऐवढेच नव्हे तर तर विधवा विवाह तसेच परित्यक्ता महिलांसाठी पुनर्विवाहाची संधी उपलब्ध करून दिली याबरोबरच आंतरजातीय विवाहाचा कायदा आणि घटस्फोट कायदा ११ जुलै १९१९ व वारसा संबंधी कायदे तयार केलेत. करविर सरकारच्या गॅझेटमध्ये १७ जानेवारी १९२० रोजी हिंदू वारसा कायदा दुरूस्ती केली. त्यामुळे सर्व जातीच्या मुलींना बापाच्या ईस्टेटीत वारसा हक्क मिळाला, स्त्रियांचे जीवन नरकमय बनविणारी देवदासी प्रथा बंदीचा कायदा काढला, देवदासी, मुरळी, जोगतिन यांना ज्या पुरूषांपासून संततीजन्यास आली त्या पुरूषांच्या संपत्तीत त्या अनौरसमुलांना हक्क मिळवून दिला. कुटुंबात होणाऱ्या छळाला प्रतिबंध बसावा म्हणून शाहूंनी २ आगस्ट १९१९ रोजी स्त्री छळ विरोधी कायदा काढला, तत्कालीन सामाजिक परिस्थितीत सर्वाधिक शोषण होणाऱ्या स्त्री वर्गास कायद्याचे कवच देऊन त्यांच्या विकासासाठी अनुकूल वातावरण तयार केले. कोल्हापूर संस्थानात १८९४ मध्ये मुलींच्या शाळांची संख्या २५ होती तर १९२२ पर्यंत ३३ झाली होती. १८९४ मध्ये शिक्षणावरील एकूण खर्च एक लाख तर १९२२ मध्ये तीन लाखापेक्षा जास्त वर्षाला होत होता.[३]

भटक्या विमुक्त जमाती सुधार कार्य :

अस्पृश्यापेक्षाही अधिक उपेक्षित असलेला घटक म्हणजे भटक्या विमुक्त जमातींचा समाज होय. या जमातींना स्वत:चे गाव नव्हते. सतत भटकंती करत राहणाऱ्या जमातींचे कायदे कानून तसेच न्यायनिवाडा व पंचायती स्वतंत्र होत्या. पोटाकरिता काहीना काही व्यवसाय त्या करीत होत्या. या जमातीतील लोक मुळात चोर व दरोडेखोर नव्हते. पुढे इंग्रज सत्ता प्रस्थापित झाल्यानंतर सामाजिक व राजकीय परिवर्तनामुळे उदरनिर्वाहाची साधने नाहीसे होऊन त्यांचे जीवन धोक्यात आले. तेव्हा त्यांच्यापैकी अनेकांनी अवैध मार्ग धरला. त्या जमातीतील लोक मोठ्या प्रमाणात चोऱ्या, दरोडे व लुटालुट अशा कृत्यात सापडू लागले. त्यामुळे इंग्रजांनी संबंधी जातीसच गुन्हेगार जात म्हणून घोषित केले. इंग्रजांनी इ. स. १८७१ ला खास गुन्हेगार जमाती कायदा करून दिवसातून तीन वेळा त्यांनी हजेरी देण्याची सक्ती केली होती. छत्रपती शाहु महाराजांनी गुन्हेगार जाती जमाती हजेरी बंद करून ३१ ऑगस्ट १९१५ मानवतावादी धोरण स्विकारले होते. माणसे जन्मजात गुन्हेगार नसतात हा विचार शाहुंचा होता. त्यांना प्रेमाने वागवून त्यांचे परिवर्तन करावे हा शाहुंचा निश्चय होता. कष्टाची व अंगमेहनतीची कामे करणाऱ्या वडु व राजपूत भामट्या लोकांना शाहू महाराजांनी जागा देवून स्थिर केले. डोंबाऱ्यांनाही जागा देवून त्यांचीही एक वस्ती बनविली. तसेच कलाकुसरीच्या वस्तू बनविण्यास त्यांना प्रोत्साहन दिले. शिकारीत तरबेज असणाऱ्या कुंचीकोरवींना

शिकारखान्यात नोकरीस ठेवले. या जमातीतील रामूला कुस्तीचे प्रशिक्षण तसेच खुराक देवून नामवंत पैलवान बनविले अशा पध्दतीने कुचीकोरवी जमातीस सामाजिक प्रतिष्ठा शाहू महाराजांनी मिळवून दिली.[४]

सर्वात खतरनाक गुन्हेगार म्हणून पारधी जमातीस शिक्का बसला होता. पारधींच्या पुढाऱ्यांनाच आपल्या निवासस्थानाच्या संरक्षणाची जबाबदारी शाहुने दिली. त्यामधील नेमबाजीत तरबेज असणाऱ्या आख्या व लाल्या यांची सोनतळी कॅम्पच्या पहाऱ्यावर नेमणूक केली. त्यांच्यातील प्रामाणिकता राजनिष्ठा जगासमोर आणली. काही फासेपारधींना रस्ते बांधणी, विहीर खोदणे, घरेण बांधणे तसेच राधानगरी धरणाच्या कामावर ठेवून संस्थानात त्यांच्याकरिता रोजगाराची विविध कामे सुरू केली.[५] फासेपारधी व इतर जमातीच्या शाळेत जाणाऱ्या मुलांना आर्य समाजाच्या गुरूकुलात शिक्षणासाठी पाठविले. फासेपारधीची कायमची भटकंती थांबविण्यासाठी घरे बांधण्यासाठी आर्थिक मदत केली. अलगवाडी, खणदाळ व कंकणवाडी येथील तीन तांड्यातील फासेपारध्यांना १९१७ च्या आदेशानुसार शेकडो एकर जमिनी जातईनाम म्हणून दिल्यात. असे माता-पित्याचे प्रेम देणाऱ्या शाहू महाराजास पारधी जमात देव मानू लागली होती. यातून महाराजांचे समाजक्रांतीचे मूर्त स्वरूप पहावयास मिळते.

विविध कला व कलाकारांना आश्रय :

छत्रपती शाहू महाराज करवीर संस्थान कोल्हापूरचे राजे असले तरी त्यांनी जनसामान्यात सर्व कलेच्या क्षेत्रातील कलाकारांना राजाश्रय देऊन व जनसामान्यात स्वत: सहभाग घेऊन मल्लविद्या, नाट्यसंगीत, पोवाडे, शाहिरी व चित्रकला इत्यादी क्षेत्रात सामान्य कलाकारांना प्रोत्साहित केले. खुद्द शाहू महाराज एक पट्टीचे मल्ल होते. राजकोट व धारवाडला त्यांना मल्लविद्येचे संस्कार झाले होते. जुन्या राजवाड्याच्या परिसरात 'मोतीबाग' तालमीची स्थापना केली. या तालमीत दत्तोबा शिंदे, पांडोबा भोसले व बालेखान पठाण यांना अनेक मल्लांना प्रशिक्षण दिले. जुन्या तालमींना अनुदान दिले. गुणवंत मल्लांना तालमीत मेहनत तसेच खुराकासह चोख व्यवस्था केली गेली. महाराजांच्या प्रेरणेतून आठवड्यातून दोन वेळा जुना राजवाडा, नवा राजवाडा, धौपाळयाचा माळा ठिकाणी कुस्त्यांची मैदाने भरविली. मल्लविद्येच्या 'उच्चशिक्षणासाठी' कोल्हापूरात बाहेरून मुले तसेच मल्ल आलेत. १९०२ ला युरोपच्या दौराप्रसंगी रोम येथील प्राचीन आखाडा बघून महाराज प्रभावित झाले होते. त्यानुसार कोल्हापूरात आखाडे तयार केलेत.[६] त्या पध्दतीवर आधारित ङ्कशाहू खासबाग मैदानफ नावाचा प्रसिध्द आखाडा निर्माण केला. उत्तरेतील मल्लाची मक्तेदारी मोडील काढले. मल्लांना आश्रय देतांना महाराजांनी जातपात पाहिले नाही, विविध जाती-धर्मातील एकाहून एक सरस नामांकित मल्ल उदयास आले. महार मल्लांना 'जाठ पैलवान' तर भंगी मल्लांना 'पंडित पैलवान' अशी नावे दिली. महाराजांचे मल्लावर पुत्रवत प्रेम होते. मल्लविद्येच्या विकासासाठी दहा कलमी कार्यक्रम जाहीर केला होता.

महाराजांनी कोल्हापूरच्या आसमंतात पूर्व बाजूस प्राण्यांसाठी 'संरक्षित वने' तयार केली होती. पश्चिमेकडील सह्याद्रीच्या घाटात अनेक जंगले 'अभयारण्ये' म्हणून राखून ठेवली होती. नाट्यकलेला राजाश्रय दिल्यामुळे कोल्हापूर संस्थानाबरोबर महाराष्ट्रात सांस्कृतिक जीवन समृध्द झाले. संगीत क्षेत्रात कोल्हापूरला अखिल भारतीय किर्ती मिळवून देणारा महान कलावंत म्हणजे गानमहर्षी अल्लादिया खाँ यांना महाराजांनी आपल्या दरबारात गायक म्हणून जयपूरवरून सन्मानाने आणले. त्यांच्याकडून अनेकांना संगीतकलेत भारतीय किर्तीचे शिष्य उदयास येवून भारतीय संगीत समृध्द झाले. त्यातील केसरबाई केरकरचा गौरव गुरूदेव रवींद्रनाथ टागोर यांनी त्यांच्या विश्वभारतीतर्फे 'सूरश्री' हा किताब देवून केला. महाराजांनी अनेक गवई व गायिकांना राजाश्रय दिला. भारतात 'गानचंद्रिका' म्हणून प्रसिध्दी पावलेली दुसरी थोर गायिका म्हणजे लक्ष्मीबाई जाधव हैदरखाँ यांच्या शिष्या होत्या. या सर्वांना शाहू महाराजांनी दिलेल्या प्रेरणेने शास्त्रीय संगीतात थोर कामगिरी बजावून आणि कोल्हापूरचे नाव अमर केले.

महाराष्ट्र रंगभूमीवर चमकणारे बालगंधर्व, नारायण राजहंस यांचे रूपांतर बालगंधर्व या नावाने करण्यात छत्रपती शाहू महाराजांचे फार मोठे प्रेम दिसून येते. त्यांनी डोंगरे संगीत नाट्य कंपनी, किर्लोस्कर नाट्य कंपनी, शाहू नगरवासी नाटक कंपनी, महालक्ष्मी प्रासादिक नाटक कंपनी, शेषासनी स्त्री संगीत नाटक कंपनी, स्वदेश हितचिंतक नाटक कंपनी, कोल्हापूर संगीत नाटक कंपनी, शिवराज नाटक कंपनी, यशवंत संगीत मंडळी इत्यादी नाटक मंडळींना राजाश्रय देऊन त्यांच्या कलागुणास वाव दिला. बालगंधर्व तसेच संगीतसुर्य केशव भोसले यांना उदार अंतकरणाने आर्थिक मदत देऊन त्यांना कलाक्षेत्रात पुढे आणले. शाहू महाराजांनी कोल्हापूर पॅलेज थिएटरची निर्मिती केली. तसेच १८९८ मध्ये त्यांनी 'शिवाजी थिएटर' बांधले. बाबुराव पेंटर यांनी स्वत:च तयार केलेला कॅमेरावर व प्रिंटींगमशिनवर 'सैरंध्री' चे चित्रण केले बाबुरावांना या चित्रपटाबद्दल लोकमान्य टिळकांनी 'सुवर्णपदक' आणि 'सिनेमाकेसरी' ही पदवी देऊन गौरव केला. बाबूरावचा शाहू महाराजांनी खास सत्कार केला.[७]

शाहू महाराजांनी आबालाल रहिमान या असामान्य प्रतिभेच्या कलावंतास सन्मानाने बोलावून त्यांचा गौरव करून 'दरबार

ISSN No. 2394-5990

चित्रकार' म्हणून पगार सुरू केला. त्यांनी पक्षी-पशू, निसर्ग, विदेशी पाहुणे व राजघराण्यातील स्त्री-पुरूषांची चित्रे काढलीत, त्यांच्या कलागुणांचे कौतूक करतांना कला समीक्षक बाबुराव सडवेलकर यांनी त्यांची तुलना लिओनार्डो द व्हिन्सी तसेच रफेल या जगप्रसिध्द चित्रकारांशी केलेली आहे. अशा प्रकारच्या विविध कलेला शाहू महाराजांनी राजाश्रय दिल्यामुळे कोल्हापूर हे अनेक कलांचे माहेरघर बनले होते.

लोकोपयोगी कार्यातील योगदान :

समृध्द व बलवान समाजासाठी बहुजन समाजातून उत्तम शेतकरी, व्यापारी, उद्योजक तसेच उत्तम सैनिक निर्माण करण्यासाठी शाहू महाराजांनी शहर ते खेडोपाड्यापर्यंत विविध योजना, सुधारणा तसेच शिक्षणाची गंगा पोहचविली. आपत्ती व्यवस्थापन, शेत सुधारणा, बाजारपेठ नियोजनाचेही उत्तम व्यवस्थापनाने अमूलाग्र बदल केले. बहुजन समाजासाठी शिक्षण महत्त्वाची शिदोरी आहे. सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची नियमावली तयार करून घेतली. २१ सप्टेंबर १९१७ रोजी राज्यात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत देण्याचा आदेश काढून त्याची अंमलबजावणी सुरू केली. या योजनेची पहिली शाळा चिखली येथे महाराजांच्या हस्ते सुरू केली. त्यासाठी शाळेत पगारी शिक्षकांची नियुक्ती केली. त्यासाठी खर्चाचे बजेट मंजूर केला. महत्त्वपूर्ण म्हणजे देवस्थानातील खर्चाव्यतीरिक्त उरलेली रक्कम अशा शिक्षणावर खर्च करण्याची अंमलबजावणी केली. बहुजन समाजाला शिक्षण प्रवाहात आणून समाजाचे अनेक विद्वान शिल्पकार बनविलेत. संस्थानात औद्योगिक शाळा, शेती शाळा, पाटील शाळा, शिक्षक प्रशिक्षण केंद्रे, धार्मिक शाळा, संरक्षण प्रशिक्षण शाळा, युवराज शाळा इत्यादी शाळा चालविल्या होत्या.

दुष्काळ, प्लेग, संकटकाळात कोल्हापूर संस्थानात शाहू महाराजांनी उत्कृष्ट उपाययोजना केली होती. कोल्हापूर संस्थानात सन १८९६ ते १९१८ या कालखंडात एकूण पाच दुष्काळ पडलेत.[८] त्यासह काही भागात प्लेगचे थैमान सुरू झाले होते. अशा प्रदेशाची प्रत्यक्ष पाहणी केली. रस्ते, पाणी, खेड्याची दुरावस्था, शेतीची दुरावस्था, रयतेचे दु:ख, धान्याच्या किंमती, बेरोजगारी इत्यादी बद्दल परिपूर्ण माहिती घेऊन जनतेचे मनोधैर्य वाढविले. तसेच विविध उपाययोजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी सुरू केली. महाराजांनी विविध आज्ञापत्रे, जाहिरनामे काढलेत तसेच या काळात यात्राबंदी केली. १८९९-१९०० या वर्षी महाराजांनी ङ्गदुष्काळ विभागफ सुरू केला होता. वैद्यकीय तपासणीसाठीचे विभाग, विहीरीचे खोदकाम, पिण्याच्या पाणी सुविधा, गरीबांना रोजगार, रस्ते, पूल बांधकाम केले. अंधश्रध्दा निवारण करून रोग प्रतिबंधक लस जागृती केली. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना तगाई कर्ज देण्याची सुविधा महाराजांनी दिली. अन्नधान्य आयात व स्वस्त धान्याची दुकाने सुरू केलीत. अशा प्रकारे महाराजांनी विविध उपाययोजना केल्यात.

महाराज अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत व सर्व समाजाचे कल्याण, स्त्री, कामगार, शेतकरी, शेतमजूर यांचा उध्दार करण्यासाठी झटत होते. महाराजांनी 'पाटबंधारे खाते' निर्माण करून त्यावर 'ईरिगेशन ऑफिसर' ची नेमणूक केली. त्याद्वारे विहिरी, तलाव, बंधारे योजना तातडीने अंमलात आणल्यात. 'राधानगरी' धरणाने जमीन, पिके व माणसांची तहान भागविली. संस्थानात सुधारीत शेती पध्दतीच्या प्रसारासाठी १९१२ साली कोल्हापूरात 'किंग एडवर्ड ग्रीकल्चर इन्स्टिट्यूट' ही संस्था स्थापन केली. तसेच आधुनिक शेती अवजारांचे एक म्यूझिअम ही सुरू केले. संस्थानात 'शेतकी प्रदर्शने', विज्ञान प्रदर्शन भरविलीत. शेतकऱ्यांना सुधारीत अवजारे, बी-बियाणे, रासायनिक खते आणि आधुनिक मशागतीच्या पध्दती यांचे ज्ञान व प्रशिक्षण देण्यासाठी खास शेती अधिकाऱ्यांच्या नेमणूका केल्या. संस्थानात शेतीच्या कायापालटाकरिता पश्चिम भागात सह्याद्रीच्या रांगात उतार जमिनीवर त्यांनी चहा, कॉफी, रबर यांचे मळे तयार केले. तसेच वेलदोडे, कोको व रेशीम तयार करण्याचा प्रयोग त्यांनी केला होता.[९] 'पन्हाळ टी. नं. ४' या नावाने कोल्हापूर संस्थानातील चहाचे उत्पादन प्रसिध्द झाले. शेतकऱ्यांनी सावकाराकडे गहाण टाकलेल्या जमिनी सोडविण्यासाठी शाहू महाराजांनी कर्ज उपलब्ध करून दिली होती.

शेतकऱ्यांनी केवळ शेतीवरच अवलंबून न राहता व्यापार उद्योग क्षेत्रातही प्रवेश केला पाहिजे त्याचे महत्व वेळोवेळी पटवून दिले. व्यापारधंदे व इतर उच्चप्रतीचे व्यवसाय यात आम्हास शिरण्याची जरूरी आहे. महाराजांनी 'शाहुपूरी' ही नवी बाजारपेठ बसविली. अशा अनेक बाजारपेठा उभारून लाखोंची उलाढाल होवू लागली. कोल्हापूर गुळाची बाजारपेठ म्हणून प्रसिध्दीस आला. शिरोळ गावी एक बाजारपेठ उभारून त्यास जयसिंगपूर असे नाव देण्यात आले. राधानगरी धरणाच्या पायथ्याशी 'राधानगरी' नावाची नवी वसाहत स्थापन केली. व्यापाऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी कर्जाऊ रकमा भांडवल म्हणून दिल्या. महाराजांनी विविध भागात उद्योगाच्या प्रशिक्षणासाठी माणसे पाठविलीत. रसायनशास्त्रज्ञ डी. एस. शाळीग्राम जपान देशातून प्रशिक्षण घेवून येऊन त्यांच्या मार्गदर्शनाखाली जंगल संपत्तीवर महाराजांनी काही उद्योग, वनस्पती तेलांचे उद्योगही सुरू केलेत. काष्ठार्क उद्योगातही कोल्हापूर संस्थान मागे राहिले

नव्हते. मधूमक्षिका पालन हा कौतुकास्पद उपक्रम कोल्हापूर संस्थानात होता. १९०६ ला कोल्हापूरात 'शाहू छत्रपती मिल्स' या कापड गिरणीची स्थापना करण्यात आली.१० त्या शेजारी पाण्याचे तळे उभारले. संस्थानात शिरोळ, इचलकरंजी, गडहिंग्लज ठिकाणी अनेक जीनिंग फॅक्टरीज स्थापन केल्या होत्या. उद्योगासाठी प्रशिक्षित कामगार तयार करण्यासाठी 'राजाराम इंडस्ट्रियल स्कुल' स्थापन केले होते. आज विविध उद्योगांच्या क्षेत्रात कोल्हापूर आघाडीवर आहे. त्याचे श्रेय शाहू महाराजांच्या कार्यालाच जाते.

समारोप :

राजर्षी शाहू महाराजांचे हे मानवतावादी कार्य पाहून भारताच्या संस्थानिकांच्या खाणीतील कोहीनुर हिरा म्हणून त्यांचा गौरव केला जातो. आपल्या जनतेची प्रतिष्ठा, योग्यता वाढविण्यासाठी असा राजा माणूस म्हणून अहोरात्र झटला. अन्यायाविरूध्द झगडतांना ते तेजारून पेटत होते. वर्ण वर्चस्ववादी वेदोक्त प्रकरणाप्रसंगीच्या लढ्यातून अपमानाच्या भावनेपेक्षा सामाजिक व सांस्कृतिक विषमता नष्टतेची भावना त्या मुळाशी असलेली दिसून येते. लोकशाही विचारांची बांधणी करणाऱ्या विचारांची पेरणी महाराजांनी आपल्या कार्यातून केली. बहुजन व मागासवर्गीय तसेच भटक्या विमुक्त जमाती आणि स्त्री हा घटक शिकून शहाणा झाल्याशिवाय त्यांचे दु:ख, दारिद्रय, अज्ञान, अंधश्रध्दा नष्ट होणार नाही याची जाणीव असलेला राजा छत्रपती शाहु यांच्या कार्याचा गौरव करावा तेवढा कमीच आहे. भारत भूमीच्या जनमाणसांच्या मनावर अधिराज्य करणारे शाहू हे उत्तुंग व्यक्तिमत्व होते. भारतीय समाजाला एकसंघ व समर्थपणे उभे राहण्यासाठी लोककल्याणकारी राज्य त्यांनी स्थापन केले. त्यांचे विचार संपूर्ण समाजाला दिशादर्शकच नव्हे तर एक सशक्त समाज व राष्ट्रउभारणीसाठी महत्त्वाचे आहेत. समाज प्रबोधनाचे त्यांनी केवळ चिंतन केले नाही किंवा नुसतेच विचार मांडले नाहीत तर हातात आलेल्या राजदंडाचा वापर जाणिवपूर्वक आणि तितक्याच निर्धाराने सामाजिक न्यायासाठी त्यांना केली. सामाजिक स्वातंत्र्यावर निर्माण होणारी लोकशाही म्हणजे सामाजिक लोकशाही. ही लोकशाही सामाजिक समता व सामाजिक न्याय या दोन तत्त्वांवर आधारीत असते. म. फुले, राजर्षी शाहू व डॉ. आंबेडकर ही तीन महात्मे या तत्वांसाठी म्हणजे सामाजिक लोकशाही स्थापन करण्यासाठी झगडले. माणसां-माणसांमधील सर्व प्रकारचे उच्चनीचतेचे भेद नष्ट होऊन सर्वांना विकासाची समान संधी मिळावी, यासाठी त्यांचा संघर्ष होता. या पार्श्वभूमीवर समाजात स्वत:ला उच्चवर्णीय समाजणाऱ्या लोकांनी अशी मानसिकता बदलावयास हवी. शाहू महाराजांच्या भूमिकेचा स्वीकार केला तर लवकरच आमच्या देशाची राष्ट्रीय एकात्मता बळकट होण्यास वेळ लागणार नाही.

संदर्भ सूची :

१) नाईक तुकाराम बी. - छत्रपती राजश्री शाहू महाराज, अजब पुस्तकालय, कोल्हापूर, १९८५ पृ. १६
२) पाटील व्ही. बी. - विसाव्या शतकातील महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास, के. सागर पब्लिकेशन, पुणे, २००४, पृ. ४३
३) पवार जयसिंग (डॉ.) - राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, २००१, पृ. ५९८
४) कित्ता, पृ. ५१२
५) साळुंखे पी. बी. (संपा), १९९८ राजषी शाहू गौरव ग्रंथ, शिक्षण व सेवा योजना विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई, पृ. १६५
६) पवार जयसिंग (डॉ.) - राजर्षी शाहू छत्रपती जीवन व कार्य, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, जानेवारी २०१२, पृ. १५०
७) कित्ता, पृ. १६०
८) सूर्यवंशी ग. सु. - राजा शाहू आणि समाज प्रबोधन, रणजित प्रकाशन, इचलकरंजी, प्र. आ. १९७८, पृ. २१०
९) जाधव रमेश - राजश्री शाहू छत्रपती, नॅशनल बुक ट्रस्ट, नवी दिल्ली, २०१३, पृ. १०२
१०) पवार जयसिंग - २०१२, उपरोक्त, पृ. १४६

■■■

ISSN No. 2394-5990

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या शैक्षणिक कार्याचे ऐतिहासिक विवेचन

डॉ. एस. आर. कट्टीमनी
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग प्रमुख,
विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)
शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर संलग्नीत
भ्रमणध्वनी: ९८६००९०६८९

घोषवारा:

राजर्षी छत्रपती शाहू महाराज हे फक्त करवीरचे राजे किंवा इंग्रजांचे मांडलिक संस्थानिक म्हणून इतिहासात नोंदले नाहीत, शाहू महाराज म्हणजे बहुजन समाजाचा उद्धारकर्ता, आधुनिक कोल्हापूरचे जनक व सामाजिक समता प्रस्थापित करणारे धोरणी युगपुरुष म्हणून नोंदले गेले. भारतात सामाजिक, शैक्षणिक व नोकऱ्यांमध्ये बहुजनांच्या आरक्षणाची तरतूद करणारे राजर्षी छत्रपती शाहू महाराज हे आद्य सुधारक होत. कोल्हापूर नगरीला कला, क्रीडा, संस्कृती, शिक्षण याबाबतीत अग्रेसर बनवण्याचे काम शाहू महाराजांनी केले. कोल्हापूरला कलानगरी बनवून कोल्हापूरचा नावलौकिक भारतात निर्माण करण्यात महाराजांचा खूप मोठा हातभार आहे. शाहू महाराजांचे सामाजिक विचार हे आधुनिक मानवतावादी मुल्यविचारांची पेरणी करणारे होते. त्यांनी अंधश्रद्धा, कर्मकांडे व दैववाद यासारख्या पारंपारिक विचारांच्या मानसिकतेवर प्रहार केला. महाराजांनी शिक्षण प्रसाराद्वारे बहुजनांचे अज्ञान दूर केले व त्यांना हजारो वर्षाच्या सामाजिक गुलामगिरीतून मुक्त करण्यास कायद्याचे पाठबळ दिले.

महाराष्ट्रात अनेक सामाजिक व शैक्षणिक विचारवंत होऊन गेले, परंतु छत्रपती शिवाजी महाराजांनंतर खरा समाजवाद आणि समतेची शिकवण देणारे शाहू महाराज लोकोत्तर पुरुष होते. पुरोगामी महाराष्ट्राच्या सामाजिक आणि वैचारिक जडणघडणीचे श्रेय शाहू महाराजांकडे जाते. त्यांनी दिलेला समतेचा संदेश व त्यासाठी केलेले कार्य पाहता त्यांचा २६ जून जन्मदिन हा 'सामाजिक न्याय दिन' म्हणून सर्वत्र साजरा केला जातो. प्रस्तुत शोधनिबंधातून राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या शैक्षणिक कार्यांचे ऐतिहासिक विवेचन केले जाणार आहे.

कळीचे शब्द: करवीर, मांडलिक, आरक्षण, पुरोगामी, मानवतावाद, कलानगरी, दैववाद, अधिष्ठान, सामाजिक न्याय दिन

प्रस्तावना :

आधुनिक भारताच्या इतिहासामध्ये एक आदर्श व लोक कल्याणकारी राजा म्हणून कोल्हापूर संस्थांनचे राजे राजर्षी छत्रपती शाहू महाराजांची ओळख आहे. बहुजन समाजाचा उद्धार करण्यासाठी त्यांच्या सामाजिक व आर्थिक जीवनात आमुलाग्र बदल करून त्यांची विचारप्रणाली बदलण्याचे महत्वपूर्ण कार्य शाहू महाराजांनी केले. शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थांनचा शाश्वत विकास होण्यासाठी अनेक योजना राबवल्या, म्हणूनच कोल्हापूर व महाराष्ट्राच्याच नव्हे तर भारताच्या इतिहासामध्ये त्यांचे नाव सुवर्णाक्षराने लिहले गेले आहे.

१९१२ मध्ये शाहू महाराजांनी प्रत्येक खेड्यामध्ये एक नवीन शाळा काढून त्यावर वतनदार शिक्षक नेमले होते. परंतू याद्वारे शिक्षणाचा योग्य तो प्रसार होत नसल्याचे दिसून आल्याने महाराजांनी १९१७ मध्ये वतनदार शिक्षक पद्धत बंद करून, पगारी शिक्षक योजना सुरू केली. शिक्षक प्रशिक्षणासाठी कोल्हापूर येथे अध्यापक विद्यालय सुरु केले. यातील शिस्त टिकून राहण्यासाठी शिक्षकांच्या वर्तवणुकीचा दाखला व २५ च्या आतील वय अशा दोन अटी शिक्षकांसाठी ठेवल्या.

१९१८ मध्ये सक्तीच्या व मोफत शिक्षणासाठी एक स्वतंत्र खाते स्थापन केले. त्यावर ङ्गडायरेक्टरफ आणि 'एज्युकेशनल इन्स्पेक्टर' या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नेमणूका केल्या.

राष्ट्रीय दृष्टी असलेल्या शाहू महाराजांचे कार्य कोल्हापूर संस्थानापुरते व विशिष्ट समाजापुरते मर्यादित नव्हते ते तसे ठेवणे म्हणजे एक ऐतिहासिक शोकांतिका ठरेल. सत्तेचा उपयोग तळागाळातील व बहुजन समाजासाठी कसा करावा हे चालू व भावी राज्यकर्त्यांनी छ. शाहू महाराजांच्या सामाजिक व धार्मिक तत्त्वज्ञानाचा अभ्यास करून शिकावे.

छत्रपती शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य :

छत्रपती शाहू महाराजांनी राजकीय सुधारणांपेक्षा सामाजिक सुधारणांना महत्त्वाचे स्थान दिले. त्यातही सामाजिक सुधारणा करण्याच्या कार्याला गती देण्यासाठी शैक्षणिक विकासाला प्रमुख स्थान दिले. या काळात खेड्यांमध्ये प्राथमिक शाळा नव्हत्या. सर्वसामान्य बहुजन समाज अज्ञान व अंधश्रद्धेचे जीवन जगत होता. शिक्षण घेणे हे ब्राह्मण किंवा सावकारांचे काम आहे अशी प्रचलित समाजाची समजूत होती. ज्ञानाच्या क्षेत्रात ब्राह्मण समाजाची मक्तेदारी ब्रिटिशपूर्वकाळापासूनच निर्माण झाली होती. इंग्रजांनी विद्येची प्रवेशद्वारे सर्व जातींसाठी खुली केली. छत्रपती शाहू महाराजांनी या अज्ञानी बहुजन समाजामध्ये ज्ञानाची ज्योत प्रज्वलित करण्याचा निर्धार केला.

शिक्षणातील अडचणींचे पेशवाईतील उदाहरण देताना शाहू महाराजांनी सांगितले की, श्री प्रतापसिंह महाराज छत्रपतींना (सातारा) पेशव्यांच्या ताब्यात असताना लहानपणी लिहिणे, वाचणे व शिकण्याचीही बंदी होती. तेव्हा त्यांच्या पूज्य व धोरणी आईने त्यांस रात्री बारा वाजता उठवून ब्राह्मणेत्तर पंतोजी कडून लिहिणे, वाचणे, शिकवण्याचे काम केले. पेशवाईत खुद्द छत्रपतींना चोरून मध्यरात्री शिक्षण घ्यावे लागत होते मग इतरांचे काय हा प्रश्न उपस्थित होतो.

प्राथमिक शिक्षणाला प्राधान्य :

समाजात शैक्षणिक विकास घडवून आणण्यासाठी महाराजांनी योजनाबद्ध आखणी केली. प्राथमिक शिक्षणाचा पाया दृढ केल्यानंतर उच्चशिक्षणापर्यंत वाटचाल करण्याचा त्यांचा निश्चय होता. त्यांनी प्राथमिक शिक्षणाला तर प्राधान्य दिलेच परंतु त्याचबरोबर माध्यमिक व उच्च शिक्षणाकडेदेखील लक्ष दिले.

शाहू महाराज म्हणतात, रयतेमध्ये प्राथमिक व उच्च शिक्षणाचा प्रसार करण्याची माझी जोराने खटपट चालली आहे, शक्य तितक्या लवकर माझ्या रयतेस स्वराज्य देण्याचे माझे धोरण आहे. जर माझी मराठी प्रजा इयत्ता तिसरी शिकून तयार झाली असती तर त्यांना राज्यकारभाराचे हक्क आनंदाने देऊन मी विश्रांती घेतली असती. राज्यकारभाराचे अधिकारदान करण्यापूर्वी सर्व लोकांमध्ये विद्याप्रसार करणे गरजेचे आहे. प्राथमिक शिक्षणाच्या भरभक्कम पायावर उच्च शिक्षणाची इमारत उभी करण्याचा त्यांचा मानस होता.

इ.स. १९१३ मध्ये शाहू महाराजांनी प्रत्येक गावात निदान एक तरी शाळा असावी व ती शाळा गावात बहुसंख्येने राहणाऱ्या जातींच्या व्यक्तीने चालवावी असे म्हटले. शिक्षणाविषयी शिक्षकांच्या मनात आस्था निर्माण व्हावी व त्याने शिक्षणविषयक चळवळीला गती द्यावी असे महाराजांना वाटत होते. बहुजन समाजाच्या सर्वांगीण हितासाठी प्राथमिक शिक्षणाद्वारे छत्रपती शाहू महाराज व्यापक बैठक तयार करीत होते. त्या दृष्टीकोनातूनच त्यांनी निरनिराळ्या शैक्षणिक संस्था व व्यक्तींना आर्थिक सहकार्य केले. त्यामुळेच कोल्हापूर संस्थानांमध्ये प्राथमिक शिक्षणाचा खूप मोठ्या प्रमाणावर विकास झाला.

सक्तीचे सार्वजनिक शिक्षण :

महात्मा ज्योतिराव फुले यांनी बहुजन समाजाच्या विकासासाठी व उद्धारासाठी शिक्षण हे एक महत्त्वाचे शस्त्र मानले. बहुजन समाजाला शिक्षणाशिवाय पर्याय नाही असे मत महात्मा फुले यांचे होते. महात्मा फुले यांच्या या शैक्षणिक धोरणाचा शाहू महाराजांनी स्वीकार केला. महाराजांनी सक्तीच्या शिक्षणाचे धोरण आखले. त्याअगोदर ५०० ते १००० लोक वस्तीच्या गावी कोठे शाळा सुरू करता येईल? कोणत्या सार्वजनिक इमारतीचा उपयोग करता येईल? याची माहिती त्यांनी संकलित केली. या गावांमधून ताबडतोब शाळा सुरू करण्याचे आदेश त्यांनी दिले. देवस्थानच्या उत्पन्नातून नित्य नैमित्तिक खर्च वजा जाता उरलेले उत्पन्न शाळेला द्यावे असे ठरवले.

शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण (सार्वत्रिक) सक्तीचे आणि मोफत करण्यासाठी एक समिती नेमली. या समितीच्या शिफारशीनुसार कोल्हापूर शहर व तालुक्यात गावोगावी सक्तीच्या शिक्षणाचा अंमल इ.स. १९१६ पासून सुरू केला गेला. सप्टेंबर १९१६ मध्ये सक्तीच्या शिक्षणाचा कायदा कोल्हापूर संस्थानात करण्यात आला. शिक्षणासाठी योग्य वय असलेल्या मुलामुलींना शाळेत पाठवण्याबाबत पालक व गाव कामगार यांच्यावर कडक बंधने लागू केली. या सक्तीच्या व मोफत शिक्षण योजनेमुळे शिक्षणाच्या प्रसाराला विस्तृत स्वरूप प्राप्त झाले. या धोरणाचा इतका फायदा झाला की, १९१७-१८ साली शाळांची संख्या २७ व विद्यार्थ्यांची संख्या १२९६ इतकी होती. तर १९२१-२२ मध्ये ४२० शाळा व २२,००७ इतकी विद्यार्थीसंख्या वाढलेली दिसते. शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी महाराजांनी शैक्षणिक सवलत व शिष्यवृत्ती जाहीर केल्या.

ISSN No. 2394-5990

स्त्री शिक्षण :

स्त्री शिक्षणामुळे कुटुंब व समाजाचा विकास घडून येण्यास मदत होते. बहुजन समाजाप्रमाणेच स्त्री जीवनाच्या मागासलेपणाची शाहू महाराजांना जाणीव होती. त्यामुळे त्यांनी स्त्री शिक्षणाकडे लक्ष दिले. आपल्या सुनबाई इंदुमतीराणी साहेब यांना वैधव्य प्राप्त झाल्यानंतर महाराजांनी त्यांना शिक्षण देऊन त्यांच्याकडे कोल्हापूर संस्थानचे शिक्षण खाते सोपवण्याचा त्यांचा विचार होता परंतु, राणीसाहेबांच्या मृत्यूमुळे तो पूर्ण झाला नाही. 'मिस लिटल' या शिक्षणाधिकारी असणाऱ्या इंग्रज बाई मायदेशी गेल्यावर 'फीमेल ट्रेनिंग स्कूल' मधील शिक्षिका ङ्गरखमाबाई केळकरफ यांना शिक्षणाधिकारी म्हणून नेमले. महाराजांनी स्त्री शिक्षणाला गतिमान केले. कोल्हापूर संस्थानात मुलामुलींच्या शाळा होत्या परंतु, मुलींच्या स्वतंत्र शाळा महाराजांनी स्थापन केल्या. मुलींच्या उच्च शिक्षणाच्या बाबतीत महाराजांनी उदार दृष्टीकोन ठेवला होता. राजाराम कॉलेजमधील सर्व मुलींना शिक्षण मोफत केले होते. केळकर यांच्या कन्या रखमाबाई या महाराजांच्या मदतीनेच शिक्षणासाठी इंग्लंडला जाऊन वैद्यकीय शिक्षण पूर्ण करू शकल्या. प्रौढ व मागासलेल्या स्त्रियांसाठी महाराजांनी १९१९ मध्ये एक शासकीय आदेश काढून त्यांच्या शिक्षणासाठी व राहण्याजेवण्यासाठीची सर्व व्यवस्था दरबाराकडून मोफत करण्याची सोय केली.

उच्च व व्यवसाय शिक्षण :

प्राथमिक शिक्षणाप्रमाणेच उच्च आणि व्यावसायिक शिक्षणाच्या विकासासाठी शाहू महाराजांनी प्रयत्न केले.१८५१ मध्ये कोल्हापूर येथे सुरू झालेले एका इंग्रजी शाळेचे १८८१ साली राजाराम महाविद्यालयात रूपांतर झाले. जहागीरदार व सरकारकडून मिळणाऱ्या वर्षासनातून या महाविद्यालयाचा खर्च चालत असे. वर्षासने बंद झाल्यानंतर दरबारातर्फे या महाविद्यालयाला दरवर्षी ५०००० रूपये महाराजांनी देण्यास सुरुवात केली.

प्राथमिक, माध्यमिक व उच्च शिक्षणाप्रमाणेच शाहू महाराजांनी व्यावसायिक शिक्षणालाही महत्त्व दिले. गावांचा कारभार व्यवस्थित चालविला जाण्यासाठी महाराजांनी पाटील स्कूल व तलाठी स्कूल सुरू केले. या शाळांमधून पाटील व तलाठ्यांना सर्वसाधारण जमा खर्च, कायदे, शांतता व सुव्यवस्था, महसूल विषयक दक्षता इत्यादी विषयाचे शिक्षण दिले जात. महाराजांनी शिक्षकांसाठी प्रशिक्षण केंद्र सुरू केले. तांत्रिक शिक्षणासाठी जयसिंगराव घाडगे तांत्रिक संस्था स्थापन केली. या संस्थेत लोहारकाम, गवंडीकाम व सुतारकाम यांसारख्या विषयांचे शिक्षण दिले जात असे. लष्करी शिक्षणासाठी इन्फंट्री स्कूल सुरू केले. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये व्यायाम व लष्करी शिक्षणाची ही आवड निर्माण होऊ शकली.

वसतिगृह चळवळीचे निर्माते :

छत्रपती शाहू महाराजांनी बहुजन समाजामध्ये शिक्षणाचा प्रसार व्हावा त्यातही उच्च शिक्षणाचा प्रसार होण्यासाठी तत्कालीन सामाजिक परिस्थितीचा वेध घेऊन अनेक जातवार वसतिगृहे स्थापन केली. ग्रामीण भागातील शिक्षणाची ओढ असणाऱ्या गरिब व होतकरू विद्यार्थ्यांना शहरामध्ये उच्च शिक्षण घेता यावे यासाठी शाहू महाराजांनी ही वसतिगृहे स्थापन केली. अनेक वसतिगृहांना शाहू महाराजांनी स्वतः देणग्या दिल्या. तसेच काही वसतिगृहांना कायमचे उत्पन्न मिळावे म्हणून शेती व इतर सोयी उपलब्ध करून दिल्या.

छत्रपती शाहू महाराज हे धोरणी समाजसुधारक होते. सरुड- सागाव येथील पांडुरंग चिमणाजी पाटील हा विद्यार्थी मॅट्रिक पास झाल्यानंतर महाराजांनी त्याला बोलवून घेतले. मॅट्रिक परीक्षा पास होईपर्यंत त्याला आलेल्या अडचणीना समजून घेतले. पांडुरंग पाटील यांच्या पुढील उच्च शिक्षणासाठी आर्थिक अडचण लक्षात घेऊन त्यांना पन्हाळा वरील गुरुदेव दत्ताच्या देवळात त्यांच्या जेवणा-खाण्याची सोय केली व येथेच पहिल्या मराठा वसतिगृहाची सुरुवात झाली. वसतिगृह स्थापन करण्यापूर्वी न्यायमूर्ती रानडे, गोपाळ कृष्ण गोखले, बापूसाहेब महाराज, रघुनाथ व्यंकाजी सबनीस, भास्करराव जाधव व दाजीराव अमृतराव विचारे यांचा सल्ला घेतला व शेवटी भारतातील पहिले व्हिक्टोरिया मराठा वसतिगृह स्थापन केले.

भारतातील विद्यार्थी वसतिगृहाचा पाया शाहू महाराजांनी घातला म्हणून त्यांना विद्यार्थी वसतिगृहाचे जनक असे संबोधले जाते. १५ एप्रिल १९२० रोजी नाशिक मधील उदाजी मराठा विद्यार्थी वसतिगृहाच्या इमारतीच्या कोनशीला समारंभाच्या अध्यक्षीय भाषणात महाराज म्हणतात, माझ्या चिमुकल्या राज्यातील प्रजाजनांनी एका बाबतीत तरी विशेष नाव कमविले आहे, हे मी अभिमानपूर्वक सांगतो. ब्रिटिश पार्लमेंटला ङ्गमदर ऑफ पार्लमेंट्सफ असे मोठया अभिमानाने इंग्रज व इतर लोक म्हणतात. त्याप्रमाणे कोल्हापुरास ङ्गमदर ऑफ बोर्डिंग हाऊसेसफ म्हणजे विद्यार्थी वसतिगृहांची माता असे सार्थ नाव मिळाले आहे.

छ.शाहू महाराजांनी कोल्हापुरात निर्माण केलेल्या वसतिगृहांचा आढावा पुढीलप्रमाणे :

अ.क्र.	वसतीगृहाचे नाव	स्थापना
१	व्हिक्टोरिया मराठा बोर्ड	१८ एप्रिल १९०१
२	दिगंबर जैन बोर्डिंग	१९०१
३	वीरशैव लिंगायत विद्यार्थी वसतिगृह	१९०६
४	मुस्लिम बोर्डिंग	१९०६
५	मिस क्लार्क हॉस्टेल	१४ फेब्रुवारी १९०८
६	देवज्ञ शिक्षण समाज बोर्डिंग	२४ डिसेंबर,१९०८
७	श्री. नामदेव बोर्डिंग	२ एप्रिल १९११
८	पांचाळ ब्राह्मण वसतिगृह	१९१२
९	श्रीमती सरस्वतीबाई गौड सारस्वत ब्राह्मण विद्यार्थी वसतिगृह	२० मे,१९१५
१०	इंडियन ख्रिश्चन हॉस्टेल	७ जून १९१५
११	राव बहादूर सबनीस प्रभू बोर्डिंग	१९१५
१२	आर्य समाज गुरुकुल	१८ मार्च १९१८
१३	वैश्य बोर्डिंग	१९१८
१४	ढोर चांभार बोर्डिंग	१९१९
१५	शिवाजी वैदिक विद्यालय वसतिगृह	६ जुलै १९२०
१६	श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊस	१ जुलै,१९२०
१७	सुतार बोर्डिंग	६ जून १९२१
१८	नाभिक विद्यार्थी वसतिगृह	२४ जुलै १९२१
१९	सोमवंशीय आर्य क्षत्रिय बोर्डिंग	१६ ऑगस्ट १९२०

शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानापुरतेच वसतिगृह स्थापन करण्याचे आमुलाग्र काम मर्यादित ठेवले नाही तर महाराष्ट्रातील इतर भागातही त्यांनी देणगी रूपाने मदत देवून वसतिगृह स्थापनेची चळवळ व शिक्षणप्रसारास मदत हे कार्य सुरु ठेवले. शाहू महाराजांच्या या वसतिगृह निर्माण चळवळीच्या भूमिकेमुळे महाराष्ट्रातील बहुजन समाजातील गरीब विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेताना येणाऱ्या अडचणी दूर झाल्या. शाहू महाराजांच्या या वसतिगृह निर्माण करावयाच्या कार्यामुळे ज्ञानाची कवाडे बहुजनांसाठी उघडी करणाऱ्या कर्मवीर भाऊराव पाटील यांसारख्या शिक्षण सुधारकांना प्रेरणा मिळाल्या.

छ. शाहू महाराजांनी संस्थानाबाहेरील वसतिगृहांस दिलेली मदत

अ. क्र.	वसतिगृहाचे नाव	वर्ष	देणगी
१.	नाशिक उदाजी मराठा वसतिगृह	१९२०	१५०००/-
२.	अहमदनगर-श्री छत्रपती करवीर चौथे शिवाजी महाराज मराठा बोर्डिंग	१९२०	१५०००/-
३.	नाशिक 'वंजारी समाज वसतिगृह'	१९२०	५०००/-
४.	नाशिक 'श्री शाहू छत्रपती बोर्डिंग'	१९१९	५०००/-
५.	नागपूर चोखामेळा वसतिगृह	१९२०	५०००/-
६.	'ताराबाई वसतिगृह' पुणे	१ डिसेंबर,१९२०	स्वखर्चातून स्थापन केले.

ISSN No. 2394-5990

कामगार चळवळीस प्रेरणा :

मुंबईमध्ये पीपल्स युनियन म्हणजेच कामगारांच्या लोकसंघाची स्थापना रावबहादूर सिताराम केशव बोले यांनी केली. शाहू महाराज या संघटनेचे आश्रयदाते होते. २४ नोव्हेंबर, १९१८ रोजी मुंबईमध्ये कामगारांसमोरील भाषणांमध्ये शाहू महाराज म्हणतात की, प्रत्येक प्रौढ व्यक्तीस मतदानाचा अधिकार मिळाला पाहिजे, म्हणजेच बहुजन समाजाच्या मताप्रमाणे राज्यकारभार चालला पाहिजे, येथेही इंग्लंडप्रमाणे मजुरांचे संघ पाहिजेत आणि सर्वांना आपल्या हक्कांची जाणीव झाली पाहिजे. भांडवलवाल्यात ब्राह्मण व वैश्य वृत्तीच्या लोकांचा विशेष भरणा आहे. त्यांना दाबात ठेवल्याशिवाय मजुरांची उन्नती होणार नाही. महात्मा फुलेंकडून प्रेरणा घेऊन नारायण मेघाजी लोखंडे यांनी मुंबईत पहिली कामगार संघटना निर्माण केली. अशा अनेक संघटना बांधण्याबाबत शाहू महाराजांनी कामगारांना प्रेरणा दिल्या.

१९७४ मध्ये कॉम्रेड वैद्य यांनी ङ्गमहात्मा फुले आणि त्यांची परंपराफ हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथाच्या ङ्गशाहू महाराजांच्या कार्याची ऐतिहासिक महतीफया लेखात ते म्हणतात, अखेरच्या दिवसात टिळकांप्रमाणेच शाहू महाराज हेही उदयोन्मुख कामगार वर्गाकडे आकर्षित झाले होते. मुंबईत मजुरांच्या सभेत भाषण करताना त्यांनी कामगारांच्या वर्गीय शक्तीचे स्वागत केले. ट्रेड युनियन बांधण्याच्या हक्काचा नि:संदिग्ध पुरस्कार केला. एवढ्यावरच न थांबता त्यांनी भांडवलदारांविरुद्ध कामगार वर्गाच्या लढ्याची महती वर्णन केली.

छत्रपती शाहू महाराजांच्या शैक्षणिक कार्याचा गौरव :

१९१८ साली कानपूर येथे भरलेल्या कुर्मी क्षत्रिय परिषदेमध्ये शाहू महाराजांना त्यांच्या असामान्य कार्याबद्दल राजर्षी ही मानाची लोक पदवी देण्यात आली.

१९०२ साली शाहू महाराजांनी भारतामध्ये प्रथम कोल्हापूर संस्थानात दलित, मागास समाजासाठी आरक्षण देण्याचा कायदा केला. सामाजिक समता प्रस्थापित करण्याचे कृतीशील प्रयत्न शाहू महाराजांनी केले. शाहू महाराजांनी मानवतावादी मूल्यांचा स्वीकार करून सर्वांना समतेची वागणूक देण्याची भूमिका स्वीकारली. शाहू महाराजांच्या याच पुरोगामी विचारांवर कृतिशील अंमलबजावणी करण्याची या देशाला गरज आहे.

शाहू महाराजांचे सामाजिक व शैक्षणिक कार्य हे क्रांतिकारी स्वरूपाचे होते. उत्तर प्रदेशातील जनतेने शाहू महाराजांच्या विचारण्याची प्रशंसा करताना त्यांना क्रांतिकारक लोकनेता मानले. उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्री मायावतींनी लखनौमध्ये राजर्षी शाहू महाराजांच्या क्रांतिकारक स्मारकाचे उद्घाटन केले. शाहू महाराजांच्या भारतातील शैक्षणिक कार्याची पोचपावती म्हणजे कानपूरच्या विद्यापीठाचे नामकरण 'छ. शाहू महाराज विश्वविद्यालय, कानपूर' असे करणे होय. या ऐतिहासिक विवेचनावरून या लोकराजाच्या कार्याची महती आपल्याला समजून येते.

निष्कर्ष :

शाहू महाराजांनी बहुजन समाजाचा सामाजिक दर्जा उंचावण्यासाठी शिक्षण हा एकमेव उपाय शोधला. शाहू महाराज एका भाषणामध्ये म्हणतात, शिक्षणानेच आमचा तरणोपाय आहे असे माझे ठाम मत आहे. शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती झाली नाही, असे इतिहास सांगतो. अज्ञानात बुडून गेलेल्या देशात उत्तम मुत्सद्दी व लढवय्ये कधीही निपजणार नाहीत. म्हणूनच सक्तीच्या आणि मोफत शिक्षणाची हिंदुस्तानला अत्यंत आवश्यकता आहे.

स्वातंत्र्याची ७५ वर्षे होऊन गेली परंतु अजूनही शिक्षण व्यवस्थेत म्हणावे असे सर्वसमावेशक धोरण भारतासारख्या विकसनशील देशाला लागू करणे शक्य झाले नाही. प्रत्येक भारतीयांच्या उत्पन्नावरील आयकरावर 'शिक्षण कर' हा अतिरिक्त कर घेऊन देखील उच्च शिक्षण आपण मोफत करू शकत नाही. शिक्षणातील गुणवत्ता सुधारण्यासाठी शिक्षण व्यवस्थेतील मुठभर लोकांचे मक्तेदारी दूर करणे गरजेचे आहे. या सर्व सामाजिक व शैक्षणिक गोष्टींचे भान ओळखून राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी शंभर वर्षांपूर्वी कोल्हापूर संस्थानांमध्ये शिक्षण व्यवस्थेतील मुठभर लोकांची मक्तेदारी कमी केली.

आज पुरोगामी शक्ती कमजोर होत आहेत व प्रतिगामी शक्ती बळावत आहेत. धार्मिक व जातीयवादी प्रवृत्ती राजकारणात बळावत आहेत. त्यामुळे पुरोगामी महाराष्ट्राच्या सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील अडचणी दूर करण्यासाठी शाहू महाराजांच्या कृतिशील पुरोगामी विचारांच्या प्रसाराची आवश्यकता आहे.

कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार एका प्रस्तावनेत लिहितात, लोक सुजाण व्हावेत, सुखी व्हावेत, जातीजातीच्या कारणाने निर्माण झालेली कृत्रिम असमानता नाहीशी व्हावी, समाज गतिमान व्हावा, प्रगत व्हावा म्हणून शाहू महाराजांनी जीवनभर प्रयत्न केले. असा राजा होणे नाही. सर्वार्थाने तो जनतेचा राजा होता.

संदर्भ साधने :

१. साळुंखे नानासाहेब (२००६), शाहूंच्या आठवणी, वृषाली प्रकाशन, प्रथम आवृत्ती, कोल्हापूर.
२. पानसरे गोविंद अँड (२०१२), राजर्षी शाहू: वसा आणि वारसा, नागनालंदा प्रकाशन, चतुर्थ आवृत्ती, सांगली.

३.चव्हाण रा. ना. (२०१३), राजर्षी शाहू महाराज यांची सामाजिक विचारधारा व कार्य, प्रथम आवृत्ती, पुणे
४. धारवाडे बाबुराव (२००५), माझे शाहू कार्य, भाई माधवराव बागल विद्यापीठ, प्रथम आवृत्ती, कोल्हापूर.
५. मिस क्लार्क हॉस्टेल, कोल्हापूर सुवर्ण महोत्सवी खास अंक, १४ एप्रिल १९६१
६. सुर्यवंशी कृ. गो. (१९८४), राजर्षी शाहू राजा व माणूस, ठोकळ प्रकाशन, पुणे.
७. नाईक तू .बा. (२०१०),छत्रपती राजर्षी शाहू महाराज, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे
८. डॉ.जयसिंगराव पवार (२०१८),राजर्षी शाहू छत्रपती :एक मागोवा, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे
९. मोरे दिनेश (२००६), आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास (१८१८-१९६०), के. एस. पब्लिकेशन्स, प्रथम आवृत्ती, पुणे.
१०. डॉ. किशोर कुमार गव्हाणे व डॉ. एस. पी. शिंदे (२०१४) महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास, एज्युकेशनल पब्लिशर्स अँड डिस्ट्रीब्युटर्स, औरंगाबाद.
११. डॉ. कठारे अनिल (२००९), आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद.

■■■

ISSN No. 2394-5990

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे स्त्री शिक्षण विषयक विचार व कार्य

कु. शुभांगी मनोहर आवारी
शासकीय अध्यापक महाविद्यालय
यवतमाळ
मो. नं. ८८०५९ ४८१५८
shubhangiawari71@gmail.com

सारांश :

राजर्षी छत्रपती शाहू महाराज जे परिवर्तनवादी विचारांचे आणि कृतिशील राजे होते. त्यांचा दृष्टीकोन हा व्यापक सामाजिक समतेची उत्स्फूर्त जाणीव निर्माण करणारा होता. या सामाजिक जाणिवेतूनच त्यांनी स्त्री उद्धाराचे कार्य हाती घेतले. महात्मा ज्योतिराव फुले प्रमाणेच त्यांनी देखील, ''स्त्रीदास्याची शृंखला खंडित करायची असेल, तर प्रथम स्त्रीवर्ग शिक्षित झाला पाहिजे,'' ही भूमिका स्वीकारीत ''स्त्री शिक्षण हा त्यांच्या सुधारणावादी कारभाराचा एक भाग बनविला.'' कोल्हापूर संस्थानचा कारभार हाती घेताच शिक्षण प्रसाराचे व्रत घेवून मुला मुलींना प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत सुरू केले. असे करणारे ते प्रथम भारतीय राजे छत्रपती शाहू महाराज त्यांचे स्त्री शिक्षण विषयक विचार व कार्य समजून घेणे गरजेचे आहे.

प्रस्तावना :

कोल्हापूर संस्थानचे छत्रपती राजर्षी शाहू महाराज हे एक अष्टपैलू व्यक्तिमत्वाचे आणि सुधारणावादी विचारांचे राजे होते. समानतेचा दृष्टिकोन समोर ठेवून स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचा वारसा जपत त्यांनी जपला. फक्त त्यांच्या स्वराज्याचाच वारसा जपला नाही तर त्यांनी त्यांच्या विचारांचाही वारसा जपत आपल्या संस्थानाचा कारभार सांभाळला. स्त्री पुरुष समानतेचे तत्व तर त्यांनी अवलंबिलेच होते पण ''शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही'' हे तत्कालीन काळातच जाणत त्यांनी स्त्री शिक्षणासाठी जे प्रयत्न केले ते उल्लेखनीय आहे. त्यासाठी त्यांचे शिक्षण विषयक विचार अतिशय महत्त्वाचे आहे.

राजर्षी शाहू महाराजांनी आपली शिक्षणविषयक भूमिका नाशिक येथील भाषणात मांडताना ते म्हणतात, ''रयतेतील थोडासा भाग पूर्ण सुशिक्षित होण्यापेक्षा सर्व रयतेला प्राथमिक शिक्षणाचा थोडा तरी अंश मिळाला पाहिजे, म्हणजे रयतेमधील मोठा भाग अडाणी राहिला, थोडे लोक विद्यासंपन्न झाले व प्रजेस अधिकार दिले तर ते या थोड्या लोकांच्या हाती पडणार व सुशिक्षित ब्युरोक्रसी तयार होणार. म्हणूनच खालच्या वर्गाच्या लोकांच्या बुद्धीवर व ज्ञानावर हे जे जड, जुलमी जू लादले गेले आहे, ते झुगारून देण्याची शक्ती बहुजन समाजाच्या अंगी येण्यास सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाची फार जरुरी आहे.''[१] याच भाषणात ते पुढे म्हणतात की, ''बहुजन समाजाचा शिक्षणाच्या बाबतीतील दर्जा वाढून वरिष्ठ वर्गाच्या बरोबरीने अंशतः तरी ते आल्याशिवाय सुधारणेच्या दृष्टीने माझ्या संस्थानच्या कारभारात लोकांस हक्क देण्याविषयीचा बदल करण्याला हात घालण्यास मी धजणार नाही.''[२] एका भाषणात ते म्हणतात की, माझे सर्व नागरिक निदान तिसरी इयत्ता पास आहेत, असे झाले म्हणजे मी आनंदाने निवृत्त होईन.[३] यावरून त्यांचे शिक्षण विषयक विचार लक्षात येते. शाहू महाराजांची तत्कालीन काळात स्त्री शिक्षणाच्या दृष्टीचे जे प्रयत्न केले ती एक क्रांतीच होती त्यामुळे शाहू महाराजांचे स्त्री शिक्षण विषयक कार्य अभ्यासणे सदर शोधनिबंधाचा हेतू आहे.

संशोधनाची उद्दीष्टे :

१. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचा शैक्षणिक दृष्टिकोन अभ्यासणे.
२. राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य समजून घेणे.
३. राजर्षी शाहू महाराजांचे स्त्री शिक्षण विचार समजून घेणे.
४. राजर्षी शाहू महाराजांचे स्त्री शिक्षण विषयक कार्य अभ्यासणे.
५. राजर्षी शाहू महाराजांच्या स्त्री शिक्षण विषयक कार्याचे सामाजिक परिणामांचा पडताळा घेणे.

संशोधनाची गृहितके :

१. राजर्षी शाहू महाराजांचा शिक्षण विषयक दृष्टिकोन हा समानतेच्या तत्वावर आधारलेला होता.
२. समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षणाचे महत्त्व तत्कालीन काळामध्ये राजर्षी शाहू महाराजांनी जाणले होते.

३. स्त्री शिक्षणाचे समाजामध्ये असलेले महत्त्व लक्षात घेता त्यांनी स्त्री शिक्षणासाठी जे कार्य केले ते स्त्रियांना सक्षम बनवणारे होते.
४. सक्तीच्या व मोफत शिक्षणाने पालकांवर आपल्या पाल्याच्या शिक्षणाचा येणार आर्थिक भर कमी करणारे होते.
५. राजश्री शाहू महाराजांच्या स्त्रीविषयक शैक्षणिक कार्यामुळे समाजामध्ये स्त्रियांचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण होण्यास मदत झाली.

संशोधनाचे महत्त्व :

वर्तमान स्थितीमध्ये महिला ह्या प्रत्येक क्षेत्रामध्ये कार्यरत असून सक्षम आहे. आजच्या सक्षम महिलेची पायाभरणी ही राजर्षी शाहू महाराजांनी तत्कालीन काळामध्ये केली. शिक्षणाचे महत्त्व जाणून स्त्री शिक्षणासाठी त्यांनी जे कार्य केले त्यामुळे वर्तमान काळातील स्त्री ही सक्षमपणे उभी दिसत आहे. त्यामुळे राजर्षी शाहू महाराजांचे क्रांतिकारी विचार आणि कार्य हे समाजासाठी सतत प्रेरणादायी आहे. त्यामुळे ते विचार मांडण्याच्या दृष्टीने हा शोध निबंध महत्त्वाचा आहे.

विषय विवेचन :

राजर्षी शाहू महाराज हे स्वतः शिक्षित आणि तर्कबुद्धीवादी विवेकसंपन्न राजे होते. कुठलीही गोष्ट तर्कबुद्धीने तपासून पाहिल्यानंतरच त्यावर ते विश्वास ठेवत. समाजामध्ये सकारात्मक परिवर्तन व्हावे हीच त्यांची भूमिका होती. समाजामध्ये सर्वांना समानता, स्वातंत्र्य मिळावे आणि भेद-विरहित समाजाची निर्मिती व्हावी हिच त्यांची इच्छा होती. यासाठी शिक्षण हे महत्त्वाचे आहे हे त्यांनी जाणून घेतले होते त्यामुळेच त्यांनी शैक्षणिक क्षेत्रामध्ये जे कार्य केले ते उल्लेखनीय आहे. राजर्षी शाहू महाराजांनी प्रथमतः आपल्या संस्थानात प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे सुरू केले. शिक्षणाच्या सार्वत्रिक प्रसारासाठी त्यांनी वतनी शिक्षक नेमण्याचा प्रयोगही केला.[४] या सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची नियमावली तयार करण्यासाठी करमरकर, मराठे व प्रो. पंडितराव अशा तीन ब्राह्मण शिक्षणतज्ज्ञांची समिती नेमली गेली.

२१ सप्टेंबर १९१७ मध्ये कोल्हापूर संस्थानात ''सक्तीच्या शिक्षणाचा कायदा'' खास जाहीरनामा काढून प्रसिद्ध करण्यात आला. त्याच्या उद्देशामध्ये शाहू महाराज म्हणतात, ''करवीर इलाख्यातील आमच्या सर्व प्रजाजनांना लिहीता-वाचता येऊन आपली स्थिती ओळखून सुधारण्यास समर्थ व्हावे'' म्हणून हा कायदा केलेला आहे. या कायद्यान्वये, शिक्षणास योग्य वयाची मुले शाळेत पाठविण्याची आईबापांवर सक्ती तर करण्यात आलीच पण त्यांना प्रत्येकी एक रुपया दर महिना दंड करण्याची तरतूद देखील करण्यात आली.[५] राजर्षी शाहू महाराजांचा सक्तीच्या, मोफत आणि शिक्षणावर दंड आकारण्या मागची भूमिका ही समाजातील सर्व वर्गांच्या मुला-मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे हे होते. जेणेकरून समाजामध्ये शिक्षणाचे प्रमाण वाढेल आणि समाज सुशिक्षित होईल.

स्त्री शिक्षण विषयक विचार :

तत्कालीन समाज व्यवस्था ही अतिशय विषमतावादी असून जातव्यवस्थेने भयान स्वरूप घेतलेले होते. जातीची रचना उतरंड प्रमाणे होऊन मानवी मनात खोलवर रुजलेली होती. आणि अशा या पार्श्वभूमीवर राजर्षी शाहू महाराजांनी बहुजन समाजामध्ये शिक्षणाच्या अभावी माजलेली दुरवस्था पाहिली. त्यामुळे या समाजाला सक्तीचे व मोफत शिक्षण देण्याच्या अनुषंगाने त्यांचा विचार सुरू होता. शिक्षणाचे महत्त्व महाराजांनी जाणले होते. खामगाव (विदर्भ) येथील २७ डिसेंबर १९१७ रोजी केलेल्या भाषणात ते म्हणतात, ''शिक्षणानेच आमचा तरणोपाय आहे, शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती झाली नाही, असे इतिहास सांगतो. अज्ञानात बुडून गेलेल्या देशात उत्तम मुत्सद्दी व लढवय्ये वीर कधीही निपजणार नाहीत. म्हणूनच सक्तीच्या व मोफत शिक्षणाची हिंदुस्थानला अत्यंत आवश्यकता आहे. फक्त एकाच जातीने विद्येचा मक्ता घेणे म्हणजे शिक्षण नव्हे तर समाजातील सर्व तळागाळातील लोकांनी, मुला-मुलींनी आणि प्रौढ स्त्री ने देखील शिक्षित होते गरजेचे आहे. स्त्री शिक्षणाचे घेतलेले व्रत त्यांनी आयुष्यभर जपले आणि स्त्री शिक्षणासाठी प्रयत्न केले.''[६] स्त्री शिक्षणानेच समाजाचा उद्धार होऊ शकतो हे शाहू महाराज जाणून होते त्यामुळेच स्त्री शिक्षणासाठी प्राथमिक शिक्षण सक्तीचे तर उच्च शिक्षणासाठी भरघोस अर्थसाह्य नैतिक पाठबळ देवून महिलांचा शिक्षणाचा दर्जा उंचावला यासाठी त्यांनी आपल्या संस्थानात नानाविध प्रयोग केले आणि स्त्रियांना शिक्षण देवून सक्षम बनविले.

स्त्री शिक्षण विषयक कार्य :

राजर्षी शाहू महाराजांनी त्यांच्या कोल्हापूर संस्थानात स्त्री शिक्षणासाठी जे धोरण स्वीकारले ते अत्यंत पुरोगामी होते. तत्कालीन समाजात पुरुषी वर्चस्व असताना देखील संस्थानात स्त्री शिक्षणाचे प्रमाण वाढावे, स्त्री शिक्षणाची व्यवस्था उत्तम प्रकारे असावी ते पाहण्यासाठी त्यांनी स्त्री शिक्षणाधिकाऱ्याचे विशेष पद निर्माण केले होते. तत्कालीन काळात केलेली ही एक मोठी क्रांतीच होती. पुरुषी मनोवृत्ती बाजूला ठेवून स्त्रियांना सन्मान मिळवून देणारे पद निर्माण केले. त्यांनी ही जबाबदारी रखमाबाई केळवकर यांच्याकडे होती. संस्थानामध्ये मुला-

ISSN No. 2394-5990

मुलींसाठी शाळा कित्येक शाळा होत्या. पण समाजाची मानसिकता लक्षात घेवून त्यांनी मुलींसाठी स्वतंत्र शाळा निर्माण केल्या. मुलींनी फक्त शाळेत नाव दाखल करून भागणार नाही तर त्यांनी उत्तीर्ण होते देखील तितकेच महत्त्वाचे होते म्हणून संस्थानात मुलींचे उत्तीर्णतेचे प्रमाण वाढावे यासाठी मुलींच्या पास होण्याच्या प्रमाणात शिक्षकांना विशेष इनाम ठेवले. जेणे करून शिक्षक मुलींच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष करणारा नाही.

आपल्या संस्थानात फक्त मुलीनीच शिक्षित व्हावे आणि प्रौढ आणि मागास स्त्रियांनी शिक्षणापासून वंचित राहावे ही बाब त्यांना मान्य नव्हती त्यामुळे प्रौढ आणि मागास वर्गातील स्त्रियांसाठी सन १९१९ मध्ये विशेष गॅझेट हुकूम जारी करून त्याद्वारे अशा शिक्षणोत्सुक स्त्रियांच्या राहण्या-जेवणाची व्यवस्था दरबारकडून मोफत करण्यात आली. हुशार मुलींना पुढील शिक्षणात प्रोत्साहन मिळावे, म्हणून दरबारातून खास शिष्यवृत्त्या ठेवल्या. राजकन्या आक्कासाहेब महाराज यांच्या विवाहाप्रित्यर्थ प्रत्येकी ४० रुपयांच्या एकूण पाच शिष्यवृत्त्या इयत्ता चौथीच्या वार्षिक परीक्षेत सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थिनींना देण्यात येत. यासर्व बाबी पाहता मुलींच्या शिक्षणाबाबत त्यांचे कार्य लक्षात येते.[७]

शाहू महाराजांनी संस्थानातील मुलींच्या उच्चशिक्षणाच्या बाबतीतही उदार दृष्टीकोन ठेवला. राजाराम कॉलेजमध्ये शिकणाऱ्या सर्व मुलींना त्यांनी शिक्षणाची सोय मोफत केले. रखमाबाई यांची मुलगी, कृष्णाबाई यांना महाराजांनी वैद्यकीय शिक्षणासाठी मुंबईच्या ग्रँट मेडिकल कॉलेजमध्ये पाठविले आणि त्यांना डॉक्टर बनविण्यात सहकार्य केले. त्या डॉक्टर होऊन परतल्यानंतर कोल्हापूरच्या एडवर्ड मेमोरियल हॉस्पिटलमध्ये वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी म्हणून नियुक्त केले. पुढे त्यांना उच्च वैद्यकीय शिक्षणासाठी त्यांना इग्लंडला पाठविले आणि उच्चविद्याविभूषित होऊन पुन्हा संस्थानच्या सेवेत रुजू झाल्या. अशा प्रकारे परदेशात वैद्यकीय उच्चशिक्षण घेऊन मायदेशी परतणाऱ्या कृष्णाबाई या दुसऱ्या महाराष्ट्रकन्या होत. पहिल्या डॉक्टर ह्या आनंदीबाई जोशी या होत्या.[८]

यावरून राजर्षी शाहू महाराज आणि त्याची स्त्री शिक्षणासाठी असलेली तळमळ त्यांच्या कार्यातून दिसून येते.

निष्कर्ष :

राजर्षी शाहू महाराजांचा शिक्षण विषयक दृष्टिकोन हा एकांगी स्वरूपाचा नव्हता. तर त्यांनी शिक्षणामध्ये जातिभेद, वर्णभेद किंवा मुला-मुलींमध्ये भेद केला नाही. त्यांनी शिक्षणाचे द्वारे ही सर्व जाती-धर्मासाठी तसेच मुला-मुलींसाठी समानतेने उघडली. शाहू महाराजांनी फक्त प्राथमिक शिक्षणावरच समाधान न मानता मुलीच्या उच्च शिक्षणावर देखील भर दिला. मुलींच्या उच्चशिक्षणाच्या बाबतीत त्यांनी उदार दृष्टीकोन ठेवला. विविध शिष्यवृत्ती आणि आकर्षक भेटवस्तू, इनामे देऊन मुलींना शिक्षणाकडे प्रोत्साहित केले. तसेच प्रौढ शिक्षणाद्वारे महिलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे देखील प्रयत्न केले जेणेकरून महिला सक्षम बनेल. तत्कालीन काळामध्ये महिलांच्या शिक्षणासाठी एवढ्या मोठ्या प्रमाणात कार्य करणारे ते एकमेव राजे होते.

समारोप :

राजर्षी शाहू महाराज हे कृतिशील राजे होते हे त्यांच्या कार्यातून प्रत्येक वेळी सिद्ध झाले आहे. शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात सक्तीच्या आणि मोफत प्राथमिक शिक्षणासाठी स्वतंत्र खाते काढले. त्याला स्वतंत्र डायरेक्टर, एज्युकेशन डायरेक्टर यांची नियुक्ती केली. आणि हे खाते खुद्द आमच्या नजरेखाली राहील असे जाहीर केले. त्यांच्या या वाक्यावरून शिक्षण विषय त्यांच्या दृष्टिकोन लक्षात येतो. फक्त पुरुषवर्गच शिक्षित झाल्याने समाजाची प्रगती होणार नाही तर त्यासाठी स्त्रियांनी देखील शिक्षित होणे गरजेचे आहे. हे त्यांनी तत्कालीन काळात ओळखून स्त्री शिक्षणाच्या वाटा तयार केल्या. स्त्रियांनी शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात यावे यासाठी आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत त्यांनी प्रयत्न देखील केले. यावरून त्यांच्या स्त्री शिक्षण विषयक कार्याची प्रचिती येते.

तळटीपा :

१. जाधव, रमेश: राजर्षी शाहू गौरव ग्रंथ, राजर्षी शाहू चरित्र साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई (२०१६), पृ. ८३८.
२. पवार, जयसिंगराव (संपा.): राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर (द्वितियावृत्ती, २००७), पृ. ६०३.
३. उपरोक्त: जाधव, रमेश, पृ. ८३९.
४. उपरोक्त: पवार, जयसिंगराव, पृ. ९७.
५. देशपांडे, सागर: मासिक जडण-घडण, सप्टेंबर २०१७, पृ. ९.
६. कठारे, डॉ. अनिल - आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास (इ.स.१८१८-१९६०), विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद. दुसरी आवृत्ती जून २०१३. पृ. ४१८.
७. कित्ता - पृ. ४१९.
८. उपरोक्त: पवार, जयसिंगराव, पृ.१००.

संदर्भ ग्रंथ सूची :

१. गाठाळ, प्राचार्य डॉ. एस. एस. – आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास (इ.स.१८१८–१९६०), कैलास पब्लिकेशन्स औरंगाबाद. ऑगस्ट २०२१.

२. पवार, जयसिंगराव (संपा.) – राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, कोल्हापूर, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, २००१.

३. भागवत, दीपक – राजर्षी छत्रपती शाहू महाराज, श्रीपाद प्रकाशन, कोल्हापूर.

४. भोसले, एस. एस. (संपा.) – क्रांतीसूक्ते – राजर्षी छत्रपती शाहू, मुंबई. म. रा. सा. व सं. मंडळ, १९९१.

■■■

ISSN No. 2394-5990

राजर्षी शाहू महाराज यांचे शैक्षणिक व सामाजिक कार्य

प्रा. डॉ. विठ्ठल कल्लापा दळवी
समाजशास्त्र विभागप्रमुख,
कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय,
कोवाड, ता. चंदगड, जि. कोल्हापूर
Email - dalvivithal1976@gmail.com
Mob - 9420355396

प्रस्तावना :

राजर्षी शाहू महाराज यांचे महाराष्ट्राच्या आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक विकासामध्ये मोठे योगदान आहे. बहुजनांसाठी शिक्षण, नोकरी-व्यवसायाच्या संधी, स्त्री शिक्षण, आरक्षण, मल्लविद्या, मराठी रंगभूमीच्या विकासासाठी दिलेले योगदान आणि सर्वात महत्वाचे म्हणजे सामाजिक समतेची धोरणे या सर्वांच्या बाबतीत राजर्षी शाहू महाराजांची दूरदृष्टी स्पृहणीय आणि अनुकरणीय आहे. तत्कालिन सामाजिक, आर्थिक स्थिती, जातीव्यवस्था यांची समीकरणे लक्षात घेऊन कालपरत्वे आपण आखलेल्या धोरणांमध्येही बदल घडवून आणले. त्यांच्या कार्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्व केवळ कोल्हापूर संस्थानापुरतेच मर्यादीत न राहता संपूर्ण महाराष्ट्रात नव्हे तर अखिल भारतातही लोकप्रिय झाले. करवीर संस्थानाची सूत्रे हाती घेण्यापूर्वी करवीर संस्थानाची परिस्थिती कशी होती याबाबत इंग्रज अधिकारी डी. सी. ग्रहम यांनी कोल्हापूर संस्थानाचा अहवाल तयार करताना म्हणतात ''समाजाच्या सर्व वर्गात अज्ञान भरलेले होते, सरदारांना आपली सही करता येत नव्हती, शासकीय नोकरांना साधी पत्रे तयार करता येत नव्हती.'' त्यावेळी कोल्हापूर संस्थानात २२४ शाळा होत्या त्यामध्ये १४८१९ विद्यार्थी शिक्षण घेत होते. संस्थानाची लोकसंख्या नऊ लाख दहा हजार इतकी होती. म्हणजे एकूण लोकसंख्येच्या १.६२ टक्के मुले शिक्षण घेत होती आणि शिक्षणावरील खर्चाचे प्रमाण मात्र फक्त शेकडा ३.७५ टक्के होते. अशी भयानक परिस्थिती कोल्हापूर संस्थानात होती. त्याचाच परिणाम म्हणून समाजात अज्ञान, जाती व्यवस्था, बाल विवाह, केशवपन, सतीप्रथा इत्यादी समस्यांनी थैमान घातले होते. हे सर्व राजर्षी शाहू महाराजांनी जाणले आणि यासर्वातून बहुजन समाजाला मुक्त करण्यासाठी त्यांना शिक्षण प्रवाहात आणण्याचे ठरवून अनेक शैक्षणिक धोरणे तयार केली आणि प्रत्यक्षात अमलातही आणली. असा एक आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात आपल्या शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक कार्याद्वारे बहुजन समाजाला जागृत करुन त्यांची सर्वांगिण क्षेत्रात प्रगती घडवून आणणारे प्रजाहितदक्ष सत्ताधिश म्हणजे राजर्षी शाहू महाराज होय.

उद्दीष्ट्ये :

१) छ. शाहू महाराजांच्या शैक्षणिक कार्याचा अभ्यास करणे.
२) छ. शाहू महाराजांच्या सामाजिक कार्याचा अभ्यास करणे.

संशोधन पद्धती :

सदरचा शोधनिबंध लिहिण्यासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.

तथ्य संकलन :

सदरचा शोधनिबंध लिहिण्यासाठी दुय्यम सामग्रीचा अवलंब करण्यात आला असून यामध्ये प्रकाशित व अप्रकाशित साहित्य, संदर्भ ग्रंथ, नियतकालीके, वर्तमानपत्रे, संकेतस्थळे इ. स्त्रोतांचा वापर करण्यात आला आहे.

राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य :

शिक्षण हे व्यक्ती विकास व समाज विकासाचे साधन आहे. दुःखाच्या दृष्टचक्रातून सुटका करून घेण्याचे ते महत्त्वपूर्ण साधन आहे. शिक्षणातून व्यक्तीचा सर्वांगीण विकास होतो. आपल्या जीवनातील सर्व प्रकारच्या गुलामगिरीतून सुटका करून घेणे आणि सर्व लोकांच्या भल्यासाठी उपयोगी पडणारे ज्ञान मिळवणे यातच खऱ्या शिक्षणाचे महत्त्व सामावलेले आहे. शिक्षणातून शरीर, बुद्धी आणि हृदय यांचा समतोल विकास साधता येतो. हे राजर्षींनी ओळखून कोल्हापूर संस्थानातील अशिक्षित, गरीब, स्त्री-पुरुषांना या शिक्षणाच्या प्रवाहात आणायचे आणि त्यांची अनिष्ट रूढी, परंपरांच्या जोखडातून मुक्तता करावी, त्यांच्यावरील मागासवर्गीय शिक्का पुसून टाकावा. एक माणूस म्हणून त्यांना समाजामध्ये समानतेची वागणूक मिळावी, त्यांच्या हक्क अधिकारांची त्यांना जाणीव व्हावी आणि त्यांची सर्वांगीण उन्नती व्हावी यासाठी छ. शाहू महाराजांनी एक अभिनव प्रयोग केला.

प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे :

आपल्या संस्थानात प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करण्याचा निर्धार केला. प्रत्येक खेड्यात एक एक शाळा स्थापन करायची व त्या शाळेत पगारी शिक्षक न नेमता खेड्यातीलच बहुसंख्य असणाऱ्या समाजातून ङ्गवतनी शिक्षक नेमायचा. त्यासाठी बापूसाहेब महाराजांच्या अध्यक्षतेखाली एक समिती ही स्थापन केली गेली होती. पण या अभिनव प्रयोगाला फारसे यश आले नाही. म्हणून राजर्षींनीं १९१७ मध्ये एक जाहीरनामा प्रसिद्ध केला. त्यामध्ये येत्या गणेश चतुर्थी पासून करवीर इलाख्यात प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करण्याचे आहे. सध्या असलेल्या सर्व प्राथमिक शाळांतील फी सदर दिवसापासून माफ करण्यात येत आहे. सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची नियमावली तयार करण्यासाठी करमरकर, मराठे व प्रा. पंडितराव अशा तीन ब्राह्मण शिक्षण तज्ञांची समिती नेमली गेली. या समितीने तयार केलेल्या नियमावलीमध्ये सक्तीच्या शिक्षणाचा कायदा खास जाहीरनामा काढून प्रसिद्ध करण्यात आला. या कायद्यान्वये शिक्षणात योग्य वयाची मुले शाळेत पाठवण्याची आईबापांवर सक्ती करण्यात आली. त्यांनी तशी पाठवली नाहीत तर त्यांना प्रत्येकी एक रुपया दर महिना दंड करण्याची तरतूद करण्यात आली.

उच्च व व्यवसाय शिक्षण :

प्राथमिक शिक्षणाप्रमाणेच छ. शाहू महाराजांनी माध्यमिक, उच्च माध्यमिक व व्यवसाय शिक्षणास महत्त्व दिले. सन १८५१ मध्ये कोल्हापूर येथे सुरू झालेल्या एका इंग्रजी शाळेचे १९८१ साली राजाराम महाविद्यालयात रूपांतर झाले. तसेच सण १९०३ साली कोल्हापूरात 'ओब्रायन टेक्निकल स्कूल'ची स्थापना करून त्यातून विविध उद्योगासाठी शिक्षणाची व्यवस्था केली.

व्यावसायिक शिक्षण सर्वांना मिळण्यासाठी 'छत्रपती राजाराम औद्योगिक मंदिर' सुरू करून संस्थानातील वेगवेगळे व्यावसायिक शिक्षण घेण्याची सुवर्णसंधी उपलब्ध करून दिली. इतकेच नव्हे तर महाराजांनी ग्रामाचा कारभार व्यवस्थित चालविला जाण्यासाठी 'पाटील स्कूल' व 'तलाठी स्कूल' सुरू करून तलाठ्यांना सर्वसाधारण जमाखर्च, कायदे, शांतता व व्यवस्था, महसूल विषयक दक्षता इ. विषयांचे शिक्षण सुरू केले. त्याचबरोबर त्यांनी विविध धार्मिक संस्कार धर्मशास्त्राप्रमाणे करता यावेत यासाठी 'सत्यशोधक शाळा' स्थापन केली. सन १९१९ मध्ये वैदिक शिक्षण देण्यासाठी श्री शिवाजी वैदिक विद्यालयाची स्थापना करून त्याला 'वैदिक स्कूल' या नावाने ओळखले जायचे. तसेच लोहार काम, सुतार काम, गवंडी काम इत्यादींना तांत्रिक शिक्षण देता यावे यासाठी त्यांनी 'जयसिंगराव घाटगे इन्स्टिट्यूट' स्थापन केले. त्यांच्या शैक्षणिक कार्याचे सूत्र हे सर्वांना समान पातळीवर आणण्याचे होते. हे सर्व करत असताना त्यांनी बनारस हिंदू विश्वविद्यालय, पुण्याची डेक्कन एज्युकेशन सोसायटी इत्यादी शिक्षण संस्थानाही भरीव आर्थिक सहकार्य केले.

विद्यार्थी वस्तीगृह :

छ. राजर्षींनीं तत्कालीन परिस्थितीला अनुसरून पिचलेल्या, ग्रासलेल्या, वंचित, मागासलेल्या या बहुजन समाजाच्या उत्कर्षासाठी सर्वांगीण विकासाचे शस्त्र म्हणून आपल्या संस्थानात माध्यमिक, उच्च माध्यमिक व व्यावसायिक शिक्षण सर्वांसाठी खुले केले. हे शिक्षण बहुजन समाजातील गोरगरीब मुलांना विशेषतः ब्राम्हणोत्तर जातीतील मुलांना ज्यांना शिक्षणाचा अधिकार नाही, ज्यांची आर्थिक परिस्थिती नाही, ज्यांना शिक्षणाचा गंध नाही अशा मुला – मुलींना शिक्षण घेता यावे आणि दूरवरून येणाऱ्या मुलांसाठी राजर्षींनी वस्तीगृहाची स्थापना केली. विद्यार्थी वस्तीगृह कोल्हापूर बरोबरच पुणे, अहमदनगर, नागपूर येथेही स्थापन करण्यात आली. या वस्तीगृहामध्ये महाराष्ट्राबरोबरच गुजरात, आंध्रप्रदेश, कर्नाटक, मध्यप्रदेश या इतर प्रांतातीलही विद्यार्थी राहत होते. वस्तीगृहाच्या माध्यमातून राजर्षींनी शिक्षण क्षेत्रात अद्वितीय स्वरुपाचे विधायक कार्य करून दाखवले. कोल्हापूर शहरात विविध शैक्षणिक सोयी उपलब्ध असल्या तरी त्याचा फायदा खेड्यातील विशेषतः गरीब शेतकऱ्यांच्या मुलांना घेता यावा या हेतूने सण १८९६ च्या सुमारास कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजला संलग्न असे एक बोर्डिंग सुरू करण्यात आले. इतकेच नव्हे तर छ. शाहू महाराजांच्या कारकीर्दीत त्यांच्या प्रेरणेने व पुढाकाराने सन १९०१ ते १९२१ या कालावधीत २० विद्यार्थी वस्तीगृहे सुरू करण्यात आली.

स्त्री शिक्षण :

आपल्या देशातील ब्राह्मणेत्तर वर्गासाठी शिक्षणाची किंकाळी फोडणारा पहिला महापुरुष म्हणून म. जोतिरावांचे नाव घेतले जाते. स्त्रियांना आणि अस्पृश्यांना शिक्षणाच्या सुविधा इंग्रजांनी दुर्लक्षित केल्याबद्दल म. फुलेनी प्रथमच सरकारची कान उघडणी केली. त्यासाठी त्यांनी लॉर्ड मेकॉलेच्या शिक्षण सिद्धांतास कडाडून विरोध केला. त्यांनी सर्वप्रथम स्त्रिया आणि अस्पृश्यांच्या विकासासाठी शाळा उघडल्या. भारतीय समाजात शिक्षणाचे नवे पर्व सुरू केले. स्त्री ही पुरुषाची माता आणि नेताही असते. यासाठी स्त्री शिक्षणाची नितांत गरज असते. एक आदर्श माता, आदर्श पत्नी, आदर्श शिक्षिका, आदर्श सेविका आणि आदर्श नेता व्हावी म्हणून स्त्रीला उपयुक्त अशा शिक्षणाची गरज असते.

ISSN No. 2394-5990

त्यातून स्त्रीमुक्ती होईल आणि तिची सर्व प्रकारच्या गुलामगिरीतून सुटका होऊन तिला स्वावलंबनाने आणि स्वाभिमानाने जगता येईल हे राजर्षींनी जाणले. आपल्या कारकिर्दीत राजाराम महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या स्त्रियांना फी माफीची सवलत जाहीर केली. स्वतःच्या विधवा सूनबाई बरोबरच इतर स्त्रियांना शिक्षण देऊन शिक्षकी पेशाची नोकरी देऊन त्यांना स्वावलंबी बनविले. आणि हजारो स्त्रियांना शिक्षित केले. अनेक मुलींसाठी शाळा, शिक्षण संस्था उभ्या करुन त्याकाळात स्त्री सक्षमीकरणाच्या दिशेने पाऊल उचलले. त्यांच्यासाठी स्वतंत्र वस्तीगृहाची सोय करून खऱ्या अर्थाने स्त्री जीवनाच्या आयुष्यात एक सोनेरी पहाट आणण्याचे शिवधनुष्य या थोर राजाने उचलले.

राजर्षी शाहू महाराजांचे सामाजिक कार्य :

राजर्षी शाहू महाराजांनी वयाच्या विसाव्या वर्षी कोल्हापूर संस्थानाची सूत्रे हाती घेतल्यानंतर सर्वप्रथम सामाजिक समता प्रस्थापित करण्यावर भर दिला. समाजातील जाती-जमाती, अस्पृश्य यांना विश्वासात घेऊन त्यांना आपल्या राज्यकारभारात सामिल करुन घेतले. अस्पृश्यांना प्रशासनात स्थान दिल्याशिवाय त्यांची प्रगती होणार नाही याची जाणीव ठेवून अस्पृशांना आरक्षणासाठी जाहिरनामे काढले. त्यांच्या सर्वांगिण विकासाठी शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही म्हणून त्यांच्यासाठी प्राथमिक व सक्तीचे मोफत शिक्षण देऊ केले. शिक्षणातून अनेक अनिष्ट रुढी, परंपरा, चालीरिती यांना फाटा देण्याचे काम केले. समाजाची अनेक उच्च-कनिष्ट जातीमध्ये विभागणी झाली असून, उच्च जातीकडून कनिष्ठ जातींचे सर्वतोपरी शोषण केले जात होते. कनिष्ठ जाती अक्षरशः गुलामगिरीचे जीवन जगत होत्या. 'जाती व्यवस्था मत्सराला जन्म देते. आणि माणसांना माणसामध्ये विभागून सोडते.' जातीव्यवस्था मानवतेच्या मुलभूत तत्वांच्या विरोधामध्ये असून आपणास खरे स्वराज्य हवे असेल तर ही अन्यायी आणि क्रूर जातीव्यवस्था फेकून दिली पाहिजे. या विचाराने शाहू महाराज सतत संवेदनशील राहिले. उच्च जातीने मागासलेल्या जातींचा द्वेष न करता त्यांच्याप्रती सहानुभूती दाखवून त्यांना प्रेमाने वागविण्याची भूमिका त्यांनी घेतली आणि समाजामध्ये सामाजिक समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न राजर्षी शाहू महाराजांनी केला.

२६ जुलै १९०२ रोजी शाहू महाराजांनी मागास जातींना आरक्षण लागू करण्याचा ऐतिहासिक आणि क्रांतिकारी निर्णय घेतला. करवीर संस्थानातील ब्राम्हण, प्रभू, शेणवी, पारसी व इतर प्रगत वर्ग सोडून मागासलेल्या जातींसाठी ५० टक्के आरक्षण लागू केले. त्यामुळे अनेक सरकारी नोकऱ्यांमध्ये मागास जाती-जमातीच्या लोकांना संधी मिळाली. आणि समाजात सामाजिक न्याय, समता आणि बंधुता प्रस्थापित होण्यास मदत झाली. जातीव्यवस्था उलथवून टाकल्यामुळे उच्च-कनिष्ठ हा भेदभाव संपुष्टात आला. खाने-पिणे, व्यवसाय, रोटी-बेटी व्यवहार, धार्मिक व सामाजिक विशेषाधिकार कनिष्ठ जातीच्या लोकांना प्राप्त झाले. तसेच २२ फेब्रुवारी १९१८ रोजी राजर्षी शाहू महाराजांनी बलुतेदारी पद्धती रद्द करणारा जाहिरनामा काढून बैठे बलुते ही शोषणकारी व्यवस्थाच रद्द करुन टाकली. त्यामुळे अस्पृश्य आणि मागास जातीतील लोकांना आपल्या कौशल्य, गुणवत्ता आणि आवडीनुसार व्यवसाय करण्याची संधी प्राप्त झाली. राजर्षी शाहू महाराजांनी जाती व्यवस्था नष्ट करण्यासाठी आंतरजातीय विवाहाला कायदेशीर मान्यता दिली. तर अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी आपल्या संस्थानातील शाळा, पाणवठे, विहिरी, दवाखाने यासारख्या सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्य लोकांना वावरण्याची संधी दिली. तसेच १९१८ मध्ये देवदासी प्रथेस प्रतिबंध करणारा कायदा पास करुन अनेक माता-भगिनींना देवदासी प्रथेपासून मुक्त केले.

शाहू महाराजांनी पारसी, कंजारभाट, कुचकोरवी, माकडवाले, डोंबारी या भटक्या विमुक्त जमातींच्या स्थिरतेसाठी, विकासासाठी ६०० एकर जागा बक्षिस म्हणून दिली. तर वडार समाजाला खाणीसाठी जागा दिली. कोरव्यांना आपल्या संस्थानात ठेवले. तर फासे पारद्यांची सोनतळी येथे सोय करुन खऱ्या अर्थाने राजर्षी शाहू महाराज हे भटक्या विमुक्तांचे देवच ठरले.

दूरदृष्टीच्या राजर्षी शाहू महाराजांनी संस्थानी समाजाचे जीवनमान उन्नत करण्यासाठी समाजहितौषीच्या आड येणाऱ्या परंपरावादी कर्मठ जातीयता, रुढी, प्रथा, अंधश्रद्धा नाकारल्या. आधुनिक विशेषतः पुरोगामी विचाराने आणि कार्याने मुलभूत सोयी सुविधा उभारण्यात प्राधान्यक्रम दिले. कला कौशल्यावर आधारित येथील व्यापार उद्योगाला गती मिळावी. आणि अर्थाजन व्हावे या उद्देशाने राजर्षी शाहू महाराजांनी पहिले लोककल्याणकारी कार्य हाती घेतले आणि अल्पावधीतच कोल्हापूर-मिरज रेल्वे मार्गाचे बांधकाम पूर्ण केले. शेतकऱ्यांच्या जीवनात हरीतक्रांति आणण्यासाठी म्हणून राधानगरी धरण उभारले. कला, क्रीडा, साहित्य, व्यापार, उद्योगाला विकासाची आधूनिक दृष्टी प्राप्त करुन दिली. अशा द्रष्ट्या महाराजाने कोल्हापूरचे नांव भारतातच नव्हे तर जगाच्या नकाशावर कोरले.

संदर्भसूची :

- डॉ. जयसिंगराव पवार, संपादक: राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, द्वितीयावृत्ती शाहू जयंती २६ जून २००७ भारतीय मुद्रणालय, कोल्हापूर

- माधवी कवी, संपादक: महाराष्ट्राचा सामाजिक इतिहास, मीना चौधरी प्रकाशन, राजपथ अकॅडमी, पुणे २०१८
- प्राचार्य रा. तु. भगत: राजर्षी शाहू छत्रपती (जीवन व शिक्षण कार्य) रिया पब्लिकेशन्स, शाहूपुरी कोल्हापूर, ऑगस्ट २०१६
- प्रा. एन. डी. पाटील, डी. एस. थोरात, डॉ. विश्वनाथ पवार: महाराष्ट्रातील समाज सुधारक, फडके प्रकाशन कोल्हापूर, जानेवारी २०१५
- धनंजय कीर: राजर्षी शाहू महाराज, पॉपूलर प्रकाशन, ताडदेव, मुंबई २००५
- कांबळे प्रविण प्रकाश: आबासाहेब
- राजर्षी शाहूंची सत्वपरीक्षा, मैत्रेयी प्रकाशन, नागाव, हातकणंगे, कोल्हापूर, मार्च २०२२
- प्रा. नानासाहेब साळुंखे: शाहुंच्या आठवणी, वृषाली प्रकाशन, कोल्हापूर, २०१६
- नाईक तु. बा. छत्रपती शाहू महाराज, मेहता पब्लिकेशन हाऊस पुणे.
- जाधव रमेश, लोकराजा शाहू छत्रपती.

■■■

ISSN No. 2394-5990

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची आपत्ती व्यवस्थापनातील प्रासंगिकता

डॉ. गणेश पंढरीनाथ भामे
कॅम्प एज्युकेशन सोसायटीचे
डॉ अरविंद ब. तेलंग वरीष्ठ महाविद्यालय
निगडी प्राधिकरण पुणे ४११०४४
ganeshbhame1@gmail.com, 9595055095

गोषवारा :

अलिकडच्या काळात कोरोना सारख्या महाभयंकर साथीच्या आजारात राजकर्त्यांच्या कृतीबाबत व धोरणांबाबत अनेकदा चर्चा होत असते. नैसर्गिक संकटाच्या काळात राज्यकर्त्यांनी काय करावे हे १२५ वर्षापुर्वीच्या राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी त्यांच्या कृतीतून दाखवून दिले आहे. प्रत्येक राज्यकर्त्याला एक आदर्श पाऊलवाट निर्माण करणाऱ्या या महान राजाचे प्लेग आणि दुष्काळ प्रसंगीचे धोरण समजून घेणे भविष्यातील संकटासाठी आवश्यक ठरेल. राजांनी वैज्ञानिक व व्यवहारवादी कृतींची सांगड घालून प्रतिबंधात्मक उपायांच्या माध्यमातून संकटावर केलेली मात हे आजच्या काळातही व भविष्यातही मार्गदर्शकच ठरणार आहे. राजर्षी छत्रपती शाहु महाराजांना त्यांच्या राज्यकारभाराच्या संपुर्ण कारकिर्दीत केलेल्या लोककल्याणकारी कार्यामुळे भारतातील आदर्श राजांमध्ये अग्रक्रमाने नोंद घेतली जाते. आजच्या राज्यकर्त्यांना त्यांचे कार्य प्रेरणादायी ठरते. नैसर्गिक आपत्तीच्या प्रसंगी राज्यकर्त्यांनी करावयाच्या उपाययोजनांची पायाभरणी राजर्षींनी घालून दिली. १९९७ मध्ये संपुर्ण देशभर पडलेल्या दुष्काळात १० लाखापेक्षा अधिक लोक मरण पावले परंतू कोल्हापूर संस्थानात दुष्काळामध्ये मरण पावलेल्या एकाही व्यक्तीची नोंद आढळत नाही. अन्नधान्य, पाणी, चारा, आणि कामाद्वारे आर्थिक खरेदी क्षमता उपलब्ध करून देऊन बाजारावर ठेवलेले नियंत्रण, व्यापाऱ्यांचा सहयोग, तर साठमारीवर केलेले नियंत्रण यामुळे दुष्काळावर प्रभावीपणे मात करता आली. त्याचप्रमाणे साथीच्या आजारामध्येही यशस्वी उपाययोजना करण्यामध्ये राजर्षींचा आदर्श संपुर्ण जगातील राज्यकर्त्यांनी घेतला पाहिजे. प्लेग, कॉलरा सारख्या आजारांवर पुरेशी औषधे उपलब्ध नसताना पुर्व प्रतिबंधीत उपायांनी साथीचे आजार आटोक्यात आणण्यात राजर्षी छत्रपती शाहू राजांचा उल्लेख केला पाहिजे. व्यक्तींना कॉरंटाईन करण्याची पध्दत राजर्षींनी भारतात पहिल्यांदा यशस्वीपणे राबविली. लोकजागृती, नियमांच्या अमंलबजावणी चे महत्व , प्रशासकीय कठोरता व बाधीतांची सेवा व त्यासाठी गावाबाहेर उभारलेली कॉरंटाईन केंद्रे यामुळे साथीच्या आजारात कोल्हापूर संस्थानात फार मोठी हानी टाळणे शक्य झाले. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे आपत्ती बाबतीत प्रशासकीय धोरण व अमंलबजावणी मधून जनतेबद्दलची आत्मियता व तळमळ जाणवते. आदर्श राजवटीचा प्रयोगशील पायंडा राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी घालून दिला.

प्रस्तावना :

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे १८९४ साली राजारोहन झाले. पुढे २८ वर्षे राज्यकारभार करताना लोककल्याणाचा आदर्श राज्यकर्त्यांपुढे ठेवला. त्यांचा काळात सात वेळा दुष्काळ व दोन वेळा प्लेग अशी नैसर्गिक संकटे कोल्हापूर संस्थानात आली मात्र राजर्षींच्या कार्यामुळे कोल्हापूर संस्थानाला अशा नैसर्गिक संकटांचा जास्त फटका बसला नाही. राजर्षी छत्रपती शाहू यांनी २ एप्रिल १८९४ पासून, म्हणजे राज्याभिषेकापासून वयाच्या अवघ्या २० व्या वर्षी सुरूवात केली. कारण या दिवशी त्यांना 'राजाचे' सर्व अधिकार ब्रिटीश सरकारने बहाल केले.

शाहु राजे कोल्हापूरच्या गादीवर येण्या अगोदर संस्थानचा कारभार ब्रिटीश अधिकार्यांमार्फत आणि नोकरशाहीकडूनच होत होता. काही ब्रिटीश अधिकारी ङ्कअमर्याद सत्तेचे केंद्रफ बनले होते. ब्रिटीशांच्या मनमानी, जुलमी व नियमबाह्य एकतंत्री कारभाराला प्रजा कंटाळली होती. छत्रपती शाहुंच्या राज्याभिषेकामुळे जनतेच्या मनात अन्यायाचे व शोषणाचे हे चित्र बदलण्याची आशा पल्लवीत झाली होती आणि ते चित्र प्रत्यक्षात बदलण्याची जबाबदारी आता राजर्षी शाहू महारांजावर आली होती. सन १८९६ ला संस्थानात मोठा दुष्काळ पडला. त्याच काळात कोल्हापूर संस्थानात आणि आजूबाजूच्या भागात प्लेगच्या साथीचीही लागण झाली. परंतू कुशल नेतृत्व प्रभावी प्रशासन, कार्यक्षम अधिकारी आणि अनुभवी योग्य सल्लागार

यांच्या सहाय्याने त्यांनी या दोन्ही आपत्तींना यशस्वीपणे तोंड दिले. संकट काळात राजा कसा असावा आणि त्याने जनतेला कशी मदत करावी याचा एक आदर्शच शाहु महाराजांनी घालून दिला आहे. दुष्काळात प्रशासनाने जनतेसाठी जे जे करायला हवे ते ते त्यांनी केले. या काळात संस्थानचा खजिना त्यांनी लोकांसाठी वापरला.

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी प्लेगचा सामना करण्यासाठी केलेले उपाय :

राजर्षी सत्तेवर १८९४ मध्ये आले आणि १८९६ साली इंग्रजांच्या अधिपत्याखालील मुंबई इलाख्यात प्लेगाची लागण फार मोठ्या प्रमाणात पसरू लागली होती. प्लेग हळूहळू मुंबई पाठोपाठ पुणे, भिवंडी, कराची, गुजरात या भागातही पसरला. कोल्हापूर संस्थानच्या आजूबाजूला प्लेगचा प्रादुर्भाव वाढू लागला होता. परंतू साथीच्या आजारापासून छत्रपती शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थान वाचविले. मुंबईत प्लेग आल्याबरोबर शाहू महाराजांना याची माहीती मिळाली होती. त्यांनी आपल्या संस्थानात प्लेग येऊ नये म्हणून अगोदरच खबरदारी घेतली.

१. लोकप्रबोधनाचा मार्ग शाहू महाराजांनी अवलंबिला. रोगाबद्दल पूर्ण माहिती, रोग होण्याची कारणे व प्रतिबंधक उपाय याबद्दलची माहिती सर्व जनतेला मिळावी म्हणून शाहू महाराजांनी आज्ञापत्रे काढली. संस्थानातील शिक्षकांनी, ग्राम अधिकारी व इतर खात्याच्या अधिकार्यांनी प्लेग साथीसंबंधीची आज्ञापत्रे लोकांना सांगावयाची, समजून घ्यावयाची व धाक घालवयाचा, असा मार्ग शाहू महाराजांनी अवलंबिला. निरनिराळ्या खात्याच्या प्रचारकांनी व्याख्याने दिली. साथीचे स्वरूप व प्रतिबंधात्मक उपाय लोकांना समजावून दिले. प्लेगच्या साथीबद्दल शास्त्रशुध्द माहिती देणारी हजारो पत्रके संस्थानने विकत घेऊन लोकांमध्ये वाटली व लोकप्रबोधनाची ही मोहीम यशस्वी ठरली.

२. या प्रबोधनाच्या कार्याबरोबरच घराघरांत असणारी अडगळ काढून टाकणे, घरात सर्वत्र हवा खेळती कशी राहील व जास्त सूर्यप्रकाश कसा येईल असे पाहणे, उंदरांची बिळे मुजविणे, उंदीर पकडण्यासाठी सापळे लावणे असा घराच्या स्वच्छतेच्या कार्यासही प्रारंभ केला.

३. शाहू महाराजांनी गॅझेटमध्ये वेळोवेळी जाहीरनामे काढून लोक मोठ्या प्रमाणात एकत्रित येणार नाहीत की, ज्यामुळे साथीचा फैलाव होईल, याची खबरदारी घेतली.

४. संस्थानातील सगळ्या यात्रा बंद केल्या. त्याचप्रमाणे कोल्हापुरातून यात्रेसाठी म्हणून येणाऱ्या जाणार्या लोकांच्यावर बंधन घातले. उदाहरणार्थ ज्योतिबा यात्रा, पंढरपूरला जाणारे वारकरी, सिंहस्थ पर्वणीला जाणारे यात्रेकरू, सौंदत्ती येथील यल्लम्माला जाणारे यात्रेकरू, मक्केस जाणारे यात्रेकरू यांच्यावर प्रतिबंध घातला. इतके उपाय करूनही १८९६ ला मुंबईत पसरलेला प्लेग हळूहळू १८९७-९८ च्या दरम्यान कोल्हापुरात पसरू लागला.

५. हे पाहून कोल्हापुरात प्रवेश करणार्या मुख्य रस्त्यावर क्वारंटाईनची केंद्रे स्थापन केली. शिरोळ पेठा येथील रेल्वे स्टेशन, मौजे किणी पेठा आळते या ठिकाणी प्रथम क्वारंटाईन सेंटर्स उभी केली व हळूहळू सर्व संस्थानभर वाढविली.

६. दररोज रेल्वेने जे उतारू कोल्हापूर शहरात येत असत, त्यांची वैद्यकीय तपासणी होत असे. वैद्यकीय तपासणीशिवाय उतारूंना नगरप्रवेश बंद केला. रेल्वे स्टेशनजवळच तपासणीसाठी एक मोठे केंद्र उघडले. तपासणी चुकवणार्या फसव्या व चुकार लोकांची नावे सांगणार्यास पाच ते पंधरा रुपयांपर्यंत बक्षीस देण्याचा प्रघात सुरू केला. त्यामुळे अनेक चुकार व फसवे लोक सापडले व इतरांना चांगला धडा मिळाला. इतके उपाय करूनसुध्दा गडहिंग्लज, शिरोळ पेठ्यातील १८ गावे प्लेगाने पछाडली.

७. घरातील रोगी हॉस्पिटलमध्ये घालविल्यानंतर घरातील लोकांना तेथून हलवून घर निर्जंतुक करण्यात येई, म्हणून शाहू महाराजांनी अनेक ठिकाणी प्लेग प्रतिबंधक हॉस्पिटल्स सुरू केली.

८. लोकांच्या व अधिकार्यांच्या सहकार्याशिवाय प्लेगग्रस्त रोगी घरातून बाहेर काढणे अशक्य होई. पण शाहू महाराजांना असे दिसून आले की, गावातील लोक व संस्थानातील अधिकारी सुध्दा राजांचे हुकूम पाळण्यास चालढकल करीत आणि म्हणून साथ आटोक्यात येण्याऐवजी फैलावत चालली, म्हणून महाराजांनी आदेश काढला की, 'प्लेगासंबंधात काढलेले हुकूम काटेकोरपणे पाळले नाहीत व त्यांची अंमलबजावणी केली नाही, तर कोणतीही सबब न ऐकता ग्राम अधिकार्याची वतने काढून घेतली जातील.' ही राजाज्ञा होती. पण 'आमची वतने परंपरागत आहेत,' असे म्हणून काहींनी दरबारचा हुकूम दुर्लक्षित केला. हे महाराजांना कळताच तीन अधिकार्यांची वतने जप्त केली व त्यानंतर हुकुमाची

ISSN No. 2394-5990

अंमलबजावणी काटेकोरपणे होऊ लागली. प्लेगचे रोगी दवाखान्यात पाठविले जाऊ लागले. घरे निर्जंतुक करण्यात येऊ लागली व घरातील लोकांना अन्यत्र हलविण्यात येऊ लागले.

९. प्लेगाचा प्रादुर्भाव अधिक असलेल्या गावांतील लोकांना गावच्या बाहेर किंवा मळ्यात वस्ती करण्यास भाग पाडले. गावाच्या बाहेर माळरानावर झोपड्या बांधून झोपडीत राहावे, असा आदेश दिला. अनेक गरीब लोकांना झोपड्या बांधण्याचे साहित्य दरबारने मोफत पुरविले. थोड्याशा ऐपतदार लोकांना अल्प मोबदल्यात दिले. शहरातील लोकांना माळरानावर वस्ती करण्यास पाठविले.

१०. शिरोळ व गडहिंग्लज पेठ्यातील ज्या १८ गावांमध्ये प्लेग पसरू लागला होता, तेथील सर्व लोकांनी रानामळ्यात झोपड्या बांधून गावाबाहेर वस्ती केली. नवीन वस्त्या व गावातील मोकळी घरे यावर पहारा ठेवण्यासाठी व चोर्या-मार्या या प्रकारांना आळा बसण्यासाठी पुरेसे पहारेकरी नेमले.

११. कोल्हापूर शहरातही हळूहळू प्लेग वाढू लागला. राजर्षी शाहूंच्या निवासस्थानी जुना राजवाडा व नवा राजवाडा येथेही प्लेगाचे उंदिर पडले. अशावेळी शाहू महाराज पन्हाळ्यास राहू लागले. महाराजांनी कोटीतीर्थ येथे मोठे प्लेगनिवास केंद्र उभे केले होते व त्यातील रोग्यांची ते दररोज पाहणी करत. महाराज प्लेगमधून लोकांचा बचाव करण्यासाठी खूपच प्रयत्न करत होते.

१२. शाहू महाराज पन्हाळा येथे राहत असले तरी अधूनमधून कोल्हापुरात येत, हॉस्पिटलची पाहणी करत. प्लेग छावणीसाठी आवश्यक असलेले डॉक्टर, परिचारिका, आया व इतर कर्मचारी वर्ग इत्यादींची नियुक्ती स्वत: शाहू महाराजांनी केली.

१३. प्लेगकाळात कोल्हापूर संस्थानच्या बाहेर इतरत्र व्यापार्यांनी धान्याचे भाव वाढविले. पण महाराजांनी मात्र कोल्हापूर संस्थानात व्यापार्यांवर चोख निर्बंध घालून धान्याचे भाव स्थिर राखले, भाववाढ होऊ दिली नाही.

१४. प्लेगमुळे एखाद्या घरातील कर्ता पुरुष बळी पडला असेल, तर त्याच्या निराधार विधवेस व लहान मुलांसाठी सरकारातून पोटगी मिळण्याची तरतूद केली .

१५. अनाथालय उघडून अपंग, आंधळे-पांगळे, अनाथ यांची सोय केली.

१६. प्लेग व दुष्काळी स्थितीमुळे अनेक लोक बेकार झाले होते. अशा बेकार व गरीब लोकांसाठी मोफत अन्नाची सोय महाराजांनी केली

१७. कोल्हापूर संस्थान त्या वेळी प्लेग आणि दुष्काळ या दोन अस्मानी संकटांनी ग्रासलेले होते.शेतकर्यांची स्थिती अत्यंत वाईट बनली होती. प्लेग काळात महाराजांनी शेतकर्यांना 'तगाई' मंजूर करून शेतीची मशागत करण्यास उत्तेजन दिले. गोरगरीब जनतेसाठी कोल्हापूर संस्थानात स्वस्त धान्य दुकाने उघडली.

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे दुष्काळ निवारणासंबंधीचे उपाय :

१८९६ ला संस्थानात मोठा दुष्काळ पडला. त्याच वेळी कोल्हापूर शहरात आणि आजूबाजूच्या भागात प्लेगच्या साथीचीही लागण झाली. १८९६ पासूनच पावसाचे प्रमाण कमी झाले होते. पाऊस कमी झाल्याने जमिनीवरचे आणि जमिनीखालचे पाणी कमी होवू लागले. पाण्याअभावी जमिनी भेगाळून गेल्या. अन्नधान्याबरोबरच चाराही संपू लागला. १८९७ नंतर शेतकर्यांच्या घरातले धान्यही संपू लागले. दररोजच्या जेवणापुरतेही अन्न मिळेनासे झाले. लोक अन्नाच्या व कामाच्या शोधात गावोगावी भटकू लागले. काही लोकांनी गावं सोडून शहराकडे कामधंद्याच्या शोधार्थ प्रस्थान केले. संस्थानातून भिषण दुष्काळाच्या बातम्या शाहु महाराजांपर्यंत पोचू लागल्या तसे ते अस्वस्थ होऊ लागले. यावर प्रभावी उपाययोजना सुरू केली.

या काळात संस्थानचा खजिना त्यांनी लोकांसाठी वापरला. प्रथम त्यांनी तातडीचे अल्पकालीन उपाय योजले आणि लागलीच कायम स्वरूपी दीर्घकालीन योजनाही आखायला सुरूवात केली. दोन्ही उपाय त्यांनी ताबडतोब अंमलात आणायला सुरूवात केली.

१. त्यांनी आपल्या अधिकार्यांना प्रत्यक्ष निरनिराळ्या भागात जावून परिस्थितीची पहाणी करायला आणि ताबडतोब त्याचा अहवाल सादर करण्यास सांगितले. या काळात छत्रपती शाहु स्वत: आपल्या राजवाड्यात बसून ऐकीव माहितीवर विसंबून काम करणारे नव्हते. त्यांनी स्वत: जातीने आपल्या संस्थानात फिरून व लोकांशी संवाद साधून लोकांची पीडा जाणून घेतली. जनतेला आणि आपल्या अधिकार्यांना सतत मार्गदर्शन करून मनोधर्य वाढवित होते. जनतेला उभारी देत होते.

२. खायला पुरेसे अन्न धान्य आणि पिण्यासाठी पाणी या मुलभूत गरजा सर्वसामान्यांच्या असतात. दुष्काळात या दोन्ही गोष्टींचीच खरी उणीव जनतेला जाणवत असते. नैसर्गिक आपत्तीत परिस्थितीचा गैरफायदा घ्यायला काही लोक टपलेलेच असतात. असे लोक त्या काळातही होते. व्यापार्यांनी धान्य गोदामातून साठवायला व दडवून ठेवायला सुरूवात केली. काही काळासाठी दुकानातून

धान्याचे साठेच नाहीसे होवू लागले. हळूहळू बाजारात धान्याचे दर दामदुप्पट होवू लागले. प्रजेची मोठ्या प्रमाणात आडवणूक केली जावू लागली. त्यावर नियंत्रण मिळवणे आणि धान्ये भरपूर प्रमाणात उपलब्ध करून देणे आवश्यक होते. राजर्षी छत्रपती शाहु राजांनी धान्याचे भाव न वाढवण्याचे आणि जास्तीत जास्त धान्य लोकांना उपल्बध करून देण्याचे व्यापार्यांना आवाहन केले. व्यापार्यांनी खरेदी किंमतीलाच धान्य विक्री करावी, असा आदेश काढला. तसे केले तर व्यापार्यांना तोटा होवू शकतो आणि तोटा सहन करून व्यापारी धान्य विक्री करणार नाहीत, याची महाराजांना पूर्ण कल्पना होती. त्यामुळे त्यांनी व्यापार्यांचा तोटा संस्थानाच्या कडून भरपाई करून दिला जाईल असे ही त्या आदेशात नमूद केले. इतकेच करून ते थांबले नाहीत, तर गरजू प्रामाणिक व्यापार्यांना धान्य खरेदी करण्यासाठी दरबाराकडून बीनव्याजी कर्ज देण्याचीही सोय त्यांनी केली. याचा चांगला परिणाम व्यापार्यांवर झाला. व्यापार्यांनी या आदेशाचे पालन करावयास सुरूवात केली. त्यामुळे धान्याचे भाव थोडे कमी झाले. काही व्यापार्यांनी एकत्र येवून एक स्वस्त धान्य दुकान सुरू केले. यातून इतरही काही व्यापार्यांनी प्रेरणा घेवून आपापल्या भागात, गावात स्वस्त धान्य दुकाने सुरू केली. काहींनी खरेदी किंमतीला धान्य विकावयास सुरू केले.

३. संस्थानातील कोठारात, व्यापाऱ्यांकडे धान्य किती उपलब्ध आहे ? ते संस्थानातील लोकांना किती दिवस पुरेल ? याचा आढावा अधिकार्यांना घेण्यास सांगण्यात आले. सत्य परिस्थिती समजल्यावर छत्रपतींनी ब्रिटीश सरकारला सर्व परिस्थितीचा अहवाल पाठविला आणि त्यांच्याकडून धान्याची मदत मिळवली. केवळ ब्रिटीशांवर अवलंबून न रहाता मधल्या काळात त्यांनी म्हैसूरच्या महाराजांनाही धान्य पुरवठा करण्याची विनंती केली आणि त्यांच्याकडूनही धान्य मिळवले. मिळालेल्या धान्याचे वाटप त्यांनी सहकारी संस्था आणि शासकीय यंत्रणेमार्फत करण्यास सुरूवात केली. ते धान्य लोकांपर्यंत योग्य प्रकारे पोचते की नाही हे महाराज जातीने लक्ष घालून पहात असत. तसेच शेजारच्या इतर संस्थानातून आणि प्रदेशातून व्यापार्यांमार्फत धान्य आणण्यात येतच होते ते वेगळेच.

४. धान्य बाहेरून आणले, पण ते घेण्याची कुवत लोकांच्यात असावयास हवी. खिशात पैसे असल्याशिवाय धान्य विकत कसे घेणार ? त्यासाठी लोकांच्या हातांना काम देण्याची गरज होती.

५. धान्य पुरवले पण पाण्याचे काय ? ते कसे आणणार ? त्याकाळात आजच्या सारखे टँकर नव्हते. रस्त्यांचे जाळे नव्हते. त्यामुळे गावोगावी लोकांना पिण्याचे पाणी पुरवणे अवघड काम होते. त्याच बरोबर लोकांना काम देणे, रोजगार उपलब्ध करून देणे ही पण समस्या होतीच. छत्रपती शाहु महाराजांनी या दोन्हीची सांगड घालण्याचा सुंदर आणि खूप दूरवर परिणाम करणारा उपाय शोधून काढला. त्यांनी लोकांना त्यांच्या जुन्या विहीरीतील गाळ उपसणे, विहीरी खोल करणे, त्या रूंद करणे अशा कामात गुंतवून टाकले. जुने बंद पडलेले झरे, काही ठिकाणी गाळ काढल्याने मोकळे झाले. विहीरींना पाणी आले. काही ठिकाणी खोली व रूंदी वाढल्याने विहीरींची पाणी साठवण क्षमता वाढली. ज्यांना विहीरी काढावयाच्या होत्या आणि जे त्यासाठी श्रमदान करण्यास तयार होते, त्यांना संस्थानाकडून काही रक्कम देवून, अशा नवीन विहीरी काढण्यास प्रोत्साहन दिले. यामुळे थोडाफार पाण्याचा प्रश्न सुटला.

पण यातून छत्रपतींनी मात्र एक चांगला धडा घेतला. या कामांनी तात्पुरता प्रश्न सुटला तरी भविष्यात अशी परिस्थिती निर्माण होवू नये, यासाठी काही ठोस काम करण्याची आवश्यकता असल्याचे मनोमन जाणले. त्या दृष्टीने त्यांचे प्रयत्न सुरू झाले. आपल्या राज्यात आणि देशात ८० टक्के लोक शेतावर अवलंबून आहेत हे त्यांना माहित होते . त्यामुळे शेती सुधारली, तरच देश सुधारेल आणि त्याचे निसर्गाच्या लहरीवरचे अवलंबन कमी होईल. पुन्हा भविष्यात दुष्काळ आला तर त्यावेळी आमचा शेतकरी आजच्या सारखा आगतिक होता कामा नये.

६. दुष्काळी कामामध्ये तात्पुरत्या कामाबरोबरच काही कायम उपयोगाची कामेही घेण्यात येवू लागली. त्यात विहीरी खण्याबरोबरच नदी नाल्यांना बांध बांधणे, तलाव बांधणे, जुन्या तलावातील गाळ काढणे, वाहतुकीसाठी रस्ते बांधणे, नदी नाल्यावर पुल बांधणे अशी कामे घेण्यात येवू लागली. संस्थानात एकूण २२ लाख तलाव बांधण्याचे नियोजन करण्यात आले. संस्थानातून पैसा आणि स्थानिक लोकांचे श्रमदान यातून ही कामे करण्यात येवू लागली. त्याचबरोबर जुन्या तलावातील गाळ उपसून तलावांची पाणी साठवण क्षमता वाढवण्यात आली. विशेष म्हणजे यातील अनेक तलाव हे सिंचन तलाव

ISSN No. 2394-5990

असून त्यावर हजारो एकर जमीन ओलिताखाली आणण्यात आली. आज ही या तलावातून सिंचनासाठी पाणी वापरले जाते. या तलावामुळे आणि बंधार्यामुळे गावातील जनावरांचा पाण्याचा प्रश्न सुटला. आपण पाण्याची सोय नेहमी आपल्या दृष्टीनेच करण्याचा विचार करतो. इतर प्राण्यांचा – पक्ष्यांचा विचार आपण क्वचितच करतो.

७. दुष्काळ व नैसर्गिक संकटात खाजगी सावकार संधी शोधत असतात. अडचणीच्या काळात शेतकर्याला जितका नाडवता येईल आणि त्यांच्याकडून त्याच्या अशिक्षितपणाचा फायदा घेवून जितके लुबाडता येईल तितके सावकार लुबाडत असत. जे शेतकरी वेळेत कर्ज फेडू शकत नाही त्यांचे बैल आणि इतर दुभती जनावरे सावकार ओढून नेत. शेती नावावर करून घेत. याला महाराजांनी फतवा काढून मज्जाव केला. सावकाराकडून शेतकरी नाडला जावू नये म्हणून छत्रपती शाहु राजांनी सहकारी सोसायट्या आणि पतपेढ्यांमार्फत शेतकर्यांना कर्ज देण्याची सोय केली.

८. छत्रपती शाहु महाराजांना माहित होते लोकांच्या हातात पैसा असेल, तर लोक आपले प्रश्न आपणच सोडवू शकतील. म्हणून शेतकर्यांना शेतासाठी तगाई देण्याची योजना महाराजांनी आखली. त्याच बरोबर कर्मचारी आणि नोकर लोक जे पगारावर काम करतात त्यांनाही दुष्काळाची झळ पोहचतच असते. तात्पुरत्या वाढत्या महागाईला तोंड देणे त्यांनाही कठीण जाते. अशा अवस्थेत त्यांच्याकडून मनलावून काम करण्याची अपेक्षा तरी कशी करणार ? हे ओळखून अशा कामगार नोकर वर्गासाठी धान्याच्या रूपात दुष्काळ भत्ता सुरू केला.

९. दुष्काळात तरूण लोक गाव सोडून शहरात रोजगाराच्या शोधात जाऊ लागले पण वृध्द, अपंग, आंधळे, पांगळे, आजारी रूग्ण व्यक्तींना गाव सोडणे शक्य नव्हते. अशा दुबळ्या लोकांची काळजी घेण्यासाठी छत्रपती शाहु महाराजांनी करविर संस्थानात सन १८९६-९७ या काळात एकूण ९ निराधार आश्रम चालू केले. ते कोल्हापूर बरोबरच गारगोटी, बाजारभोगाव, कटकोळ, बांबवडा, पन्हाळा, गडहिंग्लज, वळीवडे आणि तिरवडा येथे स्थापण्यात आले. त्यानंतर सन १८९९ – १९०० या काळात आणखीन २ निराधार आश्रम वडगाव व शिरोळ येथे सुरू करण्यात आले. या आश्रमांमधून खरोखर गरजू आणि गरीब लोकांनी आसरा घेतला होता. या आश्रमामध्ये त्यांच्या कपड्या पासून औषधपाण्यापर्यंत सर्व गरजा भागवल्या जात होत्या. या काळात जवळ जवळ ४८,७५० लोकांनी या आश्रमांचा लाभ उठवला असल्याचे दिसून येते. पण जे या आश्रमापर्यंत पोचू शकत नव्हते त्या गरजू अपंग, रोगी व्यक्तींसाठी महाराजांकडून त्यांचा शिधा त्यांच्या घरी पोचता केला जात असे.

१०. रस्त्यांच्या कामावर येणार्या तरूण स्त्री – पुरूषांच्या बरोबर त्यांची लहान मुलेही असत. ती कामाच्या ठिकाणीच बाजूला झाडाझुडपाच्या सावलीला किंवा उन्हातच ठेवलेली असत. त्यांच्याकडे पहायला कुणी नसे. अशा मुलांची काळजी घेण्यासाठी कामाच्या ठिकाणीच शिशुसंगोपनगृहे सुरू केली. या संगोपन गृहात मुलांची काळजी घेण्यासाठी संस्थानच्या खर्चाने आयांची नेमणूक केली. त्या मुलांच्या, खाण्या पिण्याची, दुधदुभत्याची आणि औषधांची व्यवस्थाही केली.

११. शाहू महाराजांच्या नजरेत दुष्काळात चार्याचे दुर्भिक्षामुळे, पाण्याविना जनावरे मरताना दिसली. राजर्षी शाहू महाराजांनी ज्या शेतकऱ्यांना केवळ चारा हवा होता त्यांना संस्थानातर्फे स्वस्त दराने चारा उपलब्ध करून द्यायला सुरू केले. इतकेच करून ते थांबले नाहीत, तर छत्रपती शाहु महाराजांनी असा फतवा काढला की ज्यांना स्वत:ची जनावरे सांभाळणे कठीण होत आहे त्यांनी आपली जनावरे संस्थानाच्या छावणीत आणून सोडावीत आणि जेव्हा मालकाला ती परत न्यावीशी वाटतील तेव्हा त्यांने ती घेवून जावीत. छावणीत आहेत तो पर्यंत त्या जनावरांचे संगोपन संस्थान करेल. छावणीत सोडलेली जनावरे परत नेत असतांना, आपली जनावरे दुसर्यांनीच नेल्याचे अनेकांना कळले. अशा लोकांना नवीन जनावरे संस्थानातर्फे देण्याची महाराजांनी व्यवस्था केली. तसेच, छत्रपतींनी संस्थानातर्फे अनेक विभागात जनावरांच्या छावण्या सुरू केल्या, त्या छावण्यात लोकांना आपली जनावरे आणून सोडण्यास सांगितले. त्यांच्या संगोपनाची जबाबदारी संस्थानाने घेतली. ज्यांना आपली जनावरे छावण्यापर्यंत नेणे शक्य नव्हते त्यांना आजूबाजूच्या गावकर्यांना सवलत देण्यात आली. अपार दु:खी असलेल्या शेतकर्यांना धीर देण्याचे काम राजांनी केले.

१२. दुष्काळ निवारणासाठी संस्थानच्या प्रशासनात स्वतंत्र कचेरी उघडणारे कदाचित छत्रपती शाहु महाराज एकमेव संस्थानिक असावेत. त्यांनी हुजुर कार्यालयातच 'दुष्काळ निवारण विभाग' सुरू केला आणि त्याचे अधिकार म्हणून संस्थानाच्या दिवाणांचीच नेमणूक केली. निव्वळ

कोल्हापूरातच कचेरी काढून ते थांबले नाहीत तर त्यांनी सर्व संबंधित मामलेदार कचेर्यांत सुध्दा खास दुष्काळ निवारण विभाग सुरू केला. त्या विभागामार्फत लोकांना दुष्काळ निवारणासाठी लागणारी उपकरणे, हत्यारे, अवजारे आणि इतर साधने पुरवली जात. या साहित्याच्या खरेदीवर एका वर्षात त्यावेळी २६,००० रूपयांहून अधिक खर्च करण्यात आला होता. साधने किंवा उपकरणे नाहीत म्हणून लोकांना शेतीची, विहीरींची किंवा रस्त्याची कामे देतांना अडचण येवू नये, याची पूर्ण खबरदारी घेतली जात असे हे यावरून दिसून येते.

१३. राजर्षी शाहू महाराजांनी सदहेतुने आणि सदभावनेने केलेल्या योजनांमध्ये त्याकाळी काही लोकांनी भ्रष्टाचार करण्यास सुरूवात केली. जे पुराव्यासह सापडले त्यांना महाराजांनी घरी पाठवले, परंतू जे सापडले नाहीत त्यांच्यावर वचक बसवण्याची संधी मात्र राजांनी सोडली नाही. आपल्या रोजगार हमी कामाच्या पध्दतीत बदल केले. जुन्या चुका पुन्हा होणार नाहीत याची खबरदारी घेतली. शाहू महाराजांनी नवीन आदेश काढला की कुणालाही त्याच्या रहात्या गावात दुष्काळाचे कामावर ठेवले जाणार नाही. त्यांना लांबच्या गावात जावून काम करावे, याचे कारण होते ज्याला खरोखरच कामाची गरज असेल तो कामावर येईल. तसेच स्थानिक लोकांकडून मस्टरमध्ये होत असलेले घोटाळेही कमी होतील. दुसरा निर्णय होता मजुरी अदा करण्यासंबंधी. जसे काम केले जाईल त्या प्रमाणेच दाम दिला जाईल असे महाराजांनी जाहीर केले. एक व्यक्ती किंवा व्यक्तींचा गट जितके ब्रास काम करेल त्यानुसार त्यास मजुरी दिली जाईल.

१४. छत्रपती शाहु महाराज केवळ दुष्काळ निवारणाचे काम करून थांबले नाहीत. त्यांनी दीर्घकालीन दुष्काळ निवारण योजना राबवण्याचे नियोजन करावयास सुरूवात केली. त्यांच्या मते, आपला शेतकरी कष्टाळू आहे. पण त्याच्याकडे आधुनिक शेतीचे ज्ञान नाही. कारण पुरेसे शिक्षण नाही. म्हणून त्यांनी ग्रामीण भागातील प्राथमिक शिक्षणावर भर दिला. त्यांनी १४ वर्षे वयापर्यंतच्या मुलामुलींसाठी प्राथमिक शिक्षण मोफत केले. त्यांनी मुलांच्या शिक्षणाइतकीच मुलींच्या शिक्षणालाही प्राथमिकता दिली. त्यातही त्यांनी गावपातळीवर दिल्या जाणार्या शिक्षणामध्ये शेतीशास्त्राचे स्वतंत्र अभ्यासक्रम राबवले. जेणे करून शेतकर्यांच्या मुलांना व्यावसाईक शिक्षण प्राप्त होईल.

१५. दुष्काळासारख्या नैसर्गिक आपत्तींना तोंड देण्यास जनता सदैव तयारच असली पाहिजे. या विचारांनीच त्यांनी 'द किंग एडवर्ड ॲग्रिकल्चरल इन्स्टिट्यूट' ची स्थापना केली. या संस्थेमार्फत शेतकर्यांच्या मुलामुलींना सुधारित बियाणे, खते, कीटकनाशके, उपकरणे साधने आणि आधुनिक शेती पध्दतींची माहिती करून देण्याची त्यांची योजना होती.

१६. राजर्षी शाहू महाराजांनी सुधारित शेती अवजारांचे एक 'संग्रहालय' स्थापन केले. त्याच्या माध्यमातून शेतकर्यांना लागणारी अवजारे मोफत दिली जात. आधुनिक रासायनिक खते शेतकर्यांत वाटली जात. या आधुनिक गोष्टींचे प्रशिक्षण देण्यासाठी महाराजांनी तज्ज्ञ डेमॉन्स्ट्रेटर्स नेमले होते. लोकांचा विश्वास वाढावा म्हणून महाराजांनी या आधुनिक वस्तुंचा वापर करून शेती कशी करावी हे दाखवण्यासाठी राजाराम हायस्कूलशी सलग्न एक नमुना शेत तयार केले. या सर्वांचा परिणाम लगेच दिसू लागला, शेतकरी या आधुनिक पध्दतींचा वापर करून शेती करू लागले.

१७. दुष्काळाला हटविण्यासाठी आधुनिक शेती करणे आवश्यकच आहे. पण आधुनिक शेती करायची असेल, तर तिला खात्रीशीर पाणी मिळेल याची व्यवस्था करणे अत्यंत आवश्यक आहे. हे ही शाहु माहाराजांनी ओळखले होते. म्हणूनच विहीरी, तलाव यांच्या बरोबरच त्यांनी नदीनाल्यांवर बांध आणि धरण बांधण्यास सुरूवात केली. विहीरीसाठी शेतकर्यांना कर्ज देवू केली. सर्वात महत्वाचे म्हणजे ब्रिटीश सरकार कडून त्यांनी भोगावती नदीवर फेजिवडे येथे 'राधानगरी धरणाची योजना' मंजूर करून घेतली आणि आपल्याच देखरेखीखाली १९०७ ला त्याची पायाभरणीही केली. १९१७ पर्यंत निम्मे धरण पूर्ण करून घेतले. परंतू पहिल्या महायुध्दामुळे धरणाचे काम थांबले. त्यानंतर छत्रपती शाहु महाराजांचे चिरंजीव छत्रपती राजाराम महाराज यांचे कारकीर्दीत धरण पुर्ण झाले. या धरणामुळेच अनेक ॲग्रो इंडस्ट्रीज कोल्हापूर जिल्ह्यात उभ्या असून आजही या जिल्ह्याला दरडोई उत्पन्नामध्ये देशात अगदी वरच्या स्थानावर विराजमान होण्याचा मान मिळवून दिला आहे.

१८. राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानातील शेतकर्यांना सक्षम करण्यासाठी आधुनिक शेती करण्यास उद्युक्त केले आणि त्यांच्या उत्पादनांना बाजारपेठ मिळावी म्हणून कोल्हापूरात मोठ्या बाजारपेठाही सुरू केल्या. त्यासाठी शेजारच्या प्रांतातून सक्षम व्यापार्यांना बोलावून

ISSN No. 2394-5990

त्यांना सर्व सवलती देवून, त्यांना सन्मानाने आपल्या संस्थानात सामावून घेतले. संस्थानातील महत्वाचे रस्ते, पुल त्यांनी बांधलेच पण जिथे ब्रिटीश प्रदेशातील रस्ते व पुल बांधणे संस्थानाच्या दृष्टीने आवश्यक होते तेथे तेही बांधले. त्यासाठी त्यांनी रेल्वे सारखे त्याकाळचे अत्यंत आधुनिक दळणवळणाचे साधन संस्थानाच्या खर्चाने कोल्हापूरात आणले. त्यामुळे कोल्हापूरचे शेती उत्पादन देशाच्या कानाकोपर्यात जावू शकले.

सारांश :

राज्यकर्त्यांच्या कामगिरीचे मुल्यमापन संकटप्रसंगी ते कसे वागतात, काय करतात आणि शांततेच्या, सुबत्तेच्या काळात ते नाविण्यपुर्ण कृती करतात का यावरून केले जाऊ शकते.

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी १८९४ मध्ये कोल्हापूर संस्थानचा कारभार पाहावयास सुरुवात केली होती. नुकतेच राज्यावर आले होते. त्या काळी सामाजिक व राजकीय परिस्थिती अनुकूल नव्हती आणि आर्थिक परिस्थिती तर फारच प्रतिकूल होती. कारभारात राजर्षी शाहू महाराजांनी लक्ष घालावयास सुरुवात केली होती. तोच दुष्काळ, प्लेग यांची चाहूल लागली. अवघ्या बावीस वर्षांच्या वयात त्यांनी ज्या पध्दतीने दुष्काळासह प्लेगच्या साथीला धैर्याने व जनतेबद्दल वाटणाऱ्या तळमळीतून तोंड दिले ते प्रेरणादायीच आहे. त्या काळी आजच्या हजारपट लोक अंधश्रधाळू होते. ९५ टकक्यांच्या वरती निरक्षरता होती. अशा काळात शाहू महाराजांनी वैज्ञानिक दृष्टिकोनाने प्लेग या साथीवर मात केली. प्लेगची बातमी देणार्यांना बक्षिसे देण्यात आली. प्लेगपीडित लोकांच्या निरीक्षणासाठी छावण्या काढण्यात आल्या. आपल्या प्रजाजनांना प्लेगच्या तावडीतून बाहेर काढण्यासाठी महाराजांनी जे अविरत प्रयत्न केले, त्याबद्दल ब्रिटिश अधिकार्यांनीही महाराजांचे अभिनंदन केलेले दिसते.

'त्या' भयंकर प्लेगच्या दिवसांत महाराजांनी स्वस्त धान्याची दुकाने उघडली, अनाथालये सुध्दा उघडली. लोकांमध्ये निर्माण झालेली बेकारी निवारण्यासाठी सरकारी कामे सुरू करून बेकारीला आळा घालण्याचा प्रयत्न केला. खेड्यापाड्यात स्वच्छता राखली. पिण्याचे पाणी दूषित होऊ नये, म्हणून खबरदारी घेतली. लोकांचे आरोग्य सांभाळण्यासाठी सरकारी खर्चाने फुकट औषधोपचार केले. त्या काळात यात्रा स्थगित केल्या. दुर्बल आणि गरीब जनतेला अन्न मोफत पुरवण्यात आले. अन्नधान्य उत्पन्न वाढविण्यासाठी शेतकऱ्यांना शिक्षण व प्रशिक्षणही दिले. शेतकऱ्यांना अवजारे, खते, बियाणे व जणावरेही दिली. शेतकर्यांना 'तगाई' मंजूर केली.

अलिकडच्या काळात देशात कितीही मोठा दुष्काळ पडला तरी कोल्हापूर संस्थानाचा परिसर मात्र सुजलाम असतो. त्याचे कारण छत्रपती शाहु महाराजांनी राबवलेल्या या सर्व योजना आहेत. हे इथले प्रत्येक शेतकरी मान्य करतो.

दुष्काळ निवारणाबरोबरच छत्रपती शाहु महाराजांनी पहिल्या ङ्हरित क्रांतीफ्चा पाया घातला. म्हणून त्यांना 'हरित क्रांतीचे आद्यजनक' ही मानण्यात येते. या कामयस्वरूपी योजना छत्रपती शाहु महाराजांनी केल्यामुळे आजचा कोल्हापूरचा शेतकरी सधन आहे आणि दुष्काळास तोंड देण्यास सक्षम आहे. तेव्हा या राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या कामापासून आजही आपण चांगला धडा घ्यावा यातच समाजाचे हित आहे.

संदर्भ ग्रंथ :

१. राजर्षी शाहू गौरव ग्रंथ संपादक प्रा. डॉ रमेश जाधव, प्रकाशक महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग, सचिवालय, मुंबई २०१६.
२. क्रांतिसूक्ते राजर्षी छत्रपती शाहू, संपादक डॉ एस एस भोसले. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई प्र.आ. १९७५, पुनर्मुद्रण २०१७.
३. राजर्षी छत्रपती शाहू महाराज विचार आणि कार्य, प्रा. डॉ. शिरीष पवार, सह्याद्री प्रकाशन, पुणे, २०१२.
४. महाराष्ट्र चरित्र ग्रंथमाला, छत्रपती शाहू महाराज, भा. ल. भोळे, गंधर्व वेद प्रकाशन, २०१०.

■■■

छत्रपती राजश्री शाहू महाराज यांचे आरक्षण विषयक धोरण: एक ऐतिहासिक अध्ययन

डॉ. प्रज्ञा कामडी
इतिहास विभाग प्रमुख
नगर परिषद शिवाजी महाविद्यालय, मोवाड
ता. नरखेड, जि. नागपूर - ४४१३०३
ई-मेल: profkamdi47@gmail.com
मोबा: ९४२२१४४२०३

सारांश :

शाहू महाराजांनी आरक्षणाची सुरवात केली. त्यांना आरक्षणाचे जनक म्हणतात. डॉ. आंबेडकरांनी घटनेत त्याचा उल्लेख करून आरक्षणाला एक नवीन दिशा दिली. परंतु भारतामध्ये आरक्षणावरून आजही राजकारण होताना दिसते. किंबहुना अनेक जातीचे लोक आरक्षणाची मागणी करीत आहेत. या आरक्षणाची सुरुवात आधीपासूनच झालेली आहे. आर्य हिंदुस्थानात आल्यानंतर समाजामध्ये ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र असे वर्ण निर्माण करून त्यातील शूद्र लोकांना म्हणून अन्याय करीत राहिले. ब्रिटिश भारतात आल्यानंतर शिक्षणाची सुरुवात करून शिक्षणामुळे समाजातील वाईट रूढी. प्रथा, परंपरा दूर करण्याची जाणीव येथील शिक्षित वर्गाला होऊ लागली. त्यामुळे अनेक भारतीय लोकांनी अस्पृश्य निवारण करणे व त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी काम केले आहेत. सत्यशोधक समाज, आर्यसमाज, ब्राह्मो समाज इत्यादी अनेक संस्थांनी अस्पृश्यता निवारणासाठी अनेक प्रयत्न केले. त्यातून अस्पृश्यांनीसुद्धा आत्मोद्धाराची चळवळ उभी केली. कारण समाजामध्ये अनेक ठिकाणी अस्पृश्यांवर अन्याय होत होता, त्यांना माणुसकीची वागणूक मिळत नव्हती, त्यांना जनावरांच्या पलीकडे अन्यायाला बळी पाडले जात होते. त्यामुळे १९व्या शतकातील अनेक विचारवंतांनी, संस्थांनानी त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आरक्षणाची तरतूद केली. प्रस्तुतु लेखात शाहू महाराजांचे आरक्षण विषयक धोरणावर प्रकाश टाकण्यात आला आहे.

बिजसंज्ञा : शाहू महाराज, छत्रपती शाहू, आरक्षण, आरक्षणाचा इतिहास, शाहू चे सामाजिक कार्य

प्रस्तावना:

प्राचीन काळापासून समाजात वर्णभेद अस्तित्वात आहे. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र असे हे चार वर्ण शूद्रांना त्या काळापासूनच सामाजिक, आर्थिक, आणि शैक्षणिक सुविधा व गरजपासून कायमचे दूर ठेवण्यात आले होते, समाजतील या चतुर्वर्णीय परिस्थितीत बदल घडून आणण्यासाठी महात्मा फुले सारख्या थोर समाजसेवक यांनी पुढाकार घेतला. महात्मा फुले यांनी १८८२ मध्ये हंटर शिक्षण आयोगाला आरक्षणाबाबत निवेदन दिले. २६ जूलै १९०२ मध्ये म्हणजे आज जवळपास १२० वर्षाआधी कोल्हापूर संस्थानाचे राजे छत्रपती शाहू महाराज यांनी संस्थानातील त्यांचे प्रशासनात ५० टक्के जागा ह्या मागासलेल्या जाती साठी राखून ठेवण्याचा मोठा ऐतिहासिक निर्णय घेतला होता आरक्षणाबाबतचा हाच जाहीरनामा करवीर गॅझेटमधून प्रसिद्ध करण्यात आला होता. त्यानंतर क्रम लागतो तो डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा त्यांनी मागासवर्गीयांना शासनाच्या सकारात्मक हस्तक्षेपाद्वारे एक प्रकारची संरक्षक भिंत उभी करून भारताच्या राज्य घटनेंत तश्या तरतुदी केल्या. त्याचा परिणाम आज आपण सगळेच बघतो आहोत. अनुच्छेद १४ पासून ते अनुच्छेद १६ (४ ख) या संविधानातील तरतुदीचा उल्लेख करावा लागेल.

आरक्षणाचा घटनात्मक मार्ग शाहू महाराजांच्या धोरणाने दाखवला. भारतामध्ये अनेक संस्थाने होती. प्रत्येक संस्थानामध्ये आरक्षण धोरण राबविले नाही; परंतु काही पुढारलेल्या संस्थानामध्ये आरक्षणाचे तत्त्व स्वीकारण्यात आले. म्हैसूर संस्थानमध्ये ब्राह्मण लोकांचे वर्चस्व होते. त्याविरोधात ब्राह्मणेतर लोकांनी चळवळ सुरू केली होती. त्यानुसार म्हैसूर संस्थानामध्ये १८७४ साली मध्यम व खालच्या स्तरातील पोलीस विभागातील २०% जागा ब्राह्मणासाठी व ८०% जागा या मुस्लीम व ब्राह्मणेत्तर हिंदू व ख्रिश्चनासाठी राखीव ठेवण्यात आल्या होत्या. पुढे म्हैसूरच्या महाराजांनी सरन्यायाधिश सर लेस्सी मूलर यांच्या अध्यक्षतेखाली ७ सदस्यांची २३ ऑगस्ट १९९८ रोजी समिती स्थापन करून आरक्षण देण्यासाठीचा अहवाल सादर करण्यात

ISSN No. 2394-5990

आला. त्यानुसार या समितीने १९१९ साली आपला अहवाल सादर केला, त्यामध्ये त्यांनी ब्राह्मणेतर व मागासवर्गीयांसाठी ५०% जागा राखीव ठेवाव्यात, अशी शिफारस केली. तसेच अय्यर या सदस्यांनी मागासजातीपैकी प्रत्येक जातीसाठी तिच्या संख्येच्या प्रमाणात जागा राखून ठेवाव्यात, अशी त्यांनी सूचना केली. मूलर समितीने समाजाचे तीन भाग करून ब्राह्मण, अन्य सवर्ण हिंदू, मुसलमान व भारतीय ख्रिश्चन व निराश्रित किंवा बहिष्कृत वर्ग (डिप्रेस्ड क्लासेस) आणि ब्राह्मणेतर अशी विभागणी केली होती.

छत्रपती शाहूंचे सामाजिक कार्य :

छत्रपती शाहू महाराज यांच्या सामाजिक कार्यामुळे त्याचे नाव सर्वदूर पोहचत असतानां त्यांचे विरोधकही वाढायला सुवात झाली होती. अश्यावेळी त्यांनी कणखरपने सांगितले कि मी गादी सोडू शकतो पण माझे सामाजिक कार्य कदापी सोडणार नाही. त्यांनी दिलेल्या आदेशात स्पष्ट म्हटले होते कि राज्यातील कोणत्याही कार्यालय आणि ग्राम पंचायतमध्ये दलित आणि मागासवर्गीयांसह समानतेचे व्यवहार झाला पाहिजे. अस्पृश्यता सहन केली जाणार नाही. दलित लोकांना पण तेवढाच मान आणि न्याय मिळाला पाहिजे. समाजाच्या उन्नतीसाठी भेदभाव सर्वात मोठी बाधा आहे. जाती आधारित संघटनांचे निहित स्वार्थ असतात आणि अश्या संघटनां वाव देण्यापेक्षा त्यांना संपवणे गरजेचे आहे असे त्यांचे मत होते. जातीभेद मिटविण्यासाठी शाहू महाराजांनी एका अस्पृश्य गंगाधर कांबळे कडून चहाची दुकान उघडवली आणि लोकांना संदेश देण्यासाठी ते स्वत: त्या चहाच्या दुकानात जाऊन चहा प्यायचे. ज्यावेळी ते स्वतः महाराज असून अस्पृश्य आणि जाती मानत नाही तर जनतेनेही मानायला नको हा त्या मागचा मोठा संदेश होता.

शाहू महाराज सामाजिक न्यायचे पुरस्कर्ते होते. त्यांची लोक ही संकल्पना राजकीय समाजशास्त्राच्या दृष्टिकोनातून समावेशक स्वरूपाची आणि व्यापक प्रकारची होती कारण त्यांनी लोक या संकल्पनेत अनुसूचित जाती, भटक्या व गुन्हेगारी जमाती, महिला, मुस्लीम आणि उच्च जाती यांचाही समावेश केला कृषी क्षेत्रातील लोक व्यापारी क्षेत्रातील लोक आणि मध्यमवर्गीय लोक यांचे हितसंबंध त्यांच्या राज्यसंस्थेमध्ये जपले होते. रयत म्हणजे अर्थातच बहुसंख्य प्रजा असा शाहूंचा विचार होता. शाहूंच्या काळात लोक या संकल्पनेची चर्चा सुरू झाली होती. महात्मा फुले यांनी शूद्रातिशूद्रांचा लोकसंकल्पनेत समावेश केला होता. ब्रिटिश सरकार वसाहतीतील प्रजेचा लोक या संकल्पनेत समावेश करत नव्हते. दादाभाई नौरोजी यांनी वसाहतीतील प्रजेचा लोक या संकल्पनेत समावेश केला. लोक या विचाराला शाहू महाराजांनी विकसित केले. त्यांनी वडरूड आणि रजपूत, भामटा समाजातील लोकांना घरासाठी जागा उपलब्ध करून दिली. डोंबाऱ्याना पण जागा आणि काम दिले. कुंचीकोरवी लोकांना शिकारखान्यात नोकरीवर ठेवले. कोरव्यातल्या रामू नावाच्या मुलाला आखाड्यात आणून त्याला कुस्तीगीर बनविले. अत्यंत खतरनाक असे लाल्या व आरबा नाईक या फासे पारध्यांच्या प्रमुखांना त्यांनी खास पहाऱ्यावर ठेवून घेतले. फासे पारध्यांच्या कुटुंबाना त्यांनी घरे बांधण्यासाठी जागा दिली.

आरक्षणाचा इतिहास :

राजाराम मोहन राय यांनी गरीब मजुरांकरिता रात्रीच्या शाळा सुरु केल्या. मुंबईमध्येही अस्पृश्य विद्यार्थ्यांसाठी शाळा स्थापन केल्या होत्या. परंतु अनुकूल परिस्थिती नसल्यामुळे त्या बंद पडल्या. महात्मा जोतिराव फुले यांनी पुणे येथे १८४८ साली मुलींची पहिली शाळा सुरू केली होती. १८५२ साली अस्पृश्यांसाठी पहिली शाळा फुलेंनी स्थापन केली. ही भारतामधील अस्पृश्यांसाठी सुरू केलेली पहिली शाळा होय. भारतातील अस्पृश्यता निवारणासाठी विठ्ठल रामजी शिंदे, शाहू महाराज, सयाजीराव गायकवाड, डॉ. बाबासाहेब आंबेडकर इत्यादी विचारवंतांनी आपल्या विचारातून आणि कृतीतून अस्पृश्यता निवारण्याचे कार्य केले आहे.

भारतामध्ये प्रत्येक संस्थानामध्ये आरक्षण धोरण राबविले नाही; परंतु काही पुढारलेल्या संस्थानामध्ये आरक्षणाचे तत्त्व स्वीकारण्यात आले. म्हैसूर संस्थानामध्ये १८७४ साली मध्यम व खालच्या स्तरातील पोलीस विभागातील २०% जागा ब्राह्मणासाठी व ८०% जागा या मुस्लीम व ब्राह्मणेत्तर हिंदू व ख्रिश्चनासाठी राखीव जागा ठेवण्यात आल्या होत्या. पुढे म्हैसूरच्या महाराजांनी सरन्यायाधिश सर लेस्सी मूलर यांच्या अध्यक्षतेखाली ७ सदस्यांची २३ ऑगस्ट १९१८ रोजी स्थापन करून आरक्षण देण्यासाठीचा अहवाल सादर करण्यात आला. त्यानुसार या समितीने १९१९ साली आपला अहवाल सादर केला, त्यामध्ये त्यांनी ब्राह्मणेतर व मागासवर्गीयांसाठी ५०% जागा राखीव ठेवाव्यात, अशी शिफारस केली.

अय्यर या सदस्यांनी मागासजातीपैकी प्रत्येक जातीसाठी तिच्या संख्येच्या प्रमाणात जागा राखून ठेवाव्यात, अशी त्यात सूचना केली. मूलर समितीने समाजाचे तीन भाग करून ब्राह्मण, अन्य सवर्ण हिंदू, मुसलमान व भारतीय ख्रिश्चन व निराश्रित किंवा बहिष्कृत वर्ग आणि ब्राह्मणेतर अशी विभागणी केली होती. मद्रास प्रांतामध्ये १९२७ साली पी. सुब्बराय यांनी कम्युनल गव्हमेंट ऑर्डरची अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेतला. ब्राह्मणेतर हिंदूंना ४४%, ब्राह्मण मुस्लीम व ख्रिश्चन यांना प्रत्येकी

१६% व अनुसूचित जातीसाठी ८% जागा राखीव ठेवण्यात आल्या. त्रावणकोर संस्थानामध्ये १४ जून १९३६ रोजी कायदेमंडळ व सरकारी नोकरीमध्ये लोकसंख्येनुसार सामाजिक आरक्षण देण्यात आले. बडोदा संस्थानामध्ये सयाजीराव गायकवाड यांनी अस्पृश्यता निवारण करण्यासाठी १८९१-९२ साली अस्पृश्य मुलां- मुलींसाठी स्वतंत्र वसतिगृहे सुरू केले. अस्पृश्यांसाठी शाळाही सुरू केल्या, त्यांना शिष्यवृत्ती देण्यात आल्या. अशाप्रकारे भारतामध्ये सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी त्रावणकोर, म्हैसूर, मद्रास इत्यादी प्रांतामध्ये आरक्षण धोरण स्वीकारले गेले. राजकीयदृष्ट्या लोकांना आरक्षण हवे होते ते १९०९ मध्ये झालेल्या मोर्ले-मेंटो सुधारणा कायद्यामध्ये मुस्लिमांना स्वतंत्र मतदारसंघ देण्यात आला. मुस्लिमांचे राजकीय महत्त्व पाहून लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षा जास्त प्रतिनिधित्व देण्यात आले. त्यामुळे शीख, अँग्लो इंडियन, हरिजन ख्रिश्चन इत्यादींनी स्वतंत्र मतदारसंघाची मागणी करण्यात आली. १९१९ साली मॉंटेग्यू-चेम्सफोर्ड सुधारणा कायदा करण्यात आला. त्या कायद्यानुसार केंद्रीय कनिष्ठ कायदेमंडळात एकूण १४४ सभासद होते. त्यामध्ये ४१ सरकारनियुक्त व १०३ निर्वाचित समावेश होते.

शाहूंचे आरक्षण विषयक धोरण :

राखीव जागांचं धोरण अंमलात आणणारे शाहू महाराज हे पहिले भारतीय राज्यकर्ते ठरले. म्हणूनच शाहू महाराजांना आरक्षणाचे जनक म्हणतात. आरक्षण धोरण राबविणे इतके सोपे नव्हतेच. पहिल्यांदाच आरक्षण धोरण राबवताना त्यांना अनेक अडचणींना सामोरं जावं लागलं. आरक्षण धोरण नेमकं राबवायचं कसं, नोकऱ्यांत मागासवर्गीयांचं प्रतिनिधित्व वाढवण्यासाठी नेमकी प्रक्रिया कशी राबवायची? या सर्व बाबींचा गाढा अभ्यास करून शाहू महाराजांनी त्याचा उपाय काढला काढला. मागासवर्गीयांचं जिथे सध्या ५० टक्क्यांहून कमी प्रतिनिधित्व आहे, अशा ठिकाणी नोकऱ्यांमध्ये मागसवर्गीयांनाच प्राधान्यानं भरती करण्याची तरतूद केली आणि आपल्या संस्थानात आरक्षण धोरण राबवायला सुरवात केली आणि इथूनच खरी आरक्षण धोरणाला सुरुवात झाली असे म्हणता येईल.

आज देशात जे आरक्षण धोरण राबवण्यात येतंय. त्याची पाळंमुळंही आपल्याला शाहू महाराजांच्या १२० वर्षांपूर्वीच्या या दूरदृष्टीमुळेच. जे लोक आरक्षण धोरणाला विरोध करतात त्यांना शाहू महाराजांनी सव्वाशे वर्षांपूर्वीच जोरदार चपराक लगावली. भारत स्वतंत्र झाल्यानंतर स्वराज्य मागणीच्यावेळी मागासजातीनी सत्तेत आपला योग्य वाटा मिळविण्यासाठी राखीव जागांची मागणी करावी असे राजर्षी शाहू महाराजांचे मत होते. आपल्या संस्थानात त्यांनी मागासजातींसाठी ५० टक्के जागा राखीव ठेवल्या होत्या. लोकशाहीचे तत्त्व व स्वराज्याची मागणी योग्य असली, तरी सत्तेचे योग्य वाटप करण्यासाठी व ते एका पुढारलेल्या जातीच्या हाती सत्ता जाऊ नये, असे त्यांचे म्हणणे होते. आम्ही स्वराज्यास पात्र झाले पाहिजे आणि ज्या कारणामुळे आमचे स्वराज्य गेले त्या कारणांचा तिरस्कार केला पाहिजे, भारतात जातिसंस्था पूर्णतः नष्ट केल्याशिवाय येथे खरे स्वराज्य नांदणार नाही असे त्यांचे मत होते. म्हणून ते म्हणतात, सत्ता केवळ अल्पसंख्यांक उच्चवर्गीयांच्या हातात जाण्यात स्वराज्याचे पर्यवसान होऊ नये म्हणून निदान दहा वर्षे तरी आम्हाला प्रतिनिधी निवडून देण्याचा हक्क असला पाहिजे. यामुळे आमचे हक्क काय आहेत, याचे आम्हाला शिक्षण मिळेल. जातवार प्रतिनिधी देण्याचा हक्क नसल्यामुळे आमच्या म्युनिसिपालटीचा शोचनीय अनुभव आमच्यापुढे आहे. ब्राह्मणाच्या हाती जर आपणास स्वराज्याची सत्ता जाऊ द्यायची नसेल, तर आपल्या अधिकाराबाबत जागृत व्हा, असे त्यांचे म्हणणे होते. शाहू महाराज म्हणतात, सर्व जातीतील लोक पुढे येऊन त्यांना सामाजिक, औद्योगिक, शिक्षणविषयक, सरकारी नोकरी वगैरे बाबतीत आपआपली जबाबदारी पूर्ण करण्याचे सामर्थ्य येणे यास मी जातवार प्रतिनिधित्व म्हणतो. यात कोणाचाही द्वेष अपेक्षित नसून याद्वारा मागासजाती स्वतःच्या ताकदीवर पुढे नेण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यांना कडेवर घेऊन जाऊ नका, पण उत्तेजन द्या, प्रतिबंध करू नका. कारण आमची धडपड आमच्या अंगी शक्ती येण्यासाठी आहे. राजर्षी शाहू महाराजांनी यासाठी जातवार प्रतिनिधित्वाची मागणी केली. मद्रासमध्ये काँग्रेस पक्षाविरुद्ध जस्टीस पार्टीचे जे राजकारण होते ते मुंबई इलाख्यात सुरू करण्याचा त्यांचा बेत होता. त्यामुळे ब्राह्मणेतरांची परिषद भरवून ही सत्ता वाटपाची चळवळ यशस्वी चालवा असे त्यांचे मत होते.

सद्यास्थितीतील आरक्षण व सरकारची नीती :

आज सध्या आरक्षणाची जी दशा आपल्या देशात आहे त्यावरून राज्य सरकार व केंद्र सरकार आरक्षण विरोधी असल्याचे चित्र स्पष्ट दिसून येत आहे. राजकारण्यांच्या झगड्यात आरक्षणाचा मुद्दा मागे पडत आहे. महाराष्ट्रात ओबीसी चे आरक्षण रद्द झाले. मराठा समाज आरक्षण मागत असताना सुद्धा आरक्षणाची मर्यादा वाढवली जात नाही याकडे ना राज्य सरकारचे लक्ष आहे ना केंद्र सरकारचे . सगळेच पक्ष आता आरक्षण विरोधी आहेत कि काय असा समज व्हायला लागला आहे. राजर्षी शाहू महाराजांनी २६ जुलै १९०२ रोजी आरक्षणाचा आदेश काढला. त्यानंतर आरक्षणाला सुरुवात झाली. शाहू

ISSN No. 2394-5990

महाराजांची आठरापगड जातींना आरक्षण देऊन मुख्यप्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या आरक्षणाला घटनात्मक संरक्षण दिलं. शाहू महाराजांनी काढलेला आदेश असा की 'महाराज सरकार असा हुकूम करतात की, हा हुकूम पोहोचलेल्या तारखेपासून रिक्त झालेल्या जागांपैकी शेकडा ५० जागा मागासलेल्या लोकांस भराव्या. ज्या ऑफिसमध्ये मागासलेल्या वर्गाच्या अंमलदाराचे प्रमाण सध्या शेकडा ५० पेक्षा कमी असेल तर पुढची नेमणूक या वर्णातील व्यक्तीची करावी. या हुकमाच्या प्रसिद्धीनंतर केलेल्या सर्व नेमणुकांचे तिमाही पत्रक प्रत्येक खात्याच्या मुख्याने सरकारकडे पाठवावे. मागासलेल्या वर्णाचा अर्थ ब्राह्मण, प्रभू, शेणवी, पार्शी व दुसरे पुढे असलेले वर्ण खेरीज करून सर्व वर्ण असा समजावा.'

भारताच्या लोकसंख्येमध्ये, अनुसूचित जातींची लोकसंख्या सुमारे १६.२% आहे. अनुसूचित जातींची परिस्थिती सुधारण्यासाठी शासन चिरस्थायी व सातत्याने प्रयत्न करत असूनही, या सामाजिक गटाचे वर्गीकरण मानवी विकासाच्या कोणत्याही मापदंडात आजही भारतीय समाजातल्या सर्वात गरीब व खालच्या दर्जामध्ये होते. अनुसूचित जातींची निम्म्याहून अधिक लोकसंख्या उत्तरप्रदेश, तामिळनाडू, बंगाल, बिहार आणि आंध्र प्रदेशमध्ये केंद्रित आहे. आर्थिक व सामाजिक अपवर्जन व जातीच्या आधारे होणारे भेदभाव या ऐतिहासिक प्रक्रियांशी या गटाची वंचितता संबंधित आहे. या गटाच्या विशेष अडचणी ओळखून, शासनाने गेल्या काही वर्षात, त्यांच्यातल्या मानवी क्षमता आणि कार्यकुशलतेला आकार देण्यासाठी, सातत्याने अनेक उपक्रम व धोरणे तयार केली आहेत. शासनाच्या अनुसूचित जातींबद्दलचा दृष्टिकोन घटनेतल्या तरतुदींमधून तयार झाला आहे. यामध्ये आरक्षण मागणीच्या इतिहासाची कालपरिक्रमा अजून संपलेली नाही. सध्या भारतात अनेक जातीसमूह नव्याने आरक्षणाची मागणी करताना दिसत आहेत. धनगर, मराठा, जाट, गुज्जर, मुस्लिम, पाटीदार हे त्यापैकी काही घटक. महाराष्ट्रामध्ये राज्य सरकारने महाराष्ट्र अधिनियम ६२ अनुसार ३० नोव्हेंबर २०१८ च्या कायद्यान्वये राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या मराठा समाजाला नव्याने १६% आरक्षण प्रदान केले. त्यामुळे राज्यातील आरक्षणाचे प्रमाण आता ६८% पर्यंत पोहोचले आहे. तसेच केंद्रसरकारने १०३ वी घटनादुरुस्ती कायदा २०१९ पारित केला आहे. त्याद्वारे घटनेच्या कलम १५ व १६ मध्ये सुधारणा करून अनुच्छेद १५ मध्ये खंड (६) चा समावेश करून खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी १०% आरक्षण लागू केले आहे. हा आरक्षणाच्या मागणीतील आतापर्यंतच्या शेवटचा टप्पा असला तरी भविष्यकाळात आरक्षण मागणीचे लढे आस्तित्वात असणारच आहेत.

वरील सर्व घटना घडामोडींचा ऐतिहासिक धांडोळा घेतला असता तसेच सध्या नव्याने होत असलेल्या आरक्षणाच्या मागण्या यातून एक गोष्ट ठसठशीतपणे दिसते. प्रत्येक अल्पसंख्यांक व मागास जातीसमूहांना आपल्या सर्वांगीण प्रगतीचे रहस्य आरक्षणातच दडलेले आहे असे वाटते.

निष्कर्ष :

शाहू महाराजांनी दिलेले ५०% आरक्षण आजही कायम ठेवण्यात आले आहे. सर्वोच्च न्यायालयाने पन्नास टक्क्यांची मर्यादा घातली आहे. महात्मा फुले यांनी सक्तीच्या शिक्षणाचे विचार मांडले आणि शाहू महाराजांनी मोफत व सक्तीचे शिक्षण देणारा कायदा १९१७ साली संमत केला. परंतु भारत स्वतंत्र झाल्यानंतर केंद्र सरकारने २००२ साली ८६ वी घटना दुरुस्ती करून कलम २१ (अ) नुसार प्राथमिक शिक्षणाच्या मूलभूत अधिकाराचा समावेश केला. त्यानुसार ६ ते १४ वयोगटातील बालकांचा प्राथमिक शिक्षणाच्या मूलभूत अधिकारांचा समावेश असलेला आणि त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देण्यासाठी केंद्रशासनाद्वारे ४ ऑगस्ट २००९ रोजी मोफत व सक्तीचे शिक्षण देणारा अधिनियमित संमत केला आणि भारतीय संविधानाच्या कलम २१ (अ) अंतर्गत १ एप्रिल २०१० पासून लागू करण्यात आला. लोकशाही, समता, सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी प्राथमिक शिक्षण महत्त्वाचे आहे, याचा विचार करण्यात आला. याचे श्रेयही शाहू महाराजांना जाते. शाहू महाराजांनी मराठा व तत्सम जातींना राखीव जागा ठेवण्याचा आग्रह धरला. आज मराठा आरक्षणासाठी अनेक नेते कार्यरत आहेत. अनेक मागासजाती या आरक्षणाच्या धोरणामुळे शिक्षण घेऊन नोकरी करीत आहेत. भारतातील आरक्षण व्यवस्था प्रचंड क्लिष्ट आणि गुंतागुंतीची आहे. जगातील बहुधा कोणत्याही देशात एवढी जटिल आरक्षण व्यवस्था नसेल. आरक्षण मागणीच्या इतिहासाची सुरवात जर आपण हंटर कमीशन १८८२ पासून केली तर आज या लढ्याला १२५ वर्षे उलटून गेल्याची दिसतात, तरीसुध्दा अजूनही काही समाज घटक आरक्षणाच्या मागणीसाठी संघर्ष करीत आहेत. म्हणजे आज अखेरपर्यंत सुध्दा सरकारने केलेल्या आरक्षणाच्या आकृतीबंधावर समाजातील काही घटक असंतुष्ट असल्याचे दिसून येते. तरीसुध्दा आरक्षणाचा इतिहास अभ्यासताना भारतीय मागास समाजाने व त्यांच्या नेतृत्त्वाने जो चिवट आणि सातत्याने लढा दिला त्याचे फलस्वरूप म्हणून त्यांना या आरक्षणाचे लाभ मिळत आहे. स्वातंत्र्यपूर्व असो किंवा स्वातंत्र्योत्तर काळ असो हा लढा त्यानी

चिवटपणे, सातत्याने लढला. याच काळात होवून गेलेले अनेक आयोग, कमिट्या, अभ्यासगटांनी देखील आपल्या अहवालांमध्ये मागासलेपणाचे वस्तुनिष्ठ चित्रण केल्यामुळेच आरक्षणाचा हा लढा इथंपर्यंत पोहोचला.

संदर्भ :

१. भगत रा. तू. (२००३), राजश्री शाहू छत्रपती जीवन व शिक्षण विषयक कार्य, सिध्दराज प्रकाशन, पुणे

२. भणगे र. पा (२०१६), आरक्षणाची वाटचाल आणि ओबीसी आरक्षण , डायमंड पब्लिकेशन, पुणे

३. ढेरे रा. चि . (२०१६), राजश्री शाहू गौरव ग्रंथ, महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग कोल्हापूर

४. पानसरे गोविंद (२०१०), राजश्री शाहू : वास आणि वारसा, श्रमिक प्रतिष्ठान, कोल्हापूर

५. पाटील टी. एस. (२०१२), राजश्री शाहू छत्रपती, श्रमिक प्रतिष्ठांन, कोल्हापूर

६. पवार जयसिंगराव (२०१४), राजश्री शाहू महाराज : जीवन व कार्य, ताराराणी बुक सर्विस, कोल्हापूर

७. पवार जे. के. (२०२०), बालकल्याणाचे प्रणेते राजश्री शाहू महाराज, राजप्रकाशन, कोल्हापूर

■■■

ISSN No. 2394-5990

छ. शाहु महाराज यांचे शैक्षणिक कार्य : आजची प्रासंगिकता

सहयोगी प्राध्यापक इंगळे किशोरकुमार मनोहरराव
लोकप्रशासन विभाग प्रमुख,
दगडोजीराव देशमुख कला वाणिज्य व
विज्ञान महाविद्यालय (बजाजनगर) मोरे चौक,
वाळुज, ता. गंगापूर, जि औरंगाबाद. २३११३६
मो.नं. ९४०३४०५२३०, Email ID - kishoringle07@gmail.com

सारांश :

कुठल्याही समाजाचा परिपुर्ण विकास करण्यासाठी शिक्षणाची व ज्ञानाची नितांत गरज असते. यासाठी राज्यातील जनता ज्ञानी व सुशिक्षीत असणे अत्यंत गरजेचे असते. देशाचा सर्वांगिण विकास, सामाजिक परिवर्तन, प्रशासकीय सुधारणा, राजकीय, आर्थिक विकास होण्यासाठी समाज सुशिक्षित असणे आवश्यक आहे. असे असेल तर देशाचा चहुबाजूनी विकास शक्य आहे. या सर्व बाबीचा विचार करुनच छ. शाहु महाराजांनी शैक्षणिक क्षेत्रात आमुलाग्र बदल आणि सुधारणा घडवुन आणण्यास सुरुवात केली. छ.शाहु महाराजांनी सत्तेत आल्याबरोबर शैक्षणिक धोरण जाहिर करुन आपल्या कार्यास खऱ्या अर्थाने सुरुवात केल्याचे दिसून येते. पुर्वी ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद या तीन वेदांना ङ्गपवित्र त्रयीफअसे म्हटले जात होते. समतेच्या आधुनिक यूगात मात्र म. फुले, छ. शाहु महाराज व डॉ. आंबेडकर ही खऱ्या अर्थाने ङ्गपवित्र त्रयीफअसल्याचे दिसते. छ. शाहु महाराज हे उच्च दर्जाचे असुन ही त्यांनी केलेले शैक्षणिक, सामाजिक, कृषी, आरक्षण या अनूषंगाने केलेले कार्य उल्लेखनिय ठरते.

कि नोट : छ. शाहु पुर्व शैक्षणिक स्थिती, छ. शाहु महाराज यांचे शैक्षणिक कार्य, प्रासंगिकता, निष्कर्ष, सारांश.

प्रस्तावना :

छ. शाहु महाराज यांनी समाजसुधारणेसोबतच मानवी जीवनाच्या धर्म, उद्योग, व्यापार, साहित्य, नाट्य, संगीत मल्लविद्या या सारख्या क्षेत्रात भरीव कामगिरी केल्याचे दिसते. भारताच्या सांस्कृतिक इतिहासामध्ये विश्वामित्र व जनक यांच्यानंतर राजर्षी, ही पदवी फक्त छ. शाहु महाराजांना होती. १९१९ मध्ये उत्तरप्रदेशातील कुर्मी छत्रियांच्या परिषदेत त्यांना ङ्गराजर्षीफ ही पदवी बहाल करण्यात आली होती. अस्पृष्यता निवारण, सक्तीचे व मोफत शिक्षण, वस्तीगृहाची स्थापना, दुष्काळ व साथींच्या रोगावर केलेले उपाय, आंतरजातीय विवाहास मान्यता, फासेपारधी समाजाचे पुर्नवसन यासारख्या बाबी मधुन छ. शाहु महाराजांच्या स्वभावातील विविध पैलुचे दर्शन घडते. स्वत: राजे असुन ही त्यांना पुरोहिता पासुन मानसिक व धार्मीक छळ सहन करावा लागला.

छ. शाहु महाराज पूर्व शैक्षणिक परिस्थिती :

ज्ञान हे सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक परिवर्तनाचे साधन असुन ऐहिक समृध्दि व सत्तेचे उगमस्थान आहे. हे फक्त ब्राह्मण व उच्चवर्णीयांना माहित होते. यामुळे यांनी बहुजन समाजाला शिक्षणाचा अधिकार नाकारुन चहुकडुन त्यांची नाकाबंदी केली. स्मृती, शास्त्र पुराणे, वेद याद्वारे त्यांनी खालच्या समाजाला शिक्षणापासून पूर्णपणे वंचित केल्याचे दिसते.

शिक्षणामुळे समाजाचा सर्वांगीण विकास होतो. प्रजा शहाणी बनते. असे त्या काळातील राज्यकर्त्यांना विश्वास नव्हता. या विचारसरणीमुळे त्या काळातील राज्यकर्ते शिक्षण विषयक जबाबदारीतून स्वत:ला मूक्त समजत. ही आपली जबाबदारी नाही असे त्यांना वाटत असे. राजा ब्राम्हणवर्गाच्या पुढे मान झुकवून राज्यकारभार हाकीत होते. परिणामी शिक्षण हे सर्वांनाच उपयोगी आहे. याची जाण फक्त ब्राम्हण वर्गालाच होती. यामुळेच बहुजन वर्ग सुशिक्षित झाल्यास आपल्या अधिकाराला व पदाला धोका होऊ शकतो. याची त्यांना जाणीव असल्याने त्यांनी पूर्व नियोजित योजनेनुसार या समाजाला शिक्षणापासुन वंचित ठेवण्याची रणनिती आखल्याचे दिसते. ब्राम्हण वर्ग स्वत:च्या मूलावर देखील जातीयतेचे संस्कार करीत होते. शिक्षण घेणे म्हणजे पाप आहे असे खालच्या वर्गावर बिंबवले जात असल्याने तो ही वर्ग स्वेच्छेने शिक्षण घेत नव्हता.

इंग्रजांनी आपल्या आग्लं संस्कृतीबरोबरच भारतात आगमन केले. या संस्कृतीमध्ये स्त्री समानता होती. जातीयता व विषमता यांना आजिबात थारा नव्हता सर्वाना समान संधीचा अधिकार होता. ही आग्लं संस्कृती यंत्र, विज्ञान यावर निष्ठा ठेवणारी होती. या काळात शिक्षण सर्वांसाठी खुले करण्यात आले. या काळातच स्त्री ही शिक्षणाबरोबरच इतर क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने

कार्य करीत होती. इंग्रजामुळे खऱ्या अर्थाने खालपर्यंत शिक्षण मिळण्यास सुरुवात झाली. परंतु यांचा म्हणावा तसा परिणाम येथील समाजावर झाला नाही. ब्रिटीशाच्या आगमनामूळे शिक्षण तळागाळापर्यंत पोहचले त्यांनी फक्त त्यांना आवश्यक असणाऱ्या बाबींचे शिक्षण येथील जनतेला दिले. शिक्षणामुळे येथील वंचित समाज आपली राजवट उलथून टाकेल या भितीपोटी त्यांनी शिक्षणाचा म्हणावा तसा प्रचार व प्रसार केला नाही.

छ. शाहु महाराज यांचे शैक्षणिक कार्य :

छ. शाहुंनी राज्याची सुत्रे हाती घेतली तेंव्हा शिक्षणाची आवड बहुसंख्य लोकात नव्हती. शिक्षण फक्त श्रीमंत ब्राम्हण व सावकारासाठीच असते अशी समज होती. स्मृती पूराण, शास्त्र यांनी मागासलेल्या लोकांना शिक्षणाची दारे कायमची बंद केली होती. ती राजर्षी शाहुंना खूली करावयाची होती. यासाठी त्यांनी आपल्या संस्थानामध्ये शिक्षण सर्वांना मिळावे यासाठी विशेष प्रयत्न केले. शिक्षण घेऊन करायचे काय? हा प्रश्न सामान्य जनतेमध्ये होता. अशा पार्श्वभूमिवर राजर्षी शाहुनी शैक्षणीक कार्यास प्रारंभ केला. शिक्षणाशिवाय व्यक्तीचा, समाजाचा, राष्ट्राचा विकास होऊ शकत नाही. सत्ता हाती येताच त्यांनी जनतेला सुशिक्षित करण्यासाठी खालील शैक्षणिक केल्याचे दिसून येते.

१. मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणावर भर :

ज्ञानरुपी शिक्षण हे सर्व सामाजिक, आर्थिक, नैतिक, राजकीय, धार्मीक सुधारणेची गुरुकिल्ली आहे. याची जाणीव ठेवून छ. शाहुनी त्यांच्या संस्थानामध्ये मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याचा निर्णय घेऊन तसा आदेश काढला. मूलांना सक्तीने शाळेत पाठविण्याचा फतवा त्यांनी १९१७ मध्ये काढला. मुलांना सक्तीने शाळेत न पाठवणाऱ्या पालकांना त्यांनी दंड आकारण्यास सुरुवात केली. प्राथमिक व माध्यमिक शाळांची संख्या वाढविली शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना पारितोषिक व शिष्यवृत्या देण्यात येऊ लागल्या. एकंदरीत मोफत व सक्तीच्या शिक्षणामुळे गोरगरीब, वंचित समाज या वर्गातील मूले शिक्षण घेऊ लागली.

२. उच्च व व्यवसाय शिक्षणासाठी प्रयत्न :

छ. शाहुंनी प्राथमिक शिक्षणाबरोबरच उच्च व व्यावसायिक शिक्षणालासुध्दा अतिशय महत्त्व दिल्याचे दिसते. कोल्हापुर संस्थानामध्ये त्यांनी एका इंग्रजी शाळेचे रुपांतर राजाराम महाविद्यालयात केले. व्यावसायिक व तांत्रिक शिक्षणाला चालना देण्यासाठी त्यांनी जयसिंगराव घाटगे टेक्नीकल इन्स्टीट्युटची निर्मिती केली.

३. मुस्लीमाच्या शिक्षणासाठी प्रयत्न :

तत्कालीन परिस्थितीत एक ब्राम्हण समाज सोडला तर सर्व जातीधर्माचे समूह हे शैक्षणिकदृष्टया मागासलेले होते. मुस्लीम वर्गाला शिक्षण देण्यासाठी छ.शाहुंनी त्या समाजातील दहा मुलांना मराठा बोर्डींगमध्ये प्रवेश दिला. १९०६ मध्ये त्यांनी मुस्लीमांच्या शिक्षणासाठी मोहम्मेडन एज्युकेशन सोसायटीची स्थापना करुन त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस मदत केली.

४. मागासवर्गीय शिक्षण :

मागासवर्गीयांच्या उन्नतीचे साधन शिक्षण हेच आहे. याची जाणीव छ. शाहूंना होती. मागासवर्गीयांच्या शिक्षणासाठी विशेष बाब म्हणून त्यांनी २८ मे १९१३ रोजी विशेष तरतूदी असलेला आदेश काढला. या आदेशात खालील बाबींचा समावेश असल्याच दिसून येतो.

१. कोल्हापूर संस्थानामध्ये प्रत्येक खेड्यात शाळा असावी.
२. ज्या गावात ज्या जातीचे लोक बहुसंख्य असतील त्या गावात त्याच जातीचा शिक्षक नेमला जावा.
३. सर्व शिक्षणकांचा समावेश वंशपरंपरागत ग्रामीण सेवकांच्या यादीव करावा.
४. ग्रामीण भागात शाळा भ्रविण्याची ठिकाणे ही मंदीर किंवा चावडया असतील.

वरील बाबींवरुन हे लक्षात येते की, शिक्षणाबरोबरच त्यांना अस्पृश्यता सुद्धा नष्ट करणे गरजेचे वाटत होते. यासाठी त्यांनी शिक्षणाचे ठिकाण सार्वजनिक जसे मंदीर, चावडी असेल हे सांगितल्याचे दिसून येते.

५. अस्पृश्यांसाठी शाळा :

छ. शाहूनी मागास दलित वर्गाची मानसिक व सामाजिक गुलामगिरीतून सुटका करण्यासाठी अथक प्रयत्न केले. त्यांच्या शिक्षणासाठी स्वतंत्र शाळा स्थापन केल्या. परंतु यामुळे जातीयता कमी न होता वाढतच गेली. ही बाब जेव्हा त्यांच्या निदर्शनास आली तेव्हा या शाळा त्यांनी बंद केल्या. या मुलांना सरकारी शाळेत दाखल करुन घेण्याचे आदेश काढले. यामुळे उच्च वर्णीयांची व मागास वर्गाची मुले एकमेकांत मिळून मिसळून राहू लागली.

६. विद्यार्थ्यांसाठी वस्तीगृहाची निर्मिती :

१८९७ सालच्या दुष्काळामध्ये त्यांनी सर्व जाती धर्माच्या मुलासाठी एका वस्तीगृहाची निर्मिती केली. यामध्ये त्यांच्या जेवणाची सोय करण्यात आली. परंतु येथे ही अस्पृश्यता पाळली जाऊ लागल्याने त्यांनी जाती निहाय वस्तीगृहाची स्थापना करुन त्या समाजाला शिक्षण घेण्यासाठी प्रेरीत केले.

ISSN No. 2394-5990

७. शिक्षक प्रशिक्षण वर्ग :

अध्ययन व अध्यापन या दोन क्रिया शैक्षणिक प्रक्रियेमध्ये अतिशय महत्त्वाच्या असतात. शिक्षक जर गुणवत्ता पुर्वक असेल तर विद्यार्थ्यांना चांगल्या दर्जाचे शिक्षण मिळू शकते. शिक्षकांच्या गुणवत्ता वाढीसाठी त्यांनी शिक्षक प्रशिक्षण योजना अंमलात आणली. शिक्षकांसाठी प्रशिक्षण व मेरीट बढती पद्धत त्यांनी सुरु केली. प्रशिक्षणासाठी ६ महिन्याची निमपगारी रजा देण्याची तजविज केली.

८. स्त्री शिक्षणास प्रोत्साहन :

स्त्री शिक्षण हा विषय त्या काळात पुरोगामी स्वरुपाचा होता. बहुजन समाजाप्रमाणेच स्त्री जीवनाच्या शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक, धार्मिक, राजकीयदृष्ट्या मागासलेपणाची जाणीव शाहूंना होती. यासाठी त्यांनी मुलींना फी माफ केली. फिमेल ट्रेनिंग स्कूलमध्ये भारतीय शिक्षिकेची नेमणूक केली. मुलींसाठी स्वतंत्र शाळा काढली. गुणवत्ताधारक व होतकरु मुलींसाठी शिष्यवृत्ती जाहिर केली. मुलींच्या शिक्षणासोबतच त्यांनी प्रौढ महिलांच्या शिक्षणावर विशेष भर दिला. मागास जातीमधील शिक्षण घेण्यास उत्सुक असलेल्या महिलांसाठी विशेष आदेश काढले. पिढ्यानपिढ्या ज्या संस्कृतीने स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नाकारला त्यांना तो अधिकार परत मिळवून देण्याचा प्रयत्न छ. शाहूंनी केल्याचे दिसून येते.

वरील बाबीवरून हे दृष्टीक्षेपास येते की, शिक्षणामुळे कसे व किती बदल होऊ शकतात याची जाणीव छ. शाहूंना होती. त्याच बरोबर राष्ट्र उभारणीत शिक्षणाचे व शिक्षित समाजाचे योगदान अतिशय मोलाचे ठरते. याची त्यांना जाणीव होती. शिक्षणाच्या माध्यमातून त्यांनी नवराष्ट्र निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

तात्कालीन प्रासंगिकता :

आज देश स्वतंत्र होऊन अनेक वर्षे लोटली. देशाने लोकशाही पद्धतीचा स्वीकार केला. स्वत:चे संविधान निर्माण करुन कार्य करण्यास सुरुवात केली. तरी हा देश शैक्षणिक दृष्ट्या मागासलेला का आहे ही खंत मनाला सतत टोचत असते. राष्ट्र उभारणीसाठी या देशातील राज्यकर्त्यांनी स्वातंत्र्यानंतर ही शिक्षणाच्या पायाभूत सोयी सुविधा कडे म्हणावे तसे लक्ष दिलं नाही. घटनेमध्ये घटनाकारानी प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत देण्यात यावे अशी तरतूद केली. परंतू अजून ही तसा प्रकारचे शिक्षण पहावयास मिळत नाही. उच्च शिक्षणामध्ये विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण वाढत आहे. शिक्षक भरती बंद, शाळांना अनुदान नाही, आरक्षण नाही, अशा अनेक मार्गांनी येथील शासनकर्ते शिक्षण घेण्यामध्ये व देण्यामध्ये अडथळे निर्माण करीत आहे. इतर देशातील शिक्षण व आपल्या देशातील शिक्षण व शैक्षणिक सुविधा यामध्ये जमीन आस्मानचा फरक दिसतो. अजूनही शिरक्षणाची गंगाजळी सर्वसामान्य लोकांपर्यत पोहचली नाही. अजून ही काही पिढ्या, समाज, जाती शिक्षणापासून वंचित आहे. खाजगी करणाच्या धोरणामुळे गरिब व मागस समाज जो आर्थिक दृष्ट्या कमकूवत आहे तो शिक्षणापासून वंचित होत चालला आहे. तांत्रीक व व्यावसायिक शिक्षणाच्या अपूऱ्या सुविधा, भरमसाठ फीस अप्रशिक्षित शिक्षक, अपूरे वेतन, अपूऱ्या भौतीक सुविधा, नोकरीची हमी नसने अंदाजपत्रकात शिक्षण विषयक तरतूद अपूरी असते. हळू हळू शिक्षणापासून गरीब व मागास समाज कसा वंचित केला जाईल असे प्रयत्न येणारे प्रत्येक शासन करीत असल्याचे दिसून येते. ज्या मूठभर लोकांच्या हातात आज सत्ता आहे त्यांना असे वाटते की येथील समाजला योग्य व लायक शिक्षण मिळाले तर हा बहुजन, वंचित, दलित समाज शिक्षणाच्या माध्यमातून सबळ होईल व आपली घराणेशाही कुठे तरी बंद करतील या भिती पोटी हे लोक आजही चांगल्या प्रकारचे शिक्षण मिळणार नाही याची खबरदारी घेत आहे. शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी ज्या संस्था होत्या त्या आज बंद होण्याच्या मार्गावर आहेत. शिक्षकच जर प्रशिक्षित नसेल तर येथील शैक्षणिक वातावरण व समाज कसा असेल हे आपल्याला कळून येईल.

निष्कर्ष :

१. खाजगी करणामुळे शिक्षणाची अधोगती होत आहे.
२. शिक्षणावर योग्य ती तरतूद केली जात नाही.
३. कायम विना अनूदान धोरणामुळे शिक्षक व विद्यर्थ्यांच्या बौद्धिक व आर्थिक विकास खूटला आहे.
४. शैक्षणिक संस्था कडे सोयी, सुविधांचा अभाव असतानाही त्या संस्था राजकीय आश्रयाखाली चालत आहे.
५. शिक्षक भरती बंद
६. खाजगी क्षेत्रातील लोकांची शिक्षण क्षेत्रात नेमणूक होत आहे.
७. योग्य शैक्षणिक धोरणाचा अभाव.

शिफारशी :

१. शिक्षण सक्तीचे व मोफत करणे.
२. व्यावसायिक शिक्षणाची फी मर्यादित करणे.
३. शिक्षणासाठी लोकसंख्यानूसार अंदाजपत्रकात तरतूद करणे.

४. प्रशिक्षित शिक्षकाची भरती करुन त्यांना प्रशिक्षण देणे

संदर्भ :

१) डॉ. रमेश ढोबळे, आधूनिक भारतीय राजकीय विचारवंत विद्या बुक्स पब्लीशर्स औरंगाबाद, जून २०१०.

२) डॉ. आर. डी. साबळे, भारतीय राजकीय विचारवंत अभय प्रकाशन नांदेड १९९९.

३) डॉ. गिरिश मोरे, राजर्षी शाहू : विचार व कार्य, निर्मिती विचारमंच कोल्हापूर आक्टोबर – २००९.

४) डॉ. ज्योती डोईफोडे, समाजशास्त्रीय विचारप्रवाह, विद्या बुक्स पब्लीशर्स, औरंगाबाद २०१२.

५) भगवानराव बापुसाहेब जाधव, राजर्षी शाहू महाराजाची भाषणे, लोक वाङ्मय गृह मुंबई, मे २००९.

६) डॉ. रामभाऊ मुटकूळे / डॉ. नितीन बावळे, आधुनिक महाराष्ट्रातील समाजसुधारक चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद एप्रिल २०१८.

■■■

ISSN No. 2394-5990

मागासवर्गीयांच्या मुक्तीतील क्रांतिकारी महानायक राजर्षी छत्रपती शाहू महाराज : ऐतिहासिक विश्लेषणफक्क

डॉ.निशांत भिमराव शेंडे
पदवी व पदव्युत्तर इतिहास विभाग,
जी.टी.पाटील महाविद्यालय, नंदुरबार जि. नंदुरबार
महाराष्ट्र (४२५४१२)
मो.न. ९०९६८९८९७६

गोषवारा (Abstract) :

राजर्षी छत्रपती शाहू महाराज सामाजिक सुधारणेच्या रणांगणातील एक महान योद्धा होते. त्यांनी दलित, शोषित, पिडीत, महिला, बहुजन वर्गाचा मानवी समाजातील एक घटक म्हणून पहिल्यांदा विचार केला. वर्षानुवर्ष विषमता, अन्याय अत्याचाराला बळी पडलेल्या दलित, शोषित. पिडीत, महिला वर्गाच्या दुर्दैशेस त्यांच्यातील वर्षानुवर्षाचे अज्ञान कारणीभूत आहे. याची जाणीव पहिल्यांदा त्यांना झाली.शिक्षणाशिवाय अस्पृश्यांचा उद्धार होणे अशक्य आहे या विचाराला कृतीची जोड देत त्यांनी अस्पृश्यांच्या मुलांना आपल्या कोल्हापूर संस्थानात शिक्षण सक्तीचे व मोफत केले. प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करण्याबाबत २४ जुलै १९१७ ला राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी एक जाहीरनामा प्रसिद्ध केला.ज्या शाळा अश्पृशांच्या मुलांना शाळेत प्रवेश देणार नाहीत अशा शाळांची मान्यता व अनुदाने कायमची बंद करण्यात येतील असे आदेश शाहू महाराजांनी दिले होते. अश्पृश बांधवाना संस्थानातील नोकरीत स्थान दिले, अश्पृश समाजातील मुले मुली उच्च शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून त्यांच्याकरिता शहराच्या ठिकाणी वसतिगृहाची स्थापना केली.

२६ जुलै १९०२ रोजी राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी प्रशासनिक सेवेतील ५० टक्के जागा राखीव करण्याचा ऐतिहासिक जाहीरनामा प्रसिद्ध केला. म्हणून त्यांना आरक्षणाचे जनक असे संबोधले जाते.मागासवर्गीयांना व्यावसायिक स्वतंत्रता प्रदान करतांना मागासवर्गीय समाजातील सुशिक्षिताना वकिलीच्या सनदा दिल्या. महार समाजाला पिढ्यानपिढ्या गुलामीत जखडून ठेवणारे महार वतन खालसा करण्याचा निश्चय करून शाहू महाराजांनी १८ सप्टेंबर १९१८ रोजी खास जाहीरनामा काढून महार वतन खालसा केले.आंतरजातीय विवाहांना प्रोत्साहन देऊन त्यांनी समाजव्यवस्थेतील जातीव्यवस्थेला कायमची मूठमाती देण्याचा प्रयत्न केला.एका हुकूमानुसार महार, मांग,रामोशी व बेरड या चार जातींची हजेरी प्रथा बंद करून त्यांची अमानुष अशा पद्धतीतून शाहू महाराजांनी मुक्तता केली.म्हणून ते खऱ्या अर्थाने मागासवर्गीयांचे मुक्तिदाते ठरतात.

प्रस्तावना (Introduction) :

समस्त महाराष्ट्राला जोतीराव फूले,छत्रपती शाहू महाराज, या महापुरुषांच्या समृद्ध विचारांची परंपरा लाभली आहे. महाराष्ट्राच्या सुपीक अशा मातीमध्ये अनेक थोर महापुरुष जन्माला आले आहेत.त्यामध्ये राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. महाराष्ट्राच्या या स्वातंत्र,समता,बंधुत्त्व व न्याय या मानवतावादी मूल्यावर आधारित भूमीमध्ये काही मोजक्या संस्थानिकांनी आपल्या कार्याचा व कर्तुत्वाचा खोलवर ठसा उमटविला त्यामध्ये शाहू महाराजांचा प्रथम क्रमांक लागतो.त्यांनी आपल्या कार्यकर्तुत्त्वाने आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीध्ये अत्यंत महत्वपूर्ण योगदान दिले.ते खऱ्या अर्थाने लोकनेते होते.मानवतावादी संस्थानिक होते.समाजातील दलित, शोषित, पिडीत, महिला, बहुजन वर्गाचे खालावलेली स्तिथी पाहून त्यांचे मानवतावादी मन द्रवले. त्यांचा या वंचित समूहाबद्दलचा दृष्टीकोन भूतदयावादी नव्हता तर तो मानवतावादी होता.त्यांनी मानवतावादी भूमिकेतून वर्षानुवर्ष अंधारात जीवन जगणाऱ्या दलित, शोषित, पिडीत पददलित, भटके, परितक्त्या विधवा महिलांसाठी सर्वकष मुक्तीचे दार उघडले. ते वंचितांच्या मुक्ती संग्रामातील महानायक होते

राजर्षी शाहू महाराजांचा पूर्व परिचय :

राजर्षी शाहू महाराजांना वारसाहक्काने राजघराणे मिळाले नव्हते. त्यांचा जन्म कागलच्या घाटगे घराण्यात झाला. जयसिंगराव राधाराणी या दाम्पत्याला २६ जुलै १८७४ या मंगल दिवशी पुत्रप्राप्ती झाली.[१] या मुलाचे नाव ठेवण्यात आले यशवंत. यशवंतराव केवळ चार वर्षाचे असतानाच इ.स.१८७८ मध्ये आबासाहेबांना कागल जहागीरीचे आधिपत्य मिळाले. इ.स.१८८२ साली ते कोल्हापूर रिजंट झाले. ब्रिटीश सरकार,

छत्रपती घराण्यातील चार विधवा राण्या आणि खुद्द आबासाहेब घाटगे या सर्वांमध्ये एकमत होवून कोल्हापूरच्या गादीवर जयसिंगराव उर्फ आबासाहेबांचे थोरले चिरंजीव यशवंतराव उर्फ बाबासाहेब यांना चौथ्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या विधवा पत्नी आनंदीबाई राणीसाहेब यांच्या ओटीत १७ मार्च १८८४ रोजी दत्तक घालण्यात आले.[३] १७ मार्च १८८४ हा करवीरच्या इतिहासातील एक महन्मंगल दिवस. या दिवशी मातोश्री आनंदीबाई यांनी घाटगे कुलोत्पन्न यशवंतराव यास विधीपूर्वक दत्तक घेतले. व नाव ठेवले 'शाहू'.[३] त्याच दिवशी आनंद व चिंतामिश्रीत वातावरणात शाहूंचा राज्यारोहण समारंभ देखील संपन्न झाला. या समारंभामुळे करवीर संस्थानावर ब्रिटीशांचे संस्थान खालसा करण्याच्या भितीचे जे काळेकुट्ट ढग दाटून आले होते, ते एका क्षणात नष्ट झाले. करवीर संस्थानात या समारंभाने एका नव्या प्रकाशपर्वाचा उदय झाला.

शिक्षण :

बालछत्रपती शाहू यांचे शिक्षण दत्तक विधानाच्या पूर्वीपासूनच प्रारंभ झाले होते. त्यांच्या शिक्षणाची उत्तम सोय रिजंट आबासाहेबांनी सर्वोत्तम अशी केली होती. त्यांनी कृष्णाजी भिकाजी गोखले व हरिपंत गोखले यांची शाहूंचे शिक्षक म्हणून नियुक्ती केली. शाहूंच्या शिक्षणावर खास देखरेख ठेवण्यासाठी मुंबई सरकारने फिटझिराल्ड यांची २९ ऑगस्ट १८८४ रोजी शिक्षण पर्यवेक्षक म्हणून नियुक्ती केली.[४] गुरुवर्य फिटझिराल्ड यांच्या कडक आणि करड्या शिक्षित शाहू छत्रपतींचे शिक्षण सुरु झाले. छत्रपती शाहू हे जन्मताच कल्पक व कुशाग्र बुद्धीमत्तेचे होते. छत्रपती शाहूंच्या शैक्षणिक प्रगतीबाबत फिटझिराल्डने जे निरिक्षण नोंदविले होते, त्यात ते म्हणतात, ''महाराजांना शिकण्याची हौस असून ते चिकाटीने अभ्यास करतात.''[५] थोड्या अवधीनंतर रिजंट आबासाहेब आणि दिवाण मेहरजीभाई कुवरजी यांनी शाहूंना पुढील शिक्षणासाठी राजकोटला पाठविण्याचे निश्चित केले. १८८५ सालाच्या शेवटच्या दिवशी शाहूंच्या शिक्षणाचे पहिले कोल्हापूर पर्व संपले. व दुसर्या राजकोट पर्वास प्रारंभ झाला. राजकोट येथील राजकुमार कॉलेजमध्ये छत्रपती शाहू १८८९ अखेर म्हणजे तीन वर्ष चार महिने अध्ययन करीत होते. राजकोट येथील प्राचार्य मॅकनॉटन यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी इंग्रजी भाषा, राज्यकारभार, जगाचा इतिहास इत्यादी विषयांचे अध्ययन केले. शिक्षण पूर्ण झाल्यावर शाहू छत्रपतींचा त्यांच्या वयाच्या १७ व्या वर्षी बडोद्याचे सरदार गुणाजीराव खानवीलकर यांच्या लक्ष्मीबाई नावाच्या अकरा वर्षाच्या कन्येशी १ एप्रिल १८९१ रोजी कोल्हापूर येथे मोठ्या थाटामाटात विवाह झाला.[६] नोव्हेंबर १८९३ मध्येच शाहूंच्या शिक्षणाचे पर्व समाप्त झाले. शिक्षण पूर्ण झाल्यावर वयाच्या विसाव्या वर्षी २ एप्रिल १८९४ साली शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानाच्या राज्यकारभाराची सुत्रे हाती घेतली. सदर राज्य हे लोक कल्याणाकरीता मानवी उत्थानासाठी मिळालेले आहे या गोष्टीची जाणीव शाहू महाराजांना होती. म्हणूनच मानवी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात त्यांनी आपल्या कर्तृत्वाने लोककल्याण हे आपले ध्येय साधण्याचा पुरेपूर प्रयत्न केला. राज्यसुत्राचा स्वीकार करतेसमयी ते म्हणतात, ''आमची प्रजा सदासर्वदा सुखी व संतुष्ट असावी, दिवसेंदिवस तिचे कल्याणी वृद्धींगत व्हावे आणि आमच्या राज्याचा सर्वबाजुंनी अभ्युदय व्हावा अशी आमची उत्कट इच्छा आहे.''[७]

मागासवर्गीयांच्या मुक्तीचे कार्य :

म.फुले हे सामान्य जणातून पुढे आलेले सुधारक होते. त्यामुळे त्यांच्या कार्याला व सामर्थ्याला बर्याच मर्यादा होत्या. याउलट शाहू महाराज दक्षिणेतील एक प्रमुख संस्थानिक सर्व मराठी माणसांना आदराचे स्थान वाटणार्या छत्रपती पदावर आरुढ झालेले राजे असल्याने राजा म्हणून लाभलेले सामर्थ्य त्यांनी बहुजन समाजात कनिष्ठ म्हणून गणल्या गेलेल्या जाती-जमातींच्या उद्धारासाठी खर्ची घातले. मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी मुक्तीसाठी शाहू महाराजांनी अनेक क्रांतीकारी पाऊले उचलली. त्यात क्रांतीकार्याचा आढावा या प्रस्तुत संशोधन पेपरमध्ये घेण्यात आलेला आहे.

प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे :

दि.१५ एप्रिल १९२० रोजी नासिक येथील एका वस्तीगृहाच्या इमारतीच्या पायाभरणी समारंभात बोलतांना शाहू महाराज म्हणतात, ''खालच्या वर्गाच्या लोकांच्या बुद्धीवर व ज्ञानावर हे जे जड व जुलमी जू लादले आहे, ते झुगारुन देण्याची शक्ती समाजाच्या अंगी येण्यात सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाची फार जरुरी आहे.''[८] राजर्षी शाहू महाराजांनी शिक्षण क्षेत्रात उचललेले क्रांतीकारी पाऊल म्हणजे त्यांनी आपल्या राज्यात राबविलेली सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाची योजना होय.

आपल्या राज्यातील प्रजेला शिक्षणाचा लाभ व्हावा म्हणून शाहू छत्रपती विविध लोककल्याणकारी योजना आखत होते व ते स्वतः राबवित होते. ३० सप्टेंबर १९१७ रोजी कोल्हापूर संस्थानात सक्तीचा आणि मोफत प्राथमिक शिक्षणाचा जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला.[९] सक्तीचा आणि मोफत शिक्षणाचा कायदा करुनही अनेक खेड्यातून शाळेत मुले पाठविण्याबाबत पालकांकडून चालढकल होवू लागली तेव्हा शाहू छत्रपतींनी शाळेत गैरहजर राहणार्या मुलांच्या पालकांना दंड करणारा हुकूम काढला होता. अस्पृश्यतेचे समाजातून निर्मुलन करण्यासाठी

ISSN No. 2394-5990

छत्रपती शाहूंनी अस्पृश्यांच्या शैक्षणिक विकासाला अधिक महत्त्व दिलेले दिसून येते.

वसतीगृहाची स्थापना :

अस्पृश्य समाजाचा उद्धार हे शाहू छत्रपतींनी आपले जिवीत कार्य मानले होते. त्यानुसारच ९ फेब्रुवारी १९०८ रोजी दिगंबर जैन वसतीगृहात प्रो. आण्णा बाबाजी लठ्ठे यांच्या अध्यक्षतेखाली एक सभा आयोजित करण्यात आलेली होती. त्या सभेमध्ये अस्पृश्य समाजात शिक्षणाचा फैलाव करण्याच्या उद्देशाने एक संस्था स्थापन करण्यात आली. या संस्थेचे नामकरण करण्यात आले 'अस्पृश्य मानलेल्या जातीत विद्याप्रसार करणारी मंडळी' या संस्थेच्यावतीने एक अस्पृश्य वसतीगृह सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला आणि हे वसतीगृह १४ एप्रिल १९०८ रोजी अस्तित्वात आले. शाहू महाराजांनी व्हायोलेट क्लार्क या समाजसेविकेच्या स्मृतीप्रित्यर्थ १४ एप्रिल १९०८ रोजी स्थापन केलेल्या अस्पृश्य वसतीगृहास तिचे नाव दिले 'मिस क्लार्क वसतीगृह'.[१०] अस्पृश्यातील होतकरु विद्यार्थ्यांचे हायस्कुलचे व कॉलेजचे शिक्षण पूर्ण करण्यासाठी त्यांना योग्य त्या सोयीसवलती उपलब्ध करुन देणे हा वसतीगृह स्थापन करण्यामागचा शाहू महाराजांचा उद्देश होता. या व्यतिरिक्त १९१८ साली 'आर्यसमाज रुकूल' वुडहाऊस वसतीगृह १९१९ साली ढोर चांभार तसेच इंदुमती राणीसाहेब वसतीगृहे १९२० साली पंढरपूर येथे अस्पृश्य वसतीगृह सुरु केले. चोखामेळा बोर्डींग हाऊससारख्या अस्पृश्य वसतीगृहांना शाहू छत्रपतींनी पाच हजार रुपयांची देणगी दिली. एकूण सात वसतीगृहे छत्रपती शाहूंनी अस्पृश्यांकरीता चालविले.

मागासवर्गींयासाठी राखीव जागा :

कोल्हापूर राज्यातील सरकारी नोकर्यांमध्ये पिढ्यांपिढ्या वरिष्ठ वर्गीयांची मिरासदारी बनली होती. पात्रता असताना देखील मागासवर्गीयांना नोकर्यांमध्ये कुठलीही जागा मिळत नसे. सदर मिरासदारी ही मागासवर्गीयांच्या शोषण व सामाजिक पिळवणुकीचे साधन बनले होते. वरिष्ठ वर्गीयांच्या या मक्तेदारीला केवळ राज्यातच नव्हेतर संपूर्ण देशात जबरदस्त धक्का शाहू छत्रपतींनी दिला. २६ जुलै १९०२ साली आपल्या राज्यातील सर्व सरकारी व खाजगी नोकरीच्या जागा मागासलेल्या वर्गांसाठी ५० टक्के राखीव केल्याचा जाहीरनामा त्यांनी प्रसिद्ध केला.[११] ब्राम्हण, प्रभू, शेणवी, पारसी असे प्रगत वर्ग सोडून बाकीचे सर्व मागासलेले समजले गेले. त्यामध्ये सामाजिक व आर्थिक मागासगलेपण हा मुख्य निकष होता. ही एक क्रांतीकारक घटना होती. ब्राम्हणी वर्चस्वाला धाब्यावर बसवून विषमतावादी व्यवस्थेला सुरुंग लावत त्यांनी आपल्या राज्याचे मागासवर्गींयासाठी आरक्षणाचे धोरण जाहीर केले. म्हणून त्यांना आरक्षणाचे जनक असे संबोधले जाते. या धोरणामुळे सत्तेची सुत्रे हाती घेताना १८९४ साली सरकारी नोकर्यातील मागासलेल्या वर्गांचे प्रमाण ५.६३ टक्के होते. ते १९२२ साली ६२.११ टक्क्यांपर्यंत गेले.

व्यावसायिक स्वातंत्र्य :

समाज व्यवस्थेतील वकीलीसारख्या अनेक व्यवसायांमध्ये उच्च वर्णीयांची मक्तेदारी निर्माण झाली होती. मागासवर्गीय पात्रता असताना देखील व्यवसायिक स्वातंत्र्यापासून वंचित होते. सदर उच्चवर्णीयांच्या मक्तेदारीला सुरुंग लावण्यासाठी छत्रपती शाहूंनी मराठे, तत्सम जाती, महार, मांग, चांभार आदी मागासवर्गीय समाजातील सुशिक्षितांना वकीलीच्या सनदा दिल्या. आणि या निर्णयाद्वारे मागासवर्गीयांसाठी व्यवसायाची द्वारे त्यांनी खुली केली. या संदर्भात छत्रपती शाहू महाराज म्हणतात, ''अशा वकीलीच्या सनदा देण्यात माझा एवढाच हेतू आहे की, जे धंदे अस्पृश्य वर्गास रुढीने, कायद्याने अगर दडपशाहीने बंद झालेले आहेत, ते त्यास मोकळे करुन द्यावेत. व त्याची स्थिती सुधारुन त्यांच्यात आपण इतर माणसांच्या बरोबरीचे आहोत असा आत्मविश्वास निर्माण करणे.''[१२] असे मत व्यक्त केले. राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या राज्यातील प्रजेच्या मनातील अस्पृश्यतेची भावना नष्ट करण्यासाठी महार समाजातील गंगाराम कांबळे या तरुणाला कोल्हापूरच्या मध्यवस्तीत चहाचे हॉटेल काढून दिले. नुसते काढूनच दिले नाहीतर त्या हॉटेलात छत्रपती शाहू महाराज सर्वांसमक्ष चहा पित असत. आणि आपल्या समवेत असलेल्या सरदार, जहाँगिरदार व इतर बड्या मंडळींनाही पाजीत.[१३] लोकांच्या मनातील उच्चनिच्चतेच्या भावनेला हादरा बसावा हा या मागील उद्देश होता.

'हजेरी'च्या शोषणकारी पद्धतीतून स्वातंत्र्य :

समाज व्यवस्थेतील काही कनिष्ठ समजल्या गेलेल्या जातींना त्या जन्मजात गुन्हेगार समजून त्यांच्यावर सरकारातून हजेरीची सक्ती केली जात असे. हजेरी म्हणजे त्या व्यक्तीने सकाळ-संध्याकाळ गावचावडीत जावून हजेरी द्यायची. ही अमानुष पद्धत पाहून शाहू महाराजांचे मानवतावादी हृदय द्रवले आणि त्यांनी १ ऑगस्ट १९१८ रोजी गुन्हेगार जातींच्या लोकांची हजेरी पद्धत बंद करण्याचा हुकूम शाहूंनी काढला.[१४] त्या अन्वये महार, मांग, रामोशी व बेरड या चार जातीची हजेरी पद्धत बंद करुन त्यांची या अमानुष अशा पद्धतीतून कायमची मुक्तता केली.

अस्पृश्यता निर्मुलनासंबंधी जाहीरनामे :

मागासवर्गीय समाजाच्या मुक्ती लढ्यातील शाहू महाराजांचे सर्वात क्रांतीकारक पाऊल म्हणजे त्यांनी आपल्या राज्यात १९१९ साली अंमलात आणलेला अस्पृश्यता निवारणाचा कायदा होय. जानेवारी १९१९ मध्ये काढलेली आज्ञापत्रे खर्या अर्थाने ती आज्ञापत्रे नसून ती अस्पृश्यतासंहारक अस्त्रे होती. एकामागून एक असे आज्ञापत्र काढून 'सर्व सार्वजनिक इमारती, धर्मशाळा, रेस्ट हौसिस, सरकारी अन्नछत्रे वगैरे ठिकाणी व नदीचे पाणुठे, सार्वजनिक विहिरी येथे कोणत्याही मनुष्यप्राण्यांचा विटाळ मानण्याचा नाही.'[१५] अशी आपल्या अधिकार्यांना, रयतेला कडक सुचना दिली. आणि त्याप्रमाणे या हुकूमाची प्रत्यक्ष अंमलबजावणी केली. या संदर्भात वैद्यकी सेवाखात्याला काढलेल्या आज्ञापत्रात शाहू महाराज म्हणतात,

''हुजूरांच्या असे पाहण्यात आले आहे की, अस्पृश्यांना व स्पृश्यांना धर्मार्थ दवाखान्यात निरनिराळ्या तर्हेने वागविण्यात येते. अस्पृश्यांना दवाखान्याच्या कम्पाउंडमध्ये सुद्धा येवू दिले जात नाही. सरकारी इमारती या काही कुणाला सॅनिटोरियम म्हणून दिलेल्या नसल्यामुळे अस्पृश्यांना इतक्या तुच्छतेने वागविण्याचा कोणालाही हक्क नाही. इतकेच नव्हेतर अस्पृश्यांची हरएक तर्हेने काळजी घेतली पाहीजे. धर्मार्थ संस्था या गरीब लोकांकरीता असून अशा अस्पृश्यांना समतेच्या पायावर वागविणे योग्य आहे. ते कर देतात, तर त्यांना वाईटरितीने का वागवावे? हुजूरांची अंतकरणपूर्वक अशी इच्छा आहे की, एखादा रोगी मग तो स्पृश्य किंवा अस्पृश्य असो, तो दरवाज्यात येताच सभ्य गृहस्थाप्रमाणे वागवून त्याची तपासणी करावी. व त्याला जनावराप्रमाणे बाहेर न घालविता उपचारासाठी दवाखान्यात पाठवावे.''[१६] अशा प्रकारचे आज्ञापत्रे शाहू महाराजांनी काढून मागासवर्गीयांच्या मुक्ती संघर्षात क्रांतीकारी कार्य केले.

महार वतने खालसा केली :

अस्पृश्य समाजाची सामाजिक गुलामगिरी नष्ट करण्याच्या उद्देशाने छत्रपती शाहूंनी महार समाजाला पिढ्यांपिढ्या गुलामीत जखडून ठेवणारे 'महार वतन' खालसा करण्यासाठी १८ सप्टेंबर १९१८ रोजी जाहीरनामा काढला. त्या अन्वये महार वतन खालसा होवून महारांच्या वतन जमीनी सरकारजमा न करता रयतेकडे सुपूर्त करण्यात आल्या.[१७] छत्रपती शाहूंचे हे क्रांतीकारी पाऊल अस्पृश्यांच्या मुक्तीलढ्यातील एक मैलाचा दगड ठरले.

निष्कर्ष (Conclusion) :

छत्रपती शाहू महाराज हे अस्पृश्यता, मागासवर्गीयांच्या मुक्ती लढ्यातील एक महान योद्धा होते. त्यांनी सर्वप्रथम मागासवर्गीयांचा मानवी समाजाचा एक घटक म्हणून विचार केला. त्यांचा अस्पृश्यांकडे पाहण्याचा दृष्टीकोन हा भूतदयावादी नव्हता. तर तो मानवतावादी होता. मागासवर्गीयांची अमानुष अशा शोषण व गुलामगिरीला जन्म देणार्या बंधनातून कायमची मुक्तता करणे हे त्यांनी आपले जिवीत कार्य मानले होते. ते कृतीशिल सुधारक होते. आपल्या विचाराला कृतीची जोड देत मागासवर्गीयांच्या मुक्तीसाठी त्यांनी आपल्या संस्थानात अनेक क्रांतीकारी पाऊले उचलली. म्हणून ते मागासवर्गीयांच्या मुक्तीतील खर्या अर्थाने महानायक ठरतात. छत्रपती शाहू महाराजांचे विचार आणि कार्य आजच्या समाजाची वैचारिक पातळी वाढविण्याकरीता महत्त्वपूर्ण ठरतात, याबद्दल तिळमात्र शंका नाही.

संदर्भग्रंथ (Reference Book) :

१) सुर्यवंशी कृ.गो. : राजर्षी शाहू : राजा व माणूस, ठोकळ प्रकाशन, बुधवार पेठ, पुणे, पहिली आवृत्ती, फेब्रुवारी १९८४, पृष्ठ क्र.२१
२) जाधव रमेश : 'राजर्षी शाहू छत्रपती', नॅशनल बुक ट्रस्ट इंडीया, प्रथम प्रकाशन-२०१२, पृष्ठ क्र.६
३) सुर्यवंशी कृ.गो. : उपरोक्त, पृष्ठ क्र.२२
४) कित्ता - पृष्ठ क्र.२५
५) कित्ता - पृष्ठ क्र.२६
६) जाधव रमेश : उपरोक्त, पृष्ठ क्र.७
७) सुर्यवंशी कृ.गो. : उपरोक्त, पृष्ठ क्र.६२
८) जाधव रमेश : उपरोक्त, पृष्ठ क्र.३१
९) कित्ता : पृष्ठ क्र.४०
१०) सुर्यवंशी कृ.गो. : उपरोक्त, पृष्ठ क्र.१४८
११) पवार जयसिंगराव : राजर्षी शाहू छत्रपती : एक मागोवा, सुमेरु प्रकाशन, डोंबीवली, पहिली आवृत्ती, २५ नोव्हेंबर २००४, पृष्ठ क्र.२१
१२) कित्ता : पृष्ठ क्र.२२
१३) सुर्यवंशी कृ.गो. : उपरोक्त - पृष्ठ क्र.३८५
१४) कित्ता - पृष्ठ क्र.३८६
१५) कित्ता - पृष्ठ क्र.३८९
१६) कित्ता - पृष्ठ क्र.३८९
१७) पवार जयसिंगराव : उपरोक्त, पृष्ठ क्र.२३

■■■

ISSN No. 2394-5990

राजर्षी शाहू महाराज यांचे स्त्री शिक्षणविषयक विचार

आरती एम. देशमुख
सहाय्यक प्राध्यापक, गृह अर्थशास्त्र विभाग प्रमुख
श्री साईबाबा लोकप्रबोधन कला महाविद्यालय, वडनेर
हिंगणघाट, जि. वर्धा
Email ID: deshmukharti494@gmail.com
Mo. 9226183102

गोषवारा :

एखाद्या व्यक्तिमत्वाला काळ घडवितो तर काही व्यक्तिमत्व अशी असतात जी काळालाच घडवीतात. अशाच काही व्यक्तिमत्वांपैकी एक म्हणजे राजर्शी शाहू महाराज होय. पूर्वीच्या काळी स्त्रीने शिक्षण घेतल्यामुळे तीला अकाली वैधव्य येईल, ती कुमार्गास लागेल, पापचरणांची प्रवृत्ती बळावेल अशी त्यावेळी स्त्रियांबद्दलचा समज होता. म्हणून शूद्र आणि अतिशूद्र जातीतील स्त्रियांना शिक्षण देणे हा त्या काळच्या सनातनी लोकांना मोठा भ्रष्टाचार वाटत असे त्यांना शिक्षण देणे म्हणजे देव, धर्म आणि समाज यांच्याविरुद्ध वर्तन करणे होय. शिवाय स्त्री शिक्षण म्हणजे हिंदुधर्मावर भयंकर अत्याचार अशा तऱ्हेच्या सनातन्यांच्या समजुतीमुळे स्त्रियांना शिक्षणाचे दरवाजे बंद होते. सनातनी लोकांच्या या मतावर तीव्र आघात करुन महाराष्ट्रात प्रथम स्त्रीस शिक्षणाचे दरवाजे उघडून दिले ते महात्मा फुले यांनीच, कारण त्यांना माहित होते की, स्त्री शिक्षण म्हणजे पर्यायाने तिच्या मुलांचे शिक्षण होय. सामाजिक क्रांतीच एक महत्वाचे शस्त्र म्हणून महात्मा फुलेंनी स्त्री शिक्षणाला सुरुवात केली. त्याला पुढे घेऊन जाण्याचे कार्य राजर्षी शाहू महाराजांनी केले. सदर संशोधन पेपरमध्ये राजर्षी शाहू महाराज यांचे स्त्री शिक्षणविषयक विचार व कार्याचा परामर्ष घेतला आहे.

बीजशब्द: स्त्री शिक्षण, विषमता, अस्पृश्यता, जातीभेद, व सुधारणा.

प्रस्तावना :

ज्या बहुजन समाजाला राजर्षी शाहू वर्ण वर्चस्वापासून मुक्त करु पाहत होते. त्या समाजातील अर्धी अधिक लोकसंख्या स्त्री वर्गाची होती आणि हा स्त्री वर्ग पुरुषी वर्चस्वाखाली व त्यांनी निर्माण केलेल्या गुलामगिरीखाली पिचत होता. जो बहुजन समाज वर्णवर्चस्व जुलूमापासून मुक्त मिळवू पाहत होता. त्या समाजाने आपल्या घरातील स्त्रियांनाही आपल्या पुरुषी वर्ग वर्चस्वापासून मुक्त ठेवले पाहिजे, अशी महाराजांची व्यापक सामाजिक दृष्टी होती. या दृष्टिकोनातूनच त्यांनी आपल्या कारकिर्दीत स्त्री मुक्तीसाठी कायदे जारी केले होते. राजर्षी शाहू एक संस्थानिक राजे होते. तर तितक्याच तळमळीचे कर्ते व क्रियाशील समाजसुधारक होते. स्त्री स्वातंत्र्याबद्दल आणि तिच्या विकासाबद्दल केवळ विचारच मांडून थांबले नाहीत, तर त्या विचाराला कृतीची व कार्यक्रमाची जोड त्यांनी दिली. ज्याप्रमाणे अस्पृश्यताविषयक बाबतीत त्यांनी विचार व कार्य अशा दोन्ही स्वरुपाच्या माध्यमातून वा संघटनात्मक दृष्टीकोनातून कार्य केले त्याचप्रमाणे स्त्री विकासाबाबत ते आग्रही होते. त्यांनी स्त्री विकासाबाबत एक निश्चित व आग्रही भूमिका मांडलेली होती. त्यांच्या स्त्री विकास या संकल्पनेत स्त्री स्वातंत्र्य, स्त्री उद्धार, स्त्री शिक्षण आणि या सर्व हिंदू समाजातील अनिष्ट प्रथांचे व त्यातून निर्माण झालेल्या समस्यांचे उच्चाटन करण्यासाठी अनेक कायदे करुन तिची अंमलबजावणी करण्याचा आग्रह धरलेला होता.

संशोधनाची उद्दिष्ट्ये :

१. राजर्षी शाहू महाराज यांचे स्त्री शिक्षणविषयक विचार व कार्यांचा अभ्यास करणे.

२. राजर्षी शाहू महाराज यांच्या व्यक्तिमत्वाचे अध्ययन करणे.

संशोधन पद्धती :

सदर संशोधन हे प्रामुख्याने दुय्यम सामग्रीवर आधारीत असून या संशोधनासाठी राजर्षी शाहू महाराज यांच्यावर लिखित साहित्य, विविध पुस्तके, मासिके, शोध प्रबंध, शासकीय प्रकाशने, संदर्भ ग्रंथ इत्यादी साधनांचा आधार घेण्यात आलेला आहे.

स्त्री शिक्षणविषयक विचार :

नवसमाज निर्मितीसाठी प्रत्येकाला शिक्षण दिले पाहिजे ही समतावादी भूमिका राजर्षी शाहूंनी स्विकारली होती. प्रत्येकाला ज्ञान प्राप्तीचा अधिकार आहे. ज्ञानाशिवाय त्या मनुष्याचा किंबहुना

पर्यायाने सर्व समाजाचा विकास होणार नाही ही मानवतावादी जाणीव राजर्षी शाहूंच्या मनात निर्माण झाली. प्रत्येक व्यक्तीच्या ठायी असलेले सामथ्र्य आणि कौशल्य वाढविण्यास शिक्षणच हातभार लावणार आहे, अशी राजर्षी शाहूंची श्रद्धा होती. समाजातील प्रत्येक घटकास शिक्षणाची गरज असते, मग तो शेतकरी असो, सैनिक असो वा स्त्री असो.

शिक्षणाचा अधिकार शूद्रांसोबत स्त्रीला सुद्धा नाकारला जात होता व तिला गुलाम ठरवले होते. स्त्रियांची या गुलामगिरीतून मुक्तता झाल्याशिवाय जातीअंताचे व समताधिष्ठित समाज निर्मितीचे प्रयत्न यशस्वी होणार नाहीत. म्हणून स्त्री वर्गाची या गुलामगिरीतून मुक्तता करण्यासाठी त्यांनी शिक्षण हे महत्वाचे मानून त्यासंदर्भात काही प्रयत्न केले. कोल्हापूर संस्थानात स्त्री शिक्षणास उत्तेजन देण्यासाठी एक विशेष अधिकाराची जागा निर्माण केली. स्त्रियाच्या मानसिक विकासासाठी शिक्षणाची गरज आहे, असे राजर्षी शाहू महाराजांना वाटत असे. शाहू महाराज यांच्या मते, स्त्रीला माणसासारखे जगता आले पाहिजे आणि त्याचबरोबर तिला स्वतःचे संरक्षण करण्याचे ज्ञान प्राप्त झाले पाहिजे. हे साध्य होण्यासाठी 'शिक्षण' हाच एकमेव रामबाण उपाय होय.[१]

प्रिन्स शिवाजीच्या दुर्देवी मृत्यूनंतर त्यांची पत्नी राणीसाहेब इंदुमती या विधवा झाल्या त्यांच्या विषयी राजर्षी शाहू काळजी घेऊ लागले. साहजिकच कर्तृत्वाच्या वेगवेगळ्या क्षेत्रात तिला संचार करता येऊन तिचे भकास व उदास जीवन काही अंशाने का होईना सुसह्य होईल. या उदात्त भावनेने राजर्षी शाहूने राणीसाहेब इंदुमतीला शिक्षण देऊन त्यांच्यावर संस्थानातील शिक्षण कार्याची जबाबदारी सोपवावी अशी एक महत्वाकांक्षा असलेली दिसून येते. इंदुमती राणीसाहेबाच्या शिक्षणाची अतिशय काळजीपूर्वक तरतूद करण्यात आली. इतःपर त्या दीर्घोयोगी व विद्याव्यासंगी झाल्या. त्यांना शक्य तितक्या चांगल्या सुशिक्षित करुन संस्थानातील महिला शिक्षण त्यांच्या ताब्यात देण्याचा महाराजाचा विचार होता. हा हेतू मनात धरुन त्यांना इंग्लिश भाषेचे ज्ञान देण्याची महाराजांनी व्यवस्था केली.[२] यावरुन हे स्पष्ट होते की, स्त्रियांच्या मानसिक व बौद्धिक विकासासाठी स्त्री शिक्षण अत्यंत आवश्यक आहे.

शिक्षणाद्वारे सर्वांगिण प्रगती साधता येते यावर राजर्षी शाहूंचा प्रचंड विश्वास होता. स्त्री विकासासाठी स्त्रीयांना शिक्षण देणे हे एकमेव साधन आहे. स्त्री शिक्षणामुळे सनातनी विचारांना तिलांजली देऊन पुरोगामी विचाराचा पुरस्कार करण्याची प्रवृत्ती निर्माण होते. राजर्षी शाहूंनी आपल्या सुनेला केवळ पुस्तक पांडित्य बनवायचे नव्हते, तर ती एक स्वावलंबी व समर्थ बनली पाहिजे हा आग्रह होता.

राजर्षी शाहूंच्या मार्गदर्शनाखाली शिक्षण घेऊन तयार झालेल्या राणी इंदुमती साहेबांनी स्त्री शिक्षणाबाबत केलेला उहापोह मार्मिक वाटतो. कोल्हापूर येथे अखिल भारतीय मराठा महिला परिषदेच्या स्वागताध्यक्ष पदावरुन भाषन देत असताना राणी इंदुमती साहेब म्हणाल्या होत्या की, हि परिषद शैक्षणिक असल्यामुळे येथे मुलीच्या शिक्षणाचा विचार करणे जरुरी आहे. तुम्ही मुलांना आणि पुरुषांना शिक्षण द्याल, पण जोपर्यंत स्त्री शिक्षणाकडे दुर्लक्ष होईल तोपर्यंत चालू परिस्थिती आहे तशीच राहिल. समाज आपत्यातील स्त्री वर्गाच्या पातळीच्या वर कधीच चढू शकणार नाही. मुलांच्या शिक्षणावर आपण जितके लक्ष देतो त्याहून मुलीच्या शिक्षणावर अधिक लक्ष देणे महत्वाचे आहे. हे ओळखून स्त्रियांमध्ये स्त्री शिक्षणाचे काम जोमाने सुरु केले पाहिजे. स्त्रियांना मुलांची जोपासना, आहारशास्त्र, निरोगीपणाची तत्वे, आरोग्य आणि सफाईशास्त्र, रोग्याची शुश्रृषा, जोडधंदे आणि कला वगैरे शिकविणे आवश्यक आहे. या सर्वात महत्वाचे म्हणजे ज्या योगे त्यांची मने भोळसर धार्मिक समजुतीतून मुक्त होतील असा प्रसार करावयास पाहिजे.[३] राणी इंदुमतीच्या या सडेतोड विचार संपदेतून स्पष्ट होते की, राजर्षी शाहूचा स्त्री शिक्षणविषयक विचार किती खोलवर परिणाम करणारा ठरलेला आहे. राजर्षी शाहूंच्या या विचारातून त्यांच्या स्त्री जीवन आणि शिक्षणविषयक मानवतावादी दृष्टिकोन लक्षात येतो.

महाराष्ट्रातील स्त्री शिक्षणाची चळवळ :

महाराष्ट्रात स्त्री शिक्षणाच्या बाबतीत पहिली क्रांती अमेरिकन मिशनऱ्यांकडून केली गेली. मुंबईत १८२४ साली या अमेरिकन संस्थेकडून पहिली मुलांची शाळा स्थापन करण्यात आली. १८५१ मध्ये स्टूडंटस लिट्रेरी ॲण्ड सांयटिफीक सोसायटी मार्फत मुलीची दुसरी शाळा स्थापन करण्यात आली. भारतीय व्यक्तीकडून पहिला प्रयत्न पुण्यामध्ये झाला, ते व्यक्ती म्हणजे महात्मा फुले होय. स्त्रीवर होणाऱ्या अन्याय अत्याचाराला वाचा फोडण्याचे कार्य महात्मा फुलेंपासून ते आगरकरांपर्यंतच्या अनेक समाजसुधारकांनी केले होते. स्त्रीमध्ये आत्मजागृतीचे सामर्थ यावे म्हणून महात्मा फुलेंनी व नंतरच्या काळात महर्षी कर्वेंनी केलेले स्त्री शिक्षणाचे प्रयत्न महाराष्ट्राच्या इतिहासात विशेष उल्लेखनीय आहेत. खरे तर महात्मा फुलेंनी स्त्री शिक्षणाची सुरु केलेली चळवळ ही स्त्री मुक्तीचीच चळवळ होती.

कोल्हापूर संस्थान व स्त्री शिक्षण :

महाराष्ट्रात महात्मा फुलेंनी स्त्री शिक्षणात फार मोठी क्रांती केली होती. राजर्षी शाहूंनी महात्मा फुलेंच्या या कार्याची प्रेरणा घेतली आणि आपल्या संस्थानात शिक्षणाच्या प्रसार कार्यास

ISSN No. 2394-5990

आरंभ केला. राजर्षी शाहूंचे स्त्री शिक्षणाबद्दलचे धोरण फार मवाळ स्वरुपाचे होते. महात्मा फुलेंनी ज्याप्रमाणे शिक्षणाच्या प्रसारासाठी स्वतःच्या पत्नीला अगोदर शिक्षण देऊन शिक्षिका बनविले. तेच धोरण राजर्षी शाहूंनी अंगीकारले. त्यांनी आपली सून इंदुमती राणीसाहेब हिला चांगले शिक्षण देण्याचा प्रयत्न केला. राजर्षी शाहू महाराजांचे कार्य वैशिष्ट्य विशद करतांना त्यांचे गुरु एस. एस. फ्रेझरनी काढलेले उद्गार मननीय आहेत ते म्हणतात, शाहू महाराजांच्या जीवित कार्याचा गाभा म्हणजे त्यांच्या ठायी असलेला मानवतावादी विशालदृष्टी आणि कोणाचीही भीड मुर्वत न ठेवणारी, दडपणाने दबली न जाणारी विलक्षण साहसी वृत्ती यांचा संगम होय.[४] शाहू महाराजांची स्त्री शिक्षणाबद्दलची साहसी वृत्ती आणि मानवतावादी विशालदृष्टी खरोखरच कौतुकास्पद होती. ज्या काळात शाहूंनी हे स्त्री शिक्षणाचे कार्य केले त्या काळात स्त्रियांनी शिक्षण घेणे हे एक पाप समजण्यात येईल. त्या काळात बालविवाहाची पद्धत होती. पडदा पद्धती देखील रुढ होती. त्यामुळे स्त्री शिक्षणात अनेक अडचणी निर्माण झाल्या होत्या. अशावेळी राजर्षींनी स्त्रि शिक्षण क्षेत्रात एक नवा प्रशस्त मार्ग निर्माण केला.[५] ज्या काळात समाज स्त्रियांना शिक्षण नाकारत होता, त्या काळात राजर्षी शाहूंनी स्त्री शिक्षणाबद्दलचे आपले विचार प्रकट करुन प्रत्यक्ष स्त्री शिक्षणाचे कार्य करुन दाखविले.

कोल्हापूर संस्थानातील मुलीच्या शाळा :

राजर्षी शाहूंनी मुलींच्या शिक्षणाला आपले जीवित कार्य बनविले होते. स्त्री शिक्षणासाठी त्यांनी अनेक संस्थांची निर्मिती केली होती. जे शिक्षक मुलीच्या शिक्षणाच्या बाबतीत विशेष परिश्रम घेतील अशा शिक्षकांना त्यांनी प्रेरित करण्याचे काम केले. मुलींना शैक्षणिक मदत व स्कॉलरशिप दिली. राजर्षी शाहू महाराज स्त्री शिक्षणाच्या बाबतीत अतिशय दक्ष होते. राजर्षी शाहूला तळाच्या थरापर्यंत स्त्री शिक्षणाचा फैलाव झाला पाहिजे असे वाटत होते. त्यांनी ३५४ नंबरची हुजूर आज्ञा ६ ऑक्टोबर १९१९ रोजी एक आदेश काढली होती. ती अशी, तमाम लोकांस जाहिर करण्यात येते की, ज्यांच्यात पडदा पाळण्याची रीत नाही आणि ज्यांच्यातील मुलींना व स्त्रियांना शिक्षण घेण्याची इच्छा आहे, अशा मागासलेल्या वर्गातील लोकांनी अप्पासाहेब तथा मामासाहेब सुर्वे यांच्याकडे तसे अर्ज द्यावेत. म्हणजे त्या त्या विद्यार्थीनींची राहण्याची, जेवणाची व शालेय फी पुस्तकांची वगैरे सारी सोय सरकारी खर्चाने करण्यात येईल.[६] यावरुन हे स्पष्ट होते की, राजर्षी शाहूंनी स्त्रियांना मोफत शिक्षणाची सुरुवात केली. एवढेच नव्हे तर उच्च शिक्षणासाठी त्यांनी प्रेरणा दिली. हुशार मुलींना राजर्षी शाहूंनी आर्थिक मदत केली. राजर्षी शाहूंनी एक ख्रिश्चन मुलगी अंत्रिकाबाई डॅनिअल बेकर या हुशार मुलीला दरमहा १६ रुपये याप्रमाणे सलग दोन वर्ष शिष्यवृत्ती मंजूर करुन १९२१ साली पुण्याला टेक्ररनिंग कॉलेजला प्रशिक्षणासाठी पाठविले. कृष्णाबाई केळवकर या हुशार विद्यार्थीनींला मुंबईला ग्रँट मेडिकल कॉलेजमध्ये वैद्यकीय शिक्षणासाठी पाठविले. वैद्यकीय शिक्षणानंतर तिला संस्थानात डॉक्टर म्हणून १९०२ साली अलबर्ट इस्पिताळात असिस्टंट डॉक्टर म्हणून संस्थानात नेमणूक केली.

मुलींना चांगल्या प्रकारचे शिक्षण मिळावे म्हणून शाहू महाराज शिक्षणाकरीता मुलींना दुसऱ्या ठिकाणी पाठवत. राधाबाई सूर्यवंशी, ताराबाई खानोरकर इत्यादी पाच मुलींची निवड करुन त्यांना सेंट कोलोम्बो गर्ल्स हायस्कूल, मुंबई या संस्थेत पुढील शिक्षणासाठी पाठवण्यात आले. या शाळेत त्या मुली दोन वर्ष होत्या. त्यांच्या दोन्ही वर्षाच्या खर्चाची जबाबदारी दरबारने घेतली. शिवाय सेंट कोलोम्बो गर्ल्स हायस्कूलला देणगी दाखल ५०० रुपयेही शाहूंनी दिले. ही देणगी २७ मार्च १९२० रोजी दिली.[७] राजर्षी शाहूंनी मुलीच्या शिक्षण प्रसारासाठी स्कॉलरशिप मंजूर केल्या. गुजरात राज्यातील मुलींना शिष्यवृत्ती देण्याचे औदार्य राजर्षी शाहूंनी दाखवले. त्यांनी २४०० रुपये भावनगर राज्याच्या खजिन्यात ठेव म्हणून ठेवले व त्या रक्कमेचे जे व्याज येईल ते भावनगर राज्यातील मुलींना शिष्यवृत्या म्हणून देण्याची सोय केली. या शिष्यवृत्या महाराणी लक्ष्मीबाई छत्रपती यांच्या नावे दिल्या गेल्या. शिक्षकांनी मुलींच्या शिक्षणाबाबत आत्मीयतेने प्रसार करावा, म्हणून राजर्षी शाहूंनी मुलांच्या शाळेत मुलींना शिक्षण घेण्यासाठी दाखल करणाऱ्या शिक्षकांना प्रोत्साहनात्मक पारितोषिके देण्याचे घोषित केले. १९१४ साली पारितोषिकासाठी २४५ रुपये तर १९१५ साली ३२० रुपये खर्च करण्यात आले.

राजर्षी शाहूंनी मुलींच्या शिक्षणासाठी विविध रितीने प्रयत्न केले. परंतु मुलांच्या शिक्षणाच्या बाबतीत जेस त्यांना यश आले तसे मुलींच्या शिक्षणाबाबत आले नाही. कारणे विविध असतील, पण मुलीच्या शिक्षणाची स्पृहणीय प्रगती राजर्षी शाहूंच्या कारकिर्दीत झाली नाही. १८९४ साली करवीर राज्यात २५ मुलीच्या शाळा होत्या व त्यातून १४३६ मुली शिक्षण घेत होत्या तर १९२२ साली ३३ मुलींच्या शाळा होत्या व त्यातील शिक्षणार्थी मुलींची संख्या २२७१ होती. हा बदल स्पृहणीय म्हणता येणार नाही. परंतु त्याचबरोबर हे ही खरे की स्त्री शिक्षणाच्या मार्गातील काही प्रमुख अडथळ्यावर मात केली आहे हे श्रेय राजर्षी शाहूकडे जाते.

सारांश :

भारतामध्ये स्त्रीला सामाजिक स्वातंत्र्य नव्हते, तिच्या इच्छेप्रमाणे राहण्याची व जीवन जगण्याची मुभा नव्हती. तिच्यावर अनेक बंधने लादलेली होती. स्त्रीला समाजात व कुटुंबात दुय्यम स्वरुपाचे स्थान होते. एकंदरीत तिला पुरुषाच्या मर्जीप्रमाणे वागावे लागत होते. पुरुषांचे आदेश तिला पाळावे लागत असत. आपल्या देशातील कट्टर पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्री जातीवर अनेक प्रकारचे अन्याय व अत्याचार होत होते. स्त्रीचे जीवन असाहाय्य व पूर्णपणे परावलंबी बनले होते. समाजाचा तिच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन हा कनिष्ठ वा वाईट स्वरुपाचा होता. १९ व्या शतकात स्त्रीयांची सामाजिक स्थिती अत्यंत दयनीय स्वरुपाची होती. ज्या काळात समाज स्त्रियांना शिक्षण नाकारत होता, त्या काळात राजर्षी शाहूंनी स्त्री शिक्षणाबद्दलचे आपले विचार प्रकट करुन व प्रत्यक्ष स्त्री शिक्षणाचे कार्य करुन दाखविले. राजर्षी शाहू उदामतवादी शिक्षणापासून ते तांत्रिक शिक्षणापर्यंत आणि अस्पृश्यांच्या शिक्षणापासून ते स्त्री शिक्षणापर्यंत दूरच्या नजरेने पाहणारे एक जाणते शिक्षण पुरस्कर्ते व प्रसारक होते.

संदर्भग्रंथ सूची :

१. सूर्यवंशी, कृ. गो., १९७६, इंदुमती राणीसाहेब, ठोकळ प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, पृष्ठ क्र. १९.
२. लट्ठे, आ. बा., १९२५, श्री म. छत्रपती शाहू महाराज यांचे चरित्र, दत्ताजीराव सावंत, श्रीरामत्व प्रकाश छापखाना, बेळगांव, पृष्ठ क्र. ३८०, ३८१.
३. भगत, रा. तु. १९९९, शिक्षण महर्षी राजर्षी शाहू महाराज जीवन व कार्य, सिद्धराज प्रकाशन, पुणे, पृष्ठ क्र. १३८.
४. करवीर गॅझेट भाग १, जाहिरनामा ११ ऑक्टोबर १९१९, ०८ ऑक्टोबर १९१९, पृष्ठ क्र. १६०.
५. सूर्यवंशी, कृ. गो., १९७६, इंदुमती राणीसाहेब, ठोकळ प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, पृष्ठ क्र. १८६.
६. करवीर गॅझेट भाग १, जाहिरनामा दि. ०८ ऑक्टोबर १९१९, पृष्ठ क्र. १६०.
७. सूर्यवंशी, कृ. गो., १९८४, राजर्षी शाहू: राजा व माणूस, ठोकळ प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, पृष्ठ क्र. १८८.

■■■

ISSN No. 2394-5990

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे सामाजिक कार्य आणि जागृति

डॉ. सचिन ज्ञानेश्वर मोरे
इतिहास विभाग,
अहमदनगर महाविद्यालय अहमदनगर
मो. ८८५६९३०८९७
इमेल : moresachin494@gmail.com

गोषवारा :

आधुनिक महाराष्ट्राच्या परिवर्तनात छत्रपती शाहू महाराजांचे योगदान अनन्यसाधारण आहे. या परिवर्तन प्रकियेत प्रस्थापित समाज व्यवस्थेला आणि प्रस्थापित वर्गांच्या विशेषत: ब्राह्मणी हितसंबंधाला हादरा बसला. त्यामुळे हा वर्ग महाराजांच्या विचार-कार्याला सातत्याने विरोध करीत होता. तत्कालीन ब्राह्मणी वृत्तपत्रांच्या माध्यमातून त्यांना झालेला विरोधी वर्तन-व्यवहार लक्षात येतो. या पत्रांना सत्यशोधक-ब्राह्मणेतर पत्रांनी चोख उत्तर देऊन छत्रपतींची बाजू उचलून धरलीच शिवाय; त्यांच्या विचार-कार्याला नैतिक अधिष्ठान दिले. त्यात बडोदे येथून प्रसिद्ध होणाऱ्या 'जागृति' या पत्राची भूमिका अद्वितीय होती. ब्राह्मणी वृत्तपत्रांशी वैचारिक संघर्ष करीत; या पत्राने न्यायावर, समतेवर व मानवतावादावर आधारलेली महाराजांची कार्यपद्धती, तार्किकतेने व विस्तारीतपणे मांडली. त्याचबरोबर त्यांचा राष्ट्रीय ऐक्याचा अन स्वातंत्र्य प्राप्तीचा मनोदय व भूमिका स्पष्ट करण्याचे कार्य केले. त्यामुळे जागृति वृत्तपत्राला ऐतिहासिक महत्व प्राप्त होते.

स्वातंत्र्य, समता बंधुता, न्याय इ. नव-मूल्यांच्या आधारे निर्माण झालेल्या समाजाला आधुनिक समाज म्हणता येते. त्यासाठी समाजात प्रबोधन, पुनरुज्जीवन घडविण्याच्या विविध साधनात सामाजिक चळवळी आणि समाजसुधारकांचे योगदान महत्वाचे ठरते. आधुनिक महाराष्ट्राच्या सामाजिक परिवर्तनाला ज्या सुधारकांचे कार्य-कर्तृत्व कारणीभूत ठरले, अशा थोर सुधारकांच्या श्रेणीमध्ये राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे नाव अग्रभागी घेता येते. महाराजांची भूमिका कृतीशील समाज सुधारकांची असल्याने त्यांनी प्रत्यक्ष स्वरुपात सुधारणा करण्यावर आपले लक्ष केंद्रित केले होते. विसाव्या शतकाच्या प्रारंभीस त्यांनी बहुजन समाजात विविधांगी सुधारणा घडवून आणल्या. सामाजिक विषमता, अंधश्रद्धा व अज्ञान इत्यादीने शेकडो वर्षांच्या परंपरेत निश्चील झालेल्या समाजाला गतिशील करण्याचे मोलाचे काम त्यांनी केले.

बहुजन समाजाच्या राजकीय, सामाजिक-धार्मिक, आर्थिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील हक्कांचा छ. शाहू महाराजांनी सतत पाठपुरावा केला. त्यांच्या या कार्यपद्धतीतून तत्कालीन समाज ढवळून निघाला. त्यातून समाजात उमटलेल्या प्रतिक्रियांना मुख्यत: दोन प्रकारात विभागता येते. या दोन्ही प्रतिक्रिया परपस्परविरोधी होत्या. एकीकडे बहुजन समाजात नव्याने उदयास आलेल्या सुशिक्षित मध्यम वर्गाच्या आशा-आकांक्षा महाराजांच्या कार्यातून व विचारातून प्रकट झाल्या होत्या. दुसरीकडे प्रस्थापित समाज आणि त्यातील उच्च वर्गाची विशेषत: ब्राह्मणी हितसंबंधाला व वर्षानुवर्षे असलेल्या मक्तेदारीला हादरा बसला. त्यामुळे हा वर्ग नाराज होता, तसेच त्यांचा या सुधारणेला आणि महाराजांच्या धोरणांनाही विरोधही होता. ब्राह्मणांची ही नाराजी विविध माध्यमातून प्रकट होत होती. त्यात ब्राह्मणी वृत्तपत्रांची भूमिका महत्वाची होती. या ब्राह्मणी वृत्तपत्रांच्या विरोधात छ. शाहू महाराजांच्या बाजूने अनेक ब्राह्मणेतर वृत्तपत्रे उभी राहिली. महाराष्ट्रातील ब्राह्मण-ब्राह्मणेतर संघर्षाला या वृत्तपत्रांनी अधिक गतिमान केले. त्यामध्ये बडोदा या अमराठी प्रांतातून प्रसिद्ध होणारे भ. ब. पाळेकर यांचे ङ्कजागृतिफ (१९१७-१९४९) या मराठी वृत्तपत्राचे योगदान महत्वाचे होते. जागृति वृत्तपत्र सत्यशोधक-ब्राह्मणेतर चळवळीचे मुखपत्र होते. याकाळात विशेषत: शाहू छत्रपतींच्या अखेरच्या पर्वात त्यांची बाजू उचलून धरण्याची महत्वाची कामगिरी जागृतिने निभावली. त्याच जागृतिच्या भूमिकेचा विचार प्रस्तुत निबंधामध्ये केला आहे.

सन १८९९ मध्ये वेदोक्त प्रकरण कोल्हापुरात उद्भवले. पुढे महाराष्ट्रात याचा भडका उडून त्याचे रुपांतर एका तीव्र सामाजिक संघर्षात झाले. त्यात, 'प्रो. विजापूरकर यांनी 'ग्रंथमाला' मासिकातून व १९०१ मध्ये लो. टिळकांनी 'केसरी'त 'वेदोक्ताचे खूळ' या नावाने दोन अग्रलेख लिहून वेदोक्ताचा अधिकार नाकारत छत्रपती व मराठ्यांच्या अस्मितेवर प्रहार केला.'[१] १९०२ मध्ये मागासलेल्या जातींना राज्यातील पन्नास टक्के नोकऱ्या राखून ठेवण्याच्या महाराजांच्या क्रांतिकारक ठरावाच्या विरोधात ब्राह्मणी पत्रे पुढे सरसावल्याचे दिसते. ह्या आज्ञेमुळे ब्राह्मणांच्या ताब्यात असलेली राज्यकारभारातील नि

राजकारणातील सत्ताकेंद्रे त्यांच्या हातातून निसटू लागली. त्यांची पत, प्रतिष्ठा नि सत्ता ह्यांना वेध लागला. कोल्हापूरचे ब्राह्मणी पत्र 'समर्थ' ह्याने अकांडतांडव केले.[२] असे मत धनंजय कीर यांनी व्यक्त केले आहे. यावरून ब्राह्मणांचा सुधारणा विरोध लक्षात येऊ शकतो. पुढे १९२० साली जागृतिने पत्राने अग्रलेखात लिहिले की, कोल्हापूरचे महाराज श्री शाहू छत्रपती यांच्यावर टीकेचा भडीमार करण्याच्या बाबतीत जरा कोठे संधी मिळाल्याबरोबर, ब्राह्मणी अर्थात कडव्या भटजी पक्षाच्या अभिमानी वर्तमानकारांमध्ये नेहमी अहमहमिका चालू असते. सुमारे वीस वर्षांपूर्वी कोल्हापूर येथे वेदोक्त प्रकरण चालू झाल्यापासून महाराजांवर ब्राह्मण वर्ण स्वाभिमानी मंडळींची वक्रदृष्टी झालेली आहे... महाराजांनी हल्ली मागासलेल्या वर्गाच्या चळवळीत आणि त्यातही विशेषकरून अस्पृश्य गणलेल्या जातींच्या उद्धाराविषयक चळवळीत मन घातल्यापासून व जाहीर रीतीने त्या चळवळीमध्ये पुढाकार घेण्यास आरंभ केल्यापासून तर महाराजांवरील प्रतिकूल टीकेला अतिशय ऊत आलेला आहे.[३] जागृतिची ही प्रतिक्रिया अत्यंत बोलकी होती. यावरून महाराजांचा द्वेष ब्राह्मणी पत्रामधून सातत्याने वीस वर्षे सुरु असल्याचे दिसते.

ब्राह्मणांचा कनिष्ठ वर्गाच्या शिक्षणास विरोध होता तर; महात्मा फुले यांच्याप्रमाणे शाहू छत्रपतींनी आपल्या सामाजिक सुधारणेच्या कार्यात शिक्षणाला प्रमुख स्थान दिले होते. त्यातील त्यांची भूमिका व्यापक आणि सर्वसमावेशक स्वरुपाची होती. कोल्हापूर संस्थानात त्यांनी १९१६ मध्ये सार्वत्रिक व मोफत शिक्षण योजनेचा पाया घातला. बडोद्याच्या खाशेराव जाधवांना एका पत्रात ते लिहितात, सक्तीच्या मोफत शिक्षणाचा प्रसार करून लोकांना ज्ञान द्यावे, त्यांना आपली एकंदर परिस्थिती काय आहे व गरजा काय आहेत ते कळवावे व देशात ऐक्य वाढून सर्वांचे कल्याण व्हावे हे ध्येय पुढे ठेवून चालण्याचा माझा संकल्प आहे.[४] सन १९१७ मध्ये मराठा शिक्षण परिषदेचे खामगावच्या अध्यक्षीय भाषणात छत्रपती शाहू महाराज म्हणाले, जोपर्यंत आमच्यामध्ये जातीजातींतील मतभेद आणि मत्सर जिवंत आहेत, तोपर्यंत आम्ही आपापसात झगडत राहणार; आणि आमच्या हितवृद्धीस अपाय करून घेणार. आमच्यातील अंतस्थ कलह नाहीसे करण्यास आणि आम्हाला स्वराज्यास पात्र करून घेण्याकरिता ही अनर्थकारक जातीपद्धती झुगारून देणे, आम्हाला अत्यंत आवश्यक आहे.[५] बहुजनांच्या शैक्षणिक प्रगतीसोबत स्वराज्याच्या मागणीचा पाठपुरावा त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात केल्याची माहिती जागृति वृत्तपत्रामध्ये मिळते.[६] सर्वांना शिक्षण हे ध्येय ठेवणाऱ्या छ. शाहू महाराजांनी, राष्ट्रावादाला व्यापक बैठक देण्यासाठी जातिभेदाला विरोध केला होता.

अस्पृश्यता निर्मुलन करताना राजर्षी शाहू महाराजांनी समतेचा आणि राष्ट्रीयत्वाचा तात्त्विकपणे विचार केला होता. १५ एप्रिल १९२० रोजी माणगाव येथील परिषदेत बोलताना ते म्हणाले की, कित्येक लोक म्हणतात राजकारणाचा नि अस्पृश्यतेचा काय संबंध आहे? पण मी म्हणतो, अस्पृश्यांना मनुष्याप्रमाणे वागविल्याशिवाय राजकारण कसे होणार? ज्यांना राजकारण करणे आहे त्यांनी मनुष्याला मनुष्याप्रमाणे म्हणजे इतर देशात वागवितात त्याप्रमाणे वागविले पाहिजे. आणि तसे वागविल्याशिवाय देशकार्य कसे होणार? तोंडाने बडबड करणारे पुढारी आम्हास नको आहेत. कुतीने जातिभेद मोडून आम्हास मनुष्याप्रमाणे वागवतील असे पाहिजेत.[७] यावरून त्यांचा अस्पृश्योद्धाराचा दृष्टीकोन दिसून येतो. तरीसुद्धा ते ब्राह्मणद्वेष्टे असल्याचा आरोप केल्यानंतर जागृति पत्राने, महाराजसाहेब अस्पृश्यांना उत्तेजन देतात ते ब्राह्मणांचा पाणउतारा करण्यासाठी, ते ब्राह्मणांना चिडविण्यासाठी अशी कित्येक मतलबी लोक अज्ञ जनांची समजूत करून देत आहेत. पण अस्पृश्यांच्या उन्नतीसंबधीची महाराजांची भाषणे जो कोणी बारकाईने वाचेल आणि महाराजांकडून ज्या धोरणाचा धैर्याने पुरस्कार केला जात आहे ते धोरण जुन्या समजुतीच्या ब्राह्मणेतरांना, अर्थातच स्पृश्य वर्गातील ब्राह्मणेतरांनाही नापसंत आहे ही गोष्ट ध्यानात वागविल, त्याला महाराजांचे धोरण अस्पृश्यांसंबंधाच्या खऱ्याखुऱ्या कळकळीनेच प्रेरित झालेले आहे याविषयी मुळीच शंका वाटावयाची नाही. एके काळी आपण अस्पृश्यांचा तिरस्कार करणारेच होतो आणि आता त्याबद्दल पश्चाताप होत आहे, अशी खुद्द महाराजांची कबुलीजबानी आहे.[८] असा खुलासा करून महाराजांच्या अस्पृश्यउद्धाराची भूमिका स्पष्ट केली. या समाजात नष्ट झालेला आत्मविश्वास उत्पन्न करण्यासाठी महाराजांनी अनेक सुधारणा केल्या. त्यापैकी एक म्हणजे अस्पृश्य लोकांना त्यांनी वकिलीच्या सनदा दिल्या. नागपूरच्या भाषणात महाराज म्हणतात, अशा वकिलीच्या सनदा देण्यात माझा हेतू एवढाच आहे की, जे धंदे अस्पृश्य वर्गास रूढीने, कायद्याने, अगर दडपशाहीने बंद झालेले आहेत, ते त्यास मोकळे करून द्यावेत व त्यांची स्थिती सुधारून, त्यांच्यात आपण इतर माणसांचे बरोबरीचे आहोत, अस आत्मविश्वास उत्पन्न करावा.[९] यामधून त्यांचा हेतू लक्षात येतो. जागृति पत्राने जप करणारे ब्राह्मण व इतर स्पृश्यवर्गीय लोक मुखत्यारी सनदांना पात्र आणि अस्पृश्य मात्र अपात्र! हा न्याय कोठचा? अस्पृश्यांना मुखत्यारीच्या सनदा देऊन त्यांच्या उन्नतीच्या आड येणारा एक निर्बंध नाहीसा करण्यात महाराजांनी खरोखरच एक महत्कृत्य केले, मोठे पुण्य जोडले असेच कोणीही न्यायप्रिय मनुष्याला वाटेल. ब्राह्मण वगैरे लोक काय ते वकिलांच्या सनदांना पात्र आणि अस्पृश्य

ISSN No. 2394-5990

मग ते शिकलेले असले तरी अपात्र अशी निसर्गाची किंवा ईश्वराची सनद आहे, असे कोणी तरी दाखवून देईल काय?[१०] असे प्रश्न विचारून जागृतिने हा मुद्दा न्यायाच्या व समतेच्या चौकटीत उभा केल्याचे दिसते.

महाराजांनी सह्याद्रीखंड व ब्रह्मपुराण यांच्या आधारे चित्पावन ब्राह्मणांची उत्पतीचा खुलासा करून त्यांकडून संस्थानातील देवघरात पूजा करून घेण्यास मनाई हुकुम केला. तेव्हा 'केसरी'ने आक्षेप घेऊन महाराज एका विशिष्ट वर्गाची निंदा करतात असा आरोप केला. ही पुराणगुंडे महाराजांनी किंवा त्यांच्या जातभाईंनी निर्माण केली नसून, स्वत: केसरीकारांच्या जातभाई पौराणिक गुंडानीच मागील काळी करून ठेवली आहेत. त्याला महाराजांचा काय इलाज? आपल्या जातभाईंच्या हजारो वर्षे भरून गेलेल्या पौराणिक गुंडांच्या विरुद्ध लिहित नाही आणी महाराजांच्या उलट मात्र भडीमार करण्यास फावते; ह्याला ङ्गकेसरीफ्च्या भ्याडपणा म्हणावा की उर्मटपणा म्हणावे हे काहीच आम्हास समजत नाही.[११] असा युक्तिवाद करून केसरीच्या आक्षेपाला जागृतिने मार्मिकपणे फटकारले होते. तसेच ब्राह्मणी संस्थानातील काही हौदांवर ब्राह्मणेतरांना जाण्याला अस्पृश्यांप्रमाणे मनाई आहे ह्याबद्दल केसरीने कधी निषेध केला तर खरा आनंद आहे.[१२] असे नमूद करून जागृतिने केसरीच्या दांभिक व दुटप्पी भूमिकेबद्दल शंका उत्पन्न केली होती.

१९२० साली कोल्हापुरात क्षात्रजगद्गुरूंच्या निर्मितीची कल्पना पुढे आली. मराठा समाजातले लोकमत अजमावून पाहण्यासाठी श्री. शाहू छत्रपती पुण्यास आले. या सभेस ङ्गजागृतिफ्चे संपादक भगवंतराव पाळेकर हजर होते. काही भाषणानंतर सभेत गोंधळ होऊन मारामारी झाली. सभेच्या दुसऱ्या दिवशी पुण्याच्या फौजदारी कोर्टात महाराजांवर फिर्याद दाखल झाली. ज्ञानप्रकाश पत्राने याविषयी महाराजांवर टीका केली. जागृतिने अग्रलेख लिहून, ''ज्ञानप्रकाशाचे' शिखंडी वार[१३] असे म्हणून टीका केली. या प्रकरणात सामील असणारे मराठे, ब्राह्मण आणि ब्रिटिश या तिघांनाही जागृतिने आपल्या लेखात जबाबदार धरले. तो लेख वाचून महाराजांनी खुश होऊन पाळेकरांना हजार रुपये बक्षीस दिले होते.[१४] पुढे पाळेकरांनी महाराजांची परवानगी घेऊन 'छत्रपतींविरुद्ध फिर्याद'[१५] या शीर्षकाने जागृति पत्रात लेख छापला. त्यात महाराजांवर केलेल्या आरोपांचा तपशील दिला आहे. या प्रकरणात जागृतिने 'केसरी' विचारांच्या संप्रदायाला अधिक जबाबदार धरले. फिर्यादी पक्षाने, महाराजांनी पारंपरिक समाजरचनेला धक्का पोहचवल्याने समाजात अनागोंदी माजेल आणि ब्राह्मणांची मने स्वराज्यप्राप्तीसाठी उदासीन होतील. असा युक्तिवाद करून ब्राह्मणेतर चळवळ स्वराज्यद्रोही असल्याचा गंभीर आरोप केला होता. त्याचे खंडन करताना जागृतिने 'छापखान्याचे ब्राह्मण्य आणि ब्राह्मण्याचा छापखाना'[१६], या लेखातून ब्राह्मणांद्वारे धर्माच्या नावाने होत असलेला बौद्धिक व आर्थिक गुलामगिरीचे मंडन उघड केले आणि ब्राह्मणेतर चळवळीची आवश्यकता स्पष्ट केली.

१९२२ मध्ये छत्रपती शाहू महाराजांचे निधन झाले. 'श्री.शाहू छत्रपती महाराजांचा स्वर्गवास!' या शीर्षकाने जागृतिने अग्रलेख लिहून महाराजांचा मुक्तकंठाने गौरव केला. परंतु ब्राह्मणी वृत्तपत्रांनी याही काळात महाराजांविषयी आकसबुद्धीने लिखाण करीत द्वेषपूर्ण व्यवहार केल्याचे दिसते. 'ब्राह्मणी खुनशीपणाचे मासले' या स्फुटलेखनातून जागृतीने लिहिले, कै. बाळ गंगाधर टिळकांच्या कुटुंबाला पहिली दुखवट्याची तार छत्रपतींनी पाठवली होती. परंतु तेच छत्रपती कैलासवासी झाले तेव्हा जहाल ब्राह्मणांच्या पुण्यामुंबईच्या दैनिकांनी शोकाचा एकही उद्गार काढला नाही. दुखवट्याचा संपादकीय लेख नाहीतर नाही, परंतु मृत्यूची बातमी देताना 'कळविण्यास दु:ख वाटते' अशा प्रकारचा ओझरता दु:खोद्गारही व्यक्त झाला नाही. कित्येक सटरफटर पत्रांनी तर महाराजांच्या मृत्यूविषयी लिहिताना उघड कुत्सित विधाने करण्यासही कमी केले नाही. 'केसरी'ने एकंदरीत मृत्युलेख चांगला लिहिला, परंतु शेवटी शेवटच्या वाक्यात त्यांच्या ब्राह्मणी हृदयाची वक्रता व्यक्त व्हावयाची राहिली नाही. वृद्ध 'ज्ञानप्रकाश' मवाळ, परंतु त्याच्या वार्धक्यजन्य मज्जाविकारामुळे मृत्युलेख लिहिताना तो मृत्युलेख आहे हे तो विसरला आणि जणू काय आपण महाराजांच्या कारकिर्दीचे परीक्षण करीत आहोत अशा थाटामध्ये त्यांनी आणला.[१७] महाराज गेल्यानंतरही त्यांच्याशी वैरभाव आणि कटुता ब्राह्मणी पत्रांनी सोडला नसल्याचे जागृती पत्राच्या विवेचनावरून लक्षात येते.

राजर्षी छ. शाहू महाराजांच्या कामगिरीचे मूल्यमापन करताना चिकित्सक दृष्टीकोन ठेवणे अवघड आहे; इतकी त्यांची कामगिरी वैविध्यपूर्ण होती. वेदोक्त प्रकरणातून त्यांच्यावर ब्राह्मणद्वेष्टेपणाचा आरोप झाला. ब्राह्मणी पत्रांनी त्यांच्याविषयी अखेरपर्यंत हीच भूमिका कायम ठेवली. प्रत्यक्ष कृती, कर्तव्यनिष्ठा आणि साहसी ध्येयवाद ही महाराजांच्या कार्यांची वैशिष्ट्ये होती. त्यांचे कार्य कोणत्याही एका विशिष्ट जात-वर्ग, लिंग आणि धर्मापुरते मर्यादित नव्हते. सामाजिक समता आणि त्यासाठी ङ्गसंधीची समानताफ हे तत्व त्या कार्याच्या मागे होते. ब्राह्मण व राजर्षी शाहू छत्रपती या संघर्षात ङ्गजागृतिफपत्र महाराजांच्या पाठीशी उभे होते. महाराजांच्या विचारांचा व कार्यांची नोंद घेऊन, त्यांचा एका तात्त्विक भूमिकेतून पुरस्कार करणारे समकालीन पत्र म्हणून जागृति पत्रास ऐतिहासिक महत्व आहे. महाराष्ट्राबाहेरील संस्थांनी मुलखातून प्रसिद्ध होऊन तसेच, महाराष्ट्रातील सामाजिक संघर्षात ब्राह्मणेतर पक्षाचे मुखपत्र म्हणून जागृति पत्राने केलेली कामगिरी उल्लेखनीय होती.

संदर्भ साधन सूची :

१. जयसिंगराव पवार, राजर्षी शाहू छत्रपती: जीवन व कार्य, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, प्रथमावृत्ती, कोल्हापूर, २०१२, पृ. ३४-३५.
२. धनंजय कीर, प्रेषित राजर्षी शाहू छत्रपती, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, १९७०, पृ. १८.
३. जागृति, ता. १२-०६-१९२०.
४. ना. य. डोळे, महाराष्ट्रातील समाज-प्रबोधन आणि छत्रपती शाहू महाराजांचे कार्य, (संपा.) मा. प. मंगुडकर, पुणे विद्यापीठ, १९७५, पृ. ४६.
५. जयसिंगराव पवार, राजर्षी शाहू छत्रपतींची भाषणे, सुमेरू प्रकाशन, डोंबिवली, २००८, पृ. ६९.
६. जागृति, ता. ०५-०१-२०१८.
७. धनंजय कीर, प्रेषित राजर्षी शाहू छत्रपती, पूर्वोक्त, पृ. ३१.
८. जागृति, ता. १२-०६-१९२०.
९. जयसिंगराव पवार, राजर्षी शाहू छत्रपती: जीवन व कार्य, पूर्वोक्त, पृ. ६९-७०.
१०. कित्ता, १२-०६-१९२०.
११. जागृति, 'केसरी-छत्रपती लढाई', ता. २४-०७-१९२०.
१२. जागृति, स्फुट, २४-०७-१९२०.
१३. जागृति, ता. २३-१०-१९२०.
१४. भ.ब. पाळेकर, जागृतिकार पाळेकर, (संपा.) सदानंद मोरे, म. जोतीराव फुले समता प्रतिष्ठान, पुणे, १९९६, पृ. ६५.
१५. जागृति, ता. ०४-०६-१९२१.
१६. जागृति, ता. ११-६-१९२१.
१७. जागृति, ता. २०-०५-१९२०.

■■■

ISSN No. 2394-5990

शैक्षणिक क्रांतीचे अग्रदूत राजर्षी शाहू महाराज : ऐतिहासिक अध्ययन

श्री. संतोष गोहोकार
सहाय्यक प्राध्यापक, चिंतामणी महाविद्यालय, घुग्घुस
जिल्हा - चंद्रपूर
मो. क्रमांक - ९८५००७१८५८
ईमेल - santoshgohakar1@gmail.com

शोधनिबंधाचा सारांश :

राजर्षी शाहू महाराज यांना शिक्षणाच्या माध्यमातून सर्वांचा विकास साधून समानतेच्या पातळीवर आणायचे होते. भूतकाळाच्या ज्ञानावरुन वर्तमान परिस्थितीचे बारकाईने अभ्यास करुन भविष्याचा वेध घेणार ते द्रष्टे सुधारक होते. महात्मा फुले यांच्या कार्यापासून प्रेरणा घेत आपल्या प्रजेच्या सर्वांगीन विकासाची महत्वाकांक्षा बाळगून शैक्षणिक विकासाच्या कार्याची सुरुवात केली आणि प्रथमच समाजातील सर्वंच स्तरातील लोकांना शिक्षणाचे दार खुले केले. शिक्षणातून सर्वांना समानतेच्या पातळीवर आणण्याचे काम केले. मागासलेल्या लोकांना आपली योग्यता दाखवून देण्याची संधी उपलब्ध् करुन दिली. मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा उपक्रम सुरु केला. प्रत्येकास शिक्षण घेता यावे म्हणून ङ्गगाव तिथे शाळाफ सुरु केल्या. आर्थिक अडचणीमुळे कुणीही शिक्षणापासून वंचीत राहू नये म्हणून शिष्यवृत्ती, वसतीगृहे सुरु केली. सामाजिक उत्थान, जातीनिर्मुलन, दुर्बलांच्या सबलीकरणासाठी शिक्षण आवश्यक असल्याचे त्यांच मत होत. स्त्रीयांच्या शिक्षणाकरिता विशेष लक्ष दिले. शैक्षणिक दर्जा वाढविण्यासाठी शिक्षक प्रशिक्षण, पंच पध्दती शाळा यासारखे उपक्रम सुरु केले. याअनुषंगाने प्रस्तुत शोध निबंधात अभ्यास करण्यात आला आहे.

बिजशब्द् : शिक्षण, समता, सामाजिक, प्रसार

प्रस्तावना :

आधुनिक महाराष्ट्राच्या जडनघडणीत ज्या महान समाज सुधारकांनी योगदान दिले आहे त्यात राजर्षी शाहू महाराज यांचे योगदान महत्वपूर्ण आहे. महात्मा फुले यांनी समतेचे, स्वाभिमानाच विचारांचे जे बिज रोवले त्याला खतपाणी घालून वाढविण्याचे काम शाहू महाराजांनी केले. सत्ता, संपत्ती व ज्ञान प्राप्त करण्याच्या अधिकारापासून ज्यांना दूर ठेवण्यात आले होते अशा मागासलेल्या वर्गांतील लोकांना स्वाभिमानाने जगता यावे. शिक्षणाच्या माध्यमातून विकासाच्या वाटा चोखाळता याव्यात याकरिता आपले संपुर्ण आयुष्य् खर्ची घातले. देशातील ९७ टक्के बहूजन समाज सामाजिक व धार्मिक गुलामगीरीत तथा दारिद्र्यात अडकलेला होता. शिक्षणाचा अभाव हे त्याचे मूळ कारण होते. शिक्षणावर उच्चवर्णीयांचीच मक्तेदारी असल्याने बहूजन समाज अप्रगत व मागासच राहिला. इंग्रजाच्या आगमनाबरोबर या परिस्थितीत बदल घडून येण्यास सुरुवात झाली. कायद्यासमोर सर्व समान, सर्वांना समान न्याय या तत्वाचा अवलंब केला. इंग्रजांच्या समानतेच्या धोरणामुळे भारतात प्रथमच प्रभाव शिक्षणाचे दार समस्त बहूजन समाजाला, शुद्रातीशुद्रांसाठी मोकळे झाले. पण प्रत्यक्षात या वर्गाला त्याचा फारसा लाभ झाला नाही. तेव्हा महात्मा फुले यांनी बहुजनांच्या शिक्षणाच्या मार्गात अडथळा ठरणाऱ्या अन्यायी व्यवस्थेच्या विरोधात लढा उभारला. बहूजन, शुद्रातीशुद्रांना शिक्षण घेता यावे म्हणून १८८२ ला हंटर आयोगासमोर मोफत व सक्तीच्या शिक्षणाची मागणी केली. महात्मा फुलेंनी हाती घेतलेल्या शैक्षणिक परिवर्तनाचा वसा राजर्षी शाहू महाराजांनी पुढे चालविला.

उद्दीष्टे :

१. शाहू महाराज यांच्या मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाच्या योजनेचा अभ्यास करणे.
२. स्त्री शिक्षणाच्या कार्याचा अभ्यास करणे.
३. वर्तमान शैक्षणिक धोरणावरील प्रभावाची चर्चा करणे.

इंग्रजाच्या भारतातील आगमनानंतर शिक्षणाच्या सार्वत्रिकरणास सुरुवात झाली. पाश्चिमात्य उदारवादी नवविचारांची ओळख झाली. सनातनी विचारांच्या लोकांनी समाजावरील, धर्मावरील आपली पकड टिकवून ठेवण्यासाठी जाणीवपुर्वक बहूजन जनतेस शिक्षणाच्या अधिकारांपासून वंचीत ठेवण्यास आले हे त्यांच्या लक्षात आले. शाहु पुर्व काळात मुठभर लोकांच्या हातात संपुर्ण शिक्षणव्यवस्था एकवटली होती. अशा परिस्थितीत समाजातील सर्वच स्तरातील व्यक्तीपर्यंत शिक्षणाचा प्रचार करणे अगत्याचे होते. भारतीयांना शिक्षण देत असतांना त्यांच्याच भाषेत शिक्षण देण्यात यावे असा विचार एलफिन्स्टन या इंग्रज अधिकाऱ्यांनी मांडला. १८२२ मध्ये बॉम्बे नेटिव्ह्

स्कुल सुरु करण्यात आले. मुंबई, पुण्यातही शाळा सुरु केल्या. याचवेळी ख्रिश्च्न मिशनरीनीही सामाजिक उत्थानाच्या भावनेनी भारतात शिक्षणाच्या प्रचारासाठी शिक्षण संस्था सुरु केल्या. यामुळे मुठभर लोकांच्या हातात एकवटलेले शिक्षण तळागळातील व्यक्तीपर्यंत पोहचू लागले. स्त्रीयांसाठी सुध्दा शिक्षणाची दारे उघडण्यात आली.

भारतात शिक्षणाच्या प्रचाराचे काम करीत असतांना प्रचलीत शिक्षण व्यवस्थेत सुधारणा करण्याची गरज इंग्रजांना वाटू लागली. चार्ल्स वूडनी १८४५ साली शिक्षणविषयक खलिता तयार करुन भारतात शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी, शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी मौलीक सुचना केल्या. खऱ्या अर्थानी शिक्षणाचा पाया भक्कम करण्यासाठी सर्वप्रथम निरक्षरांना साक्षर करण्याचा विचार त्यांनी मांडला. त्यामुळेच वूडच्या खलीत्यास ङ्गभारतीय शिक्षणाचा मॅग्नाकारीफ म्हणतात. १८८२ मध्ये प्राथमिक शिक्षणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी हंटर आयोगाची नियुक्ती करण्यात आली. त्यानूसार सर्वांना प्राथमिक शिक्षण मोफत देण्याची ठरविण्यात आले. शाहू महाराज कोल्हापूर संस्थानाचे राजे होण्यापुर्वी राजाराम महाराज, नागोजीराव पाटनकर यांनी शैक्षणिक क्षेत्रात चांगल्या परंपरा सुरु केल्या होत्या बाबाराव महाराजांनी सरकारी खर्चातून शिक्षण देण्याची परंपरा सुरु झाली. या काळात इंग्रजी शिक्षणाचा फारसा प्रसार झाला नसल्याने मोडी भाषेतच लिहिते व हिशेब ठेवण्यासच शिक्षण म्हटल्या जात होते. संपुर्ण कोल्हापूर संस्थानात १२२ खाजगी शाळांमधून १८२७ विद्यार्थी शिकत होते.

धर्ममार्तंड प्रवृत्तीच्या लोकांच्या गुलामगीरीतून सर्वसामान्य जनतेला मुक्त करुन शिक्षणाची दारे खुले करण्यात महात्मा फुले यांचे नाव अग्रक्रमानी द्यावे लागेल. अस्पृश्य व स्त्रीयांकरीता शाळा सुरु केल्या. मोफत प्राथमिक शिक्षणाची मागणी सरकारकडे लावून धरली. महात्मा फुलेंचा शैक्षणिक वारसा प्रार्थना समाज, ब्राम्होसमाज, व आर्य समाजानी पुढे चालविला. शाहू महाराजांनी या सर्वांच्या शैक्षणिक कार्याचा अभ्यास करुन व्यापक जनकल्यानाच्या उदात्त हेतूनी शिक्षण कार्यास सुरुवात केली. शिक्षणाच्या माध्यमातून समाजपरिवर्तनाचे कार्य त्यांना करायचे होते. या कार्यात त्यांना महात्मा फुलेंकडून प्रेरणा मिळाली.

शिक्षण सामाजिक विकासाचे एक महत्वपुर्ण अंग आहे. शोषण मुक्त समाजाच्या निर्मितीचे व मानवी विकासाचे साधन आहे. शिक्षणातून स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय ही सामाजिक मुल्ये कळतात. आपले हक्क, अधिकार व कर्तव्याची जाणीव होते. शिक्षणाचे हे महत्व ओळखून शाहू महाराजांनी महात्मा फुलेंचा वारसा पुढे चालविला. शिक्षण बहूजनांच्या उध्दाराचा मार्ग आहे. सर्व प्रकारच्या सुधारणांची गुरुकिल्ली आहे. असा त्यांचा ठाम विश्वास होता. केवळ ज्ञान संपादन करणे म्हणजे शिक्षण नव्हे तर सर्व प्रकारच्या गुलामगीरीतून सुटका करवून घेणे आणि समस्त जनतेच्या भल्याकरीता ज्ञान संपादन करणे हे शिक्षणाचे खरे महत्व आहे. शिक्षणातून व्यक्तीचा शारिरिक, मानसिक व बौध्दिक विकास झाला पाहिजे असे शाहू महाराजांना वाटत होते.

महान समाजसुधारक काळाच्या एक पाऊल पुढे असतात. ते नेहमी भावी पिढीचा विचार करुन धोरण ठरवित असतात. प्रत्येक व्यक्तीला उत्तम जीवन कसे जगता येईल याचाच ते सतत विचार करीत असतात. त्यासाठीच ते वर्तमानकाळातील मातीची मशागत करुन कृतीशील कार्याचे त्यावर सिंचन करतात. त्याची फळे भावी पिढीला मिळतात. शाहू महाराज सुध्दा वर्तमानकाळाबरोबर भविष्यकाळाचा वेध घेणारे समाजसुधारक होते. प्रजापालन हे प्रत्येक राजाचे कर्तव्य् आहे हा विचार मनान घेऊन शाहू महाराजांनी ङ्गप्रजाभेट दौराफकेला. या दौऱ्यात त्यांना ङ्गसावकारी पाश, कुलकर्णी तिढाफगावगुंडाची पिडाफहे ग्रामस्थांच्या दु:खाचे मुळ असल्याचे त्यांच्या लक्षात आले. आपल्या संस्थानातील प्रजा अज्ञानाच्या गर्तेत असल्याचे त्यांना दिसून आले. यातून बाहेर काढण्यासाठी शिक्षण दिले पाहिजे हा विचार त्यांच्या मनात आला. त्यांच्या या विचारातूनच जनतेस अज्ञानारुपी अंधकारातून बाहेर काढून शिक्षणरुपी प्रकाश उजळविणाऱ्या शाहू महाराजांचा उदय झाला.

व्यक्तीविकासाकरीता शिक्षणाचे महत्व् ओळखून शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची सुरुवात केली. १८८२ मध्ये महात्मा फुलेंनी मोफत प्राथमिक शिक्षणाचे बघीतलेले स्वप्न १९१३ झाली शाहू महाराजांनी प्रत्यक्षात उतरविले. केवळ कोरडी सहानुभुती दाखविण्यापेक्षा प्रत्यक्ष कृतीव्दारे शिक्षणाचे दार सर्वांसाठी उघडे करुन शिक्षणाची समान संधी सर्वांना उपलब्ध् करुन देण्याचे महान कार्य केले. समाजातील संपन्न वर्गापेक्षा दुर्बल घटकातील लोकांना शिक्षण देणे हे त्यांच्या शैक्षणिक कार्याचा मुख्य् उद्देश होता. मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची आवश्यकता प्रतिपादन करतांना शाहू महाराज म्हणतात, खालच्या जातीच्या लोकांवर जे अन्याय कर लादण्यात आले ते झुगारुन देण्याची ताकद त्यांच्यात निर्माण व्हावी यासाठी मोफत प्राथमिक शिक्षणाची अतिशय आवश्यकता होती. त्याकरीता तसा कायदा करुन अमलात आनला. यातून पुढील पिढी शिक्षीत होईल याची मला खात्री आहे. यावरुन त्यांच्या मनात शिक्षणाविषयी असलेली तळमळ दिसून येते. सर्वांकरीता शिक्षण असल्याने ते सर्वांनाच मिळायला हवे असे त्यांचे स्पष्ट् मत होते. शाहू महाराजांनी केवळ मोफत प्राथमिक शिक्षणाची व्यवस्थाच केली

ISSN No. 2394-5990

नाही तर, त्यासाठी लागणाऱ्या खर्चाचा विचार करुन १९१७ साली एक लाख विस हजार रुपयाची तरतूद केली.

शिक्षणाच्या अभावी होणाऱ्या परिणामाची जाणीव शाहू महाराजांना होती. समाजातील सर्वच स्तरातील व्यक्तींना शिक्षण घेता यावे म्हणून 'गाव तिथे शाळा' उपक्रमाची घोषणा करुन त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी केली. सर्व सामाजिक सुधारणांचे मुळ शिक्षण असल्याने शैक्षणिक विकासाच्या कार्यावर भर दिला. शिक्षणातून हक्काची व कर्तव्याची जाणीव होऊन राजकीय सुधारणांकडे आपोआपच लक्ष वेधल्या जाईल असे त्यांना वाटत होते. प्राचीन काळापासून चालत आलेली जातीव्यवस्था नष्ट करण्यासाठी शिक्षणाची गरज सांगतांना म्हणतात, जातिव्यवस्थे एवढी अन्य कोणतीही वाईट प्रथा नाही. ती एकदाची कायमसाठी नष्ट केली पाहिजे. याकरिता जनतेची मानसिकता तयार करावी लागेल. त्यासाठी शिक्षणाची आवश्यकता आहे. शेतकरी शेतमजूर व त्यांच्या मुलांना शिक्षण देऊन शेती कशी करायची याची माहिती देण्याची गरज आहे. शाहू महाराज स्वता:ला शिपाई, शेतमजूर व शेतकरी म्हणवून घेण्यात अभिमान वाटतो असे म्हणतात.

राजर्षी शाहू महाराज दूरदृष्टी असणारे महान समाजसुधारक होते. शैक्षणिक कार्यात स्त्रीशिक्षणावर विशेष लक्ष दिले. धर्ममार्तंड लोकांचा समाजावर प्रभाव असलेल्या काळात त्यांनी हे धाडस दाखविले. त्यांना स्त्रीयांमध्ये चारित्र्य, सदाचार व धाडस निर्माण करणारे शिक्षण दयावयाचे होते. कृष्णाबाई केळकर नावाच्या विद्यार्थीनीस वैद्यकीय शिक्षणाकरिता मुंबईला पाठविले. शिक्षण घेणाऱ्या मुलींचे शुल्क माफ करुन प्रोत्साहन दिले. ज्या काळात स्त्रीयांना शिक्षण नाकारण्यात आले होते त्या काळात शाहू महाराजांनी स्त्रीशिक्षणाकरीता त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून जे कार्य केले त्याला इतिहासात तोड नाही. इंद्रमतीदेवी नावाच्या बालविद्येवस शिक्षण देऊन समाजपरिवर्तनाच्या कार्यात विधवा स्त्रीयांच्या मुक्तीपर्वाला सुरुवात केली.

शिक्षणातून उत्म समाजसेवक व राष्ट्रसेवक घडावेत म्हणून 'विद्यापिठ' नावाची शाळा सुरु करुन शैक्षणिक क्षेत्रात नवा प्रयोग सुरु केला. या शाळेतून विद्यार्थ्यांना स्वावलंबनाचे व समाजसेवेचे धडे देण्यात येत होते. विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञान देण्यापेक्षा समाजातील दु:खाशी एकरुप होणारे विद्यार्थी घडावेत अशी त्यांची अपेक्षा होती. शैक्षणिक गुणवत्ता टिकवून ठेवण्यासाठी शिक्षणाधिकारी पद तयार केले. मुलांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण व्हावी, चांगले विद्यार्थी घडावेत व अध्ययन-अध्यापणाचा दर्जा सुधारावा म्हणून ङ्कशाळा पंच पध्दतीफ सुरु केली. यात एक पंच समिती तयार करण्यात येऊन शाळेवर देखरेख ठेवने, शाळेचे कामकाज चांगले चालावे. चुकीचे काही आढळल्यास त्याची माहिती शिक्षणाधिकाऱ्याला देणे ही कामे, समितीस करावे लागत होती. आज गावातील प्रत्येक शाळेत व्यवस्थापणाकरीता शाळा व्यवस्थापन समिती तयार करण्यात येते, त्याचे मुळ शाहू महाराजांच्या शाळा पंच पध्दतीत आढळते.

निष्कर्ष :

१. उच्च शिक्षणापेक्षा मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणावर शाहू महाराजांनी अधिक भर दिला.
२. सर्व सामाजिक सुधारणांचा पाया शिक्षण आहे हे ओळखून शिक्षणाच्या सार्वत्रीकरणावर शाहू महाराजांनी लक्ष दिले.
३. सामाजिक बंधनाकडे दुर्लक्ष करुन स्त्रीयांच्या व विधवांच्या शिक्षणासाठी प्रयत्न केले.
४. शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक विषमतेची, भेदण्याची दरी मिटविण्याचे कार्य केले.
५. गरिब व होतकरु विद्यार्थ्यांसाठी शाळा व वसतीगृहे काढून त्यांच्या उत्थानासाठी सर्वतोपरी प्रयत् केले.

मुल्यमापन :

प्रस्तूत शोध निबंधातून हे स्पष्ट होते की, राजर्षी शाहू महाराजांनी वर्णविषमतामूलक सामाजिक व्यवस्थेची बंधने तोडून सर्वांसाठी शिक्षणाचे दार उघडे केले. वंचीतांपासून अंत्यजापर्यंत सर्वांच्या शिक्षणाची व्यवस्था करुन त्यांना त्यांच्या हक्काची व अधिकाराची जाणीव करुन देण्याचे प्रयत् केले. त्यांचे शैक्षणीक कार्य आजही प्रासंगीक आहेत. सर्वांना मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण, मागासवर्गीयांना नोकरीत आरक्षण, गरिब व होतकरु विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण घेता यावे म्हणून शिष्यवृत्ती देणे, स्त्री शिक्षणाकरीता विशेष प्रयत् हे सर्व स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेनी स्विकारले आहे व भारत सरकारनी स्विकारले, ते सर्व विचार व कार्य शाहू महाराजांनी आपल्या काळात राबविले होते. यावरुन त्यांच्या अफाट दूरदृष्टीचा व भविष्याचा वेध घेऊन काम करण्याचा त्यांच्या सामर्थ्याची प्रचीती येते.

संदर्भ सूची :

१. भगत, रा.तु. – राजर्षी छत्रपती शाहू जीवन व शिक्षण कार्य, रिया पब्लिकेशन, कोल्हापूर – २०१६.
२. भोसले डॉ. एस.एस. (संपा.) – क्रांतिसुक्ते; राजर्षी छत्रपती शाहू, महाराष्ट्र राज्य् साहित्य् आणि संस्कृती मंडळ मुंबई, २००६.
३. कीर धनंजय – राजर्षी छत्रपती शाहू, पॉपूलर प्रकाशन मुंबई २०१७

■■■

'राजर्षी शाहू महाराजांचे समाज परिवर्तनाच्या दृष्टीने अस्पृश्य उद्धाराचे कार्य'

प्रा. केंगार आप्पासाहेब नामदेव
बाबासाहेब चितळे महाविद्यालय, भिलवडी
ता.पलूस जि.सांगली - ४१६३०३
Email: ankengargmail.com
Ph. No.9960635877

प्रस्तावना :

महाराष्ट्राच्या परिवर्तनामध्ये समाजसुधारकांच्या वैचारिक दृष्टिकोनाचा इतिहास हा अत्यंत प्रकल्प पद्धतीचा मानला जातो. सुरुवातीच्या कालखंडामध्ये बाळशास्त्री जांभेकर, गोपाळ गणेश आगरकर, लोकहितवादी, गोपाळ हरी देशमुख, जगन्नाथ शंकर शेठ यांनी सामाजिक सुधारणा चळवळ हाती घेतली. सामाजिक सुधारणा चळवळीचा मुख्य उद्देश समाजपरिवर्तन, अस्पृश्यउद्धार, समता, समानता, न्याय, बंधुता प्रस्थापित करणे, जातीयता दूर करणे, ईश्वर एक आहे ही भावना समाजामध्ये वाढीस लावणे अशा हेतूने सामाजिक सुधारणा चळवळी सुरू झाल्या. याच परंपरेमध्ये पुढे महात्मा फुले यांनी समाज परिवर्तनाच्या दिशेने व स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, शिक्षण, स्त्री शिक्षण, अस्पृश्य उद्धाराचे कार्य केले. त्यांच्या या कार्यातून खऱ्या अर्थाने अस्पृश्य वर्गाची स्थिती सुधारण्याचा पहिला मोठा प्रयत्न घडून आला. याच परंपरेमध्ये पुढे कोल्हापूर संस्थानांमध्ये सुरुवात करून अस्पृश्य उद्धाराचे कार्य खऱ्या अर्थाने समाज जागृतीसाठी करणारे राजर्षी शाहू महाराज होते. याच काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची दलित चळवळ ही विकसित अवस्थेत पोहोचलेली होती. दलितांना न्याय मिळवून देणे या वर्गाची स्थिती सुधारणे हा मुख्य उद्देश डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळी पाठीमागे होता. परंतु त्यांच्याही अगोदर राजर्षी शाहू महाराजांनी बहुजन समाजामध्ये वैचारिक जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला. सरकारी नोकऱ्यांमधून मागासलेल्या वर्गांकरिता विशेष तरतूद केली. याचबरोबर स्वराज्यातून अस्पृश्यतेचे समूळ नष्ट केली पाहिजे, या हेतूने अस्पृशांना शिक्षित करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळेच बहुजन समाजाचे उद्धारकर्ते असेही राजर्षी शाहू महाराज यांना ओळखले गेले. अस्पृश्यउद्धाराच्या दृष्टिकोनातून राजर्षी शाहू महाराज यांनी घेतलेले हुकूम अथवा निर्णय म्हणजेच बहुजन समाजाची उत्कर्षाची गुरुकिल्लीच ठरली असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. त्यांच्या या कार्य आणि कर्तुत्वामुळेच त्यांना लोकशाहीचे आद्य प्रवर्तक असेही म्हटले जाते. त्यांचे हे कार्य समाज क्रांतिकार्याच्या दृष्टीने अतिशय प्रेरणादायी ठरले. दलित व पद दलित समाज यांची अनेक बंधनातून मुक्तता करणे हेच त्यांच्या कार्याचे एकमेव ध्येय बनले.

वरील सर्व पार्श्वभूमीवर आधारित राजर्षी शाहू महाराजांचे अस्पृश्य उद्धाराचे कार्य परिवर्तनवादी दृष्टिकोनातून यशस्वी ठरले. याचा आढावा 'राजर्षी शाहू महाराजांचे समाज परिवर्तनाच्या दृष्टीने अस्पृश्य उद्धाराचे कार्य' या प्रस्तुत शोधनिबंधाच्या माध्यमातून घेण्यात आलेला आहे.

१.संशोधनाचे उद्देश :

१. राजर्षी शाहू महाराजांचे प्राथमिक जीवन याचा अभ्यास करणे.
२. राजर्षी शाहू महाराज यांच्या सामाजिक सुधारणा स्पष्ट करणे.
३. राजर्षी शाहू महाराज यांच्या कालखंडापूर्वी महाराष्ट्रातील अस्पृश्य वर्गाची स्थिती याचा अभ्यास करणे.
४. जाती व्यवस्था म्हणजे काय हे स्पष्ट करणे.
५. अस्पृश्यता म्हणजे काय व अस्पृश्यता संबंधातील विचार यांचा आढावा घेणे.
६. राजर्षी शाहू महाराज यांचे अस्पृश्य उद्धारासाठी केलेले कार्य म्हणजे बहुजनांसाठी शिक्षण, हजेरी पद्धत, महार वतन खालसा, भटक्या विमुक्त जातींचा उद्धार या विषयीचा आढावा घेणे.

अशा विविध उद्देशाने प्रस्तुत शोधनिबंधाची रचना केलेली आहे.

२.विषयविवेचन :

१.पूर्वचरित्र :

महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणेच्या इतिहासामध्ये अस्पृश्य समाजाची स्थिती सुधारण्यासाठी बहुमोल स्वरूपाचे कार्य राजर्षी

ISSN No. 2394-5990

शाहू महाराज यांनी केले. राजर्षी शाहू महाराज यांचा जन्म कागल येथील घाटगे घराण्यामध्ये २६ जुलै १८७४ मध्ये वडील जयसिंगराव उर्फ आबासाहेब व आई राधाबाई या दांपत्याच्या पोटी झाला. राजर्षी शाहू महाराज यांचे मूळ नाव यशवंत होते. लहान वयातच आई राधाबाई यांचा मृत्यू झाला. कोल्हापूरचे चौथे शिवाजी महाराज यांच्या मृत्यूनंतर वारसा हक्काचा प्रश्न निर्माण झाल्यानंतर त्यांच्या पत्नी आनंदीबाईंनी यशवंतराव म्हणजेच राजर्षी शाहू महाराजांना १७ मार्च १८८४ मध्ये दत्तक घेतले. राजर्षी शाहू महाराज यांचे शिक्षण राजकोट येथील राजकुमार विद्यालयात झाले. सर स्टुअर्ट फ्रेझर व रघुनाथ सबनीस यांचे मार्गदर्शन शाहू महाराजांना लाभले. १ एप्रिल १८९१ मध्ये बडोद्याचे गुणाजीराव खानविलकर यांच्या लक्ष्मीबाई या कन्याशी शाहू महाराजांचा विवाह संपन्न झाला. २ एप्रिल १८९४ मध्ये त्यांनी राज्यकारभाराची सूत्रे हाती घेतली. शैक्षणिक जीवनाचा प्रवास सुरू असतानाच त्यांनी जनकल्याणाच्या विविध योजना हाती घेतल्या. राज्य कारभाराची सूत्रे हाती घेतल्यानंतर लोककल्याण व अस्पृश्यता निवारण, शैक्षणिक सुधारणा, स्त्रियांच्या उद्धाराचे कार्य, राज्याचे आर्थिक धोरण सुधारणे, प्रशासकीय सुधारणा संस्थानांमध्ये करणे यावर त्यांनी लक्ष केंद्रित केले व परिवर्तनवादी धोरण निर्माण केले. परिवर्तनाच्या दृष्टीने समानतेसाठी त्यांनी प्रयत्नही केला. राजर्षी शाहू महाराजांचा मृत्यू ६ मे १९२२ रोजी झाला.[१]

राजर्षी शाहू महाराज यांचे अस्पृश्य उद्धारासाठी केलेले कार्य:

१. शिक्षण प्रसाराचे कार्य :

राजर्षी शाहू महाराजांनी शैक्षणिक प्रसाराच्या माध्यमातून मागासलेल्या जातींचा उद्धार करण्याचे काम करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार प्रथमत: अस्पृश्यांचे वस्तीगृह सुरू केले. सन १९०८ मध्ये 'अस्पृश्य मानलेल्या जातीत विद्या प्रसारक मंडळी' नावाची संस्था स्थापन केली.

अस्पृश्यांमध्ये शिक्षणासाठी जागृती घडवून आणणे, शाळांची संख्या वाढवणे हा महत्त्वाचा उद्देश होता. शैक्षणिक कार्यामुळे शाळांच्या संख्येबरोबर विद्यार्थी संख्या वाढली.सन १९१२ पर्यंत अस्पृश शाळांची संख्या २७ तर विद्यार्थ्यांची संख्या ६३६ इतकी झाली. या वर्गात महार, मांग, चांभार, ढोर या विविध जाती होत्या. या वर्गामध्ये शिक्षणाचा प्रसार होण्यासाठी त्यांनी २८ नोव्हेंबर १९०६ मध्ये रात्रीची शाळा ही स्थापन केली. ती शाळा कायम ठेवणे असा आदेश जाहीर केला. तर ४ ऑक्टोबर १९०७ साली नवीन आदेश जाहीर केला. या आदेशानुसार कोल्हापूर मधील चांभार या अस्पृश्य जातीतील मुलींच्या शाळेसाठी मंजुरी देण्यात आली. तसेच याला दरवर्षी रुपये ९६ इतकी खर्चाची तरतूद अंदाज पत्रकावर केली गेली.[२]

१४ नोव्हेंबर १९११ रोजी राजर्षी शाहू महाराजांनी पुन्हा नवीन आदेश जाहीर करून संस्थानातील सर्व अस्पृश्य वर्गास सर्व प्रकारचे शिक्षण मोफत करण्यात आले हे धोरण जाहीर केले.[३] याच वर्षी राजर्षी शाहू महाराजांनी तलाठीवर्गातील अस्पृश्य विद्यार्थ्यांना दरमहा आठ रुपये प्रमाणे शिष्यवृत्ती जाहीर केली. अस्पृश्य समाजातील विद्यार्थी व व्यक्तींना उच्चवर्णी यांच्याबरोबर शिक्षण देऊन नवे परिवर्तन शैक्षणिक क्षेत्रात घडवून आणणारे राजर्षी शाहू महाराज यांचा निर्णय खऱ्या अर्थाने समाज परिवर्तनाच्या दृष्टीने क्रांतिकारी ठरले.

२. सरकारी नोकरीमध्ये संधी :

अस्पृश्य समाजातील लोकांना शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून दिल्यानंतर मागासलेल्या वर्गांकरिता शेकडा ५० % राखीव जागा आपल्या संस्थानामध्ये देण्याचे धोरण शाहू महाराजांनी जाहीर केले व त्यानुसार महार, मांग वगैरे शिक्षित उमेदवारांना वकिलीच्या सनदा ही त्यांनी बहाल केल्या. या पाठीमागे त्यांचा मुख्य उद्देश स्पष्ट करताना राजर्षी शाहू महाराज म्हणतात, रूढी आणि कायदा यांनी या लोकांना सर्व पद्धतीची दारे बंद केलेली आहेत ती पुन्हा सुरू करणे गरजेचे ठरते त्यामुळेच खऱ्या अर्थाने अस्पृश्यांच्या उद्धाराचे व संरक्षणाचे कार्य होईल या विचारसरणीवर त्यांचा विश्वास होता. २६ जुलै १९०२ रोजी करवीर गॅझेट मध्ये या संदर्भात त्यांनी जाहीरनामा प्रसिद्ध केला. या जाहीरनाम्यानुसार ज्या सरकारी कार्यालयात मागासवर्गीयांची संख्या ५०% पेक्षा कमी आहे तेथे यापुढे मागासवर्गीयांची भरती करावी असा आदेश त्यांनी दिला. यावर समाजातील वरिष्ठ वर्गांनी मोठा आक्षेप घेतला त्यावेळी राजर्षी शाहू महाराज यांनी स्पष्टपणे सांगितले, 'मला राज्य सोडावे लागले तरी बेहत्तर पण मागासलेल्या व अविकसित समाजाच्या सेवेचे व्रत मी सोडणार नाही'.[४]

३. हजेरी पद्धतीचा शेवट :

राजर्षी शाहू महाराज यांनी कोल्हापूर गॅझेट मध्ये ३ ऑगस्ट १९१८ रोजी अस्पृश्यमुक्तीचा पहिला आदेश प्रसिद्ध केला. या आदेशानुसार अस्पृशांवर लादलेली अमानुष प्रथा म्हणजे 'हजेरी' या प्रथेचे निर्मूलन करण्यात आले. यामध्ये त्यांनी स्पष्ट केले आहे की, 'महार, मांग, रामोशी व बेरड या चार जातींच्या लोकांना हजेरी बंद करण्यात यावी. यातील जे कोणी गुन्ह्यात सापडून शिक्षा झालेले असतील त्यांना मात्र या हुकूमाने हजेरीची माफी नाही. या पद्धतीचा स्वीकार ताबडतोब करण्यात यावा असे स्पष्ट त्यांनी नमूद केले. याच

आशयाला अनुसरून २९ सप्टेंबर १९१८ रोजी राजर्षी शाहू महाराजांनी हजेरी संदर्भात नवीन हुकूम जाहीर केला. यानुसार गुन्हेगार म्हणून कपाळावर शिक्का बसलेल्या 'गट्ट्चोर' जातीची हजेरी राजर्षी शाहू महाराजांनी माफ केल्याचे जाहीर केले. या व्यतिरिक्त पुढे सन १९२० मध्ये माणगाव या ठिकाणी भरलेल्या परिषदेत राजर्षी शाहू महाराज यांनी आपण हजेरीची पद्धत बंद केली.[५] थोडक्यात त्यांचे हे निर्णय म्हणजे खऱ्या अर्थाने मानवतावादी दृष्टिकोनातून घेतलेले आहेत असे दिसून येते.

४.महार वतन खालसा धोरण :

महार वतन खालसा करून त्यांच्या जमिनी परतावा करून त्यांच्या नावे करून देणे आणि वतनांच्या जबाबदारीतून त्यांना मुक्त करणे असा निर्णय सन १९२१ मध्ये राजर्षी शाहू महाराज यांनी घेतला. तशा पद्धतीचा अर्ज प्रत्येक गावच्या समस्त वतनदार महार लोकांकडून त्यांनी अर्ज भरून घेतला. त्यावर तातडीने कार्यवाही करून त्या गावचे महार वतन खालसा करून टाकले. महार वतन खालसा केल्याने महार गावच्या सरकारी कामाच्या सक्तीतून मुक्त होणार असल्याने व त्यांच्या जागी रोखीने वेतन देऊन कामगार ठेवावा लागणार असल्याने खजिन्यावर त्याचा ताण पडणार होता हे उघड होते. सरकारी अधिकाऱ्यांनीही हा धोका शाहू महाराजांच्या निदर्शनास आणल्यावर त्यांनी हा सल्ला मान्य न करता त्याला उत्तर दिले, ङ्क माझा खजिना याबाबतीत रिता झाला तरी त्याची मला पर्वा नाही, पण माणसाला माणुसकीतून वंचित करणारी ही रुढी मला मोडायची आहे.'[६]

राजर्षी शाहू महाराजांनी बऱ्याचदा जातीवाचक शब्द अस्पृशांकारिता या लोकांना वापरला जातो त्यामुळेच त्यांनी यांची आडनावे सुद्धा बदलण्याचा नवा युक्तिवाद जाहीर केला. उदाहरणार्थ महार पैलवानांना हाक मारताना जाट असे नामकरण दिले. तर चांभार यांना सरदार व भंगी लोकांना पंडित अशी नावे ठेवली. या पाठीमागे त्यांचा मुख्य उद्देश म्हणजेच अस्पृश्य समाजातील लोकांना इतर व्यक्ती प्रमाणेच दर्जा आहे हे स्पष्ट करायचे होते. याविषयी सांगताना अस्पृश्य समाजातील गंगाराम कांबळे असे म्हणतात, अस्पृश्य समाजाला वर आणण्याकरता आणि त्यांच्यातील कमीपणाची कल्पना नाहीशी करण्याकरता राजर्षी शाहू महाराजांनी सर्वदृष्ट्या प्रयत्न केले.

५. राजर्षी शाहू महाराजांचे अस्पृश्य उद्धार संदर्भातील महत्त्वाचे विचार :

१. अस्पृश्यता म्हणजे जगाच्या पाठीवर हिंदुस्थानाशिवाय कुठेही न आढळणाऱ्या जातीभेताचेच हिडीस स्वरूप असून ते सर्वांना लज्जास्पद आहे. अशा शब्दात शाहू महाराजांनी नाशिकच्या सभेत उद्गार काढले.
२. अस्पृश्य समाजाच्या ऐहिक गुलामगिरीबरोबर त्यांची मानसिक गुलामगिरी ही नष्ट व्हायला हवी आणि त्यासाठी त्यांच्या ठिकाणी प्रथम आत्मविश्वास निर्माण करायला हवा.[७]
३. अस्पृश्य हा शब्द कोणत्याही माणसास लावणे फार निंद आहे, तुम्ही अस्पृश्य नाही तुम्हास अस्पृश्य मानणाऱ्या पुष्कळ लोकांपेक्षा जास्त बुद्धिमान, जास्त पराक्रमी, असे तुम्ही हिंदी राष्ट्राचे घटक आहात.
४. जातिभेद व अस्पृश्यता या एकमेकास हिन समजणाऱ्या व आपापसात द्वेष वाढवणाऱ्या गोष्टी असल्याने त्यांचा ब्राह्मण वर्गाने त्याग करावा अशी प्रेमाची विनंती करताना शाहू महाराज म्हणतात, प्रेमाने प्रेम वाढते व द्वेषाने दोष वाढतो.[८]

थोडक्यात राजर्षी शाहू महाराज यांनी समाजपरिवर्तनाच्या कार्यामध्ये प्रथमतः अस्पृश्यता निवारणाचा मुद्दा हाती घेतला. या वर्गात शिक्षण, नोकरी, व्यवसायामध्ये संधी, सरकारी नोकरीमध्ये उपलब्धता अशा अनेक विविध सुधारणा करून तत्कालीन कालखंडामध्ये परिवर्तनासाठी पहिलीच नांदी निर्माण केली. त्यांच्या या कार्यामुळेच समाजामध्ये समता, बंधुता, आणि न्याय प्रस्थापित झाला. पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित चळवळीचे नेतृत्व स्वीकारून राजर्षी शाहू महाराज यांना सुद्धा समाजक्रांतीचे आद्य प्रणेते आहेत असा उल्लेख केला. थोडक्यात राजर्षी शाहू महाराज यांचे कार्य समाज परिवर्तनाच्या दृष्टीने अत्यंत मौलिक स्वरूपाचे दिसून येते.

निकर्ष :

१. राजर्षी शाहू महाराज यांचे विचार हे खऱ्या अर्थाने समाजाला समतेच्या मार्गावर घेऊन जाणारे ठरले.
२. अस्पृश्य समाजाच्या ऐहिक गुलामगिरीबरोबर त्यांची मानसिक गुलामगिरी ही नष्ट व्हायला हवी आणि त्यासाठी त्यांच्या ठिकाणी प्रथम आत्मविश्वास निर्माण करायला हवा असे मत राजर्षी शाहू महाराज यांचे होते.
३. अस्पृश्य समाजाला वर आणण्याकरता आणि त्यांच्यातील कमीपणाची कल्पना नाहीशी करण्याकरता राजर्षी शाहू महाराजांनी सर्वदृष्ट्या प्रयत्न केले.
४. अस्पृश्यता म्हणजे जगाच्या पाठीवर हिंदुस्थानाशिवाय कुठेही न आढळणाऱ्या जातीभेताचेच हिडीस स्वरूप असून ते सर्वांना लज्जास्पद आहे, अशा शब्दात शाहू महाराजांनी उद्गार काढले.

ISSN No. 2394-5990

५. शिक्षण, नोकरी, व्यवसायामध्ये संधी, सरकारी नोकरीमध्ये उपलब्धता अशा अनेक विविध सुधारणा करून तत्कालीन कालखंडामध्ये परिवर्तनासाठी पहिलीच नांदी निर्माण केली.

६. राजर्षी शाहू महाराज यांचे अस्पृश्य उद्धारासाठी केलेले कार्य म्हणजे बहुजनांसाठी शिक्षण, हजेरी पद्धत, महार वतन खालसा, भटक्या विमुक्त जातींचा उद्धार या विषयी कार्य समाजपरिवर्तनवादी होते.

संदर्भ :

१. डॉ. शिंगारे अनिल व डॉ. घुले विठ्ठल, महाराष्ट्रातील आंबेडकरी चळवळीचा इतिहास, अरुणा प्रकाशन लातूर, प्रथम आवृत्ती २००९, पृष्ठ क्रमांक ७१.

२. पवार जयसिंगराव (संपा.), राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, प्रकाशन संचालक महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, प्रथम आवृत्ती मे २००१, पृष्ठ क्रमांक ७६.

३. कित्ता, पृष्ठ क्रमांक ७७-७८.

४. तोफखाने वा.द., राजर्षी शाहू छत्रपती यांचे अंतरंग, महाराष्ट्र प्रकाशन कोल्हापूर, प्रथम आवृत्ती १९६१, पृष्ठ क्रमांक ४५.

५. पुर्वाक्त, राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, पृष्ठ क्रमांक ७७.

६. कित्ता, पृष्ठ क्रमांक ११४.

७. पाटील शामराव, (संपा.) भास्कर दटावकर, राजश्री छत्रपतींचे निवडक आदेश भाग १, मुंबई १९८८, पृष्ठ क्रमांक १६०.

८. कीर धनंजय, राजर्षी शाहू छत्रपती एक समाज क्रांतिकारक, पॉप्युलर प्रकाशन, पहिली आवृत्ती मुंबई १९८९, पृष्ठ क्रमांक,५५.

■■■

राजर्षी शाहू महाराजांचे समाजसुधारणा विषयातील स्त्री उद्धाराचे कार्य

डॉ. गौतम नामदेव ढाले
इतिहास विभाग प्रमुख
श्रीमती गंगाबाई खिवराज कन्या महाविद्यालय,
जयसिंगपूर, जि.कोल्हापूर
Email :dhalegautam15@gmail.com, Ph.No: 9881849320

प्रस्तावना:

महाराष्ट्रातील समाज जीवन हे रितीरीवाज, रूढी-परंपरा, धार्मिक चालीरिती, अंधश्रद्धा, कर्मकांड, जातीयता यांनी ग्रासलेले होते. समाज कोणताही नवीन बदल स्वीकारण्यास तत्काळ तयार होणारा नव्हता. महाराष्ट्रातील समाजामध्ये गतिशीलता व परिवर्तनाचा अभाव होता. अशा या भारतीय समाजावर धर्माचा पगडा मोठ्या प्रमाणात होता. या सर्व परिस्थितीमध्ये समाजसुधारणेचा प्रामाणिक प्रयत्न करण्याचा पहिला महाराष्ट्रात मोठा प्रयत्न महात्मा फुले यांच्या सामाजिक, शैक्षणिक मूलगामी परिवर्तनाच्या कार्यापासून यांच्यापासून झाला. याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्राच्या वैचारिक परिवर्तनामध्ये समाजसुधारकांच्या मालिकेमध्ये स्त्री उद्धार हा महत्त्वाचा विषय नेहमीच अग्रेसर होता. स्त्रियांच्या उद्धारासाठी सुरुवातीला राजाराम मोहन राय, जगन्नाथ शंकर शेठ, महात्मा ज्योतिराव फुले, सावित्रीबाई फुले यासारख्या अनेक समाजसुधारकांनी स्त्रियांची स्थिती सुधारण्यासाठी सामाजिक सुधारणेचा एक भाग म्हणून या विषयाकडे पाहिले. आधुनिक भारताच्या इतिहासामध्ये तत्कालीन कालखंडामध्ये उदारमतवादी दृष्टिकोनातून विचार विनिमय हा नवा प्रवाह उदयास आल्यानंतर याच आशयसूत्राला अनुसरून पुढे स्त्रियांची स्थिती सुधारण्यासाठी प्रयत्न घडून आले. विधवा पुनर्विवाह, आंतरजातीय विवाह, बालविवाह, देवदासी प्रथा, केशवपन प्रथा, स्त्री शिक्षणा संदर्भातील विचार अशा अनेक प्रश्नांवर महाराष्ट्र व भारतामध्ये सुद्धा यावर सातत्याने विचार विनिमय होत होता.

महात्मा फुले यांच्या कार्यामुळे महाराष्ट्रामध्ये परिवर्तनाची नांदीच निर्माण झाली. याच परंपरेला अनुसरून राजर्षी शाहू महाराज यांनी स्त्रियांची स्थिती सुधारण्यासाठी महत्त्वपूर्ण कार्य केले. विशेषतः स्त्री जातीच्या संरक्षणासाठी त्यांनी केलेले कायदे हे समाज परिवर्तनाच्या नव्या विचारधारेला गतिशील बनवणारे होते. मुळातच शाहू महाराजांचे कार्य अस्पृश्य व मागासलेल्या समाजाचा उद्धार करणे, या समाजामध्ये शिक्षण प्रसार करणे, जातीयता दूर करणे, सर्वांना समान संधी उपलब्ध करून देणे, स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय या तत्त्वांचा पुरस्कार करून समाजसुधारणा करणे याच विषयाला अनुसरून होते. समाजउद्धार हा मूलभूत विचार राजर्षी शाहू महाराज यांच्या कार्य आणि कर्तुत्वाचा महत्त्वाचा विषय बनला. याच पार्श्वभूमीवर पुढे उपेक्षित आणि सर्वात आणि मागासलेल्या स्त्री वर्गामध्ये सुधारणा घडवून आणणे व स्त्री जातीवर होणारे अन्याय अत्याचार दूर करणे यासाठी राजर्षी शाहू महाराज यांनी आपल्या संस्थानांमध्ये सकारात्मक दृष्टीने प्रयत्न करून स्त्री वर्गाची स्थिती सुधारण्यासाठी परिवर्तनाचा नवा विचार समाजासमोर निर्माण केला. स्त्री शिक्षणास प्रोत्साहन व नैसर्गिक हक्काचे संरक्षण करण्यासाठी महत्त्वपूर्ण चळवळ उभारणे यामध्ये राजर्षी शाहू महाराजांचे कार्य अतिशय मौलिक स्वरूपाचे ठरले असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. आधुनिक महाराष्ट्राची पायाभरणी करणारे, समतावादी धोरणाचा पुरस्कार करून समाज परिवर्तन घडवून आणणारे, अस्पृशोउद्धार, जातीयता दूर करणारे, सर्व धर्म समभाव हे तत्व बाळगून राज्यकारभार करणारे राजर्षी शाहू महाराज यांचाच उल्लेख केला जातो.

प्रस्तुत शोधनिबंधाच्या माध्यमातून राजर्षी शाहू महाराज यांचे स्त्री उद्धाराचे कार्य या विषयाला अनुसरून संपूर्ण शोधनिबंधाची रचना घेतलेला आहे.

१. संशोधनाचे उद्देश :

१. राजर्षी शाहू महाराज यांच्या पूर्वीची महाराष्ट्रातील स्त्री वर्गाची स्थिती अभ्यासणे.
२. राजर्षी शाहू महाराज यांच्या सामाजिक सुधारणा स्पष्ट करणे.
३. राजर्षी शाहू महाराज यांचे अस्पृश्य निवारण विषयक धोरण अभ्यासणे.

ISSN No. 2394-5990

४. राजर्षी शाहू महाराज यांचे स्त्री जातीच्या संरक्षणासाठी केलेले कायदे अभ्यासणे.
५. स्त्री मुक्ती चळवळीस राजश्री शाहू महाराज यांचा कशा पद्धतीने पाठिंबा होता हे स्पष्ट करणे.
६. राजर्षी शाहू महाराजांनी विधवा पुनर्विवाह, आंतरजातीय विवाह कायदा, देवदासी प्रतिबंधक, कायदा घटस्फोट व वारसाचा कायदा या संदर्भातील काढलेले हुकूम व नियम स्पष्ट करणे.

अशा विविध उद्देशाने प्रस्तुत संशोधनाची रचना केलेली आहे.

२. पूर्वचरित्र :

राजर्षी शाहू महाराजांचा जन्म २६ जुलै १८७४ मध्ये कागल घाटगे घराण्यामध्ये झाला. त्यांचे मूळ नाव यशवंत घाटगे असे होते. त्यांच्या वडिलांचे नाव जयसिंगराव उर्फ आबासाहेब घाटगे तर आईचे नाव राधाबाईसाहेब असे होते. १७ मार्च १८८४ मध्ये राजर्षी शाहू महाराजांचा दत्तक विधानाचा समारंभ संपन्न झाला. ३१ डिसेंबर १८८५ मध्ये शाहू महाराजांना शिक्षणासाठी राजकोट या ठिकाणी पाठविण्यात आले. राजकोटच्या राजकुमार महाविद्यालयात त्यांचा प्रवेश घेण्यात आला. शैक्षणिक कार्य करत असतानाच लोककल्याणासाठी नवीन विचारधारा राजश्री शाहू महाराज यांनी निर्माण केली. १ एप्रिल १८९१ मध्ये बडोद्याचे गुणाजीराव खानविलकर यांच्या लक्ष्मीबाई या कन्याशी शाहू महाराजांचा विवाह संपन्न झाला.

२ एप्रिल १८९४ मध्ये राजर्षी शाहू महाराजांनी राज्य कारभाराची सूत्रे हाती घेतली व प्रजेला उद्देशून जनकल्याणाची ग्वाही देणारा जाहीरनामा प्रसिद्ध केला. या जाहीरनाम्याला शाहूंची लोककल्याणकारी पहिली राजाज्ञा असे मानले जाते. अस्पृश्यता निवारण, शैक्षणिक सुधारणा, आर्थिक विकास, औद्योगिक विकास यामध्ये मूलभूत बदल घडवून आणला. राजर्षी शाहू महाराजांचा शिक्षण प्रसार, अस्पृश्य व दुर्बल घटकांना न्याय, राज्याची आर्थिक घडी बसविणे, अस्पृश्योउद्धार , बहुजन समाजाला न्याय हक्क मिळवून देणे यावरच आपले कार्यक्षेत्र बनवले. राज्यकारभाराची सूत्रे हाती घेतल्यानंतर शाहू महाराजांनी अस्पृश्यांना नोकरी, कोल्हापूर मधील सर्व जातींसाठी वस्तीगृह, सहकारी तत्त्वावर उद्योग, व्यवसाय, शेती, उद्योग, व्यापार यांची स्थिती सुधारणे, कोल्हापूर मध्ये सत्यशोधक समाजाची स्थापना, सक्तीचे प्राथमिक शिक्षण अशा विविध क्षेत्रात सुधारणा घडवून आणल्या. राजर्षी शाहू महाराजांचा मृत्यू ६ मे १९२२ रोजी झाला.[१]

३. विषयविवेचन:

प्राचीन कालखंडापासून आपण जर स्त्रियांच्या संदर्भात विचार केला तर विशेषता: वैदिक कालखंडामध्ये स्त्रियांना समाजात मानाचा दर्जा होता असे दिसून येते. उत्तर वैदिक कालखंडानंतर स्त्रियांची स्थिती दुय्यमच राहील. मध्ययुगीन कालखंडामध्ये स्त्रियांचे जीवन अधिकच दुय्यम प्रतीचे बनले. तत्कालीन कालखंडामध्ये पडदा पद्धत, बालविवाह, बहुपत्नीत्व यासारख्या प्रथांमुळे स्त्री वर्ग दुबळाच बनला. अशा परिस्थितीत मध्ययुगीन कालखंडात अनेक स्त्रियांनी राजकारणावर व राज्यसत्तेवर वर्चस्व प्राप्त केले असे दिसून येते. परंतु वसाहत कालखंडामध्ये स्त्रियांना काही प्रमाणात अधिकार समाज जीवनात प्राप्त होत गेले. परंतु एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी महाराष्ट्रामध्ये पुन्हा समाजामध्ये बालविवाह, पडदा पद्धत, बहुपत्नीत्व, केशवपन अशा विविध प्रथा समाजात पुन्हा एकदा निर्माण झाल्या. चूल आणि मूल एवढेच तिचे कार्यक्षेत्र स्त्री वर्गाचे बनले. अशा परिस्थितीत समाज सुधारणा घडवून आणण्याचा नवा प्रयत्न समाज सुधारकांनी केला. विशेषता: महाराष्ट्रामध्ये महात्मा फुले यांचे कार्य अतिशय उल्लेखनीय स्वरूपाचे ठरते. याच परंपरेला अनुसरून राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानांमध्ये स्त्री शिक्षणास प्रोत्साहन देऊन स्त्रियांच्या नैसर्गिक हक्काचे संरक्षण करण्याची भूमिका घेतली समाज वर्गाकडून स्त्रियांची होणारी पिळवणूक थांबवण्याचा मोठा प्रयत्न केला.[२]

१.राजर्षी शाहू महाराजांनी स्त्री उद्धाराचे कार्य :

१.विधवा पुनर्विवाह कायदा :

कोल्हापूर संस्थानांमध्ये राजर्षी शाहू महाराज यांनी जुलै १९१७ मध्ये विधवा वर्गाची समाजातील स्थिती पाहून विधवाच्या पुनर्विवाह कायदेशीर मान्यता देणारा कायदा पास केला. या कायद्यानुसार विधवा स्त्रियांना पुनर्विवाह करण्यासाठी कायद्याने मान्यता देण्याची तरतूद केली व तशा प्रकारची नोंद सुद्धा संस्थानांमध्ये ठेवण्याचा विचार त्यांनी केला. या संदर्भात त्यांनी सन १९१९ मध्ये कानपूर मधील कुर्मी क्षत्रिय परिषदेत विचार विनिमय मांडला.

२. आंतरजातीय विवाह कायदा :

कोल्हापूर संस्थानांमध्ये १२ जुलै १९१९ रोजी कोल्हापूर इलाख्यातील विवाह संबंधी कायदा या नावाने गॅझेट प्रसिद्ध झाले. या कायद्यामध्ये मुलाचे विवाहाचे वय १८ वर्षे पूर्ण तर मुलीचे विवाह वय १४ वर्षे पूर्ण असावे अशा पद्धतीची अट या कायद्यामध्ये होती. या व्यतिरिक्त याच कायद्यामध्ये स्त्रीला आपला जन्माचा जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य देण्याचे कलम सुद्धा

नमूद केलेले होते व अशा पद्धतीची नोंद ठेवणे रीतसर असेल असा आदेश दिलेला होता.[३] या कायदा तत्वप्रणालीनुसार खऱ्या अर्थाने राजर्षी शाहू महाराजांनी स्त्री-पुरुषांच्या सामाजिक स्वातंत्र्याचा पुरस्कार केलेला दिसून येतो. अशा पद्धतीचा आंतरजातीय विवाह कायदा करून राजर्षी शाहू महाराजांनी धर्मातील रूढींना दुय्यम दर्जा दिला तसेच अशा पद्धतीच्या विवाहाला कायदेशीर स्वातंत्र्य देणारा कायदा हा खऱ्या अर्थाने निश्चित करून तो अमलातही आणला त्यामुळे समाजसुधारणेच्या क्षेत्रातील हा त्यांचा प्रयत्न क्रांतिकारी ठरला. परंतु यामध्ये सुद्धा काही नियम व निकष ठेवलेले होते वधू-वर यांना या संदर्भात विशिष्ट अटी घालण्यात आलेल्या होत्या उदाहरणार्थ वराने इकरारनामा करणे अपेक्षित होते. यामध्ये स्पष्ट असा उल्लेख होता की त्याने ते लिहून द्यायचे, म्हणजेच मी सध्या यावेळी विवाहित /अविवाहित/ अगर विदुर आहे. मी विवाहाचे विशेष नियम सन १९१८ प्रमाणे विवाह करून पाहतो. माझे वयाला १८ वर्षे पूर्ण झालेले आहेत. जर यातील माहिती खोटी असेल तर मला कैद होण्यास आणि दंडही होण्यास मी पात्र आहे असे लिहून द्यायचे होते. अशाच पद्धतीचे नियम नवरी मुलीला सुद्धा असत

३. घटस्फोट व वारसा कायदा :

राजर्षी शाहू महाराजांनी १७ जानेवारी १९२० मध्ये घटस्फोट व वारसा हक्क संबंधीचा कायदा करवीर संस्थांमध्ये पास केला. सन १९२० चा हा कायदा हिंदू वारशाच्या कायद्याच्या दुरुस्तीचा कायदा म्हणून सुधारणावादी पद्धतीने तो प्रसिद्ध केला. या कायद्यानुसार सर्व जाती धर्मातील लोकांना त्यांच्या वडिलोपार्जित मिळकतीतील वारसा हक्क दिला जावा अशी तरतूद होती. या कायद्यातील दुसरे महत्त्वाचे तत्व अथवा कलम म्हणजे स्त्रियांच्या उद्धाराच्या दृष्टीने वारसा हक्क कायदा हा महत्त्वाचा असेल. पुरुषी मानसिकेतून होणाऱ्या जुलमापासून स्त्रियांची सुटका व त्यांचे संरक्षण करण्याच्या उद्देशाने घटस्फोट कायदा करण्यात आला. घटस्फोटानंतर सुद्धा स्त्रियांना योग्य खर्चाची तरतूद उदरनिर्वाहासाठी कशी होईल असेही जाहीर केले.

४. देवदासी प्रथा प्रतिबंध कायदा :

समाजातील कनिष्ठ वर्गामध्ये मोठ्या प्रमाणात देवदासी प्रथा अस्तित्वात होती. त्यामुळे समाजात स्त्रियांना दुय्यम दर्जा प्राप्त होत गेला. तत्कालीन कालखंडात मुरळी, जोगतिनी, भावीण, देवदासी इत्यादी पद्धतीच्या स्त्रियांचा वर्ग याच प्रथेतून अस्तित्वात आलेला होता. त्यामुळे या प्रथा म्हणजे समाज व्यवस्थेला हा लागलेला कलंक आहे असे राजर्षी शाहू महाराजांना वाटू लागले. त्यामधूनच त्यांनी देवदासी प्रथा प्रतिबंधक कायदा १७ जानेवारी १९२० मध्ये आपल्या समाजात, संस्थानात घडवून आणला. जोगतीण, मुरळी, देवदासी, भावीण आदी करून देवाला अगर देवळात सोडलेल्या, अथवा धर्माच्या नावावर अन्य तऱ्हेने सोडलेल्या, कोणत्याही स्त्रीला, तिला अशारितीने सोडले नसताना तिच्या जनक घराण्यात जे हक्क प्राप्त झाले असते, तेच हक्क तिच्या जनक घराण्यात प्राप्त होतील. आणि या कायद्याच्या अंमलतारखेनंतर तिला वर सांगितल्याप्रमाणे सोडल्यामुळे जे वारसाचे व इतर विशिष्ट हक्क प्राप्त झाले असते, ते हक्क तिला प्राप्त होणार नाहीत; अगर वर सांगितल्याप्रमाणे सोडल्यामुळे तिला जो कायदेशीर दर्जा प्राप्त झाला असता तो तिचा दर्जाही मान्य केला जाणार नाही.[४] या कायद्यानुसार देवाला वाहिलेल्या मुलींना आई-वडिलांच्या वारसा हक्कातील संपत्ती मिळवून देण्याचा अधिकार राजर्षी शाहू महाराजांनी अशा स्त्रियांना प्राप्त करून दिला. शिवाय या प्रथेचे अस्तित्वच नष्ट करण्याचा प्रयत्न राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात केला.

५.अमानवी वर्तनास प्रतिबंध घालणारा कायदा :

राजर्षी शाहू महाराजांना समाज निरीक्षण याची सूक्ष्म जाणीव होती त्यामुळे समाजातील दुबळ्या वर्गांना समता व न्यायाने वागणे पाहिजे याच भूमिकेतून त्यांनी स्त्रियांना क्रूरपणे वागवण्यास प्रतिबंध घालणारा कायदा अमलात आणला. अशा प्रकारचा कायदा प्रथमच पुरोगामी स्वरूपाचा कायदा ठरला.२ ऑगस्ट १९१९ रोजी राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर सरकारच्या गॅझेटमध्ये अमानवी वर्तनास प्रतिबंध घालणारा कायदा प्रसिद्ध केला.[५] स्त्रियांना क्रूरपणे वागवण्याचे नाहीसे करावे किंवा त्यास प्रतिबंध करावा म्हणून अशा पद्धतीचे कायदे त्यांनी निर्माण केले. अनुसरून घटस्फोट नियम म्हणजेच काडीमोड कायदा सुद्धा त्यांनी अस्तित्वात आणला. थोडक्यात हे दोन्ही कायदे स्त्रियांना संरक्षण देण्याच्या उद्देशाने निर्माण केलेले होते. हा कायदा करण्याचा मुख्य उद्देश म्हणजे स्त्रियांची स्थिती सुधारणे असाच दिसून येतो. जर स्त्रियांवर क्रूरपणाचे वर्तन केले तर अपराद्याला सहा महिन्याचा कारावास व दोनशे रुपयांपर्यंत दंड असा नियमच त्यांनी आपल्या संस्थानात केला.[६]

थोडक्यात वरील सर्व विवेचनावरून असे दिसून येते, की राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या संस्थानांमध्ये स्त्रियांची स्थिती सुधारणे त्याचबरोबर स्त्रियांना समाजात मानाचा हक्क प्राप्त करून देणे या संदर्भात परिवर्तनवादी दृष्टिकोनातून मोठा बदल घडून आणला. त्यामुळेच खऱ्या अर्थाने समाजामध्ये स्त्रियांना मानाचा दर्जा प्राप्त होत गेला. बहुपत्नीत्व, बालविवाह, अमान्य वर्तनास प्रतिबंध घालणारे कायदा, देवदासी प्रतिबंधक कायदा, घटस्फोट व वारसा कायदा, आंतरजातीय विवाह कायदा, विधवा पुनर्विवाह

ISSN No. 2394-5990

कायदा हे तत्कालीन कालखंडामध्ये सुधारणावादी विचारातून दिसून आलेले राजर्षी शाहू महाराज यांचे विचार हे खऱ्या अर्थाने समाजाला समतेच्या मार्गावर घेऊन जाणारे ठरले असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. परिणामी यासारख्या कायद्यामुळे स्त्रियांची स्थिती सुधारणा व संरक्षण होण्यास मदत झाली याचे श्रेय राजर्षी शाहू महाराज यांनाच जाते.

निष्कर्ष :

१. समाजात परिवर्तन घडवून समता प्रस्थापित करणारे राजर्षी शाहू महाराज यांचे व्यक्तिमत्व होते.
२. राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानांमध्ये स्त्री शिक्षणास प्रोत्साहन देऊन स्त्रियांच्या नैसर्गिक हक्काचे संरक्षण करण्याची भूमिका घेतली.
३. राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या संस्थानांमध्ये स्त्रियांची स्थिती सुधारणे त्याचबरोबर स्त्रियांना समाजात मानाचा हक्क प्राप्त करून देणे या संदर्भात परिवर्तनवादी दृष्टिकोनातून मोठा बदल घडून आणला.
४. राजर्षी शाहू महाराज यांचे विचार हे खऱ्या अर्थाने समाजाला समतेच्या मार्गावर घेऊन जाणारे ठरले.
५. राजर्षी शाहू महाराज यांचे स्त्री जातीच्या संरक्षणासाठी अमान्य वर्तनास प्रतिबंध घालणारे कायदा, देवदासी प्रतिबंधक कायदा, घटस्फोट व वारसा कायदा, आंतरजातीय विवाह कायदा, विधवा पुनर्विवाह केलेले कायदे परिवर्तनवादी दृष्टिकोनातून मोठा बदल घडवून आणणारे होते.

संदर्भ :

१. कीर धनंजय, राजर्षी शाहू छत्रपती एक समाज क्रांतिकारक, पॅप्युलर प्रकाशन, पहिली आवृत्ती मुंबई १९८९, पृष्ठ क्रमांक,२८.
२. तोफखाने वा.द., राजर्षी शाहू छत्रपती यांचे अंतरंग, महाराष्ट्र प्रकाशन कोल्हापूर, प्रथम आवृत्ती १९६१, , पृष्ठ क्रमांक ३२.
३. पाटील शामराव, (संपा.) भास्कर दटावकर, राजश्री छत्रपतींचे निवडक आदेश भाग १, मुंबई १९८८, पृष्ठ क्रमांक १५२
४. करवीर सरकारचे गॅझेट, ता. १७ जानेवारी १९२०.
५. पवार जयसिंगराव (संपा.), राजश्री शाहू स्मारक ग्रंथ, प्रकाशन संचालक महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, प्रथम आवृत्ती मे २००१, पृष्ठ क्रमांक .११३-११५.
६. कित्ता. पृष्ठ क्रमांक.१०२९.
७. कित्ता. पृष्ठ क्रमांक १०३२.

■■■

राजर्षी शाहू महाराज आणि सामाजिक न्याय

डॉ. विष्णू राणबा पाटील
इतिहास विभाग प्रमुख
कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, कोवाड
ता. चंदगड जि. कोल्हापूर -४१६५०८
Email.-vishnurpatil@gmail.com
Phone- 7796173321

प्रस्तावना :

राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या २८ वर्षाच्या कारकीर्दीत (१८९४ ते १९२२) त्यांनी केलेले सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि इतर क्षेत्रातकेलेले कार्य हे केवळ कोल्हापूर संस्थानच्याच इतिहासामध्ये नव्हे तर महाराष्ट्राच्या समाज सुधारणेच्या इतिहासामध्ये महत्त्वपूर्ण आहे . राजर्षी शाहू हे अष्टपैलू महान व्यक्तिमत्व होते. त्यांनी भारतात नव समाज निर्मितीसाठी एक समाज क्रांतिकारक नेता म्हणून कारकीर्दीच्या प्रारंभिच्या काळात त्यांना अनेक आव्हानांना तोडं द्यावे लागले. अत्यंत प्रतिकूल परीस्थित त्यांनी स्वत:च्या जीवास व राज्यास धोका पत्करून क्रांतिकारक सामाजिक सुधारणा घडवून आणल्या, प्रजेच्या हिताच्या अनेक योजना हाती घेतल्या सामान्य जनतेस सामाजिक न्याय मिळावा व न्यायासमोर प्रत्येक व्यक्ती समान ठरावी म्हणून त्यांनी क्रांतिकारक निर्णय घेतले. पुरोगामी निर्बंध करून वरिष्ठ वर्ग व कनिष्ठ वर्ग याच्यातील भेदभाव नष्ट केला. त्यांनी मागासवर्ग व दलितवर्ग याचा उघडपणे कैवार घेतला बहुजन समाजाची उन्नती करणे म्हणजेच देशोद्धार करणे असे निर्भयपणे प्रतिपादन केले.

सामाजिक न्याय : संकल्पना

फ्रेंच राज्यक्रांतीच्या घोषणेतून (स्वातंत्र्य ,समता ,बंधुता) सामाजिक न्यायाचा विचार मांडला. यातील अनेक आधुनिक मूल्यांचे प्रतिबिंब आपल्या भारताच्या संविधानात पहावयास मिळते .२० व्या शतकाच्या उत्तरार्धात जॉन -रोल्स यांनी त्यांच्या थिअरी ऑफ जस्टीस या पुस्तकात सामाजिक न्यायाची संकल्पना मांडली आहे.त्यांच्या मते समाजाची मुलभूत संरचना हीच सामाजिक न्यायावर आधारित असली पाहिजे. माणसांच्या प्राथमिक गरजांची पूर्ती व्हायला पाहिजे म्हणजेच सामाजिक न्याय होय. समता, स्वातंत्र, विश्वबंधुत्व, आर्थिक, राजकीय, सामाजिक हक्क, स्त्री - पुरुष समानता समाजातील सर्व लवचिक शिक्षणाची,विकासाची संधी इ. मुल्ये आणि तत्वे ही सामाजिक न्यायची उदिष्ट्ये आहेत. न्याय ही मानवी संकल्पना असल्यामुळे ती गतिमान आहे. न्यायाची संकल्पना भिन्न - भिन्न समाजात वेगळी - वेगळी असते.

राजर्षी शाहू महाराजांनी सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी आपले संपूर्ण आयुष्य खर्ची केले . विविध कार्य व उपक्रमांच्या माध्यमातून आणि कठोर निर्णयातून सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याचे यशस्वी कार्य केले. समाज सुधारणेसाठी त्यांनी राज्यकारभारातील अनेक पारंपारिक नियम बद्लले. सामाजिक न्यायाच्या दृष्टीने अनेक कायदे स्थापित केले. कायदे न पाळणाऱ्या विरुद्ध अनेक कायदे केले. राजर्षी शाहू महाराजांनी सामाजिक न्यायाची नवी संकल्पना केवळ मांडली नाही. तर ती प्रत्यक्षात आणली म्हणूनच बहुजन समाज मोकळा श्वास घेऊ शकला.

सर्वाना न्याय मिळावा माणुसकीचे हक्क मिळावेत अस्पृशाना समानतेची व माणुसकीची वागणूक मिळावी त्यांच्या अंगी वैज्ञानिकता निर्माण व्हावी म्हणून महाराजांनी आपल्या सत्तेचा उपयोग केला. शाहू महाराजांनी वयाच्या २० व्या वर्षी २ एप्रिल १८९४ मध्ये कोल्हापूर संस्थानाची सूत्रे हाती घेतल्या नंतर पहिल्यांदा कोल्हापूर संस्थानातील जनतेच्या परिस्थितीची पाहणी केली. त्यावेळी त्यांच्या असे लक्षात आले कि समाज अत्यंत मागासलेला असून साक्षरतेचे प्रमाण अत्यल्प आहे शेकडो वर्षे अस्पृश समाज बहुजन समाज ज्ञान, संपत्ती, शिक्षण इ. पासून वंचित आहे. चातुवर्ण व्यवस्थेमुळे सामाजिक, धार्मिक, आर्थिक, क्षेत्रात मागास आहे. अस्पृश, गरीब, शेतकरी, मजूर, यांचे मोठया प्रमाणावर शोषण होत आहे. सामान्य जनता दारिद्र्याच्या, अज्ञानाच्या खायीत बुडालेली आहे. काही मोजकीच माणसे शिक्षणात पुढे गेली आहेत. पाणी, रस्ते, शेती, व्यापार, कला, यांचा विकास खुंटला आहे.

असे सामाज्याचे विधारक चित्र त्यांना दिसून आले.म्हणून त्यांनी आपल्याला मिळालेल्या सत्तेचा, अधिकाराचा उपयोग बहुजन समाजाच्या उद्धारासाठी आणि सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी करण्याचे ठरवले

ISSN No. 2394-5990

राजर्षीशाहू महाराज व वेदोक्त प्रकरण :

राजर्षी शाहू महाराज पूर्वापार प्रथे प्रमाणे आपल्या परिवारासह कार्तिक स्नानास पंचगंगा नदीच्या तीरावर गेले होते. त्यांच्या सोबत बंधू बापू साहेब महाराज, मेहुणे, मामासाहेब खानविलकर स्नेही राजाराम शास्त्री भागवत अशी मंडळी होती. स्नानाच्या वेळी मंत्र म्हणनारा नारायण भटजी स्नान असताना मंत्र म्हणत असताना प्रकांड पंडित राजाराम शास्त्रींचे भटजीच्या मंत्राकडे लक्ष गेले . भटजी स्नान न करताच वेदोक्त मंत्राऐवजी पुराणोक्त मंत्र उच्चारत होता हे महाराजांच्या लक्षात आणून दिल्यावर त्यांनी त्यास जाब विचारला त्यावर भटजीने उत्तर दिले शुद्राला पुराणोक्त मंत्र सांगावे लागतात सर्व शक्तिमान ब्राह्मण समाज तुम्ही क्षत्रिय आहात असे जाहिर करीपर्यंत मी तुमची किंमत क्षद्रापेक्षा अधिक समजणार नाही भटजी चे हे शब्द शाहू महाराज्यांच्या मनाला लागले. त्यामुळे महाराज्यांच्या मनात नवीन विचारांचे वादळ निर्माण झाले. ब्राह्मणेत्तर समाजाला साक्षर करण्याच्या नव विचारांचा झंझावात नर्माण झाला. शिक्षणात जे मागासलेले आहेत त्यांना पुढे आणल्याशिवाय ज्ञानाच्या आणि उदयोगाच्या क्षेत्रातील मक्तेदारी नष्ट होणार नाही या विचारांची नवी ठिणगी पडली. वेदोक्त प्रकरणामुळे समाजातील वरिष्ट समजल्या जाणाऱ्या वर्गाची अरेरावी दिसून आली. ही मक्तेदारी मोडून काढण्यासाठी बहुजन समाजाला समान पातळीवर आणणे आवश्यक असल्याचे त्यांच्या लक्षात आले. वेदोक्त प्रकरण समाजात सामजिक न्याय प्रस्थापित करण्याच्या दृष्टीकरणातून महत्वाचे ठरले.

राजर्षी शाहू महाराज आणि मानवी स्वातंत्र्य :

शाहू महाराजांनी अस्पृश्याची गुलामगिरीतून मुक्तता करण्यासाठी कडक उपाय योजना केल्या. कनिष्ट समजल्या जाणाऱ्या जातीतील काही जातींना गुन्हेगारी जाती म्हणून समजण्यात येते असे त्या जातींपैकी काही जातींना पोलीस चौकीत जाऊन हजेरी द्यावी लागे यातील काही जातीवरील बंधने दूर केली होती. आता त्यांनी ही गुलामगिरीची प्रथा कायमची बंद करून महार, मांग, रामोशी, बेरड यांना कमीपणा आणणाऱ्या हजेरीपासून मुक्त करण्याचे ठरविले . ही गुलामगिरी नष्ट करून मानवी स्वातंत्र्याचे सर्व हक्क देण्याचे ठरवीले २७ जूलै१९१८ रोजी माणुसकीला कलंक लावणारी अस्पृश्यतेची गुलामगिरी शाहू राजांनी नष्ट केली आणि अस्पृश्य गणलेल्या लोकांनी मानवी स्वातंत्र्याचे हक्क बहाल केले.

राजर्षी शाहू छत्रपतीनी अस्पृश्य समाजाची गुलामगिरी नष्ट करून त्यांनी सर्व मानवी हक्क दिले . तरी काही मानवी सवर्ण हिंदू उघडपणे व मुक्तपणे त्यांनी त्या हक्कापासून वंचीत ठेवत म्हणून शाहू महाराजांनी अशा लोकांना शिक्षा करणेसाठी आपल्याकडे अस्पृश्य व भूतपूर्व बलुतेदार यांना नोकरीत ठेवणाऱ्या मनुष्यावर जो कोणी जाती बहिष्कार टाकण्याचा प्रयत्न करील त्यांना शंभर रुपये दंड करण्यात येईल असा हुकुम काढला.

सामाजिक समता निर्माण करण्यासाठी त्यांनी सर्व सरकारी खात्यात राजवाड्यावर पूर्वास्पृश्य अनेक नोकर होते. मोटार चालक, माहूत, मोतद्दार कोल्हापूर सरकारचे टपाल नेणारे आणणारे आणि रुखडी कॅप मध्ये पुरोहित ही पुर्वस्पृश्य नोकर असत. गंगाराम कांबळे नावाच्या एका अस्पृश्य नोकराचे मराठ्याच्या विहिरीचे पाणी काढले म्हणून त्यांना बेदम मारहाण केली. गंगाराम कांबळे यांनी शाहू महाराज दिल्ली वरून परत आल्यानंतर सोनतळी जावून आपल्या पाठीवरील वळ शाहू राजाना दाखविले तेव्हा त्याचा राग अनावर होऊन ज्या मराठ्यांनी मारहाण केली होती त्यांना बोलावून त्याचीही पाठ चाबकाने फोडून काढली ते मराठे आहेत म्हणून त्याची गय केली नाही. एवढेच नव्हे तर कोल्हापूरात एक उपाहारगृह सुरु करण्यास मदत केली व स्वत: ते चहा पिऊ लागले. सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी त्यांनी आपल्या कृतीतून समाजाला दाखवून दिले.

जातीवाचक आडनावे बदलली :

छत्रपती शाहू महाराजांनी अस्पृश्याच्या उन्नतीसाठी जे अनेक प्रयत्न केले व प्रत्यक्ष कृती केली. त्याचाच एक भाग म्हणून अस्पृश्याची जातीवाचक आडनावे बदलण्याचा उपक्रम हाती घेतला . कोल्हापूर संस्थानातील अनेक अस्पृश्यांना मराठे ब्राह्मण यांची आडनावे लावली उदा ... महार पैलवानाना– जाट पैलवान, चांभारांना– सरदार, भग्यांना – पंडित अशी नावे ठवली.

महार वतन कायद्याने बंद :

परंपरागत गाव गाड्यात महार समाजाला अस्पृश्य म्हणून महार वतन असे , त्या वतनाच्या नावाखाली सर्व घाणीची व खालच्या दर्जाची कामे करावी लागत असत ती एक प्रकारची गुलामगिरीच होती. या सामाजिक आणि आर्थिक गुलामगिरीतून महार, अस्पृश्याची मुक्तता करण्यासाठी शाहू महाराजांनी खास आदेश काढून मे १९२१ मध्ये महार वतन पद्धती नष्ट केली .

मोफत आणि सक्तीचे प्राथमिक शिक्षण :

ब्राह्मणेत्तर समाजाची सर्वांगीण सेवा हे राजर्षी शाहू राजांच्या जीवन धर्माचे मिशन होते. ब्राह्मणेत्तर वर्ग शिक्षणाच्या बाबतीत मागासलेला होता. त्याला सशक्त बनविण्यासाठीम्हणूनच राजर्षीनी मोफत आणि सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची अंमलबजावणी करण्यास सुरु केली. या सक्तीच्या शिक्षणासाठी सन १९१७

साली करवीर दरबाराने एक लक्षवीस हजार रुपयांची तरतूद केली होती. या तळमळीमागे विद्येची मक्तेदारी निकालात काढून अखिल भारतीय समाज उन्नतीचा ध्यास होता. ४ मार्च १९१८ रोजी चिखली या करवीर संस्थानातील गावात मोफत आणि सक्तीच्या प्राथमिक शाळेचा शुभारंभ केला.छ. शाहू महाराजांनी गावोगावी शाळा काढल्या परंतू त्या शाळातून शिक्षकांचा तुटवडा भासू लागला म्हणुन अध्यापन विद्यालयाची स्थापना केली. शिक्षकांसाठी प्रशिक्षण केंद्रे सुरु केली. कुशल आणि किमान शैक्षणिक पात्रता संपादन केलेले शिक्षक तयार केले त्यामुळे ग्रामीण व शहरी भागातील शैक्षणिक दर्जा वाढविण्याचा प्रयत्न केला.

अस्पृश्य व मागासलेल्यासाठी शिक्षणाची सोय :

महाराजांनी सर्व मागासलेल्या जातीचा उद्धार शिक्षणाच्या माध्यमातून करण्याचे ठरविले होते. त्यानुसार निरनिराळ्या जातीच्या विद्यार्ध्यासाठी वस्तीगृहाची करवीर संस्थानात स्थापना करण्याला प्राधान्य दिले. १९०८ साली भास्कर जाधव , महादेव डोंगरे, बागल शिंदे इ. मंडळीना पुढे करून अस्पृश्यासाठी वसतीगृह सुरु केले होते. राज्यारोहण समयी अस्पृश्यासाठी संस्थानात ५ शाळा होत्या व विद्यार्थी संख्या १६८ होती. इ. स साली १९०७ –०८ साली अस्पृश्याच्या संख्या १६ व विद्यार्थी संख्या ४१६ झाली. महाराजाच्या प्रयत्नामुळे सन १९१२ मध्ये अस्पृश्य शाळाची संख्या २७ व विद्यार्थी संख्या ६३६ होती.

शाहू महाराजांनी सरकारी नोकऱ्यात मागास वर्गासाठी ५०% जागा राखून ठेवायचा निर्णय घेतला, वाघ्या – मुरळी प्रतिबंधक कायदा केला. स्त्री पुनर्विवाह कायदा केला, आपल्या संस्थानात आंतर जातीय विवाहाला मान्यता देणारा कायदा केला. तसेच त्यांनी स्वत: असे काही विवाह घडवून आणले निरनिराळ्या जातीच्या लोकासाठी वसतीगृह सुरु केली. अस्पृश्यासाठी मिस क्लास वसतिगृह सुरु केले १५% शिष्य वृत्तीची घोषणा केली.

समारोप :

शाहू राजे हे सामांन्यासाठी झटणारे राजे होते. सामाजिक लोकशाही निर्मितीसाठी शाहू महाराजांनी अतोनात कष्ट उपसले. सर्वाना न्याय मिळावा, माणुसकीचे हक्क मिळावेत, अस्पृश्यांना माणुसकीचे हक्क मिळावेत, वैज्ञानिकता त्याच्या अंगी यावी म्हणून त्यांनी आपल्या सत्तेचा उपयोग केला. यावरून शाहू महाराजाचे मोठेपण लक्षात येते सत्ता हाती आली कि सत्तेचा गैरवापर करताना दिसतात . मानवी मुल्ये पायदळी तुडविली जातात पण शाहू महाराजांनी लोकशाही निर्मितीसाठी कष्ट उपसले. महाराष्टात जे स्थित्यंतर घडून आले त्याचे श्रेय शाहू महाराजांच्या प्रेरणेने सुरु झालेल्या सामाजिक . धार्मिक , राजकीय प्रबोधनाच्या चळवळीला द्यावे लागते. शाहू महाराजाची भूमिका तत्व चिंतकाची नसुन कृतीशील समाज सुधारकाची होती .सामाजिक जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात सुधारणा घडवून आणल्या सामाजिक समता व न्याय या तत्वांचा त्यांनी संपूर्ण आयुष्यभर पाठपुरावा केला. अन्याय अंधश्रद्धाआणि अस्पृश्यता या तीन व्याधी नष्ट केल्या खेरीज माणसाच्या विकासाच्या वाटा खुल्या होऊ शकणार नाही ही खूणगाठ मनाशी बांधून कार्याला सुरवात केली. हिंदी शास्त्रीय संगीताचा एक उत्साही पुरस्कर्ता मराठी रंगभूमिचा एक प्रमुख शिल्पकार मल्ल विद्येचा एक मोठा आधारस्तंभ आणि आधुनीक महाराष्ट्राचा भाग्य विधाता अशा विविध भूमिका वटविणारे ते एक अष्टपैलू व्यक्तिमत्व होते.

संदर्भ :

१) RajarshiShahuChhatrapati Papers Volume IV (1900 1905 A.D)
Dr. Vilas Sougane
Dr. B. D. Khine
२) राजर्षी शाहू छत्रपती – धनंजय कीर
३) राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ – जयसिंराव पवार महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी , राधानगरी रोड कोल्हापूर २५ मे २००१.
४) शाहुच्या आठवणी – नानासाहेब सांळुखे
५) लोकराजा शाहू छत्रपती – अजित पाटील – डायमंड पब्लिकेशन पुणे २००९
६) बाबासाहेब आणि राजर्षी शाहूची सत्वपरीक्षा – प्रवीण प्रकाश चितळे
७) फुले शाहू समाज क्रांतीची नवी दिशा – बाबूराव गुरव
८) समाज प्रबोधन पत्रिका – जुलै, ऑगस्ट, सप्टेबंर २०२२ संपादक –अशोक चौसाळकर
९) राजर्षी शाहू गौरव ग्रंथ – रमेश जाधव ३ आवृत्ती उच्च तंत्र शिक्षक विभाग महाराष्ट्र राज्य – २०१२.
१०) शाहू छत्रपतीच्या मनाचा विकास – संपादक रमेश जाधव २०१६.
११) राजर्षी शाहू राजा माणूस – कृ. गो . सूर्यवंशी पुणे प्रथम १९८४.
१२) बहुजन समाजाचे शिल्पकार – माधव बागल , ग. ल. ठोकळ प्रकाशन पुणे १९६६.

■■■

ISSN No. 2394-5990

'राजर्षी शाहू महाराज यांनी परिवर्तनवादी दृष्टीने केलेल्या सामाजिक सुधारणांचा अभ्यास'

सौ. भारती श्याम पाटील
पीएच. डी. संशोधक विद्यार्थी
ग्रामोन्नती मंडळाचे कला व वाणिज्य महाविद्यालय, नारायणगाव
Email : bharatipatil9028@gmail.com
फोन नं :९०२८५३३४६४

प्रस्तावना :

आधुनिक महाराष्ट्राची पायाभरणी करणारे, समतावादी धोरणाचा पुरस्कार करून समाज परिवर्तन घडवून आणणारे, अस्पृशोउद्धार, जातीयता दूर करणारे, सर्व धर्म समभाव हे तत्व बाळगून राज्यकारभार करणारे राजर्षी शाहू महाराज होते. महात्मा फुले यांच्या कार्यामुळे महाराष्ट्रामध्ये परिवर्तनाची नांदीच निर्माण झाली. याच परंपरेला अनुसरून राजर्षी शाहू महाराज यांनी समाजाच्या विकासासाठी महत्त्वाची भूमिका बजावली. छत्रपती शाहू महाराज हे एक समाज सुधारक व कोल्हापूर संस्थानचे छत्रपती (इ स १८८४- १८२२) दरम्यान होते. ब्रिटिश राजसत्तेच्या काळामध्ये सामान्य जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी व बहुजन समाजाच्या सामाजिक या काळात शाहू महाराजांनी प्रयत्न केले. सामाजिक परिवर्तनाला गती प्राप्त करून दिली तसेच सनातनी वर्गाच्या विरोधाला न जुमानता दलित व मागासवर्गीय समाजाच्या विकासासाठी महत्त्वाची भूमिका बजावली. करणारे राजर्षी शाहू महाराजांना 'राजर्षी' ही पदवी कानपूरच्या कुर्मी समाजाने दिली.

लोकांनी 'लोकांचा राजा' ही प्रतिमा राजर्षी शाहू महाराजांची जनलोकांत रुजवली. सामाजिक चळवळीच्या क्षेत्रातील महात्मा फुले याचे खरेखुरे वारसदार राजर्षी शाहू हेच होत. त्यांचा देशमशत 'महाराजांचे महाराज' असा गौरव होतो. रयत व उपेक्षीत समाजाला त्यांचे हक्क व न्याय मिळवून देण्याचे कार्य राजर्षी शाहू महाराजांनी केले. आपल्या संपूर्ण जीवनकार्यामध्ये त्यांनी समाजातील बहुजन समाजाला न्याय व हक्क मिळवून देण्यासाठी आपल्या अधिकाराचा पूर्णपणे वापर केला म्हणूनच ते लोककल्याणक राज्यकर्ते ठरले. राजर्षी शाहू महाराजांची कारकीर्द एकूण अठ्ठावीस वर्षांची झाली. या कालावधीत त्यांनी राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, धार्मिक, कौटुंबिक आणि व्यक्तिगत अशा स्वरूपांचे अनेक निर्णय घेतले. हे निर्णय घेताना त्यांनी समाजपरिवर्तनाची संदर्भ चौकट वापरली. राजर्षी शाहूंनी कोल्हापूर संस्थानात संगीत, चित्रपट, चित्रकला, लोककला आणि कुस्ती या क्षेत्रांतील कलावंतांना राजाश्रय देऊन त्यांना प्रोत्साहन देण्याचे महत्कार्य केले.

याच विषयाच्या अनुषंगाने ङ्क राजर्षी शाहू महाराज यांनी परिवर्तनवादी दृष्टीने केलेल्या सामाजिक सुधारणांचा अभ्यास म या विषयाची प्रस्तुत शोधनिबंधात मांडणी केली आहे.

१. संशोधनाचे उद्देश :

१. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या कार्य व कर्तृत्वाचा अभ्यास करणे.
२. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शैक्षणिक परिवर्तनाच्या दृष्टिकोनातून शिक्षणविषयक विचार व योगदान याचा अभ्यास करणे.
३. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे समाज, जातिभेदाविरोधी विषयी विचार याचा अभ्यास करणे.
४. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची प्राथमिक शिक्षण ते शाळाबद्दलची भूमिका याचा अभ्यास करणे.
५. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची शैक्षणिक व नोकरीतील आरक्षणाविषयी भूमिका याचा अभ्यास करणे.

अशा विविध उद्देशाने प्रस्तुत शोधनिबंधाची मांडणी केलेली आहे.

२. विषय–विवेचन :

१. पूर्वचरित्र:

राजर्षी शाहू महाराजांचा जन्म २६ जून इ. स. १८७४ रोजी कागल येथील घाटगे घराण्यात झाला. त्यांचे मूळ नाव यशवंत होते. त्यांच्या वडिलांचे नाव जयसिंगराव (आप्पासाहेब) तर आईचे नाव राधाबाई होते. कोल्हापूर संस्थानचे राजे चौथे शिवाजी महाराज यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या पत्नी आनंदीबाई यांनी १७ मार्च १८८४ रोजी यशवंतरावांना दत्तक घेतले व 'शाहू' हे नाव ठेवले. सन १८८९ ते १८९३ या चार वर्षांच्या

कालखंडात धारवाड येथे शाहू महाराजांचा शैक्षणिक आणि शारीरिक विकास झाला. शिक्षण चालू असतानाच १ एप्रिल १८९१ रोजी बडोदयाच्या गुणाजीराव खानविलकर यांच्या लक्ष्मीबाई या मुलीशी शाहू विवाहबध्द झाले. २ एप्रिल १८९४ रोजी त्यांचा राज्यारोहण समारंभ झाला. राज्याभिषेक झाल्यानंतर इ.स १९२२ सालापर्यंत म्हणजे २८ वर्षे ते कोल्हापूर संस्थानचे राजे होते. मुंबई येथे ६ मे १९२२ रोजी त्यांचे निधन झाले.[१]

राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य व विचार समाज परिवर्तनाकडे घेऊन जाणारे होते. शिक्षणामुळे समाजाचा दर्जा उंचावतो यावर त्यांचा प्रचंड विश्वास होता. शाहू महाराजांनी बहुजन समाजाच्या शिक्षण प्रसार करण्यावर विशेष भर दिला. त्यांनी कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले. स्त्री शिक्षणाच प्रसार व्हावा म्हणून त्यांनी राजाज्ञा काढली. राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानांमध्ये स्त्री शिक्षणास प्रोत्साहन देऊन स्त्रियांच्या नैसर्गिक हक्काचे संरक्षण करण्याची भूमिका घेतली. जुलै १९१७ मध्ये विधवा वर्गाची समाजातील स्थिती पाहून विधवाच्या पुनर्विवाह कायदेशीर मान्यता देणारा कायदा पास केला. कोल्हापूर संस्थानांमध्ये १२ जुलै १९१९ रोजी कोल्हापूर इलाख्यातील विवाह संबंधी कायदा या नावाने गॅझेट प्रसिद्ध झाले. या कायद्यामध्ये मुलाचे विवाहाचे वय १८ वर्षे पूर्ण तर मुलीचे विवाह वय १४ वर्षे पूर्ण असावे अशा पद्धतीची अट या कायद्यामध्ये होती.[२] १७ जानेवारी १९२० मध्ये घटस्फोट व वारसा हक्क संबंधीचा कायदा करवीर संस्थांमध्ये पास केला. सन १९२० चा हा कायदा हिंदू वारशाच्या कायद्याच्या दुरुस्तीचा कायदा म्हणून सुधारणावादी पद्धतीने तो प्रसिद्ध केला. २ ऑगस्ट १९१९ रोजी राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर सरकारच्या गॅझेटमध्ये अमानवी वर्तनास प्रतिबंध घालणारा कायदा प्रसिद्ध केला. कायद्यामुळे स्त्रियांची स्थिती सुधारणा व संरक्षण होण्यास मदत झाली याचे श्रेय राजर्षी शाहू महाराज यांनाच जाते.[३]

अस्पृश्यता नष्ट करण्याच्या दृष्टीने त्यांनी इ.स १९१९ साली सवर्ण व अस्पृश्यांच्या वेगळ्या शाळा भरवण्याची पद्धत बंद केली. जातिभेद दूर करण्यासाठी त्यांनी आपल्या राज्यात आंतरजातीय विवाहाला मान्यता देणारा कायदा केला. इ.स. १९१७ साली त्यांनी पुनर्विवाहाचा कायदेशीर मान्यता मिळवून दिली. बहुजन समाजाला राजकीय निर्णयप्रक्रियेत सामावून घेण्यासाठी त्यांनी इ.स. १९१६ साली निपाणी येथे 'डेक्कन रयत असोसिएशन' ही संस्था स्थापण केली.[४]

स्वातंत्र्यापूर्वी कित्येक वर्षे आधी समता, बंधुता, धर्मनिरपेक्षता सर्व घटकांना विकासाची समान संधी ही तत्वे शाहू महाराजांनी करवीर संस्थानात अमलात आणली. महाराजांनी सुमारे २८ वर्षे राज्यकारभार केला शाहू महाराजांना बहुजनांच्या शिक्षणाविषयी तळमळ होती, म्हणून कोल्हापूर संस्थानात सक्तीच्या मोफत शिक्षणाचा कायदा केला. करवीर तालुक्यातील ङ्गचिखलीफ या गावी सक्तीचे पण मोफत प्राथमिक शिक्षण देणारी पहिली शाळा ४ मार्च १९१८ रोजी सुरू झाली.[५] तसेच ५०० ते १००० लोकवस्तीच्या गावांमध्ये शाळा काढल्या जे पालक आपल्या मुलांना शाळेत पाठवणार नाहीत त्या पालकांना प्रतिमहिना १ रु दंड आकारण्याची कायदेशीर तरतूद केली. अस्पृश्यता नष्ट करण्याच्या दृष्टीने त्यांनी सवर्ण व अस्पृश्यांच्या वेगळ्या शाळा भरवण्याची पद्धत सन १९१९ मध्ये बंद केली.

अस्पृश्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा करण्याच्या केली. याच उद्देशाने शिवणयंत्रे देऊन स्वतंत्र व्यवसाय करण्यास प्रोत्साहन दिले. राजवाड्यातील कपडे त्यांच्याकडून शिवून घेण्यास सुरुवात केली. गंगाधर काबळे या व्यक्तीला कोल्हापुरात मध्यस्त वस्तीत चहाचे दुकान काढून दिले. अस्पृश्य सुशिक्षित तरुणांची तलाठी म्हणून नेमणूक केली. असा व्यापक दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून ६ जुलै १९०८ रोजी कोल्हापूर संस्थानात मागास जातीला ५० टक्के जागा राखीव राहतील अशी घोषणा केली.[६] सन १९१७ साली त्यांनी पुनर्विवाहाचा कायदा करून विधवाविवाहाला कायदेशीर मान्यता मिळवून दिली. तसेच त्यांनी देवदासी प्रथा बंद करण्यासाठीही कायद्याची निर्मिती केली. त्याकाळी धर्माच्या नावाखाली देवांना मुले व मुली वाहण्याची विचित्र पद्धत भारतात चालू होती. राजांनी आपल्या संस्थानात जोगत्या-मुरळी प्रतिबंधक कायदा करून ही पद्धत बंद पाडली. जातिभेदाचे प्रस्थ नष्ट व्हावे म्हणून आपल्या संस्थानात आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाहास कायदेशीर मान्यता दिली.

तत्कालीन परिस्थितीमध्ये जातिव्यवस्थेची शिकार झालेल्या अनेक जमाती चोऱ्या, दरोडे अशा चुकीच्या मार्गांचा अवलंब करत होत्या. त्यामुळे ब्रिटिश सरकारने या जमातींवर गुन्हेगारीचा शिक्का मारला त्यांना रोज गावकामगाराकडे हजेरी लावावी लागत असे शाहू महाराजानी हजेरी पद्धत बंद केली. या जातीजमातींच्या लोकांना संस्थानात नोकऱ्या दिल्या. त्यांच्यातून पहारेकरी, रखवालदार, रथाचे सारथी निर्माण केले. त्यांना घरे बांधून दिली. राजर्षी शाहूंनी अस्पृश्यांची गुलामगिरी नष्ट करण्याच्या उद्देशाने १८ सप्टेंबर १९१८ रोजी आपल्या राज्यातील महार वतने रद्द केली. जमिनी अस्पृश्यांच्या नावावर रयतवारीने करुन दिल्या.[७] त्यामुळे गुन्हेगार म्हणून शिक्का बसलेल्या लोकांना माणूस म्हणून समाजात सन्मानाने वावरता येऊ लागले. राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानामध्ये सत्यशोधक चळवळीचा प्रसार आणि प्रचार करण्याची महत्त्वाची जबाबदारी पार पाडली. सामाजिक न्यायाची भूमिका घेऊन शाहू महाराजांनी समतेसाठी प्रयत्न केले.

ISSN No. 2394-5990

२६ जुलै १९०२ रोजी मकरवीर गॅझेटफमध्ये एक जाहीरनामा प्रसिद्ध करून छत्रपती शाहूंनी एक क्रांतीकारक आणि भारताच्या इतिहासातील अभूतपूर्व निर्णय घेऊन आपल्या द्रष्ट्या पुरोगामित्वाचे दर्शन घडविले. या जाहीरनाम्याच्या तारखेपासून सरकारी खात्यात रिक्त होणाऱ्या जागांपैकी ५० टक्के जागांवर सुशिक्षित तरुणांची भरती करण्यात येईल असे त्यांनी जाहीर केले.८ यादृष्टीने संपूर्ण भारतामध्य आरक्षणाचे जनक म्हणून त्यांचा गौरव केला जातो. त्या काळी शिक्षणाच्या सोयी फक्त शहरातच उपलब्ध होत्या. ग्रामीण भागातील सर्वसामान्य लोक अतिशय हलाखीच्या परिस्थितीत जीवन जगत होते. आपल्या मुलांना शिक्षणासाठी शहराच्या ठिकाणी पाठविण्यात कुवत त्यांच्याकडे नव्हती म्हणून राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापुरात वसातीगृहे सुरू करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार १८ एप्रिल १९०१ रोजी मराठा विद्यार्थ्यासाठी ङ्कव्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग हाऊसफ ची स्थापना करण्यात आली. त्यानंतर लवकरच लिंगायत, सारस्वत, पांचाल, जैन, मुसलमान, शिपी, देवज्ञ, वैश्य, ढोर, चांभार, नाभिक इ. जातीच्या विद्यार्थासाठी स्वतंत्र वसतिगृह सुरु करण्यात आली. या सर्व वसतिगृहांना महाराजांनी सढळ हाताने आर्थिक साहय्य केले. अस्पृश्य विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय व्हावी म्हणून १४ एप्रिल १९०७ त्यांच्यासाठी कोल्हापुरात मिस क्लार्क बोर्डिंग या नावाचे एक वसतिगृह उभारले.

छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रेरणेने ११ जानेवारी १९११ रोजी कोल्हापुरात सत्यशोधक समाजाची शाखा स्थापन जानेवारी झाली. सत्यशोधक चळवळीचे थोड्याच दिवसांत ब्राम्हणेतर चळवळीत रूपांतर झाले. महाराजांच्या पदरी असलेल्या एका पुरोहिताने त्यांना उर्मटपणे म्हटले होते. आपण क्षत्रिय नसल्यामुळे आपणासाठी वैदिक मंत्र म्हणण्याची गरज नाही. एक सामान्य भिक्षुक प्रत्यक्ष राजाशी इतक्या अहंकाराने वागतो तर सर्वसामान्य लोकांशी या वर्गाच वर्तन कसे असेल असा विचार राजर्षी शाहू महाराजांनी केला. पुरोहित पद्धती बंद करण्याच्या उद्देशाने ६ जुलै १९२० रोजी शाहूनी मशिवाजी क्षत्रिय वैदिक पाठशाळा सुरू केली. शाहूच्या राजवाड्यातील धार्मिक विधीबरोबरच राजवाड्यातील विवाहही पाठशाळेतील विद्यार्थी करीत.

छत्रपतीच्या २३ फेब्रुवारी १९१८ च्या आदेशानुसार करवीर संस्थानात वंशपरंपरागत कुलकर्णी नेमणुकीची पद्धत रद्द होऊन त्याऐवजी पगारी तलाठ्यांच्या नेमणुका केल्या जाऊ लागल्या होत्या. करवीर पीठाचे तत्कालीन शंकराचार्य डॉ. कुर्तकोटीचा शाहू महाराजांच्या या निर्णयास विरोध होता. पूर्वपरंपरा मोडून राजर्षी शाहूनी १२ ऑक्टोबर १९२० रोजी करवीर संस्थानातील पाटगाव येथील मौनीबाबांच्या मठाचे अधिपती म्हणून नवे पीठ निर्माण केले .१५ नोव्हेंबर १९२० रोजी शाहू महाराजांनी सदाशिवराव लक्ष्मण पाटील (बेनाडीकर) या मराठा जातीतील व्यक्तीची या पिठावर नियुक्ती केली.[९]

अशा रीतीने बहुजन, अस्पृश्य समाजाचा सर्वांगीण विकास साधण्याचे कार्य करताना राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी एका अर्थाने महात्मा फुले यांचीच परंपरा पुढे चालवली.

निष्कर्ष :

१. ब्रिटिश राजसत्तेच्या काळामध्ये सामान्य जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी राजर्षी छत्रपती शाहू महाराजानी प्रयत्न केले.
२. सनातनी वर्गाच्या विरोधाला न जुमानता दलित व मागासवर्गीय समाजाच्या विकासासाठी महत्त्वाची भूमिका राजर्षी शाहू महाराजांनी बजावली.
३. राजर्षी शाहू महाराजांनी शिक्षणप्रसार करण्यावर विशेष भर दिला.
४. स्वातंत्र्यापूर्वी समता, बंधूता, धर्म निरपेक्षता सर्व घटकांना विकासाची समान संधी ही तत्त्वे शाहू महाराजांनी अमलात आणली.
५. उपेक्षित वर्गाला प्रेमाने, आपुलकीने आपलेसे करून या समाजाला सामाजिक दर्जा दिला आणि त्यांच्यात स्वाभिमान निर्माण केला.
६. सत्यशोधक चळवळीला प्रत्यक्ष सहकार्य करून महात्मा फुले यांचीच परंपरा पुढे चालवली.
७. राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानांमध्ये स्त्री शिक्षणास प्रोत्साहन देऊन स्त्रियांच्या नैसर्गिक हक्काचे संरक्षण करण्याची भूमिका घेतली.
८. राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य व विचार समाज परिवर्तनाकडे घेऊन जाणारे होते.
९. राजर्षी शाहू महाराज यांचे समाज परिवर्तनाचे विचार हे खऱ्या अर्थाने समाजाला समतेच्या मार्गावर घेऊन जाणारे ठरले.
१०. समाजातील दलितांना न्याय देण्यासाठी राजर्षी शाहू राजांनी काळाच्याही पुढे जाऊन धडाडीने प्रभावी उपाय अंमलात आणण्यास सुरुवात केली.

संदर्भ :

१. भगत, रा. तु (२०१६) राजर्षी शाहू छत्रपती – जीवन व शिक्षणकार्य, रिया पब्लिकेशन्स, कोल्हापूर.पृ.क्र.२५.
२. जाधव नरेंद्र (१९८०) महाराष्ट्रातील मानचिन्हे, मॅजेस्टिक प्रकाशन, पुणे. पृ.क्र.४५

३. नांदेडकर, प्रा. डॉ. व. गो. (२०११) राजकीय विचार आणि विचारवंत, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे. पृ.क्र.३५.
४. नरके, प्रा. हरी. छ. शाहूराजांचा रिलेव्हन्स काय ? पृ.क्र.६०.
५. कीर धनंजय, राजर्षी शाहू छत्रपती एक समाज क्रांतिकारक, पॅप्युलर प्रकाशन, पहिली आवृत्ती मुंबई १९८९. पृ.क्र.१०२.
६. भोसले एस. एस. क्रांतीसुक्ते राजर्षी छत्रपती शाहू, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई प्रथम आवृत्ती १९९१, पृ.क्र.१२०.
७. पवार जयसिंगराव (संपा.), राजश्री शाहू स्मारक ग्रंथ, प्रकाशन संचालक महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, प्रथम आवृत्ती मे २००१. पृ.क्र.३२०.
८. पाटील शामराव, (संपा.) भास्कर दटावकर, राजश्री छत्रपतींचे निवडक आदेश भाग १, मुंबई १९८८. पृ.क्र.४५.
९. पवार जयसिंगराव, राजर्षी शाहू छत्रपती एक मागवा,सुमेरू प्रकाशन, मुंबई प्रथम आवृत्ती २००४. पृ.क्र.४८.

■■■

ISSN No. 2394-5990

छत्रपती शाहू महाराजांची कृषीनिती

डॉ.के. एल गिरमकर
प्रोफेसर व इतिहास विभाग प्रमुख,
के. जे. सोमैया महाविद्यालय,
कोपरगाव, ता.कोपरगाव, जि.अहमदनगर
(सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न)
मो.नं-९०१११२०१४०
ईमेल : klgiramkar@gmail.com

शेतकऱ्यांच्या कल्याणाची अत्यंतिक तळमळ असणारे,महाराष्ट्राच्या पुरोगामी दृष्टीचे प्रणेते म्हणजेच छत्रपती शाहू महाराज. आजच्या आधुनिक कालखंडामध्ये त्यांचे विचार अतिशय उपयुक्त आहेत. एक विचारप्रवण बाब अशी आहे की, आज ज्या बाबींना आपण आधुनिक असे संबोधतो त्या बहुतांशी बाबींची अंमलबजावणी शाहू महाराजांनी आपल्या कारकिर्दीमध्ये केली होती.[१]

भारतातील देशभक्तांची आणि राष्ट्रपुरुषांची नोंद करताना सामान्यतः परकीय सत्तेविरुद्ध लढा देणाऱ्या धुरंधर व्यक्तींचीच गणना केली जाते. सामाजिक, धार्मिक, आर्थिक इत्यादी क्षेत्रात प्रचंड उलाढाल करणाऱ्या राष्ट्रपुरुषांना त्यात सहसा स्थान मिळत नाही. आमच्या संकुचित दृष्टिकोनांचा आणि चुकीच्या कल्पनांचा हा परिणाम होय. देश किंवा राष्ट्र म्हणजे विशिष्ट सीमारेषांनी मर्यादित भूप्रदेश आणि स्वातंत्र्य म्हणजे परकीय आक्रमकांपासून किंवा पारतंत्र्यापासून मुक्तता एवढाच मर्यादित अर्थ सामान्यतः काढण्यात येतो. भूप्रदेशाच्या संरक्षणासाठी आणि त्यावरील परकीयांचे आक्रमण पिटाळून लावण्यासाठी प्राणांतिक लढा देणारे राष्ट्रपुरुष तेच देशभक्त, असे मानण्यात येते. स्वातंत्र्य प्राप्तीसाठी लढणारे वीरपुरुष श्रेष्ठ व वंदनीय आहेतच याबाबत कोणतीच शंका नाही.

'देशाची म्हणजे देश बांधवांची सेवा करणे, जनी जनार्धन शोधणे' हाच खरा धर्म आहे. अशी देशसेवेची व धर्माची व्याख्या राजर्षी शाहू छत्रपतींनी केली आहे. ती आवर्जून लक्षात घेतली पाहिजे. राजर्षीय शाहू छत्रपती हे खरे देशभक्त होते. जन्मभर त्यांनी बहुजन समाजाच्या सर्वांगीण उन्नतीचे कार्य केले. त्यासाठी त्यांनी प्राथमिक शिक्षण सक्तीचे करून शाळा काढल्या, वस्तीगृहे स्थापन केली. बहुजनांना विद्यादान करून त्यांची अस्मिता जागृत केली. अहंकारी ब्राह्मण वर्गाच्या गुलामगिरीतून सोडवण्यासाठी त्यांना नवीन पुरोहित वर्ग दिला. चातुर्वर्ण व्यवस्थेच्या मुळावर घाव घातले जाती-जातीतील विषमता नाहीशी करून सर्वांना समतेच्या आसनावर मानवतेची दीक्षा दिली. स्वराज्य म्हणजे मूठभर लोकांच्या हाती सत्ता जाणे नव्हे हे ओळखून आपल्या अधिकाराखालील स्वराज्यात या वर्गासाठी ५०% जागा राखून ठेवल्या. वरिष्ठ वर्गातील अधिकाऱ्यांच्याकडून बहुजन समाजाचे होणारे आर्थिक शोषण बंद करण्याचा प्रयत्न केला त्यासाठी कुलकर्णी वतने खालसा करून तलाठी पद्धत सुरू केली बलुते पद्धत महारपी गुन्हेगारी रद्द करून दलितांना दिलासा दिला हे त्यांचे कार्य म्हणजे त्यांच्या देशभक्तीची मूर्तीमंत उदाहरण होत आपल्या राज्यातील व्यापार वृद्धीसाठी स्थापन केलेली शाहूपुरी उद्योगधंद्याच्या वृद्धीसाठी सुरू केलेली शाहू मिल शेतीचा सर्वांगीण विकास करून हरितक्रांतीचे बिजारोपण हरितक्रांतीचे बीजारोपण करण्यासाठी बांधलेला लक्ष्मी तलाव मल्लविद्या आणि कला यांना दिलेले उत्तेजन या सर्व गोष्टी लक्षात घेतल्या म्हणजे त्यांच्या विशालदृष्टीचे बहुजन समाजोद्धाराच्या तळमळीची आणि कार्यक्षमतेची सहज कल्पना येते

राष्ट्रपुरुषांची दृष्टी राष्ट्रजीवनाच्या सर्वांगाना स्पर्श करणारी असते. शाहूछत्रपतींच्या बाबतीत याचे वारंवार प्रत्यंतर येते. आपल्या संस्थानात केवळ सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, राष्ट्रीय सुधारणा त्यांनी घडवून आणल्या असे नाही. शेती विकासाकडे ही त्यांनी विशेष लक्ष दिले. त्यासाठी धरण बांधून हरितक्रांतीचे बीजारोपण केले. शाहू मिल्सची उभारणी करून उद्योगधंद्यांच्या प्रगतीचे पाऊल रोवले. शाहूपुरी ही व्यापार पेठ वसून जनतेला व्यापाराकडे वळविले. मल्लविद्येला उत्तेजन देऊन बलोउपसना वाढवली. नाट्यसंगीतादी कलांचा पुरस्कार करून कोल्हापूर ही कलानगरी कलानगरी केली. शिल्पकला, चित्रकला, संगीत इत्यादीकडे त्यांनी तितकेच लक्ष पुरविले. अशा व्यापक दृष्टीच्या, उदार अंतकरणाच्या स्वातंत्र्य, समता व बंधुता या मूल्यांच्या प्रतिष्ठापनेसाठी आजन्म झगडणाऱ्या रंजल्या गांजल्यांच्या कैवारी, राजर्षी शाहू महाराज यांना कर्मवीर शिंदे यांच्यासारख्या तपसव्यांनी नवयुगातला सर्वांगपूर्ण राष्ट्रपुरुष म्हणून गौरवले हा त्यांचा गौरव यथार्थ होय.[२]

शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थांनाचा कारभार हाती घेतला त्यावेळी संस्थांनाचे क्षेत्रफळ ३२१७ चौरस मैल होते. लोकसंख्या नऊ लाख व साक्षरतेचे प्रमाण २.८% एवढे होते. त्याचप्रमाणे शेतीसाठी योग्य जमिनीचे क्षेत्रफळ १२ लाख ९४ हजार १९६ एकर एवढे होते. महाराजांच्या कार्यामुळे इ.स.१९२२ मध्ये साक्षरतेचे प्रमाण ४.४% एवढे झाले. तर शेती योग्य जमिनीच्या क्षेत्रामध्ये १०% वाढ होऊन ती १२२६५३५ एकर एवढे झाले. शाहू महाराजांच्या कार्याचे व तत्वज्ञानाचे वैशिष्ट्य म्हणजे ते प्रत्यक्ष कृतीवर भर देत होते. त्यांना शेती व शेतकरी या दोघांविषयी अतिव प्रेम होते ते पुढील उदाहरणावरून सहज लक्षात येते. एका शेतकरी मेळाव्यामध्ये ते म्हणतात ममी तुमच्यापैकीच एकजण आहे. मला मजूर समजा अगर शेतकरीफ ते स्वतःस शेतकरी व शेतमजूर समजत याबद्दल त्यांना अभिमान वाटत होता. ही काही सामान्य बाब नव्हती

शाहू महाराजांना शेतीविषयक व शेतकऱ्याविषयी प्रचंड जिव्हाळा होता. कोल्हापूर संस्थांमध्ये शेतीचा विकास झाला पाहिजे यासाठी ते सतत कार्यमग्न असत. शेतीसाठी मूलभूत सुधारणा करत असताना १९०२ मध्ये त्यांनी आपल्या अधिकाऱ्यांमार्फत कोल्हापूर संस्थांमधील प्रत्येक गावची पाहणी केली. गावामध्ये विहीर व परिसरामध्ये तलाव कसे आहेत याची नोंद घेतली. गावची शेती फुलवण्यासाठी आवश्यक त्या ठिकाणी तलावांची निर्मिती करण्यास प्राधान्यक्रम दिला. पाणी आडवा पाणी जिरवा हे तत्व महाराजांनी प्रत्यक्षपणे राबविले. शेतीसाठी धरणे किती आवश्यक आहेत याविषयीची शाहू महाराजांची दृष्टी पुढील एका पत्रा वरून दिसून येते. राधानगरी धरण बांधणे म्हणजे जीवन कार्यच आहे. याबाबत शाहू महाराज कर्नल फेरीस या इंग्रज अधिकाऱ्यास लिहिलेल्या पत्रात म्हणतात मआपण येथून निघून गेल्यावर, मी सुमारे वीस बंधारे बांधले पण माझी महत्त्वकांक्षा पूर्ण झाली नाही. म्हणून मी आता एक मोठा सिंचन प्रकल्प हाती घेणार आहे. संपूर्ण भारतात मोठा असा तो प्रकल्प असणार आहे. त्यासाठी मी माझी पूर्ण शक्ती लावत आहे. सध्या मी आणि बापूसाहेब दोघेही त्यावर काम करत आहोत. ही योजना यशस्वी व्हावी हीच माझी अंतरीची इच्छा आहे.'[३] राधानगरी धरणाची निर्मिती म्हणजे महाराष्ट्रातील हरितक्रांतीचा प्रारंभ होय. या ठिकाणचे पर्जन्यमान साधारणपणे २०० इंच होते. इ.स.१९०९ यावर्षी राधानगरी धरणाचे बांधकाम सुरू झाले.इ.स. १९१८ पर्यंत या धरणाचे चाळीस फुटापर्यंतचे काम पूर्ण झाले. धरणामध्ये ६०० दशलक्ष घनफूट पाणी साठले. परिणामी भोगावती नदीच्या दोन्ही बाजूस हिरवीगार शेती फुलू लागली. शाहू महाराजांचे हरितक्रांतीचे स्वप्न साकार होऊ लागले.

शाहू महाराजांनी कोल्हापूरमध्ये शेतीमध्ये आधुनिकता आणण्यासाठी विविध प्रयोग सुरू केले. आपला शेतकरी मागास का आहे याविषयीचा मूलभूत विचार केला. याचा साकल्याने विचार करताना त्यांच्या एक बाब लक्षात आली की, आपल्याकडे शेतीसाठी आवश्यक असलेला भांडवलाचा पुरवठा फार कमी आहे. शेतीसाठी शेतकरी सावकारावर अवलंबून आहेत. कोल्हापूर संस्थांमध्ये इ.स.१८९१ यावर्षी शेतकऱ्यांनी सावकारांच्याकडून किमान एक कोटी रुपयांपेक्षा जास्त कर्ज घेतले होते.[४] हे कर्ज शेतकऱ्यांना व्यक्तिगत आणि व्यावसायिक पातळीवर घातक होते. आपला शेतकरी मागे का आहे. खेड्याकडून शहराकडे त्याचे का स्थलांतर होते आहे, या मागची कारणे महाराजांनी शोधण्यास प्रारंभ केला. त्यात प्रामुख्याने शेतकऱ्यांचे अज्ञान, निरक्षरता, शेतीमालाच्या विक्रीसाठी संघटनांचा अभाव, शेतीसाठी अल्प व्याजदराने भांडवलाची उपलब्धता नसणे, आणिअल्पभूधारक शेतकऱ्यांचे सर्वाधिक प्रमाण, शेतकऱ्यांची जमीन लहान लहान तुकड्यांमध्ये विभाजित झालेली आहे. याचा विचार करून शाहू महाराजांनी आपल्या संस्थानांमध्ये तुकडे बंदी केली.

शेतकऱ्यांनी आपल्या प्रगतीसाठी पतपेढ्या उभाराव्यात, शेतकरी ग्राहक भांडार व सहकारी उद्योग धंदे सुरू करावेत. शेतीस जोडधंदा म्हणून पशुपालन, दुग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन, शेळीपालन व शेतीशी संलग्न असे व्यवसाय करावेत. यावर शाहू महाराजांनी भर दिला. शेती व्यवसाय करताना शेतकऱ्यांनी मुलोद्योगी व्यवसायाचे प्रशिक्षण घेऊन त्यातही प्रवीण व्हावे हा त्यांचा मूलगामी विचार होता.

इ. स. १९०२ मध्ये शाहू महाराजांनी युरोपचा दौरा केला. या प्रवासामध्ये त्यांनी इटली या देशास भेट दिली. स्कॉटलंडच्या शेतीचे सूक्ष्मपणे निरीक्षण केले. शाहू महाराजांची शेतीविषयक दृष्टी आणि शेतीचे ज्ञान पाहून रॉयल एग्रीकल्चरल सोसायटी ऑफ इंग्लंड या संस्थेने शाहू महाराजांना सभासदत्व देऊन गौरव केला. युरोपचा दौरा आटोपून परत आल्यावर महाराजांनी युरोपमधील शेतीज्ञानाचा वापर कोल्हापूर मध्ये केला. त्यासाठी पुढील उपाययोजना केल्या. शेतीस भरपूर पाणीपुरवठा, शेतीचे आधुनिकीकरण, विहिरी खोदण्यासाठी बिनव्याजी कर्ज, शेतकऱ्यांसाठी सहकारी पतसंस्था, शेती उत्पादनांना बाजारभाव मिळवून देणे हा कार्यक्रम हाती घेतला.

मोटांच्या विहिरींची निर्मिती केली. लहान लहान आकाराचे बंधारे बांधले. शेतीमध्ये दोनदा पीक घेण्यास प्रारंभ केला. सार्वत्रिक पाटबंधारे विभागाची स्थापना केली. धरणांची निर्मिती करण्यासाठी सर्वेक्षण अभियंता नियुक्त केला. ज्या सावकारांनी शेतकऱ्यांना दिलेल्या कर्जाच्या वसुलीसाठी शेतकऱ्यांची जनावरे

ISSN No. 2394-5990

आणि शेतामधील उभ्या पिकांचा ताबा घेतला होता त्यांना ताबा सोडण्याचे आदेश दिले.

शाहू महाराज शेतकऱ्यांशी मनमोकळेपणे गप्पा मारत. प्रसंगी त्यांच्याबरोबर शेतामध्ये फेरफटका मारत असत. एका अर्थाने आपणास असे म्हणता येईल की, महात्मा फुले यांचा शेतीविषयक दृष्टिकोन महाराजांनी प्रत्यक्षात राबविला होता. शाहू महाराजांच्या कारकिर्दीच्या प्रारंभि उसाच्या गुऱ्हाळामध्ये वजनदार लोखंडी घाणा वापरला जात असे. हा घाना हाताळताना कामगारास बऱ्याचदा इजा झाल्याचे प्रसंग घडले होते. त्याचवेळी शाहू महाराजांनी असे जाहीर केले की, वजनदार घाण्याऐवजी विज्ञान व तंत्रज्ञानाच्या साह्याने असे यंत्र बनवा की जे वापरण्यास सोपे असेल आणि त्यापासून इजाही होणार नाही. असे यंत्र बनविणाऱ्यास बक्षीस दिले जाईल.[५]

शाहू महाराजांनी आपल्या संस्थानामध्ये आधुनिक पद्धतीच्या रोपवाटिका तयार केल्या. ज्यामध्ये हिरडा, जांभूळ, काजू, साग, आंबा, फणस इत्यादी झाडांची रोपे जोपासली. ती शेतकऱ्यांना लागवडीसाठी दिली. दक्षिण भारतामधून टॅपिओका ही वनस्पती आणून तिची लागवड केली. या वनस्पती पासून साबुदाणा तयार करतात. शेती चांगल्या प्रकारे करायची असेल तर, शेतीचे शिक्षण घ्यावयास हवे. त्यासाठी कोल्हापूरच्या राजाराम हायस्कूलमध्ये विद्यार्थ्यांना शेतीच्या शिक्षणाची सुरुवात केली. बारामतीच्या महादेव नारायण देवधर यांनी शेतीची शास्त्रीय माहिती देणारे पुस्तक लिहिले असल्याची माहिती मिळताच महाराजांनी त्या पुस्तकाच्या शंभर प्रति विकत घेतल्या आणि त्या शेतकऱ्यांना भेट म्हणून दिल्या. शेतकऱ्यांसाठी कृषी प्रदर्शने आयोजित केली. त्यासाठी दरबाराच्या तिजोरी मधून आर्थिक मदतही केली. कोल्हापूर परिसरामध्ये गावोगावी विविध देवतांच्या यात्रा भरल्या जात. महाराजांनी या यात्रेच्या प्रसंगी शेतीच्या अवजारांची प्रदर्शने भरवली. त्यामधून शेतीच्या नव्या पद्धती, आधुनिक व कार्यक्षम अवजारांची माहिती करून दिली.

शाहू महाराजांनी पारंपारिक पिकांप्रमाणे आधुनिक व्यापारी पिकांची कोल्हापूरमध्ये लागवड केली. चहा, कॉफी, रबर, वेलदोडे इत्यादी व्यापारी पिकांना महत्त्व दिले. यापैकी चहाच्या मळ्यांचा प्रयोग महाराजांच्या अपेक्षेपेक्षा जास्त यशस्वी झाला. याविषयीचे एक उदाहरण पुढीलप्रमाणे २४ ऑक्टोंबर १९०४ रोजी महाराज लिहितात 'आज सकाळी मी पन्हाळ्याला गेलो होतो. तेथे लागवड केलेल्या चहाची स्थिती उत्तम आहे हे पाहून आनंद झाला. आमचा प्रयत्न यशस्वी होईल असे मला वाटते. म्हणून यापेक्षाही अधिक विस्तृत लागवड करावी असे मला वाटते. करिता माझ्यासाठी म्हणून आपण दहा मण चहाचे बी विकत घ्याल, तर मजवर आपले उपकार होतील.'[६] चहाप्रमाणेच शाहू महाराजांनी भुदरगड पेठ्यामधील शेलाप या गावी तुतीची लागवड केली होती. व्यापारी पिकांप्रमाणेच महाराजांनी आपल्या संस्थानांमध्ये औषधी वनस्पतींची लागवड केली. कोरफड या वनस्पतीचे औषधी उपयोग लक्षात घेऊन, शेतीच्या बांधावर जवळजवळ ३७ मैल लांबीच्या क्षेत्रात कोरफडीची लागवड केली. कोरफड ही तंतुमय वनस्पती असून तिचा वापर औषध म्हणून होतो. शिवाय शेताच्या बांधावर लागवड केल्यास, जमिनीची धूप होत नाही. या बाबी महाराजांना अवगत होत्या. आपल्या संस्थानांमधून शेतमाल बाहेर पाठवण्यासाठी महाराजांनी आर्थिक मदत केली. कोल्हापूरमध्ये उत्पादन केलेला चहा, पन्हाळा टी नंबर ४ या नावाने प्रसिद्ध झाला. भारतातील अनेक संस्थानिकांना तो निर्यात केला जात होता. बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड यांच्या हा चहा विशेष आवडीचा होता. कोल्हापूरमध्ये चहाप्रमाणेच गुळाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होत असे. मात्र हा गुळ राजापुरीचा गुळ या नावाने प्रसिद्ध झाला होता. म्हणून महाराजांनी शाहूपुरी आणि जयसिंगपूर या व्यापारी पेठा बसवल्या. या व्यापारी पेठामधून सन १९०२ पर्यंत ५० लाख रुपये किंमतीचा गुळ आणि २० लाख रुपयांचा भुईमूग निर्यात केला. यावरून आपणास महाराजांची शेतीमधील व्यापार विषयक दृष्टी दिसून येते.

आज आपणास सर्वत्र मधुमक्षिकापालन हा व्यावसाय किती महत्त्वाचा व उपयुक्त आहे, याबाबत माहिती दिली जाते. शाहू महाराजांनी या व्यवसायाचे महत्त्व आणि गरज त्याच वेळी ओळखली होती. शाहू महाराजांनी आपल्या संस्थानामध्ये मधुमक्षिका पालन हा प्रकल्प यशस्वी करण्यासाठी, जोरदार प्रयत्न केले होते. त्यांचा हा प्रकल्प अतिशय यशस्वी झाला. यावरून शाहू महाराजांची दूरदृष्टी आपणास दिसून येते. हा प्रकल्प यशस्वी करण्यासाठी त्यांनी, कलकत्ता या शहरांमधून या प्रकल्पाबाबतची सर्व माहिती समजून घेतली होती. शाहू महाराजांनी त्या काळात जे कृषी औद्योगिक धोरण स्वीकारले ते आज किती महत्त्वाचे आहे हे सहज लक्षात येते. काळाच्या खूप पुढची त्यांची दृष्टी होती. याची प्रचिती आपणास येते. शाहू महाराजांनी शेतीविषयक प्रदर्शनांची जी दृष्टी दिली, ती आजही उपयुक्त आहे. प्रारंभीच्या काळात केलेल्या या शेती सुधारणामुळे, कोल्हापूर संस्थानामध्ये ओलिताखालील क्षेत्रामध्ये किती बदल झाला हे आपणास पुढील आकडेवारीवरून समजू शकेल. कोल्हापूर संस्थांच्या सन १९१५-१६ च्या अहवालावरून नद्यांच्या पाण्याखालचे क्षेत्र ३९७८३ एकर, विहिरीच्या पाण्याखालचे क्षेत्र ३९८४५ एकर, तलावांच्या पाण्याखालचे क्षेत्र २३२ एकर अशा प्रकारे एकूण ७९८६० एकर जमीन ओलिताखाली आली.[७] सन १९२१-२२ सालच्या

अहवालावरून कोल्हापूर संस्थांनाच्या शेती क्षेत्रामध्ये १०% वाढ झाली असे दिसून येते. शेतीस जलसिंचनाची सोय व्हावी यासाठी खर्चिक मात्र दूरदर्शीपणाच्या योजना शाहू महाराजांनी राबविल्या. आजही त्यांचे चांगले परिणाम दिसत आहेत. कोल्हापूर पासून जवळच भोगावती नदीवर राधानगरी धरण बांधण्याची मूळ कल्पना शाहू महाराजांची होती. या धरणाचा आराखडा रावबहादूर दाजीराव अमृतराव विचारे यांनी बनविला. राधानगरी धरणाच्या बांधकामासाठी इ.स.१९०९ते १९१७ या कालावधीत २६लाख रुपये खर्च केला. आंतरराष्ट्रीय कीर्तीचे शास्त्रज्ञ विश्वेश्वरय्या या प्रकल्पाविषयी म्हणतात मअसंख्य सुप्त संभाव्यता प्रस्तुत धरण प्रकल्पात दडलेल्या आहेत. याद्वारे लोकांच्या उत्पादन क्षमतेत भर घालने, शेतकी मालाचे उत्पादन वाढविणे, तसेच औद्योगिकता व उत्पादकता यांचा विकास साध्य करणे शक्य होणार असल्यामुळे या प्रकल्पाचे मोल दिवसेंदिवस वृद्धिंगतच होत जाणार आहे.'[८]

आपल्या शेतकऱ्यांची आर्थिक प्रगती वेगाने व्हावी, आर्थिक विकासाची फळे सामान्य पर्यंत जावीत, ग्रामीण दारिद्र्य व शेतीमधील कुंठितता दूर करण्यासाठी शाहू महाराजांनी शेतीस औद्योगीकरणाची जोड दिली.इ.स. १९१०-११ मध्ये शाहू महाराजांनी शाहू स्पिनिंग अँड विव्हिंग मिलची स्थापना केली. मिल साठी जमीन आणि पाणी मोफत उपलब्ध करून दिले. मिलच्या उभारणीमध्ये दरबाराचा पैसा गुंतविला. अशाच प्रकारच्या मिल शिरोळा, गडहिंग्लज या ठिकाणी उभारल्या. कोल्हापूर संस्थानामध्ये रेशीम निर्मितीचा प्रकल्प उभारला. विणकर संघाची स्थापना केली. १९१४ मध्ये पहिले महायुद्ध सुरू झाले. भारतात पर्यायाने महाराष्ट्रात पोलादाची प्रचंड टंचाई निर्माण झाली. महाराष्ट्रामध्ये किर्लोस्करांनी शेतीसाठी आवश्यक असलेला पोलादी नांगर बनवण्याचा कारखाना काढला होता. त्यासाठी आता पोलादाची टंचाई भासू लागली. यावर महाराजांनी उपाय काढला. कोल्हापूर संस्थांमध्ये विविध ठिकाणच्या किल्ल्यावर, अडगळीत पडलेल्या तोफा वितळून त्यापासून पोलादी नांगर बनवण्यास, किर्लोस्करांना मदत केली.

शेतकरी आर्थिकदृष्ट्या बळकट होण्यासाठी संस्थानांमध्ये सहकारी चळवळ बळकट करणे आवश्यक होते. त्यासाठी भास्करराव जाधव यांच्या माध्यमातून कोल्हापूर अर्बन को-ऑपरेटिव्ह सोसायटीची स्थापना करण्यात आली. या सोसायटीस आर्थिक पाठबळ देण्यासाठी, महाराजांनी एडवर्ड एग्रीकल्चर इन्स्टिट्यूट मधून तीन हजार पाचशे रुपयांची कायम ठेव सोसायटीमध्ये ठेवली पुढे इ.स.१९२३ पर्यंत कोल्हापूर संस्थानामध्ये २६ शेतकरी सहकारी संस्था व १२ बिगर शेतकरी सहकारी सोसायट्या निर्माण करण्यास प्रेरणा दिली. प्रस्तुत सहकारी संस्थामार्फत शेतकऱ्यांना शेतीसाठी कर्ज दिली. बी-बियाणांची खरेदी, जलसिंचनांच्या सुविधा, दुभती जनावरे खरेदी करणे आधुनिक शेतीसाठी आवश्यक असलेली अवजारे खरेदी करणे, इत्यादी विविध बाबीसाठी व्हिक्टोरिया मेमोरियल फंडामधून कर्ज दिली.

सहकारी संस्थांच्या माध्यमातून वनसंपदा जपली. आदिवासी बांधवांच्या मार्फत जंगलामधील मध व वनौषधी गोळा करण्यास प्राधान्य दिले. जंगलामध्ये हिरडा आणि चंदनाच्या झाडाची लागवड वाढवली. हिरडा वनस्पतीचे औषधी महत्त्व व त्याची स्थानिक उपयुक्तता समजून घेतली. हिरड्यांमध्ये असलेले उपयुक्त घटक आणि औषधी गुणधर्म पाहून हिरड्याची निर्यात करण्यावर भर दिला.

शाहू महाराजांनी कोल्हापूरमध्ये शेती व औद्योगिक विकासाचे दालन उभे केले. शेती प्रदर्शना मधून परदेशी जनावरे आणली. शेतीचे पदवीधर विद्यार्थी व शेती तज्ञांना कोल्हापूरमध्ये आणून त्यांच्या ज्ञानाचा उपयोग शेतकऱ्यांना करून दिला. दि. १६ एप्रिल १९१४ रोजी कोल्हापूर मधील खास बागेतील शेती प्रदर्शनासाठी पुण्याच्या शेतकी महाविद्यालयाचे प्राचार्य सामील झाले होते. त्यांच्याकडून आधुनिक खते, अवजारे, यंत्रे, पिकांवर पडणाऱ्या रोगांची माहिती व त्यावरील उपाय योजना सामान्यापर्यंत पोहोचविल्या. शेतकऱ्यांना रोपवाटिका बनवण्याचे प्रशिक्षण दिले. शाहू महाराजांनी आपल्या राजवटीमध्ये ज्या ज्या वेळी बाहेरच्या संस्थानांचे दौरे केले, त्या ठिकाणी केलेल्या भाषणामध्ये त्यांनी शेतकऱ्यांचा गुणगौरव केला. दि.१९ ते २१एप्रिल १९१९ या कालावधीमध्ये महाराज कानपूर येथे अखिल भारतीय कुर्मिक क्षेत्रीय परिषदेत उपस्थित होते. या परिषदेत शाहू महाराजांनी केलेल्या भाषणामध्ये ते म्हणतात ' आपला निर्वाह कृषी कर्मावर आधारित आहे एक दाणा पेरला की हजारोंची निर्मिती होते कृषी कर्मापासून दुहेरी उत्पन्न मिळते मानवास अन्न व पशुस पशुखाद्य मिळते'.[९] महाराजांनी हे भाषण हिंदीमध्ये केले या भाषणामध्ये प्रामुख्याने जो राष्ट्राच्या शेतीचा नांगर चालवतो तोच खरा क्षेत्रीय आहे. त्यांनी शेतकऱ्यांना क्षत्रियाची उपमा दिली.

दि.१५ ऑगस्ट १९२० रोजी महाराजांनी कोल्हापूर मधील शेती प्रदर्शनामध्ये केलेले भाषण, त्यांच्या शेतीविषयक आधुनिक विचारांची ओळख पटवणारे आहे. ते म्हणतात 'आपल्या देशातील लोकांनी जुन्या शेती पद्धती ऐवजी, सुधारलेल्या शेतीशास्त्राचा आणि अवजारांचा अवलंब केला पाहिजे. सुधारलेले तंत्रज्ञान व विज्ञान शिकविण्याच्या दृष्टीने कारागिरांनी पुढे आले पाहिजे. शेतीस सुधारलेल्या अवतांची गरज आहे. नांगर व विहिरीचे पाणी काढण्यासाठी मोट यांची सुधारणा यामध्ये आमच्या शेतकऱ्यांचे हित आहे.'[१०]

ISSN No. 2394-5990

छत्रपती शाहू महाराजांच्या शेतीविषयक आधुनिक दृष्टिकोनामुळे, कोल्हापूर मधील शेतीचा इ.स.१९२१ पर्यंत कायापालट झालेला दिसून येतो. इ.स.१८९४-९५मध्ये, कोल्हापूर मधून फक्त सहा लाख किंमतीचा गुळ निर्यात केला होता. इ.स.१९२१ मध्ये हीच निर्यात तीस लाख रुपयेएवढ्या पर्यंत पोहोचली. ही बाब फक्त गुळ या एका कृषी पदार्थाच्या संदर्भातील आहे. याशिवाय औषधी वनस्पती, चहा, कॉफी, इत्यादीच्या उत्पादनात केलेली प्रगती उल्लेखनीय होती. या सर्व प्रस्तुत विवेचनावरून शाहू महाराजांची कृषीविषयक दृष्टी आजच्या पेक्षाही आधुनिक होती असे म्हणता येते. शेतीचा विकास म्हणजे शेती उत्पादनात वाढ व उत्पादित मालासाठी बाजारपेठ शोधून योग्य मूल्य प्राप्त करून देणे. शेतीच्या उत्पादन वाढीबरोबरच शेतकऱ्यांचे उत्पन्नही वाढले पाहिजे. हा शाहू महाराजांचा दृष्टिकोन अतिशय उदात्त आणि व्यवहार्य आहे. शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी शाहू महाराजांचा हा दृष्टिकोन आजच्या काळातही अतिशय उपयुक्त आहे. याच मार्गाने शेतकऱ्यांचे प्रश्न सुटू शकतात. शाहू महाराजांचे कृषिविषयक धोरण काळाच्या खूप पुढचे होते असे दिसून येते.

संदर्भ व टिपा :

१. जयसिंगराव पवार (संपा.), राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, कोल्हापूर २००७,पृ.२५६.

२. वि. भि. कोलते, शाहू महाराज एक थोर राष्ट्रपुरुष, नारायणगाव, २०२३.

३. जयसिंगराव पवार(संपा.), राजर्षी शाहू छत्रपती: जीवन व कार्य, कोल्हापूर, जानेवारी २०१२, पृ. १४२.

४. भा.ल.भोळे, छत्रपती राजर्षी शाहू, पुणे २०१० पृ.९३-९५.

५. रमेश जाधव, लोकराजा शाहू छत्रपती, पुणे १९०७ पृ.३०७.

६. अण्णासाहेब लठ्ठे, श्रीमंत छत्रपती शाहू छत्रपती यांचे कार्य, कोल्हापूर, द्वितीय आवृत्ती, २००८ पृ.२३३.

७. मीना कुलकर्णी, कोल्हापूरची वरदायिनी: राधानगरी धरण योजना, कोल्हापूर, समाविष्ट जयसिंगराव पवार (संपा.), राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, कोल्हापूर, २००७, पृ. ६९१ ते ७००.

८. जयसिंगराव पवार (संपा.) राजर्षी शाहू महाराज स्मारक ग्रंथ, कोल्हापूर, २००७, पृष. २५६.

९. R.S.Mhopare and J.F.Patil,Economics Policies and Programmes of Rajarshi Chhattrapati Shahu Maharaj,Kolhapur 2007,p.87.

१०. भगवान जाधव (संपा.), राजर्षी शाहू महाराजांची भाषणे, मुंबई, मे, २००९, पृ. ४२-४३.

■■■

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या सामाजिक सुधारणा

श्री जनार्धन विठ्ठल बुधवंत
(B.sc, M.-, D.ed, B.ed.)
मु.पो. निंबेनांदुर ता.शेवगाव जि.अहमदनगर , ४१४५०१.
Email id : janardhanbudhwantgmail.com
Mobile number : 9673733094

प्रस्तावना:

भारत हा एक सांस्कृतिक, वैचारिक, ऐतिहासिक परंपरा लाभलेला आणि विविधतेत एकता असलेला देश आहे. कोल्हापूर म्हणजे प्राचीन काळातील ङ्ककरवीर क्षेत्रफया नावाने प्रसिद्ध असलेली नगरी. भारताच्या सामाजिक, सांस्कृतिक व यांसारख्या विविध क्षेत्रात कोल्हापूर संस्थानाचे अनन्यसाधारण योगदान आहे. परिवर्तन हा सृष्टीचा नियमच आहे,आणि हेच परिवर्तन अगदी सजीवांची निर्मितीपासून ते आजतागायत होत असते. समाज हासुद्धा परिवर्तनशील घटक आहे. समाजात चांगले वाईट अनेक परिवर्तन होत असतात. अशा प्रकारचे परिवर्तन कोल्हापूर संस्थानात राजर्षी शाहू महाराजांनी समाजात करून अनेक सामाजिक सुधारणा घडवून आणून समाजसुधारणेचे बीज भारतीय संस्कृतीत रोवले व त्याबिजाचे आज मोठ्या वृक्षात रूपांतर झालेले आहे. छत्रपती शाहूंचे नाव यशवंतराव जयसिंगराव घाडगे असे होते. इसवी सन २६ जून १८७४ रोजी कागल येथील घाटगे घराण्यात छत्रपती शाहू महाराजांचा जन्म झाला. त्यांच्या आईचे नाव राधाबाई होते. कोल्हापूर संस्थानचे राजे चौथे शिवाजी महाराज यांचा २५ डिसेंबर १८८३ रोजी अहमदनगर मधील तुरुंगातील मृत्यू झाला.[१] त्यानंतर त्यांची पत्नी महाराणी आनंदीबाई यांनी छत्रपती शाहू महाराजांना दत्तक घेण्यास परवानगी दिली. त्यानुसार १७ मार्च १८९४ रोजी छत्रपती शाहू महाराज यांना दत्तक घेण्यात आले आणि यशवंतरावांचे नाव छत्रपती महाराज ठेवले. कुलदेवता महालक्ष्मीचे दर्शन घेऊन त्यांनी सामाजिक कार्याला प्रारंभ केला. कोल्हापुरात प्राथमिक शिक्षण घेऊन नंतर त्यांना राजकोटला पाठविण्यात आले. शिक्षणानंतर २ एप्रिल १८९४ रोजी दरबार भरून राज्यकारभाराची सूत्रे छत्रपती शाहूंच्या हाती दिली गेली.[२] १ एप्रिल १८९१ रोजी बडोद्याचे गुणाजीराव खानविलकर यांची मुलगी लक्ष्मीबाई यांच्याशी शाहू महाराज विवाहबद्ध झाले. अशा राजाचा मृत्यू ६ मे १९२२ रोजी मुंबईत झाला.[३]

गृहीतके :

१) छत्रपती शाहू महाराजांनी अनेक सामाजिक सुधारणा घडवून आणल्या.
२) छत्रपती शाहूंच्या सामाजिक सुधारणामुळे आर्थिक व सामाजिक विकासाला हातभार लागला व समाजात समानता प्रस्थापित करण्यास मदत झाली.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या सामाजिक सुधारणा :

छत्रपती शाहू महाराज हे एक सुधारमतवादी राजा होते. त्या कालखंडात छत्रपती शाहूंची राजवट सुरू झाली तेव्हा, राज्यकारभारत ब्राह्मण व इंग्रजांचे अतिशय प्रभुत्व होते. धार्मिकदृष्ट्या ब्राह्मणांचे पूर्णतः वर्चस्व कोल्हापूरच नाही तर समस्त भारतावर असल्याचे आढळते आणि राज्यकारभारात इंग्रजांचे वर्चस्व अशा दुहेरी कात्रीतून छत्रपती शाहू महाराजांनी समस्त समाजासाठी अनेक योजना व निर्णयाच्या माध्यमातून विकास व सुधारणा घडवून आणला. ब्राह्मणेतर चळवळीस खऱ्या अर्थाने प्राधान्य देऊन सत्यशोधक समाजाची स्थापना करून छत्रपती शाहू महाराजांनी अनेक सामाजिक सुधारणा घडवून आणल्या होत्या.

१) वेदोक्त प्रकरण व क्षात्रजगद्गुरुपद निर्मिती :

इसवी सन १८९९ मध्ये छत्रपती शाहू महाराज नेहमीप्रमाणे पंचगंगेवर स्नानासाठी गेले असता त्यांच्यासोबत त्यांच्या जीवनाला कलाटणी देणारी एक घटना घडली. महाराज स्नान करत असताना त्यांचा पुरोहित नारायण भट हे पुराणोक्त मंत्र म्हणत असताना समाजसुधारक रामशास्त्री भागवत यांनी छत्रपती शाहूंच्या लक्षात आणून दिले, त्यावर महाराजांनी विचारणा करताच ते म्हणाले, शुद्राला पुराणोक्त मंत्र सांगावे लागतात व ब्राह्मण आणि क्षत्रियांना वैदिक मंत्र सांगावे लागतात.[४] अशा तऱ्हेने महाराजांना अपमानजनक उत्तर नोकराकडून मिळाले.त्यांनी भटजींची समजूत घालण्याचा प्रयत्नही केला. आजही प्रत्येक कार्यात ब्राह्मणाकडूनच पूजा अर्चना केली जाते परंतु बऱ्याच अंशी छत्रपती शाहूंच्या प्रकरणानंतर ब्राह्मणेतर चळवळीला

ISSN No. 2394-5990

पाठबळ मिळाले व आज शुद्रांनाही ब्राह्मणाकडून पूजा करून घेण्याचा प्रवासात छत्रपती शाहूंची मोठी योगदान होते. पुढे आप्पासाहेब राजोपाध्यांनीही वेदोक्त श्रावणीसाठी नाकार दिल्यावर महाराजांनी त्यांचे वंशपरंपरागत हक्क काढून घेऊन त्यांचे इनामही जप्त केले होते. हे प्रकरण महाराजांना इतके जिव्हारी लागले की त्यांनी ऑक्टोबर १९२० रोजी कोल्हापूरतील शंकराचार्याची पीठच रद्द करून क्षात्रजगद्गुरुचे नवे पीठ निर्माण केले व त्या पिठावर सदाशिवराव पाटील बेनाडीकर या मराठा समाजातील व्यक्तीची निवडच केली. या सामाजिक सुधारणेत ब्राह्मणांबरोबरच स्वतः टिळकांनी महाराजांना विरोध केला होता.

२) मागासवर्गीयांसाठी सुधारणा व वस्तीगृहाची स्थापना:

दुर्बल,निरक्षर, मागासवर्गीय, बहुजनांमध्ये सुधारणा करण्यासाठी शिक्षणाचे महत्त्व छत्रपती शाहूंनी ओळखले होते अनेक शिक्षण संस्था शाळा स्थापन करून व अनेकांना त्यासाठी सहकार्य करून छत्रपती शाहूंनी महात्मा फुले यांच्या मदतीने मराठा व इतर मागासवर्गीय बहुजनांच्या समाजाचा विकासाचे कार्य हाती घेतली मागासवर्गीयांच्या विकासातील अधिकाराची जाणीव करण्यासाठी व त्यांच्या अडचणी दूर करण्यासाठी त्यांना शिक्षण देणे महत्त्वाचे होते, त्यासाठी स्वखर्चाने महाराजांनी अनेक वसतिगृह निर्माण केली व सर्व समाजाला न्याय देण्याचा प्रयत्न केला. आजही सरकार तर्फे विविध जाती धर्मासाठी वस्तीगृहे निर्माण केली जात आहेत. विशेषता मागासवर्गीय, मराठा यासारखे अनेक जाती धर्मातील विद्यार्थी वस्तीगृहाचा आधार घेत आहे. ज्याची सुरुवात करण्यामागे राजर्षी शाहू महाराज यांची मोठी प्रेरणा होती.

१९११ रोजी त्यांनी कोल्हापुरात सत्यशोधक समाजाची स्थापना करून परशुराम घोसवाडकर यांना अध्यक्ष बनवले व त्याच काळात १५ टक्के विद्यार्थ्यांना नादारीची घोषणा करून शाहू महाराजांनी बहुजन समाजाच्या गळ्यातले ताईत बनले.महाराजांनी आपल्या संस्थनात अस्पूश्यांसह सर्वांना ङ्गकम्युनल रिप्रेझेंटेशनफ देणार असल्याचे सांगितले.[५] १९१७ साली तर वटहुकूमच काढून त्यांनी कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचेच करून टाकले. स्वातंत्र्यानंतर भारतात कित्येक वर्षानंतर आज सर्वांना प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत झाले आहे. ज्याचा पाया १९१७ रोजी राजर्षी शाहूंनी घातला होता. शिक्षणामुळे आजही समाज गतिशील व विकसित बनत चालला आहे.

३. आरक्षणाची घोषणा:

१९०२ साली महाराज इंग्लंड वारी करून आल्यावर त्यांच्या मनावर फार मोठा परिणाम झाला. नवे जग पाहून महाराजांच्या मनामध्ये विचारांचे काहूर झाले. गरिबांचा व मागासवर्गीयांचा कैवारी झाल्याशिवाय नवयुगाची सुरुवात शक्य होणार नाही. हे ओळखून महाराजांनी २६ जुलै १९०२ रोजी करवीर गॅझेट मध्ये एक जाहीरनामा प्रसिद्ध करून मागासवर्गीयांना उच्च शिक्षण घेण्यास उद्युक्त करून त्या वर्गांना सरकारी खात्यात रिकाम्या होतील त्यातील ५०% जागा सुशिक्षित तरुणांना राखीव ठेवण्याचे आदेश दिले व नवयुगाची सुरुवात केली.[६] ज्या समाजात शिक्षण व नोकरीमध्ये वाटाच नव्हता त्यांना ५०% जागा राखीव ठेवण्याचे छत्रपतींच्या विचाराचा आज मात्र राजकीय कारणासाठी वापर होताना दिसतो. प्रत्येक समाज जाती धर्माच्या नावावर आरक्षण मागत आहे.आर्थिक दृष्ट्या खरच जे घटक कमकुवत आहे त्यांना मुख्य प्रवाहात आणणे फार गरजेचे आहे परंतु बलिष्ठ वर्गच याचा फायदा घेऊ लागले तर चुकीचं होईल. त्याच कालखंडात छत्रपती शाहू महाराजांनी स्वतःची आवड असलेल्या कुस्तीला महत्वही प्राप्त करून दिले व अनेक कुस्तींचे आखाडे व तालीमी तयार केल्या. आजही उभ्या महाराष्ट्रात मोठ्या मानाने प्रत्येक खेड्यापाड्यात कुस्तीचे फड रंगताना दिसतात.

४) कुळकर्णी वतने व महार वतने रद्द :

१९१८ साली कोल्हापूर संस्थानातील पारंपारिक कुळकर्णी वतने रद्द करून त्यांच्या जागी तलाठी नेमण्याची राजाज्ञा छत्रपती राजर्षी शाहूंनी काढली व सामाजिक सुधारण्यासाठी एक पाऊल पुढे टाकले. अर्थातच कुळकर्णी चिडले होते.काही काळ हा निर्णय स्थगित करून महाराजांनी २५ जून १९१८ रोजी परत हा निर्णय कायम करण्याची राजाज्ञा काढली.[७] कुळकर्णी पदावर ब्राह्मण्येतरांच्या नेमणुका होऊ लागल्या. कुळकर्णी यांच्या जमिनी परत न घेता त्यांनी सर्वसामान्य प्रमाणे महसूल भरावा, असा सर्व समावेशक निर्णय घेऊन कुळकर्णी यांचे वजन कमी करून लबाडी ही कमी होईल असा विचार महाराजांनी केला असावा. कुळकर्णी वतने नष्ट करणे ही एक निर्विवाद, पण समाजात आमुलाग्र सुधारणा घडवून आणणारी घटना होती. त्यातच एक इसवी सन १९१८ रोजी वटहुकूम काढून तलाठ्यांची नेमणूक करताना अस्पृश्यांना प्रथम पसंती देण्याचेही सांगितले होते. १८ सप्टेंबर १९१८ रोजी शाहूंनी आणखी एक कणखर उपाययोजना आखली. त्यांनी महारांच्या वतनी जमिनी त्यांच्याच नावावर करून देऊन गुलामगिरी नष्ट करण्याचा प्रयत्न केला व सामाजिक स्तरावर गुन्हेगार गणलेल्या अस्पृश्य समाजासाठी सुधारण्याचे दार खुले केले व सामाजिक क्रांती घडून आणली.आधुनिक कालखंडात सुद्धा असे निर्णय होणे इतके सोपे नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या

राज्यघटनेच्या माध्यमातून ते आज जनमानसात समानता प्रस्थापित करण्याचे व स्वातंत्र्य देण्याचे कार्य खऱ्या अर्थाने आपल्या संविधानाच्या माध्यमातून करताना दिसतात.

५) इतर सामाजिक सुधारणा :

छत्रपती शाहू महाराजांनी अनेक सामाजिक सुधारणा केलेले होत्या. इसवी सन १९२० रोजी करवीर गॅझेट मध्ये वेठबिगारी बंद चा हुकूम[८] १९२० प्रसिद्ध केला व अस्पृश्यांकडून वेठबिगारी घ्यावयाची नाही, असा हुकूमच काढला. त्याचबरोबर महिलांच्या बाबतीत आजच्या समाजाला सुद्धा दिशादर्शक ठरेल असे निर्णय घेतले. उदाहरणार्थ, विधवा पुनर्विवाह१९१७, आंतरजातीय विवाह१९१७,[९] स्त्रियांच्या छळ प्रतिबंध कायदाही संमत केला होता. त्याचबरोबर घटस्फोटाचा कायदा संमत केला, जो आजही आपल्या संविधानात समाविष्ट केलेला आहे व सामाजिक समतोल ठेवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य छत्रपती शाहूंनी अनेक सामाजिक सुधारणा करून केले होते.सन २६ डिसेंबर १९१८ रोजी सर्वांसाठी एकच शाळा ठेवण्याचा हुकूम जारी केला.[१०]

निष्कर्ष :

आज विशेषतः स्वातंत्र्यानंतर भारत हा एक लोकशाही शासनपद्धती असलेला देश आहे, परंतु इंग्रजांच्या सत्तेत व त्यापूर्वीही भारताच्या जनमानसाच्या मनावर धर्माचा, रूढी परंपरेचा फार मोठा पगडा होता व या रूढी परंपरेमुळे विशेषतः समाजाचा मागासवर्गीय घटक अन्यायग्रस्त होत असे, परंतु महात्मा फुले राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारख्या सुधारमतवादी नेत्यांमुळेच समाज हळूहळू नैसर्गिक व न्याय तत्त्वाच्या वाटेवर चालू लागला. राजर्षी शाहू महाराज सन १९११ रोजी कोल्हपूरातील नर्सरी बागेत शिवरायांचे मंदिर बांधुन शिवजयंती साजरी करु लागले.[११] राजर्षी शाहू महाराजांच्या सामाजिक सुधारणामुळे फक्त कोल्हापूरच नाही तर समस्त भारतातील अनेक संस्थानात महाराजांच्या उपयोजनाची चर्चा रंगू लागली. अनेक संस्थानांनी छत्रपती शाहू महाराजांसारखेच उदारमतवादी धोरण स्वीकारून समाजात समानता निर्माण करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले छत्रपती शाहूंनी घेतलेल्या कार्याची प्रतिमा आजही आधुनिक समाजात आपणास पहावयास मिळते. समाजाच्या विकासासाठी महाराजांचे निर्णय व विचार आजही प्रेरणास्रोत ठरत आहेत.विशेषतः महाराष्ट्राच्या मातीत व संस्कृतीत महाराजांना मानाचे पान आहे.आजही महाराष्ट्राच्या व देशाच्या कानाकोपऱ्यात शाहू-फुले- आंबेडकरांचा महाराष्ट्र, अशी महाराष्ट्राची ओळख निर्माण झालेली आहे याच्या सर्वस्वी श्रेयाचे बीज बऱ्याच अंशी छत्रपती शाहू महाराजांच्या सामाजिक सुधारणेमध्ये रोवले गेले आहे व समाज सुधारणेला मोठा हातभार लागलेला आहे.

संदर्भ :

१. कीर धनंजय, राजर्षी शाहू छत्रपती: एक समाज क्रांतिकारक राजा,पॉप्युलर प्रकाशन,मुंबई,तिसरी आवृत्ती २०११, पृष्ठ क्रमांक १३.
२. कीर धनंजय, तत्रैव, पृष्ठ क्रमांक ३९.
३. कीर धनंजय, तत्रैव, पृष्ठ क्रमांक ५७८.
४. कीर धनंजय, तत्रैव, पृष्ठ क्रमांक ८७-८८.
५. भोसले एस.एस., क्रांतिसूक्ते: राजर्षी छत्रपती शाहू, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कती मंडळ,मुंबई.तिसरी आवृत्ती जुलै,२००६,पृष्ठ क्रमांक,४२.
६. कीर धनंजय, तत्रैव, पृष्ठ क्रमांक १३०.
७. कीर धनंजय, तत्रैव, पृष्ठ क्रमांक३७३.
८. पवार जयसिंगराव, राजर्षी शाहू छत्रपती: लेखसंग्रह, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, प्रथम आवृत्ती, मार्च २०१९, खंड चौथा व पाचवा, पृष्ठ क्रमांक.१४७४.
९. पवार जयसिंगराव, राजर्षी शाहू पंचखंडात्मक स्मारक ग्रंथ, खंड: एक, दोन आणि तीन. महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, प्रथम,२०१९, पृष्ठ क्रमांक.११२-११३.
१०. पवार जयसिंगराव, राजर्षी शाहू छत्रपती: लेखसंग्रह, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, प्रथम आवृत्ती, मार्च २०१९, खंड चौथा व पाचवा, १७८४.
११. सावंत इंद्रजित: शिवभक्त राजर्षी शाहू महाराज,द्वितीय आवृत्ती,२००७ कोल्हापूर, पृष्ठ क्रमांक ४-५.

ISSN No. 2394-5990

आधुनिक शिक्षणाचे अग्रदूत :राजश्री छत्रपती शाहू महाराज

डॉ देविदास ग्यानोजी गाडेकर
सहायक प्राध्यापक
इतिहास विभाग, वसंतराव नाईक शासकीय
कला व समाज विज्ञान संस्था,
नेहरू मार्ग, संविधान चौक, नागपूर. ४४०००१

कळीचे शब्द : छत्रपती शाहू महाराज, कौशल्य व रोजगाराभिमुख शिक्षण, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, बहुजन.

उद्देश :

छत्रपती शाहू महाराजांचे शैक्षणिक धोरण राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या संदर्भात समजावून घेऊन त्याची प्रस्तुता अधोरेखित करणे,जनताभिमुख शिक्षणाचा श्री गणेशा शाहू महाराजांनी स्वातंत्र्यपूर्व काळात आपल्या संस्थांनात केला. सामाजिक आर्थिक विकासाची पायाभरणी आपल्या शैक्षणिक धोरणातून शाहू महाराजांनी सुमारे १३० वर्षांपूर्वी केली म्हणूनच ते भारतातील शिक्षणाचेअग्रदूत ठरतात.

अलीकडेच केंद्र शासनाने नवीन शैक्षणिक धोरण घोषित केले आहे. या धोरणात कौशल्याधिष्ठित, रोजगाराभिमुख शिक्षणाचा पुरस्कार केल्याचा दिसून येते. सोबतच नावीन्यपूर्ण आणि पथदर्शक योजनांचा अंतर्भाव या धोरणात करण्यात आलेला आहे. सुमारे शंभर वर्षांपूर्वी छत्रपती शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात आधुनिक भारतीय शिक्षणाचा पाया घातला होता. शाहू महाराजांनी आजच्या नवीन शैक्षणिक धोरणातील अनेक बाबींची अंमलबजावणी आपल्या संस्थानात केलेली होती. प्रस्तुत शोधनिबंधात छत्रपती शाहू महाराजांच्या नावीन्यपूर्ण; पथदर्शक कौशल्याधिष्ठित, रोजगारभिमुख शैक्षणिक उपक्रमावर प्रकाश टाकण्यात आला आहे.

प्राथमिक ,माध्यमिक व उच्च शिक्षण विषयक कार्य :

२००२ वर्षात संविधान दुरुस्ती करून प्राथमिक शिक्षण संस्थानात नि:शुल्क व अनिवार्य केले गेले. शाहू महाराजांनी १८१८ सालीच आपल्या संस्थानात ही शिक्षणाची व्यवस्था लागू करून समाजाला शिक्षित करण्याचे कार्य केले होते. १८१८ च्या सुरुवातीस प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले. एक आदेश काढून याद्वारे इलाख्यातील सर्व प्राथमिक शाळा मधील फिमाफ करणारे व योग्य वयाची मुले शाळेत पाठवण्याची मायबापावर सक्ती करणारे आदेश दरबारातर्फे काढण्यात आले. दरवर्षी एक लाख रुपये प्राथमिक शिक्षणावर खर्च केला जाईल. असेही जाहीर केले तेवढा खर्च मुंबई इलाख्यातही होत नव्हता.[१] शिक्षणास योग्य मुलांची व त्यांच्या बापांची यादी तयार करावी त्या मुलाने तीन दिवसाच्या आत प्रवेश घ्यावा जर का अशी मुले आली नाहीत तर, त्या मुलांची नावे व त्यांच्या बापांची नावे हेडमास्तराने मामलेदारांना कळवावे व त्यांच्या नावाने समन्स काढावा. संयुक्तिक उत्तर न दिल्यास प्रत्येक मुलास एक रुपया दंड लावावा अशा सूचना देणारा आदेश कोल्हापूर गॅझेटमध्ये प्रकाशित झाला.[२] छत्रपती शाहू महाराजांनी एका शिक्षण संचालकाची व त्याच्या दोन सहायकांची नेमणूक केली. त्यांच्या कार्यालयास प्रशस्त जागा दिली. शाळा भरण्यासाठी धर्मशाळा व चावडींचा वापर करावा आवश्यक असेल अशी नवी इमारत बांधावी किंवा जुन्या इमारतीची डागडुजी करावी यासाठी महसुलाचा ६% खर्च दरबारा कडून केला जावा. शिवाय प्रत्येक घरावर एक टक्का जादा फाळा प्राथमिक शिक्षणासाठी बसवून तो खजिन्यात वेगळा ठेवावा. दुमालदार व संरजामदार यांच्यावर शेकडा १० किंवा १५ शिक्षणपट्टी आकारावी. देवळाच्या उत्पन्नातून शाळेचा ८० टक्के खर्च चालवावा. डॉक्टर,वकील ,अमलदार ,सावकार वगैरेवर विशिष्ट दराने शिक्षण कर बसवावा.[३] आशा सूचना पाहिल्यावर शाहू महाराजांचा एकूणच दृष्टिकोन पुरोगामी असल्याची साक्ष मिळते.कोल्हापूर संस्थानात इंग्रजी पूर्व माध्यमिक शाळा स्थापन करण्यात आली होती. ती कोल्हापूर हायस्कूल म्हणून ओळखली जात असे, पुढे ती राजाराम हायस्कूल नावाने ओळखली जाऊ लागली. मुलांच्या आर्थिक अडचणी समजून घेऊन महाराजांनी मोफत शिक्षण केले होते.[४] महाराजांनी बहुजन मुलांना उच्च शिक्षणाची संधी मिळून दिली.

शेतकी, तांत्रिक, औद्योगिक शिक्षण :

भारतीय अर्थव्यवस्थेतील शेती व शेतकऱ्यांचे महत्त्व ओळखले होते व म्हणूनच कृषी महाविद्यालयाची कल्पना त्यांना सुचली याचा उद्देश एका बाजूला देशामध्ये हरितक्रांती करून शेतकऱ्यांना सुखी करण्याचा प्रयत्न होता तर दुसऱ्या बाजूला जनतेला अन्नधान्याची कमतरता कमी होऊ नये व ते

माफक दरात उपलब्ध व्हावे असा त्यांचा उद्देश होता. या कृषी महाविद्यालयाच्या शैक्षणिक धोरणातून शेतकऱ्यांच्या मुलांना प्रशिक्षित करून आधुनिक शेतीचे प्रशिक्षण देऊन त्यांच्या आर्थिक उन्नतीचा मार्ग खुला केला. यातून आत्मनिर्भर भारताचे स्वप्न त्यांना साकारावयाचे होते. २०२२ च्या शैक्षणिक धोरणाचा उद्देश कौशल्यावर आधारित शिक्षण व त्यातून रोजगार किंवा स्वयंरोजगार निर्माण करण्याचा छत्रपती शाहू महाराजांचा शिक्षणाबाबतचा दृष्टेपणा यातून अधोरेखित होतो.

कोल्हापूर संस्थानाच्या विकासाकरिता तिन्ही क्षेत्रामध्ये त्यांनी सुधारणा घडवून आणल्या. शेतकी शिक्षणासाठी त्यांनी किंग एडवर्ड एग्रीकल्चर इन्स्टिट्यूट १९१२ मध्ये स्थापन केली होती. सातव्या एडवर्ड राज्याच्या निधनानंतर उभ्या केलेल्या फंडातून या संस्थेची निर्मिती केली होती. शेतीचे सुधारित ज्ञान लोकांना देणे व ते कृतीतून उतरविणे, शेतीच्या आधुनिक पद्धती नवी उपकरणे, बी बियाणे, रासायनिक खते, सुधारित ऊस भट्ट्या इ माहिती कास्तकारांना दिली जात होती. या संस्थेला महाराष्ट्रातल्या शेती शिक्षणाची गंगोत्री मानत असत. अभियांत्रिकी धातू काम वगैरे विषयांचे ज्ञान देण्यासाठी महाराजांच्या जनक पित्याच्या स्मरणार्थ १८८७ पासून जयसिंगराव घाडगे तांत्रिक महाविद्यालय अस्तित्वात होते. संस्थेचा संपूर्ण खर्च दरबारा कडून केला जात होता. १९२० मध्ये महाराजांनी राजाराम इंडस्ट्रियल स्कूल स्थापन केले. व्यवसायभिमुख शिक्षण देणाऱ्या संस्था स्थापन केल्या होत्या. त्यामध्ये टेक्निकल स्कूल ,राधाकृष्ण मंदिरात छत्रपती राजाराम औद्योगिक मंदिर पद्याळाची सुरुवात. कलागृह, औद्योगिक स्कूलची, स्थापना दिल्लीदरबार मेमोरियल पाटील स्कूलची स्थापना करणारा जाहीरनामा काढला. त्यामध्ये जिल्हा पोलीस फौजदारी कायदे गावाचा जमा खर्च आणि मुलकी कामे रिपोर्ट वगैरे लिहिण्याइतपत भाषा ज्ञान आणि व्याकरण कोल्हापूरचा इतिहास, भूगोल, राज्यव्यवस्थेची माहिती असे विषय शिकविले जात असत आणि शेवटी परीक्षा घेतली जात असे कुलकर्णी परीक्षा पण घेतली जात असे.[५] शाहू महाराजांनी गावोगावी तालीम, आखाडे स्थापन केली स्पर्धे शिवाय प्रगती नाही हे त्यांनी जाणले होते.

वसतीग्रह चळवळ :

समाजातील गोरगरीब कुटुंबातील मुलांनाही शहरात राहता यावे, व म्हणून सुरुवातीस काही मुलांची राहण्याची व्यवस्था राजवाड्यावर केली. परंतु ती काही कारणास्तव बंद केली. ब्राह्मण खानावळीत ब्राह्मनेत्तर मुलांना अपमान कारक वागणूक मिळत होती. हे शाहू महाराजांच्या निदर्शनास आल्यामुळे त्यांनी भास्करराव जाधव, दाजी साहेब विचारे आणि शिवाजीराव सावंत या तीन पदवीधरांना वस्तीगृह काढण्यासाठी विनंती केली. १८ एप्रिल १९०१ मध्ये हे वसतीग्रह स्थापन झाले हे वसतीगृह सर्वांसाठी खुले होते, एवढ्यावर शाहू महाराज थांबले नाहीत तर वेगवेगळ्या जातींच्या विद्यार्थ्यांसाठी त्यांनी जवळजवळ २३ वस्तीग्रह स्थापन केली होती त्यामध्ये द विक्टोरिया मराठा बोर्डिंग १९०१, द जैन बोर्डींग १९०१, मुस्लिम बोर्डिंग १९०६, द लिंगायत बोर्डिंग १९०७, मिस क्लार्क होस्टेल १९०८, द नामदेव बोर्डिंग १९१२, द पांचाळ बोर्डिंग १९१२ द सरस्वत बोर्डिंग १९१२, द इंडियन ख्रिस्तियन हॉस्टेल १९१५, दिव्य ज्ञानबोर्डिंग १९१८, द शाहू वैदिक बोर्डिंग १९२०, द सोमवंशी आर्य क्षत्रिय बोर्डिंग १९२०, द प्रिन्सेस शिवाजी मराठा फ्री बोर्डिंग १९२०, सुतार बोर्डिंग १९२१, द नाभिक बोर्डिंग १९२१, द देवांग बोर्डिंग १९२१, द राजपूतवाडी बोर्डिंग १९२१, द रुकंडी बोर्डिंग असे वसतीग्रह १८९६ ते १९२१ पर्यंत स्थापन केली होती. जाती निर्मूलनाच्या दृष्टीने हे वसतिगृहे सुरू करणे अत्यंत गरजेचे होते.[६]

स्त्री शिक्षण विषयक कार्य :

भारताच्या स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण होऊनही आजही स्त्रियांच्या साक्षरतेचा दर पुरुषापेक्षा कमी आहे भारतीय समाजातील पुरुषप्रधान मानसिकता ओळखून महाराजांनी स्त्रियांचे शैक्षणिक सक्षमीकरण व्हावे म्हणून स्त्री शिक्षणाला चालना दिली. राजसत्ता हाती घेतल्यानंतर सर्वप्रथम भुदरगड या मागास भागात मुलींची शाळा काढली होती. मुलींनी शाळेत यावे मुलांच्या बरोबरीने शिकावे अशी शाहू महाराजांची इच्छा होती त्यामुळेच त्यांनी राजाराम महाविद्यालयामध्ये शिक्षण घेणाऱ्या मुलींना फी माफी दिली होती. विशेषतः मागासवर्गीय मुलींनी शिकावे म्हणून त्यांनी चांभार व ढोर मुलींसाठी वेगळी शाळा काढली होती. एवढेच नव्हे तर अस्पृश्य मुलींना शाळेत आणण्यासाठी एका स्त्रीला नोकरीवर ठेवले होते.[७] हुशार व होतकरू मुलींसाठी शिष्यवर्ती ठेवल्या होत्या स्वतः महाराजांच्या सुनबाई इंदुमती राणीसाहेब यांना लग्नानंतर वर्षभरातच वैधव्य आले तेव्हा शाहूंनी त्यांच्या शिक्षणाची सोय केली आणि त्या स्वबळावर त्या जिद्दीने व धिटाईने कलासंपन्न व प्रतिष्ठित जीवन व्यतीत करू लागल्या.[८] एकूणच शाहू महाराजांच्या प्रयत्नामुळे कोल्हापूर संस्थानातील स्त्रियांच्या साक्षरतेचा दर ०.१० टक्क्यावरून ०.३५% इतका झाला होता.[९]

निष्कर्ष :

समाजातील मागासलेपणा दूर करून विषमतेने व्यापलेले सामाजिक जीवन समतेच्या पातळीवर आणण्याचे एकमेव साधन म्हणजे शिक्षण होय. महाराजांनी औद्योगिक तंत्रज्ञान विषयक

ISSN No. 2394-5990

आणि उदारमतवादी शिक्षणास प्राधान्य दिले आजही अशा व्यवसायभिमुख शिक्षणाचा फायदा आज होताना दिसून येत आहे. शाहू महाराजांच्या आर्थिक प्रयत्नामुळे स्त्रियांच्या साक्षरतेचा दर वाढला होता. एवढेच नाही तर समाजातील विषमता दूर करण्यासाठी बहुआयामी असे अनेक जातींसाठी वसतीगृह स्थापन केले. शाहू महाराजांना शिक्षणातून भारतीयांचा सर्वांगीण विकास करायचा होता शिक्षण म्हणजे केवळ नोकरशाही नव्हे असे त्यांचे मत होते शिक्षणातून बहुजनांचे सक्षमीकरण व्हावे हा शाहू महाराजांच्या एकूणच शिक्षण चळवळीचा गाभा आहे असे म्हणता येईल. नवीन शैक्षणिक धोरण राबवीत असताना शाहू महाराजांचा संदेश लक्षात घेतल्यास निश्चितच त्याची चांगली फळे भविष्यात मिळू शकतील. या विवेचनातून छत्रपती शाहू महाराज हे भारतातील आधुनिक शिक्षणाचे अग्रदूत ठरतात.

संदर्भ :

१) घोरमाडे के .यु. घोरमाडे कला (२००६)शैक्षणिक विचारवंत भारतीय व पाश्चात्त्य) विद्या प्रकाशन , नागपूर पृ. क्र.२५ २६

२) भोसले .एस. एस (सपा) राजश्री शाहू काळ ,विचार आणि कार्य कोल्हापूर जिल्हा परिषद ,१९७६ पृ. क्र. १२२

३) Sangvi Vilas rajashree shahu Chhatrapati papers volume 8 1918 to 1990 ad, Kolhapur shahu research centre, Shivaji University, 2001 p. n. 46, 61, 63, 77

४) घोरमाडे के. यु .घोरमाडे कला शैक्षणिक विचारवंत भारतीय व पाश्चात्त्य, विद्या प्रकाशन,नागपूर पृ. क्र. २७

५) भा,ल,भोळे छत्रपती शाहू महाराज ,महाराष्ट्र –चरित्र ग्रंथमाला संच २०१० पृ. क्र. ८१

६) आर. के .कानबारकर, राजश्री शाहू महाराज, तिसरी आवृत्ती–१९२२ महाराष्ट्र शासन ,पृ क्र. ५३ ५४

७) पवार जयसिंगराव (सपा) (२००७)राजश्री शाहू महाराज स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी कोल्हापूर पृ.क्र. १२२

८) ढेरे अरुणा– राजश्री शाहू छत्रपती आणि स्त्री शिक्षण राशास्मग्रं २००१, पृ. क्र. ६१९

९) ठोसर संगीता, कुलकर्णी दिपाली (२०१२)राजश्री शाहू आणि स्त्री प्रश्न:अब्राह्मणी पर्यायाच्या दिशेने, करपे आर. एन. (संपा) राजश्री शाहू महाराज आणि वर्तमानातील संदर्भ ,चिन्मय प्रकाशन औरंगाबाद पृ. क्र. १५५

■■■

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे राजकीय योगदान

प्रा. किर्ती विजय करंजावणे
राज्यशास्त्र विभाग
बाबुरावजी घोलप महाविद्यालय,सांगवी, पुणे २७
मो नं : ९७६७८४१४५२
मेल : karanjawanekirti26@gmail.com

जगातील प्रत्येक महापुरुषाबाबत असे विधान केले जाते की ते ज्या काळात जन्माला आले, वाढले त्या काळाचे ते अपत्य असतात. आपल्या अवतीभवती असलेल्या बऱ्या वाईट परिस्थितीवर मात करून ते समाजाला किती व कशा प्रकारे पुढे घेऊन जातात; त्याचप्रमाणे समाजाला कशी दिशा दाखवितात यावरून त्यांच्या मोठेपणाचे मूल्यमापन केले जाते. शाहू महाराजही याला अपवाद नव्हते. शाहू महाराजांनी सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक, आणि सांस्कृतिक क्षेत्रामध्ये भरीव कामगिरी केली असून एक संस्थानिक राजा काय करू शकतो याचे उदाहरण संपूर्ण भारतासाठी नव्हे तर जगासाठी घालून दिले आहे. सदर संशोधन लेखाच्या माध्यमातून राजर्षी शाहू महाराजांच्या राजकीय विचारांचा व त्यांच्या राजकीय योगदानाचा आढावा घेण्यात येणार आहे. शाहू महाराज हे केवळ सामाजिक सुधारक नसून ते राजकीय सुधारक देखील होते. त्याचबरोबर शाहू महाराज दूरदर्शी राजनीतिविशारद होते. हंटरकार खंडेराव गोपाळ बागल (शाहूकालीन थोर सत्यशोधक नेते) यांनी असे मत व्यक्त केले आहे की; आज जी लोकशाही जगापुढे अस्तित्वात आहे त्या लोकशाहीचे शाहू महाराज जनक होते. त्याचबरोबर हिंदी संस्थानिकांमध्ये खऱ्या लोकशाहीचा पाया राजश्री शाहू महाराजांनी घातला आहे. विषमतेवर उभ्या असलेल्या समाजात समता प्रस्थापित करणे फार जबाबदारीचे काम आहे याची जाणीव शाहू महाराजांना होती म्हणूनच त्यांनी सामाजिक व राजकीय समतेच्या विचारांची कार्ये प्रत्यक्षात कृतीमध्ये आणली.

भारतातील जातीव्यवस्थेमुळे सुरुवातीच्या काळात शिक्षण व्यवस्थेचा, विकासाचा फायदा अर्थातच उच्च जातीय ब्राम्हण वर्गाला मिळाला त्यांच्यामध्ये राजकीय जाणीव निर्माण झाली व त्यातूनच त्यांनी स्वराज्याची चळवळ सुरू केली परंतु देशातील मागास जाती वर्गांमध्ये मात्र ही राजकीय जागृती उशिरा निर्माण झाली. कारण शिक्षण व्यवस्था त्यांच्यापर्यंत पोहोचली नव्हती, वर्णव्यवस्थेवर आधारित जातीव्यवस्था उभी होती; त्यात मागास जातींच्या दर्जा, स्थान एकदमच शेवटचे होते त्यामुळे विकास म्हणजे काय याचा मागमुसही या वर्गाला नव्हता आणि म्हणूनच शाहू महाराजांनी मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा पुरस्कार त्यांच्या संस्थानांमध्ये केला कारण त्यांना नेहमी जाणवत असे की, या सर्व बहुजन समाजाच्या दुरावस्थेला मागासलेपणाला कारणीभूत असलेला घटक म्हणजे शिक्षणाचा अभाव. बहुजन समाजाचे अज्ञान दूर होण्यासाठी त्यांनी शाळा उघडल्या आणि प्राथमिक शिक्षणावर भर दिला शाहूंना असे वाटत होते की, शिक्षणातून या समाजाचा विकास होईल. नवा सुशिक्षित तरुण वर्ग तयार होऊन तो सामाजिक व राजकीय जीवनात मोठ्या हिरारीने भाग घेऊन एकाच वर्गाचे संपूर्ण समाज व्यवस्थेवर झालेले वर्चस्व, मक्तेदारी नष्ट करेल.

शाहू महाराजांच्या आयुष्यात वेदोक्त प्रकरणाचे वादळ आल्यानंतर त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य समाजातील दिनदलित, शोषित, आणि मागास जातींचा उद्धार करण्यासाठी घालविले. त्या काळातील समाज सुधारणा चळवळी आणि मागास जातींच्या चळवळी मुख्यतः खालील पाच तत्त्वांवर उभ्या होत्या शाहू महाराजांनी आपल्या आचार, विचारांच्या जोरावर ही तत्वे बळकट करण्याचा प्रयत्न केला.

१. सर्वांगीण धर्म सुधारणा घडवून आणणे. धर्माला सार्वजनिक नीतीचे अधिष्ठान देऊन पुरोहितशाहीचे वर्चस्व नष्ट करणे.
२. शिक्षणाचा प्रसार करणे आणि मोफत आणि सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा आग्रह धरणे.
३. मागास जातींच्या जातनिहाय चळवळी बांधणे, क्षत्रियत्वाची मागणी करीत त्यांच्यामध्ये लोकशाही अधिकाराच्या आकांक्षा निर्माण करणे, त्यांच्यातील अस्मिता जागृत करणे.
४. स्वतंत्र मतदार संघ, राखीव मतदार संघ व राखीव जागा यांच्या सहाय्याने सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील उच्च जातींची मक्तेदारी कमी करणे.
५. मागास जातींचे आणि ब्राम्हणेत्तरांचे पक्ष स्थापून समाज सुधारणा आणि शेती सुधारणा यासाठी आग्रह धरणे. या राजकारणात इंग्रज सरकारची मदत घेणे.[१]

ISSN No. 2394-5990

शाहू महाराजांना नेहमीच वाटत असे की, राजकीय हक्क किंवा राजकीय स्वातंत्र्य देऊन काही उपयोग होणार नाही. त्या हक्कांची, स्वातंत्र्याची जाणीव होण्यासाठी या बहुजन समाजाला शिक्षणाची गरज आहे. हे राजकीय हक्क, स्वातंत्र्य कशाप्रकारे उपभोगायचे आहेत, वापरायचे आहेत हे समजायला पाहिजे. महाराजांनी मागास जातींना सांगितले होते की, स्वराज्य मागणीच्या वेळी मागास जातींनी सत्तेमध्ये आपला योग्य वाटा मिळविण्यासाठी राखीव जागांची मागणी केली पाहिजे. शाहूंनी आपल्या संस्थानात मागास जातींसाठी शेकडा ५०% जागा राखीव ठेवल्या होत्या. त्याचबरोबर शाहूंचे असे स्पष्ट मत होते की लोकशाहीचे तत्व व स्वराज्याची मागणी तत्वतः योग्य असली तरी सत्तेचे योग्य वाटप करण्याच्या नावाखाली ते एका पुढारलेल्या जातीच्या हाती जाऊ नये. भारतीय जातीव्यवस्थेबाबत शाहू महाराजांचे असे म्हणणे होते की, भारतातील जातीसंस्था पूर्णतः नष्ट केल्याशिवाय भारतात खरे स्वराज्य नांदू शकणार नाही म्हणूनच ते म्हणतात सत्ता केवळ अल्पसंख्यांक उच्चवर्गीयांच्या हातात जाण्यात स्वराज्याचे पर्यवसान होऊ नये म्हणून निदान दहा वर्षे तरी आम्हाला जातवार प्रतिनिधी निवडून देण्याचा हक्क असला पाहिजे. यामुळे आमचे हक्क काय आहेत याचे आम्हाला शिक्षण मिळेल. जातवार प्रतिनिधी देण्याचा हक्क नसल्यामुळे आमच्या म्युनिसीपालिटीचा शोचनीय अनुभव आमच्या पुढे आहे.[२]

शाहू महाराजांनी असेही स्पष्टपणे सांगितले होते की ब्राम्हण ऑलिगॉर्कीच्या हाती जर स्वराज्याची सत्ता जाऊ द्यायची नसेल तर बहुजन समाजाने आपल्या अधिकाराबाबत जागृत झाले पाहिजे. एवढ्यावरच शाहू महाराज थांबत नाही तर याच्याही पुढे जाऊन जातवार प्रतिनिधित्व कशाला म्हणतात हे सांगायचे विसरत नाही ते म्हणतात सर्व जातीतील लोक पुढे येऊन त्यांना सामाजिक, औद्योगिक, शिक्षण विषयक सरकारी नोकरी वगैरे बाबतीत आपली जबाबदारी पुरी पाडण्याचे सामर्थ्य येणे म्हणजे जातवार प्रतिनिधित्व. जातवार प्रतिनिधित्व मागत असताना त्याबाबतची आपली भूमिका देखील अतिशय स्पष्टपणे व्यक्त करताना दिसतात शाहू महाराज आपली भूमिका स्पष्ट करताना म्हणतात की जातवार प्रतिनिधित्वामध्ये कोणाचाही द्वेष अपेक्षित नसून जातवार प्रतिनिधित्वाद्वारे मागास जाती स्वतःच्या बळावर पुढे येण्याचा प्रयत्न करीत आहेत; त्यासाठी त्यांना उत्तेजन द्या. प्रतिबंध करू नका. कारण त्यांची धडपड ही त्यांच्या अंगी शक्ती येण्यासाठी आहे. शाहू महाराजांनी जातवार प्रतिनिधित्वाप्रमाणेच मराठ्यांसाठी स्वतंत्र मतदारसंघाची मागणी केली होती. एवढेच नव्हे तर लॉर्ड विलिंग्डन यांना पत्र लिहून त्यांनी भारताच्या नव्या राज्यघटनेमध्ये मागासवर्गापासून खालपर्यंत स्वतंत्र मतदारसंघ दिले पाहिजेत असे देखील सुचविले होते. स्वतंत्र मतदार संघ निर्माण केल्यामुळे लोकशाहीचा पाया व्यापक होईल असे शाहू महाराजांचे स्पष्ट मत होते.

ब्राम्हणेत्तर जाती असो किंवा दलित जाती त्यांना आपल्या अधिकारांची जाणीव व्हावी तसेच मानवी समता, विकासाबाबतची, उन्नतीबाबतची आकांक्षा इत्यादी. मानवाचे जन्मसिद्ध हक्क असतात ते हक्क मिळविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे असे शाहूंना वाटे. शाहूंनी पुढे असाही विचार मांडलेला पहावयास मिळतो की, मागास जातींच्या चळवळींनी शिक्षणाच्या माध्यमातून नव्या बदलांना तोंड द्यावे आणि त्यासाठी त्यांनी काँग्रेस पेक्षा वेगळा आपला स्वतंत्र पक्ष स्थापन करून आपल्या हक्कांसाठी लढावे. यातूनच पुढे मराठा जातीसाठी मुंबई विधिमंडळात सात जागा राखून ठेवण्यात आल्या होत्या. शाहू महाराजांची स्वतः राजकारणात सहभागी होण्याची इच्छा होती त्यासाठी त्यांनी सरकारकडे निवडणूक लढविण्याची परवानगी मागितली होती. परंतु सरकारने अर्थातच ही परवानगी नाकारली. मागास जातींना त्यांचे अधिकार सहजासहजी मिळणार नाही आणि नव्या मर्यादित लोकसत्तेमध्ये ब्राह्मणांचा फायदा होणार या वास्तवाची शाहू महाराजांना जाणीव होती. याचा विचार करूनच शाहू महाराजांनी आपली सामाजिक व राजकीय व्यूहनीती तयार केली होती. या देशातील मागास जातींना त्यांच्या सामाजिक आणि राजकीय अधिकाराबाबत जागृत करून त्यांना स्वावलंबनाचे महत्त्व पटवून लोकसत्ताक समाजाची स्थापना करणे हे महाराजांच्या राजकीय विवानेतेचे मुख्य सूत्र होते३ हे साध्य करण्यासाठी शाहू महाराजांनी अथक प्रयत्न केले. शाहू महाराजांचा व्यूहनीतीमध्ये पुढील गोष्टींचा समावेश होता.

१. मागास जातींमध्ये जनजागृती करून त्यांना त्यांच्या हक्कांबाबत शिक्षण देणे आणि त्यांच्या शिक्षणाची व विकासाची संधी उपलब्ध करून देणे.

२. ब्राम्हणांच्या खोट्या धर्माला आणि पुरोहितशाहीला आव्हान देऊन सर्व धार्मिक व्यवहार वेदोक्त प्रमाणे आपण स्वतः करणे.

३. ब्राम्हणेत्तरांचे राजकीय संघटन करून ब्राम्हणेत्तरांना सत्तेत योग्य वाटा देणे इत्यादी.

आपल्या सामाजिक व राजकीय व्यूहनीतीच्या माध्यमातून शाहूंनी मागास जातींमध्ये सामाजिक राजकीय हक्कांबाबत जागृती निर्माण केली.

शाहू महाराजांनी वेळप्रसंगी राजकीय हक्क प्राप्त करून घेण्यासाठी इंग्रज सरकारला पाठिंबा दिला. शाहू महाराजांच्या

राजकारणाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांची कृतीशीलता. त्यांनी इतरांना जे सांगितले ते सर्वप्रथम आपल्या राज्यात अमलात आणले. राखीव जागा असतील, प्राथमिक शिक्षणाची सक्ती असेल, सत्तेचे योग्य व समान वाटप असेल या सर्वच धोरणांची अंमलबजावणी सर्वप्रथम शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात केली.

संदर्भ सूची :

१. पवार जयसिंगराव डॉ.- राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ. पृ. ४८६, द्वितीयावृत्ती २६ जून २००७
२. पवार जयसिंगराव डॉ.- राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ. पृ. ४८९-४९०, द्वितीयावृत्ती २६ जून २००७
३. पवार जयसिंगराव डॉ.- राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ. पृ. ४९१, द्वितीयावृत्ती २६ जून २००७
४. चांदणे डी व्ही प्रा. डॉ.- जयसिंगपूर वसाहतीचा इतिहास- यशया प्रकाशन, प्रथमावृत्ती मार्च २०२२
५. साळुंखे नानासाहेब प्रा.- शाहूंच्या आठवणी- वृषाली प्रकाशन कोल्हापूर, २९ ऑक्टोबर २०१६
६. पवार वसुधा- राजर्षी शाहू छत्रपती एक अभ्यास- मेहता पब्लिशिंग हाऊस तृतीयावृत्ती मार्च २०१८
७. कांबळे प्रवीण प्रकाश- आबासाहेब राजर्षी शाहूंची सत्वपरीक्षा- मैत्री प्रकाशन प्रथमावृत्ती, मार्च २०२२
८. फडके य. दि.- विसाव्या शतकातील महाराष्ट्र खंड तिसरा श्री विद्या प्रकाशन, प्रथमावृत्ती, २ ऑक्टोबर १९९१
९. गरुड अण्णासाहेब प्रा. सावंत बी. बी प्रा.- महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास- कैलास पब्लिकेशन्स औरंगपुरा, औरंगाबाद १९९५
१०. मोरे दिनेश प्रा.- आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास १८१८-१९६०- कैलास पब्लिकेशन्स औरंगपुरा औरंगाबाद प्रथमावृत्ती डिसेंबर २००६

■■■

ISSN No. 2394-5990

राजश्री शाहू महाराजांचे जलव्यवस्थापन

प्रा.डॉ कदम सतीश रावसाहेब
इतिहास विभाग प्रमुख,
जनविकास महाविद्यालय बनसारोळा,
ता. केज, जि. बीड.- ४३१५१८
Email-id - prakadamsatish@gmail.com
Mob.No—9420783388

प्रस्तावना :

विसाव्या शतकातील भारतातल्या मोठ्या नेत्यांच्या मालिकेत आणि आधुनिक महाराष्ट्राच्या शिल्पकारामध्ये कोल्हापूरचे राजश्री शाहू छत्रपती यांची गणना केली जाते.अवघ्या २८ वर्षाच्या कारकिर्दीत शाहू महाराजांनी कोल्हापूर शहराला कलापूर बनवले. राजश्री शाहू छत्रपतींची इसवी सन १८९४ ते १९२२ पर्यंतची अवघी २८ वर्षाची कारकीर्द केवळ कोल्हापूर संस्थांनच्याच नव्हे तर साऱ्या महाराष्ट्राच्या इतिहासाला कलाटणी देणारी ठरली आहे. कारण छत्रपती शाहू महाराज यांनी ध्येयवादी दृष्टिकोनातून व नियोजनपूर्वक केलेल्या बहुविध व सर्वंकष सुधारणामुळे कोल्हापूर संस्थानातील जनतेच्या जीवनावर दुरगामी स्वरूपाचे परिणाम झाले. आणि त्याचबरोबर महाराष्ट्रातील जनतेमध्ये देखील सामाजिक, राजकीय,आर्थिक व सांस्कृतिक क्रांती घडून येण्यास सुरुवात झाली. कोल्हापूर संस्थानची राज्यसूत्रे बिकट परिस्थितीत वयाच्या केवळ २० व्या वर्षी हाती घेतल्यापासून सामान्य जनतेची सर्वांगीण प्रगती विविध मार्गाने पण शक्यतो लवकर साधावी हे ध्येय नजरेसमोर ठेवून छत्रपती शाहू महाराजांनी निष्ठापूर्वक राज्य कारभार करण्यास प्रारंभ केला आणि त्यासाठी प्रशासन, शिक्षण, कला, क्रीडा, शेती, उद्योगधंदे, आरोग्य आदी क्षेत्रात अमुलाग्र सुधारणा घडवून आणण्यास तातडीने सुरुवात केली आणि विशेष म्हणजे हे सुधारणांचे सत्र त्यांनी शेवटपर्यंत अव्याहतपणे चालू ठेवले. याचाच एक भाग म्हणजे राजश्री शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात राबवलेले जलव्यवस्थापन या भागाच्या अमुलाग्र प्रगतीसाठी अतिशय महत्त्वाचे ठरलेले आहे. तत्कालीन कालखंडामध्ये आपल्या देशात अनेक संस्थानिक होते त्या संस्थानिकांनी जल व्यवस्थापनाकडे कसलेही लक्ष दिलेले दिसत नाही किंवा त्या संदर्भामध्ये पाठपुरावाही केलेला दिसत नाही याला एकमेव अपवाद म्हणजे कोल्हापूर हे संस्थानिक असल्याचे दिसते त्यामुळे राजश्री शाहू महाराजांचे जलव्यवस्थापन विषयक कार्य कोल्हापूर संस्थानच्या विकासासाठी मैलाचा दगड ठरले आहे.

शोधनिबंधाची उद्दिष्टे :

१) राजश्री शाहू महाराज यांनी कोल्हापूर संस्थानांमध्ये केलेल्या जलव्यवस्थापन कार्याचा आढावा घेणे.
२) राजश्री शाहू महाराज यांनी शेती व शेतकरी यांच्या संदर्भात केलेल्या जल व्यवस्थापनाचा अभ्यास करणे.

विषय व्याप्ती :

हा शोध निबंध फक्त राजश्री शाहू महाराजांच्या काळापुरता मर्यादित असून यात त्यांनी कोल्हापूर संस्थानमध्ये राबवलेल्या जल व्यवस्थापन विषयक कार्याचा आढावा घेतला जाणार आहे.

संशोधन पद्धती :

या शोधनिबंधाचा विषय पुनरावलोकन व पुनर्विशलेषणात्मक असल्याने या शोधनिबंध लेखनासाठी ऐतिहासिक संशोधनातील संदर्भ पद्धतीचा वापर करून शोधनिबंधाचे लेखन करण्यात येणार आहे.

गृहीतके :

१) छ. शाहू महाराजांनी शेती व शेतकरी यांच्या संदर्भात अनेक महत्वपूर्ण कामे केली आहेत.
२) छ. शाहू महाराजांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून जल व्यवस्थापनाचे काम केले आहे.
३) छ. शाहू महाराजांनी जल व्यवस्थापनाच्या कामासाठी ब्रिटिश सरकारकडे सातत्याने पाठपुरावा केल्याचे दिसते.

विश्लेषणात्मक बाजू :

भारतीय शेती हा पावसावर चालणारा जुगार आहे हे विधान आजही भारताच्या काही प्रदेशात लागू पडते. शाहू छत्रपतींच्या काळात कोल्हापूर संस्थानातील शेतीची अवस्था यापेक्षा वेगळी नव्हती. आपल्या संस्थानातील भोळाभाबडा बळीराजा आपल्या रक्ताचे पाणी पाणी करून शेती पिकवण्याचा प्रामाणिक प्रयत्न जीवापाड करतो. परंतु निसर्गाच्या या जलसंपत्तीच्या विषम

वाटपामुळे करवीरचा शेतकरी हैराण झाला होता. काही वेळा पुरेसा पाऊस पडूनही शेतकऱ्यांना त्याचा योग्य वापर करता येत नव्हता. पाणी फुकट वाहून जात होते. शेतीसाठी त्याचा साठा होत नव्हता. त्यामुळे गरीब शेतकऱ्याचे राबणे निष्फळच ठरत होते. हे सर्व पाहून शाहू छत्रपती यांनी संस्थानातील शेतीसाठी मोठ्या प्रमाणावर पाणीपुरवठा करण्याच्या योजना हाती घेतल्या होत्या.

पाणीपुरवठा विभागाची स्थापना :

छ.शाहू महाराजांनी शेतीला पाणीपुरवठा करण्यासाठी एक खास विभाग आपल्या प्रशासनात त्यांनी सुरू केला या विभागाचे प्रमुख म्हणून शंकर सिताराम गुप्ते यांची नेमणूक करण्यात आली होती. ३ फेब्रुवारी १९०२ रोजी त्यांनी शेती पाणीपुरवठा प्रकल्प प्रत्यक्ष कार्यवाहीत आणण्यासाठी संस्थानातील तलाव, विहिरी इतर जलाशय यांची सविस्तर माहिती जमा करण्यास ३ फेब्रुवारी १९०२ रोजी पुढील प्रमाणे एक जाहीरनामा काढून सुरुवात केली. 'संस्थानात इरिगेशन होण्यासाठी तलाव कोठे आहेत, त्यास पाण्याचा पुरवठा कुठून होतो, वर्षभर प्रत्येक तिमाही पाणी किती येते, किती पाण्याचा उपयोग करता येईल, ताल बांधून पाणी आल्यास गाळ कोणत्या जातीचा येईल, त्यापासून शेतीस फायदा अगर गैरफायदा होईल वगैरे गोष्टीबद्दल माहिती खुलासेवार घेणे आहे'.[१]

शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा :क

आपल्या संस्थानातील शेतीला कायमचा पाणीपुरवठा व्हावा यासाठी छत्रपती शाहू महाराजांनी १९०६ सालापासून अधिक लक्ष घातलेले आढळते. १९०५-१९०६ या कालावधीत ११७०० इतकी विहिरींची संख्या होती ती १९२०-२१ या वर्षात १२८०० इतकी झाली जुन्या विहिरी दुरुस्त कराव्यात त्यातील गाळाचा उपसा करून त्या पूर्ववत कराव्यात त्याचप्रमाणे नव्या विहिरी खोदल्या जाव्यात यासाठी दरबारा मार्फत तगाईच्या रूपाने शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा करण्यात आला.[२]

तलाव व बंधार्यांची निर्मिती :

छत्रपती शाहू महाराजांनी शेतीला पाणीपुरवठा व्हावा यासाठी आपल्या संस्थानातील वडगाव, शिरोळ, रायबाग, शहापूर, रूकडी इत्यादी ठिकाणी २० हुन अधिक लहान मोठे तलाव बांधले. तर बेडसगाव, कटकुर, अतिग्रे इत्यादी ठिकाणी असणाऱ्या जुन्या तलावांची दुरुस्ती करण्यात आली. तसेच

भोगावती नदीवर बंधारा बांधण्या संदर्भात १९०७ साली निरीक्षण करण्यात आले व १९०८ साली या बंधाऱ्याचे काम पूर्ण करण्यात आले.यास राणी लक्ष्मीबाई तलाव असे नाव देण्यात आले.[३] यातला नंतर दुसरा बंधारा भुदरगड तालुक्यात करळे जवळ दूधगंगेवर बांधण्यात आला.[४] वरील सर्व तलाव बंधारे यांचे काम पूर्ण केल्यामुळे कोल्हापूर जिल्ह्यातील शेतीचा कायापालट होण्यास मदत झाली.

राधानगरी प्रकल्प :

राधानगरी धरणाच्या महत्वकांक्षी प्रकल्पास प्रत्यक्ष बांधकामास सुरुवात नोव्हेंबर १९०९ साली झाली परंतु शाहू छत्रपतींच्या मनी हा प्रकल्प इ.स १९०२ साली केलेल्या परदेश दौऱ्यावरून परत आल्यावर सतत स्थान मांडून बसला होता. त्याचे अनेक पुरावे अस्सल कागदपत्रातून विखुरलेले आढळतात अनेकदा शाहू छत्रपती वेगवेगळ्या इंग्रज अधिकाऱ्यांना शिकारीच्या निमित्ताने दाजीपूरच्या जंगलात घेऊन जात त्या जंगलात शिकारीचा मनमुराद आनंद लुटत असताना त्या अधिकाऱ्यांना आपल्या नियोजित धरणाची जागा दाखवीत त्या धरणाच्या खर्चाचा अंदाज सांगत या सर्व गोष्टी घडवून आणण्या पाठीमागे त्यांचा एकच प्रमुख हेतू असे तो असा की जरूर पडली तरी ब्रिटिश सरकारने या प्रकल्पाला आर्थिक हातभार लावावा. ८ फेब्रुवारी १९०७ रोजी त्यांनी मुंबईचे गव्हर्नर लॉर्ड लॅमिंगटन यांना पत्र लिहून दोन विनंत्या केलेल्या वाचावयास मिळतात त्यापैकी एक विनंती म्हणजे लॉर्ड लॅमिंग्टन यांनी कोल्हापुरात बसविण्यात आलेल्या सम्राज्ञी राणीच्या पुतळ्याचे अनावरण करावे आणि दुसरी तितकीच महत्त्वाची विनंती ते करतात ती म्हणजे शाहू छत्रपतींच्या दाजीपूर जवळ नियोजित धरणासाठी निश्चित केलेली जागा लॉर्ड लॅमिंग्टन यांनी आपल्या नजरे खालून घालावी ही होय.[५] तर १९ फेब्रुवारी १९०७ ला मुंबईचे गव्हर्नर लॉर्ड लॅमिंग्टन यांना पत्र लिहून सांगतात ममाझ्या साधन संपत्तीच्या मानाने खूप मोठा असणारा हा धरणाचा प्रकल्प मी हाती घेतला आहे त्याला प्रमुख कारण म्हणजे माझ्या राज्यातील दुष्काळाची भीती मला कायमची नष्ट करावयाची आहे. हे होय म्हणून मी आपण त्या जागेस भेट देण्याची उत्सुकतेने वाट पाहत आहे.आपली ही भेट मला खूप धैर्य आणि दिलासा देऊन जाईल अशी मला खात्री आहे. त्यानंतर २१ मार्च १९०७ रोजी लॉर्ड लॅमिंग्टनना पाठविलेल्या पत्रात ते सांगतात६ आपण आता खानदेशच्या दौऱ्यावर निघाला आहात तेव्हा पावसाळा सुरू होण्यापूर्वी तुम्ही धरणाची ही जागा पाहून जावे असे मला खूप वाटते.[७]

छत्रपती शाहूंनी आपला नियोजित धरणाचा प्रकल्प जास्तीत जास्त यशस्वी व्हावा म्हणून मुंबईचे गव्हर्नर आणि संबंधित इतर अधिकारी यांच्याशी चिकाटीने पत्र व्यवहार केला. त्यांच्या

ISSN No. 2394-5990

या प्रयत्नांना शेवटी यश आले त्यावेळी मुंबईचे गव्हर्नर असणारे सर जॉर्ज क्लार्क यांनी नियोजित धरणाच्या प्रकल्पाला सर्व प्रकारची मदत देण्याचे लेखी आश्वासन दिले. इतकेच नव्हे तर ९ मार्च १९९० च्या पत्रात ते शाहू छत्रपतींना लिहितात तुम्ही हाती घेतलेले हे महत्त्वाचे कार्य तुमच्या कल्याणकारी राज्याचे चिरंतन स्मारक व्हावे अशी माझी तीव्र इच्छा आहे.[८]

छत्रपती शाहू महाराजांनी जागतिक कीर्तीचे अभियंते सर विश्वेश्वरय्या यांचा सल्ला लक्षात घेऊन शेवटी धरण बांधून कालव्याने पाणीपुरवठा करण्याची योजना निश्चित केली. व इ. स १९०९ च्या नोव्हेंबरमध्ये धरणाच्या तलाव बांधकामास महालक्ष्मी राणीसाहेब यांच्या शुभहस्ते सुरुवात केली. या तलावास महालक्ष्मीबाई राणीसाहेबांचेच नाव देण्यात आले. हे काम काही अंशी गुत्ते देऊन आणि काही अंशी शाहू छत्रपतींचे बंधू बापूसाहेब महाराज यांच्या देखरेखीनुसार करण्यात आले.तलावाचे डायरेक्टर म्हणून कोल्हापूर दरबाराने बापू साहेबांची नेमणूक केली होती. त्यांच्या मदतीस इंजिनियर गुप्ते आणि पर्यवेक्षक श्रीयुत मित्तर होते.[९]

अशा पद्धतीने १९०९ चा नोव्हेंबर महिन्यात मोठ्या जोमाने धरणाच्या कामास सुरुवात झाली शाहू छत्रपतींना आपले राज्य सुजलाम सुफलाम करण्यासाठी राधानगरी धरण प्रकल्प लवकरात लवकर उभा करावयाचा होता. १९१४ मध्ये पहिले महायुद्ध सुरू झाले तरीदेखील या धरणाचे काम मोठे नेटाने चालू होते. या धरणाच्या पाण्यातून कोल्हापूर जिल्ह्यात हरितक्रांती घडवून आणण्याचे शाहू छत्रपतींचे भव्य स्वप्न होते म्हणून ते आपल्या पत्रातून अनेकदा म्हणत होते. 'my life's work will have been done when I complete this project'[१०] (हा धरण प्रकल्प जेव्हा पूर्ण होईल तेव्हा खऱ्या अर्थाने माझे जीवित कार्य पूर्ण होईल!) परंतु दुर्दैवाने सुरू झालेले पहिले महायुद्ध आणि साधनसामग्रीची कमतरता यामुळे इ.स १९१८ मध्ये राधानगरी धरणाचे बांधकाम जे बंद पडले ते शाहू छत्रपतींच्या हयातीत पुन्हा सुरू होऊ शकले नाही.पुढे छत्रपती राजाराम महाराजांनी शाहू छत्रपतींचा हा अर्धवट राधानगरी धरण प्रकल्प मोठ्या जिद्दीने पूर्ण करून आपल्या प्रजाहितदक्ष पित्याचे अपुरे स्वप्न पूर्ण केले. राधानगरी धरणामुळेच करवीरचा कंगाल कुणबी हा खऱ्या अर्थाने 'बळीराजा'झालेला आढळतो. कोल्हापूर भागातील महरितक्रांतीफहे राधानगरी धरणाचे फळ आहे असेच म्हणणे उचित ठरेल.[११]

निष्कर्ष :

छत्रपती शाहू महाराजांचे जलव्यवस्थापन या शोधनिबंधाचा अभ्यास केला असता पुढील निष्कर्ष हाती येतात

१) छत्रपती शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात जल व्यवस्थापनाचे खूप मोठे काम केले आहे.

२) जल व्यवस्थापनाच्या कार्यात त्यांनी या क्षेत्रातील तज्ञ व्यक्तीचा सल्ला घेऊनच अनेक योजना आखल्या व त्यांच्याच मार्गदर्शनाखाली त्या पूर्ण केल्या त्यामुळे या योजना लोकोपयोगी व महत्त्वपूर्ण ठरल्या.

३) छत्रपती शाहू महाराजांनी तत्कालीन काळात जल व्यवस्थापनाच्या कामासाठी साधनसामग्री अपुरी असतानाही त्यावर मात करून ही कामे उभी केली.

४) छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या प्रशासनात एक स्वतंत्र पाणीपुरवठा विभाग स्थापन केला होता. या विभागाच्या माध्यमातून त्यांनी आपल्या संस्थानातील जल व्यवस्थापनाच्या कामास गती दिली.

५) छत्रपती शाहू महाराजांनी कमीत कमी खर्चात जास्तीत जास्त शेतीचे क्षेत्र सिंचनाखाली कसे येईल या दृष्टिकोनातून जल व्यवस्थापनाच्या अनेक योजना आखल्या व त्या पूर्णत्वास नेल्या.

६) जल व्यवस्थापनाच्या कामासाठी त्यांनी सातत्याने ब्रिटिश सरकारच्या संबंधित विविध अधिकाऱ्याकडे पाठपुरावा करून त्यांच्याकडून विविध प्रकारचे साह्य मिळवले याचे अनेक संदर्भ आपणाला उपलब्ध आहेत.

७) कोल्हापूर संस्थानचे आर्थिक बजेट पाहता छत्रपती शाहू महाराजांना अनेक मोठ्या खर्चिक जल व्यवस्थापनाच्या योजना हाती घेता आल्या नाहीत.

८) राधानगरी धरण प्रकल्प हा छत्रपती शाहू महाराजांचा dream project होता.यासाठी त्यांनी खूप प्रयत्न केले पण पहिल्या महायुद्धामुळे या धरणाला मिळणारी साधनसामग्री मिळणे बंद झाल्यामुळे तो त्यांच्या हयातीत पूर्ण होऊ शकला नाही. पण पुढे त्यांच्या वारसांनी हा प्रकल्प पूर्ण करून छत्रपती शाहू महाराजांचे स्वप्न पूर्ण केले. या प्रकल्पामुळे कोल्हापूर संस्थानात हरितक्रांती झाली.

संदर्भ ग्रंथ :

१. पवार आप्पासाहेब (संपा) १९७८, राजश्री शाहू छत्रपती पेपर्स खंड-०१(१८८४- १८९४) शाहू संशोधन केंद्र,कोल्हापूर.

२. कित्ता.

३. जाधव रमेश, २००५, लोकराजा शाहू छत्रपती, सुरेश एजन्सी, पुणे, पृष्ठ क्र.३१३

४. करपे आर.एन, (संपा)२०१२, राजश्री शाहू महाराज आणि वर्तमानातील संदर्भ, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, पृष्ठ क्र. २१००
५. पूर्वोक्त, पवार आप्पासाहेब (संपा) १९७८, राजश्री शाहू छत्रपती पेपर्स, खंड–०१
६. पूर्वोक्त,जाधव रमेश, २००५, लोकराजा शाहू छत्रपती, पृष्ठ क्र. ३१२
७. कीर धनंजय ,२०११, राजश्री शाहू छत्रपती एक समाज क्रांतिकारक राजा, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पृष्ठ क्र.१९४
८. राठोड आर.डी, (संपा)२०१७, राजश्री शाहू महाराज सामाजिक सुधारणा व सद्यस्थिती, अरुणा प्रकाशन, लातूर,पृष्ठ क्र. १८७
९. साळुंके पी.बी, १९७६, राजश्री शाहू महाराज गौरव ग्रंथ, महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग सचिवालय, मुंबई, पृष्ठ क्र. ४१९
१०. सावंत उत्तम, २००५, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, निर्मल प्रकाशन, नांदेड, पृष्ठ क्र.८७
११. सूर्यवंशी क्र.गो,१९८४,राजश्री शाहू :राजा व माणूस, ठोकळ प्रकाशन,पुणे.

■■■

ISSN No. 2394-5990

राजर्षी शाहू महाराजांचे आर्थिक धोरण

डॉ. मोटे गितांजली सदाशिवराव
सहाय्यक प्राध्यापक, समाजशास्त्र विभागप्रमुख
जनविकास महाविद्यालय, बनसारोळा,
ता. केज, जि.बीड
Email ID : geetamote74@gmail.com

प्रस्तावना :

महाराष्ट्रातील बहुजन, शेतकरी, कष्टकरी समाजाचा सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक उध्दारासाठी कोणतीही तडजोड न करता आयुष्याच्या अखेरपर्यंत झटणारा सर्वांगपूर्ण राष्ट्र पुरुष रयतेच्या सुखात आपले सुख पाहणारा, सामाजिक न्याय व सामाजिक लोकशाहीचा आधारस्तंभ आधुनिक महाराष्ट्रातील लोककल्याणकारी राजा ज्यांच्या विचारातून शेती व उद्योगधंद्यात आमुलाग्र बदल घडून आला असा हरितक्रांतीचा अग्रदूत राजामधील थोर माणूस व माणसामधील थोर राजा म्हणजे लोकराजा राजर्षी शाहू महाराज होय.

राजर्षी शाहू महाराजांनी आर्थिक कार्याचे व्रत हाती घेतले होते. कारण कोणत्याही देशाचा विकास हा अर्थव्यवस्थेवर अवलंबून असतो. याच अनुशंघाने प्रस्तुत शोध निबंधाची मांडणी केली आहे.

शोधनिबंधाची उद्दिष्टे :

१. राजर्षी शाहू महाराजांच्या आर्थिक धोरणाचा अभ्यास करणे.
२. शाहू महाराजांच्या आर्थिक विचारांचा आढावा घेणे.
३. राजर्षी शाहू महाराजांच्या तत्कालीन आर्थिक परिस्थितीचा अभ्यास करणे.

शोध निबंधाची गृहीतके :

१. देशाची आर्थिक प्रगती ही शेती व उद्योगधंद्यावर अवलंबून असते.
२. पारंपारिक पध्दतीने शेती केल्यामुळे शेतीचे उत्पादन कमी होते.
३. पारंपारिक पिकांना फाटा देऊन चहा, कॉफी, रबर या पिकांच्या शेतीला प्रोत्साहन देऊन शेतक-यांची आर्थिक स्थिती सुधारली.

संशोधन पध्दती :

प्रस्तुत शोधनिबंधासाठी द्वितीयक स्त्रोतांतर्गत संदर्भग्रंथ, संशोधन पेपर, लेख, मासिके, जर्नल्स, साप्ताहिके, इंटरनेट, वर्तमानपत्र इ. चा आवश्यकतेनुसार वापर केलेला आहे.

विश्लेषणात्मक बाजू :

राजर्षी शाहू महाराजांचे आर्थिक धोरण :

शाहू महाराजांनी सामाजिक, शैक्षणिक धोरणाबरोबरच आर्थिक धोरणाचा स्विकार केलेला आहे. सामाजिक सुधारणा करण्याबरोबर आर्थिक सुधारणा महत्वपूर्ण आहेत. यावर महाराजांचा ठाम विश्वास होता. आर्थिक धोरणात शेतीविषयक विचार, सहकार संस्थानातील उद्योग, दळणवळणाच्या सुविधा, कामगार संघटनेची आवश्यकता, औद्योगिकरणाविषयीची भूमिका, वेठबिगारी प्रथेचे निर्मूलन, शेतीला पाणीपुरवठा इ. वर भर दिलेला दिसून येतो.

शेतीविषयक धोरण :

शेतीची उत्पादकता वाढवण्यासाठी जमिनीचे तुकडीकरण होऊ नये यासाठी १९९३ मध्ये कायदा केला. शेतीचे उत्पादन वाढवण्यासाठी केवळ पाणी पुरवठा आवश्यक नसून आधुनिक बी-बीयाणे, किटकनाशके इत्यादीचा शेतक-यांनी वापर करावा म्हणून कोल्हापूरात शेतीसंस्था १९१२ मध्ये स्थापन करुन या केंद्रात सुधारित शेतीचे प्रयोग दाखविण्यात आले. शेतक-यांना जोडधंदा म्हणून दुग्धव्यवसाय, पशूपालन इ.साठी अर्थसहाय्य व प्रोत्साहन देण्यात आले. तसेच कृषीविषयक प्रदर्शने आयोजित केली.

१. राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात पाटबंधारे योजना हाती घेतल्या होत्या. राधानगरी, काळम्मावाडी धरणांची कामे केली. विहिर व पाझर तलावांची कामे सुरु केली होती.
२. कृषि विषयक शिक्षणाची सोय केली. सुधारित पध्दतीने शेती करण्याचा ते सल्ला देत असत.

३. शेतीत नवनवे प्रयोग व्हावेत असे त्यांना वाटे. चहा, कॉफीच्या लागवडीवर त्यांन भर दिला. ऊस लागवडीसही त्यांनी प्रोत्साहन दिले. रबर, ताग, बटाटे, कंबोडिया कापूस, आंबा, फणस, पालेभाज्या व फळे आदींचे नवनवे प्रयोग केले. संस्थानातील शेतक-यांना १ लक्ष २४०० रु. कर्जे दिली. सावकार शाहीवर नियंत्रण आणले. शेतक-यांना सुधारित अवजारे दिली.
४. राजाराम हायस्कूल शेजारी चेवशश्र ऋग्री च्या प्रयोग त्यांनी राबविला.
५. आधुनिक शेतीपध्दती, खते, तंत्रज्ञान यावर व्याख्याने आयोजित केली.
६. इ.स. १८९७ मध्ये दुष्काळ पडलेला असताना धान्याचे भाव वाढले होते. कृत्रिम धान्यटंचाई व भाववाढ यावर त्यांनी प्रभावी उपाययोजना केली. दुष्काळप्रसंगी म्हैसूरहून धान्य आणल्याची नोंद आहे. तसेच दुष्काळात नवीन विहिरी तयार करणे, जुन्यांची दुरुस्ती, नद्यावर बंधारे घालून श्रमिकांना कामे उपलब्ध करुन दिली. रस्त्याचीही कामे हाती घेतली. इ.स. १८९९ च्या दुष्काळात संपूर्ण देशात १० लक्ष माणसे मृत्यू पावली पण कोल्हापूर संस्थानात मात्र एकही भूकबळी पडला नाही. याचे सर्व श्रेय राजर्षी शाहू महाराजांना जाते.

सहकार :

भारतासारख्या मोठ्या देशात उद्योगधंद्यासाठी आवश्यक भांडवल उपलब्ध होणे कठीण आहे. त्याचबरोबर जातीच्या पलीकडे लोकांना व्यवसाय व उद्योगाचे ज्ञान नाही अशावेळी सहकार हाच विकासाचा मार्ग असल्याचे शाहू महाराजांनी ओळखले होते. म्हणून त्यांनी लोकांना सहकाराचा मार्ग दाखविला. त्यांच्या मते आता प्रत्येकाने निरनिराळे काम करण्याचे दिवस गेले. पुष्कळ लोकांनी आपली कुशलता, अक्कल पैसा व अंगमेहनत एकत्र केली पाहिजे. म्हणजे सहकार्य केले पाहिजे. १०/२०/५० कुटुंबे या उद्योगधंद्याकरिता एक झाली पाहिजे त्यांना त्यांच्या योग्यतेप्रमाणे वेतन मिळाले पाहिजे व होणारा नफा ही वाटून मिळाला पाहिजे. याच अनुशंघाने सहकारी कारखाने, सहकारी संस्था व सहकारी बाजारपेठांची व्यवस्था राबविली पाहिजे यावर महाराजांनी भर दिला.

१९१२ साली महाराजांनी आपल्या संस्थानामध्ये सहकारी संस्थाविषयक कायदा संमत केला. सहकारी संस्थांची कायदेशीर नोंदणी करण्यासाठी सहकार निबंधकांची नेमणूकीची तरतूद करण्यात आली. १९१३ ला सत्यशोधक नेते भास्कररराव जाधव यांच्या नेतृत्वाखाली 'दि कोल्हापूर अर्बन को-ऑपरेटीव्ह सोसायटी लि.', ही पहिली सहकारी संस्था स्थापन केली गेली. शाहू महाराजांनी सहकारी चळवळीचा प्रसार शेती क्षेत्रात आणि ग्रामीण विभागात करण्यास अधिक प्रोत्साहन दिले. शेतक-यांना कर्ज मिळण्याच्या सुविधा उपलब्ध नसल्याने तो सावकाराच्या कर्जात सापडत असे. त्यामुळे माफक व्याजदरांवर पतपुरवठा करणा-या सहकारी पतपेढयांच्या स्थापनेस प्रोत्साहन दिले.

औद्योगिककरणाविषयीची भूमिका :

देशाच्या विकासासाठी औद्योगिकरण आवश्यक आहे. आर्थिक संपन्नता औद्योगिकरणावर अवलंबून असते. असे मत व्यक्त करताना त्यांनी मक्तेदार भांडवलशाहीला विरोध केला. अशा प्रकारची व्यवस्था श्रमिक आणि इतर लोकांच्या दृष्टिकोनातून रास्त नाही. विशेषकरुन भारतात अशी व्यवस्था मुळीच योग्य नसल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

शाहू महाराजांनी त्यांच्या कारकीर्दीत अनेक उद्योगांना मदत केली. त्यात प्रामुख्याने लघु उद्योगांचा समावेश होता. आर्थिक सहाय्याबरोबरच संस्थानात उभ्या राहणा-या उद्योगांना त्यांनी करमुक्त नोंदणी, विनामूल्य जमिनी, पेटंट संबंधीचे हक्क, खाजगी खात्याच्या निधीतून देणग्या देणे. यासारख्या भरपूर सवलती दिल्या, ज्यामुळे १९१०-१५ या काळात शाहूपूरी (कोल्हापूर) आणि तालुक्याच्या ठिकाणी अनेक उद्योगांची निर्मिती होऊ शकली. उदा. मे शिरगावकर आईल मिल्स, ग्राउंडनट फॅक्टरीज (शाहूपूरी), सुतकाम कारखाने, साखर कारखाना, दातार ड को. सॉ. मिल्स, इंडियन सायकल न्ड मोटार कं. लि., महाराजांनी सहकारी औद्योगिकरणाचा पुरस्कार केला. यामागे वितरणातील न्यायाचा विचार आणि आर्थिक विकास ही कारणे होती. औद्योगिकरणासंबंधी आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे त्यांनी धरलेला विकेंद्रीत औद्योगिकरणाचा आग्रह हा होय. उद्योगांचे केंद्रीकरण झाल्यास खेड्यांतून येणा-या लोंढ्यामुळे शहरात गर्दी होऊन आर्थिक व सामाजिक दुष्परिणाम उद्भवतात ते टाळण्यासाठी विकेंद्रीकरणाची गरज आहे अशी शाहू महाराजांची भूमिका होती.

कामगार संघटनेची आवश्यकता :

भारतीय सामाजिक व आर्थिक रचनेचा मूलाधार जातीव्यवस्था आहे ती श्रेणीबध्द विषमतेची संरचना असून श्रमाबरोबर श्रमिकांचेही विभाजन करते. असे सिध्दांतन डॉ. आंबेडकरांनी केलेले आहे. अधिकाराची वाटणी विविध जातीमध्ये, जाती उतरंडीतील त्यांच्या स्थानानुसार उतरत्या क्रमाने झालेली दिसून येते. ब्रिटिश आगमनानंतर भारतीय समाजव्यवस्थेमध्ये भांडवलशाही व्यवस्थेचे कलम करण्यात

ISSN No. 2394-5990

आले. परंतु त्यामुळे जातीव्यवस्थापक सामाजिक रचनेत मूलभूत बदल घडून आले नाहीत. भांडवलदार आणि कामगार यांचे हितसंबंध सर्वत्र परस्पराविरोधी असतात. यामुळे कामगारांचे हितरक्षण होऊ शकत नाही. यासाठी कामगारांनी एकजूट करणे आवश्यक आहे. या एकजूटीतूनच त्यांना न्यायहक्क मिळवून घेता येईल.

पाणीपुरवठा :

दुष्काळ निवारणाचा खरा मार्ग हा पाणी पुरवठा होय. कोल्हापूर संस्थानात वेळोवेळी पडणा-या दुष्काळ निवारणाकरिता विहिरी, तलाव बांधले. भोगवती नदीवर बंधारा बांधून पाणी पुरवठ्याची योजना आखली. तिलाच राधानगरी असे नाव देण्यात आले. या धरणातून आज शेतीला २२००० एकर जमिनीस पाणीपुरवठा तर ४८०० किलोवॅट इतकी जलविद्युत तयार होते. महाराजांच्या या जलधोरणातून करवीरच्या ग्रामीण विभागाचा विकास झाला. याच धर्तीवर कालवे निर्माण होऊन कृषी क्षेत्रात नवीन सुधारणा होऊन कोल्हापूर संस्थानात हरितक्रांती घडून आली.

रस्ते व रेल्वे वाहतुक :

उद्योगांना चालना मिळावी यासाठी महाराजांनी कोल्हापूर संस्थानात दळणवळण व वाहतुकीच्या आधुनिक सुविधा उपलब्ध करुन दिल्या. संस्थानामध्ये १८५ मैल लांबीचे रस्ते तयार केले. संस्थानातील सर्व खेडे रस्त्यांना जोडण्यासाठी प्रयत्न केले. तसेच कोल्हापूर ते मिरज हा रेल्वे मार्ग व कोल्हापूर रेल्वे स्टेशनची निर्मिती केली. अशाप्रकारे उद्योगधंद्याच्या वाढीसाठी रस्ते व रेल्वे वहातुकीची सोय करुन दिली.

शिक्षण, विज्ञान व तंत्रज्ञानविषयक धोरण :

सत्यशोधक नेत्यांप्रमाणेच शाहू महाराजांच्याही शिक्षण प्रसाराकडे बघण्याचा दृष्टीकोनामध्ये दोन भूमिकांचा प्रभाव असलेला दिसून येतो. एक म्हणजे त्यांनी शिक्षणप्रसाराकडे मानवी भांडवलातील गुंतवणूक व मनुष्यबळ विकासाच्या दृष्टीकोनातून पाहिले. बहुजन युवावर्गाच्या क्षमता संवर्धनासाठी शिक्षण आवश्यक असल्याचे त्यांनी मांडले. गरीब व होतकरु मुलांना वस्तीगृह, शिष्यवृत्तीची सोय उपलब्ध करुन दिली. विज्ञान व तंत्रज्ञानविषयक शिक्षणाचा प्रसार व प्रचार संस्थानामध्ये मोठ्या प्रमाणात केला.

राजर्षी शाहु महाराजांनी राबविलेल्या आर्थिक धोरणांचे अनेक महत्वाचे तात्कालिक आणि दूरगामी परिणाम घडून आले. पश्चिम महाराष्ट्रात सहकार क्षेत्राने जी प्रगती केली तसेच शेती क्षेत्राचा जो विकास घडून आला त्याची पायाभरणी महाराजांच्या शेतीच्या आधुनिकीकरणासाठी जी धोरणे राबविली तसेच सहकार क्षेत्राला जे सक्रीय उत्तेजन दिले त्यामुळे झाली.

वरील अभ्यासावरुन खालील निष्कर्ष समोर येतात.

निष्कर्ष :

१. माफक व्याजदरांत पतपुरवठा करणा-या सहकारी पतपेढ्यांमुळे शेतक-यांची सावकारीतून सुटका झाली.

२. विकेंद्रीत औद्योगिकरणांमुळे ग्रामीण भागातून शहरी भागातील येणारी गर्दी कमी होवून ग्रामीण भागाचा विकास होईल.

३. शेतीमध्ये नवनवीन प्रयोग केल्याने शेतीचे उत्पादन वाढून आर्थिक प्रगती झाली.

४. पारंपारिक पिकांना फाटा देवून चहा, कॉफी, रबर या पिकांच्या शेतीला प्रोत्साहन दिल्यामुळे शेतक-यांची आर्थिक स्थिती सुधारली.

५. विहिरी, तलाव, धरणे यातून शेतीला होणारा पाणीपुरवठा व धरणांच्या पाण्यावर होणारी वीज (जलविद्युत) या शाहू महाराजांच्या जलधोरणातून कोल्हापूर संस्थानात हरितक्रांती घडून आली.

संदर्भग्रंथ :

१. पवार जयसिंगराव (संपा.) - २००१- राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर.

२. साळुंखे नानासाहेब - २००८- शाहुंच्या आठवणी, वृषाली प्रकाशन, कोल्हापूर.

३. जाधव रमेश - २००५ - लोकराजा शाहू छत्रपती, शैलेंद्र प्रकाशन, पुणे.

४. इप्पर आर.के. (संपा.), राजर्षी शाहू महाराज, सामाजिक सुधारणा व सद्य:स्थिती, अरुणा प्रकाशन, लातूर.

५. विद्यावार्ता - हर्षवर्धन पब्लिकेशन्स, लातूर.

६. https://satyashothakpratishabd.com

७. कीर, धनंजय (१९९२) - राजर्षी शाहू छत्रपती, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

८. कुलकर्णी, मीना न्ड ब.शि. कुलकर्णी (१९७५) श्री.शाहू छत्रपतीचे अर्थकारण, गौरीनंदन प्रकाशन, कोल्हापूर.

९. घुगे.वि.बा. (१९७५) छत्रपती शाहूंचे समाजवादी आर्थिक धोरण, कोल्हापूर रायटर्स को-ऑपरेटीव्ह सोसायटी, कोल्हापूर.

■■■

राजर्षी शाहू महाराजांचे मागास जाती-जमातीच्या शिक्षणतील योगदान

प्रा.डॉ.राजेंद्र नागनाथ गायकवाड
संशोधन मार्गदर्शक
इतिहास विभाग प्रमुख
विठ्ठलराव शिंदे कला महाविद्यालय,टेंभुर्णी
मो. नं. - ९४२३७८७९८५
Email-rajendragaikwad55@gmail.com

डायरे अमोल राम
संशोधक विद्यार्थी
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
सोलापूर विद्यापीठ,सोलापूर
मो. नं. ७९७२८६२०९९
Email-amoldayre@gmail.com

प्रस्तावना :

राजर्षी शाहू महाराजांनी मागासलेल्या जाती-जमाती मध्ये योग्य बदल व्हावा त्यासाठी शिक्षण या प्रभावी साधनाचा पुरेपूर वापर केलेला होता हे लक्षात येते. राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक धोरण हे मागास जाती-जमाती यांच्या विकासाला पूरक असेच होते. त्यांच्या शैक्षणिक धोरणांचा निश्चितच परिणाम मागासलेल्या जाती-जमातीच्या जीवनामध्ये सुधारणा होण्यासाठी झालेला आहे.

आधुनिक महाराष्ट्राला सामाजिक समतेच्या वाटेवर आणण्यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी घेतलेले निर्णय, आदेश, धोरणे त्यांचे समाजातून झालेले स्वागत व मागास जाती-जमातींच्या आयुष्यात झालेला सकारात्मक बदल याचा अभ्यास होणे महत्वाचे आहे त्यासाठी संशोधन होणे गरजेचे आहे.राजर्षी शाहू महाराजांनी सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यासाठी अनेक अभिनव धोरणे राबवली. मात्र शैक्षणिक धोरणाचे महत्व अनन्यसाधारण आहे. राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक धोरण हे मागासवर्गीयांची सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक परिस्थिती बदलणारेच होते.

संशोधनाची उद्दिष्टे :

१. राजर्षी शाहू महाराज पूर्व मागास जातींच्या शैक्षणिक दर्जाचा अभ्यास करणे.
२. राजर्षी शाहू महाराजांच्या शैक्षणिक धोरणांचा अभ्यास करणे.
३. राजर्षी शाहू महाराजांनी मागास जाती - जमातींच्या शिक्षणासाठी केलेल्या कार्याचा अभ्यास करणे.

गृहितके :

१. राजर्षी शाहू महाराजांच्या शैक्षणिक धोरणामुळे मागास जाती - जमातींच्या शैक्षणिक स्थितीत सुधारणा झाली.
२. राजर्षी शाहू महाराजांच्या निर्णयामुळे मागास जाती - जमातीसाठी शिक्षणाच्या सुविधा वाढल्या.

संशोधन पद्धती :

प्रस्तुत शोधनिबंधासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा वापर केला आहे. त्याचबरोबर अन्वेषण, विश्लेषण पद्धतीचाही वापर केला आहे. सदर शोधनिबंध हा प्राथमिक व दुय्यम साधनावर आधारित आहे. यासाठी राजर्षी शाहू महाराजांचे आदेश,विविध पुस्तके, लेख यांचा वापर करून सदर शोध निबंधाचे लेखन कार्य केलेले आहे.

राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक धोरण आणि मागास जाती जमातीच्या शैक्षणिक स्थितीत झालेली सुधारणा:

२६ जून १८७४ रोजी कोल्हापूर नगरीत जन्मास आलेल्या राजर्षी शाहू महाराजांनी २ एप्रिल १८९४ पासून ते ६ मे १९२२ पर्यंत एकूण २८ वर्षे राज्यकारभार केला. २६ जुलै १९०२ च्या राजर्षी शाहू महाराजांच्या कोल्हापूर संस्थानात मागासवर्गीयांना ५० % आरक्षणाच्या संदर्भातील आदेशाप्रमाणे मागास जाती कोणत्या तर ब्राह्मण, प्रभू, शेणवी, पारशी व पुढारलेल्या जाती वगळून राहिलेल्या सर्व अन्य जाती म्हणजे मागासजाती होय.

राज्यारोहणाच्या समयी म्हणजे १८९४ साली संस्थानात अस्पृश्यांसाठी फक्त ५ शाळा होत्या. त्यामधील एकूण विद्यार्थी संख्या १६८ होती. १९०७-१९०८ साली अस्पृश्य शाळांची संख्या १६ व विद्यार्थ्यांची संख्या ४१६ झाली. राजर्षी शाहू महाराजांच्या धोरणामुळे उत्तरोत्तर ही संख्या वाढत गेली. अवघ्या चार वर्षात १९१२ साली अस्पृश्य शाळांची संख्या २७ व विद्यार्थ्यांची संख्या ६३६ एवढी झाली. संस्थानातील अस्पृश्यांची लोकसंख्या लाखाच्या घरात होती मात्र शिक्षणाचे प्रमाण अत्यल्प होते. राजर्षी शाहू महाराज यांनी योजलेल्या शैक्षणिक धोरणामुळे अस्पृश्यांच्या शिक्षणात लक्षणीय सुधारणा झाली.[१]

ISSN No. 2394-5990

राजर्षी शाहू महाराजांच्या हाती कोल्हापूर संस्थानाचा कारभार येण्यापूर्वी संस्थानात उच्चशिक्षण देणारे राजाराम कॉलेज होते.त्याचप्रमाणे माध्यमिक शिक्षणासाठी राजाराम हायस्कूल होते आणि कोल्हापूर इलाख्यात प्राथमिक शाळांची संख्या २२४ इतकी होती. हे जरी खरे असले तरी या शैक्षणिक संस्थांमधून शिक्षण घेणारे विदयार्थी हे प्रामुख्याने उच्चवर्णीय होते. बहुजनांच्या जीवनात खऱ्या अर्थाने ज्ञानकिरणे पोहचलीच नव्हती. त्याचा पुरावा म्हणजे १८८१ चा जनगणना अहवाल.

१८८१ साली कोल्हापुरात शिक्षणाचे प्रमाण ब्राह्मण ७९.१०%, मराठा ८.६० %, कुणबी १.५० %, मुसलमान ७.५० %, लिंगायत १०.६० % तर महार-मांग आदी जातींमध्ये शिक्षणाचे प्रमाण नगण्यच होते. त्याचवर्षी राजाराम हायस्कूलची एकूण विद्यार्थी संख्या ४४१ इतकी होती. त्यामध्ये ब्राह्मण विद्यार्थी ३६८ होते, तर राजाराम कॉलेजमध्ये जे ६१ विद्यार्थी होते त्यापैकी ५५ विद्यार्थी हे ब्राह्मण होते.[२]

राजर्षी शाहू महाराजांच्या १८९४ ते १९२२ या दरम्यानच्या कारकिर्दीचा आढावा घेतला तर मागास जाती आणि जमातींच्या शिक्षण घेणाऱ्या संखेत अत्यंत वाढ झाल्याचे खालील कोष्टकावरून लक्षात येते.

अनु. क्र.	तपशील	१८९४	१९२२
१	शिक्षण संस्था	२२४	५५९
२	अस्पृश्य विद्यार्थी संख्या	२३४	२१६२
३	ब्राहमणेत्तर विद्यार्थी संख्या	८०८८	२१०२७
४	राजाराम कॉलेज - मागासवर्गीय विद्यार्थी	६	१००
५	शिक्षणावरील एकूण खर्च	१ लाखापेक्षा कमी	३ लाखाहून अधिक
६	ब्राम्हणेत्तर विद्यार्थी शेकडा प्रमाण	९.९०	५१.२०

वरीलप्रमाणे तक्त्याचे निरीक्षण केले असता राजर्षी शाहू महाराजांनी राज्यकारभार हाती घेतल्यानंतर मागास जाती आणि जमातींच्या शैक्षणिक स्थितीमध्ये अत्यंत आमुलाग्र सुधारणा झाल्याचे लक्षात येते. शिक्षणात लक्षणीय वाढ झाल्याचे लक्षात येते.[३]

राजर्षी शाहू महाराजांचे मागास जाती-जमातींच्या शिक्षणाच्या संदर्भातील आदेश :

१. स्पृश्य - अस्पृश्य लोकांच्या मुलांच्या शाळा एक करण्याचा आदेश :

जाहीरनामा

तारीख ८ ऑक्टोबर १९१९ इसवी

हुजूर सरकारचा मु. ठ. क्र. ३४० चा होऊन लागत मु. जा. क्र.२४७,तारीख ३० माहे सप्टेंबर सन १९१९ ची आज्ञा झाल्याआधारे सर्व लोकांस कळवयास प्रसिद्ध करण्यात येते की,

करवीर इलाख्यात (जहागिरी सोडून) अस्पृश्य लोकांच्या मुलासाठी स्वतंत्र शाळा त्या सर्व येत्या दसऱ्या पासून बंद करण्यात आल्या आहेत व अस्पृश्यांच्या मुलांस सरकारी शाळातून इतर लोकांच्या मुलांप्रमाणे दाखल करून घेत जावे. सरकारी शाळातून शिवाशिव पाळण्याची नसल्याने सर्व जातींच्या व धर्मांच्या मुलांस एकत्र बसविण्यात येत जावे.[४]

कोल्हापूर संस्थानातील अस्पृश्य मुलांच्या शाळा बंद करून स्पृश्य आणि अस्पृश्य यांच्यासाठी एकच शाळा असावी. शिक्षणात कोणताही भेद राहू नये या उदात्त हेतूने राजर्षी शाहू महाराजांनी ३० सप्टेंबर १९१९ रोजी ठराव क्र. ३४० जा. क्र. २४७ नुसार येणाऱ्या दसऱ्या पासून अस्पृश्यांच्या स्वतंत्र शाळा बंद करण्याचा ठराव केला. स्पृश्य आणि अस्पृश्य एका शाळेत शिक्षण घेतील यामधून भेदाभेद दूर होईल हा महान विचार महाराजांच्या डोक्यात होता. यावरून अस्पृश्यांच्या शिक्षणसोबत सामाजिक समतेबाबतही शाहू महाराज आग्रही असल्याचे लक्षात येते.

२. मागासलेल्या जातींच्या स्त्रियांच्या शिक्षणाची सर्व सोय करणारा महाराणी लक्ष्मीबाईसाहेब यांचा हुकूम :

मागासलेल्या जातीतील ज्या स्त्रियांना शिक्षण घेण्याची इच्छा आहे, त्यांनी आप्पासाहेब सुर्वे यांच्याकडे अर्ज करावेत. त्यांच्या राहण्याची व खाण्याची सर्व सोय करण्यात येईल असा आदेश ८ ऑक्टोबर १९१९

ठराव क्र.३५४ जा. क्र.२६४ नुसार राजर्षी शाहू महाराजांच्या करवीर राज्याने काढलेला होता. यावरून मागासवर्गीय स्त्रियांच्या शिक्षणाबद्दल त्यांची आस्था दिसून येते.[५]

३. विद्याखात्यात अस्पृश्यता न पाळण्याचा शाहू महाराजांचा जाहीरनामा :

शाळा खात्यामध्ये मागासवर्गीय लोकाना सन्मानाने वागविले जावे. अमेरिकन मिशनच्या शाळा, आर्य समाजाच्या शाळा ज्याप्रमाणे कोणताही भेदभाव शाळेत येणाऱ्या मुलांशी करत नाहीत त्याप्रमाणे संस्थानातील सर्व शाळानी वागणे गरजेचे आहे. असा २३ ऑगस्ट १९१९ च्या गॅझेट मध्ये शाहू महाराजांनी जाहीरनामा प्रसिद्ध केला. यावरून अस्पृश्यना सन्मानाने शिक्षण घेता यावे याबाबत शाहू महाराज दक्ष होते.[६]

मागासवर्गीयांना शिष्यवृत्त्या:

राजर्षी शाहू महाराजांनी शिक्षणाची आवड असणाऱ्या अनेक होतकरू आणि गरीब मुलांना शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या. इस्लामपुरातील ब्राह्मणाच्या शाळेतील ज्ञानदेव घोलप हा महाराचा पोरगा आपल्या शिक्षणाची भूक भागवत होता. ही गोष्ट कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शाहू महाराजांच्या निदर्शनास आणून दिली. शाहू महाराजांना ज्ञानदेव घोलपच्या शिक्षणाची सारी व्यवस्था केली. ज्ञानदेव घोलप यांनी उच्चविद्या संपादित केली. १९२४ साली मुंबई इलाख्याच्या कायदेमंडळात अस्पृश्यांचा पहिला प्रतिनिधी म्हणून ज्ञानदेव घोलप निवडून गेला. पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीत त्यांनी महत्त्वाचे योगदान दिले. ममूकनायकफनियतकालिकाचे संपादक म्हणूनही त्यांनी भूमिका बजावली.[७]

कृष्णाजी लक्ष्मण मोरे ह्या मातंग समाजातील पोराने धाडस करून एकदा शाहू महाराजांची भेट घेतली व आपण मांग समाजाचा असून आपणास शाळा शिकायची आहे असे सांगितले. राजर्षी शाहू महाराजांनी त्या मुलाच्या शिक्षणाची संपूर्ण सोय केली. पुढे तो मुलगा लोकसभेचा दोन वेळेस सदस्य झाला.[८]

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनाही राजर्षी शाहू महाराजांनी आर्थिक मदत केली व शिक्षण पूर्ण करण्यासाठी त्यांना विलायतेस पाठवले.

राजर्षी शाहू महाराजांचे लहान पुत्र प्रिन्स शिवाजी यांचे दुःखद अपघाती निधन झाले होते. त्यांच्या स्मरणार्थ शाहू महाराजांनी १९२० झाली साली अस्पृश्य लोकांच्या विद्येच्या उत्तेजनाकरिता दहा हजार रुपयांच्या प्रॉमिसरी नोट करून ठेवल्या होत्या आणि त्याच्या व्याजातून दरमहा पाच रुपये प्रमाणे आठ शिष्यवृत्त्या सुरू केल्या. विशेष म्हणजे या शिष्यवृत्त्यापैकी तीन शिष्यवृत्त्या अस्पृश्य मुलींच्यासाठी ठेवल्या गेल्या होत्या. संस्थांनात जर अशा मुली मिळाल्या नाहीत तर संस्थानाबाहेरच्या अस्पृश्य मुलींना त्या द्याव्यात असेही महाराजांनी आपल्या हुकूमात लिहिलेले आहे. आपल्या राजदंडाचा शाहू महाराजांनी मागास जाती आणि जमातीच्या शैक्षणिक स्थितीमध्ये सुधारणा करण्यासाठी वापर केलेल्या आपणास पाहायला मिळतो.

मागास जाती – जमातींसाठी जातीनिहाय वसतिगृहांची सुविधा:

राजर्षी शाहू महाराजांनी वेगवेगळ्या जातींसाठी वेगवेगळी वसतिगृहे कोल्हापूर शहरात निर्माण केली. मागासवर्गीय आणि गरीब विद्यार्थ्यांना राहण्या आणि खाण्याच्या परिस्थितीमुळे शिक्षणापासून वंचित राहू नये, त्यांची राहण्याची आणि जेवणाची व्यवस्था व्हावी व त्यांनी शिक्षण घ्यावे यासाठी मोफत वसतिगृहांची निर्मिती केली. १९०१ पासून ते १९२१ पर्यन्त त्यांनी जवळपास २० पेक्षा अधिक वसतिगृहांची निर्मिती केली. मागासवर्गीयांसाठी वसतिगृह स्थापन करण्याची आपली योजना न्यायमूर्ती रानडे व गोपळकृष्ण गोखले यांनाही सांगितलेली होती. त्यांना ही योजना खूप आवडली होती.शाहू महाराजांनी त्या काळचे सरकारी शिक्षण खात्याचे संचालक गाईल्स यांचाही त्यांनी सल्ला घेतला होता.[९]

सन	नाव
१९०१	व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग
१९०५	दिगंबर जैन बोर्डिंग
१९०६	मुस्लिम बोर्डिंग
१९०७	वीरशैव लिंगायत बोर्डिंग
१९०८	मिस क्लार्क हॉस्टेल
१९०८	दैवज्ञ बोर्डिंग
१९११	नामदेव बोर्डिंग
१९१२	कायस्थ प्रभू बोर्डिंग
१९१२	पांचाल बोर्डिंग
१९१२	सारस्वत बोर्डिंग
१९१५	इंडियन ख्रिश्चन हॉस्टेल
१९१८	आर्य समाज गुरुकुल
१९१८	वैश्य बोर्डिंग
१९१९	ढोर – चांभार
१९२०	शिवाजी वैदिक विद्यालय बोर्डिंग
१९२०	प्रीन्स शिवाजी फ्री मराठा बोर्डिंग
१९२०	सोमवंशीय क्षत्रिय बोर्डिंग

ISSN No. 2394-5990

१९२१ सुतार बोर्डिंग
१९२१ नाभीक बोर्डिंग
१९२१ श्री देवांग बोर्डिंग

वरीलप्रमाणे राजर्षी शाहू महाराजांनी वेगवेगळ्या जातीच्या विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळी वसतिगृहे स्थापन करून त्यांच्या शिक्षणाची व्यवस्था केली. मागास जातीच्या शिक्षणासाठी राजर्षी शाहू महाराज किती आग्रही होते हे लक्षात येते.

इतर राज्यातील शैक्षणिक संस्था व वसतिगृहास मदत :

केवळ आपल्याच संस्थानात राजर्षी शाहू महाराज जाहिरनामे, आदेश आणि वसतिगृहे काढून शाहू महाराज थांबले नाहीत तर मागास जाती आणि जमातींच्या शैक्षणिक प्रगतीकडे ते अत्यंत व्यापक दृष्टिकोनातून पाहत होते. त्यामुळेच त्यांनी आपल्या संस्थानाबाहेरील अनेक मागास जाती व जमातींच्या शैक्षणिक संस्था व वसतिगृहास उदार हस्ते मदत केली. त्यामध्ये त्यांनी पुणे येथील शिवाजी स्कूल, मराठा फ्री बोर्डिंग हाऊस, छत्रपती मराठा बोर्डिंग हाऊस. नाशिक येथील उदाजी मराठा बोर्डिंग, संत सेना नाभीक बोर्डिंग, डिप्रेस्ड क्लास बोर्डिंग. अहमदनगर येथील छ. चौथे शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊस. नागपूर येथील डिप्रेस्ड क्लासेस बोर्डिंग हाऊस. पंढरपूर येथील अस्पृश्य विद्यार्थी वसतिगृह. कराची येथील कराची मराठा एड्युकेशन सोसायटी इत्यादि शैक्षणिक संस्थाना व वसतिगृहास शाहू महाराजांनी आर्थिक मदत केली.[१०]

निष्कर्ष :

१. राजर्षी शाहू महाराजांनी आपले शैक्षणिक धोरण मागास जाती-जमातींच्या विकासाला पूरक अशा स्वरूपाचे आखलेले होते. प्राथमिक शिक्षणावर महाराजांचा जोर होता कारण प्राथमिक शिक्षण घेतले तरच लोक उच्च शिक्षणाकडे जातील आणि प्राथमिक शिक्षणाचेच प्रमाण बहुजन समाजात कमी होते.राजर्षी शाहू महाराजांच्या धोरणामुळे मागास जातीतील शिक्षणाचे प्रमाण वाढले.
२. राजर्षी शाहू महाराजांच्या धोरणामुळे महत्वाच्या पदावर मागासवर्गीयांची नेमणूक होऊ लागली.राजर्षी शाहू महाराजांनी राज्यकारभाराची सूत्रे हाती घेतल्यानंतर शिक्षण व्यवस्थेत खूप बदल केले. उपशिक्षणाधिकारी हे पद संपवून त्या ऐवजी शिक्षणाधिकारी ह्या पदाची निर्मिती केली आणि त्या पदावर बहुजन समाजातील व्यक्तींची त्यासाठी निवड केली.
३. राजर्षी शाहू महाराजांनी १९०१ ते १९२१ या वर्षाच्या काळात एकूण २३ वसतिगृहे स्थापन केली. उच्चशिक्षणासाठी सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्या, बिनव्याजी कर्ज, प्रोत्साहन अशा अनेक गोष्टींच्या सोई केल्या. राजर्षी शाहू महाराजांनी वतनी शिक्षकांची निर्मिती केली. २९ सप्टेंबर १९१७ रोजी प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत सुरु करण्याचा ठराव केला. संस्थानात ५० % आरक्षण सुरु केले. इतर शैक्षणिक संस्थाना मदत केली. राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक धोरण हे मागासवर्गीयांची सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक परिस्थिती बदलणारे होते.
४. आधुनिक महाराष्ट्राच्याच नव्हे तर भारताच्या वैचारिक जडणघडणीत राजर्षी शाहू महाराजांचे कार्य दीपस्तंभासारखे आहे. अभिजनांची प्रत्येक क्षेत्रातील मक्तेदारी त्यांना अतीव त्रास देणारी होती. माणूस हा सन्मानाने जगला पाहिजे. कोणी उच्च व कोणी कनिष्ठ हा भेद संपला पाहिजे असे त्यांना मनोमन वाटायचे त्यासाठी त्यांनी ते विचार आपल्या धोरणातून प्रत्यक्ष अस्तित्वात आणले.
५. राजर्षी शाहू महाराजांची वसतिगृहाबद्दलची कामे, संस्थानात ५० % आरक्षण, मागास जाती-जमातीच्या मुलांना शिष्यवृत्या, शैक्षणिक संस्थाना मदत, मोफत व सक्तीचे शिक्षण, परदेशात विद्यार्थी पाठविणे अशा सर्व धोरणामुळे मागास जाती-जमातींचा फायदा झालेला आहे.शाहू महाराजांच्या धोरणामुळे मगासजाती - जमातींच्या शैक्षणिक स्थितीत लक्षणीय बदल झाले.

संदर्भ :

१. पवार जयसिंगराव,राजर्षी शाहू छत्रपती:जीवन व कार्य, खंड १, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी कोल्हापूर, जानेवारी २०१९, पृष्ठ क्र.७३.
२. संगवे विलास, राजर्षी शाहू महाराजांचे अभूतपूर्व शिक्षणकार्य: व्याप्ती व फलश्रुती, संपादक-पवार जयसिंगराव,राजर्षी शाहू छत्रपती:लेखसंग्रह,खंड २, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी कोल्हापूर, जानेवारी २०१९, पृष्ठ क्र.५९२.
३. तत्रैव,पृष्ठ ५९७।
४. करवीर सरकारचे गॅझेट, भाग,१, ठ. क्र.३४०, दि.११/१०/१९१९ चा आदेश.
५. करवीर सरकारचे गॅझेट, भाग,१ ,ठ.क्र. ३५४, दि.११ /१०/१९१९ चा आदेश.
६. करवीर सरकारचे गॅझेट, भाग,१, दि.२३ /०८/१९१९ चा आदेश.

७. पवार जयसिंगराव,राजर्षी शाहू छत्रपती:जीवन वकार्य,खंड १, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी कोल्हापूर, जानेवारी २०१९, पृष्ठ क्र.८७.
८. तत्रैव पृष्ठ क्र.७३.
९. कीर धनंजय, राजर्षी शाहू छत्रपती – एक समाज क्रांतिकारक राजा, पोप्युलर प्रकाशन, मुंबई, १९७९, पृष्ठ क्र.११३.
१०. संगवे विलास, राजर्षी शाहू महाराजांचे अभूतपूर्व शिक्षणकार्य: व्याप्ती व फलश्रुती, संपादक–पवार जयसिंगराव, राजर्षी शाहू छत्रपती:लेखसंग्रह, खंड २, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी कोल्हापूर, जानेवारी २०१९, पृष्ठ क्र.५९५.

■■■

ISSN No. 2394-5990

महाराष्ट्राच्या सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळीचे अग्रदूत- छत्रपती शाहू महाराज

डॉ. प्रेमचंद गुंडू गायकवाड
सहयोगी प्राध्यापक व विभाग प्रमुख इतिहास विभाग,
रयत शिक्षण संस्थेचे कला व वाणिज्य महाविद्यालय, माढा.
जिल्हा- सोलापूर, पिन-४१३२०९
मो. ९९२२४५२४२७/७९७२९८३४०२

सारांश :

धार्मिक कुप्रथा, अनिष्ट परंपरा, धार्मिक व जातीभेद नष्ट करून समाजाला उन्नतीच्या मार्गावर आणण्यासाठी ज्या समाज सुधारकांनी प्रयत्न केले त्या छत्रपती शाहू महाराज नाव अग्रक्रमाने घेतले जाते. सामाजिक न्याय, सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी छत्रपती शाहू महाराजांनी अथक परिश्रम घेऊन मोलाचे कार्य विसाव्या शतकाच्या सुरुवातीस केले.. छत्रपती शाहू महाराजांना महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासत सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळीचे अग्रदूत म्हणून जी ओळख आहे ती त्यामुळेच. शाहू महाराजांनी समाजात सकारात्मक सुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टीने धार्मिक सामाजिक आणि शैक्षणिक क्रांतीचा मार्ग स्वीकारला. धार्मिक जो खंडातून दिनदुबळ्या समाजाला खऱ्या अर्थाने मुक्त करण्यासाठी त्यांनी शैक्षणिक व सामाजिक चळवळ सुरू केली.. दिनदलित, दुबळे, वंचित, शेतकरी शोषित आणि कष्टकरी बहुजन समाजाचा विकास करणे हाच एक दृष्टिकोन बाळगून महात्मा फुले यांच्या वैचारिक दृष्टिकोनाचा स्वीकार करून त्यांनी सामाजिक व धार्मिक सुधारण्याच्या कार्याला आरंभ केला. सर्वसामान्य जनतेच्या जीवनात सकारात्मक आणि क्रांतिकारक बदल घडवून आणण्यासाठी छत्रपती शाहू महाराजांनी सर्व क्षेत्रात आपल्या असामान्य कर्तुत्वाचा ठसा उमटवला आहे. प्रस्तुत लेखाद्वारे छत्रपती शाहू महाराजांच्या सामाजिक कार्याचा आणि धार्मिक सुधारणा संबंधी विचारांचा थोडक्यात आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रस्तावना :

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणांच्या चळवळीत छत्रपती शाहू महाराजांचे मोठे योगदान आहे. ब्रिटिश राजवटीत महाराष्ट्राच्या सामाजिक जडणघडणीत ज्या ज्या समाज सुधारकांनी योगदान दिले त्यापैकी ते एक होते. पुरुषप्रधान समाजात धार्मिक रुढी परंपरांचा अतिरेक होता सर्वसामान्य जनतेवर अंधश्रद्धांचा पगडा होता महिलावर अन्याय होत होता अत्याचार होत होते अशा पार्श्वभूमीवर छत्रपती शाहू महाराजांनी स्त्रियांच्या सामाजिक बंधनातून आणि धार्मिक अनिष्ट प्रथापासून सुटका करण्याचा उदात्त हेतूने आपल्या कोल्हापूर संस्थानात स्त्री शिक्षणाला प्रोत्साहन दिले. त्यांच्या एकंदरीत कार्याचा आढावा घेता समाजातील उपेक्षित घटकाला प्राधान्यक्रम देण्याबरोबरच त्यांच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक विकास घडवून आणण्याचे कार्य त्यांनी प्राधान्याने केलेले दिसून येते .सामाजिक समतेच्या तत्वाचे पुरस्कर्ते आणि विचारांना कृतीची जोड देणारे म्हणून छत्रपती शाहू महाराजांकडे पाहिले जाते. त्यांनी आपल्या सत्तेचा वापर करून वंचित अशा समाजाला शिक्षण देऊन त्यांच्या जाणीव जागृती निर्माण केली.

महाराष्ट्राच्या प्राचीन कालखंडापासून ते विसाव्या शतकापर्यंतच्या कालखंडात माणूस पण असणारा राजा म्हणजे करवीरुपती छत्रपती राजश्री शाहू महाराज होते. शाहू महाराज म्हणजे जाणता राजा, प्रजाहित दक्ष आणि सामाजिक विकासासाठी, सामाजिक समतेसाठी अव्ययतपणे आणि तळमळीने कार्य करणारे राजे होते. ज्यावेळी भारतातील अनेक संस्थानिक ब्रिटिशांचे मर्जी राखून आपापल्या संस्थानात चैनीत आणि विलासी जीवन जगत होते, त्या काळात छत्रपती शाहू महाराजांनी सर्वसामान्य जनतेच्या सामाजिक प्रगतीसाठी विविध योजनांची कार्यांची आखणी करीत होते. विचारपूर्वक स्वीकारलेले सामाजिक कार्य, तत्त्वांच्या बाबतीत कोणतीही तडजोड न करता त्यांची प्रयत्नपूर्वक अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक असलेले असामान्य धैर्य त्यांच्या अंगी होते. म्हणून त्यांचे कार्यक्षेत्र केवळ कोल्हापूर संस्थानापुरतेच मर्यादित न राहता उर्वरित महाराष्ट्रातही पसरले होते. छत्रपती शाहू महाराजांचे कार्य केवळ एका क्षेत्रा पुरतेच मर्यादित नव्हते तर प्रत्येक क्षेत्रात त्यांच्या असामान्य कर्तुत्वांचा दाखला पाहायला मिळतो. प्रस्तुत लेखाच्या माध्यमातून शाहू महाराजांच्या सामाजिक

कार्याचा आणि धार्मिक सुधारणा चळवळीतील योगदानाचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

छत्रपती शाहू महाराजांचे सामाजिक सुधारणा चळवळीतील योगदान :

सामाजिक समतेसाठी मानवी प्रतिष्ठेसाठी आणि समाजातील वंचित घटकांना गोरगरिबांना विकासाची समान संधी मिळावी यासाठी छत्रपती शाहू महाराजांनी हयात लढा दिला. त्यांनी आपल्या कार्यकाळात केवळ सामाजिक सुधारणा वरच भर दिला नाही तर कला- संस्कृती-संगीत, क्रीडा, रंगभूमी, शेती, शिक्षण अशा सर्व क्षेत्रात आपले बहुमोल योगदान तर दिलेच पण निर्भय आणि धैर्यवान समाजाच्या जडणघडणीतही आपले योगदान दिले. सत्तेची सूत्रे हाती आल्यावर समाजाच्या उद्धारासाठी त्यांनी जो जाहीरनामा प्रसिद्ध केला त्यात असा उल्लेख होता की, आमचे प्रजाजन सदा सुखी व संतुष्ट असावेत, त्यांच्या हितसंबंधाची एकसारखी अभिवृद्धी होत जावी आणि आमच्या संस्थानाचा सर्व बाजूंनी अभुद्य व्हावा अशी आमची उत्कट इच्छा आहे तत्कालीन समाजाच्या सर्व व्यवहारावर उच्चभू पगडा होता आणि त्यामुळे समाजातील वंचित वर्ग उपस्थित राहिला होता. ही बाब लक्षात घेऊन शाहू महाराजांनी अशा वंचित वर्गातील नाडल्या पिढ्या गेलेल्या लोकांना समाज व्यवहारात बरोबरीचा समान हिस्सा मेळावा यासाठी शर्तीचे प्रयत्न केले. आपल्या संस्थानात त्यांनी त्या दृष्टीने अनेक क्रांतिकारक निर्णय घेतले. राज्यकारभारांमध्ये विविध जाती धर्माचे लोक सहभागी करून घेतले तर राज्यकारभाराला योग्य तो समतोल पणा येईल या भूमिकेतून त्यांनी मोठ्या आणि जबाबदारीच्या पदावर बहुजन समाजातील लोकांची नेमणूक केली. वंचित वर्गातील लोकांच्या हितासाठी चे हुकूम आदेश ते काढत त्यांची अंमलबजावणी योग्य पद्धतीने होते का नाही हे ते स्वतः जातीने तपासात असत. बहुजन समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी सर्वप्रथम स्त्री शिक्षणावर आणि सर्वसामान्य लोकांच्या शिक्षणावर आपले लक्ष केंद्रित केले. बहुजन समाजातील लोक शिकले तरच पुढे त्यांचा विकास होईल, त्यांची प्रगती होईल हा विचार करून शाहू महाराजांनी शाळा, वसतिगृह सुरू करण्याचा उपक्रम हाती घेऊन शिक्षण प्रसाराच्या कार्याला हातभार लावला. मराठा, कुणबी, मुस्लिम, जैन, लिंगायत आदी समाजातील शिक्षणाचे प्रमाण वाढविण्यासाठी त्यांनी संस्थानाच्या तिजोरीतून खर्चाची तरतूद केली. त्यांनी स्वतःच्या संस्थानात शिक्षणाचा प्रसार करताना ब्रिटिशांनी भारतीय समाजासाठी उपलब्ध करून दिलेली शिक्षणाचे संधी ही मौलिक मांडली. या अनुषंगाने शाहू महाराज म्हणत असत की- निरनिराळ्या समाजातील लोकांना शिक्षण देण्याची पद्धत मी काळजीपूर्वक अनुसरीत आहे आणि माझ्या आयुष्याच्या पुढील काळातही पद्धत सुरू ठेवण्याची माझी इच्छा आहे. निर्णया जातींना स्वतःची उन्नती करून घेण्याच्या प्रयत्नास मी प्रोत्साहन दिले आहे त्यांचेही निवेदन समाजोधरासाठी आणि जातीभेता पासून दूर होणारे अनिष्ट परिणाम टाळण्यासाठी तसेच एका परिपूर्ण राष्ट्राच्या उभारणीसाठी होती हे लक्षात घेतले पाहिजे. देशांमध्ये लोकशाहीवर आधारित असे राज्य हवेच, परंतु त्या आधी लोकशाहीची संकल्पना समजून घेण्याची लोकशाही उपभोगण्याची पात्रता बहुजन समाजात आली पाहिजे त्याबाबत बहुजन समाजात जागृती निर्माण झाली पाहिजे या उद्देशाने प्रेरित होऊन शाहू महाराजांनी अस्पृश्यता निवारण्याचे कार्य मोठ्या प्रमाणावर केली.

१८९६ च्या दुष्काळात शाहू महाराजांनी अंमलदाराकडून दुष्काळी भागातील परिस्थिती माहिती घेऊन दुष्काळ निवडण्यासाठी योग्य त्या तरतुदी केल्या. दुष्काळी भागातील लोकांना अन्य धान्य मिळावे यासाठी गाव पाटलापासून सर्वसामान्य जनतेपर्यंत सर्वांकडून धान्य गोळा करून गरजेप्रमाणे त्यांचे वाटप केले. गाव पातळीवर धान्य वाटपाचे दुकाने सुरू केली. ज्या भागात दुष्काळ नाही तेथील लोकांकडून अन्यथा धन्य गोळा करून ते या दुकानाच्या माध्यमातून दुष्काळग्रस्त भागा, बाहेरच्या राज्यातूनही अन्नधान्य आणण्याची व्यवस्था केली.. अशा प्रकारे दुष्काळी भागातही अन्यथाण्याचा प्रश्न महाराजांनी दुष्काळ नसलेल्या भागातील शेतकरी व्यापारी आदीबरोबर सहकार्यांचे सांगड घालून समाधानकारकपणे सोडवला. पिण्याच्या पाण्याची समस्या निवडण्यासाठी अनेक गावांमध्ये श्रमदानातून सरकारी खर्चाने विहिरी खोदल्या तसेच तळी व तलावांचे सुद्धा निर्मिती केली. दुष्काळ निवडण्यासाठी दुष्काळी कामांना सुरुवात केली दुष्काळाचे संकट निवारण बरोबरच १८९९ मध्ये संस्थानातील प्लेगच्या साथीच्या उच्चाटन करण्यासाठी त्यांनी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. प्रादुर्भाव असलेल्या गावातील लोकांनी गावाबाहेर रानात वस्ती करावी तिथे झोपड्या उभाराव्यात असा आदेश काढला. संस्थानाच्या प्रवेशद्वाराजवळच विलगीकरण कक्ष उभारले येणाऱ्या जाणाऱ्या प्रवाशांची वैद्यकीय तपासणी करण्याचाही आदेश दिला.. शाहू महाराजांनी अशा प्रसंगीत समाजकार्याबरोबरच शाश्वत अशा समाजकार्याचा सुद्धा पाठपुरावा केला यात सहकार क्षेत्र, कृषी क्षेत्र, जलसिंचन, कृषी बाजारपेठांचा विकास, औद्योगिक क्षेत्रातील सुधारणा आणि विकास अशा अनेक क्षेत्रातील योगदानाचा समावेश होतो.

ISSN No. 2394-5990

धर्मभेद आणि जातीभेद निर्मूलनाचे कार्य हे चुटकीसरशी होणारे नाही हे त्यांनी जाणले होते. त्यासाठी चिकाटीची गरज असल्याचे त्यांचे मत होते. जातीयता निर्मूलनासाठी त्यांनी अनेकदा सामाजिक परिषदांचे आयोजन केले होते. आपल्या भाषणातून जाते बेताबाबतचे विचार त्यांनी जनतेसमोर प्रभावीपणे मांडले. विधवा पुनर्विवाह, बालविवाह विरोध, आंतरजातीय विवाह प्रोत्साहन अशी अनेक सामाजिक कार्य करण्याबरोबरच कुष्ठरोग यांचे पुनर्वसन प्रशासनात बहुजनांना ५० टक्के आरक्षण, गायरान जमिनीस मंजुरी, राजकीय जनजागृती अशी कार्य हे त्यांनी केले म्हणून शाहू महाराजांना बहुजन हिताय बहुजन सुखाय राजा म्हणून ओळखले जाते.

लोकशाही तत्त्वाची पाळीमुळे अगदी तळागाळापर्यंत पोहोचावीत या दृष्टीने शाहू महाराजांनी ग्रामपंचायत स्थापना केली. बलुतेदारी पद्धत रद्द केली गोहत्या बंदी हुकूम काढला, सार्वजनिक ठिकाणी अपृष्ठता न पाळणे अशा अनेक सामाजिक सुधारणांचे कायदे त्यांनी संस्थानात अमलात आणले. थोडक्यात असे म्हणता येईल की शाहू महाराजांचे समाज सुधारण्याचे कार्य हे बहुजन समाजाचा शैक्षणिक विकास, अपुरुषता निर्मूलन, जातिव्यवस्थेचे निर्मूलन, स्त्रीमुक्ती आणि स्त्री शिक्षण, कालबाह्य आणि अनिष्ट परंपरा अशा धार्मिक रूढी व परंपरेचे निर्मूलन, सामाजिक समता, सामाजिक न्याय इत्यादी घटकांना अनुषंगून होते.

छत्रपती शाहू महाराजांचे धार्मिक सुधारणा चळवतील योगदान:

छत्रपती शाहू महाराज कोणत्या एका जाती धर्माचे विरोधक नव्हते तर वास्तविक ते जाती व धार्मिक विषमतेचे कट्टर विरोधक होते. समजत कोणत्याही जाती धर्माचे वर्चस्व असता कामा नये सर्वधर्म तील लोकांनी एकमेकांच्या धर्माचा आदर राखून सर्वांना समानतेची वागणूक दिली पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. छत्रपती शाहू महाराज खऱ्या अर्थाने धार्मिक सुधारक होते. ते धार्मिक होते, पण अंधश्रद्धाळू नव्हते. आपल्या धर्माचे अभिमानी होते पण इतर धर्माच्या इथे आदर करीत. हिंदू धर्माचे अभिमानी असले तरी हिंदू धर्मातील काही अनिष्ट आणि कालबाह्य परंपरा प्रथावर त्यांनी वेळोवेळी कडून हल्ला केला; त्यात सुधारणा आणण्याचा प्रयत्न केला. छत्रपती शाहू महाराज हे वेदांचे चाहते होते आणि वेदातील विचारांचा त्यांचा काढा अभ्यास होता. विशिष्ट जातीतील आणि धर्मातील मीरा सदरीचे त्यांना निर्मूलन करायचे होते.१९११ मध्ये त्यांनी कोल्हापुरात सत्यशोधक समाजाची स्थापना झाली. समाजाच्या पुरोहित शाळेत महाराजांनी अनुदान दिले. १९१८ मध्ये आपल्या संस्थानात आंतरजातीय कायदा मंजूर केला. धार्मिक सुधारणांच्या बाबतीत महाराजांचे भूमिका ही केवळ तत्त्वचिंतकाची नव्हती तर कृतिशील समाज सुधारकांची होती. १९ व्या शतकात भारतीय समाजात धार्मिक परंपरांचा रूढींचा जबरदस्त पगडा होता, समाजात जाती संस्था आणि धार्मिक निर्बंध यांना महत्त्व प्राप्त झाले होते. बुद्धिप्रामान्य वाद, प्रयोगशीलता, भौतिक विद्या यापेक्षा धार्मिक परंपरा आणि ग्रंथ प्रामाण्यावाद यांचे वर्चस्व वाढले होते. एकूणच संपूर्ण समाज जीवनावर धार्मिक, अध्यात्मिक आचार विचारांचा मोठा प्रभाव होता. यातील बहुतांशी धार्मिक परंपरा या कालबाह्य झाल्या होत्या आणि या परंपरा भारतीय समाजाच्या सर्वांगीण विकासामध्ये अडथळा ठरत होत्या. शाहू महाराजांचे नेमकी ही बाब हेरून धार्मिक सुधारणाच्या कार्यातही स्वतःला झोकून दिले. स्त्रियावर मोठ्या प्रमाणात धार्मिक बंधने घातली होती अधिक निरनिराळ्या जाती जमातीत विभागलेला समाज श्रेष्ठ कनिष्ठ त्याच्या संकल्पनेतून अजून दुभागला गेला. महाराजांनी ही बाब देखील हेरली आणि धार्मिक रोडी परंपरा यांच्यात जो खडाखाली अडकलेल्या बहुजन समाजाला मुक्त करण्याच्या उद्देशाने क्रांतिकारक पावले उचलली.

जातिभेद धार्मिक तेढ हे समाजाला लागलेले कलंक असून सामाजिक समतेच्या दृष्टीने हे हानिकारक आहेत याची जाणीव शाहू महाराजांना होती. ते धार्मिक व सामाजिक समतेचे पुरस्कर्ते होते म्हणून धार्मिक व जाती एकेच्या दृष्टीने जातीभेद आणि धार्मिक तेढ हे समाजातील वाईट घटकांचे निर्मूलन केले पाहिजे अशी त्यांची धारणा होती. शाहू महाराजांचे धार्मिक सुधारणाच्या बाबतीतील निर्णय दूरदर्शी होते. शतकानू शतके चालत आलेल्या धार्मिक व जातीय विषमतेच्या अनुसूचित अन्यायकारक आणि अमानुष परंपरा नाही धुडकावले. वेदोक्त प्रकरणात त्यांनी खंबीर भूमिका घेऊन उच्च जातीच्या वर्चस्वाखाली खुलेआम आव्हान दिले उच्च जातीतील सवर्णांनी लाभलेली मानसिक गुलामगिरी कनिष्ठ जातीच्या लोकांनी झुगारून द्यावी अशी शिकवण ते बहुजन समाजाला देत असल्यामुळे त्या काळात मोठे सामाजिक वादळ निर्माण झाले होते. जातीभेद निर्मूलन करणे अंधश्रद्धा निर्मूलन करणे यासारख्या त्यांच्या धार्मिक सुधारणांच्या कार्याला आर्य समाजाच्या विचारांची बैठक होती तर मनोवृत्ती सत्यशोधक समाजाच्या तत्त्वानुसार निर्माण झाली होती. ब्रह्म समाज, प्रार्थना समाज, जैन व लिंगायत धर्मपंथ, या पंथाच्या तत्त्वांचा ही त्यांनी अभ्यास केला होता.या अभ्यासामुळे त्यांना पंथाच्या मर्यादा लक्षात आल्या म्हणून ते आर्य समाजाकडे आकर्षित झाले परंतु या समाजाचे सर्वच तत्वे त्यांनी स्वीकारले नाही, पण त्यांची धार्मिक सुधारणांच्या बाबतीतील वैचारिक जडणघडण मात्र निश्चितच झाली. धर्म श्रद्धे विषयी त्यांना असणारे ओढ आर, ब्राह्मणी वर्चस्वाचे धार्मिक बंधने दोन करण्यासाठी उच्च

वर्गातील लोकांचे खरे अंतरंग उघड करण्यासाठी आर्य समाजाच्या तत्त्वांचा चांगला उपयोग होईल हे महाराजांनी लक्षात घेतले होते. शाहू महाराजांना हिंदू धर्मातील अनिष्ट रूळ रूढी परंपरा समूळ नष्ट करायच्या होत्या; आणि हिंदू धर्माचे खऱ्या अर्थाने शुद्धीकरण करायचे होते. त्यांना धर्म ब्राह्मणी वर्चस्व ऐवजी शुद्ध नैतिक स्वरूपाचा हवा होता त्या दृष्टीने त्यांनी खूप प्रयत्न केले. शाहू महाराजांना वैदिक हिंदू धर्म अपेक्षित असल्यामुळे साहजिकच त्यांचा ओढा आर्य समाजाकडे अधिक होता उलट सत्यशोधक समाजाचे तत्वे ही हिंदू धर्माची व्यवस्थाच समोर उकडून टाकण्यावर भर देत होती म्हणून शाहू महाराज सत्यशोधक समाजाच्या तत्त्वापासून थोडे दूरच राहिले होते. हे लक्षात घेतले म्हणजे त्यांची धार्मिक सुधारणाच्या बाबतीत येईल वैचारिक जडणघडण लक्षात येते. आर्य समाज आणि सत्यशोधक समाज या दोन्ही समाजातील चांगल्या गोष्टी तत्वे स्वीकारून त्यांनी आपल्या धार्मिक विचारांची बैठक निश्चित केली.

त्या विचारानुसार सर्वांगीण धर्म सुधारणा घडवून आणणे धर्माला सार्वत्रिक नितिनचे अधिष्ठान देऊन पुरोहित शाईनचे वर्चस्व नष्ट करणे इत्यादी विचारधाऱ्यांच्या आधारावर विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात त्यांनी हिंदू धर्मात काही सुधारणा करण्याचा प्रयत्न केला. शाहू महाराजांच्या धार्मिक सुधारणा विषयक विचारसरणीवर सत्यशोधक समाज आणि आर्य समाजाच्या तत्त्वांचा अधिक प्रभाव असल्याचे दिसून येते. या दोन्ही समाजातील योग्य अशी धर्मविषयक तत्वे होती, त्यांचा त्यांनी स्वीकार केलेला दिसून येतो. वेदनिष्ठा आणि समतेच्या आधारावर बहुजन समाजाला शिक्षण देण्यासाठी त्यांनी आर्य समाजाच्या तत्त्वांचा उपयोग करून घेतला होता. हिंदू धर्मातील आत्मघातकी संकुचित पणा सोडून देऊन सर्व जाती धर्मांचा आणि वेदविद्येचा आदर आपण केला पाहिजे अशी शाहू महाराजांचे धारणा होती. सुधारणेच्या कार्यातील त्यांची कार्यपद्धती ही अधिक वास्तववादी आणि व्यवहारी अशी होती. स्वातंत्र्योत्तर काळात सर्व जाती धर्मांना समान अधिकार मिळण्यासाठी आणि बहुजन समाजाचा शैक्षणिक विकास होण्याची गरज तीव्रतेने भासू लागली म्हणून बहुजन समाज शाहू महाराजांच्या खंबीर नेतृत्वाखाली एक आला आणि म्हणून तत्कालीन समाजात धार्मिक शैक्षणिक राजकीय जनजागृती वेगाने होत गेली.

समारोप :

महाराष्ट्राच्या इतिहास अनेक समाजसुधारकांच्या कार्याची नोंद आहे, पण आपल्या शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक कार्याद्वारे बहुजन समाजात जागृती निर्माण करून त्यांच्या सर्वांगीण प्रगतीचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सतत झटणारे प्रजाहितदक्ष सत्ताधीश म्हणजे राजश्री छत्रपती शाहू महाराज होते. पूर्ण विचारांनी स्वीकारलेले सामाजिक, राजकीय, शैक्षणिक आणि धार्मिक सुधारण्याचे तत्वे कोणतेही तडजोड न करता आम्हाला आणणारे असे ते व्यक्तिमत्व होते. या सर्व तत्त्वांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक असलेले असामान्य धैर्य त्यांच्या अंगी होते. महाराजांनी आपल्या अधिकारांचा उपयोग सकारात्मक पद्धतीने करून समाजातील अंधश्रद्धा निर्मूलन धार्मिक अनिष्ट रूढी परंपरा निर्मूलन समाजातील सर्वांचे वर्चस्व दूर करणे, बहुजन समाजाचा शैक्षणिक विकास, सामाजिक व आर्थिक विकास करणे इत्यादी कार्यासाठी केला. म्हणूनच, व्यापक दृष्टिकोन असणाऱ्या उदर अंतकरणाच्या स्वातंत्र, समता व बंधुत्व या मूल्यांची जोपासणेसाठी सतत प्रयत्नशील असणाऱ्या अशा राजाला सर्वांगीण पूर्ण राजपुरुष म्हणूनही गौरविले गेले आहे. छत्रपती शाहू महाराजांच्या वैज्ञानिक दृष्टिकोन समाजात सुधारणा करण्याच्या दृष्टीने खूपच परिणामकारक ठरला होता. लोकनायक आणि प्रजाहितदक्ष राजा म्हणून शाहू महाराजांनी दिलेले सामाजिक, शैक्षणिक योगदान भविष्यातील सर्वच राज्यकर्ते आणि भावी पिढ्यांना निश्चितच मार्गदर्शक आणि प्रेरणादायी ठरणारे आहे.

संदर्भ :

१. ना.स. भूरके (२०१४) – राजश्री शाहू व त्यांचे समाज सुधारकाचे विचार व कार्य रिसर्च डायमेन्शन्स खंड–२, अंक–१

२. राणा चव्हाण (२००१) – लोकनेते राजश्री शाहू महाराज काळ आणि कार्य, त्रिमूर्ती प्रकाशन, पुणे.

३. दीपक शिंदे (२०१६) – छत्रपती शाहू महाराज आणि सर्वधर्मसमभाव International Multidisciplinary E- Journal, खंड–५, अंक–६

४. बालाजी गंगावणे (२००५) – राजश्री शाहू छत्रपती आणि शतशोधक चळवळ Online research Journal , खंड–४, अंक–१२

५. पी.डी. पाटील (२००२) – छत्रपती शाहू महाराज यांचे सामाजिक योगदान– एक अभ्यास, चिंतामणी प्रकाशन, कोल्हापूर.

६. विनोद तावडे (२०१८) – दृष्टा राजश्री लोकराज्य, अंक– सप्टेंबर २०१८.

७. बा.बी डिंगोळे (२०१८) – राजश्री शाहू छत्रपतींचे विचार व कार्य, युगप्रवर्तक प्रकाशन, लातूर.

ISSN No. 2394-5990

८. सुरेंद्र जोंधळे (१९९१) – राजश्री शाहू महाराजांच्या कार्याचे वैचारिक पार्श्वभूमी श्री विद्या प्रकाशन, औरंगाबाद.

९. रमेश जाधव (२०१६) – राजश्री शाहू गौरव ग्रंथ महाराष्ट्र शासन, चरित्र साधने प्रकाशन समिती मंत्रालय, मुंबई

१०. कृष्णा गो सूर्यवंशी (१९८४) – राजश्री शाहू: राजा व माणूस ठोकळ प्रकाशन, पुणे.

११. ए. कुमार (१९९२) – राजश्री शाहू महाराज मॅकमिलन प्रकाशन, मुंबई.

■■■

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे आर्थिक विचार

डॉ. रुपाली गोवर्धन दिकोंडा
सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग
कला व वाणिज्य महाविद्यालय, माढा
ता. माढा, जि. सोलापूर.
मोबाईल - ९९२२६१५१२०
ईमेल -dikonda.rupali2904@gmail.com

घोषवारा :

शाहू महाराज हे कोल्हापूर संस्थानचे अधिपती होते त्यांनी एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात व विसाव्या शतकाच्या प्रारंभी बहुजन समाजाच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक विकासासाठी मोलाचे कार्य केले. त्यांनी बहुजन समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी आपल्या भाषणातून व कृतीतून शेती, उद्योगधंदे, व्यापार, दारिद्र्य निर्मूलन, इत्यादीसाठी जे विचार मांडले त्यांची अंमलबजावणीही केली. त्यामागे एक विशिष्ट विचार प्रणाली होती.

राजर्षींनी आपल्या संस्थानात शेती विकासा संदर्भात राबविलेली सर्व धोरणे व कार्यक्रम हे त्यांच्या कृतीरूपी शेती अर्थशास्त्राचा एक भाग बनून गेला होता. शाहू महराज हे अर्थशास्त्राचे प्रत्यक्ष विद्यार्थी नसले तरी त्यांनी त्यांच्या कारकिर्दीत अर्थशास्त्राच्या सर्वच क्षेत्रामध्ये (उदा.शेती, सहकार,उद्योग, मूलभूत सोई -सुविधा, सेवा क्षेत्र, राजस्व इत्यादी.) कृतीद्वारे आमुलाग्र बदल घडून आला.

प्रस्तावना :

शाहू महाराज हे कोल्हापूर संस्थानचे अधिपती होते त्यांनी एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात व विसाव्या शतकाच्या प्रारंभी बहुजन समाजाच्या आर्थिक सामाजिक, शैक्षणिक विकासासाठी मोलाचे कार्य केले. त्यांनी बहुजन समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी आपल्या भाषणातून व कृतीतून शेती, उद्योगधंदे, व्यापार, दारिद्र्य निर्मूलन,इत्यादीसाठी जे विचार मांडले त्यांची अंमलबजावणीही केली. त्यामागे एक विशिष्ट विचार प्रणाली होती.

महत्वाचे शब्द : शेतीचा विकास, समतोल विकासाचे पुरस्कर्ते

उदिष्टे :

१) राजर्षींनी छत्रपती शाहू महाराज यांचे व्यक्तिमत्व जाणून घेणे.
२) राजर्षीं छत्रपती शाहू महाराज यांचे आर्थिक विचार जाणून घेणे.

शेती विषयक व जल व्यवस्थापन विषयक विचार :

भारतीय शेतीत सुधारणा घडवून आणण्यासाठी पाश्चिमात्य देशातील आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित शेतीचे अवलोकन करून आपल्या राज्यात तशा प्रकारची शेती पद्धती राबविली पाहिजे असे त्यांचे मत होते. सन १९०२ मध्ये सातव्या एडवर्ड बादशहाच्या राज्यारोहण समारंभासाठी शाहू महाराजांना इंग्लंडला जावयाचे होते, तेव्हा त्यांनी १७ एप्रिल १९०२ रोजी 'सर क्लॉड हिल' यांना पत्र लिहिले, त्या पत्रात ते म्हणतात, आमच्या राहण्याचे ठिकाण असे असावे की, ज्या ठिकाणी शेतकीच्या जनावरांची व कोंबडी, बदकांची पैदास,दूधदुभत्यांची उत्पत्ती इत्यादी बाकीचे धंदे लहान मोठ्या प्रमाणावर चालले आहेत. त्यांच्या या विचारातून स्पष्ट होते की शेतीविषयक आधुनिक ज्ञान, तंत्रज्ञान, व जोडधंद्याची माहिती करून घेणे व करवीर संस्थानात शेती विषयक नवनवीन प्रयोग राबवून शेती उत्पादन वाढीला चालना देणे.

शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी नवनवीन क्षेत्रे शोधण्याचा त्यांचा प्रयत्न होता. शेती उत्पादन वाढीसाठी शाहू महाराजांनी करवीर संस्थानात अनेक उपाययोजना केल्या पाणीपुरवठ्याच्या सोयी, सुधारित बी बियाणे, पीक पद्धतीत बदल,शेती संशोधनाला चालना,कृषी प्रदर्शने व त्यामधून शेती विषयक माहितीची देवाण-घेवाण इत्यादी प्रयोग त्यांनी आपल्या संस्थानात केले.सन १८९६ च्या दुष्काळात शेतकऱ्यांना पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे व सिंचन क्षेत्रात वाढ व्हावी म्हणून गावोगावी विहिरी, तलाव खोदले, नदी, नाले ,ओढे यावर गावकऱ्यांच्या साह्याने बंधारे बांधून शेतीला पाणी उपलब्ध करून दिले हे बंधारे त्यांनी गावकऱ्यांच्या सहकार्याने बांधून ग्रामीण भागात श्रम सहकाराची संकल्पना राबवली. शाहू महाराजांनी कोल्हापूर इलाख्यात जे बंधारे बांधले त्यावरून आजच्या काळात महाराष्ट्र सरकार बंधारे बांधते. कोल्हापूर पद्धतीचे बंधारे ही शाहू महाराजांची आधुनिक महाराष्ट्राला दिलेली देणगी होय. दुष्काळावर कायमस्वरूपी मात करण्यासाठी राधानगरी धरणाचे बांधकाम सुरू करून करवीरभूमी सुजलाम सुफलाम करण्याचा प्रयत्न त्यांनी.

ISSN No. 2394-5990

शेती आणि शिक्षण :

राजर्षींनी सन १९१७ साली आपल्या संस्थानात प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केले होते.परंतु तत्पूर्वीच राजर्षींनी शेती शिक्षणाला उत्तेजन देण्याचे प्रयत्न आपल्या संस्थानात केले होते.१८९६ साली राजर्षींनी राजाराम हायस्कूलमध्ये शेती हा नवीन विषय सुरु केला होता. जेणेकरून विद्यार्थ्यांना लहान वयातच शेतीची गोडी निर्माण व्हावी, शेतीच्या विकासासाठी शेतीत आधुनिकता येण्याची गरज आहे हे ओळखून राजर्षींनी १९०६ साली पी.सी. पाटील या मुलास पुणे येथील एग्रीकल्चर कॉलेजमध्ये शेती शिक्षणासाठी पाठवले होते. शेती शिक्षणाची सुरुवात आपल्या घरातूनच राजर्षींनी केली होती. आपल्या युवराजांना म्हणजेच राजाराम महाराजांना राजर्षींनी इंग्लंडमधील शिक्षणात शेती विषय घेण्यास लावले होते. शेती शिक्षणाच्या सुधारित पद्धतीची माहिती संस्थानातील जनतेला करून देण्यासाठी राजर्षींनी १९१२ साली 'दि किंग एडवर्ड एग्रीकल्चर इन्स्टिट्यूटची स्थापना' कोल्हापुरात केली.

जमिनीच्या विभाजीकरणाला विरोध :

भारतातील शेती उत्पादन वाढीच्या मार्गातील महत्त्वाचा अडसर म्हणजे जमिनीचे तुकडीकरण होय. भारतात परंपरेने जमिनीची वाटणी होते. परिणामी जमिनीचा आकार लहान होत जातो.लहान आकाराच्या जमिनीत आधुनिक तंत्रज्ञानाचा व यंत्राचा वापर करणे शेतकऱ्याला शक्य होत नाही त्यामुळे शेती उत्पादनात मोठ्या प्रमाणात घट घडून येते. राजर्षींच्या मते, शेतकऱ्यांनी आपापसात जमिनी वाटून घेतल्यामुळे शेतकऱ्यांची जमीन धारणा क्षेत्र लहान झाले होते. आणि जर शेती उत्पादन वाढवायचे असेल तर जमिनीचा आकार मोठा असणे गरजेचे आहे.आणि म्हणून राजर्षींच्यासंस्थानातील सर्व इनामी अविभाज्य केली ज्यामुळे शेत जमिनीची वाटणी होऊन त्याचे तुकडे होणार नाही व लोक फक्त इनामांवर अवलंबून न राहता इतरत्र काम धंदा सुरू करतील. २२ मार्च १९२० रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली माणगाव येथे जी अस्पृश्य जनतेची परिषद भरलेली होती त्यामध्ये प्रमुख वक्ते म्हणून बोलताना, तेथील जनतेला उद्देशून राजर्षी म्हणाले होते, आज सर्व लोक वतनाच्या मागे लागत आहेत ते वतन तरी किती एक दोन आरे जमीन अगर पाठीवर धान्य यात कोणाचे पोट भरत नाही परंतु अशा स्थितीत वतनाच्या अशाने गावी राहणे भाग पडल्याने पोट भरण्याकरिता चोऱ्या वगैरे गुन्हे करण्याशिवाय त्यांना दुसरा मार्गच उरला नाही म्हणूनच मी सर्व बलुतेदारांस व महार वगैरे वतन दारास अशी विनंती केली की अशी लहान लहान वतने व बलुते यांच्यामागे तुम्ही लागू नका अशाप्रकारे राजर्षींनी कायदा व समाज जागृती करून जमिनीच्या विभाज्यीकरणाला विरोध करून लागवडी योग्य जमिनीचे आकारमान वाढविल्याचे दिसून येते.

शेतीच्या आधुनिकीकरण व प्रयोगशील वृत्ती :

कोल्हापूर संस्थान पूर्णतः शेतीवर आधारित संस्था होते. शेतीवर अतिरिक्त लोकसंख्येचा भार निर्माण झाला होता. त्यातच पारंपारिक शेती केली जात असल्याने छुप्या बेकारीचे प्रमाण देखील मोठे होते म्हणून राजर्षींनी शेतीतील अतिरिक्त मजुरांना उद्योग धंद्याकडे वळविण्याचा यशस्वी प्रयत्न केला होता तसेच परंपरागत शेतीतून प्रगती नाही हे ओळखून शेतीत नवनवीन तंत्रज्ञान यंत्रे व बी बियाण्यांचा वापर करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहना बरोबरच अत्यल्प व्याजाने कर्ज पुरवठा सुद्धा केला होता. जेणेकरून शेतीचे आधुनिकीकरण होऊन संस्थानातील शेती उत्पन्ना बरोबरच शेतकऱ्यांची परिस्थिती देखील सुधारेल व त्याचबरोबर छुपी बेकारी कमी झाल्याने उद्योगधंद्यांचा देखील विकास होईल. राजर्षींनी संस्थानात वेगवेगळ्या ठिकाणी पिके घेण्याचा प्रयत्न केला परंतु प्रयोगामध्ये अनेक वेळा राजर्षींना तोटा देखील सहन करावा लागला.

कृषी संघटनांची बांधणी :

कोल्हापूर संस्थानातील शेतकऱ्यांनी शेतीतून उत्पादित केलेला माल विकण्यासाठी त्यांच्याकडे संघटनांचा अभाव होता. त्यामुळे या शेतकऱ्यांचे सावकार दलाल व्यापारी मोठ्या प्रमाणात शोषण करीत होते यावर उपाय म्हणून शेतकऱ्यांना संघटनांचे महत्त्व लक्षात यावे त्यांना गरजेनुरूप भांडवलाचा अल्प व्याजाने पुरवठा व्हावा व त्यातून कृषी संघटनांची बांधणी व्हावी म्हणून १९१२साली संपूर्ण कोल्हापूर संस्थानात मोठ्या प्रमाणात सहकारी कृषी पतपेढ्या निर्माण केल्या ज्यामुळे शेतकऱ्यांना अल्प व्याजदराने कर्ज पुरवठा होऊ लागला व संस्थानात कृषी संघटनांच्या बांधणीला चालना मिळाली. आज आज कोल्हापुरात शाहू मार्केट यार्ड हे राजर्षींनीच्या विचारातून उभे राहिलेले दिसून येते.

निष्कर्ष :

राजर्षींनी आपल्या संस्थानात शेती विकासा संदर्भात राबविलेली सर्व धोरणे व कार्यक्रम हे त्यांच्या कृतीरूपी शेती अर्थशास्त्राचा एक भाग बनून गेला होता. शाहू महराज हे अर्थशास्त्राचे प्रत्यक्ष विद्यार्थी नसले तरी त्यांनी त्यांच्या कारकिर्दीत अर्थशास्त्राच्या सर्वच क्षेत्रामध्ये (उ.दा. शेती, सहकार,उद्योग, मूलभूत सोई -सुविधा, सेवा क्षेत्र, राजस्व इत्यादी.) कृतीद्वारे आमुलाग्र बदल घडून आला.

संदर्भ:

१) "History of Economics Thought' Bhatia H.L., Vikas publishing House Pvt.ltd.,New Delhi,Edi. 4 th 1982.

२) आर्थिक विचारांचा विकास डॉ. कविमंडन विजय, श्रीमंगेश प्रकाशन नागपूर.

३) 'अर्थशास्त्रीय विचारांचा विकास' के. बी. काटे. अजब पुस्तकालय कोल्हापूर

४) History of Economics Thought Dr.Bhattchary Gopinath, prakashan Kendra, Lucknow.

५) A History of Economics Thought Dr.Bhatnagar K.P. Bahadur Satish,Mudgal B.S, Kishor Publishing House,Kanpur.

६) https://mr.wikipedia.org/wiki/%E0%-4%B6%E0%-4%BE%E0%-4%B9%E0%-5%82š%E0%-4%-E%E0%-4%B9%E0%-4%BE%E0%-4%B0%E0%-4%BE%E0%-4%9C

७) ttps://marathi.abplive.com/news/maharashtra/chhatrapati-rajarshi-shahu-maharaj-know-about-shahu-maharaj-kolhapur-maharashtra-1056669

■■■

ISSN No. 2394-5990

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे बेधडक व्यक्तिमत्त्व : एक अभ्यास

प्रा. डॉ. गोवर्धन कृष्णाहरी दिकोंडा
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग
कला व वाणिज्य महाविद्यालय, माढा
मोबाईल - ९०२१२०७३३६
ईमेल - govardhan.docs@gmail.com

गोषवारा :

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या व्यक्तिमत्त्वात अनेक गुण संपन्न होते. महाराजांनी आपले व्यक्तिमत्त्व प्रत्यक्ष अभ्यास, कृती, अनुभव आणि विचार यांच्या माध्यमातून घडविले आहे. त्यांनी त्यांच्या जीवनात जे जे संकट, समस्या, प्रसंग, घटना अनुभवले त्यातून ते जे सकारात्मक, योग्य होते ते स्वीकार करून निर्भीड, धाडसी आणि बेधडक व्यक्तिमत्त्व बनविले आहे. शाहू महाराजांनी आपल्या हयातीत व्यक्तिमत्त्वाला कोणतेही गालबोट लागेल असे कधी कृती केली नाही. त्यांनी खर्या अर्थाने लोकांचा राजा म्हणजे लोक राजा म्हणून आपले जीवन व्यतीत केले. असे अजरामर व्यक्तिमत्त्व आपल्या महाराष्ट्र व देशाला लाभले, हे एक अहोभाग्यच आहे. त्यांच्या विचारांचा आणि व्यक्तिमत्त्वांचा प्रभाव अनेक लोकांवर पडला आहे आणि आजही त्यांचा प्रभाव कायम राहिला आहे.

सूचनक शब्द (Key-Words) : अस्पृश्यता निवारण, आत्मचरित्र, घोंगडी, महावस्त्र

प्रस्तावना :

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या व्यक्तिगत जीवनात असे अनेक प्रसंग, घटना, समस्या आणि संकट आले होते की त्यांना त्या त्या क्षणी समर्पक असे निर्णय घ्यावे लागत होते. शाहू महाराजांनी अशा प्रसंगी कायम स्वरूपी जनतेचे भले कसे होईल असे परिपूर्ण व सर्वांगीण विचार करून निर्णय घेऊन योग्य त्या प्रसंग, घटना, समस्या आणि संकटाला सामोरे जाऊन न्याय दिला होता. त्यातून त्यांचे बेधडक असे व्यक्तिमत्त्व निदर्शनास आले आहे. त्या प्रसंग, घटना, समस्या आणि संकट काळातील काही निवडक प्रसंग, घटना, समस्या आणि संकट या संशोधन लेखात संशोधक सादर करत आहे. या माध्यामातून राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे बेधडक व्यक्तिमत्त्वाचे स्वतंत्र अभ्यास करणे आजही आवश्यक वाटते.

राजर्षी छत्रपती शाहू महराजांच्या काळातील काही निवडक प्रसंग, घटना, समस्या आणि संकट :

अस्पृश्ता निवारण :

एकदा सोनतळी येथील कॅम्प ठिकाणी तेथील तलाव कोरडा पडल्याने पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली होती. त्यामुळे साहजिकच तेथे राहणार्या स्पृश्य आणि अस्पृश्य नागरिक यांना पाण्याच्या समस्येला सामोरे जावे लागले. या समस्येचे निवारण म्हणून तत्कालिक उपाययोजना म्हणून स्पृश्य नागरिकांनी त्यांच्या ताब्यात असलेल्या कॅम्प मधील सार्वजनिक हौदात पाणी भरत होते. या हौदातील पाणी अस्पृश्य नागरिकांना देणे आवश्यक होते. परंतु स्पृश्य नागरिक त्यांना पाणी देत नव्हते. एके दिवशी अस्पृश्य नागरिकांनी त्या सार्वजनिक हौदातील पाण्यास शिवाशिव केले होते म्हणून त्यांच्यात मोठया प्रमाणात भांडण झाले होते. सदर भांडणाचे प्रकरण महाराजांना समजले.

महाराजांनी शिवलेल्या त्या सार्वजनिक हौदाजवळ गेले. तेथील एका गोंविंदा नामक हरिजन नोकरास उद्देशून म्हणाले, 'गोविंदा', ''त्या शिवलेल्या हौदातील पेलाभर पाणी आण! कारण ते कसे लागते ते मी पाहणार आहे.'' गोविंदा नोकरास महाराजांना पाणी देण्यास धाडस होईना. मग स्वत:हून शाहू महाराज त्या हौदाजवळ गेले. त्यातील पाणी घेतले आणि ते त्यांनी प्याले. त्यानंतर त्यांनी त्यांच्या कॅम्प मधील अधिकार्यांना उद्देशून म्हणाले, ''काय माने, महाराने हौदाला शिवले म्हणून त्या हौदातील पाणी काही कडू लागत नाही ! अरे, जनावरांनी शिवलेले पाणी मात्र आम्ही पितो; मग महारांनी पाणी शिवले म्हणून ते पाणी बिघडले काय? महार काय नि - सारी स्पृश्य मंडळी काय - सारी माणसंच ! शिवाशिव मानण हा देवाघरचा गुन्हा आहे !''

त्यांच्या या व्यक्तव्यामुळे तेथून पुढे कॅम्प मधील ते सार्वजनिक हौद कायम स्वरूपी सर्वांना खुला झाला. महाराजांनी स्वत: स्पृश्य आणि अस्पृश्यता बाबत कोणताही भेदाभेद पालन करत

नसल्याचे त्यांच्या कृतीतून त्यांच्या नागरिकांना, अधिकारी यांना अस्पृश्ता निवारणाचे कृत्य निदर्शनास आणून दिले.[१]

स्वस्तुती अमान्य :

काही जणांना आपल्या हयातीतच आपले चरित्र लिहावे आणि आपली स्तुती आपणच दुसर्यांकडून ऐकावे तसेच आजच्या काळात आपल्याच चरित्र लेखनास व्यावसायिक स्वरूप देऊन 'अर्थपूर्ण' लाभ प्राप्त करून घेण्याचा मोह अनेकांना आहे आणि असतो. राजर्षी छत्रपती शाहू महाराज या अशा तात्कालिक मोह तथा स्वस्तुती बाबत फार कट्टर होते. श्री. बी. एल. पाटील नावाचे राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या बाबत चरित्र लिहणेसाठी एकदा महाराजांच्याकडे आले होते, ते महाराजांना म्हणाले, ''महाराज, मी तुमचे चरित्र लिहिणार आहे; तेव्हा मला तुमचे चरित्र लिहिण्यास परवानगी द्यावी.'' महाराज प्रत्युत्तरादाखल म्हणाले, ''हे पहा पाटील, चरित्र लिहिण्यासारखे मी कोणते मोठे कार्य केले आहे? त्यामुळे माझ्या चरित्राची सर्वच पाने तुम्हास कोरी ठेवावी लागतील.''

श्री. बी. एल. पाटील महाराजांचे चाहते असल्याने पुन्हा एकदा पोटतिकडीने विचारले, ''ते काही का असेना; तुम्ही परवानगी द्या म्हणजे झाले.'' त्यावर महाराज म्हणाले, ''माझे चरित्र तुम्हास लिहावयाचेच असेल, तर ते मी मेल्यानंतर लिहा! कारण, त्या वेळी माझ्या गुणदोषांचे विवेचन तुम्हास मोकळया मनाने करता येईल. त्यापासून लोकांना एक चांगला धडा तरी मिळेल.'' त्यामुळे शाहू महाराजांच्या मृत्यूनंतरच त्यांचे चरित्र लिहावे लागेल.[२]

सामान्य माणसाप्रमाणे राहणे हेच माझे जीवन :

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी नवीन राजवाडा बांधला होता. तसेच राज्यकर्ते असल्याने जेथे राजघराण्यातील व्यक्तींसाठी योग्य तो फर्निचरची व्यवस्था केलेली असते. त्यामुळे राजवाड्यात प्रत्येक वास्तूत तथा प्रत्येक खोलीत फर्निचर पुष्कळ होते. पण राजर्षी छत्रपती शाहू महाराज प्राप्त महितीनुसार या फर्निचरचा कधीच उपयोग करत नसत. महाराज दिवसा व रात्री मोकळ्या वातावरणात वावरत असत. एकदा रात्री त्यांचे राजवाडच्या बाहेर मोकळ्या वातावरणात अंथरूण घाणे चालू होते. काही नवीन मंडळी जे यापूर्वी महाराजांना रात्रीवेळी असे कधी पाहिले नव्हते. त्यांपैकी एकजण म्हणाले, ''महाराज, लहानात लहान संस्थानिक सुद्धा सोफा, खुर्ची, पलंग वगैरे शिवाय बसत उठत नाहीत. आपण तर गजान्त लक्ष्मीचे मालक ! छत्रपती आहात! मग हे असे का ?'' महाराज म्हणाले, ''मी काय कैदी आहे ? तो या फर्निचरांशी मी स्वत:ला जखडून घेऊ ? उघडी जागा सोडून मी इमारतीत निजू लागलो तर लगेच आजारी पडतो. मी अमीरीत जन्माला आलो; पण फकीरी बाण्याने राहण्याची सवय झाल्यामुळे मला आता तेच बरे वाटू लागले आहे.!'' या त्यांच्या कृतीवरून महाराज अगदी सामान्य माणसाप्रमाणे जीवन जगत असे.[३]

तुमचा पुढारी तुमचा नोकर असावा :

नागपूरचे नेते तथा पुढारी मेसर्स गवई, कालिचरण व केशवराव कंदाहारे हे कोल्हापुरास राजर्षी छत्रपती शाहू महाराजांना भेटण्यास आले. त्या वेळी महाराज सोनतळी कॅम्प येथे होते. महाराजांनी त्यांना सोनतळी कॅम्प येथे बोलविले. कॅम्प येथे त्यांची उत्तम व्यवस्था केली होती. या आदरतिथ्यामुळे पाहुणे मंडळी भारावून गेली. त्यांनी महाराजांना साष्टांग नमस्कार केला. ते म्हणाले, ''आजच्या बिकट परिस्थितीत महाराजांनी आमचा पुढाकार घ्या. कारण, आपल्याशिवाय आम्हा निराश्रित वर्गाची दाद लागणार नाही.''

महाराज म्हणाले, ''मी तुमची सेवा करण्यास केव्हाही तयार आहे; पण हल्ली तुमचे जे पुढारी आहेत, ते तसेच असू देत. मात्र पुढारी हा घोडेवाल्याप्रमाणे असावा. घोडेवाला घोड्याच्या मालकास गाडी जुंपून देतो. तो स्वत: खालून चालतो. अडथळा आल्यास तो घोड्याच्या मालकाच्या मदतीस जातो. घोड्याच्या मालक म्हणजे जनता; घोडेवाला म्हणजे पुढारी. तेव्हा पुढार्यांनी हे जाणून तुमच्या चळवळीचा लगाम तुमच्या हातात द्यावा; अडल्यास मदत करावी. थोडक्यात म्हणजे तुमचा पुढारी तुमचा नोकर असावा; त्याने मालक होण्याची महत्त्वाकांक्षा आपल्या मनात कधी धरू नये.''[४]

घोंगडी हेच आमचे महावस्त्र :

एकदा श्रीमत क्षात्रजगद्गुरु राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्याकडे आले होते. तेव्हा हिवाळा ऋतु चालू होता. महाराजांनी त्यावेळी घोंगडी पांघरली होती. ते पाहून क्षात्रजगद्गुरु थोडे हसले. त्यावर महाराज म्हणाले, ''यात हसण्यासारखे काय आहे? घोंगडी हे तर आमचे महावस्त्र ! आज रायगडावर, तर उद्या पन्हाळागडावर, तर परवा रांगण्यावर; असा प्रकार शककर्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कारकिर्दीपासून सुरू होता. त्यावेळी प्रत्येक किल्ल्यावर काय कोच थोडे होते ? खाटले टाकले व त्यावर घोंगडी पसरली की झाले छत्रपतींचे सिंहासन! शिवाय, ही गादी मावळे वगैरे घोडेवाल्यांनीच मिळविली; मग घोंगडीचे पांघरूण घेण्यास आम्हास लाज वाटण्याचे काय कारण?''[५]

सर्व जनतेचा राजा :

इसवी सन १९२० या काळात बडोद्याचे एक सन्माननीय असामी व्यक्ति महाराजांकडे पाहुणे म्हणून आले होते. त्यावेळी

ISSN No. 2394-5990

महाराज सोनतळी येथील कॅम्प येथे होते. त्यांच्यासाठी खास भोजनाची व्यवस्था केली होती. जेवण तयार होते. त्यावेळी भोजनास सर्व जातीचे लोक एकाच पंक्तिक बसले होते. बडोद्याचे सदर सन्माननीय असामी व्यक्ति महाराजांना म्हणाले, ''महाराज आपण अस्पृश्यांची चळवळ सुरू केली आहे, ती सोडून द्यावी. आपला मराठा समाजच इतका मोठा आहे की, केवळ मराठ्यांच्या उन्नतीकरिता सर्व चळवळ महाराजांनी हाती घेतली, तरी महाराजांचा खजिना पुरणार नाही. मग अस्पृश्योउद्धाराची कसली चळवळ करायची?'' प्रथम या बोलण्याकडे महाराजांनी दुर्लक्ष केले. पण पाहुण्यांनी पुन:पुन्हा तोच विषय काढला. मग महाराज म्हणाले, ''मी केवळ मराठा समाजासाठी चळवळ केली व दुसर्या उपेक्षित समाजाकडे दुर्लक्ष केले, तर मला मराठ्यांचा राजा म्हणतील; कोल्हापूरचा राजा म्हणणार नाहीत!'' यावर बडोद्याचे एक सन्माननीय असामी व्यक्ति निरुत्तर झाले. त्यांना महाराजांचे म्हणणे पटले.[६]

संशोधन पद्धती :

उपरोक्त संशोधन लेखासाठी अभिलेख संशोधन पद्धतीचा उपयोग करण्यात आलेला आहे. याकरीता प्राथमिक व दुय्यम साधनांचा अभ्यास केलेला आहे.

संशोधन आणि चर्चा :

प्रस्तुत काळात जागतिक, देश, राज्य व स्थानिक पातळीवरील अनेक महनीय व्यक्तिमत्त्व पाहता राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्यासारखे सर्वांगीण, परिपूर्ण, धाडसी, बेधडक विचार करणारा व सदर योग्य तो सकारात्मक विचार कृतीत आणून जनतेची नेतृत्त्व करणारा दिसून येत नाही. शाहू महाराजांनी वयाच्या २० व्या वर्षी राज्याच्या अधिकारग्रहणाची सूत्रे हातात घेतली. याच २० व्या वर्षाच्या आत त्यांचे विवाह झाले होते आणि शिक्षण चालू होते, तसेच ते भारत भ्रमण व विविध देशांना भेटी दिल्या. त्यांनी भारत भ्रमण आणि विविध देशांच्या भेट दिल्यामुळे त्यांना जनतेची खरी समस्या व दु:ख दिसून आले. तशा प्रकारचे समस्या व दु:ख आपल्या कोल्हापूरच्या जनतेला येवू नये म्हणून महाराज बिनधास्त व बेधडक निर्णय घेऊन कोल्हापूरच्या जनतेला न्याय देण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे त्यांच्या बेधडक व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकणे सध्याच्या काळाची गरज आहे म्हणून संशोधक राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्यावर संक्षिप्त स्वरूप लेख लिहिण्याचे प्रयत्न केला आहे.

निष्कर्ष :

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचा काळ स्वातंत्र्यपूर्व काळाचा होता तसेच त्यांचे संस्थानिक राज्य ब्रिटीशांच्या अधिपत्याखाली होते. अशा परिस्थितीत महाराज ब्रिटीशांच्या आधुनिक विचारसरणीला जुळवून घेऊन आणि कोल्हापूरच्या जनतेला त्यांच्या परिस्थितीत सुधारणा घडवून आणणेसाठी अनेक क्रांतीकारक सुधारणत्मक धोरणे राबवून न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. या प्रयत्नात असताना त्यांना त्यांचे जवळचे नातेवाईक, सहकारी, व काही इतर प्रकारचे विचारसरणी असलेले लोक काही प्रसंगी, घटना, समस्या आणि संकट काळी वेगवेगळ्या तर्हेचे प्रश्न विचारणे किंवा त्यावरून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे परीक्षा घेत होते, अशावेळी शाहू महाराजांनी आपल्या धाडसी व बेधडक त्या त्या वेळी आणि त्याच ठिकाणी आपल्या व्यक्तिमत्त्वातून संबंधितांचे बोलती बंद केली होती. त्यांच्या या बेधडक व्यक्तिमत्त्वातून कोणत्याही मनुष्याला अशा प्रसंगी, घटना, समस्या आणि संकट काळी न डगमगता स्वच्छ आणि थेट विचार मांडून आपले व्यक्तिमत्त्व सिद्ध करणे आवश्यक आहे. शाहू महाराजांनी त्यांच्या प्रत्यक्ष कृतीतून असा वारसा सर्वांना उपलब्ध करून दिली असे म्हणावयास हरकत नाही.

संदर्भ :

१) डॉ. नीलम ताटके, महाराष्ट्रातील समाजसुधारक, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २००९, पृ. ७-८

२) तुकाराम नाईक, छत्रपती राजर्षी शाहू महाराज, युनिव्हर्सल पब्लिकेशन्स, कोल्हापूर, १९७४, पृ. १२५-१२६

३) कित्ता, पृ. १२६

४) धनंजय कीर, लोकमान्य टिळक आणि राजर्षी छत्रपती शाहू महाराज, श्री गजानन बुक डेपो प्रकाशन, मुंबई, पृ. ८१

५) तुकाराम नाईक, छत्रपती राजर्षी शाहू महाराज, तत्रैव, पृ. १२६

६) तुकाराम नाईक, छत्रपती राजर्षी शाहू महाराज, तत्रैव, पृ. १२५

■■■

राजर्षी शाहू महाराजांचे महाराष्ट्राच्या सामाजिक व राजकीय विकासातील योगदान

प्रा.डॉ.दादासाहेब दामोधर हाके
सहाय्यक प्राध्यापक,राज्याशात्र विभाग
कला व वाणिज्य महाविद्यालय,माढा जि-सोलापूर
ईमेल- dadasahebhake@gmail.com मोबाईल- ९८५०२१३७९३

प्रस्तावना :

प्रस्तुत शोधनिबंधात राजर्षी शाहू महाराजांचे महाराष्ट्राच्या सामाजिक व राजकीय विकासातील योगदानाचे विवेचन करण्यात आलेले आहे. छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या अठ्ठावीस वर्षांच्या कारकिर्दीत अनेक उल्लेखनीय कामे केली. आपणास मिळालेल्या या सत्ता व अधिकाराचा उपयोग संस्थानामधील सामान्यजनांच्या हितासाठी करण्याचा प्रयत्न केला. जातिसंस्थेच्याद्वारे निर्माण झालेली सामाजिक विषमता दूर करून समाजातील दुर्बल घटकांना न्याय मिळवून देण्याच्या हेतूने त्यांनी बहुजन समाजाचे नेतृत्व स्वीकारले. संस्थानातील समाजव्यवस्थेत बदल घडवून आणण्याचे प्रयत्न केले. २ एप्रिल, १८९४ रोजी अधिकार ग्रहण करताना छत्रपती शाहूंनी प्रजाजनांना जाहीर केले की, आमचे प्रजानन सदा सुखी व संतुष्ट असावेत. त्यांच्या हिताची एकसारखी अभिवृद्धी होत जावी व आमच्या संस्थानचा सर्व बाजूंनी अभ्युदय व्हावा, अशी आमची उत्कट इच्छा आहे. यासाठी सर्वांच्या उज्ज्वल राजनिष्ठेची व सहकार्याची आम्हाला आवश्यकता आहे. या घोषणेवरूनच महाराजांनी प्रजाजनांविषयीची कळकळ व कार्य करण्याविषयी त्यांची इच्छा स्पष्ट होते.जातिनिर्मूलन, अस्पृश्योद्धार या कार्याबरोबर समाजातील स्त्रियांची स्थिती सुधारण्याच्या कार्याला महाराजांनी महत्त्व दिले. स्त्रीशिक्षणाला त्यांनी चालना दिली. स्त्रिया शिक्षित झाल्यास कुटुंब, समाज व पर्यायाने देशाचा विकास होईल असा त्यांचा विश्वास होता.जातिनिर्मूलन, अस्पृश्योद्धार, स्त्रीशिक्षण, ब्राह्मण्याला विरोध, ब्राह्मणेतरांची जागृती इत्यादी क्षेत्रांत नवीन आचार व विचारांना प्रेरणा देऊन त्यांनी सामाजिक जीवनांचे चित्र बदलण्याचा प्रयत्न केला. सामाजिक क्षेत्रातील या कार्याला होणाऱ्या विरोधामुळे प्रसंगी राजत्याग करण्याची वेळ आली तरी त्यास सामोरे जाण्याचा महाराजांनी मनोमन निश्चय केला. आपल्या या ध्येयधोरणापासून ते क्षणमात्रही विचलित झाले नाहीत.

छत्रपती शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य

महात्मा फुले यांच्याप्रमाणेच सामाजिक सुधारणेच्या कार्यात त्यांनी शिक्षणाला प्रमुख स्थान दिले. शाहू महाराजांनी अधिकारग्रहण केले त्या वेळी बहुजन समाजात शिक्षणाचे प्रमाण अल्प होता. खेड्यांमधून प्राथमिक शाळा नव्हत्या. सर्वसामान्य बहुजन समाज अज्ञानाचे व अंधश्रद्धेचे जीवन जगत होता. शिक्षण घेणे हे ब्राह्मण किंवा श्रीमंत सावकाराचे काम आहे. ज्ञानाच्या क्षेत्रात ब्राह्मण जातीची मक्तेदारी ब्रिटिशपूर्व काळापासून निर्माण झालेली होती.

इंग्रजांनी विद्येची प्रवेशद्वारे सर्व जातींसाठी खुली केली; तथापि, पूर्वीपासून ज्यांना विद्याभ्यासाची परंपरा नव्हती त्यांना या नव्या संधीचा लाभ घेता आला नाही. छत्रपती शाहू महाराजांनी या अज्ञानी बहुजन समाजात ज्ञानाची ज्योत प्रज्वलित करण्याचा निश्चय केला. बहुजन समाजाला, स्त्रियांना सुशिक्षित करण्यासाठी प्राथमिक शिक्षणापासूनउच्च शिक्षणापर्यंत सोय उपलब्ध करण्याचे धोरण त्यांनी आखले. बहुजन समाजाच्या शैक्षणिक प्रगतीत येणाऱ्या सर्व अडचणीवर मात करण्याचे त्यांनी ठरविले. शिक्षण हाच आमचा तरणोपाय आहे असे माझे ठाम मत आहे. शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती झाली नाही असे इतिहास सांगतो. अज्ञानात बुडून गेलेल्या देशात उत्तम मुत्सद्दी व लढवय्ये वीर कधीही निपजणार नाहीत, म्हणूनच सक्तीच्या व मोफत शिक्षणाची हिंदुस्थानला अत्यंत आवश्यकता आहे अशी छत्रपती शाहू महाराजांची विचारसरणी होती.

प्राथमिक शिक्षणाला प्राधान्य :

बहुजन समाजाचा शैक्षणिक विकास घडवून आणण्यासाठी महाराजांनी योजनाबद्ध आखणी केलेली दिसते. प्राथमिक शिक्षणाचा पाया दृढ केल्यानंतर उच्च शिक्षणापर्यंत वाटचाल करण्याचा त्यांचा निश्चय होता. शिक्षणाविषयी शिक्षकाच्या मनात आस्था निर्माण व्हावी यासाठी त्यांनी शिक्षकांची पगारावर नेमणूक सुरू केली. प्रत्येक गावात निदान एक तरी शाळा असावीम्हणून सन १९१३ च्या आदेशानुसार अनेक खेड्यांमध्ये मंदिरे, चावडी, धर्मशाळा या इमारतींमधून प्राथमिक शाळा सुरू केल्या. बहुजन समाजाच्या सर्वांगीण हितासाठी. प्राथमिक शिक्षणाद्वारे छत्रपती शाहू महाराज व्यापक बैठक तयार करीत होते.त्या दृष्टिकोणातूनच

ISSN No. 2394-5990

त्यांनी निरनिराळ्या शिक्षणसंस्था व व्यक्तींना आर्थिक सहकार्य केले. त्यामुळेच कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षणाचा मोठ्या प्रमाणावर विकास झाला.

उच्च व व्यवसाय शिक्षण:

प्राथमिक शिक्षणाप्रमाणेच छत्रपती शाहू महाराजांनी माध्यमिक व उच्च शिक्षणालाही महत्त्व दिले. सन १८५१ मध्ये कोल्हापूर येथे सुरू झालेल्या एका इंग्रजी शाळेचे सन १८८१ साली राजाराम महाविद्यालयात रूपांतर झाले. दरबारातर्फे या महाविद्यालयाला दरवर्षी ५०,००० रुपये देण्यास सुरुवात झाली. वा महाविद्यालयात शिक्षण घेणार्या विद्यार्थी व विद्यार्थिनींची संख्या वाढत गेली.

प्राथमिक, माध्यमिक व उच्च शिक्षणाप्रमाणेच शाहू महाराजांनी व्यावसायिक शिक्षणालाही महत्त्व दिले. ग्रामाचा कारभार व्यवस्थित चालविला जाण्यासाठी महाराजांनी 'पाटील स्कूल व तलाठी स्कूल' सुरू केले. या शाळांमधून पाटील व तलाठ्यांना सर्वसाधारण जमाखर्च, कायदे शांतता व सुव्यवस्था, महसूलविषयक दक्षता इत्यादी विषयांचे शिक्षण दिले जात असे. शैक्षणिक प्रगतीत शिक्षक हा महत्त्वाचा घटक असल्याने या शिक्षकांसाठी 'प्रशिक्षण केंद्र' सुरू केले. तांत्रिक शिक्षणाची समाजात आवड निर्माण व्हावी म्हणून 'जयसिंगराव घाटगे टेक्निकल इन्स्टिट्यूट'ची स्थापना केली. या संस्थेत विद्यार्थ्यांना लोहारकाम, गवंडीकाम, सुतारकाम यांसारख्या विषयांचे शिक्षण दिले जाई. विद्यार्थ्यांना लष्करी जीवनाविषयी आवड निर्माण व्हावी म्हणून लष्करी शिक्षण देणारे 'इन्फैंट्री स्कूल' सुरू केले. विद्यार्थ्यांमध्ये व्यायाम व लष्करी शिक्षणाची आवड निर्माण केली. या विविध शिक्षणसंस्थांद्वारे बहुजन समाजाला विविधांगी शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध करून देण्याचे श्रेय छत्रपती शाहू महाराज यांनाच द्यावे लागते.

महाराजांचे सामाजिक सुधारणेचे कार्य :

छत्रपती शाहू महाराजांच्या अगोदर-सामाजिक जीवनात जातिव्यवस्थेचे प्राबल्य होते. जातिभेदाच्या परंपरेमुळे भारतीय समाजात राजकीय किंवा सामाजिक जीवनात एकता अस्तित्वात नव्हती. समाजात उच्च मानल्या गेलेल्या जातींनी परंपरेच्या आधारे व धार्मिक बंधनाद्वारे कनिष्ठ जातींवर अनेक बंधने लादली होती. या जातिभेदामुळे समाजातील व्यक्तींना माणूस म्हणून असलेले अधिकारही मिळत नव्हते. त्यामुळेच राष्ट्रीय व सामाजिक ऐक्य नष्ट करणारा हा जातिभेद दूर करण्याचा महाराजांचा विचार होता. महाराष्ट्रात या अगोदरच राजकीय व सामाजिक सुधारणा याविषयी वाद निर्माण झाला होता. सामाजिक सुधारणा नंतर करता येतील पण प्रथम स्वातंत्र्य मिळविले पाहिजे असा लोकमान्य टिळकांचा आग्रह होता. शाहू महाराजांच्या मते हा वादच मूलतः चुकीचा होता. कारण, या दोन्हीही सुधारणा एकच असून समाजजीवनाच्या रथाची ही दोन चाके आहेत. त्यांच्या मते, ब्रिटिशांच्या वर्चस्वाविरुद्ध यशस्वी स्वातंत्र्य चळवळ करण्यासाठी सर्व जातींना विश्वासात घेणे आवश्यक आहे.महात्मा फुले यांचा संघर्षवाद व न्या. रानडे यांची परंपरानिष्ठ, समन्वयशीलदृष्टी यांची सांगड घालून शाहू महाराजांनी महाराष्ट्रात ब्राह्मणेतर चळवळीची मुहूर्तमेढ रोवली.

जातिभेद ही आपल्या देशाच्या ऐक्याच्या व उन्नतीच्या मार्गातील घोंड आहे. त्यासाठी प्रत्येक जातीने शिक्षण व जागृतीच्याद्वारे आपले सामर्थ्य व संघटन वाढविले पाहिजे असे महाराजांनी बहुजन समाजाला वारंवार सांगितले. जातिभेद निर्मूलनांच्या संदर्भात महाराजांनी केवळ विचारच मांडले नाहीत तर, आपल्या वैयक्तिक आचाराने याविषयी समाजासमोर आदर्श ठेवला. आवश्यक तेथे कायदे करून या विचाराच्या अंमलबजावणीचे कार्य केले.

अस्पृश्योद्धार :

अस्पृश्यता म्हणजे मानवजातीला लागलेला कलंक असून सामाजिक समतेच्या दृष्टीने तो हानिकारक आहे याची जाणीव महाराजांना होती. जन्माधिष्ठित वर्णव्यवस्थेतून अनेक जाती व जातिभेद निर्माण झाले. समाजाचे स्वरूप विस्कळीत बनले. भेदातून द्वेष निर्माण झाला व देशाची एकी नष्ट झाली. याचा परिणाम केवळ धार्मिक अवनती होऊन थांबला नाही तर भारतावर परकीयांच्या स्वाऱ्या होऊ लागल्या. हा भेदाभेद बाहेरच्या शत्रूंना उपयुक्त ठरला. पारतंत्र्याचे बंधन भारतीयांवर कायमचे बसले. विद्या कमी होत गेल्याने व्यापार, उद्योगधंदे, कला-कौशल्य यांचीही अवनती होऊन देशाची दैना झाली असे महाराजांनी मत मांडले. मानवतेच्या व सामाजिक समतेच्या दृष्टीने कलंक असलेली ही अस्पृश्यता नष्ट केली पाहिजे असे महाराजांचे स्पष्ट मत होते. बहुजन समाजातही जे विशेष मागासलेले पीडित व शोषित आहेत त्या अस्पृश्यांच्या उन्नतीकडे त्यांचे विशेष लक्ष होते. अस्पृश्यतेचा हा कलंक दूर करण्यासाठी व अस्पृश्यांची सर्वांगीण उन्नती करण्यासाठी त्याप्रमाणे प्रत्यक्ष आचरण करून अस्पृश्योद्धाराचे कार्य महाराजांनी केले.

जातिबंधने व दारिद्र्य यांनी गांजलेल्या समाजात महाराजांनी शिक्षणाची आवड निर्माण केली. अस्पृश्य मुलांना प्राथमिक शिक्षण मोफत मिळेल अशी व्यवस्था केली. १९०७ साली कोल्हापूर येथे अस्पृश्य मुलांसाठी 'मिस क्लार्क वसतिगृह' सुरू केले. तेथे या विद्यार्थ्यांची मोफत राहण्याची व भोजनाची

व्यवस्था केली. मराठा विद्यार्थ्यांसाठी सुरू केलेल्या 'व्हिक्टोरिया वसतिगृहात' अस्पृश्य व मुसलमान विद्यार्थ्यांचीही सोय केली. पुढील काळात अस्पृश्य विद्यार्थ्यांसाठी असलेल्या या स्वतंत्र शाळा त्यांनी बंद केल्या व स्पृश्य विद्यार्थ्यांच्या शाळांमधूनच या अस्पृश्य विद्यार्थ्यांना समाविष्ट करावे असा हुकूम काढला. सन १९१९ मध्ये काढलेल्या एका हुकमानुसार कोणत्याही शिक्षकांनी शाळेत अस्पृश्यांच्या मुलांची अस्पृश्यता मानावयाची नाही, त्यांना इतर मुलांप्रमाणे वागवावे, समान वागणूक द्यावी अशी आज्ञा दिली. अस्पृश्यांमध्ये शैक्षणिक प्रसार झाला व या जातीला शिक्षणाचे महत्त्व समजले म्हणजे त्यांच्या उन्नतीस खरी सुरुवात होईल असे महाराजांचे धोरण होते.

अस्पृश्यता निवारण्याच्या या कार्यासाठी त्यांनी निरनिराळ्या अस्पृश्यांना संस्थानच्या नोकरीत सामावून घेण्यास, त्यांना या प्रगतीची संधी देण्यास व सामाजिक प्रतिष्ठा देण्याससुरुवात केली. आपली कन्या राधाबाईसाहेब यांच्या विवाह सोहळ्याच्या वेळी वरातीत सरकारी घोडागाडीवर अस्पृश्य व्यक्तीला कोचमन म्हणून बसविले. अस्पृश्यांना शिवणयंत्रे देऊन स्वतंत्र धंदा करण्यास प्रोत्साहन दिले. राजवाड्यातील कपडे त्यांच्याकडून शिवून घेण्यास सुरुवात केली. गंगाधर कांबळे या महार व्यक्तीला कोल्हापुरात मध्यवस्तीत चहाचे दुकान काढून दिले. स्वतः महाराज तेथे जाऊन सर्वांसमोर चहा घेत असत. बेरड, पारधी, रामोशी यांसारख्या गुन्हेगार म्हणून ओळखल्या गेलेल्या जातीतील लोकांबरोबर मैत्री केली. त्यांना संस्थानात नोकरीत घेतले. स्वतंत्र हुकमाच्या आधारेअस्पृश्यांना कचेऱ्या, तळे, विहिरी, धर्मशाळा येथे स्पृश्यांप्रमाणे राहण्याचा व उपभोग घेण्याचा अधिकार दिला. योग्य शिक्षण झालेल्या अस्पृश्य तरुणांना छत्रपती शाहू महाराजांनी वकिलीच्या सनदा दिल्या. अस्पृश्योद्धारासाठी या जातिजमातींच्या ज्या सोई-सवलती दिलेल्या होत्या त्यांच्या संदर्भात त्यांनी कडक कायदे केले. अस्पृश्य जातीतील होतकरू व हुशार विद्यार्थ्यांना महाराजांनी आर्थिक साहाय्य करून त्यांना पुढील शिक्षणाची संधी मिळवून दिली. डॉ. आंबेडकरांना पुढील शिक्षणासाठी त्यांनी आर्थिक सहकार्य केल्याची माहिती मिळते.

छत्रपती शाहू महाराजांनी अस्पृश्योद्धाराच्या बाबतीत केवळ विचारच मांडले नाहीत तर प्रत्यक्ष कृतीही केली. या जातीला समानतेचे अधिकार मिळावेत. त्यांचा विकास व्हावा म्हणून प्रयत्न केले. स्वतःच्या जीवनात अस्पृश्यतेचा स्वीकार केलेला नाही त्यामुळे महाराष्ट्रातील अस्पृश्य समाज महाराजांना देव मानू लागला. त्यांची लोकप्रियता वाढत गेली. निरनिराळ्या परिषदांमधून सामाजिक सुधारणेविषयीचे आपले विचार त्यांनी मांडले. १९२० मध्ये कोल्हापूर संस्थानातील माणगाव येथे त्यांनी अस्पृश्यांची परिषद भरवली. या परिषदेत त्यांनी डॉ.भिमराव रामजी आंबेडकर यांना अस्पृश्यांच्या मुक्ती चळवळीचे नेतृत्व करण्यास प्रोत्साहन दिले. नागपूर, दिल्ली येथे भरलेल्या अस्पृश्यांच्या परिषदांचे अध्यक्षपद त्यांनी स्वीकारले.

छत्रपती शाहू महाराजांना अस्पृश्योद्धाराविषयी स्वीकारलेल्या या धोरणाबद्दल मोठ्याप्रमाणावर टीका सहन करावी लागली. तथापि, मानवता व समतेच्या दृष्टीने कलंक असलेली ही अस्पृश्यता नष्ट करण्याच्या आपल्या प्रयत्नापासून महाराज दूर सरले नाहीत. आपल्या आचार, विचार व ध्येयधोरणाद्वारे त्यांनी समाजासमोर आदर्श ठेवला. अस्पृश्यांना शिक्षणाची प्रेरणा दिली. जागृत केले व आपल्या अधिकारांच्या प्राप्तीसाठी चळवळ करण्यास प्रोत्साहित केले. अस्पृश्यता निवारणाच्या बाबतीत छत्रपती शाहू महाराजांइतके भरीव कार्य कोणत्याही समकालीन नेत्याने किंवा समाजसुधारकाने केलेले दिसत नाही.

जातिनिर्मूलन, अस्पृश्योद्धार या कार्याबरोबर समाजातील स्त्रियांची स्थिती सुधारण्याच्या कार्याला महाराजांनी महत्त्व दिले. स्त्रिया शिक्षित झाल्यास कुटुंब, समाज व पर्यायाने देशाचा विकास होईल असा त्यांचा विश्वास होता. जातिभेदामुळे निर्माण झालेली विषमता दूर करण्यासाठी निरनिराळ्या जातींतील रोटीबेटी व्यवहाराला त्यांनी चालना दिली. आंतरजातीय विवाह घडवून आणला. विधवांच्या पुनर्विवाहाला मान्यता दिली. जातिनिर्मूलन, अस्पृश्योद्धार, स्त्रीशिक्षण, ब्राह्मण्याला विरोध, ब्राह्मणेतरांची जागृती इत्यादी क्षेत्रांत नवीन आचार व विचारांना प्रेरणा देऊन त्यांनी सामाजिक जीवनांचे चित्र बदलण्याचा प्रयत्न केला.

वेदोक्त प्रकरण :

छत्रपती शाहू महाराजांनी सुरुवातीपासूनच जातिभेदाला विरोध करून समाजाभिमुख धोरणाचा स्वीकार केलेला होता. महाराजांचे धोरण सामाजिक समता व देशोन्नतीस उपयुक्त असले तरी, अज्ञानी व अंधश्रद्धा समाजावर निरनिराळी बंधने ठेवून आपले वर्चस्व प्रस्थापित करणार्या ब्राह्मणांच्या प्रवृत्तीला हे धोरण मान्य होणारे नव्हते. अधिकारग्रहण केल्यानंतर महाराजांना जाणवले की, संस्थानच्या राज्यकारभारात ब्राह्मण किंवा उच्च जातीच्या व्यक्तींचेच प्रमाण अधिक आहे. बहुजन समाजाचे प्रमाण अतिशय अल्प आहे. त्यामुळे सन १८९४ पासूनच त्यांनी अब्राह्मणांना नोकर्या देण्यास सुरुवात केली. ब्राह्मण वर्गाने महाराजांच्या सामाजिक समता निर्माण करण्याच्या प्रयत्नांना विरोध केला. त्यामुळेच पुढील काळात या दोन भिन्न प्रवृत्तींमध्ये संघर्ष होणे अटळ होते. अशा या परिस्थितीतच वेदोक्त प्रकरणाची भर पडली. या वेदोक्त प्रकरणाने एक महान धार्मिक व सामाजिक बंडखोरीला जन्म दिला. ही घटना महाराष्ट्राच्या सर्व सामाजिक जीवनाला वेगळे वळण देण्याला व इतिहासाला कलाटणी

ISSN No. 2394-5990

देण्याला समर्थ ठरली असे दिसते. या वेदोक्त प्रकरणाने त्या काळात महाराष्ट्रात खळबळ निर्माण केली.

सन १८९९ मध्ये छत्रपती शाहू महाराज आपली नित्य पूजाअर्चा करीत असताना नारायण भटजी वेदोक्त मंत्राऐवजी पुराणोक्त मंत्र म्हणत असल्याचे महाराजांना समजले याबद्दल त्यांनी पुरोहिताला खुलासा विचारला. पुरोहिताने सांगितले की, महाराज हे क्षत्रिय नसल्याने त्यांना वैदिक पद्धतीच्या मंत्रांचा अधिकार नाही, म्हणूनच शूद्रांसाठी असलेले मंत्र आपण म्हणतो. पुरोहिताच्या वरील स्पष्टीकरणाने महाराजांना या ब्राह्मणी प्रवृत्तीची खरी कल्पना आली. प्रत्यक्ष राजाबरोबर असे वर्तन करणाऱ्या या भिक्षुकांचे सर्वसामान्य समाजाबरोबर किती कठोर वर्तन असेल याची जाणीव झाली. त्यामुळेच त्यांनी या भिक्षुकशाहीबरोबर संघर्ष करण्याचा निश्चय केला. छत्रपती शिवाजी महाराजांनाही त्याचा त्रास सहन करावा लागला. शाहू महाराजांवरही ही पाळी आली. मात्र त्यांनी ब्राह्मणांच्या या प्रवृत्तीला प्रखर विरोध केला व अतिशय धीरोदात्तपणे हा संघर्ष चालविला. बहुजन समाजाने या वेळी महाराजांना साथ दिली. लोकमान्य टिळकांनी या वेळी ब्राह्मणांची बाजू घेतली. केसरी व इतर वृत्तपत्रांतून महाराजांवर टीका झाली. तथापि, महाराजांनी माघार घेतली नाही. लोकमान्यांनी तडजोडीचा प्रयत्न केला. मशिवछत्रपती क्षत्रिय ठरले होते तर त्यांच्या गादीवर येणारा घाटगे घराण्यातील पुरुष असला तरी तो भोसले ठरतो. तेव्हा जो छत्रपतींच्या गादीवर बसेल तोच क्षत्रिय. ब्राह्मण प्रवृत्तीला शरण जाणे म्हणजे आपण सुरू केलेल्या कार्यात अवसान घातकीपणाने माघार घेणे असे त्यांना वाटत होते. त्यामुळे १९०५ मध्ये त्यांनी राजोपाध्ये यांची सर्व इनामी गावे, जमिनी व वंशपरंपरागत असलेले हक्क काढून घेतले. जप्तीचेहुकूम दिले. दरबारी असलेल्या धर्मपंडित, पुरोहित, जोशी यांना धर्मादाय म्हणून दिलेली निरनिराळ्या गावांतील इनामी जमीन महाराजांनी जप्त केली. पुरोहितवर्गाने महाराजांना त्यांच्या या कृत्याबद्दल शाप लागण्याची भीती दाखवली. पण महाराज डगमगले नाहीत, राजोपाध्ये यांनी पोलिटिकल एजंट, मुंबई सरकार व हिंदुस्थान सरकारकडे दाद मागण्याचा प्रयत्न केला. तथापि, त्यांना कोठेही यश आले नाही. या संघर्षात श्रृंगेरीच्या जगद्गुरु शंकराचार्यांनी ब्राह्मणांची बाजू घेतली. तथापि, थोड्याच काळात महाराजांना क्षत्रिय म्हणून सांगण्यात, या गुरू-शिष्य शंकराचार्यांची स्पर्धा सुरू झाली. महाराजांनी कोल्हापूर संस्थानातील शंकराचार्यांचे इनाम जप्त केले. त्यांची क्षात्रजगद्गुरूंचे नवे पीठ निर्माण केले व त्या पीठावर मराठा जातीतील एका व्यक्तीची नेमणूक केली. मपुरोहितांची शाळाफ काढली. निरनिराळ्या जातींचे पुरोहित निर्माण केले. ब्राह्मणांची मध्यस्थी किंवा धार्मिक विधीतील त्यांचे महत्त्व कमी केले. या नवीन शिकलेल्या पुरोहितांकडून निरनिराळे धार्मिक विधी करून घेण्यास सुरुवात केली. छत्रपती शाहू महाराजांच्या खंबीर नेतृत्वाखाली महाराष्ट्रातील बहुजन समाज एकत्र आला. ब्राह्मणांचे श्रेष्ठत्व नष्ट होत असल्याचे पाहून ब्राह्मणवर्ग संघटित झाला. यातूनच महाराष्ट्रात पुढील काळात ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाला प्रारंभ झाला.

वेदोक्त प्रकरणातून जातिभेदाचे व जातिद्वेषाचे तसेच जातिनिर्मूलनाच्या कार्याच्या आवश्यकतेचे समाजाला ज्ञान झाले. स्वातंत्र्योत्तर काळात समाजातील सर्व जातींना समान अधिकार मिळण्यासाठी बहुजन समाजाचा शैक्षणिक विकास होण्याची गरज तीव्रतेने भासू लागली. आपल्या अधिकारासाठी बहुजन समाज छत्रपती शाहू महाराजांच्या खंबीर नेतृत्वाखाली एकत्र आला, त्यातून या समाजाची सामाजिक, शैक्षणिक व राजकीय प्रगती व जागृती होत गेली. बहुजन समाजाला अनेक संधी व अधिकारपदे देऊन त्यांचा विकास घडवून आणण्याचे धोरण महाराजांनी पुढेही चालविले. या संघर्षात त्यांनी ब्राह्मण जातीला विरोध केला नाही तर ब्राह्मणांच्या प्रवृत्तीला प्रखर विरोध केला असे दिसते.

छत्रपती शाहू महाराजांचे राजकीय कार्य :

अधिकारग्रहण केल्यानंतर महाराजांनी आपल्या संस्थानचा दौरा करून येथील प्रजेच्या सामाजिक-आर्थिक स्थितीचे ज्ञान प्राप्त केले होते. अज्ञानामुळे अंधश्रद्धा, धार्मिक व सामाजिक बंधने व वरिष्ठ जातीचे वर्चस्व यांतून बहुजन समाजाची सुटका केल्याशिवाय हा समाज प्रगत होऊ शकणार नाही हे त्यांना जाणवलेले होते. त्यामुळे त्यांनी शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक क्रांतीला प्राधान्य दिले. ब्रिटिशांबरोबर संघर्ष न करता उपलब्ध होणाऱ्या आपल्या अधिकारांचा या समाजाच्या विकासासाठी उपयोग करण्याचे धोरण महाराजांनी स्वीकारले.बहुजन समाजाचा सर्वांगीण विकास हेच महाराजांचे ध्येय असल्यामुळे त्यांनी संस्थानात स्वातंत्र्य चळवळीला सक्रिय सहभाग दिला नाही.

शाहू महाराजांना मानवतावादी, समान पातळीवर, राष्ट्रवादाला व्यापक तत्त्वाचे अधिष्ठान असलेले स्वराज्य त्यांना हवे होते. अल्पसंख्य प्रगत वर्गाने बहुसंख्य वर्गावर राज्य केले म्हणजे ते स्वराज्य हा विचार त्यांना मान्य नव्हता. त्यांचा राष्ट्रवाद हा मानवतावादी विशाल दृष्टिकोणाचा होता. आपल्या अठ्ठावीस वर्षांच्या कारकिर्दीत त्यांनी बहुजन समाजाला न्याय्य हक्क मिळवून देण्यासाठी झगडा केला, अज्ञानी, अंधश्रद्धा व गरीब असलेल्या बहुजन समाजाला मानवी मूलभूत हक्क मिळवून देऊन त्यांना स्वराज्याला पात्र ठरविणे हीच त्यांची या संघर्षामागील भूमिका होती.

ब्राह्मणेतर चळवळ :

स्वराज्याच्या महाराजांच्या वास्तववादी रचनेमुळेच त्यांनी सार्वजनिक शिक्षणप्रसार व जातिभेदाची बंधने शिथिल करण्यासाठी निरनिराळ्या उपाययोजना केल्या, कायदे केले. बहुजन समाजात शिक्षण प्रसार करणे, धार्मिक बंधनातून मुक्तता करणे व सरकारच्या राज्यकारभारात बहुजन समाजाला राजकीय हक्क मिळवून देणे हे त्यांनी आपले कार्य मानले. या कार्यासाठीच महाराजांनी निपाणी येथे 'डेक्कन रयत संस्था' स्थापन केली. बहुजन समाजातील लोकांकडे राजकीय हक्काचा वाटा आल्याशिवाय अस्पृश्योद्धार व बहुजन समाजाच्या उद्धाराचे कार्य यशस्वी होणार नाही हे जाणवल्यामुळे महाराजांना राजकीय जीवनाकडे वळणे अपरिहार्य झाले.

समान संधीसाठी सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक हक्क बहुजन समाजाला मिळवून देणे हे या चळवळीचे प्रमुख सूत्र होते. १९१७ पासून सुरू झालेल्या या चळवळीला दक्षिण भारतात लोकप्रियता मिळाली. या चळवळीच्या प्रसारार्थ वृत्तपत्रे निघाली. कार्यकर्ते तयार झाले. महाराजांनी त्यांना आर्थिक सहकार्य केले. दक्षिण भारतातील बहुजन समाज महाराजांच्या नेतृत्वाखाली एकत्र आला. १९१८ च्या मुंबईच्या पीपल्स युनियन सभेचे व जुलै, १९२० च्या हुबळी येथील सामाजिक परिषदेचे ते अध्यक्ष होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी समाजाला योग्य पुढारी निवडून देण्याची विनंती केली. तसेच जातिभेद दूर करून विद्या संपादन करण्याची गरज त्यांनी प्रतिपादन केली. ही चळवळ अखंडपणे चालविल्यास बहुजन समाजाचा सर्वांगीण विकास होऊ शकेल असा त्यांचा विश्वास होता. समाजातील अल्प लोकांच्या हाती राजकीय सत्ता जाऊ नये यासाठी सार्वत्रिक शिक्षण प्रसार, धार्मिक व सामाजिक समतेची मानवतावादी समान संधी प्रजेला मिळाली पाहिजे व मगच राजकीय सुधारणा किंवा स्वातंत्र्याचा विचार करावा असे महाराजांचे मत होते.

आपल्या संस्थानात शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक, आर्थिक क्रांतीला प्राधान्य दिले. ब्राह्मणेतर चळवळीला तात्त्विक अधिष्ठान देऊन राजकीय जीवनातील महत्त्वपूर्ण चळवळीचे स्थान मिळवून देण्याचे श्रेय छत्रपती शाहू महाराजांनाच दिले जाते.

आधुनिक महाराष्ट्रात बुद्धिप्रामाण्यावर अधिष्ठित समाजाची पुनर्रचना झाली पाहिजे असे मानणाऱ्या महात्मा जोतीराव फुले यांनी २४ सप्टेंबर, १८७३ रोजी पुणे येथे सत्यशोधक समाजाची स्थापना केली होती. जातिभेद पाळणे हा धर्म नव्हे. शूद्र किंवा अतिशूद्रांची पुरोहितांकडून होणारी पिळवणूक बंद झाली पाहिजे असे या सत्यशोधक समाजाचे ध्येयधोरण होते. छत्रपती शाहू महाराजांनाही वेदोक्त प्रकरणानंतर भट भिक्षुकांच्या प्रवृत्तीची जाणीव झाली होती. त्यामुळेच ते या समाजाच्या विचारसरणीकडे आकर्षित झाले. ११ जानेवारी, १९११ रोजी कोल्हापुरात महाराजांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. त्यामुळे पुढील काळात या चळवळीला राजाश्रय मिळाला. सत्यशोधक समाजाच्या कार्यालयासाठी महाराजांनी गंगावेशीतील जागा दिली. महाराजांच्या प्रोत्साहनामुळे सत्यशोधक समाजाला फुल्यानंतर आलेली मरगळ दूर झाली. महाराष्ट्रात त्यांच्या प्रसाराला चालना मिळाली. सत्यशोधक समाजाच्या या प्रसाराच्या कामी महाराजांना अनेक सहकाऱ्यांनी मदत केली.

स्वामी दयानंदांनी स्थापन केलेल्या आर्यसमाजातही जातिभेद मानला नसून वैदिक पद्धतीच्या धार्मिक विधीलाच महत्त्व होते. त्यामुळे महाराज या समाजाकडे आकर्षित झाले. सन १९१८ मध्ये कोल्हापुरात आर्यसमाजाची शाखा स्थापन झाली. महाराजांनी या समाजाला राजाश्रय दिला. आर्यसमाजाच्या प्रचारकांनी निरनिराळ्या खेड्यांत हिंडून कार्य केले: वैदिक धर्मप्रसार, जातिभेदाचे उच्चाटन, अस्पृश्यता निवारण, गुरुकुलांची स्थापना, मोफत शिक्षणप्रसार, अनाथ मुलांचे पालनपोषण, अंधश्रद्धांचे उच्चाटन इत्यादी कामे या समाजाने केली. ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या धर्मांतराच्या कार्याला या समाजाच्या प्रचारामुळे प्रतिबंध निर्माण झाला. सन १९१८ मध्ये महाराजांनी राजाराम कॉलेज, राजाराम हायस्कूल, प्रशिक्षण शाळा इत्यादींची जबाबदारी आर्यसमाजाकडे सोपविली. त्यामुळे पुढील काळात दक्षिण भारतातील आर्यसमाजाचे कोल्हापूर हे एक प्रमुख केंद्र बनले. जातिभेद नष्ट करून सामाजिक समता प्रस्थापित करू इच्छिणारे छत्रपती शाहू महाराज या समाजाच्या प्रगतीमागे खंबीरपणे उभे होते

समारोप :

आधुनिक महाराष्ट्रातील समाजसुधारणेच्या चळवळीत छत्रपती शाहू महाराजांचे कार्य अनन्यसाधारण आहे. महात्मा फुल्यांप्रमाणे दलितोद्धार, जातिभेद निर्मूलन, पुरोहितांच्या मध्यस्थीला विरोध व शिक्षणाचा प्रसार ही कामे महाराजांनी केली. महात्मा गांधीप्रमाणे महाराजांनी सदैव खादीचा स्वीकार केला. अस्पृश्यता निवारण्याचे व हिंदू-मुस्लीम ऐक्याचे निष्ठापूर्वक कार्य केले. त्यांनी शेती सुधारण्याकडे, शेतीला पाणीपुरवठा करण्याकडे लक्ष दिले. मशाहूपुरीफ या व्यापारी पेठेची स्थापना करून जनतेला व्यापारांकडे वळविले. उद्योगधंद्याची मुहूर्तमेढ रोवली. मल्लविद्येला उत्तेजन दिले. नाट्य संगीतादिकलांचा पुरस्कार करून कोल्हापूरला 'कलानगरी' बनविले.

छत्रपती शाहू महाराजांच्या उदार आश्रयामुळेच कोल्हापूर संस्थानात कला, संगीत, नृत्य, नाटक इत्यादी सांस्कृतिक क्षेत्राचाही विकास झाला. बहुजन समाजात सामाजिक, शैक्षणिक

ISSN No. 2394-5990

व आर्थिक क्रांती घडवून लोकजागृतीचे बीजारोपण त्यांनी केले. बहुजन समाजात जागृती घडवून आणण्यासाठी सामान्यातील सामान्य लोकांबरोबर समरस झालेले शाहू महाराज हे थोर पुरुष होत. राजे असूनही त्यांची राहणी अतिशय साधी होती. स्वतःला शेतकरी, मजूर म्हणवून घेण्यात त्यांना धन्यता वाटे. आपले राजेपण विसरून प्रजेच्या सुख दुःखाशी समरस झालेले महाराज अलौकिक लोकनेते होते. त्यांनी बहुजन समाजाचा सर्वांगीण विकास करण्याकडे प्राधान्याने लक्ष दिले. अशा या व्यापक दृष्टीच्या, उदार अंतकरणाच्या, स्वातंत्र्य, समता व बंधुत्व या मूल्यांच्या प्रतिष्ठापना करण्याचे. आधुनिक महाराष्ट्रातील बहुजन समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक प्रगतीचे श्रेय या असामान्य कर्तृत्वाच्या राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनाच द्यावे लागते.

संदर्भ ग्रंथ :

१. कीर धनंजय, राजर्षी शाहू छत्रपती,पॉपलर प्रकाशन, मुंबई, २०१६

२. प्रा.डॉ.शिरीष पवार, राजर्षी छत्रपती शाहू महाराज,सय्याद्री प्रकाशन,पुणे २०१२

३. भोळे भास्कर,आधुनिक भारतीय राजकीय विचार,पिंपळपुरे प्रकाशन, नागपूर

४. पवार जयसिंगराव, राजर्षी शाहू:एक दृष्टीक्षेप,१९८९

५. य.दि. फडके ,विसाव्या शतकातील महाराष्ट्र, १९८९

■■■

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या विचारांची व कार्याची प्रासंगिकता

डॉ. सतीश खरात
इतिहास विभाग
मिलिंद कला महाविद्यालय
नागसेनवन, औरंगाबाद

Introduction :

We need you ever so much for you are the pillar of the great movement towards social democracy which is making its headway in indian.. Dr. B. R. -mbedkar.

आधुनिक भारताच्या जडण-घडणीत ज्या-ज्या महापुरूषांनी योगदान दिले. त्यामध्ये राजर्षी शाहू महाराज यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. राजर्षी शाहू महाराजांनी सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रात आमूलाग्र बदल करून रचनात्मक कार्याद्वारे सामाजिक समता स्थापन करण्याचा यशस्वी प्रयत्न केला. महात्मा फुले यांचे सामाजिक आणि शैक्षणिक सुधारणा विषयक अपूर्ण राहिलेले कार्य शाहू महाराजांनी पूर्ण केले. सामाजिक भेदाभेद, अस्पृश्यता, उच्च-नीचता, सामाजिक विषमता, महिलांच्या समस्या इ. मानव निर्मित असून उच्चवर्णीयांनी केवळ स्वार्थासाठी निर्माण केल्या आहेत. असे म्हणून जातीव्यवस्था आणि वर्णव्यवस्था अमानवीय असून यामुळे समाजाची अधोगती झाली आहे. तेव्हा या कुप्रथा परंपरांचे समूळ उच्चाटन झाले पाहिजे, असे मत शाहू महाराजांनी प्रतिपादिले. या समस्येवरील उपाय म्हणून त्यांनी शिक्षणास प्राधान्य दिले.

तत्कालीन कर्मठ समाजव्यवस्थेच्या विरोधात बंड पुकारून पुरोहितशाहीला आव्हान देऊन सामाजिक समतेचा लढा अधिक तीव्रपणे गतिमान केला. सर्व समाजघटकांच्या कल्याणाचा विचार अंमलात आणून 'सर्वजण सुखाय, सर्वजण हिताय' या सुत्राप्रमाणे त्यांनी कार्य केले.

गोषवारा : (Abstract)

लोकराजा, अस्पृश्योध्दारक, सामाजिक समतेचा पुरस्कर्ता, मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचे जनक, लोकशाही, उदारमतवादी विचार प्रवाह स्वीकारणारे राजर्षी शाहू महाराज, आधुनिक भारताच्या इतिहासातील एक दीपस्तंभ, त्यांच्या विचार व कार्याचा अभ्यास केल्याशिवाय भारताचा इतिहास पूर्ण होऊ शकत नाही. आदर्श राजा कसा असतो? याचा पाया रचणारे शाहू महाराज 'एकमेव द्वितीय' होत. म. फुले यांच्यापासून सामाजिक सुधारणेचा वसा घेऊन भटक्या, विमुक्तांना, महिलांना शिक्षण देऊन समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी रचनात्मक कार्य करणारा एकमेव राजा म्हणजे राजर्षी शाहू महाराज.

जातीसंस्थेच्या विरोधात बंड पुकारून ती समस्त मानव जातीच्या विकास मार्गातील प्रमुख अडसर आहे. त्यासाठी प्रथम जातीसंस्था समूह नष्ट केली पाहिजे. तरच येथील सर्वसामान्य घटक भेदभावाशिवाय प्रगती करू शकेल. शिक्षणाच्या प्रसार व प्रचाराचे कार्य हाती घेऊन शाळा व वसतिगृहाची उभारणी केली. ती आज देखील प्रासंगिक आहे. वसतिगृहांना लोकचळवळीचा दर्जा प्राप्त करून देऊन, गुणवंत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याची योजना देखील त्यांनी हाती घेतली. थोडक्यात शाहू महाराजांनी सर्व उपेक्षित समाजासाठी निरपेक्ष दृष्टिकोणातून कार्य केले म्हणून शासन त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून २६ जून हा दिवस 'सामाजिक न्याय' दिन म्हणून पाळला जातो. (जन्मदिन)

म्हणूनच त्यांना आदराने 'लोकराजा' या (King of People) नावाने संबोधले जाते. राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या विचार व कार्याचा केंद्रबिंदू व्यक्ती मानून तिच्या सर्वांगीण विकासासाठी कोणत्याही भेदभावाशिवाय (Caste, Religion, Gender, Language, Region, Creed, Etc) कार्य केले.

अस्पृश्यता (Untouchability) हा मानवी जीवनास कलंक असून तिच्या समूळ उच्चाटनाशिवाय (Eliamination) येथील दलित, आदिवासी व महिला यांचा उध्दार होणार नाही. शाहू महाराजांनी सामाजिक सुधारणेचा विडा उचलला याचे कारण म्हणजे त्यांना देखील जातीव्यवस्थेचा अनुभव आला होता. म्हणून त्यांनी असा विचार केला की, आपण राजा असून देखील विषमतेची वागणूक मिळत आहे. मग आर्थिकदृष्ट्या मागास घटकांचे काय? म्हणून त्यांनी आपल्या कार्याने सामाजिक समता प्रस्थापित करणे हे उद्दिष्ट मानले.

ISSN No. 2394-5990

शाहू महाराजांवर पाश्चात्य उदारमतवादी विचारांचा प्रभाव असल्याने शासनाप्रती त्यांचा दृष्टिकोण (Approach) कल्याणकारी स्वरूपाचा होता. राज्य लोकांच्या कल्याणाकरिता असते; त्यांचे (दलित) शोषण करण्यासाठी नाही. हीच भूमिका समोर ठेवून शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात आदर्श राज्याची मूहूर्तमेढ रोवली.

शिक्षणास अधिक प्रमाणात प्राधान्य देऊन सर्वसामान्य घटकांपर्यंत शिक्षण प्रवाहित करण्यासाठी ठिक-ठिकाणी शाळा, वसतिगृहांची उभारणी केली. तत्कालीन जातीयता, अस्पृश्यता, सामाजिक, आर्थिक विषमतेचा प्रभाव शाहू महाराजांवर राहिला. समाजातील अस्पृश्य, दलित आदिवासी शूद्र-अतिशूद्र आदिवासी, भटके-विमुक्त स्त्रिया या घटकांना समाजात कोणतेच स्थान नव्हते. सामाजिक आणि धार्मिक गुलामगिरीच्या पारतंत्र्यात जाती समूह ब्राम्हण, मारवाडी, मराठा, राजपूत, ठाकूर इ. कनिष्ठ समजल्या जाणाऱ्या साळी-माळी कुंभार, चांभार, महार-मांग, ढोर, डवरी, मेहत्तर, गारूडी, फासेपारधी, लमाण, भटके, आदिवासी, दरवेशी आणि बारा बलुतेदार, अठरा अलुतेदार यांना पशुपेक्षाही हीन दर्जाची वागणूक देत होते.

धार्मिक रीतिरिवाज, रूढी, प्रथा-परंपरा, अंधश्रध्दा, याशिवाय महिलांच्या समस्या, दासीप्रथा, मुरळीप्रथा, बालविवाह, देवदासी, केशवपन, विधवा विवाहांची समस्या, इ. कूप्रथा धर्म प्रतिष्ठेच्या नावाखाली चालू होत्या. परिणामी महिलांचे होणारे सामाजिक आणि मानसिक शोषण थांबविण्याच्या हेतूने शाहू महाराजांनी सामाजिक परिवर्तनाचा वसा घेतला.

संक्षेपाने शाहू महाराजांच्या परिवर्तनशील विचारांची गरज आज देखील भारतीय समाजास आहे. जरी भारत २१ व्या शतकात वावरत असला तरी सामाजिक समता, अस्पृश्यतेचे उच्चाटन, महिलांच्या उन्नतीसाठी महाराजांचे विचार अनिवार्य ठरतात. त्यांच्या विचार व कार्याचा अभ्यास खालीलप्रमाणे -

Keywords : Empowerment, Social Reform, Eliamination, Untouchability, Exploation, Liberal.

उद्देश (Objectives) :

१. शाहू महाराजांच्या विचार व कार्याचा अभ्यास करणे.
२. शाहू महाराजांवर पडलेल्या सामाजिक, धार्मिक, स्थितीचा अभ्यास करणे.
३. सामाजिक सुधारणा विषयक दृष्टिकोण विशद करणे.
४. शाहू महाराजांचा महिला विषयक दृष्टिकोण विशद करणे.
५. शैक्षणिक आणि अस्पृश्यता निवारण विषयक दृष्टिकोण विशद करणे.

संशोधन पध्दती (Reasearch Methdology) :

प्रस्तुत विषयाच्या अभ्यासाकरिता, प्राथमिक, दुय्यम साधने, पत्रे, आज्ञापत्रे, शासनादेश, भाषणांचा संग्रह व इतर साधनांचा उपयोग करून ऐतिहासिक, वर्णनात्मक, निरीक्षणात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात येणार आहे. थोडक्यात विषयाची व्यवहार्यता टिकून राहण्याच्या दृष्टिकोणातून ज्या-ज्या पध्दतीचा अवलंब योग्य ठरेल तो केला जाईल.

विषयारंभ :

महात्मा फुलेनंतर राजर्षी शाहू महाराजांनी समाजसुधारणेची धुरा सांभाळली. त्यांना ज्ञात झाले की, शूद्र-अतिशूद्र व महिला या वर्गाची अवनती केवळ शिक्षणाच्या अभावी झाली आहे. जोपर्यंत या वर्गास शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली जाणार नाही तोपर्यंत त्यांचा विकास होणार नाही. म्हणून त्यांनी आपल्या कोल्हापूर संस्थानात शिक्षणाची व्यवस्था केली. उदा. सन १९१२-१३ मध्ये शिक्षण व आरक्षण विषयक कायदा पास केला.[१]

शिक्षणाच्या प्रचार आणि प्रसार कार्य सुलभपणे पार पाडले जावे या करिता त्रिस्तरीय समितीची स्थापना करून खेड्यापाड्यातील मुला-मुलींना शिक्षणाकडे आकर्षित करण्यासाठी शाळा व वसतिगृहाची उभारणी केली. त्या काळी जातीप्रथेचा प्रभाव अधिक असल्याकारणाने जातीनिहाय वसतिगृहाची निर्मिती केली. उदा. मराठा मुलांचे वसतिगृह, दलित अस्पृश्य मुलांचे वसतिगृह मुस्लिम, जैन, आदिवासी, भटक्या मुलांसाठी देखील वसतिगृहे स्थापन केली. उदा. १८ एप्रिल १९०१ रोजी 'व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग' या कोल्हापूरातील पहिल्या वसतिगृहाची स्थापना करण्यात आली.

शाहू महाराजांचा सामाजिक परिवर्तनाचा विचार घट्ट झाला कारण, त्यांच्या पूर्वी व समकालीन भारतीय समाज जाती आणि वर्णव्यवस्थेचा गुलाम बनला होता. येथील समाजमनावर इतका प्रभाव होता, की 'महारा घरी गाणं, कुणब्या घरी दाणं, अन् बामणां घरि लिहिणं' अशी म्हणच त्यावेळी प्रसिध्द झाली होती.[२]

हा प्रघात घालण्यासाठी शाहू महाराजांनी रचनात्मक कार्य हाती घेतले. उच्च-वर्णीय ब्राम्हण पुरोहित, पाटील, कुलकर्णी यांचे अधिकार मर्यादित करण्यात आले. सर्वसामान्य माणसांचा दर्जा त्यांना बहाल केला. याचा परिणाम म्हणून महाराजांना मनस्ताप सहन करावा लागला. पण कर्मठ व्यवस्थेच्या विरूध्द अशा प्रकारचे पाऊल उचलणे म्हणजे एक प्रकारे क्रांतीचा विडा उलण्यासारखेच आहे.

शाहू महाराजांनी आपल्या संस्थानातील मागासलेल्या जातींचा उध्दार करण्यासाठी शिक्षण उत्तम साह्य ठरू शकते. म्हणून त्यांनी अस्पृश्य समाजाच्या मनाला जडलेला पारंपरिक न्यूनगंड नष्ट करणे इतरांप्रमाणे आपणही माणूस आहोत, असा आत्मविश्वास त्यांच्यात निर्माण करणे. अस्पृश्यांमध्ये शिक्षणाचा प्रसार करणे. त्यांची आर्थिक स्थिती सुधारणे, त्यांची अस्मिता जागृत करून त्यांना त्यांच्या हक्कांची जाणीव देणे; अस्पृश्यता विरोधी कायद्याची निर्मिती करते, महार वतनादी वतने बंद करण्याच्या गोष्टी पार पाडण्यासाठी शाहू महाराजांनी स्थूल मनाने चार उपक्रमाद्वारे तडीस नेण्याचा प्रयत्न केला. ते उपक्रम असे पहिल्या शैक्षणिक उपक्रम, दुसरा लोकसंपर्क उपक्रम, तिसरा प्रशासकीय उपक्रम आणि चौथा कायदेकानून उपक्रम.[३]

सामाजिक समता स्थापन करण्यासाठी शाहू महाराजांनी अनुसरलेल्या मार्ग आज देखील अनिवार्य आहे. दलित समाजास राज्यघटनेच्या माध्यमातून समाज व शासनाच्या मुख्य प्रवाहात येण्याची संधी मिळाली असली तरी आज सुद्धा निरपेक्ष अस्पृश्यता निवारण, अन्याय, अत्याचार यांचे उच्चाटन आले नाही. म्हणून थोडक्यात शाहू महाराजांच्या रचनात्मक कार्यक्रमाची गरज आहे.

दलित-पतितांचा उध्दार करण्याची शाहू महाराजांची मनोभूमिका ही काही एका दिवसात तयार झाली नव्हती. ही भूमिका हळू-हळू काही प्रसंगाच्या अनुभवातून उत्क्रमणशील मार्गाने निर्माण झाल्याचे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी म्हटले. ते अगदी इतिहासाला धरूनच आहे.[४] अर्थात कोणत्याही महापुरूषांचे विचार अस्तित्त्वात असलेल्या परिस्थितीचा परिणाम असतात. त्यास शाहू महाराज देखील अपवाद नव्हते.

शाहू महाराजांच्या कार्याचे विभिन्न पैलू होते. त्यापैकी 'अस्पृश्योध्दार' हा एक महत्त्वाचा पैलू होता. ते म्हणत अस्पृश्यांना जागृत करण्यासाठी त्यांच्यात चळवळ झाली पाहिजे आणि त्या चळवळीचे नेतृत्व त्यांच्यातील कोणीतरी केले पाहिजे; किंबहुना ते उदयास आले पाहिजे असे महाराजांना मनापासून वाटत होते. आपली ही इच्छा त्यांनी सीताराम शिवतरकर यांना सप्टेंबर १९१९ मध्ये लिहिलेल्या पत्रात व्यक्तही केली होती.

सदर पत्रात ते लिहितात,

जो दुसऱ्यावरी विसावला।
त्याचा कार्यभाग बुडाला।
जो आपणाच कष्टात केला।
तोचित जाण भला।।[५]

येथे शाहू महाराजांचा अस्पृश्य समाजाच्या उध्दाराविषयीचा दृष्टिकोन स्पष्ट होतो. या मागे त्यांचा असा मानस होता की, शोषित (Explioted) घटकांनी आपल्या वरिल होत असलेल्या अन्याय अत्याचाराचे निर्दालन स्वत:च करावे, असे आल्यासच त्यांना न्याय मिळेल.

त्यांना ज्ञात होते की, हिंदुस्थानातील शासन अन्यायकारी आहे. यामुळे समाज विभाजीत झाला आहे. या विषयी शाहू महाराज म्हणाले, हिंदूस्थानशिवाय इतर कोणत्याही देशात मनुष्यात जात नाही. परंतु दुर्देवाने हिंदुस्थानात मात्र जातीभेद इतका तीव्र आहे की, मांजर-कुत्रे किंबहुना शेणापेक्षा देखील कमी अशा प्रमाणे आम्ही आपल्या देश बंधनास व भगिनीस वागवितो.[६]

थोडक्यात, यावरून असे लक्षात येते की, शाहू महाराजांनी हिंदुस्थानातील अमानवीय प्रथा-परंपरांवर अचूक भाष्य केले. (Criticism) यावर न थांबता यात सुधारणा घडवून आणण्यासाठी कृतीशील प्रयोग केले. २२ फेब्रुवारी १९१८ रोजी कोल्हापूर सरकारच्या गॅझेटमध्ये जाहीरनामा प्रसिध्द करून संस्थानातील 'बलुतेदारी पद्धती' खालसा करण्यात आली. त्या अन्वये कोणत्याही बलुत्या-अलुत्यावर कोणत्याही व्यवसायाची सक्ती राहिली नाही. सन्न बलुते-अलुतेदारांना वाटेल त्या ठिकाणी राहण्याची व वाटेल तो धंदा व वाटेल त्या प्रकारचे काम करण्याची परवानगी देण्यात आली.[७]

बारा बलुतेदार आणि अठरा अलुतेदार गावगाडा चालवणारी परंपरा यांत संबंधित व्यक्ती कडून काम करून घेतले जाई पण त्या कामाच्या मोबदल्यात मुआवजा दिला जात नसे. जसे सुतार कडून शेतीचे औजारे करवून घेतली जात पण त्या बदल्यात बलुतेदारांना पैसा न देता धनधान्य दिले जात असे. (वस्तुविनिमय पध्दत) यामुळे बलुतेदारांचे आर्थिक व सामाजिक शोषण झाले.

यावर शाहू महाराजांनी उपायात्मक व्यक्त केलेले विचार आजही प्रासंगिक आहेत. कारण आज देखील खेड्यातून (ग्रामीण भागातून) Village Life जातीभेद पाळला जातो.

बहिष्कृत समाजाविषयी शाहू महाराजांना किती आत्मीयता होती? याचे उत्तम उदाहरण म्हणजे-शाहू महाराजांनी बाबासाहेबांना पाठवलेले पत्र, ते म्हणतात, स. आंबेडकर यांस सप्रेम लोभाची वृध्दी होत असावी ही विनंती. विशेष आपले ता. ११-०५-१९२० चे पत्र पोहोचले. मी गर्व्हर्नमेंटची परवानगी विचारली आहे. परवानगी येताच आपणास कळवितो. माझी मुलगी आजारी असली तरी मी आपले काम हाती घेतले असल्याने कोणतीही अडचण असली तरी ती बाजूला ठेवून येण्याचे करतो.[८]

२० मार्च १९२० रोजी माणगांव येथील परिषदेत शाहू महाराजांनी बाबासाहेबांना दलितांचा नेता म्हणून घोषित केले. इथपासून शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची मैत्री झाली. इतकेच नव्हे तर चळवळीला गतिमान करण्यासाठी

ISSN No. 2394-5990

वर्तमानपत्र असावे लागते. बाबासाहेबांनी त्यांची मनिषा जेव्हा शाहू महाराजांसमोर बोलून दाखविली त्यावेळी महाराजांनी मदतीचे आश्वासन दिले. लागलीच वर्तमानपत्र काढण्यासाठी अडीच हजाराचा चेक दिला.[९]

या पार्श्वभूमीवर शाहू महाराजांनी वरील उद्गार काढले. अर्थातच् बाबासाहेबांच्या सामाजिक व राजकीय चळवळीस गतिमान करण्यासाठी शाहू महाराजांची मोठी भूमिका आहे. त्यांच्या सहकार्याने बाबासाहेबांनी 'मूकनायक' हे पाक्षिक सुरू केले. 'मूकनायक' चा पहिला अंक ३१ जानेवारी १९२० रोजी प्रसिध्द झाला.

समाजाप्रति असणारी आत्मीयता आधुनिक भारताच्या इतिहासात शोधून देखील सापडणार नाही. आपल्या कुटुंब आणि राज्याची चिंता न करता बाबासाहेबांना मदत करणारे शाहू महाराज अद्वितीय ठरतात. म्हणून आधुनिक भारताला दिशा देण्यासाठी शाहू महाराजांच्या विचारांची गरज आहे. यातच त्यांच्या कार्याचे महत्त्व सामावलेले आहे.

२ एप्रिल १८९४ साली शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानाची सत्ता-सुत्रे हाती घेतली तेव्हापासून ते अखेरच्या क्षणापर्यंत सर्वच क्षेत्रात मूलगामी कृतीशिलतेने ते कार्य करित होते. माणूस हाच त्यांच्या कार्याचा केंद्रबिंदू होता. (Man Was Central Point) त्यांना सर्वच बाबतीत परिवर्तन हवे होते. म्हणूनच २६ जुलै १९०२ रोजी सरकारी नोकरीत रिक्त असलेल्या जागा पैकी पन्नास टक्के जागांवर शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या घटकांच्या उध्दारांसाठी पहिले पाऊल त्यांनी टाकले. अस्पृश्यांचा उध्दार व्हावयाचा असेल तर त्यांच्यात शिक्षण आणि जागृती या दोन गोष्टीची गरज आहे. हे ओळखूनच महाराजांनी हा निर्णय घेतला होता.

शाहू महाराजांनी 'उक्ती आणि कृती' यामध्ये अंतर येऊ दिले नाही. म्हणूनच आज देखील समाज त्यांचा ऋणी आहे. इतकेच नव्हे तर बाबासाहेबांनी लंडनहून पाठविलेल्या ४ सप्टेंबर १९२१ रोजीच्या पत्रात शाहू महाराजांचा (कार्याचा) गौरव करताना लिहिले होते, आपली प्रकृती ठीक आहे अशी मला आशा आहे; आपली आम्हाला फारच जरूरत आहे. कारण हिंदुस्थानात प्रगती करित असलेल्या सामाजिक लोकशाहीच्या महान चळवळीचे आपण एक आधारस्तंभ आहात.[१०] (Pillor of Great Movements Of Social Democracy) एका महान व्यक्तिमत्त्वाकडून दुसऱ्या महापुरूषांच्या कार्याचा गौरव ही दुर्मिळ गोष्ट आधुनिक भारताच्या इतिहासातील अद्वितीय आहे. त्या अर्थाने उभय महापुरूषांच्या विचार व कार्याची गरज भारतवंशीय आहे यात शंका नाही.

सारांश :

प्रस्तुत विषयाचा विविध अंगानी अभ्यास केला असता शाहू महाराजांच्या कार्याच्या कक्षा सर्वच क्षेत्रात विस्तारलेल्या होत्या. राजा असून देखील सर्वसामान्य व्यक्तीसारखे जीवन जगले त्यांच्यावर पाश्चिमात्य लोकशाही, उदारमतवादाचा पाश्चिमात्य लोकशाही, उदारमतवादाचा प्रभाव राहिला. हाच विचार प्रवाह भारतीय प्रगतीच्या दिशेने घेऊन जाईल. त्यांनी प्रतिपादित 'आरक्षण व शिक्षण' विषयक कायदा आजही लागू पडतो. मोफत आणि सक्तीचे शिक्षण (Free and Compulsory Education) जो वर्तमानातील शासनास मार्गदर्शक करणारा आहे. आरक्षणाच्या माध्यमातून मागास घटकांच्या कल्याणाचा विचार अनिवार्य वाटतो. स्त्रिया, आदवासी, भटके, विमुक्त या जातीच्या कल्याणासाठी म्हणून महाराजांचे विचार व कार्य प्रासंगिक ठरते. म्हणून बाबासाहेब म्हणतात शाहू महाराजांसारखा सखा अस्पृश्यांना पूर्वी लाभला नव्हता व पुढे लाभेल की नाही याबद्दल आम्हांस शंका आहे.

संदर्भ सूची :

१. ले. जयसिंगराव पवार, 'राजर्षी शाहू छत्रपती जीवन व कार्य', तारांराणी बुक सर्व्हिस, कोल्हापूर, ऑक्टोबर २०१५, पृ.क्र. ११६.
२. ले. कृ. गो. सुर्यवंशी, 'राजर्षी शाहू राजा व माणूस', ठोकळ प्रकाशन, १००४, बुधवार पेठ, पुणे, पृ. क्र. ४५.
३. कित्ता, पृ. क्र. ४०.
४. उपरोक्त संदर्भ क्र. (१), पृ. क्र. ७१.
५. डॉ. शरणकुमार लिंबाळे, 'प्रज्ञासूर्य', दिलीपराज प्रकाशन, शनिवार पेठ, पुणे-४११०३०, पृ. आ. २६ जून १९९२, पृ. क्र. ५९.
६. कित्ता, पृ. क्र. ६३.
७. उपरोक्त संदर्भ (१), पृ. क्र. १०७, १०८
८. प्रा. विलास खरात, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची हत्या कोणी? का? व कशी केली?', प्रकाशक - डॉ. बाबासाहेब आंबेडकर रिसर्च सेंटर, नवी दिल्ली, ११०००५, सहावी आ. ६ डिसेंबर, २०१२, पृ. क्र. २१५.
९. उपरोक्त, संदर्भ क्र. (०४) पृ. क्र. ६१.
१०. ले. धनंजय कीर, 'राजर्षी शाहू छत्रपती', पॉप्युलर प्रकाशन, दुसरी आवृत्ती-१९९२, पृ. क्र. ३०६.

■■■

राजर्षी शाहू महाराज-एक लोक कल्याणकारी राजा

डॉ. रुपेश एम.मेश्राम
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभागप्रमुख
डॉ.बाबासाहेब आंबेडकर कॉलेज ऑफ आर्टस,
कॉमर्स अँड सायन्स, ब्रम्हपुरी.
rupesh25meshram@gmail.com, 8668476532

सारांश :

स्वातंत्र्य,समता व बंधुता यावर आधारित समाजरचना निर्माण करण्याचे कार्य शाहू महाराजांनी केले. शेती, उद्योग, व्यापार क्षेत्रात केलेल्या सुधारणा, दुष्काळात शेतकरी आणि प्रजेला केलेली मदत, प्लेग रोगाच्या निवारणासाठी केलेल्या उपाययोजना शाहू महाराज प्रजाहितदक्ष असल्याचे प्रतिक आहे. कोल्हापूर संस्थानात ब्राह्मणेत्तरासाठी प्रशासनातील ५० टक्के जागा राखीव ठेवल्या. अस्पृश्यांवर लादण्यात आलेली हजेरी पद्धत बंद केली, अस्पृश्यांना खाजगी सेवेत आणि सरकारी नोकरीत सामील केले, शिकलेल्या अस्पृश्य तरुणांना वकिली व्यवसायाची सनद दिली. भटक्या-विमुक्त लोकांवर विश्वास दाखवून त्यांना रोजगार उपलब्ध करून दिला, त्यांच्या मुलांसाठी शिक्षणाची सोय, निवासाची व्यवस्था, प्राथमिक शिक्षण मोफत आणि सक्ती शिक्षण, ग्रामीण भागात शाळांची सुरुवात, मुलींकरिता शाळा, शिष्यवृत्ती, वसतिगृहे, विधवा पुनर्विवाहाला उत्तेजन, आंतरजातीय-आंतरधर्मीय विवाहाचा पुरस्कार, स्त्रियांच्या हक्काचे संरक्षण, पोटगीचा अधिकार, घटस्फोटीत स्त्रीच्या मुलांच्या शिक्षणाची व्यवस्था, तांत्रिक शिक्षणाची सुरवात, नव्या बाजारपेठांची निर्मिती, कापड गिरणीची स्थापना, राधानगरी धरणाची निर्मिती, कोल्हापूर-मिरज रेल्वेमार्गाची पायाभरणी ही सर्व कार्ये राजर्षी शाहू महाराज लोक कल्याणकारी राजा असल्याचे प्रतिक आहे.

प्रस्तावना :

आधुनिक भारताच्या इतिहासात लोककल्याणकारी राजा म्हणून राजर्षी शाहू महाराज यांना ओळखल्या जाते.राजर्षी शाहू महाराज प्रजेच्या कल्याणासाठी अविरत कार्य करणारे राजे होते. उपेक्षित-वंचित जनतेचा आवाज म्हणजे राजर्षी शाहू महाराज. लोक कल्याणकारी व समताधिष्ठित समाजाची निर्मितीच्या प्रयोगाची सुरुवात करणारा राजा म्हणजे राजर्षी शाहू महाराज. बहुजन समाजाला गुलामगिरीच्या बेळीतून बाहेर काढणारे, त्यांच्यात शिक्षणाची क्रांतीची ज्योत पेटविणारे शिक्षण महर्षी, सामाजिक क्रांतीचा अथांग महासागर म्हणजे राजर्षी शाहू महाराज. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते राजश्री शाहू महाराज सामाजिक लोकशाहीचे आधारस्तंभ होत.

छत्रपती शाहू महाराजांची कारकीर्द केवळ २८ वर्षाची. शाहू महाराजांच्या उदारतावादी दृष्टिकोन आणि नियोजनपूर्वक केलेल्या सर्व सुधारणामुळे महाराष्ट्रात सामाजिक क्रांतीचे नवे युग निर्माण झाले. महाराजांचे शिक्षण सर फ्रेजर आणि सबनीस यांच्या मार्गदर्शनात झाले. २ एप्रिल १८९४ रोजी ते कोल्हापूर गादीचे छत्रपती बनले. राजर्षी शाहू महाराजांचे कृतिशील आणि सर्जनशील विचार आजही प्रभावी आहेत. शाहू महाराजांनी बहुजन वर्गाच्या लढ्याला सामाजिक न्यायाचे आशय प्रदान केले.

राज्यरोहणाच्या १२ दिवसांनी त्यांनी एक सरकारी आदेश काढून लोककल्याणकारी राज्याचा प्रत्यय दिला.तो खेड्यापाड्यातील जनतेच्या सुखदुःखाशी निगडित होता. त्या आदेशानुसार राजा शिकारीसाठी बाहेर जात तेव्हा त्यांचे नोकर जनतेकडून फुकट वसूली करीत त्यामुळे जनतेची प्रचंड लूट होई. हि लुट महाराजांनी बंद केली. शाहू महाराजांनी शेती, प्रशासन, आरोग्य, शिक्षण, स्त्रिया, अस्पृश्य तसेच भटक्या-विमुक्त जातींसाठी सुधारणा करून नव्या युगाचा प्रारंभ केला.

दुष्काळ निवारणाचे कार्य :

१८९६-९७ मध्ये कोल्हापूर राज्यात प्रचंड दुष्काळ पडला. त्यामुळे जनतेचे प्रचंड हाल झाले. त्यामुळे जनतेचे आणि शेतकऱ्यांचे प्रचंड हाल झाले.ते बघून शाहू महाराज अतिशय चिंतीत झाले.दुष्काळामध्ये शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी शाहू महाराजांनी अनेक प्रभावी उपाययोजना केल्या. अन्नधान्याची आयात करून स्वस्त धान्याची दुकाने काढली व प्रजेला अन्नधान्याचा पुरवठा केला. शेतकऱ्यांना सारा माफी देऊन त्यांच्या गुरा-ढोरासाठी वैरणचाऱ्याची व्यवस्था केली, लोकांना रोजगार मिळावा म्हणून संस्थानात रस्ते, विहिरी आणि तलावाची कामे सुरु केली. ग्रामीण भागातील पिकांची पाहणी करण्यासाठी घोड्यावरून महाराज ४० मैल अंतर फिरत होते.[१]

ISSN No. 2394-5990

प्लेगवर उपाययोजना :

१९९८-९९ यावर्षी दुष्काळाबरोबर प्लेगने धुमाकूळ घातला. प्लेगमध्ये लोकांना मदत करण्यासाठी शाहू महाराजांनी अनेक उपाययोजना केल्या. अनेक गावांचे पुनर्वसन केले, लोकांना प्लेगचे शास्त्रीय ज्ञान व्हावे म्हणून 'लोक प्रबोधन' मोहीम सुरु केली, लोकांच्या भेटी घेतल्या व राज्यभर फिरून लोकांना दिलासा दिला.[२]

ब्राह्मणेत्तरांना प्रशासनात प्रवेश :

वेदोक्त प्रकरणामुळे शाहू महाराजांना प्रचंड त्रास झाला. यामुळे उच्चवर्णीय लोकांकडून ब्राह्मणेत्तराना किती त्रास दिला जात असेल याची कल्पना शाहू महाराजांना आली. शाहू महाराज ब्राम्हणांना धार्मिक ब्युरोक्रसी म्हणत.[३] सर्वांना समान हक्क मिळाल्याशिवाय देशोद्धार होणार नाही असे शाहू महाराजांचे मत होते. त्याचा परिणाम म्हणजे शाहू महाराजानी कोल्हापूर संस्थानात ब्राह्मणेत्तरासाठी प्रशासनाचे दरवाजे खुले केले. त्यासाठी २६ जुलै १९०२ रोजी एक जाहीरनामा प्रसिद्ध करून प्रशासनातील ५० टक्के जागा बहुजनासाठी राखीव ठेवण्यात आल्या. त्यांचे हे कार्य भारतीय इतिहासात फार क्रांतिकारी ठरले.

अस्पृश्यांसाठी विशेष कार्य :

राजर्षी शाहू महाराजांनी अस्पृश्यमुक्तीचा एक नवा संग्राम सुरू केला. शाहू महाराजांचे अस्पृश्य मुक्तीचा पहिली अधिसूचना २७ जुलै १९१८ रोजी कोल्हापूर गॅझेट मध्ये प्रसिद्ध झाली. त्यानुसार अस्पृश्यांवर लादण्यात आलेली हजेरी पद्धत बंदची घोषणा करण्यात आली. गुन्हा केलेल्या अस्पृश्य लोकाना पाटील किंवा कुलकर्णी कडे दररोज हजेरी द्यावी लागे. हजेरी असल्यामुळे गरीब लोकांवर पाटील व कुलकर्णी यांच्याकडून प्रचंड त्रास दिला जाई. अस्पृश्य आणि भटक्या-विमुक्त जातीतील लोकांकडून हजेरीच्या मोबदल्यात फुकट काम करून घेतले जात होते. गावात चोरी झाल्यास हजेरीवाल्या लोकांची दैना होई. त्यामुळे शाहू महाराजांनी हजेरी पद्धत बंद करण्याचा निर्णय घेऊन तो त्वरित अंमलात आणला.राजर्षी शाहू महाराजांनी माणगावच्या परिषदेत यावर विस्तृत भाषण केले.[४]

वतनदारी पद्धतीमध्ये महार वतन होते. महार वतनदारांमध्ये 'वेठवरळा' ही अमानुष पद्धत होती. ती एक प्रकारे सामाजिक गुलामगिरी होती. त्यांची या गुलामगिरीतून मुक्तता करण्याचा निर्धार शाहू महाराजांनी केला. शाहू महाराजांनी महार लोकांना वतने सोडण्याचे आवाहन केले. माणगाव परिषदेच्यानंतर वटहुकूम काढून महाराजांनी 'वेठवरळा' ही पद्धत बंद केली.[५]

अस्पृश्यततेचे निवारण :

भारतीय देशात इतिहासात अस्पृश्यांच्या साठी अविरत झटणारा आणि कार्य करणारा राजा म्हणून राजश्री शाहू महाराज यांना ओळखले जाते अस्पृश्यतेच्या निवारणासाठी राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या कारकिर्दीमध्ये भरपूर प्रयत्न केले. १जानेवारी १९१९ ला दोन जाहीरनामे काढले.पहिला महसूल व न्याय खात्याशी तर दुसरा आरोग्य विभागाशी संबंधित होता. या जाहीरनाम्यानुसार सामाजिक विषमता नष्ट करण्याचे कार्य शाहू महाराजांनी केले. ६ सप्टेंबर १९१९ रोजी शाहू महाराजांनी सर्व जनतेसाठी सार्वजनिक इमारती, धर्मशाळा, रेस्ट हाऊस, सरकारी अन्नछत्रे, नदीचे पाणवटे, सार्वजनिक विहिरी या ठिकाणी कोणत्याही प्रकारचा विटाळ मानण्यात येणार नाही असा अस्पृश्यता निर्मुलनाचा जाहीरनामा घोषित केला.[६]

अस्पृश्यतेचे उच्चाटन करणे हे शाहू महाराजांचे मुख्य ध्येय होते. केवळ हुकूम आणि जाहीरनामे काढून शाहू महाराज स्वस्त बसले नाही. उदघोषित केलेल्या तत्त्वानुसार शाहू महाराजांनी आपल्या खाजगी सेवेत आणि सरकारी नोकरीत अस्पृश्यांना सामील करून जगासमोर एक आदर्श निर्माण केला. संस्थानाच्या सेवेमध्ये अनेक जातीची लोक काम करीत होते. शाहू महाराजांनी १९१७ मध्ये आपल्या ङ्गलष्करी फडातफचार अस्पृश्यांची, महसूल खात्यात तलाठी, पोलीस म्हणून नेमणुका केल्या.कोल्हापूर म्युनिसिपाल्टीच्या कार्यालयात एका अस्पृश्याची नियुक्ती केली. एवढेच नव्हे तर चेअरमनपदी दत्तोबा पोवार याची नियुक्ती करण्यात आली. अस्पृश्य वर्गातील पैलवानांना शाहू महाराजांनी जाट,पंडित व सरदार अशी नावे दिली.[७]

शाहु महाराजांनी उच्चवर्णीय जातींच्या पुढाऱ्यासमोर अस्पृश्य लोकांच्या हातातील चहा घेण्याचा नवा प्रयोग सुरु केला. गंगाराम कांबळे हा सरकारी पागेतील मोतद्दार होता. एके दिवशी त्याचा पाण्याच्या हौदाला स्पर्श झाला त्यामुळे त्याला मारहाण करण्यात आली. याची वार्ता कळताच शाहू महाराजांनी मारहाण करणाऱ्या मंडळींना बोलून त्यांच्यावर जरब बसविला. पुढे याच गंगाराम कांबळेने महाराजांच्या प्रोत्साहनाने कोल्हापुरच्या मुख्य रस्त्यावर सत्यशोधक नावाचे हॉटेल काढले. त्या हॉटेलमध्ये जाऊन शाहू महाराज चहा घेत असत. शाहू महाराजांच्या निधनानंतर गंगाराम कांबळेने त्यांचे स्मारक स्थापन करण्यासाठी एक मंडळ स्थापन करून कोल्हापुरात १९२५ मध्ये शाहू महाराजांचे स्मारक उभारले. हे स्मारक कोल्हापुरातीलच नव्हे तर संपूर्ण भारतातील शाहू महाराजांचे पहिले स्मारक होई. शाहू महाराजांनी शिकलेल्या अस्पृश्य लोकांना वकिली व्यवसायाची सनद दिली.

अस्पृश्य निवारणाचा प्रश्न सोडवितांना शाहू महाराजांनी कोणाचीही गय केली नाही. जातीभेद व अस्पृश्यता ह्या गोष्टी द्वेष पसरविणाऱ्या असल्यामुळे ब्राह्मण वर्गाने त्याचा त्याग करावा अशी विनंती शाहू महाराजांनी केली.

भटक्या–विमुक्त जातीचा उद्धाराचे कार्य :

अस्पृश्य समाजाच्याबरोबर शाहू महाराजांनी भारतीय समाजातील अधिक उपेक्षित असलेला भटक्या–विमुक्त जातीच्या समाजाचे प्रश्न सोडविण्याकडे विशेष कार्य केले. भटक्या विमुक्त जाती या गावगाड्याच्या भाग नव्हत्या. त्यांना नेहमी भटकंती करावी लागे. गावगाडाच्या संस्कृतीशी त्यांचा देता काही संबंध नव्हता. न्याय निवाडासाठी त्यांची स्वत:ची जात पंचायती होती. इंग्रजी सत्तेमुळे भारताच्या सामाजिक क्षेत्रामध्ये फार बदल होऊन भटक्या जातीला त्याचा फटका बसला. उदरनिर्वाहाची साधने नष्ट झाली, काही लोक चोरी, दरोडे अशा कृत्यांमध्ये सापडली. त्यामुळे या जातीला गुन्हेगारी जात म्हटले जाई. या लोकांच्या जीवनात बदल करण्यासाठी शाहू महाराजांनी प्रामाणिकपणे प्रयत्न केले.

विशेषतः शाहू महाराजांनी नेमबाजीत तरबेज असलेल्या फासेपारधी समाजातील लोकांना आपल्या निवासस्थानाच्या संरक्षणाची जबाबदारी सोपविली. शाहू महाराजांनी दाखविलेला हा विश्वास एका नवीन प्रयोगाची सुरुवात होती. पहारेकरी व पोलीस खात्यात रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध करून दिल्या तसेच रस्ते, विहिरी, घर बांधणे हि कामे दिली. धरणाची कामे फासेपारधी लोकांना कामे देण्यात आली. त्यांच्या मुलांकरिता शिक्षणाची व जेवणाची सोय उपलब्ध करून दिली, काही हुशार मुलांना आर्य समाजाच्या गुरुकुलात आणले. १९२२ मध्ये शाहू महाराजांनी एक आदेश काढून फासेपारधी कुटुंबीयांकरिता घरे बांधण्यासाठी निधी दिला, शेकडो एकर जमीन 'जात इनाम' देण्यात आल्या. भटके जीवन जगणाऱ्या आणि गुन्हेगारीचा शिक्का बसलेल्या या जाती माणूस म्हणून मुख्य प्रवाहात आणण्याचे फार मोठे कार्य केले.[८]

शिक्षणविषयक कार्य :

बहुजन समाजाला वरिष्ठ वर्गाच्या बरोबरीने आणायचे असेल तर शिक्षणाशिवाय दुसरे साधन नाही हे शाहू महाराजांनी जाणले होते. इंग्रजानी भारतातील सर्वांसाठी शिक्षणाची दारे खुली केली. शिक्षण हे सामाजिक सुधारणांची आणि प्रगतीसाठी महत्वाचे असून गुलामगिरी नष्ट करण्याचे महत्त्वाचे साधन आहे हे शाहू महाराजांनी ओळखले होते. नाशिकच्या एका भाषणात बोलताना शाहू महाराज म्हणतात खालच्या वर्गातील लोकांच्या बुद्धीवर आणि ज्ञानावर जे जड व जुलमी जू लादले आहे ते झुगारून देऊन बहुजन समाजाचे अंगी येण्यास सक्ती आणि मोफत प्राथमिक शिक्षणाची फार गरज आहे.[९]

प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक करावे असा विचार १९१२–१३ च्या दरम्यान शाहू महाराजांना आला. प्राथमिक शिक्षण सर्वांना सोयीचे व्हावे यासाठी सार्वत्रिक शिक्षणाचा प्रयोग केला. प्रत्येक खेड्यात एक शाळा स्थापन केली. २४ जुलै १९१७ ला एक जाहीरनामा प्रसिद्ध करून करवीर भागात प्राथमिक शिक्षण मोफत आणि सक्तीचे करण्यात आले. २१ सप्टेंबर १९१७ रोजी शाहू महाराजांनी ङ्गसक्तीच्या शिक्षणाचा कायदाफ लागू केला. त्यानुसार पाचशे ते हजार लोकसंख्या असलेल्या प्रत्येक गावात प्राथमिक शाळा सुरु करण्यात आली. शाळेकरीता इमारत म्हणून चावडी, मंदिर आणि धर्मशाळामध्ये शाळा सुरू करण्यात आली. कोल्हापूर सारख्या लहानशा संस्थानामध्ये शाहू महाराजांनी प्राथमिक शिक्षणावर दरवर्षी लाख रुपये खर्च केले. १९१८ ला शाहू महाराजांनी एक स्वतंत्र शिक्षण खाते स्थापन करून त्यावर डायरेक्टर आणि एज्युकेशनल इन्स्पेक्टर या वरिष्ठ अधिकाऱ्यांची नियुक्ती केली. शाळेत मुले न पाठविणाऱ्या लोकांना दंड करण्यात आले. शाहू महाराजांचे शाहू महाराजांनी प्राथमिक शिक्षणाबरोबरच हायस्कूल पर्यंतचे शिक्षण मोफत केले.

१८९६ मध्ये मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी स्वखर्चाने एक वसतिगृह स्थापन केले. १८ एप्रिल १९०१ रोजी 'व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग'ची स्थापना करण्यात आली. त्याकरिता ५५० रु. वार्षिक अनुदान देण्यात आले. या वस्तीगृहात सर्व जाती–धर्माच्या विद्यार्थ्यांना राहण्याची सोय करण्यात आली. १९०१ मध्ये 'जैन बोर्डिंग' ची स्थापना करण्यात आली. प्रत्येक वसतिगृहास इमारती, खुल्या जागा, कायमस्वरूपी उत्पन्नाची सोय करू देण्यात आली. शाहू महाराजांनी गरीब आणि ब्राह्मणेत्तर विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची उत्तम सोय करून सामाजिक कार्यात एका अभिनव प्रयोगाची सुरुवात केली. शाहू महाराजांनी अस्पृश्यांच्या मुलांसाठी १९०८ मध्ये कोल्हापूर येथे 'मिस क्लार्क होस्टेल' स्थापन केले. मुस्लीम समाजाविषयी महाराजांच्या मनात प्रेम होते. त्यामुळे मुस्लिमांसाठी स्वतंत्र वसतिगृह काढण्याचे शाहू महाराज प्रयत्न होते. १९०६ मध्ये ङ्गमोहमेडन एज्युकेशन सोसायटीची स्थापना करून मुस्लिमांसाठी बोर्डिंग सुरु करण्यात आले.

शाहू महाराजांनी वेगवेगळ्या जातीच्या विद्यार्थ्यांसाठी कोल्हापुरात अनेक वस्तीगृह स्थापन केली. १८९४ मध्ये कोल्हापुरात अस्पृश्यांसाठी फक्त ५ शाळा व १६८ होते. शाहू महाराजांच्या कार्यामुळे १९०७ मध्ये १६ शाळा व ४१६ विद्यार्थी

ISSN No. 2394-5990

तर १९१२ मध्ये ती वाढून २७ शाळा तर ६३६ विद्यार्थी संख्या झाली. अस्पृश्यांच्या मुलांना उच्चवर्गीय विद्यार्थ्यांच्या बरोबर आणण्यासाठी छत्रपती शाहू महाराजांनी पात्रता वर्गाची सुरुवात केली.अस्पृश्य समाजासाठी कोल्हापुरात रात्रीची शाळा सुरु करण्यात आली. १९०७ मध्ये अस्पृश्य समाजातील मुलींसाठी शाळा सुरु करण्यात आली. त्या शाळेसाठी ९६ रुपये तरतूद स्त्री शिक्षणाच्या अंदाजपत्रकात शाहू महाराजांनी केली. १९११ मध्ये अस्पृश्य वर्गासाठी सर्व प्रकारच्या मोफत शिक्षणाची सोय करण्यात आली. अस्पृश्य विद्यार्थ्यांसाठी दरमहा आठ रुपये शिष्यवृत्ती जाहीर करण्यात आली. अस्पृश्य मुलांना शिक्षणासाठी उत्तेजन मिळावे म्हणून शाहू महाराजांनी मोफत पुस्तके, पाट्या व पेन्सिली देण्यासाठी २५००/- रुपये मंजूर केले.[१०]

स्त्रियांसाठी केलेले कार्य :

महात्मा फुले यांच्यानंतर स्त्रियांच्या साठी बहुमोल सुधारणा कार्य शाहू महाराजांनी केले. शाहू महाराजांचे स्त्रियांविषयीचे विचार समानता आणि सुधारणावादी होते.

१ . स्त्री शिक्षण :

मिस लिटल या इंग्रज शिक्षणाधिकारी मायदेशी गेल्यावर त्याजागी शाहू महाराजांनी कोल्हापूरातील 'फीमेल ट्रेनिंग स्कूल' मध्ये रखमाबाई केळवकर या बुद्धिमान स्त्रीची नेमणूक केली. त्यांनी स्त्रियांच्या शिक्षणाच्या बाबतीत विशेष कार्य केले. संस्थानात मुला-मुलींच्या शाळा होत्या तरी मुलींसाठी काही स्वतंत्र शाळा स्थापन करण्यात आल्या. मागास भागातील मुलींसाठी शाहू महाराजांनी सह्याद्री पर्वतरांगाच्या भागांमध्ये काही शाळा स्थापन केल्या.

शाहू महाराजांनी मागास जातीतल्या स्त्रियांसाठी १९१९ मध्ये एक खास हुकूम काढून शिक्षण घेणाऱ्या स्त्रियांच्या राहण्याची व जेवणाची मोफत व्यवस्था करून त्यांना शिष्यवृत्ती जाहीर केल्या. राजाराम कॉलेजमध्ये शिकणाऱ्या सर्व मुलींना मोफत शिक्षणाची सोय करून दिली. मुलीना वैद्यकीय शिक्षण आणि उच्च शिक्षणासाठी शाहू महाराजांनी मदत केली. त्याचबरोबर आपल्या कुटुंबाच्या विरोधाची पर्वा न करता शाहू महाराजांनी आपल्या विधवा सुनेला शिक्षण दिले.

२. विधवा पुनर्विवाह नोंदणी कायदा :

भारतासारख्या पुरुषप्रधान संस्कृतीच्या देशात स्त्रियांवर अनेक बंधने लादण्यात आली होती. समाजाकडून आणि कुटुंबीयांकडून होणारी पिळवणूक थांबविण्यासाठी शाहू महाराजांनी आपल्या कारकिर्दीत अनेक कायदे केले. जुलै १९१७ मध्ये शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात विधवा पुनर्विवाह कायदा पास केला. या कायद्याने आंतरजातीय विवाहाला मान्यता देण्यात आली. या कायद्यानुसार विवाहाच्या वेळी पुरुषाचे वय १८ वर्षे आणि स्त्रीचे वय १४ वर्षे असले पाहिजे असे निश्चित करण्यात आले. १८ वर्ष पूर्ण झालेल्या स्त्रीला आपला जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य या कायद्याने देण्यात आले. त्यामुळे हा कायदा म्हणजे स्त्री-पुरुषांच्या सामाजिक समतेसाठी शाहू महाराजांचे क्रांतिकारी कार्य होते.

३. स्त्रियांच्या संबंधित इतर कायदे :

भारतीय स्त्रियांवर कौटुंबिक अत्याचार केले जाई, क्रूरपणे वागविले जाई. त्यामुळे स्त्रियांच्या संरक्षणासाठी ऑगष्ट १९१९ मध्ये शाहू महाराजांनी कायदा केला.या कायद्यानुसार स्त्रीला क्रूरपणे वागणूक देणाऱ्यास शिक्षेची तरतूद करण्यात आली.

शाहू महाराज यांनी घटस्फोटीत स्त्रियांच्या हक्काचे संरक्षण करण्यासाठी, घटस्फोटानंतर स्त्रीची आबाळ होऊ नये यासाठी स्त्रीला पोटगीचा अधिकार, घटस्फोटीत स्त्रीच्या मुलांच्या शिक्षणाची व्यवस्था या कायद्यानुसार करण्यात आली. शाहू महाराजांचे स्त्रीमुक्तीच्या संदर्भातील हे कार्य महत्त्वाचा आहे.

तत्कालीन समाजात देवाच्या नावावर मुली सोडण्याची अनिष्ट प्रथा अस्तिवात होती. या प्रथेतून देवदासी, जोगतीण, मुरळी च्या समस्या निर्माण झाल्या. शाहू महाराजांनी जानेवारी १९२० च्या कायदा करून बंदी घातली त्यामुळे ही पद्धती आपोआप बंद झाली. याबरोबरच शाहू महाराजांनी तांत्रिक शिक्षणाची सुरवात,नव्या बाजारपेठांची निर्मिती, कापड गिरणीची स्थापना, राधानगरी धरणाची निर्मिती, कोल्हापूर-मिरज रेल्वेमार्गाची पायाभरणी या सारखे अनेक विविध समाजपयोगी कार्य शाहू महाराजांनी केले.

समारोप :

राजर्षी शाहू महाराजानी अल्प कारकिर्दीत आपल्या कार्याने केवळ महाराष्ट्राच्या नव्हे तर भारताच्या इतिहासाला कलाटणी दिली. स्वातंत्र्य,समता व बंधुता यावर आधारित समाजरचना निर्माण करण्याचे कार्य शाहू महाराजांनी नियोजनपूर्वक आणि धोरणात्मक पद्धतीने केले. शेती, उद्योग, व्यापार क्षेत्रात केलेल्या सुधारणा, दुष्काळात शेतकरी आणि प्रजेला केलेली मदत, प्लेग रोगाच्या निवारणासाठी केलेल्या उपाययोजना ह्या शाहू महाराज प्रजाहितदक्ष असल्याचे प्रतिक आहे. अस्पृश्य समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रशासनात केलेली ५० टक्के राखीव जागांची सोय, शिक्षणाच्या सोयी, प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे शिक्षण हे त्यांच्या सामाजिक न्यायाचे प्रतिक आहे. स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचारांना आळा घालण्यासाठी केलेले

विविध कायदे, आंतरजातीय-आंतरधर्मीय विवाहाला दिलेली कायदे मान्यता, विधवा पुर्नविवाहाचा कायदेशीर पुरस्कार, स्त्रियांचा घटस्फोटाचा अधिकार, स्त्रियांच्या शिक्षणासाठी केलेले प्रयत्न, स्त्री-पुरुष समानतेचा अधिकार यावरून शाहू महाराज यांचा दृष्टीकोन व विचार किती व्यापक आणि मूलगामी होता हे समजते. शाहू महाराजाच्या सामाजिक कार्य्मुळे जातीभेद आणि द्वेषाचे निर्मुलन होऊन अंधश्रद्धेला तडा गेला.त्यामुळे समाजपरिवर्तनाची चळवळ अधिक बळकट झाली. अस्पृश्यांच्या बरोबरीने भटक्या-विमुक्त जातीच्या लोकांना सामाजिक प्रवाहात आणण्याचे कार्य शाहू महाराजांनी केले. देवदासी,मुरळी,जोगतीण यासारख्या प्रथा कायद्याने बंद केल्या. विशेष म्हणजे शाहू महाराजांच्या शैक्षणिक सुधारणेचे वैशिष्ट म्हणजे जातवार विद्यार्थी वसतिगृहे सुरु झालेली चळवळ होय. पुढील काळात अनेक विद्यार्थी शिक्षण घेऊन मोठ-मोठ्या पदावर गेली. शाहू महाराजांच्या या कार्यापासून प्रेरणा घेऊन पुढील काळात महाराष्ट्रात हजारो वसतिगृहे आणि शाळा काढल्या. यावर बोलतांना धनंजय किर म्हणतात छत्रपती शाहू महाराजांच्या कार्यामुळे अस्पृश्य लोक त्यांना उद्धारकर्ते मानतात. गणेश गवई म्हणतात शाहू महाराज हे आमचे अब्राहम लिंकन आहेत.

संदर्भ ग्रंथ सूची :

१. पवार, जयसिंगराव- राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ-महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, दु.आ. २००७, पृ.-२२

२. कित्ता,पृ.-२२

३. जाधव,भगवानराव बापूसाहेब-राजर्षी शाहू महाराजांची भाषणे, लोक वाङ्मय गृह,मुंबई,पा.आ, २०२२, पृ.-५८

४. कित्ता,पृ.-४९

५. कित्ता,पृ.-५१

६. पवार, जयसिंगराव- राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, पृ.-८२

७. कित्ता, पृ.-८७

८. कित्ता, पृ.-१०६

९. कित्ता, पृ.-११९

१०. कित्ता, पृ.-७४

■■■

ISSN No. 2394-5990

राजर्षी छत्रपती शाहू महाराज आणि कुंभार समुदाय

डॉ. रामचंद्र वसंत कुंभार
सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग,
छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा,
घटक महाविद्यालय, कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ, सातारा
ई.मेल-kumbhar.ramchandra@gmail.com
मोबाईल नं. ९८५०३१३८४८

गोषवारा :

भारतातील एक समाजक्रांतिकारक राज्यकर्ते म्हणून कोल्हापूरच्या राजर्षी छत्रपती शाहू महाराजांना (इ.स. १८७४ ते इ.स. १९२२) ओळखले जाते. कोल्हापूर राज्यातील बहुजन समाजाच्या सर्वांगिन उन्नतीसाठी राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या राजकीय, आर्थिक, विधीविषयक सत्तेचा जाणीवपूर्वक वापर केला. सन १९०२ मध्ये त्यांनी मागासलेल्या जातींच्या लोकांना आपल्या संस्थानातील सरकारी नोकऱ्यांत ५०% जागा राखीव ठेवण्याचा कायदा केला. तर सन १९१७ मध्ये आपल्या संस्थानात प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केले. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी कुंभार समुदायाच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक विकासासाठी अनेक उपाययोजना केल्या. प्रस्तुतच्या शोध निबंधामध्ये राजर्षी शाहू महाराजांनी कुंभार समुदायाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी केलेल्या कार्याचे चिकित्सकपणे परीक्षण करण्याचा प्रयत्न केला आहे. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी विविध जाती-धर्माच्या मुलांसाठी कोल्हापुरात जवळपास २० वसतिगृहे स्थापन केली होती. परंतु या वसतिगृहामध्ये कुंभार समुदायासाठी स्वतंत्र वसतिगृह स्थापन केल्याचे दिसत नाही. यामागे कोणती कारणे आहेत याचाही शोध या शोध निबंधामध्ये घेण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रस्तावना :

भारतातील एक समाजक्रांतिकारक राज्यकर्ते म्हणून कोल्हापूरच्या राजर्षी छत्रपती शाहू महाराजांना (इ.स. १८७४ ते इ.स. १९२२) ओळखले जाते. कोल्हापूर राज्यातील बहुजन समाजाच्या सर्वांगिन उन्नतीसाठी राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या राजकीय, आर्थिक, विधीविषयक सत्तेचा जाणीवपूर्वक वापर केला. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी कुंभार समुदायाच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक विकासासाठी अनेक उपाययोजना केल्या. प्रस्तुतच्या शोध निबंधामध्ये राजर्षी शाहू महाराजांनी कुंभार समुदायाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी केलेल्या कार्याचे चिकित्सकपणे परीक्षण करण्याचा प्रयत्न केला आहे. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी विविध जाती-धर्माच्या मुलांसाठी कोल्हापुरात जवळपास २० वसतिगृहे स्थापन केली होती. परंतु या वसतिगृहामध्ये कुंभार समुदायासाठी स्वतंत्र वसतिगृह स्थापन केल्याचे दिसत नाही. यामागे कोणती कारणे आहेत याचाही शोध या शोध निबंधामध्ये घेण्याचा प्रयत्न केला आहे.

कोल्हापूर संस्थानी राज्य आणि राजर्षी छत्रपती शाहू महाराज :

१८ व्या शतकाच्या सुरूवातीला मराठी स्वराज्याचे विभाजन होऊन सातारा व कोल्हापूर अशी दोन राज्ये निर्माण झाली. छत्रपती राजाराम महाराजांची पत्नी महाराणी ताराबाईने इ.स. १७१० मध्ये पन्हाळगडावर मराठ्यांच्या दुसऱ्या राज्याची म्हणजेच कोल्हापूर राज्याची स्थापना केली. स्वतंत्र कोल्हापूर राज्याची निर्मिती झाल्यानंतर कोल्हापूरच्या गादीवर अनेक सत्ताधीश येऊन गेले. कोल्हापूरच्या संभाजी महाराजांच्या (इ.स. १७१४ ते इ.स. १७६०) मृत्युनंतर त्यांच्या चतुर्थ पत्नी जिजाबाई यांनी शिवाजी दुसरा (इ.स. १७६२ ते इ.स. १८१२) यांच्या नावे इ.स. १७६० ते इ.स. १७७३ पर्यंत कोल्हापूर राज्याचा कारभार पाहिला. जिजाबाईंच्या मृत्युनंतर संभाजी महाराजांची सहावी पत्नी दुर्गाबाईंनी राजप्रतिनिधी म्हणून काम पाहिले. दुसरे शिवाजी यांच्या कारकीर्दीत इ.स. १७८८ मध्ये कोल्हापूर राज्याची राजधानी पन्हाळगडावरून कोल्हापूरला आणण्यात आली.[१] दुसरे शिवाजी यांच्यानंतर शंभू महाराज (इ.स. १८१२ ते १८२१); छ. शहाजी दुसरे (इ.स. १८२१ ते १८३७); छ. शिवाजी तिसरे (इ.स. १८३७ ते १८६०); छ. राजाराम दुसरे (इ.स. १८६६ ते १८७०); चौथे शिवाजी महाराज (इ.स. १८७० ते १८७३) इ. राज्यकर्ते कोल्हापूरच्या गादीवर येऊन गेले. दरम्यान इ.स. १८२९ मध्ये कोल्हापूरचे राज्य ब्रिटीशांच्या सार्वभौम सत्तेखाली आले.[२] इ.स. १८२९ पासून भारत स्वतंत्र होईपर्यंत म्हणजे इ.स. १९४७ पर्यंत कोल्हापूरचे राज्य ब्रिटीशांच्या भारतातील साम्राज्यातील एक संस्थानी राज्य (Princely State) होते.

कोल्हापूरचे महाराज चौथे शिवाजी यांच्या मृत्यूनंतर इ.स. १८८४ मध्ये कागलकर घाटगे घराण्यातील यशवंतराव यांना दत्तक घेऊन त्यांना छत्रपती शाहू या नावाने कोल्हापूरच्या गादीवर बसविण्यात आले. यशवंतराव अर्थातच राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचा जन्म इ. स. १८७४ मध्ये झाला. कोल्हापूर राज्यातील बहुजन समाजाच्या सर्वांगिन उन्नतीसाठी राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी विशेष प्रयत्न केले. दि. २६ जुलै, १९०२ रोजी शाहू महाराजांनी आपल्या राज्यात मागासलेल्या जातींच्या लोकांसाठी ५०% जागा राखीव ठेवण्याचा कायदा केला.[३] पुढे बहुजन समाजाच्या शैक्षणिक प्रगतीसाठी शाहू महाराजांनी दि. २१ सप्टेंबर, १९१७ रोजी कोल्हापूर राज्यात प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करण्याचा कायदा केला.[४]

कोल्हापूर संस्थानी राज्यातील कुंभार समुदायाचे स्थान :

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या काळात भारतातील हिंदू समाजाप्रमाणे कोल्हापूर संस्थानी राज्यातील हिंदू समाज चातुर्वर्ण व्यवस्थेमध्ये विभागलेला होता. कोल्हापूर राज्यातील हिंदू समाजात ब्राहमण सर्वोच्च स्थानी होते तर त्याखालोखाल मराठा जातीचा क्रम लागत होता. त्यानंतर लिंगायत समाजाचे स्थान होते. लिंगायतांमध्ये वाणी व जंगम अशा पोटजाती होत्या. लिंगायत समाजानंतर गुरव व त्यानंतर बलुतेदार वर्गातील सुतार, कुंभार, धोबी, न्हावी हा एकाच श्रेणीतील समाज होता. पण त्यामध्ये श्रेष्ठ कनिष्ठ असा भेद होता. सर्वात उच्च कुंभार, सुतार, न्हावी, धोबी असा क्रम लावला जात होता. हे एकाच श्रेणीतील असले तरी एकमेकात रोटी बेटी व्यवहार होत नव्हते. हिंदू समाजरचनेच्या सर्वात शेवटी चांभार, ढोर, रामोशी, महार, मांग, व्हलर या जातींचे स्थान होते.[५]

१९०१ च्या सेन्सस रिपोर्टनुसार कोल्हापूर राज्यातील हिंदू समाज पाच वर्गामध्ये विभागला होता. पहिल्या वर्गास ब्राहमण, दुसऱ्या वर्गास क्षत्रिय असे संबोधले जात होते, तर तिसऱ्या व चौथ्या वर्गाचे नाव सर्वसाधारण वर्ग (General Classes) असे देण्यात आले होते. सर्वात शेवटचा व पाचवा वर्ग अस्पृश्य (Unclean Castes) म्हणून ओळखला जात असे. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या काळात कोल्हापूर संस्थानात लिंगायत कुंभार आणि मराठा कुंभार अशा दोन जाती कुंभार समुदायामध्ये होत्या. १९०१ च्या सेन्सस रिपोर्टनुसार लिंगायत कुंभार व मराठा कुंभारांच्या सामाजिक दर्जात फरक केला होता. कोल्हापूर राज्यातील हिंदू समाजरचनेमध्ये लिंगायत कुंभारांचा समावेश दुसऱ्या म्हणजे क्षत्रिय वर्गामध्ये केला होता तर मराठा कुंभारांचा समावेश तिसऱ्या म्हणजे सर्वसाधारण वर्गामध्ये (General Class) करण्यात आला होता.६ यावरून राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या काळातील कोल्हापूर संस्थानातील कुंभार समुदायाचे सामाजिक स्थान लक्षात येते.

कोल्हापूर संस्थानी राज्यातील कुंभार समुदायाची लोकसंख्या :

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या काळात कोल्हापूर संस्थानातील कुंभार समुदाय लोकसंख्येच्या बाबतीत एक अल्पसंख्याक समुदाय होता. इ. स. १८८१ मध्ये कोल्हापूर संस्थानातील कुंभार समुदायाची संख्या ८,५०९ होती ती १८९१ मध्ये १२,२५९ झाली. इ. स. १९०१ च्या सेन्सस रिपोर्टनुसार कोल्हापूर संस्थानातील एकूण लोकसंख्या ९,१०,०११ होती आणि कुंभार समुदायाची एकूण संख्या ११,४६० होती.[७] इ. स. १९२१ च्या सेन्सस रिपोर्टनुसार कोल्हापूर संस्थानातील एकूण लोकसंख्या ८,३३,७२६ व कुंभार समुदायाची एकूण संख्या ७,६२४ होती.[८] इ. स. १९३१ च्या सेन्सस रिपोर्टनुसार कोल्हापूर संस्थानातील एकूण लोकसंख्या ९,५७,१३७ होती तर कुंभार समुदायाची एकूण संख्या ७,४७१ होती.[९] या आकडेवारीवरून असे दिसते की कोल्हापूर संस्थानातील कुंभार समुदायाची लोकसंख्या एकूण लोकसंख्येच्या एक टक्का होती. म्हणजेच कोल्हापूर संस्थानातील कुंभार समुदाय हा एक अल्पसंख्याक समुदाय होता.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज आणि कुंभार समुदाय :

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी इतर कारागिरांप्रमाणे कुंभार कारागिरांना मोठा राजश्रय दिला होता. कारागिरांना प्रोत्साहन व मदत देण्यासाठी महाराज कलाकृतींची प्रदर्शने भरून कारागिरांना बक्षिसे देत होते. एप्रिल १८८८ व एप्रिल १८९१ मध्ये कोल्हापूर राजदरबाराने कलाकार व कारागिरांना प्रोत्साहन देण्यासाठी कला-कौशल्याच्या वस्तूंचे प्रदर्शन कोल्हापुरातील टाऊन हॉल येथे भरविले होते. या प्रदर्शनात कुंभारकामातील वस्तूंचा समावेश ७ व्या वर्गामध्ये केला होता. या प्रदर्शनात ७४ कुंभार प्रदर्शकांनी सहभाग घेतला होता. भाजीव विटा, निरनिराळ्या प्रकारची कौले, बरण्या, डबे, पाण्याचे नळे, चिलमी, पांढऱ्या मातीची बशी, गुलाबदानी, अत्तरदाणी, चहादाणी, शेगडया, फिल्टर इ. प्रकाराच्या कुंभारकामाच्या वस्तू प्रदर्शनात आल्या होत्या. विशेष म्हणजे या प्रदर्शनात चंद्रा जोती कुंभार या स्त्री कारागिरानेही सहभाग घेतला होता. प्रदर्शनाच्या शेवटी गोविंद आपा कुंभार, गाव करवीर यांना खुजे व शेगड्यासाठी; गोपाळा आपा कुंभार, गाव करवीर यांना कौले व नळे यासाठी; आपा लकू कुंभार, गाव गडहिंग्लज यांना डेरे या कलाकृतीसाठी; बहिरू सदू कुंभार, गाव पन्हाळा यांना मंगलोरी कौले व दौती यासाठी आणि गिरयापा कुंभार, गाव लक्ष्मेश्वर - मिरज यांना उत्तम कुंभारकामासाठी बक्षिसे व प्रमाणपत्रे देण्यात आली होती.[१०]

ISSN No. 2394-5990

कला-कौशल्याच्या वस्तूंच्या प्रदर्शनाबरोबर राजर्षी छत्रपती शाहू महाराज कुंभार कारागिरांना राजाश्रयही देत असत. कोल्हापुरातील प्रसिद्ध चित्रकार व मूर्तिकार के. आर. कुंभार यांचे आजोबा बाळा कुंभार यांना राजवाडयावर महाराजांच्या स्नानासाठी दररोज २० डेरे पोहोचविण्याचे काम मिळाले होते. रात्रभर डेऱ्यांमध्ये पाणी भरून ठेवले जाई ते महाराज सकाळी स्नानासाठी वापरत. एकदा वापरलेला डेरा दुसऱ्या दिवशी वापरला जात नसे. या डेऱ्यांचा चांगला मोबदला मिळत असे.[११] राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी उदार राजाश्रय दिल्यामुळे आसपासच्या संस्थानातून, खेड्यातून अनेक कारागीर कोल्हापुरात येऊन स्थाईक झाले होते. महाराजांनी अशा कुंभार कारागिरांनाही आश्रय व मदत दिल्याची अनेक उदाहरणे सापडतात. दि. १७ ऑक्टोबर, १९०८ च्या महाराजांच्या जाहीरनाम्यानुसार इतर व्यावसायिकांप्रमाणे कुंभार लोकांना वसाहतीसाठी व व्यवसायासाठी कोल्हापूर शहराबाहेर मोठी जागा दिली. ही जागा देण्यासाठी महाराजांनी खाजगी जमिनी ताब्यात घेतल्या होत्या.[१२]

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षणाचे धोरण आणि कुंभार समुदाय :

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या संस्थानातील शैक्षणिक विकासासाठी अनेक उपाययोजना केल्या. महाराजांनी दि. २५ जुलै, १९१७ रोजीच्या शाळा खाते ठराव क्र. २०२ नुसार मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाबाबतचा आदेश काढला. या आदेशामुळे कोल्हापूर संस्थानातील शैक्षणिक विकासास गती मिळाली. १९ व्या शतकाच्या शेवटी कोल्हापूर राज्यातील शाळांची संख्या २२७ होती व त्यामधून शिक्षण घेणाऱ्या मुलांची संख्या १४ हजार पर्यंत गेली होती, तर एकूण साक्षरतेचे प्रमाण ३.९ % होते.[१३] राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या सन १९१७ च्या मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाच्या कायद्यामुळे २० व्या शतकात कोल्हापूर संस्थानातील शैक्षणिक परिस्थितीमध्ये सुधारणा झाल्याचे दिसते. सन १९३१ च्या सेन्सेसनुसार कोल्हापूर संस्थानातील साक्षरतेचे प्रमाण ६.६१% होते.[१४] थोडक्यात सन १९१७ च्या मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाच्या कायद्यामुळे कोल्हापूर संस्थानातील शैक्षणिक प्रगती होऊन साक्षरतेचे प्रमाण जवळजवळ दुप्पट झाले.

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या सन १९१७ च्या मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाच्या कायद्यामुळे कोल्हापूर संस्थानातील कुंभार समुदायाच्या शैक्षणिक प्रगतीस सुरुवात झाली. मात्र एकूण लोकसंख्येच्या तुलनेत कुंभार समुदायाची शैक्षणिक प्रगती फारच कमी झाल्याचे दिसते. सन १९३१ च्या सेन्सेसनुसार कोल्हापूर संस्थानातील साक्षरतेचे प्रमाण ६.६१% होते. तर सन १९३१ च्या सेन्सेसनुसार कोल्हापूर संस्थानातील कुंभार समुदायाची एकूण लोकसंख्या ७,४७१ होती, त्यापैकी फक्त २२९ जणच साक्षर होते. म्हणजेच कुंभार समाजाच्या साक्षरतेचे प्रमाण १९३१ मध्ये ३.०६% म्हणजे एकूण लोकसंख्येच्या साक्षरतेच्या निम्म्यापेक्षा कमी होते.[१५]

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी विविध जाती-धर्माच्या मुलांसाठी कोल्हापुरात जवळपास २० वसतिगृहे स्थापन केली होती. मात्र कुंभार समाजातील मुलांसाठी स्वतंत्र वसतिगृह बांधले नाही. लिंगायत कुंभार मुलांना वीरशैव लिंगायत वसतिगृहात प्रवेश दिला जात असे. मराठा बोर्डिंगमध्ये मराठा कुंभार मुलांना प्रवेश मिळत असावा. त्यामुळे कदाचित राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी कुंभार समाजातील मुलांसाठी स्वतंत्र वसतिगृह बांधले नसावे. मात्र शाहू महाराजांनी कुंभारांच्या ङ्कअष्ट म्हेतर कुंभार दैव मंडळ, कोल्हापूरफ या संस्थेस साडे सहा एकर जमीन दिली होती.[१६]

निष्कर्ष :

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या कोल्हापूर संस्थानातील बहुजन समाजाच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, धार्मिक उत्थानासाठी मोठे प्रयत्न केले. त्यासाठी वेळप्रसंगी अतिशय कडक स्वरूपाचे कायदेही केले. कोल्हापूर संस्थानातील कुंभार समुदाय एक अल्पसंख्याक व मागासलेला समुदाय होता. आपल्या राज्यातील मागसलेल्या लोकांच्या उन्नतीसाठी शाहू महाराजांनी अनेक उपाययोजना केल्या. त्याचा फायदा इतर मागालेल्या लोकांप्रमाणे कुंभार समुदायालाही झाल्याचे दिसते. सन १९०२ च्या महाराजांच्या आरक्षणाच्या धोरणामुळे कुंभार समुदायातील लोकांना सरकारी नोकरी करण्याची संधी प्राप्त झाली. पुढे सन १९१७ च्या प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करण्याच्या महाराजांच्या निर्णयामुळे कुंभार समुदाय शिक्षण घेण्याकडे वळला. मात्र महाराजांच्या या धोरणाचा जास्त फायदा करून घेण्यात कोल्हापूर राज्यातील कुंभार समुदाय कमी पडल्याचे सन १९३१ च्या सेन्सेसमधील आकडेवारीवरून दिसते. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी विविध जाती-धर्माच्या मुलांसाठी कोल्हापुरात जवळपास २० वसतिगृहे स्थापन केली होती. मात्र कुंभार समाजातील मुलांसाठी स्वतंत्र वसतिगृह बांधले नाही. याबाबतीत शाहू महाराजांचे आपल्या राज्यातील कुंभार समुदायाकडे दुर्लक्ष झाले का? असा प्रश्न उपस्थित होतो. कदाचित इतर वसतिगृहामध्ये कुंभार समुदायातील मुलांना प्रवेश मिळत असल्यामुळे कुंभार समुदायाने महाराजांकडे याबाबतीत पाठपुरावा केला नसावा.

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी कुंभार कारागिरांना राजाश्रय व मदत दिल्याची अनेक उदाहरणे सापडतात. सन १८८८ व १८९१ मध्ये राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी कलाकार व कारागिरांना प्रोत्साहन देण्यासाठी कला-कौशल्याच्या वस्तूंचे प्रदर्शन भरवून उत्कृष्ट कुंभारकामासाठी बक्षिसे दिली होती. याशिवाय दि. १७ ऑक्टोबर, १९०८ रोजी महाराजांनी एक अध्यादेश काढून खाजगी मालकीच्या जमिनी ताब्यात घेऊन त्या कुंभार लोकांना त्यांच्या वसाहतीसाठी व व्यवसायासाठी दिल्या. राजर्षी शाहू महाराजांनी कुंभारकाम व्यवसायास राजाश्रय दिला होता. मात्र स्वातंत्र्योत्तर कालखंडात राजाश्रय संपुष्टात आल्यामुळे कुंभारकाम व्यवसायासारखे अनेक व्यवसाय ऱ्हास पावले.

संदर्भ :

१. भिडे ग. रं. देशपाडे पु. ल.(संपा.) कोल्हापूर दर्शन(श्रीमान मदनमोहन लोहिया अभिनंदन ग्रंथ) प्रथम आवृत्ती इंटरनॅशनल पब्लिशिंग सर्व्हिस डेक्कन जिमखाना पुणे १९७१ पान नं. ३१.

२. कित्ता पान नं. ६०.

३. डॉ. जयसिंगराव पवार (संपा.), राजर्षी शाहू छत्रपतींचे जाहीरनामे व हुकूमनामे, द्वितीय आवृत्ती, सुमेरू प्रकाशन, डोंबिवली (पूर्व), २०१०, पान नं. ३३.

४. Dr. Sangave Vilas (Ed.), Rajarshi Shahu Chhatrapati Papers, Vol. - II (1914 - 1917 A. D.), Shahu Research Centre, Shivaji University, Kolhapur, Kolhapur, 1997, P. P. 359.

५. भोसले नंदकुमार, कोल्हापूर राज्यातील समाजिक - आर्थिक परिस्थिती (१९०१ ते १९६०), एम. फिल. प्रबंधिका, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, १९९०, पान नं. ३१ व ३२.

६. Census of 1901Kolhapur and S.M.C. States, Kolhapur Government, Kolhapur, 1903, P.P.101 to102.

७. Ibid P. 103.

८. Census of 1921 Kolhapur and S.M.C. States, Part - II, Kolhapur Government, Kolhapur, 1923, P.-178.

९. Census of 1931 Kolhapur and S.M.C. States, Kolhapur Government, Kolhapur, 1932, P. - 173.

१०. Catalogue of the Industrial and Other Products of Kolhapur and S.M.C. States, exhibited at the Industrial Exhibition held at Kolhapur in -pril 1891, P. 14.

११. संतोश कन्हैया पोवार, कलाव्यापी, उदय कृष्णा कुंभार, कोल्हापूर, २००९ पान नं. १३.

१२. डॉ. जयसिंगराव पवार (संपा.), उपरोक्त पान नं. ४९.

१३. डॉ. खंडेराव शिंदे कोल्हापूर राज्यातील सामाजिक आर्थिक परिस्थिती(१८५१ - १९००), एम.फिल. प्रबंधिका, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, १९९४ पान नं. ३६.

१४. Census of 1931, Op. Cit. P. 624.

१५. http://hdl.handle.net/10603/285342

१६. श्री पुढारी टाईम्स बावडा १२ फेब्रुवारी, २००४ कोल्हापूर पान नं. ६.

■■■

ISSN No. 2394-5990

छत्रपती शाहू महाराजांच्या काळातील ख्रिश्चन मिशनरी (१८९४-१९२२)

डॉ. अंबादास क. मंजुळकर
विभाग प्रमुख इतिहास विभाग
एस.जी.के. कॉलेज, लोणी-काळभोर, पुणे.
मो.: ९३२६८ ८९९२७.
ई-मेल: drakmanjulkar777@gmail.com

छत्रपती शिवाजी चौथे यांच्या अकाली निधनानंतर श्रीमंत जयसिंगराव उर्फ आबासाहेब घाटगे यांचे ज्येष्ठ पुत्र यशवंतराव हे छत्रपती घराण्यात दत्तक आले. त्यांचे दत्तक विधान १७ मार्च १८८४ रोजी झाले आणि प्रशासनाची सूत्रे त्यांच्याकडे २ एप्रिल १८९४ रोजी आली. पुढील २८ वर्षाच्या काळात त्यांनी कोल्हापूर संस्थानाचा आमुलाग्र असा बदल घडवून आणला. त्याचबरोबर राखीव जागेसारखे निर्णय घेऊन संपूर्ण देशात नावलौकिक संपादन केले. शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही हे उद्दिष्ट समोर ठेवून त्यांनी प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत केले करण्याचा निर्णय घेतला संस्थानातील मुलांसाठी कोल्हापूर नगरात विविध जाती धर्मातील विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहाची निर्मिती केली. त्यामुळे कोल्हापूर नगरास विद्यार्थी वसतिगृहाची माता असे सार्थ नाव प्राप्त झाले.

शाहू महाराजांनी सर्व धर्मातील संस्थांना आर्थिक सहाय्य केले यामध्ये ख्रिश्चन मिशनऱ्यांना केलेली मदत अत्यंत महत्त्वाची ठरली. हे ख्रिश्चन मिशनरी मानवतावादी दृष्टिकोनातून कार्य करतात त्याची त्यांना जाणीव होती. म्हणून त्यांना शैक्षणिक आणि वैद्यकीय केंद्रे उभारणीसाठी विपुल प्रमाणात मदत केली.

छत्रपती शाहू महाराजांच्या काळातील ख्रिश्चन मिशनरी :

छत्रपती शाहू महाराजांचा काळ मिशनऱ्यांच्या कार्यास अत्यंत उपयुक्त असा ठरला. प्रारंभीच्या काळात महाराज मिशनऱ्यांच्या बाबतीत फारसे अनुकूल नव्हते. संस्थानात काही युरोपियन अधिकाऱ्यांच्यामुळे ते नाराज झाले होते. मिशनरी हे पाश्चात्त्य देशातून आले असल्यामुळे त्यांना त्यांच्या बाबत सुरुवातीस फारसी सहानुभूती नव्हती. पन्हाळा येथे मिशनरी थंड हवेचे ठिकाण म्हणून उपयोग करीत असत. त्यामुळे रत्नागिरी, सांगली, मिरज इत्यादी ठिकाणापासून मिशनरी विश्रांतीसाठी पन्हाळा येथे जात असत. सन १८९८-९९ च्या सुमारास कोल्हापूर संस्थानात प्लेग साथीने मोठे थैमान घातले होते त्यामुळे छत्रपती शाहू महाराजांनी प्लेगची साथ अधिक पसरू नये यासाठी कडक उपाययोजना आखली होती. इतर ठिकाणाहून येणाऱ्या व्यक्तीस कोल्हापुरात प्रवेश केल्यानंतर त्याला सक्तीने क्वारंटाईन मध्ये काही काळ राहावे लागत असे, परंतु मिशनऱ्यांना क्वारंटाईन मध्ये राहणे आवडत नव्हते. म्हणून त्यांनी महाराजांना विरोध केला, परंतु महाराजांनी त्यांच्या विरोधास दुर्लक्ष केले होते.

छत्रपती शाहू महाराज जत संस्थानात रानडुकरांच्या शिकारीसाठी नेहमीच जात असत. १९०३ साली जत जंगलात शिकार करत असताना महाराजांना जखम झाली म्हणून त्यांना मिरज येथे डॉ. वॉन्लेस यांच्या दवाखान्यात आणण्यात आले. यानंतरच्या काळात शाहू महाराज आणि डॉ. वॉन्लेस यांच्यात अत्यंत सलोख्याचे संबंध निर्माण झाले.

डॉ. सर विल्यम वॉन्लेस :

२६ नोव्हेंबर १८८९ रोजी मिशन कार्यासाठी डॉ. वॉन्लेस सांगली येथे दाखल झाले. कोल्हापूर मिशनसाठी आलेले पहिले वैद्यकीय क्षेत्रातील मिशनरी म्हणून डॉ. वॉन्लेस यांचा उल्लेख करता येईल ५ सप्टेंबर १८८९ रोजी मेरी मार्शल यांच्याबरोबर त्यांचा विवाह झाला होता. सुरुवातीला त्यांचे दोन वर्षाचे वास्तव्य सांगली येथे होते इसवी सन १८९१ साली मिरज येथे आले व या गावात एक लहानसे घर भाड्याने घेऊन छोटे खाणी दवाखाना सुरू केला. दवाखान्यासाठी जागा मिळविण्याचा प्रयत्न सुरू केला त्यातून सांगली संस्थानाचे कारभारी रावसाहेब चित्रे यांची ओळख झाली. या ओळखीतून १२ एकर जमीन डॉ. वॉन्लेस साहेबांनी दवाखान्यासाठी विकत घेतली. प्रारंभीच्या काळात त्यांच्या दवाखान्यात रुग्ण येण्यास तयार नव्हते, परंतु लवकरच ते चित्र बदलले आणि पश्चिम महाराष्ट्रातील एक अत्यंत महत्त्वाचे रुग्णालय म्हणून ओळखले जाऊ लागले. डॉ. वॉन्लेस यांनी अनेक अवघड अशा शस्त्रक्रिया केल्या आणि यामध्ये त्यांना मोठे यश लाभले. विशेष म्हणजे त्यांच्या काळात वैद्यकीय क्षेत्रात फारसे शोध लागले नव्हते, परंतु प्रामाणिकपणाच्या जोरावर त्यांनी जिव्हाळ्याने रुग्णांची सेवा केली.

शाहू महाराजांना त्यांच्या कार्याची प्रचिती आली होती. म्हणून त्यांना कोल्हापूर येथे दवाखाना सुरू करण्याची सूचना केली. त्यासाठी जमीन आणि आवश्यक अशी आर्थिक तरतूद केली. अखेरीस सन १९११ मध्ये कोल्हापूर येथे दवाखाना सुरू झाला. विशेष म्हणजे या दवाखान्यात शाहू महाराजांच्यावर दोन वेळा शस्त्रक्रिया झाल्या होत्या. तसेच महाराजांनी सामाजिक व शैक्षणिक बाबतीत जो आमुलाग्र बदल घडवून आणला होता. काही प्रमाणात मिशनऱ्यांची प्रेरणा होती. डॉ. वॉन्लेस किंवा त्यांचे सहकारी डॉ. व्हेल यांनी कोल्हापुरात वास्तव्य करावे आणि संस्थानाचे डॉक्टर म्हणून कार्य करावे असा महाराजांचा प्रयत्न होता. परंतु त्यांना मिशनऱ्यांची सेवा सोडून स्वतंत्र रीतीने कोल्हापुरात काम करणे शक्य नव्हते. छत्रपती शाहू महाराजांचा औषधोपचार प्रामुख्याने डॉ. वॉन्लेस आणि डॉ. व्हेल यांच्या मार्गदर्शनाखाली होत असे. त्यांनी मिरज येथील दवाखान्यास अर्थसहाय्य केले होते. इतकेच नव्हे तर लोकमान्य टिळक यांनाही डॉ. वॉन्लेस यांच्याकडून औषधोपचार करून घ्यावा असे महाराजांनी सुचवले होते बालगंधर्व यांनी डॉ. वॉन्लेस यांच्याकडून आवश्यक औषधोपचार करून घेतले होते. शाहू महाराजांच्या अखेरच्या काळात डॉ. वॉन्लेस आणि डॉ. व्हेल यांनी त्यांच्यावर प्रामुख्याने उपचार केले असे म्हणता येईल. महाराजांना मधुमेहाचा त्रास असल्याने आणि त्या काळात या आजारावर फारशी औषधे उपलब्ध नसल्याने त्यांच्यावर प्रभावीपणे उपचार होऊ शकले नाहीत. अण्णासाहेब लठ्ठे यांनी नमूद केल्याप्रमाणे डॉ. वॉन्लेस यांचा मोठा प्रभाव शाहू महाराजांच्यावर होता. त्यामुळे त्यांनी पुरोगामी धोरण स्वीकारले. सर विल्यम वॉन्लेस यांना त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून भारत सरकारने केसर-ए-हिंद हा किताब देऊन सन्मानित केले. वैद्यकीय क्षेत्रात काम करत असताना त्यांनी एक लाखापेक्षा जास्त शस्त्रक्रिया केल्या होत्या. त्यांच्यावर राजा व सर्व सामान्य शेतकरी सुद्धा सारखाच विश्वास ठेवीत. अशा महान मिशनऱ्याचा मृत्यू २ मार्च १९३३ साली झाला.

रेव्ह डेव्हिड बी. अपडीग्राफ :

सन १८७८ मध्ये रेव्ह डेव्हिड बी. अपडीग्राफ यांचा जन्म झाला. त्याने आपले शिक्षण पूर्ण केल्यानंतर अमेरिकन बोर्डाच्या सूचनेनुसार भारतात येण्याचा निर्णय घेतला. सन १९०९ मध्ये त्यांची नियुक्ती कोल्हापूर येथे केली. सुरुवातीस त्यांनी शिक्षक म्हणून कार्य केले होते. छत्रपती शाहू महाराजांनी कोल्हापूर येथील जागा दवाखान्यासाठी दिल्यानंतर हा दवाखाना उभा करण्याची जबाबदारी डॉ. वॉन्लेस यांनी अपडीग्राफ यांच्यावर सोपविली. त्यांनी दोन वर्षाच्या आत दवाखान्याची उभारण्यात केली. या कार्याबद्दल छत्रपती शाहू महाराज आणि डॉ. वॉन्लेस यांनी त्यांचे कौतुक केले. अफडीग्राफ यांचा १९१४ मध्ये मेलेनी अँडरसन यांच्याशी विवाह झाला. पुढील काळात या उभयतांनी निपाणी येथे कार्य सुरू केले. अल्पावधीत निपाणी येथील मिशन कार्याची मोठ्या प्रमाणात भरभराट झाली. निपाणी येथे दवाखाना मुला-मुलींसाठी शाळा सुरू केल्या. त्याचा फायदा गरजू रुग्ण आणि विद्यार्थ्यांना होऊ शकला. छत्रपती शाहू महाराजांच्या काळात त्यांचे कोल्हापूर संस्थानाशी अत्यंत सलोख्याचे संबंध होते. १९४६ साली ते मायदेशी परत गेले. काही वर्षानंतर म्हणजे २० फेब्रुवारी १९५३ रोजी त्यांचे निधन झाले.

डॉ. जे. एम. आयर्विन :

डॉ. आयर्विन हे मिशन कार्यासाठी १९ नोव्हेंबर १८९० रोजी कोल्हापुरात दाखल झाले. अमेरिकेकडून भारतात आलेल्या मिशनऱ्यांमध्ये प्रकांड पंडित म्हणून डॉ. आयर्विन यांचा उल्लेख करावा लागेल. त्यांनी वेदांचा तुलनात्मक अभ्यास करून पी.एच.डी. संपादन केली होती. सुरुवातीस डॉ. आयर्विन यांनी सांगली येथे कार्य सुरू केले होते. या सुमारास डॉ. वॉन्लेस यांचा छत्रपती शाहू महाराजांशी स्नेहाचे संबंध प्रस्थापित झाले होते. म्हणून शाहू महाराजांनी आपल्या दोन्ही मुलांना युवराज राजाराम आणि राजकुमार शिवाजी यांना शिकविण्यासाठी डॉ. आयर्विन यांची ट्यूटर म्हणून नेमणूक करण्याबाबत डॉ. वॉन्लेस यांनी छत्रपती शाहू महाराजांना सुचविले. छत्रपती शाहू महाराजांनी तात्काळ आपल्या दोन्ही मुलांना शिकविण्यासाठी डॉ. आयर्विन यांची नियुक्ती केली. डॉ.आयर्विन यांनी संस्कृत भाषेत मोठे नावलौकिक संपादन केले होते. डॉ. आयर्विन यांचे ट्यूटर म्हणून कार्य सुरू असताना दुर्दैवाने दाजीपूर येथे त्यांचा अपघाती मृत्यू झाला. या घटनेचा प्रतिकूल परिणाम शाहू महाराज यांच्यावर झाला. या घटनेचे स्मरण म्हणून शाहू महाराजांनी डॉ. आयर्विन यांच्या स्मरणार्थ ३६ एकर जमीन दिली आणि त्या जागेवर आज गेल्या शंभर वर्षा पासून आयर्विन हायस्कूल ज्ञानदानाचे कार्य करत आहे.

श्रीमती हेलन आयर्विन :

डॉ. आयर्विन यांचे निधन झाल्यानंतर शाहू महाराजांनी आपल्या दोन्ही मुलांचे शिक्षण श्रीमती आयर्विन यांच्या मार्गदर्शनाखाली व्हावे असे स्पष्ट केले पतीच्या निधनामुळे त्यांना मानसिक धक्का बसला होता हे महाराजांना माहीत होते म्हणून त्यांनी काही काळ विश्रांतीसाठी युरोपात जाण्याबद्दल सुचवले होते त्यासाठी लागणारा खर्च महाराजांनी देण्याचे मान्य केले श्रीमती आयर्विन यांच्या मार्गदर्शनाखाली दोन्ही पुत्रांना प्राथमिक स्वरूपाचे मार्गदर्शन लाभल्यानंतर महाराजांना आपल्या

ISSN No. 2394-5990

पुत्रांना इंग्लंडमध्ये उच्च शिक्षणासाठी पाठवण्याचा निर्णय घेतला यावेळी श्रीमती आयर्विन यांच्याकडे पुत्राची जबाबदारी सोपवली होती मे १९२२ मध्ये दोन्ही पुत्रासह श्रीमती आयर्विन इंग्लंडमध्ये दाखल झाल्या पुढील तीन वर्षाच्या काळात श्रीमती आयर्विन यांनी त्यांचे पालकत्व इंग्लंडमध्ये मोठ्या कौशल्याने पार पाडले यावेळी महाराजांनी आपल्या पुत्रांना चार-पाच वर्ष इंग्लंडमध्ये ठेवायचे होते पण दुर्दैवाने या सुमारास पहिल्या महायुद्धाची तीव्रता वाढल्याने श्रीमती आयर्विन यांनी या दोन्ही पुत्रांना सुखरूपपणे भारतात आणले विशेष म्हणजे श्रीमती आयर्विन यांनी केलेल्या कार्याचे महत्त्व अनन्य साधारण असल्याचे त्यांनी लॉर्ड वेल्डिंग यांना ३१ ऑगस्ट १९१५ रोजी लिहिलेल्या पत्रात नमूद केले आहे विशेष म्हणजे एका महिलेने केलेले कार्य खरोखरच अभूतपूर्व असल्याचे विधान करून कोणत्याही पुरुषाच्या हातून केलेल्या कार्यापेक्षा मोठे होते याबद्दल महाराजांना मोठा अभिमान वाटला श्रीमती आयर्विन यांचे निधन १४ जुलै १९३० रोजी अमेरिकेतील लॉस एंजल्स शहरात झाले या घटनेबद्दल राजाराम महाराजांना मोठे दुःख झाले कारण त्यांना घडविण्यामध्ये श्रीमती आयर्विन यांचा वाटा निश्चित महत्त्वाचा होता.

जे. ई. नॅप :

रेव्ह जे. ई. नॅप शाहू महाराजांच्या काळात कोल्हापूर नगरातील मिशन कार्याला बळकटी देणारे आणखी एक मिशनरी होऊन गेले. ते मिशनरी म्हणजे होत. सन १९१६ मध्ये त्यांचे कोल्हापूर येथे आगमन झाले. त्यांनी धर्मप्रचाराच्या कार्याबरोबरच कोल्हापूर येथे काही वास्तू उभारण्याच्या कार्यातही पुढाकार घेतला. यामध्ये आयर्विन हायस्कूलची वास्तु. या वास्तूचे बांधकाम होऊन १०० वर्षाचा काळ लोटला आहे तरीही या वास्तू अद्यापही चांगल्या अवस्थेत आहेत. रेव्ह नॅप यांनी शाहू महाराजांच्या काळात वास्तु बांधताना बारकाईने कौशल्याने वास्तूचा अभ्यास करून बांधकाम केले आहे मिशनरी कौशल्याने वास्तूचा अभ्यास करून बांधकाम केले आहे. मिशनरी केवळ आर्थिक गोष्टींना प्राधान्य न देता मिशनच्या भौतिक वाढीसाठी काही महत्त्वपूर्ण उपक्रम हाती घेतले होते. त्यासाठी नॅप यांचे सहकार्य उपयुक्त ठरले. त्यांच्या कार्यात त्यांच्या पत्नीचेही सहकार्य महत्त्वाचे समजले जाते. थोडक्यात शाहू महाराजांच्या काळात डॉ. वॉन्लेस, अपडीग्राफ आयर्विन, रेव्ह नॅप इत्यादी अमेरिकन मिशनऱ्यांचे कार्य मिशन कार्यास उभारणी देण्यास उपयुक्त ठरले. याबाबत शाहू महाराजांचे सहकार्य आणि प्रोत्साहन निश्चितच मिशनच्या वाढीस अनुकूल असे ठरले. विशेष म्हणजे शाहू महाराजांनी कोल्हापुरातील उभारलेल्या वसतिगृहासाठी जी समिती नियुक्त केली होती त्यामध्ये आपल्या घराण्याचा संबंध ठेवला. परंतु त्यांनी 'आयर्विन हायस्कूल' असो किंवा 'आर्य वसतिगृह' असो यांच्यासाठी आपल्याबाबत व घराण्याबाबत म्हणून नामोल्लेख केला नव्हता. कारण मिशनरी अत्यंत महत्त्वपूर्ण असे कार्य करीत आहेत. मानवतावादी दृष्टिकोनातून ते गरिबांसाठी करत असलेले प्रयत्न खरोखरच महत्त्वाचे आहेत. याची त्यांना जाणीव झाली होती म्हणून त्यांनी आपल्या काही जाहीरनाम्यात मिशनरी आणि त्यांच्या मिशनचा नामोल्लेख केला आहे.

संदर्भ साधने :

१) WIN- Valume No. VIII, December 1926, No.5, Page No. 07.
२) WIN- Valume No. VIII, -ugust 1926, No.3, Page No. 04.
३) ज्ञानोदय- खंड ९८, २० जुलै १९३९ पृष्ठ क्र. २२९.
४) ज्ञानोदय- खंड ९८, २० जुलै १९३९ पृष्ठ क्र. २२९.
५) Kolhapur Archival General File No. 119.
६) जयसिंगराव पवार (संपा) राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, कोल्हापूर- २००७ पृ.क्र.५९.
७) कित्ता, पृ.क्र.३४.
८) ज्ञानोदय- खंड ८७, १२ जानेवारी १९२८ पृष्ठ क्र. १०.
९) ज्ञानोदय- खंड ९२, १६ मार्च १९३३ पृष्ठ क्र. ८४.
१०) कित्ता, पृ.क्र.८२.
११) Kolhapur Archival General File No. 119.
१२) Ann Taylor Women as Missicnaries in western India - Case Study 2014, Page. No. 3.
१३) WIN- Valume No. VII, October 1923, No.4, Page No. 02.
१४) Vilas Sangue, B.D. Khane, Raajeshri Shahu Chhatrapati Paper Vol.V, Kolhapur 1992, Page.No.13.
१५) ज्ञानोदय- खंड ९८, २० जुलै १९३९ पृष्ठ क्र. २२९.
१६) आ. बा. लवटे लष्टे, जयसिंगराव पवार (संपादित) उपरोक्त, पृष्ठ क्र. २६.
१७) कित्ता, पृ.क्र.२०४.
१८) कित्ता, पृ.क्र.३१९.
१९) अ. ल. जाधव, माझी येरुशेलमची यात्रा, कोल्हापूर -१९०२, पृष्ठ क्र. २६.
२०) Annual Reports 1935, Page.No. 04.
२१) करवीर सरकारचे गॅझेट १९१९ पृष्ठ क्र. ४६-४७.

■■■

राजर्षी छत्रपती शाहू महाराज: मानवी हक्क संरक्षक दृष्टा राजा

प्रा.डॉ.प्रकाश निवृत्ति चौधरी
उपप्राचार्य, प्राध्यापक आणि व्यापारी कायदा प्रमुख,
नेस वाडिया कॉलेज ऑफ कॉमर्स, पुणे (महाराष्ट्र)
Email:pncwadia@gmail.com, दूरध्वनी : ९८२३३५३०८१

महाराष्ट्राच्या सामाजिक जडण घडणीत राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे योगदान फार मोठे आहे. वर्षानुवर्षे अज्ञानात व मानसिक गुलामगिरीत पिचलेल्या समाजाला महाराजांनी आपलेसे करून मानवमुक्तीचा त्यांचा मार्ग मोकळा केला. स्त्री-शुद्रादीशुद्रांसाठी आपल्या राजसत्तेचा आणि अधिकारांचा विधायक उपयोग करत जागतिक पातळीवर अलीकडे सर्वमान्य झालेल्या मानवी हक्कांची प्रतिष्ठापना त्यांनी आपल्या करवीर संस्थानात शतकापूर्वी करून काळाच्या पुढे चालणारा एक द्रष्टा राजा म्हणून ख्याती मिळवली. अस्पृश्यता निर्मुलन व स्त्री उद्धाराच्या महाराजांच्या लोकोत्तर कार्याचा आढावा घेण्याचा प्रयत्न प्रस्तुतच्या संशोधनपर लेखात केला आहे.

राजर्षी शाहू छत्रपती महाराज (१८७४ ते १९२२) यांना अवघे ४८ वर्षांचे आयुष्य लाभले. त्यातील २८ वर्षे त्यांना राज्यकारभार करता आला. अल्पायुष्य प्राप्त झालेल्या ह्या दृष्ट्या राजाने महाराष्ट्राच्या नव्हे, देशाच्या नव्हे तर जगाच्या इतिहासात आपल्या समाजक्रांतिकारक कार्याने मानव मुक्तीसाठी दिलेल्या योगदानाने एक अनन्यसाधारण ओळख निर्माण केली. आपल्याला मिळालेल्या राज्याचे सुराज्यात रूपांतर करण्याचा ध्यास घेतलेल्या राजर्षींनी आपले सारे आयुष्य सामाजिक न्यायाच्या व मानवी हक्कांच्या प्रस्थापनेसाठी व्यतीत केले. महात्मा फुले, न्यायमूर्ती रानडे, प्रिन्सिपल आगरकर यासारख्या समाजसुधारकांच्या समाज सुधारणा चळवळींना त्यांच्यानंतर खंबीर नेतृत्व व राजाश्रय देण्याचा प्रयत्न छत्रपती शाहू महाराजांनी केला.

वेदोक्त प्रसंगात एका सामान्य पुरोहिताने महाराजांचा केलेला अपमान त्यांनी वैयक्तिक न मानता तो सर्व बहुजनांचा मानला[१] आणि त्यातूनच बहुजन व पददलित समाजाच्या हजारो वर्षांच्या दास्यातून मुक्ती देण्याचा मार्ग त्यांना गवसला. जातिभेद, अस्पृश्यता या गोष्टींचे निर्दालन केल्याशिवाय मानव मुक्तीचा मार्ग मोकळा होणार नाही हे त्यांनी वेळीच जाणले व त्या दिशेने आपल्या जीविताचा पुढील प्रवास केला.

समाज सुधारण्यासाठी त्याकाळी आर्य समाज, सत्यशोधक समाज, प्रार्थना समाज यासारखे समाज कार्यरत होते. या सर्वांनाच महाराज जवळचे वाटत. अर्थात राजर्षींनी स्वतःला कोणत्याच समाजाच्या चौकटीत न ठेवता समाजातील सामाजिक अन्याय, पिळवणूक दूर करण्यासाठी, समाजोद्धारासाठी ते जन्मभर प्रयत्नशील राहिले. एका बाजूला ब्रिटिशांची सत्ता व दुसऱ्या बाजूस समाज सुधारण्याची उर्मी या परिस्थितीत छत्रपतींनी महात्मा फुल्यांचे वैचारिक वारसदार या नात्याने त्यांचे मानवमुक्तीचे कार्य पुढे नेले. समाजातील जातीभेद, वर्णभेद, अस्पृश्यता, स्त्री अत्याचार, स्त्री-पुरुष विषमता याविरुद्धचे महात्मा फुलेंचे कार्य छत्रपती शाहू महाराजांनी पुढे नेले असे दिसते. एवढेच नव्हे तर सामाजिक क्रांतीची ही धुरा पुढे अलगदपणे डॉक्टर आंबेडकरांकडे सोपवली. एका पददलित समाजातून येऊन उच्चविद्याविभूषित झालेल्या डॉक्टर बाबासाहेबांना महाराज १९१९ मध्ये मुंबईत परळ चाळीत भेटले. आणि आता माझी काळजी दूर झाली दलितांना त्यांचा पुढारी मिळालाया शब्दांत त्यांनी बाबासाहेबांचेप्रती आपल्या भावना व्यक्त केल्या. पुढे माणगावच्या परिषदेत (मार्च १९२०) महाराज उपस्थित होते. अस्पृश्य समाजाच्या या परिषदेत महाराजांनी डॉक्टर आंबेडकरांच्या विद्वत्तेचा गौरव केला. याच परिषदेत बाबासाहेबांच्या पुढाकाराने परिषदेने शाहू छत्रपतींनी आपल्या राज्यात बहिष्कृतांना समानतेचे हक्क देऊन त्यांचा उद्धार करण्याचे सत्कृत्य आरंभिल्याबद्दल अभिनंदन करून त्यांचा वाढदिवस प्रत्येक बहिष्कृत व्यक्तीने सणाप्रमाणे साजरा करावा असा खास ठराव मंजूर केला होता.[२] यापुढे छत्रपती व बाबासाहेबांचा स्नेह आणखी वृद्धिंगतच होत गेला. तद्नंतर जुलै १९२० मध्ये बाबासाहेब पुढील शिक्षणासाठी लंडनला गेले तेव्हा महाराजांनी त्यांना अर्थसहाय्य तर केलेच पण रमाबाई ही धाकटी बहीण तुम्ही लंडनहून परत येईपर्यंत मी तिला माहेरी कोल्हापुरी घेऊन जातो असे अंतरीच्या प्रेमाने बोलणे केले. पुढे डॉ. आंबेडकरांनी दलित उद्धाराचे कार्य करत भारतीय संविधान निर्मितीत भरीव योगदान दिले. अशा प्रकारे फुले शाहू आंबेडकर ही त्रयी म्हणजे पुरोगामी बहुजन समाजाच्या विकासासाठी विचार देणारी मुळ स्त्रोत ठरली. किंबहुना स्वातंत्र्योत्तर काळात महाराष्ट्राने

ISSN No. 2394-5990

अनुभवलेले पुरोगामीत्व या फुले शाहू आंबेडकरांच्या विचारांचेच फलित आहे असे मानावे लागेल. राजर्षी शाहू महाराजांना खरे तर फुले आंबेडकर यांना जोडणारा महत्त्वाचा दुवा म्हणता येईल. महात्मा फुले हे सामान्य जनतेतून आपल्या कर्तृत्वाने पुढे आलेले एक कर्ते सुधारक होते तर शाहू महाराज मराठी माणसाला वंदनीय असणाऱ्या छत्रपती पदावर आरूढ झालेले राजे. छत्रपती, राजा म्हणून आपणाकडे असलेल्या सामर्थ्याचा उपयोग त्यांनी कनिष्ठ जातीजमातीतील समाजासाठी, बहुजनांसाठी, स्त्री शुद्रांच्या उन्नयनासाठी केला.

भारतातील ६६४ संस्थानंपैकी फक्त थोडी संस्थाने अशी होती की तेथील राजाने ऐषोआरामी जीवन जगण्यापेक्षा आपल्या सत्तेचा व सामर्थ्याचा उपयोग शोषित पिडीत समाजाच्या कल्याणासाठी केला. यामध्ये बडोदा, करवीर आणि इंदूरच्या संस्थानांचा समावेश होतो.[३] बडोदा नरेश श्रीमंत सयाजीराव गायकवाड, कोल्हापूर संस्थानाचे राजर्षी छत्रपती शाहू महाराज व इंदोरचे राजे मल्हारराव होळकर यांची नावे समाजसुधारक राजे म्हणून अग्रक्रमाने घेता येतील. भारताच्या इतिहासात स्त्रिया आणि शूद्रातीशूद्रांना सर्व प्रकारचे अधिकार देणारा व त्यासाठी ब्राह्मणी व्यवस्थेशी संघर्ष करणारा एकमेव राजा अशी नोंद छत्रपती शाहू महाराजांचे बाबतीत करता येईल.[४]

अस्पृश्यता निर्मूलन: स्वतंत्र भारताच्या संविधानात डॉ.बाबासाहेबांनी कलम १४ ते १८ मध्ये समानतेच्या तत्त्वाविषयी तरतुदी केल्या आहेत. स्त्रिया, बालके, अस्पृश्य- दलित समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी केलेल्या या तरतुदींमुळे समाजात पर्यायाने देशात समानता प्रस्थापित करण्याचा संविधानिक मार्ग मोकळा झाला. अस्पृश्यता निर्मूलनाची तरतूद भारताच्या संविधानामध्ये कलम १७ मध्ये केली गेली. १९४८ च्या मानवी हक्कांच्या वैश्विक जाहीरनाम्यामध्येही या समानतेच्या हक्कांचा समावेश होतो. परंतु छत्रपती शाहू महाराजांनी या समाजाप्रती असलेली आपली मानवतेची भावना आणि बंधुतेची वृत्ती आपल्या विचार, कृती व कायदेनिर्मितीमधून पुरेपूर दाखवून दिलेली दिसते. वेदोक्त प्रकरणी खुद्द छत्रपती शिवछत्रपतींच्या गादीवर बसलेल्या राजास शूद्र संबोधल्याने राजर्षींना शुद्रातीशुद्रांच्या वाट्याला आलेल्या पशुतुल्य जीवनाची दाहकता, वेदना समजू शकली. त्यामुळे या शुद्रातीशुद्रांना मानसिक व सामाजिक गुलामगिरीतून मुक्त करणे त्यांनी आपले आद्यकर्तव्य मानले.

अस्पृश्यांसाठी शाळा वसतीगृहे: महात्मा फुल्यांनी ओळखलेले शिक्षणाचे महत्त्व छत्रपती शाहू महाराजांनीही जाणले होते. शिक्षणाच्या माध्यमातूनच आपण मागासलेल्या जाती-जमातीच्या बांधवांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणू शकतो हे त्यांनी समजले होते. म्हणूनच १९०८ सालीच त्यांनी भास्करराव जाधव, महादेव डोंगरे, खंडेराव बागल, श्रीपतराव शिंदे आदी आपल्या निकटवर्तीय मंडळींना पुढे करून अस्पृश्यांचे वसतीगृह सुरू केले.[५] त्यासाठी अस्पृश्य मानलेल्या जातीत ज्ञविद्या प्रसारक मंडळीफ नावाची संस्था स्थापन केली. अस्पृश्यांसाठीच्या शाळा वाढवणे आवश्यक होते म्हणून छत्रपतींच्या राज्यारोहण प्रसंगी (१८९४)संस्थानात अस्पृश्यांसाठी पाच शाळा व विद्यार्थी संख्या १६८ होती. १९२२ मध्ये शाळांची संख्या २७ व विद्यार्थी संख्या ६१६ एवढी झाली.[६] यासाठी राजर्षींनी अथक परिश्रम घेतले. आवश्यक तिथे आदेश काढले. २८ नोव्हेंबर १९०६ च्या एका आदेशाने महाराजांनी चांभार, महार यांच्याकरिताची रात्रीची शाळा कायम केली.[७] ४ ऑक्टोबर १९०६ च्या एका आदेशामध्ये कोल्हापुरातील चांभार व ढोर या अस्पृश्य समाजातील मुलींच्या शाळेसाठी मंजुरी देण्यात आली.[८] १९०९ साली अस्पृश्यांच्या वसतीगृहात इमारतीसाठी जागा उपलब्ध करून दिली. अस्पृश्य जातीचे बोर्डिंगसाठी दर साल तीनशे रुपये देण्याचा आदेश ८ फेब्रुवारी १९१३ रोजी काढला.[९] अनेक अस्पृश्य विद्यार्थ्यांना त्यांनी शिष्यवृत्तीची तरतूद केली. ज्ञतुकाराम आबाजी मांग हा अस्पृश्य आहे व शिकण्याची इच्छा आहे सबब स्कॉलरशिपची मुदत पुरी झाल्याने एक वर्षाची मुदत वाढवण्याचाफआदेश दिनांक ९ जानेवारी १९१७ रोजी काढला.[१०] या विद्यार्थ्यासाठी मूळ स्कॉलरशिप देण्याचा दिनांक ६ जुलै १९१५ रोजी आदेश काढला होता.[११] दिनांक २८ जुलै १९१६ च्या हुकूमाने उदगाव येथील महार शाळा कायम केली. दिनांक २४ नोव्हेंबर १९११ च्या आदेशान्वये संस्थानातील सर्व अस्पृश्य वर्गास सर्व प्रकारचे शिक्षण मोफत करण्यात आले.[१२] हा निर्णयही क्रांतिकारीच म्हणावा लागेल.

अस्पृश्य विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या, मोफत शैक्षणिक साहित्य, तलाठी वर्गातील विद्यार्थ्यांसाठी दरमहा रुपये साठ प्रमाणे शिष्यवृत्ती दिल्याचे आढळते. महाराजांचे धाकटे पुत्र प्रिन्स शिवाजी यांचे स्मरणार्थ १९२० मध्ये सुरू केलेली शिष्यवृत्ती ही अस्पृश्य मुलींनाही सुरू केली होती.[१३] भास्करराव जाधवांनी त्यांच्या एका आठवणीत 'अस्पृश्य मुलांना वेदांची संथा' देऊन आपणही इतरांच्या बरोबरीचे आहोत अशी भावना निर्माण करून त्यांच्यात आत्मविश्वास जागृत केला. या कामी अस्पृश्य मुलांचे उपनयन करून त्यांना श्रेष्ठ दर्जा देण्यासाठी राजांनी प्रयत्न केले.[१४] कोल्हापूर संस्थानात डिप्रेस्ड क्लासेसच्या सर्व मुलांना मोफत शिक्षणाची सोय केल्याचा हुकूम (१६ डिसेंबर १९११), अस्पृश्य जातींच्या लोकांना संस्थानात, दरबाराच्या नोकऱ्यांत प्राधान्य दिले जाईल, एवढेच नव्हे तर त्यांच्यातील लायक व्यक्तींना महसूल, न्याय आदी खात्यांच्या प्रमुख पदीही

नेमले जाईल असे नमूद करणारा छत्रपती शाहू महाराजांचा २४ ऑगस्ट १९१८ चे गॅझेट मध्ये प्रसिद्ध झालेला जाहीरनामा, अस्पृश्य जातींच्या तलाठ्यांपैकी जे नोकरीत प्राविण्य दाखवतील त्यांना बढत्या द्याव्यात असा दिनांक १० ऑगस्ट १९१८ चा हुकूम या व अशा अनेक आदेश/ हुकूम व जाहीरनाम्यातून छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या कृतीने शुद्रातीशूद्र समाजाला संधी देण्याचा प्रयत्न केल्याचे लोकोत्तर कार्य दिसून येते. हे सर्व करत असताना मी मागासवर्गीयांची सेवा करतो असे नाही तर ती मानव जातीची करतो अशी माझी पवित्र भावना आहे असे त्यांनी मुंबईच्या गव्हर्नरास लिहिलेल्या जून १९१९ च्या पत्रात नमूद केले आहे. दिनांक ३ ऑगस्ट १९१८ च्या गॅझेटात प्रसिद्ध झालेल्या आदेशात इलाखे मजकुरी गुन्हेगार जातींच्या लोकांची हजेरी दररोज पोलीस पाटलांकडे होते, या हजेरीपासून त्या त्या जातीच्या लोकांची फार गैरसोय होते व ईमानाचे धंदे करून पोट भरण्यास अडचण पडते, ही सर्व अडचण दूर झाली पाहिजे, यासाठी हुकूम देण्यात येतो की महार, मांग, रामोशी, बेरड या चार जातींच्या लोकांची हजेरी बंद करण्यात यावी या आदेशातून महाराजांनी आपली अस्पृश्यता निर्मूलनाची आणि मानवमुक्तीची मोहीम किती जोरकसपणे चालवली होती हेच दिसून येते. हजेरीप्रमाणेच अस्पृश्यांच्या, विशेषतः महार समाजाच्या माथ्यावर 'वेठवरळा' ही वेठबिगारसदृश्य अमानुष पद्धती लादली गेली होती. या पद्धतीत पाटील, कुलकर्णी हे गावकामगार किंवा सरकारी अधिकारी, महार समाजाच्या व्यक्तीस अनेक प्रकारची कामे सांगून, विना मोबदला राबवून घेत असत. खरेतर महार हा सुद्धा गावगाड्यातील एक महत्त्वाचा वतनदार होता, पण त्याचे वतन प्रतिष्ठेचे मानले जात नसे.

महारांच्या चाकरीत गावगाड्याच्या इतर अनेक कामांबरोबर 'वेठवरळा' चे ओझे वाहावे लागत असे. 'महार' हे वतन सोडून गावाबाहेर पडू शकत नव्हते. थोडक्यात हे वतन म्हणजे सामाजिक गुलामगिरीच होती. २६ जून १९१८ रोजी महाराजांनी महार लोकांचे उत्पन्न बलुते खुतांतून कमी करून गाव हक्कदार खुतांत दाखल करण्याविषयी एक वटहुकूम काढल्याची नोंद आहे. या हुकूमाने 'वेठवरळा' ही पद्धत बंद करण्याचा प्रयत्न महाराजांनी केला. महार वतन खालसा केल्याने गावच्या सरकारी कामाच्या सक्तीतून महार मुक्त होणार असल्याने आणि त्या जागी रोखीने वेतन देऊन कामगार ठेवावे लागणार असल्याने खजिन्यावर ताण पडणार होता. याबाबत महाराज म्हणतात याबाबतीत, जरी माझा खजिना रिता झाला तरी मला त्याची पर्वा नाही पण माणसांना माणुसकी पासून वंचित करणारी ही रुढी मला मोडावयाची आहे.[१५] महार वतन खालसा प्रकरणात महाराजांनी डॉ. आंबेडकरांचा सल्ला घेतला होता. स्वातंत्र्योत्तर काळात फुले शाहू आंबेडकर विचार व परंपरा पुढे नेणाऱ्या यशवंतराव चव्हाण यांनी ही महार वतने सन १९५८ मध्ये खालसा करून गुलामगिरीतून महारांची मुक्तता केली.[१६]

अस्पृश्यता निवारणाचे जाहीरनामे: आपल्या संस्थानातून अस्पृश्यतेचे निर्मूलन करण्यासाठी महाराजांनी एक जानेवारी १९१९ रोजी दोन जाहीरनामे मंजूर केले. त्यात आमच्या संस्थानात जे अस्पृश्य नोकरी धरतील त्यांना प्रेमाने आणि समतेने वागविले पाहिजे, जर कोणा अधिकार्याची अस्पृश्यांना याप्रमाणे वागविण्याची इच्छा नसेल त्याने हा हुकूम पोहोचल्यापासून सहा आठवड्यांच्या आत नोटीस देऊन राजीनामा द्यावा. त्याला पेन्शन मिळणार नाही. आपली अशी इच्छा आहे की आमच्या राज्यातील कोणाही इसमाला जनावराप्रमाणे न वागविता मनुष्याप्रमाणे वागवावे.[१८] असाच एक जाहीरनामा त्याच दिवशी आरोग्य खात्यासाठी मंजूर केला होता. त्यात एखादा रोगी मग तो स्पृश्य असो किंवा अस्पृश्य असो तो दरवाज्यात येताच त्याला सभ्य गृहस्थाप्रमाणे वागवून त्याची तपासणी करावी आणि त्याला जनावराप्रमाणे बाहेर न घालवता उपचारासाठी दवाखान्यात पाठवावे. याच आशयाचा विद्या विभागाचा जाहीरनामाही आहे. थोडक्यात शाळा, महाविद्यालये, सर्व सार्वजनिक इमारती, धर्मशाळा, नदीचे पाणुते, सार्वजनिक विहिरी येथे कोणत्याही मनुष्यप्राण्याचा विटाळ मानण्याचा नाही. या सर्वच जाहीरनाम्यातून, आपल्या आदेशातून महाराजांनी मानवतेला कलंक असणाऱ्या अस्पृश्यतेचे समूळ उच्चाटन करण्याचा आटोकाट प्रयत्न करून एक प्रकारचे मानवमुक्तीचे मोठे काम केले आहे. प्रत्येक मानवास मानव म्हणून सन्मानाने, प्रतिष्ठेने जगण्याच्या मानवी हक्काच्या प्रतीष्ठापनेचा प्रामाणिक प्रयत्न महाराजांनी केला. छत्रपती शाहू महाराज हे सुद्धा एक कर्ते सुधारक होते. अस्पृश्यता निर्मूलनाबाबत नुसते आदेश किंवा जाहीरनामे काढून ते थांबले नाहीत तर त्यांनी अनेक प्रसंगी त्यास पूरक अशी कृती स्वतः करून हे कार्य हिरिरीने पुढे नेले. १९१७ मध्ये लष्करी फडात चार अस्पृश्यांची नेमणूक, अस्पृश्य जातीतील लोकास तलाठी म्हणून नेमणुका, त्यासाठी तलाठी प्रशिक्षण वर्ग चालवणे, १९२० मध्ये १६ महारांची पोलीस गटावर नेमणूक, कोल्हापूर म्युनिसिपालिटीच्या चेअरमन पदी दत्तोबा पवार या अस्पृश्य व्यक्तीची नेमणूक, आपल्या सोनतळी कॅम्पवर अनेक अस्पृश्यांना आपल्या सेवेत नेमणुका, शिकारीच्या खुतात अनेक अस्पृश्यांची भरती, कृष्णाजी मोरे की जे पुढे भारतीय लोकसभेचे दोनदा सदस्य झाले अशा मांग समाजाच्या मुलाला आर्य समाजाच्या आश्रम शाळेत स्वतः नेऊन प्रवेश दिला, या व अशा असंख्य घटनांतून राजर्षी हे अस्पृश्यतेच्या उच्चाटनासाठी एक कृतिशील समाज सुधारक या नात्याने सतत्य प्रयत्नशील राहिले.

ISSN No. 2394-5990

छत्रपती शाहू महाराजांनी भटक्या विमुक्त जातीच्या समाजालाही न्याय देण्याचा प्रयत्न केला. त्या काळी अनेक भटक्या जातींना गुन्हेगार मानलेलं होतं, त्यांना महाराजांनी माणसात आणण्याचा प्रयत्न केला. अनेक फासेपारधी लोकांना त्यांनी आपल्या सोनतळी कॅम्पवर कामाला घेतले. त्यांच्या मुलांच्या शिक्षणाची सोय केली. म्हणूनच एके ठिकाणी भटक्या विमुक्त समाजासाठी काम करणारे लेखक लक्ष्मण माने म्हणतात, शाहू महाराजांनी फासेपारधी सारख्या अनेक भटक्या विमुक्त जमातींवर आईच्या मायेने व पित्याच्या वात्सल्याने प्रेम केले.[१९]

महिलांच्या मुक्तीसाठी छत्रपती शाहू महाराजांचे योगदान :

महात्मा फुले सातत्याने स्त्री-शुद्रादीशूद्र यांचे कल्याणासाठी झटले. तोच विचार महाराजांनी मानला आणि आपल्या जीवनात अनुसरला. तत्कालीन स्त्री वर्ग हाही उपेक्षित व मागासलेला आहे हे त्यांनी ओळखले होते. बालविवाह, विधवाविवाह प्रतिबंध, शिक्षण बंदी, पडदा पद्धती स्त्रियांवर अन्यायकारक असणाऱ्या या प्रथा त्याकाळी प्रचलित होत्या. महात्मा फुल्यांनी सर्व जातीपातींच्या मुलींसाठी पहिली शाळा १८४८ मध्ये पुण्यातील भिडे वाड्यात काढली. १८६३ मध्ये विधवांना गुप्तपणे येऊन बाळंत होण्यासाठी आणि आपली मुले तिथे ठेवण्यासाठी एक 'बालहत्या प्रतिबंधकगृह' त्यांनी स्थापन केले. स्वतःच्या राहत्या घरात त्यांनी हा आश्रम उघडला होता.[२०] स्त्री शिक्षणास आणि मानवतेच्या जिव्हाळ्याने विधवांसाठी आश्रम काढण्यास अग्रक्रम देऊन महात्मा फुल्यांनी खरे तर स्त्री मुक्तीची चळवळच सुरू केलेली होती असे म्हणता येईल. छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात स्त्री शिक्षणास प्रोत्साहन देऊन त्यांचे साठी विविध कायदे करून त्यांच्या मानवी हक्कांचे संरक्षण करण्याचे पथदर्शी काम करून ही चळवळ पुढे नेली. महाराजांनी आपल्या कौटुंबिक पातळीवर त्यांची स्नुषा इन्दुमती राणीसाहेब यांना वैधव्य आल्या नंतर त्यांचे पुढील शिक्षण कौटुंबिक व राजपरीवाराचा कडवा विरोध पत्करून चालू ठेवले. त्यांना वैद्यकीय शिक्षण देऊन 'लेडी डॉक्टर' बनविण्याचे महाराजांचे स्वप्न होते.[२१] आपल्या विचारांना कृतीची जोड देणारे महाराज सतत समाज्योद्धाराचाच विचार करत असत.

विधवा पुनर्विवाह कायदा :

स्त्रियांना आपल्या समाजात सातत्याने दुय्यम स्थान दिले गेले आहे. त्या काळात उच्चवर्णीय स्त्रियांची तर याबाबतीत आणखी शोचनीय परिस्थिती होती. त्यांना पुनर्विवाह करण्यास परवानगी नव्हती शिवाय केशवपना सारख्या प्रथांनी त्यांची पिळवणूकच होत होती. छत्रपती शाहू महाराजांनी १९१७ च्या जुलैमध्ये आपल्या संस्थानात विधवांच्या पुनर्विवाहास कायदेशीर मान्यता देणारा कायदा संमत करून समाजसुधारणेचे महत्त्वाचे पाऊल उचलले. अशा विवाहांची कायदेशीर नोंद करण्याची पद्धती त्यांनी सुरू केली.

आंतरजातीय विवाह कायदा :

१२ जुलै १९१९ रोजी कोल्हापूर गॅझेटमध्ये हा कायदा प्रसिद्ध झाला. आपल्या संस्थानातील हिंदू व जैन या दोन धर्मातील लोकांना जातीनिर्बंध न पाळता सदरहू दोहोंपैकी आपापल्या कोणाच्याही धर्माच्या मनुष्याशी विवाह करण्याची मुभा या कायद्याने मिळाली. बालविवाहास आळा बसावा म्हणून विवाहकाली पुरुषाचे १८ व स्त्रीचे १४ वर्षे वय पूर्ण असले पाहिजे असे बंधन घातले गेले. शिवाय अठरा वर्षे पूर्ण करणाऱ्या स्त्रीला विवाहासाठी पित्याची किंवा पालकाची संमती आवश्यक असणार नाही अशी कायद्यात तरतूद करून छत्रपती शाहू महाराजांनी स्त्री-पुरुषांच्या सामाजिक स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. जातिभेदाच्या उच्चाटनासाठी त्यांनी आपली जनक घराण्यातील बहीण चंद्रप्रभाबाई यांचा विवाह इंदूरच्या यशवंतराव होळकरांशी घडवून आणला. महाराजांनी तद्नंतर २५ धनगर- मराठा असे आंतरजातीय विवाह पुढाकार घेऊन पार पाडले.[२२] जातीभेद हा भारतीय समाजास लागलेला कलंक आहे अशीच भावना महाराजांची होती. याबाबत महाराज म्हणतात, जातीभेदाचे कार्य जातिद्वेष आहे. जातिद्वेष हा हिंदुस्थानचा पुराणा रोग आहे. त्यासाठी जातिभेद सोडून आपण सर्व एक होऊया.[२३] जातिभेद व अस्पृश्यता हा हिंदू समाजावरील कलंक असून सामाजिक विषमतेस व पारतंत्र्यास तो कारणीभूत आहे असे महारांजाचे स्पष्ट मत होते.

महिला अत्याचार विरोधी कायदा :

लोकांची सामाजिक सुधारणा घडवून आणण्याचे काम कायद्याची मदत घेतल्याशिवाय होणार नाही अशी छत्रपती शाहू महाराजांची धारणा होती. स्त्रियांचा छळवाद होऊ नये म्हणून त्यांनी २ ऑगस्ट १९१९ ला स्त्रियांच्या छळवणूकीस प्रतिबंध करणारा कायदा आपले गॅझेट मध्ये प्रसिद्ध केला. स्त्रियांच्या छळाचे प्रकार अनेकदा भारतीय दंड संहितेच्या कक्षेत येत नसत. या कायद्यात एकूण ११ कलमे करून स्त्रीला क्रूरपणाची वागणूक देणाऱ्या अपराध्यास सहा महिन्यांचा कारावास व दोनशे रुपयांपर्यंतचा दंड अशी शिक्षा देण्याची तरतूद महाराजांनी या कायद्यात केली होती.[२४] 'क्रूरपणाची वागणूक' याची अतिशय व्यापक व्याख्या या कायद्यात केली होती. अशा प्रकारचा कायदा स्वतंत्र भारतात करण्यासाठी २००५ सालापर्यंत वाट पहावी लागली आणि 'कौटुंबिक हिंसाचारापासून स्त्रियांचे संरक्षण कायदा' २००५ साली भारतात केला गेला. कौटुंबिक हिंसाचार

हा निश्चितपणे मानवी हक्काचा विषय आहे हे १९९४ चा व्हिएन्ना ठराव व त्यानंतरचे बीजिंगमधील घोषणापत्र यामधून स्पष्ट झालेले आहे. अशा प्रकारे राज्यांनी कायदे करावेत अशी अपेक्षा संयुक्त राष्ट्रसंघही ठेवून होता.[२५] कुटुंबात हिंसाचार असणे हा मानवी विकासामधील एक गंभीर प्रश्न होय. यावरूनच छत्रपती शाहू महाराज हे काळाच्या पुढचे दृष्टे समाजकारणी, मानवी हक्क पुरस्कर्ते आणि स्त्री हक्काबाबत किती सजग व आग्रही होते हे आपल्या लक्षात येते.

घटस्फोटाचा कायदा :

छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या संस्थानांमध्ये विविध जाती धर्मांसाठी कोल्हापूरचा काडीमोड (घटस्फोट) कायदा ११ जुलै १९१९ रोजी केला. विविध जाती धर्मात काडीमोड पद्धतीत असलेली ढिलाई नाहीशी करून नवरा-बायको यामधील भौतिक संबंध कायद्याने सुरक्षित ठेवणे व समाजाचा नैतिक पाया मजबूत ठेवणे हा या कायद्याचा उद्देश होता. काडीमोड ही जातीतील पंचांच्या लहरीवर सोडण्याची प्रथा बंद करण्याचाही महाराजांचा त्यामागे हेतू होता.

अस्पृश्यतेप्रमाणेच देवदासी प्रथाही हिंदू समाजामध्ये एक अनिष्ट प्रथा म्हणून प्रचलित होती. ती नष्ट करण्यासाठी महाराजांनी १७ जानेवारी १९२० मध्ये 'देवदासी प्रथा प्रतिबंध कायदा' संमत केला. या देवदासी स्त्रियांना कायद्याद्वारे महाराजांनी आपल्या जनक आई-बापांच्या मिळकतीत वारसा हक्काने स्थान निर्माण करून दिले.

या सर्वच कायद्यांचा विचार करता असे लक्षात येते की छत्रपती शाहू महाराजांनी विविध कायदे करून स्त्रियांना सन्मानाचे जीवन प्राप्त होईल यासाठी अथक परिश्रम घेतले. स्वतंत्र भारतामध्ये संविधानाच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेबांनी शिक्षण व सरकारी नोकऱ्यांमध्ये आरक्षणाच्या तरतुदी केल्या परंतु छत्रपती शाहू महाराजांनी २८ जुलै १९०२ रोजी सरकारी नोकऱ्यांमध्ये ५०% जागा मागासवर्गीयांसाठी राखून ठेवण्याबाबत कायदा केला. शिक्षणामुळेच शुद्रातीशुद्रांची ऐहिक व बौद्धिक गुलामगिरीतून मुक्तता होईल हा महात्मा फुले यांचा विचार छत्रपती शाहू महाराजांनी जाणला होता. या दोघांनीही सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा आग्रह धरला. २१ सप्टेंबर १९१७ रोजी महाराजांनी सक्तीच्या शिक्षणाचा कायदा प्रसिद्ध केला. या कायद्यान्वये शिक्षणास योग्य वयाची मुले शाळेत पाठवण्याची आईबापांवर सक्ती करण्यात आली. त्यांनी तशी पाठविली नाहीत तर त्यांना प्रत्येकी एक रुपया दर महिन्याला दंड करण्याची तरतूद या कायद्यात करण्यात आली. तत्पूर्वी, म्हणजे '१६ मार्च १८९३ मध्ये प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करण्याबाबतचा कायदा सयाजीराव गायकवाड महाराजांच्या हुकुमाने बडोदा राज्यात अमलात आला.'[२६] ह्याचीही नोंद आपण घ्यावयास हवी. स्वतंत्र भारतात बालकांचा मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार कायदा (राईट टू एज्युकेशन ऍक्ट) व्हायला २००९ ची वाट पहावी लागली. त्यामध्ये भारतात ६ ते १४ वर्षे वयोगटातील बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण उपलब्ध करण्याची तरतूद आहे. यावरूनही छत्रपती शाहू महाराज हे काळाच्या पुढचे दृष्टे समाज क्रांतिकारक होते हे मान्यच करावे लागेल. १९४८ मधील मानवी हक्काचा वैश्विक जाहीरनामा असो व भारतीय संविधानातील मानवी हक्कांचा उद्घोष करणाऱ्या तरतुदी असो, त्याची बीजे छत्रपती शाहू महाराजांनी निर्माण केलेल्या अनेक कायद्यात आपणास सहज सापडतात आणि महाराजांची दुरद्रुष्टीही दिसून येते. सर्व समाज घटकांचा, विशेषतः दिन पददलित शूद्रातिशूद्र जनतेच्या आशा आकांक्षांशी समानुभूतीने वागत त्यांच्याशी नाते जोडून त्यांच्या सुखदुःखात समरस होऊन त्यांना विकासाची स्वप्ने दाखविणारा हा दृष्टा लोकराजा म्हणजे खऱ्या अर्थाने मानवी हक्क संरक्षक सेनानीच होय. प्रोफेसर आठवले यांनी महाराजांबद्दल लिहिताना ङ्कफिलॉसाफर किंग ऑफ प्लेटोज इमॅजिनेशनफहे वर्णन खरोखरच सार्थ वाटते.[२७] पु. ल. देशपांडे त्यांना ङ्कउपभोग शून्य स्वामीफ म्हणतात, तर राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे शिक्षक सर एस. एम. फ्रेझर त्यांना एक ङ्कलोकोत्तर पुरुषफ म्हणतात. यशवंतराव चव्हाण त्याना ङ्कलोकांचे राजेफ संबोधतात तर डॉक्टर वि. भि. कोलते म्हणतात, शाहू छत्रपतींनी महाराष्ट्रातील बहुजन समाजाची मानसिक गुलामगिरी नष्ट केली. जन्मसिद्ध वर्ण गुलामगिरी नाहीशी केली.[२८]

समारोप :

छत्रपती शाहू महाराजांच्या रूपाने महाराष्ट्राला समाज परिवर्तन करण्याची ताकद असणारा, एक थोर, काळाच्या पुढे चालणारा समाज क्रांतिकारक राजा लाभला. अस्पृश्यता निवारण व स्त्रीमुक्तीसाठीचे त्यांचे कार्य पथदर्शकच आहे. महाराष्ट्राच्या सामाजिक अभिसरणाच्या इतिहासात छत्रपतींच्या कार्याचे मोल अनन्यसाधारण आहे. महात्मा फुले, शाहू, डॉ. आंबेडकर या त्रयींनी महाराष्ट्राला एक समृद्ध पुरोगामी वैचारिक परंपरा दिली आहे. आपल्या सुसंस्कारास अंगभूत गुणांची जोड देऊन महाराजांनी स्वतःला मानवतेचा पुजारीच नव्हे तर मानवी हक्क संरक्षक दृष्टा राजा बनवले. स्त्री-शुद्रादीशूद्र समाजाच्या विकासासाठी जीवनभर कृतिशील राहणाऱ्या राजाचे विचार हे भारतास सतत दिशा देत राहतील या बद्दल दुमत नसावे.

ISSN No. 2394-5990

संदर्भ :

१. पवार, जयसिंगराव (डॉ),(२०१०) राजर्षी शाहू छत्रपती: एक मागोवा, सुमेरू प्रकाशन, पान १
२. पवार, जयसिंगराव (डॉ),(२०१२) राजर्षी शाहू महाराज: जीवन व कार्य, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, पान ७९
३. ओहोळ, डी. आर.,(२०१२) राजातील माणूस आणि माणसातील राजा लोक राजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज, मूलनिवासी पब्लिकेशन ट्रस्ट, पुणे, पान १२
४. कित्ता
५. राजर्षी शाहू महाराज: जीवन व कार्य,उपरोक्त, पान ६०
६. कित्ता
७. राजर्षी शाहू छत्रपतींचे निवडक आदेश,(२०२२) संपादक/ संचालक/ पुराभिलेख संचालनालय, मुंबई (भाग एक), पान ६१
८. राजर्षी शाहू महाराज: जीवन व कार्य,उपरोक्त, पान ६१
९. राजर्षी शाहू छत्रपतींचे निवडक आदेश,पूर्वोक्त, पान १२९
१०. कित्ता, पान १९१
११. कित्ता, पान १५८
१२. राजर्षी शाहू महाराज: जीवन व कार्य,उपरोक्त, पान ६१
१३. कित्ता
१४. कित्ता, पान ६२
१५. पवार, जयसिंगराव (डॉ),(२०२१), समाज क्रांतिकारक राजर्षी शाहू छत्रपती, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथम आवृत्ती, पान १३४,१३५
१६. कित्ता
१७. कित्ता
१८. कित्ता, पान १३५
१९. कित्ता, पान १७५
२०. बगाडे, उमेश,(२०२२) महात्मा जोतीराव फुले ,शब्द पब्लीकेशन्स,मुंबई, पान ४९
२१. पवार, वसुधा, (२०२२) राजर्षी शाहू छत्रपती: एक अभ्यास , मेहता पब्लिशिंग हाऊस तृतीय आवृत्ती, पान ८९
२२. पवार, जयसिंगराव (डॉ),(२०२२), राजर्षी शाहू छत्रपती आणि सामाजीक न्याय, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथम आवृत्ती, पान ३४.
२३. राजर्षी शाहू छत्रपती: एक अभ्यास, पूर्वोक्त , पान ६९
२४. पवार, जयसिंगराव (डॉ),(संपादक)(२००१) राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, पान १०२१
२५. सरोदे, असीम, (२००९), कौटुंबिक हिंसाचार आणि कायदा,मनोविकास प्रकाशन, पुणे,पान १६
२६. पाटील रमेश, खरे सुरेखा, (२०२२),लोकराजा शाहू सामाजिक न्याय व शिक्षण , अखिल भारतीय समाजवादी शिक्षण हक्क सभा ,पुणे, पान ३०
२७. राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, पूर्वोक्त, पान ३०१
२८. कित्ता, पान २८४

■■■

राजर्षी शाहू महाराजांचे शिक्षण विषयक विचार व कार्य

प्रा. डॉ. पंकज वा. मुन
श्री. साईबाबा लोक प्रबोधन कला महाविद्यालय,
वडनेर, ता. हिंगणघाट, जि. वर्धा
pankajmoon.1982@gmail.com
मो. ९५७९४९५४२७

गोषवारा :

राजर्षी शाहू महाराज हे संस्थानिक तर होतेच पण त्याचबरोबर ते समाजसुधारक होते. महाराष्ट्रात महात्मा फुले नंतर सर्वसामान्य माणसांच्या कल्याणाकरिता त्यांनी कार्य केलेले आहे. त्यांचे शैक्षणिक कार्य हे त्यांच्या शिक्षणविषयक विचारसरणीवर आधारित आहे. राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य अत्यंत प्रभावशाली व क्रांतिकारक होते. शिक्षणाकडे त्यांनी अत्यंत चिकित्सक व सुधारणावादी दृष्टिकोनातून पाहण्याचा प्रयतन केलेला आहे. शिक्षण हे एका बाजूने सामाजिक व राष्ट्रीय गरज म्हणून पाहिले, तर दुसरीकडे वैयक्तिक विकासाची गुरुकिल्ली असल्याचे त्यांचे मत होते. पाश्चिमात्य विचारसरणीच्या प्रभावामुळे कदाचित राजर्षी शाहूंचा दृष्टिकोन अशा स्वरुपाचा तयार झाला असावा. त्यांनी आधुनिक शिक्षण प्रणालीचा अंगीकार केला म्हणूनच ते शिक्षणाचा प्रसार करु शकले. राजर्षी शाहूंनी शिक्षण क्षेत्रातील सुधारणांना खास अग्रक्रम व विशेष प्राधान्य दिले होते. प्रस्तुत संशोधन पेपरमध्ये राजर्षी शाहू महाराज यांचे शिक्षण विषयक विचार व कार्याचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

बीजशब्द: शिक्षण, विषमता, अज्ञान, शेतकरी व मजूर.

प्रस्तावना :

छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी सर्वसाधारणपणे हिंदुस्थानातील व विशेषकरुन करवीर संस्थानातील शिक्षणाची वा शैक्षणिक स्थितीचे अवलोकन करीत असतांना ते असे म्हणतात, शिक्षणाच्या बाबतीत आमचा गतकाळ म्हटला म्हणजे इतिहासातील एक अंधारी रात्र आहे. फक्त एकाच जातीने विद्येचा मक्ता घेतला होता. मनू आणि त्याच्या मागून झालेल्या शास्त्रकारांनी त्या त्या वेळच्या ध्येयाला अनुसरुन निरनिराळ्या जातीच्या व्यवहारास बंधनकारक असे निर्बंध रचले, आणि खालच्या जातीच्या लोकांना विद्या मंदिराचे बरवाजे बंद करण्यात आले. त्यांचे स्वतःचे धर्मग्रंथ आणि वेद हे सुद्धा वाचण्याची त्यांना मनाई होती.[१]

आपल्या समाज बांधवापासून दूर जाणारी वा त्यांच्यात अंतर ठेवून वागणारी वा तशी प्रवृत्ती निर्माण करणारी शिक्षण पद्धती त्यांना अभिप्रेत नव्हती असे खालील घटनावरुन दिसून येते. १९१६ मध्ये दिल्ली येथे राजकुमाराची एक परिषद भरली होती, त्यात राजर्षी शाहूंनी एक टिप्पणी पाठवली होती. त्यात राजकुमाराच्या शिक्षणाबद्दल राजर्षी शाहूंनी प्रदर्शित केलेले विचार आजही महाराष्ट्रातील सुशिक्षित उच्चभ्रू समाजाने मनन करण्यासारखे आहेत. संस्थानिकांनी आपल्या मुलांना कोणत्या पद्धतीने व कशा प्रकारचे शिक्षण द्यावे ते ठरवण्याची त्यांना पूर्ण मोकळीक असली पाहिजे. त्यात बाहेरुन प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष हस्तक्षेप होणे इष्ट नाही. राजकुमाराच्या शिक्षणासाठी भारतात जी महाविद्यालये काढण्यात आलेली आहेत, त्यांची व्यवस्था समाधानकारक नाही. या संस्थानात शिक्षण घेणारे राजकुमार आपल्या प्रजाजनापासून मनाने दुरावतात. आपली भाषा, धर्म व संस्कृती याविषयी त्यांना आत्मीयता आणि अभिमान वाटेनासा होतो. पोशाख रितीरिवाज व बोलणे, चालणे यात इंग्रजाचे अनुकरण करुन स्वकियाच्या जीवनसरणीकडे ते तुच्छेतेने पाहू लागतात. पुढील आयुष्यात त्यांना राज्यकारभाराची जी जबाबदारी पार पाडावी लागणार, त्या दृष्टीने त्यांची अशी मनोवृत्ती बनने श्रेयस्कर नाही.[२]

संशोधनाची उद्दिष्ट्ये :

१. राजर्षी शाहू महाराजांच्या शिक्षणविषयक कार्याचा अभ्यास करणे.
२. शाहू महाराजांची सर्वांगिण शिक्षण संकल्पना समजून घेणे.

राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य :

राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक विचार लक्षात घेतल्यास असे दिसून येते की, त्यांचे विचार हे मूलगामी व सत्यावर आधारित होते. वास्तविक पाहता बऱ्याच वेळेस व्यक्तिच्या विचारात व प्रत्यक्ष आचारात खूप फरक असतो. जे लोक बोलतात तसे कृतीत आणतील असे नाही. परंतु राजर्षी शाहूंनी

ISSN No. 2394-5990

निव्वळ शैक्षणिक विचार दिले नाहीत तर ते प्रत्यक्षात उतरवले. त्यांचे शैक्षणिक कार्य लक्षात घेतले तर त्यांच्या विचाराला कृतीची कशी जोड होती हे स्पष्टपणे लक्षात येईल. त्यांचे हे कार्य एका चळवळीच्या स्वरुपातही मांडता येईल.

मोफत आणि सक्तीचे प्राथमिक शिक्षण :

आपल्या देशाला मोफत आणि सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची फार मोठी गरज आहे. याविषयीचे राजर्षी शाहू महाराजांचे विचार मोठे मार्मिक आहेत. वंचितांना शिक्षण दिल्याशिवाय त्यांच्या जीवनात सुख संपन्नता निर्माण होणार नाही. हे ओळखून महात्मा फुलेंनी प्रथम मोफत आणि सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाविषयी आवाज उठविला होता. महात्मा फुल्यांचा विचार राजर्षी शाहूंनी पुढे चालवला. खालच्या वर्गाच्या लोकांच्या बुद्धीवर व ज्ञानावर हे जे जड व जुलमी कर लादले गेले आहेत ते झुगारुन देण्याची शक्ती बहुजन समाजाच्या अंगी येण्यास सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाची जरुरी आहे.[३]

राजर्षी शाहू महाराज नेहमी विचार करीत असत की, दुर्बल व बहुजन समाजाच्या सक्षमीकरणासाठी शिक्षण हाच एकमेव पर्याय आहे. शिक्षणातूनच विकासाच्या प्रक्रियेला चालना मिळू शकेल यासाठी शिक्षण सक्तीचे व मोफत करणे हा प्रमुख उद्देश त्यांच्या समोर होता.

ब्राम्हणेत्तर वर्गाच्या विकासासाठी शिक्षण :

राजर्षी शाहू हे ब्राम्हणेत्तर चळवळीचे एक नेते होते. समाजातील ब्राम्हणांचे वर्चस्व नष्ट केल्याशिवाय खऱ्या अर्थाने समता प्रस्थापित होणार नाही. हे राजर्षी शाहूंनी ओळखले होते. त्यामुळे राजर्षी शाहू शिक्षणाच्या माध्यमातून समता निर्माण करण्याचे कार्य केले होते. ब्राम्हणेत्तर समाजाच्या प्रगतीसाठी अनेक प्रकारच्या शैक्षणिक साई सवलती राजर्षी शाहूंनी उपलब्ध करुन दिल्या. राजर्षी शाहूंच्या शिक्षण विषयक चिंतनात त्यांच्या शैक्षणिक कार्याचे पाळेमुळे दिसून येतात. समर्थ भारत बनविण्यात शिक्षणाचे महत्वाचे योगदान असू शकते यावर त्यांचा पूर्ण विश्वास होता. याबाबतीत त्यांचे मत असे होते की, जोपर्यंत भारतातील प्रत्येक स्त्री पुरुषास शिक्षण मिळत नाही तोपर्यंत भारत स्वतंत्र, समृद्ध, एकजीव आणि बलवान होऊ शकत नाही.[४]

शिक्षण हे विशिष्ट वर्गाला देण्याघेण्याच्या या ब्राम्हणीवृत्तीचा राजर्षी शाहूंनी धिक्कार केला आहे, ब्राम्हण समाजाच्या शिक्षणाचा प्रसार इतर समाजात न करण्याच्या कूपमंडप वृत्तीस राजर्षी शाहू दोष देत म्हणत असत, ब्राम्हणांनी विद्या रक्षण केली व विद्येची ज्योत राखली याबद्दल आम्ही त्यांचे किती तरी अभिनंदन करावे. परंतु त्यावेळी नामदार रानडे, गोखले, आगरकर यांच्या सारखे उदारमतवादी असते तर खरोखरच त्यांनी सर्वांना विद्यादान दिले असते व अप्पलपोटेपणाने दुसऱ्यांना विद्या शिकवू नये असा जो प्रकार चालू झाला त्याला आळा बसला असता व ब्राम्हण ब्राम्हणेत्तर हा भेद राहिला नसता व आज ब्राम्हणेत्तरांची म्हणून स्वतंत्र परिषद भरविण्याचा प्रसंग आला नसता.[५]

शेतकरी आणि मजूर यांच्या शिक्षणाविषयीचा विचार :

आपल्या देशातील शेतकरी मजुरांनी शिक्षणाद्वारे उन्नती करुन घेण्याविषयी आवाहन करतांना कामगार वर्गास त्यांच्या अभ्युदयासाठी संघटना स्थापन करुन स्वावलंबनाचा मूलमंत्र स्विकारण्याचा उपदेश केला आहे. ते सांगतात की, आपल्या हिंदुस्थानातील स्थिती पाहून गेल्यास इकडे मुख्य मागासलेला वर्ग म्हणजे शेतकऱ्यांचा आहे. मी ही त्यापैकीच एक आहे. कारखान्यात मजूरी करणारे आपण सर्व शेतकरीच आहात. तेव्हा सर्वांविषयी एकत्र विचार करणे साईचे आहे. मजूरदार व इतर मागासलेला वर्ग यांच्या हिताचे संरक्षण करणे, या हिंदुस्थान देशातही जरुरीचे आहे. इंग्लंडात मजूरदारांनी आपल्या उन्नतीकरीता आपले संघ स्थापन करुन स्वावलंबनाचे मार्ग स्विकारले. त्याप्रमाणे आपण आपले सुव्यवस्थित संघ तयार केले पाहिजेत. आपल्या मुलांबाळांस शिक्षण देऊन आपले आरोग्य वाढवण्याचे प्रयत्न करुन आपली उन्नती आपणच करुन घेतली पाहिजे.[६]

शिक्षकांचे प्रशिक्षण :

सर्व प्रकारची शिक्षण प्रक्रिया सुदृढ पायावर उभी राहावी अशी राजर्षी शाहू महाराजांची योजना होती. विद्यार्थी व शिक्षक हे शिक्षण प्रक्रियेतील मुख्य दोन स्तंभ आहेत. विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास करण्यासाठी सुजाण, सुसंस्कृत, सुशिक्षित आणि सुदृढ शिक्षकांची गरज असते. शिक्षक केवळ विद्यान असून चालत नाही, तर आपली विद्वत्ता विद्यार्थ्यांपर्यंत सुयोग्य पद्धतीने कशी पोहचवायची याचे त्याला ज्ञान असावे लागते. विद्यार्थ्यांचे वय, त्यांची अभिरुची, त्यांची मनोवृत्ती, त्याच्या घरची स्थिती आणि त्याचा कल ओळखून त्यांना शिक्षण देण्याची गरज असते. हे कार्य उत्तम पद्धतीने पार पाडण्यासाठी प्रशिक्षणासाठी प्रशिक्षित शिक्षकांची आवश्यकता असते हे राजर्षी शाहूंच्या लक्षात आले होते. म्हणून राजर्षी शाहूंनी 'शिक्षक प्रशिक्षण केंद्र' कोल्हापूर येथे १८६७ मध्ये सुरु केले होते.

कोल्हापूर संस्थानातील सर्व शिक्षक, जे शिक्षकांचे प्रशिक्षण परिक्षा उत्तीर्ण झाले नाहीत, किंवा व्ह. फा. ची अंतिम परिक्षा पास झालेले नाही किंवा त्यांच्याकडे विद्यापीठाची पदवी नाही

त्यांनी व्ह. फा. परिक्षा दोन वर्षाच्या कालावधीत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. असे करण्यात जे शिक्षक यशस्वी होणार नाहीत त्यांना कुठलीही बढती दिली जाणार नाही.[७] यावरुन असे स्पष्ट होते की, कृतिद्वारा विद्याभ्यास ज्ञानसंपन्न करण्याच्या पद्धतीवर राजर्षींचा अधिक भर होता. राजर्षींना ज्ञान व विज्ञान यांची सांगड घालून शिक्षण क्षेत्रामध्ये एक नवे पर्व निर्माण करावयाचे होते.

शिष्यवृत्तीमागील शिक्षण विचार :

हुशार मुलांना स्कॉलरशिप वगैरे देऊन त्यांना मतद व प्रोत्सहित करण्याचा हेतू होता. सन १९११ च्या जाहिरनाम्याप्रमाणे दर शंभरामध्ये मुलांना नादारी द्यावयाचे ठरले. अशा नादाऱ्या देतांना शेतकरी व कामगारांच्या मुलांना प्राधान्य दिले जाई. अन्य नादाऱ्या ब्राम्हण आणि व्यापारी वर्गातील मुलांना द्यावयाचे ठरले. शिक्षणाच्या प्रत्येक विभागामध्ये राजर्षी शाहूंनी शिष्यवृत्या ठेवल्या. तलाठी वर्गात येणाऱ्या अस्पृष्य जातीच्या विद्यार्थ्यांकरीता १० शिष्यवृत्या दरमहा आठ रुपये पगाराच्या तीन महिने मुदतीने मंजूर केल्या.[८] सर्व थरातील मागासलेल्या माणसाला पत, प्रतिष्ठा आणि दर्जा देण्याचा राजर्षी शाहूंनी प्रयत्न केला हा याचा अर्थ आहे.

जयसिंगराव घाटगे टेक्निकल इंन्स्टिट्यूटमध्ये विद्यार्थ्यांना तांत्रिक शिक्षण देण्याची व्यवस्था होती. इंन्स्टिट्यूटमध्ये विद्यार्थ्यांना सुतारकाम, ड्राईंग वगैरे शिकवण्याची सोय होती. या संबंधीच्या जाहिरनाम्यात म्हटले आहे. मराठी चैथी इयत्ता पास झाल्याबद्दल शाळा मास्तरांच्या सर्टीफिकेटसह अर्ज करावेत. गरीब विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येईल.[९] राजाराम महाविद्यालयामध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थीनींसाठी राजर्षी शाहूंनी संपूर्ण फी माफीच केलेली होती.

स्त्री शिक्षणविषयक विचार :

स्त्रीने शिक्षण घेतल्यामुळे तीला अकाली वैधव्य येईल, ती कुमार्गास लागेल, पापचरणांची प्रवृत्ती बळावेल अशी त्यावेळी स्त्रियांबद्दलचा समज होता. म्हणून शूद्र आणि अतिशूद्र जातीतील स्त्रियांना शिक्षण देणे हा त्या काळच्या सनातनी लोकांना मोठा भ्रष्टाचार वाटत असे त्यांना शिक्षण देणे म्हणजे देव, धर्म आणि समाज यांच्याविरुद्ध वर्तन करणे होय. शिवाय स्त्री शिक्षण म्हणजे हिंदुधर्मावर भयंकर अत्याचार अशा तऱ्हेच्या सनातन्यांच्या समजुतीमुळे स्त्रियांना शिक्षणाचे दरवाजे बंद होते. सनातनी लोकांच्या या मतावर तीव्र आघात करुन महाराष्ट्रात प्रथम स्त्रीस शिक्षणाचे दरवाजे उघडून दिले ते महात्मा फुले यांनीच, कारण त्यांना माहित होते की, स्त्री शिक्षण म्हणजे पर्यायाने तिच्या मुलांचे शिक्षण होय. सामाजिक क्रांतीच एक महत्वाचे शस्त्र म्हणून महात्मा फुलेंनी स्त्री शिक्षणाला सुरुवात केली. त्याला पुढे घेऊन जाण्याचे कार्य राजर्षी शाहू महाराजांनी केले. ज्या काळात समाज स्त्रियांना शिक्षण नाकारत होता, त्या काळात राजर्षी शाहूंनी स्त्री शिक्षणाबद्दलचे आपले विचार प्रकट करुन व प्रत्यक्ष स्त्री शिक्षणाचे कार्य करुन दाखविले.

राजर्षी शाहू उदामतवादी शिक्षणापासून ते तांत्रिक शिक्षणापर्यंत आणि अस्पृश्यांच्या शिक्षणापासून ते स्त्री शिक्षणापर्यंत दूरच्या नजरेने पाहणारे एक जाणते शिक्षण पुरस्कर्ते व प्रसारक होते.

शिक्षणाचा अधिकार शूद्रांसोबत स्त्रीला सुद्धा नाकारला जात होता व तिला गुलाम ठरवले होते. स्त्रियांची या गुलामगिरीतून मुक्तता झाल्याशिवाय जातीअंताचे व समताधिष्ठित समाज निर्मितीचे प्रयत्न यशस्वी होणार नाहीत. म्हणून स्त्री वर्गाची या गुलामगिरीतून मुक्तता करण्यासाठी त्यांनी शिक्षण हे महत्वाचे मानून त्यासंदर्भात काही प्रयत्न केले. कोल्हापूर संस्थानात स्त्री शिक्षणास उत्तेजन देण्यासाठी एक विशेष अधिकाराची जागा निर्माण केली. स्त्रियाच्या मानसिक विकासासाठी शिक्षणाची गरज आहे, असे राजर्षी शाहू महाराजांना वाटत असे. शाहू महाराज यांच्या मते, स्त्रीला माणसासारखे जगता आले पाहिजे आणि त्याचबरोबर तिला स्वतःचे संरक्षण करण्याचे ज्ञान प्राप्त झाले पाहिजे. हे साध्य होण्यासाठी 'शिक्षण' हाच एकमेव रामबाण उपाय होय.[१०]

सारांश :

नवसमाज निर्मितीसाठी प्रत्येकाला शिक्षण दिले पाहिजे ही समतावादी भूमिका राजर्षी शाहू महाराजांनी स्विकारली होती. प्रत्येकाला ज्ञानप्राप्तीचा हक्क आहे. ज्ञानाशिवाय त्या मनुष्याचा किंबहुना पर्यायाने सर्व समाजाचा विकास होणार नाही, ही मानवतावादी जाणीव राजर्षी शाहूंच्या मनात निर्माण झाली. प्रत्येक व्यक्तीच्या ठायी असलेले सामथ्र्य आणि कौशल्य वाढविण्यास शिक्षणच हातभार लावणार आहे अशी शाहू महाराजांची श्रद्धा होती.

राजर्षी शाहू महाराजांना शिक्षणाच्या माध्यमातून समाजपरिवर्तन घडवून आणायचे होते. प्रत्येकांच्या मनामध्ये अशा ज्ञानाचा प्रकाश पडणे आवश्यक होते. राजर्षी शाहूंना केवळ शिक्षणासाठी शिक्षण प्रसार करावयाचा नव्हता तर शिक्षणातून कर्तबगार माणसांची नवी पिढी निर्माण करावयाची होती. म्हणूनच सर्वांसाठी शिक्षणाची दारे खुली करुन यातून व्यवसायांना संधी देऊन शिक्षणातून विकास साधावयाचा हे सूत्र शाहू महाराजांनी स्विकारले होते.

ISSN No. 2394-5990

संदर्भग्रंथ सूची :

१. कर्णिक, द्वा. भ. १९७६, ङ्कशाहू महाराज: समाजपरिवर्तनाचे अध्वर्यूफ, साळुंके, पी. बी. (संपा.) राजर्षी शाहू गौरव ग्रंथ, मुंबई: महाराष्ट राज्य शिक्षण विभाग, सचिवालय, पृष्ठ क्र. ३११.

२. सरदार, गं. बा. १९९२, ङ्कराजर्षी शाहू महाराजांच्या विचारांची दिशाफ, कुंभार, नागोराव (संपा.) राजर्षी शाहू महाराज, विचार शलाका (विशेषांक), प्रबोधन प्रकाशन, लातूर, पृष्ठ क्र. ४७.

३. पवार, जयसिंगराव, (संपा.) २००१, राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, कोल्हापूर, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, पृष्ठ क्र. ११९.

४. Kavalekar, 1979, Non-Brahmin Movement in Southern India, Shivaji University, Kolhapur Pg. No. 53.

५. जाधव, भगवानराव बापूसाहेब (संपा.) २००१, राजर्षी श्री शाहू महाराजाची भाषणे, मुंबई, लोकवाड.मयगृह, पृष्ठ क्र. ८७.

६. भोसले, एस. एस. (संपा.) १९९१, क्रांतिसूक्ते: राजर्षी छत्रपती शाहू, मुंबई, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, पृष्ठ क्र. १२५, १२६.

७. भगत, रा. तु. २००३, राजर्षी शाहू छत्रपती जीवन व शिक्षण कार्य, सिद्धराज प्रकाशन, पुणे, पृष्ठ क्र. १८१.

८. करवीर गॅझेट, भाग १, जाहिरनामा नं. ६२१, १२/७/१९१९, भाग १, पृष्ठ क्र. १००.

९. करवीर गॅझेट, भाग १, जाहिरनामा, १८/५/१९१२, भाग २, पृष्ठ क्र. १८.

१०. सूर्यवंशी, कृ. गो., १९७६, इंदुमती राणीसाहेब, ठोकळ प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, पृष्ठ क्र. १९.

■■■

छत्रपती शाहू महाराजांच्या सामाजिक सुधारणा

प्राध्यापक निलेश जमदाडे
असिस्टंट प्रोफेसर
रयत शिक्षण संस्थेचे श्रीपतराव कदम महाविद्यालय शिरवळ
Gmail : jamdadenilesh1@gmail.com
Mo no - 7709915462

प्रस्तावना :

महाराष्ट्र ही समाजसुधारकांची भूमी आहे. आधुनिक महाराष्ट्राचे इतिहासात कोल्हापुर येथील राजश्री शाहू महाराजांचे नाव विशेष उल्लेखनीय ठरते. त्यांनी आपल्या राज्यात सामाजिक शैक्षणिक व आर्थिक क्षेत्रात स्वरूपाच्या सुधारणा करून लोककल्याण करण्याचा प्रयत्न केला. महात्मा फुले यांनी सुरू केलेले समाज सुधारकाचे कार्य शाहू महाराजांनी केले प्रजाहित दक्ष सत्ताधीश म्हणून शाहू महाराजांचा उल्लेख करावा लागतो. एक आदर्श राजा आणि बहुजन व दलित समाजाचे नेते म्हणून असलेली त्यांची लोकप्रियता शेवटपर्यंत कायम टिकली, त्यांनी केलेल्या कार्यामुळे त्यांची व्यक्तिमत्व कोल्हापूर पुरते मर्यादित न राहता महाराष्ट्रात नव्हे तर भारतातही लोकप्रिय झाले. सर्व सामान्य लोकांचे कल्याण करणे त्यांना सुशिक्षित बनवणे, बहुजन समाजाची पारंपारिक बंधनातून सुटका करणे, त्यांच्या जागृती घडवून आणणे व त्यांना प्रगत बनवण्यासाठी प्रयत्न करणे, हे त्यांनी आपले कर्तव्य मानले व त्यानुसार आयुष्यभर कार्य केले.

विषयाचे महत्व :

अगदी प्राचीन काळापासून समाज संस्कृती आणि इतिहासाचा वारसा हा महत्त्वाचा भाग आहे. यामध्ये लढाई राजे राजकारण यांचा प्रभाव इतिहासावर मोठ्या प्रमाणात राहिला आहे. परंतु याशिवाय पर्यावरण भूगोल, हवामान, आहार, कला आणि सामाजिक सुधारणा, सामाजिक जीवन अशा इतिहासातील अनेक गोष्टी आहेत. ज्या इतिहासाच्या अविभाज्य भाग आहेत .परंतु भारतातील तसेच महाराष्ट्रातील समाज सुधारक नेहमीच दुर्लक्षित राहिले आहेत. त्यामधील शाहू महाराज हे महत्त्वाचे समाज सुधारक आहेत. शाहू महाराजांच्या सामाजिक सुधारणा सदर विषय महत्त्वाचा आहे.

संशोधन पद्धती :

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधन पद्धती विषयानुसार बदलत असतात. मात्र यातून वस्तुस्थितीचे अचूक आकलन झाले पाहिजे ,यासाठी योग्य संशोधन पद्धती वापरणे महत्त्वाचे आहे. शाहू महाराजांच्या सामाजिक सुधारणा या विषयाच्या संशोधनासाठी मुख्यतः विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर केला आहे. याचबरोबर दुय्यम साधनांचा वापर केला आहे. वृत्तपत्रे, मुलाखती, इलेक्ट्रॉनिक माध्यमे, इंटरनेट याचा वापर केला आहे.

संशोधनाची उद्दिष्टे :

१. शाहू महाराजांच्या सामाजिक कार्याचा अभ्यास करणे.
२. राजश्री शाहू महाराजांच्या अस्पृश्यता निवारण कार्याचा शोध घेणे.
३. शाहू महाराजांनी भटक्या जमातीसाठी केलेल्या कार्याचा आढावा घेणे.
४. राजश्री शाहू महाराजांनी केलेला आंतरजातीय कायदा अभ्यासणे.

गृहीतके :

१. शाहू महाराजांनी सामाजिक सुधारणा केल्या आहेत.
२. राजश्री शाहू महाराजांनी अस्पृश्यता निवारण करण्याचा प्रयत्न केला आहे.
३. शाहू महाराजांनी गुन्हेगारी लोकांना गुन्हा करण्यापासून प्रवृत्त केले आहे.
४. शाहू महाराजांनी इतिहास प्रसिद्ध आंतरजातीय कायदा पास केला.

अधिकार ग्रहण :

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचा जन्म २६ जुलै १८७४ रोजी झाला. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर वयाच्या विसाव्या वर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानाच्या राज्यकारभारती सूत्रे आपल्या हाती घेतली. अधिकार सूत्रे हाती येताच राज्याचा रथ धार्मिक स्वातंत्र्याच्या, सामाजिक समतेच्या, आर्थिक सुधारण्याच्या, शिक्षण व ज्ञान प्रकाशाच्या दिशेने हाकण्यासाठी ते सज्ज झाले. २ एप्रिल १८९४ रोजी अधिकार ग्रहण करताना

ISSN No. 2394-5990

त्यांनी जाहीर केले. आमचे प्रजानन सदा सुखी व संतुष्ट असावेत. त्यांच्या हितांची एकसारखी अभिवृद्धी व्हावी ही माझी इच्छा आहे.

छत्रपती शाहू महाराजांचे सामाजिक कार्य

१. वेदोक्त प्रकरण :

पूर्वपार प्रतिप्रमाणे शाहू महाराज आपल्या परिवारासह ऑक्टोबर १८९९ मध्ये कार्तिक महिन्यात पंचगंगा नदीवर स्नानासाठी गेले. बरोबर त्यांचे बंधू बापूसाहेब महाराज होते. महाराजांच्या स्नानाच्या वेळी नारायण भटजी मंत्र म्हणत होते. भटजी स्नान न करताच वेदोक्त मंत्र ऐवजी पुराणोक्त मंत्र म्हणत होते. हे राम शास्त्री भागवतांनी महाराजांच्या नजरेस आणून दिले. त्यावर भटजी म्हणाले शूद्राला पुराणोक्त मंत्र सांगावे लागतात. वैदिक मंत्र म्हणतेवेळी स्नानाची गरज असते .परंतु शुद्रांना पुराणोक्त अनुग्रह करायचा असल्याने मला स्नानाची गरज नाही. एका क्षत्रीयाला हिंदू पतपात शहा अशी पदवी लावणाऱ्या शाहू महाराजांना एका सामान्य भडजीने शूद्र म्हणावे हे महाराजांना सहन झाले नाही. येथून पुढे महाराजांनी समाजकार्य हाती घेत.

२. क्षात्रजगद्गुरु पदाची निर्मिती :

क्षात्रजगद्गूरू पदाची निर्मिती ही राजर्षी शाहू महाराजांना अचानक सुचलेले कल्पना नव्हती. तिची मुळे वेदोक्त कालखंडातील ब्राम्हण पुरवठा शाही विरुद्ध लढलेल्या गेलेल्या संघर्षात होती. १२ ऑक्टोबर १९२० रोजी शाहू महाराजांनी क्षात्रजगद्गुरू संबधीचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. या मागची तात्विक भूमिका मांडली. क्षात्रजगद्गुरु म्हणून श्री सदाशिव पाटील या मराठा व्यक्तीची नेमणूक केली. मराठा पुरोहित तयार करण्यासाठी कोल्हापुर येथे जुलै १९२० मध्ये श्री शिवाजी वैदिक विद्यालय स्थापन केले. आणि बहुजन समाजाला विशिष्ट जातीकडून पौरोहित्य करून घेण्याची गुलामगिरी नष्ट केली.

३. सत्यशोधक समाज व राजर्षी शाहू महाराज :

सत्यशोधक समाजाची स्थापना महात्मा फुले यांनी २४ सप्टेंबर १८७४ रोजी केली होती. ब्राह्मण वर्गाच्या गुलामगिरीतून सर्वसामान्य जनतेची सुटका करण्यासाठी तसेच कनिष्ठ वर्गाला जागा करण्यासाठी सत्य शोधण्यासाठी व मानव धर्म निर्माण करण्यासाठी महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. महात्मा फुले यांच्यानंतर सत्यशोधक चळवळी उचलून धरणाचे काम राजर्षी शाहू महाराज यांनी केले ११ जानेवारी १९११ मध्ये त्यांनी सत्यशोधक समाजाची कोल्हापूर येथे पुर्नस्थापना केली .या सत्यशोधक समाजाची स्थापना होऊन यासाठी स्वतंत्र कार्यकारी मंडळ निर्माण केले. सत्यशोधक समाजाच्या कार्यासाठी शाहू महाराजांनी १५ ऑगस्ट १९२० रोजी पंधराशे रुपये भास्करराव जाधव यांच्याकडे द्यावी असा आदेश काढला अनेक सत्यशोधक कार्यकर्त्यांना जलाशाची पथके तयार करण्यासाठी प्रोत्साहन दिले.

४. अस्पृश्योध्दार :

अस्पृश्यता हा भारतीय समाजाला लागलेला कलंक आहे. हा कलंक मिटवण्याचा अनेक समाजसुधारकाने प्रयत्न केला त्यामध्ये राजर्षी शाहू महाराज यांचे फार मोठे योगदान आहे. अस्पृश्य निवारण करण्यासाठी महाराजांनी स्वतःपासून सुरुवात केली. महाराजांनी स्वतःच्या मुलीच्या लग्न वरातीत सरकारी बोर्ड गाडीवर अस्पृश्यांना कोचमन म्हणून आरुढ केले. महाराजांनी दलित त्यांना समानतेचे हक्क प्राप्त हवेत, कमीपणा पत्करून लाचारीने मागण्याची पाळी येऊ नये म्हणून वेठबिगार पद्धत कायद्याने बंद केली. अस्पृश्यांना शिवन यंत्र दिले. त्यांच्याकडून महाराजांनी राजवाड्यातील कपडे शिवून घेतले गंगाराम कांबळे याला कोल्हापूरच्या मध्यवस्तीत चहाचे दुकान काढून दिले त्या ठिकाणी महाराज रोजच्या पिण्यासाठी जात होते.

५. अस्पृश्यांच्या विद्यार्थ्यांसाठी वस्तीगृह :

शाहू महाराजांनी १४ एप्रिल १९०८ मध्ये अस्पृश्य विद्यार्थ्यांसाठी वस्तीग्रह सुरू केले. अस्पृश्यवर्गांसाठी अस्पृश्यातूनच सुधारणावादी पुढारी निर्माण व्हावेत तसेच त्यांचे आर्थिक उन्नती व्हावी या उद्देशाने या वस्तीगृहाची स्थापना केली. त्यावेळी मुंबईचे गव्हर्नर सर जॉर्ज क्लार्क यांची कन्या मिस व्हायोलेट क्लार्क ही अस्पृशुद्धराची कार्य करत होती. लहान वयातच त्यांचे निधन झाले त्यांची आठवण रावी म्हणून शाहू महाराजांनी या वस्तीगृहाचे नाव मिस क्लार्क वस्तीगृह असे देऊन त्या कुमारिकेच्या मानवतावादी कार्याचे चिरंतर स्मारक करून ठेवले. शाहू महाराजांनी रविवार पेठेतील २५ खोल्यांची इमारत या वस्तीगृहास देऊन वार्षिक ५५ हजार रुपये अनुदान मंजूर केले.

६. मागासवर्गीयांसाठी आरक्षण :

महाराजांनी १८९४ मध्ये कोल्हापूर संस्थानचा कारभार हाती घेतल्यानंतर त्यांच्या लक्षात आले की प्रशासनात फक्त ब्राह्मण वर्गाचाच अधिक समावेश आहे. तसेच मोक्याच्या जागा चित्पावन ब्रह्मणांनी बळकावल्या होत्या . वेदोक्त प्रकरण

संस्थानांमध्ये गाजत असतानाच महाराजांनी आपल्या वाढदिवसाच्या दिवशी २६ जुलै १९०२ एक आदेश जाहीर केला. या आदेशामध्ये मागासवर्गीयांच्या उन्नतीसाठी शासकीय व निमशासकीय विभागांमध्ये शेकडा पन्नास टक्के जागा राखून ठेवण्याचे नमूद केले.

त्यांच्या आदेशाचे इंग्लंडच्या बादशहाने कौतुक केले. १९२० साली शाहू महाराजांनी नोकऱ्यातील राखीव जागा चे प्रमाण ९०% पर्यंत आणले बहुजन समाजाच्या उद्धारासाठी व जातीभेद नष्ट करण्यासाठी टाकलेले हे खंबीर पाऊल होते.

७. आंतरजातीय विवाहाचा कायदा :

छत्रपती शाहू महाराजांच्या कालखंडात आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाह बेकादेशी ठरवले जात होते .विवाह ही धार्मिक बाब मानली जात होती. स्त्रियांना समाजामध्ये दुय्यम स्थान होते. हे शाहू महाराजांच्या लक्षात आल्यानंतर १२ जुलै १९१९ रोजी त्यांनी आंतरजातीय कायदा पास केला. या कायद्यानुसार कोणत्याही जातीचा व्यक्ती कोणत्याही जातीच्या मुलीशी विवाह करू शकतो.

८. महारकीच्या वतनाचा शेवट :

महार हा पाटील व कुलकर्णी यांच्याप्रमाणे गाव वतनदार आणि सरकारी गाव नोकर होता. त्यांना महारकिचे वतन होते. तसेच त्यांना पत्नी इनामी जमीन व काही हक्क होते. त्यांना मिळालेल्या इनाम जमिनीस हाडकी हाडोळा म्हणत असत. महार वतनदार असले तरी त्यांच्या वतनाला पाटील व कुलकर्णी यांच्या वतनाप्रमाणे सामाजिक व राजकीय प्रतिष्ठान होती. मारुतीच्या वतनामुळे महारांना पाटील कुलकर्णी चौगुला व रयतेची २४ तास पडेल ती कामे करावी लागत होती. मात्र त्याच्या मोबदल्यात चुकीच्या दिवसात वर्षासाठी पसाभर धान्य शिळ्या भाकरीचे तुकडे आणि काही हक्क प्राप्त झाले होते. त्यांची ही सामाजिक व आर्थिक गुलामगिरी नष्ट करण्यासाठी शाहू महाराजांनी प्रयत्न सुरू केले.१९२१ साली शाहू महाराजांनी महार वतन खालसा केले. १९५८ साली संयुक्त महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी एक कायदा करून महारकीच्या वतनाचा शेवट केला.

९. भटक्या जातीचा उद्धार :

अस्पृश्य लोकांप्रमाणेच महाराजांनी भटक्या जातीतील लोकांच्या उद्धरासाठी प्रयत्न केले. अस्पृश्यांना गाववाड्यात स्थान होते. पण भटक्या जाती का गाववाड्यात नव्हत्या. आज येते उद्या तिथे अशी त्यांची अवस्था होती. ते सतत भटकत असत. बंजारा, कैकाडी, रजपूत भामटा,टकारी भामटा, कंजार भाट, बेरड (रामोशी), मांग- गारुडी, फासेपारधी, कोलाटी यांचा भटक्या जातीमध्ये समावेश होतो. या जातींना गुन्हेगार जाती म्हणून संबोधण्यात आले होते. महाराजांनी या भटक्या जातींना जागा देऊन एका ठिकाणी स्थिर केले .त्यांना गुन्हेगारी मार्गापासून प्रवृत्त करून सन्मार्गाला लावले. त्यांना शिक्षा करण्याऐवजी त्यांच्या जीवनात परिवर्तन करण्याचा मार्ग स्वीकारला. फासेपारधी लोकांना आपल्या सेवेत नोकरीवर घेतले. तसेच फासेपारधी कुटुंबाला कोल्हापुरातील कोटी तीर्थाच्या माळावर जागा त्यांना घर बांधकामासाठी बाराशे रुपये दिले. कोल्हापुरात ही फासेपारधी व कंजार भाट या जातीतील लोकांना जमिनी देण्यात आल्या, महाराजांनी फासेपारधी लोकांना पहारेकरी म्हणून नेमणुका दिल्या.

संदर्भ साधने

१. डॉ.अनिल कठारे, महाराष्ट्रातील समाजसुधारक, विद्या बुक्स औरंगाबाद ,प्रथम आवृत्ती जानेवारी २०१४,पृ.३०.
२. प्रा.नानासाहेब साळुंखे, शाहूंच्या आठवणी, वृषाली प्रकाशन कोल्हापूर, ५१ वी आवृत्ती २६ जून २०२२, पृ.१७.
३. डॉ.जयसिंगराव पवार, राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी,१०८, कोल्हापूर ४१६ ०१२,प्रथम आवृत्ती जानेवारी २००१,पृ.८

■■■

ISSN No. 2394-5990

छत्रपती शाहू महाराजांचे शैक्षणिक आणि आर्थिक कार्य

प्रा.डॉ.प्रतापसिंह माने
श्रीपराव कदम महाविद्यालय शिरवळ
ई-मेल : drpratapmane19@gmail.com
Mo.no -9922633165

प्रस्तावना :

आधुनिक महाराष्ट्राच्या वैचारिक प्रगतीची काळ म्हणून आपण 'फुले, शाहू, आंबेडकर' कालखंडाकडे पाहतो. आधुनिक महाराष्ट्राला त्यांच्यासारख्या सुधारकांकडून आणि त्यांच्या विचारांच्या अनुयायांकडून पुरोगामित्वाचा वारसा मिळाला आहे. त्यामुळे महाराष्ट्रात समाजसुधारकांची मांदियाळीच निर्माण झाली. या मांदियाळीत राजर्षी शाहू महाराजांचे वेगळेपण प्रकर्षाने जाणवते. छत्रपती असूनही समाजक्रांतिकारक बनलेला, आपल्या राजदंडाचा वापर जनतेच्या सामाजिक, आर्थिक उन्नतीसाठी करणारा असा हा लोकराजा होता. आपले छत्रपतिपद, अधिकार, हे आपल्या समाजाला उन्नत करण्यासाठी वापरणाऱ्या शाहु महाराजांच्या कार्याचे अनेक पैलू आहेत. त्यांच्या प्रत्येक पैलूतून दीनदुबळे व शोषित घटकांबद्दलची तळमळच प्रतित होते. मग, ते मागासवर्गीय असोत, भटके विमुक्त असोत किंवा स्त्रीवर्ग असो किंवा सर्वच बहुजन असोत .राजर्षी शाहूंच्या परिवर्तनवादी विचारांच्या संकल्पनेत व्यापक सामाजिक समतेची उत्स्फूर्त जाणीव होती. या जाणिवेतूनच समाज उद्धाराचे कार्य हाती घेतले

शैक्षणिक कार्य :

सक्तीचे सार्वजनिक शिक्षण :

बहुजन समाजाचा शैक्षणिक विकास घडवण्यासाठी महाराजांनी योजनाबद्ध आखणी केली यासाठी त्यांनी सुरुवातीला प्राथमिक शिक्षणावर भर दिला बहुजन वर्गाला शिक्षण गेन्यास प्रवृत्ती केले. कष्टकरी शेतकरी मागास विद्यार्थ्यांसाठी फी माफी देण्याचा निर्णय त्यांनी घेतला.प्रत्येक गावात एक तरी शाळा असावी यासाठी महाराजांनी कोल्हापूर संस्थानात १९१२ मध्ये प्रत्येक खेड्यात नवीन शाळा काढून त्यावर वतनदार शिक्षकांच्या नियुक्तीची योजना काढली. सन १९१३मध्ये महाराजांच्या आदेशानुसार खेड्यांमध्ये मंदिर,चावडी,धर्मशाळा इत्यादी ठिकाणी प्राथमिक शाळा सुरू करण्यात आल्या गावच्या शाळेची जबाबदारी गावावर टाकण्यात आली. गावच्या पाटालाला शिक्षण समितीमध्ये ठेवून त्याला शिक्षण प्रसारण च्या कार्यात क्रियाशील सहभागी करून घेतले. तसेच खेड्यातील सार्वजनिक इमारतींची दुरुस्ती व देखरेखीची कामे पाटील कुलकर्णी व गावकऱ्यांवर सोपवली.

शिक्षकांना वेतन सुरु केले :

सुरुवातीला महाराजांनी प्रत्येक खेड्यात नवीन शाळा काढून त्यावर वतनदार शिक्षक नेमण्याची योजना काढली होती. परंतु ती योग्य न ठरल्यामुळे १९१७ मध्ये महाराजांनी वतनदार शिक्षक पद्धत बंद करून पगारी शिक्षक योजना सुरू केली. जून १९१८ पासून महाराजांनी शिक्षकांची परीक्षा घेण्यास सुरुवात केली शिक्षकासाठी कोल्हापुर येथे अध्यापक विद्यालय काढले. कुशल शिक्षकांसाठी अल्पमुदातीचे प्रशिक्षण वर्ग आयोजनास सुरुवात केली. शिक्षकांसाठी वर्तनुकीचा दाखला व २५ च्या आतील वयाची अट घातली शिक्षक हेच विद्यार्थ्यांचे खरे पाठ्यपुस्तक असल्यामुळे शिक्षक हा सर्वगुण संपन्न असावा असा राजर्षी शाहू महाराजांचा कटाक्ष होता

मोफत व सक्तीचे शिक्षण :

प्राथमिक शिक्षण मोफत आणि सक्तीचे करण्याची आवश्यकता का आहे याबाबत महाराजांनी नाशिकच्या सभेत म्हटले की खालच्या वर्गाच्या लोकांच्या बुद्धीवर व ज्ञानावर जी जड व जुलमी ओझी लादले गेले आहेत ते जुगारून देण्याची शक्ती बहुजन समाजाच्या अंगी येण्यासाठी सक्तीच्या व मोफत शिक्षणाची फार जरुरी आहे. यासाठी प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करण्या बाबत २४ जुलै १९१७ ला शाहू महाराजांनी एक जाहीरनामा प्रसिद्ध केला. प्राथमिक शिक्षणाची नियमावली तयार करण्यासाठी शिक्षण तज्ञांची एक समिती नेमण्यात आली. १९ सप्टेंबर १९१७ ला या शिक्षण तज्ञांच्या समितीने तयार केलेल्या नियमावलीवर आधारित सक्तीच्या शिक्षणाचा कायदा खास जाहीरनामा काढून प्रसिद्ध करण्यात आला. वरील कायद्यान्वये शिक्षणास योग्य वयाची मुले शाळेत पाठवण्याची आई-वडिलांवर सक्ती करण्यात आली

तसेच त्यांनी पाठवली नाही, तर त्यांना प्रत्येकी एक रुपया दंड करण्याची तरतूद या कायद्यात करण्यात आली. या कायद्याची पहिली कार्यवाही चार मार्च १९१८ साली होऊन चिखली, पेटा करवीर येथे पहिली प्राथमिक शाळा काढण्यात आली. महाराजांनी आपल्या संस्थांना १९१८ मध्ये सक्तीच्या व मोफत शिक्षणा साठी एक स्वतंत्र खाते स्थापन केले त्यावर डायरेक्टर आणि एज्युकेशनल इन्स्पेक्टर या वरिष्ठ अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली. महाराजांनी मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा शुभारंभ केल्यानंतर पुढे प्राथमिक शाळांची संख्या वाढत गेली १९१७-१८ मध्ये शाळांची संख्या २७ होती व विद्यार्थींची संख्या होती तर १९२२ मध्ये शाळांची संख्या ४२० विद्यार्थी संख्या इतकी वाढलेली होती.

स्त्री शिक्षणाचा पुरस्कार :

शाहू महाराजांनी मुलांप्रमाणेच मुलींच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष दिले. महाराष्ट्रात प्रथम स्त्रियांना शाळेचा दरवाजा उघडून देण्याचे कार्य महात्मा ज्योतिबा फुले यांनी केले. महात्मा ज्योतिराव फुले यांचा वारसा छत्रपती शाहू महाराजांनी सांभाळला. यांनी स्त्री पुरुष उच्च निच्च असा भेद न करता सर्वांकरिता सर्वसमावेशक सार्वत्रिक शैक्षणिक कार्याची चळवळ हाती घेतली. मुलांच्या शिक्षणाकडे लक्ष पुरवून महाराज थांबले नाहीत, तर त्यांनी मुलींच्या साठी स्वतंत्र शाळा काढल्या. मुलींचे उत्तीर्ण होण्याचे प्रमाण ज्या शाळेत जास्त जास्त आहे त्या शाळेत शिक्षकांना बक्षीस देण्याची प्रथा त्यांनी सुरू केली.११ ऑक्टोबर १९१९ मध्ये खास आदेश काढून मागास जातीतील स्त्रियांच्या शिक्षणासाठी लॉजिंग बोर्डिंग सह सर्व व्यवस्था मोफत करण्यात आली. प्राथमिक शिक्षणापासून ते महाविद्यालय शिक्षणापर्यंत मोफत शिक्षण देण्याची व्यवस्था केली. हुशार मुलींना पुढील शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे म्हणून त्यांच्यासाठी शिष्यवृत्ती ठेवल्या ११ ऑक्टोबर १९१९ मध्ये अध्यादेश काढून महाराजांनी मागासलेल्या स्त्रियांच्या शिक्षणासाठी निवास व जेवनाची व्यवस्था संस्थानाकडून मोफत करण्याची सोय केली.

उच्च व व्यावसायिक शिक्षण :

प्राथमिक शिक्षणाप्रमाणेच राजर्शी शाहू महाराजांनी उच्च व व्यवसाय शिक्षणाला महत्व दिले. महाराजांचे प्राथमिक शिक्षणावर माझा भर होते. मात्र त्यांनी उच्च शिक्षणाकडे दुर्लक्ष केले नाही. रयतेमध्ये प्राथमिक व उच्च शिक्षणाचा प्रसार करण्याची धडपड त्यांची कायम होती. १८८१ मध्ये कोल्हापूर येथे सुरू झालेल्या इंग्रजी शाळेची १८८१ मध्ये राजाराम महाविद्यालय म्हणून रूपांतर झाले. संस्थानाकडून या महाविद्यालयाला ५०००रुपये खर्चासाठी दिले जात. महाराजांनी पुढे १ जून१९१८ मध्ये राजाराम महाविद्यालयाची जबाबदारी आर्य समाजाकडे चालविण्यास दिली .उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना देंनग्या व शिष्यवृत्ती दिल्या. कला, कायदा, तंत्रज्ञान व वैद्यकीय इत्यादी क्षेत्रात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती ठेवला.शाहू महाराजांनी शिक्षणाकडे लक्ष दिले. खेडेगावचा कारभार चालवला जाण्यासाठी पाटील शाळा व तलाठी शाळा सुरू करून पाटील व तलाठ्यांना जमा खर्च कायदे शांतताच व्यवस्था व महसूल विषयक शिक्षण दिले जाईल. तांत्रिक शिक्षणासाठी जयसिंगराव घाडगे टेक्निकल इन्स्टिट्यूट ची स्थापना करून यातून सुतार काम गवंडी काम व लोहारकाम इत्यादी विषयांचे शिक्षण देण्यास सुरुवात केली तसेच शैक्षणिक शिक्षण देणारे इन्फ्रटी स्कूलची स्थापना शाहू महाराजांनी केली.

वसतिगृह योजना सुरु केली :

समाजातील विविध जाती जमातींचे विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहिले याची शाहू महाराजांना खंत वाटत होती. गरीब दलित व मागास जातीतील सामान्य जनतेच्या मुलांना शिक्षणाची इच्छा असते. परंतु त्यांची राहण्याची व जेवणाची सोय नसल्यामुळे ही खेड्यापाड्यातील हुशार मुले शिक्षणापासून वंचित राहत असत. ही गैरसोय लक्षात घेऊन महाराजांनी वस्तीगृह काढण्याची महत्वंकांक्षा जाहीर करून त्याची सण १९०० पासून अंमलबजावणी करण्यास सुरुवात केली. थोड्याच कालावधीमध्ये कोल्हापुरात विक्टोरिया मराठा बोर्डिंग, जैन वस्तीगृह, लिंगायत वस्तीगृह, मुस्लिम वस्तीगृह, मिस क्लार्क होस्टेल ,दैवज्ञ शिक्षण समाज बोर्डिंग, नामदेव वसतीगृह, आर्य समाज गुरुकुल, वैश्य बोर्डिंग, ढोर चांभार बोर्डिंग, शिवाजी वैदिक विद्यालय वस्तीगृह, प्रभू वसतीगृह, सारस्वत वसतिगृह, इंडियन ख्रिश्चन हॉस्टेल इंदुमती वसतिगृह सोमवंशी अर्थ आर्य क्षेत्रीय बोर्डिंग श्री देवांग बोर्डिंग इत्यादी जवळपास वीस वस्तीगृह स्थापन केले.

याच बरोबर महाराजांनी कोल्हापूर बाहेरही वस्तीगृह स्थापन करण्यासाठी प्रयत्न केले. नाशिक येथील उदाजी मराठा वस्तीग्रह इमारतीचा १५ एप्रिल १९२० रोजी महाराजांच्या हस्ते पायाभरणी समारंभ पार पाडला या वस्तीगृहाला पंधरा हजार रुपयांची देणगी महाराजांनी दिली. १९२०मध्ये अहमदनगर येथील श्री छत्रपती करवीर चौथा शिवाजी महाराज मराठा बोर्डिंग ला महाराजांनी १५००० रुपये देणगी म्हणून दिले. नाशिक येथे वंजारी समाज वस्तीगृह स्थापन केला. नाशिक येथेच१९१९ मध्ये श्री शाहू छत्रपती बोर्डींग महाराजांनी चालू केले. नागपूर येथील चोखामेळा वस्तीगृह पाच हजार रुपये महाराजांनी देणगी दिली. १ डिसेंबर १९२० रोजी पुणे येथे ताराबाई वस्तीगृह

ISSN No. 2394-5990

महाराजांनी स्थापन केले. शाहू महाराजांनी समाजात ज्ञानदानासाठी वस्तीग्रह स्थापनेची जी चळवळ उभी केली तिच्या पाठीमागे महाराजांच्या मनात सर्वसामान्य माणसांविषयीची करुणा होती.

शेती सुधारणा :

शाहू महाराजांनी आर्थिक विकासाच्या कार्यक्रमात शेतीला प्राधान्य दिले शेतीतील उत्पन्न वाढविल्याशिवाय शेतकरी सुधारणार नाही आणि शेतकरी सुधारल्या शिवाय देशाचा विकास होणार नाही. असे ते म्हणतात येथील शेती निसर्गावर अवलंबून असल्यामुळे त्या ओलिताखाली आणण्याची गरज होती. यासाठी ३फेब्रुवारी १९०२ रोजी पाटबंधारे विषयी धोरण जाहीर करून शेतीला कायमस्वरूपी पाणीपुरवठा करण्यासाठी आपत्कालीन, दीर्घकालीन उपायोजना आखण्यास सुरुवात केली. १९०२ मध्ये पाटबंधारे विभागातर्फे केलेल्या सर्वेक्षणाच्या आधारे १९०७ मध्ये भोगावती नदीवर त्याकाळचे भारतातील सर्वात मोठे धरण बांधण्याचे निश्चित करून प्रत्यक्षात १९०९ मध्ये बांधकाम सुरुवात केली. १९१७ पर्यंत या धरणाचे काम बरेच पूर्ण होऊन यावर २६ लाख रुपये खर्च करण्यात आला होता. अर्थिक संकटामुळे महाराजांनी हे काम बंद केल्यामुळे पुढे त्यांच्या पश्चात छत्रपती राजारामने हे पूर्ण करून हरितक्रांती घडवून आणली. शेती उत्पादन वाढविण्यासाठी पाणी पुरवठ्याची सोय केल्यानंतर आधुनिक अवजारे, बी-बियाणे कीटकनाशके, यांचा शेतकऱ्यांनी वापर करावा म्हणून कोल्हापुरात १९१२ मध्ये शेती संस्था स्थापन केली. यामध्ये सुधारित शेती उपयोगी अवजारांचे केंद्र उभारण्यात आले. जनतेला चांगल्या शेतीमालाची व जनावरांची माहिती व्हावी यासाठी प्रदर्शने भरविण्यात आली. खेडेगावातील शाळांमधून शेती विषयक शिक्षण देण्याची व्यवस्था केली. यामध्ये चहा, कॉफी, रबर राळ,ताग बटाटे, इत्यादी नवीन पिकांची लागवड करण्यात आली. शेतीला पूरक व्यवसाय असावे याचाही उल्लेख महाराज आपल्या भाषणातून करत असतात त्या संबंधी विचार व्यक्त करताना महाराज म्हणतात कृषी कर्माबरोबर पशुपालन व रक्षण यांचाही संबंध येतो याकरिता आपल्या पशुपालनासाठी पुष्कळ काम करायचे आहे. असे महाराज आपल्या भाषणामध्ये सांगत असत.

उद्योग निर्मिती :

शेतीप्रमाणेच महाराजांनी उद्योग क्षेत्रातील औद्योगिक सर्वेक्षण करून घेतले होते. त्याच्या आधारावर त्यांनी अनेक उद्योगधंदे सुरू केले. १९०४ मध्ये महाराजांनी डी. एस. शाळीग्राम या व्यक्तीची इंडस्ट्रियल इन्स्पेक्टर म्हणून नेमणूक केली. जंगल संपत्तीवर आधारित शाळेग्रामने सुगंधी औषध तेल उद्योग व कास्टार्क तेलउद्योग या तेलाचे उत्पादन सुरू केले. १९०५ सालापर्यंत संस्थांनात सुगंधी तेल उद्योग, मधुमक्षिका पालन उद्योग, सुती कापड उद्योग सुरू केले.१९०६ मध्ये महाराजांच्या प्रेरणे दि शाहू छत्रपती स्पिनिंग आणि विव्हिंग मिल्स या गिरणीची स्थापना करण्यात आली. या उद्योगासाठी ५०हजार रुपये भांडवल जागा, पाणीपुरवठा इत्यादी उपलब्ध करून देऊन संस्थानातील शेकडो लोकांना रोजगार संधी उपलब्ध करून दिली.

महाराजांच्या प्रेरणे संस्थांमध्ये अनेक जिनिंग फॅक्टरी स्थापन झाल्या. १९१२-१३ साली विव्हर्स असोसिएशनची स्थापना झाली. या संस्थेला धंद्यात नुकसान आल्यामुळे जे विणकर गाव सोडून चालले होते अशांना महाराजांनी या संस्थेची सभासद करून घेतले. तसेच या विणकरांनी गाव सोडून जाऊ नये म्हणून त्यांना बिनव्याजी कर्ज दिल. महाराजांनी वरील सर्व उद्योगासाठी प्रशिक्षित कामगार तयार व्हावेत म्हणून राजाराम इंडस्ट्रियल स्कूल ची निर्मिती केली. पहिल्या महायुद्धाच्या काळात कच्च्या मला अभावी किलोस्करवाडीच्या कारखान्याचे कृषी अवजारे तयार करण्याचे काम थंडावले होते अशा प्रसंगी महाराजांनी संस्थानातील किल्ल्यांवरच्या तोफा त्यांना देऊन उत्पादन चालू केल्यास मदत केली असताना उद्योग वाढवेत व जनता उद्योगशिल व्हावी यासाठी शाहू महाराजांनी प्रयत्न केले होते.

व्यापार :

शेती व उद्योगाच्या विकासाला प्रगतिशील बाजारपेठेची आवश्यकता असते त्याशिवाय उत्पादित मानाचा खप होणार नाही ही ओळखून महाराजांनी व्यापार केंद्रे निर्मितीवर भर दिला. कोल्हापूरचा मूळ चांगला असतो हे महाराजांनी ओळखले. यासाठी व्यापार वाढवा, बाहेरचा पैसा सुद्धा संस्थानात यावा व शेतकऱ्यांचाही फायदा व्हावा या उद्देशाने महाराजांनी १८९५ मध्ये शाहूपुरी व्यापारपेठेची स्थापना केली. या पेठीचीची वाढ होण्यासाठी मुंबई व पुण्याकडील व्यापारी व भांडवलदारांना कोल्हापूर पेठेत आणले. १८९९ मध्ये निपाणीच्या व्यापाऱ्यांना कागल मध्ये बोलवून व्यापार करण्यासाठी सवलती देऊ केल्या.महाराजांनी १९१७ साली शिरोळ रेल्वे स्टेशनच्या जवळ एक नवी बाजारपेठ स्थापन केली. महाराजांनी आपले जनक वडील जयसिंगराव घाडगे यांच्या स्मरणार्थ नव्या बाजारपेठेचे नाव जयसिंगपूर असे ठेवले.भोगावती नदीवर बांधलेल्या धरणाच्या पायथ्याशी नवी वसाहत (राधानगरी) स्थापन केली होती, महाराजांनी व्यापाऱ्यांना तेथे जाऊन उद्योग सुरू करावेत

म्हणून कर्जाऊ रकमा दिल्याच्या नोंदी सापडतात महाराजांच्या या धोरणामुळे १८९४-९५ मध्ये संस्थानाची असणारे सहा लाख रुपये निर्यात पुढे तीस लाख रुपये पर्यंत गेली.

दुष्काळ निवारण :

राजश्री शाहू महाराजांच्या कारकीर्दी सण १८९६-९७, १९९९-१९०० आणि १९१८-१९ या काळात दुष्काळ पडले होते. संस्थानांमधील शिरोळ व रायबाग या भागात दुष्काळाची तीव्रता भयानक होती. महाराजांनी दुष्काळाच्या काळात भास्करराव जाधव यांच्याकडे दुष्काळ आयुक्त म्हणून जबाबदारी देऊन खास खाते व अधिकाऱ्यांची नेमणूक केलेली. अधिकाऱ्याने कठोर कर्तव्य पालन करावे यासाठी त्याला कडक शब्द सूचना देण्यात आल्या.दुष्काळी कामावरच्या मजुरांची आणि कुटुंबीयांची योग्य काळजी घेण्यात आली होती. मजुरांची शोषण होऊ नये त्यांना योग्य वेतन मिळावे दुष्काळी कामें व्हावीत, इत्यादी संबंधी खबरदारी घेतली जात असे. त्याला व विहिरी खोदायी, खडकांची दुरुस्ती, तसेच एक मोठा धरण प्रकल्प याच काळात घेण्यात आले. जनतेला कर्ज देणे, दुरे पोसणे जनावरांना चारा पुरवने सरकारी जमीन चालण्यास देणे इत्यादी उपाययोजना महाराजांनी केल्या. अपंग निराधार वृद्ध आहेत अशासाठी राहण्याचे व जेवण्याची सोय व्हावी म्हणून ठिकठिकांणी आश्रम उभा केले. दुष्काळी कामावर आपल्या आई-वडिलांबरोबर असलेल्या लहान मुलांसाठी बालकालये उभारली. त्यांच्यासाठी दूध व खाऊची मोफत सोय केली. नोकरचाकरांनाही महागाई भत्ता दिला. १८९५ ते १९०० या काळातील दुष्काळ निवारण, शिक्षण व विकास इत्यादी क्षेत्रात महाराजांनी केलेल्या कामगिरीबद्दल, केम्ब्रिज विद्यापीठाने १९०२ मध्ये त्यांना डि. लीट. ही सन्माननीय पदवी प्रदान केली.महाराजांनी दुष्काळ पीडीतांच्यासाठी मानवेतच्या दृष्टिकोनातून केलेल्या अजोड कार्याची ही जणू पावतीच आहे.

सारांश :

सामाजिक क्रांती शिवाय आर्थिक क्रांती व्यर्थ आहे .हा विचार छत्रपती शाहू महाराजांनी नुसता बोलून नाही तर प्रत्यक्ष आपल्या कृतीतून दाखऊन दिला.महाराराष्ट्राला लाभलेल्या अनमोल क्रांती रत्नामध्ये,सामाजसुधाराकांमध्ये शाहू महाराजांचे कार्य हे महत्वाचे आहे.शिक्षण ,अस्पृश्यता निवारण,गरिबी निर्मुलन,व्यापार,उद्योग,असा चौफेर सुधारणा घडउन बहुजन समाजाला मानाने जगण्याची संधी करून देणारे ते जनते राजे होते.प्रत्येक सुधारणेची सुरवात स्वतापासून करावी या प्रमाणे महाराजांनी कार्य केले आहे.

संदर्भ साधने :

१. फडके.य.दी,राजर्षी शाहू महाराज व लोकमान्य टिळक,श्रीविद्या प्रकाशन पुणे,प्रथम आवृत्ती १९८६, पृ.५४
२. डॉ.गव्हाणे किशोरकुमार, डॉ.शिंदे.एस.पी, एज्युकेशन पब्लिकेशन,औरंगाबाद,प्रथम आवृत्ती २०१४, पृ.१२४
३. भिडे जी.एल.,पाटील.एन.डी,महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास,फडके प्रकाशन,कोल्हापूर,सहावी आवृत्ती,१९९९,पृ.४२
४. गाठाळ साहेबराव,आधुनिक भारत(१८१८-१९७५),कैलाश पब्लिकेशन औरंगाबाद,प्रथम आवृत्ती, १९९८, पृ.७१
५. फडके य.दी,विसाव्य शतकातील महाराष्ट्र,(१९०१-१९१४),खंड १,श्रीविद्या प्रकाशान,प्रथम आवृत्ती, १९८९,पृ.४६
६. साळुंखे नानासाहेब,शाहूंच्या आठवणी,वृषाली प्रकाशन,कोल्हापूर,५१ वी आवृत्ती,२०२२ ,पृ.१७
७. कुमार नागोराव (संपा),सामाजिक चळवळी काल आज उद्या,खंड ३,समाज विज्ञान मंडळ पुणे,प्रथम आवृत्ती १९८९,पृ.१९६
८. कठारे अनिल,महाराष्ट्रातील समाजसुधारक,विद्या बुक्स पब्लिकेशन, औरंगाबाद,प्रथम आवृत्ती २०१४,पृ.२३९
९. डॉ.पवार जयसिंगराव,राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ,महाराष्ट्र इतिहासप्रबोधनी,कोल्हापूर,प्रथमावृत्ती २००१, पृ.७१-८४

■■■

ISSN No. 2394-5990

छत्रपती शाहू महाराजांचे सामाजिक कार्य

प्रा.संजय वामन साबळे
श्रीपराव कदम महाविद्यालय शिरवळ
ई-मेल : sanjaysabale04@gmail.com
Mo.no -9096979402

प्रस्तावना :

भारतीय समाज व्यवस्था ही विषमतेवर आधारित होती.अस्पृश्यता, सामाजिक शोषण यामुळे जाती धर्माचे वर्चस्व प्रस्थापित होते. भारतातील समाजात एक देव, एक धर्म, एक प्रमाणग्रंथ, एक समाज अशी एकात्मता नव्हती. भारतीय संस्कृतीत नीती, अनीती यासाठी जुने धर्मशास्त्र प्रमाण मानले जात होते. शास्त्राबरोबर रुढी परंपरेला महत्व होते. विद्येचे दरवाजे उच्चवर्णीयांना खुले होते. धर्मानी विवीध जातीना नेमून दिलेली वंशपरंपरागत कामे हा समाज व्यवस्थेच्या एकसुत्रीकरणाचा भाग आहे याची लोकांना जाणीवही नव्हती. शुद्रातीशुद्रांना गुलामगिरीचे जीवन जगावे लागत होते. जातीच्या आधारे सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त होत असे. जुन्या चालीरिती, संस्था, तत्वज्ञान याला चिकटुन रहाणे कर्तव्य मानले जाई. पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या गोष्टीला विरोध केला जात नसे. सर्व जीवनावर धर्मांचे नियंत्रण होते. त्यामुळे परिवर्तनाची कल्पना सहज मान्य नव्हती. तसेच आपल्या समाजात एकात्मताही निर्माण झाली नाही. परकिय आक्रमण होतच राहिले मात्र त्याला एकजुटीने प्रतिकार होऊ शकला नाही. १९ व्या शतकापर्यंत ही स्थिती अशीच चालू होती. समाजात अस्थिरता होती. जातीसंस्था, परंपरागत रुढ़ी, धार्मीक व आर्थिक विषमता मोठ्या प्रमाणावर होती. ब्राम्हण, क्षत्रीय, वैश्य व शुद्र या वर्णव्यवस्थेवर आधारीत समाज व्यवस्था होती. ब्राम्हणांचे वर्चस्व मोठ्या प्रमाणावर होते. धर्माच्या नावाखाली लोकांवर अन्याय होत होते. शुद्रांना कोणतेच अधिकार नव्हते व बाल विवाह पद्धती रुढ होती. विधवा पुनर्विवाहाला विरोध

होता. विधवेला कोणत्याही धार्मिक, सामाजिक कार्यात पुढे येण्यास बंदी होती. अशा प्रकारची स्थिती संपूर्ण भारतात होती. ही स्थिती ब्रिटीशांचे आगमन होईपर्यत अशीच चालू राहीली. ब्रिटीश राजवट जेव्हां भारतात प्रस्थापित झाली त्यानंतर भारतातील समाज जीवनावर त्याचा परिणाम होण्यास सुरुवात झाली. इ.स. १८१८मधील पेशव्यांच्या पाडावानंतर ख-या अर्थाने ब्रिटीश स्थिरावले. सातत्याने होणा-या युध्द संघर्षाला काही काळ शांतता लाभली. या पाश्चिमात्यांचा भारतीय समाजाशी संपर्क होवू लागला. यातूनच नविन आचार, विचार, भौतिक प्रगती, वैचारीक प्रगल्भता याला प्रारंभ झाला. पाश्चात्य शिक्षणाने नवशिक्षित पिढी निर्माण होवू लागली. पाश्चिमात्यांची संस्कृती, त्यांनी केलेली प्रगती, स्वातंत्र्यता, मानवता, समानता, आधुनिक विचार आणि तत्वे याचे ज्ञान व माहिती शिक्षित युवा पिढीला होवू लागली. अशा आचार विचारांच्या संपर्कात आल्याने भारतातील नविन तरुण पिढीच्या जीवनावर, समाजजीवनावर परिणाम घडून आला. समाजातील स्थितीचा अभ्यास, अंधश्रध्दा, रुढी, परंपरा याचे ही ज्ञान त्यास मिळू लागले. आणि ही पिढी धार्मिक सामाजिक सुधारणा घडवून आणण्याकडे वळली. यातूनचधार्मिक, सामाजिक सुधारणा चळवळीला गती प्राप्त होवू लागली. त्याचे पडसाद बंगाल नंतर सर्वप्रथम महाराष्ट्रात उमटले आणि सामाजिक चळवळी उभ्या राहिल्या.

आधुनिक महाराष्ट्राच्या विबोधतेचा काळ म्हणून आपण 'फुले, शाहू, आंबेडकर' कालखंडाकडे पाहतो. आधुनिक महाराष्ट्राला त्यांच्यासारख्या सुधारकांकडून आणि त्यांच्या विचारांच्या अनुयायांकडून पुरोगामित्वाचा वारसा मिळाला आहे. त्यामुळे महाराष्ट्रात समाजसुधारकांची मांदियाळीच निर्माण झाली. या मांदियाळीत राजर्षी शाहू महाराजांचे वेगळेपण प्रकर्षाने जाणवते. छत्रपती असूनही समाजक्रांतिकारक बनलेला, आपल्या राजदंडाचा वापर जनतेच्या सामाजिक, आर्थिक उन्नतीसाठी करणारा असा हा लोकराजा होता. आपले छत्रपतिपद, अधिकार, हे आपल्या समाजाला उन्नत करण्यासाठी वापरणाऱ्या शाहु महाराजांच्या कार्याचे अनेक पैलू आहेत. त्यांच्या प्रत्येक पैलूतून दीनदुबळे व शोषित घटकांबद्दलची तळमळच प्रतित होते. मग, ते मागासवर्गीय असोत, भटके विमुक्त असोत किंवा स्त्रीवर्ग असो किंवा सर्वच बहुजन असोत. राजर्षी शाहूंच्या परिवर्तनवादी विचारांच्या संकल्पनेत व्यापक सामाजिक समतेची उत्स्फूर्त जाणीव होती. या जाणिवेतूनच समाज उद्धाराचे कार्य हाती घेतले.

समाज उद्धाराची प्रेरणा :

महाराष्ट्रातील समाजसुधारक महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी म्हट्ल्याप्रमाणे अगदी सुरवातीच्या जीवन काळात छत्रपती शाहूमहाराज यांच्यावर देखील प्रचलित हिंदू संस्कृतीच्या अच्यारधर्माचे संस्काराचा प्रभाव पडला होता.मात्र असे असले तरी अस्पृश्यांविषयी द्वेष त्यांच्या मनाला कधीही शिवला नाही.अगदी राज्यकारभाराची सूत्रे हाती घेतली तेव्हाही आमचे प्रजाजन सुखी समाधानी असावे आणि त्यांच्या उत्कर्षाची सतत अभिवृद्धी होत जावी अशी भावना छत्रपती शाहूमहाराजांनी व्यक्त केली होती. वेदोक्त प्रकारनाप्रसंगी वर्णवर्चस्ववाद्यांच्या दांभिकपानाचे चटके प्रत्येक्ष शाहू महाराजांनाही बसले.कारण मराठ्यांच्या राजालाही शुद्र संबोधून त्यांच्याच राज्यातील वरिष्ठ संवर्नानी हिणवले होते.यामुळे अशा वर्चस्ववादी ब्राम्हन्यवादाविरूध्द शाहूमहाराज यांनी उघड भूमिका घेण्यास सुरवात केली.यावेळी अनेक संघर्षही करावे लागले. ज्या वर्णवर्चस्ववाद्यांमुळे शुद्रातीशुद्रांना पशुतुल्य जगण्यास भाग पाडले होते त्यांच्या वेदना महाराज जवळून समजू शकले आणि त्यातूनच शुद्रातीशुद्रांना प्रथम मानसिक आणि सामाजिक गुलामीतून बाहेर काढले पाहिजे अशी धारणा महाराजांची झाली. १९१८ सालापासून सत्यशोधक चळवळ,ब्राम्हणेतर चळवळ, अस्पृशोधाराची चळवळ यातून महाराजांच समाजउद्धाराचे कार्य अधिक गतिमान झाल्याचे दिसून येते.

छत्रपती शाहू महाराजांचे सामाजिक कार्य :

१. शिक्षण :

१८ व्या शतकामध्ये शिक्षण हि उच्च वर्णीयांची मक्तेदारी होती.यामुळे बहुसंख्य बहुजन वर्ग हा अज्ञान आणि अडाणीपणात खितपत पडला होता.शिक्षणाशिवाय अस्पृश्य समाजाची उन्नती होणार नाही हि बाब ओळखुन शाहू महाराजांनी शिक्षणाची व्यवस्था सुरु केली.महार,मांग,चांभार,ढोर या जातींना अस्पृश्य समजले जात होते.या जातीमधील समाजाला शिक्षण दिल्याने धर्म बुडतो असे जाणीवपूर्वक समज निर्माण केला गेला होता.१८९४ मध्ये केवळ १६८ अस्पृश्य विद्यार्थी शिक्षण घेत होते.छत्रपती शाहू महाराजांनी अस्पृश्यांना शिक्षण देणाऱ्या संस्थांणा आर्थक सहाय्य केले.१९०६ रोजी शाहू महाराजांनी शासन आदेश काढून महार आणि चांभार समाजातील मुलांना शिक्षण देण्यासाठी रात्रीच्या शाळेला मंजुरी दिली.तसेच चांभार व ढोर मुलींच्या शिक्षणासाठी ४ ऑक्टोबर रोजी शासन आदेश काढून मंजुरी दिली.याही पुढे पाऊल टाकत २४ नोव्हेंबर १९११ मध्ये आदेश काढून राज्यातील अस्पृश्यांसाठी मोफत शिक्षणाची तरतूद केली.१९१२ पर्यंत १२ संस्थांची उभारणी केली या सर्व संस्थांमधून त्यावेळी ६३६ विद्यार्थी शिक्षण घेत होते.शाळेमध्ये प्रवेश देताना स्पृश्य अस्पृश्य असा भेदभाव न करता सर्व विद्यार्थ्यांना समानतेने वागवावे असा आदेश मुख्याध्यपकांना काढला.शिक्षणामध्ये पुरुषांच्या इतकेच स्त्रियांच्या शिक्षणाला महत्व दिले होते.जे पालक आपल्या मुलांना शिक्षणासाठी पाठवणार नाहीत त्यांना दरमहा २ पैसे दंड करण्यात आला होता. हा निर्णय क्रांतिकारी निर्णय होता.

२. अस्पृश्यांसाठी वसतिगृह :

पराकोटीची वर्णव्यस्था,जातीव्यास्था यामुळे महार मांग चांभार ढोर या अस्पृश्य समजल्या गेलेल्या समाजातील लोकांना जरी त्यांची इच्छा असली तरी साक्षर होता येत नव्हते.वास्तविक पाहता त्यांच्यावर लादलेली अस्पृश्यता यातून उत्पन्न झालेली मानसिक दुर्बलता, आर्थीक दुर्बलता यामुळे शिक्षण हि बाब त्यांच्यासाठी दुरापास्तच झाली होती.या बाबीचा गांभीर्याने विचार करून छत्रपती शाहू महाराजांनी अस्पृश्य उद्धाराचे कार्य करत असलेल्या जॉर्ज क्लार्क यांची कन्या मिस क्लार्क या युरोपियन महिलेच्या नावाने कोल्हापूरमध्ये १९०७ मध्ये वसतिगृह स्थापन केले.या वसतिगृहास ५५ लाख रुपये वार्षिक अनुदानही देऊ केले होते.शिवाय सामाजिक एकोपा वाढीस लागावा यासाठी मराठा विद्यार्थ्यांसाठी स्थापन केलेल्या व्हिक्टोरिया वसतिगृहात अस्पृश्य आणि अल्पसंख्यांक विद्यार्थ्यासाठी ठराविक कोटा ठेवण्यात आला होता.यामुळे अस्पृश्यांना शिक्षण घेने सुकर झाले.महाराजांनी जातीजातीमध्ये या कार्यास पुढे घेऊन जाणारे कार्यकर्ते निर्माण केले. त्यांना वसतिगृह बांधण्यासाठी मोफत जमिनी उपलब्ध करून देण्यात आल्या.

३. हजेरी व वेठवरळा पद्धत बंद :

छत्रपती शाहू महाराजांनी राज्यकारभार हातामध्ये घेतला तेव्हा त्यांना असे निदर्शनात आले कि इलाखे मजकुरी काही जातींची हजेरी दररोज पोलीसपाटलाकडे द्यावी लागत असे,अशा लोकांना गुन्हेगार जाती म्हणून संबोधले जात आसे.या कारणामुळे या गुन्हेगार ठरवलेल्या लोकांना आपला चरितार्थ चालवतानी, समाजात वावरतानी सन्माने जगता येत न्हवते.यामुळे त्यांची मोठ्याप्रमाणात गैरसोय होत असून याचा गैर फायदा गावाचेप्रमुख पाटील कुलकर्णी घेत असत.या जमातींना स्थलांतर करतायेत न्हवते जेव्हा असे लोक गुन्हेगार म्हणून स्थानबद्ध केले जात असत तेव्हा त्यांना आपल्या घर परिवारालाही भेटणे मुश्कील होत होती.यांना दिलेल्या अशा वागणुकीमुळे त्यांची मुलेबाळे घरी उपाशीपोटी राहत असत.छत्रपती शाहू महाराजांनी २७जुलाई

ISSN No. 2394-5990

१९१८ रोजी अस्पृश्य मुक्तीचा पहिला आदेश काढला आणि अस्पृश्यांवर लादलेल्या अमानुष अशी हजेरी पद्धती बंद करण्याचा आदेश दिला.२९ सप्टेबर रोजी आणखी एक आदेश काढला गुन्हेगार म्हणून कपाळावर कायमचा शिक्का असलेल्यागुन्हेगार जाती गट्टेचोर यांची हजेरी महाराजांनी बंद केली.

हजेरी प्रमाने अस्पृश्यांवर लादलेली वेठवरळ हि अमानुष पद्धत होती.या मध्ये गावचे पाटील कुलकर्णी हे अधिकारी जाणीवपूर्वक महारांना अनेक प्रकारची कामे सांगून विनामोबदला राबवून घेत असत.या मधून त्यांची सुटका करण्यासाठी महाराजांनी २६ जून १९१८ रोजी महारा लोकांचे उत्पन्न बलुते खुतामधून कमी करून गावहक्कदार खुतामध्ये समाविष्ट करण्यास सांगितले.

४. महारकिची वतने रद्द केली :

गावच्या पाटील कुलकर्णी यांच्या वतनाप्रमाणे महार जातींनाही गावची वतने दिली जात होती. महार वतने हि पाटील कुलकर्णी यांच्यासारखी प्रतिष्ठेची वतने मानली जात नव्हती.उलट या महार वतनदारांना गावचे पाटील, कुलकर्णी आणि सरकारची यांची कामे करावी लागत होती.महारकीच्या वातणामुळे महार आपले गाव सोडून बाहेर पडू शकत नव्हते.गुलामीची बेडीच एका अर्थाने त्यांच्या पायात पडली होती.म्हणून छत्रपती शाही महाराजांनी २६ जून १९१८ मध्ये आदेश काढून महार लोकांचे उत्पन्न बलुते खुतातून काढून गावहक्कदार खुतात समाविष्ट केले.यावेळी म्हणावा तेवढा लोकांनी सहभाग दाखवला नाही कारण वतने जाण्याची भीती वाटत होती.यावर उपाय म्हणून महाराजांनी आदेश काढून महारकीचे वतन खालसा करून त्यांच्या जमिनी रयतावा करून त्यांच्या नावे करून दिल्या आणि त्यांना वतानाच्या बंधनातून कायमचे मोकळे केले.

५. मागासवर्गीयांसाठी राखीव जागा :

छत्रपती शाहूमहाराज हे खऱ्या अर्थाने लोककल्याणकारी राजा होते कारण जेव्हा त्यांनी राज्याची सूत्रे आपल्या हाती घेतली तेव्हा प्रशासनातील सामाजिक प्रतिनिधित्वाची असमतोलता त्यांच्या नजरेतून सुटली नाही. ३% असलेले संवर्ण यांचे प्रतिनिधित्व ९७ % होते.राज्यकारभारात ७१ अधिकाऱ्यांपैकी ६० अधिकारी हे संवर्ण होते.खाजगी नोकरदारांमध्ये ५२ पैकी ४५ संवर्ण अधिकारी होते.महाराजांनी आपल्या राज्यातील प्रशासनामधील हा असमतोल दूर करण्यासाठी, होतकरू आणि हुशार ब्राम्हणेतर तरुणांना वाव देण्यासाठी आपल्या जन्मदिनी २६ जुलै १९०२ रोजी आदेश जाहीर केला आणि प्रत्येक विभागाच्या अधिकाऱ्यांना या आदेशानुसार भरलेल्या जागांचा तपशील सादर करणे बंधनकारक करण्यात आले.महाराज केवळ इथेच थांबले नाहीत त्यांनी आपल्या लष्करामध्ये २ महार ,२ मांग आणि शहरातील पोलीस गेटवर १६ महारांची नेमणूक केली.कुलकर्णी वाटणे खालसा करून त्यांच्या एवजी तलाठी पदाची निर्मिती केली ८ ऑगस्ट १८१८ रोजी आदेश काढून या पदांमध्ये अस्पृश्यांना प्राधान्य देण्याचे आदेश दिले.

६. अस्पृश्यता नष्ट केली :

अस्पृश्यता हा भारत देशाला लागलेला काळीमा होता.ज्याचे उच्चाटन करण्यासाठी स्वातंत्र्य मिळण्याची वाट पहावी लागली १९५० साली अमलात आलेल्या राज्यघटनेच्या १७व्या कलमानुसार अस्पृश्यतेचे उच्चाटन केले.भारताला १९५५ मध्ये या साठी विशेष कायदा करावा लागला.ज्या बाबीसाठी देशाला स्वातंत्र्यानंतरही वाट पहावी लागली ती बाब राजर्षी शाहू महाराजांनी ३० -४० वर्षे अगोदरच करून दाखवली हि गोष्टच त्यांच्या क्रांतिकारकपणाची साक्ष देते.

छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या राज्यात सरकारी सेवेत असणारी मराठा आणि इतर लोक हि अस्पृश्यता पाळणारी होती.यामुळे महाराजांनी जाणीवपूर्वक ५ ऑगस्ट १९१८ रोजी आदेश काढून तलाठी पदासाठी अस्पृश्य लोकांमधून नेमणुका करण्यास सांगितले आणि इतर मोठ्या पदावर त्यांच्या पात्रतेनुसार नेमणुका केल्या जाव्यात तसेच कोणत्याही सरकारी नोकरीत नेमणुकीसाठी त्यांच्या अस्पृश्यत्वाचे कारण पुढे करून संधी नाकारल्याची सबब एकूण घेतली जाणार नाही असेही या आदेशात नमूद करण्यात आले होते.अस्पृश्यांची समाजात प्रतिष्ठा वाढावी म्हणून मुलकी खात्यात दाप्तरबंद म्हणून नेमणुका केल्या.दादोबा पवार या अस्पृश्य असलेल्या गृहस्ताला कोल्हापूर म्युनिसिपाल्टीचा चीअरमन म्हणून नेमणूक केली.मदार भंगी या भंगी समाजातील व्यक्तीची कोल्हापूर म्युनिसिपाल्टी कमिटीची सदस्यपदी नेमणूक केली.शिकार हा महाराजांचा आवडता छंद होता या शिकारीच्या खुतामध्ये देखील त्यांनी मांग समाजातील युवकांची नेमणूक केली होती.

शाहू महाराज आपल्या कार्यबद्दल खूप दक्षता घेत होते याचे उत्तम उदाहरण म्हणजे जेव्हा कोल्हापुरात कुस्त्यांचे आखाडे भरवले जात होते तेव्हा आखाड्यात अस्पृश्य पैलवानाला त्याच्या आडनावाने पुकारल्यास (महार,मांग ,चांभार)यामुळे कमीपणाची भावना त्यांच्यात निर्माण होऊ नये म्हणून त्यांनी या समाजातील पैलवानांना प्रतिष्ठित अशी विशिष्ट नावे दिली होती.यामध्ये महार पैलवानाला जाट,चाम्भारांना सरदार,भंग्यांना पंडित या

नावांनी पुकारले जाई.महाराजांनी हि पराकोटीची मानवी भेदाभेद मिटवण्याचा ध्यासच घेतला होता. यासाठी शाहू महाराजांचा सोनतळी कॅम्प महत्वपूर्ण होता इथे जणू सामाजिक प्रयोग करण्याची प्रयोगशाळाच होती म्हणावी लागेल.१९२० मध्ये भरवलेल्या माणगाव परिषदेस डॉ.बाबासाहेबांना आमंत्रित करून अध्यक्ष बनवले. यावेळी कॅम्पमध्ये येऊन आपल्याबरोबर भोजन करण्याचे विनंती देखील बाबासाहेबांना केली या प्रमाणे या ठिकाणे मोठा कार्यक्रम घेऊन सत्कारही करण्यात आला.

७. स्त्रीवर्गाच्या कल्याणाचे कार्य :

समाजातील स्त्रीवर्ग एक प्रकारे उपेक्षित आणि सर्वदृष्ट्या मागासलेला होता पुरुषप्रधान संस्कृतीमुळे स्त्रियांवर विविध प्रकारच्या अन्याय अत्याचार केले जात असत. बालविवाह विधवा प्रतिबंध, शिक्षण बंदी, पडदा पद्धती इत्यादी परंपरांनी स्त्रियांचे जीवन असहाय्य आणि परावलंबी बनलेले होते. स्त्रियांच्या स्थिती सुधारण्याचे कार्य प्रथम महात्मा फुलेंनी केले. त्यांनी स्त्री शिक्षणाची सुरू केलेली चळवळ ही स्त्रीमुक्तीची चळवळ होती. शाहू महाराजांनीही आपल्या संस्थानात स्त्रीशिक्षणास प्रोत्साहन दिले तसेच त्यांनी स्त्रियांच्या नैसर्गिक हक्कांचे संरक्षण करणारे कायदे पास करून त्यांची समाज व कुटुंबाकडून होणारे पिळवणूक थांबवण्याचा प्रयत्न केला. महाराजांनी जुलै १९१७ मध्ये विधवांच्या पुनर्विवाहास कायदेशीर मान्यता देणारा विधवा पुनर्विवाह कायदा पास केला १२ जुलै १९१९ रोजी कोल्हापूर इलाख्यातील विवाह संबंधी कायदा पास केला या कायद्यानुसार जातीनिर्बंध न पाळता कोणत्याही धर्माच्या मनुष्याशी स्त्रीला विवाह करण्यास मूभा दिली. विवाह समयी पुरुषाचे वय १८ व स्त्रीचे वय १४ पूर्ण असले पाहिजे यामुळे बालविवाह वर बंधने आली१८ वय वर्ष पूर्ण झालेल्या स्त्रीला विवाहासाठी पिता अथवा पालकाच्या संमतीची आवश्यकता राहणार नाही आंतरजातीय विवाह कायदा म्हणजे स्त्री-पुरुषांच्या सामाजिक स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारे महाराजांचे क्रांतिकारी पाऊल होते २ऑगस्ट १९१९ रोजी महाराजांनी कृरपानाच्या वर्तनास प्रतिबंध करणारा कायदा पास केला पती व त्याच्या नातेवाईकाकडून स्त्रीचा होणारा छळ यावर या कायद्याने प्रतिबंध घातला गेला कोल्हापूरचे काडी मोडण्याचे नियमही स्त्रियांना संरक्षण देणारे ठरले. महाराजांनी घटस्फोट व वारशाचा कायदा पास केला. घटस्फोटानंतर स्त्रीच्या अन्न वस्त्र या खर्चाची व्यवस्था पोटगी शिक्षण व संतती असल्यास त्यांच्या ताब्याबद्दलही व्यवस्था या घटस्फोट कायद्याने लावली१७ जानेवारी १९२० रोजी हिंदू वारसाचा कायद्याच्या दुरुस्तीचा कायदा गॅजेटमध्ये प्रसिद्ध केला या कायद्याने सर्व वर्णाच्या अनौरस संततीस पित्याच्या मिळकतीत वारसा हक्क दिला या कायद्याचे दुसरे कलम स्त्रियांच्या उद्धाराच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरले समाजात कनिष्ठ वर्गात देवाच्या नावावर मुली सोडण्याचे प्रथा होती या प्रथेतून जोगतीण मुरळी देवदासी या प्रकारच्या पीडित स्त्रियांचा वर्ग निर्माण झाला अशा स्त्रियांना पित्याच्या संपत्तीत वाटा मिळत नसे कारण त्यांचा मूळ घराशी काही संबंध राहत नाही महाराजांनी देवदासी प्रथा प्रतिबंध कायदा केला या कायद्याने स्त्रियांना आपल्या पित्याच्या संपत्तीत वारसा हक्क मान्य केला थोडक्यात स्त्रियांना कायदेशीर दर्जा अमान्य केला व देवदासी व अन्यायकारी चालीरीतींचा पायाच उखडून टाकला.

७. सत्यशोधक समाजाची स्थापना :

बहुजन समाजाला ब्राम्हण्यवादी जोखडातून मुक्त करण्यासाठी महत्मा ज्योतीराव फुले यांनी सन १८७३ रोजी सत्यशोधक समाजाची स्थापना केली वास्तविक हि एक बहुजानुद्धाराची चळवळ होती.शाहू महाराजांच्या काळातही सत्यशोधक चळवळीचे कार्य चालू होते.सत्यशोधक समाजाची बहुजन हितकरी अनेक तत्वे शाहू महाराजानाही भावली होती.याशिवाय वेदोक्त प्रकरण,शंकराचार्यांचा जातीनिष्ठ अनुभव या अनुभवांमुळे महाराजांच्या संवेदनशील मनाला बसलेले तीव्र चटके यामुळे शाहूमहाराज अशा भेदभावाबद्दल पेटून उठल्यानंतर सत्यशोधक चळवळीचे महत्व त्यांना पटले होते.महत्मा फुले यांच्या नंतर सत्यशोधक चळवळीला भक्कम पायावर उभे करण्याचे काम शाहू महाराजांनी केले.त्यांनी घोसरवाडकर इनामदार यांच्या अध्यक्षतेखाली सत्यशोधक समाजाची स्थापना केली.सत्यशोधक समाजाचे कार्यालय उभारणीसाठी जागा दिली.समाजाच्या पुरोहित शाळेला अनुदान दिले होते .सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून २०० -३०० विवाह घडून आणले.१९१३ मध्ये कोल्हापुरात सत्यशोधक शाळा सुरु केली तिची जबाबदारी विसोजी डोने यांचावर सोपवली होती.महाराजांच्या कार्यामुळे महाराष्ट्रात सत्यशोधक चळवळीची वाढ झाली १९११ व १९१२ मध्ये रामय्या अय्या वारू आणि डॉ.संतू रामजी लाड यांनी परीषदा घेतल्या.यापुढे देखील सत्यशोधक समाजाचे कार्य चांगल्या स्वरूपात चालू राहिले.

८. ब्राम्हणेतर चळवळ आणि शाहू महाराज :

ब्राम्हन्यवादी दडपशाहीला विरोध करण्यासाठी महात्माफुले यांनी सत्यशोधक चळवळीची स्थापना केली होती.ब्राम्हण वर्गाच्या व्यतिरिक्त बहुजनांच्या हक्कासाठी लढणारी हि पहिली चळवळ होती.१९१७ मध्ये महाराष्ट्रात ब्राम्हणेतर चळवळीची

ISSN No. 2394-5990

सुरुवात शाहू महाराजांनी केली.बहुजनांच्या राजकीय हक्कासाठी या चळवळीची स्थापना केली होती तसेच शाहू महाराजांनी चालू केलेली वेदोक्त चळवळ हि दुसरी ब्राम्हणेतर चळवळ होती.सत्यशोधक आणि वेदोक्त या दोन्ही चळवळी एकत्र करून ब्राम्हणेतर या राजकीय चळवळीत रुपांतर शाहू महारजांनी केले.समाज जागृतीच्या अनेक सत्यशोधकी कार्याबरोबरच शैक्षणिक संस्था वसतिगृहे देखील या चळवळीच्या माध्यमातून उभी केली.वृत्तपत्राच्या क्षेत्रात कर्मठ ब्राम्ह्यवाद्यांचे वर्चस्व होते ते मोडून काढण्यासाठी शाहू महाराजांनी वृत्तपत्रांना सक्रीय उत्तेजन दिले.या कार्यासाठी अनेक सक्रीय सहकाऱ्यांची मोठी महाराजांनी उभी केली होती.

९. फुले– शाहू –आंबेडकर या त्रयींचा संगम :

महात्मा फुले छत्रपती शाहू महाराज डॉ.बाबासाहेब आंबेडकर या तीनही महापुरुषांचे जीवनकाळ भिन्न असले तरी त्यांच्या कार्याच्या विचारांचा संगम एकच होता तो म्हणजे संवर्ण असलेल्या वरिष्ठ वर्गाने लादलेली विभाजनवादाची आणि गुलामगिरीची भूमिका मोडून काढत बहुजन समाजाला उन्नत मार्गावर घेऊन जाणे.

छत्रपती शाहू महाराज यांचे वैशिष्ट्य म्हणजे ते स्वतः एका संस्थानाचे राजे असतानाही राजविलासात अडकून न राहता समाजातील दुर्बल घटकासाठी जीवनाच्या शेवटपर्यंत कार्य करत राहिले.म्हणूनच त्यांना सामाजिक लोकशाहीचा आग्रह धरणारा लोकराजा म्हणून ओळखले जाते.

संदर्भ साधने :

१. कुंभार नागोराव,सामाजिक चळवळी काळ आज व उद्या,प्रबोधन प्रकाशन लातूर,प्रथम आवृत्ती १९९४, पृ.२४

२. कठारे अनिल,महाराष्ट्रातील समाजसुधारक,विद्या बुक्स पब्लिकेशन, औरंगाबाद,प्रथम आवृत्ती २०१४,पृ.२३९

३. डॉ.गव्हाणे किशोरकुमार, डॉ.शिंदे.एस.पी, महाराष्ट्रातील समजसुधारणेचा इतिहास (१८००–१९६०), एज्युकेशनल पब्लिशर्स, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती २०१४,पृ.१४०

४. डॉ.पवार जयसिंगराव,राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ,महाराष्ट्र इतिहास प्रबोधनी,कोल्हापूर,प्रथमावृत्ती २००१,पृ.७१–८४

५. गर्गे.स.मा(संपा),भारतीय समाज विज्ञान कोश खंड ४ ,समाजविज्ञान मंडळ पुणे,पृष्ठ.१९०

६. पंडित नलिनी,जातीयवाद व वर्गवाद,लोकसंग्रह ग्रुह,मुंबई पृ.७३

७. फडके य.दी,विसाव्या शतकातील महाराष्ट्र(१९०१–१९१४) खंड १,श्रीविद्या प्रकाशन,प्रथम आवृत्ती १९८९,पृ.५०

८. गाठाळ साहेबराव,आधुनिक भारत (१८१८–१९७५), कैलाश पब्लिकेशन औरंगाबाद,प्रथम आवृत्ती १९९८ पृ.७२

९. फडके.य.दी,राजर्षी शाहू महाराज व लोकमान्य टिळक,श्रीविद्या प्रकाशन पुणे,प्रथम आवृत्ती १९८६, पृ.५४

९. डॉ.गव्हाणे किशोरकुमार, डॉ.शिंदे.एस.पी, एज्युकेशन पब्लिकेशन,औरंगाबाद,प्रथम आवृत्ती २०१४, पृ.१२४

११. भिडे जी.एल.,पाटील.एन.डी,महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, सहावी आवृत्ती,१९९९,पृ.४२

■■■

छत्रपती शाहू महाराज यांचे शैक्षणिक क्षेत्रातील कार्याचे योगदान

प्रा. डॉ. उध्दव मनोहर घोडके
विभाग प्रमुख, अर्थशास्त्र विभाग,
श्रीपतराव कदम महाविद्यालय,
शिरवळ, महाराष्ट्र uddhavmghodake@gmail.com

प्रा. अमोल जगन्नाथ वीर
सहाय्यक प्राध्यापक, वाणिज्य विभाग,
श्रीपतराव कदम महाविद्यालय,
शिरवळ, महाराष्ट्र veerradhey@gmail.com

प्रस्तावना :

छत्रपती शाहू महाराज हे पुरोगामी विचारांचे आधुनिक काळातील राजे होते. शाहू महाराजांनी देशातील अनेक सामाजिक विषयात लक्ष घालून जुन्या रूढी, परंपरा, प्रथा नाहीशा केल्या. ज्यामध्ये शिक्षांच्या क्षेत्रावर प्रचंड भार दिला. शाहू महाराजांनी मुलांसाठी वसतिगृहे, शिक्षणातील आरक्षण, मोफत शिक्षण अशा अनेक योजना सुरु केल्या.

शाहू महाराजांकडे संस्थानाच्या राज्यकारभाराची सूत्रे २ एप्रिल १८९४ ला आली. त्यानंतर शिक्षण क्षेत्रातील अनेक समस्यांवर त्यांनी उपाय शोधून त्याची अंमलबजावणी केली. तत्कालीन राज्यव्यवस्थेतील व्यवस्थेवर मत करण्यासाठी दलित व मागासवर्गीय जातींना शिकानात व नोकरीत ५०% आरक्षण लागू केले. आणि नुसते जाहीर न करता खर्या अर्थाने ते करवीर गाझेट मध्ये प्रकाशित करून त्याला शासकीय दर्जा दिला. मुलींसाठी रात्रशाळा सुरु केल्या, मुलांसाठी वसतिगृहे स्थापन केली. प्रत्येक जातीसाठी वेगळे वासातीम्ह्हे निर्माण केली. मागास्वर्गीयाना शिकन सुलभ व्यावे म्हणून १५% शिष्यवृत्ती चालू केली. अशापृश्याना मोफत शिक्षण चालू केले. शेतीविषयक माहिती समाजातील शेवटच्या शेतकऱ्या पर्यंत जावी व शेतीविषयक शिक्षण मिळावे यासाठी किंग एडवर्ड अग्री कॅल्चार संस्था चालू केली.

अशा अनेक योजना आपल्या राज्यात राबवून छत्रपती शाहू महाराजांनी शिक्षण क्षेत्रावरती बराचसा खर्च केला.

संशोधनाची अभ्यासाची उद्दिष्ट्ये :

अभ्यासाची मुख्य उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत.

०१. छत्रपती शाहू महाराजांच्या शिक्षणाच्या धोरणाचा अभ्यास करणे.

०२. शाहू महाराजांचे शिक्षण क्षेत्रातील योगदानावर प्रकाश टाकणे.

संशोधन पध्दती :

या संशोधन अभ्यासात दुय्यम साधनांचा वापर केला आहे. ज्यामध्ये विविध वर्तमानपत्रे, शाहू महाराजांवरील ग्रंथ, पुस्तके, websites यांचा समावेश आहे.

शाहू महाराजांची राजकीय पार्श्वभूमी :

आबासाहेब घाटगे यांचे जेष्ठ सुपुत्र यशवंतराव घाटगे यांना दत्तक देऊन राजगादीवर असवण्याचा आबासाहेबांचा मानस होता. मुंबईचे तत्कालीन राज्यपाल सर जेम्स फर्ग्युसन यांनी या दत्ताकाविधानाला मान्यता दिली. १७ मार्च १८८४ या दिवशी यशवंतराव घाटगे यांचे दत्तकविधान झाले. दरम्यानचा काळ हा यशवंतरावांच्या म्हणजेच शाहू महाराजांच्या शिक्षणाचा काळ होता. वेगवेगळ्या क्षेत्रातील विषयातील ज्ञान प्राप्त करण्यासाठी त्यांना राजकोट, धारवाड याठिकाणी शिक्षण घेतले. त्यानंतर २ एप्रिल १८९४ रोजी शाहूराजांनी कोल्हापूर संस्थानाच्या राज्यकारभाराची सूत्रे हाती घेतली.

शाहू महाराजांचे शिक्षण क्षेत्रविषयक मत :

साधारण १८९३ साली शाहू माजाराजनी शैक्षणिक क्षेत्रात लक्ष घालण्यास सुरुवात केली. ३ एप्रिल १८९३ रोजी राजमा महाविद्यालयातील पारितोषिक समारंभात शाहू महाराजांनी विद्यार्थ्यांना उद्देशून शिक्षणाचे महत्व नमूद केले. कोल्हापुरातील मुलांना पुण्याला उद्योगधंदा करण्यास न जाता कोल्हापुरात उद्योगधंदे चालू करावेत. सरकारी नोकरीच्या मागे जाऊ नये असे त्यांचे स्पष्ट मत होते. शाहू महाराजांनी विद्यार्थ्यांना वल्ह्यांचा एक संच देऊन त्यांच्या खेळला प्रोत्साहन दिले. संपूर्ण भारतात एक राजे होऊन गेले ज्यांनी शैक्षणिक पातळी तपासण्यासाठी त्यांच्या राज्यकारभारा अंतर्गत येणाऱ्या ठिकाणांना भेटी दिल्या. अज्ञानी, अडाणी, अंधश्रद्धाळू लोकांना चांगल्या प्रवाहात आणण्यासाठी शाहू महाराज कायम संकटातून होते.

गरीब रयतेला आपल्या हक्कांची, कर्तव्यांची माहिती व्हावी त्यासाठी त्यांनी शिक्षांचा प्रसार करण्याचे ठरविले होते. १८८० साली इंग्रजांनी १० वर्षापर्यंत मोफत व सक्तीचे शिक्षण केले

ISSN No. 2394-5990

होते. त्या धरतीवर म. फुलेंबरोबर कोल्हापूर संस्थानात देखील शाळांकडे लक्ष देण्यास सुरुवात केली. १८४८ पर्यंत राज्यात एकूण १२२ शाळा होत्या. परंतु १८४८ पासून कोल्हापूर संस्थानात सरकारी शाळा काढण्यास सहय महाराजांनी सुरुवात केली. त्यानंतर १८५१, १८५४ यासाली देखील शाहू महाराजांनी शाळा चालू केल्या. राज्यातील शाळेत शिकवणारे शिक्षक चांगले निर्माण व्हावेत यासाठी १८६७ साली अध्यापक शाळा सुरु केली.

राजाराम महाविद्यालयात गरीब मुलांसाठी वसतिगृह चालू केले. ते काही काळानंतर बंद केले गेले. कोल्हापूर संस्थानातील पहिले वसतिगृहे १८ एप्रिल १९०१ रोजी सुरु केले. १९०६ साली अस्पृश्य लोकांसाठी रात्रीची शाळा चालू केली. तसेच १९०७ साली याच जातीतील महिलांसाठी रात्रीची शाळा सुरु केली. त्यानंतर अशी अनेक वसतिगृहे चालू केली. जातिव्यवस्थेच्या भेदामुळे प्रत्येक जातीतील मुलांसाठी वेगळे वसतिगृह बांधण्यात आले. पुढे शाहू महाराजांनी राज्यात २१ सप्टेबर १९१७ साली सक्तीच्या शिक्षणाचा कायदा केला. १९१७ च्या दरम्यान एकूण ९६ शाळा चालू केल्या. शाहू महाराजांनी शिक्षण खात्यावर प्रचंड खर्च केला. राज्यातील जनतेतून शिक्षणाचा कर भरून घेण्यास सुरुवात केली.

शिक्षण क्षेत्रातील वार्षिक खर्च :

शाहू महाराजांनी १ लाख रुपये इतकी रक्कम हि सक्तीच्या शिक्षण योजनेच्या अंमलबजावणीसाठी खर्च केले. दरवर्षी १ लाख रुपये एवढी रक्कम शाहू महाराज राज्यातील शिक्षण क्षेत्रावर खर्च करीत असत. १९०६ साली सुरु केलेल्या रात्र शाळेवर दरसाल ९६ रुपये इतका खर्च केला. १९१७ साली सक्तीच्या शिक्षांची अंमलबजावणी सुरु केल्यापासून ते १९२२ पर्यंत सुमारे ३ लाख रुपये या योजनेवर केले. १९१९ साली शालेय साहित्य देण्यासाठी एकूण २५०० इतकी रक्कम मंजूर केली. तसेच काही अस्पृश्य वर्गातील मुलांसाठी ६० प्रतिमहिना शिष्यवृत्ती चालू केली.

निष्कर्ष :

छत्रपती शाहू महाराज हे आधुनिक भारताचे द्रष्टे नेतृत्व होते. लोकशाहीची सारखी राज्यव्यवस्था चालवून त्यांनी जनतेला न्याय दिला. त्यांनी अस्पृश्य, गरीब, वंचित, मागासवर्गातील लीकाना शिक्षांच्या प्रवाहात आणण्याचे काम केले. त्यांनी भारतामध्ये पहिल्यांदा सक्तीच्या शिक्षांचा कायदा आणला. त्यांनी वेगवेगळ्या जातीतील मुलांसाठी शाळा तसेच वसतिगृहे चालू केली. राज्याच्या बजेट मधील काही हिस्सा हा शैक्षणिक क्षेत्रावर खर्च केला. ज्यामुळे सर्वसामान्यांना शिक्षणाची दारे खुली झाली. शिक्षणाची गंगा खर्या अर्थाने गरीब, अश्पृश्यामध्ये, खेड्यापाड्यांमध्ये नेण्याचे काम छत्रपती शाहू महाराजांनी केले. त्यामुळे भारतातील सध्याच्या शिक्षण व्यवस्थेच्या पायाराचानीत शाहू महाराजांचे महत्वपूर्ण योगदान आहे.

महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतरावजी चव्हाण असे म्हणतात कि, शाहू महाराज हा दलितांना न्याय देण्यासाठी उभा राहिलेला, कालसुसंगत समाजप्रबोधनाचे व्रत घेतलेला, विसाव्या शतकातील मानवतावादी मराठी राजा होता.

संदर्भ:

१) धनंजय कीर, राजर्षी शाहू छत्रपती,पोपुलर प्रकाशन प्रा. लि. २०११

२) कुमार अनिल, राजर्षी शाहू महाराज, मक्मिलन प्रकाशन, ISBN-1403-909628, 2003.

३) Priydarshan.blogspot.com

■■■

छत्रपती राजश्री शाहू महाराज यांनी भौगोलिक परिस्थितीला अनुसरुन केलेला विकास

डॉ. समाधान धर्मा शिंदे
विभाग प्रमुख, भूगोल विभाग,
श्रीपतराव कदम महाविद्यालय, शिरवळ,
ता. खंडाळा, जि.सातारा, महाराष्ट्र
Email : ssamadhanshinde@gmail.com

डॉ. उध्दव मनोहर घोडके
विभाग प्रमुख, अर्थशास्त्र विभाग,
श्रीपतराव कदम महाविद्यालय, शिरवळ,
ता. खंडाळा, जि.सातारा, महाराष्ट्र
Email : uddhavmghodake@gmail.com

प्रस्तावना :

देशाच्या सर्वांगीण विकासाचा विचार करीत असताना त्या देशातील कृषी, उद्योग आणि सेवा क्षेत्राचा विकास होणे आवश्यक असते. परंतु भारतीय अर्थव्यवस्था ही प्राथमिक म्हणजेच कृषी क्षेत्रावर मोठ्या प्रमाणात अवलंबून असल्याचे दिसून येते. तसेच सद्यस्थितीचा विचार करता आजही बहुतांशी आपली अर्थव्यवस्था कृषी आधारित असल्याचे दिसून येते. म्हणून देशाच्या विकासाची सुरुवात हा कृषी व्यवसायापासून होतो. त्या अनुषंगाने ग्रामीण भागातील लोक शेतीव्यवसाय, कुक्कुटपालन, पशुपालन, दुग्धव्यवसाय, मासेमारी इत्यादी कृषी कृषी सलंग्न व्यवसाय करतात. हेच अर्थव्यवस्थेच्या प्राथमिक क्षेत्राच्या विकासाचे खऱ्या अर्थाने निर्देशक घटक आहेत .सदर सर्व व्यवसाय व उद्योग हे निसर्गावर व भौगोलिक परिस्थितीवर अवलंबून असतात एखाद्या व्यवसाय व उद्योग करण्यासाठी सभोवतालच्या पर्यावरण पोषक नसेल व जो व्यवसाय करायचा आहे त्याला लागणारे प्राथमिक घटक परिसरात उपलब्ध नसतील तर त्या ठिकाणी तो व्यवसाय उद्योग करता येणार नाही म्हणजेच आवश्यक ते भौगोलिक घटक व पर्यावरणीय घटक नसतील तर उद्योग व्यवसायास गतिमानता येणार नाही. कोल्हापूर संस्थांनची भौगोलिक परिस्थिती अतिशय विविधता असलेली आहे याच उपलब्ध असलेल्या भौगोलिक व पर्यावरणीय परिस्थितीचा उपयोग करून छत्रपती शाहू महाराजांनी करवीर संस्थांच्या विकासासाठी अनेक उपयुक्त योनजा राबविल्याचे दिसून येते .

संशोधन अभ्यासाची उदिष्टे :

अभ्यासाची प्रमुख उदिष्टे खालीप्रमाणे आहेत.

१. छत्रपती शाहू महाराजांनी सुरु केलेल्या कृषी विकास योजनाचा अभ्यास करणे.
२. प्राप्त भौगोलिक परिस्थितीनुसार दुष्काळी व औद्योगिक धोरणाचा आढावा घेणे.

संशोधन पद्धती :

सदर संशोधन हे वर्णनात्मक पद्धतीवर अवलंबून असून त्यासाठी पुस्तके , संदर्भ ग्रंध, मासिके,वर्तमान पत्रे, संशोधन लेख इत्यादी दुय्यम साधनसामग्रीचा उपयोग करण्यात आला आहे .

छत्रपती शाहू महाराजांनी करवीर संस्थांनच्या विकासासाठी केलेले कार्य :

शेती:

ग्रामीण भागातील लोकांचा मुख्य व्यवसाय हा शेती असून तो मोठ्या प्रमाणात निसर्गावर अवलंबून आहे. ङ्गज्या देशाचा प्रमुख व्यवसाय शेती आहे असे देश जोपर्यंत आधारभूत शेती क्षेत्राचा विकास करीत नाहीत तोपर्यंत आपल्या मर्यादित साधना द्वारे आर्थिक विकासाचा उच्च दर प्राप्त करू शकत नाहीत अशा प्रकारे भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीचे स्थान महत्व पूर्ण आहेफ१. शेती हा आपल्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे हे ओळखून शाहू महाराजांनी शेतीचा उद्धार म्हणजेच शेतकऱ्याचा उद्धार, पर्यायाने देशाचा उद्धार या सूत्राप्रमाणे शेतीमध्ये मूलभूत सुधारणा केल्या व प्राथमिक नवीन उद्योगांची शेतीला जोड दिली त्याचबरोबर पारंपारिक उत्पादनाबरोबर व्यापारी शेतीला मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांना प्रोत्साहन दिले. तसेच गुळ उत्पादनास प्रेरणा देऊन कृषी आधारित उद्योगांना महाराजांनी चालना दिली. तसेच चहाच्या शेतीचा प्रयोग यशस्वी करून दाखवला त्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक प्रगती होण्यास मदत झाली अशाप्रकारे प्राप्त भौगोलिक परिस्थितीनुसार कृषी व उद्योगाला पूरक अनेक योजनामुळे शेतकऱ्याचा शेतीकडे पाहण्याचा पारंपारिक दृष्टीकोन बदलून व्यवसायिक दृष्टीकोन निर्माण झाल्यामुळे शेतकऱ्याची आर्थिक प्रगती झाल्याचे दिसून येते. यावरून छत्रपती शाहू महाराजांचा शेती व शेती पूरक उद्योगा विषयीचा दूरदृष्टीपणा दिसून येतो.

ISSN No. 2394-5990

दुष्काळी परिस्थितीवर उपाय योजना :

सन १८९६-९७ मध्ये भारत देशासमोर भयानक दुष्काळ आणि प्लेग सारख्या साथीच्या रोगराईचा परिणाम महाराष्ट्राच्या जनतेला ही सहन करावा लागला.तसेच या नैसर्गिक आपत्तीमुळे राज्यातील गावोगावी व शेतीमध्ये गंभीर परिस्थिती निर्माण झाली.अशा कठीण प्रसंगी शाहू महाराजांनी शेतकऱ्यांना त्यांच्या गावोगावी वं शेतीच्या बांधावर प्रत्यक्ष जाऊन भावनिक आधार दिला. व या आपत्तीवर मातकरण्यासाठी तत्काळ आवश्यक त्या उपायोजना चालू केल्या, दुष्काळाशी सामना करण्यासाठी शाहू महाराजांनी गुरांना चारा देऊ केला, भूकेल्यांना अन्न व निराधार यांना आश्रय दिला. दुष्काळी कामांच्या योजना आखल्या, रस्त्याना मंजुरी दिली, अशा अनेक योजनेच्या माध्यमातून जनतेला रोजगार उपलब्ध करून दिला. व दुष्काळ व प्लेग या दोन संकटातून जनतेला सुरक्षित बाहेर काढले. परिणामी लोकांचे मनोधैर्य वाढले. अशा नैसर्गिक संकटावर मात करण्यासाठी महाराजांनी जे प्रयत्न केले त्याबाबत असे म्हटले जाते कि 'दुष्काळामध्ये महाराजांची उपयोजना इतकी तातडीची, दूरगामी व सर्वव्यापी होती की दुष्काळा मध्ये भूकबळी पडले नाहीत व त्यावेळी मृत्यूमध्ये सुद्धा भर पडली नाही.'[२]

अशाप्रकारे वारंवार निर्माण होणाऱ्या नैसर्गिक आपत्तीवर शाश्वत उपाय योजना करण्याच्या दृष्टीने शाहू महाराजांनी तत्कालीन भौगोलिक परिस्थितीच्या अनुषंगाने सारासार विचार तलाव, विहिरी व बंधाऱ्यांची निर्मिती मोठ्या प्रमाणावर केली. सह्याद्रीच्या माथ्यावर पडणारे पाणी तिथून उगम पावणाऱ्या नद्या पावसाळ्यात दुथडी भरून वाहतात व उन्हाळ्यात मात्र त्या कोरड्या पडतात हे शाहू महाराजांच्या लक्षात आले व महाराजांनी ह्या नद्यांचे पाणी अडवण्याचा विचार केला व उन्हाळ्यात देखील पाण्याची कमतरता भासणार नाही. हंगामी किंवा फक्त पावसाळ्यात पिके घेण्याऐवजी पावसाचे पाणी साठवून वर्षभर पिके घेण्यासाठी भोगावती नदीच्या भौगोलिक परिस्थितीचा आढावा घेऊन राधानगरी या ठिकाणी लक्ष्मी तलाव म्हणजेच राधानगरी धरण बांधण्याचा संकल्प केला. संस्थान मध्ये असणारे भूगर्भशास्त्रज्ञ यांनी परिसराची पाहणी केली त्या ठिकाणीच्या भौगोलिक पर्यावरणाचा, जमिनीचा व भूगर्भाचा अभ्यास करून धरणाची उभारणी करण्यास सुरुवात केली. शाहू महाराजांच्या हयातीत धरणाचे ४० टक्के काम पूर्ण झाले. आपली भूमिका खऱ्या अर्थाने सुजलाम सुफलाम होईल हा आशावाद त्यांनी निर्माण केला. राधानगरी धरण पुढे १९५७ मध्ये पूर्ण झाले व कोल्हापूर जिल्ह्यात हरितक्रांतीची बीजे रुजली गेली.

उद्योगधंदांना प्रोत्साहन :

भौगोलिक परिस्थितीनुसार प्रत्येक भागात वेगवेगळी पिके येतात व त्या पिकांना स्थानिक बाजारपेठ उपलब्ध होणं गरजेचे असते याचा शाहू महाराजांनी दूरदृष्टीने विचार करून संस्थानात छोटे-मोठे उद्योग उभारण्यास प्राधान्य दिले व त्यातूनच शाहू मिलची उभारणी तसेच शिरोळ इचलकरंजी येथे अनेक जिनिंग फॅक्टरीना मदत केली तसेच कागद उद्योग अशा अनेक उद्योगांना शाहू महाराजांनी आश्रय दिला व स्वदेशीचा वापर वाढवला अशा तऱ्हेने त्यांनी परिसरात उत्पादित होणाऱ्या कच्च्या मालावर प्रक्रिया करणारे छोटे-मोठे उद्योग धंद्यांना चालना दिली. महाराजांनी उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी सन १८८८ पासून करवीर संस्थांनामध्ये औद्योगिक प्रदर्शने भरवण्यास सुरुवात केली त्यामुळे उद्योगांना मोठ्या प्रमाणावर गती मिळाली व लोकांनी त्यातून प्रेरणा घेऊन कच्च्या मालावर प्रक्रिया करणारे अनेक उद्योगधंदे परिसरात उभे केले. कोल्हापूर मध्ये आज दिसणारी औद्योगिक प्रगतीची बीजे शंभर वर्षापूर्वीच शाहू महाराजांनी रुजवलेली होती.

निष्कर्ष :

१. प्राप्त भौगोलिक परिस्थितीनुसार कृषी व उद्योगाला पूरक अनेक योजनामुळे शेतकऱ्याचा शेतीकडे पाहण्याचा पारंपारिक दृष्टीकोन बदलून व्यवसायिक दृष्टीकोन निर्माण झाल्यामुळे शेतकऱ्याची आर्थिक प्रगती झाल्याचे दिसून येते. यावरून छत्रपती शाहू महाराजांचा शेती व शेती पूरक उद्योगा विषयीचा दूरदृष्टीपणा दिसून येतो.
२. नैसर्गिक आपत्ती व दुष्काळाशी सामना करण्यासाठी शाहू महाराजांनी गुरांना चारा देऊ केला, भूकेल्यांना अन्न व निराधार यांना आश्रय दिला. दुष्काळी कामांच्या योजना आखल्या, रस्त्याना मंजुरी दिली, अशा अनेक योजनेच्या माध्यमातून जनतेला रोजगार उपलब्ध करून दिला .व दुष्काळ व प्लेग या दोन संकटातून जनतेला सुरक्षित बाहेर काढले. परिणामी लोकांचे मनोधैर्य वाढले.
३. नैसर्गिक आपत्तीवर शाश्वत उपाय योजना करण्याच्या दृष्टीने शाहू महाराजांनी तत्कालीन भौगोलिक परिस्थितीच्या अनुषंगाने सारासार विचार तलाव, विहिरी व बंधाऱ्यांची निर्मिती मोठ्या प्रमाणावर केली.
४. शाहू महाराजांनी दूरदृष्टीने विचार करून संस्थानात छोटे-मोठे उद्योग उभारण्यास प्राधान्य दिले. त्यामुळे उद्योगांना मोठ्या प्रमाणावर गती मिळाली व लोकांनी त्यातून प्रेरणा घेऊन कच्च्या मालावर प्रक्रिया करणारे अनेक उद्योगधंदे परिसरात उभे केले.

संदर्भसूची :

१. कुलकर्णी सो. मीना व ब. शि. कुलकर्णी, 'श्री शाहू छत्रपतीचे अर्थकारण', पृ २२८.

२. उद्धव मनोहर घोडके व पाडुरंग किसन लोहोटे 'महात्मा फुले यांचे भारतीय शेती व शेतकऱ्याविषचे विचार' पृ. १५६ 'संशोधक' पुरवणी अंक २०२२.

३. SalunkheNanasaheb. (2007) Shahunchya Aathvani, Vrushali Prakashan

४. Keer Dhananjay. (1977). Shahu Chhatrapati - Royal Revolutionary. Popular Prakashan, Bombay. 1976

■■■

ISSN No. 2394-5990

आधुनिक भारताचे अर्थनितीकार राजर्षी शाहू महाराज

डॉ. काशिनाथ रामचंद्र तनंगे
प्रमुख , अर्थशास्त्र विभाग,
कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज
ई. मेल : tanangek@gmail.com

प्रस्तावना :

रयतेचा राजा राजर्षी शाहू महाराज यांनी आपल्या रयतेच्या उन्नतीसाठी कृषी, उद्योग, सेवा, व्यापार सहकार आणि सामाजिक आदी विविध क्षेत्रात भरीव कार्य केले. भारतात सतराव्या शतकात ईस्ट इंडीया कंपनी आणि इतरही अनेक परदेशी व्यापारी आले. त्यातून आधुनिक जीवनशैलीचा परिचय घडू लागला, सोबतच शोषण व्यवस्था दृढ होऊ लागली. ब्रिटिश साम्राज्याने एकोणिसाव्या शतकात भारतामध्ये सर्वदूर हातपाय पसरले तेव्हा भारतीय शेतमालाच्या लुटीबद्दल महात्मा फुले, दादाभाई नौरोजी यांनी आवाज उठविला. पुढल्या काळात विविध संस्थानिकांनी कष्टकऱ्यांच्या जीवनात समृद्धी आणण्यासाठी प्रयत्न केले. कष्टकरी, शेतकऱ्यांच्या जीवनात परिवर्तन घडविण्यासाठी विशेष प्रयत्न करणाऱ्यांत राजर्षी शाहू महाराज यांचे नाव अग्रणी. त्याचाच परिणाम म्हणून एकविसाव्या शतकापर्यंत जी सामाजिक आंदोलने झाली, त्यावर त्यांच्या विधायक विचार व कार्याचा प्रभावही जाणवतो. शेतीच्या विकासावरच देशाचा विकास अवलंबून असतो, याची पुरेपूर जाणीव असल्याने शाहू महाराजांनी त्यांच्या संस्थानात शेतीकडे, उद्योग, सहकार आणि सामाजिक बदलाकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले. कल्याणकारी राज्याचा विचार रूढ झालेल्या काळात व्यापक, समावेशक राज्य व्यवस्थेची उभारणी करणार्या जगातल्या काही मोजक्या राजांमधे राजर्षी शाहू महाराजांचा समावेश होतो. शाहू महाराज प्रदर्शनवादी, विस्तारवादी, चंगळवादी राजे नव्हते. त्यांनी आपल्या सत्तेचा कधीही अन्यायसाठी वापर केला नाही. याउलट समाजातल्या दुर्बळांचा विचार करणारा, सर्व जाती-धर्म यांना एकत्रित घेऊन जाणारा, सामाजिक विषमतांना विरोध करणारा एकमेव राजा म्हणजे राजर्षी शाहू महाराज होय.

शोधनिबंधाची उदिष्टये :

- राजर्षी शाहु महाराजांचे कृषी विषयक विचार समजून घेणे.
- राजर्षी शाहु महाराजांचे उद्योग विषयक विचार समजून घेणे.
- राजर्षी शाहु महाराजांचे व्यापार विषयक विचार समजून घेणे.
- राजर्षी शाहु महाराजांचे सेवा विषयक विचार समजून घेणे.
- राजर्षी शाहु महाराजांचे आरोग्य विषयक विचार समजून घेणे.
- राजर्षी शाहु महाराजांचे कल्याण विषयक विचार समजून घेणे.

शोधनिबंधाची गृहितकृत्ये :

राजर्षी शाहू महाराजांचे आर्थिक विचार आर्थिक सुधारणेला दिशा देणारे ठरतात.

संशोधन पद्धती :

प्रस्तूत शोधनिबंधासाठी दुय्यम तथ्य संकलनाचा आधार घेवून लेखन करण्याचा प्रयत्न केला गेला आहे. त्यासाठी संदर्भ ग्रंथ, क्रमीक पुस्तके, मासिके, वर्तमानपत्रे इत्यादीचा आधार घेवून शोधनिबंध तयार करण्यात आलेला आहे.

राजर्षी शाहु महाराजांचे कृषी विषयक विचार :

शेतीच्या विकासावरच देशाचा विकास अवलंबून असतो याची पुरेपूर जाणीव शाहू महाराजांना असल्यामुळे त्यांनी त्यांच्या संस्थानात शेतीच्या विकासाकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले. कष्टकरी शेतकऱ्यांच्या जीवनात बदल घडवण्यासाठी विशेष प्रयत्न केले. शेतकऱ्यांना प्रत्यक्ष भेटून त्यांचे प्रश्न समजावून घेतले. शेतीच्या दुरावस्थेमुळे शेतकऱ्यांच्या दारिद्र्यांमध्ये वाढ होऊन त्यांचे राहणीमान खालवले जाते याची जाणीव झाल्याने शेतीची उत्पादकता आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी विविध प्रयत्न सुरू केले. शेतीच्या उत्पादनामध्ये वाढ घडून आणण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार केला पाहिजे याची जाणीव आपल्या जनतेला होण्यासाठी शाहू

महाराजांनी १९१२ मध्ये कोल्हापूर येथे किंग एडवर्ड एग्रीकल्चर इन्स्टिट्यूट स्थापन केली. या इन्स्टिट्यूट मार्फत शेतकऱ्यांपर्यंत सुधारित बी बियाणे, खते, अवजारे, पशुपालन यांची माहिती पोहोचू लागली. शेतकऱ्यांसाठी शेतीच्या आधुनिक अवजारांचे प्रदर्शन भरून शेतकऱ्यांना प्रात्यक्षिक देण्याचे कार्य महाराजांनी केले. याबरोबरच आधुनिक शेती उपकरणांचे संग्रहालय सुद्धा महाराजांनी निर्माण केले. शेतकऱ्यांना वनौषधी व इमारती लाकडांची लागवड केल्यास उत्पन्न वाढू शकते ही जाणीव करून दिली. त्यासाठी शेतकऱ्यांना साग, हिरडा, बेहडा, आंबा, फणस, काजू व इतर वन औषधी वृक्षांची लागवड करण्यासाठी प्रोत्साहन दिले. याबरोबरच साबुदाणा तयार होणाऱ्या टॅपिओकाची शेती करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन दिले.

शेतीला कर्ज पुरवठा :

राजर्षी शाहू महाराजांनी भांडवली अभावी शेतीचा विकास होणे शक्य नाही हे ओळखले होते. त्यासाठी आपल्या संस्थानांमध्ये शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा करणाऱ्या विविध योजना हाती घेतल्या. सहकारी संस्थांची स्थापना करून शेतकऱ्यांच्या होणाऱ्या पिळवणुकीला लगाम घालण्याचा प्रयत्न केला. शाहू महाराजांनी १९०४ मध्ये शेतकऱ्यांच्या मदतीने व्हिक्टोरिया मेमोरियल फंडाची स्थापना केली. त्या फंडातून गरीब व अल्पभूधारकांना अतिशय कमी व्याज दराने कर्ज पुरवठा करण्याची सोय उपलब्ध करून दिली. त्याबरोबरच १९२० – २१ मध्ये द किंग एडवर्ड फंडाची स्थापना करून शेतकऱ्यांना वित्तीय सहाय्य देण्याचे काम केले. अशा विविध फंडातून शेतकऱ्यांना शेती विकासासाठी एकूण २५,५३,२८० रुपये एवढा कर्ज पुरवठा केला होता. अर्थात आजच्या काळात ही रक्कम कमी वाटत असली तरीही त्या काळाचा विचार करता शेतकऱ्यांसाठी केलेली तरतूद खूपच मोठी होती. यावरून शाहू महाराजांनी सावकारांच्या विळाख्यातून शेतकऱ्यांना सोडवण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केलेला दिसून येतो.

शेती विभाजनाला विरोध :

शाहू महाराजांना शेतीचे होणारे विभाजन आणि तुकडीकरण हे शेती विकासातील एक प्रमुख अडथळा आहे याची जाणीव होती. भारतात वारसाहक्काने शेत जमिनीची वाटणी होत असल्याने जमिनीचे आकारमान खूप कमी होत गेलेले दिसून येते. अशा कमी आकारमानातच्या शेतीत किफायतशीर शेतीचे उत्पादन शेतकरी घेऊ शकत नाही ही बाब शाहू महाराजांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी आपल्या संस्थांमध्ये जमिनीच्या विभाजनाला विरोध केला. त्यासाठी त्यांनी कायदा निर्माण केला. तसेच समाजातील लोकांच्यामध्ये जमीन विभाजना वरील समस्यावर जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला. २२ मार्च १९२० मध्ये माणगाव येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या सभेमध्ये त्यांनी महार वतने रद्द केली. अशा प्रकारे शाहू महाराजांनी कायदे करून व समाजात जनजागृती निर्माण करून शेती तुकडीकरणाला आणि विभाजनाला विरोध केलेल्या दिसून येतो.

शाहू महाराजांची जलनीती :

शेती सिंचनाखाली आणल्याशिवाय शेतकऱ्यांची उत्पन्न वाढणार नाही याची स्पष्ट कल्पना शाहू महाराजांना असल्यामुळे महाराजांनी पाणी वापराबाबत योग्य अशी धोरण ठरवले. शेती पाण्याखाली आणण्यासाठी नवीन विहिरी, तलाव, बंधारे आणि कालवे बांधण्यास सुरुवात केली. शाहू महाराजांनी १९०९ मध्ये राधानगरी धरण प्रकल्प हाती घेतले. १९१८ पर्यंत या धरणाच्या कार्यासाठी शाहू महाराजांनी १४ लाख रुपये खर्च केले. परंतु महाराजांच्या कारकिर्दीत हा प्रकल्प पूर्ण होऊ शकला नाही. पुढे राजाराम महाराजांनी हा प्रकल्प पूर्ण करून राजर्षी शाहू महाराजांचे स्वप्न पूर्ण केले.

दुष्काळ निर्मूलन आणि भविष्यकालीन पाणी नियोजन:

महाराष्ट्रातील इतर भागाप्रमाणे कोल्हापूर विभागातही दुष्काळाच्या झळा सोसावे लागत असे त्यामुळे दुष्काळाचे निर्मूलना बरोबरच भविष्यकालीन पाणी नियोजनाचे धोरण शाहू महाराजांनी राबवले. भूगर्भातून पाणी उपसा न करता नदी तलावातील पाणी वापरण्यावर त्यांनी भर दिला. जमिनीवर पडणारे पावसाचे पाणी वाहू न देता योग्य प्रकारे त्याची साठवणूक केल्यास भविष्यकालीन दुष्काळाला तोंड देता येणे शक्य आहे याची पुरेशी कल्पना असल्यामुळे शाहू महाराजांनी नवीन सार्वजनिक तळी बांधण्याची मोहीम हाती घेतली. त्याचबरोबर अस्तित्वात असलेल्या तलावांची दुरुस्ती केली. याबरोबरच दुष्काळावर कायमस्वरूपी मात करण्यासाठी पाटबंधारे खात्यांची निर्मिती केली. या खात्यामध्ये इरिगेशन ऑफिसर ची नेमणूक केली. पाटबंधारे खात्यामार्फत प्रत्येक गावाची तपशीलवार माहिती पाहणी करून १९०२ मध्ये पाटबंधारे धोरण जाहीर केले. इरिगेशन ऑफिसर म्हणून शंकर सिताराम गुप्ते यांची नेमणूक करून त्यांना व त्यांच्या कर्मचाऱ्यांना गावागावात सर्वेक्षण करण्याचे काम दिले.

राजर्षी शाहु महाराजांचे उद्योग विषयक विचार :

कोणत्याही देशाचा जलद गतीने आर्थिक विकास साध्य करावयाचा असेल तो औद्योगिक विकासाशिवाय शक्य नसतो. याची जाणीव राजर्षी शाहू महाराजांना होती. त्यासाठी सर्वस्पर्शी

ISSN No. 2394-5990

औद्योगिक विकास हे महाराजांचे उद्दिष्ट होते. खाजगी उद्योगाबरोबरच सार्वजनिक क्षेत्रात शाहू महाराजांनी विविध उद्योगांची निर्मिती केली व त्या आधारे आपल्या संस्थानांमध्ये औद्योगिक क्षेत्राचा विकास आणि विस्तार करण्याचा प्रयत्न केला. उद्योगांचा विकास आपल्या संस्थांमध्ये करण्यासाठी आर्थिक सर्वेक्षण करून घेतले. या सर्वेक्षणाच्या आधारे मोठ्या कल्पकतेने अनेक उद्योगांची उभारणी केली व त्याला प्रोत्साहनही दिले. यामध्ये औषधी तेल उद्योग, मधुमक्षिका पालन उद्योग, कोष्टार्क उद्योग आणि सुती कापड उद्योगांचा समावेश होतो. उद्योगांचा विकास हा प्रशिक्षित व कौशल्यावर आधारित कामगारावर अवलंबून असतो. म्हणून आपल्या संस्थानातील अनेक लोकांना उद्योगाचे प्रशिक्षण घेण्यासाठी बाहेर पाठवले. तसेच बाहेरील प्रशिक्षित लोकांना आपल्या संस्थानात अधिकारीपदी नेमले. त्या पाठीमागे उद्देश हा होता की, तज्ञ लोकांच्या हाताखाली आपली माणसे तयार होतील अशी धडपड महाराजांची होती. उद्योगधंद्याच्या क्षेत्रात मोठा प्रकल्प हाती घेतला तो म्हणजे कापड गिरणीचा. शाहू महाराजांच्या प्रेरणेने १९०६ मध्ये दि शाहू छत्रपती स्पिनिंग अँड वि विंव्हीग मिल्स या गिरणीची स्थापना झाली. या गिरणीच्या उभारणीसाठी विस्तीर्ण जागा, पाण्याची तळे आणि ५०,००० रुपयांचे भांडवल महाराजांनी उपलब्ध करून दिले. या उद्योगामुळे कोल्हापुरातील शेकडो लोकांना रोजगार उपलब्ध झाला. इतकेच नव्हे तर कोल्हापूर हे हिंदुस्थानाच्या कापड उद्योगाच्या नकाशावर ठळकपणे दिसू लागले. याशिवाय शिरोळ, इचलकरंजी, गडहिंग्लज इत्यादी ठिकाणी अनेक जिनिंग फॅक्टरी स्थापन झाल्या होत्या. सन १९१२-१३ च्या सुमारास संस्थानातील पहिली ऑइल ऑइल मिल, पहिली सॉ मिल, पहिली फाउंड्री फॅक्टरी, पहिली इलेक्ट्रॉनिक कंपनी असे अनेक उद्योग सुरू झाले. निरनिराळ्या उद्योगांसाठी प्रशिक्षित कामगार तयार व्हावेत म्हणून महाराजांनी राजाराम इंडस्ट्रियल स्कूलची स्थापन केली. संस्थानातील लहान, मोठ्या व्यापाऱ्यांना, उद्योजकांना प्रसंगी अल्पमुदतीची कर्जे सरकारकडून देण्याची व्यवस्था करण्यात आली. संस्थानाबाहेरच्याही उद्योजकांना महाराजांनी त्यांच्या व्यापारासाठी, व्यवसायाच्या वाढीसाठी मदत केलेली अनेक उदाहरणे दिसून येतात.

राजर्षी शाहु महाराजांचे व्यापार विषयक विचार :

जगातील कोणत्याही विकसित देशाचा अभ्यास केल्यास त्या देशाच्या आर्थिक विकासामध्ये शेतीबरोबरच उद्योग आणि व्यापाऱ्याची भूमिका ही महत्त्वाची राहिली आहे. उद्योग आणि व्यापाराशिवाय समाजाचा आणि संस्थानाचा विकासाला मर्यादा येऊ शकतात याची जाणीव राजर्षी शाहू महाराजांना होती. विशेषतः व्यापार आणि उद्योगात आपण मागे पडल्याने भयानक अशा आर्थिक शोषणात आणि पारतंत्र्यांमध्ये आपण अडकत गेलो याची जाणीव शाहू महाराजांना होती. सन १९१७ मध्ये खामगाव येथे भरलेल्या अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या अधिवेशनात अध्यक्ष म्हणून संबोधित करताना त्यांनी आपल्या मनातील भावना व्यक्त केली. आपल्या संस्थानातील लोकांनी फक्त शेतकरी आणि सैनिकच म्हणून राहू नये. तर व्यापारी, व्यवसायिक, उद्योगधंदे आणि इतर उच्च प्रतीचे व्यवसाय केले पाहिजे अशी भावना महाराजांची होती. शाहू महाराजांच्या कारकर्दीच्या सुरुवातीच्या काळात कोल्हापूर संस्थानांमध्ये व्यापाराची स्थिती फारशी समाधानकारक नव्हती. शाहू महाराजांनी आपल्या संस्थानामध्ये उद्योग आणि व्यापार वाढावा यासाठी विशेष प्रयत्न केले. शाहूपुरी ही बाजारपेठ स्थापन केली. कोल्हापूर, कागल, निपाणी येथील व्यापारी वर्गांना विशेष अशा सवलती देऊन त्यांना वखारी उघडण्यास प्रोत्साहन दिले. त्यामुळे कोल्हापूर संस्थानांमध्ये व्यापारी वर्गांची संख्या वाढली. परिणामी आर्थिक व्यवहार वाढले. शेतमालाला चांगला भाव मिळू लागला. शेतमालाला संस्थांमध्ये संस्थांमध्येच बाजारपेठ उपलब्ध झाली. या बाजारपेठेमध्ये लाखो रुपयाची उलाढाल होऊ लागली. आज कोल्हापूरचे गुळ हे सर्वत्र प्रसिद्धीस आले याचे मूळ सुद्धा शाहू महाराजांच्या व्यापारातील दृष्टिकोनामध्ये दिसून येतो. शाहू महाराजांनी शाहूपुरी बरोबरच शिरोळ रेल्वे स्टेशन जवळ १९१७ साली जयसिंगपूर या ठिकाणी नव्या बाजारपेठेची निर्मिती केली. कोल्हापूर संस्थानातील पश्चिमेकडील लोकांना बाजारपेठ उपलब्ध व्हावी. यासाठी या बाजारपेठेची निर्मिती केली. एकूणच शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानांमध्ये विविध ठिकाणी बाजारपेठांची निर्मिती करून शेतकरी, व्यापारी आणि व्यवसायिक या सर्वांचा सर्वसमावेशक विकास घडवून आणण्याचा अधिक प्रयत्न केलेला दिसून येतो.

राजर्षी शाहु महाराजांचे सेवा क्षेत्रविषयक विचार :

सेवा क्षेत्रात मुख्यत: शिक्षण आणि आरोग्य विभागांचा समावेश होतो. शिक्षणाचं महत्त्व महाराजांना नैसर्गिक समजलं होतं. कोल्हापूर, नाशिक, पुणे, नागपूर, पंढरपूर, कराड अशा ठिकाणी महाराजांनी शैक्षणिक प्रकल्पांना, वसतिगृहांना मदत केली.

कोल्हापूर इथं जैन, लिंगायत, मुस्लिम, ब्राह्मण, मराठा या समाजांची स्वतंत्र वसतिगृहं सुरू करण्यासाठी जागा दिल्या. प्राथमिक शिक्षण सक्तीचं, मोफत करण्यात आलं. दुय्यम शाळांना प्रोत्साहन देण्यात आलं. राजाराम कॉलेज सुरू करण्यात आलं.

मागास प्रदेशात शिक्षण विस्तार, वसतिगृहांची स्थापना, शैक्षणिक, प्रशासन सुधारणा ही महाराजांच्या शिक्षण धोरणाची मुख्य सूत्रं होती. प्राथमिक शिक्षण सक्तीचं करणारा कायदा १९१७ मधे झाला. हा क्रांतिकारक निर्णय होता. शिक्षण खर्चाची तरतूद करण्यासाठी क्षमतेवर आधारित शैक्षणिक अधिभार बसवण्यात आला.

शाहू महाराजांनी १८८७ला 'जयसिंगराव घाटगे टेक्निकल इन्स्टिट्यूट', १९२४ला 'राजाराम इंडस्ट्रीयल स्कूल', १९१२ला 'किंग एडवर्ड शेती, शिक्षण संस्था', 'प्रशिक्षण, शिक्षण प्रशिक्षण, सत्यशोधक, पुरोहित शाळा', 'युवराज शाळा', 'सैनिकी शाळा' अशा विशेष शिक्षण संस्थाही सुरू केल्या. त्याचबरोबर 'देवल क्लब', 'तलाठी प्रशिक्षण संस्था', 'संस्कृत शाळा', 'उर्दू शाळा', 'रात्र शाळा' सुरू करण्यात आल्या. सर्वात विशेष म्हणजे मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी १९११मधे शुल्कमाफी जाहीर करण्यात आली.

१९१३ला मागासवर्गीयांसाठी प्रत्येक खेड्यात शाळा असाही निर्णय घेण्यात आला. राजर्षींनी मुलींच्या शिक्षणसाठीही पुढाकार घेतल्याचं दिसतं. गुणवत्ता शिष्यवृत्त्या आणि शैक्षणिक मदत देण्याची व्यवस्थाही महाराजांनी केली. त्यासाठी १६ शैक्षणिक सक्षमता निधी उभारले होते. ग्रंथालयांना निधी दिले जात.

राजर्षी शाहु महाराजांचे आरोग्य क्षेत्र विषयक विचार :

शाहू महाराजांनी सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेकडे पूर्णत: लक्ष दिल्याचं दिसतं. प्लेगच्या काळात विलगीकरणाची व्यवस्था केली गेली. १९१९च्या एन्फ्ल्यूएन्झा साथीत महाराजांनी कसोशीने सार्वजनिक आरोग्य व्यवस्था राबवली. महाराजांच्या काळापूर्वीच 'अल्बर्ट एडवर्ड हॉस्पिटल' सुरू करण्यात आलं. सध्या हेच हॉस्पिटल 'छत्रपती प्रमिलाराजे हॉस्पिटल' म्हणून ओळखलं जातं.

खरं तर राजर्षी शाहू महाराजांची राज्यव्यवस्था सामान्यांच्या हितासाठी; दुर्बलांच्या मदतीसाठी; सर्वांना समान न्याय देण्यासाठी; शेती, उद्योग, व्यापार यांच्या विकासासाठी कार्यरत होती. राजर्षी शाहू महाराजांनी आर्थिक विकास आणि सामाजिक न्याय यांचं संतुलन साधण्याचा, तेव्हाच्या परिस्थितीत युगप्रवर्तक प्रयोग केला, हे मान्यच करावं लागेल.

छत्रपती शाहू महाराज कल्याणकारी राजा :

कल्याणकारी राज्याच्या विचार करून रूढ झालेल्या काळात व्यापक समावेशक राज्यव्यवस्थेची उभारणी करणाऱ्या जगातल्या काही मोजक्या राज्यांच्या मध्ये शाहू महाराजांचा समावेश होतो. शेती, उद्योग, शिक्षण, आरोग्य या क्षेत्रातील त्यांचे उपक्रम काळाच्या कितीतरी पुढे होते. त्यांची राज्यव्यवस्था सामान्य व दुर्बळांची हित जपणारी आणि विकासाभिमुख होती. शाहू महाराजांनी समाजातल्या दुर्बळ घटकांचा विचार करून सर्व धर्म, जाती, जमाती यांना एकत्रित करून सामाजिक विषमतेला विरोध केला. आपल्या राज्यातील लोकांचे जीवन अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य, रोजगार, शिक्षण आणि संरक्षण व्यवस्थित देण्याचे कार्य शाहू महाराजांनी केले. कल्याणकारी अर्थशास्त्र आणि कल्याणकारी समाज रचना निर्माण करणारा युगपुरुष म्हणजे राजर्षी शाहू महाराज होय.

समारोप :

राजर्षी शाहू महाराज यांनी आपल्या रयतेच्या उन्नतीसाठी कृषी, उद्योग, सेवा, व्यापार सहकार आणि सामाजिक अशा विविध क्षेत्रात भरीव असे कार्य केले. कष्टकरी शेतकऱ्यांच्या जीवनात परिवर्तन घडवण्यासाठी विशेष प्रयत्न करणाऱ्या शाहू महाराजांचे नाव अग्रस्थानी घ्यावे लागेल. महाराजांनी आपल्या सत्तेचा वापर समाजातील दुर्बल घटकांच्या विकासासाठी केला. सर्व जाती धर्मीयांना एकत्रित घेऊन सामाजिक विषमता दूर करण्याचा प्रयत्न केला.

कष्टकरी शेतकऱ्यांच्या जीवनात बदल घडविण्यासाठी विशेष प्रयत्न केले. शेतकऱ्यांपर्यंत सुधारित बी बियाणे, खते, अवजारे, पशुपालन यांची माहिती पोहोचवली. शेतकऱ्यांसाठी आधुनिक अवजारांचे प्रदर्शन भरवले, वृक्ष लागवड करण्यासाठी प्रोत्साहन दिले. कर्ज पुरवठा करणाऱ्या विविध योजना हाती घेतल्या व लाखो रुपयांचे कर्ज शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिले. शेतकऱ्यांना सावकारांच्या विळख्यातून सोडण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला. शेतीचे होणारी विभाजन आणि तुकडीकरण याला विरोध दर्शविला. शेती सिंचनाखाली आणण्यासाठी नवीन विहिरी, तलाव, बंधारे, कालवे बांधण्यास सुरुवात केली. राधानगरी धरणासारखा प्रकल्प हाती घेतला. महाराष्ट्रातील दुष्काळ निवारण्यासाठी महाराजांनी विशेष असे प्रयत्न केले.

आपल्या संस्थांमध्ये औद्योगिक क्षेत्राचा विकास करण्यासाठी आर्थिक सर्वेक्षण करून घेतले. औषधी तेल उद्योग, मधुमक्षिका पालन उद्योग, सुती कापडं उद्योगांचा विकासाबरोबरच कामगारांना कौशल्य आधारित प्रशिक्षण उपलब्ध करून देऊन हजारो लोकांच्या हाताला काम मिळवून दिले. शेती, उद्योग यांच्या विकासाबरोबरच व्यापाराचाही विकास घडवून आणण्याचा प्रयत्न राजर्षी शाहू महाराजांनी केला. कोल्हापूर, कागल, निपाणी येथील व्यापारी वर्गाना विशेष सवलती देऊ केल्या. शाहूपुरी

ISSN No. 2394-5990

जयसिंगपूर या ठिकाणी बाजारपेठेची निर्मिती करून शेतकरी, व्यापारी, व्यवसायिक या सर्वांचा सर्व समावेशक विकास घडवून आणण्याचा प्रयत्न केला.

शाहू महाराजांनी शिक्षण आणि आरोग्य विभागाचा विकास घडवून आणण्यासाठी विशेष प्रयत्न केले. प्राथमिक शिक्षण सक्तीचं आणि मोफत केले. दुय्यम शाळांना प्रोत्साहन दिले. राजाराम कॉलेज सुरू केले. याबरोबरच विविध प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांची उभारणी केली. विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह उभारले. आरोग्याच्या सुविधा विकसित करण्यासाठी हॉस्पिटलची निर्मिती केली. आपल्या राज्यातील लोकांचे जीवन सुखकर होण्यासाठी कल्याणकारी समाज रचना निर्माण करण्याचे कार्य राजर्षी शाहू महाराजांनी केलेले दिसून येते.

संदर्भ :

१. डॉ. जयसिंगराव पवार (२००७) राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर.

२. प्रा. नाना साळुंखे (२००६) शाहूंच्या आठवणी, वृषाली प्रकाशन, कोल्हापूर

३. तू. बा. नाईक (२००६) छत्रपती राजर्षी शाहू महाराज, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

४. डॉ. जयसिंगराव पवार (२००४) राजर्षी शाहू छत्रपती: एक मागोवा, सुमेरू प्रकाशन, डोंबिवली.

५. डॉ. टी. एस. पाटील (२०१२), राजर्षी शाहू छत्रपती, श्रमिक प्रतिष्ठान, कोल्हापूर

६. राजर्षी एक व्यक्तिदर्शन प्रा. श्याम बेडेकर, कोल्हापूर

७. शाहू छत्रपती आणि लोकमान्य डॉ. य. दि. फडके, पुणे, १९८२

८. राजर्षी शाहू छत्रपती वाद आणि वास्तव डॉ. रमेश जाधव, कोल्हापूर,१९९२

९. क्रांतिसूक्ते राजर्षी छत्रपती शाहू संपा. डॉ. एस. एस. भोसले, कोल्हापूर, १९७५

१०. कोल्हापूर गॅझेटियर महाराष्ट्र राज्य गॅझेटियर कोल्हापूर जिल्हा संपा. कि.का. चौधरी, मुंबई, १९

११. प्रबोधन प्रकाशन ज्योतीचे विविध अंक

१२. विविध वर्तमान पत्रातील विविध लेख.

१३. इंटरनेट वरील विविध वेबसाईट वरील माहिती

■■■

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या सामाजिक सुधारणा संरक्षणाचे कायदे

डॉ.संभाजी सोपानराव दराडे
इतिहास विभाग प्रमुख
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
सोनई ता.नेवासा जि.अ.नगर - ४१४१०५
sambhajidarade333@gmail.com

१) प्रस्तावना :

राजसत्तेचा वापर जनकल्याणासाठी करावयाचा असतो अशा प्रकारचा आदर्श राजर्षी शाहू महाराजांचे महाराष्ट्राच्या नव्हे तर भारताच्या समाज विकासाच्या क्षेत्रातील योगदान अत्यंत महत्वपूर्ण असे आहे. छत्रपती शिवरायांनी निर्माण केलेली शॉर्याची लोककल्याणकारी राज्याची परंपरा राजर्षीनी पुढे चालू ठेवली. तत्पूर्वी गेली शेकडो वर्ष आपल्या देशाची संस्कृती ही कट्टर पुरुष प्रधान होती, आणि अदयापहि ती थोड्या फार फरकाने तशीच आहे. त्यामध्ये समस्त स्त्री-पुरुषप्रधान समाजांत रूढी, परंपरा आणि अंधश्रद्धाचा पगडा असल्यामुळे स्त्रियांवर सतत अन्याय होत होते. डॉ. पवार म्हणतात, बालविवाह, विधवाविवाह प्रतिबंध इ. रूढी परंपरांनी स्त्रीचे जीवन असहाय व पुर्णपणे परावलंबी बनले होते.[१] स्त्रीयांच्या अन्यायाला वाचा फोडण्याचे काम महात्मा फुले यांच्या पासून प्रिन्सिपल आगरकरांपर्यंत अनेक सुधारकांनी केले होते. स्त्रियांच्या ठिकाणी आत्मजागृतीचे सामर्थ्य यावे तसेच निर्भयता व स्वाभिमान निर्माण व्हावा म्हणून त्यांनी आपल्या संस्थानात स्त्री शिक्षणास प्रोत्साहन दिले, शिवाय तिच्या नैसर्गिक हक्काचे संरक्षण करणारे अनेक कायदे केले व तिची समाजाकडून व कुटुंबाकडून होणारी पिळवणूक थांबविण्याचे अनेक प्रयत्न केले.

२) अभ्यासाचा समाज शास्त्रीय दृष्टीकोण :

स्त्रियांच्या समाजातील स्थानाचा संबंध हा सामाजिक चळवळीशी व परिवर्तनाशी निगडीत असतो त्याची काही कारणे खालीलप्रमाणे :

१. सामाजिक व्यवस्थेत बदल घडून आणण्याचे सामर्थ्य महिलांच्या शक्ति मध्ये असते.[२]
२. सामाजिक वातावरणातील बदलामुळे परिवर्तन घडते.[३]
३. परिवर्तन हे सभोतीच्या पूरक वातावरणातून घडते. त्यासाठी महिलांना सक्रियपणे अभ्यास करणे योग्य ठरेल. समाजाच्या स्वास्थासाठी स्त्री-वर्गाच्या संरक्षणविषयक कायदेशीर मान्यता असणे ही अत्यंत अवशक बाब आहे.

३) सामाजिक संरक्षण विषयक कायदे :

१. विधवा-पुनर्विवाह कायदा :

मागासलेल्या समाजात स्वातंत्र्य होते. मात्र स्वत:ला क्षेष्ठ वर्णीय व सुसंस्कृत समजल्या जाणार्या जातीमध्ये विधवांना पुनर्विवाह करता येत नव्हता.शिवाय त्यांना केशवपण सारख्या अत्यंत क्रूर रूढीखाली दु:खी व उपेक्षित जीवन जगावे लागत होते. एखाद्याने असा पुनर्विवाह केल्यास त्यास समाज मान्यता नव्हती. तर कायद्याचीही मान्यता नव्हती. अश्या विवाहास बेकायदेशीर ठरवून त्यापासून होणारी संतती ही अनौरस समजली जात होती. राजर्षी शाहू महाराजांनी या अन्यायी रूढीस धक्का ध्यायचे ठरविले. जुलै १९१७ मध्ये त्यांनी आपल्या संस्थानात विधवांच्या पुनर्विवाहास कायदेशीर मान्यता देण्याचा कायदा मंजूर केला. या कायद्याद्वारे विवाहांच्या पुनर्विवाहाच्या बाबतीत अनेक अडचणी दूर करण्यात आल्या. एक प्रकारे स्त्री-वर्गावर होणार्या संभाव्य अन्यायाचा प्रतिकार करण्याचे साधन जनतेला उपलब्ध करून दिले गेले.

विधवा :

पुनर्विवाह हा आपदधर्म असून समाजाच्या स्वास्थ्यासाठी असे विवाह अत्यंत आवश्यक असल्याचे मत राजर्षीनी १९१९ मध्ये कानपूरच्या कुर्मी - क्षत्रीय परिषदेत व्यक्त केले होते ते म्हणाले, हा आपदधर्म आहे. मनुष्यसमाज निर्दोष राखण्याकरिता हे आहे. वेदशास्त्राचे याला पाठबळ आहे. आमच्या सरकारने विधवा विवाहाचा कायदा पास केला आहे. ज्या जातीमध्ये या आपद्धर्माचा प्रचार नाही. त्या जातीत भ्रूणहत्या, व्यभिचार इ.पापे घडत आहे व हजारो मुले प्रत्येकवर्षी मरत आहेत. ही किती दु:खाची गोष्ट आहे बरे![५] उपरोक्त कुर्मी क्षेत्रीयांच्या सभेत त्यांनी पडदा पद्धतीचा निषेध व तिसरे कोणाशीही मिळून भोजन

ISSN No. 2394-5990

न करणे. क्षत्रीय स्त्रियांनीही राज्याचा गाडा चालवलेला आहे व रणांगणावर जाऊन शत्रू बरोबर लढाया मारलेल्या आहेत हे सर्व काम पडद्यात राहून केवळ अशक्य होते. सध्याही पड्द्याची चाल सर्व देशात नाही. महाराष्ट्र, मद्रास, गुजरात, वगैरे प्रांतात पडदा बिलकुल नाही.[६] राजर्षी छत्रपती शाहू महाराज असेही म्हणतात की, पडद्यामुळे स्त्रियांमधील शूरतादी गुणाचा सर्वथा नाश होतो.[७]

२. आंतरजातीय विवाह कायदा :

कोल्हापूर संस्थांनातील हिंदू व जैन या दोन मुख्य धर्माच्या लोकांनाही 'जातीनिर्बंध न पाळता सदरहू दोहोपैकी आपआपल्या मुभा' १२ जुलै १९१९ रोजीच्या अंतरजातीय विवाह कायद्याने दिली. या कायद्याच्या एका कलमान्वये विवाहकाली पुरुषाचे वय १८ वर्ष पूर्ण व स्त्रीचे वय १४ पूर्ण असले पाहिजे. असा निर्बंध घातला गेला.[८] इंग्रज सरकारच्या समती वयाच्या कायद्याला अनुसरूनच हा कायदा राजर्षी शाहू महाराजांनी केला होता. यामुळे संस्थानात बाल विवाहाला आळा बसला व स्त्रियांना आंतरजातीय विवाह करण्यास मोकळीक मिळाली. या पार्श्वभूमीवर विवाह प्रसंगी मुलीचे वय किमान १४ असावे. असे सांगणारा राजर्षी छत्रपती शाहुंचा कायदा इंग्रजांच्या कायद्यापेक्षा आधिक पुरोगामी होता हे स्पष्ट होते. डॉ.जयसिंगराव पवार म्हणतात, या कायद्यानुसार १८ वर्ष पूर्ण झालेल्या स्त्रीला विवाहासाठी पित्याची अथवा पालकाची समती अवशक असणार नाही स्त्रीला आपला जन्माचा जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य देणारे हे मोठे वैशिष्यपूर्ण कलम होते. तसेच या कायद्याने होणार्या विवाहाची रीतसर नोंद करण्यात येणार होती. हा कायदा म्हणजे स्त्री – पुरुषांच्या सामाजिक स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारे एक क्रांतिकारक पाऊल होते. या नव्या कायद्यानुसार झालेल्या आंतरजातीय लग्नास कायदेशीर मान्यता देण्यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी एक खास 'विवाह नोंदणी अधिकारी' नियुक्त केला होता.

३. क्रूरपणाच्या वर्तनास प्रतिबंध करणारा कायदा :

अनेक कुटुंबात स्त्रियांचा नवरा व त्यांचे नातलग यांच्याकडून विविध प्रकारचे छळ होत असे. या छळाला प्रतिबंध करण्यासाठी व कोणाताही छळ न्यायदेवतेच्या नजरेतून सुटणार नाही. अशा प्रकारचा सर्व समावेशक कायदा त्यांनी २ ऑगस्ट १९१९ रोजी आपल्या संस्थानात सरकारच्या गॅझेटमध्ये प्रसिद्ध केला. या कायद्याचे महत्व असे होते की, छळ करणार्या अपराध्याना 'इंडियन पिनल कोड' मधील कलमाच्या मर्यादेत आणता येत नसे. या कायद्याची उदीष्टे व कारण स्पष्ट करणारा आपल्या सहीचा एक आदेश जारी केला. या आदेशावरून महाराजांनी कुटुंबामध्ये होणार्या स्त्रियांच्या छळाचा किती बारकाईने अभ्यास केला होता हे स्पष्ट होते.[१०]

सध्याच्या काळात स्त्रियांविरोधी कौटुंबिक हिंसाचाराचा जो कायदा आहे. त्याची बीजे राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या कायद्यात दिसून येतात. या कायद्याचे महत्व सांगताना राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी म्हटले आहे की, हिंदू शास्त्रकारांनी कुटुंबातील पुढर्यास प्रसंगविशेष हलकेसे शासन करण्याची परवानगी दिली आहे. पण या परवानगीचा दुरुपयोग करून स्त्रियांनी वाटेल अशा वाईट पद्धतीने वागण्याचा आपणास परवनाच मिळाला आहे.[११] पुरुषवर्गाकडून स्त्रियांना होणार्या अत्याचारास आळा घालावा म्हणून हा कायदा करण्यात आला. राजर्षी छत्रपती शाहू महाराज पुढे म्हणतात की, अत्यंत त्रासदायक आणि जुलमी वागणूक वरिष्ठ वर्गाच्या लोकांत घडत असली, तरी तिच्या बद्दल केव्हाही तक्रार होत नाही, त्या (स्त्रिया) चार चौघात येत नाहीत किवा आणण्याचा प्रयत्नही केला हात नाही. म्हणून अशी सर्वसाधारण कसोटी आम्ही घालून दिलेली आहे की, त्या योगाने अत्यंत सुधारलेल्या समाजातील क्रूरपणाच्या वागणुकीचे जे प्रकार आहेत. त्याचाही यात समावेश व्हावा[१२] यावरून राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी तत्कालीन समाजजीवनचा किती सूक्ष्म अभ्यास केला होता हे स्पष्ट होते. एकूण ११ कलमांच्या या कायद्यामध्ये, स्त्रीला क्रूरपणाची वागणूक देणार्य अपराध्यास ६ महिन्याचं कारावास व २०० रुपयांतपर्यंत दंड अशी शिक्षा देण्याची तरतूद केली गेली होती.

४) घटस्फोटाचा व वारसाचा कायदा :

स्त्रियांच्या हक्काचे सरक्षण कसे होईल, घटस्फोटांनंतर तिच्या अन्नवस्त्राच्या खर्चाच्या योग्य ती व्यवस्था कशी होईल. याकडे लक्ष ठेऊन कायद्याची तशी कलमे तयार केली होती. तसेच वैवाहिक संतती असेल, तर त्याच्या ताब्याबद्दलची, पोटगीबद्दलची व शिक्षणाबद्दलची व्यवस्थाही या कायद्याने लावली गेली.[१३] या कायद्यातील एक महत्वाची तरतूद अशी होती की, काही जातीमध्ये जातपंचायतीला घटस्फोटाचे अधिकार होते ते या कायद्याने काढून घेतले गेले. म्हणजे जातपंचायतीच्या लहरीवर आधारलेला, प्रसंगी स्त्रीवर अन्याय करणारा घटस्फोट अमान्य केला गेला. सर्वात महत्वाचे म्हणजे सर्व वर्गाच्या अनौरस संततींना, जनक बापाच्या मिळकतीत वारसा- हक्क दिला गेला.

या कायद्याच्या उद्देशाबाबत महाराज म्हणतात की, ज्यापेक्षा दरबारच्या प्रजाजनात अनेक जातीमध्ये काडी मोडण्या संबंधाने बरीच ढिलाई आहे. त्यामुळे समाज सर्वस्वी नीती भ्रष्ट होईल व विवाह विधी जो सुधारलेल्या समाजाचा पाया आहे. तो पाया

अजिबात नाहीसा होईल, असे दरबाराचे मत आहे. त्यापेक्षा नवरा व बायको यातील नैतिक हितसंबंध कायद्याच्या मध्यस्थीने काडी- मोड करून घेण्याची त्यास मुभा देऊन दृढतर पायावर उभारण्याचे योजिले आहे. काडी मोडने ही जातीतील पंचांच्या लहरीवर सोडण्याची पडलेली चाल बंद करण्याचे योजिले आहे. ज्यांनी काडी मोडून घेतली आहे, अशा इसमाचा विवाह कायदेशीर करण्याचे आगर कायदेशीर करून घेण्याचे, काडी मोडण्यापूर्वी जन्मलेल्या मुलांचे ताब्यासंबंधी नियम करण्याचे योजिले आहे.[१४] त्यांच्या प्रगतिशील विचारांचे चित्र या कायद्यात रेखाटले आहे. कोल्हापूर गॅझेट मध्ये १७ जानेवारी १९२० रोजी हिंदू वारसा दुरूस्ती कायदा प्रसिद्ध करण्यात आला. या कयद्याची संहिता मराठी व इंग्रजी अशा दोनही भाषेत दिलेली आहे. अशाप्रकारे राजर्षी शाहू महाराजांनी केलेला हा घटस्फोट कायदा उपयुक्त आहे.

५) देवदासी प्रथा प्रतिबंध कायदा :

तत्कालीन समाजात कनिष्ठ वर्गात देवाच्या नावावर मुली सोडण्याची अनिष्ठ प्रथा मोठ्या प्रमाणावर अस्तीत्वात होती. आजही या प्रथेचे समूळ निर्मूलन झालेले नाही. यातून देवदासींचा वर्ग निर्माण होऊन जोगतीन, मुरली, भाविण इ. प्रकारच्या पतीत स्त्रियांचा दुर्दैवी वर्ग अस्तीत्वात आलेला होता. ही प्रथा हिंदू समाजावरील कलंक होता.[१५] तो दूर करण्यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी १७ जानेवारी १९२० रोजी देवदासी प्रथा प्रतिबंध कायदा केला. या कायद्याचे महत्व सांगताना असे म्हटले आहे की, जेव्हा या मुली देवाच्या नावाने सोडली जाते. तेव्हा त्या सर्वार्थाने देवाच्या बनत. जनक घराण्याशी त्याचा काही संबंध राहत नसे. जनक आई बापाच्या मिळकतीत त्याचा काही ही वारसा हक्क राहत नसे. पण त्याचबरोबर देवाला सोडल्यामुळे संबधित देवस्थानात तिला काही परंपरा चालत आलेले विशिष्ट हक्क मिळत असे. त्यांना कायद्याच्या दृष्टीने सामाजिक दर्जाही प्राप्त होत असे. हे हक्क व दर्जा कितीही हीन प्रकारचा असला तरी त्याला समाजाची व परंपरेची मान्यता होती. राजर्षी शाहू महाराजांनी उपरोक्त कायद्याने ते हक्क व दर्जा अमान्य केला. पण त्याचबरोबर या स्त्रियांना आपल्या जनक आईबापाच्या मिळकतीत वारसाचे हक्क प्राप्त करून दिले.[१६] अशा प्रकारे राजर्षी शाहू महाराजांनी देवदासी प्रथेचा पाया उखडून टाकण्याचा प्रयत्न केला.

४) राजर्षी शाहू महाराजांच्या कायद्याचे महत्व :

राजर्षी शाहू महाराजांचे कायदे म्हणजे स्त्रियांच्या सामाजिक स्वातंत्र्याच्या संरक्षणाचे कायदे होते. स्त्रियांना मिळकतीवरून मुक्त करणे हाच उद्देश होता. कायदे केले म्हणजे स्त्रियांवरील अत्याचार थांबले असे म्हणता येणार नाही कारण आजही अशा प्रकारचे कायदे अस्तीत्वात असून ही स्त्रियांवरील अत्याचारांचे प्रकार थांबलेले नाहीत. राजर्षी शाहू महाराज हे आधुनिक महाराष्ट्रातील स्त्रीच्या स्वातंत्र्याचा हक्काचे संरक्षण करणारे कायदे करून आपल्या कारभाराची एक प्रकारे ग्वाही दिली होती.[१७] केवळ कायदा केल्याने स्त्री मुक्त झाली असे नव्हे तर राजर्षी शाहू महाराजांनी या कायद्यासाठी पोषक असे वातावरण तयार केले. त्यामुळे संस्थानात उदारमतवादी विचाराचे वारे वाहू लागले. कायद्याने स्त्रियांवरील अत्याचार थांबले नाहीत पण समाजात एक प्रकारचा धाक निर्माण होऊन लोक प्रगतशील विचाराने वागतील. एका बाजूला कायदे करून दुसर्या बाजूला सामाजिक मन साधण्याचा प्रयत्न केला.

स्त्री मुक्तिचे प्रणेते राजर्षी शाहू महाराज :

राजर्षी शाहू महाराज हे आधुनिक महाराष्ट्रातील स्त्री मुक्तिचे प्रणेते ठरतात. महात्मा ज्योतीराव फुले यांनी स्त्रियांच्या कल्याणास सुरुवात केली. राजर्षी शाहू महाराजांनी हा विचार पूर्णत्वास नेण्याचे कार्य केले. शाहू महाराजांनी आपल्या कारकीर्तीत स्त्रीच्या स्वातंत्र्याच्या हक्काचे संरक्षण करणारे कायदे करून आपल्या पुरोगामी व लोककल्याणकारी राज्य कारभाराची एकप्रकारे ग्वाहीच दिली होती.[१८] प्रश्न असा आहे कि, केवळ कायदा केल्याने स्त्री मुक्त झाली असे नव्हे, शाहू महाराजांनी या कायद्यासाठी पोषक असे वातावरण तयार केले व संस्थानात उदारमतवादी विचाराचे वारे वाहू लागले. कायद्याने स्त्रियांवरील अत्याचार थांबत नाहीत पण त्याहीपेक्षा महत्वाचे असे की, समाजात एकप्रकारचा धाक निर्माण होतो व लोक प्रगतीशील दृष्टीने वागतात. तेच शाहू महाराजांचे अंतिम उदिष्ट होते.

समारोप :

राजर्षी शाहू महाराज हे दूरदृष्टीचे समाज सुधारक होते. त्यांनी महात्मा फुले याचा विचार प्रत्यक्ष कृतीत आणला. डॉ. जयसिंग पवार म्हणतात, कुटुंबामध्ये होणार्या विविध प्रकारच्या क्रूर छळातून असाह्य स्त्रीची सुटका करावी अथवा देवदासी सारख्या अनिष्ट व रानटी प्रथेपासून तिची मुक्तता करावी हा विचार घेऊन स्वातंत्तोतर काळात बर्याच उशिरा चळवळी सुरू झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर शंभर वर्षापूर्वी या राजाने अशा स्त्रियांच्या उद्धाराचा विचार मनात आणला व त्यानुसार कृती करावी ही घटना मोठी लक्षणीय मानवी लागेल.[१९] कोल्हापूर संस्थांनातील राजर्षी शाहू छत्रपतींनी केलेल्या विविध सुधारणामध्ये स्त्रीयांच्या सुधारणांना विशेष

ISSN No. 2394-5990

महत्व आहे. कारण राजर्षी शाहू महाराजांनी सरंजामशाही समाजात कालबाह्य रूढी विरूध दुहेरी लढे दिले. हा लढा एका बाजूने स्वकीयाविरुद्ध होता तर दुसर्या बाजूने हा लढा सनातनी परंपरांच्या विरूद्ध होता. त्याने सत्यशोधक चळवळ आणि आर्य समाजाची चळवळ या दोहोतील चांगल्या गोष्टी घेतल्या आणि स्त्रियांच्या शिक्षणास उचलून धरले. एका बाजूला कायदे केले व दुसर्या बाजूला सामाजिक मन घडविण्याचा प्रयत्न केला. शाहू महाराजांच्या जीवनात अंतर्गत व बाह्य संकटाशी लढताना आधुनिक प्रगत विचारांची मूल्य जाणीव हीच खर्या अर्थाने भक्कम बैठक होती. शाहू महाराज हे लोकराजा होते आणि या लोकराजाने घेतलेले निर्णय ही समर्थ प्रशासकाचे निर्णय होते. भारतीय समाजाच्या सूक्ष्म अभ्यासातून त्यांनी काढलेली ही सूत्रे होती. त्यांच्या शैक्षणिक चळवळीत स्त्रियांच्या शिक्षणाला विशेष महत्व होते, त्यांच्या स्त्री सुधारणावर सत्यशोधक समाज व आर्य समाजाचा संस्कार होता. सामाजिक विषमतेशी लढा देताना त्यांनी केलेल्या चळवळी या नवे विचारपीठ निर्माण करणार्या होत्या. धर्मनिरपेक्ष राज्यात स्त्री व पुरुष हे समान आहेत आणि स्त्रियांचा विकास झाला तरच समाजाची सर्वांगीण प्रगती होऊ शकेल हे त्यांनी ओळखले होते. तोच त्यांच्या सामाजिक सुधारणा कार्याचा पाया होता.

संदर्भ :

१) पवार जयसिंगराव, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, २००७ पृ.११२
२) जोन्सन एम, हरी, सोसालॉजी : अ सिस्ट्यामेटिक इंट्रोडक्षण, अलाईड पब्लिशर्स प्रा.लि., नवी दिल्ली, २००७ पृ.६३३
३) कित्ता पृ.६३३
४) कित्ता पृ.६३३
५) पवार जयसिंगराव, राजर्षी शाहू छत्रपती, जीवन व कार्य, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, २०१२ पृ.९१
६) राजर्षी शाहू महाराजांची भाषणे, पृ.४८-४९
७) कित्ता पृ.४९
८) डॉ.पवार जयसिंगराव, उपरोक्त, पृ.११३
९) कित्ता पृ.११३
१०) कित्ता पृ.११४
११) डॉ.जयसिंगराव उपरोक्त पृ.९३
१२) कित्ता पृ.९३
१३) डॉ. जयसिंगराव उपरोक्त पृ.११५
१४) करवीर सांस्थान गॅझेटियर भाग ४, २ ऑगस्ट १९१९, पृ.४२-४३
१५) डॉ. जयसिंगराव उपरोक्त पृ.११५
१६) करवीर सांस्थान गॅझेट, १७ जानेवारी १९२०, पृ.३
१७) पवार जयसिंगराव, उपरोक्त पृ.१२३
१८) करविर संस्थान गॅझेट, १७ जानेवारी १९२०, पृ.११६
१९) कित्ता पृ.११६

■■■

वेदोक्तो प्रकरणात राजर्षी शाहू महाराज यांची भूमिका

प्रा.ज्ञानेश्वर बाळासाहेब पादर
सहाय्यक प्राध्यापक
कला, वाणिज्य व विज्ञान महविद्यालय,
सोनई, ता. नेवासा जि.अहमदनगर.
मो. ९९६०९५०२३६
इमेल : dnypadar@rediffmail.com

युरोपमध्ये प्रबोधनाची चळवळ सुरु झाली आणि अंधारात खितपत पडलेले युरोप आज संपूर्ण जगात झगमगताना दिसते. तशाच पद्धतीने भारतीय समाज देखील अनिष्ट रूढी, परंपरा, चालीरीती, प्रथा यात खितपत पडलेला होता. त्यात सुधारणा करण्याचे काम केले ते म्हणजे भारतीय समाज सुधारकांनी. भारतात अनेक समाज सुधारकांचा उदय झाला. आणी एक प्रकारे समाज प्रबोधनाची चळवळ सुरु करून अंधारात खितपत पडलेल्या भारतीय समाजाला प्रकाशात आणण्याचे काम त्यांनी केले. संपूर्ण भारतातील समाज सुधारकांचे काम नेत्रदीपक होते. त्यात महाराष्ट्रातील समाज सुधारक देखील आघाडीवर होते. त्यातील एक महत्वाचे नाव घेतले जाते ते म्हणजे कोल्हापूर संस्थानचे राजर्षी शाहू महाराज यांचे. त्यांनी वयाच्या २० व्या वर्षी २ एप्रिल १८९४ रोजी राज्याभिषेकानंतर राज्यकारभाराची सूत्रे हाती घेताच आपल्या पहिल्याच जाहीरनाम्यात कल्याणकारी राज्यकारभाराची ग्वाही देणारा आपला मनोदय स्पष्ट केला होता. त्यांनी भारतीय नवसमाज निर्मितीच्या कार्यासोबतच सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, प्रशासकीय, कृषी, जलनीती, अस्पृश्यता निवारण यासारख्या समाजातील वेगवेगळ्या घटकांना स्पर्श करून त्यावर योग्य असे निर्णय घेण्याचा प्रयत्न देखील केलेला पहावयास मिळतो. त्यावेळी असे निर्णय घेणे एक संस्थानाचा राजा म्हणून देखील ते शक्य नव्हते कारण प्राचीन कालखंडापासून चालत आलेल्या आणि तत्कालीन चालू असलेल्या रूढी, प्रथा आणि परंपरा. ब्राम्हणी वर्चस्व, वर्ण व्यवस्था आणि जाती व्यवस्था या बाबतीत शाहू महाराजांनी केवळ बोलघेवड्या प्रकारची भूमिका न घेता प्रत्यक्षात कृतीची भूमिका घेतलेली पाहायला मिळते. राजर्षी शाहू महाराजांनी जाती व्यवस्थेवर आधारित असलेल्या विषमते विरुद्ध त्यांनी कायदे केले आणि प्रचलित व्यवस्थेला सुरुंग लावण्याचे काम केले. हिंदू, क्षत्रिय यासारख्या शब्दांचा साधा, सरळ आणि सोपा अर्थ असून देखील ब्राम्हणांनी स्वतःच्या स्वार्थासाठी आपल्याला पाहिजे तसा त्याचा अर्थ लावून हिंदुच्या माथ्यावर वेदोक्तो आणि पुराणोक्त असे दोन वेगवेगळे विधी दोन वेगवेगळ्या वर्णासाठी लादल्याचे पहावयास मिळते.

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये राजर्षी शाहू महाराज यांना व्यक्तिगत जीवनात व सामाजिक सुधारणा चळवळीत आलेल्या ब्राम्हणी वर्चस्वाचा अभ्यास आणि घडलेल्या वेदोक्तो प्रकरणात राजर्षी शाहू महाराज यांनी घेतलेली भूमिका यांचा अभ्यास करणार आहोत.

वेदोक्तो प्रकरण हे राजर्षी शाहू महाराज यांच्या जीवनात तसेच आधुनिक महाराष्ट्राच्या सामाजिक आणि धार्मिक सुधारणा चळवळीत महत्वाचे आहे. तसे पाहता वेदोक्तो प्रकरणाचे मुळ हिंदुच्या वर्ण व्यवस्थेवर आधारित असणाऱ्या समाज रचनेत पहावयास मिळते. आर्य श्रेष्ठ आहे. अनार्य कनिष्ठ आहे. वेदपठनाचा अधिकार फक्त आर्यानाच आहे. 'वेद हे हिंदूचे सर्वश्रेष्ठ धर्मग्रंथ ते ग्रंथ मानवनिर्मित नसून ते अपौरुषेय आहे.'[१] हा समज ब्राम्हणांनी निर्माण करून ठेवला होता. वेदातील मंत्राप्रमाणे पूजा, धार्मिक विधी, धार्मिक संस्कार केले जातात त्यांना वेदोक्तो असे म्हणतात. हे वेदोक्तो मंत्र केवळ क्षत्रिय यांच्यासाठीच म्हंटले जात असे. प्रमाणबुद्री ''वैदषु साधना नामनेकता'' या वेदातील वाक्याचा अर्थ सांगताना असे म्हंटले जाते कि ''जो वेद प्रमाण मानतो तो हिंदू म्हणजेच हिंदू'' या शब्दाचा साधा सरळ अर्थ ब्राम्हणांनी आपल्याला हवा असाच लावला आहे. ब्राम्हणी वर्चस्वाला कोठे हि धक्का न लागू देण्याचा प्रयत्न येथे केला आहे. आर्याच्या म्हणण्यानुसार ब्राम्हण, क्षत्रिय, आणि वैश्य यांना वेदोक्ताचा अधिकार आहे. शूद्रांना मात्र पुराणोक्त पद्धतीने धार्मिक विधी करण्याचा अधिकार आहे. शुद्र म्हणजे अनार्य होय.

राजर्षी शाहू महाराज, बापूसाहेब घाडगे, मामासाहेब खानविलकर, राजारामशास्त्री भागवत हि लोक ऑक्टोबर १८९९ मध्ये पंचगंगा नदीवर स्नान करण्यासाठी गेले होते. धार्मिक विधी करण्यासाठी त्यांच्या सोबत नारायण भटजी देखील होते. नदीवर नारायण भटजीने वेदोक्तो मंत्र म्हणण्या ऐवजी पुराणोक्त मंत्र म्हणण्यास सुरुवात केली. हि बाब राजाराम शास्त्री भागवत यांच्या लक्षात आली. कोल्हापूर संस्थानचे राजे असून देखील

ISSN No. 2394-5990

येथे पुरोणोक्त मंत्र का हा मोठा प्रश्न सर्वानाच पडला होता. राजर्षी शाहू महाराज यांनी या सबंधी विचारणा नारायण भटजी यांच्याकडे केली. त्यांनी उत्तर दिले कि 'आपण शुद्र आहात आणि शूद्रांना फक्त पुराणोक्त मंत्र म्हणावयाचे असतात.'[२] नारायण भटजीना असे म्हणावयाचे होते कि महाराज हे क्षत्रिय नाही. 'आपण शुद्र नाहीत तर क्षत्रिय आहोत.'[३] ''मग 'क्षत्रियकुलावतंस' ही आमची बिरुदावली आहे, त्याचे काय?''[४] असे महाराज नारायण भटजींना म्हणाले त्यावर नारायण भटजी म्हणाले ''ब्राम्हण जोपर्यंत वर्ग तुम्हाला क्षत्रिय म्हणून मान्यता देत नाही तोपर्यंत तुम्ही शूद्रच आहात.''[५] म्हणजे कोण क्षत्रिय, कोण शुद्र हा ठरविण्याचा अधिकार देखील ब्राम्हणांना होता कि काय असा मोठा प्रश्न पडतो. 'जरी ब्राम्हण झाला भ्रष्ट तरी तिन्ही लोकी श्रेष्ठ' अशी भूमिका मात्र ब्राम्हणांसाठी होती. शाहू महाराजांचे कार्य श्रेष्ठ असून देखील त्यांना हे सांगावे लागले कि मी क्षत्रिय आहे आणि मी क्षत्रिय असल्यामुळे आपल्या घरातील धार्मिक विधी व संस्कार हे पुराणोक्त मंत्रा ऐवजी ते वेदोक्त मंत्रांनीच झाले पाहिजे या भूमिकेवर शाहू महाराज ही ठाम होते. यातूनच उभे राहिले ते म्हणजे वेदोक्त प्रकरण.

एका राज्याचा छत्रपतीस जर शूद्र म्हणून राहावे लागत असेल, ब्राम्हणांच्या वर्चस्वाखाली राहावे लागत असेल तर सर्व सामान्य लोकांची काय परिस्थिती असेल याची कल्पना येते. राजर्षी शाहू महाराज यांच्या घरातील धार्मिक विधी करण्याचा अधिकार आप्पासाहेब राजोपाध्ये यांचा होता. त्यासाठी त्यांना वार्षिक ३०००० रुपयांचा इनाम देखील मिळत होता. छत्रपतींच्या कडे एक प्रकारे नोकरीस असून देखील त्यांनी राजघराण्यातील धार्मिक विधी करण्यास नकार दिला कारण त्यांना राजर्षी शाहू महाराज हे क्षत्रिय आहे हे त्यांना मान्यच नव्हते. त्यामुळे राजर्षी शाहू महाराजांनी १६ मे १९०२ रोजी राजोपाध्ये यांना नोकरीवरून काढून टाकले आणि फक्त नोकरीच नाही तर त्यांना दिलेले वतन देखील जप्त करून घेतले. एक प्रकारे हा निर्णय घेऊन महाराजांनी प्रस्थापित समाज व्यवस्थेतील समाज कंटकांना धडा शिकविण्याचा पहिला निर्णय घेतलेला पहावयास मिळतो. नंतर राजोपाध्ये यांनी आपली नेमणूक रद्द करून आपले इनाम जप्त करण्याचा फेरविचार करावा अशी मागणी शाहूकडे केली. महाराजांनी ती फेटाळली. आणि ती फेटाळणे अगदी बरोबरच होते. या निर्णयावर फेरविचार करण्यासाठी राजोपाध्ये यांनी संस्थानातील प्रतिनिधी फेरीस्ता, मुंबई सरकार, आणि व्हाईसरॉय लॉर्ड कर्झनकडे तक्रार केली. परंतु सर्वानीच त्याचा अर्ज फेटाळला. अर्ज फेटाळून ब्रिटीशांनी शाहू महाराजांनी सुरु केलेल्या समाज प्रबोधनाच्या चळवळीला एकप्रकारे सहकार्यच केले. या वेदोक्तो प्रकरणात आपल्याला सहकार्य मिळावे म्हणून राजोपाध्ये यांनी महाराष्ट्रातीलच नव्हे तर कर्नाटक मधील ब्राम्हण वर्ग संघटीत करण्याचा प्रयत्न केला. मात्र त्याचा काहीही परिणाम झाला नाही. आर्य कालखंडापासून चालत आलेल्या ब्राम्हणांच्या वर्चस्वाला, त्यांच्या अधिकाराला शह देण्याचे काम शाहू महाराजांनी केलेले पहावयास मिळते. कारण या समाजव्यवस्थे मध्ये स्वतःला श्रेष्ठ समजणारा हा वर्ग सत्तेच्या, अधिकारांच्या जोरावर सर्व सामन्य अशा लोकांची लुट करीत होता. समाजामध्ये असणाऱ्या अनिष्ट, रूढी, परंपरा चालीरीती यामध्ये उच्चवर्णीयांचा हातभार मोठा होता. त्यांनीच याला खतपाणी घालण्याचे काम केले होते.या वेदोक्तो प्रकरणामुळे पुरोहितशाहीची समाज जीवनावरील पकड काहीशी कमी झालेली पहावयास मिळते. ''राजर्षी शाहू महाराज यांच्या बाबतीत घडलेल्या या प्रकरणामुळे कोल्हापूरच्या वातावरणात एक नवा उत्साह निर्माण झालेला पहावयास मिळतो. यातूनच ब्राम्हेत्तर चळवळीला मोठी चालना मिळाली. कोल्हापूरचे लोक कोठे हि गेले तरी तेथे ही ब्राम्हेत्तर चळवळीची नवे केंद्रे निर्माण करीत असे. यातूनच काही वर्षातच ब्राम्हेत्तर चळवळ निर्माण झाली असे म्हणण्यास हरकत नाही.''[६] राजर्षी शाहू महाराज यांना खर तर जाती व्यवस्था ही मुळा पासूनच नष्ट करावयाची होती. कारण जाती व्यवस्था ही समाजाला लागलेली कीड आहे. आणि ते नष्ट करणे गरजेचे ही होते. आणि तत्कालीन ब्रिटीश कायद्याच्या आधारे ते शक्य देखील होते. वेदोक्तो प्रकरणाच्या माध्यमातून प्रस्तुत समाज व्यवस्थेला तडा देण्याचे काम शाहू महराजांनी केले. मात्र त्यांना देखील अनेक ब्राम्हणी नेत्यांशी वैचारिक संघर्ष करावा लागला होता. आणि तो संघर्ष होणे देखील सहाजिकच होते. या वादात लोकमान्य टिळकांनी देखील उडी घेतली परिणामी धार्मिक आणि सामाजिक प्रश्न मधून सुरु झालेल्या या प्रश्नाला पुढे जाऊन राजकीय वळण लागल्याचे दिसून येते.लोकमान्य टिळकांनी केसरी मधून २२ ऑक्टोबर १९०१ मध्ये ''वेदोक्ताचे खूळ –१''[७] अशा आशयाचा एक अग्रलेख लिहिला. धनंजय कीर लिहितात 'टिळकांच्या वेदोक्ता वरील संकुचित अनुदार मते प्रतिपादित करणाऱ्या केसरी वृत्तपत्रा वरील लेखामुळे ब्राम्हणेतर वर्गात मोठा असंतोष निर्माण झाला होता. तसे पहिले तर आर्य काळापासूनच समाज हा वर्ण व्यवस्था नंतरच्या काळात जातीव्यवस्था यात विभागलेला होता.

वेदोक्तो प्रकरणामुळे सर्वात महत्वाची घटना घडली ती म्हणजे मराठा समाज जागा झाला. मुळातच वेदोक्त प्रकरण हे ब्राम्हण व क्षत्रिय या दोघात श्रेष्ठ कोण यासाठी चाललेला तो वाद होता. ''वेदोक्ताच्या वादात राजर्षी शाहू महाराज यांचा विजय झाला. धार्मिक विधी करण्यासाठी राजर्षी शाहू महाराज यांनी रोख वेतन स्वरूपात पंडितांची नियुक्ती केली. आप्पासाहेब

राजोपाध्ये यांच्या जागी तात्याराव जोशी यांची २५० रुपये वेतनावर नियुक्ती केली होती.''[८] नारायण भट सेवेकरी यांच्याकडून १९०१ मध्ये वेदोक्त पद्धतीने श्रवणी करून घेतली. राजर्षी शाहू महाराज एवढ्यावरच न थांबता महाराजांनी क्षात्रजगद्गुरु चे नवे पीठ निर्माण केले आणि त्यावर मराठा जातीच्या सदाशिव बेनाडीकर यांची नेमणूक केली. धार्मिक विधी करणे हा कोणा एका जातीची मक्तेदारी नाही, तो अधिकार सर्वांना आहे. ब्राम्हणांनीच नाही तर क्षत्रिय, वैश्य, शूद्र वर्णातील वेगवेगळ्या जातीतील लोकांना देखील धार्मिक विधी करण्याचा अधिकार निर्माण व्हावा, धार्मिक विधी करता यावेत यासाठी पुरोहितांची शाळा शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात सुरू केली. पुरोहितांची शाळा काढणारे कोल्हापूर संस्थान हे भारतातील पहिलेच संस्थान होते. वर्षानुवर्ष चालत आलेली ही परंपरा बदलविण्याचा आणि समाजात नवचैतन्य निर्माण करण्याचे काम महाराजांनी येथे केले. कारण ब्राम्हण सर्व-सामान्यांची कशी लूट करत होते हे आपल्याला प्रामुख्याने महात्मा ज्योतिबा फुले यांच्या वाङ्मयातून देखील येथे समजून येतो.

थोडक्यात राजर्षी शाहू महाराज यांच्या स्वतःच्या संदर्भात सुरू झालेले, स्वतःच्या क्षत्रियत्वाच्यावर निर्माण केलेल्या प्रश्नाला उत्तर शोधण्यासाठी ही चळवळ सुरू केली. मात्र एका संस्थानात निर्माण केलेल्या प्रश्नाला उत्तर शोधण्यासाठी ही चळवळ सुरु केली. मात्र एका संस्थानात निर्माण झालेला हा संघर्ष काही वर्षानंतर थांबला असे नाही. केवळ धार्मिक मुद्द्यावरच हे प्रकरण येऊन थांबले असेही नाही. या प्रकरणातून समाजातील विविध प्रश्नांवर चर्चा, विचार मंथन व्हायला सुरुवात झाली. वेदोक्त प्रकरणाचा आणि ब्राम्ह्मेत्तर चळवळीचा जवळचा संबंध होता. ''सत्यशोधक चळवळ ही धार्मिक सुधारणा चळवळ होती तर ब्राम्ह्मेत्तर चळवळ ही राजकीय चळवळ होती.''[९] असे मानले जात असले तरी समाजातील ब्राम्हण वर्चस्वाला शह देऊन समाजातील अनिष्ट प्रथावर काम ब्राम्ह्मेत्तर चळवळीने केलेले पहावयास मिळते. राजर्षी शाहू महाराज यांचा मोठा अपमान या प्रकरणांमध्ये झाला होता. त्याचा परिणाम म्हणजे विखुरलेला बहुजन समाज एक होण्यासाठी देखील हे प्रकरण महत्त्वाचे ठरलेले होते. एकंदरीत विचार केला तर असे दिसून येते की त्या काळात कोल्हापूर नगरपालिका ब्राम्हणमय असताना, पंचगंगेवर ब्राम्हणासाठी वेगळा घाट असताना म्हणजेच एवढे वर्चस्व ब्राम्हणांचे असताना वेदोक्त प्रकरणामुळे कोल्हापुरात ब्राम्हणांचे वर्चस्व कमी होऊन सर्वसामान्यांना अधिकार मिळाला. मात्र राजर्षी शाहू महाराजांनी जरी पुरोहित निर्माण करण्यासाठी पुरोहितांची शाळा काढली असली तरी आजही धार्मिक विधी पूजा-अर्चा हे ब्राम्हण वर्गच करताना दिसून येतो. सर्व समाज शिकून देखील धार्मिक विधीच्या अधिकारावर त्यांचीच मक्तेदारी पहावयास मिळते. मग आपण महाराजांचे विचार विसरलो की वेदोक्त प्रकरण हा मोठा प्रश्न पडतो.

संदर्भ ग्रंथसूची

१. गाठाळ एस.एस., आधुनिक महराष्ट्राचा इतिहास, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, पृ.क्र. ३७६
२. कित्ता पृ क्र.३७६
३. कित्ता पृ क्र.३७६
४. पवार शि. राजर्षी शाहू महाराज विचार आणि कार्य, सहयाद्री प्रकाशन पुणे,पृ क्र.४१
५. गाठाळ एस.एस., आधुनिक महराष्ट्राचा इतिहास, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, पृ.क्र. ३७६
६. लठ्ठे आ.बा. श्री छत्रपती शाहू महराज यांचे चरित्र, वरदा प्रकाशन पुणे पृ.क्र.२२०
७. पवार शि. राजर्षी शाहू महाराज विचार आणि कार्य, सहयाद्री प्रकाशन पुणे,पृ क्र.४३
८. कित्ता पृ क्र.४२
९. फडके य.दी. शाहू छत्रपती आणि लोकमान्य, श्रीविद्या प्रकाशन पृ.क्र.१९२-९३

■■■

ISSN No. 2394-5990

छत्रपती शाहू महाराज यांचे शेतकऱ्यांच्या समस्या आणि शेती सुधारणेबाबत विचार

श्री.विष्णू मनोहर गावडे
पीएच.डी संशोधक विद्यार्थी
इमेल-vmgavade111@gmail.com
मो.क्र.९९६०५६५९०१

सारांश :

भारत हा शेतकऱ्यांचा देश आहे. भारतीय अर्थव्यवस्था शेतीवर अवलंबून आहे. भारतीय विकासात कृषीविकास हा केंद्रस्थानी आहे. शाहू महाराज यांनी शेती व शेतकऱ्यांबद्दल असणारा दृष्टिकोन म. फुले यांच्या विचारानेच पुढे चालू ठेवला. शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानाची राज्यकारभाराची सुत्रे स्वीकारली. राज्यकारभार स्वीकारल्यानंतर सर्वप्रथम त्यांनी शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष भेटी घेऊन त्यांच्याशी चर्चा करुन त्यांचे म्हणणे ऐकून घेतले. त्यांच्या समस्या, अडीअडचणी समजावून घेतल्या. शेतकऱ्यांचे दु:ख व दारिद्र्य जवळून पाहिले. शेतीच्या दुरावस्थेमुळे शेतकऱ्यांचे द्रारिद्य वाढते, तसेच शेतीची उत्पादकता कमी असल्यामुळे उत्पन्न कमी होते. शेतकरी पिढ्यान पिढ्या अज्ञान, अंधश्रध्दा, सावकारी पाशा, सतत पडणारे दुष्काळ, सामाजिक मागासलेपणा, शिक्षणाचा अभाव, शेती विकासासाठी मिळणाऱ्या अपुऱ्या सुविधा, नैसर्गिक संकटे, प्रचलित प्रशासकीय धोरणे इत्यादीमुळे पुरा पिचलेला होता. या वंचित घटकांना आत्मसन्मानाची जाणीव निर्माण करुन त्यांच्या विकासाला व्यापक दिशा देऊन शेतीत मोठ्या प्रमाणात सुधारणा करण्याची गरज असुन शेतीत सुधारणा करण्यासाठी विदेशातील शेती उत्पादनाचे तंत्रे शेतकऱ्यांनी आत्मसात करावे यासाठी अनेक प्रयोग केले. सन १९०२ साली युरोपचा दौरा केला. युरोपीय प्रगत देशातील दौऱ्यामुळे तेथील देशांनी घडवून आणलेली प्रगती, आधुनिक उद्योगधंदे, शेती सुधारणा, नद्यांवर बांधलेली प्रचंड धरणे, लोकशाही जीवन पध्दती, सार्वजनिक शिस्त यामुळे ते प्रभावित झाले. त्यांच्या दौऱ्यामुळे त्यांची शेतकरी वर्गाबद्दलची सुधारणावादी दृष्टी विशाल बनली होती. त्यांनी अनेक प्रयोग राबविण्यासाठीचे नियोजन केले. सन १९०२ साली कोल्हापूर संस्थानात सार्वजनिक पाटबंधारे धोरण (Mass Irrigation Policy) जाहीर केले. त्यावर बांधकामाची सुरुवात केली. १९१२ मध्ये, कोल्हापूर येथे किंग एडवर्ड ग्रीकल्चरल इंन्स्टिट्युट ची स्थापना केली. कृषीकर्म या विषयी वैदिक काळात गैरसमज होते. ते गैरसमज दूर करुन त्यांनी इनामाचा कायदा केला. तो कायदा त्यांनी १९१३ साली केला. त्याचबरोबर ते १९१९ रोजीच्या अखिल भारतीय कुरमी क्षत्रियांच्या तेराव्या सामाजिक परिषदेचे अध्यक्ष होते. त्या परिषदेत अध्यक्षीय भाषणातून शेती सुधारणेबाबत आपले विचार संबंधित शेतकऱ्यांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन सावकार शेतकऱ्यांना लुबाडतात. यावर उपाययोजना करण्यासाठी सन १८९५ मध्ये कर्ज बाजारी शेतकऱ्यांना दरबारामार्फत कर्ज पुरवठा करण्यास प्रारंभ केला. व्हिटोरिया राणीच्या स्मरणार्थ एक निधी स्थापन करुन त्यातून सावकारांनी, शेतकऱ्यांनी शेतकऱ्यांच्या जप्त केलेल्या जमिनी सोडविण्यासाठी शेतकऱ्यांना आर्थिक पुरवठा केला. १ जून १९१९ रोजी एक वटहुकूम जारी करुन सावकारांवर अनेक निर्बंध आणले त्यानुसार उभी पिके जप्त करण्यावर बंदी आणली. शेतकरी वर्गाची दशा समाजापुढे मांडून भविष्यातील शेती व शेतकरी विकास यांची प्रगती करण्यासाठी शेतकऱ्यांच्या समस्या, उपाययोजना, शेती सुधारणेबाबत विचारांचे विवेचन प्रस्तुत शोधनिबंधाच्या माध्यमातून केले आहे.

बीज प्रश्न (Keywords) : शेती, अज्ञान, अंधश्रध्दा, द्रारिद्य, सावकारी, दैन्यावस्था, शेती विषयक कायदे, मानसिक गुलामगिरी, शिक्षण.

प्रस्तावना :

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांना शेतकरी व वंचित वर्गाबद्दल आस्था होती. सामाजिक व मानसिक गुलामगिरी बहुजन समाजातील कष्टकरी शेतकरी मजूर या घटकांचे शोषण आणि अन्याय यापासून मुक्तता करण्याबाबत व्यापक चिंतन करुन वैचारिक आणि व्यावहारिक भूमिका त्यांनी घेतलेली दिसून येते. राजषी शाहू महाराजांना आय.सी.एस. स्टुअर्ट मिटफोर्ड फ्रेझर, रघुनाथ सबनीस, आबासाहेब घाटगे यांच्या विचारांचा प्रभाव होता. त्याच बरोबर आर्यसमाज, सत्यशोधक समाज याचाही विशेष प्रभाव त्यांच्यावर दिसून येतो. प्रत्येक

माणाला त्याचे सर्व हक्क उपभोगण्याचा आणि प्रतिष्ठित सामाजिक जीवन जगण्याचा अधिकार आहे ही फुलेंची शिकवण त्यांच्यात रुजलेली होती. मानव मुक्तीच्या या प्रेरणेतून त्यांनी आपले सारे जीवन मानवी हक्काच्या चळवळीला समर्पित केले. म. फुले यांचा शेती आणि शेतकरी यासंबंधी असणारा दुष्टिकोन शाहू महाराजांनी आयुष्यभर जोपासलेला होता. आपल्या कारकिर्दीत अभिजनांच्या मानसिक गुलामगिरीतून सुटका करण्यासाठी महात्मा फुले जसे अखेरपर्यंत लढले त्याचप्रमाणे शेतकरी व बहुजनांचे द्रारिद्रय संपुष्टात यावे यासाठीही ते शेवटपर्यंत झगडत राहिले. त्यांची आर्थिक गुलामगिरीतून मुक्तता व्हावी म्हणून आपल्या संस्थानात शेती औद्योगिक विकासाचे विविध प्रकल्प राबविलेले दिसतात. शेतकरी हा अर्थव्यवस्थेचा कणा आहे. समाज आणि अर्थव्यवस्था यांच्यामधील ती कडी आहे. सबंध समाजाच्या गरजा शेतकरी भागवतात. समाजाच्या मुलभूत गरजा शेतीवरच असलंबून आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी विशेष लक्ष दिले गेले पाहिजे. असा त्यांचा अट्टाहास होता. त्यासाठी त्यांच्या अडी-अडचणी समजून घेण्यासाठी ते स्वत: शेतकऱ्यांच्या बांधावर जात होते. त्यांच्याबरोबर तेथे जाऊन शेतकऱ्याशी सुसंवाद साधण्याचे कामही करत असत. शेतकरी आणि शेती क्षेत्राची उन्नती झाल्याशिवाय व्यापक समाजहित साधता येणार नाही अशी त्यांची फुलेप्रमाणेच धारणा होती. त्यांच्या कृतीशिल विचारांचा हाच मुलभूत धागा होता. या भूमिकेतून शाहू महाराज म्हणतात शेतीचा उध्दार म्हणजेच शेतकऱ्यांचा उध्दार, पर्यायाने देशाचा उध्दार हे शाहू महाराजांचे सुत्र होते. शेती व शेतकरी यांच्या सुखाची वास्तव कल्पना शाहू महाराजांनी समाजापुढे मांडली.

जलनीती : राधानगरी धरण :

'भारतीय शेती हा पावसावर चालणारा जुगार आहे.' महाराष्ट्रातील सह्याद्रीच्या माथ्यावर पावसाचे वायपट जाणारे पाणी अडविणे आवश्यकतेचे आणि गरजेचे आहे. पाण्याची साठवण करण्याची व्यवस्था आपल्या संस्थानात असावी अशी त्यांची धारणा होती. त्यासाठी त्यांनी युरोपचा दौराही केलेला होता. युरोपातील विकसित देशांनी केलेल्या प्रगतींचा त्यांच्यावर प्रभाव पडलेला होता. त्याचाच एक भाग म्हणून उन्हाळ्यात शेतीला भरपूर पाणी मिळाले पाहिजे. त्यासाठी कालव्यांची दुरुस्ती, धरणांची निर्मिती यांवर त्यांनी भर दिला. त्यातूनच १९०९ साली राधानगरी धरण बांधण्याचे ठरविले. त्यासाठी त्यांनी अनेक अभियंत्यांशी चर्चा केली. त्यांच्याशी सुसंवाद साधला. त्यामध्ये श्रीयुक्त दलाल, गोडबोले आणि धरणाचे कार्यकारी अभियंता मिस्टर हिल या तीन वेगवेगळ्या तज्ज्ञांचा सल्ला घेतला होता. त्याचबरोबर जागतिक दर्जाचे स्थापत्य अभियंता विश्ववैरय्या यांचेही याकामी मार्गदर्शन घेतले होते. मात्र या तज्ज्ञांत एक वाक्यता नव्हती. त्यांच्या मतभेदांचा त्रास महाराजांना होत असे. या संदर्भात शाहू महाराज आपल्या मित्राला पाठविलेल्या पत्रात सांगतात. हे पाटबंधाऱ्याचे काम मला मोठे त्रासदायक झाले आहे, दोन वैद्यांचे जसे एकमत होत नाही त्याचप्रमाणे दोन इंजिनिअरांचे ही एकम होत नाही. त्यामुळे मला चिंता वाटते ! यावरुन राधानगरी धरण बांधताना प्रथमपासून येणाऱ्या अडचणींचा पाढा अधोरेखित होतो. परंतू शाहू महाराज हा प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी आग्रही होते. पहिल्या महायुध्दाच्या काळात सुध्दा हे काम त्यांनी नेटाने चाले ठेवले होते. १९१८ सालापर्यंत राधानगरी धरणाच्या बांधकामावर तिजोरीतून १४ लाख रुपये खर्च केला. धरणाचे काम ४० फुटापर्यंत पूर्ण केले. धरणाच्या बांधकामात पावसाचे पाणी दरवर्षी ६०० दशलक्ष पाण्याचा साठा साठविला गेला. या धरणाच्या पाण्यातून कोल्हापूर जिल्ह्यात हरितक्रांती घडवून आणण्याचे शाहू महाराजांचे स्वप्न होते. म्हणून ते आपल्या पत्रातून अनेकदा म्हणत होते. My life is work will have been done when I Complete this Project. (हा धरण प्रकल्प जेव्हा पूर्ण होईल तेव्हा खऱ्या अर्थाने माझे जीवित कार्य पूर्ण होईल.)

'राधानगरी धरण' बांधकामात ३००० मजूर, गवंडी व इतर कामगार अहोरात्र राबत होते. परंतु राधानगरी धरण बांधकामात दुर्देवाने अडथळे येत गेले. त्यामध्ये पहिले महायुध्द आणि साधनसामुग्रीची कमतरता यामुळे हे बांधकाम शाहू महाराजांच्या कार्यकाळात पूर्ण होऊ शकले नाही. परंतु महाराजांचे राधानगरी धरणाचे अपूर्ण राहिलेले स्वप्न राजाराम महाराजांनी सन १९५७ मध्ये जिद्दीने पूर्ण केले. राधानगरी धरणामुळेच कंगाल, कुणबी हा खऱ्या अर्थाने बळीराजा झाला. कोल्हापूर भागातील 'हरितक्रांती' हे राधानगरी धरणाचे फळ आहे. आजही कोल्हापूर जिल्ह्यातील हरितक्रांतीची 'जननी' म्हणून राधानगरी धरणाकडे पाहिले जाते. यावरुनच शाहू महाराजांची जलनीती धोरण शेतकरी वर्गासाठी अनुकरणीय असेच ठरले आहे.[१]

राधानगरी धरण याबरोबर संस्थानातील शेतीला कायमचे भरपूर पाणी मिळावे यासाठी पाणी पुरवठा योजना राबविल्या होत्या. या योजना राबविण्यासाठी तशा प्रकारची धोरणेही आखली व त्यांची अंमलबजावणी केल्याचे दिसून येते. १९०५-०६ कालावधीत ११७०० विहिरींची संख्या होती. १९२०-२१ या वर्षात १२८०० विहीरींची संख्या झाली. नव्या विहीरी

ISSN No. 2394-5990

पाडण्यासाठी शेतकऱ्यांना तगाई दिली. तसेच वडगांव, शिरोळ, रायबाग शहापूर, रुकडी या ठिकाणी असणाऱ्या २० तलावांच्या बांधकामाची दुरुस्ती केली.(२)

संस्थानमध्ये जलनीतीचे धोरण ठरविण्यात त्यांची भूमिका महत्वाची होती. संस्थानात असलेले तलाव, सरकारी व खाजगी विहीरीवर किती एकर जमीन भिजते. याचा प्रत्येक तालुक्याचा गाववार निराळा तक्ता तयार करणेचे जाहीरनामे काढून या तक्त्यांत विहीरीचे पाणी मोटारीने किती दिवस पुरते, किती एकर पिके दरसाल होतात. तलावांची माहिती गांववार देण्याचे नियोजन करावे. सदर माहिती मि. गुप्ते व रावसाहेब विचारे यांचा अभिप्राय मागवून तो आपले अभिप्रायास हुजूर पाठविण्याचे आदेश दिले.

पारंपारिक आणि मागास शेतीला आधुनिक शेतीचा पर्याय :

छ. शाहू महाराज यांना शेतकऱ्यांच्या समस्येला ज्याप्रमाणे मानवी प्रवृत्ती जबाबदार आहे तशी नैसर्गिक कारणे देखील आहेत, याची जाणीव त्यांना होती. शेतकऱ्यांच्या समस्येचे मुळ निसर्गापेक्षा सामाजिक रचनेत असल्याचे ते प्रतिपादन करतात. त्यांच्या मते, आधुनिक शेती हा या समस्यांवरील एक प्रभावी उपाय आहे. आधुनिक शेतीसाठी सिंचनाबरोबर नगदी पिकाकडे शेतकऱ्यांनी वळले पाहिजे असे शाहू महाराजांचे मत असल्यामुळे त्यांनी पन्हाळा येथे चहा, कॉफी, रबर यांचे खास मळे तयार केले. सोबतच बेळगांवी बटाटे, कापूस, ताग, रेशीम यासारखी पिके घेण्यास शेतकऱ्यांना प्रवृत्त केले. चहा उत्पादनाचा प्रयोग यशस्वी झाला. ''पन्हाळा चहा नं.४''(३) या नावाने चहा प्रसिध्द होता. पन्हाळा व भुदरगड येथे वेलदोडे आणि कोको तर भुदरगड पेट्यातील शेलाप येथे रेशीम तयार करण्याचे प्रयोग यशस्वी करुन दाखविले.

कोल्हापूर संस्थानातील शेतकऱ्यांनी युरोपीय देशाप्रमाणे आधुनिक ज्ञानाचा शेतीसाठी वापर करावा हा उदात्त हेतू त्यांचा होता. त्यासाठी आधुनिक शेतीचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी त्यांनी सन १९१२ साली 'एडवर्ड ग्रीकल्चरल इन्स्टिट्युट' ची स्थापना केली. या संस्थेलाच जोडून कोल्हापूर येथे आधुनिक शेती अवजारे म्युझिअम सुरु केले. आधुनिक शेतीची गोडी लागावी म्हणून संस्थानात 'महालक्ष्मी रथोत्सव', 'जोतीबा यात्रा' यामध्ये 'शेतकी प्रदर्शने' भरवून आधुनिक शेतीचे प्रयोग तळागाळापर्यंत पोहोचविण्याचा यशस्वी प्रयत्न केला. शेती प्रदर्शनातून शेतीची आधुनिकता, साधने, बी-बियाणे यांचे उत्कृष्ट नमुने या अभिनव उपक्रमांच्या माध्यमातून शेतीची उत्पादकता वाढविण्यासाठी त्यांची भूमिका महत्वाची ठरली.(४)

शेतकऱ्यांच्या उत्पादित मालाला योग्य बाजारपेठ व संरक्षण:

शेतकऱ्यांनी पिकविलेल्या मालाला योग्य मोबदला मिळाला पाहिजे. 'त्यांच्या हाताच्या घामाला दाम मिळाला पाहिजे' अशी त्यांची धारणा होती. परंतु त्याकाळात कोल्हापूर संस्थानात बाजारपेठेची परिस्थिती फारशी समाधानकारक नव्हती. संस्थानात प्रमुख बाजारपेठ नव्हती. संस्थानामध्ये उत्पादित होणारा माल उत्कृष्ट दर्जाचा असे. परंतु बाजारपेठ नसल्यामुळे कोकणातील राजापुरच्या बाजारपेठेत जाई व तिथून मुंबईत माल जात असे. त्यामुळे गुळ 'राजापुरी' गुळ म्हणून प्रसिध्द पावला. मात्र महाराजांना या गोष्टी न पटणाऱ्या होत्या. शाहू महाराज म्हणतात. ''गुळ कोल्हापूरचा नाव मात्र राजापुरचे'' यामुळे महाराजांनी ही परिस्थिती बदलण्यासाठी ठोस पावले उचलण्याचे ठरविले. राज्य कारभार हातात घेतल्यानंतर दुसऱ्याच वर्षी रेल्वे स्टेशन जवळील ''शाहुपुरी'' ही शेतकऱ्यांसाठी नवीन बाजारपेठ वसविली. शेजारील व्यापाऱ्यांना सवलती दिल्या. बाजारपेठेचे काम पूर्ण करुन घेतले. परिणाम असा झाला की, ''शाहूपुरी'' बाजारपेठेचे व्यवहार वाढले. सन १९०२ साली बाजारपेठेची भरभराट पाहावयास मिळाली. खुद्द महाराज आपल्या एका पत्रात म्हणतात की, ''शाहूपुरी'' या बाजारपेठेतून दरवर्षी ५० लाखांचा गुळ व २० लाखांचा भुईमुग निर्यात झाल्याची माहिती दिली आहे.(५) आजही सर्व देशात कोल्हापूर ही गुळाची सर्वात मोठी बाजारपेठ मानली जाते.

त्याचबरोबर शाहू महाराजांनी आपल्या वडिलांच्या नावाने १९१७ साली शिरोळ रेल्वे स्टेशनजवळ शेतकऱ्यांच्या उत्पादित मालासाठी नविन बाजारपेठ स्थापन केली. या नवीन बाजारपेठेला जयसिंगपूर असे नाव दिले. आजही जयसिंगपूरची ओळख आपल्या महाराष्ट्राला होते. त्यामध्ये शाहू महाराजांची शेतकऱ्यांबद्दल असणारी उदात्त दुरदृष्टी नजरेस पडते.

सार्वत्रिक पाटबंधारे धोरण (Mass Irrigation Policy):

छ. शाहू महाराज हे सुधारणावादी होते. त्यांचे विचार हे दुरदृष्टीकडे व कल्याणकारी होते. त्यातून त्यांची शेती सुधारणाविषयांची वैचारिक बैठक अभिनव अशा प्रकारचीच होती. भारतातील अन्य भागाप्रमाणे कोल्हापूरातील बहुसंख्य जनता ही शेतकरीच होते. त्याकाळी हा शेतकरी अज्ञान, अंधश्रध्दा, द्रारिद्रय यांच्या गर्तेत खितपत पडलेला होता. अज्ञानामुळे सामाजिक मागासलेपण तर द्रारिद्र्यामुळे भौतिक मागासलेपण प्राप्त झालेले असे विदारक चित्र होते. अशा स्थितीत रयत दुष्काळाचा सामना करीत असताना शाहू महाराजांना खुप वाईट वाटत असे. दुष्काळावर कायमस्वरुपी मात करण्याची

मुलभूत उपाययोजना करण्याचे त्यांनी मनोमनी ठरविले. त्याचाच भाग म्हणून सन १९०२ साली ''सार्वत्रिक पाटंबंधारे धोरण'' (Mass Irrigation Policy)[६] जाहीर केले. त्यासाठी त्यांनी स्वतंत्र पाटबंधारे खाते निर्माण केले. त्यावर 'इरिगेशन ऑफिसर' ची नेमणूक करण्यात आली. याचा फायदा असा झाला की, खात्यामार्फत प्रत्येक गावची पाटबंधाऱ्याच्या दृष्टीने माहिती तपशीलवार मिळाली. पाटबंधारे खात्यामार्फत नव्या जुन्या विहीर, छोटे-मोठे तलाव, लहान मोठे बंधारे या सर्वांची नोंद घेऊन भविष्यकाळासाठी दुरुस्तीची कामे हाती घेतली गेली. त्यातुनच पावसाचा पडणाऱ्या प्रत्येक थेंब अडविण्याचा प्रयत्न सुरु केला गेला. त्यामुळे शेतकऱ्यांसाठी, राज्यकर्त्यांसाठी, प्रशासनासाठी उपयुक्त ठरत आहे. यावरुनच शाहू महाराजांचे सार्वत्रिक पाटबंधारे धोरण आजही राबविले जाताना दिसते.

कृषीकर्माबाबत आग्रही भूमिका :

कृषीकर्माबाबतीत ते परिवर्तनवादी होते. त्याबाबत त्यांचा दृष्टिकोन विशाल असाच होता. कृषीकर्माविषयीचे जे गैरसमज पसरले होते. त्याबद्दल त्यांनी शेतकऱ्यांमध्ये जाणीव जागृती केली. अज्ञान, अंधश्रध्दा नाहीशी करण्यासाठी जनजागृतीचे व्रत स्वीकारले. कृषीकर्मामध्ये पिकांची लागवड, तपासणी आणि कापणी या गोष्टीचा अंतर्भाव होतो. शाहू महाराज यांनी शेतीकर्माबाबत आपली भूमिका मांडली. १९ एप्रिल १९१९ उत्तर प्रदेशातील कानपूर येथे आखिल भारतीय कुरमी क्षत्रियांच्या तेराव्या सामाजिक परिषदेचे ते अध्यक्ष होते. अध्यक्षीय भाषणात कृषीकर्माबाबत उद्देशुन ते म्हणतात की, ''कृषीकर्म इतके पवित्र आहे की, वैदिक काळात वर्षातून एकदा चक्रवती राजा व त्यांचे मंत्री हे कृषीकर्माची उन्नती करण्यासाठी नांगर हाकीत असत. ज्याच्या योगाने भूमीमध्ये एक दाणा टाकून हजारो दाणे मिळतात व ज्या कृषीकर्मावर सारी मनुष्यजात उपजिविका करते ते कर्म हलके किंवा वाईट असे मी मुळीच मानत नाही. कृषीकर्मापासून दुहेरी सुख मिळते. कृषीकर्माचा संबंध पशुपालन व रक्षण यांच्याशीही येतो. याकरीता पशुपालनासंबंधीही पुष्कळ काम करावयाचे आहे. दुध, तुप वगैरेची समृध्दी देशामध्ये झाली पाहिजे.''[७]

अविभाज्य इनामाचा कायदा :

कोल्हापूर संस्थानात शेती हाच प्रमुख व्यवसाय होता. त्यावेळी या संस्थानाची लोकसंख्या आठ ते नऊ लाख एवढी होती. उदरनिर्वाहाचे साधन शेतीच होते. त्यामुळे शेतीचे छोटे-छोटे तुकडे पाडले जात होते. त्यामुळे उत्पादन कमी निघत असे. शाहू महाराजांच्या मते ''शेतीचे विभाजन, लोकसंख्यावाढ यामुळे शेतीचे तुकडे झालेले होते. तुकड्यांची व्यवस्था बदलून त्याचे रुपांतर मोठ्या शेतीमध्ये व्हावे म्हणजे शेती व्यवसाय किफायतशीर होईल.''

कोल्हापूर संस्थानात माणगांव येथे एकशे तीन वर्षांपुर्वी २१ व २२ मार्च १८२० रोजी भरलेली होती. या परिषदेमध्ये भाषण करताना शाहू महाराज म्हणतात तुम्ही साधारण माणसी दहा एकर जमीन वाट्याला येईल असे तुमच्या मालकीचे (महारवतन जमिनीचे) तुकडे करा हे उत्पन्न तुमच्यातील वडील असणाऱ्या व्यक्तीकडे चालवायला द्या. म्हणजेच सर्वांना अर्धपोटी रहावे लागते ते वाचेल ''यासाठी त्यांनी तुकडेबंदी कायदा केला. १९१३ ला या कायद्याला त्यांनी अविभाज्य इनामाचा कायदा'' असे सुचित केले. त्यानुसार इनाम अथवा वतनी जमिनीची वाटणी करता येणार नाही असे त्यांनी कायदे करुन त्याची अंमलबजावणी केली. तेव्हापासून तो कायदा 'तुकडेबंदी' कायदा म्हणून आजही प्रचलित आहे. यामागे महाराजांची दुरदृष्टी विशाल होती याची प्रचिती येते.[८]

शाहू महाराजांचे शेती विषयक कार्य लक्षात घेतले तर असे दिसून येते की, त्यांनी शेतकरी व शेती विषयक महात्मा फुले यांच्या विचारांचा वारसा पुढे चालविला होता. शाहू महाराजांनी मिळविलेला राज्याधिकार त्यांनी शेतकरी वर्गाच्या उध्दारासाठी केला. संस्थानातील सर्व इनामे एकत्र केली होती. त्यांचे कर्जे पहाता त्यांना शेती व शेतकऱ्याप्रती प्रचंड जिव्हाळा होता. यासाठी त्यांनी कोल्हापूर परिसरात शेती विकास करण्यासाठी निर्धारपुर्वक व योजनाबध्द पध्दतीचे कार्य करुन या परिसरात खऱ्या अर्थाने हरितक्रांती विकसित केली. यामागे त्यांची महत्वाची भूमिका होती. कायम दुष्काळावर मात करण्यासाठी कायम स्वरुपी शेती व शेतकऱ्यांसाठी उपाययोजना करण्याकामी आराखडा आखुन अतिशय नियोजन पध्दतीचे कार्य त्यांनी सुरु केले. यासाठी शेतकऱ्यांना एकत्रित करुन मार्गदर्शन केले. प्रसंगी शेतकऱ्याच्या बांधावर जाऊन त्यांच्या समस्या जाणुन घेतल्या. शेतीसाठी त्यांनी कायम पाणी पुरवठा योजना, धरणे, तलाव बांधले नविन विहीरीसाठी आर्थिक मदतीचा हात दिला. दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता स्वतंत्र पाणीपुरवठा धोरण जाहीर केले. त्याचबरोबर जलनीती धोरणाच्या माध्यमातून धरणाचे बांधकाम, तलावांची दुरुस्ती, नविन विहीर खोदाईसाठी अर्थसहाय्य, इनामी अविभाज्य कायदा, महारवतन, पारंपारीक शेतीला आधुनिक शेतीचा पर्याय, कृषी औद्योगिक विकास धोरण शेती मालाला नविन बाजारपेठ, कृषी व्यवसायाशी संलग्न असणाऱ्या कृषी संस्थांची स्थापना केली. त्याचाच भाग म्हणून १९१२ मध्ये कोल्हापूर येथे किंग एडवर्ड ग्रीकल्चर इन्स्टिट्युटची स्थापना केली. शाहू महाराजांनी शेती विषयक केलेल्या प्रकल्पांच्या अंमलबजावणीतून शेतकी वर्गाविषयी विधायक दुरदृष्टी लक्षात

ISSN No. 2394-5990

येते. याचाच परिणाम म्हणून आजही महाराष्ट्रात कोल्हापूर जिल्हा शेती, औद्योगिक, सहकार व शिक्षण याबाबत अग्रेसर असल्याचे दिसून येते.

शेती आणि शेतकरी विकास याबाबत समन्वय साधून सुत्रबध्द तर्कसंगत आणि वैचारीक मांडणी करुन व्यापक अशी समाज सुधारणेची चळवळ शाहू महाराजांनी सुरु केली. त्यांचा हा वैचारीक आणि कृतीशिल वारसा आधुनिक पिढीला मार्गदर्शक स्वरुपाचा आहे.

संदर्भ सूची :

१. रमेश जाधव लोकराजा शाहू छत्रपती, गुलाबराव मारुतीराव कारले, सुरेश एजन्सी, शुक्रवार पेठ पुणे पृ. ३१५.

२. रमेश जाधव लोकराजा शाहू छत्रपती, गुलाबराव मारुतीराव कारले, सुरेश एजन्सी, शुक्रवार पेठ पुणे पृ. ३१२.

३. डॉ.जयसिंग पवार राजश्री शाहू छत्रपती, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, १०८, साने गुरुजी वसाहत, राधानगरी रोड, कोल्हापूर पृ. २०४

४. रमेश जाधव लोकराजा शाहू छत्रपती, गुलाबराव मारुतीराव कारले, सुरेश एजन्सी, शुक्रवार पेठ पुणे पृ. ३०८.

५. डॉ.जयसिंग पवार राजश्री शाहू छत्रपती, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, १०८, साने गुरुजी वसाहत, राधानगरी रोड, कोल्हापूर पृ. २०४

६. डॉ.जयसिंग पवार राजश्री शाहू छत्रपती, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, १०८, साने गुरुजी वसाहत, राधानगरी रोड, कोल्हापूर पृ. २०१

७. रमेश जाधव लोकराजा शाहू छत्रपती, गुलाबराव मारुतीराव कारले, सुरेश एजन्सी, शुक्रवार पेठ पुणे पृ. ३०६.

८. रमेश जाधव लोकराजा शाहू छत्रपती, गुलाबराव मारुतीराव कारले, सुरेश एजन्सी, शुक्रवार पेठ पुणे पृ. ३०६.

■■■

राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य

प्रा.रविंद्र गोविंदराव पाटील
सहाय्यक प्राध्यापक,इतिहास
शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय,औरंगाबाद
E-mail: ravindrapatil2211@gmail.com
Mob.9923342211

प्रस्तावना :

एकोणिसावे व विसावे शतक भारतातील इतिहासाच्या संदर्भात राजकीय,सामाजिक, धार्मिक, आणि शैक्षणिक सुधारणांचे शतक म्हणून ओळखले जाते. याच शतकात सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक सुधारणा घडवून आणण्याचे कार्य तत्कालीन समाज सुधारकांनी केले होते. बहुजन, मागास, अस्पृश्य दीनदुबळ्या समाजाच्या शिक्षणासाठी महात्मा ज्योतिबा फुले यांनी आपल्या कार्याने मुहूर्तमेढ रोवली..पुढे त्यांचेच कार्य पुढे नेत, त्यांचे अनुयायी असलेले छत्रपती शाहू महाराजांनी बहुजनांच्या, अस्पृश्यांच्या, मागास जातीतील मुलांसाठी, त्यांच्या शैक्षणिक विकासासाठी, समाजात शैक्षणिक प्रचार व प्रसार करण्यासाठी शैक्षणिक चळवळ उभी केली होती. राजर्षी शाहू महाराजांनी अनेक शैक्षणिक संस्थेबरोबरच प्रत्येक समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षण घेता यावे याकरिता अनेक वस्तीगृहाची स्थापना केली होती. बहुजन वर्गाला मोफत शिक्षण मिळावे याकरिता शैक्षणिक चळवळ उभी करून त्या चळवळी व्दारे समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा दारिद्रता दूर सारण्याचा प्रयत्न केला होता. शिक्षणाची वाटचाल, ही जन कल्याणाची आहे, मात्र ती दीर्घ काळाची असून ती सोपी नाही,या दूरदृष्टीने राजश्री शाहू महाराजांनी वाटचाल केली होती. शिक्षण द्यावयाचे ते केवळ शिक्षणासाठी म्हणून नाही तर सामाजिक, धार्मिक, आर्थिक विषमतेच्या दारिद्र्याच्या व अज्ञानाच्या सर्वकष संघर्षातील ते एक प्रबळ प्रखर आणि प्रभावी शस्त्र म्हणून दिले जावे ही दृष्टी राजश्री शाहू महाराजांची होती. त्यांनी ही दृष्टी जनमानसात व समाजात खोलवर चेतविली, संवर्धिली आणि रुजवली होती.

छत्रपती शाहू महाराज यांच्या शैक्षणिक कार्याचा आढावा या संशोधन लेखात घेण्यात आला आहे.

उद्दिष्टे :

०१. राजर्षी शाहू महाराजांच्या शैक्षणिक कार्याचा अभ्यास करणे

०२. राजर्षी शाहू महाराजांच्या शैक्षणिक विचारामागील पार्श्वभूमी अभ्यासने

०३ .राजश्री शाहू महाराजांनी सुरू केलेल्या शैक्षणिक चळवळीचा अभ्यास करणे

शैक्षणिक कार्य :

एकोणिसाव्या शतकामध्ये बहुजन समाज हा दारिद्रता व अज्ञानात खितपत पडलेला होता आणि त्याचे कारण म्हणजे हा समाज शिक्षणापासून वंचित राहिलेला होता. अशिक्षितपणामुळे व अविद्येने या समाजाची किती नुकसान झाले होते, किती अनर्थ झाला होता. याची जाणीव महात्मा ज्योतिबा फुले यांनी समाजाला करून दिली होती. महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रमाणे राजश्री शाहू महाराज यांनी सुद्धा त्यांच्या काळात आपल्या राज्यात शिक्षणाची ज्योत तेवत ठेवली होती.

शिक्षणाचा प्रवाह सर्व समाजापर्यंत पोहोचला पाहिजे, त्यामुळे सर्व समाजाच्या प्रगतीची दारी खुली होतील. सर्वसाधारण समाजात शिक्षण नाही म्हणून मागासलेपण आहे. मागासलेपणा दूर करावयाचा असेल तर शिक्षण सर्वसामान्य माणसापर्यंत समाजापर्यंत पोहोचले पाहिजे. परंतु शिक्षण पोहोचविणे एवढेच कार्य नव्हे, तर सर्व साधारण व्यक्तीच्या मनात शिक्षणाविषयी आस्था निर्माण करणे, त्यांच्यात शिक्षणाविषयी आवड निर्माण करणे, तसेच शिक्षणाचे महत्व पटवून देणे या बाबी राजर्षी शाहू महाराजांना अभिप्रेत होत्या. राजश्री शाहू महाराजांच्या शिक्षण विषयक चळवळीचा भाग फक्त शिक्षण देणे किंवा शिक्षण घेतलेल्या व्यक्तींना स्वतः ला सुशिक्षित म्हणून घ्यायला संधी मिळवून देणे एवढाच नव्हता, तर जो माणूस, जो समाज, दारिद्र्य, अंधश्रद्धा, अज्ञान या गोष्टीने ग्रासलेला होता. त्या सर्वसाधारण माणसाला समाजाला परिवर्तनाकडे व वळविने, त्यांना अज्ञानातून दारिद्र्यातून अंधश्रद्धेतून मुक्ती मिळवून देण्याची राजश्री शाहू महाराजांची शैक्षणिक चळवळ होती.

राजर्षी शाहू महाराजांची शिक्षण विषयक चळवळ ही तीन पायांवर उभी होती.

०१. शिक्षण विषयक सोयी सवलती, शिक्षण संस्थांची निर्मिती, शिक्षण संस्थांना मदत, शिक्षण विषयक निराळ्या

ISSN No. 2394-5990

उपक्रमाचे संयोजन या विविध बाबीद्वारे शिक्षणाचा प्रचार – प्रसार करणे.

०२. विविध जाती जमातीसाठी विद्यार्थी वस्तीगृहाची सोय करून शिक्षणाच्या प्राप्तीचे मार्ग सुकर करणे, वस्तीग्रहयुक्त शिक्षणाला उत्तेजन देऊन जातीभेद नष्ट करणे.

०३. सामान्य माणसाच्या मनामध्ये शिक्षण विषयक अभूतपूर्व लालसा निर्माण करून, त्याच्यातील मागासलेपण दूर करणे.

शिक्षण हे माणसाच्या व समाजाच्या उन्नतीचा मार्ग आहे. सर्वसाधारण माणसांना व समाजाला शिक्षित करून त्याची प्रगती घडून आणने. तसेच समाजामध्ये असलेला उच्च नीचपणा, जातीभेद दूर करण्यासाठी शिक्षण महत्त्वाचे आहे. त्यामुळे सर्वसामान्यांना शिक्षणाची व्दारे खुली व्हावी हा उद्देश शाहू महाराजांच्या शिक्षण विषयक चळवळीचा होता. शिक्षणामुळे समाजातील अज्ञान, दारिद्र्य दूर होते व समाजाच्या प्रगतीची व्दारे खुली होतात. समाजाला प्रगतीच्या दिशेने घेऊन जायचे असेल, तर सर्व समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षण मिळाले पाहिजे असे राजर्षी शाहू महाराजांना वाटत होते.

राजर्षी शाहू महाराज शिक्षणाची महती सांगताना म्हणतात, शिक्षण हाच आमचा तरणोपाय आहे. अज्ञानात बुडून गेलेल्या देशात उत्तम मुत्सद्दी व लढवय्यें वीर कधीही निपजनार नाहीत, म्हणूनच सक्तीच्या व मोफत शिक्षणाची हिंदुस्थानाला अत्यंत आवश्यकता आहे. याबाबतीत आमचा गतकाल म्हटला म्हणजे इतिहासातील एक अंधारी रात्र आहे. फक्त एकाच जातीने विद्येचा मक्ता घेतला आहे. मागासवर्गामध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी त्यांना खितपत पडलेल्या दारिद्र्यातून बाहेर काढण्यासाठी, त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे गरजेचे आहे. मागासलेल्या वर्गाचे मानसिक गुलामगिरी नाहीशी करण्यासाठी त्या वर्गाला शिक्षण दिले गेले पाहिजे. असे शाहू महाराजांना वाटत होते. नाशिक येथील भाषणात राजश्री शाहू महाराजांनी उद्गार काढले होते की, खालच्या वर्गाचा लोकांच्या बुद्धीवर व ज्ञानावर हे जे जड व जुलमी जू लादले गेले आहे, ते जुगारून देण्याची शक्ती बहुजन समाजाच्या अंगी येण्यासाठी, सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाची फार जरुरी आहे. समाजाची प्रगती होण्यासाठी, समाज समृद्ध बनविण्यासाठी, बहुजन समाजातून शिक्षक, व्यापारी, सैनिक, उत्तम शेतकरी नावलौकिकास आले पाहिजे, त्याकरिता बहुजन वर्गामध्ये शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार करणे गरजेचे आहे, असे राजश्री शाहू महाराजांना वाटत होते. प्राथमिक शिक्षण सर्वसामान्य मिळाले पाहिजे त्याकरिता त्यांनी प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केले होते. त्यासाठी एक शिक्षण तज्ञाची समिती तयार करण्यात आली होती. मोफत व सक्तीच्या शिक्षणासाठी येणारा खर्च म्हणून राजश्री शाहू महाराजांनी एक लाख रुपये जाहीर केले होते.

राजर्षी शाहू महाराज यांनी २४ जुलै १९१७रोजी सक्तीच्या शिक्षणाचा कायदा केला आणि त्याची अंमलबजावणी अवघ्या ५९ दिवसात म्हणजे दिनांक– २१ सप्टेंबर १९१७ रोजी पासून करण्यास सुरवात देखील केली होती. छत्रपती शाहू महाराजांनी सक्तीच्या शिक्षणाचा जाहीरनामा प्रसिद्ध करून सर्वांना प्राथमिक शिक्षण मिळावे या दृष्टीने उपाय योजना आखल्या होत्या. एवढेच नव्हे तर सक्तीच्या शिक्षणाच्या कायद्याची अंमलबजावणी योग्य रीतीने व्हावी याची दक्षता घेतली होती. त्याची अंमलबजावणी कसोशीने त्यांनी करवून देखील घेतली होती. ज्या गावाची लोकसंख्या ५०० ते १००० असेल अशा गावांमध्ये प्राथमिक शाळा सुरू करण्यात आल्या होत्या. गावातील धर्मशाळा, चावडी, मंदिरे यामध्ये शाळा सुरु करण्यात आल्या तर, काही ठिकाणी प्राथमिक शाळेच्या नवीन इमारती उभारण्यात आल्या होत्या. वर्षभरात संपूर्ण संस्थानातील खेड्यापाड्यात अशा ९६ शाळा सुरू झाल्या होत्या. प्राथमिक व मोफत सक्तीच्या कायद्यामुळे नवीन शाळांची संख्या वाढणार होती. तसेच त्या शाळेवर शिकविण्यासाठी शिक्षकांची संख्या सुद्धा वाढणार होती. या कारणामुळे शाळेत शिकविणाऱ्या शिक्षकाची निवड काही कसोट्यानुसार केली जात होती. कारण ज्यांनी उत्तम नागरिक निर्माण करावयाचा, ज्यांच्या ज्ञानातून नवीन पिढी घडणार होती, तो शिक्षक अर्धा कच्चा असून कसा चालेल या त्यांच्या दूरदृष्टीमुळे शाळेतील शिक्षकाची नेमणूक ही कसोट्यानुसार केली जात होती. त्यासाठी पद्धती ठरलेली होती शिक्षक म्हणून परीक्षेला सामोरे जाऊ परीक्षा पास करूनच शाळेत शिक्षक म्हणून नेमणूक केली जात होती. यामधूनच राजश्री शाहू महाराजांची निखळ विवेकी शैक्षणिक दूरदृष्टी दिसून येते.

शाळेमध्ये शिक्षण देणाऱ्या शिक्षकांना प्रशिक्षणाची आवश्यकता असेल या जाणिवेतून शाहू महाराजांनी शिक्षक प्रशिक्षण केंद्र सुरू केले होते. या शिक्षक प्रशिक्षण केंद्रातून शिक्षकांना सहा महिन्याचे प्रशिक्षण दिले जात होते. याशिवाय या प्रशिक्षण केंद्राद्वारे दरवर्षी वीस शिक्षकांना प्रशिक्षण दिले गेले पाहिजे, अशी योजना तत्कालीन काळात शाहू महाराजांनी केली होती. राजर्षी शाहू महाराजांनी लष्करी शिक्षणावर सुद्धा भर दिलेला दिसून येतो. लष्करी शिक्षण देण्याच्या हेतूने त्यांनी 'इन्फंट्री स्कूलची' निर्मिती केली होती. राजर्षी शाहू महाराजांनी बहुजन वर्गातील अनेक विद्यार्थ्यांना शिक्षणाचा लाभ मिळावा, प्राथमिक, माध्यमिक व उच्च शिक्षणाची सोय व्हावी म्हणून अनेक सवलती प्राप्त करून दिल्या होत्या. त्याचबरोबर बहुजन

समाजातील अनेक तरुणांना उच्च शिक्षण घेण्यासाठी, परदेशात जाऊन उच्च शिक्षण घेण्यासाठी आर्थिक सहाय्य देखील केले होते. त्याकरिता शिष्यवृत्ती देखील दिल्या होत्या. मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाच्या अंमलबजावणीसाठी राजर्षी शाहू महाराजांनी वरिष्ठ अधिकारी म्हणून 'डायरेक्टर व एज्युकेशनल इन्स्पेक्टर' अशी पदे निर्माण केली होती.

सर्वांना प्राथमिक शिक्षण मिळावे हाच उद्देश शाहू महाराजांचा होता. त्यासाठी एक विशेष स्वतंत्र खात्याची निर्मिती त्यांनी केली होती. ज्यावर्षी मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची योजना कार्यान्वित झाली होती त्याच वर्षी फक्त २७ शाळा व १२९६ मुले शिक्षण घेत होती. परंतु पुढील पाच वर्षात यामध्ये वाढ होऊन शाळांची संख्या ४२० आणि मुलांची संख्या २२००७ एवढी झाली होती. हे शाहू महाराज यांनी केलेल्या मोफत शिक्षणाच्या कायद्याचे तसेच त्यांनी हाती घेतलेल्या चळवळीचे फलित होते. प्राथमिक, माध्यमिक शाळेमध्ये तसेच महाविद्यालय स्तरावर शिक्षण घेत असलेल्या अस्पृश्य मुलांना, इतर मुलांसारखीच समानतेची वागणूक द्यावी म्हणून शिक्षण खात्याला त्यांनी आज्ञा केली होती. राजर्षी शाहू महाराजांनी प्राथमिक माध्यमिक आणि महाविद्यालय या तीन शिक्षण स्तरांपैकी, प्राथमिक व माध्यमिक स्तरावरील शिक्षणाकडे विशेष लक्ष दिले होते. महाविद्यालयीन शिक्षण पुढील टप्पा आहे. या टप्प्यातील शिक्षण घ्यावयाचे असल्यास प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाचा पाया मजबूत असणे गरजेचे असते. जर प्राथमिक शिक्षणाचा पाया मजबूत नसेल तर पुढील शिक्षणाचा डोलारा कमजोर होतो, म्हणून तत्कालीन काळात राजश्री शाहू महाराजांनी जनतेच्या शिक्षणाची गरज ओळखून प्राथमिक शिक्षणावर भर तर दिलाच परंतु पुढे महाविद्यालय स्तरावरील शिक्षणाकडे सुद्धा त्यांनी लक्ष पुरविले होते.

स्त्रीशिक्षण :

छत्रपती शाहू महाराजांच्या परिवर्तनवादी विचारांच्या संकल्पनेत सामाजिक समानतेची दृष्टी देखील होती. सामाजिक सुधारणेच्या बरोबरच त्यांनी शैक्षणिक कार्याला अत्यंत महत्त्व दिले होते. त्यामधे त्यांनी स्त्री शिक्षणाचे कार्य सुद्धा त्यांनी हाती घेतले होते. स्त्रियांना शिक्षण मिळावे यासाठी त्यांनी पुढाकार घेतला होता. राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात मुलींच्या शिक्षणासाठी विशेष व्यवस्था केली होती. मुलींच्या शिक्षणासाठी स्वतंत्र शाळा स्थापन करण्यात आल्या होत्या. एवढेच नव्हे तर मागास भागातील मुलींना सुद्धा शिक्षण घेता आले पाहिजे, या दृष्टिकोनातून मागास भागात मुलींच्या शाळा स्थापन करण्यात आल्या होत्या. मुलींच्या शिक्षणाबरोबरच प्रौढ स्त्रियांच्या शिक्षणाकडे देखील त्यांनी लक्ष दिले होते. प्रौढ स्त्रियांना शिक्षित करण्यासाठी तसेच मागास वर्गातील ज्या स्त्रियां शिक्षण घेण्यासाठी इच्छुक होत्या अशा स्त्रियांना शिक्षण देण्यासाठी इस १९१९ साली एक खास 'हुकूम गॅजेट' त्यांनी काढला होता. त्यामुळे शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या स्त्रियांना त्यांच्या राहण्याची जेवणाची सोय ही केली गेली होती. राजर्षी शाहू महाराजांनी मुलींना उच्च शिक्षण घेता यावे याकरिता शिष्यवृत्ती देखील सुरू केली होती. मुलींनी उच्च शिक्षण घेता यावे यासाठी मुलींना मोफत शिक्षण दिले गेले होते.याचे कृतियुक्त उदाहरण म्हणजे कोल्हापूर येथील राजाराम कॉलेजमध्ये शिक्षण घेत असलेल्या सर्व मुलींना मोफत शिक्षण दिले गेले होते. राजश्री शाहू महाराजांनी संस्थानांमध्ये मुलींच्या तसेच स्त्रियांच्या शिक्षणासाठी एक महिला शिक्षण अधिकाऱ्याचे पद देखील निर्माण केली होते. त्यामुळे स्त्रीशिक्षणाच्या कार्यास गती प्राप्त झाली होती.

वसतीगृहाची स्थापना :

भारतातील विद्यार्थी वस्तीगृहाचे आद्य जनक म्हणून राजश्री शाहू महाराजांकडे पाहिले जाते. राजर्षी शाहू महाराजांना कोल्हापूर म्हणजे विद्यार्थी वस्तीगृहाची माता असे म्हणण्यात सार्थ अभिमान वाटत असे. अनेक खेड्यापाड्यातील विद्यार्थी कोल्हापूर या शहरांमध्ये शिक्षण घेण्यासाठी येत असत, परंतु अशा विद्यार्थ्यांना शहरात वस्तीगृह नसतील तर अनेक विद्यार्थ्यांना शिक्षणाची आवड असून सुद्धा शिक्षण घेता येणार नाही असे राजर्षी शाहू महाराजांना वाटत होते. १५ एप्रिल १९२० रोजी नाशिक येथे उदाजी मराठा वस्तीगृहाची कोनशीला बसविताना त्यांनी सांगितले होते की, ब्रिटिश पार्लमेंटला, 'मदर ऑफ पार्लमेंट' असे मोठ्या अभिमानाने इंग्रज व इतर लोक म्हणतात. त्याप्रमाणे कोल्हापुरास मदर ऑफ होस्टेल म्हणजेच विद्यार्थी वस्तीगृहाची माता असे सार्थ नाव मिळाले आहे. त्या ठिकाणी अनेक जाती-धर्माच्या विद्यार्थ्यांसाठी वस्तीगृहे आहेत. मराठा, जैन, लिंगायत, सारस्वत, मुसलमान, पांचाळ,दैवज्ञ, शिंपी, कायस्थ प्रभू इत्यादी. एवढेच नव्हे तर अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या समाजातील मुलांच्या करिता सुद्धा संस्था तसेच वस्तीगृहे काढून अस्पृश्यता दूर करण्यासाठी कोल्हापूरच्या लोकांनी पुढाकार घेतला असे उद्गार राजश्री शाहू महाराजांनी १९२० झाली जाहीरपणे काढले होते.

ग्रामीण भागातील तसेच बहुजन समाजातील विद्यार्थ्यांचे दारिद्र्य त्यांच्या शिक्षणाच्या आड येते, तर काही विद्यार्थ्यांची जात आडवी येते हे तत्कालीन काळात राजश्री शाहू महाराजांनी जाणले होते. अनेक विद्यार्थ्यांची शहरात येऊन राहण्याची, जेवणाची व्यवस्था नसते. अनेकांची आर्थिक परिस्थिती

ISSN No. 2394-5990

हालाखीची असते त्यामुळे त्यांना शहरात राहणे जमत नाही. त्यासाठी शाहू महराजांनी १८९६ साली कोल्हापुरात सर्व जाती-जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी एक बोर्डिंग काढले होते. त्या बोर्डिंगमध्ये राहण्याची जेवणाची व्यवस्था सर्व विद्यार्थ्यांसाठी केली होती. परंतु या बोर्डिंगची व्यवस्था ज्याच्याकडे सोपविली होती त्यांनी काही वर्षानंतर उच्च जातीतील विद्यार्थ्यांचाच भरना या बोर्डिंग मध्ये करण्यावर भर दिला होता. बोर्डिंग स्थापनेच्या तीन वर्षानंतर त्या बोर्डिंग इतर जाती-जमातीच्या विद्यार्थ्यांचा भरणा कमी होऊन फक्त ब्राह्मण जातीतील विद्यार्थीच आहेत, हे पाहून राजश्री शाहू महाराजांनी निरनिराळ्या जातीच्या विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र वस्तीगृहे काढण्याची ठरविले. त्यामध्ये त्यांनी विक्टोरिया मराठा बोर्डिंग, दिगंबर जैन बोर्डिंग, वीरशैव लिंगायत विद्यार्थी वस्तीगृह, मुस्लिम बोर्डिंग, मिस क्लार्क हॉस्टेल, दैवज्ञ शिक्षण समाज बोर्डिंग, श्री नामदेव बोर्डिंग, इंडियन ख्रिश्चन हॉस्टेल, रावबहादूर सबनीस प्रभू बोर्डिंग, आर्य समाज गुरुकुल, वैश्य बोर्डिंग ढोर चांभार बोर्डिंग अश्या विविध जाती-धर्माच्या विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र अशी १८ वस्तीगृहाची त्यांनी स्थापना केली होती.या विविध वस्तीगृहाची स्थापना करून सर्व जाती धर्माच्या विद्यार्थ्यांना कुठल्याही भेदभावाला सामोरे न जाता, तसेच सर्वांना समान संधी मिळावी व शिक्षण घेता यावे हाच उद्देश राजश्री शाहू महाराजांचा होता. राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात सर्व जाती धर्माच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या सोयीसाठी शिक्षण संस्था, वस्तीगृहे तर काढलीच होती. परंतु संस्थानाबाहेरील वस्तीगृहांना सुद्धा मदत केलेली दिसून येते. पुण्याच्या छत्रपती मराठा वस्तीगृहास सुरुवातीस तीनशे रुपयाची भांडी त्यांनी देऊ केली होती. त्याचबरोबर कोल्हापूर बाहेरील संस्थांना वस्तीगृहांना देणगी स्वरुपात त्यांनी वेळोवेळी मदत केली होती. विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी मदत करून विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण केली होती. वसतिगृहाच्या माध्यमातून सर्व जाती-धर्माच्या विद्यार्थ्यांना शहरात येऊन शिक्षण घेण्याची संधी त्यांनी प्राप्त करून दिली होती.

राजर्षी शाहू महाराजांनी सुरू केलेल्या शैक्षणिक कार्याचे परिणाम फक्त त्यांच्या कोल्हापूर संस्थांना पुरतेच मर्यादित राहिले नव्हते. तर त्याचे लोण संपूर्ण महाराष्ट्रभर पुढील काळात पसरून बहुजन समाजाच्या उत्थानास महत्वपूर्ण ठरले होते. त्यांच्या या कार्यापासून प्रेरणा घेऊन पुढील काळात कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यापासून ते डॉ. पंजाबराव देशमुख, तसेच अनेक शिक्षणप्रसारकानी संपूर्ण महाराष्ट्रात बहुजन समाजाला समर्थ बनवणारी, त्यांना शिक्षित करणारी शैक्षणिक चळवळ पुढे चालविली होती. शिक्षणाची दारे बहुजन समाजासाठी त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रभर खुली झाली होती. शिक्षणामुळे सर्व समाजाच्या प्रगतीला हातभार लागला होता. या सर्व प्रगतीची मुळे महात्मा ज्योतिबा फुले, राजश्री शाहू महाराज यांच्या विचार आणि कृतीत आहेत हे विसरून चालणार नाही.

सारांश :

राजर्षी शाहू महाराजांनी शिक्षण विषयक सर्वांगीण दृष्टिकोन अंगीकारला होता. केवळ शिक्षण देणे, शिक्षण देण्यासाठी शाळा स्थापन करणे, शिक्षणासाठी सोयी सवलती उपलब्ध करून देणे, त्याद्वारे शिक्षणाचा विस्तार घडवून आणणे एवढ्या पुरता मर्यादित नव्हता.तर त्यांच्या सर्वांगीण दृष्टिकोनातून जनसामान्याच्या मनामध्ये शिक्षणासंबंधी अभूतपूर्व लालसा निर्माण करणे, रुजविने याचा त्यांनी प्रयत्न केला होता. त्याकरिता त्यांनी अंगिकारलेली दृष्टी, त्यांनी ठरविलेले शैक्षणिक धोरण आणि शिक्षणाच्या धोरणाची केलेली अंमलबजावणी या सर्व गोष्टीतून त्यांच्या शैक्षणिक कार्याची प्रचिती येते. राजश्री शाहू महाराजांनी उभ्या केलेल्या शैक्षणिक चळवळीचे सूत्र मक्तेदारीकडून सार्वजनिकतेकडे जाणारे आहे. वैयक्तिक हितसंबंधांकडून सामाजिक कल्याणकडे ते नेणारे आहे,तसेच विषमतेने कीडलेल्या आणि जातीभेद पंथांनी नासलेल्या समाज जीवनाला समानतेच्या पातळीवर आणणारे ते असल्याचे दिसून येते.

निष्कर्ष :

०१. राजश्री शाहू महाराजांच्या शैक्षणिक कार्यामुळे सर्व जाती-धर्माच्या विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची द्वारे खुली झाली होती

०२. राजश्री शाहू महाराज यांनी स्त्रीशिक्षणासाठी देखील अनमोल कार्य केल्याचे दिसून येते

०३. राजश्री शाहू महाराज यांच्या वस्तीगृहाच्या योजनेमुळे सर्व जाती-धर्माच्या विद्यार्थ्यांना शहरात येऊन शिक्षण घेता येऊ लागले होते.

०४. राजश्री शाहू महाराजांच्या शैक्षणिक कार्यापासून पुढे अनेक शिक्षण प्रसारकानी प्रेरणा घेऊन महाराष्ट्रात बहुजन समाजासाठी शिक्षणाची ज्योत पेटवली होती.

संदर्भसूची :

०१. संपादक मंडळ(जाधव रमेश), मराजर्षी शाहू गौरव ग्रंथ,, शिक्षण व सेवा योजना विभाग, महाराष्ट्र राज्य मंत्रालय मुंबई २३ फेब्रुवारी १९७६

०२. भगत, रा. तु., राजर्षी शाहू छत्रपती - जीवन व शिक्षणकार्य. कोल्हापूर: रिया पब्लिकेशन्स.२०१६

०३. पवार जयसिंगराव, मराजश्री शाहू छत्रपती- जीवन व कार्यफ ताराराणी बुक सर्विस, शिवतेज, कोल्हापूर ऑक्टोबर २०१५.
०४. राणा अशोक, मलोकांचा राजा शिवछत्रपतीफ जिजाई प्रकाशन क्वीन्स गार्डन कॅम्प, जिजापूर, पुणे. १२ जानेवारी २००२.
०५. नांदेडकर, प्रा. डॉ. व. गो., राजकीय विचार आणि विचारवंत. पुणे: डायमंड पब्लिकेशन्स.२०११.
०६. सावंत इंद्रजीत, लेख-सक्तीच्या प्राथमिक शिक्षण कायद्याची शतकपूर्ती,महाराष्ट्र टाईम्स, दिनांक-२४ जुलै २०१७.

■■■

ISSN No. 2394-5990

कोल्हापूर मल्लविद्येचे माहेरघर व छ. शाहू महाराज

प्रा. डॉ. थोरे किशोर धोंडीबा
सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग,
सी. बी. खेडगीज् बी. सायन्सं, आर. व्ही. कॉमर्स अण्डं
आर. जे. आर्टस् कॉलेज अक्कलकोट जि. सोलापूर
भ्रमणध्वनी - ९४२२४२५०४२, ईमेल- ज्ञळीहेीवर.ींहेीशसारळश्र.लेा

प्रस्तावना :

महाराष्ट्राला शाहू-फुले-आंबेडकरांचा महाराष्ट्रं म्हणून ओळखले जाते. त्यातही छ. शाहू महाराज हे कोल्हापूरचेच नाही तर महाराष्ट्राच्या इतिहासातील मेरुमणी होय. छत्रपती शिवाजी महाराजांच्या गादीवर वारसा सांगताना त्यांच्या विचारांचाही वारसा प्रभावीपणे सांगणारे व्यक्तीमत्वं म्हणजे छ. शाहू महाराज होय. छ. शिवाजी महाराजांच्या स्वप्नातील भारत बनविण्याची प्रेरणा घेऊन कार्य करीत असताना आपल्या कारकिर्दीत व कार्यक्षेत्रात ते स्वप्नं प्रत्यक्षात उतरविण्याची कार्य शाहू महाराजांनी केले. शाहू महाराजांचे चित्रण करीत असताना त्यांच्या अनेक पैलूवर प्रकाश टाकता येतो. त्यांनी वेगवेगळ्या व महत्त्वाच्या सर्वच क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा खुप प्रभावीपणे राबविला. राजे फक्तं राज्यकारभार प्रभावी केले तरी ते आजरामर होतात. पण छ. शाहू महाराजांनी आपल्याला आवडणाऱ्या अनेक क्षेत्रात अमुलाग्रं बदल करण्याचा प्रयत्नं केला व त्यांना त्यामध्ये प्रचंड मोठे यश मिळाले.

शाहू महाराजांनी इतर राजे ज्याप्रकारे राज्यकारभार करतात ती क्षेत्रे तर त्यांनी पादाक्रांत केलीच पण त्याव्यंतिरिक्तं कला व क्रीडा या क्षेत्रातही अमुलाग्रं बदल करण्याचा व योगदान देण्याचे कार्य त्यांनी केले. त्यामुळेच छ. शाहू महाराजांनी ज्या क्षेत्रात हात घातला त्या क्षेत्रात आजही कोल्हापूर अग्रस्थानी असल्याचे दिसून येते. असेच एक क्षेत्र म्हणजे मल्लविद्या अर्थात कुस्ती होय. आजही कोल्हापूर मल्लविद्देच्या बाबतीत भारतातच नाही तर जगाच्या पातळीवर गाजत असल्याचे आपणास दिसून येते. राजर्षी शाहू महाराज हे केवळ पेलवानाचे पोशिंदे नव्हते तर ते स्वंत:ही पट्टीचे पैलवान होते. त्यामुळे त्यांनी कोल्हापूर हे कुस्तीचे माहेरघर बनविले. आजही संपूर्ण भारतातून कुस्ती शिकण्यासाठी व मार्गदशनासाठी अनेक पैलवान कोल्हापूरची वाट धरतात.

संशोधनाचे उद्देश :

१. राजर्षी शाहू महाराजांच्या विविध पैलूचा अभ्यास करणे.
२. शाहू महाराजांच्या कुस्तीप्रेमाची चिकित्सा करणे.
३. शाहू महाराजांचे कुस्ती या खेळाचा केलेल्या प्रचाराचा अभ्यास करणे.
४. ग्रामीण भागात कुस्ती संस्कृती वाढविण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचा अभ्यास करणे.
५. कोल्हापूर संस्थानातील पैलवानास केलेल्या मदतीचा अभ्यास करणे.
६. एक मल्लं म्हणून महाराजांचा अभ्यास करणे.

गृहितके :

राजर्षी शाहू महाराजाच्या विशेष प्रयत्नामुळे कोल्हापूर परिसराला कुस्तीचे माहेरघर म्हणून ओळखले जाते. महाराजांनी अनेक पैलवानांना आश्रय व मार्गदर्शन देवून कोल्हापूरचा भारतभर दबदबा निर्माण केला.

संशोधन पध्दती :

या विषयावर शोध निबंध तयार करण्यासाठी मी प्राथमिक व दुय्यंम संदर्भ साधनांच्या आधारे वर्णनात्मकं संशोधन पध्दतीचा वापर केला आहे.

राजर्षी शाहू महाराज व कुस्तीची ओळख :

भारतामध्ये प्राचीन काळापासून कुस्ती हा क्रीडा प्रकार प्रसिध्दं आहे. भारतामध्ये पतियाळाला मल्लंविद्देची गंगोत्री मानली जाते. तर कोल्हापूर मल्लंविद्देचे माहेर म्हटले जाते. याच दृष्टीकोनातून पतियाळाचे महाराज राघवेंद्रं सिंग यांना मल्लंविद्देचे भोक्ते आणि कोल्हापूरचे राजर्षी शाहू महाराज यांना मल्लंविद्देचे पोशिंदे तसेच मल्लांचे मल्लं असे संबोधले जाते. छ. शाहू महाराज अगदी लहानपणापासून कुस्तीचे शौकिन होते. शाहू महाराजांची पहिली कुस्ती इ.स. १८८३-८४ च्या दरम्यान कागल याठिकाणी मारुती रुकडीकर यांच्याशी झाली. त्यावेळी महाराज नऊ वर्षाचे होते. याप्रसंगी महाराजांचे जन्मदाते श्रीमंत आबासाहेब व महाराजांचे उस्ताद दत्तोबा हरी शिंदे हे उपस्थित होते. आबासाहेब स्वंत: मल्लं असल्यामूळे त्यांचे महाराजांच्या कुस्तीसाठी सतत प्रोत्साहान देत असत. ही कुस्ती शाहू

महाराजांनी जिंकली. या विजयानंतर राजर्षी शाहू महाराज व कुस्ती यांचे नाते अतूट बनले.[१]

महाराजांचे शिक्षण चालू असताना राजकोट व धारवाड याठिकाणी त्यांना कुस्ती व व्यायामाबद्दल प्रचंड आवड निर्माण झाली. त्याचबरोबर त्यांचे ब्रिटीश पालक सर फ्रेझर यांनीही त्यांच्या मनात व्यायामासंबंधी प्रेम निर्माण केले. छत्रपती शाहू महाराजांच्या हातात कारभार आल्याबरोबर त्यांनी आपल्या जून्या राजवाड्यात मोतीबाग तालीम सूरु केली.

कुस्तीसाठी महाराजांनी प्रोत्साहानपर केलेले कार्य :

महाराज सत्तेवर येताच इ.स. १८९४ मध्ये मंगळवार पेठेतील खरी कॉर्नरजवळील शिवाजी थिएटरच्या जागेत पहिल्या कुस्त्यांचे मैदान भरविले.[२] यासाठी नदीवरून खास तांबडी माती आणली. या पहिल्याच स्पर्धेत त्यांनी अनेक क्रांतीकारक निर्णय घेतले. त्यातील सर्वात पहिले कुस्तीत फक्त विजयी पैलवानास नारळ व मानाचा फेटा दिला जात असे. पण महाराजांनी यांच्यात मोठा बदल करुन त्यांनी बक्षीस म्हणून रोख रक्कम देण्यास सुरूवात केली. त्याचबरोबर त्यांनी पराभूत पैलवानासही रोख रक्कमेच्या स्वरूपात बक्षीस देण्यास सुरूवात केली. त्यांमुळे पैलवान कुस्तीसाठी जीवापाड प्रयत्नं करू लागला. अशाप्रकारे महाराज पहिल्याच स्पर्धेपासून आपला वेगळा ठसा उमठविण्यास सुरूवात केली.

आपल्या मुलांच्या जन्माच्या आनंदाच्या प्रित्यर्थ् युवराजांच्या बारशाच्या दिवशी पुन्हा मोठी कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेसाठी महाराजांनी आपल्या अनेक नातेवाईक, मित्र, आप्तेष्ठं नातेवाईक यांना पाचारण केले. परिसरातील अनेक राजे राजवाडे या कार्यक्रमासाठी कोल्हापूरात हजर झाले. ही स्पंर्धा सध्या दसरा चौक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या परिसरात आयोजित केली. या स्पर्धेसाठी संपूर्ण भारतातून एकापेक्षा एक असे नामांकित पैलवानांना महाराजांनी आमंत्रित केले कारण आपल्या संस्थानातील व परिसरातील पैलवानांना व सर्वसामान्यं नागरिकास पाहता यावे व त्यांचा आदर्श घ्यावा. अशी भुमिका होती. पंजाबमधून चंदन, लब्बू, कल्लू अशा रुस्तूम-ए-हिंद तोडीचे पैलवान कोल्हापूरास आलेले होते. या स्पंर्धेत या पैलवानांनी महाराष्ट्रातील पैलवानास चारी मुंड्या चीत केले.[३] त्यावेळी महाराजांनी ठरविले. या पराभवामुळे मराठी पैलवान पेटून उठेल व जिद्दीने तयारी करतील व एक ना एक दिवस आपल्या पंचगंगेचे पाणी पाजल्याशिवाय राहणार नाहीत.

कुस्तीसाठी मल्लं तयार करण्यासाठी उपाययोजना :

महाराजांची शरीरयष्टी व व्यक्तीमत्वं पैलवानास साजेशे होते. महाराज लहानपणापासून व्यायाम व कसरतीची आवड होती त्यामुळे ते कुस्ती या खेळाकडे आकर्षित झाले. कुस्ती, व्यायाम यामुळे त्यांची शरीर संपदा कमाविलेले होते. उंची चांगली सहा फुट चार इंच होती. रुबाबदार व प्रमाणबध्दं शरीरसंपदा होती. महाराजांना त्यांच्या विद्यार्थीदशेत दत्तोबा शिंदे, पांडबा भोसले, बालेखान पठाण या वस्तादांनी कुस्तीचे शिक्षण दिले होते. त्यामुळे त्यांनी आपल्या राज्यात कुस्तीचे प्रशिक्षण देण्यासाठी विशेष लक्ष दिले. आपल्या राजवाड्याच्या परिसरात आपल्या देखरेखीखाली पैलवानाची मेहनत घेत. कागल तालुक्यातील रावजी धोंडी सांगावकर यांचे कुस्तीतील प्राविण्यं व डावपेचांची जाण लक्षात घेऊन महाराजांनी त्यांना मुख्यं वस्ताद म्हणून नेमले. त्याच्या मदतीला पठाण, कसबेकर व इतर वस्तादांची नेमणूक केली.[४] पंजाबी पैलवानांना शह देण्यासाठी महाराजांनी चंग बांधली. त्यासाठी त्यांनी आपल्या राज्यातील विविध तालमींना भेटी दिल्या व ज्या तालमीची पडझड झालेली आहे त्यांचा जिर्णोद्दार करण्याचे काम केले. या काळात महाराजांनी जवळपास ५० ते ६० तालमींचे पुनरुज्जीवन केले.

महाराजांनी काही नविन तालमी बांधण्यासाठी मोफत जमीन उपलब्धं करून दिली. त्यांना इमारत बांधण्यासाठी रोख पैशाची तरतूद केली. कुस्तीबरोबरच महाराजांनी फरी गदगा, दांडपट्टा, बोथाटी, विटा, भाला, बाणा आदी सहित्यं तालमींना पुरविली. त्या खेळातही आपले तरुण वाकबगार व्हावेत ही महाराजांची मनिषा होती. आपली रयत दिवसभर शेतात अथवा विविध कामामध्ये गुंतलेले असतात म्हणून महाराजांनी मर्दानी खेळाचे प्रशिक्षण देण्यासाठी रात्रींची वेळ ठरवून दिली. त्यामुळे अशा मर्दानी खेळाकडे व कुस्तीकडे तरुणांचा कल वाढला. आपला कामधंदा संभाळून आपण यामध्ये वाकबगार होवू शकतो याची खात्री तरुणांना होवू लागली.

आपल्या राज्यात अशा अनेक तालमीमध्ये विविध वस्ताद कुस्तीसाठी मल्लं तयार करु लागले. महाराज त्यांना हवी ती मदत देण्यास तत्परं असत. फक्त कोल्हापूरात जवळपास शंभरच्यावर तालमी होत्या. प्रत्येक पेठेत पंधरा ते वीस तालमी तयार झाल्या होत्या. त्यापैकी काही महत्वाच्या तालमी पुढीलप्रमाणे आहे. मोतीबाग तालीम, पंत अमात्यं बावडेकर आखाडा, नवा राजवाडा लाल आखाडा, रंकाळवेश तालीम, सत्यनारायण तालीम, गंगावेश तालीम, शाहूपुरी तालीम, काळा इमाम तालीम, तटाकडील तालीम, पंचगंगा तालीम, संध्यामठ तालीम, बजाप माने तालीम अशा तालीमांचा समावेश होता.[५] अशा विविध मार्गानी महाराज कुस्तीचा प्रसार करायला सुरुवात केली.

महाराजांची पैलवानास मिळणारी मदत :

राजर्षी शाहू महाराज फक्त तालमीची निर्मितीच नाही तर आपल्या राज्यांत पैलवानांना आश्रय देण्यास सुरूवात केली.

ISSN No. 2394-5990

निरनिराळ्या तालमीत पैलवान आश्रित म्हणून राहत असत. त्यांच्या खाण्याजेवणाचा, खुराकाचा, निवासाचा वगैरे सर्व खर्च महाराज आपल्या खासगीतून करीत असत. यात मालिश करणारे, खुराक करणारे, जेवण करणारे व वस्ताद यांनाही सर्व सुविधा मिळत असत. असे काही पैलवानाची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

१. बापूसाहेब महाराज आखाडा- गुलामबक्ष, हसनबक्ष, श्रीपती चव्हाण
२. सोनतळी तालीम- गणपत पैलवान, धोंडी पैलवान, गुत्तासिंग, रजब पैलवान, कादर इस्माईल
३. घुडणपीर- लप्पू, वजीर, बापू सज्जनं, पांडू पैलवान,
४. मोतीबाग- कल्लू गामा, बाबू बिरे, म्हादू हांडे
५. बाबूजमाल तालीम- गुलाम कादर, बिंदू ब्राह्मण, कसबेकर बंधू

ही उदाहरणे कोल्हापूर परिसरातील होती. पण सर्व राज्यात जवळपास दोनशे पैलवानांना मासिक नियमित आर्थिक मदत महाराजांकडून मिळत असे.[६] महाराजांनी काही पैलवानांना घरासाठी जागा उपलब्ध करून दिले. ७काही हौशी पैलवानांना प्रसंगोपात आर्थिक मदत मिळे ती वेगळीच. पैलवानांचा खर्च किती होता हे आपण उदाहरणादाखल पाहता येईल. शिवाप्पा बेरड या पैलवानाला रोज दोन कोंबड्या, दीड शेर बदाम, चार शेर हाडांची आकणी, मांस, एक शेर लोणी, पुलावा, रोट्या, चपात्या, मोसमानुसार फळे, चार शेर दूध असा खुराक असत. यावरुन आपण एका पैलवानाचा दिवसभराचा खर्च किती येतो याचा अंदाज करू शकता. हा सर्व खर्च महाराज आनंदाने करत असत. त्याचे कारण आपल्या कोल्हापूरचा पैलवान भारतात नाव कमावले पाहिजे. पंजाबमधील पैलवानास चितपट केले पहिजे.

राजर्षी शाहू महाराजांच्या प्रयत्नांनी कोल्हापूर शहरात व संस्थानात कुस्तीचा प्रचार व प्रसार सुरू झाला. कोल्हापूरात दर मंगळवारी व शुक्रवारी कुस्त्यांची मैदाने भरू लागली. अशा मैदानास दंगली असे म्हणंत. या कुस्त्या जुन्या राजवाड्याच्या मागील बाजूस तसेच शिवाजी थिएटर, बाबुजमाल, नवा राजवाडा या ठिकाणी होवू लागल्या. मध्यभागी लाल मातीचे मैदान व सभोवताली पडदे लावून बंदिस्तं जागेवर व या कुस्त्या होवू लागल्या. या कुस्त्यांना महाराज स्वतः हजर राहत त्यामूळे मोठया प्रमाणात अशा दंगली होवू लागल्या. महाराजांनी पाडलेला नवा पायंडा विजेत्या व हरलेल्या दोघांनाही मानाचे बक्षिस दिले जात त्यामुळे कोल्हापूर परिसर कुस्ती ने प्रभावित झाला. वेगवेगळ्या सणांना उदा. संक्रांत, महाशिवरात्र, शिवजयंती, महाराणी ताराराणी पुण्यतिथी, धुलिवंदन, हनुमान जयंती, हजरत पीर उत्सवं, मोहरम अशावेळी जल्लोषात मैदाने भरू लागली. कोल्हापूरचे हे वारे परिसरातही पसरू लागले. संस्थानामध्ये खेड्यापाड्यात तर प्रभाव होताच पण सांगली, मिरज, कुरुंदवाड, कागल, निपाणी, बेळगाव, धारवाड, हुबळी, जामखंडी, अथणी, अंकली, नांदणी, शिरोळ, वाडी, इस्लामपूर, संकेश्वरं अशा अनेक गावामध्ये महाराजांनी सुरू केलल्या कुस्त्यांचे लोण पसरू लागले.[७]

राजर्षी शाहू महाराजांनी आयोजित केलेल्या कुस्ती स्पंर्धा :

महाराजांनी फक्तं कुस्तीस सुरूवात केली नाही तर त्यांना प्रोत्साहान देण्यासाठी त्यांनी अनेक स्पर्धा घेण्याचे व त्या आयोजित करण्यासाठी प्रोत्साहान देण्यास सुरूवात केली. महाराज इ.स. १९०२ मध्ये युरोप दौऱ्यावर असताना तेथील सुविधा पाहून महाराजांना आपल्याही कोल्हापूरात असे मैदान तयार करण्याची प्रेरणा मिळाली. महाराज परतल्यानंतर खासबाग मैदान तयार केले. खास नियोजन करून सुमारे ५० हजार लोक बसू शकतील असे मैदान महाराजांनी तयार केले. त्यानंतर कोल्हापूर परिसरातील सर्व कुस्त्या या मैदानावर होवू लागले. वर्तुळाकार प्रशस्तं मैदान, चोहोबाजूनी उतरती त्यामुळे सर्वाना कुस्ती दिसत होती. प्रशस्तं मैदान असल्यामुळे आठ ते दहा कुस्त्या सहज होत होत्या. यालाच शाहू खासबाग मैदान म्हणुन ओळखले जाते. हे मैदान म्हणजे महाराजांच्या कुस्तीप्रेमाचे चिरंतन स्मारक आहे. या मैदानाचे बांधकाम १९०७ ते १९१५ या कालखंडात पुर्ण झाले. या मैदानावरील उद्घाटनपर झालेली इमामबक्ष व गुलाब मोहिद्दीन यांची कुस्ती खुप गाजली. इ.स. १९११ पंचम जार्ज बादशहाच्या राज्यारोहण समारंभानिमित्तं दिल्लीमध्ये सलग तीन दिवस कुस्त्यांचे मैदान भरणार होते. त्यावेळी महाराजांना खास आमंत्रण देण्यात आले होते. त्यावेळी अनेक नामवंताच्या कुस्त्या झाल्या पण पैलवानांचा महाराजाबरोबर असणारा सहसंबंध, आपूलकी पाहून व्हाईसराय लॉर्ड हार्डिंग्जं हे आश्चर्यचकीत झाले. याचाच अर्थ महाराजांचे कुस्ती प्रेम व भारतातील अनेक पैलवानाचे महाराजाविषयी असणारा आपुलकिचे दर्शन होते. २० एप्रिल १९१३ ते २५ एप्रिल १९१३ या काळातही कोल्हापूरात कुस्त्यांचे जंगी मैदान भरविले.[८] राजर्षी शाहू महाराज मुंबईचे गव्हर्नर लॉर्ड विलिंग्डनं यांनाही नोव्हेंबर १९१३ मध्ये कोल्हापूर भेटी दरम्यान कुस्ती पाहण्यासाठी आमंत्रण दिले होते.[९] कोल्हापूरातील पैलवानाशी झुंजण्यासाठी महाराज उत्तर हिंदुस्थानातील पहिलवानांना पाचारण करीत असत. पतियाळा याठिकाणी आसणाऱ्या जाठ पहिलवानांना महाराजांनी आमंत्रित केले होते.[१०]

महाराजांची पैलवानाविषयी आसणारी पारख :

महाराजांच्या अंगी माणसे व जनावरे यांची पारख करण्याची क्षमता मोठ्या प्रमाणात होती. त्यामुळे दौऱ्यावर असताना महाराज अनेक सर्वसामान्यं माणसाची पारख करुन त्यांना तालमीत आणले. पुढे त्यातील अनेक पैलवान नामांकित झाले होते. रंकाळ्यामध्ये गवताचा भारा बांधून आपल्या डोक्यावर झटक्यात घेणारा कृष्णा भालेकरास मोतीबाग तालमीत आणून त्याला नामंकित पैलवान बनविले. पुढे तो महाराजांचा अंगरक्षक म्हणून काम केले.[११] रायबागचा देवाप्पा धनगर हाही शेळ्यामेंढ्या राखणारे त्याला महाराजांनी आपल्या तालमीत भरती केले. देवाप्पाने रुस्तूम-ए-हिंद हा पुरस्कार मिळवावा अशी अपेक्षा होती. पण काही दिवसानंतर त्यांचा आजारपणात मृत्यू झाला. राधानगरीकडील शिवप्पा बेरड हाही सर्वसामान्यं होता. त्याला आपल्या तालमीत भरती करुन घेतले.[१२] त्याला काळा गेंडा म्हणून प्रसिध्दी मिळाली. अनेक पंजाबी पैलवानांचा त्यांनी पराभव केला होता. काळा मारुती म्हणून ओळखला जाणारा व्यकंप्पा बुरुड गोविंदराव जाधव, बाबू बिरू, महादू हांडे, अशा अनेक मल्लांना महाराजांनी आपल्या आश्रयाला ठेवले व त्यांना मदत केली.

उत्तरेच्या पैलवानावर मात :

महाराजांनी अशा अनेक मल्लांना आश्रय दिल्यामुळे कोल्हापूरच्या तालमीतल एकएक मल्लं मातब्बरं निर्माण झाले. महाराजांनी लहानपणापासून जे स्वंप्नं पाहिलेले होते ते आता प्रत्यक्षात उतरविण्याची वेळ आली होती. महाराजांच्या अपेक्षेप्रमाणे कोल्हापूरातील पैलवानांनी पंजाबच्या पैलवानास चारीमुंड्या चित केले. भोला पैलवान या नावाजलेल्या पंजाबी पैलवानास कृष्णा मर्दानेने अवघ्या पंधरा मिनिटांत चित केले. शिवाप्पाने हमदूकाला व आक्रम याला देवाप्पा इंगळे यांनी पराभूत केले. आगरतळ्याचा नवरंगसिंग व वस्सां याला गणपत शिंदेने चितपट केले.[१३] उत्तरेकडील पैलवाना चारीमुंड्या चित केल्याने महाराजांचे स्वप्न पुर्ण झाले.

पैलवानांना जन्मजन्मांतरीचे पुरस्कार :

राजर्षी शाहू महाराज पैलवानांना फक्त कामापुरते पाहत नसत तर त्यांचे आयुष्यभर काळजी घेण्याचे धोरण ठेवत असत. कारण उतारवयात कुस्ती करण्याची क्षमता राहत नसे त्यामुळे महाराजांनी याचाही विचार केला होता. कृष्णा मर्दानेला केर्ली गावात सुपिक मळा, दादू हेर्ले घर व शेतजमीन, गणू भोसले, पांडु शिराळकर, श्रीपती चव्हाण यांना पेन्शनच्या नोकऱ्या दिल्या.[१४] अशा अनेक पैलवानास महाराजांनी मोठे पुरस्कार देवून त्यांचा सन्मान करणयात येत असे. महाराजांनी कुस्तीची मैदान तिकीट लावून भरविले त्यामधून मैदानाचा खर्च वजा जाता उरलेल्या रक्कम हजारी फंडात जमा होत असे. व त्यामधून पैलवानांना सर्व प्रकारची मदत देत असत.

निष्कर्ष :

१. राजर्षी शाहू महाराजांच्या प्रयत्नामुळेच आज कोल्हापूरात कुस्ती क्षेत्रात मोठी प्रगती झाली.
२. महाराजांनी ग्रामीण भागातील तरुणामधील कुवत ओळखून त्यांना पैलवान बनविले.
३. कोल्हापूर संस्थानात कुस्ती प्रचार व प्रसार करण्यासाठी विविध उपाययोजना केल्या.
४. गावागावामध्ये तालीम बांधणीस मदत केली.
५. पैलवानांना आपल्या खुराकावर मोठा खर्च करावा लागतो म्हणून महाराजांनी त्यांना आर्थिक मदत केली.
६. राजर्षी शाहू महाराजांच्या प्रयत्नामुळे कोल्हापूरचा मल्लं देशभर आपला प्रभाव निर्माण केला.

समारोप :

कोल्हापूरला कुस्तीचे माहेरघर बनविण्यामध्ये राजर्षी शाहू महाराजांचा वाटा किती महत्वाचा होता याचे दर्शन आपणास दिसून येते. आजही कोल्हापूरात महाराष्ट्रातूनच नाही तर सुपूर्ण भारतातुन मोठ्या प्रमाणात पैलवानांचा ओढा असल्याचे दिसून येते. म्हणूनच आज कोल्हापूरला कुस्ती पंढरी म्हणून ओळखले जाते. महाराज स्वतः पैलवान असल्यामुळे व कुसतीचे शौकीन असल्यामुळे त्यांनी तन मन व धनाचा वापर कोल्हापूरात कुस्ती संस्कृती निर्माण केली. याचे आपणास जाणीव असणे गरजेचे आहे.

संदर्भ साधने :

१. राजर्षी शाहू महाराज पंचखंडात्मकं स्मारक ग्रंथ, संपा. पवार जयसिंगराव व पवार मंजुश्री, खंड दुसरा, महाराष्ट्रं इतिहास प्रबोधिनी कोल्हापूर, २०१९ पान क्रं. ६३१
२. साळूंखे हिंदूराव, राजर्षी शाहू महाराज व मल्लविद्या, महाराष्ट्रं इतिहास प्रबोधिनी कोल्हापूर, २०१९
३. उपरोक्तं, स्मारक ग्रंथ, पान क्रं. ६३४
४. Letter, Rajarshi Shahu Chhtarapati papers Vol VI No. 272 Date- 29/09/1913
५. उपरोक्तं, स्मारक ग्रंथ, पान क्रं. ६३३

ISSN No. 2394-5990

६. उपरोक्तं, Vol VI No. 277 Date- 22/10/1913
७. उपरोक्तं, Vol VI No. 284 Date- 31/10/1913
८. उपरोक्तं, Vol VI No. 336 Date- 16/04/1913
९. उपरोक्तं, Vol VI No. 283 Date- 28/10/1913
१०. उपरोक्तं, Vol VI No. 233 Date- 31/03/1913
११. उपरोक्तं, स्मारक ग्रंथ, पान क्रं. ६३६
१२. कित्ता, पान क्रं. ६३८
१३. कित्ता, पान क्रं. ६४०
१४. कित्ता, पान क्रं. ६४०

■■■

राजर्षी शाहू महाराज: अब्राम्हणी राजा

अप्पासाहेब मल्लप्पा देशमुख
सी. बी. खेडगीज् कॉलेज, अक्कलकोट
मोबा. ९४०३०२८२५१
Email. - deshmukh.appasaheb@gmail.com

गोषवारा :

भारतीय समाजात विशेषत: महाराष्ट्रात सर्वांगीण समता, स्वातंत्र्य, बंधुत्व आणि सामाजिक न्यायाची या चतु:सत्रीची प्रत्यक्ष कार्यवाही व्हावी म्हणून ज्या महापुरूषांनी आपले आयुष्य वेचले. त्यामध्ये महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर हया महापुरूषांचे जीवन कार्य खरोखर कालातीत ठरले आहे. यामध्ये राजर्षी शाहू महाराज सामाजिक न्यायाचे प्रत्यक्ष अंमलबजावणी करणारे महाराष्ट्रातीलच नव्हे तर देशातील पहिले राजे ठरतात. सामाजिक न्यायाची भलामण करताना राजर्षी शाहू महाराजांना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली होती की ब्राम्हण्यवाद नष्ट केल्याशिवाय सामाजिक न्याय प्रत्यक्षात येवू शकणार नाही. त्यासाठी त्यांनी सामाजिक सुधारणांच्या कार्याबरोबरच ब्राम्हण्यवाद पूर्णपणे नायनाट व्हावा असे प्रयत्न केले. ब्राम्हण्यवाद समाजविघातक असण्याबरोबरच राष्ट्रविघातक देखील आहे असे त्यांचे प्रतिपादन होते.

सदर शोध निबंधात राजर्षी शाहू महाराजांनी अब्राम्हणी परंपरा जोपासून जातीभेद, सामाजिक अनिष्ठ परंपरा व ब्राम्हण्यवाद मोडीत काढण्याच्या कार्यावर प्रकाश टाकण्यात आला आहे.

प्रस्तावना :

स्वातंत्र्यपूर्व काळात आपल्या देशात शेकडो संस्थानिक होते. त्यापैकी अनेक विलासी, स्वकेंद्रीत आणि स्वार्थी संस्थानिक राजे होते. मात्र त्याला काही सन्मानीय अपवाद होते, बडोद्याचे महाराजा सयाजीराव गायकवाड व कोल्हापूरचे राजर्षी छ. शाहू महाराज हे दोघे पुरोगामी सामाजिक धोरण राबवणारे प्रजाहितदक्ष संस्थानाधिपती होते. दोघेही सामाजिक परिवर्तनाची ओढ असणारे पुरोगामी राजे होते. अर्थात, काळाची पाऊले ओळखणारे महान राजे होते. बहुजन समाजाचे शिक्षण, जातिभेद –निर्मूलन, अस्पृश्यता निवारण, ब्राम्हणी धर्माचे वर्चस्व नाहीशे करणे, ब्राम्हणेतरांचे राजकारण इत्यादी कार्याना शेवटपर्यंत शाहू महाराजांनी स्वत:ला अर्पित केले होते. तत्कालीन महाराष्ट्रातील समाजव्यवस्था जातिसंस्थेमुळे निरनिराळया गटांत विभाजन झाले होते. जातिसंस्थेत हजारो उपजाती निर्माण झाल्या होत्या. तसेच, यांवर आणखी एक कलंकित असणारी गोष्ट म्हणजे अस्पृश्यतेची प्रथा. बहुजन समाजाला व स्त्रियांना शिक्षणास बंदी होती. सतीप्रथा, बालविवाह, विधवापन व केशवपन यासारख्या अनिष्ठ प्रथांचे अवडंबर माजले होते. भारतात इंग्रजी शासनाचे अंमल सुरू झाल्यामुळे बहुजन समाजाला शिक्षणाची वाट मोकळी झाली. यांतही सनातनी ब्राम्हण वर्गाने धर्माचा आधार घेवून आडकाठी आणण्यास सुरूवात केली होती. या ब्राम्हण्यावादास विरोध करून शाहू महाराजांनी बहुजन समाजाला ऐनकेन प्रकारे मुख्य प्रवाहात आणण्याचे काम केले. प्रस्तुत शोध निबंधात ब्राम्हण्यवादास विरोध याअर्थाने अब्राम्हणी या शब्दाचा अर्थ घेण्यात आला आहे. ब्राम्हण्यवाद म्हणजे ब्राम्हणांना विरोध नव्हे, तर ब्राम्हण असल्याचा वर्णश्रेष्ठत्वाचा अहंगड यास विरोध असणे म्हणजे अब्राम्हणी होय. याच अहंगडातून शिवाजी महाराज क्षत्रिय नाहीत म्हणून त्यांचा राज्याभिषेक नाकारला होता. तसेच शाहू महाराज देखील क्षत्रिय नसल्यामुळे त्यांना देखील वेदोक्त मंत्राचा अधिकार नाकारण्यात आला होता. हे उदाहरण ब्राम्हणी वर्चस्व किंवा ब्राम्हण्यवादाचे आहे असे म्हणता येईल. यावरून असे स्पष्ट दिसते की हा ब्राम्हण्यवाद संपूर्ण समाजास किती विघातक आहे. यासाठीच शाहू महारांजानी एका बाजूला सामाजिक उन्नतीचे कार्य करीत दुस–या बाजूला त्यांनी प्रकर्षाने ब्राम्हण्यवादास विरोध करून अब्राम्हणी समतेचा धागा समर्थपणे चालविली.

उद्दीष्टे :

१. छत्रपती शाहू महारांजाच्या कार्यातून आणि विचारांतून अब्राम्हणी परंपरा अधोरेखीत करणे.
२. त्यांच्या जातिविषयक विचारांवर प्रकाश टाकणे.

राजर्षी शाहू महाराजांचे धार्मिक व सामाजिक विचारांतून अब्राम्हणी परंपरा पुढीलप्रमाणे सांगता येईल.

१. बहुजन समाजाला शिक्षणास बंदी :

शाहू महारांजाच्या मते, ब्राम्हण्यवादाचे पहिले सूत्र असे की बहुजनांना शिक्षणापासून वंचित ठेवणे. ते म्हणतात की

ISSN No. 2394-5990

एकाच जातीने विद्येचा मक्ता घेतला आहे. मनू आणि त्याच्या मागून झालेल्या शास्त्रकारांनी, त्या त्या वेळच्या ध्येयाला अनुसूरून निरनिराळया जातींच्या व्यवहारांस बंधनकारक असे निर्बंध रचले आणि खालच्या कमी जातीच्या लोकांना विद्यामंदीराचे दरवाजे बंद करण्यात आले. त्यांचे स्वत:चे धर्मग्रंथ आणि वेद हे सुध्दा वाचण्याची त्यांना मनाई होती. हिंदू धर्मा शिवाय इतर कोणत्याही धर्माने आंधळया व दु:खकारक परिणाम करण्याबद्दल अग्रेसरत्व मिळविले नाही. (महाराज र. श., शिक्षणानेच आमचा तरूणोपाय आहे , २००७)

२. ब्राम्हण्यवाद पोसणारे पुराण ग्रंथावर टीका

शाहू महाराज यांच्या मते, मनुष्य उपजल्यापासून तो मरेपर्यंत त्याच्याकडून निरनिराळया रूपाने पैसे मिळविण्याकरिता व्रते, दाने वगैरे विषयीचे ग्रंथे ब्राम्हणांनी तयार केले. इतकेच नव्हे तर मेल्यावरही मृतास पोचविण्याकरिता श्राध्द, महाळ, दान वगैरे मिळावे याकरिता गरूड पुराणासारखे गारूडी ग्रंथ तयार झाले. याप्रमाणे अज्ञान्यांच्या पैशावर ब्राम्हण म्हणविणा-यांची खूप चंगळ उडाल्याने ब्राम्हणांतील विद्या नष्ट होत चालली. आपले व आपल्या संततीचे व्यवस्थित चालले पाहिजे या बुद्धीने ब्राह्मणेतरांचीही विद्या त्यांच्याकडून बंद करण्यात आली. पुढे फलज्योतिषशास्त्र वाढवून निरनिराळ्या ग्रहांची भीती घालून पैसे उपटण्याच्या युक्त्या निघाल्या. अमूक दिवस चांगला व अमूक वाईट, अमक्या दिवशी प्रवास करावा, लग्न, उपनयन वगैरे अमूकच मुहूर्तावर व्हावे अशी थोतांडे काढून अनेक वेडगळ धर्मसमजुतींचा पगडा जनसमाजावर बसविला गेला. ङ्गउपाध्याय सांगेल ती पूर्वदिशा व भट सांगेल ती अमावस्याफ असे झाल्याने भट सांगेल तसे निमूटपणे वागणे हा आपला धर्म आहे व यानेच ईश्वर प्रसन्न होतो व आपले कल्याण होते, अशी ब्राम्हणेतरांची समजूत झाली व ते निव्वळ नंदीबैलाचे स्थितीस आले. (महाराज र. श., आर्यधर्म समता व राष्ट्रैक्य वाढवील, २००७)

३. देशाच्या ऐक्याच्या दृष्टीने ब्राम्हणवाद घातक :

मूळच्या चार वर्णाचे चार हजार जाती तयार झाल्या असून त्यातून समाज विस्कळीत झाला आहे. भेदापासून द्वेष उत्पन्न झाला व देशातील एकी नाहीशी झाली. याचा परिणाम केवळ धार्मिक अवनती होवूनच थांबला नाही. परकीय लोकांच्या स्वा-या होवू लागल्या व घरच्या फुटीमुळे बाहेरच्या शत्रूंना फार फावले. अशा कारणांनी परतंत्रेचे जू देशाच्या मानेवर हळूहळू कायम बसले. विद्या कमी कमी होत गेल्याने व्यापार, कलाकौशल्य, उदीम, धंदा वगैरे सर्वास अवनती आली. एकंदर देशाची फार दैना उडाली. अशा पध्दतीने देशाच्या ऐक्याचे दृष्टीने ब्राम्हणवाद घातक आहे असे मत शाहू महाराज व्यक्त करताना दिसतात. यापुढे जावून ते म्हणतात की मराठयांची सत्ता हळूहळू पण पूर्णपणे ब्राम्हणांच्या हाती गेल्याने ब्राम्हण-ब्राम्हणेतर हा भेद तीव्र होवून मराठी राजसत्ता नाश पावली. (महाराज र. श., आर्यधर्म समता व राष्ट्रैक्य वाढवील, २००७)

४. ब्राम्हण ब्युराक्रसी

ब्राम्हण वर्गाची वर्चस्वाची यंत्रणा, प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष कशा पध्दतीने ब्राम्हणवादास पोषक वातावरण तयार करतात ते स्पष्ट करण्यासाठी 'ब्राम्हण ब्युरॉक्रसी' हे शब्द शाहू महाराजांनी योजिलेले आहे. त्यांच्या मते, दक्षिण हिंदुस्थानसारखे उत्तर हिंदुस्थानातही ब्राह्मणत्व जन्मावर येऊन बसले आहे. पण तेथे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र हे चारही वर्ण अस्तित्वात आहेत; असे मानण्यात येत असल्याने ब्राह्मणाखेरीज बऱ्याच इतर लोकांस वेदाध्ययनाचा व इतर विद्यासंपादनाचा अधिकार आहे असे समजण्यात येते. दक्षिणेत तर ङ्गकलौ अद्यंतपो स्थितिफ यावर जोर देऊन क्षत्रिय व वैश्यांचा पूर्ण अभाव असे प्रतिपादण्यात ब्राह्मणवर्गास मोठा आवेश येत असतो. त्यामुळे इकडील ब्राह्मणेतर वर्गात वेदविद्या तर बंद झालीच पण त्या योगाने इतर विद्येवरही जवळजवळ बंदी झाली. अशा रीतीने दक्षिण हिंदुस्थानच्या परिस्थितीत फार मोठा फरक पडला आहे. तिकडे ब्राम्हण वर्गाचे वर्चस्व मुख्यत्वे धार्मिक बाबतीत आहे. बाकीच्या बाबतीत इतर लोक परतंत्र नाहीत. यामुळे समाजाचे पारडे समतोल आहे. दक्षिणेत ब्राह्मणेतरांची विद्या बंद झाल्याने सर्व ब्राह्मणांच्या हाती श्रेष्ठपणा गेला आहे. धार्मिक, राजकीय, सामाजिक, शिक्षणविषयक वगैरे सर्वत्र प्राबल्य ब्राह्मणांचे, यामुळे इतरांची स्थिती फार परावलंबी व केविलवाणी झाली आहे. ही 'ब्युरॉक्रसी' मोडण्याकरिता पुष्कळ प्रयत्न झाले. जोपर्यंत ब्राह्मणांच्या धार्मिक वर्चस्वावर प्रत्यक्षपणे हल्ला होऊन ते नाहीसे होत नाही तोपर्यंत ब्राह्मणेतरांची परावलंबी स्थिती दूर होणार नाही, हे मर्म जोतीराव फुले यांनी जाणून ब्राह्मणी सत्तेच्या अगदी मर्मस्थानी प्रहार करण्यास सुरुवात केली. जोतीराव यांच्या 'सत्यशोधक समाजा' चे मुख्य मत, ईश्वर व भक्त यांच्यामध्ये दलाल नको, हे आहे. याप्रमाणे ब्राह्मणी मध्यस्थांची जरूर न ठेवता प्रत्येकाने आपली धर्मकृत्ये स्वतः करावीत असा उपदेश त्यांनी सुरू केला. बहुजनसमाज ब्राह्मणी गुलामगिरीत व तज्जन्य अज्ञानात हजारो वर्षे वाढलेला असल्याने सत्यशोधकांच्या कामात पुष्कळ अडथळा येत असतो. अर्थात सुधारकांस अडचणीशी टक्कर देणे भागच पडत असते. असे मत शाहू महाराजांनी व्यक्त केले आहे. (महाराज र. श., आपल्या जातीचा पुढारी करा, २००७)

५. स्वजातीचा पुढारी

ब्राम्हण्यवाद नाकारून स्वहितास प्राधान्य द्यावे त्यासाठी सर्वप्रथम आपल्या जातीमधील चांगला पुढारी नेमणे. त्याद्वारे समाजाची उन्नती होईल असे शाहू महाराजांचे मत होते. त्यासंदर्भात ते असे म्हणतात, आतापर्यंत आम्ही निकृष्ट अवस्थेस पोचण्याचे कारण आम्ही आमचा योग्य पुढारी योजून काढीत नाही. गोड बोलून नावलौकिक मिळविण्याच्या हेतूने, आमच्यापैकी काही अप्पलपोटी मंडळी अयोग्य पुढारी नेमून देऊन अज्ञानी लोकांना फसवितात. पशूपक्षीदेखील आपल्या जातीचा पुढारी करितात. पक्ष्यांत कधी चतुष्पादांचा पुढारी झाला नाही. चतुष्पादांत कधीही पक्ष्यांचा पुढारी नसतो. गाय, बैल, मेंढरे यात मात्र धनगर त्यांचा पुढारी असतो. त्यामुळे शेवटी त्यांना कसाबखान्यात जावे लागते. ज्यांच्याप्रमाणे हजारी एकसुद्धा नसून जे मागासलेल्यांना, खुद्द क्षत्रियांना (ज्यांनी त्यांचा मोंगलापासून बचाव केला व ज्यांचे पूर्वज राम कृष्ण सूर्यवंशी, सोमवंशी क्षत्रिय हे ज्यांच्या देव्हाऱ्यावर आहेत त्यांना) सुद्धा शूद्र म्हणून गोमय काय विष्ठेपेक्षाही अस्पृश्य मानितात व स्पर्श झाला म्हणजे जे स्वत:ची शुद्धी करून घेतात, असे पुढारी काय कामाचे? पाश्चिमात्य देशांत अगर इतर कोणत्याही देशात असले पुढारी कोण कबूल करील? पशुहून काय, गोमय किंवा विष्ठेहूनही कमी दर्जाचे आपल्या बंधू-भगिनींना व देशबांधवांना मानणाऱ्या लोकांनी पुढारी व्हायची इच्छा करणे कितीतरी बेशरमपणाची गोष्ट आहे ! मला ज्या वेळी मुखत्यारी मिळाली, त्यावेळी ब्राह्मणेतर एकही वकील अगर नोकर नव्हता. परंतु त्यांना वकिलीचे ज्ञानामृत पाजल्यापासून ते वाकबगार झाले आहेत. त्याचप्रमाणे अस्पृश्य मानिलेल्या लोकांना नोकऱ्या व स्पेशल केस (Special Case) करून वकिलीच्या सनदा दिल्या आहेत. यात ते इतर लोकांप्रमाणे वाकबगार होतील अशी उमेद आहे. मी लवकरच लोकांना, मसेल्फ गव्हर्नमेंटफथोड्या प्रमाणावर देणार आहे. त्याचा फायदा सर्वांना व विशेषत: अस्पृश्य मानिलेल्यांनाही सारखा मिळावा म्हणून 'कम्युनल रिप्रेझेंटेशन' ही देणार आहे. हिंदुस्थानशिवाय इतर कोणत्याही देशात मनुष्यास जात नाही. परंतु दुर्दैवाने हिंदुस्थानात मात्र जातिभेद इतका तीव्र आहे की, मांजर-कुत्रे किंबहुना शेणापेक्षादेखील कमी, अशाप्रमाणे आम्ही आपल्या देशबांधवांस व भगिनीस वागवितो व अजूनही आम्ही गैरशिस्त पुढारी करितो. म्हणून गरीब लोक अहमदाबाद, अमृतसरसारखे ठिकाणी व मागे मुंबईस झालेल्या दंग्यासारख्या प्रसंगी बळी पडतात. तोंडाने बडबडणारे पुढारी आम्हास नको आहेत. कृतीने जातिभेद मोडून आम्हास मनुष्याप्रमाणे वागवितील असे पुढारी पाहिजेत. (महाराज र. श., आपल्या जातीचा पुढारी करा, २००७)

६. धार्मिक ब्यूराक्रसी

देशाचा उन्नती करायाचे असेलतर ब्राम्हण समाजाने वर्णश्रेष्ठत्व सोडून द्यावे लागेल असे आवाहन करतात. जर ते तसे करीत नसेलतर बहुजन समाजाला त्यांची धार्मिक ब्युराक्रसी मोडून काढण्याचे आवाहन करतात. एका प्रसंगी ते स्पष्ट करतात की जपानातील सामुराई लोकांनी आपला जन्माने प्राप्त झालेला उच्च दर्जा सोडून दिला म्हणून जपानमध्ये ऐक्य होऊन त्या देशाची उन्नती झाली. त्याप्रमाणे ब्राह्मणांनी जातिमत्सर सोडल्याशिवाय लोकांची उन्नती होणार नाही. सर्व जातींना हात देऊन त्यांना आपल्याबरोबर घेऊन सर्वांची स्थिती सुधारणे हे काम क्षत्रियांनी अवश्य केले पाहिजे. ते त्यांचे कर्तव्य आहे. ब्राह्मण लोकांना जन्मसिद्ध धार्मिक बाबतीत श्रेष्ठपणा आहे. त्याच्या जोरावर त्यांची एक मधार्मिक ब्यूराक्रसीफ्च झाली आहे. ही ब्युराक्रसी मोडल्याशिवाय व सर्वास धार्मिक बाबतीत सारखे हक्कमिळाल्याशिवाय कधीही देशोद्धार होणार नाही. यासाठी लोकांनी ब्राह्मणांकडून पूजा करविणे व त्यांच्याकडून धर्मकृत्ये चालविणे, हे सोडले पाहिजे. तसेच त्यांच्याकडून धर्मग्रंथ किंवा कथापुराणे वगैरे ऐकणे हेही सोडले पाहिजे. नाहीतर ब्राह्मणांच्या श्रेष्ठपणाच्या कथाच लोकांच्या कानावर येणार. आमचेच पूर्वज राम- कृष्ण यांची पूजा, ब्राह्मण लोक करितात यावरून ब्राह्मणांचा दर्जा व जात आमच्यापेक्षा हलकी आहे हे उघड आहे. असे असूनही ते आम्हास हीन लेखतात. तेव्हा त्यांना सोडून आमची कामे आम्हीच चालवावीत. (महाराज र. श., जातीभेद मोडून आपण सर्व एक होवू या, २००७)

७. जातवार प्रतिनिधित्व :

शाहू महाराज यांच्या मते, सर्व जातीचे लोक पुढे येऊन सामाजिक, औद्योगिक, शिक्षणविषयक, सरकारी नोकरी वगैरे सर्व बाबतीत आपआपली जबाबदारी पूर्ण करण्याचे सामर्थ्य त्यास येणे म्हणजे 'जातवार प्रतिनिधित्व' (Communal Representation) होय. जनतेला व त्याचप्रमाणे हीन स्थितीतील लोकांस वर काढण्यास हातभार लावणे. ते यासंदर्भात असे स्पष्ट करतात की वयात आलेल्या व आपले हिताहित कळणाऱ्या मुलाकडे लक्ष देण्याची आईबापास जरूरी नसते. पण जी अज्ञान आहेत, ज्यांना चालता येत नाही, ज्यांना धड उभेही राहाता येत नाही त्यांची काळजी आईबापास जास्त घ्यावी लागते. कोणास हाताचा आधार द्यावा लागतो व कोणास उचलूनही घ्यावे लागते. असे करणारे आईबाप योग्यतऱ्हेने आपले कर्तव्य बजावितात असे होते. सर्व मुलांस सारखे वागवीत नसल्याने ते मुलामुलांत पक्षपात करतात असा त्यांच्यावर आरोप करणे हे अधमपणाचे होईल. हेच तत्त्व लक्षात घेऊन अगदी

ISSN No. 2394-5990

निकृष्ट स्थितीत असलेल्या जातीस जास्त उत्तेजन देणे गरजेचे आहे. शाहू महाराजांनी हे सामाजिक न्यायाचे तत्व लागू करताना मागास जातीना नोकऱ्या सढळ हाताने दिल्या. वकिलीच्या सनदाही त्यांना देऊन त्यांचे शिक्षण, दर्जा व महत्त्व वाढविण्यात मोठे योगदान दिले आहे.

या जातवार प्रतिनिधित्वाला काही ब्राम्हण मंडळी कडून विरोध झाला त्यास शाहू महाराजांनी समर्पक उत्तर दिले आहे ते म्हणतात की अलीकडचे काही राजकारणी ब्राह्मण म्हणतात की, ब्राह्मणच आजपर्यंत पुढारीपणा घेत आले व आताही घेत आहेत; म्हणून त्यांचा हेवा वाटून त्यांचे पाय मागे ओढण्याकरिता जातवार प्रतिनिधीसारख्या मागण्या केल्या जात आहेत. पण खरी स्थिती तशी नाही. आमची ब्राह्मणबंधूंस हीच विनंती आहे की, आपण या कामी फार पुढे गेलेले आहात. आपणास धावण्याची शक्ती आहे. आम्ही आता कोठे रांगत आहोत. थोडे थोडे पडतझडत उभे राहाण्याचा प्रयत्न करीत आहोत. आमचे श्रम वाचविण्याकरिता आमच्यावरील प्रेमामुळे आपण आम्हास उचलून नेण्यास तयार आहात. पण आपल्या प्रेमाचा व कळकळीचा परिणाम आमच्या नुकसानीचा होईल. आम्हाला आपण रांगू दिले नाही व पडतझडत उभेही राहू दिले नाही तर आम्ही कायमचे पंगू होऊ. याकरिता आपण आमच्या रांगण्याचे व उभे राहाण्याचे कौतुक करा व उत्तेजन द्या. प्रतिबंध करू नका. आमची धडपड आमच्या अंगी शक्ती येण्यासाठी आहे. आपल्या द्वेषामुळे आम्ही ती करितो ही आपली समजूत चुकीची आहे. (महाराज र. श., जातीभेद मोडून आपण सर्व एक होवू या, २००७)

८. पटेल बिल :

देशाची उन्नती लवकर किंवा उशिरा होणे, हे येथील जातिभेद ज्या प्रमाणात नाहीशा होईल; त्यांवर अवलंबून आहे. हा जातिभेद नाहीशा होण्यास भिन्न भिन्न जातींचे आंतरजातीय विवाहास मान्यता देण्यात यावी यासाठी नामदार पटेल यांनी कायदे मंडळात तशाप्रकाराचे बिल आणले होते त्यास ब्राम्हण्यवादी मंडळीनी मोठयाप्रमाणात विरोध केला होता. शाहू महाराजांनी या बिलास पाठिंबा दर्शवित ब्राम्हण्यवादास विरोध केला.

९. वेदोक्त प्रकरण :

शाहू महारांजाच्या जीवनात वेदोक्त प्रकरण घडले त्यास ऐतिहासिक असे महत्व आहे. या प्रकरणांमुळे एकूणच ब्राम्हण्यवादाचे खरे स्वरूप उघड झाले. या प्रकरणाने ब्राम्हणी अहंगडपणा यातून स्पष्ट होण्यास मदत झाली. साधारतणत: हिंदू धर्म चार वर्णांवर आधारलेला होता. ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य, आणि शुद्र या चार वर्णातील फक्त पहिल्या तीन वर्णाना वेद अध्ययनाचा अधिकार होता. कालांतराने क्षत्रिय आणि वैश्यांचा अधिकार नाकारण्यात आला. याचा परिणाम विशेषत: क्षत्रिय वर्णावर झाला. वर्णाने जे क्षत्रिय असतात ते राजे होतात. पण ब्राम्हणांनी आपले सांस्कृतिक, सामाजिक व राजकीय वर्चस्व टिकविण्यासाठी असे मिथके निर्माण केली की परशुरामाने एकवीस वेळा पृथ्वी नि:क्षत्रीय केले आहे. त्यामुळे जगात क्षत्रिय शिल्लक नाहीत याचा अर्थ त्यांना राज्याभिषेक देखील करून घेता येणार नाही. याच अर्थाने शिवाजी महाराजांचे राज्यभिषेक करण्यास देखील तत्कालीन ब्राम्हणांनी नकार दिला होता.

छ. शाहूच्या स्नानाच्या वेळी त्यांचा उपाध्याय नारायणशास्त्री भटजी नेहमीप्रमाणे मंत्र म्हणत होता. हे राजारामशास्त्री भागवतांनी हे मंत्र लक्षपूर्वक ऐकले आणि ते चकित झाले. हे मंत्र पुराणातील होते. छ. शाहूंचा गाढ परिचय शास्त्रीबुवांना होता. त्यांना छ. शाहूंच्या क्षत्रियत्वाची पूर्ण प्रचीती होती. क्षत्रियांचे संस्कार वेदोक्त मंत्राने झाले पाहिजेत. तसे ते का होत नाहीत, हे जाणून घेण्याची त्यांना उत्सुकता लागली. ते महाराजांना म्हणाले, हा उपाध्याय आपल्या स्नानाच्यावेळी पुराणोक्त मंत्र का म्हणत आहे? महाराजांनाही त्याची कल्पना नव्हती, म्हणून त्यांनी विचारले, तुम्ही पुराणोक्त मंत्र का म्हणत आहात? तेव्हा तो उपाध्याय बेदरकारपणे म्हणाला, महाराज, तुम्ही शूद्र आहात. शूद्रांना पुराणोक्त मंत्रच म्हणावयाचे असतात, किंबहुना त्यासाठी आम्हाला स्नान करून शुचिर्भूतही व्हावे लागत नाही. हे ऐकल्यावर महाराजांना तो आपला अपमान वाटला. आणि हे प्रकरण त्यांनी धडीस लावण्याचे ठरविले. हा संघर्ष सुरूवातील मर्यादीत होते. नंतर ब्राम्हण आपली ताठर भूमिका सोडयाला तयार नव्हते. छत्रपतींना आपल्या अधिकाराचा उपयोग करण्याची पाळी आली. प्रारंभी हा संघर्ष ब्राम्हण व क्षत्रिय यामध्येच होता. नंतर तो ब्राम्हण आणि ब्राम्हणेतर– शुद्र असा बनला व संपूर्ण समाजाला ग्रासून राहिला. यामुळे ब्राम्हणेतर संघटित झाले. पण ब्राम्हण मात्र विस्कळीत झाले. (सांळुखे, २००७)

या वेदाक्त प्रकरणांमुळे एक फायदा सामान्य जनतेस असा झाला की त्यांना ब्राम्हण्यवादाचे विकृतवृत्तीचे दर्शन झाले. त्या विरोधात संघटित होवून आत्मभात निर्माण होण्यास मदत झाली.

निष्कर्ष :

शाहू महाराजांनी विविध सामाजिक, औद्योगिक व जनकल्याणाचे कार्य केले. त्याबरोबरच त्यांनी महत्वपूर्ण कार्य केले म्हणजे बहुजन समाजाला ब्राम्हणी हिंदू धर्मापासून मुक्त

करण्याचे. भारतीय एकात्मतेला आणि हिंदू समाजाला खरा धोका ब्राम्हण्यवादापासूनच आहे हे ओळखनूच त्यांनी याविरूध्द लढा दिला त्यातून अनेक सामाजिक चळवळींना बळ मिळाले. शाहू महाराज सामाजिक समता आणि न्यायावर दृढ विश्वास ठेवणारे होते आणि त्यांनी जातिव्यवस्था संपुष्टात आणण्यासाठी आणि समाजातील सर्व घटकांना त्यांची जात किंवा लिंग पर्वा न करता शिक्षण, आरोग्य सेवा आणि रोजगाराच्या संधींना प्रोत्साहन देण्यासाठी कार्य केले.त्यांच्या प्रमुख योगदानांपैकी एक म्हणजे आरक्षण धोरणाची अंमलबजावणी, ज्याने खालच्या जाती आणि जमातींच्या सदस्यांना शिक्षण आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या. त्यांनी आंतरजातीय विवाहांनाही प्रोत्साहन दिले आणि महिलांच्या शिक्षणाचा प्रसार करून त्यांच्या हक्कांसाठी वकिली करून त्यांच्या उन्नतीसाठी कार्य केले. शाहू महाराजांचे सामाजिक विचार उदारमतवाद, लोकशाही, सामाजिक न्याय या तत्त्वांवर आधारित होते. व्यक्तिस्वातंत्र्याचे महत्त्व आणि सर्वांना समान संधी मिळण्याची गरज यावर त्यांचा विश्वास होता. ते शिक्षणाचे खंबीर पुरस्कर्ते होते आणि ते सामाजिक आणि आर्थिक प्रगतीची गुरुकिल्ली आहे असा त्यांचा विश्वास होता.

एकंदरीत, शाहू महाराजांचा सामाजिक विचार पुरोगामी आणि पुढचा विचार करणारा होता आणि समाजसुधारणेच्या कार्यात त्यांचे योगदान पिढ्यानपिढ्या लोकांना अधिक न्यायी आणि न्याय्य समाजासाठी कार्य करण्यास प्रेरित करत आहे.

References :

- महाराज, र. श. (२००७). आपल्या जातीचा पुढारी करा. In ज. पवार, राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ (pp. ८४२-८४५). कोल्हापूर: महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी.
- महाराज, र. श. (२००७). आर्यधर्म समता व राष्ट्रैक्य वाढवील. In ज. पवार, राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ (pp. ८२८-८३२). कोल्हापूर: महाराष्ट्र इतिहास प्रबोधनी.
- महाराज, र. श. (२००७). जातीभेद मोडून आपण सर्व एक होवू या. In ज. पवार, राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ (pp. ८४६-८५३). कोल्हापूर: महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी.
- महाराज, र. श. (२००७). शिक्षणानेच आमचा तरूणोपाय आहे. In ज. पवार, राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ (pp. ८१७-८२०). कोल्हापूर: महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी.
- सांळुखे, आ. ह. (२००७). राजर्षी शाहू आणि वेदोक्त प्रकरण. In ज. पवार, राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ (pp. ४२० – ४२९). कोल्हापूर: महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी.

■■■

ISSN No. 2394-5990

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या जडणघडणीतील ब्रिटिशांचे विशेषत: गुरु फ्रेजर यांचे योगदान

डॉ. शिल्पा शेटे
श्री पद्ममणि जैन कला व वाणिज्य महाविद्यालय, पाबळ
Email- shilpasrujan@rediffmail.com

राजर्षी छत्रपती शाहू महाराज हे महाराष्ट्रातील अनेक पुरोगामी व्यक्तींपैकी एक महत्वाचे व्यक्तिमत्त्व होय. राजर्षी छत्रपती शाहू हे कोल्हापूरच्या संस्थानाचे राजे होते. त्यांनी आपल्या राज्याचा उपयोग सामाजिक न्याय, समता, आरक्षण, शिक्षण, अस्पृशोद्धार, वस्तीगृह चळवळ, स्त्रियांच्या संरक्षणविषयक कायदे, जातीभेद निवारण चळवळ, त्याचबरोबर कामगार चळवळ, शेती आणि उद्योग धंदे यांचा विकास, मल्लविद्या, शिकार, आणि इतर खेळ इ. ना प्रोत्साहन दिले. त्याचबरोबर विविध कला, लेखक, कवी यांना प्रोत्साहन देणे यांसारख्या अनेक पैलूंसाठी ते प्रसिद्ध आहेत. शाहू महाराजांचे संस्थान हे ब्रिटिश सरकारचे अंकित संस्थान होते. त्यामुळे राज्यकारभार करत असताना त्यांना अनेक मर्यादा पडत होत्या, परंतु त्यांनी शक्य तेव्हढ्या पद्धतीने त्यांचे राज्य लोककल्याणकारी करण्याचा प्रयत्न केला. राजर्षी शाहू महाराजांच्या जडणघडणीमध्ये ज्याप्रमाणे त्यांच्या पिताजींचा वाटा होता, तितकाच ब्रिटिश अधिकाऱ्यांचा आणि त्यातल्या त्यात त्यांचे गुरु फ्रेझर यांचा महत्त्वाचा वाटा होता, असे त्यांच्या एकूणच व्यक्तिमत्त्वावरून वाटते.

१८८२ मध्ये कोल्हापूर संस्थानात रिजन्सी कौन्सिलची स्थापना झाली. त्या संस्थानाचा कारभार पाहण्यासाठी जयसिंगराव उर्फ आबासाहेब घाडगे यांची नियुक्ती झाली. आबासाहेब घाडगे हे कागल जहागिरीचे अत्यंत कर्तुत्ववान, सुशिक्षित, सुसंस्कृत जहागीरदार होते. त्यांचे थोरले पुत्र यशवंतराव यांना कोल्हापूरच्या गादीचे वारस म्हणून 'शाहू छत्रपती' या नावाने १७ मार्च १८८४ रोजी दत्तक घेतले.[१] आपला मुलगा हा एक उत्तम राजा बनावा आणि त्यासाठी त्याला अत्यंत दर्जेदार शिक्षण मिळावे ही त्यांची इच्छा होती. त्यांच्या इच्छेप्रमाणे सुरुवातीला कोल्हापूरचे राजनीतिक प्रतिनिधी कर्नल रिव्हर्स यांनी छत्रपतींच्या शिक्षणाबाबत बाबासाहेबांशी सविस्तर चर्चा करून त्यासंबंधी काही महत्त्वाचे निर्णय घेतले होते. त्या निर्णयाप्रमाणे त्यांनी शाहू छत्रपतींच्या शिक्षणावर खास देखरेख करण्यासाठी राजनीतिक उपप्रतिनिधी फिटझीरॉल्ड यांची सातशे रुपये पगारावर नेमणूक केली होती. दरबाराला शाहू छत्रपती यांच्या शिक्षण व याच्या प्रगतीसंबंधी त्यांनी जे पत्रक सादर केले, त्या पत्रकात ते सांगतात, ''मी त्यांच्यावर देखरेख ठेवण्याचे काम सुरू करताच प्रथम त्यांच्या पूर्व अभ्यासाची, ज्ञानाची कसोटी घेतली. सरकारी शाळेतील त्यांच्या वयाच्या मुलांइतकाच काय शाहू छत्रपतींचा अभ्यास झाला होता हे माझ्या लक्षात आले.''[२] त्यानंतर त्यांना शाहू महाराजांच्या इंग्रजी भाषेची अधिकाधिक तयारी करून घेण्याची आवश्यकता वाटली आणि त्यानुसार त्यांना गोखले हे शिक्षक नेमले गेले. राजांच्या इंग्रजी भाषेच्या तयारीसाठी विशेष ग्रंथांचा वापर केला. याच पत्रकात भारताचा इतिहास, भारताचा आणि आशिया खंडाचा भूगोल यांचा सखोल अभ्यास व्हावा या पद्धतीने त्यांची रचना केली गेली. जगाचा प्राथमिक भूगोल त्यांना माहीत झाला पाहिजे याचीही काळजी घेतली गेली. तसेच युरोपचे राजकीय विभाजनही त्यांनी अभ्यासले. चित्रकलेचेही प्राथमिक शिक्षण त्यांना दिले गेले.[३] त्यानंतर शाहू राजे, त्यांचे धाकटे बंधू बापूसाहेब, त्यांचे चुलते काकासाहेब व दत्ताजी इंगळे यांच्या शिक्षणाची व्यवस्था फिटझिरॉल्ड यांनी राजकोट येथे केली. त्याचबरोबर कृष्णाजी गोखले व हरिपंत गोखले या शिक्षकांचीही नेमणूक केली गेली. त्याचबरोबर आबासाहेब घाडगे यांच्या विश्वासातील सरदार बुवासाहेब इंगळे यांनाही त्यांच्याबरोबर पाठविले.[४] तेथे शिक्षण घेत असतानाच शाहू राजेंच्या वडिलांचे निधन २० मार्च १८८६ रोजी त्यांच्या वयाच्या अवघ्या तिसाव्या वर्षी झाले. तेव्हा शाहू राजांचे वय बारा होते. त्यांच्या मातोश्रींचे निधन आधीच म्हणजे शाहू राजांच्या वयाच्या तिसऱ्या वर्षीच झाले होते.[५] आबासाहेबांचे निधन झाले, त्यावेळी कोल्हापुरचे पोलिटिकल एजंट पदावर ली वॉर्नर हे आबासाहेबांचे घनिष्ट मित्र होते. ते उदारमतवादी व सुसंस्कृत होते. आबासाहेब मृत्युशय्येवर असताना आपल्या मुलांचे शिक्षण एखाद्या विद्वान आणि हुशार अशा ब्रिटिश पालकांच्या हाताखाली व्हावे, अशी त्यांनी इच्छा व्यक्त केली होती.[६] अशा वेळी त्यांना चांगल्या, आधुनिक, पुरोगामी व सर्वांगीण विकास होईल अशा स्वरूपाचे शिक्षण देणे ही जबाबदारी ली वॉर्नर या इंग्रज अधिकाऱ्यावर येऊन पडली.

त्यानुसार त्यांनी ११ जून १८८९ रोजी अत्यंत उदारमतवादी, संयमी, सालस, प्रेमळ आणि कर्तव्यदक्ष अशा ब्रिटिश आय.सी.एस.अधिकारी स्टुअर्ट मिटफोर्ड फ्रेजर यांची शाहू राजे यांचे गुरु आणि पालक म्हणून नियुक्ती केली.[७] शाहू महाराज आणि त्यांचे सहाध्याही यांच्या शिक्षणाची व्यवस्था करत असताना त्यांचे शिक्षण अत्यंत आनंददायक वातावरणात व्हावे यासाठी फ्रेजर यांनी तयारी केली. त्यासाठी त्यांनी धारवाड या ठिकाणी अत्यंत चांगली जागा शोधून तेथे त्यांना शिक्षण दिले.

फ्रेझर यांच्या मार्गदर्शनाखाली शाहू महाराज व त्यांचे सवंगडी आणि इतर राजपुत्र यांचे शिक्षण सुरू झाले. शाहू महाराजांचा दिनक्रम अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने गुरुवर्य फ्रेजर यांनी ठरविला होता. १८९० मध्ये त्या संदर्भात त्यांनी लिहिलेल्या वृत्तांतात ते म्हणतात, ''सर्व विद्यार्थी सकाळी साडे-सहाच्या दरम्यान उठतात. त्यानंतर ते घोड्यावरून रपेट करणे, लांब चालणे किंवा नेमबाजी इत्यादी व्यायाम बुवासाहेब इंगळे या खास आबासाहेबांनी नेमलेल्या भल्या गृहस्थाच्या मार्गदर्शनाखाली करतात. काही वेळा या मुलांच्या बरोबर इंगळे असतात किंवा काही वेळा मी स्वतः असतो. त्यानंतर सकाळी दहा ते एक आणि पुन्हा दुपारी दोन ते सायंकाळी पाच पर्यंत त्यांचे वर्ग भरतात. त्यानंतर अर्धा तास त्यांची कवायत चालते. मग ते पुन्हा टेनिस, चालणे आणि सारथ्य यामध्ये रमून जातात तर संध्याकाळी ते दांडपट्टा आणि इतर देशी व्यायाम यांचा सराव करतात. असा पुरेपूर शारीरिक व्यायाम झाला की ते संध्याकाळचे जेवण घेतात. मग दुसऱ्या दिवशीच्या अभ्यासाची तयारी सुरू करतात. रविवार किंवा सुट्टीच्या दिवशी ही सर्व मुले मोठी शिकार करण्यात आपला वेळ घालवितात.''[८] या सर्व शिष्यांचा दिनक्रम इतका काटेकोर राखण्यामागे सर्व राजकुमारांचा व सवंगड्यांचा वेळ खूप मजेत आणि आनंदात जावा, तसेच सकाळपासून रात्रीपर्यंत ते सतत अभ्यास किंवा खेळ यामध्ये मग्न रहावेत याची दक्षता त्यामागे घेतली गेली होती. त्यांना आळशी पणाने भटकणे किंवा इतर वाईट गप्पागोष्टी आणि कार्य यांत त्यांचा वेळ वाया जाऊ नये, याची काळजी यामध्ये घेतलेली आपल्याला पाहायला मिळते.

सुरुवातीला १८८९ ते १८९२ या कालावधीत फ्रेझर यांनी शाहू महाराजांना इंग्लिश, गणित, इतिहास, भूगोल, अर्थशास्त्र इ. अनेक विषय शिकविले. आपल्या विद्यार्थ्यांच्या प्रगती विषयी ते नियमितपणे कोल्हापूरच्या पॉलिटिकल एजंटला आपला अहवाल पाठवीत असत. शाहू राजे यांचा अभ्यास कसा सुरू आहे याविषयी ते सातत्याने काळजी घेत असत. एका अहवालात ते म्हणतात, ''शाहू राजे हे स्वभावाने निकोप सरळ मनाचे दिलदार व सत्यनिष्ठ आहेत. आपलेच ते खरे असे ते मुळीच म्हणणार नाहीत, त्यांच्या स्वभावातील निस्वार्थीपणा आणि विचारांचा सखोलपणा यांची उदाहरणे मी पाहिलेली आहेत. त्यावरून ते जसे दिसतात तसेच स्वभावाने आहेत.''[९]

फ्रेजर यांनी आपल्या शिष्यांना सर्व पद्धतीचे शिक्षण दिले. शिक्षणामध्ये त्यांनी मुलांना विविध विषयांचे शिक्षण देत असतानाच त्यांनी राजधर्माचे संकेत कसे पाळावेत, त्याचबरोबर विविध प्रकारे शिकार कशी करावी, लढाई कशी करावी, तसेच विविध क्रीडा प्रकार शिकविले. उदा. राजर्षी शाहू महाराज यांना कुस्ती हा क्रीडा प्रकार अत्यंत आवडत असे आणि त्याप्रमाणे त्यांनी स्वतःचे शरीरही कमविले होते. अशा रीतीने सर्व पद्धतीचे शिक्षण देत असताना त्यांना एक सुसंस्कृत, लोककल्याणकारी, सर्वच दृष्टीने आधुनिक व सुयोग्य नेतृत्त्व निर्माण होईल याची खबरदारी त्यांचे गुरु फ्रेजर यांनी घेतली. त्याचाच परिणाम पुढील काळामध्ये राजर्षी शाहू महाराजांच्या संपूर्ण राज्यकारभाराच्या पद्धतीमध्ये तसेच व्यक्तीमत्त्वामध्ये दिसून येतो.

महाराजांच्या शिक्षणाच्या प्रगतीबद्दल गुरु फ्रेझर यांनी सविस्तर अहवाल लिहिला आहे, त्यात ते म्हणतात, ''शाहू राजे दिसण्यात कुशाग्र बुद्धीचे वाटत नाहीत परंतु त्यांचे व्यवहारज्ञान आणि स्मरणचित्र विलक्षण आहे. त्याचबरोबर त्यांना शिक्षण घेण्यात स्वारस्य असून त्यासाठी ते काळजीपूर्वक परिश्रम घेऊ इच्छितात.''[१०] पुढे ते म्हणतात, ''शाहूराजे यांची व्यवहारबुद्धी विशेषत: प्राथमिक राजकीय अर्थशास्त्रामध्ये चालते, असे दिसून येते. या विषयात त्यांनी आपल्या सर्व सहाध्यायांना खूपच मागे टाकले आहे.''[११] शाहू महाराजांचे इंग्रजी सुधारण्यावर विशेष भर फ्रेजर यांनी दिलेला होता. त्यांची इंग्रजी भाषेत संभाषण करण्याची शैली सुधारली असून ते इंग्रजीत सहज आणि अचूक असे संभाषण करू शकतात असा विश्वास त्यांच्या गुरूंनी व्यक्त केल्याचे दिसते. त्याचप्रमाणे जसा जसा त्यांचा भीडस्तपणा जाईल तशी तशी त्यांची प्रगती होत जाईल अशीही त्यांनी आशा व्यक्त केली होती आणि त्या आशा शाहू महाराजांनी पुढे पूर्ण केल्या.

धारवाड येथे शाहू राजे आणि त्यांचे इतर सहाध्यायी यांच्या शिक्षणाच्या अभ्यासक्रमात गुरुवर्य फ्रेझर यांनी राज्यकारभार, कायदे-कानून, प्रशासनातील प्रमुख अधिकारी यांची भूमिका या पाठीमागील तत्त्वांची माहिती व्हावी म्हणून त्यांना न्यायपद्धती, कायदे, भारतीय राजनीतिक निर्बंध यावर अनेक व्याख्याने दिली. त्याचप्रमाणे त्यांनी आतापर्यंत कोल्हापूर संस्थानाबरोबर ब्रिटिश सरकारचे कोणकोणते करार झाले, यासंबंधीचा इतिहासही त्यांना सांगितला इतकेच नव्हे तर यांनी शाहू महाराज व बापूसाहेब या उभय बंधूंना ग्रामीण आणि जिल्हा पोलीस पद्धतीची माहिती दिली. त्यांना दिवाणी, फौजदारी कायदे समजावून सांगितले. त्याचबरोबर त्यांना प्रत्यक्ष न्यायालयात आणून न्यायाधीश कसा

ISSN No. 2394-5990

न्याय देतात, ते पुरावा कसा घेतात इ. संबंधी विविध प्रकारचे ज्ञान दिले. तसेच शाहू राजे व त्यांचे बंधू बापूसाहेब यांना जुन्या आणि नव्या महसूल पद्धतींमधील फरक स्पष्ट करून सांगितला. खेड्यांतील महसुलाचा हिशेब आणि खाजगीकडचा हिशोब कसा ठेवायचा यांचेही धडे दिले. हे शिक्षण घेत असतानाच अंकगणित, बीजगणित, प्राथमिक तंत्रज्ञान, इंग्लंडचा इतिहास, अर्थशास्त्र, हिंदू कायदा आणि मुस्लिम कायदा यांतील साम्य आणि भेद इ. शिक्षणही दिले.[१२] फ्रेझर यांनी कायदा, न्यायदान पद्धती, इंडियन पिनल कोड इ. वर एक छोटासा तीन महिन्यांचा कारभार व्यवस्थेचा अभ्यासक्रम तयार करून तो शाहू महाराजांना शिकविला.[१३]

शाहू महाराजांना एका संस्थानाचे महाराज म्हणून राज्य करण्यासाठी गुणवंत राजा बनविणे हे फ्रेझर यांचे उद्दिष्ट होते आणि त्याच दृष्टिकोनातून फ्रेझर यांनी राजर्षी शाहू महाराजांच्या शिक्षणाची व्यवस्थित आखणी केली. त्यासाठी त्यांनी शिक्षणात औपचारिक शिक्षणाबरोबरच वर्गाबाहेरील म्हणजेच अनौपचारिक, व्यावहारिक शिक्षण दिले. त्यासाठी त्यांनी ज्या ज्या भागांमध्ये इतिहास घडला तो तो प्रदेश शाहू महाराजांनी पहावा, यासाठी त्यांना देशभरातील काही महत्त्वाच्या भागांमध्ये सहली काढून तेथील भौगोलिक, ऐतिहासिक, सामाजिक इ. सर्व पद्धतींची माहिती मिळावी, याची व्यवस्था केली. याबाबत त्यांचे मत होते, 'आपल्या देशातील लोकस्थिती काय आहे, सामाजिक व धार्मिक आचार विचार काय आहेत यांचीही कल्पना त्यांना येणार होती.'[१४] या दृष्टिकोनातून फ्रेझर यांनी आपल्या अभ्यासक्रमात शाहू महाराजांचे उत्तर व दक्षिण हिंदुस्तानचे दौरे आयोजित केले. या दौऱ्यांत फ्रेझर जातीने उपस्थित होते. त्यानुसार नोव्हेंबर १८९० मध्ये त्यांचा उत्तर हिंदुस्थानचा दौरा त्यांनी काढला. त्यामध्ये नाशिक पासून बनारस, अलाहाबाद, कलकत्ता, दार्जिलिंग, आग्रा, फतेहपुर सिक्री, दिल्ली, जयपूर, अजमेर, मुंबई असा प्रवास केला आणि तिथून ते कोल्हापूरला परतले. हा प्रवास एकूण ५००० मैलांचा होता. या प्रवासात त्यांच्या ज्ञानात व अनुभवात मोठीच भर पडली. नाशिक, बनारस यांसारख्या तीर्थक्षेत्री पुरोहितांनी ज्या प्रकारे धर्माचा बाजार मांडलेला होता तो पाहिल्यावर राजर्षी शाहू महाराजांना त्याची उबग आली.[१५] असाच अनुभव त्यांना हैदराबाद शहरातील बाजारपेठेत फेरफटका मारत असताना अल्लाच्या नावाने भिक्षा मागत येणाऱ्या फकीरांचा आला.[१६] थोडक्यात नाशिकच्या तीर्थस्थळी आलेला अनुभव आणि हैदराबाद शहरात आलेला अनुभव हे दोन्हीही भिक्षूक व फकीर यांची एकच जात आहे ती म्हणजे देवाधर्माच्या नावावर लोकांना लुटणे ही होय, असेच त्यांना वाटले. मुहूर्त, पाप-पुण्य यासारख्या गोष्टींवर राजांचा विश्वास नव्हता, हेही दौऱ्यात लक्षात आले, असे फ्रेझर यांनी नोंदविले आहे.[१७]

या उलट दार्जिलिंग येथील हिमालयाच्या बर्फाच्छादित प्रदेशांच्या विलोभनीय दर्शन त्यांना अत्यंत आवडले. त्यानंतर दुसऱ्या वर्षी नोव्हेंबर १८९१ मध्ये फ्रेझर यांनी त्यांचा दक्षिण भारत आणि श्रीलंका या प्रदेशांचा दौरा आयोजित केला. या दौऱ्यामध्ये त्यांनी विजापूर, हैदराबाद, मद्रास, पाँडेचेरी, तंजावर, तुतिकोरीन, कोलंबो, कँडी या ठिकाणांना भेटी दिल्या. परतीच्या प्रवासात त्यांनी बंगलोर आणि म्हैसूर ही शहरे सुद्धा पाहिली. या दौऱ्यात हैदराबाद, तंजावर व म्हैसूर या ठिकाणी शाहू महाराजांचे उत्स्फूर्त स्वागत झाले आणि त्यांची तेथील राजांशी मैत्रीही झाली. श्रीलंकेच्या ब्रिटिश गव्हर्नरने त्यांना सन्मानाची वागणूक दिली.[१८]

१८९२ च्या आक्टोंबर मध्ये त्यांचा तिसरा अभ्यास दौरा सुरू झाला. या दौऱ्यात बडोदा, जयपूर, जोधपुर, अलवार, भरतपूर, मथुरा, आलाहाबाद, हरिद्वार, अमृतसर, लाहोर, पेशावर, मुलतान, कराची आणि शेवटी मुंबई या ठिकाणी छत्रपती शाहू महाराज जाऊन आले. तंजावरच्या राजवाड्यातील दिवाणखाने, त्या दिवाणखान्यातील कौशल्यपूर्ण रचना, एका दरबार हॉलमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा पाहून शाहू महाराज भारवून गेले. तेथील सरफोजी भोसले यांचे २०००० होऊन अधिक संस्कृत ग्रंथ असणारे प्रचंड ग्रंथालय शाहू महाराजांनी पाहिल्यानंतर त्यांना खूप आनंद झाला. याशिवाय तेथे अनेक दुर्मिळ इंग्रजी ग्रंथही होते.[१९] याशिवाय तंजावर मध्ये प्रशस्त मंदिरे भव्य राजवाडे आणि अनेक मनमोहक इमारती त्यांना पाहायला मिळाल्या आणि मोठ्या गौरवाने त्यांनी त्यांच्यावरचा उल्लेख 'दक्षिणेची दिल्ली' असा केला.

शाहू राजांचे धारवाड येथील शिक्षण संपत असताना त्यांचे आचार्य गोखले हे निवृत्त झाले. आचार्य कृष्णाजी गोखले यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली आणि अतिशय कडक शिस्तीत शाहू महाराजांचे शिक्षण झाले होते. त्यांच्याविषयी फ्रेझर म्हणतात, ''श्रीयुत गोखले हे महाराजांना अगदी लहानपणापासून ओळखतात. त्यांच्या प्रकृतीविषयी आणि शिक्षणाविषयी त्यांनी मनःपूर्वक सतत काळजीही वाहिली. हे फारच चांगल्या वर्तनाचे गृहस्थ असून दयाळू परंतु तितकेच कडक शिस्तीचे चाहते, अति जुन्या वळणाचे तथापि उदात्त विचारसरणीचे असे होते. आपला शिष्य पुढे कसा निपजावा या संबंधी त्यांचे ध्येय फार उच्च होते.''[२०] आचार्य गोखले यांच्या नंतर छत्रपतींचे राजगुरू म्हणून कोणत्या चांगल्या गुरुची शिक्षक म्हणून निवड करावी हा प्रश्न फ्रेझर यांच्या पुढे पडला होता, त्यातून त्यांनी १८९३

च्या जानेवारीत रघुनाथराव सबनीस यांची नेमणूक केली. आचार्य गोखले यांच्या जागी तितकाच समर्थ राजगुरू नेमण्यासाठी फ्रेझर यांनी अपार कष्ट घेतलेले दिसतात. सबनीस यांच्यासारख्या व्यासंगी आणि वक्तशीर, निर्भय आणि निर्व्यसनी, निष्ठावान आणि निश्चयी, चतुर आणि चौकस व सत्य प्रेमी आणि सालस असा राजगुरू शाहू छत्रपतींना त्यांनी मिळवून दिला.[२१]

शाहू महाराजांपूर्वी कोणत्याही कोल्हापूरच्या राजांनी संपूर्ण तालुके फिरून पाहिले नव्हते परंतु गुरु फ्रेझर यांनी शाहू महाराजांना आपल्या संस्थानाचा दौरा काढण्यास सांगितले अर्थात कधी पायी तर कधी घोड्यावरून शाहू महाराजांनी हातकणंगले, इचलकरंजी, शिरोळ, कुरुंदवाड, निपाणी, गडहिंग्लज, आजरा, गारगोटी, दाजीपूर, आंबोली इ. गावांना भेटी दिल्या. या भेटीत त्यांना आपल्या आधिपत्याखाली असणाऱ्या जहागीरदारांची तसेच गावांची माहिती मिळाली. त्या ठिकाणांचा इतिहास, भूगोल, त्या ठिकाणी असणारी सर्वसामान्य जनता, त्यांचे राहणीमान, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक परिस्थिती व त्यातील वैविध्य यांचे त्यांनी अवलोकन केले. तिथे असणारी कला, संस्कृती या सर्वांचे दर्शन राजर्षी शाहू महाराजांना झाले. या राज्यातील आपल्या संस्थानातील प्रत्येक गावातील शाळेत तर ते आवर्जून जात असत. आपल्याच राज्यातील प्राथमिक शाळांची दयनीय अवस्था पाहून राजे व्यथीत होत होते. त्याचप्रमाणे आपल्या राज्यातील लोकांशी सुसंवाद साधून त्यांची सुखदुःखं प्रत्यक्ष त्यांनी पाहिली. बऱ्याच वेळा शाहू महाराज दुपारच्या वेळी शेतातील शेतकऱ्यांच्या बरोबर बसून त्यांच्याबरोबर जेवण सुद्धा करत असत. ते त्यांच्या पुढील जडणघडणीसाठी, वाटचालीसाठी, एक राजा म्हणून प्रजेशी कशा पद्धतीने व्यवहार केला पाहिजे यासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरले.[२२]

आपण जर पाहिले तर राजर्षी शाहू महाराजांनी संपूर्ण भारताचा आणि आपल्या राज्याचा दौरा केलेला असल्यामुळे येथील सामाजिक स्थिती, येथील शेतीची अवस्था, जातीजातीमध्ये असणारा भेद, शिक्षणाच्या बाबतीत लोकांची असणारी उदासीनता व अज्ञान, स्त्रियांची स्थिती या सर्वांचा त्यांचा रीतसर व्यवस्थित अभ्यास झाला होता असे दिसून येते. ज्या प्रजाजनांवर आपण लवकरच राज्य करणार आहोत त्यांची अवस्था काय आहे याचे निरीक्षण केले आणि त्यानुसार पुढील काळात त्यांनी आपल्या राज्यकारभाराची रूपरेषा आखली, असे म्हणावे लागेल.

याच अनुभवांतून पुढे महाराजांनी शेतकऱ्यांसाठी पाणीपुरवठ्याची सोय करण्यासाठी गंगासागर सारखा मोठा तलाव बाधला. राधानगरी या भव्य अशा धरण बांधण्याची योजना हाती घेतली. ते स्वतःच छत्रपती असूनही ब्रह्मणांनी वेदोक्त आणि पुराणोक्त या दोन प्रकारच्या मंत्रोच्चारांमध्ये केलेला भेद आणि त्यातून छत्रपती राजर्षी शाहू महाराजांना शूद्र लेखले गेले हा अनुभव आल्यानंतर राजाला देखील जेव्हा शुद्र लेखले जाते, तेव्हा इतर व्यक्तींची कशा पद्धतीने या ठिकाणी कुचंबना होत असेल, याचा विचार करून त्यांनी ब्राह्मण पुरोहितांची मक्तेदारी मोडून काढण्यासाठी प्रयत्न केले. त्यांनी क्षात्रजतगुरु पद निर्माण केले. त्याचबरोबर ब्राह्मणेतर चळवळ त्यांनी सुरू केली. यातूनच सर्वसामान्य जनतेविषयी होणाऱ्या अन्यायाच्या जाणीवेतून त्यांनी आपल्या राज्यात सामाजिक न्यायाची स्थापना केली. त्यातून समाजातील सर्व वर्गांतील, सर्व वर्णांतील व सर्व जातीतील विद्यार्थ्यांना शिक्षण मिळावे यासाठी त्यांनी अनेक शिक्षण संस्था स्थापन केल्या. त्याचबरोबर लांबच्या खेड्यांतून येणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षण घेताना तेथेच राहता यावे, यासाठी त्यांनी वस्तीगृहे निर्माण केली. सुरुवातीला त्यांनी सर्व जाती-धर्मांसाठी एकच वस्तीगृह निर्माण केले होते, परंतु त्या वस्तीगृहाचा अनुभव त्यांना अत्यंत वाईट आल्यामुळे, त्यांनी विविध जातींच्या नुसार वस्तीगृहांची निर्मिती केली. अशा पद्धतीने वस्तीगृहांची चळवळच त्यांनी सुरू केली. त्यांनी त्यांच्या राज्यात अस्पृश्यता नष्ट करण्याचा प्रयत्न केला. अस्पृश्यांना अत्यंत मानाची वागणूक मिळावी यासाठी प्रयत्न करतानाच, राजर्षी शाहू महाराजांनी भारतातील सर्वप्रथम आरक्षण लागू केले.[२३] स्त्रियांच्या संरक्षणाचे कायदे केले, त्याचप्रमाणे स्त्रियांना शिक्षण देण्याचे कार्यही हाती घेतले. शाहू महाराजांचा विवाह राणी लक्ष्मीबाई यांच्याबरोबर झाल्यानंतर राजांनी त्यांच्या शिक्षणाची खास व्यवस्था केली होती. याबाबतही त्यांना गुरु फ्रेझर यांनी मार्गदर्शन केलेले दिसते.[२४] दुर्दैवाने राजर्षी शाहू महाराजांचे दुसरे सुपुत्र प्रिन्स शिवाजी यांचा मृत्यू झाल्यानंतर त्यांच्या सूनबाई यांना त्यांनी आवर्जून शिकविले. त्यांनी राज्यकारभारात लक्ष घालावे हा त्यामागील त्यांचा उद्देश होता.

राजर्षी शाहू महाराज स्वतः इंग्लंडला गेल्यानंतर तेथील मोठे मैदान पाहिल्यानंतर आपल्या येथे अशा प्रकारचे कुस्तीसाठी मैदान असले पाहिजे हे लक्षात घेऊन त्यांनी कुस्तीसाठी सर्वात मोठे मैदान (खासबाग मैदान) कोल्हापूरमध्ये बांधले. त्याचप्रमाणे विविध कामगार चळवळींना त्यांनी प्रेरणाही दिली. हिंदू आणि मुस्लिम यांच्यामध्ये ऐक्य साधण्याचा त्यांनी प्रयत्न केला. मुस्लिमांसाठीही त्यांनी शिक्षण संस्था सुरू केल्या. शेती व त्याचबरोबर शेतीवर आधारित उद्योगधंदे वाढले पाहिजेत आणि सहकार चळवळ यशस्वी झाली पाहिजे यासाठी त्यांनी प्रयत्न केले.

शाहू महाराजांनी सर्वच बाबतीत केलेल्या प्रगतीची दखल फ्रेझर यांनी घेतलेली दिसते. त्यांची तल्लख बुद्धी आणि स्मरणशक्ती यांचे ते कौतुक करतात. शाहू महाराजांच्या विवाहासंबंधी सुद्धा त्यांनी अतिशय विचार केला होता. शाहू राजांचा विवाह करत असताना वधूचे वय, चांगली शरीर प्रकृती, सौंदर्य, बुद्धिमत्ता,

ISSN No. 2394-5990

शिक्षण, कुटुंब परंपरा या सर्व बाबी लक्षात घेऊन तिची निवड करण्याच्या सूचना इंग्रजांनी पुढे दिलेल्या दिसतात. त्यानुसार एक एप्रिल १८९१ रोजी बडोद्याच्या गुणाजीराव खानविलकर यांच्या मुलीशी शाहू महाराजांचा विवाह झाला.[२५] संसार सुरु करण्यापूर्वी फ्रेझर यांनी राजांना त्यासंबंधी अत्यंत महत्त्वाचे मार्गदर्शन केले.[२६]

छत्रपती शाहू महाराज यांचे हे सर्व जे काही व्यक्तिमत्त्व दिसते, त्यात तसेच ते एक सुसंस्कृत व कल्याणकारी राजे बनावेत, यासाठी जे प्रयत्न केलेले दिसतात त्या प्रयत्नांमध्ये त्यांचे गुरु फ्रेझर यांचा अत्यंत महत्त्वाचा वाटा होता. राजर्षी शाहू महाराजांचे शिक्षण संपल्यानंतरही गुरु फ्रेझर यांच्याशी त्यांचा सातत्याने पत्रव्यवहार चालू होता. फ्रेझर हे निवृत्त होऊन इंग्लंडला गेल्यानंतरही राजर्षी शाहू महाराज व फ्रेझर या गुरु शिष्यांमध्ये पत्रव्यवहार सुरू होता. अनेक वेळा एखाद्या ठिकाणी केलेल्या वेगवेगळ्या कायद्यांविषयी, वेगवेगळ्या चळवळीविषयी किंवा एखाद्या शिकारीविषयीची माहिती ते फ्रेझर यांना आत्यानंदाने कळवित असत आणि फ्रेझर हेही आपल्या शिष्याची प्रशंसा करत असत.

थोडक्यात इंग्रजांचे राज्य भारतामध्ये प्रस्थापित झाल्यानंतर इंग्रजांनी येथील अनेक राज्यांवर स्वतःची सत्ता स्थापन केली, तर अनेक राज्य आपल्या अंकित केली. अशा अंकित केलेल्या राज्यांपैकी कोल्हापूर हे राज्य होते. परंतु त्यांनी त्या राज्याच्या होणाऱ्या राजाला सुसंस्कृत, आधुनिक काळातील शिक्षण देऊन अत्यंत उत्तम राजा कसा होईल याचा प्रयत्न केलेला दिसतो आणि या सर्व प्रयत्नांचा परिणाम म्हणून राजर्षी छत्रपती शाहू महाराजांसारखा एक अत्यंत न्यायी, प्रामाणिक, दयाळू, समाजाकडे, आपल्या जनतेकडे पालकत्त्वाच्या भूमिकेतून पाहणारा, शेतकऱ्यांना आणि जनतेला मदत करणारा, त्यांच्यामध्ये शिक्षणाची आवड निर्माण करणारा, त्यांच्यामध्ये मल्लविद्या आणि इतर खेळ यांविषयी जाणीव निर्माण करणारा, स्वतः शिकारीची आवड असणारा, शिवाय समाज आणि संस्कृती इतिहास यांची आवड असणारा असा राजा निर्माण झाला. याचे श्रेय काही प्रमाणात का होईना आपल्याला ब्रिटिशांना विशेषत: फ्रेजर यांना द्यावे लागते. धनंजय कीर यांनी 'शाहू महाराजांचे सल्लागार' या लेखात ज्या चार मुत्सद्द्यांचा उल्लेख केला आहे, त्यात तीन ब्रिटिश अधिकाऱ्यांचा उल्लेख केला आहे.[२७] ब्रिटिशांचे राज्य भारतात स्थापन झाल्याचे ज्याप्रमाणे प्रचंड तोटे भारताला सहन करावे लागले, त्याचप्रमाणे काही गोष्टी ह्या भारतात जमेच्या ठरल्या. त्यातीलच राजर्षी शाहू महाराजांची झालेली जडणघडण हे त्याचे फलित आहे असे वाटते.

संदर्भ :

१. डॉ. जयसिंगराव पवार, राजर्षी शाहू छत्रपती– जीवन व कार्य, ताराराणी बुक सर्विस, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, २०१४, पृ. १४.
२. डॉ. रमेश जाधव, लोकराजा शाहू छत्रपती, गुलाबराव मारुतीराव कारले, सुरेश एजन्सी, पुणे, १९९७, पृ. १२
३. कित्ता, पृ. १३.
४. डॉ. जयसिंगराव पवार, समाजक्रांतीकारक राजर्षी शाहू छत्रपती, मेहता पब्लिकेशन हाऊस, जुलै २०२१, पृ. २९.
५. पूर्वोक्त, राजर्षी शाहू छत्रपती– जीवन व कार्य, पृ. १४.
६. कित्ता, पृ. १५.
७. पूर्वोक्त, लोकराजा शाहू छत्रपती, पृ. २०.
८. कित्ता, पृ. २३.
९. पूर्वोक्त, समाजक्रांतीकारक राजर्षी शाहू छत्रपती, पृ.३०
१०. पूर्वोक्त, लोकराजा शाहू छत्रपती, पृ. २४.
११. धनंजय कीर, राजर्षी शाहू छत्रपती, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, चौथे पुनर्मुद्रण, २०२०, पृ. २४.
१२. पूर्वोक्त, लोकराजा शाहू छत्रपती, पृ. ५३,५४.
१३. संपा. डॉ. जयसिंगराव पवार, राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, प्रकाशक डॉ. जयसिंगराव पवार, कोल्हापूर, द्वितीय आवृत्ती, २००७, पृ.५२२.
१४. पूर्वोक्त, समाजक्रांतीकारक राजर्षी शाहू छत्रपती, पृ.३१
१५. कित्ता, पृ. ३१
१६. पूर्वोक्त, लोकराजा शाहू छत्रपती, पृ. ४१.
१७. कित्ता, पृ. ३५ आणि ४५.
१८. पूर्वोक्त, राजर्षी शाहू छत्रपती, पृ. २९, ३०.
१९. पूर्वोक्त, लोकराजा शाहू छत्रपती, पृ. ४३.
२०. कित्ता, पृ. ५१.
२१. पूर्वोक्त, राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, पृ. ५६१.
२२. पूर्वोक्त, लोकराजा शाहू छत्रपती, पृ. ५५.
२३. पूर्वोक्त, राजर्षी शाहू छत्रपती– जीवन व कार्य, पृ. ३८.
२४. पूर्वोक्त, लोकराजा शाहू छत्रपती, पृ. ५१.
२५. पूर्वोक्त, राजर्षी शाहू छत्रपती, पृ.२८.
२६. कित्ता, पृ. ३०, ३१.
२७. संपा. आमदार पी.बी.साळुंके, राजर्षी शाहू गौरव ग्रंथ, महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग सचिवालय, मुंबई, १९७६, पृ. २२२ ते २२७.

■■■

राजर्षी शाहू महाराज यांचे शैक्षणिक कार्य

डॉ. बब्रुवान केरबाजी मोरे
इतिहास विभागप्रमुख
महात्मा फुले महाविद्यालय
अहमदपूर,जिल्हा लातूर
मो. नं – ९९२३३५१६७८

प्रस्तावना :

राजर्षी शाहू महाराज हे दक्षिण महाराष्ट्रातील कोल्हापूर या लहानशा संस्थानाचे अधिपती होते; परंतु एक संस्थानाधिपती यापेक्षा महाराष्ट्रातील बहुजन समाजाचे महान नेते, हीच त्यांची खरी ओळख होय. शाहू महाराजांच्या हातून कोल्हापूर संस्थानामध्ये लोककल्याणाचा, विकासाची, सामाजिक न्यायप्रस्थापनेची अनेक महत्त्वाची कामे पार पडली. काळाच्या पुढे जाऊन त्यांनी शंभर वर्षांपूर्वी जे कार्य केले, त्याचे महत्त्व आज शंभर वर्षांनंतरही कणभरही कमी झालेले नाही, उलट त्यांच्या कार्याची प्रस्तुतता ही आजही अनेक कामांच्या उभारणीसाठी प्रेरणादायी व स्फूर्तीदायक स्वरुपाची आहे.

सुमारे शंभर वर्षांपूर्वी आपल्या संस्थानात मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा कायदा करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करून बहुजन, दलितांच्या शिक्षणाची पर्यायाने उत्थानाची पायाभरणी शाहू महाराजांनी केली. बहुजनांच्या शिक्षणात खंड पडणार नाही, याची दक्षता घेणारा शाहू महाराज हा एक आगळा प्रजाहितदक्ष लोकराजा होता. येथील बहुजन समाजावर त्यांनी इतके उपकार करून ठेवले आहेत की, बहुजन समाजाने त्यांना आपले दैवतच मानले आहे.

जीवनपरिचय :

राजर्षी शाहू महाराजांचा जन्म २६ जून, १८७४ रोजी कागलच्या घाटगे घराण्यात झाला. त्यांचे मूळ नाव यशवंत, त्यांच्या वडिलांचे नाव जयसिंगराव तर आईचे नाव राधाबाई होते. कोल्हापूर संस्थानाचे राजे चौथे शिवाजी महाराज यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या पत्नी आनंदीबाई यांनी १७ मार्च १८८४ रोजी यशवंतरावांना दत्तक घेतले, व 'शाहू' हे नाव ठेवले. हे स्थळ आता विश्रामधाम म्हणून ओळखले जाते.

समजुदारपणा, संयम, समानता, बुद्धीचातुर्य, या गुण वैशिष्ट्यांमुळे त्यांची कार्यक्षमता उत्तम होत. १८९१ साली शाहु महाराजांचा विवाह लक्ष्मीबाई यांच्याशी झाला. राज्य रोहनानंतर २८ वर्षे बडोदा संस्थानाचे प्रजापतीपालक राजे म्हणून शाहु महाराजांनी जनतेच्या आणि समाजाच्या विकासाच्या दृष्टिकोनातून कार्य केले. समाजात स्त्री आणि पुरुषांना समान दर्जा आहे हा वैचारिक दृष्टिकोन त्यांच्या कार्यातून दिसून येतो.

शैक्षणिक दृष्टिकोन :

राजर्षी शाहू महाराजांच्या काळात बहुजन समाज शिक्षणापासून वंचित राहिला होता, शिक्षण ही फक्त वरिष्ठ वर्गाचीच मक्तेदारी बनली होती. येथील बहुजन समाजाच्या मागासलेपणाचे एक महत्त्वाचे कारण त्याच्यातील शिक्षणाचा अभाव होय, ही गोष्ट शाहू महाराजांनी ओळखली. म्हणून बहुजन समाजात शिक्षणाचा प्रसार घडवून आणण्याच्या कार्याला त्यांनी अग्रक्रम दिला.

उपेक्षित समाजाला शैक्षणिक प्रवाहात आणण्या– साठी विविध प्रकारच्या शाळा शाहु महाराजांनी सुरू केल्या. ज्याच्या माध्यमातुन समाजपरिवर्तना नवी दिशा मिळाली. त्यात खालील प्रकारच्या शाळाचा समावेश होतो. प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, पुरोहित शाळा, युवराज/ सरदार शाळा, पाटील शाळा, उद्योग शाळा, संस्कृत शाळा, सत्यशोधक शाळा, सैनिक शाळा, बालवीर शाळा, डोंबारी मुलांची शाळा,कला शाळा ह्या आहेत.

ग्रीक तत्त्ववेत्ता अरिस्टॉटल म्हणाला होता, की राजा हा तत्त्ववेत्ता असला पाहिजे. राजर्षी शाहू ख–च्या अर्थाने तत्त्ववेत्ता राजे होते. तत्कालीन राजांची बांधिलकी ही भोग, विलास, कुटुंब विकास आणि केवळ मांडलिकत्वापुरती मर्यादित होती. शाहू महाराजांची बांधिलकी ही गरीब, अज्ञानी, दुबळ्या अस्पृश्यांप्रती होती, हे त्यांच्या भाषणांमधून दिसून येते. पीडितांचे अश्रू पुसणे, हेच त्यांचे जीवित कार्य होते. विशेषत: शिक्षणाच्या माध्यमातून दुबळ्यांचे सशक्तीकरण होऊ शकेल, ही त्यांची पक्की धारणा होती. खामगाव येथील शिक्षण परिषदेत बोलताना ते म्हणाले, की शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती नाही, असे इतिहास सांगतो.

महाराज हे निव्वळ बोलके सुधारक नव्हते, तर कर्ते सुधारक होते. म्हणूनच आपल्या संस्थानात १९१७मध्ये मोफत व सक्तीच्या

ISSN No. 2394-5990

शिक्षणाचा कायदा त्यांनी केला. राज्यारोहण प्रसंगी संस्थानात १९० शाळा आणि ११,३९९ विद्यार्थी शिक्षण घेत होते. सन १९२२ मध्ये ५९० शाळा आणि ३१,०९६ विद्यार्थी शिक्षण घेत होते. शिक्षणावर सहा टक्के खर्च करणारा हा पहिला राजा होय.

आपल्या जन्मदिनी (१९०२) या राजाने संस्थानात अस्पृश्य समाज घटकांसाठी ५० टक्के आरक्षणाची घोषणा केली. केवळ घोषणाच नाही, तर तसा आदेशही काढला. शाहू महाराज येथेच थांबले नाहीत, तर मागासलेल्या लोकांना त्यांच्या प्रगतीसाठी भावी राज्यघटनेत 'जातवार प्रतिनिधीत्व' मिळाले पाहिजे (१८९८) असा क्रांतदर्शी विचार मांडला. मजूर, शेतकरी व स्त्रिया हे मागासलेले वर्ग होत. त्यांनी हक्कांसाठी एकत्र येणे गरजेचे आहे, अशी त्यांची दृढ धारणा होती.

अस्पृश्यांनी आपल्या हक्कांप्रती सजग राहिले पाहिजे, हे त्यांचे मत होते. महाराजांनी माणगावच्या परिषदेत 'आपल्या जातीचा पुढारी करा,' असे म्हणत, बाबासाहेब हेच आता अस्पृश्यांचे नेते आहेत. त्यांच्यापासून आपण प्रेरणा घ्यावी, असा भविष्यवेधी विचारही मांडला. त्यातून त्यांचे बाबासाहेबांवरील अढळ प्रेम आणि कर्तृत्वावरील अभिक्रमावरचा विश्वास दिसून येतो.

राजर्षी शाहूंना मजुरांप्रती कळवळा होता. श्रमिकांबद्दल ममत्व होते. मजूर वर्गामध्ये हक्कांची जाणीव निर्माण झाली पाहिजे. संघटनात्मक बांधणी झाली पाहिजे. त्यांना आपल्यातल्या स्वत्वाची ओळख घडली पाहिजे, यासाठी मुंबई व परळ येथे भरलेल्या कामगार मेळाव्यास त्यांनी संबोधित केले. या दोन्ही भाषणांमध्ये त्यांनी आपल्या हक्कांसाठी झगडा व भारतातही ब्रिटनप्रमाणे मजुरांचे संघ निर्माण झाले पाहिजेत, असा पथदर्शी विचार मांडला. मजुरांमध्ये लढाऊ वृत्तीचे बीजारोपण शाहूंनी केले, असे म्हटल्यास वावगे ठरू नये. केवळ विचार मांडूनच ते थांबले नाहीत, तर कृतीशील कार्यक्रमाची जोडही त्यांनी दिली.

वसतिगृहांची स्थापना :

महाराजांनी त्या दिशेने उचललेले एक महत्त्वाचे पाऊल म्हणजे कोल्हापुरात निरनिराळ्या जातिधर्मांच्या विद्यार्थ्यांसाठी केलेली वसतिगृहांची स्थापना होय. वसतिगृहे ही त्या काळातील एक महत्त्वाची गरज होती; कारण त्या काळी शिक्षणाच्या सोयी फक्त शहरातच उपलब्ध होत्या. ग्रामीण भागातील सर्वसामान्य लोक अतिशय हलाखीच्या परिस्थितीत जीवन जगत होते. साहजिकच, आपल्या मुलांना शिक्षणासाठी शहराच्या ठिकाणी पाठविण्याची कुवत त्यांच्याकडे नव्हती.

शिक्षणाचा प्रसार व्हावा यासाठी राजाज्ञा काढली जे पालक आपल्या मुलांना शाळेत पाठवणार नाहीत त्या पालकांना प्रतिमहिना १ रुपये दंड आकारव्याची कायदेशीर तरतूद केली. मागासलेल्या लोकांना प्रगतीच्या प्रवाहात आणायचे असेल तर त्यांच्यासाठी राखीव जागांची तरतूद केली पाहिजे. हा व्यापक दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून त्यांनी कोल्हापूर येथे संस्थात ६ जुलै १९०२ रोजी मागासवर्गीयांना ५० टक्के जागा राखीव राहतील अशी घोषणा केली व त्वरित अंमलबजावणी करून मागासवर्गीयांना प्रगतीच्या प्रवाहात आणले.

शैक्षणिक वसतिगृहे :

शाहू महाराजांनी सुरू केलेली शैक्षणिक वसतिगृहे खालीलप्रमाणे आहेत. ज्याचा परिणाम म्हणजे शिक्षणाचे वारे समाजात वाहू लागले आणि मोठ्या प्रमाणात उपेक्षित, वंचित, मागास समाज शिक्षणाच्या प्रवाहात आला. त्यात प्रामुख्याने व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग हाऊस (१९०१), दिगंबर जैन बोर्डिंग (१९०१), वीरशैव लिंगायत विद्यार्थी वसतिगृह (१९०६), मुस्लिम बोर्डिंग (१९०६), मिस क्लार्क होस्टेल (१९०८), दैवज्ञ शिक्षण समाज बोर्डिंग (१९०८), श्री नामदेव बोर्डिंग (१९०८),पांचाळ ब्राह्मण वसतिगृह (१९१२), श्रीमती सरस्वतीबाई गौड सारस्वत ब्राह्मण विद्यार्थी वसतिगृह (१९१५), इंडियन ख्रिश्चन होस्टेल (१९१५), कायस्थ प्रभू विद्यार्थी वसतिगृह (१९१५), आर्यसमाज गुरुकुल (१९१८), वैश्य बोर्डिंग (१९१८), ढोर चांभार बोर्डिंग (१९१९), शिवाजी वैदिक विद्यालय वसतिरगृह (१९२०), श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊस (१९२०) मुले असतील मुली असतील या दोघांनी खऱ्या अर्थाने देशाचा विकास होणार आहे त्यामुळे सर्वप्रथम त्यांचा विकास होणं गरजेचा आहे हा दृष्टिकोन समोर ठेवून विविध वस्तीगृहाची स्थापना राजश्री शाहू महाराज यांनी केली.

इंडियन ख्रिश्चन होस्टेल (१९२१), नाभिक विद्यार्थी वसतिगृह (१९२१), सोमवंशीय आर्यक्षत्रिय बोर्डिंग (१९२०), श्री देवांग बोर्डिंग (१९२०), उदाजी मराठा वसतिगृह, नाशिक (१९२०),चौथे शिवाजी महाराज मराठा वसतिगृह, अहमदनगर (१९२०), वंजारी समाज वसतिगृह, नाशिक (१९२०), श्री शाहू छत्रपती बोर्डिंग, नाशिक (१९१९), चोखामेळा वसतिगृह, नागपूर (१९२०), छत्रपती ताराबाई मराठा बोर्डिंग, पुणे (१९२०) यांचा समावेश होतो.

अस्पृश्यांच्या उद्धाराची संजीवनी म्हणजे विद्यामृत होय, असे त्यांना वाटत असे. अस्पृश्य वर्गाच्या परिषदेत विचार मांडताना ते म्हणाले, 'अस्पृश्यांनी पूर्वापार चालत आलेल्या धंद्यांना चिकटून न राहता, प्रतिष्ठित व्यवसाय काबीज केले पाहिजेत. अस्पृश्यांनी आपल्या उन्नतीसाठी मि. भीमराव आंबेडकरांचे उदाहरण डोळ्यापुढे ठेवावे.' राजर्षी शाहू

शिक्षणासंबंधी अत्यंत डोळस होते. त्यांनी शिक्षणाचे महत्त्व जाणले होते. आपल्या अनेक भाषणातून त्यांनी शिक्षणाचा महिमा गायला आहे. येथे शाहू महाराज स्वत:ला म. फुलेंच्या शिक्षणासंबंधी मूलभूत चिंतनास जोडून घेतात. गरीब, अज्ञानी आणि दुबळ्या माणसांचे सशक्तीकरण शिक्षणातूनच होऊ शकेल, अशी त्यांची प्रगाढ धारणा दिसून येते.

स्त्रीशिक्षण विषयक दृष्टिकोन :

संस्थानातील स्त्री शिक्षणाची व्यवस्था पाहण्यासाठी त्यांनी स्त्री शिक्षणाधिकाऱ्याचे विशेष पद निर्माण केले होते. ही जबाबदारी रखमाबाई केळवकर यांच्याकडे होती. संस्थानात मुला- मुलींसाठी शाळा होत्याच. पण, मुलींसाठी स्वतंत्र शाळा निर्माण केल्या. मुलींचे उत्तीर्णतेचे प्रमाण वाढावे म्हणून त्यांच्या पास होण्याच्या प्रमाणात शिक्षकांना विशेष इनाम ठेवले. प्रौढ आणि मागास वर्गातील स्त्रियांसाठी सन १९१९ मध्ये विशेष गॅझेट हुकूम जारी करून त्याद्वारे अशा शिक्षणोत्सुक स्त्रियांच्या राहण्या- जेवणाची व्यवस्था दरबारकडून मोफत करण्यात आली. हुशार मुलींना पुढील शिक्षणात प्रोत्साहन मिळावे, म्हणून खास शिष्यवृत्त्या ठेवल्या.

राजकन्या आक्कासाहेब महाराज यांच्या विवाहाप्रित्यर्थ प्रत्येकी ४० रुपयांच्या एकूण पाच शिष्यवृत्त्या इयत्ता चौथीच्या वार्षिक परीक्षेत सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थिनींना देण्यात येत होत्या. मुलींच्या उच्चशिक्षणाच्या बाबतीतही शाहू महाराजांनी उदार दृष्टीकोन ठेवला. राजाराम कॉलेजमध्ये शिकणाऱ्या सर्व मुलींना त्यांनी शिक्षण मोफत केले. शाहू महाराजांनी दोन पातळ्यांवर स्त्री मुक्तीचे कार्य केले एक म्हणजे स्त्री शिक्षित व्हावी यासाठी प्रयत्न केले तर दुसरीकडे स्त्रियांचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण व्हावे यासाठी त्यांनी केलेले कायदे. शाहू महाराजांनी जे स्त्री मुक्तीचे कार्य १९ व्या शतकाच्या सुरूवातीस केले ते २० व्या शतकातील स्त्री मुक्ती चळवळीचे प्रवेशव्दार आहे. शाहू महाराजांनी केलेले स्त्री मुक्तीचे कार्य हे जागतिक दर्जाचे आहे.

राजर्षी शाहू महाराजांनी सामाजिक प्रश्नांवर परखड भाष्य केले आहे. अस्पृश्यता व जातिभेद यांचा प्रश्न, वर्णव्यवस्थेची चिकित्सा, समानतेचे तत्त्व, सामाजिक नीतिमत्ता, विधवा विवाह, पडदा पद्धती, दबलेले समाज घटक (शेतकरी, मजूर आणि स्त्रिया), कृषि कर्म, सहकार तत्त्व इत्यादी बाबींचा त्यांनी ऊहापोह केला आहे. समाज एवढा हीन अवस्थेत का जगतो आहे, याबद्दलही त्यांच्या मनात प्रचंड अस्वस्थता दिसून येते. सामाजिक नीतिमत्तेची वाढ हे समाजसुधारणेचे महत्त्वाचे अंग आहे, असे त्यांना वाटे. म्हणूनच ब्राह्मणेतरांनी सामाजिक हीन स्थितीतून मुक्त होण्याचे युद्ध निकराने लढण्याची आवश्यकता आहे, असे त्यांचे स्पष्ट मत होते. शाहूंनी जातिव्यवस्था मोडण्यासाठी २५ आंतरजातीय विवाह घडवून आणले.

समारोप :

आपले वेगळेपण हे आपल्या समाजाला उन्नत करण्यासाठी वापरणाऱ्या शाहू महाराजांच्या कार्याचे अनेक पैलू आहेत. त्यांच्या प्रत्येक पैलूतून दीनदुबळे व शोषित घटकांबद्दलची तळमळच प्रतित होते. मग, ते मागासवर्गीय असोत, भटके विमुक्त असोत किंवा स्त्रीवर्ग असो त्यांच्या कारकिर्दीचा वाढता आलेख उन्नतीच्या पाऊलखुणा दर्शवतो. धर्माविषयी शाहूंचे मूलभूत असे आकलन, चिंतन होते. धर्म हा नीतिवान, चरित्र्यसंपन्न व शीलवान नागरिक घडविण्यासाठी आवश्यक आहे, असे त्यांचे मत होते. धर्माच्या बाबतीत त्यांनी जी दोन भाषणे नवसारी (गुजरात) आणि भावनगर (सौराष्ट्र) येथे दिली, त्यातून त्यांचा धर्मासंबंधी दृष्टिकोन दिसून येता. आर्यधर्म समता व राष्ट्रैक्य वाढवील आणि आर्यधर्म विश्वव्यापी धर्म बनेल, अशी त्यांची मांडणी होती. अर्थात, शाहूंवर आर्यधर्म आणि सत्यशोधक समाज यांचा प्रभाव अनुभवण्यास मिळतो. वास्तविक पाहता, धर्माच्या बाबतीत अतिशय परखडपणे ते म्हणाले, 'व्यक्तीच्या दृष्टीने धर्माची बाब महत्त्वाची असेल; पण राष्ट्रीय बाबतीत ती केव्हाही आड येता कामा नये. यापुरती धर्म ही बाब फारच कमी महत्त्वाची आहे, असे मला वाटते.'

धर्माच्या बाबतीत असे विचार विसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकात मांडणे, धाडसीपणाचेच होते.अनेक सामाजिक समस्यांचा वेध घेतलेला दिसून येतो. विषयांतील वैविध्य, समकालीन प्रश्नांची जाण आणि भान, दुबळ्या माणसांच्या सक्षमीकरणासंबंधी मूलभूत विचार, स्त्री-शुद्रांप्रती कळवळा, पक्की वैचारिक बैठक, आपल्या विचारांवर, भूमिकांवर ठाम राहण्याची वृत्ती, श्रमिक (शेतकरी, मजूर), अस्पृश्य, वंचित, उपेक्षित वर्ग समूहांना प्रकाशात आणण्याची धडपड, परखडपणा, सामाजिक नीतिमत्ता, बौद्धिक स्वातंत्र्य, मागासलेल्या समाजाचा उद्धार, व्यापार, धंदे, कारखानदारी इत्यादी अनेक सामाजिक, धार्मिक, राजकीय व आर्थिक विषयांचा ऊहापोह त्यांनी केला आहे. यातून त्यांच्यात असलेली अभ्यासू वृत्ती, चिंतनाची खोली, नम्रतेचा गुण, आपलेपणाची भावना पाहायला मिळते. स्वातंत्र्य हे माणसास प्रिय असले पाहिजे, असा मूलभूत विचारही ते देतात. ते म्हणतात, 'स्वातंत्र्यासाठी जीव द्या, काय वाटेल ते करा; परंतू तुम्हाला जे पशुप्रमाणे वागवितात, त्यांच्यापासून स्वातंत्र्य मिळवा.' शाहूंचा हाच क्रांतदर्शी विचार या शतकात प्रेरणादायी ठरू शकेल.

ISSN No. 2394-5990

संदर्भग्रंथसूची :

१. कठारे अनिल, (२०१५),भारतातील सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळीचा इतिहास, प्रशांत प्रकाशन जळगाव.

२. कुलकर्णी शिल्पा, (२०१२), महाराष्ट्राचे समाज सुधारक, डायमंड प्रकाशन, पुणे.

३. धर्माधिकारी. ए. बी. (२००७), महाराष्ट्रातील समाज सुधारक, चाणक्य महामंडळ परिवार प्रकाशन, पुणे.

४. नांदेडकर. व. गो. (२०११), राजकीय विचार आणि विचारवंत, डायमंड प्रकाशन, पुणे.

५. भगत.रा. तु. (२०१६), राजर्षी शाहू छत्रपती जीवन व कार्य, रिया प्रकाशन,कोल्हापूर.

६. पवार जयसिंगराव,(२००७), राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर

७. जाधव, नरेंद्र (१९८०), महाराष्ट्रातील मानचिन्हे, मॅजेस्टिक प्रकाशन,पुणे.

■■■

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे सामाजिक व शैक्षणिक कार्य

प्रा.डॉ.जयकुमार चंदनशिवे
कन्या महाविद्यालय,मिरज

प्रस्तावना :

आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत अनेक समाज सुधारकांचा मोठा वाटा आहे. इतिहासाने खऱ्या अर्थाने ज्यांची लोकराजे म्हणून नोंद घेतली त्यामध्ये कोल्हापूरचे राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांना अगदी २८ वर्षाचा राजकीय कालखंड लाभला. परंतु या कमी कालावधीत देखील त्यांनी प्रत्येक भारतीयांच्या चिरंतन स्मरणात राहिल असे कार्य केले. कोल्हापूरचे 'कलापूर' केले कोल्हापूरचा संपूर्ण कायापालट करुन सांस्कृतिक वारसा जोपासला. राजर्षी शाहू महाराजांचे कार्य हे सर्वांगीण सर्वासाठी होते. त्यांच्या धोरणांचा व समाज सुधारणाचा शैक्षणिक कार्याचा आढावा अनेक अंगाने घेता येईल. प्रस्तुत निबंधात राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे सामाजिक व शैक्षणिक कार्य असे होते या सर्व समावेशक धोरणाचा परिचय या निबंधातून देण्याचा प्रयत्न केला आहे.

आपल्या संस्थानात राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी बहुजन समाजातील वंचित घटकांसाठी सक्तीचे व मोफत शिक्षण सुरु केले सर्व जाती धर्मांच्या विद्यार्थ्यांना भोजनाची सोय केली. केवळ गरीब परिस्थितीमुळे शिक्षणापासून कुणीही वंचित राहू नये कारण शिक्षण हेच समाज परिवर्तनाचे खरे साधन आहे हे राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी जाणले होते. म्हणून त्यांनी सर्वांगीण सुधारणेसाठी शिक्षणाला प्रथम प्राधान्य दिले.

ज्यांच्याकडे शिक्षण घेण्यासाठी कुवत आहे प्रगतीची साधणे आहेत ते काहीही करुन प्रगती करतील, पण ज्यांच्याकडे काहीच नाही त्यांना शिक्षण कसे मिळणार ? त्यांनाही शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी दिनदुबळ्यांना उभे करण्यासाठी त्यांना मोफत शिक्षण घेताना पोटापाण्याचा प्रश्न आड येवू नये म्हणून वसतिगृहाची उभारणी केली कोल्हापूरात उभ्या राहिलेल्या वसतिगृहात शिकणारी पोरही खेड्यातून, परजिल्ह्यातून आलेली होती. ज्यांच्या कुठल्याच पिढीला शिक्षणाचा गंध नव्हता अशा वंचित घटकातील ही मुलं शिक्षण घेऊ लागली. कोल्हापूर संस्थानात सर्व जाती धर्माच्या मुलांना राहण्यासह भोजनाची व्यवस्था केल्यामुळे बहुजनांना शिक्षण मिळू लागले. हे महत्वाचे कार्य राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी करुन दाखविले. त्यांच्या प्रेरणेतून पुढे महाराजांचा शिक्षणाचा वारसा चालविण्याचे कार्य कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यासारख्या शिक्षणांचा महर्षीने केले. रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून आण्णांनी शिक्षणाची ज्ञान गंगा झोपडीपट्टीपर्यंत पोहचविले.

जातिभेदामुळे पछाडलेल्या हिंदु समाजाचे रोग नाहीसे करण्यासाठी मोफत आणि सक्तीचे शिक्षण हे एकच औषध उपलब्ध आहे असे १९२० च्या नाशिक येथील भाषणात महाराजांनी सांगितले. मी माझ्या संस्थानांत सक्तीचे प्राथमिक शिक्षण सुरु केले असून त्या योगाने पुढची सगळी पिढी सर्वस्वी साक्षर होईल यात शंका नाही असे भाकित ही महाराजांनी केले होते. माझ्या प्रजेला शक्य तेवढ्या लवकर स्वराज्याचे अधिकार देण्याची मला उत्सुकता आहे. अशा प्रकारचे उच्च विचार मनात बाळगूनच महाराजांनी आपल्या कारकिर्दीत अनेक शिक्षणविषयक चळवळी केल्या. महाराजांनी उभारलेल्या शिक्षणमंदिराचा पाया म्हणजे उपेक्षित, वंचित बहुजन वर्गाची मानसिक अथवा बौध्दिक जागृति हे होय. हा पाया त्यांनी प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करुन घातला. तो विस्तृत व बळकट करण्याच्या उद्ययोगास त्यांनी प्रारंभ केला. नवीन शाळा सुरु करुन तेथे वतनदार शिक्षक नेमला. पुढे त्यांनी १९१४ साली पगारी शिक्षक नेमून शाळा सुरु कराव्या व त्यांना वतनी जमिनी दिल्यानंतर पगार बंद करावा असा हुकुम केला.

प्राथमिक शिक्षणासाठी दरसाल एक लाख रुपये खर्च करण्यास महाराजांनी मंजूरी दिली. मंजूर केलेले एक लक्ष रुपये कोणत्या पध्दतीने खर्च करावेत याबाबतची योजना तयार करण्यासाठी त्यांनी एक कमिटी नेमली. या कमिटीच्या शिफारशीनुसार कोल्हापूर शहरांत व संस्थानातील तालुक्याच्या गावांत सक्तीचे शिक्षण देण्याचा त्यांनी १९१६ च्या सप्टेंबर महिन्यात हुकूम केला. या योजनेस विस्तृत स्वरुप देवून निरनिराळ्या खेडयांत ९६ नवीन शाळा उघडल्या, यापैकी पहिली

ISSN No. 2394-5990

सक्तीच्या शिक्षणाची शाळा करवीर पेटयांतील चिखली येथे ४मार्च १९१८ रोजी खुद्द छत्रपती शाहू महाराजांनी उघडली. या योजनेमुळे अनेक खेड्यातील लोकांना प्राथमिक शिक्षण घेण्याची संधी मिळाली.

मुंबईचे नवे गव्हर्नर सर जॉर्ज लॉइड हे १९१९ मध्ये कोल्हापूर येथे आले असता महाराजांनी आपल्या शिक्षणविषयाक धोरणाचा खुलासा केला. महाराज म्हणाले ''माझ्या प्रजेपैकी बलवान (पुढारलेल्या)'' लोकांपेक्षा निर्बल लोकांची मी अधिक काळजी घेत आहे. त्यांची स्थिती पाहून माझे मन अधिक द्रवते व त्यांची स्थिती सुधारण्यासाठी शक्य तेवढा प्रयत्न करणे, हे माझे सर्व कार्यातील मुख्य ध्येय आहे. यातून येथील बहुजनांच्या उच्च शिक्षणासाठी आर्ट्स कॉलेज, औद्योगिक शिक्षण देता यावे तसेच व्यापार विषयक सुधारणा होण्यासाठी सर्व शिक्षण प्रसारक संस्थांनी शिक्षणाकडे वळावे असे मत व्यक्त केले.

शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात १८८३ मध्ये राजाराम कॉलेज सुरु केले. त्या कॉलेजला जोडूनच सर्व जातींच्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह बांधून सर्वांना प्रवेश दिला.

महात्मा फुले यांच्या कार्याची सूत्रे छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या कार्यामध्ये अमंलात आणली. महात्मा फुले यांची स्त्री-पुरुष समानता हे महत्वाचे तत्व होते. ते छत्रपती शाहू महाराजांनी पुढे चालू ठेवले.महिलांसाठी अनेक कायदे केले.महिलांच्या प्रश्नांबाबत आवाज उठवला. राज्यकर्ते म्हणून मानवी हक्कांसाठी छत्रपती शाहू महाराज भक्कमपणे उभे राहिले. आपल्या विधवा सुनेला शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले.

समाजातील स्त्रिया शिकल्या पाहिजेत याविषयी महाराज दक्ष होते, पुरुषाप्रमाणे स्त्रियांनाही शिक्षण मिळाल्यास समाजाची प्रगती होईल. म्हणूनच महाराजानी स्त्रियांच्या शिक्षणाबाबतही भरीव असे कार्य केले. स्त्रियांच्या शिक्षणासंबंधी तत्कालीन समाजात विपरित कल्पना होत्या. अशा पार्श्वभूमिवर तत्कालीन काळात म.फुले, आगरकर, रानडे इ. सुधारकांनी स्त्रियांना शिक्षण देण्यासाठी प्रयत्न केले. अशा कालखंडात छत्रपती शाहुंनी स्त्री शिक्षण हे आपल्या सुधारणावादी कारभाराचा एक भाग म्हणून स्विकारले.

मुलांच्या शाळेत शिक्षण घेणाऱ्या मुलींचे व त्यांना शिकविणाऱ्या शिक्षकांचे महाराजांनी कौतुक केले. शिक्षणात मुलींची संख्या वाढावी म्हणून खास बक्षिस योजना सुरु केली. तसा हुकुम त्यांनी २४ मे १९१७ रोजी काढला. त्यामुळे मुलींच्या शिकणात, गुणवत्तेत व संख्या वाढीवर परिणाय झाला. हुशार मुलींना प्रोत्साहन मिळावे म्हणून छत्रपती शाहू महाराजांनी खास शिष्यवृत्या ठेवल्या होत्या.

उच्च शिक्षणातही मुलींना राजाराम कॉलेज मध्ये मोफत शिक्षण दिले. शिक्षणाचा प्रसार मोठ्या प्रमाणावर होण्यासाठी महाराजांनी हातभार लावला. तसेच नाशिक, पुणे, अमरावती, अमदनगर जळगाव, पढंरपूर येथील अनेक शिक्षण संस्थाना भरीव अशी आर्थिक मदत केली. या सर्व त्यांच्या कार्यावरुन छत्रपती शाहू महाराजांची शिक्षणाविषयी किती दूरदृष्टीची होती हे दिसून येते. तसेच त्यांचे उदात्त धोरण व्यास्मित्वाला, विकासाला चालना देणारे ठरणे.

सामाजिक सुधारणा :

राजर्षी छत्रपती शाहू महाराज विचार व प्रेरणा घेऊन त्यांच्यावर निस्सीमश्रध्दा ठेवून छत्रपती शाहू माहराजांनी वयाच्या १०च्या वर्षापासून करवीर संस्थान सांभाळण्याची जबाबदारी यशस्वीरित्या पार पाडली. यावरुन त्यांच्या बुध्दीची आणि कर्तृव्याची चुणूक दिसून येते. महात्मा फुले यांच्या विचारांचा वारसा घेऊन राजर्षी शाहू महाराजांनी सामाजिक क्रांतीची खऱ्या अर्थाने सुरुवात केली. कोल्हापूर संस्थानाचा कारभार आपल्या हातात घेतल्यानंतर त्यांनी आपली संपूर्ण शक्ती बहुजनांच्या कल्याणासाठी वापरली. वैदोक्त प्रकरणावरुन ते दिसून येते. कोणाच्याही टिकेला भीड न घालता आपली भूमिका ही वास्तववादी व व्यवहारनिष्ठ होती हे दाखवून दिले.

सामाजिक क्रांतीचे पुरस्कर्ते आणि कृतिशील राजे म्हणून छत्रपती शाहू महाराजांकडे पाहिले जाते.विचाराला प्रत्यक्ष जोड देणारा हा कार्यप्रवण राजा होता. भास्करराव जाधव व शाहू महाराज यांनी पडत्या काळात सत्यशोधक समाजाचे पुनरुजीवन करुन सत्यशोधक चळवलीला बळ दिले. मुळात सत्यशोधक चळवळ ही धार्मिर्क व सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यासाठी धडपडणाऱ्या लोकांची चळवळ होती. कोल्हापूरमध्ये राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी १९३३ मध्ये सत्यशोधक शाळेची स्थापना केली. या शाळेचे संचालकत्व ढोणे नावाच्या धनगर समाजाच्या हुशार व कर्तबगार कार्यकर्त्याकडे दिले होते.

माणगाव येथे झालेली अस्पृश्य परिषद ही खऱ्या अर्थाने गाजली. या परिषदेला डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि राजर्षी शाहू महाराज उपस्थित होते. महाराजांनी असपृथ्यना नष्ट करण्यासाठी आपल्या संस्थानात कायदे तयार केले. त्यांचा विकास आणि उध्दार व्हावा म्हणून त्यांना शिक्षण, नोकरी व उद्योगधंदे प्राप्त करुन दिले. त्यामुळे त्यांना माणून म्हणून जगण्याचे बळ मिळाले. भटक्या -विमुक्त जातीतील लोकांना एकत्र करुन त्यांना माणसात आणण्याचे कार्य छत्रपती शाहू महाराजांनी केले ज्याच्या त्याच्या पात्रतेप्रमाणे संस्थानात नोकऱ्या दिल्या.शिक्षण व नोकरी कोणत्याही एका वर्गाची मक्तेदारी

नाही, ती सर्वांसाठी खुली केली. सन १९०२ मध्ये एक क्रांतीकारी निर्णय घेतला. आपल्या संस्थानात जुन्या रुढी परंपरेने चालत आलेल्या वाईट प्रथांना छेद देण्याचा क्रांतीकारी निर्णय घेतला.आठरापगड जाती-जमातीच्या लोकांना नोकरीमध्ये ५०% आरक्षण देवून देशात पहिले कार्य केले. मागासवर्गीय लोकांची सार्वत्रिक होणारी उपेक्षा पाहून त्यांना बहुजनांच्या बरोबर आणण्याचे महान कार्य केले.

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या आरक्षण धोरणाचे परिणाम दूरगामी आणि क्रांतीकारक स्वरुपाचे ठरले. त्यातून परिवर्तनवादी चळवळीने मोठ्या प्रमाणत सामाजिक शैक्षणिक कार्याला वाहून घेतले. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी अस्पृथ्यांच्या उध्दारासाठी केलेल्या कार्यामुळे देशभर अस्पृथ्यांमध्ये जागृती निर्माण होऊन अस्पृथ्यतेची तीव्रता कमी होण्यास मदत झाली.

निष्कर्ष :

समाजाला शोषण मुक्त करण्यासाठी शिक्षणाशिवाय पर्याय नाही शिक्षण हा सामाजिक परिवर्तनाचा मूलमंत्र आहे. शिक्षणातून घडलेला माणूस समाजाला सुशिक्षित व शोषणमुक्त करु शकतो असा राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचा विश्वास होता. शिक्षणाशिवाय समाज परिवर्तन अशक्य आहे. म्हणूनच त्यांनी शिक्षणावर भर दिला. आपल्या संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे करुन समाजातील अज्ञान दूर करणे हा त्यांचा उद्देश होता. तत्कालीय परिस्थिती पाहून आपल्या संस्थानात समाजाची आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक परिस्थिती बदलण्यासाठी शिक्षण हेच महत्वाचे साधत आहे हे जाणले. आपल्या संस्थानात शिक्षणाचा प्रचार व प्रसार करुन बहुजन समाजाला अज्ञानाच्या अंधारातून ज्ञानरुपी प्रकाशाकडे जाण्यासाठी पय्रत्न केले. त्यात यशस्वीही झाले.

थोडक्यात राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी जातीभेद, वर्ण भेद, धर्मभेद अस्पृथ्यता याबरोबरच समाजातील वाईट प्रथा मोडून सर्व समाज व मानव समान पातळीवर आणून त्यांच्यात परिवर्तन घडवून आणले.

संदर्भ :

१) डॉ.पवार जयसिंगराव (संपादक), राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी कोल्हापूर, व्हिनीयावृत्ती २७ जून २००७.

२) लठ्ठे आ.बा.श्री शाहू छत्रपती यांचे चरित्र

३) दै.सकाळ दि.६ मे २०२२ विशेषपान

४) बागल माधवराव, शाहू महाराजांच्या आढवणी

५) संगवे विलास, राजर्षी छत्रपती शाहू महाराज कार्य व प्रभाव एक्स्प्रेस पब्लिशिंग हाऊस, कोल्हापूर २००७

■■■

ISSN No. 2394-5990

राजर्षी शाहू महाराज यांचे शिक्षणातील योगदान

श्रीम. स्वामी आगतराव घावटे
संशोधक विद्यार्थी
जि.प. कन्या प्रा.शा. माढा, सोलापूर
मो.नं. ८२०८४३५९८०

बहुजन समाजाच्या मागासलेपणाचे खरे कारण अज्ञान आहे, असे महात्मा फुले यांनी स्पष्ट केले होते. बहुजन समाजाचा उद्धार करण्याचा मार्ग म्हणजे शिक्षण होय, हे सत्य जाणून शाहू महाराजांनी शिक्षणानेच आमुचा तरणोपाय आहे. असे ठाम मत मांडले. शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती झाली नाही असे इतिहास सांगतो. अज्ञानाने बुडून गेलेल्या देशात उत्तम मुत्सद्दी व लढवय्ये वीर कधीही निपजणार नाहीत. म्हणून सक्तीच्या व मोफत शिक्षणाची हिंदुस्थानला अत्यंत आवश्यकता आहे. हे उद्गार खामगाव येथील अखिल भारतीय शिक्षण परिषदेच्या अकराव्या अधिवेशनात अध्यक्ष पदावरून बोलताना लोकराजा राजर्षी शाहू महाराज यांनी काढले होते.[१]

इंग्रज राज्यकर्त्यांचे प्रयत्न व धोरण :

१८५४ साली वूड साहेबांनी आपल्या खलित्यात हिंदी लोकांना शिक्षण देऊन पाश्चात्य संस्कृतीचे फायदे उपलब्ध करून घेणे हे इंग्रज राज्यकर्त्यांचे पवित्र कर्तव्य असल्याचे सांगून शिक्षणाचीद्वारे सर्व जाती धर्माच्या लोकांना खुली केली त्यानुसार ठिकठिकांनी काही सरकारी खाजगी मिशनऱ्यांच्या शाळा सुरु झाल्या परंतु यातून सर्वांना, शिक्षण उपलब्ध झाले नाही. इंग्रज राज्यकर्त्यांनी शिक्षणप्रसाराबाबत मझिरपणीच्या सिद्धांताचाफ पुरस्कार केलेला होता. वरिष्ठ वर्गाला मिळणारे शिक्षण हळूहळू झिरपत कनिष्ठ वर्गाच्या स्तरापर्यंत पोहचेल असे गृहीत धरून इंग्रजांनी आपले शैक्षणिक धोरण आंमलात आणले परंतु यातून वरिष्ठ वर्गात शिक्षण मिळाले[२] बहुजन समाज संख्येने प्रचंड असल्याने राज्यकत्यांनीही बहुजन समाजास शिक्षण देण्यास जबाबदारी टाढली.

सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा शाहूंचा आग्रह :

शिक्षण हीच सामाजिक सुधारणांची प्रगतीची जननी आहे. समाजातील मागसलेल्या वर्गांची बौध्दिक च गुलामगिरी नष्ट किमान प्राथमिक शिक्षण उपलब्ध करुन देण्याचा सुधारणेचा शाहुनीपुरस्कार केला.[३]

समाज समृद्ध व बलवान करण्यासाठी बहुजन समाजातून उत्तम शेतकरी, उत्तम शिक्षक, उत्तम व्यापारी उत्तम उदयोगपती, उत्तम सैनिक निर्माण झाले पाहिजेत, त्यासाठी गोरगरीब लोकांच्या दारापर्यंत शिक्षण गेले पाहिजे असे त्यांना वाटत होते.

मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा :

आपल्या कोलापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक करावे हा विचार १९१२-१३ च्या सुमारास होता. सार्वत्रिक शिक्षणाचा विचार अमलात आणण्यासाठी महाराजांनी एक अभिनव प्रयोग केला. प्रत्येक खेड्यात एक एक शाळा स्थापन करून शाळेत पगारी शिक्षक न नेमता खेडयातील बहुसंख्य असणाऱ्या समजातून वतनी शिक्षक नेमायचा अशी ती योजना होती. त्यासाठी बापुसाहेब महाराजांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापना केली पण वतनी शिक्षकाचा प्रयोग फारसा यशस्वी झाला नाही.

प्राथमिक शिक्षणाच्या संदर्भात २४ जुलै १९१७ साली प्रसिद्ध केलेल्या जाहिरनाम्यात शाहू महाराजांनी ३० सप्टेंबरपासून करवीर हलाख्यात प्राथमिक शिक्षण मोफत सक्तीचे केले.[४] सर्व प्राथमिक शाळांतील फी सदर दिवसापासून माफ केली. सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची नियमावली तयार करण्यासाठी करमरकर, मराठे व प्रो. पंडीतराव अशा शिक्षणतज्ञांची समिती नेमली. इन्यूकेशन इन्सपेक्टर डोंगरे यांच्याकडे अभ्यासक्रम तयार करण्याची जबाबदारी सोपविली तसेच या सक्तीच्या योजनेवर १ लाख रु खर्च करण्याचे जाहिर केले.

२१ सप्टेंबर १९१७ रोजी सक्तीच्या शिक्षणाचा कायदा खास जाहिरनामा काढून प्रसिद्ध करण्यात आला.[५]

प्राथमिक शिक्षण :

पहिला नव्या सक्तीच्या शाळेचे चिखली येथे ४ मार्च १९१८ रोजी उद्घाटन करण्यात आले. यामुळे सुमारे साडेचार हजाराच्या वर मुले शिक्षण घेवू लागले. शाहू महाराज आपल्या संस्थानाच्या उत्पन्नातून १ लाख रुपये प्राथमिक शिक्षणासाठी खर्च करीत होते ही गोष्ट भारताच्या इतिहासात अपूर्व मानली जाते. महाराजांनी हा पैसा संस्थानातील प्रत्येक घरावर १ रुपया अशा नाममात्र शिक्षण कराच्या रूपाने उभा केला. संस्थानातील

सावकार, वकील, डॉक्टर व दरबारातील वरिष्ठ प्रतीचे अधिकारी यांच्यावर शिक्षणविषयक कर १६ ऑगस्ट १९१८ रोजीपासून बसविण्यात आला

खेड्यामध्ये दरमहा शाळा तपासणी रिपोर्ट करण्याची जबाबदारी मामलेदार व मामलेदार व महालकरी यांच्यावर सोपवली प्राथमिक शिक्षणाच्या संदर्भाने महाराजांनी २ महत्त्वाचे निर्णय घेतले होते. पहिल्या निर्णयानुसार संस्थानातील अस्पृश्यांसाठी असलेला शाळा बंद केल्या. अस्पृश्यांची मुले आता स्पृश्य मुलाबरोबर आता एकत्र शिकू लागली. दुसरा निर्णय शेतकऱ्यांच्या मुलांच्या संदर्भात होता. महाराजांनी खेड्यातील शेतकऱ्यांच्या मुलांनी सकाळी किंवा संध्याकाळी २ तास शाळेत यावे व बाकीच्या वेळ शेतकामात घालवावा अशी सवलत दिली.

विविध धार्मिक संस्कार धर्मशास्त्रानुसार कसे करावे याचे शिक्षण घेण्यासाठी सत्यशोधक शाळा स्थापन केली. समाजातील वाईट चालीरीती मानसिक गुलामगिरी तोडण्यासाठी श्री. शिवाजी वैद्यकीय विद्यालय स्थापन केले. मुलाना लष्करी शिक्षण देण्यासाठी इन्फन्ट्री स्कूल काढले. तसेच तांत्रिक शिक्षणासाठी टेकनिकल इन्सट्यूट सुरु केल्या. खेडेगावातील पाटील लोकांना सरकारी कामकाजाच्या पध्दतीचे शिक्षण देण्यासाठी दिल्ली दरबार पाटील पाठशाळा उघडली. शाहू महाराजांनी शिक्षण कार्य उभे करताना समाजसुधारक न्यायमुर्ती रानडे, गोपाळ कृष्ण गोखले, संस्कृत पंडित रामकृष्ण भांडारकर शिक्षणसंचालक गि. गाईल्स यांच्याशी विचारविनिमय केला. पुढे राजर्षी शाहू महाराजापासून प्रेरणा घेवून कर्मवीर भाऊराव पाटील, कर्मवीर भाऊसाहेब हिटे, हा पंजाबराव देशमुख, डॉ बाबासाहेब आंबेडकर, डॉ. बापूजी साळुंखे यांनी शिक्षण संस्था उभारला.[६]

स्त्री शिक्षण :

संस्थानात मुलामुलींच्या शाळा होत्याच त्याशिवाय खास मुलींच्या स्वतंत्र अशा शाळा होत्या. महाराजांच्या कारकिर्दीत पहिला ४ ते ५ वर्षात भुदरगड सारख्या सह्याद्रीलगतच्या मागासलेल्या भागात मुलींच्या शाळा स्थापन झाला होत्या. मुलीच्या उच्च शिक्षणाच्या बाबतीत राजाराम कॉलेजमध्ये शिकणाऱ्या सर्व मुलीना मोफत शिक्षण केले. महाराजांनी आपल्या सुनेला इंदूमतीदेवींना शिक्षण देवून समाजापुढे आदर्श निर्माण केला. संस्थानातील कोल्हापूरचे राजाराम कॉलेज ब्राह्मणल समाजाच्या उच्च शिक्षणाचे प्रमुख केंद्र बनले.[७]

दलितांसाठी रात्रशाळा :

राजर्षी शाहू महाराजांनी चांभार महार इ. साठी रात्रीची शाळा २८ नोटेबर १९०६ रोजी काढण्यात आली. त्याचप्रमाणे १९०७ साली चांभार व ढोर समाजातील मुलींची शाळा काढणात झाली.

दलितांना मोफत शिक्षण :

दलितांची दयनीय अवस्था लक्षात घेवून महाराजांनी पुस्तके, पाटया, पेन्सिली मोफत देण्यासाठी २५००० रु. मंजूर केले. संस्थानातील सर्व लोकांना सर्वप्रकाराचे शिक्षण २४ नोव्हेंबर १९११ च्या आदेशात मोफत करण्यात आले.[८]

उच्च शिक्षण :

१९१७ साली शाहू महाराजांनी करवीर शंकराचार्याच्या मार्गदर्शनाखाली संस्कृत कॉलेज काढण्याचा अभिनव प्रयोग केला. त्यानुसार २९ जुलै १९१७ रोजी छत्रपती महाविद्यालय या नावाने संस्कृत कॉलेज सुरु झाले. १४ व १९२० साली महाराजांनी तीन विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी अमेरिकेला पाठविले.[९] काही शिष्यवृत्त्या कला कायदा तंत्रज्ञान, वैद्यकीय विषयात उच्च शिक्षण होणाऱ्या घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ठेवल्या होत्या.

संस्थानाबाहेरील संस्थासाठी मदत केलेली दिसून येते त्यामध्ये डेक्कन एज्युकेशन सोसायटी, श्री शिवाजी मराठी सोसायटी, ताराबाई मराठा बोर्डिंग पुणे, श्री उदाजी मराठी बोर्डिंग सोमवंशीय समाज बोर्डिंग नाशिक चोखामेळा बोर्डिंग नागपूर,बनारस हिंदु युनिव्हर्सिटी काशी. इ. अनेक संस्थांना मदत केली. देशातील शिक्षण प्रसाराच्या चळवळीस हातभार लावण्याचे सर्व प्रकारचे प्रयत्न महाराजांनी आपल्या कारकिर्दीत उत्साहाने व ध्येय निष्ठेने केले.[१०]

शाहू महाराजांच्या पुरोगामी व धडाडीच्या शिक्षण धोरणाची दृश्यफले त्यांच्या कारकीर्दीतच दिसून आली. प्राथमिक स्तरावरील विद्यार्थी संख्या वाढत गेली. संसथानातील एकूण विद्यार्थी संख्या १०,८४४ इतकी होती. अस्पृश्य विद्यार्थी संख्या २१८२ होती. कॉलेज विद्यार्थी संख्या ७९ हुन २६५ झाली होती.

शाहू महाराजांच्या शैक्षणिक क्रांतीने कोल्हापूरला शिक्षणकाशी अशी एक वेगळी शैक्षणिक ओळख प्राप्त करुन दिली. संस्थानाच्या महसुलाचा ६% इतका भाग शिक्षण क्षेत्रावर खर्च केला.

संदर्भ :

१) जाधव रमेश, ङ्कराजर्षी शाहू गौरव ग्रंथ, राजर्षी शाहू जनमशताब्दी प्रकाशन, कोल्हापूर तिसरी आवृती २०१६पवार जयसिंगराव (संपा) राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ प्रकाशक, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर द्वितीय आवृत्ती २६ जून २००७ पृ.क्र. ७४.

ISSN No. 2394-5990

२) मन वसंत (संपा.) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे बहिष्कृत भारत आणि मुकनायक प्रकाशन शिक्षण विभाग महाराष्ट्र राज्य मुंबई प्रथमावृत्ती नोव्हेंबर १९९० पृष्ठ ३७५.
३) मुन वसंत (संपा) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे बहिष्कृत भारत आणि मुकनायक प्रकाशन शिक्षण विभाग महाराष्ट्र राज्य मुंबई, प्रथमावृती नोव्हें १९९० पृष्ठ ३७५.
४) Report on the General Administration of Kolhapur - 1906-07 Page-70.
५) बाकल माधवराव लोकराजा राजर्षि शाहू, कोल्हापूर जिल्हा परिषद प्रकाशन, कोल्हापूर १९९५ पान नं.१८.
६) सुर्यवंशी उमेश राजर्षी, लोकराजा फोरम कोल्हापूर २०१८.
७) पानसरे गोविंद – राजर्षी शाहू वसा आणि वारसा (पाचवी आवृत्ती)
८) करवीर सरकारचे गॅझेट भाग –१, १२ जुलै १९१९.
९) शिंदे श्रीपतराव (संपा) राजर्षी शाहू खास अंक १९२३ विजयी मराठा प्रकाशन २००७.
१०) सावंत इंद्रजित, पाटील देविकाराणी, राजर्षी शाहू छत्रपती रयतेच्या राजाचे चित्रमय चरित्र सप्टेंबर २०१७.

■■■

राजर्षी शाहू महाराज यांचे अस्पृश्यद्धाराचे कार्य :

विशेष संदर्भ – राजर्षी शाहू वसा आणि वारसा : एक आकलन

डॉ. शारदा कदम
मराठी विभाग, बहिर्जी स्मारक महाविद्यालय,वसमत,
जिल्हा –हिंगोली. ४३१५१२
ज्ञरज्ञवश.ीहरीवरसारळश्र.लेा

उद्दिष्टे :

१) राजर्षी शाहू महाराज यांचा जीवन परिचय थोडक्यात आढावा घेणे.

२) राजर्षी शाहू महाराज यांनी केलेले अस्पृश्यद्धाराचे कार्य तत्कालीन परिस्थितीत किती महत्त्वाचे होते, याचा वेध घेणे.

३) राजर्षी शाहू महाराज यांनी केलेल्या अस्पृश्यद्धाराच्या कार्याचा थोडक्यात आढावा घेणे.

प्रास्ताविक :

महाराष्ट्राच्या पुरोगामी परंपरेत छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांचे स्थान महत्त्वाचे आहे. त्यांनी आपल्या कार्यकाळात अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. ते अमलात आणले. सर्वसामान्यांचेच नव्हे तर समाजातल्या शेवटच्या माणसालाही समतेने स्वाभिमानाने जगण्याचा अधिकार हा निसर्गदत्त आहे. त्याला त्याच्या जात, धर्म, लिंग इत्यादी वरून ते अधिकार नाकारता येणार नाहीत. हे ठामपणे सांगत पायाभूत घटकांवर लक्ष केंद्रित करणारा राजा अस्पृश्यता निर्मूलन असो की सर्वसामान्यांच्या हक्काचे शिक्षण असो त्यासाठी आग्रही असणारा राजा म्हणूनही छत्रपती शाहू महाराजांची ख्याती आहे. त्यांच्या एकूण कार्यावर प्रकाश टाकणारी राजर्षी शाहू वसा आणि वारसा ही पुस्तिका कॉम्रेड गोविंद पानसरे यांनी जून २०१० मध्ये प्रकाशित केली. या ग्रंथाच्या आज अनेक आवृत्ती प्रकाशित झाल्या आहेत. अल्पावधीत हा ग्रंथ लोकप्रिय झाला. या ग्रंथाच्या मांडणी मधून राजर्षी शाहू महाराजांच्या व्यक्तिमत्त्वातील अनेक पैलू संशोधनात्मकरीत्या समोर आले आहेत.

कॉम्रेड गोविंद पानसरे :

गोविंद पंढरीनाथ पानसरे यांचा जन्म २६ नोव्हेंबर१९३३ मध्ये कोल्हापूर येथे झाला. त्यांचे जीवन अत्यंत संघर्षमय होते. बालवयातच ते सामाजिक चळवळीशी जोडल्या गेले. तळागाळातील वंचित, कामगार, कष्टकरी वर्गासाठी त्यांनी आयुष्यभर लढा दिला. वृत्तपत्र विक्रेता, म्युनिसिपल कॉर्पोरेशन मध्ये शिपाई, प्राथमिक शिक्षक बार असोसिएशनचे अध्यक्ष ते सहयोगी व्याख्याता असा त्यांचा अनेक पैलूंचा प्रवास आहे. साहित्य संपादनही त्यांनी विपुल प्रमाणात केले आहे. त्यात शिवाजी कोण होता? या पुस्तकाने तर विक्रीचा उच्चांक गाठला आहे. त्याचबरोबर राखीव जागा आणि मंडल आयोग, मागासलेले मुस्लिम धर्म जात वर्ग आणि परिवर्तनाच्या दिशा इत्यादी अनेक ग्रंथ त्यांचे प्रकाशित आहेत. अनेक राजकीय चळवळीशी ते जोडले गेले होते. २० फेब्रुवारी २०१५ रोजी कोल्हापूर येथे त्यांचा खून करण्यात आला.

राजर्षी शाहू वसा आणि वारसा :

प्रस्तुत ग्रंथ हा एकूण ५३ पृष्ठांचा असून त्यात एकूण १३ प्रकरणांचा समावेश आहे. यात राजश्री शाहू महाराजांच्या जीवन व कार्यावर अत्यंत अभ्यासपूर्ण विवेचन केले असून वाचकांसमोर अनेक नवे आयाम, पैलू आलेले आहेत. यात झाले बहु पर्या समूहा तथाकथित गुन्हेगार जमाती संबंधी राजर्षी शाहू शिक्षण विषयक भूमिका व कार्य, स्वातंत्र्य आंदोलन आणि शाहू महाराज, शाहू महाराज : वसा आणि वारसा अशी प्रकरणे आहेत. प्रस्तुत ग्रंथामध्ये लेखकाने राजश्री शाहू महाराजांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू वाचकांसमोर आणले. एक राजा म्हणून वावरत असताना शाहू महाराजांनी समाजाच्या सर्वस्तरातील लोकांना न्याय देण्याचा प्रयत्न केला असून हजारो वर्षापासून चालत आलेली अस्पृश्यतेची परंपरा मोडीत काढण्यासाठी भरीव असे कार्य केले. धोरणे आखली ती अंमलात आणली. प्रस्तुत ग्रंथामध्ये लेखक म्हणतात ङ्गविद्येत मागासलेल्या वर्गाच्या जाहीर सभांमधून शाहू महाराजांनी भाषणे करून जागृती निर्माण केली. उत्तर प्रदेशातील कुरमी समाज परिषदेत आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांबरोबर माणगावच्या अस्पृश्य वर्गाच्या परिषदेत मार्गदर्शन केले होते. निराश्रीत सोमवंशीय समाजाच्या सभा अखिल भारतीय बहिष्कृत समाज

ISSN No. 2394-5990

परिषद कर्नाटक ब्राह्मणेत्तर परिषद ज्ञानवर्धक सभा या आणि अशा व्यासपीठावरून शाहू महाराजांनी समाजातील त्या त्या विभागांशी जवळीक साधली होती.[१]

यावरून एखादा राजा आणि त्याची आपल्या प्रजेविषयी असलेली तळमळ स्पष्ट होते. राज्यातल्या शेवटच्या व्यक्तीच्या सुखा-समाधानात आपलं समाधान मानणारा, सामान्यांचे अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण आणि आरोग्य यावर लक्ष केंद्रित करत. शिक्षण सक्तीचे व मोफत देऊन न थांबता शिष्यवृत्ती ही देणारा दृष्टा राजा म्हणून ही शाहू महाराजांचा उल्लेख करता येईल. महार वतन खालसा केल्याने तिजोरीवर ताण पडणार होता तरीही शाहू महाराजांनी महार वतन खालसा केले. या संदर्भात ते म्हणतात, 'माझा खजिना याबाबतीत जरी रीता झाला तरी त्याची मला परवा नाही पण माणसाला माणुसकी पासून वंचित करणारी ही रुढी मला मोडावयाची आहे.'[२]

यावरून छत्रपती शाहू महाराजांचे वंचितांप्रती असणारे प्रेम स्पष्ट होते. छत्रपती शाहू महाराजांना आपल्या हयातीत अनेक प्रकारच्या आव्हानांना सामोरे जावे लागले, तरीही ते आपल्या कार्यावर ठाम राहिले. तत्कालीन परिस्थितीत अस्पृश्यांना मिळणारी वागणूक ही अत्यंत निकृष्ट दर्जाची होती जेव्हा शाहू महाराजांच्या हे लक्षात आले की, अस्पृश्यांना दवाखान्याच्या कंपाउंड वॉलमध्येही येऊ दिले जात नाही. तेव्हा महाराजांनी यामध्ये लक्ष घातलं हा मार्ग तडीस नेला. याप्रसंगी अत्यंत कठोर भूमिका घेत त्यांनी कोणाचीही परवा केली नाही. यासंदर्भात अधिकाऱ्यांना ते म्हणतात, 'एखादा रोगी मग तो स्पृश्य किंवा अस्पृश्य असो तो दरवाज्यात येतात त्याला सभ्यग्रस्त प्रमाणे वागणूक देऊन त्याची तपासणी करावी व त्याला जनावराप्रमाणे बाहेर न घालविता उपचारासाठी दवाखान्यात पाठवावे मेडिकल खात्यातील कोणाही इसमाची असे करण्यास हरकत असेल तर त्याने हा हुकूम झाल्यापासून सहा आठवड्याच्या आत आपला राजीनामा पाठवावा'[३]

यावरून शाहू महाराजांच्या प्रशासनातील शिस्त आणि तत्कालीन जात, धर्म अशा अनेक प्रकारच्या विषमतेच्या कुबड्या लावलेल्या आणि झापड लावलेल्या समाजामध्ये त्यांना अशी कठोर पावला उचलावी लागली आणि त्यांनी ती उचलली. ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. शाहू महाराजांना अनेक प्रकारच्या आव्हानांना सामोरे जावे लागले यावरून शाहू महाराजांचे प्रशासन आणि त्यातली शिस्त स्पष्ट होते. शाहू महाराज कर्ते सुधारक होते. समाजातील विषमता हा मोठा आजार असून तो दूर झाल्याशिवाय समाजाची प्रगती होणे शक्य नाही. जात, धर्म, लिंग, वर्ण यावर भेदाभेद करणे. हे अमानवीय असून समाज त्यामुळे रसातळाला जाऊ शकतो. याची त्यांना पूर्ण कल्पना होती. त्यासाठी त्यांनी अत्यंत धाडसाने पाऊले उचलले. त्यासाठी त्यांना अनेक परीक्षा द्याव्या लागल्या. वेदोक्त प्रकरणा नंतर त्यांना शूद्र म्हटले गेले. त्यांनी या कशाचीही तमा न बाळगता अखंडपणे आपले कार्य चालू ठेवले. ते एका ठिकाणी म्हणतात, 'अस्पृश्य' हा शब्द कोणत्याही माणसाला लावणे फार निंद्य आहे तुम्हास अस्पृश्य मानणाऱ्या पुष्कळ लोकांपेक्षा जास्त बुद्धिमान पराक्रमी सुविचार स्वार्थ त्यागी असे तुम्ही हिंदी राष्ट्राचे घटक आहात. मी तुम्हाला अस्पृश्य समजत नाही. आपण निदान बरोबरीची भावंडे आहोत. आपले हक्क समसमान तरी खास आहेतच.'[४]

यावरून छत्रपती शाहू महाराजांनी केवळ अस्पृश्य उध्दारासाठी धोरणेच आखली नाही तर त्यांनी सातत्याने अस्पृश्यांना विश्वास दिला. समतेचा आणि समानतेचा संदेश देत अनेक सभा परिषदांमध्ये हजेरी लावली. सामूहिक भोजन केले, अस्पृश्यांच्या चहाच्या हॉटेलवर जाऊन चहापानाचा कार्यक्रम घेतला, तत्कालीन परिस्थितीतील त्यांची ही कृती म्हणजे अत्यंत विद्रोही होती. त्यामुळे एक राजा असूनही सामान्य जनतेचा त्यांना रोष पत्करावा लागला वेगवेगळ्या टीकाही झाल्या परंतु शाहू महाराज ठाम राहिले. अगदी चारित्र्य हणनापासून ते विषप्रयोगापर्यंत अनेक आव्हाने त्यांनी पेलले. अस्पृश्यांसाठी अनेक बाबी केल्या त्यात हजेरी देण्याची पद्धत बंद केली. विद्यार्थी वसतिगृह सुरू केले. अस्पृश्यता निवारणाचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. हे शाहू महाराजांचे कार्य अत्यंत ऐतिहासिक म्हणावे लागेल. यासंदर्भात राजश्री शाहू महाराज १९२० साली एका व्याख्यानामध्ये म्हणतात. 'जातीभेद असू द्या असे म्हणणारे पुष्कळ आहेत. हे मत प्रामाणिकपणाचे असल्यास त्यांच्या अज्ञानाची क्यू केली पाहिजे कारण जातीभेदाचे कारण हे जाती द्वेषातच आहे. हे आपण नाकारू शकणार नाही.'[५]

यावरून छत्रपती राजर्षी शाहू महाराजांची तर्कशुद्ध वैचारिक मांडणी स्पष्ट होते. समतेची, एकतेची तळमळ स्पष्ट होते. आपल्या हयातीत अस्पृश्यद्धाराचे काम त्यांनी अत्यंत धाडसाने केले. समाजासमोर समतेचा पायंडा ठेवला. एक राजा काय करू शकतो. याची पुढच्या हजारो पिढ्यांना कल्पना आल्याशिवाय राहणार नाही. महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यात शाहू महाराजांसारखे अनेक पुरोगामी महामानव होऊन गेले, त्यामुळे महाराष्ट्राची एक वैचारिक ओळख निर्माण झाली. शाहू महाराजांचे हे कार्य पुढच्या पिढ्यांनी अखंडपणे पुढे नेणे अपेक्षित होते परंतु सध्या परिस्थितीमध्ये आपापल्या

स्वार्था मध्ये गुरफटलेले राजकीय नेते असो किंवा सर्वसामान्य माणसे त्यांना समाजाच्या अशा अनेक प्रश्नांचं फारसं घेणं देणं असल्याचं सध्या दिसत नाही. आज समाज प्रगतीच्या दिशेने झपाट्याने वाटचाल करत असताना समाजातील मूलभूत प्रश्न तसेच मागे पडत चालले आहेत. राजश्री शाहू महाराजांचा वसा आणि वारसा जपणारी माणसं आज निर्माण होणे अत्यंत गरजेचे आहे. एक राजा किंवा राष्ट्रप्रमुख हा कोणत्याही एका पक्षाचा नसून तो सबंध राष्ट्राचा असतो ही जाणीव आज कुठेतरी मागे पडताना दिसत आहे. त्यामुळे अशा परिस्थितीमध्ये राजर्षी शाहू महाराजांची तीव्रपणे आठवण होणे स्वाभाविक आहे. या संदर्भात लेखक गोविंद पानसरे म्हणतात, 'सामाजिक समतेसाठी शाहू महाराजांनी संघर्ष केला ती सामाजिक समता अजून प्रस्थापित व्हायची आहे सामाजिक समतेसाठीचा संघर्ष आपणास नव्या जोमाने नव्या विचाराने चालू ठेवला पाहिजे. शाहू महाराजांनी १९०२ साली राखीव जागांचा कायदा केला. आज शाहू महाराजांचा जयजयकार करणारे राखीव जागांना विरोध करत आहेत. आपण राखीव जागांना पाठिंबा दिला पाहिजे आणि शाहू महाराजांच्या या कार्याचा वारसा नेटाने पुढे चालवायला हवा.'[५]

तत्कालीन परिस्थितीमध्ये छत्रपती शाहू महाराजांनी अस्पृश्यांसाठी, वंचितांसाठी, स्त्रियांसाठी अनेक महत्त्वपूर्ण तरतुदी केल्या. सर्वांसाठी मोफत शिक्षण हा अत्यंत महत्त्वाचा कळीचा मुद्दा लावून धरला. यासाठी राज्याच्या एकूण उत्पन्नातला वाटा त्यांनी बाजूला काढून ठेवला. त्यांनी केलेले हे अस्पृश्यद्धाराचे कार्य हजारो वर्षानंतरही समाजाला मार्गदर्शक असेच असेल.

निष्कर्ष :

१) पुरोगामी महाराष्ट्राच्या वैचारिक चळवळीतील राजर्षी शाहू महाराज यांना एक महत्त्वाची व्यक्ती म्हणून ओळखले जाते.

२) राजश्री शाहू महाराजांनी ज्या काळात अस्पृश्यद्धारासारखा महत्त्वाचा विषय घेऊन काम केले तो काळ अत्यंत मागासलेला होता.

३) राजश्री शाहू महाराजांनी समतेचा आणि समानतेचा संदेश देत अखंडपणे कसल्याही प्रकारच्या दडपणाला न जुमानता अस्पृश्यद्धाराचे कार्य केले.

संदर्भ ग्रंथ सूची:

१) राजर्षी शाहू वसा आणि वारसा, अँड गोविंद पानसरे, प्रकाशक राजन बावडेकर, लोक वाङ्मय गृह, मुंबई, सातवी आवृत्ती. नोव्हेंबर २०१५ पृष्ठ क्रमांक ५.

२) राजर्षी शाहू गौरव ग्रंथ, संपादन पी. बी. साळुंखे, मुंबई १९७६ पृष्ठ क्रमांक ५०९.

३) राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, डॉ. जयसिंगराव पवार, प्रथम आवृत्ती १९८७ पृष्ठ क्रमांक ७३.

४) राजर्षी शाहू छत्रपती : एक समाज क्रांतिकारक राजा, धनंजय कीर, पृष्ठ क्रमांक ४४.

५) राजर्षी शाहू वसा आणि वारसा, अँड गोविंद पानसरे, राजन बावडेकर, लोक वाङ्मय गृह, मुंबई, सातवी आवृत्ती. नोव्हेंबर २०१५ पृष्ठ क्रमांक ५२

■■■

ISSN No. 2394-5990

राजर्षी छत्रपती शाहूमहाराजांचे सामाजिक सुधारणेचे कार्य

डॉ. रवींद्र पुंजाजी मते
अहमदनगर महाविद्यालय
समाजशास्त्र विभाग
ravindramate1980@gmail.com

गोषवारा (Abstract) :

भारत देश हा अनेक जाती, जमाती, धर्म, भाषा तसेच विविध संस्कृत्यांनी युक्त असा देश आहे. एकूणच भारतात मोठ्या प्रमाणात विविधता असलेली दिसून येते. या विविधते मुळे विषमता, भेदभाव, शोषण, उच्च निच्चता व यातून निर्माण होणारा सामाजिक विषमता ही दिसून येते, ही विषमता भारतीय समाज व्यवस्थेचा अविभाज्य भाग आहे आणि या मुळे एकीची भावना भारतीय लोकांत कमी प्रमाणात दिसून येते या मुळे भारतातील सामाजिक आरोग्य हे तणाव पूर्ण असेलेले दिसून येते. ही जाणीव असणारे फार कमी लोक भारतीय इतिहासात दिसून येतात राजर्षी छत्रपती शाहूमहाराज हे त्यापैकी एक होत. स्वतः उच्च जातीत जन्मास येऊन राजा असून निम्न जाती साठी कार्य करणारी व्यक्ती म्हणून महाराजांची ओळख आहे. तत्कालीन समाजातील सामाजिक विषमता वयाच्या अवघ्या २० व्या वर्षी समाजावून घेऊन सामाजिक विषमता नष्ट करणारा राजा म्हणून त्यांची ओळख आहे. तत्कालीन समाजात असणारे अनेक सामाजिक प्रश्न स्वकीयांना न जुमानता प्रसंगी त्यांचा विरोध पत्करत महाराजांनी सोडवले यात प्रामुख्याने स्त्रियांचे प्रश्न जातीयता, आंतरजातीय विवाह, विधवा विवाह, घटस्फोटाचा कायदा, विधवा-पुनर्विवाह, पडदा पद्धती निषेध, घटस्फोट, वारसा हक्क कायदा, देवदासी प्रथा प्रतिबंध कायदा व स्त्रियांच्या शिक्षणासाठी प्रोत्साहन, या सारखे अनेक प्रश्न महाराजांनी सोडवले या वरून आपणास छत्रपती शाहूमहाराज याचा उद्दात हेतू लक्षात येतो.

प्रस्तावना :

महाराष्ट्रातील थोर समाज सुधारकांनपैकी छत्रपती शाहू महाराज हे नाव अग्रस्थानी असलेले दिसते. १९ व्या शतकात पुरोगामी विचारप्रणालीने प्रभावित असलेल्या महाराष्ट्रातील समाज व्यवस्थेत सामाजिक परिवर्तन घडविण्याचे काम छत्रपती शाहू महाराज यांनी केल्याचे अभ्यासाअंती दिसून येते. आम्ही समाजाचे काही देणे आहोत, समाजाच्या प्रगतीसाठी आपलेही काही योगदान असावे असा उद्दात हेतू महाराजांचा होता. छत्रीपती शाहू महाराजांनी सत्ता हाती घेतल्यानंतर कोल्हापूर संस्थानच्या पहानीत असे दिसले कि तत्कालीन समाज हा अतिशय मागासलेला, निरक्षर, जातीपातीने दुभंगलेला, जातियवादाने फार पोखरलेला होता तसेच शेकडो वर्ष बहुजन समाज हा ज्ञान, सत्ता, संपत्ती या बाबत मागासलेला असल्याचा दिसून आले. त्याचबरोबर चातुर्वर्ण व्यवस्थेमुळे समाज सामाजिक, धार्मिक, आर्थिक क्षेत्रात मागे असल्याचे त्यांच्या निदेर्शनास आले. अस्पृश्य, गरिब यांचे मोठ्या प्रमाणावर शोषण होत असल्याचे त्यांना जाणवले. सामान्य जनता अज्ञान, अंधश्रद्धा, रूढी व पारंपारिक जोखंडात अडकलेली आहे हे ही महाराजांनी ओळखले व तत्कालीन सामाजिक व्यवस्था बदलण्यासाठी शाहू महाराजांनी अनेक उपक्रम राबविण्यास सुरुवात केली.

उदिष्ट्ये :

१. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या कार्याचा आढावा घेणे.
२. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे सामाजिक सुधारणेचे कार्य अभ्यासणे.
३. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या सामाजिक सुधारणा कार्यातून तत्कालीन समाजात आलेल्या परिवर्तनाचा अभ्यास करणे.

संशोधन पद्धती :

'राजर्षी छत्रपती शाहूमहाराजांचे सामाजिक सुधारणेचे कार्य एक समाजशास्त्रीय विश्लेषण' सदर शोध निबंध लेखन कार्या साठी दुय्यम स्रोताचा आधार घेतलेला आहे. या संदर्भात वर्तमानपत्रात आलेली माहिती, छत्रपती शाहूमहाराजां विषयी उपलब्ध असलेले पुस्तके, मासिकातून प्रसिध्द झालेले लेख तसेच इंटरनेट वर छत्रपती शाहूमहाराजां विषयी असणाऱ्या माहितीचा आधार सदर शोध निबंधा चे लेखन करतांना घेतलेला आहे.

विश्लेषणात्मक बाजू :

राजर्षी छत्रपती शाहूमहाराजांच्या सामाजिक सुधारणा कार्याचे समाजशास्त्रीय विश्लेषण :

भारतीय समाज हा पूर्वी पासूनच जाती, धर्म, स्पृश-अस्पृश्य, गरिबी, सामाजिक भेदभाव अशा अनेक बाबींनी युक्त असलेला दिसतो. इतर देशाच्या तूलनेत भारतात अनेक भेद असलेले दिसून येतात या सर्व विषमते मुळे भारत देशात असमानता असलेली दिसते. वेगवेगळ्या काळात वेगवेगळ्या व्यक्तींनी ही सामाजिक परीस्थीती बदलण्याचा प्रयत्न केला त्या पैकी राजर्षी छत्रपती राजर्षी शाहू महाराज हे एक होते. महाराज हे लोकशाहीचा व सामाजिक समतेचा पुरस्कार करणारे होते, 'एकवेळ गादी सोडीन; पण बहुजन समाजाचा उद्धार करण्याचे कार्य सोडणार नाही'[१] या त्यांच्या वक्तव्यावरून लक्षात येते कि त्यांना बहुजन समाजाच्या उद्धाराची किती तळमळ होती. त्यांच्या हातात सत्तेची सूत्रे येताच त्यांनी पहिल्यांदा कोल्हापूर संस्थानातील प्रजेच्या हलाखीची पाहणी केली. संस्थानात साक्षरतेचे प्रमाण अत्यल्प असल्याचे त्यांना जाणवले तसेच मागासलेला समाज, अप्रवाही समाज, समाज हा जाती पातीने दुभंगलेला व जातीयवादाने फार पोखरलेला होता. शेकडो वर्षे अस्पृश्य समाज, बहुजन समाज हा ज्ञान, सत्ता, संपत्ती, शिक्षण अशा अनेक गोष्टींपासून वंचित राहिला होता. चातुवर्ण व्यवस्थेमुळे सामाजिक, धार्मिक, आर्थिक क्षेत्रात मागे होता. अस्पृश्य, गरीब, शेतकरी, मजूर यांचे मोठ्या प्रमाणावर शोषण होत होते. सामान्य जनता भयानक दारिद्र्य, अज्ञान, अंधश्रद्धा, रूढींच्या खाईत बुडाली होती. शिक्षण क्षेत्रात बहुजन समाज बोटावर मोजता येईल इतकाच होता. पाणी, रस्ते, शेती, व्यापार, कला अविकसित होत्या. एकूणच संपूर्ण समाज हा अतिशय मागास (विचार व आचाराने) आहे हे महाराजांनी ओळखले व तत्कालीन समाजात सुधारणा कारणास्तव महाराजांनी प्रयत्न सरू केले.

तत्कालीन समाज व्यवस्थेत जाती व्यवस्था ब्राह्मणांची सर्वात मोठी ताकद आणि बहुजनांची सर्वात मोठी कमजोरी बनलेली आहे हे शाहू महाराज जाणून होते. छत्रपती शाहू महाराजांचे कार्य केवळ त्यांच्या संस्थांना पुरते मर्यादित नव्हते, तर संपूर्ण महाराष्ट्रभर त्यांची पकड होती. तत्कालीन समाजात अस्पृश्य समाजाचे फार हाल होत होते, माणूस म्हणून त्यांच्याकडे कुणी पाहत नव्हते. विषमतेमुळे त्यांचे जीवन पोखरून निघाले होते, भयभीत झाले होते. ''तेंव्हा राजर्षी शाहू महाराजांनी अस्पृश्य जातीच्या लोकांना उपाहारगृहे, दुकाने चालविण्यासाठी आर्थिक मदत केली. सत्यशोधक समाजाची स्थापना करून फुले नंतर ब्राह्मणेतर चळवळीचे नेतृत्व शाहू महाराजांनी केले. अस्पृश्य समाजातील व इतर गरीब समाजातील लोकांना सरकारी नोकऱ्या दिल्या. वकिलीच्या सनदा दिल्या. जातीयता कमी करण्याचा प्रयत्न करून त्यांना मान सन्मानाचे जीवन दिले.''[२] त्याच काळात दलित उद्धाराचे कार्य करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर धडपडत होते हे ही महाराज जाणून होते त्याच बरोबर छत्रपती शाहू महाराजांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याविषयी खूप आदर आणि अभिमान होता, कारण दलितांच्या हिता साठी ते खूप आग्रही होते म्हणून ते स्वतः डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना भेटण्यासाठी मुंबई येथे त्यांच्या घरी गेले. त्यांचा सत्कार केला. त्यांना वृत्तपत्र काढण्यासाठी व इतर शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य करून माणगाव परिषदेत अस्पृश्य व इतर ङ्गबांधवांना त्यांचा परिचय करून देऊन सांगितले की, 'माझ्यानंतर अस्पृश्योउद्धारक म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच असतील.'[३] असा मोठ्या मनाचा राजा म्हणजे राजर्षी छत्रपती शाहूमहाराज हे होते. आपल्याला आज विविध क्षेत्रात शोधूनही असा माणूस सापडणार नाही. म्हणूनच त्यांना यशवंतराव चव्हाण यांनी मोठ्या दिलाचा राजा असे म्हटले आहे. ''ब्रिटीश पर्लमेंट ला मदर ऑफ पर्लमेंट असे मोठ्या अभिमानाने इंग्रज व इतर लोक म्हणतात, त्याच प्रमाणे कोल्हापुरास 'मदर ऑफ बोर्डिंग हाऊस' म्हणजे विद्यार्थी वसतिगृहांची माता असे सार्थ नाव मिळाले आहे.''[४] तत्कालीन समाज व्यवस्था ही चातुर्वर्ण या जोखंडात मोठ्या प्रमाणावर गुरफटून गेली असल्यामुळे आणि प्रत्येकाला जातीनुसार काम वाटून दिले असल्यामुळे अस्पृश्य समाजात प्रगती होत नव्हती. शिक्षण नव्हते. खालच्या वर्गातील माणूस वरच्या वर्गात जाऊ शकत नव्हता. अस्पृश्य लोकांची प्रगती व्हावी, त्यांचे दारिद्र्य दूर होऊन त्यांना प्रतिष्ठा प्राप्त व्हावी, त्यांचे जीवनमान उंचवावे व हे सर्व शिक्षणा शिवाय शक्य नाही हे महाराजांनी जाणले त्याच बरोबर केवळ शिक्षण दिल तरी खालचा वर्ग पूर्ण पणे शिक्षणाच्या प्रवाहात येणार नाही त्या साठी विद्यार्थी वसतिगृहांची स्थापना केली या शिवाय राजर्षी शाहू महाराजांनी अस्पृश्यांसाठी नोकऱ्यांमध्ये पन्नास टक्के जागा राखून ठेवण्याची क्रांतिकारी घोषणा करून २६ जुलै १९०२ ला लंडनहून आदेश काढून क्रांतिकारी पाऊल उचलले आहे. अस्पृश्यांसाठी 'मिस क्लार्क' हे वस्तीगृह स्थापन केले. १५ टक्के शिष्यवृत्तीची घोषणा केली.[५] या सर्व बाबींचा विचार करता असे दिसून येते कि महाराजांनी जातीभेद नामशेष करण्याचा विशेष प्रयत्न केला कारण शाहू महाराजांनी आपल्या आदेशात म्हटले होते की त्यांच्या राज्यातील कोणत्याही कार्यालय आणि ग्रामपंचायतीमध्ये दलित आणि मागासवर्गीयांसह समानतेचा व्यवहार झाला पाहिजे. अस्पृश्यता सहन केली जाणार नाही. दलित लोकांशी मानवीय व्यवहार केला गेला पाहिजे. मनुष्याला

ISSN No. 2394-5990

मनुष्य समजणार नाही तोपर्यंत समाजाचा विकास संभव नाही. त्यांचे म्हणणे होते की समजाच्या उन्नतीसाठी भेदभाव सर्वात मोठी बाधा आहे. जाती आधारित संघटनांचे निहित स्वार्थ असतात आणि अश्या संघटनांना वाव देण्यापेक्षा त्यांना संपवणे गरजेचे आहे असे त्यांना वाटत होते. नाशिक येथील उदाजी मराठा वसतीगृह कोनशीला समारंभात बोलताना महाराज म्हणाले की ''सर्व जातींच्या पुढा–याना माझे सांगणे आहे की, आपली दृष्टी दूरवर ठेवा. पाया पुरते पाहू नका. जातीभेद मोडणे इष्ट आहे, जरूर आहे. जातीभेद पाळणे हे पाप आहे. देशोन्नतीच्या मार्गात हा अडथळा आहे. हा दूर करन्याचे प्रयत्न जोराने केले पाहिजेत, ही जाणीव पक्की धानात ठेवून मग ह्या प्रकारच्या जातीपरिषदा भरवा. जाती बंधने दृढ करणे, जातीभेद तीव्र होणे हा परिणाम अशा परिषदानचा होऊ नये, ही खबरदारी घेतली पाहिजे.''[६] वरील माहिती वरून असे दिसून येते की, शाहूमहाराज हे तत्कालीन सामाजिक विषमते बद्दल खूपच जागरूक होते. या बाबत त्यांनी सामाजिक प्रबोधन तर केलेच पण आपल्या कृतीतून अनेक सामाजिक सुधारणा देखील केल्या व केवळ तत्कालीन समाजातील लोकांना नव्हे तर २१ व्या शतकात देखील छत्रपती शाहूमहाराजांचे कार्य लोकोपयोगी पडत आहे. शाहूमहाराज यांनी तत्कालीन समाजात ज्या सुधारणा केल्या त्याचा परीणाम हा बहुजन समाजावर सकारात्मक झाला मात्र ब्राह्मण वर्गात नाराजीचा सूर दिसून आला. जसे कि लोकमान्य टिळक हे तत्कालीन समाजात संपूर्ण महाराष्ट्रातील ब्राह्मण समजाचे पुढारी होते शाहू महाराजाच्या सामाजिक कार्या बद्दल त्याचा मनात असंतोष दिसून येतो कारण तत्कालीन केसरी वर्तमान पत्रात टिळक असे लिहतात की ''कोल्हापूरचे महाराज यांनी आपल्या राज्यात इतउत्तर रिकाम्या होणाऱ्या जागांपैक अर्ध्या जागा मागासलेल्या लोकास आणि अर्ध्या बामण, शेवणी, परभू, पारशी वगैरे पुढारलेल्या लोकास द्यावयाच्या असा ठराव करूंन त्याचे अंमलबजावणी होण्यासाठी नुकताच प्रसिध्द केला आहे... ही कोटी भ्रामक आणि घातक आहे व त्या पासून ब्राह्मणांचे नव्हे तर संस्थानाचे जास्त नुकसान होण्याचा संभव आहे.... रिकाम्या झालेल्या निम्म्या जागांवर ज्या मागासलेल्या जातीतील लोकांची नेमणूक करावयाची त्यांची योग्यता पहावयाची कि नाही.''[७] अशा प्रकारे टिळकांची असणारी प्रतिक्रिया तत्कालीन समाजातील उच्चभ्रू लोकात शाहूमहाराज प्रती द्वेष निर्माण करणारी होती. परंतु महाराजांनी सर्व बाबींचा विचार न करता आपले समाज कार्य चालू ठेवले.

''स्त्रियांच्या प्रगतीसाठी आणि जातीयता नष्ट करण्यासाठी शाहू महाराजांनी कार्य केले. १९१८ साली त्यांनी आपल्या राज्यात आंतरजातीय विवाहाला मान्यता देणारा कायदा केला. स्वतःच्या घरात धनगर घराण्याची नाते जुळून कृतीत उतरवून आणला. जातीयता कमी व्हावी म्हणून त्यांनी स्वतः काही विवाह घडवून आणले. विधवा विवाहास मान्यता दिली. १९२० मध्ये घटस्फोटाचा कायदा केला.''[८] ज्या काळात स्त्रियांना कोणतेही स्वतंत्र्य नव्हते त्या पूर्ण पणे पुरुष प्रधान मानसिकतेच्या दबावा खाली होत्या तत्कालीन समाजात असे करणे म्हणजे समाजाचा रोष पत्करणे परुंतु तत्कालीन समाजात हे पाऊल महाराजांनी उचलले होते. या वरून शाहू महाराज हे स्त्रियांचा सच्चा पाठीराखा होते हे निदेर्शन येते. ''सामाजात महाराजांनी विधवा – पुनर्विवाह आपद्धर्म असून समाज स्वास्थासाठी असे विवाह अत्यंत आवश्यक असल्याचे मत महाराजांनी स.१९१९ साली कानपूर कुर्मी क्षत्रिय परिषदेत व्यक्त केलं होते''[९] तसेच पडदा पद्धती निषेध घटस्फोट व वारसा हक्क कायदा, देवदासी प्रथा प्रतिबंध कायदा स्त्रियांच्या शिक्षणासाठी प्रोत्साहन, महाराजांनी घेतलेल्या या भुमिकेमुळे हेही तत्कालीन समाजातील स्त्रियांचे स्थान बदलन्यात मदत झाली. छत्रपती शाहू महाराज हे अतिशय कुशाग्र बुध्दीमत्तेचे होते त्या शिवाय ते हे जाणू शकत नाही कि समजाच्या मागासले पणाचे मुख्य कारण हे निरक्षरता हे आहे 'म्हणून राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या सत्तेचा उपयोग या रंजल्या– गांजलेल्या लोकांसाठी केला. शिक्षणाचा प्रचार– प्रसार व्हावा म्हणून १९१६ मध्ये प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करून शाळा, महाविद्यालये, बोर्डिंग, शिष्यवृत्त्या सुरू केल्या. तसे आदेश त्यांनी जारी केले. शाहू महाराजांनी सरकारी नोकऱ्यांत मागास वर्गांसाठी पन्नास टक्के जागा राखून ठेवण्याचा निर्णय घेतला, त्याच्या या कृती मुळे बहुजन समजातील मुले आज ही शिक्षणाच्या प्रवाहात येतांना दिसतात.

राजर्षी शाहू महाराजांचे कार्य हे केवळ अनुसूचित जातींन पुरतेच मर्यादित नव्हते तर अनुसूचित जमाती बद्दल सुद्धा होते हे निदेर्शनास येते. कारण भटक्या जमाती व विमुक्त समजाच्या विकासासाठी महाराज दक्ष होते. शाहूमहाराज हे विशेष करून फासेपारधी या भटक्या जमाती बद्दल दक्ष होते. तत्कालीन काळात महाराजांच्या असे निदेर्शनास आले कि ही जमात समाजासाठी उपद्रवी आहे. महाराजांनी त्यांच्या या उपद्रवी पणाचे कारण जाणून घेतलें व हा उपद्रव कसा कमी करता येईल या साठी उपाय योजना केल्या तसेच त्यांनी त्यांची गुन्हेगारी प्रवृत्ती मागील कारणे जाणून घेतलें व उपाय केले. कवी लहरी हैदर फासेपारध्या बद्दल महाराजांना असे म्हणतात कि ''महाराज तुम्ही जवळ केले तरी काय उपयोग? अद्याप त्याच्या अंगाची घाण जाईना. कपड्यांतील उवा कमी होईनात. महाराज का घेता अशांना जवळ?'' परंतु महाराजांनी त्यांना अतिशय मार्मिक

उत्तर दिले ''अरे असू दे रे. आपल्या देहात सगळी घाणच आहे. सारा देह किड्यांचाच बनलेला आहे.''[१०] वरील माहिती वरून असे दिसते ही शाहूमहाराज हे खरोखरच समाजभान असणारे राजे होते. आपल्या समाजातील कोणत्या स्तरांत काय समस्या आहेत हे महाराज मनोमन जाणून होते. महाराजांनी फासेपारधी समाजाला पहारेकरी, निरोपे, मजूर ई. रोजगाराची क्षेत्रे उपलब्ध करून दिली तसेच त्यातील निवडक लोकांना पोलिसातही दाखल केले. फासे टाकून पक्षी पकडण्याची कला तिचा ही महाराजांनी मोठ्या कौशल्याने उपयोग करून घेतला त्यांच्या शिकार खात्यात अनेक फासे पारधी लोकांना नोकऱ्या दिल्या. या समजाच्या सामाजिक साम्मीलनासाठी महाराजांनी विशेष प्रयत्न केले. गुन्हेगार जमात म्हणून त्यांना कोणी त्रास देऊ नये यासाठी विशेष प्रयत्न केले.

या शिवाय महाराजांनी हिंदू मुस्लीम ऐक्य वर भर दिला कारण हिंदू मुस्लीम वाद हा योग्य नाही या तून हिंसाचार घडू शकतो व सामाजिक आरोग्य धोक्यात येते. जर या दोन धर्मात सलोखा निर्माण केला तर बऱ्याच गोष्टी टळू शकतील म्हणून महाराजांनी प्रयत्न केले. या वरून असे दिसून येते कि शाहूमहाराज महाराज हे समाजभान असणारे राजे होते. वाघ्या-मुरळी प्रतिबंधक कायदा केला. स्त्री पुनर्विवाह कायदा केला. ''जेवढ्या प्रमाणात आंतरजातीय विवाह होतील तेवढ्या प्रमाणात हिंदू समजातील जातीभेद नस्ट होतील.''[११] असे परखड मत महाराजांनी मांडले होते कारण अशा प्रकारचे विवाह हे गरजेचे आहेत या शिवाय दुसरा कोणता ही मार्ग जातीयता कमी करण्यास प्रभावी नाही हे महाराजांनी माहीत होते म्हणूनच की काय महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी 'सर्वांगपूर्ण राष्ट्रपुरुष' अशा शब्दांत त्यांना गौरविलेले आणि त्यांची हीच खरी ओळख आहे यात शंका नाही.

निष्कर्ष :

एकूणच वरील माहितीच्या आधर असा निष्कर्ष निघतो की राजर्षी छत्रपती शाहूमहाराज महाराज हे आपल्या जनते प्रती फार दक्ष होते ते एक तत्कालीन समाज व समाजात असणाऱ्यां त्रुटीचे व विषमतेचे जाणकार होते. महाराज केवळ जाणकारच राहिले नाही तर त्यांनी समाजात असणारा भेदभाव जाणून घेतला व उपयायोजना सरू केल्या व परिवर्तन घडवले. आजच्या परिस्थितीत आजचे राज्यकर्ते शाळा, महाविद्यालये यांना मिळणा-या शिष्यवृत्त्या व अनुदान बंद करीत आहेत. हे समाजहित, देशहिताच्या दृष्टीने घातक आहे. आरक्षीत पदे आज पूर्णपणे भरले जात नाहीत. उलट त्या विषयी गैरसमज पसरविले जाताना दिसतात. आज देशात होत असलेल्या स्त्रियावरील अन्याय अत्याचारावरून आजच्या राज्यकर्त्याचे डोळे उघडणे गरजेचे आहे. परंतु जेंव्हा आपण राजर्षी शाहू महाराजयांचे कार्य आभ्यासतो तेंव्हा असे दिसून येते कि ते सामान्य माणसात मिळणारे, सामान्याच्या हिता साठी झटणारे राजा होते. सामाजिक लोकशाही निर्मितीसाठी शाहू महाराजांनी अतोनात कष्ट उपसले. सर्वांना न्याय मिळावा, माणुसकीचे हक्क मिळावेत, अस्पृश्यांना समानतेची व माणुसकीची वागणूक मिळावी, वैज्ञानिकता त्यांच्या अंगी यावी म्हणून त्यांनी आपल्या सत्तेचा उपयोग केला. यावरून शाहू महाराजांचे मोठेपण हे लक्षात यायला लागते. आज मात्र आम्ही व आमच्या राज्यकर्त्यांनी छत्रपती राजर्षी शाहू महाराजांचा आदर्श बाजूला ठेवला आहे. त्यांचे नाव घेऊन आम्हीही त्यांचेच आहोत म्हणणारेही त्यांच्या विचाराने वागत नाहीत उलट आपल्या सत्तेचा गैरवापर करताना दिसतात. मानवी मूल्य पायदळी तुडवताना दिसतात. ज्या शाहू महाराजांनी लोकशाही निर्मितीसाठी कष्ट उपसले, त्याच लोकशाही धिंडवडे काढताना आजचे राज्यकर्ते आम्हाला दिसत आहेत. असे मात्र आताच्या कुठल्याच राज्यकर्त्यांना वाटत नाही एवढे भयावह चित्र डोळ्यासमोर उभे राहते. स्वार्थासाठी, मतलबासाठी, जातीसाठी, धर्मासाठी राजकारण करणे चालू आहे परंतु मानवतेसाठी, मानवी कल्याणासाठी राजकारण करावे लागते हे मात्र त्यांनी राजर्षी शाहू महाराजांकडूनच शिकायला हवे, त्या पद्धतीनेच आपली सत्ता पुढे घेऊन जायला हवी व सामान्याचे हित जोपासायला हवे.

संदर्भ सूची :

१. https://marathi.thewrite.inchattrap
२. https://marathi.webdunya,comacritical
३. https://marathi.thewrite.inchattrap
४. ग.ल. ठोकळ, कृ.गो. सूर्यवंशी, डॉ. ए. एस. भोसले (संपा.) राजर्षी शाहू गौरव ग्रंथ,महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग सचिवालय, मुंबई, २३ फेब्रुवारी १९७६ , प्रथम आवृत्ती, पृ.क्र.६४.
५. https://marathi.thewrite.inchattrap
६. ग.ल. ठोकळ, कृ.गो. सूर्यवंशी, डॉ. ए. एस. भोसले (संपा.) राजर्षी शाहू गौरव ग्रंथ, महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग सचिवालय, मुंबई, २३ फेब्रुवारी १९७६ , प्रथम आवृत्ती, पृ.क्र.६६
७. डॉ. पवार जयसिंगराव, राजर्षी शाहू छत्रपती जीवन व कार्य, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी कोल्हापूर, १ जानेवारी २०१२, पृ. क्र.३९

ISSN No. 2394-5990

८. ग.ल. ठोकळ, कृ.गो. सूर्यवंशी, डॉ. ए. एस. भोसले (संपा.) राजर्षी शाहू गौरव ग्रंथ,महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग सचिवालय, मुंबई, २३ फेब्रुवारी १९७६ , प्रथम आवृत्ती, पृ.क्र.३०७
९. डॉ. पवार जयसिंगराव, राजर्षी शाहू छत्रपती जीवन व कार्य, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी कोल्हापूर, १ जानेवारी २०१२, पृ. क्र.९१
१०. ग.ल. ठोकळ, कृ.गो. सूर्यवंशी, डॉ. ए. एस. भोसले (संपा.) राजर्षी शाहू गौरव ग्रंथ,महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग सचिवालय, मुंबई, २३ फेब्रुवारी १९७६, प्रथम आवृत्ती, पृ.क्र.१६३
११. तैत्रव पृ.क्र. ८९

■■■

लोकनेता राजश्री शाहू महाराज

प्रा.डॉ.लखपती वासुदेव गायकवाड
कार्यकारी प्राचार्य व इतिहास विभाग प्रमुख
महिला कला महाविद्यालय,उमरेड जि. नागपूर
Emaid-ID-lakhpatigaikwad1973@gmail.com
Mob.No.9604494676

ऐतिहासिक घडामोडीच्या दृष्टीने पाहिले तर महात्मा फुले यांच्या मृत्यूनंतर शाहू महाराजांच्या रूपाने सामाजिक समतेची शक्ती पुन्हा जोर पकडू लागली. त्या काळातील उच्च वर्णीयांनी निर्माण केलेली जुलमी परिस्थिती शाहूना त्यांच्या मनाविरुद्ध समाज सुधारणेच्या संघर्षात त्यांना लोटत होती. राजश्री शाहू महाराजांच्या विचारांना व कृतींना नवीन आकार देत होती.महात्मा फुले यांनी सामाजिक समता न्याय बुद्धीप्रामाण्य यांच्यावर आधारित अशी समाज रचना निर्माण करण्यासाठी जो संघर्ष केला.त्या संघर्षात पुरोगामी सामाजिक शक्ती शाहू महाराजांना पुढे चालवण्याकरिता प्रेरित करीत होती आपले धैर्य निर्भयता व सुधारणावादी सामाजिक दृष्टिकोन यामुळे यामुळे शाहू महाराज महाराष्ट्राचे एक नवविचार प्रवर्तक नेते म्हणून पुढे येऊ लागले. आपला राज्यकारभार सहानभूतीने व कर्तव्यनिष्ठने चालवीत असत. त्यामुळेच ते आपल्या राज्यकारभाराविषयी दुसऱ्यांच्या मनात प्रेम नी आस्था निर्माण करीत असत. शाहू महाराज हे केवळ भिक्षुक ब्राह्मणांना गरीब विधवता आणि जात धर्म निरपेक्ष बुद्धीने आपल्या राज्यातील विद्यार्थ्यांना मदत करीत होते असे नाही तर आपल्या राज्यातील जनतेचे खरे पालक व हितकर्ते करते होते. शाहू महाराज हे एक यशस्वी व लोकप्रिय राज्यकर्ते म्हणून उदयास आले पण त्यांचे आकर्षण व्यक्तिमत्व त्यांच्या अंगी असलेली शहाणभूतीची भावना शाहू महाराजांचे खाजगी जीवनाचा विचार केला तर त्यांची साधी राहणे त्यांना लाभत असलेले कौटुंबिक सौख्य यामुळेच केवळ नव्हे तर आपल्या प्रजेच्या बाबतीत त्यांच्या मनात असलेली तळमळ शासनावरील पूर्ण नियंत्रण यामुळे त्यांना जनतेकडून अनेक आशीर्वाद मिळत होती. एक आदर्श राजा म्हणून त्यांची कीर्ती खूपच पसरलेली होती.

राजश्री शाहू महाराज यांनी राज्यकर्ता म्हणून संपादन केलेले यश त्यांच्या अनेक गुणांची ओळख आपल्याला होत असते. शाहू महाराज हे स्त्रियांच्या शिक्षणाचे कैवारी असल्यामुळे आणि स्त्रियांच्या प्रगतीवर त्यांच्या विश्वास असल्या मुळे त्यांनी कृष्णाबाई केळवकर या हुशार विद्यार्थिनीला मुंबईच्या मेडिकल कॉलेजमध्ये वैद्यकीय शिक्षणासाठी पाठवले होते यावरून त्यांची स्त्रियांच्या बाबतीत कृतज्ञता दिसून येते.राजश्री शाहू महाराज यांनी हिंदू वारसा हक्काचा निर्बंध १७ जानेवारी १९२० रोजी पास केला असता त्या लावलेल्या निर्बंधाप्रमाणे शुद्रांची अनौरस संतती व ब्राह्मण क्षत्रिय वैश्य या तिन्ही वर्णाची अनौरस संतती यांच्या वारसा हक्कांमध्ये जी तफावत होती ती त्यांनी समाप्त केली. नवीन निर्बंधाप्रमाणे ब्राह्मण,क्षत्रिय वैश्य यांच्या अनौरस संततीतील त्यांच्या पित्याच्या मालमत्तेवर वारसा हक्क लागू केला.

शाहू महाराज हे अस्पृश्य वर्गाचे व पददलीताचे कैवारी आहेत अशी त्यांची सगळीकडे कीर्ती पसरलेली होती. अस्पृश्यतेचे निर्मूलन करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्रातील सर्व प्रमुख ठिकाणच्या प्रमुखांना चालना दिली.त्यामुळे सगळीकडे दलित वर्ग शाहूचा जयजयकार करीत होते.त्यांनी अनेक ठिकाणी सभा व परिषदा भरवून शाहू महाराजांना धन्यवाद देत अस्पृश्य वर्गाची मजबूत संघटना करून त्यांचा एक स्वतंत्र पक्ष स्वतःचे प्रश्न लढवण्यासाठी उभा असावा व त्यांनी आपला स्वतःचा नेता आपल्या समाजात निवडून त्यांच्या नेतृत्वाखाली लढावे इतर समाजातील नेत्यांवर विश्वास ठेवू नये यासाठी शाहू महाराज प्रयत्न करीत असत. भेड्यांचे नेते खाटीक होऊ शकत नाहीत असे त्यांचे मत होते.

भारतामध्ये जी गुलामगिरी आज हजारो वर्ष भोगावी लागत आहे तिचे मुख्य कारण हा जातीभेद आहे भारतातील काही लोक असे आहेत की आपल्या बंधू-भगिनींना पशुपक्ष्यापेक्षाही नीच समजतात. आपणा सर्व लोकांचे नेतृत्व करीत आहेत असेही भासवतात व तुमचे चांगले करू अशा खोट्या भापा मारण्यास त्यांना शरम वाटत नाही. सामाजिक समता हे आपल्या जीवनाचे कार्य आहे असे शाहू महाराजांना वाटत होते. सामाजिक पूर्णरचनेच्या बाबतीतील त्यांची तळमळ व निष्ठा अत्यंत ज्वलंत व अस्सल होती. अस्पृश्य मानलेल्याच्या हातचा चहा घेणे किंवा पाणी पिणे त्यांच्याबरोबर राजवाड्यात किंवा शिकारीच्या वेळी सहभोजन करणे अशी त्यांची रीत होती. शाहू महाराजांनी

ISSN No. 2394-5990

अनेक स्थापन केलेल्या शैक्षणिक केंद्र व वस्तीगृहे होते. त्यांनी उत्तेजन देऊन स्थापन केलेल्या सहकारी संस्था आणि लोकशाहीच्या दृष्टीने चालवलेल्या अनेक चळवळी ह्यामुळे कोल्हापूर संस्थान हे एक क्रियाशील लोकशाही निष्ठा विचारांचे एक केंद्र बनले होते.

जनतेच्या हाती पूर्ण स्वातंत्र्याचे हक्क देण्यापूर्वी त्यांनीही लोकशाही स्थापनेची पूर्वतयारी चालवली होती. राजश्री शाहू महाराजा विषयी त्यांच्या मित्रकर्जर यांनी मोठ्या अभिमानाने म्हटले होते की, गेली अनेक वर्ष सामान्य जनतेची परिस्थिती सुधारणा व्हावी हेच त्यांचे मुख्य आणि वैयक्तिक ध्येय होते ते ध्येय गाठण्यासाठी त्यांनी शाळांवर शाळा सुरू केल्या. इतकेच नव्हे तर शिक्षणाच्या सोयींचा फायदा घेण्याच्या बाबतीत जो कनिष्ठ गरीब आणि अज्ञानी वर्ग उदासीन होता त्या वर्गापर्यंत शाहू महाराजांनी जातिभेदातील बुद्धीने शिक्षणाचे लोन पोहचविले. दुसऱ्या कोणत्याही हिंदी संस्थानिकांनी आपल्या गरीब रयतेच्या बाबतीत इतक्या उदार मत अंत:करनाने आपले कर्तव्य केले ते दिसत नाही शाहू महाराजांनी आपण मुसलमान, ख्रिश्चन व हिंदू सर्वांचे पालक आहोत असे माणुन त्यांना समभावनेने वागविले हा उच्च जातीचा वा तो कनिष्ठ जातीचा असा भेदभाव त्यांनी केला नाही.

राजश्री शाहू महाराज म्हणाले मजूरदाराचे हितसंबंध भांडवलदारांच्या हितसंबंधांशी विरोधी असल्यामुळे ह्या मंडळीतील प्रतिनिधीकडून मजूर वर्गाच्या लोकांच्या हक्काचे रक्षण होत नव्हते. अशी स्थिती इंग्लंड या देशांमध्ये होती. पुढारलेल्या वर्गाकडून मागासलेल्या वर्गाच्या हितसंबंधांचे रक्षण होणे शक्य नाही. म्हणून इंग्लंडमधील मजुरांनी आपल्या प्रगतीकरिता आपले संघ निर्माण करून ज्या प्रकारचे स्वावलंबाचे मार्ग उभारले त्या प्रकारचे संघ तयार केले पाहिजेत पुढारलेल्या वर्गाकडून मागासलेल्या वर्गाचे हितरक्षण होणे शक्य नाही याकरिता जातवार किंवा वर्गवार मतदार संघातर्फे त्यांच्यातील प्रतिनिधी निवडून आले पाहिजेत असे मत शाहू महाराजांचे होते. सर्व महाराष्ट्रात आपल्या ध्येय धोरणाचा प्रसार करावा आणि राजनिष्ठेच्या बुरख्याखाली हळूहळू सरकारन आपल्या प्रचार करण्यास मान्यता देण्यासाठी भूल पाडावी. ह्या दिशेने शाहूच्या हालचाली चालल्या होत्या. ब्रिटिश सरकारला वाटले की सामान्य जनतेवर शाहूचे जे मोठे वजन होते व त्यांना अमाप लोक प्रियता लाभली होती. त्याचा उपयोग सरकारला पाठिंबा मिळविण्याकरिता येईल पण जनतेने आपल्या हक्कासाठी उभे राहून देशाच्या शासन व्यवस्थेमध्ये योग्य तो वाटा मिळवावा ह्या उद्देशाने कोल्हापूरच्या बाहेर आपला संदेश पोहोचवण्यासाठी फिरत राहावे अशा प्रकारचा उद्देश शाहू महाराजांना होता अश्पृश्याचे समूक उच्चाटन करण्याची कामगिरी शाहू अगदी नेटाने, कळकळीने व खंबीरपणे करीत असत. ग्रामीण भागातील लोकांना आपल्या विहीरी अस्पृश्यांनी बाहकिल्ला असे शाहू महाराजांना आपल्या राज्यातील दौऱ्याच्या काळात कळविले तर शाहू त्या गावात प्रत्यक्ष जाऊन त्या विहिरीचे पाणी पित असत हे दृश्य तक्रार करणारे उच्च वर्णीय ग्रामस्थ पाहून त्यांना आपल्या राज्याविषयी अभिमान वाटत असे.

तसेच आपल्या नातलगांना साध्य करण्यासाठी शाहू महाराज सदैव तयार रहास त्यांच्या स्वभावा वैशिष्ट्यामुळे नातलग मंडळींमध्ये प्रिय झाले होते. शाहू महाराजांनी आपल्या एका पत्रात म्हणाले होते मागासवर्गीयांना द्रारिद्राच्या आणि दु:खाच्या चिखलातून बाहेर काढणे हे माझे पवित्र कार्य आहे असे शाहू महाराज मानीत असत हे माझे पवित्र कर्तव्य करण्यात मी मागासवर्गीयांनी सेवा करीत असे नाही तर मी मानव जातीची करतो अशा प्रकारची माझी पवित्र भावना आहे.

शाहू महाराजांनी अनेक आपल्या कार्यांपैकी एक कार्य ते म्हणजे ज्या देवस्थानाच्या जमिनीचे वहिवाट हे खाजगी व्यक्ती आहेत. त्या मीळकतीवर त्यांच्या आता सर्वशी अधिकार राहणार नाही.ते यापुढे विशिष्ट देवस्थानाची व्यवस्था करण्यासाठी नेमलेले सरकारचे मुमीन म्हणून काम करतील. त्या सर्व व्यवस्थापकांनी देवस्थानच्या खर्चात काटकसर केली पाहिजे. व काही ठराविक रक्कम इमारतीच्या दुरुस्ती करिता ठेवली पाहिजे. देवस्थानाच्या उजव्या बाजूला शाळेकरिता जागा राखून ठेवावी तर डाव्या बाजूला पूजा आर्च्या, आरती हा दैनिक कार्यक्रमात पुरुष बायका व मुले यांना भाग घेता यावा म्हणून पडवीकरिता जागा राखून ठेवावी असे शाहू महाराजाच्या दरबाराने आदेश काढत होता. शाहू महाराज हे प्रजारित दक्ष व व्यवहार कुशल राज्यकर्ते असल्यामुळे ते आपल्या घरगुती कार्यास किंवा राजेशाही भाटभाट करण्यात फारसा पैसा खर्च करीत नसत. परंतु मात्र गरजवंतांना पैशाची मदत ते जरूर करीत असत कला रंगभूमी संगीत शिल्प लोकगीते पोवाडे व यांना मल्लाविषयांना उत्तेजन देण्यासाठी शाहू महाराजांनी जेवढा पैसा खर्च केला तेवढा भारतातील दुसऱ्या कोणत्याही समकाळातील राजाने किंवा लक्षधीसाने खर्च केल्याचे दिसत नव्हते. समाजाने तिरस्कारनीय म्हणून मानले एखादा महारोग्यासारखा अस्पृश्य मानलेला मांग हे शाहू महाराजांच्या पंगतीत आनंदाने जेवताना दिसत होती. हे दृश्य पाहिल्यानंतर भारताच्या इतिहासातील त्या काळातील ही गोष्ट घडलेली नाही हे लक्षात येते जनहिताच्या दृष्टीने राज्यकारभार करताना जुन्या गोष्टी दुरुस्त करीत न बसता निर्भयपणे सरळ सरळ सुधारणेचा मार्ग ते स्वीकारित मुसलमान समाजामध्ये शिक्षण कार्याला गती देण्याचे कार्य त्यांनी केले

शाहू महाराजांनी लोकांच्या उपयोगाकरिता आपली स्वतःची जागा जनतेचा वापरण्याकरिता दिली होती. शेतीला लागणारी जनावरे त्यांची चांगली वाढ व्हावी याकरिता त्यांनी एक मोठीच प्रयोगशाळा निर्माण केली. दुष्काळ व फ्लेग ह्यासारख्या भयानक स्थितीमध्ये सुद्धा शाहू महाराजांनी अविस्तृतपणे कार्य केले. दुष्काळ फ्लेग यांचा अधिक प्रसार होऊ नये म्हणून तातडीच्या उपायोजना अमलात आणल्या होत्या.

जनतेच्या हिताकरिता त्यांनी अनेक गोठी धरणे उभारली, कालव्याची भव्य योजना हातात घेऊन सहकारी संस्था काढून ते भारतातील हरितक्रांतीचे अग्रदूत ठरले. सामान्य जनतेस सामाजिक न्याय मिळावा व न्यायालय समोर प्रत्येक व्यक्ती समान ठरावी म्हणून त्यांनी क्रांतिकारक नी पुरोगामी निर्बंध करून वरिष्ठ वर्ग व कनिष्ठ वर्ग यांच्यातील भेदभाव नाहीसा केला. आपल्या अज्ञान निर्धन व अंधश्रद्धाकडून जनतेमध्ये शिक्षणाचा फार मोठा प्रसार केला आपल्या कारभारातील भ्रष्टाचार लाजलूजपत अशाप्रकारच्या दोषपूर्ण नाहीसा करून आपल्या जनतेच्या राहणीमानात सुधारणा घडवून आणली. मागास अतही दलित वर्गाचे कल्याण करताना ज्या ज्या गोष्टी त्यांच्या मार्गात अडचणी येत असत त्यांचे निवारण करण्यासाठी ते समाज क्रांतीच्या तत्वाची कास धरून निर्णय घेत असत. यामधूनच आपल्याला म्हणता येईल की, राजश्री शाहू महाराज एक लोकनेता आहेत असे आवर्जून म्हणत आहे.

सारांश:

राजश्री शाहू महाराज हे एक उत्कृष्ट संघटक लोक कल्याणला आपले जीवन समर्पित केलेले राज्यकर्ते व निर्भय समाज क्रांतिकारक राजा असून भारताच्या समाज क्रांतिकारचे एक अग्रणी होते असे आपल्याला म्हणता येईल शाहू महाराजांमध्ये धैर्य, उत्साह व शक्ती अमर्याद होती त्यांच्या प्रत्येक कृतीत त्यांचे मानवी मन व उदाल स्वभाव दिसून येत होता. शाहू महाराज संतांशी व समाजातील प्रस्थापितांशी समस्या समरस होण्यापेक्षा समाजातील अपंगाशी दलितांशी आणि पद दलीताशी बंधूभावनेने लवकर समरस होत असत. धर्मशाळा राजनीती शास्त्र समाजशाखा या तिन्हीमध्ये वक्र बुद्धीचा नांगर खोल घालून संस्थेच्या बळावर शाहू महाराजा इतकी हल्लीच्या काळात दुसऱ्या कोणीही विचारी जागीन उलथा-पालथी केली नसेल. त्यांनी केलेल्या मेहनत अशागतीने कोणत्या प्रकारचे पीक आले आहे हे जनतेला दिसतच होती. शाहू महाराज हे अस्पृश्येचे व पददलितांचे कैवारी आहेत अशी त्यांची सगळीकडे कीर्ती झाली होती. सामाजिक समता स्थापन करण्याकरिता उत्तेजन देत होती. शाहू महाराजांनी काही जातीवरील बंधन दूर केली होती आणि मानवी स्वातंत्र्याचे मूलभूत हक्क दिले. त्यांनी जातीभेद समाजामध्ये जास्त प्रमाणात फोफावत होता तो दूर केला. आंतरजातीय विवाह व्हावेत असे शाहू महाराजांना वाटत होते. त्या करिता त्यांनी वातावरण त्या प्रकारचे निर्माण केले. कनिष्ठ वर्गात शिक्षणाची प्रगती झपाट्याने व्हावी याकरिता प्राथमिक शिक्षण सुरू केले. शाहू महाराज हे प्रजा हितदक्ष व व्यवहार कुशल राज्यकर्त असल्याने आपल्या घरगुती कार्यात राजेशाही भाट करावा असे अजिबात त्यांना आवडत नव्हते शाहू महाराज आपल्या जेवनाच्या पंक्तीत शिकाऱ्यांना गरीब जनतेला घेऊन बसत असत म्हणूनच एक आदर्श राजा म्हणून त्यांची कीर्ती झाली शाहू महाराज एक यशस्वी व लोकप्रिय राज्यकर्ते म्हणून उद्यास आले त्यांचे आकर्षण व्यक्तिमत्व त्यांच्या अंगी असलेली कृतज्ञतेची भावना खाजगी जीवनातील त्यांची साधी राहणे त्यांना लाभत असलेले कौटुंबिक सुख त्यामुळे केवळ नव्हे तर आपल्या प्रजेच्या बाबतीतील त्यांची तळमळ शासनावरील पूर्ण नियंत्रित त्यामुळे त्यांना जनतेकडून आशीर्वाद मिळत असे.

संदर्भ:

१. राजश्री शाहू महाराज-धनंजय कीर
२. कॉ.राजश्री छत्रपती शाहू महाराज यांच्या आठवणी-श्री शा.स.भोसले
३. श्री छत्रपती शाहू महाराज- डॉ. सौ मीना कुलकर्णी-ब.शि.कुलकर्णी
४. राज्यश्री छत्रपती शाहू महाराजांच्या आठवणी भाई माधवराव बागल
५. भारताचे भाग्यविधाते राजश्री शाहू महाराज- डॉ. भालबा विभते
६. राजश्री शाहू महाराज स्मारक ग्रंथ पवार डॉ. जयसिंगराव संभाजी(संपादित)

■■■

ISSN No. 2394-5990

राजर्षी शाहू महाराजांचे कृषीविषयक धोरण : एक अध्ययन

प्रा. डॉ. संतोष पां. बनसोड
इतिहास विभाग प्रमुख
नारायणराव राणा महाविद्यालय बडनेरा (रेल्वे), अमरावती.
मो. नं. ८२७५४१८९८६
ई.मेल - bansodsantosh73@gmail.com

गोषवारा :

कोल्हापूर संस्थानचे राजे राजर्षी छत्रपती शाहू महाराज हे सुधारणावादी, समानतावादी धोरणाचे दूरदृष्टीकोणाचे, लोककल्याणकारी राजे होते. राजर्षी शाहू महाराजांच्या प्रयत्नामुळेच कोल्हापूर संस्थान हे समृद्ध संस्थान म्हणून उदयाला आले. तत्कालीन समाज व्यवस्थेचा आर्थिक कणा कृषी असल्याने प्रथमतः संस्थानात कृषी क्षेत्राचा विकास करणे गरजेचे असल्याने शाहू महाराजांनी कृषी क्षेत्रामध्ये नवनवीन प्रयोग करून क्रांती घडवून आणली. त्यामुळे कृषी क्षेत्रात जे अमुलाग्र परिवर्तन झाले त्या परिवर्तनामुळेच कोल्हापूर संस्थान सुजलाम सुफलाम झाले.

प्रस्तावना :

ब्रिटिशांचे भारतात आगमन झाल्यानंतर जवळजवळ संपूर्ण भारतात ब्रिटिशांनी आपले साम्राज्य निर्माण करून भारतातील कित्येक राज्यांना मांडलिक केले. महाराष्ट्रातील कोल्हापूर हे संस्थान देखील ब्रिटिशांचे मांडलिक राज्यच होते. १ हजार ६९ गावाचे कोल्हापूर हे संस्थान या संस्थानाचे राजे म्हणून जेव्हा शाहू महाराज सिंहासनावर बसले तेव्हा ते देखील ब्रिटिशांचे मांडलिक राजे होते. तत्कालीन भारताचा आणि कोल्हापूर संस्थानचा अर्थव्यवस्थेचा कणा शेती हा होता. परंतु कोल्हापूर शहरामध्ये शेती योग्य जमीन कमी असून सह्याद्रीच्या पर्वताजवळील बाजू ही डोंगराळ, माथ्याची असल्याने आणि पाण्याची योग्य सोय नसल्याने शेतीची दुरावस्था होऊन संस्थानाची अर्थव्यवस्था कोलमडली होती. त्यामुळे संस्थानातील प्रजेचे हाल हाल होत होते, त्यांना रोजगार मिळत नव्हता, त्यांच्यावर उपासमारीची वेळ येत होती. त्यामुळे संस्थानाची आर्थिक घडी बसविण्यासाठी, काही उपाययोजना करण्यासाठी कृषी विषयक धोरणे आखली. संस्थानाची अर्थव्यवस्थेची विस्कटलेली घडी बसविण्यासाठी वरवर उपाय करून चालणार नाही हे राजर्षी शाहू महाराज जाणून होते. त्यामुळेच त्यांनी अर्थव्यवस्थेचा कणा आणि तत्कालीन महत्त्वपूर्ण असलेला व्यवसाय म्हणजे शेती. या शेतीमध्ये सुधारणा करण्याचे ठरवले आणि त्यानुसार कृषी विषयक धोरणे आखून कोल्हापूर संस्थानातील शेतीला ऊर्जीतावस्था प्रदान करण्याचा प्रयत्न केला.

कोल्हापूर संस्थान ब्रिटिशांचे मांडलिक असल्याने त्यांच्या कार्याला खूप मर्यादा होत्या. त्या मर्यादेत राहूनही राजर्षी शाहू महाराजांनी त्याच्या संस्थानांमध्ये जी कृषी विषयक धोरणे आखली, कृषी क्षेत्रात परिवर्तन, सुधारणा केल्या ते अतिशय महत्त्वाचे आहे. त्यांनी बांधलेले राधापुर धरण त्यांच्याच प्रयत्नांनी मोठ्या दिमाखात उभे आहे. त्यांचे हे उदंड कृषी विषयक कार्य जाणून घेणे सदर शोधनिबंधाचा उद्देश आहे.

संशोधनाची उद्दीष्टे :

१. राजर्षी शाहू महाराज आणि तत्कालीन समाज या संबंधित माहितीचा आढावा घेणे.
२. राजर्षी शाहू महाराजांचे कृषी विषयक विचार जाणून घेणे.
३. राजर्षी शाहू महाराजांचे संस्थानातील कृषी विषयक धोरणे समजून घेणे.
४. राजर्षी शाहू महाराजांनी संस्थांतील कृषी क्षेत्राच्या विकासासाठी केलेले नवनवीन प्रयोग अभ्यासणे.
५. राजर्षी शाहू महाराजांच्या कृषीविषयक धोरणांचा समाजावर झालेला परिणाम अभ्यासणे.

संशोधनाची गृहितके :

१. राजर्षी शाहू महाराज हे लोक कल्याणकारी आणि सुधारणावादी राजे होते.
२. तत्कालीन समाजाचा आर्थिक पाया कृषी असल्याने कृषी विकास होणे फायदेशीर होते.
३. राजर्षी शाहू महाराजांच्या कृषीविषयक धोरणामुळे त्यांच्या संस्थानाचा सर्वांगीण विकसित झाला.
४. कोल्हापूर संस्थान हे औद्योगिक वसाहत म्हणून विकसित झाली.
५. कोल्हापूर संस्थानात कायमस्वरूपी आर्थिक स्थैर्य प्राप्त झाले.

६. कोल्हापूर संस्थानातील जनता आर्थिकदृष्टया संपन्न होऊन संस्थानाची उत्तरोत्तर प्रगती झाली.

संशोधनाचे महत्व :

कोल्हापूर संस्थानचा राज्यकारभार पाहायला लागल्यानंतर राजर्षी शाहू महाराजांनी संस्थानातील आर्थिक दुरावस्था पाहली. ही दुरवस्था दूर करून संस्थान आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवण्यासाठी अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या शेतीवर लक्ष केंद्रित केले आणि २८ वर्षाच्या राज्यकारभारामध्ये कोल्हापूर संस्थानातील कृषी सुजलाम सुफलाम करून दाखविली. त्यांनी कृषी क्षेत्रात ज्या सुधारणा केल्या, जे नवनवीन प्रयोग केले ती तत्कालीन काळातील हरितक्रांती आहे. विसाव्या शतकात झालेली हरितक्रांती. त्यामुळे राजर्षी शाहू महाराजांचे कृषी विषयक विचार, कार्य, धोरणे अभ्यासणे गरजेचे आहे. यासाठी सदर संशोधन विषय महत्त्वाचे ठरते.

विषय विवेचन :

भारत हा कृषी प्रधान देश म्हणून पूर्वीपासून प्रचलित आहे. त्यामुळे कृषी क्षेत्रात नवनवीन प्रयोग आणि सुधारणा करणे हे फार पूर्वीपासून प्रचलित आहे. भारताच्या इतिहासात कृषी क्षेत्राला संपन्नतेच्या शिखरावर नेण्यासाठी भारतातील अनेक राजे, महाराजे, विचारवंत, अभ्यासक, समाजसुधारकांनी प्रयत्न केले. मध्ययुगीन भारतातील अल्लाउद्दीन खिलजी, फिरोजशहा तुघलक, शेरशहा सूरी, छत्रपती शिवाजी महाराजांनी शेतीमध्ये सुधारणा करून शेतीला ऊर्जीतावस्था मिळण्यासाठी जे प्रयत्न केले ते अतिशय वाखानण्याजोगे आहे. त्याचप्रमाणे महात्मा ज्योतिराव फुले यांनी शेती आणि शेतकऱ्याच्या व्यथा समाजासमोर मांडण्यासाठी, शेतीमध्ये येणाऱ्या अडचणी, शेतकऱ्यांचे होणारे हाल या संदर्भात वैचारिक प्रबोधन करण्यासाठी ''शेतकऱ्याचा आसूड'' सारखे अनेक ग्रंथ लिहिले. ज्यामधून शेतकऱ्यांप्रती समाजमन संवेदनशील करण्याचा प्रयत्न केला. भारतीय कृषी सुधारणेचा इतिहास आणि महात्मा फुलेंची शेतकऱ्यांबद्दल तळमळ पाहत तोच वारसा समोर घेऊन कोल्हापूर संस्थांचे राजे राजर्षी शाहू महाराज यांनी कृषी क्षेत्रामध्ये अमुलाग्र परिवर्तन घडवून आणले. त्यांनी जी कृषी विषयक धोरणे आखली त्यामुळेच कोल्हापूर संस्थान काही वर्षात सुजलाम सुफलाम होऊन संपन्नतेच्या शिखरावर पोहोचले.

एकोणिसाव्या शतकात भारतात बहुतेक राजे हे ब्रिटिशांच्या वर्चस्वाखाली असल्याने ते ब्रिटिशांचे मांडलीक झाले होते. त्या प्रदेशावर संपूर्णतः ब्रिटिशांचे नियंत्रण असे. कोल्हापूर संस्थान देखील असेच मांडलिक राज्य होते आणि तेथील राजे होते. त्या कालखंडात राज्यकर्त्यांनी कर गोळा करून प्रजेचे संरक्षण करावे आणि आपल्या राज्य हद्दीतील अंतर्गत कायदा, सुव्यवस्था पाहावी एवढीच मर्यादित कार्ये राज्यकर्ते स्वीकारीत. प्रजेचे आर्थिक जीवनमान सुधारावे असे त्यांच्या कार्यप्रणालीत नव्हते. आर्थिक बाबतीत प्रजेने स्वतःचे स्वतःच पाहावे, असे धोरण तत्कालीन काळात होती. त्यांना प्रगतिपथावर नेणे, त्यांना आर्थिकदृष्ट्या भक्कम करून सुखी करणे हे त्यांच्या स्वभावातच नव्हते. राजर्षी शाहू महाराजांचा राज्याभिषेक झाल्यानंतर स्वराज्याचे राजे म्हणून त्यांना अनेक समस्या जाणवल्या. त्या समस्येवर प्रभावी उपाय करण्यासाठी कृषी क्षेत्रात सुधारणा करणे गरजेचे आहे हे ठरवून त्यांनी कृषी क्षेत्रामध्ये सुधारणार करण्याचा आजीवन प्रयत्न केला.[१]

राजर्षी शाहू महाराजांचे कृषी विषयक विचार :

राजर्षी शाहू महाराजांच्या कारकिर्दीत कृषी हा प्रधान व्यवसाय होता; पण वाटणी व्यवहाराने त्याचे लहान-लहान तुकड्यांत विभाजन झाले होते. ती बदलावी आणि त्याचे रूपांतर मोठ्या शेतीमध्ये व्हावे हा त्यांचा विचार होता. म्हणजे शेती किफायतशीर होईल आणि शेतकऱ्याची प्रगती होईल. हे मत त्यांनी माणगावच्या परिषदेमध्ये भाषण करताना बोलून दाखविले, तुम्ही साधारण माणसी दहा एकर जमीन वाट्याला येईल असे तुमच्या मालकीचे तुकडे करा आणि हे उत्पन्न तुमच्यातील वडीलधाऱ्या व्यक्तीकडे चालवायला द्या. म्हणजे सर्वांना अर्धपोटी राहणे वाचेल?फ जमीन विभाजनाचे तोटे जाणून असल्याने त्यांनी १९१३ ला अविभाज्य इनामाचा कायदा केला.[२]

कृषी आणि कृषक, कृषी संबंधित सर्वच कामगारांना प्रतिष्ठेचे स्थान देताना राजर्षी शाहू महाराज म्हणतात, ''कृषी कर्मापासून दुहेरी उन्नती होते. स्वत:ला सुख तर होतेच, शिवाय सर्व मनुष्य जातीलाही सुख मिळते. कृषी कर्म करताना क्षात्र धर्माला बाधा येते ही समजूत निखालस खोटी आहे. ज्यावर माणूस समाजाची सुव्यवस्था आणि उन्नती अवलंबून आहे, ते कर्म कमीपणाचे आहे ही समजूत वेडगळपणाची आहे. हे असे कर्म करणारा माणूस समाज खऱ्या अर्थाने क्षत्रिय होय. अन्न माणसाला जगविते. त्याचे पालनपोषण करते. त्याला बलवानही करते आणि इतरांनाही जगवा असा संदेश देते. श्रमाची प्रतिष्ठा जगात खूप मोठी आहे आणि कृषी ही श्रमाची प्रतिष्ठाच आहे.''

ज्याप्रमाणे अर्थव्यवस्था बळकट करण्यासाठी व्यवसाय महत्त्वाचे आहे. त्याचप्रमाणे सर्व व्यवसायाचा पाया असणारा कृषी व्यवसाय हा महत्त्वाचा आहे. सर्व व्यवसायाची जननी कृषी असल्याने प्रथमतः कृषी समृद्ध करणे हे आद्य कर्तव्य मानून त्यांनी कृषी क्षेत्राबद्दल कृतज्ञता व्यक्त करत कृषी क्षेत्रात सुधारणा केल्या आणि कृषीवर आधारित व्यवसाय निर्मिती

ISSN No. 2394-5990

करून संस्थानाला औद्योगिकदृष्ट्या सक्षम बनविले.[३]

राजर्षी शाहू महाराजांचे कृषी विषयक कार्य :

राजर्षी शाहू महाराज शिकारीच्या निमित्ताने आपल्या संपूर्ण संस्थानाची पाहणी करीत. त्यामुळे त्यांना इथल्या जमिनीचा पुरेपूर परिचय होता. संस्थांनामध्ये सह्याद्रीच्या भागात विपुल प्रमाणात डोंगर असल्याने मुरमाळ जमीन होती. तेथे कृषी उत्पन्न कमी होत. काही भाग हा काळ्या कसदार जमिनीचा होता तर बराचसा भाग हा जंगलांनी व्याप्त होता. समृद्ध प्रदेशांमध्ये बऱ्यापैकी जनतेला रोजगार मिळत होता. परंतु डोंगराळ, माथ्याच्या भागातील लोक, गाव कुसाबाहेरील लोक यांच्यावर उपासमारीची वेळ येत. त्यामुळे शाहू महाराजांनी प्रथमतः सह्याद्रीच्या डोंगराळ भागांमध्ये येणाऱ्या काही पिकाची प्रायोगिक तत्त्वावर लागवड केली. डोंगराळ भागांमध्ये येणाऱ्या पिकांमध्ये चहा, कॉफी, वेलदोळे, शिरडा, जांभूळ, ताग, काजू, साग, फणस यांची लागवड केली. येवढेच नाही तर बुंद्याच्या झाडाची आणि गंजन वनस्पतीची देखील लागवड केले. गंजन या वनस्पती पासून धार्मिक कार्यात उपयुक्त राळेची निर्माण होत असल्याने विपुल प्रमाणात गंजन वनस्पतीची लागवड करून राळं निर्मितीची प्रक्रिया या भागात सुरू केली. डोंगराळ भागात विपुल प्रमाणात येणाऱ्या वनस्पतींवर आधारित प्रक्रिया उद्योगाची निर्मिती मोठ्या प्रमाणात करून इथल्या जनतेला रोजगार उपलब्ध करून देण्यात आला.[४]

अस्मानीय सुलतानी संकटांपासून शेतीचे रक्षण करणे आणि शेतीमध्ये सुधारणा करण्यासाठी आर्थिक भांडवलाची गरज असते. दुष्काळ प्रसंगी शेतकऱ्यांना शेतसारा माफी देऊन त्यांच्यावरील आर्थिक भार कमी करण्याचा प्रयत्न महाराजांनी केला. शेतकऱ्यांना शेतीसाठी कर्ज पुरवठा व्हावा म्हणून दरबारामार्फत कर्जपुरवठा सुरु केला. सावकाराच्या जाचापासून शेतकऱ्याची सुटका व्हावी, शेतकऱ्याची आर्थिक पिळवणूक होऊ नये यासाठी १ जून १८९९ रोजी वटहुकूमाव्दारे सावकारांवर अनेक निर्बंध लादून शेतकऱ्याच्या शेतातील उभी पिके जप्त करण्यावर बंदी केली. शेतकऱ्यांवर होणारे अन्याय दूर करण्यासाठी कुलकर्णी शेतीच्या मालकी हक्कात फेरबदल करून १५ सप्टेंबर १९१८ रोजी कुलकर्णी वतने नष्ट केली.[५]

शेतीची उत्पादकता आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्याचे प्रयत्न महाराजांनी केले. शेतीचे उत्पादन वाढविण्यासाठी आधुनिक तंत्र आत्मसात केले पाहिजे यासाठी त्यांनी १९१२ मध्ये कोल्हापूर येथे 'किंग एडवर्ड ॲग्रिकल्चर इन्स्टिट्यूट' स्थापन केली. या संस्थेमार्फत सुधारीत बी-बियाणे, खते, पशुपालन यांची माहिती शेतकऱ्यांना देण्यात येत. अद्ययावत शेती अवजारांची प्रदर्शन भरवून शेतकऱ्यांना प्रात्यक्षिकाव्दारे शेती बद्दल माहिती दिल्या जात. तत्कालीन आधुनिक शेती उपकरणांचे संग्रहालय सुद्धा शाहू महाराजांच्या प्रयत्नांतून निर्माण झाले.[६] शेतीच्या विकासासाठी, उत्पन्न वाढीसाठी, शेतीला योग्यवेळी पाण्याची गरज ओळखून महाराजांनी धरणे व तलाव बांधले. कोल्हापूरच्या पश्चिमेस असलेल्या ५५ किलोमीटर अंतरावर दाजीपूर जवळ भोगावती नदीला बंधारा घालून जमिनीला पाणीपुरवठा करण्याची योजना सन १९०७ मध्ये त्यांनी आखली. भूजलातील जलसाठा वापरण्यापेक्षा नदी, नाले, तलाव यामधले पाणी वापरण्यावर त्यांनी भर दिला. त्यासाठी मोठमोठे कालवे, धरणे बांधली. राधानगरी हे धरण त्यांच्या दूरदृष्टीचे प्रतीक म्हणून आज मोठ्या दिमाखात उभी आहे. संस्थानामध्ये पाटबंधारे खाते निर्माण करून खास इरिगेशन ऑफिसरची नेमणूक केली. या मागचा उद्देश म्हणजे संस्थानातील जास्तीत जास्त जमीन ही शेतीसाठी वापरात येऊन संस्थानाचे उत्पन्न वाढावे यासाठी फक्त ध्येयधोरणे आखून ते थांबले नाहीत तर त्यांनी आपल्या निगराणीखाली त्याची अंमलबजावणी देखील करून घेतले.[७]

राजर्षी शाहू महाराजांच्या कृषीविषयक धोरणांचा समाजावरील परिणाम :

भारत कृषिप्रधान देश असून देखील येथील शेतकऱ्यांना दुय्यम लेखले जात आजही ते होत आहे; परंतु राजर्षी शाहू महाराजांच्या कृषी विषयक धोरणांमुळे, विचारांमुळे आणि कार्यामुळे इथल्या शेतकऱ्यांना प्रतिष्ठा मिळाली. त्यांनी पदोपदी शेतकऱ्यांचा सन्मान केला. त्यांच्या हयातीतच त्यांनी वेगवेगळ्या ठिकाणी कृषी प्रदर्शने भरविली. शेतीमध्ये उत्तम कामगिरी करणाऱ्या शेतकऱ्याला बक्षिसे दिली. जनावरांची पैदास वाढावी यासाठी ज्या शेतकऱ्यांनी जनावरांची उत्कृष्ट निगा राखली, पैदास केली त्यांना बक्षीस देऊन त्यांचे अनुभव समाजासमोर ठेवले. शेतीवर आधारित नवनवीन प्रयोग करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन आणि आर्थिक पाठबळ दिले. शेतीच्या अभ्यासाला प्रोत्साहन दिले. शेतीमध्ये पारंगत लोकांचा सन्मान करून शेतकऱ्यांना समाजात स्थान मिळवून दिले. ज्याप्रमाणे इतर क्षेत्रातील व्यावसायिकांना मानसन्मान मिळतो त्याच प्रकारचा मानसन्मान त्यांनी कृषी क्षेत्रातील जनतेला मिळवून दिला.[८]

या सर्वांमुळे शेतकऱ्यांना शेतीप्रती आपुलकी निर्माण होऊन शेतीमध्ये सुधारणा करण्याचा, नवनवीन प्रयोग करण्याचा उत्साह वाढला आणि शेतकरी वर्गाची समाजामध्ये सन्मान, प्रतिष्ठा वाढली. शेतकऱ्यांचा शेतीमध्ये काम करण्याचा उत्साह देखील वाढून औद्योगिक विकासाला चालना मिळत संस्थानाची अर्थव्यवस्था बळकट झाली.

निष्कर्ष :

१. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी आपल्या रयतेसाठी त्यांच्या उन्नतीसाठी सहकार, सामाजिक, कृषी, उद्योग, आदी विविध क्षेत्रांत भरीव कार्य केले.

२. संपूर्ण देश शेतीप्रधान असल्याने शेती आणि शेतकरी यांचा विचार केंद्रस्थानी ठेवला. त्यांची शेती आणि शेतकऱ्याबद्दलची आस्था कमालीची संवेदनशील होती. त्यामुळेच त्यांनी कृषी क्षेत्रात सुधारणा आणि नवनवे प्रयोग करून यामध्ये परिवर्तन केले.

३. शेतीसाठी उपयुक्त धरण, बंधारे तर त्यांनी बांधलेच शिवाय जमिनीचे प्रकार ओळखून ज्या ज्या जमिनीमध्ये जे जे पीक उत्तम प्रकारे होते ते पीक घेऊन शेतीचे उत्पन्न वाढविले. यामुळे इथल्या प्रजेला कायमस्वरूपी रोजगार मिळाला. रोजगाराचा प्रश्न मिटल्याने संस्थानातील आर्थिक व्यवहार सुरळीत झाले.

४. शेतकऱ्यांना शेतीपूरक व्यवसाय आणि जोडधंदे करण्यास महाराजांच्या विचार, कार्य आणि धोरणामुळे प्रेरणा मिळाली.

५. राजर्षी शाहु महाराजांनी कृषी विकासातून संस्थानांमध्ये आर्थिक समानता प्रस्थापित केली.

समारोप :

राजर्षी शाहू महाराज हे शेतकऱ्यांप्रती, शेतकऱ्यांच्या अधिकाराप्रती अतिशय जागृत होते. दारिद्री व अज्ञानी शेतकरी शिकला पाहिजे, त्यांचे दारिद्र्य संपले पाहिजे, तो कर्जमुक्त झाला पाहिजे, शेतीचे उत्पन्न वाढले पाहिजे आणि शेतकऱ्यांवर कुठल्याही प्रकारचा अन्याय होऊ नये यासाठी ते सतत सज्ज होते. शेतकऱ्यांना फक्त शेतीच्या कामांमध्ये गुंतून न ठेवता त्यांच्यामध्ये प्रायोगिकशील वृत्ती निर्माण केली. शेतीमधून त्यांनी जोडधंदा, शेती पूरक व्यवसाय करण्यास शेतकऱ्यांना प्रोत्साहित केले. शेतीमध्ये नवनवीन प्रयोग, सुधारणा करण्यास प्रोत्साहन दिले. त्यांच्या या विचार, कार्य आणि धोरणामुळेच कृषी क्षेत्रात सकारात्मक परिणाम झाले आणि संस्थानातील भूमी सुजलाम सुफलाम होऊन संस्थेतील जनता सुखी समृद्ध झाली. त्यांच्या याच दूरदृष्टीमुळे आजचे समृद्ध संस्थान आपल्या दृष्टीस पडते. आजच्या समृध्द कोल्हापूर संस्थानाची पाळ्यामुळे ही राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी तत्कालीन काळातील कार्यात रुतलेली दिसून येते. त्यांनी केलेले कार्य, त्यांच्या दूरदृष्टीचा परिणाम म्हणून आजही कोल्हापूर शहर औद्योगीकदृष्ट्या समृध्द, सक्षम असल्याचे दिसते. त्यांचे कार्य विचार आजही समाजासाठी प्रेरणादायी, प्रासंगिक आहे.

तळटीपा :

१. भोसले, प्रा. शिवाजीराव – राजर्षी शाहू महोत्सव १९९३, अजित कुमार जैन, जिल्हाधिकारी व अध्यक्ष, रा. शाहू छ. मेमोरियल ट्रस्ट, कोल्हापूर. पृष्ठ क्र. ४.

२. जाधव, श्यामकांत – राजर्षी शाहू महाराज कृषी, उद्योग प्रणेते, लोकमत. दि. २६ जून २०१५.

३. उपरोक्त – राजर्षी शाहू महाराज कृषी, उद्योग प्रणेते, लोकमत.

४. गाठाळ, प्राचार्य डॉ. एस. एस. – आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास (इ.स.१८१८-१९६०), कैलास पब्लिकेशन्स औरंगाबाद. ऑगस्ट २०२१. पृष्ठ क्र. ३९९-४००.

५. कठाळे, अनिल – आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास (इ.स.१९९८ ते १९६०), विद्या बुक पब्लिशर्स, औरंगपुरा, औरंगाबाद. दुसरी आवृत्ती जून २०१३. पृष्ठ क्र. ४१७.

६. तत्रैव – आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास (इ.स.१८१८-१९६०), पृष्ठ क्र. ४००

७. तत्रैव – आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास (इ.स.१९९८ ते १९६०), पृष्ठ क्र. ४२४.

८. कीर, धनंजय – राजर्षी शाहू महाराज, पॉपुलर प्रकाशन मुंबई २०१२.

संदर्भ ग्रंथ सूची :

१. कुलकर्णी, प्रा. मीना – श्री शाहू छत्रपतींचे अर्थकारण, गौरीनंदन पब्लिकेशन्स, औरंगाबाद. पहिली आवृत्ती १९७५.

२. गाठाळ, प्राचार्य डॉ. एस. एस. – आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास (इ.स.१८१८-१९६०), कैलास पब्लिकेशन्स औरंगाबाद. ऑगस्ट २०२१.

३. जाधव, रमेश – राजर्षी शाहू गौरव ग्रंथ, राजर्षी शाहू चरित्र साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई (२०१६)

४. नाईक, तु.बा. – राजर्षी शाहू महाराज, मेहता पब्लिकेशन्स हाऊस, पुणे. जुलै २००५.

५. पवार, जयसिंगराव (संपा.) – राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर (द्वितियावृत्ती, २००७.

६. भागवत, दीपक – राजर्षी छत्रपती शाहू महाराज, श्रीपाद प्रकाशन, कोल्हापूर.

७. भोसले, एस. एस. (संपा.) – क्रांतीसूक्ते – राजर्षी छत्रपती शाहू, मुंबई. म. रा. सा. व सं. मंडळ, १९९१.

■■■

ISSN No. 2394-5990

राजर्षी शाहू महाराज : सामाजिक क्रांतीचे अग्रदूत

प्रा. डॉ. दीपक सो. वेडे
सहयोगी प्राध्यापक
सरस्वती मंदिर नाईट कॉलेज ऑफ कॉमर्स अँड आर्टस्
पुणे २

शोध सारांश :

सर्वसामान्य बहुजन समाजाला गुलामगिरीच्या दलदलीतून बाहेर काढून स्वाभिमानाचे नवे जीवन देणाऱ्या काही मोजक्या समाजसुधारकांमध्ये राजर्षी शाहूंचा समावेश होतो. राजर्षी शाहू आणि इतर समाजसुधारक यांच्यात महत्वाचा फरक म्हणजे राजर्षी शाहुंकडे राजसत्ता होती. त्याआधारे ते बहुजन समाजाच्या हिताचे निर्णय राबवू शकत होते.त्यासाठी त्यांना दुसऱ्यांची मनधरणी करावी लागली नाही.राजर्षी शाहू हे प्रजावत्सल, दलितबंधू, समतेचे पुरस्कर्ते आणि निधड्या छातीचे कर्ते समाजसुधारक होते. शाहू राजांचा जन्म २६ जून १८७४ रोजी कोल्हापूर जिल्ह्यातील कागल या गावी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव जयसिंगराव व आईचे नाव राधाबाई होते. शाहूंचे बालपणीचे नाव यशवंतराव होते. १७ मार्च १८८४ रोजी शाहूंचे दत्तकविधान व राज्यारोहण झाले. यशवंतरावाचे दत्तकविधानानंतर ङ्गशाहू महाराजफ असे नामकरण झाले. शाहूंनी आपल्या आयुष्यात जातीभेद निर्मूलन, अस्पृश्यता निवारण, स्त्रियांचा उद्धार, बहुजनांचा शैक्षणिक विकास, औद्योगिक प्रगती, शेतीचा विकास, धरणे, रस्ते ई. क्षेत्रात मोलाची कामगिरी बजावली. आपली राजसत्ता खऱ्या अर्थाने उपेक्षित, वंचित समाजासाठी वापरली. त्यामुळे शाहू हे लोकांचे राजे झाले.

सांकेतिक शब्द : बहुजन समाज , स्वाभिमान , समाजसुधारक, प्रजावत्सल, दलितबंधू

प्रस्तावना :

छत्रपती राजर्षी शाहू महाराज हा राजा लोकशाहीचा, सामाजिक समतेचा पुरस्कार करणारा होता, हे 'एकवेळ गादी सोडीन; पण बहुजन समाजाचा उद्धार करण्याचे कार्य सोडणार नाही' या त्यांच्या वक्तव्यावरून कायम लक्षात येते. राजर्षी शाहू महाराजांचा जन्म २६ जुन १८७४ रोजी कागलच्या घाटगे घराण्यात झाला. कागल चे जहागीरदार जयसिंगराव आबासाहेब घाटगे हे त्यांचे जन्मदाते वडील राधाबाई ही त्यांची जन्मदाती माता. शाहू महाराजांचे मूळ नाव यशवंतराव होते. छत्रपती शाहू महाराज, राजर्षी शाहू महाराज, कोल्हापूरचे शाहू व चौथे शाहू अशा विविध नावांनी ते प्रसिद्ध होते. ते दहा वर्षांचे असताना कोल्हापूरचे राजे चौथे शिवाजी यांची राणी आनंदीबाई यांनी १८ मार्च १८८४ रोजी त्यांना दत्तक घेतले व ते कोल्हापूर संस्थानाचे छत्रपती शाहू महाराज झाले.

इ. स. १८८५ मध्ये त्यांना शिक्षणासाठी राजकोट येथे पाठविण्यात आले. तेथे त्यांनी चार वर्षे शिक्षण घेतले. त्यानंतर ते कोल्हापूरला परतल्यावर धारवाड येथे शिक्षणासाठी गेले. तेथे सर एस.एम. क्रेजर यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यकारभार, इतिहास, इंग्रजी भाषा इत्यादी विषयांचे शिक्षण घेतले. धारवाड येथे शिक्षण घेत असतानाच लक्ष्मीबाई यांच्याबरोबर एप्रिल १८९१ रोजी शाहू महाराजांचा विवाह झाला. शिक्षणक्रम संपल्यानंतर वयाच्या विसाव्या वर्षी २ एप्रिल १८९४ रोजी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानच्या राज्यकारभाराची सूत्रे हाती घेतली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना त्यांच्या शिक्षणासाठी, तसेच मूकनायक वृत्तपत्रासाठी शाहू महाराजांनी सहकार्य केले. चित्रकार आबालाल रहिमान यांच्यासारख्या कलावंतांना राजाश्रय देऊन प्रोत्साहन दिले. शाहू महाराजांना 'राजर्षी' ही उपाधी कानपूरच्या कुर्मी क्षत्रिय समाजाने दिली. महाराजांनी सुमारे २८ वर्षे राज्यकारभार केला. २६ जुन हा शाहू महाराजांचा जन्म दिवस महाराष्ट्र शासनाने २००६ पासुन'सामाजिक न्याय दिन' म्हणून साजरा करण्याचे घोषीत केले आहे.

छत्रपती राजर्षी शाहू महाराजांच्या हाती वयाच्या २० व्या वर्षी १८९४ मध्ये सत्ता हाती आली. त्यांच्या हातात सत्तेची सूत्रे येताच त्यांनी पहिल्यांदा कोल्हापूर संस्थानातील प्रजेच्या हलाखीची पाहणी केली. संस्थानात साक्षरतेचे प्रमाण अत्यल्प, मागासलेला समाज, अप्रवाही, जाती पातीने दुभंगलेला व जातीयवादाने फार पोखरलेला होता. शेकडो वर्षे अस्पृश्य समाज, बहुजन समाज ज्ञान, सत्ता, संपत्ती, शिक्षण अशा अनेक गोष्टींपासून वंचित राहिला होता. चातुर्वर्ण व्यवस्थेमुळे सामाजिक, धार्मिक, आर्थिक क्षेत्रात मागे होता. अस्पृश्य, गरीब, शेतकरी, मजूर यांचे मोठ्या प्रमाणावर शोषण होत होते. सामान्य जनता

भयानक दारिद्र्य, अज्ञानाच्या, अंधश्रद्धा, रूढींच्या खाईत बुडाली होती. शिक्षण क्षेत्रात बहुजन समाज बोटावर मोजता येईल इतकाच होता. पाणी, रस्ते, शेती, व्यापार, कला अविकसित होत्या, म्हणून राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या सत्तेचा उपयोग या रंजल्या- गांजलेल्या लोकांसाठी केला, हे आजच्या स्वार्थी राज्यकर्त्यांनी लक्षात घ्यायला हवे.

अशाप्रकारे राजर्षी शाहू महाराज हे सामान्य माणसात मिळणारे, सामान्यांसाठी झटणारे राजा होते. सामाजिक लोकशाही निर्मितीसाठी शाहू महाराजांनी अतोनात कष्ट उपसले. सर्वांना न्याय मिळावा, माणुसकीचे हक्क मिळावेत, अस्पृश्यांना समानतेची व माणुसकीची वागणूक मिळावी, वैज्ञानिकता त्यांच्या अंगी यावी म्हणून त्यांनी आपल्या सत्तेचा उपयोग केला. यावरून शाहू महाराजांचे मोठेपण हे लक्षात यायला लागते. आज मात्र आम्ही व आमच्या राज्यकर्त्यांनी छत्रपती राजर्षी शाहू महाराजांचा आदर्श बाजूला ठेवला आहे. त्यांचे नाव घेऊन आम्हीही त्यांचेच आहोत म्हणणारेही त्यांच्या विचाराने वागत नाहीत उलट आपल्या सत्तेचा गैरवापर करताना दिसतात. मानवी मूल्य पायदळी तुडवताना दिसतात. ज्या शाहू महाराजांनी लोकशाही निर्मितीसाठी कष्ट उपसले, त्याच लोकशाही धिंडवडे काढताना आजचे राज्यकर्ते आम्हाला दिसत आहेत. आम्ही समाजाचे काही देणे आहोत, समाजाच्या प्रगतीसाठी आपलेही काही योगदान असावे, असे मात्र आताच्या कुठल्याच राज्यकर्त्यांना वाटत नाही एवढे भयावह चित्र डोळ्यासमोर उभे राहते. स्वार्थासाठी, मतलबासाठी, जातीसाठी, धर्मासाठी राजकारण करणे चालू आहे परंतु मानवतेसाठी, मानवी कल्याणासाठी राजकारण करावे लागते हे मात्र त्यांनी राजर्षी शाहू महाराजांकडूनच शिकायला हवे, त्या पद्धतीनेच आपली सत्ता पुढे घेऊन जायला हवी व सामान्याचे हित जोपासायला हवे. त्यांच्या विचारांची, आचारांची व कृतीची आज देशाला गरज आहे. प्रत्येक मानवाने त्यांच्या विचाराने कार्य केले तर देशाची प्रगती व्हायला वेळ लागणार नाही.

संशोधन पद्धती :

प्रस्तुत शोधनिंबधासाठी दुय्यम तथ्य संकलनाचा अधार घेवून लेखन करण्याचा प्रयत्न केला गेला आहे. त्यासाठी संदर्भग्रंथ, क्रमिक पुस्तके, मासिके, वर्तमानपत्रे इत्यादीचा आधार घेवून शोधनिबंध तयार करण्यात आलेला आहे.

उद्दिष्टे :

१. राजर्षी शाहू महाराजांचे सामाजिक विचार समजून घेणे.
२. राजर्षी शाहू महाराजांचे केलेल्या सामाजिक सुधारणांचा अभ्यास करणे.

राजर्षी शाहूंचे शैक्षणिक कार्य :

तत्कालीन वर्ण-व्यवस्थेने शूद्र आणि सर्व स्त्रिया यांना शिक्षणाचा अधिकार नाकारून त्यांच्यावर अन्याय केला. महात्मा जोतीराव फुले आणि सावित्रीमाई यांनी दलित-बहुजनांसाठी आणि स्त्रियांसाठी शाळा काढल्या. तोच वारसा जपत शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात बहुजन समाजाच्या शैक्षणिक विकासाच्या अनुषंगाने मोलाची कामगिरी बजावली. महाराजांनी १९१७ साली कोल्हापूर संस्थानात सक्तीच्या मोफत शिक्षणाचा कायदा केला. हा कायदा करताना महाराजांनी पालकांनाही दंड ठेवला. जर एखाद्या पालकाचा मुलगा शाळेत आला नाही तर दरमहा १ रु. दंड ठेवला. शाहूंनी प्राथमिक शिक्षणावर भर दिला. कारण पाया पक्का असेल तरच माणसाची भावी शैक्षणिक प्रगती होऊ शकेल असे महाराजांचे मत होते.ते म्हणत, ''शिक्षणानेच आमचा तरणोपाय आहे असे माझे ठाम मत आहे. शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती झाली नाही, असे इतिहास सांगतो.'' शिक्षण घेताना विद्यार्थ्यांना येणाऱ्या अनेक अडचणी समजावून घेवून महाराजांनी त्यावर उपाय केले. मागास, गरीब विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप व इतर सवलती दिल्या. विद्यार्थ्यांना राहण्यासाठी वसतीगृहे बांधली. कोल्हापुरात हायस्कूल व कॉलेजची स्थापना केली. राजाराम कॉलेज मध्ये मुलींची फी माफ केली. त्याकाळी काही शिक्षक अस्पृश्य मानल्या गेलेल्या समाजातील काही मुलांना व्हरांड्यात बसवत असत. ही गोष्ट महाराजांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी शिक्षकांना जरब बसेल असे उपाय केले. सरकारी शाळेत शिवाशिव पळू नये व सर्व जाती-धर्माच्या विद्यार्थ्यांना एकत्र बसवावे असा वटहुकूम काढला. ज्या शाळा या हुकुमाचे पालन करणार नाहीत त्यांची ग्रांट व इतर सवलती बंद करण्याची तंबी दिली.

आरक्षणाचे प्रणेते :

मागासलेल्या वर्गाना प्रगतीच्या प्रवाहात आणायचे असेल तर त्यांच्यासाठी राखीव जागांची तरतूद केली पाहिजे, अशी कल्पना महात्मा जोतिबा फुले यांनी मांडली.राजर्षी शाहूंनी आपल्या अधिकारांचा वापर करून ही कल्पना प्रत्यक्षात उतरवली. ६ जुलै १९०२ रोजी त्यांनी कोल्हापूर संस्थानात मागास जातींना ५० % जागा राखीव राहतील अशी घोषणा केली. त्याची त्वरित अंमलबजावणी करून संबंधित अधिकाऱ्यांकडून रिपोर्ट मागविले. शाहूंच्या या निर्णयाला तेव्हा सामाजिक कार्यकर्ते म्हणवणाऱ्या अनेक उच्चवर्णीय पुढाऱ्यांनी विरोध केला. शाहुंवर अनेक प्रकारचे आरोप केले. परंतु वंचितांच्या विकासाचे व्रत घेतलेल्या शाहूंनी कशाचीही पर्वा न करता आपले धोरण चालू ठेवले.

ISSN No. 2394-5990

तथाकथित गुन्हेगार जातींविषयी भूमिका :

जातव्यवस्थेची शिकार झालेल्या अनेक जमाती त्या काळात चोऱ्या, दरोडे अशा चुकीच्या मार्गांचा अवलंब करत होत्या. सनातनी वर्णव्यवस्थेने त्यांना उपेक्षित ठेवून शिक्षण, सत्ता व संपत्तीचा अधिकार नाकारला. परिणामी त्यांची सर्वच क्षेत्रात अधोगती झाली. त्यांचा सामाजिक दर्जा खालावला. समाजाकडून मिळणारी अन्याय वागणूक व उत्पन्नाचे काहीच साधन नाही अशा दुहेरी संकटात सापडलेल्या मागास, भटक्या जमातीतील अनेक लोकांनी पोटापाण्यासाठी चोऱ्या, दरोडे अशा गोष्टींचा आधार घेतला. तत्कालीन ब्रिटीश सरकारने या जमातीवर गुन्हेगारीचा शिक्का मारला. त्यांना रोज गावकामगाराकडे हजेरी लावावी लागत असे. शाहू राजांना या लोकांची कणव होती. शाहू खऱ्या अर्थाने वंचितांचे राजे होते. त्यामुळे शाहूंनी ही हजेरी पद्धत बंद केली. या जाती-जमातीतील लोकांना संघटीत करून गुन्हेगारी कृत्यांपासून परावृत्त केले. त्यांना नोकऱ्या दिल्या. त्यांच्यातून पहारेकरी, रखवालदार नेमले, रथावर वाहक नेमले. त्यांना घरे बांधून दिली. राहण्याची व पोटापाण्याची सोय झाली. शाहू राजांचे प्रेम मिळाले. त्यामुळे या लोकांनी गुन्हेगारी कारवाया सोडून देवून ङ्गमाणूसफम्हणून जगायला सुरुवात केली. गुन्हेगारांना शासन करणारा सत्ताधीश सर्वत्र पहायला मिळेल. मात्र त्यांना प्रेमाने, मायेने आपलेसे करून समान सामाजिक दर्जा देणारा व त्यांच्यात स्वाभिमान निर्माण करणारा राजा विरळाच.

राजर्षी शाहू आणि स्त्रियांची स्थिती :

धर्मव्यवस्थेने स्त्रियांनाही अतिशय उपेक्षित ठेवले. त्यांचे हक्क-अधिकार नाकारले. स्त्रियांवर अनेक बंधने लादली.त्यामुळे स्त्रियांची एकंदर सामाजिक अधोगती झाली होती. पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रियांना दुय्यम स्थान प्राप्त झाले होते. त्यांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागे. स्त्रियांना कुणीही वाली उरला नव्हता. स्त्रियांची ही अवनती जाणून शाहू राजांनी त्यांच्या उन्नतीसाठी विशेष प्रयत्न केले. स्त्रियांसाठी अनेक चांगले कायदे केले. धर्माच्या नावाखाली देवांना मुले-मुली वाहण्याची अनैतिक पद्धत संस्थानात चालू होती. महाराजांनी जोगत्या-मुरळी प्रतिबंधक कायदा करून ही अमानुष पद्धत बंद केली. जातीभेदाचे प्रस्थ नष्ट व्हावे म्हणून संस्थानात आंतरजातीय-आंतरधर्मीय विवाहास कायदेशीर मान्यता दिली. तसा कायदा केला. आपल्या चुलत बहिणीचे लग्न धनगर समाजातील यशवंतराव होळकर यांच्याशी लावून दिले. तसेच त्या काळात संस्थानात शंभर मराठा-धनगर विवाह घडवून आणले. विधवांची दारूण परिस्थिती लक्षात घेवून पुनर्विवाह नोंदणीसंबंधी कायदा केला. त्यामुळे विधवांच्या परिस्थितीत बराच फरक पडला. त्यांना कायद्याने पुनर्विवाह करता येवू लागला. संस्थानातील अनेक समाजात 'काडीमोड'संबंधी त्या-त्या जात-पंचायतींचे आपापले कायदे असत. हे कायदे पुरुषप्रधान संस्कृतीला साजेसे म्हणजेच पुरुषांना अनुकूल तर स्त्रियांना प्रतिकूल असत. त्यामुळे स्त्रियांवर नेहमी अन्याय होई. स्त्रियांच्या मतांना आणि भावनांना फारशी किंमत नव्हती. त्यामुळे स्त्रियांची कुचंबना होई. हे ओळखून शाहू महाराजांनी संस्थानात 'काडीमोड'संबंधी कायदा केला. अशा प्रकारचे खटले रीतसर कोर्टात चालवण्याचे आदेश दिले. स्त्रियांवर अन्याय होऊ नये म्हणून त्यांनाही 'काडीमोड' घेण्याचे अधिकार दिले. स्त्रियांना क्रूरपणे वागवण्याच्या पद्धतीविरुद्धही शाहू राजांनी कायदा केला.स्त्रियांचा शारीरिक व मानसिक छळ करणे, त्यांना उपाशी ठेवणे, मारहाण करणे अशा प्रकारच्या गुन्ह्यांसाठी कडक शिक्षा केल्या. त्यामुळे स्त्रियांना मोठा आधार मिळाला. राजर्षी शाहूंनी केलेल्या या अनेक स्त्री-उद्धारक कायद्यांमुळे स्त्रियांना सामाजिक प्रवाहात येण्यासाठी खूप मदत झाली.

वेदोक्त प्रकरण :

शाहू महाराजांच्या जीवनाला कलाटणी देणारा सर्वात महत्वाचा प्रसंग म्हणजे वेदोक्त प्रकरण होय. शाहू महाराजांचा भटजी राजोपाध्ये यांनी महाराजांना शूद्र मानून त्यांचे विधी वैदिक मंत्राने न करता पुराणोक्त मंत्राने करणार अशी भूमिका घेतली. त्यामुळे महाराज दुखावले गेले. अनेक प्रकारे समाज देवूनही भटजी त्याची भूमिका सोडत नाही असे दिसताच महाराजांनी त्याचे इनाम जप्त केले. परिणामी वाद अधिकच चिघळला. टिळकांनीही केसरीमध्ये अग्रलेख लिहून सामाजिक न्यायाची बाजू न घेता भटजीची बाजू घेतली. आधीच महात्मा फुलेंच्या सत्यशोधक चळवळीमुळे ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद धुमसत होता.त्यात टिळक आणि महाराष्ट्रातील बहुतांशी ब्राह्मण महाराजांच्या विरोधात एकवटल्यामुळे ब्राह्मणेतर समाजही महाराजांच्या पाठीशी ठामपणे उभा राहिला. परिणामी महाराष्ट्रात ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर असे दोन गट पडले. ब्राह्मणांचे नेतृत्व टिळकांकडे तर ब्राह्मणेतरांचे नेते शाहू महाराज. परिणामी टिळक आणि शाहू राजे यांच्यात वितुष्ट निर्माण झाले. खरेतर शाहू महाराजांचे भांडण ब्राह्मणांविरुद्ध नव्हते तर त्यांच्या वर्चस्ववादी मानसिकतेविरुद्ध होते. विधी वैदिक मंत्राने केले काय किंवा पुराणोक्त मंत्राने केले काय ? काहीच फरक पडत नाही हे शाहू राजे जाणत होते. परंतु बहुजनांचे विधी वैदिक पद्धतीने न करण्यामागे ब्राह्मणांचा वर्णवर्चस्ववाद असल्याने शाहूनीही आपली भूमिका सोडली नाही. या घटनेनंतर शाहू राजांनी सामाजिक न्यायाच्या लढाईला अधिक बळकटी मिळवून दिली.

शाहू महाराजांचे आर्थिक धोरण :

शाहू महाराजांनी उद्योगधंदे उभारण्याच्या दृष्टीने खास प्रयत्न केले.कारागिरांना आश्रय दिला. आपल्या संस्थानात सुत गिरणी चालू केली.त्यासाठी मोठी जमीन मोफत दिली. इचलकरंजी येथे जिनिंग कारखाना सुरु केला. त्यानंतर इतर ठिकाणी अशा प्रकारचे कारखाने सुरु केले. उद्योगधंदे आणि व्यापार वाढीसाठी शाहूंनी कारागिरांना अनेक प्रकारच्या सवलती दिल्या. त्यांना राहण्यासाठी जमिनी दिल्या. बिनव्याजी कर्जे दिली. पाणीपुरवठ्याची मोफत सोय केली. रस्ते बांधले, रेल्वेच्या विकासास गती दिली. १८९५ साली शाहूपुरी ही व्यापारपेठ वसवण्यात आली.

राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. आंबेडकर :

छत्रपती शाहू महाराजांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याविषयी खूप आदर आणि अभिमान होता. म्हणून ते स्वतः डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना भेटण्यासाठी मुंबई येथे त्यांच्या घरी गेले. त्यांचा सत्कार केला. त्यांना वृत्तपत्र काढण्यासाठी व इतर शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य करून माणगाव परिषदेत अस्पृश्य व इतर बांधवांना त्यांचा परिचय करून देऊन सांगितले की, माझ्यानंतर अस्पृश्योउद्धारक म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच असतील. असा मोठ्या मनाचा राजा होता. जे आपल्याला आज विविध क्षेत्रात शोधूनही असा माणूस सापडणार नाही. म्हणूनच त्यांना यशवंतराव चव्हाण यांनी 'मोठ्या दिलाचा राजा' असे म्हटले आहे.

आंतरजातीय विवाहाला मान्यता :

स्त्रियांच्या प्रगतीसाठी आणि जातीयता नष्ट करण्यासाठी शाहू महाराजांनी कार्य केले. १९१८ साली त्यांनी आपल्या राज्यात आंतरजातीय विवाहाला मान्यता देणारा कायदा केला. स्वतःच्या घरात धनगर घराण्याची नाते जुळून कृतीत उतरवून आणला. जातीयता कमी व्हावी म्हणून त्यांनी स्वतः काही विवाह घडवून आणले. विधवा विवाहास मान्यता दिली. १९२० मध्ये घटस्फोटाचा कायदा केला. स्त्रियांचा सच्चा पाठीराखा होता. हेही आज देशात होत असलेल्या स्त्रियावरील अन्याय अत्याचार अत्याचारावरून आजच्या राज्यकर्त्याचे डोळे उघडणे गरजेचे आहे.

व्यापार, कला, क्रीडा, साहित्य व इतर कलांना मदत :

छत्रपती राजर्षी शाहू महाराजांना व्यापार, कला, नाट्य, संगीत या विषयीही आवड व आदर होता. व्यापारी क्षेत्रात गरुड झेप घेऊन सूतगिरण्या कापडगिरण्या वाढविल्या. राधानगरी धरण अस्तित्वात आणले. शेतीसाठी, शेतकऱ्यांसाठी बंधारे बांधले. अल्लादिया खान यांच्यासारख्या गायकाला बाबूराव पेंटरला आश्रय दिला. नाटक कंपन्या सुरू केल्या.

राजर्षी शाहूंचा वारसा :

आज शाहू महाराजांचे काम बहुतांशी लोकांपर्यंत पोहचले आहे. शाहू राजांच्या या अद्वितीय कामगिरीमुळे सर्वसामान्य बहुजनांच्या हृदयात शाहूंना आदराचे स्थान आहे. महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या युगपुरुषांच्या जोडीला शाहू राजांचे नाव घेतले जाते. पुरोगामी महाराष्ट्र घडवण्यात फुले-शाहू-आंबेडकरी विचारांचा फार मोठा वाटा आहे. आज शाहू महाराजांच्या जयंत्या-पुण्यतिथ्या सर्वत्र साजऱ्या केल्या जातात. परंतु फक्त एवढे करून त्यांच्या विचार-कार्याचे चीज होणार नाही. शाहूंचा लढा हा समतेसाठी होता. आत्मसन्मानासाठी होता. वर्णवर्चस्वाच्या अहंकारी प्रवृत्तीविरुद्ध होता. आज शाहू राजांच्या पश्चात त्यांचाच जयजयकार करणारे, त्यांच्या नावाने सत्ता भोगणारे राज्यकर्ते गरीब प्रजेला छळत आहेत. भ्रष्टाचार, गुंडगिरी या प्रवृत्ती फोफावल्या आहेत. शाहूराजे फक्त पुजण्यापुरतेच राहिले आहेत. त्यांचा वारसा, त्यांचे विचार, कार्य आपण विसरलो आहोत. राजर्षी शाहूंनी प्रतिकूल परिस्थितीत आपल्या संस्थानात जनहितार्थ अनेक कायदे केले. प्रसंगी टीका, अपमान, बदनामी यांची पर्वा केली नाही. पण आजच्या राज्यकर्त्यांना झ्र्जादूटोणा व अघोरी प्रथाविरुद्ध कायदाफ करता येत नाही. राज्यकर्ते शाहूंच्या नावाने राजकारण करतात मात्र त्यांचा विचार जपताना कुणीच दिसत नाही, ही दुर्दैवाची बाब आहे.शाहूंच्या कार्याचे खरे चीज व्हावे असे वाटत असेल तर शिक्षण घेवून उच्च पदे हस्तगत केली पाहिजेत. आपल्या अधिकाराचा, पदाचा वापर सर्वसामान्य जनतेच्या कल्याणाकरता केला पाहिजे. उपेक्षित, वंचितांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे, जातीभेद नष्ट करणे, सामाजिक समता प्रस्थापित करणे ही शाहू राजांची अपूर्ण राहिलेली स्वप्ने पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करुया.

निष्कर्ष :

१. राजर्षी शाहू महाराज यांचे विचार क्रांतीकारी स्वरूपाचे होते
२. राजर्षी शाहू महाराज यांचे विविध क्षेत्रातील योगदान भारतीय समाजाला दिर्शादर्शक ठरणारे आहे.

समारोप

अशा प्रकारे राजर्षी शाहू महाराज हे एक थोर समाजसुधारक व भविष्याचा अचूक वेध घेणारे महापुरूष ठरतात. खरे तर महापुरूष हे ते ज्या काळात जन्मले आणि वाढले त्या काळाचे

ISSN No. 2394-5990

अपत्य असतात. अवती भवतीच्या परिस्थितीमुळे पडणा–या स्वाभाविक मर्यादावर मात करून हे समाजाला किती पुढे नेतात आणि कोणती दिशा दाखवतात यावर त्यांच्या मोठेपणाचे मूल्यमापन करावयाचे असते. ते केल्यास छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांचे सामाजिक योगदान दिपस्तंभाप्रमाणे प्रखर आणि हिमालायाच्या उंचाचे ठरते असे म्हणाने वावगे ठरणार नाही. राजर्षी शाहू महाराज हे सामान्य माणसात मिळणारे, सामान्यांसाठी झटणारे राजा होते. सामाजिक लोकशाही निर्मितीसाठी शाहू महाराजांनी अतोनात कष्ट उपसले. सर्वांना न्याय मिळावा, माणुसकीचे हक्क मिळावेत, अस्पृश्यांना समानतेची व माणुसकीची वागणूक मिळावी, वैज्ञानिकता त्यांच्या अंगी यावी म्हणून त्यांनी आपल्या सत्तेचा उपयोग केला. यावरून शाहू महाराजांचे मोठेपण हे लक्षात यायला लागते. आज मात्र आम्ही व आमच्या राज्यकर्त्यांनी छत्रपती राजर्षी शाहू महाराजांचा आदर्श बाजूला ठेवला आहे. त्यांचे नाव घेऊन आम्हीही त्यांचेच आहोत म्हणणारेही त्यांच्या विचाराने वागत नाहीत उलट आपल्या सत्तेचा गैरवापर करताना दिसतात. मानवी मूल्य पायदळी तुडवताना दिसतात. ज्या शाहू महाराजांनी लोकशाही निर्मितीसाठी कष्ट उपसले, त्याच लोकशाही धिंडवडे काढताना आजचे राज्यकर्ते आम्हाला दिसत आहेत. आम्ही समाजाचे काही देणे आहोत, समाजाच्या प्रगतीसाठी आपलेही काही योगदान असावे, असे मात्र आताच्या कुठल्याच राज्यकर्त्यांना वाटत नाही एवढे भयावह चित्र डोळ्यासमोर उभे राहते. स्वार्थासाठी, मतलबासाठी, जातीसाठी, धर्मासाठी राजकारण करणे चालू आहे परंतु मानवतेसाठी, मानवी कल्याणासाठी राजकारण करावे लागते हे मात्र त्यांनी राजर्षी शाहू महाराजांकडूनच शिकायला हवे, त्या पद्धतीनेच आपली सत्ता पुढे घेऊन जायला हवी व सामान्याचे हित जोपासायला हवे. त्यांच्या विचारांची, आचारांची व कृतीची आज देशाला गरज आहे. प्रत्येक मानवाने त्यांच्या विचाराने कार्य केले तर देशाची प्रगती व्हायला वेळ लागणार नाही.

संदर्भ ग्रंथ :

१. डॉ. विलास संगवे, राजर्षी शाहू महाराज :कार्य व प्रभाव
२. कीर, धनंजय, शाहू छत्रपती, अ रॉयल रिव्हल्युशनरी, बॉम्बे, १९७६.
३. लठ्ठे, अण्णासाहेब, परमपूज्य श्री शाहू छत्रपती महाराजांच्या आठवणी, कोल्हापूर, १९२४.
४. पवार, जयसिंगराव संपा., राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, कोल्हापूर, २००१.
५. सूर्यवंशी, कृ. गो. राजर्षी शाहू : राजा व माणूस, पुणे, १९८४.
६. https://mr.vikaspedia.in/education/childrens-corner/92d93e93092494092f-90792493f93993e938/93693e939942-92e93993e93093e91c
७. डॉ. जयसिंगराव पवार, राजर्षी शाहू, छत्रपती – जीवन व कार्ये
८. दैनिक सकाळा, लोकमत, दिव्यमराठी , बाईटस ऑफ इंडिया , पुढारे इत्यादी
९. नाईक, तु. बा. छत्रपती राजर्षी शाहू महाराज, पुणे, २००५.

■■■

गोलमेज परिषदांमध्ये अस्पृश्यांच्या हक्कासाठी डॉ.आंबेडकरांचा संघर्ष व परिणाम

प्रा.डॉ.जयपाल चंद्रकांत सावंत
शिवाजी विद्यापीठ संलग्नित,
शंकरराव जगताप आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज,
वाघोली ता. कोरेगाव जि. सातारा

प्रस्तावना :

डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्यता निवारणासाठी जे लढे दिले त्यात काळाराम मंदिराच्या सत्याग्रहाचे महत्त्वाचे स्थान आहे. फक्त हिंदूंनाच नव्हे तर सत्ताधारी इंग्रजांनाही जाग यावी आणि त्यावेळच्या दलितांना, शोषितांना सर्व मूलभूत हक्क मिळावेत यासाठी त्यांनी हा लढा उभारला होता. हा लढा २ मार्च १९३० ला सुरू झाला आणि पुढील पाच वर्षे चालला. त्यावेळी सत्ताधारी इंग्रजांच्या दडपशाहीविरोधात काँग्रेस लढत होती तर हिंदू धर्ममार्तंडशाहीविरोधात डॉ.आंबेडकरांचा संघर्ष सुरु होता. नाशिकामधील काळाराम मंदिरात हजारो अस्पृश्यांसह प्रवेश करण्याचा निर्धार डॉ. आंबेडकर यांनी केला होता. त्याबद्दल डॉ. आंबेडकरांचे चरित्रकार धनंजय कीर लिहितात, ''महाराष्ट्रातील स्पृश्य हिंदूंचे नाक जे नाशिक तेच दाबण्याचा निर्धार डॉ. बाबासाहेब डॉ. आंबेडकरांनी केला. डॉ. डॉ. आंबेडकरांचा लढा माणुसकीस कलंक लावणाऱ्या अमानुष, अन्यायी आणि अघोर अशा स्वदेशी सनातनी ब्राह्मणी सत्तेविरुद्ध होता.''[१] इ.स. १९२९ च्या ऑक्टोबर मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी विचारविनिमय करुन नाशिक जिल्ह्यातील अस्पृश्यांच्या पुढाऱ्यांनी नाशिक येथील काळाराम मंदिरात अस्पृश्यांनी प्रवेश करावा व गरज वाटल्यास सत्याग्रह करावा, असे निश्चित करण्यात आले.[२] २ मार्च १९३० रोजी डॉ. आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली नाशिकमध्ये एक परिषद भरली.२ मार्च १९३० रोजी सकाळी व दुपारी अशा दोन सभा बाबासाहेब आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली झाल्या, तसेच ३ मार्च १९३० रोजीही सकाळी डॉ.आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली सभा झाली. डॉ. आंबेडकरांनी शांततेच्या मार्गाने सत्याग्रह करावा व यश मिळेपर्यंत सत्याग्रहाचा लढा सुरु ठेवावा असा उपदेश केला. काळाराम मंदिराचा सत्याग्रह म्हणजे शोषितांना त्यांचा हक्क मिळावा यासाठी डॉ. आंबेडकरांनी स्पृश्य व सवर्णांना केलेले एक आवाहन होते. २ मार्च १९३० रोजी केलेल्या भाषणात ते म्हणतात,''आज आपण मंदिरात प्रवेश करणार आहोत. मंदिरात प्रवेश केल्यामुळे आपले प्रश्न सुटणार नाहीत. आपले प्रश्न राजकीय आहेत, सामाजिक, धार्मिक, आर्थिक आणि शैक्षणिक आहेत. काळाराम मंदिरात प्रवेश करणे म्हणजे हिंदू मनाला केलेले आवाहन आहे. उच्चवर्णीय हिंदूंनी आपल्याला आपल्या हक्कांपासून अनेक पिढ्यांपासून दूर ठेवले. आता तेच हिंदू आपल्याला आपला मानवी हक्क देतील का हा प्रश्न या काळाराम मंदिर सत्याग्रहाच्या माध्यमातून मी विचारत आहे. हिंदू मन हे आपल्याला एक मानव म्हणून स्वीकारावयास तयार आहे की नाही हा याची पडताळणी या सत्याग्रहाद्वारे होणार आहे.''[३]

त्या परिषदेत ठरल्याप्रमाणे २ मार्च रोजी नाशिक शहरात अस्पृश्यांची मोठी मिरवणूक निघाली. मिरवणूक मंदिराजवळ पोहोचली. त्या दिवशी स्पृश्यांनाही मंदिर प्रवेशास मज्जाव करण्यात आला होता. पुढे महिनाभर हा सत्याग्रह सुरूच होता. ९ एप्रिल, १९३० रोजी रामनवमीचा दिवस होता. त्याआधी सनातनी हिंदू आणि सत्याग्रहाचे नेत्यांमध्ये तडजोड झाली आणि असे ठरले की स्पृश्य-अस्पृश्यांनी मिळून रामाचा रथ ओढावा. कार्यकर्त्यांसह डॉ. आंबेडकर मंदिराजवळ आले. पण डॉ.आंबेडकरांच्या अनुयायांनी रथाला हात लावण्यापूर्वीच सनातनी हिंदूंनी सत्याग्रहींना हुलकावणी देऊन तो रथ दुसरीकडे पळवला. त्या रथाचा पाठलाग डॉ. आंबेडकरांच्या अनुयायांनी केला व चरण पादुकाजवळ थांबलेल्या सत्याग्रहींच्या लक्षात येताच त्यांनी सर्व शक्ती एकवटून रथ अडविला तेव्हा मारामारी व डॉ. आंबेडकरांच्या अनुयायांवर दगडांचा वर्षाव झाला.[४] In the instance, on 2nd March, 1930 in the Kalaram Mandir Satyagrah, many satyagrahis were stoned heavily and grievously injured by the castes Hindu. The satyagrahis wanted to retaliate. But Babasaheb always displayed the wisdom of a statesman; qualities of a leader, the courage of a hero and endurance of a martyr. He advised them to remain peaceful and not to retaliate aggressively.[५]

या दरम्यान डॉ. आंबेडकर गोलमेज परिषदेसाठी लंडनला गेले. त्यांच्या अनुपस्थितीत भाऊराव गायकवाड यांनी हा

ISSN No. 2394-5990

सत्याग्रह सुरूच ठेवला. पाच वर्षं हा लढा चालूनही अस्पृश्यांना मंदिर प्रवेश मिळाला नाही. डॉ. आंबेडकरांनी ३ मार्च, १९३४ रोजी गायकवाडांना पत्र पाठवले आणि आता सत्याग्रह सुरु ठेवून शक्ती वाया घालवण्यापेक्षा ती शक्ती राजकीय हक्क व शिक्षण घेण्याची सोय मिळवण्यासाठी वापरावी, म्हणून आता सत्याग्रह बंद करण्यात यावा, असे कळवले. त्यानंतर हा मंदिराचा सत्याग्रह बंद करण्यात आला, व तो पुन्हा कधीही करण्यात आला नाही.[६]

पहिली गोलमेज परिषद :

ब्रिटिश सरकारने भारताला देऊ केलेल्या वसाहतींचे स्वराज्य व भावी राज्यघटना यावर चर्चा व विचारविनिमय करण्यासाठी भारतातील नेत्यांसह इंग्लंड येथे गोलमेज परिषद भरवली. यात अस्पृश्यांचे प्रतिनिधी म्हणून बाबासाहेब आंबेडकर व रावबहादूर श्रीनिवासन या दोघांचा समावेश होता. काँग्रेसने गोलमेज परिषदेवर बहिष्कार टाकला. डॉ. आंबेडकरांनी १८ ऑक्टोबर १९३० ते ११ नोव्हेंबर १९३० या कालावधीत भारतमंत्री, उपभारतमंत्री, मजूर पक्षाचे नेते जॉर्ज लान्सबेरी, भारताचे नवे सरसेनापती सर फिलिप चेटवूड, लंडनचे खासदार, मजूर, उदारमतवादी व हुजूर पक्षांचे सभासद या सर्वांशी भेटी घेतल्या व अस्पृश्योद्धाराच्या विषयावर त्यांच्याशी चर्चा केल्या.

पंतप्रधान रॅम्से मॅक्डोनाल्ड यांच्या अध्यक्षतेखाली १२ नोव्हेंबर १९३० ते १९ जानेवारी १९३१ पर्यंत गोलमेज परिषदेच्या बैठका होत राहिल्या. या परिषेदला डॉ. बाबासाहेब आंबेडकर व रावबहादूर श्रीनिवासन अस्पृश्यांचे प्रतिनिधी म्हणून उपस्थित होते. डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्यांच्या राजकीय हक्कांचा खलिता या परिषदेत सादर केला. डिसेंबर १९३० मध्ये त्यांनी अस्पृश्यांच्या राजकीय हक्कांचा खलित्याच्या दोन हजार प्रती छापल्या व त्यापैकी काही प्रती ब्रिटिश संसदेच्या सदस्यांना, गोलमेज परिषदेच्या सभासदांना तसेच काही प्रती मुंबईला पाठवून दिल्या. भविष्यात भारत स्वतंत्र होऊन ज्या राज्यघटनेच्या आधारे राज्यकारभार करतील त्या राज्यघटनेत अस्पृश्यांच्या आठ राजकीय हक्कांचा समावेश असावा, असे मत डॉ. आंबेडकर व श्रीनिवास यांनी मांडले. The first Round table conference in 1930 was again by Boycotted by congress where representative of the Muslim, Sikh, Christian, untouchables and the Hindu Mahasabha participated along with the traditional supports of the British of the liberal party. Ambedkar attended accompanied by Raw Bahadur Ratnamala Srinivasan member of legislative council of the Madras Presidency. In Nagpur in August 1930 the all India depressed class congress head came out in favour of the same skin as that defended by -mbedkar before the Simon Commission one that combined reserved seats and universal surffrage. -mbedkar repeated this demand in London but the conference reached no conclusion given the absence of the Congress representative.[७] अस्पृश्य वर्गासाठी समान नागरिकत्व, समान हक्क, जातिद्वेषरहित वागणूक, कायदेमंडळात भरपूर प्रतिनिधित्व, सरकारी नोकरीत अस्पृश्यांची भरती करण्यात यावी, सरकारची पूर्वग्रहरहित वर्तवणूक, अस्पृश्यता निर्मूलन सरकारी खाते, व गव्हर्नर जनरलच्या मंत्रिमंडळात प्रतिनिधित्व, असे ते राजकीय हक्क होते. या परिषदेदरम्यान डॉ. आंबेडकरांना कळाले की त्यांचे मुंबई कायदेमंडळाचे सदस्यत्व आणखी तीन वर्षांनी वाढवले आहे. डॉ. आंबेडकरांनी गोलमेज परिषदेमध्ये तसेच मजूर पक्ष, उदारमतवादी पक्ष, हुजूर पक्ष या तिन्ही पक्षांच्या सभासदांपुढे भाषणे दिली आणि भारताच्या भावी राज्यघटनेत अस्पृश्यांच्या राजकीय हक्कांची तरतुद करुन ठेवण्याबाबत पाठपुरावा केला.

पहिल्या गोलमेज परिषदेच्या प्रसंगी बोलताना ते म्हणतात, ''When we compare our present position with the one which it was our lot to bear in Indian society of pre-British days, we find that, instead of marching on, we are marking time. Before the British, we were in the loathsome condition due to our Untouchability. Has the British Government done anything to remove it? Before the British, we could not draw water from the village well. Has the British Government secured us the right to the well? Before the British, we could not enter the temple? Can we enter now? Before the British, we were denied entry into the Police Force. Does the British Government admit us into the force? Before the British. We were not allowed to serve in the Military. Is that career now open to us? To none of these questions can we give an affirmative answer. Our wrongs have remained as open sores and they have not been righted, although 150 years of British rule have rolled away.''[८]

डॉ. आंबेडकरांच्या भाषणांची दखल ब्रिटिश वर्तमानपत्रांनीही घेतली, डॉ. आंबेडकरांच्या छायाचित्रासह त्यांच्या भाषणांचे वृत्त वर्तमानपत्रांत प्रसिद्ध होऊ लागली. अस्पृश्यांच्या स्थितीबाबतची माहिती सर्वांना कळू लागली. वर्तमानपत्रे डॉ.आंबेडकरांना 'अस्पृश्यांचा महान नेता' संबोधू लागले. लंडन मधीन काही संस्थानी डॉ. आंबेडकरांची भाषणे आयोजित केली होती. ब्रिटिश संसदेत हाऊस ऑफ कॉमन्सच्या सदस्यांपुढे डॉ. आंबेडकरांनी भाषण केले आणि अस्पृश्यांचा उद्धार करणे अत्यंत निकडीचे असल्याचे सांगितले.

दुसरी गोलमेज परिषद :

दि. ७ सप्टेंबर १९३१ रोजी दुसरी गोलमेज परिषद बोलविण्यात आली. यावेळी म. गांधीनी, ''काँग्रेसने तिच्या सुरुवातीपासूनच तथाकथित अस्पृश्यांचा मुद्दा हाती घेतला आहे. तथापि १९२० मध्ये काँग्रेसने व्यापक पाऊल उचलले आणि राजकीय जाहीरनाम्यातील एक कलम म्हणून अस्पृश्यता निर्मूलनाच्या प्रश्नाला आपल्या राजकीय कार्यक्रमात प्राधान्य देऊन, त्यास काँग्रेसने समाविष्ट करून घेतले.''[९] अशा प्रकारचे मत आपल्या पहिल्या भाषणात मांडले. दुसऱ्या भाषणामध्ये म.गांधीजी आणखी तीव्रपणे अस्पृश्यांच्या राजकीय प्रतीनिधित्वाला विरोध करताना म्हणतात, ''काँग्रेसने हिंदू-मुस्लीम-शिख गुंत्यात समेट घडवून आणला आहे. यासाठीची सबळ ऐतिहासिक कारणेही आहेत, परंतु त्या तत्त्वाचा कोणत्याही स्वरूपात किंवा आकृतिबंधात काँग्रेस विस्तार करणार नाही. विशेष हितसंबंधाच्या यादी बद्दल मी ऐकले आहे. अस्पृश्यांचा संबंध जेथे आहे, तेथे अजूनही मला डॉ. आंबेडकरांना काय म्हणायचे आहे याचे नीटसे आकलन झालेले नाही, परंतु अर्थातच अस्पृश्यांच्या हितसंबंधाचे प्रतिनिधित्व करताना डॉ.आंबेडकरांसोबत सहभागी होण्याकरिता काँग्रेसला समाधान वाटेल. इतर समाज घटकांच्या हितसंबंध प्रमाणेच अस्पृश्यही काँग्रेसला प्रिय आहेत. म्हणून मी कोणत्याही आणखी जास्तीच्या विशेष प्रतिनिधित्वाचा तीव्रपणे प्रतिकार करेन.''[१०]

The Mahatma has been claiming, "Dr.Ambedkar proceeded that the Congress stands for the Depressed Classes, and that the Congress represents the Depressed Classes more than I or my colleagues can do. To that claim I can only say that it is one of the many false claims which irresponsible people keep on making although the persons concerned with regard to those claims have been invariably denying them.' Dr.Ambedkar thereupon showed how he had received from the farthest Untouchable corner of India-from the places which he had never visited and from the men he had never seen-telegrams supporting the stand taken by him.[११]

गांधीजींच्या या भूमिकेचा अनिष्टपणा मि, मॅक्डोनाल्ड यांच्या नजरेस डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आणून दिला व या परिषदेसमोर अस्पृश्यांच्या हक्काची मागणी केली. त्यात, 'अस्पृश्यांना लोकसंख्येच्या प्रमाणात स्वतंत्र राजकीय हक्क मिळाले पाहिजे आणि अस्पृश्य मतदारसंघातून अस्पृश्यांनी आपले उमेदवार निवडले पाहिजेत, तसेच त्यांना नोक-यांमध्ये व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये, प्रांतिक व मध्यवर्ती कायदेमंडळात लोकसंख्येच्या प्रमाणात जागा मिळाव्या.' अशा प्रकारचा खलिता परिषदेला सादर केला. सन १९३०, १९३१ व १९३२ या वर्षी गोलमेज परिषदा झाल्या, त्यात बाबासाहेबांनी अस्पृश्यांच्या भयानक जीवनाचे दर्शन संपूर्ण जगाला घडवले, की कशाप्रकारे दीन दलितांवर सर्वण हिंदू अत्याचार करतात. कसा हा समाज हजारों वर्षापासून सर्वणांच्या गुलामगिरीत जगत आहे.

ज्या लोकांची स्थिती गुलामापेक्षाही वाईट आहे. त्या भारतातील एक पंचमांश लोकांची गाऱ्हाणी या परिषदेसमोर ठेवत आहे. त्या लोकांची अशी मागणी आहे की, भारतातील सरकार हे लोकांनी लोकांकरिता चालवलेले लोकांचे असावे.[१२] या ७ कोटी समाजाला सामाजिक, राजकिय, धार्मिक, संस्कृतिक समता मिळावी म्हणून बाबासाहेब लढले. शोषित, पीडित व दलितांच्या उत्थानासाठी त्यांनी राजकिय स्वातंत्र्य आवश्यक आहे याचा त्यांनी पुरस्कार केला.

म.गांधीजी व डॉ.आंबेडकर यांच्यातील अस्पृश्यांच्या राजकीय प्रतिनिधित्वाचा प्रश्न कायम राहिल्याने दुसऱ्या गोलमेज परिषदे नंतर हा प्रश्न ब्रिटिश पंतप्रधानांच्या इच्छेवर सोपवण्यात आला. ब्रिटिश पंतप्रधान काँग्रेस आणि म.गांधीजींच्या इच्छेविरोधात डॉ.आंबेडकरांना पूरक असा निर्णय घेणार नाही अशा भ्रमात म.गांधीजी राहिले व त्यांनी या प्रस्तावास संमती दिली.

जातीय निवाडा :

ऑगस्ट १९३२ मध्ये ब्रिटिश पंतप्रधानांनी अस्पृश्यांना आपला स्वतंत्र उमेदवार निवडण्याचा आणि संयुक्त मतदार संघात मत देण्याचा अधिकार देण्याचा निर्णय जाहीर केला. On the 17th August 1932 the dicision of the British Prime Minister on the communal question, was

ISSN No. 2394-5990

announced. "According to this -ward, the Depressed Classes were granted separate seats in the Provincial Assemblies and the right of double vote under which they were to elect their own representatives and to vote also in the general constituencies."[१३] यानुसार भारतातील अस्पृश्यांना युरोपीयन, अँग्लो इंडियन, भारतीय ख्रिश्चन, मुसलमान व शीख यांच्याप्रमाणे राजकीय हक्क देण्याची तरतूद करण्यात आली होती. यामुळे अस्पृश्यांना दुहेरी राजकीय लाभ मिळणार होता. पहिला लाभ असा की, कायदेमंडळावर निवडून येण्याकरिता अस्पृश्यांना स्वतंत्र मतदार संघ मान्य करण्यात आले होते. त्या स्वतंत्र मतदारसंघातून अस्पृश्य उमेदवार निवडून येऊन प्रांतिक कायदेमंडळाचे सभासद बनू शकत होते. यावेळी अस्पृश्य उमेदवारांनी स्वतंत्र निवडून येण्यासाठी फक्त अस्पृश्य मतदारांवरच विसंबून राहता येत होते, त्यांना स्पृश्य मतदार मतदान करु शकत नव्हते. अस्पृश्यांसाठी विकास करण्यासाठी केवळ अस्पृश्य मतदारांमार्फतच अस्पृश्य प्रतिनिधी निवडण्यात येणार होता. दुसरा लाभ असा की, अस्पृश्यांना दोन मतांचा अधिकार मान्य करण्यात आला होता. अस्पृश्यांचे मतदार संघ सामान्य मतदारसंघाच्या अंतर्गत होते. अस्पृश्य मतदार आपल्या दोन मतांपैकी एक मत अस्पृश्य उमेदवाराला देऊ शकत होते व दुसरे मत सामान्य स्पृश्य उमेदवाराला देऊ शकत होते. सामान्य (स्पृश्य) उमेदवाराला निवडणुकीत निवडून येण्यासाठी अस्पृश्य मतदारांवरही अवलंबून राहावे लागणार होते. अस्पृश्य उमेदवाराला निवडून येण्यासाठी स्पृश्य मतदारांवर अवलंबून राहण्याची गरज नव्हती. भारतातील स्पृश्यास्पृश्यभेद नष्ट होण्यासाठी आणि सामाजिक समता स्थापन होण्यासाठी ब्रिटिश सरकारने हे राजकीय हक्क मान्य केले होते.

अस्पृश्यांचा हा राजकीय हक्क महात्मा गांधींना मान्य झाला नाही. त्यांनी अस्पृश्यांच्या स्वतंत्र मतदार संघाच्या हक्कास विरोध केला आणि तो बदलण्यासाठी पुण्याच्या येरवडा तुरूंगात २० सप्टेंबर, १९३२ रोजी प्राणांतिक उपोषण सुरू केले. He (Gandhiji) informed the British Cabinet from Yeravda Jail that he would resist with his life the separation of the Untouchable Hindus from the Caste Hindus. And when the Communal Award was declared, granting Separate Electorates to the Untouchables, he declared his resolve to fast unto death if the separate electorates for the Depressed Classes were not abolished.[१४]

डॉ. आंबेडकर अस्पृश्यांना मिळालेले हे राजकीय हक्क कोणत्याही स्थितीत सोडून देण्यास किंवा बदलण्यास तयार नव्हते. प्राण गेला तरी बेहेत्तर, पण अस्पृश्यांना स्वतंत्र असे काही मिळू देणार नाही असे गांधी म्हटले. सर्वसाधारण मतदारसंघातून मुसलमानांना वगळल्यानंतर जे मतदारसंघ शिल्लक राहतात त्यांच्यामध्ये स्पृश्य हिंदूंची संख्या फार मोठी असल्यामुळे अस्पृश्यांना केवळ स्वतःच्या सामर्थ्यावर कायदेमंडळात आपले प्रतिनिधी निवडून आणता येणार नाहीत. अस्पृश्य हे मुसलमानांसारखेच अल्पसंख्याक आणि त्यांच्याहूनही अधिक दुबळे व असंघटित आहेत म्हणून त्यांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी त्यांना स्वतंत्र मतदारसंघ द्यावेत असा युक्तिवाद डॉ. आंबेडकरांनी गोलमेज परिषदेत केलेला होता. अस्पृश्य हे हिंदू धर्माचेच घटक आहेत असे गांधींच्या मतावर डॉ. आंबेडकरांनी स्पष्ट केले की, स्पृश्य हिंदूप्रमाणे अस्पृश्यांना मंदिरात जाता येत नाही, हिंदू देवाच्या मूर्तीला स्पर्श करता येत नाही, हिंदू ग्रंथांचे वाचन करता येत नाही तसेच स्पृश्य हिंदू अस्पृश्यांना आपले धर्मबांधव मानत नाही व त्यांनी कोणताही धार्मिक अधिकार देत नाही. त्यामुळे अस्पृश्यांना हिंदू म्हणणे योग्य नाही. युरोपीयन, अँग्लो इंडियन, भारतीय ख्रिश्चन, मुसलमान व शीख या अल्पसंख्याकांना मिळालेल्या स्वंतत्र मतदारसंघास गांधींचा विरोध नव्हता, मात्र अस्पृश्यांना स्वतंत्र्य मतदारसंघ दिल्यास हिंदू समाज दुभंगेल तसेच राष्ट्राचे तुकडे पडतील असे गांधींना वाटत होते. त्यावर डॉ. आंबेडकरांचे मत होते की युरोपीय, अँग्लो इंडियन, भारतीय ख्रिश्चन, मुसलमान व शीख या अल्पसंख्याकांना स्वतंत्र मतदारसंघ दिला गेल्यामुळे राष्ट्राचे तुकडे पडत नाही त्याप्रमाणे बहिष्कृत वर्गासाठी (अस्पृश्य) स्वतंत्र मतदारसंघ दिल्यास अरिष्ट कोरळणार नाही किंवा राष्ट्राचे तुकडे पडणार नाही.

अस्पृश्यतेचे निवारण करण्यासाठी व बहिष्कृत वर्गाचा दर्जा उंचावण्यासाठी आणि त्यांना सामावून घेण्यासाठी अस्पृश्यांना स्वतंत्र्य मतदार संघ आवश्यक आहेत. अस्पृश्यता निर्मूलन हे अस्पृश्यांच्या सशक्तीकरणामुळेच होऊ शकते असा डॉ. आंबेडकरांचा विचार होता तर स्पृश्य हिंदूंच्या हृदयपरिवर्तनाने अस्पृश्यता निर्मूलन होईल असे गांधींना वाटे. डॉ. आंबेडकरांना काँग्रेसचे नेते भेटू लागले आणि गांधींचे प्राण वाचविण्यास विनवू लागले. या कालावधीत देशात अशांतता निर्माण झाली होती. गांधीजीनी जातीय निवाड्याच्या विरोधात प्राणांतिक उपोषण सुरू केले. देशभरातले काँग्रेसचे बडे नेते मंडळी डॉ.आंबेडकरांना भेटण्यासाठी येऊ लागली. परंतु डॉ.आंबेडकर जातीय निवाड्यातील मिळालेल्या या

गोष्टींवर पाणी सोडण्यास तयार नव्हते. अशावेळी एका बाजूस गांधीजींचे प्राण व दुसऱ्या बाजूस अस्पृश्यांच्या हक्क अशा कोंडीत डॉ.आंबेडकर अडकले होते. यावेळी ते म्हणतात नियतीने मला खलनायकाच्या भूमिकेत आणली आहे परंतु मी हे सांगू इच्छितो की मी माझ्या पवित्र कार्यापासून तसूभरही मागे सरणार नाही अगदी जरी तुम्ही मला जवळच्या दिव्याच्या खांबावर फाशी दिले तरी मी माझ्या लोकांच्या न्याय्य हक्कांची प्रतारणा करणार नाही. "I tell you I shall not deter from my pious duty, and betray the just and legitimate interests of my people even if you hang me on the nearest lamp-post in the street."[१५]

भारतातील सर्वच अल्पसंख्यांक समाजघटकांना स्वतंत्र मतदारसंघाचे तत्त्व लागू करताना गांधीजी त्यास मान्यता देतात परंतु त्या तत्त्वाचा अस्पृश्यांसाठी विस्तार केल्यानंतर गांधीजी आपले प्राण पणाला लावतात त्याचे तीव्र दुःख डॉ.आंबेडकरांना झाले.[१६] या संदर्भांनी मांडणी करताना डॉ.आंबेडकर म्हणतात, 'हिंदू किंवा काँग्रेसच्या मानवता वादातून अस्पृश्यतेचा प्रश्न न चुकता तो तसाच राहिला,' महात्मा आले आणि गेले, परंतु अस्पृश्य हे अस्पृश्यच राहिलेत.[१७] अंतिमतः गांधीजींच्या वतीने हिंदू नेते आणि अस्पृश्यांच्या वतीने स्वतः डॉ. आंबेडकर आणि इतर यांच्यात तडजोड होऊन संयुक्त मतदारसंघ आणि राखीव जागा पुणे करारातून अस्पृश्यांना प्रदान करण्यात आल्या. स्वतंत्र मतदार संघाच्या योजनेत प्रांताच्या कायदेमंडळाच्या ७८ जागा दिल्या होत्या त्या या या करारातून संयुक्त मतदार संघाद्वारे १४८ पर्यंत वाढवण्यात आल्या. कराराचा अंतिम मसुदा तयार झाल्यानंतर त्यावर हिंदु आणि अस्पृश्य पुढाऱ्यांनी सह्या केल्या.[१८] ब्रिटिश सरकारने २६ सप्टेंबर, १९३२ रोजी पुणे करार मान्य केला, त्यानंतर गांधींनी २७ सप्टेंबर, १९३२ रोजी आपले प्राणांतिक उपोषण समाप्त केले. परंतु एक महत्त्वाची बाब म्हणजे या करारावर महात्मा गांधीजींची सही नाही. महात्मा गांधीजी आणि डॉ. आंबेडकर यांच्यात अस्पृश्यांच्या हक्कासाठी झालेला पुणे करार पुढील प्रमाणे आहे.

Appendix II

TEXT OF THE POONA PACT

(1) There shall be seats reserved for the Depressed Classes out of the general electorate's seats in the Provincial Legislatures as follows:

Sr. No.	State	Seats
1.	Madras	30
2.	Bombay with Sind	15
3.	Punjab	8
4.	Bihar and Orissa	18
5.	Central Provinces	20
6.	Assam	7
7.	Bengal	30
8.	United Provinces	20
9.	Total	148

(2) These figures are based on total strength of the Provincial councils announced in the Prime Minister's decision.

(3) Election to these seats shall be by joint electorates, subject however, to the following procedure : All the members of the Depressed Classes registered in the general electoral roll in a constituency will form an electoral college, which will elect a panel of four candidates belonging to the Depressed Classes for each of such reserved seats, by the method of the single vote ; the four getting the highest number of votes in such Primary election, shall be candidates for election by the general electorate. (1) Representation of the Depressed Classes in the Central: (2) Representation of the Depressed Classes in the Central Legislature shall likewise be on the principle of joint electorates and reserved seats by the method of Primary election in the manner provided for in clause (3) above, for their representation in the Provincial Legislatures.

(4) In the Central Legislature, eighteen per cent of seats allotted to the general electorate for British India in the said Legislature shall be reserved for the Depressed Classes.

ISSN No. 2394-5990

(5) The system of Primary election to a pannel of Candidates for election to the Central and Provincial Legislature, as hereinbefore mentioned, shall come to an end after the first ten years, unless terminated sooner by mutual agreement under the provision of clause (6) below.

(6) The system of representation of the Depressed Classes by reserved seats in the Provincial and Central Legislatures as provided for in clauses (1) and (4) shall continue until determined by mutual agreement between the communities concerned in the settlement.

(7) Franchise for the Central and Provincial Legislatures, for the Depressed Classes shall be as indicated in the Lothian Committee Report.

(8) There shall be no disabilities attaching to anyone on the ground of his being a member of the Depressed Class in regard to any elections to local bodies or appointment to the Public Services. Every endeavour shall be made to secure fair representation of the Depressed Classes in these respects, subject to such educational qualifications as may be laid down for appointment to the Public Service.

(9) In every Province out of the educational grant an adequate sum shall be earmarked for providing educational facilities to the Members of the Depressed Classes.

मात्र या कराराबाबत डॉ. आंबेडकर असमाधानी होते. स्टेट अंड मायनॉरिटी या ग्रंथामध्ये डॉ.आंबेडकरांनी पुणे कराराचा धिक्कार केलेला आहे. या ग्रंथात त्यांनी अस्पृश्यांच्या राजकीय अधिकारापासून कशाप्रकारे त्यांना दूर करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे याची आकडेवारी सहित तपशीलवार माहिती दिलेली आहे. गांधींच्या उपोषणाचे वर्णन डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्यांच्या राजकीय अधिकारांना बगल देण्यासाठी गांधींनी खेळलेली राजकीय चाल होय असे नंतर केले. या ग्रंथातील परिशिष्ट क्रमांक III मध्ये त्यांनी पुणे कराराचे तोटे अस्पृश्यांना कसे झालेले आहेत याची तपशीलवार माहिती देऊन ते शेवटी म्हणतात पुणे करार अशाप्रकारे शरमेने भरलेला आहे. कारण गांधीजींच्या या जबरदस्ती उपोषणाने आणि आणि हिंदू लोक अनुसूचित जातीच्या निवडणुकीमध्ये हस्तक्षेप करणार नाहीत अशा दिलेल्या या आश्वासनामुळे स्वीकारण्यात आलेला होता.[१९]

संदर्भ यादी :

१. गायकवाड 'राजवंश', डॉ. ज्ञानराज काशिनाथ, महामानव डॉ. भीमराव रामजी आंबेडकर, कोल्हापूर, रिया प्रकाशन, ऑगस्ट २०१६, सहावी आवृत्ती पृष्ठ क्र. १६२-१६५

२. कित्ता, पृष्ठ क्र. १६३.

३. डॉ. आंबेडकर यांची भाषणं आणि पत्रं (प्रकाशक- परराष्ट्र मंत्रालय भारत सरकार, भाग १७).

४. https://maharashtratimes.com/maharashtra/nashik/kalaramsatya graha and drambedkar/articleshow/63750408.cms

५. Dr. Jay Pal Singh, DR. BHIMRAO AMBEDKAR'S UNFLINCHING HUMANISTIC CONVICTIONS, International research journal of India, ISSN 2454-8707 VOLUME-II,ISSUE-III, NOV-2016 IMPACT FACTOR-1.3652 (JIIF),n¥ð> H«$..3

६. गायकवाड 'राजवंश', डॉ. ज्ञानराज काशिनाथ, उपरोक्त, पृष्ठ क्र. १६४

७. Christophe Jaffrelot, Analysing and finding cast Dr Ambedkar and untouchability,n¥ð> H«$..57

८. HARI NARAKE, DR. M. L. KASARE, N. G. KAMBLE, ASHOK GODGHATE, DR.BABASAHEB AMBEDKAR WRITINGS AND SPEECHES VOL. 17 PART ONE DR. B.R. AMBEDKAR AND HIS EGALITARIAN REVOLUTION PART ONE STRUGGLE FOR HUMAN RIGHTS, First Edition by Education Department, Govt. of Maharashtra : 4 October, 2003 Re-printed by Dr. -mbedkar Foundation : January, 2014,Page.75-76

९. इंडियन राउंड टेबल कॉन्फरन्स(सेकंड सेक्शन) प्रोसिडिंग ऑफ फेडरल स्ट्रक्चर कमिटी अंड मायनॉरिटी कमिटी,

खंड १, गव्हर्मेंट ऑफ इंडिया, सेंट्रल पब्लिकेशन ब्रांच, कलकत्ता,१९३२, पृ.४२
१०. कित्ता, पृ.१६३.
११. HARI NARAKE, DR. M. L. KASARE, N. G. KAMBLE, ASHOK GODGHATE, DR. BABASAHEB AMBEDKAR WRITINGS AND SPEECHES VOL. 17 Cnamoº$, Page.115-116
१२. भोळे आर.आर., स्वतंत्र मजूर पक्ष आणि मुंबई विधानसभा शब्दांकन-डॉ.बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथमावृत्ती, १९९३, पृ.१४१
१३. HARI NARAKE, DR. M. L. KASARE, N. G. KAMBLE, ASHOK GODGHATE, DR. BABASAHEB AMBEDKAR WRITINGS AND SPEECHES VOL. 17 Cnamoº$, Page.133-135
१४. कित्ता, Page.137
१५. कित्ता, Page.154
१६. आंबेडकर बी.आर., व्हॉट काँग्रेस अँड गांधी हॅव्ह डन टू द अनटचेबल्स, ठक्कर अँड कं., बॉम्बे,१९४५, पृ.३११-१७
१७. कित्ता,पृ. ३११-१७
१८. आंबेडकर बी. आर., स्टेट्स अँड मायनॉरिटीज, डॉ.आंबेडकर मेमोरियल सोसायटी, हैदराबाद,१९७०, पृ.६१-६२
१९. HARI NARAKE, DR. M. L. KASARE, N. G. KAMBLE, ASHOK GODGHATE, DR. BABASAHEB AMBEDKAR WRITINGS AND SPEECHES VOL. 17 Cnamoº$, Page.154

■■■

ISSN No. 2394-5990

संगीत प्रेमी राजर्षी शाहू महाराज

डॉ. बुद्धरत्न लिहीतकर
वसंतराव नाईक शासकीय कला व
समाजविज्ञान संस्था, नागपूर
bsliheetkar@gmail.com
९८२२९५४६८२, ७०२०९०३६२२

keynote : छत्रपती शाहू महाराज, संगीत, तमाशा, नाटक

प्रस्तावना :

छत्रपती शाहू महाराज यांचे सामाजिक भान अतुलनीय होते. समाज केवळ आर्थिक बळ तसेच सामाजिक विकास यावरच सुखी होईल असे नाही तर सांस्कृतिक जीवनमान सुध्दा आवश्यक आहे. निसर्गाच्या सानिध्यात माणसाला विविध रंग छटा अनुभवण्यासाठी जसे आपल्याला मन आहे तसेच काही कला छंद माणसाच्या अंगी असल्यातर माणसाचे संपूर्ण आयुष्य हे खूप सुखावह होणार यात शंका नाही. विविध कलांमधून समुचित मानव समाज वृद्धिंगत होणार याची जाणीव सुद्धा महाराजांना होती. त्यामुळे अशा विविधतेने नटलेल्या कलांचा आश्रयदाते महाराज म्हणून शाहू महाराज सांस्कृतिक विकासाच्या द्रुष्टीने अनेक कलावंतांना एकत्रित करण्याचे आणि त्यांचा सांस्कृतिक दर्जा उंचावण्यासाठी आपल्या कार्यकाळात महत्वपूर्ण योगदान दिले.

आधुनिक काळामध्ये छत्रपती शाहू महाराज यांच्यासारखा मर्मज्ञ, गुणग्राहक आणि रसिक तसेच जाणता राजा देशात शोधून सापडणार नाही. म्हणूनच समकालीन शाहिरांनी शाहूंचे गुणसंकीर्तन केले असून सांस्कृतिक क्षेत्रातील त्यांच्या योगदानाचे तोंड भरून कौतुकही केले आहे. अभिजात कलाकारांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने तसेच सांस्कृतिक जडणघडणीच्या दृष्टीने शाहू महाराजांचे विशेष योगदान कलाकारांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण मानल्या गेलेले आहे.

महाराजांनी कलाकारांवर अनेक वेळा धनदौलत उधळण्याचा विषय आपल्याला नवीन नाही. पण ही उधळण किती जाणीवकारक करावी आणि दुसरे असे की केवळ काही हौसे मौजेसाठी, उपभोगण्याच्या उद्देशाने अय्याशीतून नव्हे तर कलावंतांना यथायोग्य मान आणि सामाजिक सुरक्षितता देण्याच्या दृष्टीने पालकाच्या भूमिकेच्या अंतर्गत कितपत केले जाते हे पाहिल्यास शाहू महाराजांचा वेगळेपणा दिसून येतो. बाबुराव पेंढारकरांनी हा फरक नेमक्या शब्दांमध्ये व्यक्त केला आहे. कलेचे असे एकही क्षेत्र नव्हते की ज्यात कोल्हापूरच्या कलावंतांनी आपला संपूर्ण विकास करून घेतलेला नव्हता आणि ज्यात कोल्हापूरचे कलावंत अग्रेसर नव्हते ही वास्तविकता नोंदवून ते लिहितात ''शाहू महाराजांनी कोल्हापूरमध्ये कलावंतांचे केशराचे पीक पिकवले त्या मनातून मी नुसता चाललो तर माझ्या सर्वांगावर सुगंध व रंग चढला.''[१]

महाराजांना सर्वच क्षेत्रातील कलावंतांचा नितांत आदर होता आणि त्यांच्या कलेची ते एवढी कदर करत असत की, प्रसंगी कलाकारांमुळे स्वतःचा अपमान सुद्धा सहन करत असत.

शाहू महाराज आपल्याला त्या-त्या विषयाचे ज्ञान व्हावे यासाठी सतत प्रयत्न करायचे. गायन कलेतील बारकावे समजावे आणि मर्म कळावे म्हणून त्यांनी पांडूतात्या ढेरे यांच्या सारखे संगीत जाणकार सोबत ठेवत असत. सांगीतिक ज्ञानाचा उलगडा आपल्याला अपेक्षित आहे ते महाराज मिळविल्याशिवाय राहत नसत.

गोविंदराव टेंभे यांनी जे नाट्यकलावंतांच्या संदर्भात सांगितले आहे तेच अन्य क्षेत्रातील कलाकारांबाबत खरे असावे असे दिसते. टेंबे लिहितात, ''शाहू महाराज कंपनीकडे मधून-मधून येत असत पण त्यांचा आश्रय म्हणजे सुळावरची पोळी. तुमच्या सुख सोयी करून देतील; पण तुमच्या कर्तबगारीची कसोटीही क्षणोक्षणी आजमावतील. उधळपट्टी तर दूरच, पण गैरशिस्त खर्च करायला पैसाच मुळी हाती देणार नाहीत.''[२] यातून महाराजांची आस्था स्पष्ट होते पण संबंधितांनी कठोर परिश्रमातून भव्य दिव्य यश संपादन करून संस्थानाचा लौकिक वाढवावा अशी दूरदृष्टीही दिसून येते. राजांचा दिलदारपण, सूक्ष्मदृष्टी आणि कलाकारांचा त्यांना मिळालेला भरघोस प्रतिसाद या कारणांमुळे कोल्हापूर संस्थानांमध्ये सर्व कलादालने भरास आली आणि तिथेच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात कला गुणांचे सुवर्णयोग सुरू झाले, असेच म्हणावे लागेल.

कलावंतांची जात-पात धर्मपंथ यांचा शाहू महाराज कधीही विचार करत नसत त्यांच्या अंगी असलेली कला हाच एक कलावंतांचा सन्मान होता. मग तो हिंदू, मुसलमान किंवा ब्राह्मण, महार असा विचार चुकूनही त्यांच्या मनाला कधी शिवला नाही.

सर्वांनाच एका नजरेत बघितल्यास महाराजांचा मोठेपणा 'वय-वंश-धर्म-भाषा यांना न ठाव काही, क्रीडांगणी कलांचा हा भेदभाव नाही' या ग. दि. माडगूळकरांनी आपल्या काव्यपंक्तीत अचूक वर्णलेले आहे. कलावंतांचे मोठेपण जपताना त्यांनी स्वतःचे स्थान आणि अधिकार यांचा कधीही बडेजाव केला नाही.

कलाकार अव्यवहारी असतात उद्याचा विचार करण्याचा हिशेबीपणा त्यांच्याजवळ बहुतेक नसतोच. आपल्या पुढच्या पिढ्यांसाठी काही तरतूद केली पाहिजे ही दृष्टी त्यांच्यामध्ये अभाव असतो त्यामुळे परंपरागत आणि वडीलोपार्जीत मिळेल तेच कलावंत जपतात, जगतात सुद्धा आणि यामुळे कुटुंबीयांची खूप हाल होतात. याची जाणीव महाराजांना अचूक होती. अडचणीत सापडलेल्या कलाकारांना त्यांनी आर्थिक मदत करून स्थैर्य मिळवून देण्याचा, त्यांना घर, जमिनी, पेन्शन, नोकरी अशा सुविधा दिल्या ह्या विशेष महाराजांमध्ये दिसून येते.

कोल्हापूर संस्थानामध्ये संगीताची दीर्घ परंपरा आहे कीर्तन, तमाशा, लावणी, दिंड्या, वाघ्या मुरळीची गाणी, लोकसंगीत, ठुमरी, गझल, द्रुपद-धमार अशा विविध संगीत प्रकारांमध्ये सहाशे पेक्षा जास्त कलावंत शाहू महाराजांच्या आधीपासून तिथे वास्तव्य करत होते सावकार, जहागीरदार, राजे रजवाडे वगैरे लोक त्यांना कमी अधिक आश्रय देत. महाराजांचे जनक पिते संगीताचे शौकीन होते. कोल्हापुरातीलच नव्हे तर देशातील पहिली संगीत विषयक संस्था ज्याला म्हणता येईल तो कोल्हापूर गायन समाज १८८३ मध्ये त्यांच्याच पाठबळावर स्थापन झालेली आहे. १८९२ मध्ये स्थापन झालेल्या देवल क्लबला जागा, इमारतीसाठी पैसा, कलावंतांना आश्रय आणि प्रेरणा देऊन खुद्द महाराजांनी उभे केले होते. त्या आधारावरच या संस्थेची निर्मितीच नव्हे तर दरारा संपूर्ण देशभर पसरला होता.

सुविख्यात संगीत मर्मज्ञ एस. ए. कुलकर्णी म्हणतात देशात आज कीर्तीमान झालेले अनेक संगीत घराण्यांच्या गायक गायकांची परंपरा या नगरीतच संवर्धित झालेली आहे आणि त्याचे मूळ प्रणेते शाहू महाराज हेच होते कोल्हापूरच्या महाराजांच्या कृपाप्रसादाने उदयास आलेला देवल क्लब प्रसिद्धीस आला तेव्हा देशातल्या प्रत्येक गायक-गायकेला वाटायचे की आपले गायन देवल क्लब मध्ये व्हावे. जो कलाकार आपली गायन वादनाची कला सादर करू शकला तो देशाच्या किर्तीवलयात रंगू लागला असे उद्गार पवार यांनी काढले.[३]

कोल्हापुरात उत्सवाच्या प्रसंगी खूप दूरचे गायक कलावंत येत असत आणि आपली हजेरी लावत असत. कलावंतांच्या दर्जेदार शास्त्रोक्त संगीत असा गायक-वादक असो की ठुमरीचा वा भजनांचा गायक असो त्याला महाराजांकडून सारखाच सन्मान आणि प्रोत्साहन मिळत असे.

संगीताच्या क्षेत्रातील माऊंट एव्हरेस्ट म्हणून ज्यांचा बॅरिस्टर जयकारां-सारख्या रसिकांनी गौरव केला ते गानमहर्षी अल्लादिया खा साहेब यांना शाहू महाराजांनी १८९५ मध्ये दरबारी गायक म्हणून आणले. त्यांच्या स्वरूपात जयपुर घराण्याच्या गायकीचा महाराष्ट्रात प्रवेश झाला आणि पुढच्या काळात झपाट्याने प्रसारही झाला. अल्लादिया खा हे खास आहे यांना संपूर्ण देशामध्ये नावलौकिक मिळाला. त्यांच्यासोबतच त्यांचे बंधू हैदर खा तीन पुत्र मंदिर खा, भुर्जी खा आणि नसिरुद्दीन खान असे सारे कुटुंबच कोल्हापूर नगरीत वास्तव्यास आले होते. जणू एका प्रतिष्ठित संगीत विद्यापीठाचा भाग कोल्हापूर झाला आहे आणि या विद्यापीठातून बाहेर पडलेल्या अलाद्याखाच्या शिष्य स्नातकांची नावे जरी नजरे समोरून घातली तर त्यांनी संगीत क्षेत्रात केवढी जबरदस्त कामगिरी बजावली याची कोणालाही कल्पना येऊ शकेल. भास्कर बुवा बसले, नथन खा, केसरबाई केरकर, हैदर खान म्हणजे मोगुबाई कुर्डीकर जसदनवाला, शाळीग्राम, निवृत्ती बुवा सरनाईक अशी अखिल भारतीय कीर्तीची कितीतरी बहुमोलाची माणसे संगीत क्षेत्रात होते. संगीत तज्ञ बाबुराव जोशींनी म्हटलेले की अल्लादिया खा साहेबांच्या रूपाने कोल्हापूरला शोभा देणारे नवे लेणेच मिळाले असा प्रचंड बुद्धीचा व प्रतिभेचा गवयांचाही गवई वाग्गेयकार कोल्हापूरला लाभला आहे. त्या कोल्हापूरचे भाग्यच असे म्हणावे लागेल. पवार, जयसिंगराव - ''राजर्षी शाहू छत्रपती - जीवन व कार्य'' २००१ पृ. क्रमांक २१८.

१९०१ मध्ये अब्दुल करीम का प्रथमच कोल्हापूरला आले नंतर शाहू महाराजांनी त्यांचे गाणे ऐकले आणि त्यांना भरपूर बिदागी दिली. नंतर खा साहेबाचा मुक्काम सहा महिने कोल्हापूरतच होता. त्यावेळी अवघ्या नऊ वर्षाच्या असलेल्या केसरबाई केरकरांना खा साहेबांनी सहा महिने गाणे शिकवले. अल्लादियाखा यांनी शाहू छत्रपतींच्या सांगण्यावरून सर्वांना भरपूर संगीताचे ज्ञान दिले याच केसरबाईंना एका मैफिली नंतर महाराजांनी असा उत्स्फूर्त आशीर्वाद दिला की त्यांना अखिल भारतीय कीर्ती मिळाली. त्यांचा तो आशीर्वाद पूर्णपणे खरा ठरला. हैदर बक्ष सारंगीये यांच्या सारंगी वादनावर महाराज एवढे प्रसन्न होते की त्यांनी हैदर-बक्ष यांना आपल्या चाकरीत ठेवून घेतले. ते तहयात महाराजांच्या सेवेत होते.

देवासचे प्रसिद्ध गवई रजबअली खा यांचे वडील मुघले खा किराणा घराण्याचे अर्ध्वयू हैदर बक्ष, अब्दुल करीम खान, अंजनीबाई मालपेकर अशा अनेक महान गायिका-गायकांना महाराजांनी आपल्या कोल्हापूरच्या वास्तव्यात ठेवले. निवृत्तीबुवा सरनाईक आणि नूतन गंधर्व आप्पासाहेब देशपांडे यांना संगीताचे धडे दिले. अंजनी मालपेकर या अखिल भारतीय कीर्ती

ISSN No. 2394-5990

लाभलेल्या बहुभाषी विदुषीच्या गाण्यावरही महाराज बेहद्द लुब्ध होते.

अशा पद्धतीने शाहू महाराजांनी आपल्या संस्थानामध्ये सर्व घराण्यांच्या थोर कलावंतांची मांदियाळीच भरली होती. महाराजांनी जणू त्या विविध गायकींच्या प्रवाहांचा सुंदर संगमच आपल्या राज्यांमध्ये घडून आणला होता. आपल्या राज्यालाच नव्हे तर उभ्या महाराष्ट्राला शास्त्रीय संगीताची गोडी लावण्याचे काम प्रत्यक्षात महाराजांनी केलेले आहे असं म्हणल्यास वावगे ठरू नये.

मराठी कलावंतांची उच्च दर्जाची परंपरा कोल्हापूरच्या संगीत विशवातून पुढच्या काळात निर्माण झाली हे आपल्याला यावरून स्पष्ट होते शास्त्रीय संगीता बरोबरच शाहू महाराजांनी भजन गायक-गायीकांनाही तेवढेच सन्मानित केले. तुकाराम बुवा सरनाईक, पंडितराव करंबळेकर, कृष्णा बागणीकर असे अनेक भजन गायक त्यांच्या काळात उदयास आले.

तमाशा शाहीर, तमासगीर, सत्यशोधक जलसेवाले या लोककलांचा सन्मान सुद्धा शाहू महाराजांनी अत्यंत जाणीवेने केला. उच्च वर्णीय कलाकारांच्या तुलनेत तळागाळातल्या कलावंतांचे स्थान खालचे मानन्याची वृत्ती समाजामध्ये दिसायला लागली होती. तिला छेद देण्याचे मौलिक धोरण महाराजांनी अवलंबिले होते. लोककला म्हणून ज्यांचा कधी उपेक्षा किंवा कुत्सीत भावाने उल्लेख केला गेला होता. त्या कथीत कलाकारांची खऱ्या अर्थाने विशुद्ध कला असून त्यांच्याशी जीवाभावाचे नाते ठेवून असणाऱ्या उच्चभ्रू कला सशक्तपणे वाढू शकतात अशी त्यांची भूमिका होती. त्यांनी स्वतःला जाणीवपूर्वक या लोकपरंपरांशी जोडून घेतले. त्यांची साधी जीवन सरणी, त्यांचा मराठमोळा आहार, गळ्यात कवड्यांची माळ आणि मुखात खेडूतांची भाषा हे सारे त्यात जोडून घेण्याच्या प्रक्रियेचाच भाग होते. सामाजिक क्षेत्रात विषमतेची उतरण मोडून जनसामान्यांना मान मरातब देण्याचा हा त्यांचा प्रयत्न होता. त्याचेच प्रत्यंतर कथीत लोककलांना सहानुभूती पूर्ण प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने अनेक धोरणे महाराजांनी आपल्या कार्यकाळात कार्यरत केले. लोककल्याणाचे आणि सुधारणेचे लोन जर रयतेच्या मनात खोलपर्यंत पोहोचवायचे असेल तर ते त्यांच्या भाषेतून आणि त्यांच्या आवडणाऱ्या कला गुणांच्या वापरातूनच शक्य होऊ शकेल असे महाराजांना वाटत. त्यामुळेच शाहीर, तमासगीर वगैरे लोक रंजनकार कलावंतांना त्यांनी जवळ आश्रय दिला. तमाशाला कलासापेक्ष स्वरूप देऊन त्यांचे सत्यशोधक जलसा रूपांतर केले. याचे श्रेय अर्थातच महाराजांना जाते. या संस्थानात शाहिरीची समृद्ध परंपरा शिवकाळाच्याही आधी लाभले होते. कलगीतुऱ्याचे आखाडे तेथे फार जुने होते. शाहू महाराजांना लोककलांमध्ये कमालीचा रस होता. तर दुसऱ्या बाजूने शाहिरांना शाहूच्या स्फूर्तीदायक चरित्राचे संमोहन होतेच. त्यांच्या विविध क्षेत्रातील पराक्रमांचे गुणगान शहरांच्या प्रतिभा फुलून येत असेल. शाहू छत्रपती लोकांवर करत असलेली डोंगराएवढी माया, त्यांचे आकाश एवढे मन, त्यांची अभिजात गुणग्राहकता, त्यांची धाडसी सुधारकता इत्यादी अनेक विषयांनी समकालीन शहिरांचे पोवाडे ओतप्रोत भरलेले दिसून येतात. लहरी हैदर साहेब, जंगली मुजावर, शाहीर विठ्ठल बिराजी डोणे, रामचंद्र नारायण माळी, आबा माळी, शाहीर भाऊ पाटोळे, भिवडीकर शाहीर रामचंद्र दळवी खेडकर, शाहीर पठ्ठे बापूराव, शाहीर मारुती सकटे असे अनेक शाहीर महाराजांच्या उदार आश्रयाचा एक भाग आहे. त्यांच्यापैकी लहरी हैदर हे कलगीवाले, आबा माळी तुरेवाले, रामचंद्र नरहर माळी कलगीशिरपेजवाले म्हणून विख्यात होते. शाहीर आपापल्या डफ तुंतुनांवर ही चिन्हे मोठ्या अभिमानाने मिरवत. लहरी हैदर साहेब हे महाराजांच्या विशेष मर्जीतील मानले जातात. त्यांना राजर्षी आखाडा बांधण्यास मदत दिलीच. शिवाय त्यांचा संपूर्ण योगक्षेमही ते चालवत असत. राजर्षी यांनी कित्येकांना शेलापागोटे आणि रोख बक्षीस दिल्याचे उल्लेख सापडतात. चव्हाण, शि. रा. आणि मगदूम, विजयकुमार - ''छत्रपती शाहू आणि शाहिरी परंपरा'' १९७५ पृ. क्रमांक ३८०.

शाहीर तात्या सावळजकर आणि लावणी सम्राट पठ्ठे बापूराव यांना आपल्या सोनताई त्यांच्या मुक्कामी खास बोलवून महाराजांनी त्यांच्या कलेचा गौरव केला. ''मोहना बटाव'' हा वग तर महाराजांना इतका आवडला होता की तो ऐकल्यावर त्यांनी कलावंतांना जरीपटका आणि एक हजाराची थैली देऊन त्यांचा सत्कार केला.

निष्कर्ष :

अशाप्रकारे छत्रपती शाहू महाराजांच्या ठिकाणी असलेल्या अभिजात रसिकतेमुळे संगीत, नाटक, तमाशा इतरही कलांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले. बरीच गुणीजान माणसे जनसामान्यांसमोर आली आणि त्यांनी देशव्यापी कीर्ती संपादित केली. ज्या काळात कलावंतांना फारशी सामाजिक प्रतिष्ठा नव्हती, घरच्या लोकांचा आणि आप्तस्वकीयांचा पाठिंबा नव्हता, कोणत्याही कलेला वाहून घ्यायचे तर घरदार सोडून बाहेर पडण्याखेरीज दुसरा मार्गच नव्हता त्या काळात शाहू महाराजांनी कला आणि इतरही क्षेत्रांचा यथोचित सन्मान मानसिक आधार, आर्थिक आधार देऊन या सर्व कलासक्त गोष्टींना पुरस्कृत केले. त्यामुळे जो परिणाम आज आपल्यासमोर आहे तो केवळ महाराजांमुळेच हे निर्विवाद आहे.

संदर्भ :

१. पेंढारकर बाबुराव, – केशराचा मळा राशागौग्रं, १९७६ पृ. ५५३.
२. टेंबे, गोविंदराव– रसिला राजा राशागौग्रं,१९७६,पृ.५३९.
३. पवार, जयसिंगराव – राजर्षी शाहू छत्रपती – जीवन व कार्य २००१ पृ. क्रमांक २१७.
४. kanbarkar R.K. - Glimpses of Rajarshi Shahu Maharaj-2022
५. देशपांडे बाबुराव, – नाट्यप्रेमी राजा १९७६

■■■

ISSN No. 2394-5990

राजर्षी शाहू महाराज म्हणजे सामाजिक लोकशाहीचे आधारस्तंभ

प्रा.संदिप पुंडलिक नन्नावरे
सहा.प्राध्यापक,इतिहासविभाग
महात्मा फुले महाविद्यालय,पिंपरी,पुणे
Email: snannaware98@gmail.com
भ्रमणध्वनी : ८६०५९७०७७०

प्रस्तावना :

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी जडणघडणीमध्ये राजर्षी शाहू महाराज यांची महत्त्वाची भूमिका मानली जाते. मुळातच महाराष्ट्र हा फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचारसरणीतून परिवर्तनवादी स्वरूपात निर्माण झालेला महाराष्ट्र मानला जातो. याच परिवर्तनवादी भूमिकेतून समाजसुधारणा करण्याचा प्रयत्न महात्मा ज्योतिबा फुले यांच्या कार्य व कर्तृत्वाने निर्माण झाला. समाजामध्ये स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय ही तत्वप्रणाली निर्माण करण्यासाठी आयुष्यभर सातत्याने प्रयत्नशील असणारे महात्मा फुले होते. त्यांच्या विचारसरणीला अनुसरून सामाजिक समता, मनुष्य विकास, बंधुता विकसित करण्यासाठी नेहमीच तत्परतेने आणि समाजातील पददलित वर्गाला न्याय मिळवून देण्यासाठी अविरत झटणारे राजर्षी शाहू महाराज होते. सामाजिक व राजकीय क्षेत्रात घडून आणण्याचा प्रयत्न त्यांच्या कार्यामुळेच झाला.

प्रथमता: अस्पृश्यउद्धार, स्त्रीशिक्षण, समाजसुधारणा, आर्थिक धोरण, राजकीय सुधारणा यावर प्रकटपणे धोरण ठरवून सामाजिक सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न राजर्षी शाहू महाराज यांनी केला. अस्पृश्य उद्धाराचे कार्य म्हणजे मानवतावादी दृष्टिकोनातून उचललेले सर्वात मोठे परिवर्तनवादी पाऊल ठरले. त्यांच्या अस्पृश्यउद्धाराच्या कार्याची महती वर्णन करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राजर्षी शाहू महाराज यांना ''सामाजिक लोकशाहीचे आधारस्तंभ म्हणजे राजर्षी शाहू महाराज'' म्हणून वर्णन केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राजर्षी शाहू महाराजांची योग्य अशा शब्दात केलेली रचना ही खऱ्या अर्थाने त्यांच्या कार्य आणि कर्तुत्वामुळे यशस्वी ठरते. शाहू महाराजांचे कार्य अस्पृश्य व मागासलेल्या समाजाचा उद्धार करणे, या समाजामध्ये शिक्षण प्रसार करणे, जातीयता दूर करणे, सर्वांना समान संधी उपलब्ध करून देणे, स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय या तत्त्वांचा पुरस्कार करून समाजसुधारणा करणे याच विषयाला अनुसरून होते. समाजउद्धार हा मूलभूत विचार राजर्षी शाहू महाराज यांच्या कार्य आणि कर्तुत्वाचा महत्त्वाचा विषय बनला.

प्रस्तुत शोधनिबंधाच्या माध्यमातून राजर्षी शाहू महाराज यांच्या सामाजिक सुधारणा या कार्यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे.

१. संशोधनाचे उद्देश :

१. राजर्षी शाहू महाराज यांच्या सामाजिक सुधारणा यांचा आढावा घेणे.
२. राजर्षी शाहू महाराज यांचे अस्पृश्य निवारण विषयक कार्य अभ्यासणे.
३. राजर्षी शाहू महाराज यांचे स्त्री जातीच्या संरक्षणासाठी केलेले कायदे स्पष्ट करणे.
४. अस्पृश्यता संबंधातील राजर्षी शाहू महाराज यांचे विचार अभ्यासणे.
५. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शैक्षणिक परिवर्तनाच्या दृष्टिकोनातून शिक्षणविषयक विचार अभ्यासणे.
६. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे समाज, जातिभेदाविरोधी विचार अभ्यासणे.

अशा विविध उद्देशाने प्रस्तुत संशोधनिबंधाची रचना केलेली आहे.

२. विषयविवेचन :

राजर्षी शाहू महाराज यांचा जन्म २६ जुलै १८७४ मध्ये कागलच्या घाटगे घराण्यामध्ये झाला. कागलचे जागीरदार जयसिंगराव आबासाहेब घाटगे हे त्यांचे जन्मदाते वडील व राधाबाई ही त्यांची जन्मदाती माता होती. शाहू महाराजांचे मूळ नाव यशवंतराव होते. १ एप्रिल१८९१ मध्ये बडोद्याचे गुणाजीराव खानविलकर यांच्या लक्ष्मीबाई या कन्येशी शाहू महाराजांचा विवाह संपन्न झाला. वयाच्या दहाव्या वर्षी कोल्हापूरचे राजे चौथे शिवाजी यांची पत्नी राणी आनंदीबाई यांनी सन १८८४ मध्ये यशवंतराव यांना दत्तक घेतले. तेच पुढे राजर्षी शाहू महाराज या नावाने नावारूपाला आले. मुळातच राजपदाचा कोणत्याही वैयक्तिक फायद्यासाठी उपयोग न घेता समाजसेवा करण्याचा निर्णय राजर्षी शाहू महाराज यांनीच घेतला. आबासाहेब

घाटगे यांच्या विचारसरणीतून त्यांनी प्रेरणा घेतली. आबासाहेब यांनी त्यांच्या संस्थानांमध्ये लोकउद्धाराचे कार्य करणे यालाच आपले सूत्र मानले होते. याच विचारसरणीवरून पुढे राजर्षी शाहू महाराजांनी सामाजिक कार्याचा वारसा घेऊन समाजसुधारणेचा पहिला मोठा प्रयत्न आपल्या संस्थांमध्ये घडवून आणला. समाजसुधारणेच्या या प्रयत्नामध्ये मानवतावादी दृष्टिकोनातून बहुजन समाजावर लादलेली सर्व बंधने त्यांनी नष्ट करण्याचा प्रयत्न केला. या काळामध्ये अस्पृश्यउद्धार, स्त्री शिक्षण, वसतीगृहांची रचना, राज्याचे आर्थिक धोरण सुधारणे, प्रशासकीय सुधारणा आपल्या संस्थांनामध्ये घडून आणणे यावरच त्यांनी लक्ष केंद्रित केले. सर्व विचारसरणीतून पुढे राजर्षी शाहू महाराज यांचे लोकउद्धाराचे कार्य दिसून येते. शैक्षणिक प्रवास सुरु असताना राजर्षी शाहू महाराजांनी लोककल्याण सूत्र हाती घेऊन जनकल्याणाच्या विविध योजना मांडल्या. २ एप्रिल १८९४ मध्ये राजर्षी शाहू महाराजांनी राज्यकारभाराची सूत्रे हाती घेतली. त्यामुळेच समाजामध्ये परिवर्तनवादी दृष्टिकोन समानतेच्या माध्यमातून मांडण्याचा प्रयत्न राजर्षी शाहू महाराज यांच्या कार्यामुळे झालेला दिसून येतो. राजर्षी शाहू महाराजांचा मृत्यू ६ मे १९२२ रोजी झाला.[१]

राजर्षी शाहू महाराजांचे अस्पृश्य उदाराचे कार्य समाज परिवर्तनाच्या दिशेने गतिशील ठरले. बहुजन समाजाचा विकास करणे यासाठी त्यांनी प्रथमता अस्पृश्य मानलेल्या जातीत विद्या प्रसारक मंडळी नावाची स्वतंत्र संस्था स्थापन केली. या संस्थेच्या माध्यमातून या वर्गामध्ये शिक्षणासाठी जागृती करून आणणे हा मुख्य हेतू या संस्थेचा होता. १४ नोव्हेंबर १९११ रोजी राजर्षी शाहू महाराजांनी पुन्हा नवीन आदेश जाहीर करून संस्थानातील सर्व अस्पृश्य वर्गास सर्व प्रकारचे शिक्षण मोफत करण्यात आले हे धोरण जाहीर केले. त्याचबरोबर या समाजातील लोकांना शिक्षणाच्या संधी दिल्यानंतर पुढे शेकडा ५० % राखीव जागा नोकरीमध्ये देण्याचे धोरणही त्यांनी जाहीर केले. मागासवर्गीयांची भरती करावी असा आदेश त्यांनी दिला.[२] हे धोरण जाहीर करताना त्यांना प्रस्थापित समाजातील वरिष्ठ वर्गाचा विरोध होता परंतु त्यांनी आपली भूमिका ठामपणे मांडली. ते म्हणतात, 'मला राज्य सोडावे लागले तरी बेहत्तर पण मी मागासलेल्या व अविकसित समाजाच्या सेवेचे व्रत कोणत्याही परिस्थितीमध्ये सोडणार नाहीफ अशी ठाम भूमिका त्यांनी घेतल्यानेच खऱ्या अर्थाने अस्पृश्य उदयाचे कार्य झाले असे म्हणावे लागेल.

मानवतेच्या दृष्टिकोनातून त्यांनी ३ ऑगस्ट १९१८ रोजी अस्पृश्यमुक्तीचा पहिला आदेश प्रसिद्ध केला. यानुसार अस्पृशांवर लाभलेली अमानुष प्रथा म्हणजे ङ्गहजेरीफ या प्रथेचे निर्मूलन करण्यात आले. सन १९२० मध्ये माणगाव या ठिकाणी भरलेल्या परिषदेत राजर्षी शाहू महाराज यांनी आपण हजेरीची पद्धत बंद केली असे जाहीर केले. सन १९२१ मध्ये राजर्षी शाहू महाराजांनी महार वतन खालसा धोरण जाहीर केले व या धोरणानुसार त्यांना गावच्या सरकारी कामाच्या सक्तीतून मुक्त होणार असल्याचे जाहीर केले.[३] त्यांना इथून पुढे रोख वेतन देऊन कामगार ठेवावा लागणार होता. अस्पृश्यता उद्धरासंदर्भात राजश्री शाहू महाराजांचे विचार अत्यंत प्रेरक व दिशादर्शक ठरतात. त्यांच्या मते, ''अस्पृश्यता म्हणजे जाती भेदाचे हिडीस रूप आहे आणि ते सर्वांना लज्जास्पद आहे. अस्पृश्य हा शब्द कोणत्याही माणसास लावणे हे फार निंदनीय आहे.'' या समाजाची मानसिक गुलामगिरी नष्ट व्हायला हवी आणि त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण व्हायला हवा. त्यामुळे या समाजाला शिक्षण, नोकरी, व्यवसाय संधी यांची उपलब्धता करून द्यावी असे जर झाले तर अस्पृश्यता निर्मूलन हे कार्य अगदी गतिशील होईल असे राजर्षी शाहू महाराज मानत होते.[४]

राजर्षी शाहू महाराज यांनी महात्मा फुले यांच्याप्रमाणेच स्त्री उद्धाराचे कार्य हाती घेतले. या कार्यातून त्यांनी स्त्रियांच्या नैसर्गिक हक्काचे संरक्षण करणे त्याचबरोबर समाजाकडून होणारी या वर्गाची पिळवणूक थांबवणे यासाठी प्रथमता समाजातील अनिष्ट रूढी, प्रथा, परंपरा दूर करण्याचा प्रयत्न केला. याच प्रयत्नातून जुलै १९१७ मध्ये विधवा पुनर्विवाह कायदा अस्तित्वात आणला. विवाहसंदर्भात १२ जुलै १९१९ रोजी विवाह संबंधी कायदा केला. या कायद्यामध्ये मुलाचे विवाहाचे वय १८ वर्षे पूर्ण तर मुलीचे विवाह वय १४ वर्षे पूर्ण असावे अशा पद्धतीची अट घातली. विवाहाच्या या कायद्याबरोबरच पुढे त्यांनी स्त्रियांना स्वातंत्र्य देण्याचा मुद्दा सुद्धा उपस्थित केला. स्वतःचा जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य स्त्रियांना बहाल करण्यात आले. त्या संदर्भात तसे नमूदही केले त्यांचे हे कार्य म्हणजेच स्त्री-पुरुष तुलना व स्त्री-पुरुषांच्या सामाजिक स्वातंत्र्याचा पुरस्कार हे तत्व दिसून येते. पुढे जाऊन राजर्षी शाहू महाराजांनी आंतरजातीय विवाहाला सुद्धा कायदेशीर मान्यता प्राप्त करून दिली. १७ जानेवारी १९२० मध्ये घटस्फोट व वारसा हक्क संबंधीचा कायदा पास केला. मुरळी, जोगतिनी, भावीण, देवदासी इत्यादी प्रथा म्हणजे समाज व्यवस्थेला हा लागलेला कलंक आहे असे राजर्षी शाहू महाराजांचे मत होते.त्यामुळे त्यांनी देवदासी प्रथा प्रतिबंधक कायदा १७ जानेवारी १९२० मध्ये आपल्या संस्थानात केला. तसेच २ ऑगस्ट १९१९ रोजी राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर सरकारच्या गॅझेटमध्ये अमानवी वर्तनास प्रतिबंध घालणारा कायदा प्रसिद्ध केला. थोडक्यात राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या संस्थानांमध्ये स्त्रियांची स्थिती सुधारणे त्याचबरोबर

ISSN No. 2394-5990

स्त्रियांना समाजात मानाचा हक्क प्राप्त करून देणे या संदर्भात परिवर्तनवादी दृष्टिकोनातून मोठा बदल घडून आणला.

राजर्षी शाहू महाराज यांच्या मते, 'शिक्षणामुळे समाजाचा दर्जा उंचावतो यावर त्यांचा प्रचंड विश्वास होता.' राष्ट्र विकासामध्ये शिक्षणाची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.यामुळे त्यांनी शैक्षणिक सुधारणा आपल्या संस्थांमध्ये घडून आणल्या. जातीनिहाय वसतीगृहे त्यांनी स्थापन केली. सन १९०६ मध्ये मुस्लिम समाजातील विद्यार्थ्यांकरिता वस्तीगृह, सन १९०८ मध्ये अस्पृशांकारिता मिस क्लार्क वसतिगृह, सन १९०९ मध्ये महाराणी व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग इन्स्टिट्यूशन, दिगंबर जैन वस्तीगृह, सन १९११ मध्ये शिंपी समाज, सन १९१२ मध्ये पांचाळ समाजासाठी, सन १९१५ मध्ये सारस्वत ब्राह्मणांसाठी वस्तीगृहाची स्थापना केली.[६] प्रथमच शिक्षकांसाठी प्रशिक्षण शाळा, ग्राम प्रशासनात पाटील शाळा, पुरोहितांची शाळा, मोफत व सक्तीचे शिक्षण, क्षत्रिय वैदिक शाळा, कुलकर्णी पाटील शाळा, सैनिक शाळा, संस्कृत शाळा यावर विशेष लक्ष देऊन या सर्व शाळांनी प्राथमिक, तांत्रिक, धार्मिक, नैतिक, शिक्षण देण्याची जबाबदारी त्यांनी स्वीकारावी असेही धोरण त्यांनी जाहीर केले.

शाहू महाराजांनी शेती, उद्योग, सहकार या तिन्ही क्षेत्रात नाविन्यपूर्ण बदल घडवून आणले. राजर्षी शाहू महाराज यांनी शेती व्यवस्थेत बदल घडवून आणून शेती व्यवस्थेतील आधुनिक उपक्रमाची संकल्पना मांडली. १९१२ मध्ये कोल्हापुरात 'किंग एडवर्ड एग्रीकल्चर इन्स्टिट्यूट' नावाची संस्था स्थापन केली. कोल्हापुरात आधुनिक शेती अवजारांचे म्युझियम, संस्थानात चहा पिकवण्याचा प्रयत्न, शेतकऱ्यांना योग्य प्रशिक्षण, शेती अवजाराचे प्रदर्शन, सुधारित शेती पद्धतीचा प्रसार यावरुन शास्त्रीय पद्धतीने शेती विकास हे तत्व राजर्षी शाहू महाराज यांनी यशस्वी केले. पाणीपुरवठा याकरिता जुन्या विहिरी, छोटे-मोठे तलाव, लहान मोठे बंधारे या सर्वांच्या दुरुस्तीची कामे जल व्यवस्थापनाच्या दृष्टीने त्यांनी हाती घेतली.त्यातून राधानगरी धरण प्रकल्प हाती घेतला. सन १९१८ पर्यंत हे बांधकाम पूर्ण केले. संस्थानांमध्ये स्वतंत्र पद्धतीच्या बाजारपेठांची स्थापना केली. या दृष्टीने त्यांनी 'शाहूपुरी' नावाची नवी बाजारपेठ निर्माण केली. औद्योगिक सर्वेक्षण, कापड उद्योग व्यवसाय, औषधी तेल उद्योग व्यवसाय असे नवे उद्योग सुरू केले.

थोडक्यात राजर्षी शाहू महाराज यांचे कार्य समाज परिवर्तनाच्या दृष्टीने अत्यंत प्रेरक ठरले. शेती, उद्योग, व्यापार, दळणवळण, चलन व्यवस्था, शिक्षण व्यवस्था, स्त्री शिक्षण, राजकीय व्यवस्था, अस्पृश्यउद्धार हे त्यांचे कार्य म्हणजे खऱ्या अर्थाने सामाजिक लोकशाहीच्या दृष्टीने मुख्यघटक बनले. या कार्यावरच सामाजिक लोकशाहीचे आधारस्तंभ निर्माण झालेले दिसतात. म्हणजेच कोणत्याही समाजाचा विकास घडवून आणायचा असेल तर शिक्षण, उद्योग, दळणवळण या घटकांना महत्त्वाचा दर्जा दिला जातो. त्यामुळे या क्षेत्राचा विकास शाहू महाराजांनी खऱ्या अर्थाने केला असे दिसून येते. पुढे बऱ्याच कालखंडापर्यंत त्याचा प्रभाव महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक घटकावरती पडला असे दिसून येते. महात्मा फुले यांच्यानंतर समाजात समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय ही तत्वे आपल्या संस्थानात पहिल्यांदा जोपासण्याचे काम आपल्या कृतीच्या माध्यमातून राजर्षी शाहू महाराज यांनी केले. त्यामुळे महाराष्ट्रात त्याचा विस्तार अल्पावधीतच झाला. त्यामुळेच खऱ्या अर्थाने राजाची शाहू महाराजांना ङ्गलोकराजाफ ही पदवी सार्थ ठरते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांचे वर्णन सामाजिक लोकशाहीचे आधारस्तंभ या शब्दात केली हे अतिशय मार्मिक ठरते.

निष्कर्ष :

१. राजर्षी शाहू महाराज यांचे विचार हे खऱ्या अर्थाने समाजाला समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय व समतेच्या मार्गावर घेऊन जाणारे ठरले.
२. राजर्षी शाहू महाराज यांचे कार्य समाज परिवर्तनाच्या दृष्टीने अत्यंत प्रेरक ठरले.
३. शेती, उद्योग, व्यापार, दळणवळण, चलन व्यवस्था, शिक्षण व्यवस्था, स्त्री शिक्षण, राजकीय व्यवस्था, अस्पृश्यउद्धार हे त्यांचे कार्य म्हणजे खऱ्या अर्थाने सामाजिक लोकशाहीच्या दृष्टीने मुख्यघटक बनले.
४. कोणत्याही समाजाचा विकास घडवून आणायचा असेल तर शिक्षण, उद्योग, दळणवळण या घटकांना महत्त्वाचा दर्जा दिला जातो. त्यामुळे या क्षेत्राचा विकास शाहू महाराजांनी खऱ्या अर्थाने केला असे दिसून येते.
५. शाहू महाराजांनी शेती, उद्योग, सहकार या तिन्ही क्षेत्रात नाविन्यपूर्ण बदल घडवून आणले.
६. अस्पृश्यता उद्धरासंदर्भात राजश्री शाहू महाराजांचे विचार अत्यंत प्रेरक व दिशादर्शक ठरतात.
७. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राजर्षी शाहू महाराज यांचे केलेले वर्णन सामाजिक लोकशाहीचे आधारस्तंभ या शब्दात केली हे अतिशय मार्मिक ठरते.

संदर्भ:

१. कीर धनंजय, राजर्षी शाहू छत्रपती एक समाज क्रांतिकारक, पॅप्युलर प्रकाशन, पहिली आवृत्ती मुंबई १९८९, पृष्ठ क्रमांक,३०.

२. पवार जयसिंगराव (संपा.), राजश्री शाहू स्मारक ग्रंथ, प्रकाशन संचालक महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, प्रथम आवृत्ती मे २००१, पृष्ठ क्रमांक .११६.
३. भोसले एस. एस. क्रांतीसुक्ते राजर्षी छत्रपती शाहू, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई प्रथम आवृत्ती १९९१, पृष्ठ क्रमांक ४०.
४. पवार जयसिंगराव, राजर्षी शाहू छत्रपती एक मागवा,सुमेरू प्रकाशन, मुंबई प्रथम आवृत्ती २००४, , पृष्ठ क्रमांक ५५.
५. डॉ. शिंगारे अनिल व डॉ. घुले विठ्ठल, महाराष्ट्रातील आंबेडकरी चळवळीचा इतिहास, अरुणा प्रकाशन लातूर, प्रथम आवृत्ती २००९, पृष्ठ क्रमांक ७२.
६. पाटील शामराव, (संपा.) भास्कर दटावकर, राजश्री छत्रपतींचे निवडक आदेश भाग १, मुंबई १९८८, पृष्ठ क्रमांक १२५.

■■■

ISSN No. 2394-5990

रिपब्लिकन पक्ष आंदोलनात नेतृत्वाचा प्रभाव

डॉ. योगेन्द्र काटकर
C/O संजय जटाले
अरिहंत नगर, BJM कारमेल अकादमी समोर
DOC रोड, तुकुम, चंद्रपूर
(महाराष्ट्र)४४२४०२
संपर्क क्र. ९४२०१३७६९८
yogendrakatkar15@gmail.com

प्रस्तावना:

कोणत्याही चळवळीची किंवा संघटनेची गतिमानता ही ध्येय-धोरण, तत्वज्ञान, कार्यक्रम आणि नेतृत्व ह्यावर प्रामुख्याने अवलंबून असते. ध्येय-धोरण, तत्वज्ञान आणि कार्यक्रम ह्या कागदावरील बाबी प्रत्यक्ष उतरवण्यासाठी नेतृत्वाची अनिवार्य गरज असते. आधुनिक काळातील सत्ता संघर्षात नेतृत्वाने आपले अस्तित्व निर्माण करुन इतर पक्षातील वरिष्ठ नेतृत्वाच्या तुल्यबळ असणे आवश्यक असते. अन्यथा पक्षाचा ऱ्हास झाल्याशिवाय राहत नाही. म्हणूनच नेतृत्व प्रामाणिक मार्गदर्शक व नि:स्वार्थी हवे. दुसऱ्याच्या ओंजळीने पाणी पिणारा आणि भाडोत्री नसावा. तो दिशाभूल करणारा नसावा.

या संदर्भात डॉ. आंबेडकर म्हणतात, ''राजकारण करणाऱ्याने राजकारणाचा चांगला अभ्यास केला पाहिजे. अभ्यासाशिवाय कोणालाही काहीही साध्य होणार नाही. आपल्या समाजातील प्रत्येक कार्यकर्त्यांने राजकीय, धार्मिक आणि आर्थिक या सर्व प्रश्नांचा चांगला बारकाईने अभ्यास करावयास पाहिजे. ज्याला पुढारी व्हायचे आहे त्याला पुढाऱ्यांची कर्तव्येकर्मे आणि जबाबदारी काय आहे याची सतत जाणीव ठेवायला पाहिजे. कारण आपल्या समाजातील पुढाऱ्यांवर अत्यंत, मोठी जबाबदारी आहे. इतर समाजाच्या पुढाऱ्यांसारखी आपल्या समाजातील पुढाऱ्यांची स्थिती नाही.'' अशा अपेक्षा करीत डॉ. आंबेडकर यांनी नेत्यांसोबत कार्यकर्त्यांला पक्षाचा महत्त्वाचा व अनिवार्य घटक समजतात.

"The honest leadership which can, never be sold is of vital importance in the same way, devoted workers in the party is the second important thing essential for the growth of the party."[१]

एखादे आंदोलन चालविताना बुद्धिजीवी वर्गाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. त्यांचा सहभागाविषयी आपली मते मांडतांना डॉ. आंबेडकर म्हणतात, ''प्रत्येक देशामध्ये बुद्धीवादी वर्ग असा असतो की जो भविष्याच्या घडामोडी जाणू शकतो आणि हाच वर्ग लोकांना सल्ला आणि नेतृत्व देवू शकतो. कुठल्याही देशातील बहुसंख्य समाज बौद्धिक विचाराचे आणि कृतीचे जीवन जगू शकत नाही. तो बुद्धीवादी वर्गाचे अनुकरण करीत असतो. त्यामुळे एखाद्या देशाचे भवितव्य बुद्धीवादी वर्गावर अवलंबून असते असे म्हटल्यास वावगे नाही. हा बुद्धीवादी वर्ग प्रामाणिक, स्वतंत्र विचारसरणीचा आणि नि:स्वार्थी असेल तर अडचणीच्या काळात तो लोकांचे नेतृत्व करण्यास विश्वासपात्र ठरतो. हे खरे आहे की बुद्धीमत्ता हा सद्गुण असतोच असे म्हणता येणार नाही. ते एक साधन आहे आणि साधनाचा वापर हा त्या बुद्धीवादी माणसाच्या उद्दिष्टांवर अवलंबून असतो. बुद्धीवादी मनुष्य हुशार असू शकतो तसाच तो बदमाश पण असू शकतो. त्याचप्रमाणे बुद्धीजीवी वर्ग हा थोर अंतःकरणाच्या माणसांचा गट असू शकतो जो मदतीसाठी, इतरांच्या मुक्तीसाठी सज्ज असतो किंवा तो सहज दृष्ट प्रवृत्तीच्या माणसांचा गट बनू शकतो की जो संकुचित विचारसरणीच्या घोषणा देत असतो ज्याच्या पासून त्याने स्वार्थ शोधलेला असतो.[२]

बुद्धीजीवींच्या राजकीय भूमिका विविध आहेत.

१. विचारसरणी मांडणे, २. राजकीय संरचना सुचविणे, ३.तृट्या दाखवितांना पर्याय सुचविणे, ४. समाजरचना बदलविण्यासाठी उपाय सुचविणे. ५. राजकीय घटनेचा समाजजीवनावर होणारा संभाव्य परिणाम सांगणे, ६. देशाने स्वीकारलेल्या राजकीय व्यवस्थेला साजेशी अर्थव्यवस्था सुचविणे, ७. संविधानाची निर्मिती करणे, ८. परराष्ट्र धोरणाची दिशा निश्चित करणे, इत्यादी भूमिका बुद्धीजीवी पार पाडत असतो.[३]

म्हणूनच बुद्धीजीवींच्या विचारांना आणि कृतींना विधायक वळण लावण्याच्या उद्देशाने डॉ. आंबेडकर यांनी आपल्या जीवनाच्या अखेरच्या पर्वात मुंबईत जुलै १९५६ पासून संसदीय शिक्षण देणारी एक आदर्श संस्था "Training School For Entrance To Politics" स्थापन केली होती.[४]

डॉ. आंबेडकर यांनी आयुष्याच्या उत्तरार्धात नियोजित केलेल्या रिपब्लिकन पक्षाची घटना लिहून त्याची स्थापना करण्याचे निश्चित केले. परंतु त्यांच्या आकस्मिक महापरिनिर्वाणाने त्यांचे हे कार्य त्यांच्या सहकाऱ्यांनी अध्यक्षीय मंडळ स्थापून पूर्ण करण्याचा प्रयत्न केला.

रिपब्लिकन पक्ष आंदोलनातील सक्षम नेतृत्व

एन. शिवराज :

डॉ. आंबेडकर यांनी पुकारलेल्या सामाजिक व राजकीय क्रांतीलढ्याला यशस्वी करण्यासाठी ज्या अनेक नेत्यांनी आपले आयुष्य वेचले त्यातील सर्वात अग्रणी व अजोड नेता म्हणजे एन. शिवराज होय. डॉ. आंबेडकर यांच्या खांद्याला खांदा लावून दलितांच्या अस्मितेचा क्रांतीरथ त्यांनी सतत फिरता ठेवला. दलितांना त्यातून स्फूर्ती व शक्ती मिळाली. या त्यांच्या कार्यामुळे संपूर्ण भारतातील दलित समाज नवे तेज घेऊन तडपू लागला. या देशातील जातीय विषमतेच्या विष वृक्षांची पाळेमुळे खणून काढण्याच्या निर्धाराने डॉ. आंबेडकर यांनी दलित फेडरेशनची स्थापना केली तेव्हापासून एन. शिवराज यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे.

दलित फेडरेशनचे अध्यक्षपद डॉ. आंबेडकर यांनी अगदी सुरुवातीपासून एन. शिवराज यांच्याकडे विश्वासाने सोपविले होते यावरून त्यांच्या कर्तृत्वाची कल्पना येते. स्वतःला सुस्थिती आणि प्रतिष्ठा लाभली असली तरी आपण ज्या समाजात जन्मलो त्यांच्या दुरावस्थेचा आणि हालअपेष्टांचा कधी विसर पडू दिला नाही. त्यामुळेच प्रसिध्दीची, मानापमानाची अथवा संपत्तीची थोडीसुद्धा हाव न धरता या देशातील दलितांवरील अन्यायाचे निवारण करण्यासाठी समर्पित आयुष्य जगले.

इ. स. १९४२ मध्ये अखिल भारतीय शेड्युल्ड कास्ट फेडरेशनच्या अध्यक्षपदाची जबाबदारी डॉ. आंबेडकर यांनी त्यांच्यावर सोपविली आणि अवघ्या दोन वर्षात संपूर्ण भारतातील अनेक प्रांतातील खेड्यापाड्यात शेड्युल्ड कास्ट फेडरेशनच्या शाखा सुरू झाल्या. हे अतिबिकट काम त्यांनी ज्या नेटाने केले ते उल्लेखनीय आहे.

डॉ. आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणानंतर त्यांनी ज्या मुत्सद्दीपणाने रिपब्लिकन पक्षाला नेतृत्व दिले व रिपब्लिकन पक्षाच्या माध्यमातून देशपातळीवर अनेक लढे उभारले. त्या लढ्यांना यशस्वी केले. त्यामुळे या देशातील दलित पीडित समाज नव्या संघर्षासाठी तयार झाला याचे बरेचसे श्रेय एन. शिवराज यांच्याकडे जाते.

दादासाहेब गायकवाड :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जो मुक्तीसंग्राम सुरू केला त्यांत कसोटीला उतरलेले व्यक्तिमत्त्व म्हणजे त्यांचे सहकारी म्हणजे भाऊराव कृष्णाजी गायकवाड उर्फ दादासाहेब गायकवाड हे होत. ''मी माझे आत्मचरित्र यदाकदाचित लिहिले तर त्यात अर्धाअधिक भाग भाऊरावांचा असेल त्याशिवाय ते परिपूर्ण होणार नाही.'' या डॉ. आंबेडकर यांच्या उद्गारातून दादासाहेब गायकवाड यांची महती कळते. दादासाहेब गायकवाड डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे उजवा हात होते. महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह, नाशिकच्या काळाराम मंदिराचा सत्याग्रह, येवला येथील ऐतिहासिक परिषद, स्वतंत्र मजूर पक्ष व शेड्युल्ड कास्ट फेडरेशनची स्थापना, निवडणूकीतील धोरण, इत्यादी संदर्भात डॉ. आंबेडकर गायकवाडांना विश्वासात घेत.[५]

मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी उपलब्ध असलेली ध्येय-धोरणे प्रामाणिकपणे राबविली जावीत असा आग्रह करणाऱ्या पेरूमल समितीच्या कार्यात दादासाहेब गायकवाड यांचा सिंहाचा वाटा होता. जमीन वाटपासंबंधी गायकवाडांनी सुचवलेले उपाय अत्यंत महत्त्वपूर्ण होते.[६] मुखेड सत्याग्रहात गायकवाडांवर नागरिकांनी हल्ला करून त्यांना भयंकर रक्तबंबाळ केले होते. काळाराम मंदिर प्रवेशाच्याप्रसंगी पत्नी व आई समवेत तीन महिन्याची शिक्षा भोगली. मराठवाडा येथील भूमीवाटप आंदोलनाचे नेतृत्व केले. संसदेवर भूमिहीनांचा विराट मोर्चा काढून पंतप्रधान लालबहादूर शास्त्री ह्यांना दहा मागण्यांचे निवेदन सादर केले. मागण्या नामंजूर झाल्यामुळे भूमिहीनांचा देशव्यापी सत्याग्रह करून तीन लक्ष चाळीस हजार सत्याग्रहींना अटक झाली. या लढ्यात सर्व जातीधर्माच्या भूमिहीनांनी उत्स्फूर्त भाग घेतला. भूमिहीनांचा सत्याग्रह हा दादासाहेब गायकवाड यांच्या कर्तृत्वाचा सर्वोच्च मानबिंदू होता.[७]

विधानसभेत तसेच संसदेत केलेल्या कामावरून त्यांच्या कार्य-कर्तृत्वाची चांगलीच आठवण राहते. सभापती मालवणकर यांच्याकडून उत्कृष्ट वक्ता म्हणून झालेला गौरव, काँग्रेसच्या कमिटीत महात्मा गांधीजींना विचारलेले नऊ प्रश्न, संयुक्त महाराष्ट्र समितीच्या कार्यातील ऐतिहासिक योगदान, भूमिहीन, शेतकरी, कष्टकरी, कामगार इत्यादिंच्या प्रश्नाबाबत त्यांनी केलेले कार्य, सामाजिक प्रबोधनातील त्यांचे योगदान, भारत सरकारने दिलेला पद्मश्री पुरस्कार आणि त्याहून महत्त्वाचे म्हणजे लोकांनी प्रदान केलेली कर्मवीर ही पदवी, ह्या सर्वांवरून दादासाहेब गायकवाडांच्या विविधांगी नेतृत्वाला सिद्ध करते.

ISSN No. 2394-5990

बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे :

एका ऐश्वर्यसंपन्न कुटुंबात राजाभाऊ खोब्रागडे यांचा जन्म झाला. इंग्लंडला उच्च शिक्षणाकरिता पाठविण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी ज्या चौदा विद्यार्थ्यांची निवड केली त्यांत राजाभाऊचे नांव होते.पण या यादीत एका अधिकच्या हुशार मागासवर्गीय विद्यार्थ्यांचा समावेश व्हावा म्हणून राजाभाऊच्या वडीलांनी डॉ. आंबेडकरांच्या संमतीने राजाभाऊला स्वखर्चाने इंग्लंडला पाठवले. नोव्हेंबर १९४९ मध्ये राजाभाऊ लिंकनइनलंडन मधून बॅरिस्टर ऍट लॉ ची पदवी संपादन करून भारतात परतले. डॉ. आंबेडकरांनी आपला राजकीय मानसपुत्र म्हणून राजाभाऊची अप्रत्यक्षपणे निवड केली.[८]

दि. १६ ऑक्टोबर १९५६ मध्ये राजाभाऊनी आपली जन्मभूमी चंद्रपूर येथे धम्मदीक्षा समारोहाचे आयोजन केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर या समारोहासाठी उपस्थित होते. सुमारे अडीच लाख लोकांनी बौद्ध धम्मात प्रवेश केला. १९६४ मध्ये यशस्वी झालेल्या भूमिहीनांच्या आंदोलनात राजाभाऊचा मोलाचा वाटा आहे. पुढे राजाभाऊ राज्यसभेवर खासदार म्हणून निवडून गेले. तब्बल १८ वर्षे ते या वरिष्ठ सभागृहाचे सदस्य होते. इ. स. १९७० मध्ये राजाभाऊ राज्यसभेचे उपसभापती म्हणून निवडले गेले. राजाभाऊनी संपूर्ण हयात दलितांच्या समस्येसाठी संघर्ष करण्यात घालविली. या संघर्षाची आयुधे आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत त्यांनी कधीच खाली ठेवली नाहीत. सिद्धांताशी त्यांनी कधीच तडजोड केली नाही. चांदीचा चमचा घेवून जी व्यक्ती जन्मास आली त्या राजाभाऊचे निधन झाले तेव्हा त्यांचा एक छदामही बँक बॅलन्स नव्हता. ही घटना त्याग व समर्पणाच्या भावनेने काम करणाऱ्या असंख्य कार्यकर्त्यांना प्रेरणादायी ठरणार आहे.[९]

रिपब्लिकन पक्ष आंदोलनाचा विकास

भारतातील अन्य कोणत्याही पक्षापेक्षा रिपब्लिकन पक्षाचे भारतीय राजकारणात एक वेगळे स्थान आहे. हा पक्ष तत्त्वत: दलित पीडित शोषितांच्या हित रक्षणाकरिता स्थापन झालेला पक्ष आहे. ह्या पक्षाला विविध आंदोलनाचा आणि चळवळीचा आधार आहे. अगदी महात्मा फुले यांच्या अस्पृश्य- शूद्र- स्त्री उद्धाराच्या चळवळी प्रेरणास्थानी असून त्यांच्याही प्रबोधनाचा रिपब्लिकन पक्ष आंदोलनाच्या विकासात अप्रत्यक्ष हातभार लागला आहे. बहिष्कृत हितकारिणी सभेचे अस्पृश्य उद्धाराचे कार्य व्यापक होत जात शेतकरी मजूर यांच्या कल्याणाचा मार्गक्रमण करत स्वतंत्र मजूर पक्षाच्या दिशेने कार्यान्वित होवून शेड्युल्ड कास्ट फेडरेशनचा पाया विस्तारीत रिपब्लिकन पक्ष आंदोलनाचा विकास झाला आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणानंतर उद्भवलेल्या बिकट परिस्थितीत अस्पृश्य समाज वावरत होता. एखाद्या विराट सेनेचा सेनापती गेल्यावर जी अवस्था होते तीच अवस्था त्यावेळी अस्पृश्य समाजाची झालेली होती. अशा गंभीर परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी डॉ. आंबेडकरांच्या तालमीत तयार झालेल्या अनुयायांनी अध्यक्षीय मंडळ निर्माण करुन अस्पृश्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला. नेतृत्वाच्या प्रश्नांवरून वादंग न घालता सामूहिक नेतृत्वाची नेते मंडळीनी मोठ्या मुत्सद्देगिरीने स्वीकारली होती. रिपब्लिकन पक्षाच्या स्थापनेमुळे दलित शोषितांच्या जीवात जीव आला, उत्साह वाढला, आत्मविश्वास व मनोधैर्य निर्माण झाले. देशातील कोट्यवधी बांधवांच्या आशा पल्लवित झाल्या होत्या. रिपब्लिकन नेतृत्व अनुभवी, उच्चविद्याविभूषित, कर्तृत्ववान असल्याने रिपब्लिकन पक्ष आंदोलनाच्या विकासाला गती प्राप्त झाली.

राजकीय पक्षांसाठी एखाद्या पोषक अशा संघटनेची आवश्यकता असते. अशा संघटनेतून कार्यकर्ते होवू शकतता म्हणून रिपब्लिकन पक्षाने आपला विस्तार वाढविण्यासाठी समता सैनिक दलाला आपली पोषक संघटना म्हणून वाढविण्याचे ठरवले. अर्थात समता सैनिक दलाची स्थापना स्वतः डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९२८ मध्येच केली होती. समता सैनिक दलाचे मुख्य कार्य म्हणजे सर्व क्षेत्रामध्ये समता प्रस्थापित करणे व दलित शोषितांची एक स्वयंसेवी संघटना म्हणून कार्य करणे हे होते.

समाजातील महिलांची संख्या लक्षात घेता रिपब्लिकन पक्षाने आपल्या आंदोलनात महिलांचा सहभाग वाढावा याकरीता महिला संघटना बांधली. दि. २ ऑक्टोबर १९५७ ला नागपूर येथे अखिल भारतीय महिला परिषद भरविण्यात आली. अध्यक्षस्थानी प्रसिद्ध महिला कार्यकर्त्या श्रीमती शांताबाई दाणी होत्या. रिपब्लिकन पक्षाने अखिल भारतीय रिपब्लिकन विद्यार्थी फेडरेशन नावाची संघटना स्थापन केली. या संघटनेचे जनरल सेक्रेटरी म्हणून बी. सी. कांबळे यांनी काही काळ काम पाहिले. कामगार वर्गाला आंदोलनात सक्रिय करून व्यापकता वाढविण्याच्या दृष्टीने त्यांच्या संघटना बांधण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले.

नागपूर येथे दि. २ ऑक्टोबर १९५७ रोजी कनिष्ठ गांव कामगार व अखिल भारतीय कामगार परिषद भरविली. परिषदेचे उद्घाटन कर्नाटकातील खासदार मा. दत्ता कट्टी यांनी केले. तर अध्यक्षस्थानी दादासाहेब गायकवाड होते. एन. एच. कुंभारे, व्ही. टी. परमार, पी. टी. बोराडे आणि दा. ता. रुपवते यांनी परिषदेत मार्गदर्शन केले. कनिष्ठ गांव कामगारांना

किमान वेतन कायदा लागू करण्याविषयीचा महत्त्वपूर्ण ठरावही परिषदेत मंजूर करण्यात येवून कामगारांच्या मागण्या मान्य करून घेण्यासाठी एका कृती समितीची निवड करण्यात आली. इ. स. १९५९ मध्ये अहमदनगर जिल्ह्यातील हरेगांव येथे भरलेल्या कामगारांच्या परिषदेला स्वतः पक्षाध्यक्ष एन. शिवराज उपस्थित होते. यावरुन स्पष्ट होते की, रिपब्लिकन पक्षाने कामगारांच्या संघटना स्थापन करण्याकडे आवर्जून लक्ष दिले होते.[१०]

इ. स. १९६४ च्या भूमिहिनांच्या आंदोलनाला केवळ रिपब्लिकन चळवळीतच नव्हे तर जागतिक पातळीवरही महत्त्व आहे. रिपब्लिकन पक्षाच्या आजपर्यंतच्या राजकीय प्रवासातील ही महत्त्वपूर्ण कामगिरी समजावी लागेल. यापूर्वी या मागणीसाठी जरी महाराष्ट्र पातळीवर आंदोलन झाले असले तरी या आंदोलनाची व्याप्ती वाढवून देशव्यापी आंदोलन उभारण्याचा पक्षाने यशस्वी प्रयत्न केला. हे आंदोलन दादासाहेब गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली झाले असले तरी याची पूर्वतयारी एन. शिवराज यांच्या मार्गदर्शनात झाली होती. त्यातही रिपब्लिकन पक्ष गोरगरीबांचा पक्ष म्हणून मान्यता पावला होता. या पार्श्वभूमीवर रिपब्लिकन पक्षाने जनहितार्थ एका कार्यक्रमाची आखणी केली. या कार्यक्रमाचे शीर्षक म्हणजे १९६४ चा भूमिहीनांचा सत्याग्रह होय. दिल्लीच्या लाल किल्ल्यावर एकत्र येवून संसदेवर चढाई केली. विविध मागण्यांसाठी लोकसभेवर जोरदार निदर्शने केली. मोर्चाचे नेतृत्व दादासाहेब गायकवाड, बी. पी. मौर्य, राजाभाऊ खोब्रागडे इत्यादी नेत्यांनी करून तत्कालीन पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांना दहा मागण्यांचे निवेदन दिले.[११]

या दहा मागण्या खालीलप्रमाणे :

१. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. आंबेडकर यांचे तैलचित्र लोकसभेच्या केंद्रीय सभागृहात लावण्यात यावे.
२. देशातील शेतीला लायक असलेली जमीन कसणाऱ्यांना देण्यात यावी.
३. पडीत जमिनीचे वाटप भूमिहीनांना करण्यात यावे.
४. अन्नधान्यांचे पुरेसे वाटप करण्यात यावे आणि वाढत्या महागाईला आळा घालण्यात यावा.
५. झोपडपट्टी आणि गलिच्छ वस्त्यांची सुधारणा करण्यात येवून झोपडपट्टीत राहणाऱ्या लोकांची आर्थिक स्थिती सुधारण्यात यावी.
६. १९४८ चा किमान वेतन कायदा सर्व उद्योग धंद्यांना विनाविलंब लावण्यात यावा. यांत भूमिहीन शेतमजूर व अशिक्षित मजुरांचा समावेश करण्यात यावा.
७. अनुसूचित जातीच्या सवलती बौद्धांना देण्यात याव्यात.
८. अस्पृश्यता निवारण कायदयांची योग्य अंमलबजावणी व्हावी व संबंधित गुन्हेगारांना कडक शिक्षा देण्यात यावी.
९. दलितांवर होत असलेल्या अन्याय अत्याचारांवर त्वरीत पायबंद घालण्यात यावा.
१०. अनुसूचित जाती जमातींचे आरक्षण त्वरीत भरण्यात यावे व मागील अनुशेष १९७० पूर्वी भरण्यात यावेत.

रिपब्लिकन पक्षाच्या विविध मागण्यांसाठी काढण्यात आलेल्या मोर्चानंतर पंतप्रधानांशी विस्तृत चर्चा करण्यात आली. सरकारने यावेळी विशेष दखल घेतली नव्हती. म्हणून दि. ६ डिसेंबर १९६४ म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाण दिनापासून सत्याग्रहाचा निर्वाणीचा इशारा देण्यात आला. या सत्याग्रहाचे स्वरूप एवढे व्यापक होते की आंदोलन काळात म्हणजे दि. ६ डिसेंबर १९६४ ते दि. ३० जानेवारी १९६५ या कालावधीत एकूण ३ लाख ४० हजार सत्याग्रहींनी भाग घेतला.[१२]

ह्यावरून हे स्पष्ट होते की, रिपब्लिकन पक्षाने राजकीय व सामाजिक कार्यासोबतच आर्थिक स्वरूपाचे कार्य सुद्धा केले. दलित शोषितांचा प्रश्न मुख्यतः आर्थिक बाबींशी निगडीत असून तो सोडविणे अत्यंत आवश्यक होते. त्यासाठी रिपब्लिकन पक्षाने शासनाला एक दिशा दिलेली होती आणि त्यासंबंधात आंदोलन करून वातावरण निर्मिती केली होती. दलित शोषितांना स्वाभिमानाने जीवन जगण्यासाठी त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारणे आवश्यक होते. त्यांचा आर्थिक प्रश्न एक राष्ट्रीय प्रश्न आहे म्हणून तो प्रश्न सोडविणे अत्यंत गरजेचे आहे असे रिपब्लिकन पक्षाला वाटत होते. हे रिपब्लिकन पक्षाने ज्या जिद्दीने भूमिहीनांचा सत्याग्रह लढविला त्यावरून सिद्ध होते.

रिपब्लिकन पक्ष आंदोलनाचा प्रभाव :

रिपब्लिकन पक्षाचे आदर्श डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तत्वनिष्ठतेने प्रामाणिक कार्यकर्तृत्वाने अस्पृश्य शोषितांना प्रेरित केले आहे. ज्या पद्धतीने डॉ. आंबेडकरांनी संघटना निर्माण केल्या आणि संघटनांना राबविले, त्या पद्धतीचा रिपब्लिकन नेतृत्वावर आणि आंदोलनाच्या विकासावर परिणाम झाला. अस्पृश्यूशोषितांचा उद्धाराचे उद्दिष्ट ठेवून निर्माण झालेल्या रिपब्लिकन पक्षाचा अस्पृश्य शोषितांवर प्रभाव असणे नैसर्गिक होते कारण असा प्रयत्न त्याआधी कोणत्याही संघटना किंवा पक्षाने केला नव्हता. रिपब्लिकन पक्ष आंदोलनाची गतिमानता ह्या प्रभावामुळे अधिक क्रियाशील झाली होती. भूमिहीनांच्या

ISSN No. 2394-5990

आंदोलनात तर ती आणखीच वरच्या पातळीवर गेली. या आंदोलनाला मिळालेल्या व्यापक जनाधारामुळे गतिशीलतेत तीव्रता दिसून येते.

रिपब्लिकन पक्षाच्या स्थापनेचा एक आगळा वेगळा इतिहास आहे. डॉ. आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणानंतर निर्माण झालेल्या हतबल आणि शोकाकूल परिस्थितीला उधाण यावे अशी ही घटना आहे. डॉ. आंबेडकरांच्या संकल्पित रिपब्लिकन पक्षाची स्थापना दि. ३ ऑक्टोबर १९५७ ला नागपूर ह्या ऐतिहासिक ठिकाणी करण्यात आली. या समारंभाला सात लाख लोकांची उपस्थिती होती. कारण एका राजकीय पक्षाच्या स्थापनेसाठी सात लाख लोकांची उपस्थिती राहण्याचा हा एक विक्रम होता. भारतात दि. २८ डिसेंबर १८८५ रोजी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना मुंबईत झाली. त्यात केवळ ७२ लोकच उपस्थित होते. त्यातही प्रामुख्याने इंग्रज अधिकारी जास्त होते. यावरून आपल्याला हे लक्षात येते की, आपल्याच भवितव्याशी निगडीत असलेले लाखो लोक पक्ष स्थापनेसाठी उपस्थित राहणे हा अपूर्व आणि अजब प्रकार होता.[१३]

लोकहिताचे भक्कम रक्षण करणारा पक्ष म्हणून रिपब्लिकन पक्षाने नेहमीच कार्य केले आहे. त्याच्या कार्यपद्धतीतील एका मोर्चाचे उदाहरण दाखला म्हणून देता येईल. दि. ९ ऑगस्ट १९६३ रोजी रिपब्लिकन पक्षाने विधान सभेवर भव्य मोर्चा काढला तसाच त्याच दिवशी इतर ठिकाणी एकाच वेळी कलेक्टर ऑफिस व तालुका तहसीलदारावरही मोर्चा नेण्यात आला. या सर्वत्र निघालेल्या मोर्चाची प्रमुख मागणी ही भूमिहीनांना न मिळालेल्या जमीन वाटपाची होती. परंतु मोर्चातील इतर मागण्या पाहिल्या तर रिपब्लिकन पक्ष सर्व सामान्य माणसाच्या आर्थिक प्रश्नांशी कसा निगडित होता हे प्रत्ययास येते.

समारोप :

कोणत्याही आंदोलनाची परिणामकारकता ही त्या आंदोलनाच्या नेतृत्व, विकास आणि प्रभावाला स्पष्ट करीत असते. आंदोलनाचे महत्व त्याच्या परिणामकारकतेवरून कळत असते. रिपब्लिकन पक्षाने लोकाभिमुख आणि लोकहिताच्या समस्या सोडवण्यासाठी पुढाकार घेतला. त्यामुळे रिपब्लिकन पक्षाने भारतीय संविधानातील उद्देशाला अनुरूप कार्य करून विधायक कार्याला गती दिली.

संदर्भ ग्रंथसूची :

१. डॉ. भीमराव रामजी आंबेडकर चरित्र खंड १०, श्री चां. भ. खैरमोडे, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, नवीन प्रसान भवन, मुंबई. ४०००३२. प्रथमावृत्ती ऑक्टोबर १९८९ पृष्ठ १५

२. जातीभेद निर्मुलन, लेखक डॉ. भी. रा. आंबेडकर, भाषांतर मा. फ. गांजरे, अशोक प्रकाशन.३ / बॅनर्जी ले आऊट, भगवान नगर रोड, नागपूर २७, प्रथमावृत्ती २५.०९.१९७० पृष्ठ ९४

३. राजकीय समाजशास्त्र, बी. वाय. कुलकर्णी, विद्या प्रकाशन, रुईकर पथ, महाल, नागपूर ४४० ००२, प्रथमावृत्ती, २००३, पृष्ठ १०१

४. डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन व भाषणे खंड २०, महाराष्ट्र शासन, मुंबई, प्रथमावृत्ती २००५, पृष्ठ ४६३

५. कर्मवीर दादासाहेब गायकवाड, काल आणि कर्तृत्व, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई. प्रथमावृत्ती १६ ऑक्टोबर २००२, पृष्ठ १८

६. तत्रेव, पृष्ठ १८९

७. तत्रेव, पृष्ठ १४६

८. महाराष्ट्राचे शिल्पकार, समता संग्रामाचे सेनानी, बॅ.राजाभाऊ खोब्रागडे, लेखक, व्ही. डी. मेश्राम, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथमावृत्ती, ऑगस्ट २००३, पृष्ठ ११

९. तत्रेव, पृष्ठ ६५

१०. भारतीय रिपब्लिकन पक्ष, लेखक ः प्रा. आर. के. क्षीरसागर, नाथ प्रकाशन, मनगटे निवास, नागेश्वरवाडी, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, जुलै १९७९, पृष्ठ ६६

११. आंबेडकरोत्तर आंबेडकरी चळवळ, भाग २, लेखक ज.वि. पवार, कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती १४ ऑक्टोबर २००६, पृष्ठ ९८

१२. तत्रेव, पृष्ठ १०१

१३. आंबेडकरोत्तर आंबेडकरी चळवळ, भाग १, लेखक ज. वि. पवार, कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, २८ नोव्हेंबर २००२, पृष्ठ ४२

■■■

राजर्षी शाहू महाराज व आर्य समाज

प्रा.डॉ.संजीव सुखलाल बोडखे
प्रोफेसर, इतिहास विभाग,
सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, सातारा
मोबा.नं.९४२१२०८९२४
ईमेल : bodkhesanjeev@gmail.com

प्रास्ताविक :

ब्रिटिशांनी १८४८ पर्यत भारतातील एकूण साडेसातशे देशी लहानमोठी संस्थाने जिंकून त्यांना मांडलिक बनवले. त्यापैकी कोल्हापूर हे एक छोटे पण महत्त्वाचे ऐतिहासिक संस्थान होते. राजर्षी शाहू महाराज लोकनेते म्हणून सर्व महाराष्ट्रीयनांच्यापुढे स्मृतिरूपाने राहिले आहेत. व्यक्ती गेली पण कीर्ती आहेच. हे कार्य इंग्रजांच्या राज्यात झाले. छत्रपती शिवाजी महाराजांनी राजकीय स्वराज्य आणले. शाहू महाराजांच्यामुळे धार्मिक स्वराज्य निर्माण झाले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात धार्मिक व सामाजिक स्वातंत्र्याची निकड होती. शाहू काळात जी गरज होती. ती धार्मिक, सामाजिक क्षेत्रातील होती. लोक म्हणजे शेतकरी, बहुजन लोक निरक्षर, दरिद्री, विद्याहीन होते. आधी सामाजिक? का आधी राजकीय? हा जो वाद टिळक-आगरकरात चालला होता त्या वादात न पडता राजर्षी शाहू महाराजांनी ङ्कआधी सामाजिकफम्हणून स्वतःच्या मनात निर्णय घेऊन, सामाजिक-धार्मिक क्रांती करुन राजकीय स्वातंत्र्याच्या लढयाला समर्थ अशी महाराष्ट्रीय जनता बनविली. म्हणून शाहू महाराज हे लोकजीवन घडविणारे लोकनेते ठरले. राजर्षी शाहू महाराजांनी जवळजवळ पंचवीस ते तीस वर्षे महाराष्ट्रातील समाजाचे नेतृत्त्व केले. ते सर्व दक्षिणेत पसरले होते. मद्रास, नागपूर, पुणे, मुंबई, पंजाबातील आर्य समाज वगैरे ठिकाणी जाऊन राजर्षी शाहू महाराजांनी उद्बोधक भाषणे केली. महाराष्ट्रात ठिकठिकाणी संस्था उभ्या केल्या. दातृत्त्वाचा ओघ सर्व समाज स्तरामध्ये पसरविला व सर्वांगीण प्रगती केली.

राजर्षी शाहू महाराजांचे आर्य समाजातील कार्य :

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील सामाजिक व धार्मिक क्षेत्रातील महत्वाची चळवळ म्हणजे आर्य समाज होय. आर्य समाजाची स्थापना स्वामी दयानंद सरस्वती यांनी १० एप्रिल, १८७५ रोजी मुंबई येथे केली. या समाजाने आपली तत्त्वे मांडताना वेदांना अंतिम प्रमाण मानले, या समाजाचे सदस्य झालेल्या प्रत्येकाने आपल्या उत्पन्नाचा ०.०१ वा भाग समाजकल्याण, आर्य विद्यालय व आर्य प्रकाश या वृत्तपत्राकरीता द्यावा, तसेच आर्य विद्यालयात स्त्री-पुरूषांना वेदनिष्ठ शिक्षण देणे. या तीन मुख्य तत्त्वास अनुसरूनच आर्य समाजाने कार्य केले होते.

आर्य समाजाने धार्मिक सुधारणामध्ये हिंदू धर्मातील मूर्तिपूजा, अवतारवाद, तीर्थयात्रा, व्रतवैकल्ये, पौराणिक अनुष्ठाने या गोष्टी नाकारल्या. राम-कृष्ण हे ईश्वरी अवतार नसून श्रेष्ठ मानव आहेत असे सांगितले. ब्राम्हण पुरोहिताचे श्रेष्ठत्व नाकारले. परमेश्वराला प्रसन्न करण्यासाठी पुरोहिताची गरज नाही, असे सांगितले. सत्कर्म हाच खरा धर्माचा आधार असून सदाचार, परोपकार, सेवा व दया ही धर्माचरणाची अंगे आहेत. स्त्री-पुरूष व शूद्रादी हे सर्व समान असून सर्वांना वेदांचा अभ्यास करण्याचा हक्क आहे असे सांगितले. वेदांना प्रमाण मानताना समृतिग्रंथ, अठरा पुराणे, सहा शास्त्रे व ब्राम्हण ग्रंथाना नाकारले. हिंदू धर्मातील कर्मकांड, संकुचितपणा घालवला. शुद्धीकरण चळवळ हाती घेतली.

आर्य समाजाने सामाजिक चळवळ हाती घेतली. जातिव्यवस्था, जातिभेद व अस्पृश्यता पालन यास आर्य समाजाने विरोध केला. समाजातील वर्ण हा जन्मावर नव्हे तर गुणकर्मावर अवलंबून असतो, असे आग्रहाने सांगितले. शूद्र व स्त्रियांना वेदाचे अध्ययन करण्याचा व उच्च शिक्षण घेण्याचा अधिकार आहे, असे सांगून त्यासाठी चळवळ उभारली. बालविवाह, कायम वैधव्य, विधवांना हीन मानणे, पडदा-पद्धती, हुंडा पद्धती, बहुपत्नी विवाह, देवदासी अशा वाईट प्रथांवर कठोर प्रहार करीत आंतरजातीय विवाहाचे समर्थन केले. शैक्षणिक कार्यामध्ये शिक्षणाचा प्रसार मोठया प्रमाणावर केला. उत्तर भारतात गुरुकुल पद्धतीच्या शाळा सुरू केल्या. महाराष्ट्रात कोल्हापूर, सोलापूर व मुंबई येथे या समाजाच्यावतीने आजही शैक्षणिक कार्य चालू आहे.[१]

राजर्षी शाहू महाराज यांनी आर्य समाजास कोल्हापूर येथे उदार हस्ते आर्थिक मदत केली. याचे कारण आर्यसमाजाने वेदोक्त व वेद सर्वाना खुले केले. डॉ.बाळकृष्ण हे प्रमुख होते.

ISSN No. 2394-5990

आर्य समाजामार्फत कोल्हापूर येथे हायस्कूल व कॉलेज दीर्घकाळपर्यत चालले होते. त्यामुळे शिक्षणाचा प्रसार मोठया प्रमाणावर झाला.[२]

राजर्षी शाहू महाराज हे विचार-आचाराने आर्य समाजी होते. असे मत स.मा.गर्गे, डॉ.य.दि.फडके यांनी मांडले आहे. इतिहास संशोधन क्षेत्रात अस्सल कागदपत्रांच्या पुराव्याचे महत्त्व लक्षात घेता ते आर्य समाजी होते. तसेच राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या अनेक जाहीर भाषणात आणि खाजगी पत्रव्यवहारात 'मी आर्य समाजाचा कसा झालो' किंवा 'मी स्वतः हृदयाने आर्य समाजवादी कसा आहे' याचे विवेचन केलेले आढळते.[३]

गर्गे स.मा.यांनी म्हटले आहे की, 'राजर्षी शाहू महाराजांनी आर्य समाजाची तत्वे आणि ध्येयधोरणे पुरस्कारिली' यावरून हे लक्षात येते की, राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर येथे आर्य समाजासाठी फार मोठे कार्य केले होते. सन १९२१ मध्ये बडोद्याच्या 'जागृती' पत्रात राजर्षी शाहू महाराजांचे एक पत्र प्रसिद्ध झाले होते. त्यात ते म्हणतात, मी सत्यसमाजिस्ट केव्हाही नव्हतो व नाही..कोल्हापूरात आर्य समाज, थिऑसॉफी वगैरे पुष्कळ पंथ आहेत. त्यांच्यापैकीच सत्यसमाज एक आहे. मला वेद मान्य असून मी वेदास चिकटून राहणारा आहे.[४] अशाच आशयाची विधाने अनेक पत्रातून आढळतात. यावरून डॉ.य.दि.फडके म्हणतात की, शाहू छत्रपती हे सत्यशोधक नसून आर्य समाजाचे पुरस्कर्ते होते. असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही.

मार्च १९१९ मध्ये भावनगर येथे भरलेल्या तिसऱ्या आर्य समाज अधिवेशनाच्या अध्यक्ष स्थानावरून भाषण केले. या भाषणात स्वामी दयानंद सरस्वती व आर्य समाजाबद्दल धन्यवाद देऊन ते म्हणाले की, मी आर्य समाजाची विचारसरणी स्वीकारली. त्याचे कारण म्हणजे वैदिक धर्म इतर कोणत्याही धर्मश्रद्धेपेक्षा श्रेष्ठ आहे, असा माझा विश्वास आहे. मी राजाराम हायस्कूल, गुरूकूल, अनाथाश्रम, सरदार बोर्डिंग या संस्था आर्य प्रतिनिधीकडे सोपविल्या. त्यामागे अशी माझी श्रद्धा आहे की या सर्व शैक्षणिक संस्थांची नैतिक प्रगती व्हावी. आर्य समाजाचे शिक्षक व विचारवंत माझा उद्देश सफल करतील म्हणून मी संस्था त्यांच्याकडे सोपविल्या. या परिषदेला जमलेल्या प्रतिनिधींनी आणि प्रमुख सूत्रधारांनी तशाच प्रकारच्या शिक्षणसंस्था महाराष्ट्रात जोतिबा, पंढरपूर इत्यादी धार्मिक क्षेत्राच्या ठिकाणी स्थापन कराव्यात. त्यांना माझे साहय राहील.[५]

राजर्षी शाहू महाराजांनी सन १९१८ च्या आरंभी कोल्हापूर येथे आर्य समाजाची स्थापना करण्यास प्रोत्साहन दिले होते. बडोद्याहून पंडित आत्माराम यांना त्यासाठी आमंत्रित केले होते. आर्य समाजाकडे राजाराम कॉलेज व राजाराम हायस्कूल चालविण्यासाठी दिले होते. कोल्हापूरातील काही शाळेत महर्षी दयानंदाचा 'सत्यार्थ प्रकाश' हा ग्रंथ मराठी विद्यार्थ्यांना सक्तीचा म्हणून त्यांनी सुरू केला. कोल्हापूर व जोतिबाच्या रस्त्यावर केर्ली येथे गुरूकूल स्थापन केले. त्याचवर्षी राजाराम अनाथाश्रम ही संस्था आर्य समाजाच्या कार्यकर्त्यांना चालविण्यास दिली. त्यांच्या आर्थिक मदतीची सोय केली. अशा प्रकारे आर्य समाजाच्या कार्याला चालना देऊन आपल्या धार्मिक सुधारणेच्या कार्याची दिशा त्यांनी स्पष्ट केली.[६]

गुजरातमध्ये नवसारीत दि. १४ डिसेंबर १९१८ रोजी आर्य समाजाचे ११ वे अधिवेशन भरले होते. या अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून राजर्षी शाहू महाराजांनी केलेले भाषण फारच गाजले होते. या भाषणात त्यांनी सध्याच्या ब्राम्हण वर्गाचे अधःपतन कसे झाले आहे. हे सांगून ब्राम्हणांनी आपल्या बनावटी धर्माने ब्राम्हम्हणेत्तरांना कोणत्या हीन अवस्थेत आणून ठेवले आहे. याचे चित्र रंगविले आहे. या अवस्थेतून बहुजन समाजास वर काढण्याचे प्रयत्न स्वामी दयानंद, बाबू केशवचंद्र सेन व महात्मा जोतिबा फुले यांनी कोणत्या परिस्थितीत केले याची चर्चा करून महाराज ब्राम्हणेत्तरांना वेदाचा अधिकार देऊन सर्वत्र समता निर्माण करु पाहणाऱ्या आर्य धर्माचा गौरव करतात. त्यांच्या मते आर्य धर्माच्या प्रसारामुळे भिन्न भिन्न जाती, पंथ व धर्म यामध्ये एकोपा निर्माण होऊन भारतात राष्ट्रीय ऐक्याची भावना वाढीस लागणार आहे. महायुद्धानंतर सर्व जग आता एक होण्याच्या मार्गावर असता आमची नजर एकराष्ट्रीयत्वाच्या भावनेनेही कुंठीत होता कामा नये. असा विचार या भाषणातून राजर्षी शाहू महाराज यांनी मांडलेला होता.[७]

याच भाषणात ते आर्य धर्माबद्दल म्हणतात की, दक्षिण हिंदुस्थानची धार्मिक व सामाजिक स्थिती मोठी शोचनीय आहे, यातही जास्त फूट पाडण्यास ब्राम्हण म्हणविणारे कसा प्रयत्न करतात याचे उदाहरण म्हणजे राजा असल्याने आपण विष्णूचा अंश आहात, म्हणून आपण क्षत्रिय आहात. आपल्या घरी वेदोक्त कर्मे करण्यास तयार आहोत, असे धूर्त ब्राम्हण मला म्हणतात. या युक्तीने माझ्या ज्ञातिबंधांत व माझ्यात फूट पाडण्याचा प्रयत्न त्यांनी केला. त्याचप्रमाणे मराठे लोकांतही निरनिराळे कारणे लावून अमूक श्रेष्ठ, अमूक कनिष्ठ असे सांगून ते फूट पाडीत असतात. यासाठी आर्यसमाजाचे प्रयत्न प्रांतात विशेष झाले पाहिजेत. बनावटी धर्मगुरूंचा सुळसुळाट नाशिक, पंढरपूर या क्षेत्रातच असतो. तेव्हा त्या त्या ठिकाणी आपल्या शाळा, गुरूकुले, उपदेश मंदिरे झाली पाहिजेत. खऱ्या धर्माचे ज्ञान वाढविले पाहिजे. नामदार पटेल यांनी हिंदुस्थानच्या कायदे कौन्सिलात आणलेल्या बिलास पुष्टी देण्याचा ठराव आपल्या अधिवेशनात आपण आणणार आहात, हे फार चांगले आहे.

जातिभेदामुळे रोटीबेटी व्यवहारास फार अडचण येऊन समाजात फार फूट झाली आहे. त्यामुळे बहुतेक सगळा ब्राम्हणेत्तर समाज या कामी या बिलास अनुकूल आहे. त्याप्रमाणे सभा भरून ठिकठिकाणी ठराव होत आहेत. शेवटी ते म्हणतात की, ङ्कआर्यधर्माचे ज्ञान सर्वत्र प्रसार होऊन, त्या योगाने या देशाची चिरकाल उन्नती होवो व सर्व जगात शांती आणि आनंद फैलावत जावे अशी ईश्वरचरणी प्रार्थना करतो.[८]

अशाप्रकारे राजर्षी शाहू महाराजांनी आर्य समाजाच्याबाबतीत आपले विचार परखडपणे मांडून त्या समाजासाठी कोल्हापूर येथे मोठया प्रमाणावर कार्य केलेले दिसून येते.

सारांश :

आर्य समाजाची स्थापना स्वामी दयानंद सरस्वती यांनी १० एप्रिल, १८७५ रोजी केली. या समाजाने आपली तत्त्वे मांडताना वेदांना अंतिम प्रमाण मानले होते. आर्य समाजाने धार्मिक सुधारणामध्ये हिंदू धर्मातील मूर्तिपूजा, अवतारवाद, तीर्थयात्रा, व्रतवैकल्ये, पौराणिक अनुष्ठाने या गोष्टी नाकारल्या. आर्य समाजाने सामाजिक चळवळ हाती घेतली. जातिव्यवस्था, जातिभेद व अस्पृश्यतापालन यास आर्य समाजाने विरोध केला. आर्य समाजाने बालविवाह, कायम वैध्यव्य, विधवांना हीन मानणे, पडदा पद्धती, हुंडा पद्धती, बहुपत्नी विवाह, देवदासी प्रथा अशा वाईट प्रथांवर कठोर प्रहार करीत आंतरजातीय विवाहाचे समर्थन केले. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी आर्य समाजास कोल्हापूर येथे उदार हस्ते आर्थिक मदत केली. याचे कारण आर्य समाजाने वेदोक्त व वेद सर्वाना खुले केले. आर्य समाजामार्फत कोल्हापूर येथे हायस्कूल व कॉलेज दीर्घकाळपर्यत चालले होते. त्यामुळे शिक्षणाचा प्रसार मोठया प्रमाणावर झाला. राजर्षी शाहू महाराजांनी सन १९१८ च्या आरंभी कोल्हापूर येथे आर्य समाजाची स्थापना करण्यास प्रोत्साहन दिले होते. आर्य समाजाकडे राजाराम कॉलेज व राजाराम हायस्कूल चालविण्यासाठी दिले होते. कोल्हापूरातील काही शाळेत महर्षी दयानंदाचा ङ्कसत्यार्थ प्रकाशफहा ग्रंथ मराठी विद्यार्थ्यांना सक्तीचा म्हणून त्यांनी सुरू केला. कोल्हापूर व जोतिबाच्या रस्त्यावर केर्ली येथे गुरूकूल स्थापन केले. त्याचवर्षी राजाराम अनाथाश्रम ही संस्था आर्य समाजाच्या कार्यकर्त्यांना चालविण्यास दिली. त्यांच्या आर्थिक मदतीची सोय केली. अशाप्रकारे आर्य समाजाच्या कार्याला चालना देऊन आपल्या धार्मिक सुधारणेच्या कार्याची दिशा त्यांनी स्पष्ट केली. राजर्षी शाहू महाराजांनी आर्य समाजाच्याबाबतीत आपले विचार परखडपणे मांडून त्या समाजासाठी कोल्हापूर येथे मोठया प्रमाणावर कार्य केलेले दिसून येते.

संदर्भ :

१) सरदेसाई बी.एन. व नलावडे व्ही.एन., आधुनिक भारताचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, ऑक्टोबर २००४, पृ.३३३, ३३४

२) चव्हाण रमेश(संपा.), राजर्षी शाहू महाराज यांची सामाजिक विचारधारा व कार्य, रा.ना.चव्हाण जन्मशताब्दी वर्ष प्रकाशन, पुणे, पृ.१०१

३) जाधव भ.बा.(संपा.), राजर्षी श्री शाहू महाराजांची भाषणे, कोल्हापूर, पहिली आवृत्ती, १९७१, पृ.२१, २२

४) फडके य.दि. शाहू छत्रपती आणि लोकमान्य, पुणे, १९८२, पृ.१८६

५) कित्ता, पृ.१८७

६) पवार शिरीष, राजर्षी छत्रपती शाहू महाराज विचार आणि कार्य, सहयाद्री प्रकाशन पुणे, २६ जून २०१३, प्रथमावृत्ती, पृ.६८

७) कित्ता, पृ.६८

८) पवार जयसिंगराव(संपा.), राजर्षी शाहू छत्रपतींची भाषणे, सुमेरू प्रकाशन, डोंबिवली, १५ जुलै २००८, पृ. १९

■■■

ISSN No. 2394-5990

कलासक्त राजर्षी शाहू महाराज

प्रा. डॉ. प्रफुल्ल तु. बन्सोड
कार्यकारी प्राचार्य तथा सहयोगी प्राध्यापक
राष्ट्रसंत तुकडोजी महाविद्यालय, चिमूर
जि. चंद्रपूर पिन - ४४२९०३
भ्रमणध्वनी ९४२१७२०३१७
ई मेल - prafullbansod7gmail.com

सारांश :

'वर्तमान काळात महाराष्ट्र राज्य हे फुले शाहू आबेडकर या नावाने ओळखले जाते कारण या महाराष्ट्र प्रदेशाला म. फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ बाबासाहेब आंबेडकर या थोर समाजसुधारकांचा वैचारिक वारसा लाभलेला आहे. ब्रिटीश राजसत्तेचा काळात सामान्य जनतेचा व बहुजन समाजाच्या प्रगतीसाठी राजर्षी शाहू महाराजांनी केलेले कार्य म्हणजे भारतीय समाजसुधारणेच्या इतिहासातील मैलाचा दगड आहे. महाराजांच्या ४८ वर्षाच्या अल्प आयुष्याच्या सामाजिक कार्याच्या परिघाचा विचार केला असता असे लक्षात येते की, महाराजांनी बहुजन व अस्पृश्य समाजाचा सर्वांगीण विकास कसा होईल याकडे जातीने लक्ष दिले. अनेक शाळा, वस्तीगृहे, व्यापार पेठ, शेतक-यांच्या सहकारी संस्था सहकार क्षेत्र, जाती भेदाचे उच्चाटन करण्यासाठी उभारलेला लढा, यासारख्या अनेक महत्वाच्या सुधारणा राजर्षी शाहू महाराजांनी केल्या या सामाजिक सुधारणांबरोबर राजर्षी शाहूंनी कोल्हापूर संस्थानात संगीत, चित्रपट, लोककला, आणि कुस्ती या क्षेत्रातील कलावंताना राजाश्रय देऊन त्यांना प्रोत्साहन देण्याचे स्पृहनीय कार्य केले. त्यांच्या या कार्यामुळेच महाराष्ट्रातील कलेला अखिल भारतीय किर्ती मिळाली. महाराष्ट्रातील अनेक गायक, नाटक कंपन्या, अनेक गुणी कलावंत, जसे बालगंधर्व, केशवराव भोसले, हे शाहू महाराजांनी महाराष्ट्राला दिलेली कलाभेट आहे. त्यांच्या या कार्यामुळे त्यांच्यात दडलेला कलासक्तपणा उघडीस येतो. त्यांच्यामुळे महाराष्ट्रातील साहित्य, संगीत, चित्र, यासारख्या इतर कला जगतमान्य झाल्या आहेत. कलासक्त राजर्षी शाहू महाराजांच हे कार्य आज उन्नत पावलेल्या कलाक्षेत्राची सुरुवात होती.

कलासक्त राजर्षी शाहु :

कलेच्या ठायी सृजनाचा शोध घेणारे आधुनिक नामदेव म्हणजे राजर्षी शाहु होय. असं म्हटल्यास वावगे ठरणार नाही, कारण बहुजन हिताय बहुजन सुखाय हा मुलमंत्र जपणाऱ्या या राजाने लेखक कवी, शाहीर, संशोधक व पत्रकार या सर्वच साहित्यीक मंडळीवर नितांत प्रेम केले. त्यांना विविध प्रकारची मदत केली परंतु हे सर्व करीत असताना या प्रतिभावंत लेखक आणि कवीच्या साहित्यगुणांची कदर करावी, त्यांच्या गुणांचा योग्य तो आदरसत्कार करावा त्यांच्या साहित्यनिर्मितीतून मनोरंजन आणि प्रबोधन हे दोन्ही घडावे हीच शाहू छत्रपतीची खरीखुरी भावना होती. आपल्या संस्थांना मध्ये कलेची वाढ व्हावी, कोल्हापूरचे वातावरण कलापूर्ण व्हावे असे त्यांना नेहमी वाटत होते. संगीत, नृत्य, गायन हे जीवनातील अविभाज्य अंग असावे. मनाला एका वेगळ्या आनंदात घेऊन जाणारी कला, तिचा विकास होणे गरजेचे आहे. हे छत्रपती शाहू महाराजांनी ओळखले होते. ते कलेचे भोक्ते होते. कलेचे पुजारी होते. कोल्हापूर संस्थानात संगीत, नाट्य, चित्रादी कलांना त्यांनी राजाश्रय दिला. कलेची वाढ होण्यासाठी कलाकारांना कलेचे प्रशिक्षण दिले. दुष्काळासारख्या परिस्थितीमध्येही कलाकारांना त्यांनी पितृप्रेमाने संरक्षण दिले. महाराष्ट्रातील कलाकारांचे नाव भारतभर कसे गाजेल यासाठी त्यांनी प्रयत्न केले.त्यांनी नटांमध्ये लहानपणापासून कलेची आवड निर्माण करून रशंभूमीवर उत्कृष्ट नट बनविले. आपल्या दरबारात नृत्य, संगीत, गायन, चित्रकला, नाट्यकला तमाशा आदी विविध कलांना प्रोत्साहन, राजाश्रय देऊन त्यांची जोपासना केली.

इतिहास आणि अनुभव हेच आपले खरे गुरु असल्याचे शाहू छत्रपतीनी एका भाषणात मान्य केले आहे. पहिले शिवचरित्रकार म्हणून कृष्णराव अर्जुन केळुसकर यांचा गौरवाने उल्लेख करावा वाटतो. केळूसकरांनी लिहिलेल्या शिवचरित्रास शाहू छत्रपतीनी एक हजार रुपयांचे पारितोषिक दिले. तर रावबहादूर, द.ब. पारसनीस यांना शिवछत्रपतीचे सविस्तर व आधारचरित्र लिहिण्यासाठी सहा हजार रुपये मंजूर केले. विठ्ठल रामजी शिंदे यांच्या इतिहासाच्या व्यासंगीपणाबद्दल शाहू छत्रपतीना खूप आदर होता. म्हणून २९ ऑगस्ट १९२० रोजी

रायबागहून विठ्ठल रामजी शिंदे यांना पत्र पाठवून त्या पत्रात त्यांना वि.रा.शिंदेना शिवचरित्र लिहिण्याची विनंती केली. सातारा परिसरांचा इतिहास लिहिण्यासाठी प्रबोधनकार ठाकरे यांना सांगितले होते. पुढे २६ वर्षांनतर १९४८ मध्ये प्रबोधनकार ठाकरे यांनी 'प्रतापसिंह छत्रपती आणि रंगो बापूजी' हा अस्सल ऐतिहासिक ग्रंथ लिहून प्रसिद्ध केला. याखेरीज लोकमान्य टिळकांनी मंडालेच्या तुरुगांतील गितारहस्य लिहिला. त्या ग्रंथाच्या प्रथम प्रती त्यांनी मागविल्या होत्या. तसेच इंग्रजी लेखक व्हेलेन्टाईन चिरोल यांनी मइंडियन अनरेस्टफ नावाचा ग्रंथ लिहिला. शाहु महाराजानी या ग्रंथाच्या ५०० प्रति विकत घेतल्या. हा ग्रंथ हिंदी देशभक्त आणि क्रांतिकारक यांच्याविरुद्ध प्रसार करणारा होता. शाहु महाराजांनी जिज्ञासा म्हणून महादेव गोविंद डोंगरे यांना उपरोक्त ग्रंथाचे भाषातर करण्यासाठी अकराशे रुपये दिले.

दीनमित्र साप्ताहिकांचे संपादक मुकुंदराव पाटील यांना राजर्षी शाहूंनी त्यांच्या मकुलकर्णीलीलामृतफ या पुस्तकांसाठी १९१३ मध्ये सहाय्य केलेले दिसते. आपल्या दरबारामध्ये कारकून पदावर असणा-या अप्पाजी धुंडिराम मरतुले भास कवी सुमंत होण्यासाठी राजर्षी शाहूंनी मदत केली. (मांना दरबारी कवी म्हणून नेमण्यात आले. त्यांचे 'मौक्तिकमाला', गितावली, भावनिनाद असे मौलिक काव्य ग्रंथ पाहून शाहू महाराजानी त्यांना 'कवी मौक्तिक' ही पदवीही बहाल केल्याचे इतिहासात नमूद आहे. सर्व धर्मातील लोकावर महाराजांचे प्रेम होते. मुसलमान समाजाचाही विकास व्हावा असे त्यांना वाटत होते. म्हणून सन १९१० मध्ये कुराणाचे मराठी भाषांतर करण्यासाठी फार मोठी रक्कम खर्च केली. दिनकरराव जवळकर यांनी देशाचे दुश्मन' हा जहाल ग्रंथ लिहिला. त्यांनी 'प्रणय प्रभाव' नावाचे नाटक लिहिले प्यास मदत केली त्यांच्या 'तरुण मराठा' था वृत्तपत्रास सहाय्य केले. त्याचप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'मुकनायक' या साप्ताहिकास मदत केली. त्यामुळे अस्पृश्य समाज बोलका झाला. प्रबोधनकार ठाकरे यांच्या ग्रामण्याचा साधन शतिहास, कोदंडाचा टणत्कार, वज्रप्रहार ग्रंथमाला प्रा प्रसिद्ध करण्यासाठी आर्थिक मदत केली.

मराठी पत्रकारांची पत्रकारिता आणि त्यांच्यातील 'लेखक' सतत जागृत राहावा त्यांची लेखणी अथकपणे कार्यरत राहावी म्हणून राजर्षी शाहू छत्रपती अक्षरक्षः जीवाचे रान करीत होते. 'विजयी मराठा' कार श्रीपतराव शिंदे, दिनकरराव जवळकर, 'जागृति'कार भगवंतराव पाळेकर, 'संदेश' कार अच्युत बळवत कोल्हाटकर जागरुका कार वालचंद कोठारी इत्यादीनां राजर्षीनी दिलेले प्रोत्साहन आणि प्रेम यामुळे मराठी वृत्तपत्रसृष्टीची परंपरा समृद्धशाली बनली हे मान्य केले पाहिजे. याखेरीज भास्करराव जाधव अण्णासाहेब लट्ठे, हरिभाऊ चव्हाण, शंकर सखाराम शाळीग्राम, महादेव गणेश डोंगरे, बाळाजी प्रभाकर मोडक इत्यादी लेखक मंडळीना शाहू छत्रपतीचा वरदहस्त लाभलेला होता. राजर्षी शाहु छत्रपतीनी हरी सखाराम तुंगार यांच्या दयानंद सरस्वती यांचे चरित्र व कामगिरी या ग्रंथास प्रोत्साहन दिल्याचे आढळते. कवी सुमंत ग. आ. गवई, राजकवी शेव भोसले यी सावरख्या अनेक कनीना राजश्री शाहुनी प्रोत्साहन दिले

शाहिरी वाड:मयाला ममराठी वाड:मयाची प्रभात' असे संबोधून प्रसिद्ध पत्रकार अच्युत बळवंत कोल्हटकरांनी शाहिरी कलेचा गौरव केला आहे. समाजप्रबोधना साठी शाहिरीचा उपयोग करून घेण्याचा वारसा महात्मा फूलेच्याकडून शाहू छत्रपतीकडे आलेला दिसून येतो. शाहू छत्रपतीनी आपल्या दरबारात शाहीर लहरी हैदर, शाहीर विठ्ठल बिरामी होणे, शाहीर रामचंद्र नरहर माळी, शाहीर ईश्वरा माळी इत्यादिंना उदार आश्रय दिला होता. शाहीर हैदर सत्यशोधक समाजाची भजने म्हणत असत. शाहू छत्रपतींनी बहुजनांच्या प्रबोधनासाठी तमाशाचा वापर केला. तमाशाला त्यांनी जनजागरणाचे माध्यम बनविले. अलशा व तमाशामधून हुंडा पद्धती, दाऊंचे दुष्परिणाम, हिंदू-मुस्लीम ऐक्य, स्वदेशी वस्तूंचा वापर, बुवाबाजी विधवांचे केशवपण, बालविवाहांचे दृष्टः परिणाम इत्यादी विविध लोककल्याणाचे विषय हाताळण्यासाठी खुद्द छत्रपती शाहू महाराज दक्ष असत. भीमराव महामुनी ओतुरकर, भाऊराव रामचंद्र पाटोळे उर्फ भिलवडीकर तातोबा यादव कासेगावकर आणि गणपतराव मोरे यांनी सत्यशोधकी जलसे व तमाशे गाजविले होते.

राजर्षी शाहू महाराजांना गायनाचा आस्वाद घेण्याचा मनस्वी छंद होता. महाराजांच्या काळात अल्लादियाखाँ हिंदी शास्त्रोक्त संगीताचे गौरीशंकर प्रसिद्ध होते. १९९५ पासून त्यांना आपल्या दरबारात ठेवले होते. हिंदी विख्यात गायिका अंजनीबाई मालपेकर यांनाही महाराजांनी बहुमान दिला. त्यांच्या दरबारातील केसरबाई केरकर, पंडित भास्करराव बरवले यांनी पुढे अखिल भारतीय संगीत क्षेत्रात नाव कमविले. बकबाई बंदोडकर (बाळाबाई) यांना महाराजांनी दरबारात नर्तकी व गायिका म्हणून ठेवले होते. केसरबाईना अल्लादियाखाँ कडे शिकविण्यासाठी आर्थिक मदत दिली. पुढे त्यांना भारत सरकारने पद्मभूषण देऊन सन्मान केला याचबरोबर अब्दुल करीमखॉ, रजब अली, वजीरखॉ आदिना प्रोत्साहन दिले. गायिका साहेबजान, सोपी जान यांच्या केलेला मदत / प्रोत्साहन दिले. म्हणून खऱ्या अर्थाने ते कलोपासक होते. राजर्षी शाहू महाराजांनी गायनकलेची ज्या प्रमाणे सेवा केली त्याचप्रमाणे रंगभूमीचीही सेवा केली. नाटके पाहण्याची महाराजांना विलक्षण आवड होती. तंजावरच्या भोसले

ISSN No. 2394-5990

घराण्यात मराठी नाटकांचा जन्म १६९० मध्ये झाला. १८३२ पर्यंत तंजावर येथे नाटके होत होती. महाराजांनी याच नाट्य केलेचा विकास करून उत्तुंग शिखरावर नेले. ज्या काळात नाटक पाहणे पाप समजत होते, महारोग्यात त्याची गणना होत असे. अश्या काळात महारांजानी या कलेची आपल्या दरबारात वाढ केली. महाराजांच्या मुळे नारायण राजहंस तथा बालगंधर्व, केशवराव भोसले आदी नटांना तर मराठी रंगभूमीवर महत्वाचे स्थान प्राप्त झाले. त्यांनी १८८३ मध्ये गायन समाज नाट्यमंडळ स्थापन केलं. १८८६ मध्ये किर्लोस्कर नाट्यमंडळ, प्रति सौभद्र, शाहुनगरवासी, 'स्वदेश हितचिंतन' अश्या नाट्यमंडळीना मदत केली. १८९८ साली महाराजांनी नाट्यकलेसाठी डुणगु सावकार यांच्याकडून मशिवाजी थिएटरफ बाधून घेतले. १९१५ मध्ये पॅलेस थिएटर बांधले. पुढारी कलावंत रसिकांची व्यवस्था केली. बाबूलाल पेटर, बाळासाहेब पंडित, गणपतराव बोडस, राम, गणेश गडकरी, आंबालाल रहेमान यांनी आपली कला महाराजांच्या कडे राहूनच जोपासली. तसेच पेटीवादक गोविंदराव भ कांता प्रसवाद- तबलजी, साधलेबुवा - पखवालजी आणि शाहीर लहरी हैदर हे राजर्षीच्या छत्राखालीच नावारुपाला आले. महाराजांनी नाटकासाठी जेवढे करता येईल तेवढे केले. २३ मे १९११ रोजी भारतनाटय समाजाचे सातवे अधिवेशन मुंबईतील खेतवाडी येथील बंगल्यात भरविण्यास परवानगी देऊन सर्वोपरी मदत केली.

एकंदरीत राजर्षी शाहूंचे विचार व कार्य परस्परपूरक होते. जेमतेम अट्ठेचाळीस वर्ष आयुष्य मिळालेली एक व्यक्ती काय करू शकते याचा आदर्श राजर्षी शाहूनी घालून दिला. केवळ जीवन जगणे महावाचे नाही! ते सार्थकी लावणे गरजेचे असते, हे त्यांच्या विचार- कार्यावरुन दिसते. सत्ता, पद, अधिकार, सिंहासन या बाबी स्वतःसाठी नसतात. त्याचा उपयोग हा इतरासाठी असतो ते त्यांनी दाखवून दिले. साहित्य-कला इत्यादी क्षेत्रात त्यांनी केलेल्या कार्यामुळे कोल्हापूर संस्थानामधील लोकांच्या मनाची- सांस्कृतिक पातळी वाढली. संगीत, नृत्य, गायन हे अविभाज्य सामाजिक अंग बनून राहील, परंतु राजषी शाहु छत्रपतीचा कलासक्तपणा कधीच समकालीन लेखकानी महत्वांचा मानलेला नाही हे मोठे आश्चर्यकारक आहे.

संदर्भ-साधने :

१) जाधव डॉ. रमेश - 'लोकराजा शाहू छत्रपती', सुरेश एजन्सी कोल्हापूर, प्र.आ. १९९७

२) मोरे डॉ. गिरीश - 'राजर्षी शाहू विचार व कार्य', निर्मिती प्रकाशन कोल्हापूर २००९

३) किर धनजंय - 'राजर्षी शाहू छत्रपती' एक समाजकृतिकारक राजा पॉप्युलर प्रकाशन मुंबई १९७९

४) सुर्यवंशी कृ. गी - मराजर्षी शाहू राजा व माणूस, ठोकळ प्रकाशन पुणे १९८४-

५) फडके य. दि. - मशाहू छत्रपती आणि लोकमान्य श्रीविद्या प्रकाशन पुणे १९८६

६) पवार डॉ अप्पासाहेब (संपादक) मराजर्षी शाहू छत्रपतीं पेपर्स खेडफ(१८८४-१८९४-) शाहू संशोधन केंद्र कोल्हापूर- १९७८

७) जांभुळे सरिता - लोकराजे राजर्षी शाहू महाराज, संकेत प्रकाशन-२०२१

■■■

अस्पृश्यउध्दारक - राजार्षी शाहू महाराज

प्रा. प्रफुल एम. राजुरवाडे
इतिहास विभाग प्रमुख
राष्ट्रसंत तुकडोजी महा. चिमूर जि. चंद्रपूर
९६८९९५२८७३
rajurwadep9@gmail.com

प्रस्तावना :

आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार राजर्षी शाहू छत्रपती यांना म्हणतात. इ.स. १९८४ ते १९२२ पर्यंतचा अवधी म्हणजे त्यांचा २८ वर्षाची कारकीर्द महाराष्ट्राच्या इतिहासाला कलाटणी देणारी होती. याचकाळात महाराष्ट्रातील जनतेत सामाजिक क्रांती घडून येण्यास सुरवात झाली. प्रशासन, शिक्षण, कला क्रिडा, शेती, उद्योगधंदे, आरोग्य आदी क्षेत्रात त्यानी आमुलाग्र सुधारणा केली.

बहुजनांच्या वाट्याला प्रतिष्ठेचे जीवन यावे म्हणून आपल्या संस्थानात ५०% जागा नोकरीत राखून ठेवणारा भारतातील ७०० संस्थानिकातील हा प्रथम संस्थानिक राजा होता. महात्मा फुलेंनी सत्यासोधक चळवळीची निर्मिती केवळ हिंदू समाजातील जाती व्यवस्था आणि पुरोहीताशाही यांच्या अहंकारी वर्चस्व-विरूद्ध दिलेली झुंज नव्हती, तर अवघा बहुजन समाज शिक्षण, धर्म, अर्थनिती, साहित्य, कृषी, उद्योग, राजकारण, विज्ञान इत्यादी सर्व बाजूंनी सामर्थ्यशाली व्हावा यासाठी दिलेला व्यापक असा लढा होता. राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या समर्थ नेतृत्वाने सत्यशोधक चळवळ जोरदार आणि शक्तिशाली बनविली.

अस्पृश्यता निर्मूलनाचा वसा :

दुर्बल जाती आर्थिक सामाजिक आणि राजकीय दृष्ट्या जोपर्यंत शक्तिशाली होत नाहीत तोपर्यंत जातिसंस्था समूळ नष्ट होणार नाही हे राजर्षी शाहू छत्रपतीचे जातीसंस्था नष्ट करण्याच्या संघर्षाचे प्रमुख सूत्र होते. म्हणून त्यांनी विद्यार्थ्यांच्या जातवार वस्तीगृहाची चळवळ सुरु केली. इतकेच नव्हे तर आपल्या जातीचे नेतृत्व दुसऱ्या जातीच्या पुढाऱ्याच्या हाती जाणार नाही याची दक्षता प्रत्येक जातीने घ्यावी असा प्रगल्भ विचार मांडला. आपला विचार प्रत्यक्ष कार्यवाहीत व्हावा म्हणून त्यांनी माणगाव येथील दलितांच्या परिषदेस जातीने हजर राहून दलितांचे नेते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा गौरव केला.

अस्पृश्यवर्गास शैक्षणिक संधीची उपलब्धता :

कोल्हापूरच्या गादिवर शाहू छत्रपती जेव्हा विराजमान झाले तेव्हा १९८४ मध्ये महार, मांग, चांभार, ढोर या अस्पृश्य समाजाची कोल्हापूर संस्थानातील संख्या सुमारे एक लाख होती. १८८६ मध्ये कोल्हापूर संस्थानात त्यांनी अस्पृश्यांच्या ६ शाळा काढल्या. त्यामध्ये विद्यार्थ्यांची संख्या १९६ एवढी होती. पुढे १९१० मध्ये ६९४ एवढी झाली. तर शाळांची संख्या २२ होती. १९०८ मध्ये कोल्हापुरात खास अस्पृश्य विद्यार्थ्यांसाठी मिस क्लार्क वस्तीगृह उघडले होते. याखेरीज १९१८ मध्ये ढोर-चांभार तथा इंदुमती राणीसाहेब वस्तीगृह १९२० मध्ये पंढरपूर येथे अस्पृश्य वस्तीगृह सुरु केले. अस्पृश्य विद्यार्थ्यांना पाच हजार रुपयांची देणगी देऊन त्यांना कार्यक्षम बनविण्याचा पर्यंत केला. इतकेच नव्हे तर २४ सप्टेंबर १९११ मध्ये मागासलेल्या विद्यार्थ्यांची फी माफ केली. राजाराम हायस्कूल आणि राजाराम महाविद्यालयामधील विद्यार्थ्यांना मुक्त प्रवेश देण्यात आला. या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी खास शिष्यवृत्ती देण्यात आली होती.

विविध कायदे मंजूर :

राजर्षी शाहू छत्रपतीनी अस्पृश्यता समूळ नष्ट करण्यासाठी विशेष प्रयत्न केले. ही जिर्ण व समाजघातक रूढी नष्ट करण्यासाठी ३० सप्टेंबर १९१९ ला क्रांतिकारक हुकुम काढला. आपल्या खाजगी नोकरदार वर्गात अस्पृश्यांना ते अधिक संधी देत असत. १८ सप्टेंबर १९१८ ला शाहू महाराजांनी महार वतने खालसा केली. परंतु महारांच्या जमिनी त्यांच्याकडे राहू दिल्या. तो आता पूर्वीसारखा वेठबिगारी राहिला नाही. ते आता सरकारी कामे करू शकणार होता. माणसाला माणूसकीपासून वंचित ठेवणारी हि रूढी त्यांनी मोडली. २७ जुलै २०१८ मध्ये महार, मांग, रामोशी, बेरड यांना जीवघेण्या सक्तीच्या हजेरीतून मुक्त केले. दि. ८ व १० ऑगस्ट १९१८ रोजी दोन हुकुम काढून तलाठी नेमताना अस्पृश्यांना आधी अग्रक्रम द्यावा. त्यांच्यातील लायक माणूस असेल तर त्याला मुख्याधिकारी करावे. असा

ISSN No. 2394-5990

हुकुम दिला. अस्पृश्यांची सर्वांगीण मुक्ती करण्याच्या उद्देशाने राजर्षी शाहू महाराजांनी अनेक महत्वाचे निर्णय घेतले. अनेक हुकूम काढले. त्याची अंमलबजावणी केली. हुकूम पाळण्यात कसूर करणाऱ्यावर कायदेशीर करवाई करण्याची तरतूदही केली.

अस्पृश्यता निर्मुलनासाठी लोकशाही :

कोल्हापूर संस्थानात राजर्षी शाहू महाराजांनी अस्पृश्यांना राजकारणामध्येही सवलत पाहिजे यासाठी जातवार प्रतिनिधित्वाची योजना तयार केली. विविध जातींना आपला प्रतिनिधी निवडून देता येईल इतकी पुरोगामी विचारसरणी त्यांची होती. तसे त्यांनी लार्ड विलिंग्डन यांना पत्र लिहून कळविले होते. मागासवर्गापासून खालपर्यंत स्वतंत्र मतदार संघ असावे असे स्पष्ट मत होते. कोल्हापूरच्या नगरपालिका निवडणुकीमध्ये स्वतंत्र मतदार संघाचे तत्व लावून अस्पृश्यांसाठी खरी लोकशाही निर्माण केल्याचे दिसून येते.

जातीभेद मोडण्यासाठी शाहू महाराजांना जे काही करता येईल ते सगळे पर्यंत केले. रोटीव्यवहारा बरोबरच बेटी व्यवहाराला चालना द्यावी यासाठी प्रयत्न केले. गंगाराम कांबळेना चहाचे दुकान टाकून दिले. अस्पृश्यांना त्यांनी शिवणयंत्र देऊन दरबारातील कपडे त्यांच्याकडे शिवण्यासाठी दिले. मिरवणुकीवेळी असणाऱ्या हत्तीकरिता माहूत म्हणून अस्पृश्यांची नेमणूक करीत असत. अस्पृश्य व्यक्तींना राजघराण्यातील महाराणी अक्कासाहेब, युवराज यांच्या मोटारीवर ड्रायव्हर म्हणून नेमले जात असे. त्यांना ड्रायविंगच्या कोर्सला पाठवीत असत. एकूण राजर्षी शाहू महाराजांनी समाजात समता प्रस्थापित करण्याचे कार्य केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांशी ऋणानुबंध :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि शाहू महाराजांची १९१९ ला ऐतिहासिक भेट झाली. दत्तोबा संतराम पोवार यांनी ती भेट घडून आणली. मुंबईच्या परळ चाळीत छत्रपती शाहू महाराज त्यांना भेटले. छत्रपती शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामध्ये शेवटच्या २-३ वर्षात जो पत्रव्यवहार झाला तो उपलब्ध आहे. या पत्राच्या आधारे समजते की, डॉ. आंबेडकराना अडीअडचणीच्या काळात शाहू महाराज पैशाची मदत करीत असत.

अस्पृश्यांची बाजू साउथबरो समितीसमोर मांडण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकराना वर्तमानपत्राची गरज भासू लागली. शाहू महाराजांनी वर्तमानपत्र काढण्यासाठी तत्काळ अडीच हजाराचा चेक दिला. आणि त्यांनी दिलेल्या पैश्यातून 'मूकनायक' पाक्षिकाचा जन्म झाला. मूकनायक पाक्षिकाचा जन्म ३१जानेवारी १९२० रोजी झाला. अस्पृश्यांच्या चळवळीला बळकटी येण्यासाठी 'मूकनायक' पाक्षिकाचा खूपच उपयोग झाला. समकालीन केसरी वृत्तपत्राने 'मूकनायक' ची जाहिरात करण्यास नकार दिला होता.

माणगाव परिषद (१९२०) :

राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर अस्पृश्यांच्या चळवळीला दोन वैचारिक खंबीर आधारस्तंभ लाभले होते. ही चळवळ गतिमान करण्यासाठी कोल्हापूर जिल्ह्यात माणगाव या छोट्याशा खेड्यात २० मार्च १९२० रोजी अस्पृश्यांची पहिली व मोठी परिषद भरली. या परिषदेची प्रेरणा छत्रपती शाहूंची होती. या परिषदेत गंगाराम कांबळे, दत्तोबा पवार, डॉ. रमाकांत कांबळे, दादासाहेब शिर्के, तुकाराम गणाचार्य, शिवराम कांबळे, निगापा ऐदोळे, पंजाबराव आदि अस्पृश्य कार्यकर्त्यांबरोबर माणगावचे समाजसुधारक अप्पासाहेब दादगोंडा पाटील, मुंबईचे बँ. तलवार खान, भास्करराव जाधव इत्यादी स्पृश्य समाजातील नेते होते. या परिषदेचे अध्यक्ष डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे होते. माणगाव परिषदेसाठी अनेक अस्पृश्य आणि इतर कार्यकर्ते सलग २-३ आठवडे राबत होते. शाहू महाराजांनी या परिषदेत सांगून टाकले कि, डॉ.आंबेडकर हे अस्पृश्यांचे खरे नेते आहे. अस्पृश्यांनी त्यांना आपला नेता निवडावा. ह्या परिषदेत काही ठराव सर्वानुमते पास झाले. राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या राज्यात बहिष्कृताना समानतेचे हक्क देऊन उध्दार करण्याचे कार्य सुरु केले. त्याबद्दल त्यांचा प्रत्येक वाढदिवस प्रत्येक बहिष्कृत व्यक्तीने सणाप्रमाणे साजरा करावा. असे या परिषदेने ठरविले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सार्वजनिक कार्याची ही परिषद म्हणजे सुरुवात होती. सोशल इंगीनियरिंगचा प्रथम प्रयोग होता. या परिषदेपासून प्रेरणा घेऊन अनेक सामाजिक कार्यकर्त्यानी हा प्रयोग केलेला आहे. या परिषदेत राजकीय प्रतिनिधीची मागणी करण्यात आली. आम्हाला स्वतंत्र मतदारसंघ मिळाले पाहिजेत असे डॉ. आंबेडकरानी ठणकावून सांगितले होते. हीच मागणी त्यांनी १३ वर्षांनी पुणे करारात लावून धरली होते.

'मूकनायक' चा शाहू जयंती विशेषांक काढण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी शाहू महाराजांना पत्र लिहिले यातून २६ जून ही राजर्षी शाहू महाराजांची खरी जन्मतारीख निघाली. सुमारे नव्वद वर्ष शाहू चरित्रकार अण्णासाहेब लठ्ठे यांनी दिलेली चुकीची तारीख प्रमाण मानली जात होती. दहा वर्षपूर्वी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या या दुर्मिळ पत्रामुळे दुरुस्ती करण्यात आली.

अखिल भारतीय बहिष्कृत परिषद – नागपूर :

माणगाव परिषदेनंतर ३० मे १९२० रोजी नागपुरात अखिल भारतीय बहिष्कृत परिषद भरली. या परिषदेचा विषय होता ङ्गराजकीय सुधारणा त्यानुसार अस्पृश्यांना कायदेमंडळात मिळणारे प्रतिनिधित्वफ या परिषदेमुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि राजर्षी शाहू महाराजांमध्ये संबध अधिक दृढ झाले. या परिषदेचे अध्यक्ष शाहू महाराज होते. या परिषदेला सर गंगाधर चिटणवीस, शंकराव चिटणवीस, सर बी. के. बोस, बाबुराव यादव, श्रीमंतराव शिंदे, दत्तोपंत दळवी, ग. आ. गवई इत्यादी मान्यवर उपस्थित होते. या परिषदेने ब्राम्हणेत्तर व अस्पृश्य यांच्या सहकार्यांच्या वाटचालीस सुरुवात झाली. ही एका नव्या राजकीय प्रवासाची सुरुवात होती. पुढे १६ फ्रेब्रुवारी १९२२ दिल्ली येथे तिसरी अस्पृश्य परिषदेचे अधिवेशन भरले. त्यात राजर्षी शाहू महाराजांची अस्पृश्यावियी व डॉ. बाबासाहेब आंबेडकराविषयी विशेष कळवळा दिसतो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर शाहू महाराजांना ङ्गअस्पृश्यांचा सखाफ म्हणत असत. अस्पृश्य आणि ब्राम्हणेत्तर समाजाची सर्वागीण प्रगती कशी करावी हा दोघांचा नेहमी चर्चेचा विषय असायचा.

सारांश :

छत्रपती शाहू महाराजांनी अस्पृश्य निर्मूलनाच्या चळवळीत सर्वस्वीपणे स्वतःला झोकून दिले होते. त्यांच्यावर चौफेर टिका सुदधा झाली. परंतु ते टिकेपुढे झुकले नाही. उलट अस्पृश्यतेच्या चळवळीला सर्वकष मदत करण्याची तयारी ठेवली. इतकेच नव्हे तर, कृतीशीलतेचे एक पाऊल म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या 'डीस्प्रेड क्लास इन्स्टिट्यूट' या संस्थेकरिता निधी गोळा करण्यासाठी भारतभर दौरा करण्याची योजना त्यांची होती. त्यावर राजर्षी शाहू महाराजांचा मोठेपणा, अस्पृश्याविषयी आंतरिक तळमळ इ. दिसून येतात. एका राज्याचा राजा असूनही स्वभावातील नम्रता अनुकरणीय आहे. अस्पृश्यांसाठी राजर्षी शाहू महाराजांचे कार्य अतिशय महत्वपूर्ण आहे. कोर्टामध्ये अस्पृश्य समाजातील आरोपींची बाजू मांडावी यासाठी अस्पृश्य तरुणांना वकिलीच्या सनदा महाराजांची दिल्या. या जोरावरच अस्पृश्यामधील काही लोक पुढे उत्तम वकील म्हणून प्रसिध्द झाले. अस्पृश्यांना ते 'सूर्यवंशी' असे संबोधत असत. हा सामाजिक अभियांत्रिकेचा अभिनव प्रयोग होता. राजर्षी शाहू महाराजांच्या राजकारणाची व समाजकारणाची प्रेरणा घेणे वर्तमानकाळाच्या संदर्भात आवश्यक आहे.

संदर्भग्रंथ सूची :

१) जाधव डॉ. रमेश – लोकराजा शाहू छत्रपती, सुरेश एजन्सी प्रकाशन पुणे, १९९७

२) जांभुळे डॉ. सरिता– लोकराजे राजर्षी शाहू महाराज, संकेत प्रकाशन, नागपूर २०१२

३) मोरे डॉ. गिरीष – राजर्षी शाहू विचार व कार्य, निर्मिती प्रकाशन, कोल्हापूर २००९

४) पवार जयसिंगराव – मराठी साम्राज्याचा उदय आणि अस्त, कोल्हापूर, १९८६

५) भोसले एस. एस. – राजर्षी शाहू संदर्भ आणि भूमिका, रणजीत प्रकाशन, कोल्हापूर १९८१

६) दैनिक पुढारी– मानव मुक्तीच्या लढ्याची मुहूर्तमेढ – रामदास आठवले यांचा लेख दि. २१ मार्च २०२०

७) लोकसत्ता, रविवार विशेष पुरवणी –माणगाव परिषद, 'सोशल इंजिनिअरिंग चा प्रथम प्रयोग' मार्च २०२०

■■■

ISSN No. 2394-5990

छत्रपति शाहू - लोकतंत्र के स्तंभकार

डॉ. श्वेता बा. चौधारे
हिन्दी विभागाध्यक्षा,
मुळा एज्यूकेशन सोसाइटी का कला,
वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सोनई,
नेवासा तहसील, अहमदनगर, महाराष्ट्र - 414105

बीज शब्द : बलूतदारी प्रथा,करवीर गॅझेट,दत्तक ग्रहण कानून, मांडलीक राज्य

सारांश :

भारतीय संस्कृति- समाज में सदियों से प्रचलित एक शब्द अपने आप में विशेष रहा है -राजर्षि, ऐसा व्यक्ति जो राजा और ऋषि या विद्वान भी हो। अन्य शब्दों में, राजर्षि वह ऋषि कहलाते थे,जो राजवंश या क्षत्रिय कुल के हो। महाराष्ट्र की धरती को आधुनिक युग में एक ऐसा ही राजर्षि मिला- राजर्षि छत्रपती शाहू महाराज, जो जन्म से राजा और कर्म से ऋषि समान थे। इसलिए जनता के बीच वे ङ्कराजर्षिफ इस उपाधि से विभूषित हुए। शाहू की प्रकृति- स्वभाव उन्हें ङ्कअष्टौ गुणा: पुरुषंफ बनाती है। वे भारतीय शास्त्रीय संगीत के पुरस्कर्ता, मराठी रंगभूमि के शिल्पकार, मल्लविद्या के आधार स्तम्भ और आधुनिक महाराष्ट्र निर्माण के एक निष्ठावान कार्यकर्ता बने रहे। समाज के पिछड़े - दलित वर्ग की उन्नति में देश का उज्वल भविष्य, तथा इसे ही समाजोद्धार मानकर शाहू ने शिक्षार्जन की सक्ती के माध्यम से समाज को सदियों से कर्मकांड, कुप्रथा एवं परंपरा के जड़ों से स्थापित मानसिक और सामाजिक गुलामी से मुक्त करवाने की कोशिश की। शाहू ने इस समाज को मानवीय हक्क दिलवाने की पहल की। शाहू का समय न सिर्फ महाराष्ट्र के लिए बल्कि सम्पूर्ण भारत में ही सामाजिक अशांतता का काल था। फिर भी शाहू ने अपने संयम और स्वभाव से परिवर्तन का आग्रह करते हुए भी सामाजिक स्थिरता को बनाए रखने की कोशिश की। इस बीच गरीबों के साथ समरस होने वाले, उनके हितों के बारे में सोचनेवाले शाहू के व्यक्तिगत व सामाजिक जीवन पर टीका करने की कोशिश भी हुई, किन्तु उन्होंने इसकी परवाह नहीं की। कला-संस्कृति के नवत्थान के लिए अग्रेसर शाहू सही मायने में भारत के लोकतन्त्र के स्तंभकार बने।

मूल आलेख :

महाराष्ट्र के कोल्हापुर संस्थान के छत्रपती राजश्री शाहू महाराज अपने द्वारा सांस्कृतिक, सामाजिक और राजकीय क्षेत्र में दिये गए अतुलनीय योगदान के लिए केवल महाराष्ट्र में ही नहीं, राष्ट्रीय स्तर पर जाने जाते है। तत्कालीन समाज में समता तथा प्रजातन्त्र जैसे मूल्यों का जनमन में बीजावपन करनेवाले एक सच्चे लोकतन्त्रवादी के रूप में शाहू का कार्य विशेष उल्लेखनीय रहा है। राजकुल के होकर भी उनके द्वारा किए गए जनसामान्य के कार्य सही मायने में उन्हें समाजसुधारक की उपाधि देते है।सन 1812 के ब्रिटिशों से हुए तह के कारण कोल्हापुर एक मांडलीक राज्य बना। 1862 के दत्तक ग्रहण कानून के अनुसार मात्र कोल्हापुर के राजा को वंशपरंपरा से दत्तक वारस ग्रहण करने का अधिकार प्राप्त था। जिसके चलते आबासाहेब घाटगे के जेष्ठ पुत्र यशवंतराव बाबासाहेब कोल्हापुर की गद्दी पर शाहू महाराज इस नाम से विराजमान हुए। शाहू के समय के ब्रिटिश शासनतंत्र के नियमों के चलते ब्रिटिश अधिकारियों की देखरेख में शाहू की शिक्षा पूर्ण हुई। किन्तु ब्रिटिश गुलामी के इस समय में भी भारतीय समाज उन्हीं पुरानी रूढ़ियों से चली आ रही अनेक मूलभूत समस्याओं से जूझ रहा था। खुद राजतंत्र में ब्राह्मण-गैर ब्राह्मण वर्ग जैसे मुद्दे को लेकर संघर्ष चल रहा था। समाज भी अनेक भ्रष्ट रीतियों में फंसा था। ऐसे में शाहू महाराज के लिए राजसत्ता और समाज इन दोनों के कई छुपे और प्रकट खतरों से जूझना था। अत: एक सच्चा समाजसुधारक बन कर शाहू ने सामाजिक समानता के लिए अतीव प्रयत्न किए।

शाहू के समय में ब्राह्मणवादी पारंपरिक मूल्यों की अति के कारण समाज क्षीण हो चुका था। जिस वक्त शाहू ने अपने संस्थान के सत्तासूत्र को हाथ में लिया तब महाराष्ट्र में तीन सामाजिक-राजकीय विचार प्रवाह चल रहे थे। जिनमें पहला गोपाल गणेश आगरकर और न्या. महादेव गोविंद रानडे के विचारों से प्रेरित विचारवर्ग था, दूसरे में महात्मा फुले के

सत्यशोधक समाज के कार्यकर्ता थे और तीसरे में लोकमान्य तिलक के विचारों के समर्थक थे। यह तीनों शक्तियाँ तत्कालीन समाज के उच्च वर्ग में व्याप्त कुप्रथाओं पर प्रहार कर रही थी। यदा-कदाचित अस्पृश्य तथा पिछड़ी जन-जाति के त्रास, असमानता पर होने वाली चर्चाएँ भी होती थी, किन्तु वह प्रत्यक्ष की भूमि से ऊपर ही थी। सामाजिक और धार्मिक बंधनों के कारण गैर ब्राह्मण समाज को शिक्षार्जन में जो बाधा आ रही थी, उसके परिणाम स्वरूप ब्रिटिश अमल में नौकरीयों में ब्राह्मणों का वर्चस्व सर्वसामान्य बन चुका था। राजकाज में एक ही जाति की अति के चलते न्यायदान की व्यवस्था भ्रष्ट और पक्षपाती बन चुकी थी। ऐसी स्थिति में शाहू के सामने सबसे बड़ी चुनौती प्रस्थापित लोगों की थी। अपने संस्थान के राजकाज में सुव्यवस्था लाने के साथ आर्थिक- सामाजिक समतोल को बनाए रखना जैसे काम उनके लिए शेष थे।

महाराष्ट्र में दलित और पिछड़े वर्ग में सतही स्तर पर कम करने वाली पहली संस्था महात्मा फुले की सत्यशोधक समाज थी। इन प्रवर्गों में शिक्षा का प्रचार-प्रसार का श्रेय फुले के साथ शाहूको भी जाता है। स्थानिक राजकाज और सार्वजनिक संस्थाओं में पिछड़े वर्ग को प्रतिनिधित्व दिलवाकर ही उनमें अपने अधिकारों के प्रति जागृति बढ़ाई जा सकती है। अत: इस वर्ग में शिक्षा के प्रसार के साथ ही यह सब सहज साध्य किया जा सकता है, यह विश्वास शाहू को था। अपने इस हेतु की सिद्धि में आने वाली नई समस्याओं के निराकरण के लिए ही उन्होंने पहले छात्रावास खोले। स्त्री शिक्षा को प्रोत्साहन दिया।

सातवे एडवर्ड के राज्यारोहण के समारोह में शामिल होने जून 1902 में छत्रपती शाहू महाराज इंग्लंड की यात्रा के लिए निकले। इस यात्रा के प्रयोजन स्वरूप वे पहली बार यूरोपियन दुनिया, वहाँ की सभ्यता- संस्कृति को देख रहे थे। इस नई दुनिया को देख कर उनका अपने समाज के प्रति दृष्टिकोण भी बदलने लगा। अब तक अमूर्त रूप में उनके मन में उमड़ने वाले गरीब व पिछड़े वर्ग की उन्नती के विचारों को प्रत्यक्ष आकार मिलने लगा, अपने संस्थान के पिछड़े वर्ग की प्रगति के लिए कुछ कर दिखाने का उनका निर्धार दृढ़ होने लगा। जिसके परिणाम स्वरूप 26 जुलाई 1902 को ङ्कारवीर गॅझेटफमें शाहू ने एक अद्भुत घोषणा पत्र प्रसिद्ध किया, जिसके अनुसार पिछड़े वर्ग की प्रगति को साध्य करने के लिए बनाई गई उनकी नीतियों की पूर्ति हेतु इसवर्ग के लोगों को उच्च शिक्षा लेने के लिए उद्युक्त किए जाने के लिए उन्हें सरकारी खाते में पहले से अधिक नौकरियाँ दिलवाने की मंशा उन्होंने प्रकट की। शाहू के अनुसार जब तक समाज के सभी स्तरों पर शिक्षा का सम-समान प्रचार नहीं होंगा, तब तक हम जाति-व्यवस्था में भी समानता के धरातल पर परिवर्तन नहीं कर सकते। जिसके कारण ऊपरी तौर पर किए गए सभी प्रयत्न निष्फल होंगे। पिछड़े वर्ग की उन्नति के हेतू निकाले गए शाहूके इस घोषणा पत्र से अल्पसंतुष्ट हो कुछ लोगों ने यह कह कर इस परिवर्तन के विरुद्ध चीखना-चिल्लाना शुरू किया कि शाहू मानवी गुणवत्ता से अधिक जाति को महत्वपूर्ण मानते है। बावजूद इन सबके इस बात को कोई नकार नहीं सकता कि शाहू के इस घोषणा पत्र से गैर-ब्राह्मण वर्ग को राजकाज में धीरे-धीरे ही क्यों न हो, पर बड़ा हिस्सा मिलने वाला था।

इस घोषणा पत्र की प्रसिद्धी के दिन से सरकारी खाते के रिक्त स्थानों पर 50 प्रतिशत जगह पिछड़े वर्ग के सुशिक्षित युवाओं के लिए आरक्षित रखने की इच्छा शाहू ने व्यक्त की थी। इसके साथ ही सरकारी खातों में जहां पिछड़े वर्ग के कर्मचारियों की संख्या कुल संख्या से 50 प्रतिशत से भी कम होंगी, वहाँ तुरंत पिछड़े वर्ग से युवाओं की नियुक्ति रिक्त पदों पर करने के आदेश शाहू ने दिये थे। इस गॅझेट में शाहू ङ्कपिछड़े वर्गफकी संकल्पना भी स्पष्ट करते है। जिसके अनुसार ब्राह्मण, प्रभू, शेणवी, पारसी और अन्य विकसित जन-जातियों के अतिरिक्त का समाज वे इस वर्ग के अंतर्गत समाविष्ट करते है।शाहू की यह घोषणा केवल कोल्हापूर संस्थान के लिए ही नहीं, बल्कि ब्रिटिश भारत के लिए भी एक नये युग की घोषणा थी। सदियों से समाज में अपना एकछत्र अमल, वर्चस्व बनाए रखने वाले प्रस्थापित वर्ग की सत्ता को प्रत्यक्ष शह देने के लिए और पिछड़े वर्ग को पुन: अधिकार ग्रहण के लिए यह घोषणा पत्र महत्त्वपूर्ण सिद्ध हुआ। जैसे की उम्मीद थी, इस घोषणा पत्र का ब्राह्मण समाज द्वारा विरोध हुआ। जब की इंग्लंड से वापस अपने संस्थान में आने के बाद इस घोषणा पत्र का सकारात्मक परिणाम अन्य प्रजाजनों पर भी तुरंत दिखाई दिया। शाहूमहाराज के वापस लौटने पर जहाँ ब्राह्मण वर्ग अपनी उदासीनता दर्शा रहा था, वहीं इन ब्राह्मणों की परवाह न करते हुए संस्थान की मराठी, जैन, मुस्लिम आदी प्रजा ने शाहू का काफी गर्म-जोशी से स्वागत किया। शाहू के समय में कोल्हापूर संस्थान की कुल नऊ लाख की प्रजा में गैर ब्राह्मण समाज की संख्या 97 प्रतिशत थी तो,ब्राह्मण जाति केवळ 3 प्रतिशत थी थी। ऐसे में केवल 3 प्रतिशत लोगों को कुल नौकरियों में 50 प्रतिशत की जगह शाहूने पहले जैसी ही रखी, यह उनकी नीति उनके अत्यंत उदात्त भाव की ही परिचायक थी। ऐसा होते हुए भी ङ्कंकेसरीफ जैसे तत्कालीन वृत्तपत्र ने इस घोषणा पत्र को ङ्कअन्यायकारकफकहते हुए ब्राह्मण और संस्थान के हितचिंतकों के लिए धक्कादायक माना। तो 'मराठा' जैसे साप्ताहिक ने इस घोषणा पत्र के द्वारा छत्रपती शाहू पर राजकाज में जातीयप्रश्न

ISSN No. 2394-5990

लाने की कोशिश करने का आरोप भी लगाया। पिछड़े वर्ग के हित साधने के नाम के नीचे छत्रपती शाहू सिर्फ मराठों का हित साध रहे है, ऐसे आरोप भी शाहू पर लगे। जो भी हों महाराष्ट्र का उपेक्षित तांबोळी, शिंपी, धनगर, मराठा, तेली तथा अन्य उपेक्षित और पिछड़े वर्ग को शाहू महाराज ने राजकाज में यथा योग्य हिस्सा दिया। जबकि महाराष्ट्र के कई ब्राह्मण शाहू के इस घोषणा पत्र को 'एक अपवित्र वस्तु' के रूप के धिक्कारित करते है। वास्तविकता यह थी की शाहू के इस घोषणा पत्र ने उपेक्षित और पिछड़े वर्ग को उन्नति का अवसर दिया और ब्राह्मण सत्ता को कड़ी चोट पहुंचाई।

ब्रिटिशों के द्वारा भारत में जो परिवर्तन हुए उसे शाहू सकारात्मक दृष्टि से देख रहे थे। 1905 के आसपास एक जैन छात्रावास के उद्घातन के समय शाहू ने कहा था कि ब्रिटिश रियासत के जो कुछ परिणाम हुए उनमें से एक यह भी है कि उपेक्षित और पिछड़ी जाती का उद्धार कार्य शुरू हुआ। युगों-युगों से चले आ रहे उस वर्ग के बौद्धिक और सामाजिक गुलामीके अंत का आरंभ हों गया। उस वर्ष की पब्लिक सर्विस परीक्षा में पिछड़ी जाती के परीक्षार्थीयों को मिली सफलता से शाहू महाराज को अत्यधिक प्रसन्नता हुई। शाहू अपने राज्य के उपेक्षित जन-जाती की उपेक्षितता को दूर करने की कोशिश कर रहे थे, पिछड़ी जाती का पिछड़ापन दूर कर उनके मन-मस्तिष्क में जमे सदियों पुरानी जातीयता के कीचड़ को साफ़ करने का काम कर रहे थे। वे राष्ट्रवाद की नींव को पक्का कर उसपर लोकतंत्र के भवन को खड़ा कर रहे थे। ब्राह्मणी जातिव्यवस्था और अंधश्रद्धा की शृंखला में जकड़े गए लोगों के लिए शाहू के आधुनिक और मानवतावादी मूल्य उनके कार्यों से प्रकट होते है।

शाहू ने महाराष्ट्र की धरती पर जड़ पकड़ चुकी कई पुरातन मान्यताओं प्रहार किए। जिनमें से एक रोटी - बेटी व्यवहार भी था, जिसकी नींव में जातिवादी वह सड़ी-गली मानसिकता थी, जो उच्च वर्ग की गरिमा को कायम रखने के लिए बड़े पैमाने पर समाज के बहुसंख्यांक वर्ग को दास्यत्व की बेड़ियों में जकड़कर रखने में ही अपना बड़पन मान रही थी। शाहू ने अपने अभ्यास और क्षेत्रों की भेंट में साथ ही उनके दरबार में जातीय वरिष्ठता को कायम रखने की जद्दोंजहत करते 'उस' वर्ग के अनगिनत कारनामों को सुना, देखा और स्वयं अनुभव भी किया। अत: समानता का जो सपना शाहू देख रहे थे, उसकी पूर्ति के लिए सबसे पहले निम्न समझी जाने वाली, दलित, पिछड़ी जन-जातियों में एकता का भाव पैदा करना जरूरी था। इसलिए शाहू ने जातिभेद नष्ट करने का कार्य शुरू किया। इस उद्देश्य को पूर्ण करने सबसे पहले उन्होंने मराठों और धनगर समाज में विवाह हो इसलिए इंदौर के महाराज की सहायता मांगी। इस हेतु शाहूने अपने धार्मिक सलाहकार श्री. गुंडोपंत पिशवीकर को इंदौर में अंतरजातीय विवाह के योग्य वातावरण निर्मिति हेतु और वेदोक्त पद्धती से लोगों के संस्कार हो इसलिए भेंजा। जातिभेद निर्मूलन की आवश्यकता को समाज के एकत्व के लिए महत्वपूर्ण जानकार शाहूने हिन्दू और जैन समाज में होने वाले विवाह को पहले ही सम्मति प्रदान की थी। शाहू के विचारों और कार्यों का सकारात्मक परिणाम महाराष्ट्र के सामाजिक आंदोलनों पर पड़ने लगा। जिसकी प्रशंसा में श्री. खासेराव जाधव शाहू को लिखे एक पत्र में कहते है कि शाहू नाजुक और जटिल प्रश्नों को सुलझाने में चतुर है।

भारत में जब 1916-18 के बीच स्वशासन की मांग करता होमरूल आंदोलन चला, जिसकी बांगडोर बाल गंगाधर तिलक ने सँभली थी, तब शाहू इस आंदोलन के विरुद्ध खड़े थे। अपने गृहविभाग के सचिव श्री. कैडेल को वे होमरूलवादियों पर दया न करने के लिए कहते है। शाहू के इस विरोध का कारण उनके द्वारा श्री. कैडेल और श्री. सिड़नहैम को लिखे गए पत्रों में मिलता है। शाहू के अनुसार होमरुलवादीयों को न तो जनता के प्रति सहानुभूति है, न उन्हें जनता से कोई लेना-देना है। अपने गुरु समान श्री. सिड़नहैम को व्यक्तिगत रूप से वे लिखते है कि दलित-पिछड़ी जन-जतियों को उनकी वर्तमान अवनति और धार्मिक, सामाजिक निर्बंधों का ज्ञान हो रहा है। ऐसे में अगर सत्ता ब्राह्मणों के हाथ आ गई तो फिर एक बार ब्राह्मणी शासनतंत्र शुरू हो जाएंगा। ऐसी स्थिती को भापकर ही शाहू ने इस आंदोलन का विरोध किया था। शाहू को तब बार-बार इस बात की कमी खल रही थी कि भारत के पिछड़े - दमित वर्ग को न्याय दिलानेवाला, उनका अपना कोई सशक्त नेतृत्व नहीं है।

शाहू की नीति थी के वे पहले करके दिखाते थे, फिर कहते थे। इसी नीति से दुनिया में परिवर्तन लाये जा सकते है, इसपर उनका दृढ़ विश्वास था। अछूतों को हजारों सालों से चली आ रही गुलामी से छुड़वाने की कोशिश करते हुए उन्होंने जुलाई 1918 में अछूत मानी गई समाज की एक बड़ी आबादी की गुलामी की जंजीरों को तोड़ा। इनमें से जो जातियाँ पेशेवर गुन्हेगार मानी जाती थी और उस जाती के प्रत्येक व्यक्ति को हर रोज पोलिस चौकी जाकर हाजरी लगानी पड़ती थी,शाहू ने यह प्रथा बंद कर महार, मांग, रामोशी, बेरड जैसी कई जन-जातियों को इस अपमानित प्रथा से से मुक्त कर उन्हें सामान्य जनता की तरह जीने के हक्क दिये। इसी को व्यावहारिक रूप देते हुए अगस्त 1918 में उन्होंने यह आदेश भी निकाला की तलाठी पद के चुनाव के लिए सर्वप्रथम अछूत उम्मीदवारों को

प्रधानता दी जाए। सितंबर 1918 के अन्य एक आदेश से शाहू ने महारों की वतनी ज़मीनें उनके नाम पर कर महाराष्ट्र में चली आ रही 'वतनदारी या बलूतदारी' प्रथा को नष्ट किया।

शाहू को शिक्षा का मूल्य मालूम था, इसलिए सामाजिक एकत्व में शिक्षा का महत्व जानकार उन्हों ने जात, वर्ग, पंथ, लिंग आदि का भेद स्वीकार न करते हुए सभी के लिए शिक्षा अनिवार्य की। उन्होंने स्वयं समाज के सभी स्तरों का अपने शिक्षा संस्थान में स्वागत किया । समाज के हर तबके को शिक्षा संबंधी सहुलतें मिले इसलिए शाहू ने अलग-अलग जाती- धर्म के लिए स्वतंत्र छात्र- अधिवास खोलें। इसी में एक और कदम आगे बढ़ते हुए गरीब और पिछड़े वर्ग के होनहार छात्रों के लिए विद्यावेतन देना शुरू किया। भारत का प्रथम व्यक्ति सक्षम और स्व:समर्थ हो अपने पैरों पर खड़ा होने के लिए शिक्षा का प्रसार करने को अग्रक्रम देना अपरिहार्य होंगा यह शाहू की सोच थी। इसलिए उन्होंने ब्रिटिश सरकार को धन्यवाद भी दिया था। साथ ही 'सर्वांगीण शिक्षा' जैसी संकल्पना सामने रखी। शाहू ने समाज के सभी स्तरों के लिए समानता को प्रधानता दी। शाहू जिस सामाजिक आंदोलन के प्रतिनिधि बने वह समाजविभाजन करनेवाला आंदोलन नहीं था, बल्कि समाज सुधारों को महत्व देनेवाला आंदोलन था, जिसका प्रमुख लक्ष्य सामाजिक उन्नति था। अस्पृश्य और दलित - पिछड़े वर्ग को स्वतंत्र निर्वाचन क्षेत्र मिले, इस मांग की पूर्ति के लिए इंग्लंड में प्रचार करने के लिए शाहूने 3 हजार रुपये की हुंडी दी थी।

जातिव्यवस्था, जातिभेद और अस्पृश्यता नष्ट करने के छत्रपती शाहू के प्रयास तत्कालीन समाज, ब्रिटिश नीतियाँ और राजनैतिक स्थिति को देखते हुए अतुलनीय थे। समाज के सभी घटकों को समान प्रतिनिधित्व तथा उन्नति के समान अवसर मिले इस हेतु सरकारी नौकरीयों के लिए आरक्षण प्रणाली,उस भारतीय पिछड़े वर्ग के उत्थान के लिए ऐतिहासिक निर्णय था, जिसका अभाव आज आज़ादी के 75 सालों के बाद भी दिखाई देता है। लोकतन्त्र में सर्वहारा वर्ग के लिए शाहूजैसा या यूँ कहे तो उनके इतना ही शिद्दत से निर्णय लेना वाला जनप्रतिनिधी दूर-दूर तक दिखाई नहीं देता। अपने संस्थान के महाराज होने की ज़िम्मेदारी का वहन करते हुए उन्होंने शाही हुकुम द्वारा अपने प्रजाजनों को समाज के हर व्यक्ति के साथ सन्मानपूर्वक व्यवहार और मानवीय मूल्यों की रक्षा करने का आदेश दिया। अछूतों के लिए संस्थान के सार्वजनिक रस्ते, गलियाँ, कुएं और तालाब के इस्तेमाल का समान हक्क दिया। शाहू ने 27 जुलाई 1918 को शाही आदेश द्वारा घोषणा कि, की उनके राज्य के अस्पृश्य बिना किसी बाधा के सभी नागरी हक्क का उपभोग कर सकेंगे। अपने संस्थान में स्त्री सबलीकरण के लिए शाहू ने लड़कियों के लिए विद्यालय खोलें। सदियों से चली आ रही देवदासी प्रथा के विरोध में खड़े होकर भगवान को कन्या अर्पण करने की प्रथा, जिसमें कालांतर से मंदिर या ईश्वर केनाम पर वहाँ की लड़कियों का दैहिक शोषण किया जाता था, निडर होकर शाहू ने ऐसी अघोरी प्रथा पर रोंक लगाई; विधवा पुनर्विवाह को सम्मति दी और बालविवाह रोखने के लिए प्रयास किए।

शाहू के अप्रतिम कार्यों के गौरव के कारण वे न सिर्फ कोल्हापूर संस्थान के, बल्कि सम्पूर्ण भारत के ऐसे पहले महाराज बने जिन्हें इतिहास आज भी अनमोल रत्न मानता है । शाहू के पूर्व हो चुके महान समाजसुधारक ज्योतिबा फुले के सामाजिक योगदान का भी शाहू पर अधिक प्रभाव पड़ा। उन्होंने फुले के सामाजिक मूल्यों का अनुकरण करने का प्रयत्न किया। फिर भी फुले के कार्यों से पूर्ण अलग अस्तित्व बनाकर शाहू आधुनिक युग के अनुरूप पुरोगामी बनने के लिए तयार हो रहे महाराष्ट्र के आदर्श और सक्षम सम्राट के रूप में उभरे। शाहू के पुरोगामी विचारों ने सामाजिक संरचना में परिवर्तनों के लिए जो किया, वह आनेवाले समय में भी समाज के लिए पथदर्शी सिद्ध हुआ। राजर्षी शाहू महाराज ने सामाजिकदृष्टि से असहाय जनता की उन्नती के लिए अपना सम्पूर्ण जीवन समर्पित किया। शाहू के इन अथक प्रयासों का मूल हेतू यही था कि समाज के सभी नागरिकों को मानवता के आधार पर सभी हक्क मिलें। शाहू महाराज के इन्हीं क्रांतिकारी तत्त्वज्ञान का समाज के मानसपटल पर काफी अधिक प्रभाव रहा और आने वाले समय में भी शाहू अपनी इसी उदारमतवादी भूमिका के लिए सदियों तक इस भूमि के लिए वंदनीय रहेंगे।

संदर्भ सूची :

1. धनंजय कीर - राजर्षी शाहूमहाराज - पॉप्युलर प्रकाशन - 1992
2. तु.बा. नाईक - छत्रपती राजर्षी शाहूमहाराज-मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे - 1974
3. डॉ. आलटे आर. एन.-सामाजिक न्यायाचे पुरस्कर्ते राजर्षी शाहूमहाराज- लूलू पब्लिकेशन -2022
4. डॉ. जयसिंगराव पवार- समाज क्रांतिकारक राजर्षी शाहूछत्रपती - मेहता पब्लिशिंग हाउस - 2021
5. ग्रेट इंडियन सोशल रिफॉर्मर हिंन्दी- मनोज डोळे

■■■

ISSN No. 2394-5990

राजश्री शाहू महाराज परिवर्तन का आरंभ

प्रा. शहेनाज अ.रफीक देशमुख
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सोनई
Email- anisadeshmukh5@gmail.com
Contact number-9373723060

प्रस्तावना :

भारत के गौरव शाली इतिहास में महाराष्ट्र के कोल्हापुर रियासत में 26 जून 1874 को बहुजन-श्रमण परंपरा में ऐसे राजा हुए हैं, जिनका राज्य सचमुच में न्याय और जनता के कल्याण की स्थापना के लिए था और जिन्होंने वर्ण-जाति व्यवस्था एवं इस पर आधारित भेदभाव को मिटाने के लिए अपना जीवन लगा दिया। ऐसे ही महान राजा छत्रपती शाहू महाराज थे। वे एक ऐसे राजा हुए जिन्होंने ज्योतीराव फुले के सत्यशोधक समाज के विचारों को प्रत्यक्ष में साकार कर दिया। शाहु महाराज ने 2 जुलाई 1894 में कोल्हापुर रियासत की राजगद्दी संभाली । रियासत में समानता और न्याय लाने का प्रयास आरंभ किया । छत्रपती शाहु महाराज राजा होते हुए उनके विचार राजतांत्रिक विरोधी और लोकतांत्रिक थे । जब तक जाति का विनाश नहीं होंगा तब तक न्याय और समता स्थापित नहीं होंगी । वे विचारो से ही नहीं बल्कि नीतियों से, कानून लागु करने से भी आधुनिक थे । राजा बनते ही उन्होंने राज्य और समाज पर ब्राह्मणों के वर्चस्व को खत्म करने की शुरूआत कर दी।महाराष्ट्र में छत्रपती शाहु महाराज का कार्य अतुलनीय है। उन्हें सम्पूर्ण महाराष्ट्र सदैव याद रखेगा । महाराष्ट्र की सामाजिक स्थिति उच्च स्तर पर ले जाने में उन्होनें महत्वपूर्ण भूमिका निभाई है ।

भारतीय आरक्षण के जनक :

छत्रपती शाहु महाराज ने 26 जुलाई 1902 को भारतीय इतिहास में वह काम कर दिखाया, जिसकी किसी ने कल्पना भी नहीं की थी। शाहू महाराज ने चितपावन ब्राह्मणों के प्रबल विरोध के मध्य 26 जुलाई को अपने राज्य कोल्हापुर की शिक्षा तथा सरकारी नौकरियों में दलित-पिछड़ों के लिए 50 प्रतिशत आरक्षण लागू किया। यह आधुनिक भारत में जाति के आधार पर मिला पहला आरक्षण था। इस कारण शाहू आधुनिक आरक्षण के जनक कहलाये। परवर्तीकाल में डॉ. बाबासाहेब आंबेडकर ने शाहू जी द्वारा लागू किये गए आरक्षण का ही विस्तार भारतीय संविधान में किया। संविधान में दलितों के लिए आरक्षण तो लागू हो गया, लेकिन ओबीसी जातियों के लिए आरक्षण भविष्य पर छोड़ दिया गया। जब कि शाहू जी ने अपने राज्य में आर्थिक पिछड़ों और दलितों दोनों के लिए आरक्षण लागू किया था। भारत में पिछडे या ओबीसी जातियों को आरक्षण आजादी के करीब 45 वर्षों बाद 16 नवंबर 1992 को मिला। यानी शाहू जी द्वारा आरक्षण लागू करने के 90 वर्ष बाद।

1894 में जब शाहू जी महाराज राजा बने थे, उस समय कोल्हापुर राज्य के अधिकांश पदों पर चितपावन ब्राह्मणों का कब्जा था। जब शाहू महाराज ने राज्य की बागडोर संभाली थी, उस समय कोल्हापुर के सामान्य प्रशासन में कुल 71 पदों में से 60 पर ब्राह्मण अधिकारी नियुक्त थे। इसी प्रकार लिपिक के 500 पदों में से मात्र 10 पर गैर-ब्राह्मण थे।शाहु महाराज ने देखा की जिनकी आबादी इतनी कम है वही लोग अधिकतर पदों पर अपना कब्जा जमाए बैठे है । 26 जुलाई 1902 को शाहू जी महाराज द्वारा पिछड़ी जातियों को 50 प्रतिशत आरक्षण उपलब्ध कराने के कारण 95 पदों में से ब्राह्मण अधिकारियों की संख्या अब 35 रह गई थी। तत्कालीन समाज में इस प्रकार का कानून लाना अपने आप में चुनौती था। यही कार्य शाहु महाराज ने किया जिस कारण उन्हे काफी विरोध सहना पड़ा ।

समग्र शिक्षा के प्रणेता :

समाज में न्याय और समता स्थापित करनी है तो इसका एकमेव हथियार शिक्षा है । शिक्षा के बिना दलित और पिछड़ी जाती का विकास नही होंगा । इसी सोच को अपनाते हुए उन्होने 'शिक्षा सुधार समिती' का गठन किया । शिक्षा के संबंध में न्या. महादेव गोविंद रानडे, गोपाल कृष्ण गोखले, डॉ. रामकृष्ण गोपाल भांडारकर आदि का परामर्श लिया। इन सभी विचारों को प्रत्यक्ष में लाते हुए 25 जुलाई 1917 को प्राथमिक शिक्षा को अनिवार्य और निःशुल्क बना दिया। इसके पहले 1912 में ही उन्होंने प्राथमिक शिक्षा को अनिवार्य कर दिया

था। अगर कोई छात्र घर पर रहता है तो उससे दंड लिया जाता था । परिणाम स्वरूप छात्रों की संख्या बढने लगी । 500 से 1000 तक की जनसंख्या वाले प्रत्येक गांव, कस्बे में स्कूल देने का आदेश छत्रपती शाहु महाराज ने निकाला । स्त्री-शिक्षा के फुले दंपत्ति के सपने को पूरा करने के लिए उन्होंने लड़कियों की शिक्षा पर विशेष जोर दिया। स्त्रियों को मुफ्त शिक्षा देने वाले वह पहले राजा थे ।इसी का परिणाम कह सकते है कि भारत को आनंदीबाई जोशी जैसी पहली महिला डॉक्टर मिली।

पाटिल स्कूलों का निर्माण :

स्वराज्य के अधिकरत गाँव के प्रशासन में पाटिल और कुलकर्णी अपनी मुख्य भूमिका निभाते थे । जिसमे कुलकर्णी पढे-लिखे थे । वही सभी पाटिल पढे-लिखे नही थे । पाटिल गाँव के तलाठी के साथ मिलकर गाँव के लोगे की समस्या परभारतीय हिंदू संस्कृति में और महाराष्ट्र के धार्मिक, राजनीतिक, आर्थिक और सामाजिक जीवन पर ब्राह्मणों का वर्चस्व और नियंत्रण कायम हो गया था। इस वर्चस्व और नियंत्रण को तोड़ने के लिए 50 प्रतिशत आरक्षण, नि:शुल्क और अनिवार्य प्राथमिक शिक्षा के साथ ही शाहू महाराज ने धार्मिक प्रभुत्व को भी तोड़ने का निर्णय लिया। 9 जुलाई 1917 को उन्होंने एक आदेश जारी किया कि कोल्हापुर राज्य के समस्त देवस्थानों की आय और संपत्ति पर राज्य का नियंत्रण होगा। इसके साथ ही उन्होंने मराठा (पिछड़ी) जाति के पुजारियों की नियुक्ति का भी आदेश जारी किया। 1920 में उन्होंने पूजा और पुरोहितों के प्रशिक्षण के लिए विद्यालय खुलवाया। इसका परिणाम यह हुआ की उन्हें यहां पर विरोध का सामना करना पड़ा।

स्त्रियों को संपत्ति में अधिकार :

11 नवंबर 1920 को ही शाहू महाराज ने एक हिंदू कोड बिल पास किया था । इस बिल के माध्यम से उन्होंने संपत्ति के उत्तराधिकार के संदर्भ में मिताक्षरा न्याय सिद्धांत को समाप्त कर दिया। मिताक्षरा याज्ञवल्क्य स्मृति पर विज्ञानेश्वर की टीका है। इसकी मूल बात यह है कि स्त्री को संपत्ति में उत्तराधिकार नहीं मिल सकता संपत्ति के संदर्भ में स्त्री पर तरह-तरह की शर्तें और प्रतिबंध लगाये गये हैं। उन्होंने इन सभी का विरोध करके स्त्रियाँ को संपत्ति में अधिकार दिलवाया । डॉ. बाबासाहेब आंबेडकर ने इसी कोड बिल की पृष्ठभूमि पर अपना कोड बिल बनाया था।

अस्पृश्यता निवारण का प्रयास :

छत्रपती शाहू महाराज ने अस्पृश्यता निवारण का ना सिर्फ विचार किया बल्कि उसे वास्तव में लाने के लिए प्रयास भी किया । इसका स्वयं से प्रयास किया। उन्होने अपने दरबार में विभिन्न जाती समुदाय के लोगों को नियुक्त किया था । उसी में एक था नारायण कांबले । नारायण कांबले ने एक दिन महल के तालाब से पानी पी लिया इसलिए उसे महल के अधिकारी ने पिटा और अपमानित करते हुए उसे निकाल दिया जब शाहू महाराज को इस घटना की खबर खबर चली तब स्वयं उन्होने उसे पैसे देकर गाँव के चौराहे पर चाय की दुकान डालने का परामर्श दिया । कांबले ने चाय की दुकान डालने के बाद स्वयं उसके दुकान में चाय पीने गए। वहां चाय की चुसकी लेते हुए कांबले से कहा तुम्हने अपने दुकान पर नाम क्यो नहीं डाला।ङ्घ कांबले ने जवाब में कहा की नाम के पास क्या रखा है। शाहू महाराज कहते है 'लगता है की तू सम्पूर्ण शहर का धर्म भ्रष्ट करके ही मानोगे।' यह घटना भले ही आज सामान्य लगती हो लेकिन तत्कालीन समाज में अछूत के दुकान पर चाय जाकर पीना अपने आप में बड़ी बात थी। अछूतों (दलितों) को समाज में बराबरी का हक दिलाने और उनकी स्थिति में सुधार के लिए शाहू जी ने अन्य विशेष कदम भी उठाये। 1919 से पहले अछूत कहे जाने वाले समाज के किसी भी सदस्य का इलाज किसी अस्पताल में नहीं हो सकता था। 1919 में शाहू जी ने एक आदेश जारी किया, जिसके अनुसार अछूत समाज का कोई भी व्यक्ति अस्पताल आकर सम्मानपूर्वक इलाज करा सकता है। इसके अलावा उन्होंने 1919 में ही यह आदेश भी जारी किया कि प्राइमरी स्कूल, हाई स्कूल और कॉलेजों में जाति के आधार पर छात्रों के साथ कोई भी भेदभाव न किया जाय। उन्होंने दलितों को नौकरियों में जगह देने के साथ ही इस बात का आदेश दिया कि सरकारी विभागों में कार्य कर रहे दलित जाति के कर्मचारियों के साथ समानता और शालीनता का बर्ताव किया जाय। किसी प्रकार का छुआछूत नहीं होना चाहिए। जो अधिकारी इस आदेश का पालन न करने के इच्छुक हों, वे 6 महीने के भीतर त्यागपत्र दे दें। शिवाजी महाराज की गुलामगिरी के खिलाफ स्वतंत्रता की लढाई थी वही शाहू महाराज की जातिवादी शक्ती के खिलाफ लढाई थी। शाहू महाराज कहते है की ब्राहमनोत्तरों की ये लढाई प्राण जाने तक ये शाहू नहीं छोड़ेंगा ।'[1]

दलितों की दशा में बदलाव लाने के लिए उन्होंने दो ऐसी विशेष प्रथाओं का अंत किया जो युगांतकारी साबित हुईं। पहला, 1917 में उन्होंने उस 'बलूतदारी-प्रथा' का अंत किया, जिसके तहत एक अछूत को थोड़ी-सी जमीन देकर बदले में उससे और उसके परिवार वालों से पूरे गाँव के लिए मुफ्त सेवाएं ली जाती थीं। इसी तरह 1918 में उन्होंने कानून बनाकर राज्य की एक और पुरानी प्रथा 'वतनदारी' का अंत किया तथा भूमि सुधार लागू कर महारों को भू-स्वामी बनने का हक़

ISSN No. 2394-5990

दिलाया। इस आदेश से महारों की आर्थिक गुलामी काफी हद तक दूर हो गई। दलित हितैषी कोल्हापुर नरेश ने 1920 में नासिक में दलितों की विशाल सभा में सगर्व घोषणा करते हुए कहा था–'मुझे लगता है आंबेडकर के रूप में तुम्हें तुम्हारा मुक्तिदाता मिल गया है। मुझे उम्मीद है वो तुम्हारी गुलामी की बेड़ियाँ काट डालेंगे।'[2] उन्होंने दलितों के मुक्तिदाता की महज जुबानी प्रशंसा नहीं की बल्कि उनकी अधूरी पड़ी विदेशी शिक्षा पूरी करने तथा दलित–मुक्ति के लिए राजनीति को हथियार बनाने में सर्वाधिक महत्वपूर्ण योगदान किया। 4 सितम्बर 1921 को डॉ बाबासाहेब आंबेडकर ने एक पत्र के द्वारा शाहू महाराज से कुछ पैसों की माँग की और कहा की नोकरी लगने के पश्चात वह पुरे पैसे लोटा देंगे । इसका जवाब देते हुए शाहू महाराज ने कहा कि अगर आपके पत्नी को भी पैसे की आवशकता हो तो वह भी बेझीझक पैसे मांगे । समय पड़ने पर उन्होनें डॉ. आंबेडकर की सहायता की है ।

सारांश रूप में हम कह सकते है कि छत्रपती शाहु महाराज राजा होते हुए भी समाज के लिए उन्होनें जो कार्य किया था वह सभी दृष्टी से आधुनिक था । उन्होनें आजीवन समाज के जाति–पाती के बंधन को दूर करने का प्रयास किया है। समाज में परिवर्तन लाना है तो उसकी पहल किसी को करनी चाहिए। लेकिन शाहु महाराज परिवर्तन का आरंभ स्वयं से करते थे। छत्रपती शाहु महाराज के विचार इतने आधुनिक थे की स्वतंत्र भारत होने के पश्चात उनके द्वारा बनाए गए कानून लागू किए गए । इसलिए डॉ. बाबासाहेब आंबेडकर ने शाहु महाराज को 'सामाजिक प्रजातंत्र का आधारस्तंभ' कहा है ।'[3]

संदर्भ ग्रंथ सूची :

1. लोकराज्य मासिक पत्रिका –अंक 3, सितंबर 2018, पृष्ठ क्र. 11
2. वही, पृष्ठ क्र. 15
3. वही, पृष्ठ क्र. 12
4. महाराष्ट्रातील समाज सुधारनेचा इतिहास – भिडे, पाटिल, थोरात, फड़के प्रकाशन,ऑक्टोंबर 2005
5. महाराष्ट्रातील परिवर्तनचा इतिहास इ. स. 1818 ते 1960– प्रा. गणेश राऊत, प्रा. ज्योती राऊत– डायमंड पब्लिकेशन, डिसेंबर 2009

■■■

Pioneers of Human Rights and Social Justice: Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj

Dr. Nandkishor Nanasaheb Ugale
Assistant Professor & Head, Department of Political Science
Pune District Education Association's
Annasaheb Waghire Science, Arts & Commerce College, Otur,
Tal-Junnar, Dist-Pune 412409

Abstract :

Human rights and social justice are the fundamental concepts of overall human development. Chhatrapati Rajarshi Shahu Maharaj's work in the field of human rights and social justice is remarkable. Shahu Maharaj dedicated his entire life to create a society based on equality. Bahujan society will not be saved unless it is educated. Shahu Maharaj realized that one of the important reasons for their backwardness was their lack of education and decided to spread education in the Bahujan society. He started educational facilities like college, boarding, scholarship etc. In today's situation, rulers are closing schools, colleges, scholarships, it is very dangerous in terms of social interest and national interest. Untouchable society did not progress as the caste system was greatly increased and work was assigned to each according to caste. But today we and our rulers have set aside the ideal Shahu Maharaj. Those who take his name and say that we are also his do not act according to his thinking. On the contrary, they are seen abusing their power. Human values are trampled underfoot.

Keywords*-Society, Bahujan, Education, Justice, Rights, Human.*

Introduction :

Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj was born on 26 June 1874 in the Ghadge family of Kagal in Kolhapur district. His father Jaisingrao Abasaheb Ghadge was Jahagirdar of Kagal. Shahu Maharaj's original name was Yashwantrao. Shahu Maharaj was adopted by Queen Anandibai of Kolhapur Raja Shivaji IV on 18 March 1984 when he was ten years old. Later he became Chhatrapati Shahu Maharaj of Kolhapur State. Except for Chhatrapati Shivaji Maharaj, many kings have a history of injustice, oppression and tyranny. It is of totalitarianism, dictatorship. But Shahu Maharaj is an exception to this. This king was an advocate of democracy and social equality. "I will leave power, but I will not leave the task of saving the Bahujan society" from his statement that his awareness about the society can be seen. A.D. In 1885, Shahu Maharaj went to Rajkot for education, where he studied for four years. After that he went to Dharwad for education after returning to Kolhapur. There Under the guidance of Sir S. M. Kreizer, he studied subjects like governance, history, English language etc. While studying at Dharwad, Shahu Maharaj got married to Lakshmibai on April 1891. After completing his education, at the age of twenty, Shahu Maharaj took over the administration of Kolhapur State.

Rational of Study :

Many years before independence Shahu Maharaj implemented the principles of equality, fraternity, secularism, equal opportunity for development to all elements in the Karveer Sansthan. That is why he is praised as 'Maharaj of Maharaj' throughout the country. Shahu did the work of getting the rights and justice to the riots, subjects and the marginalized community.

ISSN No. 2394-5990

Throughout his life work, he fully used his authority to get the justice and rights of the Bahujan community in the society that is why he became a public welfare ruler. His work has been praised by contemporary writers and historians. He ruled for about 28 years. He was passionate about the education of the Bahujans. So he enacted the law of compulsory free education in Kolhapur state. Schools were also established in villages of 500 to 1000 populations. Rupees 1 per month to parents who will not send their children to school. Legal provision for levy of penalty is made. He made primary education compulsory and free. Shahu Maharaj decided to make the untouchables self-reliant with the aim of improving the economic condition of the untouchables. For this, the untouchables were encouraged to do independent business, encouraged to open shops and hotels, and also provided financial assistance. Untouchables were encouraged to do independent business by giving them sewing machines. He started sewing the palace clothes from them. Shahu Maharaj commissioned Gangadhar Kamble, a person from the Mahar caste, to start a tea shop in Kolhapur. In order for the untouchables to gain respect in the society, he gave titles like Pailwan to Mahar Pailwan, Sardar to Chambar and Pandit to Abhang. Untouchables, educated youths were appointed as talathi. At that time, in the name of religion, the strange practice of giving children to gods was going on in India. But Shahu Maharaj stopped this practice by passing the Jogtya-Murali Prohibition Act in his state. In order to eradicate caste discrimination, inter-caste and inter-religious marriages were legally recognized in our institution. He passed such a law and while actually implementing it, he got his younger sister married to Yashwantrao Holkar of Dhangar community. Not only were this, nearly 100 Maratha-Dhangar marriages arranged in the Sansthan. Through many such activities, he gave respect and status to women.

Objective of the Study :

- To review the social activities of Shahu Maharanja.
- To analyze the contribution of Shahu Maharaj as an ideal king.
- To review the educational work of Shahu Maharanja.

Hypothesis of the study :

- Shahu Maharaj realized that Bahujan society will not be saved unless it is educated.
- Shahu Maharaj did the work of getting the rights and justice to the backward people.
- Shahu Maharaj decided to make the untouchables self-reliant.

Methodology :

For this research paper, research tools have been used to observe the happenings around the Chatrapati Shahu Maharaja's great contribution for the society, news in the media, news in newspapers, reviews of various scholars. This research is basically based on secondary sources for which observational and descriptive research methods have been adopted.

Analysis of the Study :

Bahujan society will not be saved unless it is educated. Shahu Maharaj realized that one of the important reasons for their backwardness was their lack of education and decided to spread education in the Bahujan society. A.D. In 1901, he established Victoria Maratha Boarding for Maratha students. He established a hostel for students of different castes and religions in Kolhapur. In 1902, Shahu Maharaj took a revolutionary decision to reserve 50% seats for backward classes in government jobs in his state. In 1906, Shahu Maharaj founded Shahu Chhatrapati Spinning and Weaving Mill. In 1907 he set up a textile mill on cooperative basis. Shahu Maharaj opened a hostel named 'Miss Clark Boarding' in Kolhapur to facilitate the

education of untouchable students. He planned to supply water to the land by damming the river Bhogavati near Dajipur, about 55 km west of Kolhapur. After implementing this plan, the dam was named as 'Maharani Lakshmibai Lake'.

At the inspiration of Shahu Maharaj, Satya Shodhak Samaj was re-established in Kolhapur. In 1913, according to the order of Shahu Maharaj, schools were started in the villages through Chavadis, Dharamshalas and temples. He established the Deccan Rayat Sanstha at Nipani to bring political rights to the Bahujan community. In 1917, Shahu Maharaj announced the waiver of primary school fees. According to the proclamation issued on 21 November 1917, primary education was made compulsory in Kolhapur State. He legalized widow marriage by enacting the Remarriage Act. Rajarshi Shahu abolished the Mahar watans in his kingdom and gave the lands in the name of untouchables on a rayatwari basis. He banned the untouchables from doing work in a corrupt manner. In 1918, Shahu Maharaj passed a law allowing inter-caste marriages in his kingdom and he himself performed some such marriages. Shahu Maharaj abolished the Kulkarni watans in the village to free the farmers from the oppression of the watandars and arranged for the appointment of paid talathis in their place. Shahu Maharaj consciously paid attention to prevent untouchability in his state. He ordered that untouchables should be treated equally in schools, hospitals, public wells etc.

In 1919, he enacted a law to abolish the Balutedar system, punishing those who did not comply with the law with a fine of one hundred rupees and imprisonment for four days. In 1920, he held a conference of untouchables at Mangaon in Kolhapur state. In 1920 he enacted the Divorce Act. A non-Brahmin social council was held at Hubli presided over by Shahu Maharaj. The foundation of Kolhapur to Miraj railway line was laid by Shahu Maharaj. During the period 1890 to 1894, Shahu Maharaj Studied English language, world history and governance lessons under the guidance of Fraser. On April 1, 1891, Shahu Maharaj got married to Lakshmibai, daughter of Gunaji Khanwilkar of Baroda.

In November 1899, an incident that changed Shahu Maharaj's life took place when Shahu Maharaj went for a bath by the river Panchganga when his priest Narayan Bhatji was chanting Puranokta mantras instead of Vedokta mantras. When Maharaj asked about this, he said that since Maharaj was not a Kshatriya, he had no right to Vedokta Mantra. This is where the real non-Brahmin struggle movement began. Shahu Maharaj closed the vatan of Appasaheb Upadhyay and chanted mantras from Narayan Bhatta Sahakari in Vedic manner. On April 16, 1902, the Vedokta Committee appointed by the British Government in connection with the Vedokta case ruled in favor of Shahu Maharaj and ruled that Shahu had the right to the Vedokta mantra. Rajarshi Shahu Maharaj was the ex-officio president of the Deccan Education Society. After the Vedokta affair, Shahu Maharaj resigned from the post of president. In 1901, Shahu Maharaj enacted the Prevention of Cow Slaughter Act in Kolhapur State. Shahu Maharaj went to England for the coronation ceremony of Edward VII of England during this event Cambridge University awarded Shahu Maharaj L. L. D. Awarded this title. Shahu Maharaj announced the Irrigation Policy. Shahu Maharaj reserved 50% seats for backward class people in Kolhapur state. This manifesto about reservation was published in Karveer Gadget. Shahu Maharaj came to power in 1894 at the age of twenty. As soon as the sources of power came into his hands, he first inspected the suffering of the subjects of Kolhapur state. The society in the Sansthan was uneducated, backward and divided by caste lines. For hundreds of years untouchable society, Bahujan society was deprived of many things like knowledge, power, wealth, education.

ISSN No. 2394-5990

Due to the caste system, it was backward in social, religious and economic fields. Untouchables, poor, peasants, laborers were being exploited on a large scale. The general public was mired in dire poverty, ignorance, superstition and stereotypes. In the field of education, the proportion of Bahujan community was minimal. Water, roads, agriculture, trade, arts were underdeveloped. Shahu Maharaj used his power to serve these troubled people. This is to be noted by the selfish rulers of today. During the reign of Shahu Maharaj, Bahujan society was deprived of education. He gave importance to education and opened a boarding house named 'Miss Clarks Boarding' in 1907 as there would be no improvement without education. He made primary education compulsory and free in 1916 in order to spread education. He started educational facilities like college, boarding, scholarship etc. In today's situation, today's rulers are closing schools, colleges, scholarships, it is very dangerous in terms of social interest and national interest. Untouchable society did not progress as the caste system was greatly increased and work was assigned to each according to caste. There was no education, a lower caste man could not move to a higher caste. Shahu Maharaj took a revolutionary decision to reserve 50 percent jobs for untouchables in order to make progress of the untouchables, remove their poverty and gain them dignity and raise their standard of living. Shahu Maharaj had great respect and pride for Dr. Babasaheb Ambedkar. So he himself went to meet Dr. Babasaheb Ambedkar at his home in Mumbai. He felicitated Babasaheb. By supporting him financially to publish a newspaper and for other education, he introduced him to the untouchables and other brothers in the Mangaon Parishad and said that Dr. Babasaheb Ambedkar will be the one to save the untouchables after me. Shahu Maharaj was famous as such a big hearted king. Shahu Maharaj worked for the advancement of women and to eradicate casteism. In the year 1818, he passed a law allowing inter-caste marriage in his state. In his own house, he arranged a marriage relationship with the Dhangar family and implemented the law. He himself arranged some marriages to destroy caste. He approved of widow marriage. He passed the Divorce Act. Shahu Maharaj is mentioned as the true supporter of women. It is necessary to open the eyes of today's rulers about the injustice and oppression of women in the country today. Rajarshi Shahu Maharaj was also very interested in trade, art, theater music. He took an eagle leap in the business sector and increased the yarn mills and textile mills. Radhanagari Dam came into existence during his time. Rajarshi Shahu Maharaj was a king who worked for the common people as he built dams for agriculture and farmers.

Findings :

Many tribes who were victims of the caste system in that time were following wrong ways like thieves and robberies. The orthodox caste system marginalized them and denied them the right to education, power and wealth, making their lives miserable. As a result of that, they followed the path of thieves and robberies. Therefore, the British government branded this tribe as criminals. He had to attend the village worker every day. Shahu Maharaj had mercy on these people. Because they were truly kings of the underprivileged. So they stopped the attendance system. The people of these castes and tribes were united and discouraged from crime. They were given jobs in the institute. Guards, charioteers were created from them. Houses were built for them. Accommodation was provided for people who wandered in wildfires. Food was provided. Therefore, people who were branded as criminals started to behave with dignity in the society as human beings.

Rulers ruling over criminals will be seen everywhere. But there is only one in a million

king who makes them his own with love and affection and gives them social status in the society and creates self-esteem in them. The Vedokta conflict over the right to chant the Vedokta mantra took place during the reign of Rajarshi Shahu. It was a storm in the social life of Maharashtra. The Satya Shodhak movement was further inspired by this case. In a sense, he carried forward the tradition of Mahatma Phule while working to achieve the all-round development of the Bahujan, untouchable society. He directly supported the Satyashodak movement. Rajarshi Shahu Maharaj fulfilled this important responsibility of propagating and propagating the Satyashodhak movement in the Kolhapur states. Further, Karmaveer Bhaurao Patil carried out the important responsibility of spreading and propagating this movement, so he adopted the formula of all-round development of Bahujan society through education. Rajarshi Shahu, Mahatma Phule and Rajrishi Shahu are the real inspiration behind trying to bring justice to Dalit victims and marginalized society. Belonged to Dr. Babasaheb Ambedkar. Ambedkar was declared as "Leader of Dalits" and "Peaceful Leader of India" in Mangaon Parishad. Shahu Maharaj also appealed to Babasaheb to lead the marginalized Dalit society in the future. Shahu Maharaj is hailed as the father of reservation throughout India as he tried to provide jobs to all marginalized communities and untouchables through reservation in his institution. Taking the role of social justice, Shahu Maharaj tried for social equality.

Conclusion :

Shahu Maharaj worked hard for social democracy. He used his power to get justice for all, to get human rights, to get equality and humane treatment for untouchables, to bring science to them. This shows the greatness of Shahu Maharaj. But today we and our rulers have set aside the ideal of Shahu Maharaj. Those who take his name and say that we are also them, do not act according to his thinking. On the contrary, they are seen abusing their power. Human values are trampled underfoot. We see today's rulers pulling the strings of the same democracy that Shahu Maharaj toiled for. We owe something to the society, but none of the current rulers think that we should also contribute to the progress of the society. Such a frightening picture stands before the eyes today. Politics is going on for selfishness, meaning, caste, religion. But they should learn from Shahu Maharaj that politics has to be done for humanity and human welfare. It is in that manner that our power should be carried forward and the interests of the common people should be nurtured. The country needs Rajarshi Shahu's thoughts, manners and actions today. If every human works according to their thoughts, it will not take long for the progress of the country.

Refrences :

1. Deshpande Ramakant, Rajarshi Chatrapati Shahu Maharajanchya 51 goshti, Manorama Prakashan, Mumbai, 2021.
2. Kothule Madan, Lokraja Rajarshi Shahu, Yashodip, Pune 2021.
3. Naik T. B., Chatrapati Rajarshi Shahu Maharaj, Mehata Publishing House, Pune
4. Chavan Ramesh, Rajarshi Shahu Maharaj yanchi samajik vichardhara v karye.
5. https://mr.wikipedia.org
6. https://marathi.abplive.com/news
7. https://www.biographymarathi.com/2021/07/shahu-maharaj-biography-in-marathi.html
8. https://mr.vikaspedia.in/education/
9. https://www.culturalindia.net/reformers/shahu-chhatrapati.html

■■■

ISSN No. 2394-5990

Contribution of Rajarshri Chatrapati Shahu Maharaj in the field of Performing Arts

Asst.Prof. Mharsale Sonali Bhaskar
M.A.(English), M.Ed., SET in English
Asst.Prof., English Dept.(visiting faculty)
GES's BYK College of Commerce, Nashik.
sonalibmharsale@gmail.com, 9372439628

Affiliation – Savitribai Phule Pune University, Ganeshkhind, Pune.

Abstract :

The purpose of this paper is to bring into light the role of the royal patronage given to the contemporary and the budding artists. These artists were the performing artists. He also helped the theatre companies and the performers, painters and the poets too. This greatly contributed in the development of the existing Arts in Kolhapur. He is the well known social reformer king and was the light of hope for the underprivileged class and women education. His contribution is a milestone in retaining and enhancing these art forms. He identified the potential artists and also helped them in reaching the global level.

Keywords :

Maharaj- Chatrapati Shahu Maharaj (in context with the research paper)

patronage- the support, encouragement, privilege or financial aid that an organization or individual bestows on another.

Arts patronage- financial support that the kings, popes and the wealthy provided to the artist such as musicians and sculptors **performing arts-** form of creative activities that are performed in front of the audience

folk singers- the artists who acquire the art of singing through observation and self practice and they sing the inherited traditional songs.

classical singers- the artists who acquire the art of singing by formal instructions at school of music

theatre–collaborative drama, stage auditorium

Jalsa- the folk art form organized by a specific society or institution to educate the masses through songs and skits.

Satyashodhak Samaj- the social reformation society formed by Mahatma Jyotiba Phule in Pune on 24/09/1873 with the mission to promote education and work for the equal rights of farmers, women and the under privileged class of the society .

Introduction:

Rajarshri Shahu Maharaj's ruled from 1894 to 1922. He was a learned person, a great supporter of the Satyashodhak Samaj and also a great social reformer. He supported the freedom strugglers, brought the under privileged class into the main stream. He strongly believed in secularism and social equality. He motivated the employees, the intelligent and the artists. During the famine of Kolhapur in the year 1896-97, he not only took care of the people but also of their domestic animals. He set-up many wrestling grounds and also gave royal patronage to many wrestlers and many performing artists. He also encouraged theatre artists by providing the financial help and also set up theatres for the drama companies. He had the best singers, poets, painters in his court as the royal artists.

Review of the literature :

1. Dr.Jaysinghrao Pawar(2014) in his book has mentioned the various contributions of Chhatrapati Shahu Maharaj to the development of Arts. He has mentioned the royal patronage given to the classical singers, folk artists, drama companies, poets and painters.

   He also speaks about the Satyashodhak Jalsa in it
2. Professor Nana Sahib Salunkhe (2007), in his book has described memories from the life of Chhatrapati Shahu Maharaj. He has described all the noteworthy incidents and the contributions of the great king to the field of Arts.
3. Dr.Sambhaji Kharat, (2023) in his recently published article in daily Loksatta, writes in detail about the Satyashodhak Jalsa.
4. The ancestor of Chatrapati Shahu, the present Shahu Maharaj, in one of his interviews in 'People of Kolhapur', has mentioned about the efforts taken by Chhatrapati Shahu Maharaj in building 'The Palace Theatre' which was built in 1915, which is now known as the Keshavrao Bhosale Natyagruh.

Objectives :

1. To study how the royal patronage given by Chhatrapati Shahu Maharaj helped in the creation of the great Arts and the artists.
2. To know about the various efforts taken by Chhatrapati Shahu Maharaj to bring about the cultural development in Kolhapur.
3. To make the readers aware about the contribution of Chhatrapati Shahu Maharaj to the field of Arts.

Methodology :

Type of research- Qualitative Research

Data collection :

The research is conducted with the help of literature review formed with the help of the secondary data.

It is a descriptive study. The details are collected from the Marathi books, journals, newspaper articles, studying the folk singing form marathi powadas and the interviews of the ancestors of Chhatrapati Shahu Maharaj available from internet.

The Era of Chhatrapati Shahu Maharaj was indeed the golden era for the artist who lived in the contemporary Kolhapur.

Royal patronage to the classical singers :

The tradition of musical concert was in existence in Kolhapur from the childhood of Maharaj. During the Navratra utsav and Ramnavami Utsav various folk artists and classical singers used to showcase their talent. The father of Rajarshri Shahu Maharaj, shri Aabasaheb Ghatge was too fond of various art forms. The Deval (देवल) club was established in 1892 during Maharaj's rule. This school of music created many legend male and female singers and instrument players and music composers.

Ustad Allah- Diyan- Khan :

Ustad Allah- Diyan- Khan- was the great singer of Dogarbani from Dhrupadiya gharana. Once Ustadjee was invited to Kolhapur on the occasion of Navratri. Maharaj heard his mesmerizing singing and appointed him as the royal singer in his royal court. Khansaheb with his brother Haider Khan and all his family of 20 members were given royal patronage in Kolhapur. He was the master trainer for the vocals.It was under his training, the famous singers like Pandit BhaskarBuwa Bakhale, Manji Khan, Natthan Khan, Kesarbai Kerkar, Mogubai Kurdikar, Zariwala, Nivrutti Buwa Sarnaik emerged as the rising stars of vocals. Khansaheb was known as the Gaurishankar of Music.

ISSN No. 2394-5990

Maharaj also gave royal patronage to the famous singers of Devas (देवास) Gawai Rajaballi Khan, Haider Bakhsh Khan of Kirana gharana. Anjanibai Malpekar who later was titled as the singing crescent 'GaanChandrika' (गानचंद्रिका) and Laxmibai Jadhav. All these artists brought glory to Kolhapur.

The famous thumari style singing artists, Menka Shirodkar, Azambai, Sardarbai, C. Balaji and Appasaheb Deshpande were the students of Khan saheb's brother Haider Khan.

Kesarbai Kerkar :

In 1917, once Maharaj was invited to listen to the performance of a 9 year old girl. Maharaj never said no to any invitation. The moment he reached the place the nine year old performer came running to him. She was the student of Bhaskar Buwa Bakhale. She told Maharaj that she wanted to learn singing from the great Master Allah Diyan Khan Saheb. She sang few classical ghazals and chiz (classical compositions) taught to her. Maharaj was very happy with her performance and made provisions that she gets further music lessons from the royal singer Allah Diyan Khan.

This girl futhur in 1938 won the top most title of honour, 'Surshree' given for vocals by Vishwa Bharti of Rabindranath Tagore. She was awarded by the Sangeet Academy Award,in the post independent era at the hands of the first President of India Dr.Rajendra Prasad and was also awarded with Padma Bhushan Award.

The Satyashodhak Jalsa :

The era of Chhatrapati Shahu Maharaj was the era when Satyashodhak Samaj was already pre-established by Mahatma Jyotirao Phule in Pune in the year 1873. This Samaj was established to promote education, men women equality and to bring social equality. To promote the thoughts of Satyashodhak Samaj, the Satyashodhak Jalsa was the strongest medium existing then. Maharaj helped all the members who were the part of the Satyashodhak Jalsa. The popular folk art form Tamasha with certain changes in it, formed the base of the Satyashodhak Jalsa. These Jalsas were the enlightenment of the knowledge programmes. It included folk songs and skits with the ideology . It also consisted of Farce(satirical dramas) and inspirational songs. These Jalsas were used to promote the ideology of the Satyashodhak Samaj for educating the masses with entertainment.

Many of the members and artist of the Satyashodhak Samaj like Bhimrao Mahamuni, Bhaurao Patole, Tattoba Yadav, Ganpatrao More, Prabhuti formed the Jalsa Kalapathaks. The most popular Jalsa among these was that of the well known education activist and the founder of Rayat Shiksha santha Shri Bhaurao Patil of Satara who was later popularly known as Karmaveer Bhaurao Patil. The contribution of Ramachandra Ghadge, Jyotirao Phalke, Tukaram Bhosale, Keshavrao Vichare, Kasegavkar is remarkable. The accompanists playing dholki, tutunaa, taal, harmonium of these Jalsa teams were sheltered by Chhatrapati Shahu Maharaj. The folk art was utilized for a social cause.

Baal-Gandharva of Sangeet Naatak (melodrama) :

Appashastri Belekar once met Maharaj and told him about about his singer grandson Narayana Rajhans who was a young boy and requested Maharaj to listen to his song. The young boy sang well. When Maharaj appreciated him he noticed that the boy was deaf to major extent. On asking him he learned that the right eardrum of the boy was badly hurt herebefore. Maharaj felt pity for him. He informed his officer Fauzdar Balwantrao Mhaiskar to send the child to the Mission Hospital of Miraj for the treatment of his eardrum at the hands of Dr. Wales, the expert then. Later with the patronage of Maharaj, he was sent to learn classical music from the legend Ustad Allah Diyan Khan. In those days the 'Kirloskar Natak Mandali' was the renowned

drama company. They invited Narayan for playing the woman character of Shakuntala in the drama Shakuntal, as it was a music drama. It was necessary for an actor to be an excellent singer too. The boy performed and for this first performance, Maharaj was personally present and blessed him for a successful future. This artist then became the famous theatre artist, 'Baal Gandharva' (बालगंधर्व) meaning the child singer of the heaven. His singing caliber was already identified by Maharaj in his childhood with his first performance.

Shakarrao Sarnaik was another such example of the male singer who played women characters in various dramas. The famous actress-singer Hiratai Badodekar too could scale the peak of success due the royal patronage.

Development of theatres :

With the patronage of Maharaj, many drama producing companies such as Shahunagarwasi, Kirloskar Sangeet Mandali and the Shivraj Sangeet Mandali were getting the financial aid as and when required from the royal treasure.

Govindrao Tembe an all rounder artist, an actor, writer, director, poet was a well known personality then. He taught Narayan Rajhans and Shankarrao Sarnaik how to act while singing.

The Palace Theatre :

Once when Maharaj had been to Rome he observed the huge theatres there and thought of building a huge theatre at Kolhapur with maximum seating capacity, a proper theatre with Proscenium arch and study of acoustics.

On these grounds of England and Rome, the Palace theatre was erected in Kolhapur in 1915. It was the first updated theatre for the performing arts in Kolhapur. This was the biggest Royal theatre of pre-independent India. It was later renamed as Keshavrao Bhosale Natyagruha to honour the great artist of theatre Sangeetsurya Keshavrao Bhosale the veteran actor singer.

Findings :

1. Chhatrapati Shahu Maharaj was people's king and he gave the royal patronage to various artists for the career development and self progress of these artist.
2. He appointed the best classical singer ustad Allah-diyan- Khan, the best poet Kavi Sumant and the best painter Abalaal Rahiman in his court as the royal artists.
3. He gave royal patronage to all these artist irrespective of their caste creed or religion, only on the principle of equal opportunity for all.
4. Even folk artists were encouraged and funded for the social cause of educating people, giving scientific attitude and eradication of orthodox ideas by the formation of Satyashodhak Jalsa performing teams.
5. Many great artist singers were given royal patronage even at their early age. Maharaj was very good at identifying the art potential within the artist.
6. Due to his royal patronage, many great artists emerged and developed in Kolhapur.

Conclusion :

Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj was rightly called as the People's king who worked for the development of every strata of the society. He brought all the people under one roof of development irrespective of their religion, caste, gender . He strongly believed in equality for all and secularism. He greatly contributed for all the fields including agriculture, education, social reformation, social-equality and the development of fine arts, mechanical arts and performing arts.

The royal patronage given by him to numerous artists from various fields is noteworthy. These artists brought a name and fame to Kolhapur, rightly called as 'Kalapur'.Chatrapati Shahu Maharaj was not only the King with the royal heart but also the king with the royal thoughts.

ISSN No. 2394-5990

He worked only for the betterment of his subjects.

References :

- Dr. Pawar, JaySinghrao: Rajarshri Shahu Chatrapati Jiwan wa Karya,Tararani book services, Kolhapur 2014.
- Prof. Salunkhe, Nanasaheb: Shahunchya Athwani , Vrushali Publishers, Kolhapur, 2006.
- Dr.Kharat, Sambhaji. (2016,April16). Parampara Satyashodhak Jalshyanchi. DainikLoksatta.https://www-loksatta-com.cdn.ampproject.org/v/s/www.loksatta.com/lokprabha/pustkachepan
- Gaikwad, Uday. (2020,December 04).Heritage of Kolhapur: Palace Theatre and Kusti Maidan. https://www.esakal.com/paschim-maharashtra/kolhapur/kolhapur-palace-theater-and-wrestling-ground-heritage-story-uday
- www.google.com

■■■

Rajashri Shahu Maharaj Educational Reforms

Prof. Sunil Narnaware
Head , LRC, Nagar Parishad Shivaji Mahavidyalaya,
Mowad, Th. Narkhed, Dist. Nagpur.
Email: lib.npsmm@gmail.com, Mob: 9423411997

Abstract :

Rajashri Shahu Maharaj was a 19th century Indian ruler and social reformer who made significant and lasting reforms to the Indian educational system. His reforms changed the way education was provided in the region. Rajashri Shahu Maharaj of the Kolhapur State was a visionary leader who believed in the power of education to improve the lives of all. His educational reforms during the early 1900s were aimed at providing quality education to all, regardless of caste, religion, or gender. His reforms included introducing free and compulsory education for all and opening up educational institutions for girls, womens and lower castes. His reforms laid the groundwork for an educational system that was more equitable and far-reaching than ever before. His commitment to the cause of education and his efforts to bring about reform in the existing education system were lauded by many of his contemporaries. He was strived to ensure that education was accessible to all, regardless of caste, class or religion. His reforms and initiatives had a lasting impact on the education system in India and continue to be felt even today. In this article, we will discuss the educational reforms of Rajashri Shahu Maharaj and the lasting impact of his reforms on modern Indian education.

Keywords: Chtrapati, Rajshri, Shahu Maharaj, Education, Primary Education, Women's Education

Introduction :

Rajashri Shahu Maharaj Educational Reforms is an important example of the progressive educational reforms that have been undertaken in India. His reforms have had a profound effect on the way education is delivered and perceived in the country. Rajashri Shahu Maharaj was a Maharaja of Kolhapur who believed in the importance of education for the upliftment of the masses. He was a great advocate of universal education and his reforms focused on making education more accessible and affordable to all sections of society.

Shahu Maharaj's idea and actual work regarding educational system

At the period of Rajarshi Shahu Maharaj the Brahmin was the most important community who takes education and has the funds for a complimentary recognition greater than the prosecution of the re administrative positions in British find in India. And they are enjoying the suitable statue in that time and auxiliary community people are excluded at all. Hence, the Shahu Maharaj thought roughly the event and he realized that without providing the pardon education to the socially backward community it was not reachable to add together these people in education and administration and process of economics make miserable in front plus. Hence, he had taken the decision nearly providing to free education to the masses. Shahu Maharaj feared that if he handed taking into consideration than more the facility to the common man past he is educated,

ISSN No. 2394-5990

the expertise will be snatched away by the merged class people. He so, arranged to provided pardon education to the non Brahmin community.

Dissemination of education for establishment of equality. Shahu Maharaj made primary education free and compulsory in his institute since 1917. on 21 September 1917, the ' Compulsory Education Act ' was issued in a special manifesto in the Kolhapur Institute. In its purpose, it was said that the law was enacted so that ' all our citizens of Karveer region should be able to read and write and come to know their condition and improve it ' . Under this Act, parents were forced to send their children of school age to school. If they did not send the same, they were fined one rupee per month each. It was announced to spend one lakh rupees on this scheme. On September 21, 1917, the 'Compulsory Education Act' was issued in a special manifesto in the Kolhapur Institute. Under this Act, parents were forced to send their children of school age to school. If they did not send the same, they were fined one rupee per month each. During the year, 96 new schools were started in the villages of the Sansthan. Due to this scheme, primary education was first introduced in the phase of about half a million peasants and 4500 children of them began to receive education. (Lathe, 2008). Consequently, when the Primary Education Act came into force in 1917-18, there were 27 schools and 1296 children under the scheme. However, during the next five years, by 1921-22, it increased to 420 schools and 22,007 children. So, the expenditure on the scheme went up to three lakhs.

Efforts for education of untouchables :

Creating educational awareness among the untouchables and increasing the number of their schools and students was a priority given by Shahu Maharaj. At the time of his period there were only five schools for untouchables in the Sanstha with 168 students. In 1907-08 these numbers increase to 16 and 416 respectively, and in 1912 the number of schools rose to 27 and the number of pupils to 636. He gave some special orders for the education of untouchables during that time. d. On November 24, 1911, Shahu Maharaj issued a very important order, which was to make all kinds of education free to all the untouchables in the state. Apart from this, a policy of giving special scholarships from time to time to intelligent, untouchable students was adopted by the court. By order dated 7th April, 1919, keeping in view the destitution of the untouchables, Rs 2,500 was sanctioned to encourage their education by giving them free boards, pencils and books (Pawar, 2007). After this, on 28 September 1919, Maharaja issued a very important order. Accordingly, it was decided to close the independent schools of untouchables in the institute. In 1920, for the promotion of education of the untouchables, a promissory note of Rs.10,000 was issued and from its interest eight scholarships of Rs.5 per month were started. Interestingly, three of these scholarships were reserved for untouchable girls.

Efforts for women's education :

Shahu Maharaj adopted a very progressive policy of women education in the Karveer Sansthan. He created a special post of Women Education Officer to look after the system of women education in the institution. This responsibility was with Rakhmabai Kelavakar. There were schools for boys and girls in the institution. However, separate schools were created for girls. In the year 1919, a special gazette order was issued for adult and backward class women, whereby the accommodation and food of such women who were interested in education were provided free of charge by the court. To encourage talented girls in further

education, the court maintained special scholarships. Shahu Maharaj also took a liberal approach in the matter of higher education for girls. He made education free for all girls studying in Rajaram College. Rakhmabai's own daughter Krishnabai was sent by the Maharaja to the Grant Medical College in Mumbai for medical education and became a doctor. Later, he was sent to England for higher medical education and after graduating, he rejoined the institute's service. Krishnabai became the second Maharashtra girl to return home after pursuing higher medical education abroad. First of course, Anandibai Joshi. Origins of Hostel Movement: Shahu Maharaj tried his best to perfect the education system of the Sansthan by establishing hostels with accommodation and food arrangements for the students of the Bahujan community in the villages so that their education does not suffer. On 18th April 1901, Mamasaheb Khanwilkar, Appasaheb Mhaisalkar, Bhaskarrao Jadhav, Dajirao Vikhare, Jiwajirao Sawant etc. Maharaja established 'Victoria Maratha Boarding' with the help of prominent Maratha personalities. P.C. Patil became the first student of this hostel. Although the hostel had Maratha in its name, it had an admission policy for students of all castes (Latthe, 2008). Then Jain Boarding was also established by Maharaja. Later, till 1908, twenty- three hostels of various castes and religions such as Lingayat, Muslim, Untouchable, Goldsmith, Tailor, Panchal, Gaud Saraswat, Indian Christian, Kayastha Prabhu, Vaishya, Dhor- Chambar, Carpenter, Nabhik, Somavanshiya Arya Kshatriya, Koshti, etc. was established. In the social system of that time, casteism was of a terrible nature. The caste hierarchy was deeply rooted. Against this backdrop, Shahu Maharaj decided to establish Jatwar hostels keeping in mind the social conditions of the time. He established hostels keeping in view the goal that all non- Brahmin children should learn at all costs. Even in the untouchable community there was a feeling of inferiority towards other untouchables, so they had to provide separate hostels for the dhorchambhars. They were sure that once these children learn, this caste- religion sentiment in their minds will automatically disappear. Karmaveer Bhaurao Patil's 'Rayat Shikshan Sanstha' is its embodiment.

Origins of Hostel Movement :

Shahu Maharaj tried his best to perfect the education system of the Sansthan by establishing hostels with accommodation and food arrangements for the students of the Bahujan community in the villages. In the year 1896, Maharaja had established a hostel attached to the college for students coming for higher education in Rajaram College. However, in 1899, the Maharaja learned that Pandurang, the son of Patil Chimanaji of Vadgaon in the Sansthan, had passed his matriculation. He called Pandurang and questioned him earnestly. Then, while studying, he became aware of the Brahmin dominance over hostels and taverns in the city. Maharaja took measures to stop such education-seeking students. Ranade and no. After discussing with Gokhale and consulting with Giles, Director of Education, Bombay Region, an unprecedented decision was taken to establish a hostel. On 18th April 1901, Mamasaheb Khanwilkar, Appasaheb Mhaisalkar, Bhaskarrao Jadhav, Dajirao Vikhare, Jiwajirao Sawant etc. Maharaja with the help of prominent Maratha figures Established ' Victoria Maratha Boarding ' . P.C. Patil became the first student of this hostel. Although the hostel has Maratha in its name, there is an admission policy for students of all castes.

Work on Higher Education support :

Rajshri Shahu Maharaj recognized the significance of higher education as well as

ISSN No. 2394-5990

primary education. According to Latthe (1924), Shahu Maharaj sent 15 students in 1910–11 and 10 students in 1911–12 to pursue higher education in Bombay (Mumbai), Pune, Madras (Chennai), and other locales. Regarding higher education, he sent these students not only to pursue conventional education but also to pursue professional education in Medical Science. He sent six students to Bombay's Midical College, Ponna's Medical School, Poona Training College, and Pune's Deccan College between 1913 and 1914.

Support for Agriculture Education :

Rajshri Shahu Maharaj knows the importance of agriculture education. He started King Edward Agriculture Institute in Kolhapur in 1912. This institute provided special and modern education on agriculture. For establishment of the institution he collected Rs. 30,000/- and deposited it to state treasury and got 6% of interest rate. He was appointed better teachers to this institution to teach agriculture education.

Conclusion :

While encouraging the education of children, Rajashri Shahu Maharaj did not neglect the education of women in the Sansthan. While implementing proper education system in the institute, He started separate schools for girls in the backward areas of the institute. Shahu Maharaj had appointed Mrs. Rakhmabai Kelavakar as the first 'Women Education Supervisor' of the Kolhapur Institute on 1st September 1895. Along with this, various scholarships were also started for the boys and girls of the institution who could not study due to the situation. Helping libraries, encouraging the growth of books was a matter of routine in his administration. Interestingly, Shahu Maharaj did not limit this thing only to the institution, but this flow of Shahu Mahara 's help continued outside the institution as well. This shows his broad approach towards education. Rajashri Shahu Maharaj is aware of the numerous forms of education and training, and he hasn't just concentrated his efforts on traditional education; he's also made efforts in the areas of industrial education, medical education, and agricultural education. Most importantly, he understood the idea of free and required education for everyone in that time period. Rajashri Shahu Maharaj worked to make primary education free and required for everyone; today, skill education has to be free and required for everyone.

References :

1. Bagade D. R. (1982). Chh. Rajarshi Shahu Maharaj Aani Kayadekanu, Padm Prakashan Sanstha, Kolhapur, 1982.
2. Bhagat R. T. (1999). Shikshanmaharshi Rajarshi Shahu Maharaj, Siddharaj Prakashan, Pune, 1999. 3. Kavalekar, K.K (1979). 'Non-Brahmin Movement In Southern India', 1979. Kolhapur. Shivaji University, Kolhapur.
4. Keer Dhananjay. (1976). Shahu Chhatrapati: A Royal Revolutionary. Popular Prakashan, Bombay. 1976
5. Kumbhar Nagojirao (1992.)."Rajarshi Shahu Maharaj" Prabhodhan Prakashan, Latur, 1992.
6. Latthe , AB. (1924). Memoirs of His Highness Shri Chhatrapati Maharaj of Kolhapur, Times of India, Press, Bombay, 1924, Vol. II, pp. 452-53.
7. Mhopare, Rahul (2006). Economic policies and programmes of Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj, PhD Thesis, Kolhapur. Shivaji University, Kolhapur. http://hdl.handle.net/10603/140066
8. Moon, V., ed. (2002). Dr. Babasaheb Ambedkar Lekhan and Bhashane-Part II (Marathi). Vol. 18. Dr. Babasaheb

Ambedkar Source Material Publication Committee, Government of Maharashtra, Mumbai.

9. Pawar, J., ed. (2001). Rajashree Shahu Smarak Granth. Maharashtra Academy of History, Kolhapur.

10. Warkhede, Ramesh (2017). "Maharaja Sayajirao Gaikwad Yancha Bhashan Sangraha (Marathi)." Vol. II. Secretary, Maharaja Sayajirao Gaikwad Biography Publication Committee, Aurangabad, 34.

■■■

ISSN No. 2394-5990

Rajarshi Chhatrapati Shahu And Educational Revolution in Maharashtra

Dr. Sonawane Jagdish Chhaburao
Associate Professor in History,
Arts, Commerce and Science College Sonai
Tal-Newasa, Dist-Ahmednagar. 414603.
9423210260 sonawanejagdish31@gmail.com

The pre-colonial India was a caste-based society. It was characterized by caste-endogamy, rigid and closed hierarchical structure and domineeringly Brahmanical patriarchy. The upper castes exercised an absolute control over the Hindu society enjoying all privileges at the expenses of downtrodden. At the same time the lower castes, untouchables and women were exploited and enforced to serve for the upper castes and the Brahmans thus it maintained supremacy of very few. According to Dr.Babasaheb Ambedkar, the caste system is not only the division of the labour but it is also a division of labourers.

In Maharashtra, the Brahmanical supremacy reached its zenith under the rule of the Peshvas (Brahmans). The British East India Company established British rule in Maharashtra by defeating Peshwa Bajirao II in 1818. Mount Stuart Elphinston took over as the first Governor of the Bombay Presidency. The British occupation of Maharashtra marked a new era in the history of Maharashtra. The far-reaching measures were introduced in the social, political and economic spheres by the British rulers in order to strengthen their colonial interests.

Education is regarded as an important instrument in a complete progress of a society. It has a potential of generating a spirit of enquiry and questioning to the accepted truths in the society and rebel against the injustice. As a result, it is considered as an important factor in the process of transformation of a society and subsequently other aspects from one stage to another. The English Education, introduced by the British, proved an important strategic move in the history of Modern India. It must be seen as an important aspect of social history of India which was perhaps introduced under the dire necessity of new rulers to educate local people to conduct a day-to-day administration. In the view of Mount Stuart Elphinstone, who introduced modern English education in Maharashtra, existing caste system and the feudal structure was essential to maintain good relations between the rulers and the indigenous people. It is evident from the histories of various colonized societies that the colonizers, instead of destroying the earlier feudal structure, nurture the process of formation of new classes, which co-exist alongside the with former structure and be the mediators between and the ruled themselves. He adopted a policy of appeasement of the traditional caste-elite. He was aware that the Brahmans are unwilling to educate rest of the people due to fear of losing supreme position and dominance over the society. They attempted to keep lower castes and untouchables away from education and it was limited to the Brahmans, though purportedly it was made open to all. It was proposed to all irrespective of caste, class and gender. It was a gesture under the influence of liberal thoughts. Contrary to it Mahatma Phule, Shahu Maharaj, Dr. Babasaheb Ambedkar and Karmaveer Bhaurao Patil not only imparted education among the masses but started all-inclusive units in the form of schools.

The English Education introduced modern concepts liberty, equality, fraternity, justice, humanism, liberalism and scientific temperament to India, which opened arena for newly educated Indians. They began to ponder upon inequality, injustice, inhuman practices, intolerance, and superstitions prevalent in then society and decided to transformation the society on the modern ideology. Therefore, we see the revival of socio-religious reform movements in Maharashtra in the second half of the nineteenth century.

Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj :

Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj of Kolhapur was the most important revolutionary social reformers in the nineteenth century Maharashtra. He was regarded as the benevolent king due to his devotion to the cause of the social revolution. After taking charge of the Kolhapur State, Shahu Maharaj realized that the bureaucracy of the Kolhapur state was Brahmin dominated; the Shudras, Dalits were out of government services only because of lack of education. He conceived that the lack of education makes a personal slave of the Brahmanical religion, loses dignity and so education must be delivered to everybody.[1] He realized the necessity of launching a strenuous campaign against the evils of the traditional caste hierarchy and the patriarchy. The educational backwardness of the Shudras and Dalits is evident from the Census Report of 1881, according to which literacy rate of the Brahmins in Kolhapur was 79.1 per cent, of the Marathas, 8.6 per cent. There were 368 Brahmin students out of total 441students of Rajaram High School and 55 Brahmin students out of 61 students in the Rajaram College in Kolhapur.[2] This disparity alarmed Shahu Maharaj and he realized the need for educating Shudras and Dalits.

Shahu Maharaj, being well educated on western lines, realized the importance of equality, liberty and fraternity which was a distant dream in the Indian context. He knows the fact that the Brahmans occupied a large number in the administrative posts and have unlimited control over administration. As elsewhere in western India, the establishment of a Western educational system and a modernized administration had brought Brahmans to the forefront as the most educated class.[3]

The main reason behind Brahman-non-Brahman conflict was the Vedokta controversy in 1899, when Shahu Maharaj became a strong opponent to the Brahmans. This evidence convinced Shahu Maharaj that non-Brahmans must be in power to control the Brahmanical supremacy. Then he immediately ordered 50% Reservation to the members of "backward communities" in the administration on 26th July 1902.[4] This was the beginning of the system of Reservation in India and Shahu Maharaj thus became the pioneer of it.

Shahu Maharaj had realized the importance of education in the process of emancipation of the downtrodden. His view about the education is reflected in his speech delivered in *Aryadharma Parishad,* he said,

"There was a great loss of the nation due to lack of education among the non-Brahmins and dalits... the priests became numerous in the temples and their interference should be stopped by making our schools as our temples, the knowledge of true religion must be exposed."[5]

Shahu Maharaj established many hostels in Kolhapur and he gave financial support to other hostels in different parts of Maharashtra for the education of the non-Brahmans. Some of his hostels are Jain Hostel (1901), Victoria Maratha Hostel (1901), Lingayat Hostel (1907), Mahomedan hostel (1906), Namdeo Shimpi Hostel, Sonar Hostel (1921), and Miss Clark Hostel for Dalits (1908) were founded to impart education among non-Brahmans.[6] These hostels played a crucial role in education and social change in the early years of nineteenth-century

ISSN No. 2394-5990

Maharashtra. His hostels made it possible for many students from all over Maharashtra to come to Kolhapur and achieve their education and progress further in their lives.

Understanding the necessity for education, Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj established a Training College for Women to meet the need of woman teachers.[7] It was made compulsory for students that after completion of their education, they had to teach the girls in the schools. Shahu Maharaj sent *Krushnabai Kelavkar*, a brilliant student to Grant Medical College for medical education. In 1902, he appointed her as an Assistant Medical Officer at 'Albert Edward Medical Hospital'. He again granted a scholarship to her for specialization in Gynecology to London. After completing the course, she rejoined her duty in 1903.[8]

Shahu Maharaj looked at women's education as a necessity to bring gender equality, so he tried to encourage women's education. When the girls passed from the schools meant for boys, he granted an amount of Rs. 512/- to the teachers.[9] He also encouraged the girls of Shudras and Dalits for education. For this purpose, he established a school for girls from *Chambhar, Dhor* and sanctioned Rs 96 for the purpose.[10] He desired the emancipation of women through education and for this purpose insisted on good moral education. Once in a discussion with Tofkhane and Bhaskarrao Jadhav, he said that 'if women should get a proper education, which make them understand the difference between good and bad; if they would get it from the teachers of good moral, they would never go on the wrong ways'.[11] Thus he cared and insisted on the quality of education.

Shahu Maharaj opened many schools for the spread of education among women and Dalits. The Brahmin intelligentsia started a movement for education for Brahmin women, while Satyashodhak movement under the leadership of Mahatma Phule started the movement for women, Shudras and Dalits. The Christian missionaries had been working for women's education. In the nineteenth century, the non-Brahmin movement under the leadership of Shahu Maharaj also devotedly worked for the education of women. He considered education important for women to bring up the children properly and encouraged the girls for education in many ways. He exempted the fees of the girls in Rajaram College and also declared scholarships for them.[12] He also declared the scholarships of Rs. 40 each, in the names of, 'Shri Radhabai Akkasaheb Maharaj Scholarship' and 'Shri Nandkunwar Maharani Bhavnagar Scholarship' for first two girls in the ranking of standard IV of Marathi medium schools in Kolhapur and *Bawda*.[13] He ordered to help women's education in his state and provided boarding, mess and educational facilities for girls. On account of his efforts, the percentage of women's literacy rose from 0.10 to 0.35 in the Kolhapur state.[14] He had contributed greatly to increase the percentage of literate women due to his various efforts. He opened a free school, 'Ahilyabai Girls' High School', for girls towards the eastern side of his Royal Palace and he also opened another school for girls in Kolhapur, '*Ma. Laxmibai Girls' High School'*.[15] In 1911, Shahu Maharaj made the provision of Free Education to Dalit girls and boys and devotedly worked for the emancipation of the Dalit and women and he already started a hostel for them in 1908.[16] There were only 05 schools for the Dalits, due to his attempts the number increased up to 27 in 1911-12 and from 1917 onwards he ran 7 hostels for them through his personal and royal expenditure.[17]

Shahu Maharaj had realized the necessity of education for all the people and so he made his mind for the education for his citizens and passed the Act of Compulsory and Free Education in 1917.[18] He not only passed the Act of compulsory education but implemented it rigidly by fining

the parents for the absence of their children at the rate of One Rupee per month.[19] He thus never discriminated in the educational system based on caste, gender etc. He not only cared about the education of non-Brahmin women but equally cared about the education of the Brahmin women. He helped Dr Anandibai Joshi by sending her amount to return India from America and decide to appoint her as 'Assistant Darbar Surjan', but she died after reaching India.[20]

Shahu Maharaj was very keen to eradicate evil practices like untouchability, which was prevalent in every aspect of social life, including education. Some of the teachers instructed strictly the students of Mahar, Mang, to seat out of the classes, in verandas under the traditional influence of untouchability. When Shahu Maharaj came to know this practice, he ordered to close special schools for Dalits and include them into regular schools and sit all students together. In another order, he issued that those educational institutes which were getting grants from Government should focus and treat Dalit students with love because they were unable to progress at their own unlike touchable; if there was anybody who dislikes it should send resignation within six weeks, and of course, they would not grant the pension by the government. If any of the institutes had any objection, the government should stop the grants immediately.'[21] This incidence is the strong proof of his modern outlook towards social practices. He was very helping in many ways to the Dalits and he attempted to annihilate untouchability.

Shahu Maharaj had criticized the educated non-Brahmins for almost ignoring the cause of emancipation of Dalits and the education to non-Brahmins.[22] He was so liberal to provide all kinds of help for the cause of education of the non-Brahmins, Dalits and women. So, he wholeheartedly helped various institutes and persons not only in the Kolhapur State but also from various parts of Maharashtra. V. B. Patil had founded the 'Tararani University' at Kolhapur to expand the women's education with the help of Shahu Maharaj.[23]

Shahu Maharaj even bores the severe critique on the issue of women's education from his family when he educated his daughter-in-law, Indumati Ranisaheb, after becoming a widow at the early age of eleven. He decided to educate her to make her an able person. At that time, his family members including his wife criticized him on his decision. But after all, he managed to educate her at *Sonatali,* a village near Kolhapur by appointing talented teachers, and she passed the examination of matriculation with second-ranking. He even wanted to appoint her as the chief of the Department of Education in the State, but due to her death, it was not possible.[24]

Thus Shahu Maharaj contributed vehemently for the educating Shudras, women and Dalits to bring them in the mainstream of the society. He made every possible arrangement for the cause in his capacity as a king of the Kolhapur State; not limited to it, but also extended his educational movement throughout Maharashtra.

Footnotes :

1. Kambale Uttam, (2003), *Rajarshi Shahu Maharaj Ani Mahila Mukti*, Sugava Prakashan, Pune, p. 13.
2. Jadhav Ramesh, (1997), *Lokraja Shahu Chhatrapati*, Suresh Agency, Pune, 6th edition, 2015, p. 162.
3. Omvedt Gail, (2011), *Cultur al Revolt in a Colonial Society,* Manohar Publication, New Delhi, p. 130.
4. Khane B. D., 2006, *Chhatrapati Shahu's C rusade a gainst Untouchability*, Critical Quest, New Delhi, p.6.
5. Karadkar K. S. (1975), in mangudkar M. P. (Ed), *Maharashtratil Samajprabodhan Ani Chhatrapati Shahu Maharajanche Karya*, Pune University, Pune, p. 57.

ISSN No. 2394-5990

6. Omvedt Gail, (2011), *Cultur al Revolt in a Colonial Society,* Manohar Publication, New Delhi, p.135.
7. Keer Dhananjay, (1979), *Rajarshi Shahu Chhatrapati: Ek Samajkrantikarak Raja*, Popular Prakashan, Mumbai, reprinted 2001, p. 104.
8. Ibid, p. 111.
9. Dhatavkar Bhaskar, (ed.), (1988), *Shahu Chhatrapatinche Nivdak Adesh*, Purabhilekh vibhag, Government of Maharashtra, Mumbai, p. 139.
10. Ibid, p.45.
11. To fkhane V.D.,(1965), *Rajarshi Shri Shahu Yanche Antarang*, Maharashtra Granth Bhandar, Kolhapur, p.76.
12. Bhosale Narayan, (2008), *Maharashtratil Strivishayak Sudharnavadache Sattakaran*, The Taichi Prakashan, Pune, p.240.
13. Ibid, p.240.
14. Suryawanshi G.S.,(1978),*Raja Shahu Ani Prabodhan*, Ranjit Prakashan, Ichalkaranji, p.240.
15. Salunkhe Hindurao, (1989), *Chhatrapati Shahu Smrutidarshan*, Maharashtra Granth Bhandar, Kolhapur, p.16.
16. Phadake Y.D., (2005), *Visavya Shataktil Maharashtra*, (Maharashtra in the 20th Century), Vol.2, K'Sagar Publication, Pune, Second Edition, p.233.
17. Phadake Y.D.,(2005),*Visavya Shataktil Maharashtra*, (Maharashtra in the 20th Century), Vol. 2,K'Sagar Publication, Pune, Second Edition,p.233.
18. Pansare Govind, (2003), *Rajarshi Shahu: Vasa Ani Warsa*, Lokwangamaya Gruha, Mumbai, p.18.
19. Ibid, p.19.
20. Bhosale Narayan, (2008), *Maharashtratil Strivishayak Sudharnavadache Sattakaran*, The Taichi Prakashan, Pune, p.64.
21. Pansare Govind, (2003), *Rajarshi Shahu: Vasa Ani Warsa*, Lokwangamaya Gruha, Mumbai, p.20.
22. Karadkar K.S.(1975), in Mangudkar M.P. (ed), *Maharashtratil Samajprabodhan Ani Chhatrapati Shahu Maharajanche Karya*, Pune University, Pune, p.57.
23. Salunkhe Hindurao, (1989),*Chhatrapati Shahu Smrutidarshan*, Maharashtra Granth Bhandar, Kolhapur, p.7.
24. Suryawanshi G.S.,(1978),*Raja Shahu Ani Prabodhan*, Ranjit Prakashan, Ichalkaranji, p.54.

■■■

Chhatrapati Shahu Maharaj an Immortal king of modern India

Dr Devesh M. Kamble
Off. Principal
Dr.Babasaheb Ambedkar College of Arts,
Comm and Science, Bramhapuri, Dist.Chandrapur
Mob. 9422474297
Email Id : devesh8271@gmail.com

Abstract :

Chhatrapati Shahu Maharaj become the ruler of Kolhapur at the age of twenty on 2nd April 1894.His reign lasted for 28 years. He in his reign has crafted out a space for himself in the annals of modern India by his rationality, modern Outlook, social reform, administration initiative, Revolutionary economic politics, social initiatives, tough administrative decisions, inititave, promote and support true social reforms and movements. Identified education as the true cause of backwardness of non-Bramhins and promoted education for all in his Kingdom. He challenge the Monopoly of Brahmin in fields of administration, religion and business. He worked hard to mitigate the sufferings of his people and remove poverty. He promoted agriculture and wanted to develop agriculture as business. He strived hard to remove the uncertainty in agriculture. He was perhaps the only ruler who strived to remove caste system from his Kingdom.

He was a vibrant figure in the social movement of satyashodhak Samaj and later dalit movement led by Dr. Ambedkar Chhatrapati Shahu Maharaj works have made him Immortal in the history of modern India. He was true people's king.

keyword – Immortal, annals, initiatives.

Introduction:

Chhatrapati Shahu Maharaj was born on 26th June 1874 and was coroneted on 2nd April 1894 at the age of 20. Before assuming the throne he toured throughout his empire, inspected all Taluka stations. He met people and learned a lot about their suffering and poverty. He trained himself in village and district police system. He was well versed with the Indian penel code and the Criminal Procedure Code. He studied the old and new land revenue system and the accounting system. He got himself ready for administration system. The vedokta controversy which took place in October 1900 was a rude shock to him which changed his total Outlook toward administration and Society. hereafter he took evolutionary decision in administration, social, educational agriculture and economic fields.

In modern Society man is the centre of all activities. It discords any type of inequality uphold justice, liberty and fraternity. Modern society is governed by law based on above principles. It aims at welfare of the people. Religion is a private affair and do not dictate administration. Education is the cornerstone of a modern state. Dr. Ambedkar felt that Hindu society is 'devoid of humanity'. It does notrecognize the importance of an individual. It is based on graded inequality which is the basic principle of Hinduism. Shahu Maharaj was influenced by Dr. Ambedkar.

Rajashree Shahu Maharaj believed in the modern philosophy. To him education is the key to remove backwardness of lower caste and also to destroy the hegemony of upper cast. He

ISSN No. 2394-5990

therefore in his social reform stressed universalization of education, social equality, liberty, justice, fraternity and gender equality.

Social reform:

Shahu Maharaj believed that transfering power to lower caste is hindred by illiteracy. Brahmins due to their education has captured the position of power and they failed in giving justice to the lower caste. the 'vedokta controversy come as a rude shock to Shahu Maharaj. It the brahmins treat their ruler in such indignified manner then the plight of lower caste is unimaginable.He said that, without nutrition man become weak but without education man become backward. National leaders like Tilak got involved in the vedockta controversy and supported the Rajopadhyay. This opened the eyes of Shahu Maharaj. He said that the politics of extremeist group of Congress was nothing but Bramhanicalpolitics. He supported non bramhin social movement and introduced sweeping change in the field of caste reform, education, agriculture and economic policies.

Shahu Maharaj was strong advocate of equality and so refused to give brahmins any special status. He removed brahmins from the post of Royal religious advise when they refused to perform religious roles are non-brahman. He appointed young moracha as Jagatguru. He patronized satya shodhak samaj movement and also helped Dr. Ambedkars movement for uplifment of lower caste. He made laws banning practice of inequality and made public utilities such as wells, hospitals open to the untouchables.

Education reform :

Great people are not born in illiterate society. Rajashree Shahu Maharaj made free and compulsory education in his Kolhapur state. He fined parents who do not admit their sons and wards in schools. In 1911 Shahu Maharaj stated scholarship for meritorious students for background classes. He emphasized education for women. He started Radhabai Akkasaheb scholarship in 3rd March 1913 for promating womens education. also Nandkuvar Maharani Bhavnagar Scholarship. He was staunch advocate of english education. He introduced tax for education. A 2% educationcess was levied on person having income about Rs.100.

He Started hostel for students Separate hostel were build for students of different casts and communities and also for Muslims,Jain, Christians.

He believedilliteracy in the main handle to transfer power to the lower caste creating monopoly of Brahmin in employment. He ensured suitable employment for educated students. He was the first ruler to start affirmative action. 50% seats in employment reserved for weaker section. He build Rajaram college with aim to make education available to the masses. He established vedic school to enable students learn scriptures. He also established special school for village head Patil school to make them better administrator.

Women empowerment :

Shalu maharaj was great advocate of women empowerment.He established schools to educate women. He build hostels for women. He legalized widow remarriages in 1917 and made efforts in stopping child marriages. In 1920 he introduced lo banning 'Devadase Paratha' which essentiality led to sexual exploitation of girls at the hands of clergy. Started various scholarship for women in 1913. Female training college to train teachers. Advocated english education for women. He send several women for higher and technical education. Girls students were send to bombay medical college, poona medical college and poona training college, Deccan college for higher and medical education.

Political participation :

Shahu Maharaj political participation aimed at political emancipation of lower caste and non

bramhais. Chhatrapati shahu maharaj established Decon Royal association in Nipani during 1916. This association aimed to secure political rights to non bramhains and invited their participation in politics. shahu maharaj was influenced by the work of jyotiba phule and so patronized the satya sadak samaj movement.

He said that the political movement of the congress was nothing but brahminical politics. He actively supported non-bramhins political movement. whichpreached liberty equality and fertility for uplifmet of lower caste, peasents and workers. The took counter views to the view of congress socialreforms and held that hinduism was responsible for the plight, poverty, ignorance and backwardness of lower cast.

Shahu maharaj was impressed by the great intellect revolutionaries ideas of Dr. Bhimrao Ambedkar. He travelled to Bombay in 1972 to meet Dr. Ambedkar. Thereafter he met Dr. Ambedkar several times. He said that Dr. Ambedkar was the true leader of the downtrodden. He donated Rs. 2500 to Dr. Ambedkar to start newspaper. Muknayak' on 31st January 1921 and contribute more later for the same cause. Dr. Ambedkar and Shahu maharaj organized a conference for betterment of untouchables popularly known as Mangaon perished 21 to 22 march 1920 and he made to Dr Ambedkar the chairman of parishad. Shahu maharaj said that abolutions of caste is nessesary for the unity and integrity of India.

Economic and industrial reform :

Shahu maharaj introduced number of project which enable his subject to substance themselves. The shahu chatrapati spinning and weaving mill in 1905.He followed the policy of decentralization of industries for balance group of state. Also in 1905 started wood distilation industry based on forest weath. In 1906-07 started sericulture industry. He encouraged and established government motor vehicle factory, shahu loom factory at Ralbag 1907 Ginning factory at Siror Road 1906-07. Shahu Maharaj encouraged co-operative sector and also encouraged private sector to start industries. In 1893-94 kolhapur state had 5 printing press which went to 12 m 1913-14 Established rajaram industrial school in July 1920. several sawmill, electric light industry, laundry indushy, were stared in his reign. He organized agriculture and industrialexhibitions to educate people. handicraft and cottage industries also flourished under his palronags. He developed markets in the state. Shahapuri market develop very much in his patronage. He gave loans to traders and formed trade rules.

Agriculture did not escape his attention. Radha nagari dam initiated in February 1907 to make kolhapur self sufficient. He build and developed market for agriculture goods to eliminate middle man. He was great lover of art and culture supported writers and researchers in their endavours. Kholhapur during Shahu maharaj's reign had made great progress in Industry cottage & small scale industry art, architecture, forest wealth agriculture and agri industries.

Conclusion:

Chhatrapati shahu maharaj was well ahead of his times. He was a rational thinker and a keen learner. welfare of the people was central to all his administration. He visited europe and was impressed by the development they have made through industrialization. He wanted his kolhapur state and also India at large should develop through industrialization.Illiteracy in the main causes of backwardnessof the lower caste and therefore started universal compulsory education. Advocated higher and technical education for both mail and woman. He was champion of equality and social justice. He look mesures to eliminate caste system and gender equality. Made laws of eliminate evil practices of widowhood,Devdasi and untouchability. He introduced to concept of affermative action for

ISSN No. 2394-5990

lower caste untouchables and women. He patronized social justice movement in the satya sodhak samaj and movement of Dr. Ambedkar he believed that caste system harmful for unity and integrity of india. He wanted to develop India on modern principles of liberty, equality, fraternity and justice. His works in social economic and cultural fields have guided social justice movement to come. He is rememberel not as a ruler of Kolhapur but a simbal of social justice in India. Thought he died in 1922 his name is still alive in the annals of modern India. And has become Immortal due to his works.

Biblography :

- Keer Dhananjay - Shahu Chatrapati -A Royal Revolutionary- popular Prakashan, Bombay January 1976,
- Gail Omvedt - Cultural Revolution in Colonial Society -The non-Brahmnical movement in western India -1873 to 1930, scientific socialist education trust 1976
- Jadhav B B - Rajashri Shahu Maharajanchi Bhashane -Rajshree Prakash in Kolhapur, 1971, Ramesh Dawane-Mangaon Parishad, 61st Shruti Mohotsav special number March 1982,
- Bhosale S S-volume one, Vichaar aani Karya Kolhapur, April 1975
- Vaidya G N - A Royal Revolutionary, Mali MG ,P B, Solanki, (1994) Chatrapati Shahu-The pillar of social democracy
- https://www.roundtableindia.co.in/the-historical-founder-of-rte-act-chh-shahu-maharaj/

■■■

A Study of Economic Reforms by RajarshiChatrapatiShahu Maharaj

Dr. Pakdhane Smita N.
Assistant Professor,
Department of Commerce
MVP's KSKW ASC College,
CIDCO, Nashik
smitapakdhane@cidcocollegenashik.ac.in

Abstract :

RajarshiShri ChatrapatiShahu Maharaj, a well-known Maratha king of Kolhapur, also known as social and economic reformer and apply many progressive policies for the development of state and society which include infrastructure development, educational system development, agriculture, industry, trade and economic reforms, social welfare, upliftment of weaker section for the development of society etc. are core areas of huge work done by RajarshiChatrapatiShahu Maharaj. Thus, this article try to understand the economic reforms of RajarshiChatrapatiShahu Maharaj before 100 years, it was the period when the country was struggle for freedom

Key Words: Economic reforms, agriculture, industry, trade, infrastructure, Rajarshi Chatrapati Shahu Maharaj etc.

Introduction :

Shahu, well known as Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj, Shahu IV, Rajarshi Shahu, Kolhapur's Shahu Raja (26 June 1874 – 6 May 1922) from the Bhonsle dynasty of Marathas was a Raja and the first Maharaja (1900–1922) of the Indian princely state of Kolhapur. Rajarshi Shahu was considered a true democrat and social reformer. Shahu Maharaj was an able ruler who was associated with many progressive policies during his rule. From his coronation in 1894 till his demise in 1922, he worked for the cause of the lower caste subjects in his state. Primary education to all regardless of caste and creed was one of his most significant priorities.[1]

Generally, the kings are well known for their political career and war strategy, but Rajarshi Chatrapati Shahu Maharaj was the king who is well known for his social reforms and upliftment of weaker section of society 100 yearsback . He was true king of public in Marathi we can term this as "Rayatecha Raja". He could also be defined as a true "Innovator" and "Inventionist" as defined by the legendary economist Schumpeter in the sense that he envisioned the need and essentiality for trade, markets, Industries , innovation and technological development which would ultimately lead to public welfare, mass education and employment generation.

Along with the social reforms, Rajarshi Chatrapati Shahu Maharaj majorly contributed in infrastructure development, facilities for agricultural development like irrigation, storage etc.

Objectives of the Study :

1. To understand the economic reforms brought about and implemented by ChatrapatiShahu Maharaj in Kolhapur region
2. To identify educational reforms that took place during the tenure of Rajarshi Chatarpati Shahu Maharaj in Kolhapur State

ISSN No. 2394-5990

3. To understand the impact of above economic reforms in Kolhapur region
4. To analyze the benefits of Work done by Shri ChatrapatiShahu Maharaj in today's context.

Scope of research article: This research article is purely related with the economic reforms brought about and implement by Rajarshi Chatrapati Shahu Maharaj in Kolhapur State up to 1922 was consider only.

Research Methodology : This research article is a study-based article on the economic reforms implemented by Rajarshi Chatrapati Shahu Maharaj in Kolhapur State., the study conducted in around Kolhapure state and the information was collected regarding economic reforms implemented by Rajarshi Chatrapati Shahu Maharaj up to 1922, all the information is collected from the published Material and purely secondary data based study.

Limitations of the Study:

This study is only related with the economic reforms implemented by Rajarshi Chatrapati Shahu Maharaj of Kolhapur State. Thus the research article is related with the specific geographic are of Kolhapur and the historic period of Rajarshi Chatrapati Shahu Maharaj's tenure as a king.

Review of Literature:

1. Kulkarni Meena andKulakarni B.S.[2] in the book titled "Shri Shahu Chattrapatinche Arthkaran", have given statistical information and construction process of Radhanagari Dam and also about the expenses incurred on it. RajarshiShahu Maharaj also constructed several tanks and wells in the Kolhapur state. In 1919-20 well-irrigated area of Kolhapur was 21021 acres, river-irrigated area for agriculture was 8933 acres, while tank-irrigated area was 241 acres available(p.53). RajarshiShahu Maharaj was inaugurated State railway construction work on 3rd May, 1888 for the development and growth of trade in the Kolhapur state. During famine period, RajarshiShahu Maharaj undertook the construction work of roads toprovide an employment to many people of the state.
2. Satham D. N., [3] "Aadhunik Bhagirath Rajarshi Shahu", the author has provided information about the Radhanagari dam, which was constructed by RajarshiShahu Maharaj with the aim ofagriculture development and attacking the problem of famine by irrigation facility. Ravbahaddur Bajirao AmrutraoVichare was the architectof Radhanagari dam. The scheme was given permission by an ordinance No. 390/1908/date 22-09-1908. It is alsomentioned that the dam was constructed by labour only and not use any machine for it. They also decide forelectricity generation from the dam in future.
3. Darekar S. V.,[4] in his article on Chatrapati Shahu Maharaj, titled "Shahu Chhatrapatinche Arthkaran Sheti, Udyog Va Vyapar." Discuss on the vatious reasons for traditional farming of farmers, as understood by Rajarshi Chatrapati Shahu Maharaj are Illiteracy of farmers, Scarcity of capital due to non-availability of other source of income as purely depend on agriculture and agriculture depend on monsoon, Fragmentation of land as divided in relatives after each generation and Unorganised farmers etc. The author also discussabout experiments carried out by Rajarshi in the farming of tea and coffee and the agricultural exhibition organised by RajarshiShahu at Chinchli village. RajarshiShahu also set up a museum of equipment'srequired for agriculture. Some credit cooperative societies was also

established and developed by RajarshiShahu for easy loans facility to farmers for agricultural activities and marketing.

4. Pansare Govind,[5] in his article titled "Rajarshi Shahu :Aarthik Dhoran Aani Vichar", the author has tried to study the Rajarshi Shahu's economic thoughts and work. The authorshows that the land under cultivation increased from 1294196 acres in 1893-94 to 1426535 acres in 1921-22. RajarshiShahumade all tries in the state for passing legislation in 1913 to prevent and reduce sub division of land, as it was the mainreason of low productivity of agriculture. RajarshiShahuwas also support agriculture by irrigation facility, develop education system forgeneral public, exhibitions and modernization of industry also.
5. Nalawade M. D.[6] has mentioned in his Ph.D. thesis, "Shahu Chhatrapati of Kolhapur: A Social Revolutionary", RajarshiShahuduring his tour to Europe in the year 1902 observed the industrial revolution in England and its benefits to society. He thus helped public and private industries in the state of Kolhapur to bring industrial development in Kolhapur. He started Shahu Mill in Kolhapur for employment generation and to show that business talent did not belong to Mumbai.

Meaning of Economic Reforms:

"Economic reforms are the changes acquaint with by the government to bring an improvement in the economy of a country through various improvements and policies."

A fundamental change process for economic reforms which improves standards of living of general public, a well-being of society and increases resistance against financial shocks and to provide permanent and long-term improvement and solutions.

In the most ofworld's developing countries the economic reforms were initiated by the World Bank and International Monitory Fund with the aims of liberalizing their economies – moving away from ancongested environment with greater state activities to depend onon the private sector. Most macroeconomic policies reform focused on liberalisation of countries economy for international and domestic trade which includes liberalisation of agricultural prices and marketing activities, removal or decrease of agricultural subsidies, reduction in trade tariffs and taxes and removal of non-tariff blocks to trade, liberalisation of the exchange rate system, liberalisation of the financial sector and interest rates and provision of investment incentives.

The changes in the Financial and business system, economic management, changes in methods of economic policy implementation are known as economic reforms. The Economic reforms are carried out under various conditions like when the economic system efficiency is revealed low, economic crises are occur again and again, when the market does not sufficiently satisfy the needs of general people, the development process of a country is very slow or lags behind from other countries, the financial position of a country is very weak etc.

The Economic reform means to bring the huge changes in economy system, majorly to give nation a much-needed upgradation of society as per requirement of time. It was all required in more than one aspect of the country.

Contribution of Rajarshi Chatrapati Shahu Maharaj in economic Reforms:

1. **Infrastructure Development:**The improvement in infrastructure facilities is basic need for development in standard of living and economic and financial development.

   The infrastructural facilities developed by RajarshiShahu Maharaj in the Kolhapur

ISSN No. 2394-5990



Source: https://byjus.com/commerce/economic-reforms/

state include road development, railway development, irrigation facilities for agriculture and drinking facilities, etc.With the help of this development, Rajarshi Chatrapati Shahu Maharaj wanted to develop agricultural production and income of farmers, industry for employment and trade.While road construction, the kaccha and pakka roads both are constructed, the road construction spread across the rural sector and connecting to the urban sector for supporting the transportation of raw and finished good in Kolhapur state.During entire reign, constructed roads are equivalent to 185 miles. As a support to road development, Rajarshi chatrapati Shahu Maharaj inaugurated railway in the year 1891, as he knew that development will be possibleby railways transport facility. After understanding the dependence of economy majorly on agriculture, it is necessary to solve the problem of water supply for agriculture along with drinking water.

Rajarshi Shahu Maharaj constructed new water tanks at several places and Existing tanks were repaired for storage. Rajarshi Shahu Maharaj undertook dam construction project still after having the finance problem. This project also increase employment. the construction work of Radhanagari dam was stopped in 1917 due to non-availability of funds during World War I. Later it was completed by Rajarshi's son Rajaram Maharaj.

2. **Industry and Trade reforms:** Agriculture alwaysmeasured as a back bone of Indian economy. Howeverindustries also play an important role ineconomybut still the maximum manufacturing industries are depend on Agriculture for raw materialand agriculture dependent on industry for seeds, fertilizers and technology.

industrialization is important not only for developing countries but for the whole world. Industrialization creates more employment opportunities along with other benefits.

Some industries were already in operation even before RajarshiShahu Maharaj tenure. Among them :Cotton or Weaving industries, Blanket manufacturing, Tanning, Pottery, Oilpressing, Rope making rice making, Bangles manufacturing, Dyeing, Sugar, Leather work, Bamboo industry, Foundry, Gunny cloth, Paper, Goldsmith, Carpentry, Coppersmith's etc.

In all these industries the total capital of Rs. 170900 was invested in machinery and plant, etc. and the working capital was Rs. 1519608. In the year 1894, the value of articles turned out from these industries was Rs. 2456641 and 23138 people were employed, however the maximum workers were illiterate, unskilled and untrained. The manufacturing productswere of low quality and not physible for export only for local customers or market. Jaggery and blanket of normal grade was manufactured on large scale[7].

Rajarshi Shahu Maharaj did not want only material development but to create good employment opportunities, increase earning sources, improve standard of living of general public. Moreover, Rajarshi had taken care of monopoly So, he applythe decentralize policy for industry to achieve overall balanced development of the state and facilitated development of industries.

3. **Educational System Reforms :** Before 100 years,only Brahmin from the society have the right of education and because of that they are important part of administrative positions in government offices. The other community people are excluded at all as they are illiterate and purely depend on physical or blue-collar work. the Rajarshi Shahu Maharaj thought about the situation around him and realized that without education, the development of the socially backward community it was not possible and they are far away from the process of economics development and their participation in administration.

According to the Dutta and Biswanath (2009) the Rajarshi Shahu Maharaj thought that, it is compulsory to educate common man before giving him a position and responsibility, without education the common man was not prepared for responsibility. Rajarshi Shahu feared that if he handed over the power to the common man before the education, the power will be swift away by the higher class people (Bagade, 1982). He therefore, decided to provided free education to the non-Brahmin community.

Chhatrapati Shahu Maharaj believed that education is compulsory for the development and progress. Best thinkers, Best politicians, great warriors are not born in illiterate country (Keer, 1976). So it is important to give education to the people. It menace Shahu Maharaj identified the power of education to the masses. The education is essential for survival and national progress and which is helpful for decentralize the concentrated Power of administration and bureaucracy. As there is close association between the education and economical empowerment (Ahmed et al 2010). Thus, for free education, Rajarshi Chatrapati Shahu Maharajapply the Strategy of Free and compulsory Education, distribution of Scholarships and Freeships to intelligent students, Women Education etc.During 1911 to 1914 total

ISSN No. 2394-5990

8369 girls had been taken education through this system. For this purpose, six lady teachers were deputed for training.

4. **Facilities for Agriculture and Agricultural Marketing:** Agriculture always been a core sector of the economy.Still today Agriculture is the main source of supply of the basic food for human being and raw material to industry. According to Simon Kuznets the contribution of agriculture is not only important from the point of view of economic development but it supply food and fiber products to society, contribute in trade contact, contribute by releasing labour and also contribute inearning of foreign exchange by exporting agriculture products. There are number of hurdles in the development of agriculture. The most and important hurdle was famine. In other words, the shortage or scarcity of water is the main reason for less productivity of agriculture. In this case Rajarshi Chatrapati Shahu Maharaj conduct irrigation survey and after that he tried to improve the water storage capacity and construct Radhanagari Dam. The other hurdle in agriculture development was shortage of capital, illiteracy, small land holding,absence of unity and farmers organisation etc. so to overcome these hurdles, Rajarshi Shahu study the agriculture of other countries and provide agriculture education facilities along with the financial support in the form of loan and tagai in concession rate and Rajarshi also try to use technology in agriculture.

Major Economic, Infrastructural and Developmental Reforms undertaken by Shahu Chatrapati Maharaj:

i. Chatrapati Shahu Maharaj believed in the coexistence of all four forms of economic enterprises i.e Private, Public, Co-oprative and partnership of jointly operated firms.

ii. Set up Oil Mills , Foundaries, Stationary manufacturing units, weaving mills, technical education schools and agricultural training schools.

iii. Always encouraged trade and insutrialization by setting up "Shahu Cotton Mill", "Rajaram Cotton Mills" and many small cotton textile mills. Also set up Weavers Assciation , encouraged tea and coffee plantations on cottage level.

iv. Set up "Jaysinghrao Ghatge Industrial School" for imparting primary technical education to local youth and tradesmen.

v. Encouraged and promoted roads, railways amd irrigation systems set up for promoting technological and industrial dispersion and labour mobility.

vi. Followed and implemented various trade policies and practices mentioned by Chanakya (Arthshastra).

vii. While setting up irrigation systems on farmlands Shahu Maharaj discouraged land subdivisions occurring with each subsequent generation by promoting "Community Farming" especially amongst lower castes and educationally and economically backward peoples and untouchables.

viii. He was a major propagator for education amongst children and backwards and believed in "investment in human capital" through expenditure in health and education.

ix. He considered "Labours" as true weaith and "Pillars" of a strong and balanced economy and promoted the idea that educated and skilled labour workforce is the only way of achieving all-round

industrial, social and technological development.

x. Being a firm believer in free and compulsory education he started many school such as "Patil School", Sardar School" and "Satya Shodhak School". Closing down schools meant only for untouchables he admitted them to common public schools and colleges.

xi. Shahu Maharaj knew the importance of Women education and strongly supported the cause of social skill impartment and training of young girls and housewives.

xii. For health services he started "Albert Edward Hospital", "Ahilyabai Deshi Dawakhana", Leper Hospital and Homeopathic Dispensary.

xiii. For Agricultural education , "King Edward Agricultural Institute" which imparted training at the student's location by demonstrations and practicals, also agricultural markets were set up at different locations such as Jaggery market at Shahupuri, Kolhapur, groundnuts and chilly markets in Gadhinglaj and Malakapur etc.

Impact of economic reforms of Rajarshi Chatrapati Shahu Maharaj:

The reforms undertaken by Rajarshi had major and long lasting beneficial impacts on the region of Kolhapur and its residents and their future generations. These reforms paved the way for easy implementation of modern business and industial practices.. These reforms not only enhanced the financial position of society but also improved overall performance as it was made possible due to educational provisions for masses.

The irrigation, road construction, railway transport facilities, develop financial support to agriculture and industry are really helpful for future development and strategies.

Conclusion:

Rajarshi applied interfering approach in economic reform policy. All his programs and actions clearly shows that he is interested in maximization of public welfare. Rajarshi planned his development policy for employment generation and use of technology in overalldevelopment of society. As far as Rajarshi's agriculture related work is concerned.

Rajarshi, considering labour as wealth, as the labour is an importance factor of society. He has opinion that labour is neither of higher nor of lower status.

Rajarshi helped for the implementation of new methods of production as against the traditional method so that quality goods and quantity can be produced with less efforts.

References:

1. Kulkarni Meena and Kulkami B. S. - Shri ShahuChhatrapatincheArthkaran, Gauri-Nandan Publication, Kolhapur. 1975, (pp. 51 to 60, 77,163, 164,172 to 176).
2. Satham D. N. - Aadhunik Bhagirath RajarshiShahu, PraharPrakshan, Kolhapur 1950, (pp.36 to 43).
3. Darekar S.V. - "Shahu Chhatrapatinche Arthakaran :Sheti, Udyog vaVyapar" in the "Rajarshi Shahu Maharaj" edited by KumbharNagojirao.PrabhodhanPrakashan, Latur, 1992, (pp.17 to 20).
4. Pansare Govind "Rajarshi Shahu Aarthic Dhoran Aani Vichar in the "RajashriShahu Smarak Granth" edited by Pawar Jaysingrao, Maharashtra ItihasPrabodhini Kolhapur Jan. 2001, (pp. 624 to 627).
5. Nalawade M.D., " Shahu Chhatrapati of Kolhapur : A Social Revolutionary (1874-1922), Ph.D. Thesis (unpublished), Shivaji University, Kolhapur, Dec. 1978 (pp.333, 335).
6. Mhopare Rahul S., "Economic policies and programmes of Rajarshi Chhatrapati Shahu

ISSN No. 2394-5990

Maharaj" Ph.D. Thesis, Department of Economics, Shivaji University 2006.
7. Dhingra I. C. - Agricultural Economy of India, Sultan Chand & Sons Publishers, New Delhi, 1982, (p. 21).

Weblink references:
1. https://en.wikipedia.org › wiki › Shahu_ of_ Kolhapur
2. https://www.vedantu.com/commerce/economic-reforms
3. https://www.igi-global.com/dictionary/second-generation-reforms/9057
4. https://www.toppr.com/ask/question/define-economic-reforms/
5. https://byjus.com/commerce/economic-reforms/
6. http://hdl.handle.net/10603/140066
7. https://dnyantarangini.com/2023/01/rajarshri-chhatrapati-shahu-maharaj-a-visionary-social-reformist.html

■■■

RAJARSHI CHHATRAPATI SHAHU MAHARAJ: THE ROYAL PATRONISER OF 'KUSHTI' (WRESTLING)

Mr. Rahul Vasant Ingle
Asst. Prof. of English
Shripatrao Kadam Mahavidyalaya,
Shirwal, Tal. Khandala, Dist. Satara
Mob. No.: 9822647623
E-mail Id : rahoolingle@gmail.com

Intoduction :

India was the land of kings and their kingdoms. In India, there were royal families who got the throne by their birth and few king earned their throne by their own prowess. Every king had contributed to their kingdom at their level. Few had wasted their power in highjinks, few had used their power for lovelass of money and power, and few had used their power for the society welfare. Every king was dissimilar than the others. Who had got royalty by birth, mostly enjoyed it because they got it without efforts, and on the other hand who had earned their kingdom, they were known about the value and responsibility of the throne. But some examples are rare in rare that they got the throne not by birth nor they earned by themselves. They gain the throne luck by chance, by adoption and they used their royal power for the society welfare. These types of examples are literally rare in true sense. For instance- Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj, he was not the lineage of the royal family or royal family blood. He was adopted by the Kolhapur Sansthsnik, Royal Bhonsle family from the Ghatge Family. Rajarshi Shahu Maharaj became the ruler without having royal ancestry. Despite of that Shahu Maharaj earned the respect and love from the society because his extraordinary work for the society made him 'Rayatecha Raja' (the king of People)

Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj has given his contribution in every aspect of humanity, and social welfare. He was the best ruler to be ruled. He helped in the form of money, education, food, water, employment, and health as well to the needy people. he became the royal patroniser for farmers, untouchables, poor, artists, actors, litterateurs, sculptors, and sports persons especially wrestlers.

Objectives:

The objectives of the research paper as follow:

1) To study the contribution of Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj in sports Especially in wrestling.
2) To study the struggle of Maharashtrian wrestlers, particularly after retirement in Shahu Maharaj era.

Methodology :

In the present research paper secondary data has been used, in which biographies of Shahu Maharaj and other topic oriented books have been used.

Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj was born on 26th June 1874,inGhatge family. At the early stage of his childhood he lost his parent and in timeward he was adopted by the Queen Aandibai, widow of King Shivaji VI, the Bhonsle dynasty of Marathas. Soon he became the King of the Kolhapur reign. On 02nd April 1894 he became the Chhatrapati in a true sense. On 03rd April 1894 he has given manifesto to his demos of his reign/ kingdom, in which he promised 'welfare state'. And by the period of time he proved himself out right in his manifesto. He had a great physic and smart brain. With the help of smart brain he could

ISSN No. 2394-5990

solved crucial situations like- political crises, religious problems, health issues, casteism and many more, on the other hand with the help of great physic he could keep going his hobbies like hunting, wrestling and at the same time he could worked hard for his kingdom and his demos by travelling in all over his kingdom, travelling to abroad, attending social meetings and gathering.

Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj had a keen interest in wrestling. He used to exercise every early morning and had one to one hand with popular wrestles. Thereafter his day set to begin. Meanwhile he went to Rome the diplomatic reason but he deliberately visited to ancient arens of Rome. After learning its particulars he wished to have such arena in Kolhapur and in this way the idea of 'Khasbaugh Maidan' took place. He had built many wrestling arenas in Kolhapur nearby places. He had given exhort and encouragement not only to Maharashtrian wrestlers but other state wrestlers also, particularly Panjabi wrestlers. Many Panjabi wrestlers used to come to Kolhapur for participating into wrestling competition and won the money prizes, Bharjari Feta (turbun) of honor, silver Gadaa besides blessings of ShahuMaharaj. Wrestlers like Chandan wrestler, Rahimbaksha wrestler, Gama wrestler, Imambaksha wrestler, Hasanbaksha wrestler, ShivappaBerad wrestler, Hamdukaka wrestler, GulabMohiddin wrestler and many more wrestlers came into the patronage of Shahu Maharaj.

Rajarshi Shahu Maharaj was deeply involved in wrestling. He has donated more than lakhs rupees for the arenas of wrestling and for the diet of wrestlers like- milk, eggs, chicken-mutton, dry fruit, fruit,etc. he was very strict about the diet and exercise of the wrestlers. Many more time he himself participated in the exercise and gave them coaching. He taught them many tactics of wrestling. Shahu Maharaj had become the patron of more than hundred wrestlers in Kolhapur. He had built many wrestling arenas in Kolhapur like- Plalace Red soil arena, Arena of Bapusaheb Maharaj, Kala Imam Arena, Gangavesh Arena, Ghodanpeer Arena, Bavadekar Arena, Bajaprao Mane Arena, Motibaugh Arena, Dilbahar Arena, NathaGole Arena, Uttareshwar Arena, Dotre Arena, Bodke Arena, Shipugade Arena, Rankala Arena, Mahakali Arena, JunaBudhwarPeth Arena, Babujamal Arena, Mangalwarpeth Arena etc. From these wrestling arenas many inveterate wrestlers came out and earned their name in wrestling ring.

In 1895, Rajarshi Shahu Maharaj has established 'Motibaugh Arena' in which he deliberately stuck a board with the thoughtful message is"The real virtuous person is like that, who has first wealth of health, second wealth of offspring and third wealth of property wealth". There is no doubt, this thoughtful board definitely encouraged the wrestlers.

Rajarshi Shahu Maharaj has done a lot things for wrestling and wrestlers. He had organized a ticket show of wrestling competition not for earning purpose but for the wrestler'swelfare, and diet. He used to run a scheme called 'Hazari Fund' for the wrestler'swelfare. In and used only for wrestlers welfare. Once Shahu Maharaj came to know that after the retirement of wrestler he has to face many problem like- money problem, earning problems, enternal feeding problem, oldage problem etc. So Rajarshi Shahu Maharaj had started pension policy for retired wrestlers, provided many opportunities of employment in police, in office, in security etc. he had done many things for the wrestlers.

Conclusion:

In this way Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj has contributed in sports, particularly in Wrestling. He was the true patroniser of sports, not only sports but sculpture, painting and drama. He was the rare in rare example of 'King of the People'. No one could match his dignity in the terms of social welfare, education, casteism,

patroniser of farmers, wrestler, artist, actor, and litterateurs. His type of king in the past never born and in the future ever born. In the present era, there should be a prominent person like-Rajarshi Shahu Maharaj who come again reset all the wrong customs, and provide a royal patronage to farmers, sports persons, artists, actors, painters, and litterateurs.

Bibliography:

1) Pawar J., ed (2001). Rajarshi Shahu Maharaj Granth. Maharashtra Academy of History, Kolhapur
2) SalunkheNanasaheb. (2007) Shahunchya Aathvani, Vrushali Prakashan
3) Keer Dhananjay. (1977). Shahu Chhatrapati: A Royal Revolutionary. Popular Prakashan, Bombay. 1976
4) Latthe, AB. (1924). Memoirs of His Highness Shri Chhatrapati Maharaj of Kolhapur, Times of India, Press, Bombay, 1924, Vol. II, pp. 452-53

■■■